अस्पृष्टांचा प्रश्न

म. ग्रं. सं. ठाणें
विषय अस्पृश्य
नं. क्र. ८२५५

REFBK-0004806

श्रीपाद महादेव माटे

अस्पृश्यांचा प्रश्न



लेखक

श्रीपाद महादेव माटे एम. ए.



REFBK-0004806

१९३३

किंमत दोन रुपये

मुद्रक व प्रकाशक

शंकर रामचंद्र दाते,

लोकसंग्रह छापखाना, ६२४ सदाशिव पेठ, पुणें.

प्रस्तावना

हें पुस्तक लिहून प्रसिद्ध करावें असा माझा फारा दिवसांचा हेतू होता. परंतु आजवर तो योग आला नाहीं. याचें मुख्य कारण तरी हेंच कीं अंगावर येवढी जवाबदारी घेणारा कोणी प्रकाशकच लाभेना. यांतील कित्येक प्रकरणें मी लिहूनहि ठेविलेलीं होतीं व शेवटीं तीं शिळीं होण्याचा प्रसंग येऊं लागला. पण शेवटीं लोकसंग्रह छापखान्याचे चालक श्री. शंकरराव दाते यांनीं ही जबाबदारी पत्करली. " मी छापतों व प्रसिद्ध करतों " असें त्यांनीं म्हटल्यावर मी ग्रंथरचनेच्या उद्योगास लागलों. दुर्दैवानें शाळा बंद झाल्यामुळें त्या रिकामपणाचा उपयोग मला या कामाकडे करितां आला. पण आधीं अपेक्षा केली होती तीप्रमाणें दसऱ्यापर्यंत हें काम उरकलें नाहीं. प्लेगमुळें मला रिकामपण मिळालें हें खरें; पण प्लेगमुळेंच माझे लेखन–व्यवसायांतील जे नेहमीचे मदतनीस–त्यांच्या साहाय्यास मी पुष्कळच अंतरलों. त्यामुळें विजयादशमीचा मुहूर्त साधतां आला नाहीं व जाहिरातींत दिलेली तारीख दोन वेळां चुकली. तथापि प्लेगमुळें उत्पन्न झालेला चिन्ता-तुरपणा हा जरी कामांत व्यत्यय आणीत होता तरी वेळांत वेळ काढून व आपल्या कामाचे उपक्रम बदलून इतिहास–संशोधक श्री. शंकरराव जोशी, श्री. शंकरराव साठे, श्री. दिवेकर वकील व रा. शिवरामपंत आंबर्डेकर यांनीं मला शक्य तितकी सर्व मदत केली; त्यामुळें निदान दिवाळीच्या मागोमाग तरी पुस्तक प्रसिद्ध करतां येत आहे. पुस्तकाची जबाबदारी पत्करण्यांत रा. शंकरराव दाते यांनीं मोठेंच धाडस केलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. या सर्व मंडळींचा मी मनापासून आभारी आहें.

हें पुस्तक तयार करतांना रिस्ले, ब्लंट, एन्थोवेन, मार्टिन, मोलोनी, अबदुल मजीद, सेजविक, ड्रेकप्, सॉर्ली, इत्यादि गणनाकोश (Census Reports) करणारांच्या या कोशवाङ्मयाचा मी पुष्कळच उपयोग केलेला आहे. त्याप्रमाणेंच एन्थोवेन, थर्स्टन्, हॉड्सन्, अंडरसन्, विड्ने, भट्टाचार्य, राजवाडे, रानडे, एम्. केनेडी, ब्रूअर, महालक्ष्मीवाला यांच्या ग्रंथांचाहि

जरूर तेवढा उपयोग केलेला आहे. तसेंच राऊंड टेवल कॉन्फरन्सच्या निमित्तानें जें अस्पृश्यविषयक मुबलक वाङमय प्रसिद्ध झालें आहे त्याचाहि मला अतिशय उपयोग झाला आहे. वरील सर्व ग्रंथकर्त्यांचा व वाङमय लिहिणारांचा मी फार ऋणी आहें.

या पुस्तकांत प्रथम अस्पृश्य म्हणजे कोण याची चिकित्सा करून त्यांची प्रांतवार संख्या निश्चित करण्याचा यत्न केला आहे. या दोनहि मुद्यांवर स्टार्ट कमिटीच्या रिपोर्टांत व फ्रान्चॅइज कमिटीच्या प्रांतिक व भारतीय रिपोर्टांत इतका बारीक खल झालेला आहे कीं, तें सर्व वाङमय कोणी जसेंच्या तसें जरी प्रसिद्ध केलें तरी सुद्धां तें आज मनोरंजक व उपयुक्त ठरेल, व मतदानाचा अधिकार जास्त करण्याचें ठरल्यामुळें संथ असलेलें जातिविचाराचें पाणी सध्यां कसें उधसलें आहे हेंहि दिसून येईल. बृहन्महाराष्ट्रांतील ज्या चार पांच प्रमुख अस्पृश्य जाती आहेत त्यांच्या जीविताची ओळख व्हावी म्हणून त्यांच्या हकीकती होतांहोईतों सविस्तर देऊन मग त्यांच्या पुढाऱ्यांचें मनोगत काय आहे हें दर्शविणारे निरनिराळ्या स्थळचे व निरनिराळ्या प्रसंगींचे त्यांचे उद्‌गार दिलेले आहेत. यानंतर ज्या वन्य इत्यादि जातींचा प्रश्न या अस्पृष्टांच्या प्रश्नाच्या मागोमाग येत आहे व कदाचित् या प्रश्नांशीं तो कायमचाहि निगडित होईल त्या जातींपैकीं महाराष्ट्रांतील कांहीं थोडया जातींचीं वर्णनें देऊन मग अखिल भारतांत या जाती कोठें कोठें पसरल्या आहेत हें त्यांच्या प्रांतवार लोकसंख्येसह दिलें आहे. येथपर्यंत हा माहितीचा भाग वाचला म्हणजे भारतीय अस्पृष्टांविषयींची बरीचशी कल्पना वाचकांना येईल असा अंदाज आहे. यानंतर 'अस्पृश्यतेची उपपत्ति' या विस्तृत प्रकरणांत अस्पृश्यता कशी स्थापित झाली असावी याचें विवेचन करून स्पृश्यांच्या या मनोभावनेचा आविष्कार शास्त्र, इतिहास इत्यादिकांत निरनिराळ्या तऱ्हांनीं कसा झाला हें दाखविलें आहे. यानंतर महाराष्ट्रांतील मुख्यतः महार जातीची स्थिति हळूंहळूं कशी बदलत गेली व शेवटीं मराठी राज्यांत तिला काय रूप आलें याचें विवेचन केलें आहे. नंतर इंग्रजी अमदानीच्या सुरवातीस अस्पृश्यांच्या प्रश्नाकडें धर्मसुधारकांचें मन कसें वळलें व शेवटीं राजकीय विचाराचें रूप त्याला

हळूं हळूं कसें येऊं लागलें हें सांगितलें आहे. पुढें नवें युगमान या प्रकरणांत अस्पृश्यता कां जावी व या कामीं भावना व बुद्धि यांचा निर्णय एकच कसा येतो हें सांगून पुढें वर्णकर्मचिकित्सेचें व संधि-समानतेचें तत्त्व विस्तरशः विवेचिलें आहे. यापुढें सुधारकाची जबाबदारी कोणची याचें विवेचन करून पाणी, देऊळ यासंबंधींचीं अस्पृष्टांचीं गाऱ्हाणीं निरनिराळ्या वाङ्मयविशेषांनीं सांगितली आहे. यापुढें अस्पृश्यतानिवारणाच्या कामीं ज्यांना कोणास प्रतिपादक बनावयाचें असेल त्यांच्या उपयोगी पडण्यासारख्या अनेक कल्पना नमूद केल्या आहेत. यानंतर आपलें स्वतःचें बरें करावयास जे कोणी अस्पृष्ट पुढारी कामें करूं लागतील किंवा जे स्पृश्य सुधारक हेंच काम अंगावर घेतील त्यांना आपलीं अनुमानें पायाशुद्ध बनवितां यावीं म्हणून १९३१ सालच्या नव्या गणनाकोशांतून अस्पृष्टांच्या जीविताच्या विविध अंगांची मुबलक आंकडेवारी दिली आहे. यानंतर अस्पृष्टांचीं कर्तव्यें काय आहेत हे सांगून शेवटीं 'भावी काळ' या नांवाच्या प्रकरणांत हिंदुस्थानच्या भावी राजकारणाचा या समाजसुधारणेशीं कसा संबंध पोचतो व म्हणून ती घडवून आणण्यासाठीं पृथक् पृथक् अशा कोणच्या उपायांचा अवलंब करावयास हवा याचें विवेचन केलें आहे. येथवरचा भाग वाचला म्हणजे अस्पृश्यता–निवारणाची सुयुक्तता व त्याची पद्धति हीं वाचकांच्या ध्यानीं येतील अशी अटकळ आहे. यापुढें आमच्या अस्पृश्यतानिवारक मंडळानें गेल्या सोळा वर्षांत जें कांहीं थोडेंबहुत काम केलें आहे त्याचें संक्षिप्त वर्णन दिलें आहे. या वर्णनांत अस्पृश्यता–निवारणाच्या कामीं उपयोगी पडण्यासारख्या अनेक बारीक बारीक सूचना प्रतिपादकास सांपडतील.

वरील सर्व लेखनांत कोणाकोणाचें थोडें मन दुखविण्याचा प्रसंग आलेला आहे. अस्पृष्टांची संख्या आजवर जितकी आहे असें वाटत होतें तितकी ती नाहीं असें म्हटल्याबद्दल कोणास नुकसान झाल्यासारखें वाटेल; अस्पृष्टांच्या पोटजातींतील परस्पर अविश्वासाविषयीं लिहिलें म्हणून कोणाला राग येईल; आपलीं मनोगतें दिल्याबद्दलहि कदाचित् कोणा अस्पृष्टास कसेसेंच वाटेल; शास्त्रवचनांचा पाढा दिला आहे तो गैर-सोयीचा आहे असें कोणास वाटेल; अस्पृश्यतेचें मूळ शोधतांना, आर्यवंशीय,

द्रविडवंशीय व आदिद्रविड यांच्या मनःसामर्थ्यांची केलेली चर्चा कोणास आवडणार नाहीं; अस्पृश्यता स्थापन होण्याच्या कामीं द्रविडांचा कांहीं संबंध होता कीं काय हें सूचित केलेलें अनुमान कित्येकांस आक्षेपार्ह वाटेल; मराठी राज्याच्या शेवटपर्यंत निदान सैन्यांत तरी महार समाजाची स्थिति कशी पुष्कळच सुधारलेली होती याचें विवेचन वाचून आक्षेपकांना आपल्या हातांतील एक ठराविक शस्त्र गेलें असें पाहून थोडें चुकल्यासारखें होईल; शास्त्र कितपत पाळावें याचें विवेचन व वर्ण–कर्म–कल्पनेची चिकित्सा वाचून सनातन बांधवांना मोठाच मनस्ताप होईल; आपल्या सुधारणा-कांडांत कांहीं चुका होत आल्या आहेत असें म्हटल्याबद्दल सुधारकांना आपली थोडी रूपहानी झाली आहे असें वाटेल; महात्मा गांधी यांच्याशीं कोठें कोठें मतभेद दर्शविला असल्यामुळें त्यांच्या अनुयायांना कांहींसा विषाद वाटेल; सहभोजन व मिश्रविवाह यावरील चर्चा वाचून इतकें मूलगामी बोलण्याची जरूरी नाहीं असें कांहीं जणास वाटेल; कदाचित् कोणा वर्तमान-पत्रकर्त्यांना व पुढाऱ्यांना आपला मुलाहिजा पुरेसा ठेवला नाहीं असें पाहून पोटांत थोडा रागहि येईल. परंतु या सर्वांना अत्यंत नम्रपणानें मला येवढेंच सांगावयाचें आहे कीं, माझें त्या त्या प्रकरणांतील विवेचन जितकें तर्कशुद्ध ठेवितां येईल तितकें मीं ठेविलें आहे व केवळ भावनावश होऊन शुद्ध तत्त्वविचारांपासून होतां होईतों न ढळण्याची खबरदारी मीं राखली आहे. तथापि सध्यां जातिविषयक खळवळ फार जोरानें चालूं असल्यामुळें कोणाच्या मनांत तात्त्विक मतभेदाचा जातिविचारांशीं संकर होणें हें अगदीं संभाव्य आहे; व तदनुसार थोडें हर्षविमर्ष जागे होणें हेंहि सहज आहे. पण ते तसे कोणाच्या चित्तांत झाले तर तें निमूटपणें सहन करणें येवढेंच मला करतां येण्यासारखें आहे.

महामहोपाध्याय वे. शा. सं. श्रीधरशास्त्री पाठक यांची माझ्यावर पहिल्यापासूनच कृपा आहे व शंकरराव जोशी यांचाहि माझ्याशीं फार दिवसांचा सुहृद्भाव आहे. या उभयतांनीं शास्त्रवचनें व ऐतिहासिक उल्लेख यांचा भरणा करून देऊन जें साह्य केलें त्याचें स्मरण मला निरंतर राहील. वे० शा० सं० महादेवशास्त्री दिवेकर यांचा शास्त्राची वाढ कशी होत गेली आहे हें उलगडून दाखविणारा ग्रंथ या माझ्या पुस्तका-

बरोबरच कदाचित् प्रसिद्ध होणार आहे. ज्यांना शास्त्रवचनांची जास्त चिकित्सा पहावयास हवी असेल त्यांनीं ती तेथें पहावी. त्यांचा ग्रंथ आतांच जर प्रसिद्ध व्हावयाचा नसता तर शास्त्रवचनांची जास्त चिकित्सा याहि ग्रंथांत केली असती. असो. अस्पृश्यांचा प्रश्न आतां खास सुटणार असें वाटूं लागलें आहे. एका अंगास खुद्द सरकारच व दुसऱ्या अंगास देशांतील प्रमुख राजकीय पुढारी म. गांधी हीं दोघेहि या प्रश्नाच्या सोडवणुकीस सिद्ध झालीं आहेत. त्याप्रमाणेंच हिंदुमहासभेचे नेते जे डॉ. मुंजे व भाई परमानंद हेहि आपली शिकस्त करीत आहेत. त्याप्रमाणेंच आर्यसमाज, प्रार्थनासमाज, ब्रह्मसमाज, डी. सी. मिशनसारख्या ठिकठिकाणच्या संस्था, मोठामोठाल्या संस्थानांचे अधिपति व अनेक पराक्रमी व्यक्ती या आपत्तीवर तुटून पडत आहेत. शास्त्रीपंडितांत फाटाफूट पडत आहे, व वर्णाश्रमधर्मवाद्यांची वृत्ति थोडी तरी निवळत चालली आहे. खुद्द अस्पृश्य समाजांतूनहि मोठमोठाले सुधारक निपजत आहेत. हें पाहून ही अस्पृश्यता आतां झपाट्यानें हटत जाणार असें वाटूं लागतें. याच प्रसंगीं या विषयांत ज्यांनीं आपली सर्व हयात घालविली असे जे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनीं आपलें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे; समाजाची सेवा हेंच आपलें व्रत बनविलेले जें महादेवशास्त्री दिवेकर त्यांचेंहि पुस्तक वाट चालत आहे व माझें हें पुस्तक मी प्रसिद्ध करीत आहें. पहिल्या दोन पुस्तकांचा हा प्रश्न सोडविण्याच्या कामीं मोठाच उपयोग होईल हें त्या लेखकांच्या अधिकारावरूनच सहज दिसून येतें. माझ्या या पुस्तकाचाहि त्याच कामीं थोडाबहुत उपयोग झाला तर मला फार बरें वाटेल.

पुणें
कार्तिक शु. १, १८५५ } श्रीपाद महादेव माटे

☞ प्रथम सविस्तर अनुक्रमणिका जरूर वाचावी.

श्री. आण्णासाहेब भोपटकर

अर्पण

श्री. **लक्ष्मण बळवंत उर्फ आण्णासाहेब भोपटकर** एम्. ए. एल्एल्. बी. यांचा जन्म सन १८८० त झाला. सर्व शिक्षण संपवून १९०९ सालीं त्यांनीं वकिलीच्या धंद्यास आरंभ केला. दरम्यानच्या काळांत इकडे विद्याभ्यास चालूं असतां कुस्ती, दांडपट्टा, देशी व्यायाम–पद्धति व खेळ यांचें ज्ञान ओळीनें सहा वर्षेंपर्यंत ते संपादीत होते. १९०५ ते १० पर्यंत वडील बंधू भास्कर वळवंत ऊर्फ भाऊसाहेब भोपटकर यांच्या बरोबर त्यांनीं भाला पत्राच्या संपादकाचें काम केलें. महाराष्ट्र विद्यालय या नांवाचें जें राष्ट्रीय हायस्कूल पूर्वीं पुणें येथें होतें तें या भोपटकर बंधंनीं आपल्या हिंमतीवरच काढलें होतें. १९०५ सालीं भाऊसाहेब भोपटकर यांना राजद्रोहाबद्दल शिक्षा झाली; तेव्हां यांनींच भाला पत्र चालविलें. १९१५ सालपासून ते सार्वजनिक कार्यांत प्रत्यक्ष पडूं लागले. लोकसंग्रह दैनिकाचा खर्चाचा बोजा कित्येक दिवसपर्यंत उचलून त्यांनीं दोन वर्षेंपर्यंत या पत्राचें संपादकत्वहि केलें. महाराष्ट्र प्रां. कॉं. कमिटीचे ते चार वर्षें अध्यक्ष होते व ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे अनेक वर्षें सभासद होते. पुण्यांतील बहुतेक संस्थांशीं त्यांचा संबंध असून महाराष्ट्र-व्यायाम-शाळा ही संस्था तर केवळ त्यांच्या पुरस्कारामुळेंच येवढी भरभराटीस येत आहे. पूना लॉ कॉलेज सुरूं करण्याच्या कामांतहि त्यांचा पुढाकार होता. व तें सुरूं झाल्यापासून ते तेथें कायद्याचे प्रोफेसर व व्हाईस प्रिन्सिपल आहेत. १९३० सालीं कायदेभंगाच्या चळवळींत त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली व १९३२ सालीं येरवड्यास त्यांना दोन महिने डेटिन्यू म्हणून ठेवलें होतें; व तेव्हांपासून अजूनहि सरकारनें त्यांच्यावर कांहीं अटी लादलेल्याच आहेत.

ऐन उमेदींत असतांना त्यांनीं लिहिलेलीं दोन पुस्तकें सरकारजमा झाल्यावर वर्तमानपत्राच्या लेखनापलीकडे किंवा मासिकांतील प्रासंगिक लेखांपलीकडे ते फारसे फिरकले नाहींत. पण ग्रंथलेखनाची त्यांची हौस पुन्हां परत आली. Law of Torts इत्यादि कायद्याचीं पुस्तकें, दांडपट्टा, कुस्ती हीं व्यायामविषयींचीं पुस्तकें, तसेंच नवरत्नांचा हार हें ऐतिहासिक गोष्टींचें पुस्तक व मृत्यूच्या मांडीवर ही कादंबरी हीं पुस्तकें त्यांनीं लिहिलीं

आहेत. त्यांच्या वकिलीच्या ज्ञानाला फार मोठी मागणी आहे व अनेक देशभक्तांचे खटले विनामूल्य चालवून त्यांनीं त्यांस उपकृत केलें आहे. आपला मोठा धंदा संभाळून इतर अनेक व्यवसायांत व लोकहिताच्या कार्यांत ते मन घालतात व त्यावरोवरच कोरडी सहानुभूति न दाखवितां संपत्तीचा सद्व्यय म्हणून सढळ हातानें मदत करतात. केसरीप्रवोध, केळकरग्रंथ व महाराष्ट्र सांवत्सरिक या ग्रंथांचीं अवाढव्य कामें अण्णासाहेव यांच्या रेटकपणामुळेंच तडीस गेलीं असें म्हणावयास हरकत नाहीं.

१९०५ सालापासून ते या अस्पृश्यता–निवारणाच्या विषयावर लिहीत व वोलत आहेत. इतक्या पूर्वी, सध्यां नागपूराकडे प्रतिष्ठा प.व-लेल्या एका अस्पृश्य पुढाऱ्याला मुद्दाम वोलावून आणून त्यांनीं पुणें येथें त्याचें व्याख्यान करविलें होतें. राजकीय मतस्वातंत्र्याव रोवरच सामाजिक मतस्वातंत्र्यहि असावें असें त्यांचें ठाम मत आहे व त्यास अनुसरूनच त्यांनीं आपलें या विषयाचें प्रतिपादन चालूं केलें होतें. त्यांची व माझी ओळख होण्याला हेंच कारण झालें; व तेव्हांपासून आजपर्यंत सतत पंधरा सोळा वर्षें आम्हांला जें कांहीं या विषयांत अल्पस्वल्प करतां येण्यासारखें होतें तें आम्ही एकमतानें करीत आलों आहों. आमच्या अस्पृश्यतानिवारक मंडळाचे ते कायमचे अध्यक्ष आहेत व मी काय-मचा चिटणीस आहें. आजपर्यंत जे कोणी या मंडळांत आपुलकीनें काम करीत आले आहेत ते सर्व मंडळाचे कायमचे सभासद आहेत. मंडळाला वर्गणी नाहीं व व्होटहि नाहीं. याचा अर्थ आम्ही सभासदांना कांहीं विचारीत नाहीं असा मुळींच नाहीं. पण सर्व चर्चा यथास्थित करून कोणचाहि उपक्रम आम्ही करीत असल्यामुळें मतभेद झाल्याचें किंवा झाल्यास तो दुस्तर ठरल्याचें आम्हां कोणांस आठवत नाहीं. चळवळींतील रोजचा जो कांहीं धवडगा असतो त्यांत आण्णासाहेव उतरत नसल्यामुळें यांच्या मतप्रतिपादनांत एक तऱ्हेची तुरमुंडी आहे; व म्हणून त्यांचें भाषण ऐकत असतांना ते या विषयांत मोठे एकांतिक मताचे असावे असें लोकांस वाटतें. पण "लोकांच्या मनाला धक्के दिले पाहिजेत" हें जें त्यांचें आवडतें वाक्य त्याच्या अर्थाच्या व्याप्तीपुरतीच ही त्यांची तुरमुंडी असते. तर्कशुद्ध व सद्भावनापूत असें मत बनविण्याची जरूरी ते नेहमींच ओळखतात व तें बनविण्याची धमकहि बाळगतात. त्यांचें

दातृत्वहि मोठें आहे व त्याचा मुख्य गुण म्हणजे हा आहे कीं तें कधीं कण्हत कुथत आल्यासारखें दिसत नाहीं. आपल्याला जें कांहीं देतां येण्यासारखें असेल तें आण्णासाहेब मनांत आल्याबरोबर तटकन् देऊन टाकतात. या त्यांच्या औदार्याचा आमच्या या मंडळाच्या कामाला फारच मोठा उपयोग झाला आहे. याबरोबरच बारिकसारिक मतभेदाचे कांहीं कानेकोपरे असले तर त्यांकडे काणाडोळा करण्याला मनाची जी एक साळढाळ वृत्ति असावी लागते तीहि त्यांजपाशीं मोठीच आहे. यामुळें आम्हांस कांहीं थोडेंबहुत करतां आलें व पुढेंहि करतां येईल असें वाटतें. या त्यांच्या औदार्याचें व भलेपणाचें मोल कशानेंच होणार नाहीं. पण आपली कृतज्ञता दाखविण्याला ही एक संधि आहे हें पाहून त्यांना अत्यंत प्रिय असलेला जो अस्पृश्यतानिवारण हा विषय त्या वरचें माझें हें पुस्तक मित्रभावानें मी त्यांस नजर करतों.

श्री. म. माटे

आहेत. त्यांच्या वकिलीच्या ज्ञानाला फार मोठी मागणी आहे व अनेक देशभक्तांचे खटले विनामूल्य चालवून त्यांनीं त्यांस उपकृत केलें आहे. आपला मोठा धंदा संभाळून इतर अनेक व्यवसायांत व लोकहिताच्या कार्यांत ते मन घालतात व त्यावरोबरच कोरडी सहानुभूति न दाखवितां संपत्तीचा सद्व्यय म्हणून सढळ हातानें मदत करतात. केसरीप्रबोध, केळकरग्रंथ व महाराष्ट्र सांवत्सरिक या ग्रंथांचीं अवाढव्य कामें अण्णासाहेब यांच्या रेटकपणामुळेंच तडीस गेलीं असें म्हणावयास हरकत नाहीं.

१९०५ सालापासून ते या अस्पृश्यता–निवारणाच्या विषयावर लिहीत व बोलत आहेत. इतक्या पूर्वी, सध्यां नागपूराकडे प्रतिष्ठा प.व-लेल्या एका अस्पृश्य पुढाऱ्याला मुद्दाम बोलावून आणून त्यांनीं पुणें येथें त्याचें व्याख्यान करविलें होतें. राजकीय मतस्वातंत्र्याबरोवरच सामाजिक मतस्वातंत्र्यहि असावें असें त्यांचें ठाम मत आहे व त्यास अनुसरूनच त्यांनीं आपलें या विषयाचें प्रतिपादन चालूं केलें होतें. त्यांची व माझी ओळख होण्याला हेंच कारण झालें; व तेव्हांपासून आजपर्यंत सतत पंधरा सोळा वर्षें आम्हांला जें कांहीं या विषयांत अल्पस्वल्प करतां येण्यासारखें होतें तें आम्ही एकमतानें करीत आलों आहों. आमच्या अस्पृश्यतानिवारक मंडळाचे ते कायमचे अध्यक्ष आहेत व मी काय-मचा चिटणीस आहें. आजपर्यंत जे कोणी या मंडळांत आपुलकीनें काम करीत आले आहेत ते सर्व मंडळाचे कायमचे सभासद आहेत. मंडळाला वर्गणी नाहीं व व्होटहि नाहीं. याचा अर्थ आम्ही सभासदांना कांहीं विचारीत नाहीं असा मुळींच नाहीं. पण सर्व चर्चा यथास्थित करून कोणचाहि उपक्रम आम्ही करीत असल्यामुळें मतभेद झाल्याचें किंवा झाल्यास तो दुस्तर ठरल्याचें आम्हां कोणांस आठवत नाहीं. चळवळींतील रोजचा जो कांहीं धबडगा असतो त्यांत आण्णासाहेब उतरत नसल्यामुळें यांच्या मतप्रतिपादनांत एक तऱ्हेची तुरमुंडी आहे; व म्हणून त्यांचें भाषण ऐकत असतांना ते या विषयांत मोठे एकांतिक मताचे असावे असें लोकांस वाटतें. पण "लोकांच्या मनाला धक्के दिले पाहिजेत" हें जें त्यांचें आवडतें वाक्य त्याच्या अर्थाच्या व्याप्तीपुरतीच ही त्यांची तुरमुंडी असते. तर्कशुद्ध व सद्भावनापूत असें मत बनविण्याची जरूरी ते नेहमींच ओळखतात व तें बनविण्याची धमकहि बाळगतात. त्यांचें

दातृत्वहि मोठें आहे व त्याचा मुख्य गुण म्हणजे हा आहे कीं तें कधीं कण्हत कुथत आल्यासारखें दिसत नाहीं. आपल्याला जें कांहीं देतां येण्यासारखें असेल तें आण्णासाहेब मनांत आल्याबरोबर तटकन् देऊन टाकतात. या त्यांच्या औदार्याचा आमच्या या मंडळाच्या कामाला फारच मोठा उपयोग झाला आहे. याबरोबरच बारिकसारिक मतभेदाचे कांहीं कानेकोपरे असले तर त्यांकडे काणाडोळा करण्याला मनाची जी एक साळढाळ वृत्ति असावी लागते तीहि त्यांजपाशीं मोठीच आहे. यामुळें आम्हांस कांहीं थोडेंबहुत करतां आलें व पुढेंहि करतां येईल असें वाटतें. या त्यांच्या औदार्याचें व भलेपणाचें मोल कशानेंच होणार नाहीं. पण आपली कृतज्ञता दाखविण्याला ही एक संधि आहे हें पाहून त्यांना अत्यंत प्रिय असलेला जो अस्पृश्यतानिवारण हा विषय त्या वरचें माझें हें पुस्तक मित्रभावानें मी त्यांस नजर करतों.

श्री. म. माटे

अनुक्रमणिका

विषय	पान
अस्पृश्य म्हणजे कोण ?	१–१९
अस्पृश्य व अस्पृष्ट	१
महायुद्धाचा चमत्कार	२
लोकसत्तेची ललकारणी	३
डिप्रेस्ड क्लासेस या शब्दाची व्याप्ति	४
स्टार्ट कमिटीचें मत	६
अस्पृश्यतेची व्याख्या	७
संयुक्त प्रांतांतील भांडण	८
बंगालचें भांडण	११
मूळ चूक कोणाची ?	१२
आसामांतील डिप्रेस्ड क्लासेस	१३
पंजाबांतील भांडण	१४
चिंतामणी, तांबे, बखले	१५
अस्पृश्यतेची व्याख्या	१८
अस्पृश्य लोकसंख्या	२०–३१
स्टार्ट कमिटीनें दिलेल्या मुंबई इलाख्यांतील अस्पृष्ट जातींचे १९३१ चे आंकडे	२१
मद्रास इलाख्यांतील आंकडे	२३
अंतरावरून ज्यांचा विटाळ धरतात त्या जातीचे आंकडे	२६
निजामचें राज्यांतील अस्पृश्यांचे आंकडे	२६
मध्यप्रांत व वऱ्हाड, आंकडे	२७
बंगाल, आंकडे	२८
बिहार व ओरिसा, आंकडे	२९

संयुक्त प्रांत, आंकडे ३०
पंजाब, आंकडे ३१
अस्पृश्य जातींची माहिती ३२–६१
महार ३२
चांभार ४३
मांग ४६
ढोर ५२
कीलघा ५७
खालपा ५७
तुरी ५१
सिंधव ६०
अस्पृष्टांचीं मतें व त्यांच्या आकांक्षा ६२–९५
श्री. श्रीनिवास ६३
डॉ. आंबेडकर ६७
महाराष्ट्रांतील मातंग समाज ७७
रा. ब. राजा ७९
भारतीय अस्पृश्य समिती इ. ८६
श्री. भाग्यारेड्डी ८७
श्री. ढवरे ९१
श्री. घोलप ९४
मागसलेल्या व गुन्हेगार जाती ९६–१०४
वंजारी ९६
कोळी ९७
भामटा ९८
भिल्ल ९९
कातकरी १००
कैकाडी १००
मांग गारुडी १०१

पारधी १०२
रामोशी १०२
वडार १०३
पठाण १०३

रानटी व डोंगरी लोक यांचीं मुंबई इलाख्यांतील ठिकाणें व त्यांच्या लोकसंख्या १०५–१०६
मुंबई इलाख्यांतील मागसलेले वर्ग १०७–११३
भारतांतील मागसलेल्या जाती ११४–१२०
स्थलवार लोकसंख्या ११४
अस्पृश्यतेची उपपत्ति १२१–१६६
कारणमीमांसेची जरूरी १२१
कारणमीमांसेची शक्यता १२२
नेल्सनचें मत १२४
यूरोपियन पंडितांचा अभ्यास व वंश–नकाशा १२५
हजारो जातींची वंशवारी १२६
जातींची वंश–पाहणी १२८
रिस्लेचा प्रयत्न १२८
आमच्या आठवणी १३०
नवागतांना रिचविणें १३१
वंश टिकविण्याची बुद्धि १३२
शूद्रातिशूद्र=द्रविडादिद्रविड १३३
सधर्मीयांनीं विवाह करावे लागतात हा अपसिद्धान्त आहे. १३६
लिंगायत पंथ १३७
शीख १३७
ख्रिस्ती–अँग्लो इंडियन्स १३८
पारशी १४०
मुसलमान १४१
स्वत्वरक्षण हा जीवकोटींतील श्रेष्ठ न्याय १४७

दक्षिण अमेरिकेंतील संकर १४८
इंग्रजांचा वंशाभिमान १५०
अमेरिकेंतील मिश्र जाती १५२
सांची येथील स्तूपावरील चित्राचा अर्थ १५३
रानटांचीं मनबुद्धींचीं सामर्थ्यें १५४
द्रविडादिद्रविडांविषयीं तेंच १५६
'कोण कुणाचें ऐकतो' १५८
'ते आपल्यांपैकींच' १५९
देवतांची देवघेव १६०
समाजबांधणीचा अवघडपणा १६१
घोर अन्याय १६२
तदनुसार दंडक १६३
अस्पृश्यच कां केलें ? १६४
'त्रिवर्ण' शब्दप्रयोग १६५
बंडाचें जागतिक रूप १६६
व्यवहारांतील स्पर्शास्पर्श-विचार १६७–१९५
शास्त्रवचनें–स्पर्श १६७
जलपान १७७
मंदिरप्रवेश १८०
मूर्तिस्पर्श १८२
हें शास्त्र मानावें काय ? १८३
अस्पृश्यतेचा जाच : सामाजिक, १८४
धार्मिक १८५
नाथनाक व देवकाई–समाधी १८६
शिवाजी राजाचा हुकूम १८७
चोखोबाची तक्रार १८९
म्हणी १९२
शिव्या १९४

विचाराचें बदललेलें वळण १९६–२३५
मांग हा वन्य १९६
महार हा भूमिपुत्र १९७
गांव तेथें महारवाडा १९९
महाराचीं कामें २००
महाराचे हक्क २०३
मनोरंजक तपशील २०९
महार साक्षीदार व न्यायाधीश २१३
आपद्धर्म शास्त्राधार २१५
परमार्थविचारांत प्रवेश २१७
विठ्ठलाचें दर्शन २१९
लष्करांत प्रवेश २२३
इंग्रजी अमलांतील खटपटी २२७

नवें युगमान २३६–२४८
भावना व बुद्धि या संवादी हव्या २३६
मनुष्ययोनीची स्थिरस्थावर २३८
राजसत्तेपासून लोकसत्तेपर्यंत २४०
माणसाची किमान किंमत बदलली २४२
नव्या युगमानाचें लक्षण २४४
देशाभिमान २४५
'सरकार करीतच आहे' २४७

वर्ण–कर्म–चिकित्सा २४९–२६७
कडकडीत जबाब २४९
जुळणी टिकेना २५०
आपापलें कर्म करावें २५१
विहित कर्माचा संकोच २५२
ब्राह्मणांचीं आडनांवें २५३
ब्राम्हणांचें धंदे २५४

आपद्धर्माचें तत्त्वज्ञान २५५
बौद्धिक कामगिरीची वाटणी २५६
असें कां करतो ? २५८
'किंमतच तितकी' २५९
समाज चाळविण्याची जरूरी २६०
तत्त्वज्ञानांत बदल २६२
कर्मचिें तत्त्वज्ञान २६३
संधी पाहिजे २६५
धर्मशिक्षणांत प्रवेश २६५
सुधारकाची जबाबदारी २६८–२८६
सुधारकांच्या परी २६८
'दुराग्रह' २७३
जुन्यानव्याची सांगड २७५
सापेक्ष–विचार २७८
हिंदु समाजाच्या स्थितींत फरक २८२
काय करावयास हवें २८६
पाणी २८७–२९५
धर्म व देऊळ २९६–३३३
धर्माचे उपकार २९६
मानसिक समाधान नाहीं २९७
ख्रिस्तीकरण २९८
देऊळवाल्यांचीं कर्तव्यें ३०३
मतपरिवर्तनाचें महत्त्व ३०७
प्रश्न कोणचा तो पहा ३०७
साधनाची कार्यसाधकता ३०८
'हक्क' शब्दाची व्याप्ति ३१०
देवळांचा सार्वजनिकपणा ३१२
महात्माजींस 'अनावृत पत्र' ३१४

महात्माजींचें उत्तर ३२०
कायदा ३२२
मुलाखत ३२५
देवदर्शनाची तडजोड ३२९
प्रतिपादकाची भूमिका ३३४–३६६
राजकारणांतील साधनें ३३४
हें धर्ममतबदलाचें काम आहे ३३५
समाज जाब देतो ३३५
प्रतिपादक सश्रद्ध नाहीं? ३३६
फडकरी हवा ३३७
समाज हेंच दैवत ३३८
राजकारण–निरपेक्ष प्रयत्न ३३९
हा प्रश्न हिंदूंचा आहे. ३३९
विषय–मिश्रण करूं नये ३४०
धोरण ३४१
मागल्या जन्मीचें पातक ३४३
स्वच्छता ३४५
सहभोजन ३४७
मिश्रविवाह ३५६
संत–वाङ्मयाचा आधार ३६०
अस्पृष्ट समाजाची आंकडेवारी ३६७–४००
संख्या ३६७
साक्षरता ३७१
शहराची ओढ ३७९
पोटजाति संख्या ३८०
स्थलांतर ३८४
तौलनिक शिक्षित संख्या ३८५
वैवाहिक जीवन ३८७
साक्षरता–हैद्राबाद ३९१
साक्षरता–मध्यप्रांत वऱ्हाड ३९२

तौलनिक वैवाहिक जीवन ३९४
मॅक्डोनल्ड ॲवॉर्ड ३९८
पुणें करार ३९९
अस्पृष्टांचीं कर्तव्यें ४०१–४३३
मतमांसाशन टाकावें ४०३
जातवारीची चुरस घालवावी ४०७
सर्वांनाच संधी पाहिजे ४१०
गरीब विद्यार्थ्यांची सोय ४१२
अस्पृश्य समाजांतील बेकारी ४२४
स्वराज्य कां हवें–डॉ. आंबेडकरांचें मत ४३०
जातिभेदाचा व धर्माचा बाऊ ४३३
भावी काल ४३४–४६४
नवें राजकारण ४३४
अविश्वास ४३६
सरकारी धोरण ४३९
मनाची लाज ४३९
पळवाट ४४०
'लोकसत्ताच देणार' ४४२
देशभक्त तेंच म्हणतात ४४४
आडवळणी विचार ४४५
मुख्य काम ४४६
मागसलेल्यांचें दुखणें ४४७
मराठ्यांची निरक्षरता ४४८
पायगोवा असलेला मराठा ४५०
पायगोवा नसलेला अस्पृष्ट ४५१
वन्य जाती ४५३
सरहद्दीवरच्या जाती ४५६
शिक्षणांत अंतर्भाव ४५८
शेवटची विनंति ४५९

अस्पृश्यता—निवारणाचे अनुभव

अस्पृश्यता—निवारक—मंडळ	१
अस्पृश्यता निवारक मंडळाचे सभासद	२
आरंभ व देवळाची कल्पना	४
लोकमान्यांचें मत	८
नव्या देवळाची कल्पना	९
आळंदी येथील खटपट	११
अस्पृश्यांच्या वस्तींतील काम	१५
पहिली शाळा	१६
शाळांची वाढ	१९
गुलटेकडीवरील मुसलमानांचें प्रकरण	२३
मुसलमानांच्या कारवाया	२६
आगाखान यांस उघड पत्र	२७
महात्माजींची भेट व त्यांचें उत्तर	३१
शाळा आश्रयाचें ठिकाण बनलें	३२
मीठगंजांतील महारवाडा	३२
रामा महाराची हकीकत	३४
नव्या शाळा काढणें	३७
शाळांची जातवारी	३९
आमची शिक्षणपद्धति	४१
कामाचा व्याप	४३
अडाणी म्युनिसिपल मेंबर	४५
शाळांची यादी	४८
मतप्रचारासाठीं दौरा	४९
माहितीचा तक्ता	५६
मतप्रसाराचें कार्य	५८
अस्पृष्ट समाजांतील प्रचारक	५९
प्रचारांतील निरनिराळे अनुभव	६२

पंडित–परिषद्	६६
अस्पृश्यांच्या परिषदा	६७
जमाखर्चाचा हिशेब	७१
सुताचा प्रयोग	७३
औषध–पाण्याची योजना	७४
वार लावणें	७५
अस्पृश्यांच्या वस्त्या झाडणें	७६
आंघोळी	७९
शिदोरी व अन्नदान	८०
विश्वास	८२
संशयी स्वभाव	८४
मराठा सावकार	८५
पठाणांविरुध्द तक्रार	८७
साळसूद ब्राह्मण	८७
जुगारीचें वेड	८९
दंडेलीचे प्रकार	९१
घराचें उच्चाटण	९२
जातीजातींच्या परिषदा	९४
इतर परिषदा	१०२
ब्राह्मणपरिषदांतील ठराव	१०३
पुण्याची हिंदुधर्म परिषद	१०४
इस्लामपूरची सभा	१०६
पुण्यास खटपट	१०९
टिळक विहिरीची सोय	११०
महाडचा अन्याय व न्याय	१११
गुन्हेगाराच्या वसाहती	११३
लोकमताचा प्रवाह	११५
पुण्यास देवळाबद्दल खटपट	११६
गणेशोत्सवांत अस्पृश्यांचा गणपति	११८

प्रचारकांची शाळा	११९
स्त्रियांस मारणें	१२१
पोथीवाचन	१२३
कै. वासुदेवराव आपटे	१२५
सत्याग्रहाची खटपट	१२६
धोरण	१३३
अलीकडच्या घडामोडी	१३४
अस्पृश्य समाजांतील कार्यकर्ते	१४२
रा. राजभोज	१४२
रा. के. के. सकट	१४३
रा. वायदंडे	१४४

अस्पृश्यांचा प्रश्न

'अस्पृश्य' म्हणजे कोण ?

पुढील सर्व विवेचनांत 'अस्पृश्य' व 'अस्पृष्ट' हे शब्द समान अर्थाचे म्हणून वापरले आहेत. ज्यांना आपण 'अस्पृश्य' असें म्हणतों त्यांना 'अस्पृष्ट' असें म्हणावें असें माझें मत आहे. तीन वर्षांपूर्वी सरकारानें नेमलेली जी स्टार्ट कमिटी तिनें एक प्रश्नावलि अनेक लोकांकडे धाडिली होती. तिच्यांत 'अस्पृश्य' हा शब्द त्या त्या लोकांना अवमानास्पद वाटतो व म्हणून तो टाकून द्यावा व दुसरा कोणचा तरी योग्य अर्थाचा नवीन रूढ करावा अशी कमिटीनें सूचना केली होती व दुसरा कोणचा सुचवितां येतो हें विचारलें होतें. 'अस्पृश्य' शब्दानें शिवण्यास अयोग्य असा बोध होतो. मग जर तो शिवण्यास अयोग्य असें आपणच आपल्या शब्दानें म्हणणार तर त्याला शिवा असा आग्रह करणें कितपत प्रशस्त आहे? हा विचार वरोवर आहे; व म्हणूनच वरील विचारणा झाली होती हें स्पष्ट आहे. या प्रश्नावलीचें उत्तर देतांना मी लिहिलें कीं 'अस्पृश्य' हा शब्द रद्द करून त्याच्याऐवजीं 'अस्पृष्ट' हा शब्द रूढ करावा. अस्पृश्य शब्दानें जो शेरा आपण मारतों तो या शब्दानें आपोआपच गळतो व शिवाय वस्तुस्थितीचें वर्णनही यथार्थ होतें. त्यांस आपण शिवत नाहीं हें खरेंच आहे; म्हणून तोही अर्थ या नव्या शब्दानें व्यक्त व्हावयास हवा व तें काम या 'अस्पृष्ट' शब्दानें चांगलें होतें. तेव्हांपासून मी हाच शब्द होताहोईतों वापरीत आहें. पण अस्पृश्य हा शब्द इतका रूढ झालेला आहे कीं तो एकदम रद्द होणें व तेथें हा अस्पृष्ट शब्द रूढ होणें हें कालगतीचें काम आहे. श्रोत्यांना व वाचकांनाही एकदम विचकल्यासारखें होतें; तें न व्हावें म्हणून या दोनही शब्दांचा उपयोग मीं सरमिसळीनेंच केला आहे. महात्मा गांधी यांनीं हरिजन शब्द प्रचारांत आणला आहे. वक्ते, लेखक, व अस्पृष्ट स्वतः ज्या शब्दांचा उपयोग जास्त जास्त करीत राहतील तोच शब्द शेवटीं कायम होईल. तोंपर्यंत तरी आपल्याला जो शब्द युक्त वाटतो तो घालावा

म्हणून मी 'अस्पृष्ट' असा शब्द घालतों. व हा अस्पृश्य शब्दासाठींच आहे हें वाचकांच्या मनांत कायम व्हावें यासाठीं अस्पृश्य हाही योजतों.

गेलीं पंचवीस वर्षेंच या अस्पृष्टांच्या प्रश्नांसंबंधानें खल चालू आहे. त्यांतही मॉंटेग्यू–चेम्सफोर्ड सुधारणांच्या वेंळेपासून याला जास्त महत्त्वं आलें व आतां तर अखिल–भारतीय असे जे सर्वव्यापी महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांतच याची गणना होते. देशांत राजकीय आन्दोलनें जों जों अधिक अधिक जोराचीं होऊं लागलीं व जबाबदार राज्यपद्धति सुरू होणार असें दिसू लागलें तों तों सर्व समाजभर जी जागृति झाली तिचेंच हेंही एक अंग होतें. जर लोकांचें राज्य व्हावयाचें व निवडणुकीच्या पद्धतीनें त्याचा बस बसावयाचा तर, जे जे कोणी लोक म्हणून असतील त्यांना त्यांना या अभिनव राजकारणाची हाक पोचणें साहजिक होतें व ज्यांना ती पोचण्यासारखी नव्हती त्यांजपर्यंत ती पोचविणें हें रास्त होतें. राजकीय वारे लोकसत्तेच्या दिशेनें वाहू लागावयाच्या आधीं सुधारकांनीं या प्रश्नाकडे लक्ष दिलेंच होतें. पण त्यांच्या विचाराचा तेव्हांचा व्याप धार्मिक व सामाजिक अंगापुरताच होता. दहापंधरा वर्षांत या प्रश्नाला राजकीय महत्त्वही प्राप्त होईल व त्याच्याद्वारां या अंगांचाही जोरानें विचार सुरू होईल ही कल्पना सुधारकांनाही नव्हती व खुद्द सरकारालाही नव्हती. पण महायुद्धानें जे अनेक चमत्कार घडवून आणले त्यांतीलच हाही एक होय कीं अस्पृष्टांच्या प्रश्नाला येवढें महत्त्व अकल्पितपणें प्राप्त व्हावें. स्वयंनिर्णय, स्वतंत्रता अशांसारख्या औदार्यवाचक व विमोचनवाचक शब्दांचा महायुद्धकालांत इंग्लंडांतून इतका सडा पडत होता कीं, धूर्तांचे मनोगत कांहींही असो, पण खुद्द इंग्रज लोकांनाही व हिंदी लोकांनाही ते शब्द खरेच आहेत व त्यांच्या अर्थांना जिवंत असा व्यावहारिक अर्थ उत्पन्न व्हावयाचा आहे असें वाटूं लागलें. ही औदार्यबुद्धि मुत्सद्यांच्या कसवांतून किंवा वाचाटांच्या बडबडींतून उगम पावली नव्हती; तर इंग्रज राष्ट्राची जी अव्वल मनोभूमि तिच्यांतून आस्फाळून बाहेर पडली होती. इंग्लंडवर संकटाचे दिवस आले होते; देशाचें खरें वैभव जे तरुण लोक त्यांची फ्रान्सच्या रणांगणावर शुद्ध लांडगेतोड चालली होती. रोजच्या रोज मृतांच्या आणि घायाळांच्या याद्या पत्रें भरभरून येत होत्या. अपेश चोहोंकडून घेरीत येत आहे असें वाटत होतें आणि ज्याला ज्या तऱ्हेनें आवाहन पोचवितां येणें शक्य

होतें त्या तऱ्हेनें पोचविण्याचें काम चालू होतें. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कॅनडा इत्यादि मुलखांतील लोक हे इंग्रजच म्हणून त्यांना आपण एका हाडा-मांसाचे या मुद्यावर आवाहन होत होतें; पण हिंदुस्थान हें Dependency म्हणजे परावलंबी राष्ट्र, त्यालाही समरभूमीकडे चला, तुम्हीही थोर आहां, शूरांचे वंशज आहां, आतां ज्यानें त्यानें आपल्या भवितव्याचा निकाल करावयाचा आहे, जगांतील दास्य नष्ट झालें असें समजा, साम्राज्यावर संकट आलें आहे तर हिंदुस्थानाला आपली राजनिष्ठा रणमैदानावर दाखविण्याची संधि प्राप्त झाली आहे, अशासारख्या .गर्जना आणि आरोळ्या सर्व वातावरणांत दुम-दुमत होत्या. संकटकालीं मनें अगदीं उघडपणानें म्हणजे आडपडदा न ठेवतां बोलत होतीं. अर्थात् यांतलें बरेंचसें खरें असलें पाहिजे असें हिंदी लोकांना वाटणें व खरें करून दाखविलें पाहिजे असें इंग्लिश राष्ट्रांतील जनसमाजास वाटणें स्वाभाविक होतें. आपत्ति निघून गेल्यानंतर साम्राज्यवादाचें झुटिंग जरी पूर्वस्थळाला आले तरी जनलज्जा म्हणून कांहीं वस्तू आहेच व मनलज्जा थोडीबहुत तरी आहेच; तिला वश होऊन मॉंटफोर्ड सुधारणांची घोषणा झाली. ही घोषणा लोकसत्ता व जवाबदार राज्यपद्धति अशा प्रकारची होती व म्हणून जे जे कोणी 'लोक' आहेत त्या त्या सर्वांना राजकारणाची ललकारणी ऐकूं जाईल असे इलाज योजण्यांत आले. ज्यांनीं ही ललकारणी ऐकली त्यांत डिप्रेस्ड् क्लासेस म्हणजे अस्पृश्य वर्गही होता.

एकदां राजकारणांतील उत्क्रान्ति किंवा परिवर्तन यांत या प्रश्नाला स्थान मिळाल्यानंतर उत्तरोत्तर त्याला तेजच येत चाललें. त्यांच्यांतील पुढाऱ्यांना कळून चुकलें कीं, राजकारणाच्या द्वारां आपल्या सामाजिक आपत्ति नष्ट करून टाकतां येण्यासारख्या आहेत व म्हणून स्पृश्य लोकांचें जें राजकारण तें जसजशीं पुढें पावलें टाकील तसतसा आपलाही प्रश्न पुढें पुढें नेला पाहिजे. या त्यांच्या धोरणास अनुसरून चळवळ चालू असतां एकोणीसशे तीस साल जसजसें जवळ आलें व राष्ट्रांतील असहकार, सत्याग्रह इत्यादि चळवळींचा जोर होत चालला तसतसे दशवार्षिक परीक्षेचें आपलें काम सरकारनें चालू केलें. दिलेले हक्क रयतांनीं कसे भोगले, काय लायकी दाखविली हें पहाण्या-साठीं सायमन कमिशन आलें आणि डिप्रेस्ड क्लासेसच्या प्रश्नानें मोठीच उचल खाल्ली. प्रातिनिधिक राजसत्तेचा मोठा हप्ता आतां द्यावयाचा तर हिंदी

प्रजापैकीं जितक्या जास्तींचें अवलोकन करतां येईल तितक्यांचें करावयाचें ठरलें व मॉंटफोर्ड सुधारणांच्यावेळीं जी मुत्सद्यांची दृष्टि डिप्रेस्ड् क्लासेस-पर्यंतच खालीं गेली होती ती आतां आणखी खोलांत गेली व वन्य जाति कोण आहेत, डोंगरकरी कोण आहेत, चोरट्या कोण आहेत, अर्धसंस्कृत कोणच्या आहेत, शिक्षणांत मागसलेल्या कोणच्या आहेत, गरीवीनें नाडलेल्या कोणच्या आहेत, याची जोराची चवकशी चालू केली. वास्तविक पाहतां हिंदी राष्ट्राला राज्यकारभाराची, नवे कायदेकानू करण्याची, व विशेषतः नवे धंदे उभारून व बाहेरच्या मालाला प्रतिबंध करून देशांत समृद्धि करण्याची, संधि हवी होती; पण या बाबीला जितकें प्राधान्य मिळालें त्यापेक्षां किती निरनिराळ्या लोकांना आपआपले मुखत्यार कायदेमंडळांत पाठवितां येतात या मुद्यालाच जास्त महत्त्व दिलें गेलें व मताधिकार आपण किती विस्तृत करतों यावर आपल्या राजकीय औदार्याचें माप ठरावयास हवें असें सरकार म्हणू लागलें. अर्थात् या धोरणास अनुसरून अवघा देश ढवळून काढण्यांत आला. ज्यांना राजा म्हणजे काय आणि प्रजा म्हणजे काय, मतें म्हणजे काय आणि राजकीय हक्क म्हणजे काय याचा गंधही नाहीं, त्यांनाही ही वार्ता देण्यांत आली व मोजदादीचें व वर्गीकरणाचें काम चालू झालें. मोजदादी मागें झालेल्याच होत्या पण वर्गीकरणाचें काम मात्र नवीन होतें. हे सर्व प्रकार होत असतांना सरकारचा धूर्तपणा, मुसलमानांचा मत्सर, अस्पृश्यांचा अविश्वास, हिंदू समाजाची चिंता असे निरनिराळे विकार आपापल्यापरी आविष्कृत होत होते व त्यांच्या छाया या मोजदादीवर व वर्गीकरणावर पडत होत्या.

यांतूनच एक मनोरंजक प्रश्न उद्भवला. 'डिप्रेस्ड् क्लासेस' असा शब्द-प्रयोग सुरू झालेला होता व त्याला चांगलें चलनही मिळालें होतें. पण हा शब्द जरी रूढ झाला होता तरी तो कोणाकोणास लावतां येतो हें सरकारी रीत्याही निश्चित झालें नव्हतें. दशवार्षिक खानेसुमारी करणारे जे अधिकारी असतात त्यांना नव्या गोष्टी पुष्कळच करतां येतात; पण त्यांनाही या 'डिप्रेस्ड् क्लासेस' या शब्दप्रयोगाची व्याप्ति किती ठेवावी याचा निकाल लावतां आला नव्हता. दरम्यान शिक्षण, चवकशी इत्यादीसाठीं ज्या कमिट्या वगैरे नेमल्या होत्या त्यांना जसजसे प्रसंग आले तसतसे त्यांनीं आपलें तारतम्य चालवून डिप्रेस्ड् क्लासेस म्हणजे कोण याची निश्चिति आपल्यापुरती तरी

ग्रंथ प्र. नि नं. ५०५.
ला. २१-११-३३

करून घेतली. त्यांच्या मागून येणारांनीं पाऊलवाट पडली आहे हें पाहून तिचाच अवलंब केला. पण ही वर वर्णिलेली सार्वत्रिक चळवळ चालू झाल्यानंतर हें अनमानधपक्याचें काम टिकेनासें झालें. प्रत्येक प्रान्ताधिकाऱ्यांना सांगन गेलें कीं हरतऱ्हेच्या लोकांची संख्या नीट पहावी व डिप्रेस्ड् क्लासेस कोणास म्हणतां येईल व वन्य, इत्यादि कोणास म्हणतां येईल हेंही पहावें. मद्रास, मुंबई व मध्यप्रांत या प्रदेशांत कांहीं वांधे नव्हतेच, कारण डिप्रेस्ड् क्लासेस हा शब्द या तीनही ठिकाणीं 'अस्पृश्य' लोकांनाच लाविलेला होता. पण पंजाव, संयुक्तप्रांत, वहार–ओरिसा, बंगाल, आसाम इकडे या शब्दाच्या अर्थाची इतकीशी शहानिशा झाली नव्हती व त्यामुळें त्याच्या अर्थाची व्याप्ति प्रान्तानिहाय बदलत गेली. दक्षिणेंतील तीन प्रांतांत तरी सरकारी रीत्या कांहीं दंडक बसला होता असें नव्हे पण इकडेच त्या प्रश्नाला महत्त्व फार म्हणून त्याची थोडीवहुत चिकित्सा झालेली होती व म्हणून शब्दही यथान्याय बनला होता. तरीही मुंवई इलाख्यांत प्राथमिक शिक्षणाचा कायदा करतांना जीं निरनिराळीं कोष्टकें किंवा याद्या प्रसिद्ध झाल्या त्यांत, वास्तविक डिप्रेस्ड् क्लासेस म्हणजे अमूक अमूक असा संकेत रूढ झाला असतांही, तदितर अनेक लोकांचाही अंतर्भाव सरकारानें केला. त्यामुळें या शब्दाच्या व्याप्तीला पुन्हां अनिश्चितपणा प्राप्त झाला. १९२२–२७ या वर्षपंचकाचा जो सरकारी रिपोर्ट हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केला त्यांत डिप्रेस्ड् क्लासेस म्हणजे अस्पृश्य वर्ग असेंच गृहीत धरलें होतें. हारटॉग कमिटीनेंही हीच व्याप्ति मानिली. पण असें असूनही सरकारदरवारीं एकवाक्यता प्रस्थापित होईना; म्हणून वर म्हटल्याप्रमाणें प्रांताप्रांतांत चवकशी व शहानिशा चालू झाली. 'डिप्रेस्ड् क्लासेस' हें नांव एकट्या अस्पृश्यांनाच कां द्यावें? दुसरे शेंकडो लोक डिप्रेस्ड्च आहेत. कोणी शिक्षणाच्या बाबतींत डिप्रेस्ड्, कोणी ऐपतीनें डिप्रेस्ड्, कोणी सामाजिक दर्जानें डिप्रेस्ड्, कोणी हीनसंस्कृति म्हणून डिप्रेस्ड् असे आहेत; तर त्यांनाही डिप्रेस्ड् वर्गांतच कां गणूं नये असा प्रश्न उपस्थित झाला. तसेंच डिप्रेस्ड् क्लासेस म्हणजे अस्पृश्य लोक असें क्षणभर पतकरलें तर मग अस्पृश्य लोक म्हणजे तरी कोण कोण समजावयाचे हाही प्रश्न उद्भवला. असो. मग मुळापर्यंत गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें दिसून आल्यावरून 'अस्पृश्यता' तरी कशाला म्हणावयाचें याचीही शहानिशा सुरू झाली!

मुंबई इलाख्यांत स्टार्ट कमिटी नांवाची कमिटी नेमण्यांत येऊन तिच्याकडे हा सर्व प्रश्न मागेंच सोपविण्यांत आला होता. तिनें सर्व प्रकारची चवकशी करून असें सुचविलें कीं, प्राथमिक शिक्षणकायद्यांत ज्यांना मागसलेले वर्ग म्हटलें आहे त्याला मध्यमवर्ग म्हणावें व त्यांत ज्यांना डिप्रेस्ड् क्लासेस म्हटलें आहे त्यांना मागसलेले वर्ग म्हणावे. या मागसलेल्या वर्गाचे पुन्हां आणखी तीन पोटभाग पाडावे: एकास डिप्रेस्ड् क्लासेस हें नांव देऊन त्यांत फक्त अस्पृश्यांचा अन्तर्भाव करावा व दुसऱ्यांत मूळचे लोक व डोंगरकरी व तिसऱ्यांत इतर मागसलेले यांचा समावेश करावा.या दुसऱ्या व तिसऱ्या गटांना "प्रिमिटिव्ह" म्हणजे असंस्कृत असें नांव द्यावें. त्याप्रमाणेंच गुन्हेगार जाती म्हणून जें सरकारनें एक पृथक् सदर पाडलें आहे तें कायम होऊं नये. कारण गुन्हे करणाऱ्या जाती दर ठिकाणीं त्या त्याच नाहींत. त्या अस्पृश्य असतील तर अस्पृश्यांत घालाव्या; पण जंगलवस्तीच्या असतील तर "मूळचे व डोंगरकरी" या लोकांत घालाव्या. व हें कांहीं नसेल तर"इतर मागसलेले" वर्ग जे त्यांत घालाव्या. स्टार्ट कमिटीनें सदरीलप्रमाणें नामकरणें सुचवून प्रत्येक सदरांत कोणकोण बसतात हेंही तपासून पाहिलें व त्याप्रमाणें सुविस्तृत व त्या त्या वर्णनाचे कोणचेही लोक न वगळतां अशा तीन याद्या केल्या व त्यांच्या लोक-संख्याही निश्चित केल्या.हा स्टार्ट कमिटीचा निर्णय वरपर्यंत मान्य झाला आहे असें दिसतें व लोकांनींही त्यावर आक्षेप घेतलेले नाहींत. कमिटीच्या मतें पुढारलेले वर्ग, मध्यमवर्ग व मागसलेले वर्ग असे तीन गट असावे. पैकीं मागस-लेल्यांचे दोन; एक अस्पृश्य किंवा डिप्रेस्ड् क्लासेस व दुसरा प्रिमिटिव्ह किंवा असंस्कृत. अस्पृश्य किवा असंस्कृत हे जरी मागसलेले या सामान्य नांवा-खालीं आले तरी ते पृथक् लोक आहेत. व म्हणून अस्पृश्य वर्गाचे हितसंबंध राखण्यासाठीं त्यांना स्वतंत्र प्रतिनिधि असावयास हवेत. असंस्कृतांनाही निराळे असावे कारण त्यांचेही हितसंवंध निराळेच आहेत. ज्या याद्या पुढें दिलेल्या आहेत, त्यांवरून दिसेल कीं पहिली जी अस्पृश्यांची यादी तिच्यांत ३६ जाती आहेत, दुसरी जी 'मूळचे डोंगरकरी' यांची, तिच्यांत २४ जाती व तिसरी जी इतर मागसलेले यांची, तिच्यांत ९८ जाती आहेत. या तिसऱ्या यादीसंबंधींच्या विनचूकपणाविषयीं मात्र कमिटी इतकासा निर्वाळा देत नाहीं. पहिली यादी जर आपण वाचून पाहिली तर

तिच्यांतील पांचसहा नांवें आपल्या परिचयाचीं अशीं वाटतील. वरीचशीं नांवें गुजराथेंतील व कांहीं कानडी मुलखांतींल असावीं. महार, मांग, चांभार, ढोर व कदाचित् भंगी ही अस्पृश्य लोकांचीं नांवें सर्वपरिचित आहेत.पैकीं भंगी ही महाराष्ट्रांत तरी बेटीवंद व भरती न करून घेणारी अशी जात आहे कीं काय याविषयीं शंका आहे. तथापि येवढें एक कलम सोडलें तर महाराष्ट्राला ही यादी पूर्ण आहे असेंच वाटेल. 'अस्पृश्य' म्हणजे काय हा वादही निदान या जातींपुरता तरी करावयास नको असेंच सार्वत्रिक मत असणार. मद्रास प्रांतांतील अस्पृश्यांची यादी पुढें दिलीच आहे.तिकडे केवळ अस्पृश्यताच आहे असें नाहीं म्हणजे स्पर्शानेंच विटाळ होतो असें नाहीं. तर अमूक एका अंतरावरूनच विटाळ व्हावयास लागतो असें मानतात. कोणाचा साठ हातांवरून विटाळ, कोणाचा चाळीस हातांवरून विटाळ असें मानतात. कांहीं कांहीं गल्ल्यांतूनही त्यांना प्रवेश नसतो. इतकी कडक अस्पृश्यता त्या प्रान्तांत आहे. अशा या अस्पृश्यांची यादी दिलेली आहे व लोकसंख्याही दिलेल्या आहेत. तेव्हां मद्रासकडे यासंबंधांत कांहीं वाद नाहीं. मध्यप्रांतांतही हा वाद नाहीं. जे लोक अस्पृश्य मानले जातात त्यांचाच समावेश खानेसुमारी करणारांनीं डिप्रेस्ड् क्लासेस या सदरांत केला आहे.जिल्हानिहाय अस्पृश्यतेंत फरक पडत जातो. म्हणजे एक जात एका जिल्ह्यांत अस्पृश्य असली तर दुसऱ्या जिल्ह्यांत नसते. तरी पुढें दिलेल्या संख्येंत त्या सर्वांचा समावेश केलेला आहे. सबंध प्रान्तभर ज्यांना अस्पृश्य मानतात अशा फक्त नऊ जाती आहेत. जिल्हाधिकाऱ्यांशीं पत्रव्यवहार करून व इतर तऱ्हेनें माहिती गोळा करून अठरा महिन्यांच्या चवकशीनंतर खानेसुमारींतील हें अस्पृश्यांचें वर्गीकरण अधिकाऱ्यांनीं सिद्ध केलेलें आहे. याप्रमाणें या तीन प्रान्तांत फारसा वाद उपस्थित न होतां अस्पृश्यांची संख्या कायम झालेली आहे.

पण इतर प्रांतांत अस्पृश्य कोणास म्हणावें हें वादाचें कारण झालें आहे. वास्तविक एकादी जात अस्पृश्य आहे असें आग्रहाचें प्रतिपादन स्पृश्य लोक करतील व आम्ही अस्पृश्य नाहीं असा आग्रह अस्पृश्य लोक धरतील हें स्वाभाविक आहे. पण सध्यां अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधि देण्याचें ठरलें असल्यामुळें, हे स्वतंत्र प्रतिनिधि,आपलें स्वतंत्रपण सरकारशीं मिलाफ करण्यांतच दाखवून, सरकारविरुद्ध जें कांहीं घडावयास हवें असें लोकांस वाटत असेल त्यावर बिब्बा

घालतील कीं काय ही भीति सर्वांस आहे. स्वतंत्रपण लाभतें एवढ्याचसाठीं आम्ही अस्पृश्यच आहोंत असाही आग्रह कांहीं जाती विनाकारण धरतील व कांहीं जाती खरोखर अस्पृश्य असूनही त्या तशा नाहींत असा आग्रह स्पृश्य लोक धरतील असा कांहीं अविश्वासाचा प्रकार सध्यां चालू आहे. त्यामुळें या मोजदादीला व वर्गीकरणाला थोडें वादाचें रूप आलें आहे. परंतु वर म्हटल्याप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानांत हा विषय विवाद्य वनलेला नाहीं. याचें कारण तरी इतकेंच कीं, आपण इकडील लोक उत्तरेकडील लोकांपेक्षां जास्त समंजस आहों असें नव्हे तर इकडील अस्पृश्यता इतकी स्पष्ट व ढळढळीत आहे कीं, वादाचें कांहीं कारणच नाहीं. उत्तरेकडे असें नाहीं. दक्षिणेंतल्या इतका तिकडील प्रश्न विकट नाहीं. तथापि अस्पृश्यतेच्या व्याख्याच फारच विलक्षण अशा कल्पिलेल्या आहेत, यामुळें वाद माजला आहे. समज पडावा म्हणून संयुक्त प्रांताचें उदाहरण घेऊं. मि. डेसंजीस यांचें मत असें कीं, सायमन कमिशननें डिप्रेस्ड क्लासेसची व्याख्या ठरविली आहे तीच कायम धरावी. ती अशी—स्पर्शानें किंवा अंतरावरूनही ज्याचा विटाळ मानला जातो तो डिप्रेस्ड क्लासचा माणूस असें समजावें. पण रावसाहेव वाबू रामचरण हे म्हणतात कीं, "संयुक्त प्रांतांत ज्या तऱ्हेची अस्पृश्यता सध्यां मानली जाते ती ज्या जातीला लागूं ती तर डिप्रेस्ड क्लासेसमध्यें धरावीच; पण जे लोक आर्थिक दृष्ट्या किंवा शैक्षणिक दृष्ट्या मागसलेले आहेत, किंवा जे गुन्हेगार म्हणून मोडतात त्यांसही डिप्रेस्ड क्लासेस-मध्यें घ्यावें." यावर कुमार विक्रमसिंग म्हणतात "आर्थिक व शैक्षणिक हलाखी हें जर डिप्रेस्ड क्लासेसपणाचें गमक मानावयाचें असेल तर माझ्या जाट लोकांतर्फेच नव्हे तर सर्व लढाऊ जातींच्या तर्फे मी म्हणतों कीं, ज्यापक्षीं आम्ही पैसा व विद्या यांत अगदीं मागसलेले आहों त्यापक्षीं आम्हांसही डिप्रेस्ड क्लासेस-प्रमाणें स्वतंत्र प्रतिनिधी द्यावेत" हाफीज हिदायत हुसेन म्हणतात "या तऱ्हेनें पाहतां रजपूत, जाट, कुर्मी, गुजर यांनाही डिप्रेस्ड क्लासेसमध्येंच गणावें लागेल कारण तेही विद्येंत मागसलेलेच आहेत!"

इंडियन फरँचाइज् कमिटीकडे संयुक्त प्रांताच्या सरकारनें जो खलिता धाडला त्यांत डिप्रेस्ड क्लासेसविषयीं लिहितांना तें म्हणतें "प्रांतिक मतदान कमिटीनें ज्या शिफारशी केल्या आहेत त्या तपासून पाहतां असें दिसून येतें की, डिप्रेस्ड कोणास म्हणावें याविषयीं फारच मतभेद आहेत. डिप्रेस्ड लोक

किती आहेत याविषयीं लिहितांना कांहीं सभासद म्हणतात कीं, त्यांची संख्या १ कोटि ७० लक्ष आहे, आणि कांहींजण म्हणतात कीं, ती केवळ दशलक्षाहूनही कमी आहे!." हे सगळे घोटाळे कां होत आहेत हें पाहिलें तर असें दिसेल कीं, एक तर खुद्द सरकारनें डि० क्लासेसची अशी ठसठशीत व्याख्या केलेली नाहीं व 'अस्पृश्यता' ही जी व्याख्या तिच्या शलाका कोठपर्यंत सूक्ष्म झाल्या तरीही त्या जातीस डिप्रेस्ड क्लासेसमध्यें घालावें हें ठरलेलें नाहीं. हिंदुधर्मी लोक व सरकार या प्रश्नाकडे निरनिराळ्या दृष्टींनीं पहात आहेत. हिंदुधर्मांतील जी पुढारलेली व राजकारणमग्न माणसें आहेत व त्याप्रमाणेंच धर्मसुधारक जे आहेत त्यांना या प्रश्नाकडे अस्पृश्यतेच्या दृष्टीनेंच पहावेसें वाटतें. ज्या जातींना कोणी शिवत नसेल व म्हणून ज्यांना जीवितांतील व्यवहाराला अवघडपणा प्राप्त होतो त्यांना डिप्रेस्ड क्लासेस म्हणावें व त्यांचा एक गट कल्पावा असें त्यांचें म्हणणें. म्हणून डि० क्ला०ची व्याख्या म्हणजे 'अस्पृश्यता' एवढीच असावी असा त्यांचा आग्रह आहे. तिकडे सरकारचें पहाणें असें कीं, ज्या लोकांना आपल्यांतले मुखत्यार राजदरबारीं पाठवितां येणार नाहींत ते ते सर्व लोक नामनिर्दिष्ट व्हावे व त्यांचे प्रतिनिधि कौन्सिलांत येण्याची व्यवस्था करावी. पण हा विचार कायम केला तर उतरत उतरत थेट डोंगराळ लोकांपर्यंत खालीं जावें लागतें व त्यांचीही कांहीं व्यवस्था करणें जरूर आहे असें सरकाराचें म्हणणें पडतें. प्रतिनिधी एवढेंच म्हणतात कीं ती व्यवस्था काय करावयाची असेल ती करा पण त्यांना डिप्रेस्ड क्लासेस असें नांव देऊं नका. कारण डि० क्ला० म्हटले म्हणजे ते अस्पृश्य आहेत असा बोध होऊं लागतो व मग इतके हे लोक हिंदूसमाजानें अस्पृश्य मानले आहेत असें बालंट त्याजवर येतें. इतकेंच काय पण अस्पृश्य या नांवानें जगभर ओळखल्या जाणाऱ्या गटांत कांहीं जाती विनाकारणच जाऊन पडतात व आधींच असलेलें राष्ट्रीय दुखणें असाध्य होईल असें वाटूं लागतें. "ब्राह्मण ज्यांच्या हातचें अन्नपाणी घेत नाहीं त्या जाती अस्पृश्य" असें म्हणावयाचें असलें तर हिंदूसमाज जवळ जवळ सगळाच अस्पृश्यांचा बनला आहे असें म्हणावें लागेल! कोण कुणाला आपल्या पंक्तीला घेतो किंवा त्याच्या हातचें पाणी घेतो हेंच जर पहावयाचें म्हटलें तर ब्राह्मणांतही पुन्हां अस्पृश्य निर्माण होतील. तेव्हां हातचें खाणेंपिणें ही व्याख्या ठरविणें व तीवरून डिप्रेस्ड क्लासेसची संख्या ठरविणें हास्यास्पद आहे. ज्यांच्या

शरीराला विटाळ मानतात व म्हणून ज्यांना जीविताच्या व्यवहारांत प्रत्येक ठिकाणीं अडचण उत्पन्न होते तेच अस्पृश्य समजले जावे हेंच रास्त आहे. या दृष्टीनें पाहतां संयुक्तप्रांतांत सुमारे सहा लक्ष लोक अस्पृश्य आहेत. पण ही व्याख्या एकदां सोडून देऊन " ब्राह्मण कांहीं वर्षे पूर्वीपर्यंत ज्याच्या हातचें खातपीत नव्हता तो अस्पृश्य समजावा " अशी व्याख्या पतकरली तर ते एक कोटी चवदा लक्ष काय, पण एक कोटी सत्तर लक्षही भरतात! आणि मग या आंकडयांची बेरीज करून त्यांचा एक निराळा गट करावयास हवा असें सरकार व ते ते लोकही म्हणत रहाणार. वास्तविक पाहतां त्या प्रांताचे प्रसिद्ध गणनाकार ब्लंट हे म्हणतात कीं, ९१, ८१, ३१५ इतके लोक ब्राह्मणांच्या दृष्टीनें अस्पृश्य आहेत. केवळ ५,७०,१३७ इतकेच काय ते सर्व द्विजांच्या व शूद्रांच्याही दृष्टीनें अस्पृश्य आहेत. ब्राह्मणांच्या दृष्टीनें अस्पृश्य या शब्द-प्रयोगांतही गोम आहे. जे लोक भंगीपणा करीत असतील, डुकरें पाळीत असतील, डुकराचें किंवा गाईचें मांस खात असतील, किंवा गावोगांव भटक्या मारत फिरत असतील त्यांस ब्राह्मण हा शास्त्रार्थानें तरी (in theory) अस्पृश्य मानतो असें खुद्द ब्लंट यांनींच म्हटलें आहे. हा शास्त्रार्थ सांगून पुढें लगेच ते सांगतात कीं, "हा शास्त्रविहित अस्पृश्यतेचा कलंक जरी आतां कोणी इतकासा मानीत नाहीं तरी सरसकट ब्राह्मण माणूस हा त्याचें शास्त्रविहितत्त्व अजूनही मानतो". यावरून असें निश्चित दिसतें कीं, खुद्द ब्राह्मणही व्यवहारांत अस्पृश्यता इतकीशी मानीत नाहींत. अस्पृश्यांची यादी देऊन Untouchable (अस्पृश्य) म्हणजे कोण याची फोड करताना ब्लंट हे म्हणतात कीं वर सांगितलेल्या प्रकारांपैकीं एकतरी ज्यांच्या आचारांत असेल त्या जाती ब्राह्मणांना पूर्वीं सर्वथा अस्पृश्य वाटत. यांत **पूर्वीं** व **सर्वथा** हे शब्द फार महत्त्वाचे आहेत. पूर्वीं वाटत असत म्हणजे आतां वाटत नाहींत. व पूर्वीं सर्वथा वाटत म्हणजे आतां तितक्याशा वाटत नाहींत. म्हणजे यांत किती पर्याय उत्पन्न झाले पहा. ब्लंट यांच्या मतानेंच संयुक्त प्रांतांत ९१, ८१,३१५ इतके अस्पृश्य आहेत. हे तरी सर्व हिंदूंना अस्पृश्य नाहींत. तर केवळ ब्राह्मण वर्गाला वाटतात. बरें,आज प्रत्यक्ष वाटतात असेंही नाहीं. तर पूर्वी वाटत असत म्हणजे आतां इतकेसे वाटत नाहींत. याचा अर्थ पुन्हां असाच होतो कीं, सध्यां फक्त जुन्या विचाराचे ब्राह्मण या लोकांना अस्पृश्य मानतात, कारण तसा शास्त्रार्थ आहे.

नि. ४०५९
ता. २१.२.३३

एक ब्राह्मण–व तेही आतां सांगितले तसले–सोडून इतर कोणीही हिंदू इतकें म्हणजे सुमारें १ कोट लोकांना अस्पृश्य मानीत नाहींत तर फक्त ५७०१३७ लोकांना मात्र चतुर्वर्ण हिंदु अस्पृश्य मानतात! असें आहे तरें अस्पृश्य लोकांचा आकडा एवढा मोठा कां? आपण हा इतका बारीकपणा विचारांत ठेवला आहे तो फरँचाइज कमिटीच्या नजरेस यावा व तो लक्षांत घेऊन त्यांनीं वाटल्यास सुमारें एक कोटीचा आकडा पतकरावा,यासाठीं त्यांनीं मुद्दाम तशी सूचना दिली आहे. याचा अर्थ असा आहे कीं, आपण ठरविलेली अस्पृश्यतेची कसोटी कमिटीला पसंत पडेल न पडेल अशी त्यांस शंका होती. असो. असे प्रकार असले तरी संयुक्त प्रांतांतील अस्पृश्यांची लोकसंख्या एक कोटी तीस लक्ष आहे असें म्हणण्याचा आग्रह चालू आहेच. हें उदाहरण अशासाठीं दिलें आहे कीं अस्पृश्य कोण हें ठरविण्याची पद्धति कोण लोक कोणकोणती पतकरतात हें वाचकांस कळावें. मात्र वर जो विचार सांगितला कीं, अस्पृश्य कोण व मुख्त्यारीच्या हक्कांस योग्य कोण या दोन बाबींचा संकर होत आहे, तो अमलांत येऊन फरँचाईज कमिटीनें ६७,७३,८१४ इतके लोक असे मानले कीं ज्यांची कांहीं स्वतंत्र व्यवस्था व्हावी.

बंगाल्यांतही असेंच भांडण आहे.फरँचाईज कमिटीनें जी कसोटी ठरविली ती लावून प्रांतिक कमिटीनें तपासणी केली. तीवरून असें दिसूं लागलें कीं, बंगाल्यांत एकच जात अस्पृश्य आहे व तिची संख्या ७२०००आहे! पण या कमिटीच्या हातून कांहीं चुका झाल्या आहेत असें दिसून आलें.अगदीं शेवटीं शेवटीं बंगाल सरकारकडून फरँचाइज कमिटीस तार गेली कीं, "फेर तपासणी-वरून दिसतें कीं, बंगाल्यांत एक कोटीच्यावर डिप्रेस्ड क्लासेसचे लोक आहेत." अर्थात् फेरतपासणीचें काम पुढें चालूच होतें. याचा अर्थ असा कीं व्याख्या ठरविण्यांत कसोशी झाली नाहीं. अस्पृश्यांचा आकडा७२हजारांपासून एक कोटी-पर्यंत किंवा ५।। लक्षांपासून १ कोटी ३० लक्षांपर्यंत फिरत रहावा हें आश्चर्य नव्हें काय? आधीं सर्व कसोटचा कळविल्या असतां एका प्रांतांत कामाचा हिशेब घेण्यासाठीं आपण गेलों तेव्हां "अस्पृश्यतेची व्याख्या काय?" असा प्रश्न आम्हांस जवाबदार अधिकाऱ्यांनीं विचारला अशी तक्रार या कमिटींतील सभासदांनीं केली आहे! म्हणजे अस्पृश्य कोणास म्हणावें हें सरकार दरबारींच सुनिश्चित झालें नाहीं; व न होतांच मोजदादी झाल्या.पण त्यामुळें

६९२

करारांचीं भांडणें केवढीं उद्भवलीं व चालूही आहेत हें पाहिलें म्हणजे मूळांतच शुद्ध व्याख्येची जरूरी केवढी होती हें स्पष्ट होतें. आतां प्रांताप्रांतांचे अस्पृश्यांचे आकडे खानेसुमारीच्या रिपोर्टांत प्रसिद्ध होत रहातील त्यांत तरी कोणच्या व्याख्येवर या मोजदादी केल्या आहेत हें कळावयास इतक्यांतच मार्ग नाहीं.

या कामीं मुळांत चूक झाली आहे. ती ही कीं, दर दहा वर्षांनीं जी शिरगणती होते ती करतांना दर प्रांतांतल्या गणकांना आगाऊ योग्य सूचना खात्याच्या वरिष्ठांकडून गेल्या नव्हत्या.यामुळें ज्यांना जसें योग्य दिसलें व डिप्रेस्ड क्लासेस या शब्दाच्या अर्थाची व्याप्ति अमुक धरावी असें वाटलें तसें त्यांनीं केलें. एकदां पायंडा पडला म्हणजे तोच पुढिलांस आधार बनतो. आणि मग त्याच्या बळावर पुढील रचना होतात. प्रांतिक कमिटचा कां चुकल्या तर त्यांनीं खानेसुमारी करणारांचा आधार घेतला; आणि खानेसुमारीवाले कां चुकले तर ही चूक होते आहे हें त्यांच्या ध्यानांत येण्यासारखेंच नव्हतें. डिप्रेस्ड क्लासेस या शब्दाचा सर्वसामान्य अर्थ धरून त्यांनीं मोजदादी केल्या होत्या. किंवा मोजदादी करतांना जरी हा शब्द त्यांच्या डोळ्यांपुढें नसला तरी त्या झाल्यावर या शब्दाच्या वर्णनांत कोण सांपडतात हें त्यांनीं पाहिलें. आणि या शब्दाचें वर्णन नेमकें कोणचें? तर जो त्यांतून सामान्य अर्थ निघतो तें, असें झालें. डिप्रेस्ड म्हणजे 'दलित' 'दडपलेला' 'खालचा' 'मागसलेला' 'दूरचा' 'आनाडी' 'रानटी' असे अर्थ पतकरून यांत बसणारे ते डिप्रेस्ड क्लासेस असें त्यांनीं म्हटलें. त्यांचें पाहून मागून येणाऱ्या कमिटचा इत्यादींनीं तेंच म्हटलें. पण दरम्यान विषयाचा जसजसा खल होऊं लागला व अस्पृश्य लोकांचे पुढारीच बोलूं लागले तेव्हां खरें दुखणें कोणतें याचा उलगडा होऊं लागला. मागसलेलेंपण हें दुखणें असेल पण अस्पृश्यपण हें एक निराळें दुखणें आहे व त्याबद्दलची तक्रार म्हणजे अस्पृश्यांचा प्रश्न, असा अर्थ सिद्ध होऊन रूढही झाला. अर्थात् या नव्या अर्थनिर्णयाची वार्ता जितकी काटेकोरपणानें सर्वत्र पोंचावयास हवी होती तितकी पोंचली नाहीं व त्याच्या आधींच मोजदादी झाल्या.त्यामुळें हें प्रकरण ठिकठिकाणीं अनिर्णित राहिलें.फरँचाईज कमिटीनें दर प्रांताचे आकडे देणारें कोष्टक प्रसिद्ध केलें आहे. पण त्यांतही त्यांनीं अनिश्चितपणा दर्शित केला आहेच. वास्तविक पाहतां अस्पृश्य कोण याची

चवकशी करावयाची होती तर Untouchables हा शब्दच वापरावयास हवा होता म्हणजे काय हवें याचा बोध झाला असता व शिवाय अस्पृश्यता इतकी इतकी असली म्हणजे त्या जातीस या कोटींत घालावयाचें अशी व्याख्या जोडिली असती म्हणजे घोंटाळ्याचें कांहींच कारण नव्हतें. पण डिप्रेस्ड क्लासेस हा प्रयोग रूढ होऊन बसला होता व त्याची व्याप्ति कांहीं प्रांतांना तरी माहीत झालेली होती. अर्थात् तोच प्रयोग, पण त्याची व्याप्ति माहीत न होतां, इतरांनीं पतकरला. याचें उदाहरण म्हणजे ओरिसा व बहार हा प्रांत होय. १९११ सालच्या शिरगणतींत रानटी लोक, भटके लोक असेही डि०क्ला०या लोकांत धरले होते. ख्रिस्ती, मुसलमान झालेले पण अस्पृश्य राहिलेले लोकही यांत घातले होते. त्यामुळें त्या प्रांतांची डि०क्लासची लोकसंख्या केवढी तरी होऊन बसली होती. पण चीफ सेक्रेटरींनीं हे सर्व लोक या नव्या मोजदादींत सोडले व त्यामुळें तेथील संख्या चाळीस लक्षांच्या आसपासपर्यंत आली आहे; व ती फरँचाईज कमिटीनें मान्यही केली आहे.

आसामाची बाब आणखी निराळी आहे. तेथें शरीराला विटाळ असा कोणाचाच मानीत नाहींत व कोणाला शाळेंत घेत नाहींत असेंही नाहीं. तसेंच पाणी भरण्यासंबंधानेंही विशेष अडचण नाहीं. पण कांहीं जातींच्या स्पर्शाचें पाणी उच्च हिंदू घेत नाहींत व त्यांना देवळांतही येऊं देत नाहींत. या ठिकाणीं Interior of Hindu Temples. याचा अर्थ गाभाऱ्यांत असा करावयाचा कीं देवळांत असा करावयाचा याचा खुलासा व्हावयास हवा होता. असो. पण त्यांच्या सांवलींतलें अन्नपाणी कोणी घेत नाहीं व न्हावी त्यांची श्मश्रु करीत नाहीं. अशा जातींना तिकडील गणनाकार मि. मुलन यांनीं Exterior जाती म्हणजे बहिस्थ जाती असें नांव दिलें आहे. हिंदुसमाजाच्या वळचणीखालीं असलेल्या जाती असा त्याचा अर्थ आहे. डॉ. आंबेडकर यांना हें नांव संमत आहे कारण ज्या स्टार्ट कमिटीवर ते होते त्या कमिटीनें 'बहिष्कृत' हा शब्द पसंत केलेला आहे. येथें वरील अडचणच पुन्हां उद्भवली. अमुक जाती प्रांतिक खानेसुमारी करणारांनीं आसाम खोऱ्याच्या यादींतून काढून टाकाल्या पण मि. मुलन यांनीं त्या शर्मा खोऱ्याच्या यादींत अन्तर्भूत केल्या. वास्तविक हा सुद्धां व्याख्या ढिली असल्याचा परिणाम होय. शेवटीं त्या त्या जातींनाच विचारावें व मग निर्णय करावा

असें ठरलें. यांतही एक भीति असते. संयुक्त प्रांतांत कित्येक जाती अशा भेटल्या कीं डिप्रेस्डच्या यादींत शिरल्यानें कांहीं फायदा आहे असें वाटल्याबरोबर आमचें नांव त्या यादींत घाला म्हणून मागें लागल्या! व म्हणून ज्याचें त्यास विचारणेंही सावधगिरीनेंच व्हावयास हवें असें वाटूं लागलें.

पंजाबांतील अडचण थोडी निराळी आहे. १९११ सालच्या शिरगणतीच्या यादींत जे लोक अस्पृश्य म्हणून दिले आहेत ते आपल्या कसोटीस जमतात हें पाहून त्यांस फरँचाईज कमिटीनें डि० क्ला०चे लोक असें ठरविलें व त्यांची लोकसंख्या वारा तेरा लाख अशी ठरविली. वास्तविक १९११ सालच्या यादीचा आश्रय करण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण प्रांतिक कमिटीचे कांहीं मेंबर्स व ही मोठी कमिटी यांचें निराळ्याच एका मुद्द्यावर जमेना. सरकारानें सेन्सस कमिशनरचें मत ग्राह्य मानलें; व सरकारचें मत फरँचाईज कमिटीनें मानलें. कांहीं सभासदांचें तरी असें म्हणणें होतें कीं पंजाबांत या प्रश्नानें गति घेतली आहे व म्हणून तो पुन्हां उकरून काढूं नये. रायबहादूर चौधरी यांनीं मोठ्या कळवळ्यानें सांगितलें कीं मुसलमानी धर्म, शीख धर्म, आर्यसमाज, कौन्सिलांतील पक्ष, सुधारक हिंदु, जाठ शेतकरी, काँग्रेस इतकी मंडळी हा प्रश्न आज कित्येक दिवस सोडवीत आहेत. व त्यांनीं तो जवळपास सोडविलाही आहे. आतां पुन्हां नांव देऊन त्याला कायम रूप द्यावयाचें हें फार वाईट काम आहे. कारण त्यानें झालेल्या सुधारणेच्या कामावर बोळा फिरविण्यासारखेंच आहे. त्यांनीं असेंही सांगितलें कीं, १९१८च्या अँड्व्हिजरी फरँ० क०नें व पंजाब रिफॉर्म कमिटीनेंही हेंच मत दिलें आहे. तर विनाकारण पुन्हां विच्छेदन करून तंटे वाढवूं नयेत. पण रा. व. चौधरी यांचें हें मत कमिटीस पसंत झालें नाहीं व तिनें डि० क्ला० चा गट बनवावयाचें ठरविलें. बनवावयाचें असें ठरविल्यावर जाती न मिळतील तर काय होईल? चौधरी यांनीं तरी हा प्रश्न अजिबात सुटला आहे असें म्हटलेंच नव्हतें. तेव्हां या सदरांत पडावयास कांहीं जाती आल्याच; व होतां होतां इतकें झालें कीं आपल्या पोटांत सर्वांसच रिचवितों म्हणणारा जो शीख धर्म त्यांतूनही "आम्ही डिप्रेस्ड आहों" असें म्हणत एक जात पुढें आली! झालेली सुधारणा कशी मागें ढकलली जाते याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. पण वर जो व्याख्येचा विचार चालू आहे त्यासंबंधांत एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. सायमन कमिशननें अस्पृश्यांचा आकडा २८ लक्ष

इतका धरला पण पंजाब सरकारनें फरँचाईज कमिटीस कळविलें कीं, खानेसुमारींतील कांहीं गैरमाहितीच्या उताऱ्यावरून तो आकडा सायमन कमिशन नेंघेतला होता; पण खरा आकडा १३ लक्ष आहे.

येथपर्यंत हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या प्रांतांतील अस्पृश्य लोकांचीशिर-गणती करतांना डिप्रेस्ड क्लासेस म्हणजे नेमके कोण हें मुळांत ठरलेलें नसल्यामुळें कसकशा भानगडी झाल्या याचें विवेचन केलें. 'अस्पृश्यता हीच जर कसोटी ठरविली तर डि० क्ला०ची लोकसंख्या खरोखर फार कमी भरते असें श्री. चिंतामणी, श्री. तांबे व श्री. बखले यांनीं दाखवून दिलें आहे. 'अस्पृश्य' लोकांचीच जर मोजदाद करावयाची आहे तर अस्पृश्यता हीच कसोटी लावावयास हवी हें खरेंच आहे. पण अस्पृश्यता म्हणजे तरी काय हें निश्चित करतां न आल्यामुळें भिन्न भिन्न संख्या येतात. डॉ. अंबेडकर यांनीं म्हटल्याप्रमाणें अस्पृश्यतेच्या निरनिराळ्या तऱ्हा असतील; व सर्व प्रांतांत एकच दंडक लावून मोजदाद करतां यावयाची नाहीं हेंही खरें; पण वर संयुक्त प्रांताच्या बाबतींत दाख-विल्याप्रमाणें कोण कोणाच्या हातचें खातो पितो येथवर हा न्याय न्यावयाचा म्हटला तर व्याख्येंत अतिव्याप्तीचा दोष उत्पन्न होतो. तसेंच झालेल्या सुधारणेचा मान ठेवावयाचा नाहीं असें ठरलें तर सुधारणेची गतिही मंद होईल हेंही विसरतां कामां नये. डॉ. अंबेडकर यांनीं "अस्पृश्यता नष्ट होत आहे" या सुधारकांच्या शब्दांवर फार कडक टीका केली आहे, व हें मत पतकरतांना फार सावधगिरी बाळगावयास हवी असें म्हटलें आहे. अस्पृश्यता ही हिंदु-धर्माच्या तत्त्वज्ञानांतच समाविष्ट आहे व म्हणून बाह्य आचारांत जरी नाइलाज म्हणून लोकांनीं अस्पृश्यता पाळली नाहीं तरी ती त्यांच्या मनांतून निखळून पडली आहे असें समजूं नये; बुद्ध, रामानुज व वैष्णव संत यांच्या सारखे कैक महात्मे या कामीं झगडले पण या अस्पृश्यतेनें त्यांना दाद दिली नाहीं; म्हणून अस्पृश्यतेची भावना जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत अस्पृश्यता आहेच असें त्यांचें म्हणणें. तसेंच त्यांनीं लिटरल सेन्स म्हणजे शब्दार्थ व नोशनल सेन्स म्हणजे भावना असा भेद सांगून म्हटलें आहे कीं "जरी शब्दार्थानें अस्पृश्यता गेली म्हणजे सध्यांच्या अस्पृश्यांचा जरी कोणी विटाळ मानीनासे झाले तरी तेवढ्यानें तिचें उच्चाटन झालें असें समजतां कामा नये. अस्पृश्यतेची भावना ही शिल्लक राहाते. ती नष्ट होणें कठीण आहे. ती झाली तर मात्र अस्पृश्यता गेली."

पण ती नष्ट होत आहे याची खूण तरी दुसरी काय असणार ? निदान पहिल्या पहिल्या खुणा तरी आचारांतच दिसावयाच्या. व्यवहारांतून ती गेली तर ती जाऊं लागली आहे असें म्हणूं नये काय? व्यवहारांत दिसते म्हणून जर ती आहे असें म्हणावयाचें, तर व्यवहारांत ती नाहीं असें दिसू लागलें म्हणजे ती जात चालली असें म्हणूं नये काय? फक्त व्यवहारापुरती ती गेली आहे असें वाटल्यास म्हणावें. पण जात आहे हें कबूल केलेंच पाहिजे. इतकेंच काय पण व्यवहार हा आंतील मानसिक भावनेचा आविष्कार असतो असें जें त्यांनीं इतरत्र म्हटलें आहे तेंच खरें आहे व म्हणून बाहेर जर आविष्कार होत असेल तर त्या त्या प्रमाणानें मानसिक भावना थोडी तरी कमजोर होत चालली आहे असेंच म्हटलें पाहिजे. नाइलाजानें किंवा लुच्चेगिरीनें माणूस किती वागेल? इतकेंच काय पण बाह्य आचार जर होऊं लागला तर त्याचेंही पर्यवसान भावना कमजोर करण्यांतच होतें. व्यवहारांत अस्पृश्यता नष्ट होत चालली तर तें सुचिन्हच आहे व म्हणून सुधारकांच्या म्हणण्याकडे वहिमी दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे असें नाहीं. रायबहादुर चौधरी यांनीं पंजाबच्या बाबतींत जें आर्जव केलें तें सयुक्तिक आहे हें दाखविण्यासाठीं हें विवेचन केलें. जे लोक अस्पृश्यतेंतून मुक्त झाले पण जे **मागसलेले** राहिले आहेत त्यांच्या प्रतिपाळाची स्वतंत्र योजना करावयाची असल्यास करावी. पण ती ते **मागसलेले** आहेत म्हणून करावी, **अस्पृश्य** म्हणून नव्हे इतकाच वादाचा मुद्दा आहे.

मूळ मुद्याकडे वळून श्री. तांबे, श्री. चिंतामणी व श्री. बखले यांनीं लिहिलेल्या मतपत्रिकेचा विचार करावयास हवा. कारण त्यांतही व्याख्येचा विचार येतच आहे. व्याख्या करूनच्या करून फरँ० कमिटीनें ती नीट लागूं केली नाहीं ही त्यांची तक्रार आहे. मागें म्हटलें आहे कीं मुंबई, मद्रास, व मध्यप्रांत या इलाख्यांतील अस्पृश्यांच्या आकडयांविषयीं मतभेद नाहीं. पण हे तिघे म्हणतात कीं, फरँ० कमिटीची जी व्याख्या ती लावूनच मुंबई इलाख्यांतील अस्पृश्य जातींची मोजदाद केली आहे असें वाटत नाहीं. इतकेंच कीं त्या मोजदादीवर कोणी आक्षेप घेतला नाहीं. या नव्या कामासाठीं ज्या कमिटया नेमल्या नव्हत्या त्यांनीं मोजदादी केल्या. तेव्हां त्या या व्याख्येप्रमाणेंच झाल्या असतील असें त्यांच्यानें म्हणवत नाहीं. फरँचाईज कमिटीनें जी व्याख्या ठरविली ती ही:— ज्यांना देवळांत घेत नाहींत; ज्यांचा स्पर्शानें किंवा अंतरावरूनही विटाळ

होतो ते अस्पृश्य. ही कमिटीची व्याख्या स्टार्ट कमिटीनें कोठें कोठें लावलेली नाहीं हें या तिघांनीं दाखविलें असतें तर बरें झालें असतें. मद्राससंबंधानें तसेंच दाखवावयास हवें पण त्यांनीं दाखविलें नाहीं. बहार व ओरिसा येथील कमिटीनें मान्य केलेला ४३ लक्षांचा आंकडा त्यांस मान्य नाहीं. आपण जो साक्षी पुरावा घेतला त्यावरून व्याख्येप्रमाणें या प्रांतांत केवळ ४ लक्षच डि० क्ला० चे लोक आहेत असें त्यांचें मत आहे. संयुक्त प्रांतांत व्याख्येप्रमाणें ५,४९,००० लोकच खरे अस्पृश्य आहेत; बंगाल्यांत ७० हजारांचा प्रांतिक कमिटीनें जो आंकडा दिला आहे तोच बरोबर आहे व पंजाबांत तर हा प्रश्नच शिल्लक नाहीं असें त्यांनीं आपलें मत दिलें आहे. रामवंशी हे शीख आहेत व आदधर्मी हे आपण हिंदू नव्हे असें म्हणत असतांना त्यांना डि० क्ला० मध्यें कां घालावें असें त्यांचें विचारणें आहे! शेवटीं व्याख्येवर जोर देऊनच त्यांनीं अखिल भारतांतील डि० क्ला० ची लोकसंख्या पुढीलप्रमाणें ठरविली आहे. मद्रास ७१,००,०००, मुंबई १७,००,०००, बंगाल ७०,०००, संयुक्त प्रांत ६,००,०००, पंजाब १०,००,०००, बहार–ओरिसा ४,००,०००, मध्यप्रांत २०,००,०००, आसाम ६,५०,००० म्हणजे एकंदर १,४४,२०,००० इतके सर्व डि० क्लासचे लोक आहेत.

डिप्रेस्ड लोकांची लोकसंख्या एवढीच आहे हें पाहून वाचकांस आश्चर्य व समाधान वाटेल; व सुधारणेचा डंका महात्मा गांधी सर्वत्र वाजवीत आहेत तो तसाच कांहीं वर्षें चालू राहिला तर अस्पृश्यतेचें उच्चाटन लवकरच होऊन हिंदू समाजाला उश्शाप मिळाल्यासारखें होईल. आजवर अनमानधपक्यानेंच बोलणें होत होतें. आतां सरकारनेंच कमिट्या, मोजदादी, वर्गवारी इत्यादि खटपटी केल्या त्यावरून हें निष्पन्न झालें कीं, वाटत होती तितकी प्रजा अस्पृश्यतेनें ग्रस्त नाहीं, व जी आहे ती कोठें हळू हळू व कोठें जलद अशी या आपत्तींतून बाहेर पडत आहे. श्री. चिंतामणी इत्यादींचा आंकडा जरी हा असला तरी फरँचॅईज कमिटीनें तोच पतकरला आहे असें नाहीं. पण शेजारीं जोडलेल्या कोष्टकावरून ध्यानांत येईल कीं साऊथबरो कमिटीच्या ४ कोटी २२ लक्षांवरून प्रॉव्हिन्शिअल कमिटीच्या १ कोटी ८६ लक्षांपर्यंत तो उत्तरोत्तर खालीं आला आहे. वर पुन्हां पुन्हां सांगितलेंच आहे कीं अस्पृश्य कोणास म्हणावें यासंबंधींच्या अगदीं स्थूल कल्पना प्रथम रूढ झाल्यामुळें अनेक घोटाळे

उत्पन्न झाले व मग फरँ० कमिटीनें कांहीं व्याख्या ठरवून दिली तरीसुद्धां तिची अंमलवजावणी नीट झाली नाहीं. खुद्द कमिटीनेंच आपल्या व्याख्येला निर्णायक रूप दिलें नाहीं अशी चिंतामणी इत्यादींनीं तक्रार केली आहे. तिनें जी प्रश्नावलि प्रांतिक कमिटचांकडे धाडिली तिच्यांत असा एक प्रश्न होता. "डि० क्ला०च्या म्हणून तुम्ही कोणकोणच्या जाति अंतर्भूत कराल? अस्पृश्यांशिवाय इतर जाती तुम्ही डि० क्लासेसमध्यें घालाल काय? घालणार असाल तर त्या कोणच्या?" प्रां० क०च्या मनांत या प्रश्नानें अधिकच गोंधळ माजविला असला पाहिजे व त्यामुळें प्रां० कमिटचा व प्रां० सरकारें यांचे आकडे निरनिराळे आले! एतावता आरंभीं जें म्हटलें आहे तेंच खरें कीं, बुद्धिपुरस्सर अशी कोणीच चूक केलेली नाहीं, चूक होतां होतां झाली. प्रश्नाला इतकें सार्वत्रिक व इतकें तीव्र रूप प्राप्त होईल अशी ज्यावेळीं कल्पना नव्हती त्यावेळीं डि० क्लासेस हा शब्दप्रयोग चालू झाला व म्हणून त्याच्या अर्थाविषयीं इतकीशी कसोशी झाली नाहीं. असो. हें मात्र ध्यानांत घ्यावयास हवें कीं, फरँचॅईज कमिटीनें मतदानाकरितां ही सगळी मोजदाद केली व म्हणून ती ब्रिटिश मुलखांतील अस्पृश्यांचीच केवळ असली पाहिजे. या पद्धतीनेंच गोळा केलेले संस्थानांतले आंकडे यांत मिळविले तर दोन कोटीपर्यंत हा आंकडा जाईल असें वाटतें.

कमिटचांनीं व तिन्हाइतांनीं जरी कांहीं व्याख्या ठरविल्या असल्या तरी आपली कांहीं एक निश्चित कल्पना असावयास हवी. 'चतुर्वर्ण हिंदू ज्याच्या देहालाच विटाळ मानतात व म्हणून ज्याला व्यवहारांत अडचण उत्पन्न होते व जीवितांत उत्कर्ष साधतां येत नाहीं ते अस्पृश्य लोक होत, इतकें जरी व्याख्यारूप वर्णन पतकरलें तरी पुरेसें आहे असें मला वाटतें. यांत सगळें येतें. ज्याच्या देहालाच विटाळ मानला त्याला देऊळ, पाणवठा, इत्यादि ठिकाणीं प्रतिवंध होत असेल हें निराळें सांगावयास नको. अस्पृश्य लोक निराळे, मागसलेले निराळे, गुन्हेगार निराळे, व अर्धसंस्कृत म्हणजे रानट निराळे. मागसलेल्यांना समाजांत प्रवेश नाहीं असें मुळींच नाहीं; पण विद्या, ऐपत, जीवितांतील आकांक्षा इत्यादींत रेंगाळत असलेले असे हे लोक होत. गुन्हेगार हे वास्तविक रानटांपैकींच आहेत. पण रानांत राहात नाहींत, तर समाजाच्या आसपास वागतात व त्या समाजांचीं नियमनें न पतकरतां त्यांना उपद्रव देऊन त्यावर उपजीविका करतात. अर्धसंस्कृत किंवा रानटी

हे खरोखरच रानांतच किंवा डोंगरकठडीला रहातात व समाजाकडे एक तऱ्हेच्या तिरस्कार बुद्धीनें पहातात. त्यांना असें वाटतें कीं, आपण कोणी स्वतंत्र लोक आहोंत. डि० क्ला०मध्यें त्यांचें नांव घातलें तर त्यांना राग येतो. हिंदु-धर्माची छाप या बहुतेकांवर पडली आहे. पण स्वतंत्र वनवृत्ति सोडून ते समाजाच्या सामुदायिक जीवनांत प्रविष्ट झालेले नाहींत. अस्पृश्य लोक मात्र ते कीं, ज्यांना समाजाच्या शिवेवर उभें केलें आहे; ज्यांचा आर्थिक जीवितांत कनिष्ठ प्रकारें कां होईना पण प्रवेश झाला आहे; पण ज्यांच्या देहालाच विटाळ मानल्यामुळें ज्यांना व्यावहारिक अडचणी प्राप्त झाल्या आहेत व उत्कर्ष साधतां येत नाहीं. भावी राजकारणांत या सर्वांविषयीं बोलण्याचे प्रसंग येणार आहेत; व हे चारही लोक आपापल्या परी त्यांत पडणार आहेत. आणि म्हणून प्रगतीची मर्यादा साधारणपणें सारखी सारखी रहात गेल्यामुळें त्यांचा मोठा गट होण्याचाही संभव आहे. अर्थात् राजकारण, समाजकारण, आणि धर्मकारण यांचा विचार करणारे व त्या त्या कारणांत श्रम करणारे या सर्वांनीं त्यांची पृथक् पृथक् माहिती करून घ्यावयास हवी. प्रस्तुत ग्रंथ अस्पृश्यांच्या संबंधीचा आहे पण अस्पृश्यतानिवारणरूप दरवाजा उघडून बाहेर पाहूं लागलों म्हणजे काय काय दृश्यें दिसतात व त्यांचा आपल्या भावी जीवितावर काय काय परिणाम होणार हें ध्यानांत यावें म्हणून त्या इतर जातींची व जमातींची माहिती थोडी थोडी दिली आहे.

अनेक कमिटयांनीं आजवर डि० क्ला० चे प्रांतानिहाय आंकडे दिलेले आहेत. त्यांचा एकमेकांत मेळ नाहीं, हें पुढें येणाऱ्या पहिल्याच कोष्टका-वरून दिसून येईल. उत्तर हिंदुस्थानांतील प्रांतांतील आंकडे ठरवितांना फँचाइज कमिटीला सुद्धां कांहींच करतां येईना. आणि म्हणून कोणाचेच आंकडे तिनें पसंत केले नाहींत. पहिल्या कोष्टकानंतर प्रत्येक प्रांतांत ज्यांना डि० क्ला० चे लोक असें आजवरचें नांव आहे त्यांचीं नांवें व १९२१ किंवा १९३१ सालचे त्यांचे आंकडे एकत्र घालून प्रांन्तिक याद्या दिल्या आहेत. या याद्यांतून कांहीं नांवें व संख्या निरनिराळ्या हिशेबाप्रमाणें गळतील हें खरेंच; पण सामान्य कल्पना यावयास या उपयोगीं पडतील.

अस्पृश्य लोकसंख्या

(आंकडे दशलक्षाचे आहेत.)

प्रांत	साउथबरो कमिटी	सर हेन्री शार्प १९१७	खानेसुमारी कमिशनर १९२१	सायमन कमिशन	खानेसुमारी कमिशनर १९३१	प्रांतिक सरकार १९३२	प्रांतिक कमिटी १९३२	शेरा.
मद्रास	६·४	५·७	६·४	६·५	*७·०	७·१	७·१	
मुंबई	·६	१·६	२·८	१·५	१·८	१·७	१·७	
बंगाल	९·९	६·७	९·०	११·५	†	‡११·२	**·०७	कांहींच्या मतें ·०७
संयुक्तप्रांत	१०·१	८·४	९·०	१२·०	१२·६	§६·८	·६	कांहींच्या मतें ११·२
पंजाब	१·७	२·१	२·८	२·८	१·३	१·३	‖१·३	मि. ब्लंट यांचा
बिहार व ओरिसा	९·४	१·२	८·०	५·०	+३·७	+५·८	४·३	अंदाज ९·२
मध्यप्रांत	३·८	३·०	३·३	३·३	२·९	२·९	२·९	
आसाम	·३	२·७	२·०	१·०	१·९	·६५	·६५	
एकूण....	४२·२	३१·५	४३·३	४३·६		३७·४५	१८·६२	

* अंदाजी आकडे. नक्की आंकडे मिळत नाहीत.

† मिळत नाहीं. खानेसुमारीवरून स्थानिक सरकारनें दाखविलेला आंकडा १,०३,११,२६८ आहे.

‡ तपासणी चालू आहे. १९२१ चा आधार.

§ ज्या जातींचें स्वतंत्र प्रतिनिधित्व सुचविण्यांत आलें आहे त्या जाती धरून.

\+ अल्पसंख्यांकांनीं दाखविलेले आंकडे. वहुसंख्यांकांनीं आपला अंदाज सांगितला नाहीं.

‖ अंदाजी आंकडे.

** यांत राजवन्सी (१·४) व टेकड्यांवरील टोळ्यांचा समावेश होतो.

स्टार्ट कमिटीनें दिलेल्या अस्पृष्ट वर्गांचे इ. १९३१ चे आंकडे (मुंबई इलाखा)

	जातीचें नांव	खालसाप्रांत		संस्थानें		प्रांत
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	
१	आगेर	४३३३	२३४७			कराची
२	असोडी	....	....	....	....	....
३	भांवी	९९	१८४	४२४३	४२०३	ईदर संस्थान, अहमदाबाद.
४	भंगी	३४७०४	३००४०	७६८१	६९७८	मुंबई इलाखा
५	चक्रवाघ–दसार	१५	६	....	....	धारवाड.
६	चांभार अथवा मोची गार	१२५९२०	११७८३१	२४७१७	२३३४३	दक्षिण महाराष्ट्र, कोंकण,कर्नाटक.
७	चेलवाडी	....	....	....	....	....
८	चेना–दसरू	२६६	४६०	२	१	विजापूर, धारवाड.
९	चुहार (चुन्हा)	....	....	....	....	....
१०	दाकलेरू मांगांची पोटजात.	....	....	....	....	....
११	धेड	१४०२७६	१३१३२१	....	....	गुजराथ.
१२	ढेगू–मेगू	....	....	....	....	....
१३	ढोर	१०१९२	६३३८	९१३	८३४	अहमदनगर, खानदेश, सातारा, सोलापूर,बेळगांव, विजा. को.पूर
१४	गरोडा	....	....	....	....	....

	जातीचें नांव	खालसा प्रांत		संस्थानें		प्रांत.
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	
१५	हलसार (हसलार)हलसावर	१२६९	१००८	....	....	कारवार.
१६	होळिया		....	....	....	सदर्न मराठा कंट्री, कारवार,पुणें, सातारा, सोलापूर.
१७	खालपा	४०७०	४१३४	१६२९	१६५२	भडोच, सुरत, रेवाकांठा.
१८	कोळी ढोर	७८००	७२५७	६३६	२३०	उत्तर कोंकण.
१९	कोलघा किंवा कोलचा	३३५	३०५	२४२	२३२	सुरतेशेजारील संस्थानें.
२०	कोटेगार	८५	३९	....	....	कारवार (उत्तर).
२१	कोटवाल किंवा कोटवालिया	६४४	६१४	९२	६८	गुजराथ.
२२	लिंगदेर	....	....	....	....	....
२३	महार किंवा म्हार	....	....	....	....	मराठी जिल्हे व उत्तर कारवार.
२४	मांग आणि माडीग	१२८७३१	१३००६९	२५९४२	२५१९६	गुजराथ, महाराष्ट्र, कारवार.
२५	मांग गारुडी	२२९७	२०३७	....	.... २	,, ,, ,,
२६	मेघवाल किंवा मेंघवार	३६४८४	३२४६०	४३१	४२	कच्छ.
२७	मिनि–माडीग	मांगांची	पोट–	....	–जात	
२८	मुकरी	२४८६	२५९६	....	....	कारवार.
२९	नडिया			....	....	मच्छी व खालपा यांची पोटजात
३०	शिंदवा किंवा शेणवा	११६५	१००५	...	....	खेडाजिल्हा,पालनपूर, रेवाकांठा.

३१	सोची किंवा मोची फक्त गुजराथेंत अस्पृश्य					गुजराथ.
३२	तमाली	२९	३९			सुरत.
३३	तुरी	४२३	३६४	८३	१८३	गुजराथ.
३४	विठोलिया	८	१२	२४७	२६९	सुरतेजवळील संस्थानें.
३५	वांकर (महार,होळिया,घेड)	५२२७३५	५२३२९१	१०६२३०	१११८४८	
३६	वांझफोड	२७१	३५६	१५	२२	बुरुडांची पोटजात.

मद्रास इलाखा

जिल्ह्यांचें नांव (१)	पोटजातीचें नांव (२)	लोकसंख्या (३)
गंजाम	हल्ली	२८,२०१
	बावुरी	६५,७००
	दंवासी	४४,०८९
	मेवारी	२०,५११*
विजगापट्टण	माल	१,६१,०५७
	मदिग	४५,४८३
	बावुरी	१,३६६
	दंवासी	१,०६७
गोदावरी	माल	२,८५,८७३
	मदिग	७२,०१७
कृष्णा	माल	३,०६,८०४
	मदिग	१,५४,३६१
गन्तूर	माल	१,४७,४७०
	मदिग	६४,७७६
कर्नूल	माल	५५,७३४
	मदिग	६२,७११
बेल्लारी	पराय्यण	५,४४८
	माल	१२,९१५

मद्रास इलाखा

जिल्हा	पोटजातीचें नांव	लोकसंख्या
(१)	(२)	(३)
बेल्लारी		
	मदिग	१,०२,४४२
	होलेया	१३,१९५
अनन्तपूर		
	माल	२५,७११
	मदिग	१,०२,४४२
कुडुपा		
	माल	५९,१९९
	मदिग	५६,१९२
नेलोर		
	माल	१,६८,४१६
	मदिग	८०,८७०
चग्लीपट		
	पराय्यण	३,५०,५२९
	वल्लूवान	४,७९४
	चाक्किलियन	९,६२६
	माल	१४,७९४
	मदिग	३,३११
मद्रास		
	पंचम	५९,६५१
	चुकलेर	१,१८४
	झाडूवाले	†
चित्तूर		
	माल	१,६४,५२८
	मदिग	४७,२९९
उत्तर अर्काट		
	पराय्यण	३,०३,०८१
	माल	१०,६१०
	मदिग	८,७२०
दक्षिण अर्काट		
	पराय्यण	५,९०,५८९
	वल्लूवान	१७,४०५
	चाक्किलियन	१८,३४८
सालेम		
	पाल्लन	२०,४८३
	पराय्यण	१,४९,४९८
	वल्लूवान	३,९४७
	माल	१६,३४७
	मदिग	२,८८६
	चाक्किलियन	५९,६२६
कोइमतूर		
	पराय्यण	६९,८४१
	पाल्लार	३६,६३१
	चाक्किलियन	१,९८,३८०
	मदिग	२,४२१
	होलेया	१३,२९९
त्रिचनापल्ली		
	पाल्लन	१,४४,८५५
	पराय्यण	१,६८,९६५
	वल्लूवान	६,६९०
	चाक्किलियन	६५,५५५

मद्रास इलाखा

जिल्हा	पोटजातीचें नांव	लोकसंख्या
(१)	(२)	(३)
तंजावर		
	पराय्यण	३,३६,२०८
	वल्लूवान	७,५०८
	पाल्लन	१,५९,६५८
	चाक्किलियन	४,२६८
मदुरा		
	पाल्लन	१,३६,६८५
	पराय्यण	९९,९१७
	वल्लूवान	३,१५०
	चाक्किलियन	८०,३३२
रामनद		
	पाल्लन	१,४३,७६१
	पराय्यण	५८,७६२
	चाक्किलियन	३६,४२३
तिनेवेल्ली		
	पाल्लन	१,९३,२१९
	पराय्यण	९८,४३१
	चाक्किलियन	२९,१५५
दक्षिण कानडा		
	होलेया	१,०६,६८८
	कोराग	४,३९१†
मलबार		
	चेरूम	२,४७,८५५
	पराय्यण	१४,८५७
	नायाडी	५३५
निलगिरी		
	कोट	१,१६३
	पाल्लण	३०९
	पराय्यण	१८,७२५
	वल्लूवान	३४७
	चाक्किलियन	१,३००
	चेरूम	६०६
	होलेया	२,०५४
एकूण–		६४,८४,७७६

मद्रास इलाखा, म्हैसूर, हैद्राबाद, त्रावणकोर व कोचीन या विभागांत कांहीं हिंदू अस्पृश्य जाति अशा आहेत कीं, स्पर्श न होतांहि केवळ दूर अंतरावर असल्यामुळेंच त्यांचा विटाळ मानतात.या जातींचीं नांवें,पोट विभाग व त्यांची संख्या हीं खालीं दिलीं आहेत.

(दि पीपल ऑफ़ इंडिया बाय् एच्. एच्. रिस्ले, या पुस्तकाच्या आधारें)

१ गोमांस न खाणाऱ्या जाती		२ गोमांस खाणाऱ्या जाती.	
क्र.	जातीचें नांव	संख्या	क्र.	जातीचें नांव	संख्या
१	बिलावा	१,४२,८९५	१	चवकीलियन	४,८७,४४५
२	चेरुमन	२,५३,३४७	२	होलेया	७,४३,८५३
३	इल्युवान	७,८७,२५०	३	मादिगा	१०,३४,९२७
४	कमालान	१,०४,०३२	४	माळ	१६,४५,०८४
५	पलन	८,३३,९५८	५	परइयन	२२,३१,६५५
६	शानन	६,०३,३३१	६	इतर	१६,१२,९३७
७	तियन	५,७८,४५३			
८	इतर	८,९०,४५१			
	एकूण	४१,९३,७२२		एकूण	७७,५५,९०१

(वरील आंकडे सन १९०१ च्या शिरगणतीच्या वेळचे आहेत).

(हैद्राबाद)

	जात	एकूण	पुरुष	स्त्रिया
१	चांभार	१,१२,५३४	५६,५६२	५५,९७२
२	धेड	५१,९५९	२६,९३५	२५,०२४
३	ढोर	४३,४०९	१९,५०९	२३,९००
४	कैकाडी	२४,७९४	१२,६४२	१२,१५२
५	महाडिक	६,६९,२०३	३,२६,९८२	३,४२,२२१
६	महार	४,९४,३१६	२,४५,०२६	२,४९,२९०
७	माला	३,७५,७४८	२,०१,७५६	१,७३,९९२
८	मांग	३,३०,८४०	१,६३,१५४	१,६७,६८६

मध्यप्रांत व वऱ्हाड

(सेन्सस ऑफ इंडिया १९२१ व्हॉल्यूम ११; सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार पार्ट २)

क्र.	जात.नां.	मध्यप्रांत व वऱ्हाड		मध्य.प्रि.जिल्हे, वऱ्हाड		मध्य. प्रि. जि.	
		पु.	स्त्रि.	पु.	स्त्रि.	पु.	स्त्रि.
१	बहाणा	७९७	७४४	३४१	२१२	३४१	२१२
२	बलाही	५०७६७	४६२७९	४९९४०	४६०१६	३४९४२	३२८७०
३	बासोड	२१२३६	२२०२३	२१११०	२१८८१	२००१३	२०८६९
४	चादर	१२८९८	१२९२७	१२५७५	१२२६१	१२५६७	१२६४८
५	चांभार	४३२९३७	४४८७३७	३९९६५०	४१५७०४	३८१७३८	३९८३४२
६	ढाणुक	२५८३	२४८८	२५८३	२४८८	२५८३	२४८८
७	धोबी	८१७३७	८३८८७	७३७९०	७४६७७	६०८२९	६१०१९
८	ढोर	२५२२	२५२१	२५२२	२५२१		
९	डोंब	३०७७	२४५३	३०७७	२४५३	३०७७	२४५३
१०	दहायत	५३८५	५७५६	५३८५	५७५६	५३८५	५७५६
११	गंडा	६६९५२	७३२१०	३९७६६	४५६६५	३९६६१	४५६६५
१२	घाशिया	१८२२०	१९३०८	९४७९	१०३४०	९४७९	१०३४०
१३	जंगम	१६३५	१८२०	१६२७	१८१५	६६२	८५७
१४	कातिया	१८२१८	१९७३२	१७९०७	१९४३०	१७९०७	१९४२४
१५	खंडगर	५०४२	५०६८	५०४२	५०६८	५०४२	५०६८
१६	कोळी	२१२०१	१९८४८	२१०८३	१९७८३	४५३५	३१७१
१७	कोरी	१९७१५	१८४९३	१८६२३	१६४८९	१८०३९	१६११०
१८	कुम्हार	६०१८२	६१२२६	५१७४५	६२६६८	४०३०३	४२४०५
१९	महार	५७९५१७	५९१२२०	५५६०८७	५६४६८९	३४१३११	३४७८३५
२०	मांग	४१७८९	४२४५०	४१७६६	४२४१२	१०९३६	१०७४७
२१	माडगी	३८२६	४००३	३८२६	४००३	२१६८	२३२९
२२	माला	३२००	२८८०	३१८५	२८५८	२६९५	२४८९
२३	पाणका	११४४५	१५०६८	६३१४९	६६७५०	६३१४४	६६७५०
२४	परधान	९७६८	१०२३९	८०८३	९०५१	६५५१	६५८४
२५	पार	६२०५	५९४६	६०६९	५८१२	१५५४	१४६९

बासोड, गंडा व परधान या जातींत हिंदूंशिवाय ज्यांनीं अजून कोणताच धर्मपंथ स्वीकारलेला नाहीं असे बिनधर्मीचे (ॲनिमिस्ट) लोक आहेत. संख्या येथें दिली नाहीं.

बंगाल

खानेसुमारी १९३१		खानेसुमारी १९३१	
जात	संख्या	जात	संख्या
१ अगारिया	२३०	३० झालो मालो	१००० ५
२ बगडी	९८७५७०	३१ कादर	१०७८
३ बहेलिया	४४४९	३२ कैरा	३८२८७
४ बैती	८८८८	३३ कालू	७१०२४
५ बौरी	३३१२३८	३४ कालवार	१३५३१
६ बेदिया	७२४३	३५ काण	६६
७ बेलदार	३१३९	३६ कंध	१५२५
८ बेरुआ	३६७	३७ कांद्र	४७२४
९ भाटिया	३२२	३८ कावरा	१०७९०८
१० भुईमाळी	७२८०४	३९ कपाली	१६५५८३
११ भुइया	४९३७०	४० कपूरिया	१७०
१२ भूमीज	८४४४७	४१ कारेंगा	९८५५
१३ बिंद	१९५१८	४२ कौर	१७८१
१४ विंझिया	३१७	४३ खाटिक	११५७
१५ चमार	१५०४५८	४४ कीचक	२
१६ धेनुआर	४४	४५ कोच	८१२९१
१७ धोबा	२२९६६६	४६ कोनाई	४१०५८
१८ दोआई	१९५०	४७ कोनवार	१३३
१९ डोंब	१४००५७	४८ कोरा	४६७८९
२० दोसध	३६४२०	४९ कोताळ	७६५१
२१ गारो	३७९०९	५० लालबेगी	४९६५
२२ घाशी	५३१२	५१ लोध	११००१
२३ गोंन्ही	५१४९	५२ लोहार	५०१६७
२४ हादी	१४३३४	५३ महार	१९८६
२५ हाजंग	१९६९३	५४ माहली	१६२६२
२६ हलालखोर	८७६	५५ माळ	१११५७
२७ हरी	१३२३९३	५६ मल्लाह	२६२५२
२८ हो	२३	५७ मालपहारिया	११७८२
२९ जळिया कैवर्त	३५२०७२	५८ मेच	४८७५

खानेसुमारी १९३१		खानेसुमारी १९३१	
जात	संख्या	जात	संख्या
मेहतर	२३२७८	पोड	६६७७३१
मुची	४१४२१९	पुंदारी	३१२५५
मुंडा	६३१०७	रभा	२०७६
मुसाहार	११७१४	राजू	५६७७८
नागर	१६१६४	राजवार	२१३३७
नागेशिया	२०८८	संताळ	४३३५०२
नैय्या	४०	शागीर्दपेशा	३३३
नामशूद्र	२०९४९५७	शुक्ली	३८६०
नट	७३४८	सुनरी	७५९२०
नुणीया	२८१००	तेली	२२४२८२
ओरांव	१३६४२७	तियार	९६४१३
पालिया	४३१६०	तुरी	१६१९९
पाण	१८५५		
पासी	१८९२५	एकूण	८०,७१,२०१
पाटणी	४०७६६		

बिहार आणि ओरिसा सन १९३१

जात		संख्या	जात		संख्या
१	बौरी	३१४९७९	१०	घासी	५०६९५
२	भोगटा	६६०५४	११	घुसूरिया	१८४६
३	भुइया	६२१०६२	१२	गोद्रा	७१२
४	भुमीज	२६६४६४	१३	गोखा	४८६२२
५	चमार	१२८८२९८	१४	हलालखोर	२०७४२
६	चौपाळ	२७३७	१५	हरी	९३४४१
७	धोबी	३६५८४१	१६	इरिका	३३२
८	दोसध	१२९०९३६	१७	कांद्र	१४६४५८
९	डोंब	१६०२२७	१८	कंजार	२५२६

	जात	संख्या		जात	संख्या
१९	केला	७७३७	२६	नट	९६२८
२०	कुरारियर	६३१	२७	पाण	२२६०७६
२१	लालबेगी	१०५	२८	पासी	१७२०६१
२२	महूरिया	२३८९	२९	राजवार	१३३९३५
२३	प्रांगण	१८४	३०	सियाल	६४६३
२४	मोची	२२८६३			
२५	मुशाहर	७२००५१	३१	तुरी	५४०४१
				एकूण—	६०,९१,८१०

वर दिलेल्या वर्गांपैकीं नं. १, २, ३, ४, १०, १९, २१ आणि २२ (बौरी, भोगटा, भुइया, भुमीज, घाशीपाण, राजवार आणि तुरी) यांना रानटी वर्गांतहि (Aborigines)धरण्यांत आलें आहे. त्यांची एकूण संख्या १७,४६,४२५ आहे. ही संख्या वर दिलेल्या दलितवर्गाच्या (Depressed Classes) संख्येंतून वजा केली तर ४३,६६,४६९ इतकी संख्या राहाते. आणि पुन्हा यांतून ख्रिश्चन, मुसलमान आणि जमाती (Animists) यांची संख्या २१,८८४ ही वाजूला काढली तर निव्वळ हिंदू डिप्रेस्ड् वर्गाची संख्या ४३,४४,५८५ होते. विहार आणि ओरिसा प्रांतांची लोकसंख्या ३,७६,७७,५७६ आहे. या एकूण लोकसंख्येशीं डिप्रेस्ड् वर्गाचें प्रमाण शेंकडा ११·५ येतें.

संयुक्तप्रांत

१	भोक्सा	१९०२८	११	धारी	७५९९
२	भार	४६०६४३	१२	कोळारी	१२८३५६
३	गिधिया	१९१	१३	बमार	७८७७०
४	लुनिया	४५४७३	१४	डोंब	१०९९०६
५	दुसाध	७१३४०	१५	फसी	१७३८६६३
६	ढाणुक	१२७५८१	१६	डोंगरीडोंब	३१६०१२
७	कोरी	७७५८३९	१७	हाबुरा	३८३२५
८	चांभार	४१८७७७०	१८	नाथ	३७०७२
९	भंगी	३४९०५३	१९	मडिक	३५७८१
१०	धोबी	६५६९१३		एकूण—	९१,८१,३१५

पंजाब

१९२१ च्या खानेसुमारीवरून:—

१	बंगाली	८१५	१८	खाटिक	२३८८८
२	बेजारा	५४०४	१९	कोरी	१२५५८
३	वरार	२३२४	२०	महातम्	८३१४२
४	बवारिया	२१२४२	२१	मझाबी	६१५९७
५	बाझिगर	१६०१०	२२	मेघ	३१२५७
६	बंजारा	२३१२	२३	नाथ	४१९७
७	चांभार	८४८२५६	२४	पसी	१८७२
८	चनाल	१०२६	२५	पर्ना	१२९९
९	छुरा	६००९०१	२६	रिहार	२०३
१०	दागी व कोळी	४०९१७	२७	शिकलगार	१३४५
११	दाओली	९३०	२८	संशी	२६९३६
१२	ढाणक	६१७९६	२९	सपेला	१०५७
१३	ढुमना	१९०६१	३०	सरेरा	९३४६
१४	गग्रा	१९९२	३१	सर्कीबंद	३६२९
१५	गंधियाला	७६७	३२	लवाणे	४८९८८
१६	गेड्री	१७			
१७	केहाळ	३०५		एकूण—	१९,४५,४४१

बृहन्महाराष्ट्रांतील अस्पृश्य जातींपैकीं कांहीं प्रमुख जातींची माहिती

(१) महार——

महार ज्या निरनिराळ्या नांवांनीं ओळखले जातात तीं नांवें:—(१) अंत्यज, (२) अतिशुद्र, (३) भूमिपुत्र किंवा धरणीचे पूत, (४) भूयल, (५) चोखामेळा, (६) धेड, (७) डोंब, (८) होलसाव, (९) काठीवाले, (१०) म्हेत्रे, (११) मिराशी, (१२) परवरी, (१३) तराळ, (१४) थोरले घरचे (१५) वेस्कर.

महार शब्दाची व्युत्पत्ति कालौघांत नष्ट झाली. तरी महा हारी (महा आहारी) म्हणजे पुष्कळ खाणारे यावरून महार शब्द बनला असावा असेंच बहुतेकांचें म्हणणें पडतें. कांहींच्या मतें संस्कृतांत अगदीं खालच्या जातींच्या लोकांना दिलेलें जें मृताहारी नांव त्याचेंच महार हें प्राकृत रूपांतर असावें.मार्कंडेय पुराणांत त्यांना मृतहारिन् असें म्हटलेलें आहे.मेलेलीं जनावरें उचलून नेण्याचा त्यांच्या धंद्यावरून त्यांना हें नांव मिळालें असावें.

अंत्यज याचा अर्थ शेवटीं जन्मलेला म्हणजेच समाजरचनेंतील अगदीं शेवटच्या पायरीचा असा आहे. मनूच्या विभागणीप्रमाणें चातुर्वर्ण्यांतील शेवटचा जो शूद्र समाज त्याच्या पेक्षांहि हलक्या दर्जाचे जे लोक ते अतिशूद्र होत. हेच लोक येथील मूळचे रहिवासी असावेत असें त्यांच्या नांवावरून सूचित होतें. थोरल्या घरचे म्हणजे थोर कुळांत जन्मलेले हें नांव हेटाळणी करण्याच्या उद्देशानें असावें? कारण वरील तीनहि नांवें झिडकारण्याच्या बुद्धीनेंच उच्च वर्णियांकडून महारांना दिलीं गेलीं आहेत. भूमिपुत्र किंवा धरणीचे पूत म्हणजे पृथ्वीपुत्र या नांवावरूनहि यांचें मूळचें वसतिस्थान कोणतें हें ध्वनित होतें. धेड व डोंब हे गुजराथ व उत्तर हिंदुस्थान इकडील महार होत. काठीवाले हें नांव त्यांच्या पुरातन काळच्या व कांहीं अंशीं हल्लींच्याहि धंद्याचें सूचक आहे. काठीवाल्याच्या काठीस इतकें वैशिष्ट्य प्राप्त झालें आहे कीं पुष्कळ ठिकाणीं जात ओळखण्याची ती खूणच समजली जाते; इतकेंच नव्हे तर न्यायमंदिरांत किंवा नोंदणी खात्यां-

तहि या जातीची ती खूणच मानली जाते. मिराशी या संज्ञेचा अर्थ जमीनदार असा आहे. परवरी हा शब्द जरी युरोपियन लोक सर्वच महारांना लावतात तरी तो फक्त गायक महारांच्या साठींच योजला जातो. वेस्कर म्हणजे वेशीवरचा पहारेकरी. या नांवावरून महारांचा रात्रींच्या रक्षकांचा पेशाहि ध्वनित होतो. पुण्याकडील जे महार वारकरी पंथाचे आहेत ते त्यांच्यांतील सुप्रसिद्ध साधू जो चोखामेळा त्याच्याच नांवानें ओळखले जातात. हुलसव हें कर्नाटकाकडील विशिष्ट नांव आहे.

महारांत खालील पोटजाती आहेत:—

(१) अवने, (२) आन्दवन किंवा अन्धोन, (३) अनंतकुल्य, (४) औट कांबळे, (५) बल्ही, (६) बालकाम्वळे, (७) बार्के, (८) बावन किंवा बावने, (९) बावचा, (१०) वाविसे, (११) बेल, वेले किंवा बेलिया, (१२) बेन, (१३) बंकर, (१४) बोले, (१५) चेळकर, (१६) डौले, (१७) धेड, (१८) धर्मिक, (१९) डोम किंवा डोंब, (२०) गरदी, (२१) गवसाई किंवा गवशे, (२२) घडशी, (२३) घाट काम्वळे, (२४) गोडवन किंवा गोंडवन, (२५) गोपाळ, (२६) हेडशी, (२७) होलार किंवा हुवळ, (२८) झाडे, (२९) जोगती, (३०) जुन्नरे, (३१) कबुले, (३२) कडवन, कुडवन किंवा कडू, (३३) काम्वळे, (३४) कासरे, (३५) खर्से, (३६) कोचरे, खोसरे किंवा कोसरे, (३७) लादवन किंवा लाधवन, (३८) मठकांवळे, (३९) मुरली, (४०) निराळे, (४१) पाण किंवा पाण्य, (४२) प्रधान, (४३) पुलार, (४४) रती, (४५) सालादी, सालादे, (४६) सिलवन् (४७) सिरसाळकर, (४८) सोम किंवा सोमवंशी, (४९) सोम कांवळे, ५०) सोन काम्बळे, (५१) सोनाइवल कांबळे, (५२) सुताड, (५३) तिळवण.

या पोटजातींपैकीं जे आपली उत्पत्ति चंद्रापासून आहे असें मानतात ते सोमवंशी. हे संख्येनें अधिक असून सामाजिक बाबींतहि इतरांपेक्षां श्रेष्ठ आहेत. सावंतवाडी संस्थानांत बेले आणि सोमवंशी हे एकच समजले जातात व पाणांत मांग, बेरड, म्होरपी आणि रामोशी यांचा समावेश करतात. छत्र्या वगैरे ज्याच्या वनतात अशा झाडांच्या पानांच्या धंद्याशीं संबंध येतो म्हणून या जातीचें नांव पाण असें पडलें असावें. आणि बेल हें नांव बांबूचे तुकडे करून चटया वगैरे करण्याचा जो धंदा त्यावरून पडलें असावें. गोपाळ म्हणजे महार

साधू होत. खंडोवाच्या सेवेसाठीं वाहून टाकलेल्या महार मुलीपासून उत्पन्न झालेले ते मुरळी महार होत. गवशे महार महार–स्त्री–पुरुषांच्या व्यभिचारा-मुळें जन्मले असें म्हणतात. आणि जोगती महारांची उत्पत्ति कर्नाटकांतील येल्लम्मा नांवाच्या देवीस वाहिलेल्या व्यभिचारोत्पन्न महारांच्या पोटीं झाली असें सांगतात. कडवन किंवा कडूहि जारकर्मामुळेंच जन्मलेले असून आंदवन म्हणजे ज्यांचा कुमारिकांच्या पोटीं जन्म झाला ते होत.

अहमदनगर जिल्ह्यांतील अनंतकुल्य, आंदवन, वावणे आणि वेल ह्या पोटजातींत रोटी–बेटी–व्यवहार होतो. खानदेशांतील महारांत साडेवारा पोट जाती आहेत, त्यांची नांवें:–अन्धोन, वावणे, वाल्ही, वंकर गोडवन, होलार, खारसे, कोचरे, लाधन, प्रधान, सोम, तिळवण आणि अर्धी जात गोपाळांची. यांपैकीं पहिल्या चौघांत रोटी व्यवहार होतो, पण वेटी-व्यवहार होत नाहीं. नाशीककडील महारांतहि साडेवारा जाति आहेत. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:–आंदवन, बावचा, चेळकर, धेड, डोंब, घाडशी, गोपाळ, लादवन, पान, पुलर, राती, सोमवंशी, आणि सुताड. पैकीं रातींची अर्धी जात धरली जाते. पुण्याकडील महार आंदवन, डौले, जुन्नर, पाण, सिलवन आणि सोमवंशी या पोटजातींत विभागले गेले आहेत. यांच्यांतील कोणीच कोणाच्या हातचें खात नाहींत किंवा त्यांच्यांत लग्नें होत नाहींत. सोलापूर जिल्ह्यांत, आवणे, आंदवन, वावणे, वेल, वेन, वावीसे, बोले, धेड, गोडवन, काडवन, कांबळे, खोचरे, लादवन, निराळे, पाण, सालाडे, सोम आणि तिळवण हे आढळतात. काडवनांच्या खेरीज यांतील बहुतेकांत रोटीबेटी व्यवहार होतो. साताऱ्याकडील महार लोकांत एकंदर चार पोटजाती आहेत. यांच्यांत रोटीव्यवहार होतो. पण बेटीव्यवहार होत नाहीं. कुलाबा जिल्ह्यांत, वेलीआ, डोंब, गारदी, आणि सोमवंशी ह्या पोटजाती आहेत. ठाणे जिल्ह्यांत डौले, पाण, आणि सोमवंशी हे आढळतात. रत्नागिरी जिल्ह्यांत बहुतेक कांवळेच आहेत.दक्षिण महाराष्ट्रांत एकंदर चौदा पोट-जाती आहेत. त्यांचीं नांवें:–आंदवन, बेले, गवशे, घाडशी, हेडशी, झाडे, जोगती, काडवन, लादवन, मुरली, पान. आणि सालादी हें एकमेकांच्या हातचें खातहि नाहींत व त्यांच्यांत बेटीव्यवहारहि होत नाहींत. सावंतवाडी कडील महारांत दोन विभाग आहेत. बेल आणि पान हेच ते होत. यांच्यांत

रोटीवेटी व्यवहार होत नाहींत. हें सर्व तीस वर्षांपूर्वींचें आहे. आतां झपाट्यानें फरक पडत असला पाहिजे.

महारांत आडनांवें पुष्कळच आहेत. एकाच आडनांवाच्या घराण्यांत लग्नें होत नाहींत. नेहमीं प्रचारांत असलेलीं महारांचीं कांहीं नांवें खालीं दिलीं आहेत.

अभंग	भोईर	गोटे	मेहेडे
अढाव	भोलके	हतवटे	म्हसगे
आदिजाधव	भोसले	जाधव	म्हसकाटे
आडसुळे	चंदनशिवे	जोशी	मोहिते
अहेरराव	चव्हाण	कदम	मोरे
अहिरे	च्येटिसे	काकटे	निकुंभ
अवचट	चिकणे	काकुडे	निर्मळ
औटकांबळे	चितळे	काळे	पाचरणे
वाव्रे	डाहाने	कांवळे	पागर पाखरे
वाचव	दारुळे	कनोजे	पारधे
वागड	देटगे	कात्रे	पाटेकर
वाहेलिमे	धारपवार	खंडागळे	पवार
वाईकर	धेडे	खांदीझाड	पोकाडे
वालकाम्बळे	दिवे	खराट	पुरवणे
वन्सुरे	डोवळे	खरोड	सदावर्ते
वासेडे	दुकरे	खुपटे	सपकाल,सकपाळ
वायकर	गाडे	कोहळे	साळवे
वयत	गद्रे	कोलगे	सामीदार
भगत	गाइकवाड	लादव	तांबे
भालेराव	गामरे	लकडे	सरवगोड
भाम्भल	गरूड	लोकरे	सतपाल
भेंडे	घाणवट	लोखंडे	शेलार
भिलंग	घाटकांबळे	मकासुरे	शेळके
भिंगार	घोडे	मालवे	शेवाळे
भोई	गोडिवले	मातकाम्वळे	शिंदे

शिर्के	सूर्य	थोरवडे	वर्तक
सिसाटे	सूर्यवंशी	उंबाले	यादव
सोडजाधव	सूर्यकदम	वाडकर	येतुम
सोमाइवलकांवळे	ताडके	वाघ	झनकर
सोमकांवळे	तलवटके	वाघचावरे	
सोनावणे	तापीचेरे	वाघमारे	
सोनकावळे	तिझड	वाघपंजे	

शोधाअंतीं एकमेकांत विवाह–संबंध न करणाऱ्या अशा पोटजाती मुळांत एकाच देवकाच्या पूजक होत्या हें सिद्ध करण्यास पुरेसा पुरावा मिळूं शकला. ही गोष्ट कानडी बळीशीं बरीच जुळती आहे. देवकांत अंतर्भूत असलेल्या वस्तूंची पूजा करण्यांत येते. आणि ती वस्तु देवकांच्या प्रतिनिधींकडून जपून ठेवण्यांत येते. लग्नाच्या वेळीं या वस्तूला फार महत्त्व प्राप्त होते.एकच देवक असलेल्या निरनिराळ्या कुटुंबांत विवाह होऊं शकत नाहीं. कांहीं कुळें व त्यांचीं देवकें यांची यादी खालीं दिली आहे.

कूळ–	देवक–
वगड	उंबर
भगट	नाग
गायकवाड	खेकडा, सूर्यफूल, कोहळें.
जाधव	पानकणिस, कासव
कदम	कदंब
म्हसगे	म्हैस
मोहिते	उंबर
मोरे	मोर
सटपाल	नाग
शेवळे	नागवेल
सोनकांबळे	चंपक
तलवटके	तांबें
तांबे	उंबर
झनकर	आंवा, उंबर, जांभूळ

वरील यादींत भर म्हणून इतर नेहमींच्या वहिवाटींतलीं आणखी देवकें म्हटलीं म्हणजे हरीण, नाग, नांद्रूक, पिठीचे वावले आणि वडाचें झाड इ० होत.

पुष्कळशीं देवकें हल्लीं प्रचारांत नाहींत आणि अशा देवकांची जागा आतां पंच पालवीनें घेतली आहे. पंचपालवीचीहि पूजा करण्यांत येते आणि लग्नाच्या वेळीं तिला फार महत्त्व प्राप्त होतें. महारांत पांच या आंकड्याला विशेष महत्त्व आहेसें दिसतें. खेडेगांवच्या देवळांतून दगडावर कोरलेल्या वंशाची म्हणजे पांच निरनिराळ्या जातींच्या पांच श्रेष्ठ पूर्वजांची पूजा केली जाते.

महार हे वंशपरंपरागत खेड्याचे चाकर असून शिवेसंबंधीच्या सर्व बाबतींत मुख्य समजले जातात. ते सरकारी तिजोरीचे रक्षक असतात, अधिकाऱ्यांना मार्ग दाखविणारे व निरोपाची ने आण करणारे पट्टेवाले असतात. शेतकऱ्यांना साऱ्याचा तगादा करण्याचें काम त्यांच्याकडे असतें. चावड्या व गांवकुसवांचीं दुरुस्तीचीं कामें त्यांच्याकडे असून गांवचे रस्ते झाडण्याचें कामहि ते करतात. त्यांतील बहुतेकांना सरकारांतून छोटासा तनखा, कांहीं रोकड व कांहीं जमीन या स्वरूपांत, मिळतो. त्यांचीं मुख्य मिळकत म्हणजें वर्षाकांठचें बलुतें होय. पूर्वी त्यांना वावन मार्गांनीं बलुत्याचें उत्पन्न असे असें ते सांगतात परंतु आतां हें मान फार कमी झालें आहे. मुसलमानी व मराठी राज्यांत मिळणाऱ्या या बलुत्यांपैकीं कांहीं बलुत्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

१ सितादेवी किंवा उभ्या उसाचा भाग
२ वेशीवरची देणगी
३ शिमगी पौर्णिमेच्या दिवशीं होळीचा नैवेद्य
४ बेंदूर आषाढी पौर्णिमेला धान्य
५ हातशेकणें—गुऱ्हाळावरील भट्टीचें बलुतें
६ मृत जनावरांचे अवशेष
७ घरटक्का
८ दफनाचे खड्डे खणण्याचे पैसे
९ खळ्यावरील दाणे
१० पेवाच्या तळाचे दाणे
११ चौरंगावरील नवरानवरीसाठीं भरलेल्या चौकाचे तांदूळ

१२ गांव राखणीवद्दल वर्षाकांठीं जोडा

१३ रुक्का–लग्नाची देणगी, तांदूळ व नारळासुद्धां

१४ ओली-पाती–म्हणजे नव्या दाण्याच्या पहिल्या विक्रीच्या वेळीं महारणीला द्यावयाचे दाणे

१५ नवरा किंवा नवरीच्या आईला ओवाळल्याची ओवाळणी

१६ मढें-पडें–मढ्याची जकात

१७ आपाढी व कार्तिकी प्रतिपदेला गांवाभोंवतीं मांगुली दोर गुंडाळल्या-बद्दलची देणगी

१८ रानसोडवण–रान साफ केल्यावद्दलची जकात

१९ पेंढा

२० लगिनटक्का–लग्नाच्या वेळची महाराची ओवाळणी

लाकूडफाटा आणणें, टपालाची ने आण करणें, घराचें आंगण साफ करणें, गोवऱ्या थापून आणून देणें, दफनाच्यावेळीं खड्डे खांदून देणें हीं महारांचीं नेमलेलीं कामें होत. मेलेलीं गुरें घेणें, खेड्यांतील कोणी मेल्यानंतर त्याचें उरलें सुरलें घेणें आणि विसाव्याच्या जागेवर फेकलेले पैसे घेणें या संबंधीचा महाराचा हक्क आहे. युरोपियन लोक घरकाम करण्यासाठीं महार लोक ठेवतात. मोतद्दार म्हणून तर ते सर्व हिंदुस्थानभर कामांवर असतात. अलीकडे मोटार ड्रायव्हरच्या धंद्यांत शिरल्यामुळें त्यांच्या प्राप्तींत वाढ झाली आहे. मोठमोठ्या धंद्याच्या ठिकाणच्या आसपासच्या खेडेगांवांतून हल्लीं अशी तक्रार ऐकूं येते कीं, महार लोक शहराकडे धांव घेतात त्यामुळें खेड्यांची गरज भागण्यास पुरेसे महार उरले नाहींत. महारांत कांहीं शेतकरीहि आहेत. त्यांच्यांत पुष्कळ लोक कंत्राटाचा धंदा करणारे आहेत व सावकारी करणारे-हि आहेत; आणि कोणाहि उच्चवर्णीय कारकुनाच्या मदतीखेरीज ते हे धंदे चालवितात. महार रेल्वेचीं कामें करणारांमध्यें अगदी पट्टीचे ठरले आहेत आणि त्यामुळें कांहीं जिल्ह्यांत रेल्वेच्या हमाली बिगारी कामाचा जवळ-जवळ मक्ताच त्यांना मिळाला आहे. कर्नाटकाकडील आणि सावंतवाडीकडील महार चटया विणणें, टोपल्या करणें, पंखे बनविणें, धार्मिक प्रसंगीं व हलक्या जातींच्या लग्नाच्यावेळीं ढोलकें, सनई वाजविण्याचा धंदा करणें हे उद्योग करतात.

परवारी किंवा गायक महार सम्बळ, सूर, सनई, बक, चाप, व अलगुज हीं वाद्यें मुख्यत: वाजवतात. प्रसंगाप्रसंगानें ते शिंगहि वाजवितात पण तम्बोरा किंवा कर्णा कधींहि वाजवीत नाहींत, कारण तीं मांगांचीं वाद्यें आहेत.

दक्षिणेकडील महारांचें मुख्य अन्नं म्हणजे जोंधळ्याची भाकरी, डाळ, मिरच्याचें तिखट, स्वस्तांतला भाजीपाला, कधीं कधीं मासे, आणि मेलेल्या जनावरांचें मांस. डुकराचें मांस खाणारे म्हणून हे मांगाला कमी लेखतात व हे गाय खातात म्हणून मांग त्यांना हिणवितात. महार दारूचे व ताडीचे भारी भोक्ते असतात. ते बुरुड, जिनगर, कैकाडी, वडारी, परीट, मोची , भंगी, मांग आणि घाडशी, यांच्या हातचें खात नाहींत. होलार आणि मांग त्यांच्या हातचें खातात. सामाजिक दृष्टीनें पाहतां महारांची हळुहळू उन्नति होत चालली आहे.

महार लोक पंचपालवीची निरनिराळ्या जिल्ह्यांत खालीलप्रमाणें पूजा करतात.

	पुणें	नाशिक	खानदेश	सातारा
१	आंवा	आंवा	अरकाठी	बाभूळ
२	पिंपळ	पिंपळ	बोरकाठी	वड
३	रुई	रुई	जांभूळ	जांभूळ
४	शमी	शमी	आंबा	आंबा
५	उंवर	उंबर	रुचकिन	रुइ.

लग्नसंबंधीं आपआपसांत पूर्वींचा कांहीं धागा दोरा असल्याखेरीज, निरनिराळ्या प्रांतांतील महार एकाच पोटजातीचे असले तरी एकमेकांत शरीरसंवंध करीत नाहींत. सावंतवाडी संस्थानांत एकाच खेड्यांत राहणाऱ्या महारांत शरीरसंबंध होत नाहींत.

मूल जन्मल्याबरोबर आईला अस्पर्श समजतात. सर्वसाधारण हा काळ बारा दिवसांचा आहे. पुणें शहरांत ४१ दिवसपर्यंत आईस अस्पर्श समजतात, अहमदनगरकडे अकरा दिवस आणि कोल्हापूरकडे आठ दिवस अस्पर्श समजण्याचा प्रघात आहे.

मुलाचा बाप लग्नापूर्वी मुलीस मागणी घालतो. कांहीं प्रसंगीं मुलाच्या

वापास मुलीच्या वापाला पैसे द्यावे लागतात. लग्नापूर्वी मुलाचें व मुलीचें जुळतें कीं नाहीं हें खेड्याच्या ब्राह्मणास विचारतात. भटजीबुवा पंचांग पाहतात व तसें कांहीं असल्यास सांगतात. या नंतर हळद लावण्यासाठीं व लग्नासाठीं गुरुजींना शुभ मुहूर्त काढून देण्याची विनंति करण्यांत येते व गुरुजी आपलें पंचांग पाहून तो काढून देतात. मुहूर्त सांगितल्यानंतर भटजीबुवा वधूवरांच्या डोक्यावर टाकण्यासाठीं थोड्या तांदळाच्या अक्षता त्यांच्या हातीं देतात. लग्नविधि भटजी दूर अंतरावर उभे राहून करतात किंवा महार गोसाव्याकडून हा विधि करविला जातो. खानदेशाकडे कांहीं ठिकाणीं धनगराकडून लग्न लावून घेतात. बहुतेक सगळीकडेच लग्नाचा सोहळा संपेपर्यंत नवऱ्या मुलीजवळ चाकू व नवऱ्या मुलाजवळ हातांत सुरा देण्याची वहिवाट आहे. ठाण्याकडील महार ब्राह्मणाला न बोलावतांच लग्न करतात. परंतु मुलाचा बाप जर चोखामेळा पंथाचा असला तर ब्राह्मणाकडून लग्न करवून घेतात. कांहीं महार भाटांनाहि बोलावतात. लग्नापूर्वी एक दिवस एक मध्यस्थी भगत आणून त्याला लग्न लावण्यास उद्याचा दिवस चांगला का असें विचारतात व त्यानें हो म्हटलें म्हणजे दुसरे दिवशीं लग्न लावतात. लग्न लागतेवेळीं नवरानवरीच्या अंगावर तांदुळाच्या अक्षता फेकण्याचा प्रघात आहे. एकूण जवळजवळ कुणब्यांप्रमाणेंच महार आपल्यांतील लग्नें लावतात.

विधवाविवाहास आडकाठी नाहीं, मात्र विधवा स्त्रीस आपल्या आतेभावाशीं, मावसभावाशीं, मामेभावाशीं किंवा आपल्या पूर्वीच्या नवऱ्याच्या कुळांतील इसमाशीं लग्न लावतां येत नाहीं. खान्देशांत मात्र नवरा मेल्यानंतर धाकट्या दिराबरोबर लग्न लावण्याचा प्रघात आहे. अशा तऱ्हेनें मोहोतुर लावणाऱ्या इसमास त्या विधवेच्या वापास, व पहिल्या नवऱ्याच्या नातेवाइकास कांहीं पैसे द्यावे लागतात. त्याला देज असें म्हणतात. विधवेचा पाट लावावयाचा तो नेहमीं रात्रीं लावण्यांत येतो; शुद्ध प्रतिपदेला मात्र लावीत नाहींत. तसेंच पहिलीं लग्नें ज्या तिथीला लागलीं असतील त्या तिथीलाहि असा पाट लावतां येत नाहीं. कांहीं प्रांतांत, आषाढ, भाद्रपद व पौष या महिन्यांतहि पाट लावीत नाहींत. पाट लावावयाचा तो एकीकडे एकांत ठिकाणीं लावतात आणि त्या नसंगीं बहुधा पुनर्विवाह केलेल्या स्त्रिया, गोसावी किंवा पंडित, व कांही प्रसंगीं

ब्राह्मणहि हजर असतो. पाट लावण्याच्या वेळीं नव्या नवऱ्याकडून मिळालेलीं पांघुरणें व दागिने पाटाची बायको अंगावर घालते व मग नवरानवरीचा जोडा सतरंजीवर वसविण्यांत येतो. दोघांच्या पदराच्या गांठीं देतात व विवाहित स्त्रीचा मळवट भरला जातो; नंतर तिची ओटी भरतात व हा समारंभ खलास होतो. प्रथम वराला विधवा स्त्रीशीं लग्न करावयाचें झाल्यास प्रथम त्याचें रुईच्या झाडाच्या फांदीशीं पद्धतशीर लग्न लावण्यांत येतें. नंतर ही रुईची फांदी मोडतात म्हणजे पहिली लग्नाची बायको मेली असें होतें व नंतर ती फांदी पुरून टाकतात. असें झालें म्हणजे प्रथमवराला विधुरावस्था प्राप्त होते आणि मग तो पाट लावण्यास मोकळा होतो.

काडीमोड करण्याची परवानगी आहे. मात्र त्याला बायको गैरवर्तणुकीची असणें, नवरा नीट नांदवीत नसणें किंवा दोघांपैकीं कोणासहि असाध्य असा रोग झालेला असणें, यांपैकीं एकादें कारण हवें.काडीमोड केलेल्या स्त्रिया दुसरें लग्न करूं शकतात. महारांचे वारसदारीचे हक्क हिंदुकायद्या प्रमाणच आहेत.

महार धर्मानें हिंदू आहेत. शैव आणि वैष्णव असे दोनहि भेद त्यांच्यांत आहेत. अहमदनगर जिल्ह्यांतील कांहीं महार मातंगपट्टा पंथाचे असून पुष्कळसे कबीर, गिरी आणि नाथ या पंथांचेहि आहेत. चोखामेळा पंथाचे जे आहेत म्हणजे जे महार वारकरी आहेत ते गळ्यांत तुळशीच्या माळा घालतात आणि आळंदी व पंढरपूरच्या वाऱ्याहि करतात. वाऱ्या करतांना अभंग म्हणून भजन करण्यांत त्यांच्या रात्रीं निघून जातात. दक्षिणेकडे जे महार धार्मिक प्रवृत्तीचे आहेत त्यांचे ठिकठिकाणीं हरिभजनाचे ताफे आहेत.भजनाच्या वेळीं ते श्रीराम किंवा पंढरपूरचा विठोबा यांची स्तुति करतात.त्यांच्यांतील स्त्रिया व पुरुष दोघेहि चांगले सुस्वर भजनकरी असून,गोड आवाजांत भजन करीत व भिक्षा मागत दोघे दोघे किंवा अधिक मिळून ते वाऱ्या करतात.

दक्षिणेकडील महारांचीं मुख्य दैवतें म्हणजे भवानी, महादेव, चोखोबा, ज्ञानदेव, खंडोबा, विठोबा आणि म्हसकोबा हीं होत. नागोबा, देवीच्या सांथीची देवता सटवाई आणि पटकीची देवता मरीआई यांची ते प्रामुख्यानें पूजा करतात. ह्या देवांचीं देवळें बहुधा महारवाड्यांतच असतात. शांतारिअम्मा, मरि, देवी, आणि महादेव हीं कर्नाटकाकडील महारांचीं कुलदैवतें होत. खेडोपाडीं,

मोठ्या देवळानजीकच महारांचा तलखोवा असतो. ठाण्याकडील महारांची कुलदैवतें म्हसकोवा, जनाई, गौरी, वहिरोवा, खंडोवा, चोखोवा, भवानी, येल्लम्मा, गिरोवा, बावदेव, चेडोवा, जखाई, सोमनाई, कलकाई आणि जोखाई हीं आहेत. या दैवतांखेरीज पुष्कळांच्या घरीं पूर्वजांचे टाकहि असतात. हिंदूंचे सर्व सण ते पाळतात आणि हिंदूंच्या बहुतेक क्षेत्रांच्या विशेषतः पंढरपूर, आळंदी, जेजुरी आणि तुळजापूर इकडच्या तीर्थयात्राहि करतात.

महारांचे धर्मगुरु हे त्यांच्यांतीलच असून त्यांना गुरु, साधु, वाचक, पंडित, गोसावी किंवा मेंढे जोशी असें म्हणण्याचा प्रघात आहे. खानदेशच्या वाजूला भिकाऱ्यांचा एक पंथ असून त्यांना महार ठाकूर असें म्हणतात. हे ठाकूरहि महारांच्या धर्मगुरूंचीं कामें करतात. गुरु म्हणजे ज्यांनीं धार्मिक कार्याकरितां विशेषतः पंढरीच्या विठोवाच्या सेवेकरितां आपलें आयुष्य दिलें आहे ते होत. महार ठाकूर हे बहुधा पूर्वीचे भाट असावेत आणि महारांत मिसळून गेल्यामुळें त्यांची अवनति झाली असावी. ठाकूर महारांचे धर्मगुरु आहेतच. शिवाय ते त्यांचे ठेवीदारहि आहेत. ठाकूर महाराच्या हातचें खातो पण महार मात्र ठाकुराच्या हातचें खात नाहीं. गुरू आणि ठाकूर यांच्याखेरीज दक्षिणेंत ब्राह्मणहि लग्नादि प्रसंगीं महारांचीं धार्मिक कृत्यें करतात. जंगमहि कांहीं प्रसंगीं ही कामें करतात.

नामदेवापासून महारांचा समावेश भक्तिमार्गांतील वारकरी पंथांत झाला. त्यांच्यांतील श्रेष्ठ साधु चोखामेळा याची समाधि पंढरपुरास नामदेवाच्या पायरीशेजारीं आहे.

महारांतील साधू हिंदूंनीं पवित्र मानलेले भक्तिविजय, दासबोध, ज्ञानेश्वरी, हरिविजय, रामविजय, संतलीला, आणि ज्ञानोबा–तुकोबाचे अभंग वाचतात. त्यांच्यांत कांहीं लोक अस्खलितपणें पुराण वाचणारे व पुराण सांगणारे आहेत.

जादूटोणा, जारणमारण, चेटूक इत्यादींवर महारांचा विश्वास आहे.

त्यांच्यात मयताला पुरतात. ज्यांना ऐपत आहे असे थोडे मयताला जाळतात.

भाद्रपद वद्यांत पूर्वजांच्या नांवानें महालय करतात. त्याप्रसंगीं काकबळी देऊन जातवाल्यांना जेवण देण्याचा प्रघात आहे.श्राद्धविधि करण्याचा प्रघात नाहीं.

(२) चांभार—

कानडा प्रांतांत यांना 'चामगार' असें म्हणतात व कर्नाटकांत यांना 'संगार' असें म्हणतात. हीं नांवें जातीचीं असून त्यावरून कातड्याचा धंदा करणारे लोक असें ओळखलें जातें. काठी, कटाई, जिनगर व ढोर या जातींनाही चांभार या नांवानें ओळखलें जातें; शिवाय चांभारांत हिंदुस्थानी, बंगाली, मद्रासी व मारवाडी या परप्रांतस्थांचाही समावेश केला जातो. तरी पण प्रांतिक भेद असे दोनच आहेत व ते म्हटले म्हणजे मराठा चांभार आणि कानडी चांभार.

उत्पत्तिः— यांच्या उत्पत्तीविषयीं अनेक दंतकथा आहेत. शिवभक्त हरळी यापासून यांची उत्पत्ति झाली अशी एक समजूत आहे. तर दुसरी दंतकथा अशी आहे कीं, यांचा मूळ पुरुष मार्कंड ऋषी हा आहे. यांच्या पूर्वजांनीं शिवाला आपल्या भक्तीनें संतुष्ट केलें व शिवानें त्यांच्या भक्तीवर संतुष्ट होऊन त्यांना उदरनिर्वाहाकरतां जोडे शिवण्याचा धंदा सांगितला. कोल्हापूर संस्थानांत तर त्यांच्या उत्पत्तीविषयीं अशी दंतकथा सांगतात कीं, यांचा मूळपुरुष खुद्द शिवाच्या मुलांपैकीं एक होता व त्यानें शिवाला आपल्या अंगाच्या कातड्याचे जोडे करून अर्पण केले; त्यावर शिवानें रुष्ट होऊन तूं चांभाराचा धंदा करशील असा शाप दिला!

संस्कृतिः— या जातीची मूळ उत्पत्ति कोणतीही असो, परंतु पूर्वापार या जाती कातड्यासंबंधीं धंदा करीत आल्यामुळें यांना गांवाबाहेर वस्ती करून रहावें लागलें. महारमांगांप्रमाणेंच हे इतर हिंदूंकडून अस्पृश्य लेखले गेले. ही गोष्ट जरी खरी असली तरी बुद्ध कालापूर्वी यांचा समाजांतील दर्जा मोठा होता असें दिसतें. चांभार व विशेषतः त्यांच्या स्त्रिया आणि त्यांतल्या त्यांत कर्नाटकांतील स्त्रिया या रूपानें व वर्णानें इतर अस्पृश्यांपेक्षां सुंदर आढळून येतात. शिवाय बुद्धपूर्वकालीं यांच्या धंद्यांतील व्यापाऱ्यांचे संघ असून त्यांना राजदरबारींही मान्यता असे. या जातीचा उल्लेख वेदामध्यें आढळतो. यावरून त्यावेळीं आर्यांच्या इतर जमातीइतकें महत्त्वाचें स्थान या जातीला मिळालें होतें. परंतु पुढें बुद्धकालानंतर या जातीचें महत्त्व कमी होत होत ती इतर हलक्या जातींच्या मालिकेंत येऊन पडली व त्या जातींचे आचारविचारही या जातीनें आत्मसात् केले!

ही जात आर्यांपैकीं असावी असें अनुमान काढण्यास एवढीच माहिती मिळते.

दक्षिण हैद्राबादकडे यांचा मूळ पुरुष रोहिदास आहे अशी कथा आहे. मराठा चांभारामध्यें दोन पोटभेद आहेत. चांभार आणि विदुर चांभार. विदुर चांभारही त्यांतलीच मिश्र संतति असल्यामुळें कनिष्ठ समजले जातात.

इस्टेटीच्या वाटणींत ज्येष्ठ मुलाला जास्त वाटणी मिळते.मराठा चांभार मरी-अम्मा व शीतळा यांची पूजाअर्चा करतात.

उपजाति:— या जातींत(१)अहीर, (२) चेवळी, (३) दाभोळी, (४) घाटी, (५) हरळी व (६) कोकणी असे सहा पोटभेद आहेत.

चेवळी हे कुलाब्यांतील चौलचे; रत्नागिरी कडील दाभोळचे दाभोळी, कोंकणांतले ते कोंकणी व महाराष्ट्रांतील घाटी. चेवळी, दाभोळी व घाटी हे ठाणे, कुलाबा जिल्ह्यांत आढळतात. सातारा जिल्ह्यांत यांचे हरळी व चेवळी असे दोन पोटभेद सांपडतात. हरळी हे चेवळीप्रमाणें महारामांगांसारख्या लोकांचे जोडें शिवत नाहींत हा यांच्यामध्यें मुख्य फरक आहे. यांच्यामध्यें रोटी-बेटी-व्यवहार होत नाहींत. याप्रमाणेंच रत्नागिरीकडील दाभोळी-चेवळींची स्थिति आहे. येथील चेवळी महारामांगांचे जोडे शिवतातच पण आणखी वर मृत मांसही खातात. त्यामुळें दाभोळी त्यांना आपल्यापेक्षां कनिष्ठ समजतात. उलट दाभोळ्यांना महाराष्ट्रांतील हरळी कमी दर्जाचे समजतात. याचें कारण दाभोळी ढोराप्रमाणें कातडी कमावतात हें होय. मराठा व कोंकणी असा तर भेद आहेच पण उच्चवर्णीयांचीं कामें करणारे व नीचवर्णीयांचीं कामें करणारे असाही भेद आहे.

विवाह:— यांच्यामध्यें खालीलप्रमाणें आडनांवें रूढ आहेत. अगावने, अर्खे, वामणे, भागवत, भोसले, चव्हाण, देशमूख, देवरे, डोईफोडे, दुर्गे, गायकवाड, जाधव, कदम, काळे, कांबळे, कारंडे, पवार, साळवे, सातपुते, शेळके, शिंदे, वाघ वगैरे.

या जातींतील कुळपरंपरा:— प्रत्येक कुळाचें देवक वड, निंब, वसनवेल, पाचपालवी अशासारखें कोणतें तरी, झाड असतें. अशीं कुळें दहा असून त्यांचीं नांवें:—अहिराव, अर्खे, वामणें, भोसले, डोईफोडे, करंडे, पवार, शेळके, शिंदे, बसाईत. एकाच आडनांवांत व एकाच देवकांत लग्न-संबंध होत नाहींत. एकाद्याला आपल्या बापाच्या नातेवाईकांतील मुलीशीं

लग्न करतां येत नाहीं. मावशीच्या मुलीशीं लग्न करतां येत नाहीं परंतु मामाची मुलगी चालते. यांच्यांत बालविवाहाची पद्धत रूढ आहे परंतु गरीबीमुळें मुली १६ वर्षें वयापर्यंत लग्नाशिवाय राहिलेल्या आढळून येतात. लग्नें पद्धतीप्रमाणें होतात व तीं ब्राह्मण उपाध्याकडून लावून घेतात. क्वचित् लग्नें लिंगायताकडूनही लावून घेतात. रत्नागिरी जिल्ह्यांत लग्नें चांभार जातीचा भगत हा लावतो व कधीं कधीं जंगमालाही बोलावतात. या जातींत पुनर्विवाहाची चाल रूढ आहे; व कांहीं विशेष कारणावरून नवरावायकोला काडीमोड करतां येते.

सांप्रदाय:— या जाती हिंदुधर्म पाळतात व त्यांना हिंदु कायदा लागूं आहे. यांच्यांत शैव व भागवत असे दोन पंथ आहेत. यांचीं विशिष्ट दैवतें म्हटलीं म्हणजे, जनाई, जोखाई व जखाई हीं आहेत. मृत पूर्वजांच्या स्मरणांत नारळाला दैवत समजून त्याची पूजाअर्चा करण्याची चाल रत्नागिरीकडे आहे. पुणें व नाशिककडे त्यांचा धर्मगुरु "बावा" म्हणून कोणीतरी एक पुरुष असतो. अहमदनगरकडे त्यांचा गुरु लिंगायतापैकीं असतो. साधारणत: या जातीचीं धार्मिक कृत्यें ब्राह्मण व जंगम करितात.

मार्तिक:— यांच्यांत प्रेतें जाळण्याची चाल सर्रहा आहे. पण गरिबीमुळें तें शक्य नसल्यास कधींकधीं प्रेतें पुरतातही. प्रेताचे संस्कार नदीवर अगर विहिरीवर करण्याची चाल असून दहावा व अकरावा हे दिवस पाळले जातात. तेराव्या दिवशीं मोठी जेवणावळ दिली जाते. श्राद्ध व पक्ष हे विधी दरवर्षीं पाळले जातात. खानदेशांत विवाहित मृतांना जाळणें व अविवाहितांना पुरणें अशी चाल आहे.

धंदा:—या जातीचा मुख्य धंदा जोडे करणें हा आहे. कांहीं कातड्याच्या वह्या, दोर, पिशव्या, चाबूक वगैरेही धंदा करतात. कांहीं गाड्या ठेवणें, तंबू ठोकणें व कापड विणणें हाही धंदा करतात. कांहींना इनामी उत्पन्नें आहेत. परंतु बहुतेक सर्व लोक मजूर आहेत.

खाद्य:— हरीण, ससा, कोंबडी व बकरी यांचें मांस, मासे हें यांचें खाद्य आहे. ही जात दुसऱ्या कोणत्याही प्राण्याच्या मांसाला शिवत नाहीं अगर उष्टें खात नाहीं. गोमांस व मृतमांस यांना वर्ज असल्यामुळें ही जात आपल्याला महार-मांगांपेक्षां श्रेष्ठ समजते.

(३) मांग—

नांव, उत्पत्ति व मूळ ठिकाण:—हे कानडी मुलखांत 'मडिग' म्हणून व गुजराथेंत 'मांगेला' नांवानें ओळखले जातात. मांग दक्षिण व कर्नाटक या देशांत वरेचसे आढळतात आणि गुजराथ व कानडांत थोडे आढळतात. संस्कृत वाङ्मयांत या जातीचें नांव 'मातंग' असें आहे. मांग हें या 'मातंग' शब्दाचें अपभ्रष्ट रूप होय. गुजराथेंतील मासे धरण्याचा धंदा करणाऱ्या 'मांगेला' ची एक स्वतंत्र जातच मानली जाते. मांग आपल्या उत्पत्तीसंबंधीं अशी गोष्ट सांगतात कीं, आम्हीं जंबुक ऋषीचे वंशज आहोंत. या सात मुलांपैकीं थोरल्यानें शंकराची गाय (मारून) खाल्यामुळें शंकरानें त्याला 'महार' होण्याची शिक्षा केली. धाकटा गाईचें रक्त अंगावर सांडलेलें आहे, अशा स्थितींत शंकरापुढें गेल्यानें, त्याला 'मांग' होण्याची शिक्षा मिळाली.

मांगांचे तीन प्रादेशिक पोटभेद आहेत. (१) मराठा मांग—यांना 'मांग' म्हणतात, (२) कानडी मांग म्हणजे 'माडिग'; (३) गुजराथी मांग—यांना 'मांगेला' म्हणतात; हें एकमेकांशीं भोजन व विवाह करीत नाहींत.

मांगांचें स्थान हिंदूंत अति खालचें आहे. सापांना भुलविणारे मांगगारुडी हे भटकणारे व नजरबंदी करणारे असून एका ठिकाणीं राहात नाहींत. ते जमिनींत खुंट्या मारतात आणि त्यांच्या आधारें पसरलेल्या चांदव्याखालीं राहातात. ते कुत्रे पाळतात आणि गाढव व म्हैस या जनावरांचा ओझी वाहण्याकडे उपयोग करून घेतात. त्यांना स्वत:च्या विहिरी व देवळें असतात. गांवचा न्हावी त्यांची हजामत करीत नाहीं आणि धोबी त्याचे कपडे धूत नाहींत. मांग हे उंच, मजबूत बांध्याचे व राकट असून त्यांचे डोळे नेहमीं रक्ताप्र माणें लाल असतात. त्यांच्या अंगावरील लव पातळ असून, डोक्यावरील केस दाट म्हणजे पुष्कळ असतात. 'अहमदनगर' जिल्ह्यांतील कांहीं पुरुष अंगावरील व डोक्यावरील केस मोकळेपणानें वाढूं देतात. वायका आपले केस कुणबी बायांप्रमाणें बांधतात. त्या कृत्रिम—बनावट—केस वा फुलें यांचा उपयोग करीत नाहींत. त्यांचे हात व दंड यांवर पुष्कळ ठिकाणीं गोंदलेलें असतें. सुरूचें झाड, विंचू व सर्प यांचीं चित्रें गोंदण्याकरितां पसंत करतात. हाताच्या मागील आंगठ्याशिवाय सर्व बोटांवर '।।।' असें गोंदितात. त्याचप्रमाणें

वाजूवर सूर्यफूल (कमळ) गोंदतात. पोषाक व अलंकाराचे बाबतींत मांगांचे महाराशीं साम्य आहे.

त्यांच्या पोटजाति:—(१) अस्सल मांग किंवा मराठा मांग, (२) वाले, (३) वुरुड, (४) चपलसांडे, (५) दबकर, (६) देसूर (७) धकलवार–दकलवार–वाजंत्रीमांग; (८) ढोग, (९) घडशी, (१०) होळगे होलार, (११) जिनगर, (१२) जिराइत, (१३) काकर, (१४) कोकलवार, (१५) मानभाव, (१६) मांगगारुडी, किंवा म्हैसभादरे, (१७) मोची, (१८) नाडे, नुडार, खोत्र (१९) परिट, (२०) पेंड–पेड,(२१) शिवट–शेवते; (२२) तेलंगी, (२३) टोकरफोडे, (२४) झरे, (२५) मुसलमान.

यांपैकीं कांहीं पोटभेदांचे अकरमाशे–अधर्मजात असे आणखी पोटविभाग पडतात. अस्सल मांगांची सामाजिक योग्यता श्रेष्ठ आहे. सोलापूरकडे होलरमांग आणि दवलकार मांग अस्सलांचें उष्टें खातात. कांहीं ठिकाणीं टोकरफोडे व काकर हे स्वत:स 'मराठामांग' म्हणवितात पण सहभोजन करीत नाहींत. दवलकार हे इतर मांगाचे भाट व उपाध्याय असून, त्यांना 'मांगटे ' ही संज्ञा आहे. दवलकार असें सांगतात कीं 'आम्हीं श्रेष्ठ मांग आहों आणि आम्ही इतरांना शिवत नाहीं म्हणून ते आमचें शासन करण्याकरितां आमचा द्वेष करण्याची ऐट आणितात. पण हें विधान खोटें आहे. कारण दवलकार अस्सल मांगाचें उष्टें खातात आणि कोणताही मांग त्यांना शिवत नाहीं. इतर मांग ज्या ओढचाचें वा प्रवाहाचें पाणी उपयोगांत आणतात त्या पाण्यास त्यांना शिवूं देत नाहींत. त्यांना दुसऱ्याकडून पाणी घ्यावें लागतें. असें असूनही दवल-कारांच्या ठिकाणीं अशी एक पवित्र शक्ति असते कीं मांग त्यांच्या नांवानें खोटी शपथ कधीं घेत नाहींत. कोकलकार दवलकारांचे मांगटे असून त्यांच्या-पेक्षां योग्यतेनें कमी आहेत.

मांगगारुडी हे मूळचे साप भुलवणारे असल्यामुळें त्यांना तें नांव मिळालें. खानदेशांत ते म्हशी भादरण्याच्या धंद्यावरून 'म्हैसभादरे' म्हणून प्रसिद्ध आहेत. टोकरफोडे हें नांव बांबू फोडण्याच्या धंद्यावरून त्यांनीं (टोकर-फोडयांनीं) घेतलें असून त्यांचा धंदा बांबू फोडण्याचा आहे. नाडा म्हणजे दोरे वळण्याच्या धंद्यावरून नाडयांनीं आपलें नांव घेतलें आहे. मोची हा कातडी

कमावितो. काकर बिनकमावलेल्या चामड्याचे दोर वळतो (काकर म्हणजे बिनकमावलेल्या कातड्याचा दोर). शिवते, चांभार आहेत. होळगे किंवा होलार, ढोर, बुरूड, घडशी व जिनगर हे निःसंशय मांगांनीं मानिलेले असे त्या त्या जातींचे प्रतिनिधीच होत. मानभाव बहुतकरून कृष्णभटानें स्थापिलेल्या 'मातंगपद' समाजाचे असावेत. हा 'मातंगपद' 'मांगभाव' म्हणून लोकप्रसिद्ध आहे. या उपजातींच्या उपपत्तीचा शोध अजून लागला नाहीं.

अहमदनगर जिल्ह्यांत चपलसांडे, गारुडी, होलार, जिराइत, मराठा, व टोकरफोडे या जाती असून, जिराइत बरेच दिसतात. खानदेशांत १३॥ पोटजाति आहेत. त्याः—मराठा, गारुडी, दवलकार, पेंड, ढोर, बुरुड 'जिनगर, तेलंगी, परिट, मोची, घडशी, देसूर, मानभाव या तेरा व मुसलमान ही अर्धी. नाशिकमध्यें अस्सल, पेंड व गारुडी या तीनंच पोटजाती आहेत. अस्सलमांग, गारुडी, होळगे व होकरफोडे या जाती पुणें जिल्ह्यांत नजरेस पडतात. सातारा जिल्ह्यांत मांगांत पोटभेद नाहींत. सोलापुरांत अस्सल, गारुडी, पेंड, होलार, मोची, दकलवार टोकरफोडे, काकर, शेवले, नाडे व काकलवार हे आहेत. ठाण्यांत गारुडी, झरे व वाले या जाति आढळतात. बेळगांवच्या मांगांत दबकारी, गारुडी व नाडे आहेत. उत्तर मराठा देशांतील संस्थानांत मांगांच्या दवलकार, गारुडी, नाडे, पाटणा, मराठा व शेवते या जाती आहेत.

मांगांचे गोत्ररूप गट असे:—

(१) अदमाने (२) अव्हार (३) आपटे (४) अलवे (५) अवार (६) भिसे (७) भोदे-डे, (८) भोरे (९) चव्हाण (१०) धोंगडे (११) दिवटे १२) गाइकवाड (१३) गवळी (१४) हुंडे (१५) जाधव (१६) जगताप (१७) जोनवरे (१८) जोगदंड (१९) कवले (२०) काळुखे (२१) कांबळे २२) रवडे (२३) खवटे (२४) कोटे (२५) कुंचेकर (२६) लाकडे (२७) लोखंडे (२८) मोहिते (२९) मोरे (३०) नांदेडे (३१) नेटके (३२) पालुटे-ते (३३) पारधी (३४) पवार (३५) पिता-रा-रे, (३६) राजगुरु (३७) सता-टाने (३८) साठे (३९) शेंगे (४०) सिंदे (शिंदे) (४१) ठोकरे (४२) वैरास्वर (४२) वब्राट.

विवाहाचे नियम:—एकाच गोत्रवजा गटांतील स्त्रीपुरुषांचे एकमेकांशीं विवाह होत नाहींत. मांगाला आपल्या आईबापांच्या बहिणींच्या मुलींशीं

लग्न करितां येत नाहीं. त्याला आपल्या मामाच्या मुलीशीं लग्न करतां येतें. कांहीं ठिकाणीं वायकोच्या वहिणीशीं ती जिवंत असतांना पुरुषाला विवाह करतां येतो, कांहीं स्थलीं वायको मेल्यावरच त्याला तसें करतां येतें, बहुपत्नीत्वाला परवानगी असून तें प्रचारांत आहे. लग्नें लहानपणीं व मोठेपणींही होतात, कधीं मुलांचीं लग्नें तीं लहान असतांनाच करितात. पत्नीचें अपातिव्रत्य, एकमेकांचा स्वभाव न जुळणें, व नवऱ्याची दुर्बलता या गोष्टी असतां व महारोगासारखा असाध्य रोग–दोघांपैकीं कोणासही झाला असतां, काडीमोड करतां येते. अशा तऱ्हेनें काडीमोड केलेल्या स्त्रीला पुनर्विवाह पद्धतीनें लग्न करतां येतें.

भाषा:—मांगांची मातृ–भाषा मराठी होय. सोलापुराकडे ते मराठ्यांस न समजणारी व व्यवहारांत नसलेली अशी 'पारोशी' नामक भाषा आपापसांत बोलतात. अहमदनगरचे मांगांची मातृभाषा मराठीची एक पोटभाषा आहे. त्यांना अनुनासिकें व जोडाक्षरें यांचा उच्चार नीट करतां येत नाहीं. त्यांच्या बोलण्यांतले विशेषेंकरून येणारे शब्द म्हणजे राकस (राक्षस) पुरिस (पुरुष) मप (मजपाशीं) तप (तुजपाशीं) मद (माझें) तुद (तुझें). खानदेशांत ते स्थानिक कुणबी व महार यांच्यांप्रमाणें मराठीची एक पोटभाषा बोलतात.

जातिव्यवस्था:—मांग नायक दोन प्रकारचे आहेत, मेहेतर व सरनाईक. मेहेतर हे धार्मिक पुढारी असून दुसरे गुन्हे करण्याच्या धंद्यांतले नायक होत. मेहेतर हे जातिसंबंधीं तंटे, जातींतील प्रौढ माणसांच्या सल्ल्यानें तोडतात. अपराध्यांना १। ते ५ रु. दंड करितात आणि तो पैसा जातजेवणांत खर्च करतात. जेवण देईपर्यंत अपराध्याला जातींत घेत नाहींत. जातजेवण न दिलें तर अपराध्याला जातीबाहेर टाकितात. हे अपराध म्हणजे दवलकार, बहार, मांगगारुडी, फांसेपारधी यांजबरोबर जेवण, विडी ओढणें व व्यभिचार वगैरे होत.

जन्मसमारंभ:—मांगस्त्री बाळंतीण झाल्यावर मांग तिला ५ आठवडे अशुद्ध मानितात, पण बाराव्या दिवसापासून तिला शिवतात, मात्र तिच्या हातचें कांहीं खात नाहींत. मूल जन्मल्यानंतर पांचव्या दिवशीं ते सटवाईच्या पिठाचे मूर्तीची वा पांचखडे रांगेनें मांडून त्यांची बाळंतिणीच्या खोलींत पूजा करितात, आणि तिला भात वा डाळभात अर्पितात. पिठाचे दोन

दिवे रात्रभर जळत ठेवतात. (रात्रीं) एक मेजवानी होते. बाराव्या दिवशीं बाळबाळंतिणीस आंघोळ घालून तिचीं चिरगुटें धुतात आणि बाळंतिणीची खोली गाईच्या शेणानें सारवतात. मग घराच्या बाहेर ओळीनें सात खडे मांडून बाळंतीण सटवाईच्या नांवानें त्यांची पूजा करते. ह्याच दिवशीं मुलाचें नांव ब्राह्मण ज्योतिषाकरवीं ठेवितात. बायकांना बोलावून त्यांना पुरण वा (शिजलेले गहूं) गव्हांची खीर देतात. एक महिन्यानंतर बाळंतिणीला नवा चुडा भरतात. मुलाचें जावळ पहिल्या तीन वर्षांत केव्हांही काढून, आप्त व इष्टमित्र यांना मेजवानी देतात.

लग्नसमारंभ:—लग्नाचें बोलणें मुलाचा बाप (मुलीच्या बापापाशीं) काढतो. त्याला मुलीच्या बापाला हुंडा म्हणून ५ ते १० रु. द्यावे लागतात. लग्नाचा मंगल दिवस त्यांच्यांत जातीचा पवित्र मनुष्य वा साधु ठरवितो. प्रत्येक साधूकडे १२ ते ३० खेडीं असतात. खानदेशाकडे साधूचं लग्नें चालवितात, त्यांना सर्व लग्नांस हजर रहावें लागतें. जर साधू नसला तर समारंभास जमलेल्यापैकींच कोणीतरी लग्न चालवितो. कोठें कोठें ब्राह्मण दूर उभें राहून लग्नें चालवितो. मांगांचीं लग्नें बऱ्याचशा बाबींत महारासारखीं होतात. लग्नप्रसंगीं खंडोबा, बहिरोबा, काळुबाई वगैरे दैवतांच्या मूर्ति सोनें, रुपें किंवा तांबें या धातूच्या (नव्या) करतात किंवा जुन्याच स्वच्छ करतात. लग्नापूर्वी पांच दिवस रोज मुलीच्या अंगाला तिच्या घरचीं माणसें हळद लावितात आणि उरलेली मुलाकडे पाठविण्यांत येते. तिसऱ्या दिवशीं दुपारीं दोन्ही घरीं कुळदैवतास एक मेंढी बळी देतात, आणि लग्नमंडपांत ती मारतात. संध्याकाळीं मुलाचा मामा, चुलतभाऊ किंवा बंधु हा इष्टमित्र व आप्तांसह वाजंत्री घेऊन मारुतीला जातो. मुख्य मनुष्य आपल्या हातांत एक परशु घेतो, चौघेजण त्याच्या डोक्यावर वस्त्र धरतात आणि त्यांच्याबरोबर भात व नैवेद्य असतो. गुरव देवळांत देवक म्हणजे आंब्याचे डहाळे, जांभूळ, रुई, शमी व उंबर यांच्या फांद्या आणून ठेवतात. त्या देवकापुढें ते लोक नैवेद्य व ताम्रनाणें ठेवितात आणि लग्नमंडपाच्या एका खांबाला ते डहाळे बांधतात. मग दोन्हीकडे एक बोकड देवकास बळी देतात आणि मेजवानी करतात. मग नवरा–मुलगा आप्तांसह वाजंत्री घेऊन घोडा वा बैल या जनावरावर बसून

मारुतीच्या देवळांत जातो. तेथें मुलीचा बाप त्याला भेटून अंगरखा व पागोटें देतो. ते कपडे मुलगा आंगावर घालतो आणि मग ते त्याला मुलीचे घरीं नेऊन लग्नमंडपांत बसवितात. मग ते दोन टोपल्या घेऊन त्यांत चामडें व दोर ठेवितात आणि नवरानवरीस एकमेकांच्या समोर बसवून त्यांच्यामध्यें अंतरपाट धरितात. लग्न चालविणारा उपाध्याय मंगलाष्टकें म्हणतो आणि निमंत्रित मंडळी वधुवरांवर अक्षता टाकितात. मंगलाष्टकें संपलीं कीं तीं दोघें नवराबायको होतात. कांहीं ठिकाणीं मुलीच्या टोपल्यांत चर्मा-ऐवजीं जातें व मुलाच्यांत दोर ठेवण्यांत येतो. अंतरपाटाऐवजीं 'जम्नीका'-नामक रजई दोघांच्यामध्यें धरितात आणि तांदुळाच्या ऐवजीं ज्वारी वधुवरांवर टाकितात. या नव्या जोडप्यास जमिनीवर परस्परांशेजारीं उभें करितात आणि अंतरपाटाचें त्यांच्यावर आच्छादन घालितात. त्यांच्या-भोंवतीं पांच वेळां सूत गुंडाळून त्याचे दोन भाग करतात. एक तुकडा हळ-कुंडासह मुलाचे उजवे मनगटास बांधून दुसरा मुलीच्या डाव्या मनगटास बांधतात. मग त्या जोडप्यास वोहोल्यावर उभें राहावयास सांगतात व दोघेजण तीनदां जागा बदलतात. नवरानवरीच्या बोटांना हळद लावितात. नवरा मुलगा रात्रीं तेथेंच राहातो. आणि इतर पाहुण्यांसमवेत लग्नमंडपांतच निजतो. नवरानवरी पोफळांनीं खेळतात आणि एकमेकांच्या पाठीवर कापडाच्या गुंडाळीनें मारतात. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशीं मुलीचे आईबाप मुलाकडील व आपले आप्त आणि जातभाऊ यांना मेजवान्या देतो. चवथ्या दिवशीं मुलाचा बाप नवरीस चोळी, साडी देतो आणि नवरानवरीस लग्नाचीं बाशिंगें बांधतो. नंतर ते लोक दोघांस मिरवत मारुतीला घेऊन जातात आणि मग मुलाच्या घरीं नेतात. दुसऱ्या दिवशीं हें जोडपें गांवकऱ्यांच्या घरीं जातें आणि लग्नसमारंभ संपतो.

विधवांना पुनर्विवाह करण्यास परवानगी आहे. पण पुण्याच्या मांगांत व 'मराठा' आडनांवाच्या मांगांत पुनर्विवाहाची परवानगी नाहीं. विधवेला आपल्या मावशीच्या किंवा मामाच्या मुलाशीं आणि मृत नवऱ्याच्या कुटुंबांतील कोणाशीं लग्न करतां येत नाहीं. विधवेचा पुनर्विवाह (काळोख्या रात्रीं) किंवा कृष्णपक्षांतील रात्रीं करण्यांत येतो.

ढोर जातीची माहिती—

या जातीचे लोक मुख्यतः ढोरांचीं कातडी कमाविण्याचा धंदा करतात, त्यावरूनच त्यांना 'ढोर' हें नांव पडलें असावें असें दिसतें. ह्यांची वस्ती मराठी जिल्ह्यांत विशेषतः अहमदनगर, खानदेश, सातारा, सोलापूर, बेळगांव, विजापूर, कोल्हापूर या जिल्ह्यांत आहे. कर्नाटक व तेलंगण या प्रान्तांतही यांची वस्ती बरीच आढळते.

या जातींतही आणखी पोटजाति आहेत. या पोटजातींत बेटीव्यवहार व रोटीव्यवहारसुद्धां चालत नाहीं. ह्या पोटजातींतील भेद निश्चितपणें सांगणें कठीण आहे. कित्येक वेळां प्रान्तावरून तर कित्येक वेळां पंथावरून अगर धंद्यावरून हे भेद पडले असल्याचें आढळतें. (१) बुदलिगर अथवा बुधलेकरी, (२) बुंदेलखंडी, (३) हिंदुस्थानी, (४) कंकय, (५) कर्नाटके, (६) खेटरफडी, (७) लिंगायत व (८) मराठे अगर अस्सल ढोर. अशा आठ प्रकारच्या पोटजाती मुंबई प्रान्तांत आढळतात. हैदरावाद संस्थानांत, कर्नाटक व तेलंगण प्रान्तांत (१) रंगे ढोर, (२) बुधले ढोर, (३) ककय्य ढोर, (४) चांभार ढोर व (५) शादू ढोर अशा पांच प्रकारच्या ढोरांच्या पोटजाती प्रामुख्यानें आढळतात.

बुधलेकरी व खेटरफडी यांची वस्ती सोलापूर जिल्ह्यांत आहे, कंकय व बुंदेलखंडी यांची वस्ती सातारा जिल्ह्यांत आहे; कर्नाटके व हिंदुस्थानी हे बेळगांव जिल्ह्यांत आढळतात. बुधलेकरी व हिंदुस्थानी हे धारवाड जिल्ह्यांतही आढळतात. मराठे ढोर अगर अस्सल ढोर यांची वस्ती मात्र सर्व मराठी जिल्ह्यांतून आढळते.

ह्या जातींत जीं आडनांवें आढळतात. त्यांपैकीं सर्वसामान्य आढळणारीं खालीलप्रमाणें आहेत:—बोराडे, दरवेशी, गाइकवाड, गजकोस, गावरे, घोडकी, हसनळे, होटकर, होळकर, इंगळे, कदम, कैकंदाद्रे, कटकदवंडे, कळंबे, कावळे, केळगंद्रे, खंदरे, मानकर, मुनिमानी, नानडे, नारायणकर, नावगणे, पोळे, राजुरी, सदाफळे, साळुंके, शेरखाने, शिंदे, सोनोने, त्रिवके, इत्यादि. प्रत्येक आडनांवाचें एक ठराविक देवक असतें. ब्राह्मणांत जसें गोत्र तसाच हा देवकाचा प्रकार आहे. उंबर, जांभूळ, मरियादवेल व

कुन्हाड हे देवकाचे सामान्य प्रकार आहेत. एकाच देवकाच्या कुटुंबांत बेटी-व्यवहार होत नाहीं. लग्नाचे वेळीं देवकाचें चिन्ह जवळ असावें लागतें.

ह्या जातींतील मुलाला आपल्या आते बहिणीशीं अगर मामे बहिणीशीं लग्न करतां येतें; परंतु मावस बहिणीशीं मात्र करतां येत नाहीं. बायकोच्या बहिणीशीं लग्न केलें तरी चालतें. एका कुटुंबांतील दोन सख्खे भाऊ दुसऱ्या कुटुंबांतील दोन सख्ख्या बहिणींशीं लग्न करूं शकतात. लग्नांत मुलाचें वय पांच पासून वीस पर्यंतही असतें. मुलींचीं लग्नें पदर आल्यानंतर सुद्धां करतात. बहुपत्नित्व प्रचारांत आहे.

लग्नाचा प्रकार सामान्यपणें असा असतो:—मुलाचा बाप मुलीची मागणी घालतो व मुलगी मिळविण्याकरितां त्याला मुलीच्या बापाला पन्नास पासून दोनशें पर्यंत रुपये द्यावे लागतांत. मागणीला मुहूर्त पाहतात, व ह्या सर्व गोष्टी ब्राह्मणाकडून अगर जंगमाकडून करविल्या जातात. सुमुहूर्तावर मुलाचा बाप मुलीच्या घरीं जातो व नवी साडीचोळी व साखरेचा पुडा देतो. उपाध्याय मुलीला कुंकू लावतो व ती नवी साडीचोळी नेसते. नंतर तिची नारळतांदुळांनीं ओटी भरतात व जमलेल्या मंडळीस पानसुपारी वांटण्यांत येते. हा मागणीचा प्रकार अगर साखरपुडा झाला. यानंतर लग्न कांहीं दिवस लांबलें तरी चालतें. लग्नाला सुरवात हळद तयार करण्यापासून होते. हळद तयार झाली म्हणजे तीपैकीं थोडी मुलाच्या अंगाला लावतात व उरलेली मुलीला लावण्याकरतां पाठविण्यांत येते. हळदीबरोबरच साडीचोळी, फुलांच्या माळा, मुंडावळी वगैरे पाठवितात. लग्नाच्या पूर्वीं दोन दिवस पांच झाडांचीं पानें घेऊन आप्तेष्टांसह वाजतगाजत मारुतीच्या देवळांत जातात, व तीं पानें देवापुढें ठेवून परत लग्नाच्या मांडवांत आणतात व एका खांबाला बांधतात; ह्यालाच देवक किंवा संरक्षक देवता म्हणतात. आप्तेष्टांना बकऱ्याची मेजवानी देण्यांत येते. लग्नाच्या दिवशीं बहुलें तयार करतात. नवरा मुलगा घोडयावर बसून मिरवत मुलीच्या गांवच्या मारुतीच्या देवळांत जाऊन उतरतो. सोलापूर व विजापूर जिल्ह्यांत नवरा मुलगा बैलावर बसून जातो. मुलाचा भाऊ मुलीच्या घरीं जाऊन नवऱ्या मुलाकरितां पागोटें आणतो. मांडवाच्या दारांत नवऱ्या मुलावरून दहीभात ओंवाळून तो भुताखेतांकरितां टाकण्यांत येतो. नंतर नवरा मुलगा मांडवांत जातो. त्याला

स्नान घालण्यांत येऊन एका पाटावर बसविण्यांत येतें. त्याच्या समोर दुसऱ्या पाटावर मुलीला बसविण्यांत येतें, व त्यांच्यामध्यें अंतरपाट धरतात. नंतर ब्राह्मण (किंवा जंगम) मंगलाष्टकें म्हणतात व नवरानवरीवर मंगलाक्षता टाकितात. मंगलाष्टकें झाल्यावर अंतरपाट काढण्यांत येतो व नवरानवरी एकमेकांस माळ घालतात. पांच पदरी सुताच्या दोऱ्यांत हळकुंडें बांधून त्याचीं दोन कंकणें तयार करून एक नवऱ्याच्या उजव्या व दुसरें नवरीच्या डाव्या मनगटांत बांधतात. नवरानवरीच्या कपाळाला बाशिंगें बांधतात. उपाध्याय होम करतात व नवरीच्या गळ्यांत मंगळसूत्र बांधतात. नंतर नवरानवरीला स्थंडिलाला पांच प्रदक्षिणा घालण्यास सांगतात. प्रदक्षिणा झाल्यावर त्यांच्या पदरांची गांठ मारतात. तसेंच त्यांना गृहदेवतांपुढें नारळ ठेवून नमस्कार करण्यास जावें लागतें. नवरा तो नारळ परत आणतो व मांडवांत परत आल्यावर जोडपें बहुल्यावर बसतें. अशा प्रकारें लग्न झाल्यावर आप्तेष्टांना भोजन देतात. दुसरे दिवशीं सकाळीं वरात नेण्यांत येते. मुलाच्या घरीं पांच सुवासिनी बायका नवरीची ओटी भरतात. नवरानवरी मारुतीच्या देवळांत जाऊन पायां पडतात. दुसऱ्या दिवशीं त्यांना हळद लावून स्नान घालण्यांत येतें व नंतर एकमेक एकमेकांचीं कंकणें सोडून तीं पाण्यानें भरलेल्या तांब्याच्या भांड्यांत टाकतात. हें झालें म्हणजे लग्नविधि संपतो.

ह्या जातींत पुनर्विवाहाची पद्धति प्रचारांत आहे. विधवेनें आपल्या आतेभावाशीं अगर मामेभावाशीं अगर पहिल्या नवऱ्याच्या कुटुंबांतील कोणाशींही लग्न केलें तरी चालतें. फक्त मावसभावाशीं व सख्ख्या दिराशीं तिला लग्न करतां येत नाहीं. मुंबई प्रान्तांत विधवांचीं लग्नेंही ब्राह्मणच किंवा जंगम चालवितात. हैदराबाद संस्थान, कर्नाटक व तेलंगण या प्रान्तांत अशा वेळीं ब्राह्मण लग्न चालवीत नाहीं. नवरीची ओटी भरणें व तिच्या कपाळीं कुंकू लावणें हा अशा लग्नांतील महत्त्वाचा भाग असतो. पुरुषाला पहिलेंच लग्न विधवेशीं लावावयाचें असेल तर प्रथम त्याला रुईच्या झाडाशीं लग्न लावावें लागतें.

नवराबायकोचें न पटलें, किंवा बायको गैरवर्तनी अगर वांझ असली तर काडीमोड करतां येते. जातीच्या पंचांसमक्ष पेंढ्याची काडी मधोमध मोडण्यांत येते अगर लेखी करार करतात. स्त्रीनें जातींतल्या पुरुषाशींच व्यभि-

चार केला असेल तर तिला काडीमोडीनंतर पुन्हां लग्न करतां येतें. पण पर-जातींतील पुरुषाशीं व्यभिचार करणाऱ्या स्त्रीला जातीबाहेर टाकण्यांत येतें.

ढोर हिंदुधर्मी आहेत व विशेषतः शैवपंथी आहेत व त्यांच्यांतील वारसाचे हक्क, पद्धति वगैरे हिंदू कायद्याप्रमाणें आहेत. बहिरोबा, तुळजापूरची व कोंडणपूरची भवानी, जनाई, जेजुरीचा खंडोबा, शिंगणापूरचा महादेव, व पंढरपूरचा विठोबा हीं त्यांचीं मुख्य दैवतें आहेत. सर्व प्रकारचे हिंदूसण व उपवासाचे दिवस ते पाळतात.नवरात्र,महाशिवरात्र हीं व्रतें कडकडीत उपोषण करून पाळतात. दसऱ्याच्या दिवशीं देवाला बकऱ्याचा किंवा कोंबड्याचा बळी देतात. प्रत्येक कुटुंबाचा ठराविक गुरु असतो. दरवर्षीं गुरूला दक्षणा म्हणून पैसे, कपडे वगैरे देतात. रोगराई उद्भवली असतां हे लोक मरी किंवा शितळा देवीची पूजा करून तिला कोंबडा अगर बकरा बळी देतात; अशानें रोगराई थांबते अशी समजूत. देवाचा कौल, जादुमंत्र, चेटूक वगैरेंवर या लोकांचा फार विश्वास आहे; व देवऋषीची भक्ति, अगांत देव येणें, जादूटोणा करणें, अंगाराधुपारा, कोंबड्याबकऱ्याचा बळी देणें, वगैरे प्रकार अडीअडचणीच्या वेळीं, विशेषतः घरांत कोणी आजारी असल्यास, फार चालतात. यांच्यांत कित्येक लिंगायतधर्मी आहेत व कांहीं वारकरी पंथाचेसुद्धां आहेत.

माणूस मेल्यावर कधीं कधीं दहन करतात;परंतु नियम प्रेतें पुरण्याचाच. प्रेत तिरडीवर ठेवून जातभाईनीं खांद्यावर वाहून स्मशानांत नेण्याचा प्रघात आहे. सुवासिनी स्त्री मेल्यास तिला नवी साडीचोळी नेसवून व चुडें भरून, मळवट भरून अशी नेतात. विधवांना हा मान मिळत नाहीं. मुलगा अगर अगदीं जवळचा नातेवाईक विस्तवाचें मडकें धरून तिरडीच्या पुढें चालतो. व तिरडी वाहणारे व इतर जातभाई "जयजयराम " म्हणत मागून जातात. वाटेंत " विसाव्याची जागा " म्हणून एका ठराविक ठिकाणीं तिरडी उतरून ठेवण्याचा प्रघात आहे. या ठिकाणीं तांब्याचा पैसा व थोडी भाकरी जमिनी-वर ठेवून, खांदे बदलून तिरडी उचलतात व स्मशानांत जातात. तेथें एका खड्ड्यांत प्रेत बसल्या स्थितींत पुरण्यांत येतें. प्रेताचें तोंड पूर्वेकडे करतात. त्याचा उजवा हात डाव्या हातावर ठेवतात. मग वर माती लोटतात. जंगम बरोबर असतो तो वर बेलाचीं पानें टाकतो व मेलेला कैलासास गेला असें

सांगतो. नंतर सर्वजण स्नान करतात व जंगमाला तांब्याची दक्षणा देतात व तो सर्वांना अंगारा लावतो. नंतर मृताच्या घरीं परत येऊन सर्वजण पाय धुवून चूळ भरून टाकतात व पायांवर कडूलिंबाच्या डाहळीनें गोमूत्र शिंपडून घेऊन घरोघर जातात. लिंगायत ढोरांत व विशेषतः हैदरावाद, कर्नाटक, तेलंगण या प्रांतांत प्रेताच्या हातांत लिंग देऊन व कपाळाला भस्म लावून मग पुरण्याची पद्धत आहे. तिसरे दिवशीं एका सुपांत तूप लावलेल्या गव्हाच्या तीन रोटच्या, खोवरें, झारा व दहयाचीं दोन मडकीं आणि एक गोमूत्राचें, असें घेऊन स्मशानांत जातात. एक रोटी विसाव्याच्या जागेवर ठेवतात व नंतर स्मशानांत जाऊन प्रेत पुरलेल्या जागेवर गोमूत्र शिंपडून त्यावर उरलेल्या दोन रोटच्या व दहयाचीं दोन्ही मडकीं ठेवतात. आंघोळी करून लोक घरीं येतात. दहा दिवस सुतक पाळण्याची वहिवाट आहे. दहाव्या दिवशीं मृताचा मुलगा अगर क्रिया करणारा लगतचा नातेवाईक क्षौर करून कणकेचे दहा पिंड तयार करतो. ही सर्व क्रिया जंगम चालवितो. नऊ पिंड पाण्यांत टाकतात व दहावा कावळ्याला देतात. अकराव्या दिवशीं आप्तेष्ट व स्नेहीसोबती यांना जेवण देण्यांत येतें. वार्षिक श्राद्ध करतातच असें नाहीं. पितृपक्षांत मात्र तिथीच्या दिवशीं न चुकतां महालयश्राद्ध करतात. लिंगायतपंथी ढोर मात्र सुतक पाळीत नाहींत व नंतर कोणत्याही प्रकारची श्राद्ध वगैरे क्रिया करीत नाहींत.

महारांपासून कातडीं विकत घेऊन तीं कमाविणें हा ढोर जातीचा वंशपरंपरेचा धंदा आहे. बहुतेक लोक स्वतःच्या भांडवलावर धंदा करतात. स्त्रियाही पुरुषांना कामांत मदत करतात. कित्येक लोक पादत्राणें, खोगीर, मोटा, पखाली, तोवरे, इत्यादि कातडी जिन्नस करतात. विशेषतः सोलापूर जिल्ह्यांतील लोक हीं कामें उत्तम करतात. कांहीं लोक शेती करतात, कित्येक मोलमजुरीही करतात.

सर्व ढोरजात मांसाहारी आहे पण कोणीही गोमांस खात नाहीं. ह्या जातीचे लोक उष्टें मात्र खात नाहींत. हैदराबाद, कर्नाटक, तेलंगण ह्या प्रान्तांत ढोर स्वतःला महार, धेड इत्यादि जातींहून उच्च समजतात व त्यांच्या हातचें खात नाहींत. परंतु महार, धेडसुद्धां ढोरांच्या हातचें खात नाहींत.

कीलघा

पीठिका व लग्नें—लोकसंख्या ५,८४९ (१९११). अगदीं प्राथमिक अवस्थेंतील जमात. भंग्यांहून हीन, पण भंग्यांशीं संबंध ठेवीत नाहींत. वस्ती मुख्यत: सुरतेच्या आग्नेयीकडील संस्थानांत. ते ब्राह्मणांना मानीत नाहींत व त्यांच्या जातीचा असाही धर्मगुरु त्यांना नाहीं. ते हिंदूंच्या खालच्या दर्जाच्या देवतांची पूजा करतात व त्यांचे समारंभ अगदीं प्राथमिक अवस्थेंतील दिसतात. बहुपत्नीत्व आणि विधवाविवाह सम्मत व सुरू आहेत. लग्नाचा प्रश्न प्रथम मुलाचा बाप काढतो व तो वधूच्या बापाला तीन रुपये देतो. लग्नाच्या दिवशीं नवरा वाजतगाजत वधूच्या घरीं जातो. वधुवरें एका जाजमावर बसतात, त्या दोघांच्या वस्त्रांची गांठ मारण्यांत येते व दोन्ही पक्षांकडील वायका गाणीं म्हणतात. वधूवरें एकमेकांचें नांव घेतात व नंतर 'पुरुष व वायका मिळून जोडयाजोडयांनीं एका ठिकाणीं नाचतात.' मग जेवण झाल्यावर वधू आपल्या सासरीं जाते.

धर्म—कीलघा लोक मुख्यत: मारुतीची उपासना करतात. मृतांना जाळण्यांत येतें व चितेला दोनही टोकांकडे आग लावण्यांत येते. स्मशानभूमींतून परत येतांना ते ताडी पितात व मर्तिकाच्या तिसऱ्या दिवशीं मृताच्या अवशेषांवर ताडी शिंपडण्यांत येते. ज्यांना ऐपत असेल ते मर्तिकजेवणही घालतात.

धंदा—हे लोक आनुवंशिक नोकरी, मजुरी किंवा लांकुडतोडयाचें काम हे धंदे करतात. ते फारच गरीब असून त्यांना कधीं कधीं ओळीनें तीनचार दिवस उपवास पडतात !

खालपा

पीठिका:—लोकसंख्या ९,५७० (१९०१). वस्ती मुख्यत: भडोच, सुरत आणि रेवाकांठा. खालपा शब्दाची व्युत्पत्ति 'खल' किंवा 'छल' (बाहेरील कातडें) यावरून लावतात. हे कातडीं कमावण्याचा आणि चामडयाचा धंदा करतात. चमडिया, छडिया, चमार, दवगार हीं या लोकांचीं दुसरीं नांवें आहेत. भंगी, मांग व अत्यंत हीन लोक यांखेरीज इतरांना ते आपल्या जातींत घेतात.

ज्ञातिविवाहाच्या दृष्टीनें खालपांचे पुढील विभाग पाडले आहेत. (१) खंबटिया किंवा कंबय, (२) कोठरिया, (३) नडिया, (४) पटणी, (५) सरिया, (६) तिप्रा. कांहीं कुळांचीं नांवें गांवांवरून पडलेलीं असतात, उदा. धोलक्या, सोरठी इ. बरींचशीं कुळांचीं नांवें रजपुतांचींच उचललेलीं आहेत.

लग्नें:—एकाच कुलांतील मुलामुलींचा विवाह होत नाहीं. मामेबहीण, आतेबहीण व मावसबहीण यांच्याशीं लग्न करतां येत नाहीं. बायको जिवंत असतांना अगर मेल्यावर तिच्या धाकटचा बहिणीशीं लग्न करण्यास परवानगी आहे. भावाभावांना बहिणीबहिणींशीं लग्न करतां येतें. मुली वयांत येण्याच्या आधींच त्यांचीं लग्नें होतात. जी मुलगी अत्यंत गरीब असेल तीच वयांत येईपर्यंत लग्नाची राहाते. मुलांचीं लग्नें पांचव्या वर्षापासून होतात. एकाद्या मुलीचा त्याच जातींतील एकाद्याशीं असलेला अनीतिकारक संबंध उघडकीला आला तर बहुधा त्याच्याशींच तिचें लग्न लावण्यांत येतें. तसें शक्य नसलें, तर त्या माणसाला दंड होतो व जातीला एक भोजन दिलें जातें. बहुपत्नीत्व चालू आहे, लग्नें जुळविणाऱ्याला वस्तलिओ किंवा कारभारी असें म्हणतात. वधूच्या बापाला वराच्या बापाकडून देज किंवा पल्लो म्हणून कांहीं रक्कम मिळते. लग्नाचा दिवस खालपा किंवा धेड असलेला गारुडब्राह्मण ठरवितो, व तोच लग्नविधि करतो. लग्नांत गणपतीची पूजा आवश्यक आहे. लग्नांत गांठ मारल्यावर अग्नि पेटविलेल्या कुंडांत वधूवरें तूप ओततात व त्या कुंडाला चार प्रदक्षिणा घालतात. विधवेला पुनर्विवाह करतां येतो. मात्र मामेभाऊ, आतेभाऊ व मावसभाऊ यांच्याशीं तिला लग्न करतां येत नाहीं. प्रथम वराला विधवेशीं लग्न करण्याच्या आधीं शमी वृक्षाशीं लग्न करावें लागतें. काडीमोडीला परवानगी आहे.

धर्म—खालपा लोक हिंदुधर्मीय आहेत. वारसाहक्काच्या बाबतींत ते हिंदू कायदाच मानतात. ते शिव, विष्णु, राम, देवी या देवतांची आणि गाय, तुळस, पिंपळ, साप, मुंगूस यांची पूजा करतात. उनाई, डाकोरजी व शुक्लतीर्थ हीं त्यांचीं धर्मक्षेत्रें होत. हिंदूंचे बहुतेक मुख्य सण ते पाळतात.

मृताचे विधि—ते मृतांना जाळतात अगर पुरतात. लहान मुलें मेल्यास त्यांना पुरतात. कॉलरा, देवी, सर्पदंश, रक्तपिती यांनीं मरणाऱ्यांना पुरतात.

मर्तिकाच्या ११ व्या किंवा १२ व्या दिवशीं जातींतील सर्व लाकांना जेवण देण्यांत येतें. ते मृतपितरांचीं श्राद्धें करतात.

धंदा—कातडीं कमविणें व रंगविणें हा त्यांचा पिढीजाद धंदा आहे. धेड किंवा मुसलमान खाटिक यांच्याकडून खालपा लोक कच्चीं कातडीं घेतात. ते शेळ्या, मेंढ्या, मासे, बदकें यांचें मांस खातात व दारू पितात.

तुरी

पीठिका:—तुरी म्हणजे पडघम किंवा ढोल वाजविणारे. लोकसंख्या ३,१९५ (१९०१). वस्ती मुख्यत: अहमदाबाद, कायरा, काठेवाड, महीकांठा, पालनपूर आणि रेवाकांठा या भागांत. १९०१ सालीं एकुणापैकीं निम्मे लोक एकट्या पालनपूर संस्थानांत होते. 'तूर' याचा 'पडघम' असा अर्थ असून त्यावरूनच त्यांस हें नांव मिळालें. ते स्वत: आपली उत्पत्ति एका भाटापासून झाली असें सांगतात. सिद्धराजा (इ. स. ११००) राज्य करीत असतां, पटण (Patan) येथील सहस्त्रलिंग नांवाच्या तळ्याला पडलेलें भोंक बुजावें म्हणून आपण बळी जावयास तयार आहोंत असें महिद नांवाच्या धेडानें राजाला सांगितलें; व त्याबद्दल धेड लोकांवर त्यावेळीं असलेलीं अत्यंत कडक सामाजिक बंधनें काढून टाकण्याबद्दल विनवणी केली. सिद्धराजानें त्याप्रमाणें केलें व त्या लोकांना धर्मगुरु व भाटही दिला. चालचालणूक व भाषा यांमध्यें धेड आणि तुरी यांच्यांत फरक नाहीं. त्यांचा दर्जा धेड व भंगी यांच्यामधील आहे. धेड लोक तुरीबरोबर जेवणार नाहींत आणि तुरी भंग्याबरोबर जेवणार नाहींत.

लग्नें:—मुलामुलींचीं लग्नें सात व दहा या वर्षांच्या दरम्यान होतात. आईचा अगर बापाचा ज्या कुळांशीं संबंध पोंचतो, त्यांतील माणसाबरोबर लग्न होत नाहीं. 'गारुड' किंवा 'धेड ब्राह्मण' लग्नविधि करतो. लग्नांत गणपति व शमी यांची पूजा करतात. लग्नांत जेवणावळ होते आणि नवरानवरीची पुढें ठेवलेला रुपया मिळविण्याकरितां चढाओढ होते. विधवांच्या लग्नाला परवानगी आहे. मृताच्या धाकट्या भावाला विधवेशीं लग्न करण्याला पहिला हक्क असतो. व्यभिचार किंवा नवराबायकोचा बेबनाव यांमुळें काडीमोड

होऊं शकते. काडीमोड केलेल्या वायकोला नवऱ्याकडून कांहीं मिळत नाहीं ती आपल्या माहेरीं राहाते, तिचा मुलांवर मुळींच हक्क नसतो.

धर्म:—तुरी लोक उमिया देवीची उपासना करतात. अहमदाबादेच्या उत्तरेस ५५ मैलांवर अंज (Unja) येथें या देवीचें स्थान आहे. अंज व उज्जयिनी हीं त्यांचीं धर्मक्षेत्रें आहेत. उमिया देवीची प्रतिमा घरोघर असते. नवरात्रांत या देवीला एक बकरें वळी देतात. एक बकरें पुरून ते नवीन घराची शांति करतात. त्यांचा धर्मगुरु एक धेड असून तो डाकोरला राहातो, त्याला प्रत्येक घरांतून सालिना १ रुपया व एक दिवसाचा शिधा मिळतो.

मृताचे विधि:—मृतांना पुरण्यांत येतें. मेलेल्या माणसाला वेळूच्या ताटी-वरून स्मशानांत नेतात, या ताटीच्या प्रत्येक टोंकाला एक नारळ बांधतात. मर्तिकाच्या तिसऱ्या दिवशीं पाण्यानें भरलेलें एक भांडें, एक लाडू व तुपाचा दिवा स्मशानाजवळ नेऊन ठेवतात. नऊ दिवस मृताबद्दलचे विधि चालतात; दहाव्या दिवशीं सर्व पुरुष–नातेवाईक मिशा काढतात.

धंदा:—तुरी लोक पावसाळ्यांत शेतकी करतात. वर्षाच्या उरलेल्या दिव-सांत ते गांवोगांव भटकतात आणि तूर नांवाचें पडघम आणि सारंगी यांच्यावर अर्धवट गद्य व अर्धवट पद्य अशा कथा गाऊन उपजीविका करतात. रावलिया लोकांच्या चुरशीमुळें त्यांचा वरील धंदासुद्धां अलीकडे अगदीं बसत चालला आहे.

अन्न:—ते बकरी, शेळ्या, हरणें, अस्वलें, ससे, साळू यांचें मांस खातात.

सिंधव

पीठिका:—यांना शेनवा किंवा सिंधव असेंही म्हणतात. लोकसंख्या १९०१ सालीं २,१७०. वस्ती मुख्यतः कायरा जिल्हा, पालनपूर स्टेट व रेवाकांठा. या लोकांची संख्या १८८१ सालीं ५,९५६ होती. सिंदी या नांवाच्या झाडापासून या लोकांना सिंधव हें नांव मिळालें आहे. त्यांचा मुख्य धंदा शिंदीच्या झावळ्यांच्या चटया तयार करणें हा आहे. या जातीचे पोटविभाग नाहींत. कुटुंबांचीं नांवें गांवाच्या नांवावरून पडलीं आहेत; उदा०–अनंदरिया, पालनपुरी.

लग्नें:— एक भाऊ दोन बहिणींशीं लग्न करूं शकतो. भाऊ भाऊ बहिणीबहिणीशीं लग्न करितात. वरच्या जातींतून एकादा माणूस या जातींत

घेण्यास त्या लोकांच्या मताप्रमाणें हरकत नाहीं; पण अशा तऱ्हेचें एकच उदाहरण आहे. लग्नें लहानपणींच होतात. लग्नाचें बोलणें प्रथम वधूपिता काढतो व त्याला व्याह्याकडून लग्नांत बहुधा तीस रुपये मिळतात. लग्नांत गणपतीची पूजा करतात,व गारुडब्राह्मण लग्नविधि करतो. मुद्दाम तयार केलेल्या पवित्र अग्नीसभोंवतीं वधुवरांनीं पांच प्रदक्षिणा घालणें हा त्यांच्या लग्नांतील शेवटचा विधि आहे. बहुपत्नीत्व चालू आहे.

विधवांच्या लग्नाला परवानगी आहे. विधवा बहुधा आपल्या नवऱ्याहून धाकट्या दिराशीं लग्न करते. विधवेला आपला मावसभाऊ, मामेभाऊ व आतेभाऊ यांच्याशीं लग्न करतां येत नाहीं. विधवेचें लग्न रविवार, मंगळवार अगर गुरुवार या दिवशीं होतें व त्या समारंभाला सुवासिनींना हजर रहातां येत नाहीं. विधवेशीं लग्न करणाऱ्याला प्रथम शमी किंवा झिंगी या झाडाशीं लग्न करावें लागतें. काडीमोडीला परवानगी आहे. वारसाच्या बाबतींत ते हिंदुकायदा मानतात.

धर्म:—धार्मिकदृष्ट्या सिंधवांचे बिजमारगी, रामानुज, व रामडी पीर आणि भिलडी माता यांचे भक्त असे चार प्रकार आहेत. त्यांच्या घरांत असणारी देवता म्हणजे भिलडी माता; हिची प्रतिमा म्हणजे एक नारळ असतो व शत्रूचा नाश व्हावा अशी इच्छा असेल तेव्हांच त्याची पूजा करतात. रामडी पिराचे भक्त प्रतिपदेला उपवास करतात आणि शुक्रवारीं काम करीत नाहींत. देवीची साथ उद्भवते तेव्हां हे लोक सितळादेवीची पूजा करतात. त्यांचा मुख्य धर्मगुरु डाकोर येथें राहतो. बहुधा, अंब, डाकोर आणि द्वारका हीं त्यांचीं धर्मक्षेत्रें होत.

मृताचे विधि; धंदे:—मृताला पुरतांना त्याचें तोंड उत्तरेला करतात. पूर्वजांची आठवण म्हणून कांहींही करण्यांत येत नाहीं. बहुतेक लोक चटया विणणें व केरसुण्या करणें हा धंदा करतात. उरलेले लोक कोणी पत्रपोचव्ये, कोणी निरोप्ये, कोणी न्हावी असे असतात. त्यांच्या बायका व मुलें त्यांना त्यांच्या धंद्यांत मदत करतात. हे लोक बकरीं, मेंढरें, बदकें इत्यादींचें कच्चें किंवा शिजवलेलें मांस खातात व दारूही पितात. यांचा दर्जा धेड व भंगी यांच्या मधला आहे.

अस्पृष्टांचीं मतें व त्यांच्या आकांक्षा

अस्पृश्य समाज अजून मूकच आहे. शिक्षणाचा संस्कार नसल्यामुळें आपल्या गाऱ्हाण्यांना किती तऱ्हांनीं तोंड फोडावें हें त्यांना अजून साधलेलें नाहीं. पण त्यांचे पुढारी व त्यांच्या पुढारी संस्था यांच्याद्वारां हीं गाऱ्हाणीं व्यक्त झालेलीं आहेत. भावी कालांत आपलें काय व्हावयाचें या विषयींची जबर चिंता या पुढाऱ्यांना लागली आहे असें खालील उताऱ्यांवरून दिसून येईल. राजसत्ता जर स्पृश्य लोकांच्या हातीं गेली तर आपले हाल होतील असें त्यांस वाटतें. व या वाटण्यांत कांहीं गैर आहे असेंही नाहीं. पुढील उद्धृत उद्गार निरनिराळ्या काळचे व ठिकाणचे आहेत.

'अस्पृश्यता' हेंच काय तें मुख्य संकट आहे. यांतून मुक्तता झाली पाहिजे हा सर्व उद्गारांचा इत्यर्थ आहे. पण ही जर अजून आहे तर आम्हांला राजसत्तेंत स्वतंत्र हक्क हवेत कारण त्यावांचून आमच्या तक्रारी मिटावयाच्या नाहींत व स्पृश्य हिंदूंनाही आम्हांस वचकांत ठेवतां यावयाचें नाहीं असें त्यांचें ठाम मत आहे.

सामाजिक बाबतींत प्रान्तानिहाय अस्पृश्य पुढाऱ्यांचीं काय मतें आहेत हें जरी नीट अजमावतां आलें नाहीं तरी आपल्या प्रांताला अस्पृश्यांचे जे प्रमुख पुढारी डॉ. आंबेडकर यांनीं अनेकदां बोलून दाखविलें आहे कीं, सर्व हिंदूसमाजांत आमूलाग्र क्रांति घडवून आणणें हेंच आमचें काम आहे. जातिसंस्था नष्ट झाली पाहिजे व रोटीबेटी व्यवहार स्थापित झाला पाहिजे असेंही त्यांनीं अनेकदां सांगितलेलें आहे. हिंदू लोकांनीं आपल्याला जर नीट वागविलें नाहीं तर आम्ही अस्पृश्य लोकांनीं मुसलमान कां होऊं नये असेंही त्यांनीं एका परिषदेंत विचारलें होतें. देवालयप्रवेशासंबंधानें ते इतकेसे खळखळ करीत नाहींत. त्यांना तो हवा आहे यांत तिलप्राय संदेह नाहीं, पण त्यापेक्षां आर्थिक उन्नतीवर त्यांचा भर विशेष आहे. स्पृश्यांसंबंधींचा अविश्वास हा त्यांनीं इंग्लंडच्या राजदरबारीं किती कडकडून वर्णन केला हें त्यांच्या उद्गारावरून दिसून येईलच.

दुसऱ्या गोलमेज़ परिषदेंतील श्रीनिवास यांच्या भाषणांतील निवडक उतारे.

अस्पृश्यांचा निराळा मतदारसंघ—

या आमच्या मागणीला लोक जादा मागणी समजतात. आम्हांला असें सांगण्यांत येतें कीं, कांहीं झालें तरी आम्ही हिंदू जातीचेच एक घटक आहोंत व आम्हांला स्वतंत्र मतदारसंघ दिले तर आमच्या दोघांमधील अंतर दुरावत जाईल. असें वोलणाऱ्या लोकांवद्दल योग्य तो आदर दाखवून मला असें सांगणें भाग आहे कीं, त्यांच्या विधानाचें मर्म माझ्यातरी ध्यानांत येत नाहीं. अस्पृश्यवर्गाचें जीवित व रहाणी हीं इतर हिंदूंपेक्षां अजिवात निराळीं आहेत. कोणताही हिंदू भटजी अस्पृष्टांच्या घरांत कोणताही संस्कार करणार नाहीं व त्याला आपल्या देवळांत येऊं देणार नाहीं. हिंदू न्हावी त्याची हजामत करणार नाहीं, हिंदू धोबी त्याचे कपडे धुणार नाहीं इतकेंच नव्हे तर कोणताही हिंदू अस्पृष्टावरोबर रोटीव्यवहारही करणार नाहीं! मग वेटी-व्यवहार तर स्वप्नांतही आणावयास नको. स्पृश्य व अस्पृश्य हिंदूंमध्यें असणाऱ्या तीव्र सामाजिक विषमतेहून अधिक विषमतेची आम्हांला कल्पनाही करतां येत नाहीं. शेवटीं मला इतकेंच सांगावयाचें कीं या ठिकाणीं "परमेश्वरानें ज्यांची गांठ बांधली आहे त्यांची कुणीही ताटातूट करूं नका." हा वायबलांतील उपदेश अनुसरण्यासारखी आमची स्थिति नाहीं. खरोखरीच जर विषमता आहे, तर ती लक्षांत घ्यावयास नको काय?

स्वतंत्र मतदारसंघ हवा यांतील इंगित—

स्पृष्ट व साध्या संयुक्त मतदारसंघामध्यें अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी म्हणजे बहुतकरून चातुर्वर्णीय हिंदूंपैकीं नियोजित लोक अशीच स्थिति होणार व त्यामुळें आमच्या प्रतिनिधित्वाच्या मुख्य तत्त्वाचें समूळ उच्चाटन झाल्या-खेरीज राहाणार नाहीं, याकरतांच सायमन कमिशननें निर्दोशित उमेदवारी-पद्धतीचाच पुरस्कार केलेला आहे, आणि आम्ही निराळे म्हणजे स्वतंत्र मतदारसंघ मागतों यांतील इंगित तरी हेंच आहे.

अस्पृश्य वर्गाच्या या न्याय्य मागणीला आम्हांला तरी कोणतीच हरकत दिसत नाहीं. कित्येक वेळां आम्हांला असें विचारण्यांत येतें कीं, 'अहो, या जागा स्वीकारण्यास तुमच्याजवळ लोक तरी आहेत का?' वक्रोक्ति वगळल्यास वरील प्रश्नाचें उत्तर कोणत्या प्रकारच्या लोकांची जरूरी आहे यावर अवलंबून राहातें. आपल्या वक्तृत्वानें कायदेमंडळांत गोंधळ माजविणाऱ्या बी. ए. व एम्. ए. लोकांची फरड आम्हांस उभी करतां येणार नाहीं. विरोधकांच्या अग्रभागीं चमकणारे आणि तिजोरीवर अधिकार चालविणारे लोक आम्हांस कदाचित् निर्माण करतां येणार नाहींत! आणि आम्हांला तशी जरूरही नाहीं. राज्यकारभार बळकावण्याचा नव्हे तर तो आमच्या विरुद्ध चालविला जात नाहीं अशी खबरदारी घेण्याचा आमचा मुख्य इरादा आहे. याकरतां आमची परिस्थिति जाणणारे व आमच्या हालअपेष्टा वेशीवर टांगणारे असे लोक आम्हांस पाहिजेत. या गोष्टी करावयास खंबीर अशीं कैक माणसें आमच्याजवळ आहेत. मला मोठें आश्चर्य वाटतें कीं, 'या जागा स्वीकारण्यास तुमच्याजवळ लोक तरी आहेत का ?' हा प्रश्न फक्त अस्पृश्य वर्गांनाच विचारण्यांत येतो. कायदेमंडळांतील जागांच्या ज्यांच्या हक्काचें प्रमाण अस्पृश्य वर्गापेक्षां कितीतरीच जास्त आहे अशा शीख, मुसलमान अगर दुसऱ्या कोणत्याही अल्पसंख्याक जमातीला हा प्रश्न विचारला जात नाहीं. तरीपण, या अल्पसंख्याक जमातींच्या अगर जातींच्या, सध्यांच्या कायदेमंडळांतील प्रतिनिधींची काय लायकी असते? मुंबई कायदेमंडळांत एकोणीस सभासद सिंधच्या वांट्यास आलेले आहेत. या एकोणीस सभासदांपैकीं अंदाजें चवदा सभासदांना इंग्रजीचा एक शब्द माहीत असेल तर शपथ! त्यांनीं वादविवादांत कधींही भाग घेतला नाहीं; इतकेंच काय, पण त्यांनीं अजूनपर्यंत एकादा प्रश्नसुद्धां विचारलेला नाहीं. त्याच मंडळामध्यें सात का कांहीं जागा ब्राह्मणेतरांकरतां राखीव आहेत. या सातांपैकीं एकदोन तरी सभासद असे असतात कीं त्यांना इंग्रजी येत नाहीं. मद्रास कायदेमंडळामध्यें इंग्रजी न येणारे चार सभासद आहेत व त्यांपैकीं दोन ब्राह्मणेतर पक्षाचे आहेत. पंजाब कायदेमंडळांत शंभर सभासद आहेत, त्यांच्यापैकीं फक्त वीस लोकांना इंग्रजी येतें. बाकीचे लोक आपआपल्या मातृभाषांतून बोलतात. इतर प्रांतिक कायदेमंडळांतूनही अशाच तऱ्हेचीं उदाहरणें निःसंशय दाखवितां येतील; इतकेंच नव्हे, तर

इंग्रजी न येणारे लोक खुद्द लेजिस्लेटिव्ह असेंब्लींतही आहेत हें ध्यानांत ठेवावयास हवें. आतां, इतर जातींच्या इंग्रजी न येणाऱ्या प्रतिनिधींकडून जर कायदेमंडळाचा कारभार चालणें शक्य होतें तर इंग्रजी न येणाऱ्या पण अस्पृश्य लोकांचे प्रतिनिधी असलेल्या अशा लोकांनाच काय म्हणून हरकत असावी? इंग्रजी भाषेच्या महत्त्वाची आम्हांला जाणीव आहे व सध्यां असलेलें तिचें उंच स्थान ती यापुढेंही कायम राखील अशी आम्हांस आशा आहे. पण प्रतिनिधि असण्याकरतां इंग्रजी जाणणें ही लायकी ठरविणें, ही मात्र निराळी गोष्ट आहे. अस्पृश्य वर्गांच्या हक्काची गळचेपी करण्याकरतां ज्यांना एकादें शस्त्र पाहिजे असेल त्यांना मात्र यामुळें समाधान वाटेल. यामुळें लोकांचें बुद्धिवैभव रसातळाला जाईल व केवळ त्यांच्याच हातून त्यांची भरभराट घडवून आणण्याकरतां अस्तित्वांत येऊं घातलेल्या संस्थांमध्यें शिरून विचार-विनिमय करणें त्यांना शक्य होणार नाहीं; आणि म्हणूनच वरीलसारखी विक्षिप्त आणि जंगली योजना घातुक ठरल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. म्हणून आम्ही असें म्हणतों कीं, वरील हरकत कदाचित् प्रामाणिकपणानें घेतलेली असली, तरी ती निराधार व म्हणून निरर्थक आहे.

आधीं मुग्धवृत्ति सोडा--

अस्पृश्यवर्गाच्या राजकीय मागण्यांच्या बाबतींत स्वतःची भूमिका स्पष्ट करण्याऐवजीं आमच्या हिंदु मित्रांनीं स्वीकारलेली मुग्धवृत्ति पाहून आम्ही तर आश्चर्यचकित झालों. हिंदी लोकांच्या राजकीय मागण्यांच्या बाबतींत स्वतःची भूमिका कोणती आहे तें ब्रिटिश सरकारनें भरीव योजनांच्या द्वारां स्पष्ट करावें असा तर त्यांनीं सारखा आग्रह चालविला आहे. त्याच न्यायानें, अस्पृश्य वर्गाच्या राजकीय मागण्यांबद्दल स्वतःची भूमिका कोणती हें आमचे हिंदु मित्र उघडपणें सांगतील असें आम्हांस वाटलें होतें. कारणें काय असतील तीं त्यांचीं त्यांनाच ठाऊक; पण असें करणें ठीक नव्हे असें त्यांना वाटलें खरें. अशा प्रकारच्या गोष्टींत त्यांनीं कसें वागावें हें त्यांना सांगण्याचें काम आमचें नाहीं. मुत्सद्दीपणाचा कांटा त्यांच्या बाजूला झुकलेला आहे हें आम्ही जाणतों. या प्रश्नाचा मला अधिक्षेपच करावयाचा आहे; पण असें करतांना मला सभ्यतेचा उसना आव आणतां येत नाहीं. आम्हीं त्यांना एकच गोष्ट

सांगूं शकतों आणि ती ही कीं, तुम्हीं आम्हांला जर 'जवाबदार कार्यकारी-मंडळाला तुमचा पाठिंवा आहे काय?' असा प्रश्न विचारलात तर तशाच तऱ्हेचा दुसरा प्रश्न तुम्हांला विचारून आम्ही त्याचें उत्तर देऊं. तो प्रश्न हा कीं, 'ज्याला तुमचें कार्यकारीमंडळ जबावदार असावयाचें म्हणून तुम्ही म्हणतां तें कायदेमंडळ कोणत्या प्रकारचें होणार आहे?' कायदेमंडळाची घडण आणि भूमिका या दोन गोष्टी जवावदार राज्यघटनेच्या वावतींत आम्हांला निर्णयाच्या वाटतात.

शेवटचे तीन मुद्दे—

शेवटीं मी तीन मुद्दे सांगून भाषण संपविणार आहें. पहिला मुद्दा असा कीं, स्वतंत्र प्रतिनिधित्वामुळें आमच्यावर 'खास अस्पृश्य' असें शिक्कामोर्तव होईल व त्यामुळें आमच्या हितसंबंधाला धक्का वसेल, या सूचनेला आम्ही काडीचीही किंमत देत नाहीं. आमचें मत अगदीं निराळें आहे व तें असें कीं, आजारी माणसानें स्वत:चीं दु:खें उघडपणें बोलावींत, त्यावर उपचार करावेत व अशा रीतीनें एक दिवस त्या रोगाच्या तावडींतून सुटावें हेंच त्याच्या दृष्टीनें अधिक चांगलें. त्या आजाऱ्यानें लाजेनें जर आपला रोग लपविला व त्यावर वेळींच उपचार केले नाहींत तर त्याचे परिणाम भयंकर होतील. आम्हांला जरूर तें खरेंखुरें संरक्षण मिळविण्याच्या कामीं आम्हीं चालविलेल्या यत्नांमध्यें अशा तऱ्हेच्या लटपटी आम्हांस मुळींच खपणार नाहींत. दुसरा मुद्दा हा कीं, कायद्याच्या जोरावर मूलभूत हक्कांचें दान आणि अस्पृश्यतेचें उच्चाटन या गोष्टी जरी घडवून आणल्या, तरी त्यामुळें सर्व कार्य होत नाहीं. अस्पृश्यतेचें कायद्यानें उच्चाटन ही एक वाव आहे, तर तिचें व्यवहारांतून उच्चाटन ही निराळी पण पहिलीहून अधिक महत्त्वाची वाव आहे. व्यवहारांतून अस्पृश्यतेचें उच्चाटन करणें हें कायदेकारी व कार्यकारी अशा दोनही सरकारांचें मिळून काम आहे व त्यामुळेंच आमचा दर्जा आमच्या इतर बांधवांच्या वरोवरीचा होऊं शकेल. कायदेमंडळ व कायदेमंडळाच्या मध्यस्थीनें कार्यकारी मंडळ यांवर हुकमत चालविण्याकरतां पुरेशी सत्ता अस्पृश्य वर्गाच्या हातीं आल्याशिवाय वरील गोष्ट घडणें शक्य नाहीं. आमच्याकरितां घातलेलीं संरक्षक बंधनें आणि आमचे हक्क या गोष्टी राज्यघटनेच्या अंतर्भूत पाहिजेत.

आमच्या भविष्यकालीन स्थितीसंबंधीं कोणाही एका व्यक्तीचा हवाला स्वीकारण्यास आम्ही तयार नाहीं; मग त्या व्यक्तीचा अधिकार वा योग्यता, किती कां असेना.

दुसऱ्या गोलमेज़ परिषदेंतील डॉ. आंबेडकर यांच्या भाषणांतील निवडक उतारे

अस्पृश्यांची परिस्थिति—

(१) हे विचार किंवा हीं मतें, ४,३०,००,००० लोकांचीं म्हणजे ब्रिटिश हिंदुस्थानच्या एकूण लोकसंख्येपैकीं एकपंचमांश लोकांचीं आहेत. सर्व अस्पृश्य वर्ग मिळून त्यांचा स्वतःचाच असा एक गट तयार होतो. हा गट मुसलमानांहून अगदीं निराळा व भिन्नसंस्कृत असून, त्या गटाचा जरी हिंदू लोकांत समावेश होत असला तरी तो हिंदुसमाजाचा एक केवळ अवश्यच असा पोटभाग नाहीं. त्याचें जीवितच निराळें आहे असें नव्हे तर हिंदुस्थानांतील इतर कोठल्याही समाजापेक्षां अत्यंत चीड आणणाऱ्या अशा भलत्याच परिस्थितींत हे लोक डांबले गेले आहेत. हिंदुस्थानांत हीन व खालच्या दर्जाचे इतर समाज नाहींत असें नाहीं, पण अस्पृश्यांची स्थिति मात्र अगदीं निराळ्या स्वरूपाची आहे. ही स्थिति शेत–गुलाम (शेतीबरोबरच विकलीं किंवा खरेदी केलीं जाणारीं माणसें) व गुलाम यांच्या स्थितीमधील आहे व तिला सोईकरतां दास्य किंवा गुलामगिरी असें म्हणतां येईल; मात्र शेत–गुलाम किंवा गुलाम यांना असलेली शारीरिक स्पर्शाची परवानगीही या लोकांना नाहीं हें ध्यानांत घ्यावयास हवें. याहूनही अत्यंत वाईट गोष्ट ही कीं,त्या लोकांच्या अस्पृश्यतेमुळें त्यांच्यावर गुलामगिरी जबरीनें लादली जाते व मनुष्यजातीबरोबर मिसळून वागण्याच्या मार्गांत एक मोठाच कोलदांडा घातल्यासारखें होतें. या दोन गोष्टींचे परिणाम सार्वजनिक जीवितांतील सापत्नभावावरच थांबत नाहींत तर त्यामुळें त्यांना जीवितांत नशीब काढण्यास इतरांस असलेली संधि मिळत नाहीं व मानवी जीविताला अत्यावश्यक असे नागरिकाचे मूलभूत हक्कही त्या वर्गाला नाकारण्यांत येतात. लोकसंख्येंत इंग्लंडची किंवा फरान्सची

बरोबरी करणाऱ्या व जीवनकलहांत अस्पृश्यतेचें लोढणें गळ्यांत बांधलेल्या या लोकांचें मत हिंदुस्थानचा राजकीय प्रश्न यथायोग्य सोडविण्याच्या कामीं लक्षांत घेतलेंच पाहिजे अशी मला खात्री वाटते व म्हणून तें परिषदेला आरंभीच समजलेलें असावें असा माझा आग्रह आहे.

उपरिनिर्दिष्ट मत मला जितक्या संक्षेपानें मांडतां येईल तितकें मी मांडीन. तें असें आहे: हिंदुस्थानांतील सध्यांच्या नोकरशाहीऐवजीं नवीन अमलांत येणारी राज्यघटना लोकांची, लोकांकरतां व लोकांनीं चालविलेली अशी असावी. अस्पृश्य वर्गांचें हें मत कांहीं कांहीं लोकांना अगदींच अनपेक्षित वाटेल याची मला पूर्ण जाणीव आहे. अस्पृश्य वर्ग आणि ब्रिटिश सरकार यांचे संबंध एका विशिष्ट प्रकारचे आहेत. पुराणमतवादी हिंदूंकडून आज शतकानुशतकें चाललेल्या जुलूमजबरदस्तीपासून आमची सुटका करणारे थोर लोक म्हणून अस्पृश्य वर्गांनीं ब्रिटिशांचें स्वागत केलें. हिंदू, मुसलमान व शीख यांच्याशीं लढून अस्पृश्यांनीं ब्रिटिशांस हिंदी साम्राज्य जिंकून दिलें. ब्रिटिशांनीं परतफेड म्हणून आम्हां अस्पृश्य वर्गांच्या हितसंरक्षकपणाची जिम्मा घेतली. दोन पक्षांचे संबंध इतके निकटचे असतांना, ब्रिटिशसत्तेसंबंधानें अस्पृश्य वर्गाच्या मनांत वर सांगितलेली बुद्धि उत्पन्न व्हावी हा एक अपूर्व चमत्कारच आहे. पण या चमत्काराचीं कारणें शोधण्यास कांहीं दूर जावयास नको. बहुमतवाल्यांबरोबर आमचें काय व्हावयाचें तें होईल एवढ्याच केवळ विचारानें आम्हीं हें लोकसत्तेचें मत पत्करलें नाहीं. कारण, बहुसंख्याक व मी ज्यांच्यासंबंधीं बोलत आहे ते अल्पसंख्याक यांची मैत्री कितपत आहे हें आपण जाणतांच. आम्हीं पतकरलेलें हें मत स्वतंत्र विचारावर आधारलेलें आहे. केवळ आमच्याच परिस्थितीच्या दृष्टीनें सध्यांच्या राज्यपद्धतीचा अभ्यास केल्यानंतर, सध्यांच्या राज्यपद्धतींत उत्तम राज्यपद्धतींतील कांहीं मूलभूत तत्त्वांचा समावेश झालेला नाहीं ही गोष्ट आमच्या लक्षांत आली. आमच्या सध्यांच्या परिस्थितीची ब्रिटिशपूर्व कालांतील हिंदुसमाजामधील आमच्या स्थितीशीं तुलना केल्यास असें दिसून येतें कीं, आमची प्रगति म्हणजे प्रगति नसून आम्ही जागच्या जागींच पाय वरखालीं करीत आहों. ब्रिटिशांच्यापूर्वीं आमच्या अस्पृश्यतेमुळें आमची स्थिति अत्यंत किळसवाणी होती; तिच्यांत फरक पाडण्याकरितां ब्रिटिश सरकारनें एक तरी गोष्ट केली आहे काय? त्यावेळीं आम्हांला खेड्यांतील

पाणवठ्यावर पाणी भरतां येत नव्हतें, ब्रिटिश सरकारनें आम्हांला पाणी भरण्याचा हक्क दिला आहे काय ? त्यावेळीं आम्हांला देवळांत जातां येत नव्हतें, आतां तरी जातां येतें का? त्यावेळीं आम्हांला पोलीस खात्यांत नौकऱ्या मिळत नसत, ब्रिटिश सरकार तरी आम्हांस पोलिसांच्या जागा देतें का ? ब्रिटिशांच्या पूर्वी आम्हांला फौजेंत नौकरी करतां येत नसे, आतां तरी आमच्या करतां तें क्षेत्र मोकळें आहे का? वरीलपैकीं एकाही प्रश्नास होकारार्थी उत्तर येणें शक्य नाहीं. इतक्या दीर्घकालपर्यंत आमच्यावर अशी विस्तृत सत्ता गाजविणाऱ्या सरकारनें आमचें थोडेंफार चांगलें केलें आहे हें नमूद करण्यास आम्हांला आनंद वाटतो; पण त्यामुळें आमच्या परिस्थितींत मात्र मूलभूत असा कांहींएक फरक झालेला नाहीं. केवळ माप घेण्यासाठीं एक जुना कोट दिला असतां चिंध्या शिवून व ठिगळें मारून मोठ्या डौलानें त्या जुन्या कोटा-बरहुकूम नवा कोट तयार करणाऱ्या एका चिनी शिंप्याची गोष्ट सांगतात, ब्रिटिश सरकारनें अगदीं तसें केलें. त्यावेळीं सामाजिक व्यवस्था जशी दिसली तशीच स्वीकारून सरकारनें आजतागायत ती काळजीपूर्वक अगदीं तशीच राखिली आहे. ब्रिटिशांची सत्ता सुरू होऊन दीड शतक पुरें झालें असलें, तरी आमच्या अंगावरील क्षतें अजून तशींच आहेत; त्यावर कोणी उपचारहि केलेले नाहींत.

गंभीर स्वरूपाचीं दोन बंधनें—

ब्रिटिशांवर निष्काळजीपणा किंवा सहानुभूतीचा अभाव यांचा आरोप करण्यास आम्ही तयार नाहीं. आम्हांस इतकेंच समजतें कीं, आमचा प्रश्न सोडविण्यास ते सर्वथैव असमर्थ आहेत. जर हा सर्व निष्काळजीपणाचाच परिणाम असता तर त्याला इतकें महत्त्व देतां आलें नसतें, व त्यामुळें आमच्या भूमिकेमध्येंही इतका खोल फरक पडला नसता. थोडासा खोल विचार केल्यावर आम्हांस असें आढळून आलें कीं, या बाबतींत निष्काळजीपणाचा कांहीं संबंध नसून आमचा प्रश्न सोडविण्यास लागणाऱ्या पात्रतेचा अभाव हीच यांतील मेख आहे. अस्पृश्य वर्गाचें असें मत आहे कीं, हिंदुस्थानांत ब्रिटिशसरकारला अडथळा करणारीं गंभीर स्वरूपाचीं अशीं दोन बंधनें आहेत. पहिलें म्हणजे आंतर्बंधन, हें राज्यकर्त्यांचा नैसर्गिक स्वभाव, हेतु व फायदे यांपासून उद्भवतें.

या बंधनाचा परिणाम असा होतो कीं, राज्यकर्त्यांना आमच्या समाजामध्यें चालू असलेल्या घडामोडींची खरी किंमत अजमावतां येत नाहीं, त्याच्या महत्त्वाकांक्षेकडे ते निष्काळजीपणानें व शत्रुत्वाच्या दृष्टीनें पाहतात आणि त्याच्या शिक्षणासंबंधानें तर ते उदासीनच होतात. या वर सांगितलेल्या गोष्टींत आम्हांला मदत करणें राज्यकर्त्यांना शक्य नाहीं असें नाहीं, पण अशी मदत करणें म्हणजे त्यांनीं आपला नैसर्गिक स्वभाव, उद्दिष्ट हेतु व फायदे यांच्यावर बोळा फिरविण्यासारखेंच आहे. दुसरें बंधन बाह्यबंधन आहे. तें म्हणजे बाह्य प्रतिकाराची सरकारला वाटणारी मरणप्राय भीति. आज वर्षानुवर्षे अस्पृष्ट वर्गाचे प्राण होरपळून काढणाऱ्या व हिंदी समाजाचें काळीज कुरतडणाऱ्या निंद्य व तिरस्करणीय सामाजिक चालीरीतींच्या हकालपट्टीची जरूरी हिंदुस्थानसरकार पूर्णपणें ओळखून आहे. जमीनदार लोक शेतकऱ्यांना पिळून काढीत आहेत व भांडवलवाले मजुरांना घाणेरड्या परिस्थितींत काम करावयास लावून वर पोटभर जेवूंही देत नाहींत याचीही जाणीव सरकारला आहे. तरीपण या पापांविरुद्ध ब्र काढण्याचीही सरकारची छाती झाली नाहीं ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. कां? या गोष्टींना मूठमाती देण्यास सरकारला कायदेशीर सत्ता नाहीं हें तर त्याचें कारण नसेल? छे, छे! तसें मुळींच नाहीं. सरकार या भानगडी करीत नाहीं याचें कारण इतकेंच कीं, प्रचलित सामाजिक किंवा आर्थिक घटनेंत आपण जर कांहीं उठाठेवी केल्या तर आपण होऊनच जोरकस विरोध उत्पन्न केल्यासारखें होईल, अशी धास्ती सरकारला आहे. कुणाला झाला तरी असल्या सरकारपासून काय फायदा होणार? या दोन बंधनांत विकल झालेल्या सरकारच्या अंमलाखालीं जीवितला उपकारक अशा व्हावयाच्या गोष्टी थबकून रहाव्या हें ओघानेंच येतें. आम्हांला असें सरकार पाहिजे कीं, त्यांतील सत्ताधारी माणसें देशाच्या खऱ्याखुऱ्या हिताकडे कसून लक्ष पुरवितील. आम्हांला असें सरकार पाहिजे कीं त्यांतील सत्ताधारी माणसें लोकांची विरोधबुद्धि जागी होऊं न देतां, सध्यां न्याय व जरूरी या दृष्टींनीं ज्यांची तीव्र उणीव भासत आहे अशा सामाजिक व आर्थिक सुधारणा निर्भयपणानें ताबडतोब अंमलांत आणतील. हा चमत्कार ब्रिटिश सरकारला केव्हांही दाखवितां येणार नाहीं. लोकांचें, लोकांकरतां व लोकांनीं चालविलेलें सरकारच त्या गोष्टी करूं जाणें.

आमच्या उद्धारासाठीं स्वराज्य हवें !

अस्पृश्य वर्गांनीं उपस्थित केलेले कांहीं प्रश्न व त्यांच्या मताप्रमाणें त्यांचीं उत्तरें हीं अशीं आहेत. तात्पर्य, हिंदुस्थानांतील नोकरशाहीचे हेतु कितीही उच्च असले तरी आमचीं विशिष्ट दुःखें निवारण्याच्या कामीं तिला काडी-भरही हालचाल करतां यावयाची नाहीं. आतां हें तात्पर्य ऐकायला वाईट आहे, पण आमच्या अभ्यासाचा निष्कर्ष तोच आहे हेंही तितकेंच खरें आहे. आम्ही स्वतःच आमचीं दुःखें निवारण करूं, तशीं तीं इतर कोणालाही करतां येणार नाहींत अशी आमची ठाम समजूत आहे; व आमच्या हातांत राजकीय सत्ता मिळाल्याशिवाय आम्हांलाही ती गोष्ट करतां येणार नाहीं. ब्रिटिश सरकार सध्यां आहे तसें असेपर्यंत तीळभरही राजकीय सत्ता आम्हांस मिळावयाची नाहीं हें उघडच आहे. आमच्या उद्धाराला जरूर ती राजकीय सत्ता आमच्या स्वतःच्या हातांत येण्याचा स्वराज्यामध्यें मात्र बराचसा संभव आहे.

मागसलेल्या वर्गांचे विचार आपल्या समोर मांडतांना मी डोमिनियन स्टेट्स् हा शब्दप्रयोग योजिलेला नाहीं. मात्र त्यांतील गुंतागुंत मला कळत नाहीं किंवा अस्पृश्यवर्ग हिंदुस्थानला डोमिनियन स्टेटस् मिळण्याच्या विरुद्ध आहेत म्हणून मीं तो टाळला असें मुळींच नाहीं. अस्पृश्य वर्गांना नेमकें काय म्हणावयाचें आहे तें त्या शब्दानें व्यक्त होत नाहीं व म्हणूनच मीं तो शब्द-प्रयोग योजला नाहीं. ज्यावेळीं अस्पृश्यवर्ग संरक्षक बंधनांतर्गत डोमिनियन स्टेट्सला मान्यता दर्शवितात त्यावेळीं ते एका विशिष्ट प्रश्नालाच अत्यंत महत्त्व देत असतात! आणि तो प्रश्न हा कीं, डोमिनियन स्टेट्सचा कारभार कसा चालेल? राजकीय सत्तेचा मध्यबिंदु कोठें असेल? त्याचा ताबा कुणाकडे राहील? अस्पृश्य वर्गांना त्यांत मालकीहक्क मिळेल काय? अस्पृश्य वर्गांच्या विशिष्ट संबंधाचे असे हे प्रश्न आहेत. नवीन अंमलांत येणारी राज्य-घटना विशिष्ट प्रकारची बनविल्याशिवाय आपल्याला त्यांत काडीभरही राजकीय सत्ता मिळणार नाहीं असें अस्पृश्य वर्गांना वाटतें. या नवीन राज्य-घटनेच्या यंत्रणाचा विचार करतांना सामाजिक हिंदी जीवनामधील कांहीं बिकट प्रश्नांकडे दुर्लक्ष करणें योग्य होणार नाहीं. हिंदू समाज म्हणजे अनुलोम पद्धतीची तिरस्कारबुद्धि व प्रतिलोम पद्धतीची आदरबुद्धि यांवर

रचलेल्या जातींची एक उतरंड आहे हें ध्यानांत घ्यावयास हवें. या पद्धतीमुळें लोकसत्ताक राज्यपद्धतीचे आधारस्तंभ अशा समता व बंधुभाव यांच्या वाढीला वावच शिल्लक राहात नाहीं. तसेंच देशांतील स्वतंत्र विचार करणाऱ्या लोकांचा वर्ग हा जरी हिंदी समाजाचा एक अत्यंत उपयुक्त व तितक्याच महत्त्वाचा भाग असला व राजकीय चळवळीचें नेतृत्व पतकरून, सबंध देशाचा कैवार घेऊन हा वर्ग भांडत असला, तरी या वर्गांत समाजाच्या वरच्या थरांतील लोक असतात व ते त्या त्या वर्गाच्या आकुंचित दृष्टीपासून अलिप्त नसतात, इकडेही दुर्लक्ष करून चालण्यासारखें नाहीं. निराळ्या शब्दांत बोलावयाचें तर, आम्ही जोरानें एवढेंच प्रतिपादितों कीं नवीन राज्यघटनेच्या यंत्रणामध्यें आमचें मनोगत काय आहे हें पाहिलें पाहिजे व त्या यंत्रणाचा या मनोगताशीं मेळ घातलेला असावा. नाहींतर आमच्या समाजाच्या दृष्टीनें अत्यंत गैरलागूं व शेंडाबुडखा नसलेली पण वरून दिसण्यांत मात्र प्रमाणबद्ध अशी एकादी राज्यघटनाच तुम्ही निर्माण करून बसाल.

या प्रकरणाचा विचार संपविण्यापूर्वी मला आणखी एक मुद्दा मांडावयाचा आहे. जेव्हां तेव्हां आम्हांला असें सांगण्यांत येतें कीं, अस्पृश्य वर्गाचा प्रश्न हा एक सामाजिक प्रश्न असून त्याचें उत्तर कोठेंही असलें तरी तें राजकीय क्षेत्रांत मात्र खास सांपडणार नाहीं. या विधानाला आमची मोठी हरकत आहे. स्वत:च्या हातांत राजकीय सत्ता मिळाल्याशिवाय अस्पृश्य वर्गाचा प्रश्न आम्हांला कधींही सोडवितां येणार नाहीं अशी आमची खात्री आहे. हें जर खरें असेल—तदितर मत सिद्ध करतां येईल असें मला वाटत नाहीं.—तर अस्पृश्य वर्गाचा प्रश्न, मी म्हणतों त्याप्रमाणें, मुख्यत्वेंकरून एक राजकीय प्रश्नच आहे व त्या दृष्टीनेंच त्याचा विचार झाला पाहिजे. राजकीय सत्ता ब्रिटिशांच्या हातांतून, आमच्यावर आर्थिक, सामाजिक आणि राजकीय बाबतींत प्रचंड अधिकार गाजविणाऱ्या लोकांच्या हातांत जात आहे हें आम्ही जाणतों. स्वराज्याच्या कल्पनेनें गतकालीन स्वराज्यांत आमच्यावर झालेले जुलूम, जबरदस्त्या व अन्याय यांची आठवण ताजी होते व आगामी स्वराज्यांत त्यांच्या पुनरागमनाचीही भीति वाटते. तरीपण, स्वराज्याचें स्वागत करण्यास आम्हांला आनंद वाटतो. आमच्या देशबांधवां-बरोबर आम्हांलाही योग्य व पुरेशा प्रमाणांत राजकीय हक्क मिळतील या

आशेच्या जोरावरच येऊं घातलेल्या अनिवार्य परिस्थितीचें जोखीम उचलण्यास आम्ही तयार झालों आहोंत. मात्र त्याला आम्ही एकाच अटीवर सम्मति देऊं व ती अट ही कीं आमचा प्रश्न सोडविण्यास मुळींच उशीर होतां उपयोगीं नाहीं. काळ कांहींतरी घडवून आणील या आशेनें आम्हीं कंटाळा येईपर्यंत वाट पाहिली आहे. इतकी कीं, आम्हांस अजूनही वाट पाहावयास लावणें माझ्या मतें धोक्याचें ठरेल. प्रातिनिधिक राज्यघटनेचें महत्त्व वाढावें म्हणून ब्रिटिश सरकारनें लागोपाठ जे उपक्रम केले त्या प्रत्येकाच्या वेळीं अस्पृश्य वर्गाना पद्धतशीर रीतीनें वगळण्यांत आलें आहे. अस्पृश्य लोकांच्या राजकीय हक्कांविषयीं मुळीं विचारच झालेला नाहीं. याचा तीव्र निषेध करून मी असें स्पष्ट सांगतों कीं, अशी स्थिति आम्ही यापुढें मुळींच सहन करणार नाहीं. भविष्यकालीन राज्यकर्त्यांच्या सहानुभूतीवर व सदिच्छारूपी चंचळ वाळूवर आमचा प्रश्न अवलंबून ठेवतां उपयोगीं नाहीं. मुख्य राजकीय प्रश्नावरोवरच आमचा प्रश्नही निकालांत निघाला पाहिजे. अस्पृश्य वर्गांचा तरी असाच अट्टाहास कां ? याचीं कारणें अगदीं उघड आहेत. मालकाच्या हातांत मालक नसलेल्या माणसापेक्षां अधिक सत्ता असते हें कोणालाही न सांगतां कळण्यासारखें आहे. सत्तावान् माणूस सत्ताहीन माणसाकरतां फारच क्वचित् झीज सोसतो हेंही आपणांपैकीं प्रत्येकाला माहीत आहे. सत्ता व प्रतिष्ठा यांच्या सिंहासनावर चढून वसण्याकरितां आम्ही आज ज्यांना हातभार लावीत आहोंत त्या लोकांचें नवीन घटनेंत थोडेसें सामाजिक नुकसान होणार आहे, पण त्यांना पदच्युत करण्याचें हत्यार हातांत असल्याशिवाय आज जर आम्हीं त्यांच्या हातीं सत्ता जाऊं दिली तर आमचा सामाजिक प्रश्न सोडविण्यास जोराची चालना मिळेल अशी आशा करणें वेडेपणाचें ठरेल. उगाच भलता विश्वास उराशीं बाळगून आत्मनाश करून घेण्यापेक्षां दूरदृष्टीनें शक्य तीं आगामी दुःखें व संकटें आधीं पाहणेंच आम्हांस अधिक परवडतें, मग त्याबद्दल लोक आम्हांस किती कां नांवें ठेवीनात.

आमच्या दौर्बल्याकडे पहा—

स्पष्ट शब्दांत बोलावें लागत आहे याबद्दल फार वाईट वाटतें; पण माझा तरी काय इलाज? अस्पृश्य वर्गांना वाली असा कुणीच उरला नाहीं. आपलें

राज्य हिंदुस्थानावर कां टिकून रहावें हें दाखवावयासाठीं मात्र इंग्रज सरकारनें आमचा उपयोग सारखा करून घेतला आहे. हिंदू लोक त्यांना आपलेच म्हणतात, पण त्यांना कसलेच हक्क देत नाहींत, व असलेले गिळंकृत करतात. मुसलमान मात्र आमचें निराळें अस्तित्व मान्य करण्यास मुळींच तयार नाहींत; कारण आम्ही म्हणजे अल्पसंख्याकांचा एक निराळा वर्ग असें एकदां ठरलें म्हणजे मुसलमानांना मिळणारें खास हक्कांचें घवाड आमच्यामुळें थोडेंतरी कमी होईल अशी त्यांना धास्ती पडली आहे. सरकारकडून दडपलेल्या, हिंदूंकडून चिरडलेल्या व मुसलमानांकडून दुर्लक्ष केलें गेलेल्या आमची स्थिति अत्यंत दुःसह झाली आहे. माझी खात्री आहे कीं आमच्या दौर्बल्याची आतां सीमा झालेली असून असें उदाहरण दुसरीकडे कोठेंही सांपडणार नाहीं. विशेषेंकरून या दौर्बल्याकडेच आपलें लक्ष वेधावें अशासाठीं माझा हा सर्व यत्न आहे.

मी या परिषदेला आलों तेव्हां मला वाटलें होतें कीं मतदानाच्या हक्का-पुरती तरी वादविवादाची लढाई संपलेली आहे, पण फरँचाइज् कमिटीमध्यें माझ्या भ्रमाचा भोपळा फुटला. नेहरू रिपोर्टावर सह्या करतांना सर्वांनींच आपल्या मनांत कांहींतरी चोरून ठेविलें होतें हें पाहून मी तर आश्चर्यचकित होऊन गेलों. ही चोरी इतकी मोठी होती कीं, प्रान्तिक कायदेमंडळांकरतां शेंकडा २५ लोकांना मताधिकार देण्यास हिंदुस्थानांतील उदारमतवाद्यांचीही संमति मिळणें महा कठिण कर्म होऊन बसलें. मध्यवर्ति कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठीं किती मताधिकार द्यावयाचा हें अजून अज्ञातच आहे. पण, या मताधिकारामुळें आगामी प्रांतिक कायदेमंडळापेक्षां मध्यवर्ती कायदे-मंडळ अधिक प्रातिनिधिक होईल अशी आशा निदान मला तरी वाटत नाहीं. मताधिकार इतका मर्यादित केल्यामुळें 'हिंदुस्थानचें भावी सरकार म्हणजे सर्व जनसमूहाचें पण विशिष्ट वर्गांनीं चालविलेलें सरकार' अशी स्थिति येणें अपरिहार्य आहे असें मला वाटतें. आमच्या हक्कांत बदल व्हावा म्हणजे सुधारणा व्हावी व ज्याच्या मर्यादा आणि सत्ता हीं दोनही वाढलीं आहेत अशा नव्या राज्याचे एक घटक म्हणून आम्हांस योग्य ते सर्व हक्क मिळावे असें आमचें जोराचें मागणें आहे. होणारे वदल व सुधारणा कोणत्याही असोत; एकदां जो पाया घातला गेला आहे तो उखडून टाकण्याचें धाष्टर्य कोणासच

करवणार नाहीं. अस्पृश्य वर्गांचा प्रश्न हा अगदीं निराळ्या स्वरूपाचा आहे. ते काय मागतात हें आतां कुठें ऐकून घेतलें गेलें आहे. त्यांच्या हक्कांची अजून नुसती चौकशीही झालेली नाहीं व आतां तरी त्यांना मोठें घबाड मिळणार असें थोडेंच आहे? दुसऱ्या जातींनीं आपल्या संरक्षणाकरतां नव्हे तर स्वतःच्या हातांत सत्ता खेळावी म्हणून अनेक डाव चालविले आहेत. मला तर अशी जबर शंका येते कीं, या निरनिराळ्या जातींच्या झुंजींमुळें त्यांची म्हणजे भांडखोर लोकांची भूक शमविण्याकरतां, सरकार, अस्पृश्य वर्गांच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन त्यांचे प्रतिनिधित्वाचे न्याय्य हक्क लुबाडून घेण्यासही मागेंपुढें पाहणार नाहीं.

या बाबतींत माझी भूमिका नेमकी काय आहे हें मला पूर्णपणें स्पष्ट केलें पाहिजे. आगामी राज्यघटनेमध्यें अस्पृश्य वर्गांना किती हक्क द्यावयाचे हें ज्याअर्थीं निश्चित झालेलें नाहीं त्याअर्थीं प्रांतिक किंवा मध्यवर्ती सरकारांत जबाबदार राज्यपद्धतीची सुरुवात म्हणून राजेसाहेबांचें सरकार जी कोणती योजना जाहीर करणार असेल तींत ही गोष्ट स्पष्ट केलेली असावी कीं, या दृष्टीनें जी सुधारणा व्हावयाची ती निरनिराळ्या जातींच्या संमतीनें झालेल्या ठरावानुरूप व्हावी; अशाकरतां कीं त्यामुळें अस्पृश्य वर्गांच्या संरक्षणाचा प्रश्न उरणार नाहीं व त्यांचे हक्क आणि हितसंबंध यांनाही धक्का लागणार नाहीं.

चालू परिस्थिति किती गंभीर स्वरूपाची आहे याची आपणांस तीव्र जाणीव करून देणें व यासंबंधीं काय तो एकदां स्पष्ट निकाल मिळाल्याशिवाय आम्हांला कोणत्याही योजनेस मान्यता देतां येणार नाहीं हें आपल्या नजरेस आणणें हें मी आपलें कर्तव्य समजतों. असा निकाल जर झाला नाहीं तर परिषदेच्या पुढील कामांत भाग घेण्याची जबाबदारी मला किंवा माझ्या मित्रांना स्वीकारतां येणार नाहीं; व आम्हीं तिच्याशीं असलेला आमचा संबंध तोडून टाकूं. महाराज, असें बोलतांना मी आपल्याला, पूर्वी दिलेलें वचन खरें करून दाखवा, यापेक्षां अधिक असें कांहींच सांगत नाहीं. ब्रिटिश पार्लमेंटनें व पार्लमेंटच्या प्रतिनिधीनी आपण अस्पृश्य वर्गाच्या हक्कांचे व हितसंबंधांचे संरक्षक असल्याबद्दल कैकवेळां बोलून दाखविलें आहे, व तें त्यांचें बोलणें म्हणजे मनुष्याचे परस्पर संबंध चांगले राहावेत म्हणून आपण सुधारलेलीं माणसें नेहमीं ज्या

गप्पा झोकून देत असतों त्यांपैकीं एकादी गप्प नव्हे असा मला विश्वास वाटतो. म्हणून आमचा विश्वासघात होऊं न देणें हें राजेसाहेबांच्या कोणत्याही सरकाराचें पण विशेषत: मजूर सरकाराचें आवश्यक कर्तव्य आहे असें मी समजतों. आणि मी आपणांस हेंही सांगून ठेवतों कीं, ज्यांची भरभराट आणि मोठेपणा, आमची अवनति व नाश यांच्या पायावर उभारलेला आहे व आमच्या हिताहिताशी ज्यांचा कांहींच संबंध नाहीं अशा लोकांच्या लहरीवर जर आमचा प्रश्न अवलंबून ठेवावयाचा असेल तर राजेसाहेबांच्या सरकारनें आमचा भयंकर विश्वासघात केला असेंच अस्पृश्यवर्ग समजतील.

अशा तऱ्हेनें बोलल्याबद्दल हिंदुस्थानांतील राष्ट्रीय प्रवृत्तीचे लोक व देशभक्त मला जातिनिष्ठ म्हणून डिवचतील याची मला पूर्ण जाणीव आहे, पण मला त्याची थोडीच फिकीर आहे? हिंदुस्थान हा एक विशिष्ट देश आहे व तेथील राष्ट्रीय प्रवृत्तीचे लोक आणि देशभक्त म्हणजे कांहीं निराळेच लोक आहेत. स्वजातीयांना लोक माणूसही म्हणण्यास तयार नाहींत ही स्थिति जो उघड्या डोळ्यांनीं पाहातो, तो हिंदुस्थानांतील राष्ट्रीय प्रवृत्तीचा माणूस किंवा देशभक्त होय. तें दृश्य पाहूनही या देशभक्ताची माणुसकी संतापानें उसळून बाहेर येत नाहीं. या विशिष्ट स्त्रीपुरुषांचे अगदीं साधेसाधे मानवी-हक्क सुद्धां लाथाडले गेले आहेत याची जाणीव त्याला असते, पण त्याचा प्रतिकार करण्याकरितां त्या भल्या नागरिकाची कर्तव्यबुद्धि कांहीं खडबडून जागी होत नाहीं. सार्वजनिक व्यवहारव्यापार आणि नोकरीधंदा यांमध्यें सबंध वर्गचे वर्ग बहिष्कृत झालेले आहेत हें तो पाहात असतो, तरीपण त्याची न्यायबुद्धि या अन्यायाविरुद्ध चंग बांधीत नाहीं. व्यक्ति आणि समाज यांना घायाळ करणारे शेंकडो अत्याचार या देशभक्तासमोर प्रत्यहीं घडतात, पण त्यामुळेंही त्याला चेव येत नाहीं. त्याची सारी ओरड सत्तेकरतां असते व स्वत:ला आणि स्वत:च्या वर्गाला अधिक सत्ता मिळावी अशी त्याला हांव असते. अशा देशभक्तांच्या मालिकेंत माझी गणना होत नाहीं याबद्दल मी धन्यता मानतों. समाजहित आणि कोणत्याही प्रकारच्या मक्तेदारीचा विध्वंस हीं ज्याचीं तत्त्वें त्या वर्गाचा मी आहें. राजकीय, आर्थिक, सामाजिक अशा सर्व प्रकारच्या आयुष्यामध्यें प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट महत्त्व आहे हें आमचें तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचा आमचा इरादा आहे. हें ध्येय

गांठण्याकरतां प्रातिनिधिक राज्यघटना हा एक उपाय आहे व म्हणूनच मी, अस्पृश्यवर्ग त्या घटनेला इतकें विशेष महत्त्व देतात. तरी तुमच्या जाहीरनाम्याप्रमाणें प्रातिनिधिक राज्यघटना स्थापन झाली पाहिजे असा जो आग्रह चालविला आहे तोहि उपरिनिर्दिष्ट महत्त्वामुळेंच. तुम्ही आम्हांला असेंही सांगाल कीं अस्पृश्य वर्गाबद्दल आम्हांला फार सहानुभूति आहे. त्याला माझें उत्तर असें आहे कीं, पूर्ण खचून गेलेल्या लोकांकरतां याहून अधिक भरींव व याहून अधिक स्पष्ट असें कांहींतरी पाहिजे असतें. भलभलते तर्क लढविण्याबद्दल तुम्ही खुशाल माझी कुचाळकी करा; मला एवढेंच समजतें कीं उगीच भलता विश्वास उराशीं बाळगून आत्मनाश करून घेण्यापेक्षां शक्य तीं आगामीं दुःखें व संकटें आधीं हेरून ठेवणेंच आम्हांस अधिक परवडतें.

महाराष्ट्रांतील मांगांनीं (मातंगांनीं) सायमनसाहेबांना पाठविलेला अर्ज

"महाराष्ट्रांतील आम्ही मातंग समाजाचे पुढारी खालीं दिलेला मजकूर आपल्या विचाराकरतां आपणांकडे पाठवीत आहों.

हिंदू लोक ज्या जातींना अस्पृश्य म्हणून समजतात त्या दुर्दैवी अस्पृश्य जातींपैकीं आम्ही मांग अगर मातंग जातीचे लोक आहोंत. आम्ही संख्येनें २० लाख असून आमचा धंदा दोर वळणें व खेडेगांवांतून शेतकऱ्यांचीं पडतील तीं कामें करणें हा होय. आमची जात १२ जिल्ह्यांतून पसरली आहे. आमची संघटित अशी लहानशी संस्थाहि आहे. आमच्या जवळ जमिनी नाहींत म्हणून ज्याला थोडा अभिमान आहे तो घ्यावयास कचरेल अशा, शेतकऱ्यांनीं अगर ज्यांची आम्ही नोकरी करतों त्यांनीं टाकलेल्या, तुकड्यावर आम्ही गुजारा करतों.

ही परिस्थिति बदलण्याची वेळ जवळच आली आहे, ती फार लांब नाही. आपल्या नजरेस प्रथमच ही गोष्ट आणूं इच्छितों कीं, श्रेष्ठ जातींकडून जी अपमानकारक वागवणूक झाली त्याबद्दल व अस्पृश्यतेमुळें भाग्य काढण्यास संधि मिळाली नाहीं याविरुद्ध आम्हांला तक्रार करावयाची नाहीं. ते आमचे धर्मबांधवच आहेत. आमची सुधारणा आम्हींच केली पाहिजे याची जाणीव

आम्हांला आहे व तसे आमचे प्रयत्न चालू आहेतच. आमच्यावर होत असलेल्या व झालेल्या अन्यायाची जाणीव त्यांना होत आहे व त्यांचेही तसे प्रयत्न चालू आहेत. यामुळें अस्पृश्यतेचा किल्ला दोहों बाजूंनीं उखडला जात आहे. तेव्हां केवळ सत्ताधारी सरकारलाच नाहींशा करतां येतील अशा आमच्या अडचणी आपल्या नजरेस आम्ही आणूं इच्छितों.

आम्ही अत्यंत दरिद्री आहोंत व हें आमचें दारिद्र्य दिवसेंदिवस वाढतच आहे. दोर वळून व तसेच कांहीं धंदे करून आमचें पोट भरत नाहीं. पुष्कळांना जगणें अशक्यप्राय होऊन बसलें आहे. शहराकडे कामधंदा मिळेल म्हणून जावें तर अझूनपर्यंत कष्टानें जतन करून ठेवलेली संसाराची झोंपडी मोडून टाकणें जीवावर येतें. शिवाय लाखो मांगांना शहरांतून देखील कामधंदा मिळेल असें नाहीं. आमची स्थिति तर फारच अनुकंपनीय आहे. आम्ही अस्पृश्य जातींत अगदीं खालच्या थरांत आहोंत. अशीच जर स्थिति कायम राहिली तर आमच्या जातीचें काय होणार हें समजत नाहीं. जरी बहुजनसमाज व शेतकरीवर्ग आम्हांस जास्त उदारतेनें पोसूं लागला तरी आमची आर्थिक परिस्थिति सुधारेल असें आम्हांस वाटत नाहीं. अशा स्थितींत आमच्या मताप्रमाणें खालील गोष्टी घडवून आणण्यास आपल्या कमिशननें खटपट केली तर आमची सांपत्तिक स्थिति थोडी सुधारेल अशी आशा वाटते.

(१) आमची कुटुंबसंस्था मोडली जाणार नाहीं असा धंदा आम्हांस देणें. आधुनिक पद्धतीवर दोर वळण्याचा धंदा आम्हांस दिल्यास चालेल. आधुनिक यंत्रसामुग्री पुरवून आधुनिक पद्धतीचें ज्ञान देऊन आमच्यांतील तरुणांना जर त्यांत तरबेज केलें व या गोष्टीकरतां केतकीची मोठ्या प्रमाणांत लागवड करण्याच्या सवलती व जमिनी दिल्या तर या योजननेनें आमची सांपत्तिक स्थिति सुधारेल.

(२) सरकारी नोकऱ्यांचे दरवाजे आम्हांला खुले करणें.

(३) आमच्यांतील होतकरू व शिकाऊ मुलांकरतां वसतिगृहांची स्थापना करणें.

(४) सरकारजवळ पुष्कळ पडित जमीन आहे. ती आम्हांस शेतीकरतां सरकारनें द्यावी व सारा देण्याची ऐपत येईतों आमचेकडून सारा घेऊं नये.

वरील सवलती जर आम्हांला मिळाल्या तर आमची स्थिति सुधारण्या-

करतां व स्वतःची उन्नति करून घेण्याकरतां व स्पृश्यांकडून आमचे सामाजिक हक्क मिळविण्याकरतां झगडण्यास आम्हांस सामर्थ्य येईल. सांपत्तिक स्थिति सुधारली म्हणजे सामाजिक व धार्मिक उन्नति आपोआप होईल आणि अशी सांपत्तिक स्थिति आम्हांस प्राप्त करून देण्यास आपणच समर्थ असल्यामुळें आपणांपुढें हा अर्ज ठेविला आहे.

वायदंडे, सकट, शेडगे, गायकवाड, इंगळे, आवळे, अवघडे, काकडे, शेलार, शेंडगे, लोखंडे. पुणें १–९–१९२८. "

रा. ब. **एम्. सी. राजा,** एम्. एल्. ए. यांनीं ३१।१०।३१ व १।११।३१ रोजीं गुरगांव (पंजाब) येथें अखिल भारतीय अस्पृश्यांच्या परिषदेंत अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांतील उतारेः—

"निरनिराळ्या प्रांतीय कौन्सिलांतून अस्पृश्यांना ज्या जागा द्यावयाच्या त्यासंबंधीं सरकारचें धोरण अस्पृश्यांच्या हिताला मारक आहे व हें धोरण सरकारनें वेळींच बदललें नाहीं तर सरकार या मोठ्या समाजाचा आदर व पूज्यबुद्धि गमावेल व या राजनिष्ठ व कायद्याला भिऊन वागणाऱ्या समाजांत असंतुष्टता उत्पन्न होण्यास कारणीभूत होईल. असें झालें तर तें दोघांनाहि घातुक होईल एवढेंच मी नम्रपणें त्यांच्या नजरेस आणूं इच्छितों.

हिंदुस्थानला ज्या नव्या सुधारणा देण्याचें घाटत आहे त्यांना आमचा विरोध नाहीं. जबाबदारीचें, वसाहतीच्या दर्जाचें अगर संयुक्त घटनेचें स्वराज्य दिलें तरी त्यास आमची हरकत नाहीं. परंतु स्वराज्यांत देशांतील एक पंचमांश लोकांना–अस्पृश्यांना, समान हक्क व दर्जा प्राप्त न होतां केवळ बुद्धिजीवी लोकांचें कल्याण साधणार असेल तर तसल्या स्वराज्याला आमची तीव्र नापसंती व विरोध राहील.

प्रत्येक मनुष्याला जास्तींत जास्त ऐहिक सुख भोगतां येईल व जेथें अशा सुखसाधनांची वाढ होण्यास भरपूर वाव राहील तेथेंच खरें स्वातंत्र्य नांदतें आहे असें म्हणतां येईल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बंधुभावाची जोपासना व वाढ झाली नाहीं तर ती स्थिति असह्य व जुलमाची वाटेल. परंपरागत धार्मिक सत्तेच्या व रूढीच्या नांवाखालीं संघटित प्रयत्न करून आर्थिक सत्ता बळकावून श्रेष्ठ जातीच्या लोकांनीं आजपर्यंत जो जाच व जुलूम केला

तो यापुढें आपण सहन करणें शक्य नाहीं. याच धार्मिक रूढीमान्य जुलमांत आणखी आतां राजकीय वर्चस्वानें प्राप्त होणाऱ्या जुलमाची भर नको.

या वरिष्ठ हिंदू जातींनीं आपल्यावद्दल पुष्कळ पोकळ सहानुभूति दाखविली! अस्पृश्य आपलेच देशवांधव असून आपल्याच हाडामांसाचे आहेत असे यांनीं वेळोवेळीं उद्‌गार काढले! पण हिंदूधर्माला लागलेला हा काळा डाग धुवून काढण्याकरतां यांनीं काय केलें? तर पशूपेक्षां हीनतेनें यांनीं आपल्याला वागविलें! अजूनही राजरस्त्यावर फिरकण्याची आपल्याला मोकळीक नाहीं! सार्वजनिक पाणवठ्यावर आपणांस पाणी भरूं देत नाहींत; आपल्या मुलांना शाळांतून शिक्षण घेऊं देत नाहींत; सार्वजनिक धर्मशाळा वगैरेंतून आपल्याला क्षणभर विश्रांतिही घेऊं देत नाहींत! मूर्तीच्या पूजेकरतांहि आपल्याला देवळांत प्रवेश नाहीं व सार्वजनिक समारंभांत भाग घेऊं देत नाहींत. आपण वेद वाचावयाचे नाहींत अगर आपलीं प्रेतें या श्रेष्ठ हिंदूंच्या स्मशानांत जाळायचीं अगर पुरायचीं नाहींत आणि असें म्हणतात कीं, हिंदूंच्या स्वर्गांत देखील अस्पृश्यांना जागा नाहीं! असें असूनहि, अस्पृश्य म्हणे हिंदू अशीच चिठी त्यांच्या कपाळावर मारली जाते! अशी चिठी कपाळावर मारली असली तरी आम्ही व आमची सारी जात हे स्वतंत्र लोक, जमात आहे.

लंडनमध्यें आमच्याबद्दल भ्रामक कल्पना पसरविल्या जात आहेत. वर्तुळ परिषदेंत महात्मा गांधींनीं असें म्हटल्याचें सांगतात कीं, राष्ट्रीय सभा अगदीं पहिल्यापासून अस्पृश्यांची सर्वतोपरी काळजी घेत आहे; राष्ट्रीय सभेचें धोरण अस्पृश्यता निवारणाचें असून तत्प्रीत्यर्थ अनेक प्रयत्न झाले व होत आहेत. अस्पृश्यांच्या कल्याणाची काळजी राष्ट्रीय सभेनें वाहिली व अस्पृश्यतानिवारणाची जवाबदारी अंगावर घेऊन राष्ट्रीय सभेनें सर्व देशभर चळवळ केली. हीं सर्व विधानें साफ खोटीं आहेत असें मी म्हणतों.

राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आली त्याला ४६ वर्षे झालीं; या सभेनें अस्पृश्यतानिवारणाचा ठराव पास केला त्याला अजमासें दहा वर्षें झालीं आणि म० गांधींनीं राष्ट्रीय सभेच्या विधायक कार्यक्रमांत खादीप्रसार व दारूबंदी यावरोबरच अस्पृश्यतानिवारण या वाबीचा समावेश अगदीं अलीकडे केला. मला म० गांधींना असें विचारावेसें वाटतें कीं, राष्ट्रीय सभेच्या अनुयायांनीं खादीप्रसाराप्रीत्यर्थ जितका वेळ व पैसा खर्च केला त्याच्या एक शंभरांश

वेळ व पैसा त्यांनीं अस्पृश्यतानिवारणाच्या कार्याकरतां केला काय? खादी-प्रसाराची चळवळ चांगली आहे पण गिरणी कापडाशीं टक्कर देण्यास ती असमर्थ असल्यामुळें राष्ट्रीय सभेनें त्या एका कार्यावर भर न देतां अस्पृश्यता-निवारणावर आपलें सारें सामर्थ्य वेचलें असतें तर मला वाटतें स्वराज्याचे हक्क आपल्या पदरांत पडण्यास फार वेळ लागला नसता.

कांहीं विवक्षित कंपूच्या हातांत राज्यसूत्रें जाण्याऐवजीं खरेंखुरें स्वराज्य मिळावें अशी जर म० गांधींची प्रामाणिक इच्छा असती तर गांधींनीं राष्ट्रीय सभेच्या द्वारें अस्पृश्यतानिवारणाचें कार्य हातीं घेऊन त्याची कड लावावयास हवी होती. "अस्पृश्यतेचा हिंदुधर्मावरील हा डाग जितक्या लवकर धुतला जाईल तितक्या लवकर हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळेल." "अस्पृश्यता न घालवितां जर स्वराज्य मिळालें तर दुसऱ्याच महिन्यांत नाहींसें होईल" आणि "ही सुधारणा स्वराज्यापूर्वींच झाली पाहिजे." असा अट्टाहास जर म० गांधींनीं धरला होता व आहे तर खादीप्रसाराचे ते अचाट प्रयत्न, त्या अवाढव्य संस्था व संघटना व मोठा फंड त्यांनीं कां जमवला? खादीप्रसाराकरितां साऱ्या देशभर चळवळीची धुमश्चक्री कां माजविली? या खादीच्या नगाऱ्यापुढें बिचाऱ्या अस्पृश्यतानिवारणाची टिमकी वाजली नाहीं! आणि कोण वाजविणार? व्यासपीठावरून समभाव, बंधुत्व यांवर लांब लांब व्याख्यानें झोडणारे राष्ट्रीय सभावाले लोक कोठें गेले? राष्ट्रीय सभेच्या चळवळीच्या कार्यक्रमांत सामाजिक सुधारणेची एकादी बाब अंतर्भूत केली आहे काय? असें मी विचारतों. राष्ट्रीय सभेची अस्पृश्यांबद्दलची ही सहानुभूति दिखाऊ व वरवरची असून जगाच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचे प्रयत्न ती करीत आहे यापलीकडे त्यांत कांहीं नाहीं.

तसें जर नसतें तर "आधीं अस्पृश्यतानिवारण व मग स्वराज्य" असें एका बाजूस म्हणत असतांना दुसऱ्या बाजूनें केवळ स्वराज्य मिळविण्याचे प्रयत्न म० गांधी कां करीत आहेत? त्यांनीं आपली सर्व शक्ति व वेळ अस्पृश्यता-निवारणाच्या कार्याला कां देऊं नये?

म० गांधीसारख्या अद्वितीय पुढाऱ्यानें अस्पृश्यतानिवारणाकरतां साऱ्या देशभर चळवळीची धुमश्चक्री उडवून दिली असती तर तो एक मोठा चमत्कार झाला असता यांत शंका नाहीं. मिठाचा कायदा मोडण्याकरतां दांडीला

जाणाऱ्या सत्याग्रही गांधींचें चित्र आपल्या डोळ्यापुढें उभें करा; त्या-प्रमाणेंच तुरुंगांत घालण्याच्या भीतीनें अस्पृश्यांना देवळें बंद करणाऱ्या लोकां-विरुद्ध अगर जुन्या व पवित्र देवळांत अस्पृश्यांना प्रवेश मिळवून देण्याच्या निश्चयानें म. गांधींनीं मोहीम काढली आहे असें चित्र डोळ्यापुढें उभें करा. नसती कल्पना करून काय उपयोग? म० गांधींना अशी मोहीम काढण्याची कल्पनाहि आली नाहीं याबद्दल मला वाईट वाटतें. कोणी म्हणतील अशा मोहिमेंत दांडीच्या मोहिमेचें गांभिर्य दिसलें नसतें व देवालयावरील ही मोहीम अयशस्वी झाली असती. पण मी म्हणतों कीं ही अयशस्विता इतिहासांत नमूद करून ठेवण्यासारखी झाली असती इतकें महत्त्व तिला प्राप्त झालें असतें. परंतु माझें असें म्हणणें आहे कीं, अस्पृश्यता-निवारणाचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून म० गांधीसारखा पुढारी देवालयावर अस्पृश्यांना दरवाजे उघडून वाट मिळवून देण्याकरतां मोहीम काढूं लागला तर त्याला अपयश कां यावें? सनातनी लोकांचा तिरस्कार व द्वेष पतकरूनही या महात्म्यांनीं देवालयप्रवेशाची चळवळ हातीं घ्यावयास पाहिजे; मग त्यांत त्या महात्म्याचे प्राण गमावले तरी त्याची फिकीर त्यांनीं केली नसती! अस्पृश्यता निवारणाचें कार्य प्राण देऊनही करावयास पाहिजे इतकें तें थोर व पवित्र नाहीं का?

नवीन सुधारणेमुळें कौन्सिलाची सत्ता वाढेल व लोकांना जास्त हक्क मिळ-तील असें मीं अनेकदां बोलून दाखविलें आहे. मात्र हे हक्क आपल्यावर जुलूम करणाऱ्याच्या हातीं जाणार नाहींत याबद्दल आपण खबरदारी घेतली पाहिजे. नाहींतर त्यांच्या हातीं आपल्यावर जुलूम करण्याकरितां हें हक्काचें व सत्तेचें नवीन शस्त्र दिल्यासारखें होऊन त्याखालीं आपण उखडले जाऊन त्यांतून सुटण्याकरितां आपणास बंडच उभारावें लागेल. अशीही अडचणीची परि-स्थिति निर्माण न होईल याबद्दल आपण काळजी घेतली पाहिजे. "प्रथम स्वराज्य मिळवूं व नंतर आपआपसांतील तंटे मिटवूं अगर अस्पृश्यतानिवारणाचें पाहूं" हें बोलणें दिसायला फार चांगलें आहे. माल वाईट लागला तर पैसे परत म्हणणाऱ्या बाजारी वाण्याच्या बोलण्यासारखें हें बोलणें आहे. एकदां पैसा हातीं आला म्हणजे तो वाणी सोडत नाहीं, त्याप्रमाणेंच स्वराज्य मिळाल्या-नंतर हे लोक अस्पृश्यतेबद्दल एक शब्दही बोलणार नाहींत आणि मग आपणां-वर नुसता पश्चात्ताप करण्याची पाळी येईल.

राज्यकर्त्यांविषयीं बोलतांना म० गांधी "अंत:करणांत बदल" पाहिजें असें नेहमीं म्हणतात. तद्वत् स्पृश्य हिंदूंच्या अंत:करणांत आपल्याविषयीं बदल झाल्याची अगर होण्याची वेळ अजूनपर्यंत आली नाहीं काय? मला तर तशीं चिन्हें कांहीं दिसत नाहींत!

म०गांधीना वाटलें कीं शीख-मुसलमानांचा तंटा मिटवला कीं स्वराज्याचा मार्ग सुकर झाला. पण ही त्यांची चूक आहे असें मला वाटतें. शीख–मुसलमानांच्या मागणींतल्या न्यायीपणापेक्षां आमच्या मागण्या कमी न्यायी आहेत असें कां त्यांना वाटतें? हिंदू–मुसलमानांतील तंटा मिटावा असें सर्वांप्रमाणें मलाहि वाटतें. पण इतर हिंदूंनीं आजपर्यंत अस्पृश्यांवर गाजविलेल्या जुलमाचें व अत्याचाराचें काय? त्याचा जाब कोण देणार?

शीख–मुसलमानांच्या तक्रारींत सत्यांश असेल पण अस्पृश्यांच्या तक्रारी तितक्याच खऱ्या आहेत, असें असूनही म० गांधीनीं आमच्यावर होत असलेल्या अन्यायी जुलमांकडे दुर्लक्ष केलें आहे. हिंदू–मुसलमानांचे तंटे फक्त पंजाब–बंगालपुरतेच आहेत; पण अस्पृश्यांवर तर साऱ्या हिंदुस्थानभर जुलूम चालला आहे. शीख लोक २० लाख आहेत तर अस्पृश्य ५ कोटी आहेत. या अल्पसंख्याक लोकांवर सामाजिक अन्याय असे होत नाहींत तर अस्पृश्यांवर त्यांचा कहर चालला आहे. राजकीय हितरक्षणार्थ शीख–मुसलमानांपुढें हिंदूंनीं नमतें घ्यावें आणि राजकीय व सामाजिक हक्कांची समानता मिळावी म्हणून झगडणाऱ्या अस्पृश्यांकडे यांना नुसतें पहाण्यास वेळ नाहीं! कोणत्याही अल्पसंख्याक जातीपेक्षा आमच्या जातीचा प्रश्न महत्त्वाचा आहे. संरक्षणाची जर खरोखरीच कोणाला जरूरी असेल तर ती आम्हालाच. असें असूनही सामाजिक सुधारणेचे कळकळीचे पुरस्कर्ते असे म०गांधी वर्तुळ–परिषदेंत असें बोलले कीं, अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार-संघ दिल्यास ते नाहींसें करण्याकरतां मी आपले प्राण पणास लावीन. पण तेच महात्मा गांधी आम्हांला जें पाहिजे तें मुसलमानांस व शीखांस देण्यास तयार आहेत! आम्हांला स्वतंत्र–मतदार–संघ तात्पुरते पाहिजे आहेत. तर म० गांधींनीं आमच्यावर मिश्रमतदार–संघ लादण्याचा अट्टाहास चालविला आहे. आमचीं दु:खें काय आहेत हीं म. गांधीना समजणें शक्य नाहीं. जोडा कोठें चावतो हें तो घालतो त्यालाच कळतें.

म०गांधी सदय अंत:करणाचे, कनवाळू वृत्तीचे गृहस्थ असून ते आज जगाला वंद्य आहेत. व्यतिक्श: मला त्यांच्याबद्दल आदर आहे. वर्तुळ-परिषदेला ते राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि म्हणून गेले आहेत. राष्ट्रीय सभेच्या धोरणानें त्यांचे हात बांधले आहेत व म्हणून ते अस्पृश्यांच्या हिताला विरोध करीत आहेत कीं व्यक्तिश: त्यांना अस्पृश्यांचा समावेश मिश्र मतदारसंघांत व्हाव-यास पाहिजे हें समजणें कठीण आहे. परंतु व्यक्तिश: गांधी हे कितीही मोठे असले तरी राजकारणी गांधीबद्दल हुशार रहा असा मी इशारा देऊन ठेवितों.

माझें व गांधींचें कांहीं भांडण नाहीं आणि आपल्याला सध्यां त्यांच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. अस्पृश्यांकरतां कौन्सिलांतून कांहीं जागा राखून ठेवून अस्पृश्यांचा अंतर्भाव मिश्रमतदारसंघांत करावा अशा मताचे डॉ. आंबेडकर असूनही त्यांनीं आपलें हें वैयक्तिक मत बाजूला ठेवून ज्या अस्पृश्यांचे प्रतिनिधि म्हणून ते गेले आहेत त्यांचें मत ते वर्तुळ–परिपदेंत मोठ्या उत्साहानें दर्शवून स्वतंत्र मतदारसंघाकरतां गांधींनाही ते जो जोराचा विरोध करीत आहेत त्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों. येथून पुष्कळशा अस्पृश्य संस्थांनीं त्यांच्या या धोरणाला तारा पाठवून पुष्टि दिली व पसंति दाखविली आहे हें फार चांगलें झालें.

आपलें हित व हक्क, आपली लोकसंख्या, आपलें राजकीय महत्त्व व सामा-जिक वैगुण्यें इतक्या बाबी लक्षांत घेतल्या म्हणजे कायदे–मंडळांत आपले प्रतिनिधि हमखास निवडून यावेत, म्हणून आपल्याला स्वतंत्र मतदारसंघच हवेत व त्याकरतां आपण प्रयत्न केला पाहिजे. आपणांस स्वतंत्र मतदारसंघ मिळाला पाहिजे व तो आपला हक्क आहे. आणि त्याकरतां आपण भांडलें पाहिजे. या संघांतून निवडून गेलेल्या प्रतिनिधींनाच आपलीं दु:खें व अडचणी काय आहेत तीं सरकारच्या कानांवर योग्य रीतीनें व परिणामकारक रीतीनें घालतां येतील.

मिश्र मतदारसंघांत अस्पृश्यांचा समावेश झाल्यास त्यांचा प्रतिनिधी कायदे-मंडळांत निवडून जाणें जवळजवळ अशक्य आहे. इतर लोक त्याच्याऐवजीं त्याची जागा अडवतील अगर एकादा अस्पृश्य गेला तर तो स्पृश्यांच्या हातचें खेळणें होऊन राहील! आपल्या हितरक्षणार्थ व आपल्या हक्कसंपादनार्थ स्वतंत्र मतदारसंघ पाहिजेत. याबद्दल शंका नाहीं.

परंतु कांहीं काळ गेल्यानंतर अस्पृश्यांस जर अशी खात्री वाटूं लागली कीं स्पृश्य हिंदू, बहुमतवाले, हे आमच्या हक्कावर गदा न आणतां आमच्या हित-संरक्षणार्थ आपलेपणानें प्रयत्न करीत आहेत तर आम्ही मिश्र मतदारसंघाला मान्यता देऊं. पण ही गोष्ट ध्यानांत धरावयास पाहिजे कीं, ३७ संस्थांनीं आपल्या साक्षी इंडियन स्टॅटचूटरी कमिशनपुढें दिल्या, त्यांपैकीं ३५ संस्थांनीं स्वतंत्र मतदारसंघ पाहिजेत असें सांगितलें. नेहरू-रिपोर्टांतही या जातीला स्वतंत्र मतदारसंघ द्यावेत असें प्रथम म्हटलें पण पुढें असे मतदार संघ देणें देशाचे हिताचें नाहीं असें सांगून मतदारसंघाची शिफारस फेटाळून लावण्यांत आली. तामील-नाडू कॉंग्रेसचे अध्यक्षांची अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार-संघाला मान्यता आहे ही गोष्ट मी आपल्या नजरेस आणूं इच्छितों.

सरकारनें अस्पृश्यांचे प्रतिनिधी कायदेमंडळांतून नेमावेत ही पद्धति यापुढें कायमची नष्ट होणार आहे. अस्पृश्यांना राजकीय हक्कांची जाणीव व्हावी व त्यांनीं आपली राजकीय जवाबदारी हळूहळू ओळखण्यास पात्र व्हावें म्हणून राजकीय प्रगतीची पहिली पायरी म्हणून त्यांना स्वतंत्र मतदारसंघ देऊन आपले प्रतिनिधी निवडण्याची संधि देणें योग्य आहे. हे हक्क पदरीं पाडून घेण्याकरितां आतां बाजूला उभें राहून अस्पृश्यांनीं हिंदु-मुसलमानांचें भांडण न पाहतां आपल्या हक्क संपादनाकरतां हिंदूंशीं झगडण्याकरितां मुसलमान, ख्रिस्ती अगर अँग्लोइंडियन्स यांच्याशीं एक होऊन झगडा केला पाहिजे. मिश्र-मतदार-संघ आपणांत एकी व्हावी म्हणून आपल्यावर लादले जाणार नसून आपल्यावर निरंतरचा अव्याहत जुलूम करतां यावा म्हणून मिश्रमतदार-संघ आपणांवर लादण्याचे स्पृश्यांचे प्रयत्न चालले आहेत

लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रांतीय व वरिष्ठ कायदेमंडळांत अस्पृश्यांना जागा मिळाल्या पाहिजेत; इतकेंच नव्हे तर मी असेंहि म्हणतों कीं जरा ज्यास्त जागा मिळल्या तर त्या जरूर द्याव्यात. शिवाय मंत्रिमंडळांत अस्पृश्यांचे प्रतिनिधि सरकारनें घ्यावेत.

मतदानाच्या हक्काचा विचार करतां अस्पृश्यांच्या बाबतींत हा अधिकार वयांत आलेल्या साऱ्या अस्पृश्य स्त्री-पुरुषांना द्यावा या मताचे आपण आहोंतच. पण सध्यां तें शक्य नाहीं व म. गांधींनाही तसेंच वाटतें. तरीही अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यास ते विरुद्ध आहेत. सध्यांच्या परिस्थितींत

मत देण्याची जी लायकी ठरविली आहे त्याचें प्रमाण उतरवून मतदारांची संख्या दुप्पट होईल असें करावें व अशी संख्या वाढवितां वाढवितां कांहीं कालानें सर्व वयांत आलेल्या स्त्रीपुरुषांना मतदानाचा अधिकार मिळेल अशी योजना करून ठेवावी. सांपत्तिक दृष्ट्या आधींच खालावलेल्या समाजांत मतदानाच्या अधिकाराची पात्रता ठरविण्याकरितां "स्थावर इस्टेट असणें" ही कसोटी लावणें योग्य नाहीं. तरी पण त्यावरोवरच सध्यां तरी ज्याला लिहितां वाचतां येतें अशास मताधिकार देण्यास हरकत असूं नये असें माझें मत आहे. लोक-संख्येच्या प्रमाणांत कायदेमंडळांत प्रतिनिधित्व मिळेल अशी कांहींतरी योजना फरॅन्चाईज कमिटीनें हुडकून काढावी अशी जी सूचना करण्यांत आली आहे ती मला मान्य आहे.

व्यक्तीचा धर्म, जातगोत, रंग, वंश, काय वगैरे गोष्टींचा विचार सरकारी नोकरींत घेतांना पहावयाचा नाहीं असा नियम असतांनासुद्धां अस्पृश्यांना नोकऱ्या दिल्या जात नाहींत. सायमन कमिशनच्या रिपोर्टांत तर असें नमूद केलें आहे कीं, अस्पृश्यांना अस्पृश्य म्हणून मुंबई, पंजाब, बंगाल, यू.पी., आसाम या प्रांतांतून पोलीस खात्यांत घेतलें जात नाहीं. तर यापुढें न्यायाला स्मरून म्हणून तरी अस्पृश्यांना लहानमोठ्या नोकऱ्यांवर सर्व खात्यांतून सरकारनें नेमणुका कराव्यात." वगैरे.

भारतीय अस्पृश्य समिती व सोमवंशी संस्था यांचें संयुक्त पत्रक

आमची राजकीय व आर्थिक स्थिति सुधारावी म्हणून सरकारनें आम्हांस मदत करावी असें आम्ही म्हणत असतांना देशाच्या रक्षणाची जबाबदारी आम्ही घेतली आहे व घेतों आहोंत हें आम्ही विसरणें शक्य नाहीं. ज्या दिवशीं पेशव्यांचें राज्य जाऊन इंग्रजांचें राज्य आलें त्या दिवसापासून आम्हास आमची वीरवृत्ति व लढाऊ वृत्ति दाखविण्याची संधि मिळाली. हिंदी लष्करांत आम्हांस नोकऱ्या मिळाल्या व पुष्कळांना तदनुषंगिक धंदे मिळाले.

आमच्या लढाऊ वृत्तीबद्दल मध्यभाग कमिशनर मि. मांटफोर्ड यांनीं कायदे-मंडळांत धन्योद्‌गार काढून आमच्या जातीनें दाखविलेल्या शौर्याचा उल्लेख केला. मूठभर महारांच्या फौजेनिशीं कोरेगांवला पेशव्यांच्या अफाट सैन्याशीं इंग्रजांनीं टक्कर देऊन जय मिळविला त्याचें स्मारक कोरेगांवला

उभें केलें आहे. त्यावर शूर महारांचीं नांवें कोरलीं आहेत. मि. मांटफोर्ड साहेवांनीं वरील शब्दांत महारांच्या शौर्याचा गौरव केला.

अलीकडे लष्करांतील अधिकाराच्या जागांवर हिंदी लोकांची नेमणूक करावी अशाबद्दलचे प्रयत्न चालू असून कांहींना अधिकाराच्या जागा दिल्या आहेत. आमची हीन स्थिति लक्षांत घेतली असतां आम्हांस असें वाटतें कीं, आमची लढाऊ जात वगळून इतरांना सैन्यांत घेणें बरोबर होणार नाहीं. या हिंदीकरणाला आमचा विरोध आहे. लष्करांत उच्चवर्णीय हिंदू उच्च जागा एकदां पटकावून वसले म्हणजे तेथें अस्पृश्यांना मुळींच वाव मिळणार नाहीं. त्यांनीं फार तर या अधिकारी स्पृश्यांचीं लाकडें फोडावीं. या हिंदी अधिकाऱ्यांपेक्षां युरोपियन लष्करी अधिकारी फार बरा. त्याला स्पृश्य-अस्पृश्य हा भेद नाहीं. नेहमींच युरोपियन अधिकारी मिळतील असें नाहीं. पण या संक्रमणकालांत आम्हाला लष्करी अनुभव येईतोंपर्यंत तरी तेच अधिकारी असावेत असें आम्हास वाटतें. आम्ही आधींच मागासलेले व हीन दर्जाचे व शिक्षणाच्या सवलती नुकत्याच कोठें आम्हास मिळूं लागल्या आहेत. अशा स्थितींत आमच्या बाबतींत नोकरीला जरूर असलेली वयाची मर्यादा वाढवावी. नोकऱ्या देण्याच्या बाबतींत अस्पृश्य उमेदवाराचा आधीं विचार करावा हें योग्य होईल. इ.इ. . .

अखिल भारतीय परिषदेचे अध्यक्ष श्री. एम्. व्ही. भाग्यारेडी, हैद्राबाद यांनीं जें अध्यक्षीय भाषण केलें त्याचा गोषवारा. लखनौ २७–९–३१

गेलीं कित्येक शतकें वरिष्ठ जातीचा आपणा आदिहिंदूवर होत असलेला व झालेला जुलूम व आपल्याशीं झालेली अतिनिष्ठुरतेची वर्तणूक यांचा इतिहास वर्तुळ परिषदेला गेलेल्या सर्वांना परिचित असावा असें मी धरून चालतों. आमच्यांत असलेलीं वैगुण्यें व आमच्या जातीची अवनति याला कारण सामाजिक अगर धार्मिक स्वरूपाचें नसून तें राजकीय स्वरूपाचें आहे हें सांगावेसें वाटतें. हल्लीं ज्यांना वरिष्ठ हिंदू असें म्हणतात त्यांचे पूर्वज बाहेरून जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां राजकीय व आर्थिक वर्चस्वाकरतां त्यांच्यांत व येथील मूळच्या रहिवाशांत म्हणजे आदि हिंदूंत भयंकर लढा झाला व या लढ्याचें पर्यवसान अस्पृश्यतेंत झालें.

हे आर्य येण्यापूर्वीं आपण या देशाचे मालक होतों. आपण त्यावेळेस प्रबल सत्ताधारी होतों. आपलें सामर्थ्य अचाट होतें. पौर्वात्य व पाश्चिमात्य इतिहासकारांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, या आर्यांना आपण जिंकलें होतें इतकेंच नव्हे तर हे आर्यलोक कित्येक शतकें आपले दास होते.

जेत्यांना आपलें वर्चस्व कायम टिकावें असें वाटतें व या लोभापायीं त्यांचे जित लोकांना कायमचें दास्यत्वांत ठेवण्याचे प्रयत्न चालू असतात. असे प्रयत्न चालले असतांनासुद्धां जित लोकांनीं आपलें स्वातंत्र्य पुन्हां मिळविल्याचीं उदाहरणें आहेत. पण आदिहिंदूंना आर्यांनीं जेव्हां जिंकलें तेव्हां त्यांना कायमचें दास्यांत ठेवण्याकरतां त्यांनीं ज्या युक्त्या योजिल्या त्या मात्र खरोखर आश्चर्य करण्यासारख्या आहेत. त्या वेळीं जिंकलेल्या लोकांनाच नव्हे तर त्यांच्या पुढच्या पिढ्यांनासुद्धां कायम दास्यांत ठेवण्याकरतां या आर्यांनीं युक्ति शोधून काढिली! प्रथम त्यांनीं या जित लोकांना—आदिहिंदूंना ज्ञानाचे दरवाजे बंद केले! पूर्वजन्मानुसार परमेश्वरानेंच जित हे अंत्यज केले आहेत अशी भोळी भावना त्यांच्या हृदयांत उत्पन्न केली! आणि जर या नीच स्थितींतून वर येण्याचे प्रयत्न अंत्यजांनीं केले तर अंत्यज नरकांत जातील अशी धार्मिक भीति आमच्यांत या लोकांनीं उत्पन्न केली! अशा रीतीनें आपण या अस्पृश्यतेच्या गर्तेंत कायमचे येऊन पडलों आहोंत. लक्तरें आंगावर पांघरून उपाशी पोटानें आपण आपलें कष्टमय जीवित कंठीत आहोंत. आपल्याला राजरस्त्यावर फिरण्याची मनाई आहे. सार्वजनिक पाणवठे आपल्याला बंद आहेत. देवळांतून आपल्याला प्रवेश नाहीं. धर्मशाळांतून उतरण्यास आपणांस बंदी आहे. इतकेंच नव्हे तर आपलीं प्रेतें पुरण्याकरितां आपणास टीचभर जागा हवी असेल तर या वरिष्ठ जातीच्या तोंडाकडे आपणांस पहावें लागतें.

या इंग्रजी अमदानींतच आपल्याला ज्ञानभांडार खुलें झालें. ईश्वरनिर्मित नव्हे तर मानवनिर्मित या अवनत स्थितीचें ज्ञान आपणाला या शिक्षणानें प्राप्त होऊन आपले डोळे उघडले. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या उच्च ध्येयानें प्रेरित झालेल्या या पाश्चिमात्य लोकांचा व आपला संबंध आला नसता तर अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील डाग आहे ही गोष्ट स्पृश्यांना समजली असती कां नाहीं याची वानवाच आहे. या उदारधोरणी इंग्रजांचा राज्य-

कत म्हणून हिंदुस्थानाशीं संबंध आला म्हणूनच स्पृश्यांना या अस्पृश्यतेबद्दल शरम वाटूं लागली आहे.

जित राष्ट्राचे प्रतिनिधि म्हणून कांहीं लोक राष्ट्रीय हक्क मिळविण्याकरितां विलायतेला गेलेले आहेत. पण आम्हां अस्पृश्यांचा त्यांना असा सवाल आहे कीं, आम्हांला वगळून राष्ट्राचे प्रतिनिधि म्हणून जाण्याचा तुम्हांला कोणता हक्क आहे?

सर्वतोपरी स्पृश्यांची अशी जी राष्ट्रीयसभा, तिनें आमच्या उन्नतीचे कोणते प्रयत्न केले? ज्यांना लीलेनें चिरडतां येईल अशा आपणा अस्पृश्यांना वाजूला सारून मुसलमान व शीख समाजांना वाजवीपेक्षां जास्त हक्क देण्यास ही राष्ट्रीय सभा तयार आहे! यावरून अस्पृश्यांवर कायमचें वर्चस्व ठेवण्याचें राष्ट्रीय सभेचें धोरण आहे असें आपण कां म्हणूं नये?

हिंदू जातींत जी असमानता दिसते आहे ती नाहींशी व्हावी म्हणून समतेच्या व न्यायाच्या दृष्टीनें मतदानाचा अधिकार वयांत आलेल्या सर्वांना द्यावा असें तत्त्व हे स्पृश्य प्रतिपादित आहेत. अशा मानभावीपणाच्या गोष्टी आतां आम्हीं ऐकून घेणार नाहीं. धर्माच्या खुळचट कल्पना आमच्या माथीं मारून आम्हांला आजपर्यंत पायीं तुडविलें तें आतां पुरें झालें. आमच्याबद्दल सहानुभूतीचा नसता उमाळा स्पृश्यांना आतांच कां आला? अस्पृश्यांच्या दु:खांनीं आमचीं मनें विदीर्ण होऊन आम्हांला त्यांच्या उन्नतीच्या प्रयत्नांत यश यावें म्हणून राजकीय हक्क मिळविण्याकरितां झगडावें लागत आहे, असा देखावा हे स्पृश्य केवळ जगाच्या डोळ्यांत धूळ फेकण्याकरतां करीत आहेत हें विसरूं नका. वयांत आलेल्या साऱ्या हिंदूंना मत देण्याचा अधिकार मिळाला तर त्यामुळें अस्पृश्यांचें कोणतें हित साधणार आहे? आम्ही साऱ्या देशभर पसरलों असून प्रत्येक ठिकाणीं आमची संख्या फार कमी आहे. अस्पृश्यतेचा शिक्का आमच्या कपाळीं आधींच मारला असल्यामुळें निवडणुकीत आम्हांस भाग घेतां येणार नाहीं. शिवाय आमच्यांत ज्ञानाचा गडद अंध:कार इतका आहे कीं, आमच्यांतील एकही माणूस कायदेमंडळांत आमच्यातर्फे निवडला जाईल कां नाहीं याची शंका आहे. मात्र गेल्या निवडणुकींत कांहीं प्रांतांत ज्याप्रमाणें कांहीं दयाळू राष्ट्रीय सभेच्या अनुयायांनीं आमच्यांतील अस्पृश्य पुढाऱ्यांना निवडून येणें शक्य केलें त्याप्रमाणें पुढेंहि होऊं शकेल.

पण ही त्यांची व त्यांच्या सामर्थ्याची घमेंड होती हें विसरूं नका. सरकारला खिजविण्याकरितां म्हणून आम्ही एकादा झाडूवालासुद्धां कायदेमंडळांत पाठवूं शकतों व जेथें झाडूवाला प्रतिनिधि वसतो त्या कायदेमंडळाची लायकी किती हीन आहे हें जगाला दाखवूं शकतों अशी ती त्यांची घमेंड होती. महार-कायदेमंडळावर बहिष्कार घातला पाहिजे, नव्हे, बहिष्कार घालण्यास पात्र अशीं तीं कायदेमंडळें आहेत हें दाखविण्याकरितांच राष्ट्रीयसभावाल्यांचा, हे असे अस्पृश्य प्रतिनिधि निवडून आणण्यांत उद्देश होता. राष्ट्रीयसभा व तिचे अनुयायी आपल्याबद्दल ही अशी अपमानकारक खोटी सहानुभूति दाखवितात आणि असलेच प्रतिनिधि आपल्या हक्काकरतां वर्तुळ–परिषदेंत भांडत आहेत!

हिंदुस्थानाला स्वराज्य मिळालें तर हे स्पृश्य हिंदू आपल्याला कोणत्याही प्रकारचे हक्क देणार नाहींत. आपल्यावर वर्चस्व गाजविण्याची त्यांना लागलेली संवय एकाएकीं नाहींशी होणार नाहीं. आणि असें वर्चस्व तुम्हीं चालूं दिलें तर तुमच्याकरतां ते वाटेल तितकी पोकळ सहानुभूति दाखवितील.

आर्यांच्या कालापासून आजपर्यंत जर आपण अशाच अवनत स्थितींत आहोंत तर ती सुधारण्याकरतां आपणच स्वतंत्रपणें प्रयत्न केले पाहिजेत. त्याकरतां स्पृश्यांवर अवलंबून राहिल्यास आपल्यावर पश्चात्तापाची पाळी येईल यांत शंका नाहीं. या अनंत कालच्या दास्यांतून मुक्त होण्याकरतां आपण आपल्याच पायावर उभे राहून प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या हक्का-करतां झगडण्यास आपलेच प्रतिनिधि कायदेमंडळांत हमखास निवडून गेले पाहिजेत. आपलेच प्रतिनिधि खात्रीनें निवडून यावेत असें वाटत असल्यास त्याला आपल्यास स्वतंत्र मतदारसंघच पाहिजे. सर्व ठिकाणीं आपली संख्या कमी असल्यामुळें मिश्र–मतदारसंघांत आपला समावेश केल्यास आपला प्रति-निधि कायदे मंडळांत पाठविणें जवळ जवळ अशक्य आहे. शिवाय मध्यवर्ती व प्रांतीय सरकारच्या मंत्रिमंडळांत अस्पृश्यांचा एकतरी प्रतिनिधि हवाच. त्याशिवाय आपल्या हिताचें रक्षण व्हावें तसें होणार नाहीं.

अस्पृश्यता नाहींशी करण्याकरतां सार्वत्रिक सक्तीचें शिक्षण व्हावयास हवें. शेवटीं या दास्यांतून सोडविण्याचा प्रयत्न सरकारनें केला पाहिजे. वगैरे.

नागपूर येथन ३०।३।३२ ला ऑल इंडिया डिप्रेस्ड् क्लास असोसिएशनचे **अ० सेक्रेटरी रा. गं. म. ढवरे** यांनीं काढलेल्या पत्रकाचा सारांश:—

असोसिएशननें लोकसंख्येच्या प्रमाणावर मिश्रमतदार संघाची मागणी केल्यावरोबर डॉ. आंबेडकर व त्यांचे सहकारी या असोसिएशनवर तुटून पडल्यासारखे दिसतात. माझी साक्ष हिंदी मतदाननिर्णायक मंडळापुढें ता. १५ मार्च रोजीं होणार. मी त्या असोसिएशनचा अ. जनरल सेक्रेटरी असल्यामुळें मी मिश्र–मतदारसंघच मागणार व माझें व्यक्तिशः मत मिश्रमतदार-संघाकडेच आहे.

दिल्लीला अखिल भारतीय अस्पृश्य–परिषद भरली त्या परिषदेचे अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकरांची निवड झाली. ते येऊं शकले नाहींत म्हणून रा. ब. राजा यांची निवड करण्यांत आली. यामुळें डॉ. आंबेडकर व परिषद भरविणारी मंडळी यांमध्यें वितुष्ट उत्पन्न झालें व डॉ. आंबेडकर यांनीं आपला सवतासुभा स्थापन केला.

नागपूरच्या कॉंग्रेसमध्यें डॉ. आंबेडकरांनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं, माझें मत मिश्रमतदारसंघाकडे आहे व त्याप्रमाणें त्या कॉंग्रेसमध्यें अस्पृश्य समाजाला मिश्रमतदारसंघ मिळावा असा ठराव मंजूर झाला. ही कॉंग्रेस आमच्या असोसिएशनची नव्हती. सायमन कमिशनच्या वेळेला डॉ. आंबेडकरांनीं साक्षींत मिश्र–मतदारसंघच मागितला. व १९३० च्या राऊंड–टेबल-कॉन्फरन्समध्यें त्यांनीं जें भाषण केलें त्यांतसुद्धां त्यांनीं मिश्र–मतदारसंघावरच जोर दिला आहे. आम्ही त्या वेळेला वेगळा मतदार–संघ मिळावा या मताचे होतों; त्यानंतर कांहीं दिवसांनीं डॉ. आंबेडकर वेगळ्या मतदार-संघाकडे झुकले. अर्थात् सर्व अस्पृश्यांची मागणी एक झाली.

आम्ही मिश्र–मतदार–संघ कां मागतों !

१९१९ पासून आम्ही वेगळ्या मतदार संघाचे भोक्ते होतों ते १९३१ सालच्या अखेरपर्यंत; म्हणजे पूर्ण १२ वर्षें लोकसंख्येच्या प्रमाणावर वेगळ्या मतदार संघाकरतां तप केलें; पण त्याचें कांहींच चीज न होतां आमच्या हातीं भोपळाच मिळण्याचें भविष्य दिसल्यामुळें आम्हांस आमचें मत वदलणें भाग पडलें. आम्हाला लष्कर नको, खजिना नको, पण लोकसंख्येच्या

प्रमाणांत जागा पाहिजेत, अशी १२ वर्षें सारखी ओरड करून मध्यप्रांत सरकारनें अस्पृश्यसमाज व मजूर मिळून फक्त १० जागांचीच शिफारस केली. लोकसंख्येच्या प्रमाणांत आपल्याला २२ जागा येतात; तर हा काय न्याय झाला ? रा. व. श्रीनिवास यांनीं वर्तुळ–परिषदेंत आपल्या भाषणांत मुंवई व मद्रास इलाख्याकरितां लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षां इतर प्रांतांतील अस्पृश्यांच्या जागा कमी करून डॉ. आंबेडकरांच्या सल्ल्यानें जास्त जागा मागितल्या. मध्यप्रांताच्या जागा कमी करून मुंवई–मद्रासला कां द्याव्या ?

म्हणे आम्हीं मत बदललें—

आमच्यावर असा आक्षेप आहे कीं, आम्हीं आपलें मत लवकरच बदललें; पण डॉ. आंबेडकरांप्रमाणें लवकर दुसऱ्या राऊंड–टेबलमध्यें जसे ते बदलले तसे आम्हीं न बदलतां १२ वर्षांनीं मत बदललें आहे व तें बदलण्याचें या दोन कारणांशिवाय मुख्य कारण म्हणजे मुख्य वजिरांनीं आपल्या भाषणांत प्रांतिक–स्वायत्तता देण्याचें सांगितलें आहे. सध्यांच्या राज्यघटनेंत व भावी प्रांतिक-स्वायत्ततेंत बराच भेद आहे. सध्यांचा अधिकार इंग्रजाकडे आहे व कौन्सिलनें जें कांहीं सध्यां ठरविलें तें सध्यांचें सरकार धाब्यावरही ठेवूं शकतें. तसेंच आपल्यावर वऱ्याच खेड्यापाड्यांतून हिंदूसमाजाकडून जुलूम झाला व सरकारला आपण दाद मागितली, तर सरकारनें आपल्याला यावद्दल वरीच मदत केली. पण प्रांतिक स्वायत्ततेंत आतां राज्यकारभार राहणार नाहीं. वहुमतवाल्यांच्या हातीं सूत्रें राहणार. सारे समाज एक झाले तरी बहुमत स्पृश्य हिंदूंचें राहणार. अस्पृश्य–समाज वेगळा होऊन कौन्सिलांत आपल्याला कांहींच करतां येणार नाहीं. जर आपल्याला आपल्या समाजाकरतां कांहीं करून घ्यायचें असेल तर हिंदूंशीं मिळूनच वागलें पाहिजे. आपला प्रयत्न अस्पृश्यता–निवारणाचा आहे. जर आपण राज्यघटनेंत हिंदूंपासून वेगळे झालों तर अस्पृश्यता कायमची राहणार आणि अस्पृश्यसमाज व स्पृश्य हिंदू-समाज यांच्यामधील द्वेषाची वृद्धि मात्र होणार. यामुळें आपल्या समाजाचा कांहीं फायदा होणार नाहीं.

मिश्रमतदारसंघानें हिंदूंचे बगलवच्चे येतील असाही कांहीं लोकांचा आक्षेप आहे. पण तोच आक्षेप वेगळ्या मतदार–संघावरहि येतो. अस्पृश्य

समाजांतून मिश्रमतदारसंघानें योग्य माणसांचीच निवड होईल हें रा. ब. राजांचें टाइम्स ऑफ इंडियानें ता. २५।३।३२ मध्यें जें पत्र प्रसिद्ध केलें तें वाचल्यानें प्रत्येक अस्पृश्य समाजाची खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं. मॉंटेग्यू–चेम्सफर्डच्या चौकशीच्या वेळेला मद्रासच्या ब्राह्मणेतरांनीं स्वतंत्र मतदारसंघ मागितला पण त्यांना स्वतंत्र मतदारसंघ न मिळतां संयुक्त मतदार संघ व राखीव जागा (जी मागणी ऑल इंडिया डिप्रेस्ड् क्लासेस असोसिएशन करीत आहे) हेच मिळाले, व सध्यां आपण मद्रास इलाख्यांत पाहतों तर ४५ ब्राह्मणेतर, मिश्रमतदारसंघानें विनहरकत लायकच निवडून येतात. मध्यप्रांतांत मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ आहे व त्यांचे ७ मेंबर कौन्सिलांत असून त्यांच्यामधून एकदांच दिवाणाची नेमणूक झाली; पण लवकरच त्या दिवाणाची उधळपट्टी झाली. कारण स्वतंत्र झाल्यानें इतर समाजांनीं कां मदत करावी? कौन्सिलचा अध्यक्ष म्हणून हिंदूंच्या मदतीनें एकादा अस्पृश्य निवडून येणें शक्य आहे पण तें सध्यांच्या द्विदल पद्धतींतच; प्रांतिक स्वायत्ततेंत होणार नाहीं. कॉंग्रेस व मुसलमान यांच्या लखनौच्या करारान्वयें मुसलमानांना लोकसंख्येपेक्षां अधिक जागा मिळतात. त्याप्रमाणें त्यांना जर मिळताहेत तर आपण आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणांतच जागा मिळण्याकरितां हिंदुमहासभेशीं करारनामा कां करूं नये? व याचकरितां आमच्या असोसिएशननें आपलें मत बदललें आहे. वेगळ्या मतदार–संघांत आपल्या समाजाचें अहित व मिश्र मतदारसंघांत हित आहे, अशी खात्री झाल्यामुळें मिश्र-मतदार-संघच आपल्या समाजाला "हितावह" आहे अशी आमच्या असोसिएशनची खात्री झाली आहे.

डॉ. आंबेडकरांचा मायनॉरिटी पॅक्ट—

डॉ. आंबेडकर व डॉ. श्रीनिवासन् यांनीं इतर अल्प संख्याकांशीं करारनामा करून स्वार्थ साधण्यापलीकडे कांहींच केलेलें नाहीं. यांनीं मुंबई व मद्रास (आपापल्या) प्रांताला लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षां ज्यास्त जागा मागितल्या. याशिवाय त्यांनीं अस्पृश्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करून मुसलमानांना फक्त खूष ठेविलें आहे. लोकसंख्येच्या मानानें अस्पृश्यांना ५९ जागा कमी घेण्यास व मुसलमानांना १७७ जागा अधिक देण्यास आंबेडकरांचा लंडनचा

करारनामा कोणताही विचारी अस्पृश्य कबूल करणार नाहींच. उलट असें केल्याबद्दल डॉ. आंबेडकरांचा धिक्कारच करील. यामुळें अस्पृश्यांचें फार नुकसान झालें आहे. डॉ. आंबेडकरांच्या लंडनच्या करारापेक्षां रा. ब. राजांनीं दिल्लीस डॉ. मुंजे यांच्याशीं केलेला करारच न्याय्य व रीतसर आहे.

ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप—

इंग्रज सरकारच्या हातून आम्हां अस्पृश्यांचीं दुःखें कमी होतील अशी आम्हांला आशा नाहीं. आमच्या तक्रारींची दाद लावून घ्यावयाची तर सरकार डोळे असून पहात नाहीं व कान असून ऐकत नाहीं. तशीच स्थिति आमच्या धर्मबांधवांची. दोघेहि एकाच माळेचे मणी. मराठी राज्यांत आमचा सामाजिक व राजकीय दृष्ट्या अत्यंत छळ झाला व त्या पापाचे धनी मराठे आहेत. पेशवे तर वोलूनचालून ब्राह्मण; तेव्हां या दोषांतून त्यांची मुक्तता होणें नाहीं! या दोषारोपांत किती तथ्यांश आहे याला इतिहासांत पुरावा नाहीं अगर असल्यास कोणी पुढें आणीत नाहीं. मात्र एवढी गोष्ट खरी कीं, ब्राह्मण पेशव्यांनीं आपल्या फौजांत महारांना नोकऱ्या देऊन आपली वीरवृत्ति दाखविण्यास संधि दिली. आणि महार हा एकाद्या इंग्रज टॉमीपेक्षां लढण्यांत व शौर्यांत कमी नाहीं हें जगाला दाखवून दिलें. आपल्या लढाऊवृत्तीस पेशव्यांनीं अशी संधि दिल्यामुळें अस्पृश्यांचा सामाजिक व आर्थिक दर्जा वाढला व त्यांच्या मनांत भावी उत्कर्षाची आशा उत्पन्न झाली. या कारणामुळें त्यावेळीं अस्पृश्यांना स्वतःच्या धार्मिक अगर सामाजिक अवनतीबद्दल कांहीं वाटलें नाहीं. परंतु इंग्रजी अमदानीपासून महारांना व इतर अस्पृश्यांना लष्करांत वाव मिळाला नाहीं. आम्हांला लष्करी चाकरीचे दरवाजे बंद करण्याचे संघटित प्रयत्न या सरकारच्या अमदानींतच सुरू झाले. सर्व जातींना या राज्यांत समानतेनें वागविण्यांत येईल अशी घोषणा एकीकडे चालू असतांना अस्पृश्यांना मात्र चोहोंकडे सांपत्तिक दृष्ट्या तुडविलें जात आहे. सरकारचे कान स्पृश्यांच्या हातीं असल्यामुळें अस्पृश्यांची स्थिति दिवसेंदिवस वाईट होत चालली आहे. आणि म्हणून आमच्या या अवनत स्थितीचीं कारणें शोधून काढून तीं नाहींशीं करण्याचे प्रयत्न सरकारकडून होतील अशी आम्हांला आशा नाहीं. दास्य-विमोचनाच्या

चळवळीचे पुरस्कर्ते म्हणून सरकारनें कितीही ओरड केली तरी येथें कायद्यानें जोंपर्यंत सरकार कांहीं जातींना गुन्हेगार जाती म्हणून ठरवीत आहे तोंपर्यंत त्यांच्या या दास्यविमोचनेच्या घोषणेला जग किंमत देणार नाहीं. अमुक एक व्यक्ति अमुक एका जातीची म्हणून ती गुन्हेगार ठरविणें हें इंग्रज सरकारच्या न्यायीपणाला धरून नाहीं. नुकत्याच जन्मलेल्या अर्भकाला तें विशिष्ट जातींत जन्माला आलें म्हणून जातीचे कायद्यानें गुन्हेगार ठरविणें म्हणजे पशुवृत्तीचें नाहीं काय? सरकारची ही वृत्ति व स्पृश्यांची अस्पृश्यांसंबंधीं वृत्ति यांत फरक तो काय राहिला? अस्पृश्य नांवाखालीं तरी अस्पृश्यांना स्पृश्य दूर ठेवतात पण हें सुधारलेलें सरकार कायद्याच्या जोरावर अस्पृश्यांना गुन्हेगार वृत्तीचे ठरवितें! सरकारला उघड विरोध करण्याची या चढेल स्पृश्य ब्राह्मण व ब्राह्मणेतर जातींची छाती नाहीं. पण आपल्या देवाच्या लाडक्या मुलांवरोबर अस्पृश्यांच्या मुलांनीं एकत्र शिक्षण घेऊं नये म्हणून हे वाटेल तें शस्त्र उपयोगांत आणतील. शिक्षणखात्यांत आधींच ब्राह्मणांचा व इतर स्पृश्यांचा भरणा जास्त प्रमाणावर असल्यामुळें शहरांपासून तों खेड्यांपर्यंत या वाबतींत त्यांचेंच प्राबल्य आहे. यांत अलीकडे ब्राह्मणेतरांची म्हणजे मुख्यतः मराठ्यांची भर पडली आहे. मराठ्यांनीं ब्राह्मणांना हाकलन देऊन त्यांच्या जागा आपण घेतल्या आहेत. अस्पृश्यांनीं आपलीं मुलें शाळेंत पाठवूं नयेत म्हणून "घरादारांचा नाश करूं" अशा धमकावण्या देण्यास या लोकांनीं कमी केलें नाहीं. त्यांच्या इच्छेविरुद्ध जाण्याचा निश्चय आम्ही केल्यास आमच्या झोपड्यांना आग लावण्यांत येईल अशी धमकी दिली जाते. आमचीं मुलें अशा सार्वजनिक शाळांतून पाठविण्याची सक्ति आमच्यावर करूं नये अशासारखे अर्ज लिहून त्यांच्यावर आमच्यांतील अज्ञ लोकांच्या सह्या घेऊन धाडण्याचें काम कांहीं आपमतलवी स्पृश्यांनीं केलें आहे. सरकारी हुकमाचा आधार घेऊन जर कांहीं अस्पृश्यांनीं आपलीं मुलें अशा शाळांतून धाडण्याचें धाडस केलें तर स्पृश्य लोक आपलीं मुलें या शाळांतून काढून घेऊन आपलें म्हणणें खरें करून दाखवितात. शाळांतून स्पृश्यांस्पृश्यांच्या मुलांना वागविण्यांत भेद केला जातो कीं काय याचीहि चौकशी करण्यासारखी आहे.

मागासलेल्या, वन्य व गुन्हेगार जाती

अस्पृश्यांची प्रांतवार लोकसंख्या मागें दिलीच आहे. पण ज्यांचा अंतर्भाव Backward म्हणजे मागसलेले यांत करतात व ज्यांचे हितसंबंध संरक्षिले पाहिजेत असें लोकसत्तेच्या नव्या पद्धतीप्रमाणें अवश्यच आहे त्यांपैकीं कांहीं प्रमुख जाति हिंदुस्थानांत कोठें कोठें राहतात व त्यांची लोकसंख्या किती आहे हें पुढें दिलेल्या विस्तृत तक्त्यावरून दिसून येईल. हे सर्व लोक आज ना उद्यां आपल्या राज्ययन्त्राच्या चाकाला हात देऊन उभे राहणार आहेत हें विसरतां कामा नये. पुढें 'भविष्यत्' म्हणून जें प्रकरण घातलें आहे त्याच्या उमजाला याचा उपयोग होईलच. पण आज जो अस्पृश्यांचा प्रश्न आपण सोडवीत आहों त्याहूनही वलवत्तर असा या लोकांना वाकीच्यांच्या बरोबरीला आणण्याचा अधिक वलवत्तर प्रश्न सोडवावा लागणार आहे हेंही कळून चुकेल.

मुंवई इलाख्यांत व विशेषतः महाराष्ट्रांत ज्या जाती रानटी म्हणून समजल्या जातात किंवा ज्यांना गुन्हेगार म्हणून सरकारानें म्हटलेलें आहे त्यांची थोडी थोडी हकीकत प्रथम दिली आहे. त्यांच्या लोकसंख्या इलाख्याचीं जीं कोष्टकें दिलीं आहेत त्यांत सांपडतील. ही हकीकत झाल्यावर अखिल भारतांत जे कोणी विशेष मागासलेले किंवा वन्यवृत्तीचे लोक आहेत त्यांची प्रांतवारी देऊन त्यांपैकीं कांहींचे आंकडेही दिले आहेत. त्यावरून हा मागसलेलेपणा आणि वन्यपणा किती भरून राहिला आहे हें दिसेल.

बंजार–वंजारी:—वंजारी या नांवानें सामान्यपणें ओळखल्या जाणाऱ्या जमाती साऱ्या हिंदुस्थानांत आढळतात. त्यांच्यांत देशपरत्वें पुष्कळ पोटभेद आहेत. मुख्य पोटभेद–वंजारी, ब्रिंजारी, लमाणी, लंवाणी व लंबाडी हे होत. मथुरी, लमाण, चरण (रजपूत वंजार) आणि धारी असे त्यांत आणखी भेद आहेत. धारी हे मुसलमान धर्माचे आहेत. धालिया म्हणून आणखी एक पोटजात आहे त्यांना बंजारी मांग असें म्हणतात. कांहीं जमातींत सोनार, न्हावी व पुजारी असेहि पोटभेद आढळतात. पुणें, नगर, नाशिक, खानदेश येथें रहाणारे व एकाच वंशांतील असे दिसणारे बंजार व वंजारी यांत फरक आहे. वंजारी हे दक्षिणेंतील मराठ्यांसारखे दिसतात व खेडेगांवांतून स्थायिक झालेले आढळतात. गुजराथेंतील कांहीं वंजारी स्थायिक झाले असून शेती-

भाती करून राहिले आहेत. यांची बोलण्याची भाषा व पेहराव दक्षिण व कर्नाटकांतील वंजाऱ्यांसारखाच असतो.

यांची वस्ती जवळ जवळ सर्व इलाखाभर आहे. या जाती अजूनहि पोटा-मागें भटकतांना दिसतात. परंतु अलीकडे पुष्कळसे खेडेगांवांतून स्थायिक झालेले आहेत. पूर्वी म्हणजे आगगाडया व रस्ते होण्यापूर्वी या जातीचा मुख्य धंदा म्हणजे बैलावरून धान्य, मीठ व इतर व्यापारी माल एका भागां-तून दुसऱ्या भागांत पोंचविण्याचा होता. अजूनहि हा धंदा लहान प्रमाणावर चालू आहे. आतां हे लोक आपला उदरनिर्वाह शेतीवर करतात. कांहीं शेतमजुरी करतात व जोडधंदा म्हणून लांकडें व गवत विकण्याचा धंदा करतात. गुरें पाळण्याचा धंदा हे लोक मोठ्या प्रमाणावर करून व्यापार करतात तर कांहीं या व शेतीच्या धंद्यावर श्रीमंत होऊन सावकारी करतात.

खानदेशमधील सुखवस्तु बंजाऱ्यांत गुन्हे करण्याची प्रवृत्ति जरी कमी असली तरी कधीं कधीं इतर जातींच्या गुन्हेगार लोकांबरोबर चोऱ्यामाऱ्या करून तुरुंगांत गेलेले बरेच बंजारी सापडले आहेत. इतर ठिकाणीं मात्र बंजारी हे वाटमारी व घरफोडी करून अगर दरोडे घालून आपला गुजारा करितात. गुरें पळविणें हा गुन्हा या जातीकडून पुष्कळदां व मोठ्या प्रमाणावर होतो. कर्नाटक लंबाणी या जातींत गुन्हेगारी विशेष आहे. पुष्कळसे दारू गाळतात.

बंजार:—शेळ्या, बकऱ्या चोरणें, वेळीं धनगराला दिवसां लुबाडणें, मुलें पळविणें, धान्याच्या कोठ्या लुटणें, जाणाऱ्या येणाऱ्या गाडया लुटणें, अफूचा चोरटा व्यापार करणें असे गुन्हे करण्यांत या जाती पटाईत आहेत.

काठ्या, गोफणी, दगड व कोयते यांचा उपयोग हे लोक गुन्हे करतांना फार करतात. कधीं कधीं चाकू व सुऱ्या वापरतात.

कोळी:—ज्यांची गुन्हेगार जातींत गणना केलेली आहे ती जात म्हणजे महादेव कोळी. हे पश्चिम सह्याद्रीच्या बाजूला व गुजराथेंत सांपडतात. कोळ्यांमध्यें मल्हार अगर पाणभरी कोळी, ढोर कोळी, आग्री कोळी वगैरे पोटभेद आहेत.

यांची वस्ती सह्याद्रि पर्वताच्या वर घाटावर व खालीं कोकणांत बरीच आढळते, व ती मुख्यतः नगर, पुणें, ठाणें, कुलाबा, जव्हार संस्थान व नाशिक या जिल्ह्यांत आहे.

महादेव कोळी ही जात घरेंदारें करून स्थायिक झालेली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांचा मुख्य धंदा शेती व शेतमजुरी हा आहे. कांहींनीं जंगल व पोलीसखात्यांत नोकऱ्या धरल्या आहेत. कांहीं, कोळ्यांच्या वस्तींतून शाळा–मास्तरकी करतात; पण पुष्कळसे मजुरीवर पोट भरतात. खाण्याची पंचाईत पडली तर रानांवनांतील कंदमुळें व फळें यांवर हे ते निर्वाह करतांना आढळतात.

कोळ्यांमध्यें गुन्हे करण्याची प्रवृत्ति फारशी नसली तरी लहान प्रमाणावर चोऱ्या करणारे फार लोक या जातींत आढळतात. मात्र कांहीं निर्ढावलेले लोक दरोडे घालतात, मारामाऱ्या करतात व विशेषप्रसंगीं खून सुद्धां करतात. गुन्हे करण्याच्या प्रवृत्तींत ते भिल्लाप्रमाणेंच आहेत. गुन्हे करतांना अणकुचीदार बांबूचा ते फार उपयोग करितात. कधीं कधीं जुन्या तलवारी व बंदुका वापरतात.

भामटा:—या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या जातींत घांटीचोर, उचले, खिसेकापू, वडारी, टाकारी, पायरवट वगैरे लोकांचा समावेश होतो.

हे मूळचे तेलंगणांतील. हल्लीं सर्व इलाखाभर यांची वस्ती आहे. पुणें, सातारा, नगर व सोलापूर या जिल्ह्यांतून यांची फार वसति आहे. ही जात भटकणारी नसून घरेंदारें करून स्थायिक झालेली आहे. गुन्हे करण्याकरतां म्हणून कदाचित् केलेलें घरदार सोडून दुसऱ्या ठिकाणीं हे जातात. यांचा मुख्य धंदा शेती. पुष्कळांच्या जवळ मोठ्या प्रमाणावर शेती असल्याचें आढळून येतें. कांहीं व्यापार व सावकारी करतांना दिसतात.

हल्लींचा भामटा खिसेकापू म्हणून प्रसिद्ध आहे. आगगाडयांमधून चोऱ्या करण्यांत हे पटाईत आहेत. याकरतां ते आसाम–बंगालपर्यंत गेलेले आढळतात. देवळें, बाजार, यात्रा व आगगाडया यांतून यांचा फार सुळसुळाट आहे. मुंबईला यांची बरीच वसति आहे व तेथें गिरण्यांतून व गोद्यांतून हे आपला धंदा कुशलतेनें करतांना दिसतात. लहान प्रमाणावर उचलेगिरी करून चोऱ्या करणें ही जरी यांची मुख्यतः प्रवृत्ति असली तरी जमावानें दरोडे घालणें व वाटमारी करणें असे भयंकर स्वरूपाचे गुन्हे या लोकांनीं केलेले आहेत व करतांना आढळतात. गुन्हा करतांना उघडकीस येऊं नये म्हणून निरनिराळ्या

तऱ्हेचा वेष हे लोक घेतात. घरें, पेटचा फोडण्याकरतां लोखंडी सळया व चाकू व उलथनें यांचा ते नेहमीं उपयोग करितात.

भिल्ल:—देशांतून वसति करणारे, डोंगरांत व रानांत राहणारे व मिश्र जात असे तीन गट भिल्लांचे होतात. दक्षिणेंत व खानदेशामध्यें या तिन्ही प्रकारच्या भिल्लांच्या वसती आहेत.

डोंगरी भिल्लांत, नहाल, पावरा, वरडा, धानका, धोरप, मावची, वरळी व डांगची असे पोटभेद आहेत. मिश्र जातींत रजपूत व भिल्ल मिश्रित असे, भिलाला व भिल्ल मुसलमान–मिश्रित असे, तडवी व निरधी असे पोटभेद आहेत. गुजराथेंत शुद्ध भिल्ल व रजपूत भिल्ल असा भेद आहे. भिल्लांची मुख्य वसति मध्यहिंदुस्थान, राजपुताना, गुजराथ व खानदेश येथें मुख्यत: फार आहे. दक्षिणेमध्यें नाशिक व नगर या जिल्ह्यांतून यांची बरीच लोकवस्ती आहे.

भिल्ल ही जात पोटापाठीमागें भटकत नाहीं. घरेंदारें करून स्थायिक झालेली आहे. डोंगरी भिल्ल आपला उदरनिर्वाह जंगलांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूच्या व्यापारावर करतात. लाकूड, गवत, मध, डिंक, महूचीं फुलें, लाकूड-कोळसा विकणें व नागली पेरणें हे त्यांचे मुख्य धंदे आहेत. पुष्कळसे शेतमजुरी करतात. खाण्यांत हे लोक महूच्या फुलांचा फार उपयोग करतात. कांहीं पावरे भिल्ल सुतारकी व लोहारकी करतात. इतर ठिकाणचे भिल्ल मुख्यत: शेती करितात व पुष्कळसे रखवालदारी, शेतमजुरी, रेल्वेच्या कामावर मजूरी, सुतारकी, लोहारकी, पोलीस व जंगल खात्यांत नोकरी वगैरे धंद्यांतून आहेत. शिकार करण्यांत हे नाणावलेले आहेत.

साधारणपणें या जातींत गुन्हे करण्याची प्रवृत्ति कमीच आहे. पण दुष्काळांत अगर पोटाला कांहीं मिळालें नाहीं म्हणजे चोऱ्या करण्यासारख्या गुन्ह्यांकडे यांची प्रवृत्ति होते. मग मात्र दरोडे घालणें, खून करणें, जाळ-पोळ करणें, रस्तालूट करणें असे भयंकर गुन्हे ते करतात. जादूटोणा, मत्सर यामुळें सुद्धां खुनासारखीं भयंकर कृत्यें हे लोक करतात. या जातींत दारूचें व्यसन फार असल्यामुळें दारू गाळणें हा कांहीं लोकांचा तर धंदाच आहे. यांच्यापैकीं खोतिल आणि वडवी जातीचे भिल्ल निर्ढावलेले गुन्हेगार म्हणून प्रसिद्ध आहेत. या जातींतून प्रसिद्ध दरोडेखोर निर्माण झाले आहेत व त्यांना

—पकडण्याकरतां सरकारलां फार त्रास पडला. गुन्हे करतांना ही जात धनुष्य-बाणांचा व तरवारींचा उपयोग करते. हे लोक भाले व कुऱ्हाडी तर नेहमींच बाळगून असतात.

कातकरी:— यांच्यांत दोन पोटभेद आहेत. एक ढोर कातकरी, दुसरा मराठा-कातकरी. यांची मुख्य वसति कुलाबा व ठाणें या जिल्ह्यांतून आहे. गुन्हे करण्याच्या उद्देशानें ही जात सुरत, सोलापूर, नाशिकपासून तों-रत्नागिरीपर्यंत भटकतांना आढळून येते.

मराठा कातकरी मात्र कायमची वसति करून राहिलेला आढळतो. त्याचा मुख्य धंदा शेतमजुरी करणें, जळाऊ लाकडें तोडणें व विकणें, कोळसा पाडणें व विकणें, मासे मारणें व शिकार करणें, हा होय. धंदा नसेल त्यावेळीं हे जंगलांत फळें व कंदमुळें यांवर निर्वाह करतात.

शेळ्या, बकऱ्या व कोंबड्या पळविणें, लहान लहान चोऱ्या करणें, जंगलां-तून प्रवास करणाऱ्यांना लुटणें अशांसारखे क्षुल्लक स्वरूपाचे गुन्हे ते करतात. हे जमावानें कधीं चोऱ्या अगर दरोडे घालीत नाहींत. मोठ्या प्रमाणावर लूटमार अगर वाटमार केल्याचें उदाहरण नाहीं. दुसऱ्या जातीचें साहाय्य घेतलेलें आढळून येत नाहीं. गुन्हे करतांना ते कोयते, विळे व पहारा यांचाच उपयोग करतात. कधीं कधीं बाणांचा उपयोग करतात.

कैकाडी:—या जातींत पुष्कळ पोटभेद आहेत. ही जात साऱ्या महाराष्ट्र-भर पसरलेली आहे. घोडीं, गाढवें, कुत्रीं, तंबू वगैरे लवाजम्यासह ही जात टोळीटोळीनें साऱ्या इलाखाभर भटकतांना दिसते. कांहीं वसति करून स्थायिक झाले आहेत व ते शेती करून, वाजंत्र्याचा धंदा करून, टोपल्या व केरसुण्या करून, त्याचा व्यापार करून व इतर धंदे करून आपलें पोट प्रामाणिकपणानें भरतांना दिसतात.

दरोडे घालणें हा पिढीजात धंदा आहे असें ही जात समजते. स्वभावतः धाडशी असल्यामुळें, लूटमार करणें, वाटमारी करणें व दरोडे घालणें अशां-सारखे भयंकर गुन्हे करावयास ही जात मागेपुढें पहात नाहीं. गुन्हे करतांना या जातींतील स्त्रिया गांवांत दिवसां टोपली व केरसुण्या विकण्याच्या निमित्तानें हिंडतात व गांवांतील बातमी पुरुषांना कळवितात. धान्य, कडबा, बकरी, शेळ्या वगैरे लांबविण्यांत यांना कांहींच वाटत नाहीं. यांच्यांतील

दा. क्र. ४५९

स्त्रियांनीं दिवसांसुद्धां कुलपें फोडून चोऱ्या केल्याचीं अनेक उदाहरणें आढळून आलीं आहेत.

कांठ्या, गोंफणी, कुऱ्हाडी, चाकू, पहारी व कधीं कधीं तलवारी व बंदुका यांचाही ते चोऱ्या करतांना उपयोग करतात. त्यांचीं मुख्य हत्यारें म्हणजे कुऱ्हाड व गोफण हीं होत.

मांग गारुडी—मांग म्हणून अगर गारुडी म्हणून जी जात ओळखली जाते त्या जातीशीं या जातीचा कसलाही संबंध नाहीं. मांगाला यांच्या हातचें जेवण चालत नाहीं, इतकेंच नव्हे तर मांग यांच्यासह चिलीमसुद्धां ओढणार नाहीं.

ही जात दारिद्र्यानें पीडलेली असून पोटाकरतां साऱ्या मुंबई इलाखाभर भटकतांना दिसते. यांच्या टोळ्या ठराविक रस्त्यांनीं व ठराविक प्रांतांतच नेहमीं फिरतात. तळ पडला असेल त्याच्या आजूबाजूच्या भागांत या जातींतील लोक चोऱ्या करतात. चोरी करण्याकरतां रात्रींतून वीस मैल अगर चाळीस मैल मजल मारल्याचीं उदाहरणें फार थोडीं आहेत.

वांझ म्हशीवर आपलें खाटलेंबाजलें घालून कुत्रीं, घोडीं व गुरें घेऊन पोलीस चौक्या चुकवीत ही जात एका गांवाहून दुसऱ्या गांवांस जाते व बाजारापासून जवळ पण गांवापासून लांव अशा ठिकाणीं तळ देऊन राहते. यांच्यांतीलच एकादा त्या टोळीचा म्होरक्या असतो. हे लोक दारू पितात व घोड्या-गाढवाच्या मांसाशिवाय वाटेल त्या जनावराचें मांस यांना चालतें. शेती करून अगर घरदार करून राहिलेला एकादा मांग—गारुडी कधीं कधीं आढळतो. यांची भाषा मराठी आहे पण ती ते अशुद्ध बोलतात.

कष्टाचीं कामें करण्याचा यांना अतिशय कंटाळा. गांवांतून भीक मागणें, खेळ करणें, म्हशी व घोडी यांचा व्यापार करणें हा या जातीचा मुख्य धंदा. गवळ्यांकडून वांझ म्हशी घेऊन त्या दुभत्या झाल्या म्हणजे पुन्हां विकणें हाहि एक त्यांचा धंदा आहे. वायका गवत व लाकडें विकतात व गांवांतून नेहमीं भीक मागतात.

या जातींतील पुरुष, स्त्रिया व मुलें हीं सर्व चोरी करण्यांत पक्कीं निढावलेलीं असतात. आपलीं गुरें दुसऱ्याच्या शेतांत चरायला सोडतात, धान्य व कडबा चोरतात, गुरें पळवितात, गाई, म्हशी, रेडे, बैल या जनावरांना हे विष घालून

ठार मारतात. कधीं कधीं शेळ्या, वकरी, कोंबडी यांवर हे डल्ला मारतात. यांच्या बायका दिवसा भीक मागण्याकरतां गांवांत जातात व जोडे व वाळत घातलेले वगैरे जिन्नस चोरून आणतात. बाजाराच्या दिवशीं खिशांत हात घालून पैसा अडका लांववतात. क्वचित् ही जात वाटमार अगर दरोडे घालते.

चोऱ्या करण्याकरतां त्यांचीं हत्यारें म्हणजे कुऱ्हाडी, काठ्या व भिंतीला भोंक पाडण्याकरितां सळई हीं मुख्य होत.

पारधी:—ही जात साऱ्या इलाखाभर पसरली आहे, पण खानदेशांत यांची वसति वरीच आहे. त्यांच्यांतील टाकणखार याशिवाय वाकीचे सारे पारधी पोटामागें भटकतांना दिसतात. हे बहुधा रानांतून झोपड्या वांधून राहतात. जेथें शिकार सांपडेल त्या ठिकाणीं यांची वसति असते. जे खेड्यां-पाड्यांतून स्थायिक झाले आहेत त्यांचा धंदा मुख्यतः शेती व शेतकामाची मजुरी हाच होय. कांहीं रखवालदारीचीं कामें करतांना आढळतात. वाकीचे मात्र भिक्षा मागणें, वनस्पति औषधें आणणें व विकणें, सागरगोटे विकणें, शिकार करणें वगैरे धंदे करतात. जाळ्या लाऊन चित्ते, वाघ पकडणें अगर हरणें, ससे धरणें व त्यांची शिकार करणें यांत हे पूर्ण वाकबगार आहेत. यांच्यांत मोठ्या प्रमाणावर गुन्हे करणारे टाकणखार हे फार थोडे आहेत. दरोडा घालणें व घरफोडी करणें व इतर भयंकर स्वरूपाचे गुन्हे हेच करतात. वाकीचे पारधी लहान लहान चोऱ्या करण्यापलीकडे मोठा गुन्हा करण्याचें धाडस करीत नाहींत. खायला मिळालें नाहीं तरच धान्य चोरणें व शेळ्या पळवणें अशा सारख्या लहान प्रमाणावर चोऱ्या करून हे आपलें पोट जाळतात. कांहीं निर्ढावलेले पारधी मात्र जमावानें मोठ्या प्रमाणावर दरोडे घालतात. दरोड्यांत प्राणहानी अगर खून झाला तरी त्यांना त्याची पर्वा नसते. वरोवर ते नेहमीं कुऱ्हाडी, गोफणी व दगड नेतात.

रामोशी:— रामोश्यांत दोन पोटभेद आहेत. एक पुरंधर रामोशी व दुसरा होळगा रामोशी. होळगा रामोशी व पुरंदर रामोशी यांच्यांत रोटी-व्यवहार चालत नाहीं. खाणें पिणें, राहण्याची पद्धत, चालीरीती वगैरेंमध्यें यांच्यांत मुळींच फरक नाहीं. यांची वस्ती मुख्यतः सातारा व पुणें या जिल्ह्यांतून आहे. कांहीं इतर ठिकाणीं व विशेषतः मुंबईला गोद्यांतून व गिरण्यांतून काम करण्याकरतां गेले आहेत. कांहीं हमाली करतात.

भामटा अगर इतर गुन्हेगारजातीप्रमाणें रामोशाची जात भटकणारी नसून खेडचांतून कायम वस्ती करून राहणारी आहे. चोऱ्यामाऱ्या अगर दरोडे घालण्याकरितां म्हणून सुद्धां रामोशी आपल्या गांवापासून फारसा लांब जात नाहीं. गांवच्या आजूबाजूस ५० मैलांच्या टप्प्यापर्यंतच तो मजल मारतो व परत गांवीं येतो. दरोडे घालण्याची प्रवृत्ति यांच्यांत फार. जमाव करून दरोडे घालण्याबद्दल यांची प्रसिद्धि आहे. त्याच्या जातींतील उमाजी नाईक वगैरे प्रसिद्ध दरोडेखोरांचीं नांवें अजून पुष्कळांच्या स्मरणांत असतील. १८७९ मध्यें सातारा व पुणें जिल्ह्यांतील रामोशांनी उठाव करून रयतेला फार त्रास दिला.जात्या धाडशी स्वभावाचा असल्यामुळें घरफोडी, मोठ्या चोऱ्या व दरोडे घालण्यांत रामोशी हा पटाईत आहे. गुन्हे करण्याच्या बाबतींत हा मांगाशिवाय दुसऱ्या कोणत्याही जातीचें साहाय्य घेत नाहीं.

खेडेगांवांतून एरवीं रखवालदारीचीं कामें करणें, शेतीवर मजुरी करणें, कधींकधीं शेती करणें, घरगुती कामें करणें, हमाली करणें, बैलगाडचा ठेवून भाडें करणें वगैरे धंदे करून आपली उपजीविका करतो. बरेच पोलीसच्या नोकरींतही गेले आहेत. यांच्या बायका मोलमजुरी करतात.

गुन्हे करतांना हे कधींकधीं तलवारींचा व बंदुकींचा उपयोग करतात. नेहमींचीं हत्यारें म्हणजे, कुऱ्हाडी, काठ्या, गोफणी, लोखंडी सळया आणि फुसके बाँब हींच होत.

वडार:—वडार हे मूळचे तेलगू वंशाचे आहेत. मातीवडार, भांडीवडार अगर गाडीवडार, पाथरवट अगर दगडी वडार असे यांच्यांत पोटभेद आहेत. ठकवडार व डोंग (चोर) वडार म्हणून घांटीवडारांत एक पोटजात आहे.

कोकण, कर्नाटक व महाराष्ट्र या भागांतून ही सर्वत्र आढळते. उद्योग-धंद्याच्या पाठीमागें हे लोक हिंडत असतात. गाडीवडार व मातीवडार मात्र स्थायिक झालेले आढळतात. शेती करणें, विहीरी खणणें, मातकाम करणें, गाडयांतून दगड वाहणें, रस्त्यावर कामें करणें, पाथरवटी, जातीं घडविणें वगैरे त्यांचे मुख्य धंदे होत. पुष्कळ डुकरांची शिकार करतात व त्याकरतां गांवांतून यांना हें काम मिळतें. घरफोडी, धान्य लुटणें, लहान व मोठ्या चोऱ्या करणें, दरोडे घालणें असे गुन्हे करणारे या जातींत फार आहेत.

पठाण:—वायव्य सरहद्दीच्या पलीकडील मुलखांतून येणाऱ्या लोकांना

साधारणपणें पठाण म्हणण्याची चाल आहे. पण तो वझीरी, आफ्रिडी, अगर स्वाति या टोळ्यांपैकीं कोणाच्या तरी टोळींतील असतो. त्याला इकडे कधींकधीं रोहिला, काबुली, पेशावरी, अफगाण अगर पश्तुनि असें संबोधतांना आढळतें. मुंबई इलाख्यांत सांपडणारे पठाण लोक बहुतेक स्वान, बुरेन, तिराह, कंदाहार व पेशावर या मुलखांतून आलेले आढळतात. मुंबई, कुर्ला, पुणें, हुबळी, बेळगांव, सुरत, खानदेश, अहमदाबाद येथें यांचीं मुख्य ठाणीं आहेत. साधारणपणें यांची एकंदर लोकसंख्या २००० वर आहे. पठाण बहुधा धंद्यानिमित्त कायमची वस्ती करून राहिलेला आढळतो. लहान प्रमाणावर दुकानदारी करणें व सावकारी करणें हा यांचा मुख्य धंदा. चौकीपहाऱ्यावर नोकरी करणें, सावकारांचे व व्यापाऱ्यांचे पैसे गोळा करणें या धंद्यांतून हे लोक फार आढळतात. रेल्वे कंपन्यांच्या व मोठमोठ्या कंत्राटी कामांत मजुरावर देखरेख करणें, कधीं स्वतः मजुरी करणें, लाकूड, फळफळावळ, चहाचीं दुकानें, धान्य, चाकू काऱ्या विकणें वगैरे धंदे करतांना हे लोक आढळतात. गुन्हे करण्याची प्रवृत्ति या जातींत मूळचीच आहे. धाकदपटशा दाखवून पैसे उकळणें, मारामारी करून माल उपटणें, दरोडे घालणें, देवळें लुटणें, रस्तालूट करणें व लोकांना शक्तीच्या जोरावर छळून त्यांची चीजवस्त लुबाडणें असे अनेक गुन्हे हे लोक करतात. गुन्हे करतांना सुऱ्या व खंजीर या शस्त्रांचा ते नेहमीं उपयोग करतात. सावकारी धंद्यांत कुळांकडून पैसे वसूल करतांना मारामारी करणें, प्रसंगीं खून करणें अशांसारखे भयंकर गुन्हे करण्यास हे मागेंपुढें पहात नाहींत.

	जातीचें नांव	खालसा प्रांत		संस्थानें		प्रांत
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	
१	अदवी किंचेर अथवा पारधी	५०३०	४५६९	७४	६४	खानदेश, नाशिक, सोलापूर, विजापूर, कच्छ,
२	वरडा	२	१	..	..	खानदेश.
३	बावचा	४१८	३६७	..	..	अहमदाबाद.
४	भिल्ल	२५४९४५	२४२३८०	१४२५२९	१३७१२१	गुजराथ, खानदेश.
५	चोध्रा	२१५६६	२०९९०	८२०	१८२६	सुरतएजन्सी, अहमदाबाद,भडोच
६	धाणका	१४३८	८९१	१८९२५	१३३६८	भिल्लांची पोटजात.
७	धोदिया	४६१२३	४६६८३	२१३९४	२५१०९	सुरत, ठाणें व सुरत एजन्सी सं.
८	दुबळा	४११३६	३९३३०	१६३८	१४२३	भडोच, सुरत एजन्सी, ठाणें.
९	गामिन किंवा गमता	४८१४	४६४९	१३०३	११६७	सुरत, राजपिंपळा.
१०	गोंड	२८९	२७३	..	..	सुरत, नाशिक.
११	कातकरी किंवा काठोडी	३९१६०	३७२६१	५६९१	५६७२	गुजराथ, ठाणें, कुलाबा.
१२	कोकणा	८६००	७७३५	२५६६६	२३७९१	सुरत, ठाणें, खानदेश, जव्हार, बांसदा, धरमपूर.

	जातीचें नांव	खालसा प्रांत		संस्थानें		प्रांत
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	
१३	कोळी महादेव	७६२७७	६१९४१	१२१४	१०७१	पुणें, नाशिक, जव्हार.
१४	मावची (भल्लांची पोटजात)	१५७२०	१५३२६	७४३	६२६	खानदेश.
१५	नायक किंवा नाईकदास	२८५९८	२८६४९	२२३७८	२२३२९	सुरत, पंचमहाल, रेवाकांठा.
१६	फांसे पारधी	३५३	३२०			खानदेश, अहमदनगर.
१७	पटेलिया	४४	३३		४६०	पंचमहाल, लुनावाडा.
१८	पोमला	३९	१२६			अहमदाबाद, भडोच, सुरत.
१९	राठावा	२	५			खानदेश.
२०	ठाकूर	५६१९२	४९६६४	५५२९	५२०६	ठाणें, कुलाबा, नाशिक.
२१	ताडवी भिल्ल	६२	७			खानदेश.
२२	वाळवी	१३९४	२६१६			पंचमहाल, अहमदनगर.
२३	वरळी	६९६४२	६८०४९	३५५७६	३३२८४	सुरत एजन्सी, ठाणें, जव्हार, नाशिक, खानदेश.
२४	वसवा	३००२	२७८५	६	१	सुरत, खानदेश.

	जातीचें नांव	खालसा प्रांत		संस्थानें		प्रांत
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	
१	अलीकार	१७	२१			पूर्वखानदेश.
२	बहिरुपी	२९	६६	१०	५	अहमदनगर,रत्नागिरी,सावंतवाडी
३	बाजनिया	६३४	५९५	१७०	२२७	खेडा, पंचमहाल, महीकांठा, रेवाकांठा.
४	बाळसंतोषी	१७	१९			सातारा.
५	बंदी	३७८१	४१३९			कारवार.
६	बत्तल	४३	२४			कारवार.
७	बावा–वैरागी	२१०३८	१८३८२	३४१०	३०६०	गुजराथ, मराठी जिल्हे, इलाख्यांतील वहुतेक सर्व भागांत.
८	वाजीगार					
९	वेलदार	५६०५	५५१९	१८०	१८०	सर्व मराठी जिल्हे व भोर,फलटण औंध,अवकलकोट,सावंतवाडी इ.
१०	वेरड अथवा बेदर,तलवार, वाल्मिकी, नाईक–मवकळू	८८५७७	८७९५६	१४९०३	१५४४७	मध्यभाग, दक्षिणभाग व दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें.
११	भामटा	१२७६	१२८३	५२	२३	अहमदनगर, सोलापूर, बेळगांव, विजापूर, अक्कलकोट,फलटण.

	जातीचें नांव	खालसा प्रांत		संस्थानें		प्रांत
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	
१२	भांड			८९	६०	काठेवाड.
१३	भराडी	२१२५	२१४१	५	१	सुरत, नगर,खानदेश,नाशिक,पुणें
१४	भवया	२९७	२४४	२१४	११९	गुजराथ.
१५	भावीण	२	४	९७३	१४७७	सावंतवाडी.
१६	भिस्ती	१७	१७			मुंबई, खेडा, खानदेश.
१७	भुते	७४	४२	१	३	खानदेश, सातारा.
१८	बुरूड	५५९५	५७१४	३३२	३९६	मराठी जिल्हे,बेळगांव, धारवाड, विजापूर, कारवार.
१९	चमथा			७०	१२०	काठेवाड.
२०	चंदलगार					मोचींची पोटजात.
२१	छप्परबंद	६९४	७२७			विजापूर, धारवाड.
२२	चारण	३०२४	२५०६	१४८१	१२९१	सिंध, गुजराथ, नाशिक.
२३	चित्रकाठी	२७५	२६७			अहमदनगर.
२४	दास	२४				मुंबईशहर.
२५	देपला			३२४	२७९	कच्छ, काठेवाड, वढवाण.
२६	गांध्रप	५७	४२			दक्षिण गुजराथ.
२७	गारुडी	११३९	१२१९	१२७७	१३१७	गुजराथ, नगर, नाशिक.
२८	घिसाडी	१२१९	१५३८	९१	१०४	मध्यभाग.

२९	गोल्ला	४१५५	४०१९	३०	२०	ठाणें, बेळगांव, धारवाड, कारवार, विजापूर.
३०	गोंधळी	२६४५	२४३४	३७०	३७८	ठाणें, मध्यभागांतील जिल्हे.
३१	गोपाळ	२७२४	२६२२		२	नगर, खानदेश, नाशिक, पुणें, रत्नागिरी.
३२	हेळव	५५७	५३१			बेळगांव, विजापूर, धारवाड, कारवार.
३३	जग्यासी					सिंध.
३४	जाजक					सिंध
३५	जतिया					
३६	जोगी	७६५	६६८	१३	११	गुजराथ, खानदेश.
३७	जोगीन	९	१४			पुणें, सातारा.
३८	जोशी	३६४८	३८०६	२४८	२१८	महाराष्ट्र.
३९	जोहारी अथवा जव्हेरी	८५	११४	८	६	खानदेश, नाशिक.
४०	काहार	११७४	७७७			मुंबई, नगर, नाशिक.
४१	कैकाडी	४६६३	५०३८	३६५	३९३	महाराष्ट्रांतील जिल्हे.
४२	कंजारी	६५	१२९			खानदेश
४३	कापडी			४७८	४३१	कच्छ, पालनपूर.
४४	कत्ताई					परदेशी मोची अगर चांभार
४५	खवा	१४०	८३	४९७	४६९	गुजराथ.
४६	खाटी					सिंध
४७	किलिकेट किंवा कटबू					यांची स्वतंत्र मोजदाद नाहीं.

	जातीचें नांव	खालसा प्रांत		संस्थानें		प्रांत
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	
४८	कोल्हाटी,डोंबारी,खेळकरी	१४५१	२१६१	३१	३०	महाराष्ट्र, कर्नाटक.
४९	कोळी मल्हार	२७८४०	२२१२९	८८२	८६९	महाराष्ट्र–ठाणें.
५०	कोरवा किंवा कोरचार	९६७२	९६९२			विजापूर, बेळगांव, धारवाड.
५१	कोरी	५८६	३६९			सिंध
५२	कुछरिया	३४५	१७४			सिंध
५३	लमाणी	२२७८१	२१५५६	२१७२	२१३६	मुंबई इलाख्यांतील सर्व भागांत.
५४	मैराळ	१२	१७			पुणें.
५५	मानभाव	१०७७	११२१		४	महाराष्ट्र.
५६	मंगेला	४९८३	४७२६			ठाणें.
५७	मे			३३	३३	कच्छ
५८	मियान (मुसलमान)					
५९	मोचीगुजराथखेरीज सर्वत्र अस्पृश्य	२४२२	२७२२	२३६	२०७	गुजराथ.
६०	मोदीकार					गारुड्याचें एक नांव.
६१	नट	२७९	३०५			गुजराथ
६२	ओड					वडारांत गणती.
६३	पधारिया					अहमदाबाद, काठेवाड.
६४	पदियार	१४५	१५७			कारवार
६५	पडती	१८०४	१७०६			कारवार, गोवा.

६६	पांगुळ	४२	५७			अहमदनगर,खानदेश,नाशिक.
६७	पत्रदावरू					धारवाड
६८	पाथरवट	१२७६	१२६४	३०	३४	महाराष्ट्र–कर्नाटक.
६९	फुलडगी	४९०	५४५			ठाणें.
७०	राचेवार	५३५	४२४			अहमदनगर, खानदेश, धारवाड.
७१	राइकारी	४७	३१			भिवंडी.
७२	रामोशी	२६५८८	१५१९१	३५७३	३३५०	पुणें, सातारा, अहमदनगर.
७३	रावळिया	१८५१	२२२३	५४००	४७९९	गुजराथ.
७४	सहदेव जोशी	३	२७४	१६६	१६५	पुणें, अहमदनगर.
७५	सलाट	३८१	२७४	१६६	१६५	गुजराथ.
७६	सणगर	१९७७	१६६६	९०२	९०३	सातारा, सोलापूर, नगर, पुणें, कोल्हापूर.
७७	संजोगी	१०९	९५			कारवार
७८	सुप्पलीग	३८६	४१०			कारवार.
७९	सरणिया			२१		काठेवाड
८०	सरोदी	२२	१४			कुलाबा
८१	सरवदे	४७७	५१२			रत्नागिरी.
८२	शिकारी					पारध्यांत गणती.
८३	शिकलिगार	७३५	८५७	३९	२३	धारवाड
८४	सुलेर					धारवाड
८५	सुठरिया					सिंध
८६	टकारी	२२२	२६०			नगर, नाशिक, सातारा.

	जातीचें नांव	खालसा प्रांत		संस्थानें		प्रांत
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	
८७	ठाकर	१३२१३	१२७३७	९३७	७३०	सिंध, महाराष्ट्र, सावंत,खैरपूर.
८८	तिरगार	७५२	६६५			गुजराथ.
८९	तिरमाली	७५८	७४९			सोलापूर, नगर, खानदेश, पुणें, नाशिक.
९०	वडार अगर ओड	४९१६६	४५९५०	७४४१	६९६१	मुंबईइलाख्यांतील जिल्हे,संस्थानें
९१	वाडी			३९६	३३८	काठेवाड
९२	वाघरी	२८५८५	२६०४४	४२०३	३३८९	सिंध, गुजराथ.
९३	वैद्‌	७१०	६२२			नगर, खानदेश, नाशिक, पुणें, मुंबईशहर.
९४	वैती	१५१६	१४५०			ठाणें.
९५	वल्हार	२२२	३६			पूर्वखानदेश.
९६	वंजारी	७०७०९	६८९४४	१८३४	१५६१	गुजराथ, महाराष्ट्र.
९७	वासुदेव	४९	१२			नगर, नाशिक, सातारा.
९८	वीर	५९	६०			पुणें.

सन १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें मुंबई इलाख्यांतील डिप्रेस्ड क्लासेस, रानटी जाती (Primitive) व इतर मागसलेले वर्ग (Other Backward) यांची लोकसंख्या पुढें दिली आहे.

	एकूण लोकसंख्या	खालसाप्रांत		संस्थानें	
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
डिप्रेस्ड् जाती	२०९८९९८	८८६१३१	८६४२९३	१७३१०३	१७५४७१
रानटी जाती	१९०३९९३३	७०६६२७	६७४३८०	२८४९७०	२७३९५६
इतर मागसलेले वर्ग	९५७८२६	४३७६७८	४१७१९९	५२६४१	५०३०८
		२०३०४३६	१९५५८७२	४१०७१४	४९९७३५
	एकूण	३९८६३०८		१०१०४४९	
	एकूण मुंबई इलाखा	४९९६७५७			

(सेन्सस ऑफ इंडिया १९३१, व्हॉल्युम १; इंडिया; पार्ट २;
इंपीरियल टेबल्स; टेबल १७ च्या आधारें)

अनु	जातीचें नांव	एकूण लोक सं.	स्थलनिर्देशासह लोकसंख्या	
			स्थलनिर्देश	लोकसंख्या
१	भिल; (बरेला, भिल, भिलाला इ.)	२४५४१४४	मुंबई	८५२२५३
			मध्य हिंदुस्थान	६५३२६३
			ग्वाल्हेर	१२५०२६
			राजपुताना	६५५६४७
			अजमीर मारवाड	८३१३
			वऱ्हाड व मध्यप्रांत	४६२३१
			संयुक्त प्रांत	२८
			बडोदा	८३९७२
			हैद्राबाद	१५०५२
			पश्चिम हिंदुस्थानां-तील संस्थानें इ.	१४३५९
२	कोळी, (बरिया भालिया इत्यादि) (आर्यन पद्धतीची व विशेषतः हिंदु भाषा बोलणारे(	३४१८६४३	अजमीर मारवाड	१०५९१
			बहार ओरिसा	५००१
			मुंबई	१९८८२६५
			वऱ्हाड व मध्यप्रांत	४३१३०
			पंजाब	१८२२३५
			बडोदा	४५९१०६
			ग्वाल्हेर	७८६२१
			हैद्राबाद	५२४७२
			रजपुताना	९१४०५
			प. हिंदु. संस्थानें	४८१४७५
			दिल्ली	६९३४

अनु	जातीचें नांव	एकूण लोक सं.	स्थलनिर्देशासह लोकसंख्या	
			स्थलनिर्देश	लोकसंख्या
३	कोल (मुन्दा भाषा बोलणारे आणि हिंदी व ओरियापैकीं पोटभाषा बोलणारे लोक)	७२८३७४३	मध्य हिंदुस्थान	१९४०८
			बंगाल	७६३
			बहार ओरिसा	७५१८२
			संयुक्त प्रांत	६९१४१
			मध्य हिंदुस्थान इ.	६३७३
४	ओरेअनगट (भाषा द्रविडिअन असून मुंदा पद्धतीची आहे. पोटजाती हिंदी भाषा बोलतात) बायर बनामू, धनगर इ.	१९४३९२९	बंगाल	३६६०८
			बहार, ओरिसा	११४४०७
५	गोंड (भाषा द्राविडी पोटजाति हिंदी किंवा ओरिआ भाषा बोलतात).	५०७२४०६		
	धनगर, गोंड इत्यादि	४७१९२२२	अंदमान व निकोबार	९०
			बंगाल	१५६९
			बहार, ओरिसा	५७१४६१
			मुंबई	५६२
			मध्यप्रांत व वऱ्हाड	२९२८५१३
			मद्रास	६३६१९१
			संयुक्तप्रांत	१२१५७९
			मध्य हिंदुस्थान	३१०७७३
			ग्वाल्हेर	११६३

अनु	जातीचें नांव	एकूण लोक सं.	स्थलनिर्देशासह लोकसंख्या	
			स्थलनिर्देश	लोकसंख्या
			हैद्राबाद	१४६९१८
			रजपुताना	४०३
६	बोडो	६९५६४८		
	गारो, हजांग इ.	६९५६४८	आसाम	६२१७३५
			बंगाल	७३९१३
७	वाडगा	४३०७५	मद्रास	४३०७५
८	करेन	१३६७६७३	ब्र. देश	१३६७६७३
९	नाग	२७२५२९	आसाम	२६८३०३
			ब्र. देश	४२२४
			ग्वाल्हेर	२
१०	चरणीचा धंदा करणाऱ्या जाती	२०१२९११०		
	यादव, अहर अहिर इ.	१४१७००३२	अजमीर मारवाड	२५०९
			अंदमान, निकोबार	४१६
			आसाम	५६३९८
			बंगाल	५९९२८३
			बहार, ओरिसा	४३४५८४३
			मुंबई	६६३९७
			मध्यप्रांत व वऱ्हाड	१००३०९५
			कुर्ग	१४५४१
			दिल्ली	१३०५१
			मद्रास	१७१११९९
			पंजाब	२२१९३३
			संयुक्तप्रांत	४३२३९५८
			बडोदा	६५३७

अनु	जातीचें नांव	एकूण लोक सं.	जातीनिर्देशासह लोकसंख्या	
			जातिनिर्देश	लोकसंख्या
			मध्य हिंदुस्थान	२४८२८०
			ग्वाल्हेर	१३१०२५
			हैद्राबाद	९२८४०४
			कोचीन	४०६५
			त्रावणकोर	८४५७
			म्हैसूर	१७४२०१
			राजपुताना	१८२६८२
			प. हिं. संस्थानें.	१२७७५८
	गोपाळ,गड्डी, घोशी	१३९४७२	मुंवई	८२२४
			मद्रास	५९३
			पंजाब	३८५३
			संयुक्तप्रांत	८३७५९
			मध्य हिंदुस्थान	१५७७७
			ग्वाल्हेर	८६१६
			जम्मू आणि काश्मीर	११४१७
			राजपुताना	७२३३
११	लोंकर, कातडें इ. धंदा करणारे	१६४५५४८७	अजमीर मारवाड	१४१८
			आसाम	७३१२
१)	मोची,जिनगर इ.	१०२६४०५	बलुचिस्थान	३८८
			बंगाल	४१४२२१
			बिहार–ओरिसा	२२८६३
			मुंबई	५५८७
			वऱ्हाड व मध्यप्रांत	६८५८
			कुर्ग	२०
			मद्रास	१८४२

अनु	जातीचें नांव	एकूण लोक सं.	स्थलनिर्देशासह लोकसंख्या	
			स्थलनिर्देश	लोकसंख्या
			वायव्य सर. प्रांत	२६७५९
			पंजाव	४७२६१६
			संयुक्तप्रांत	९८६६
			वडोदा	११५६९
			मध्य हिंदुस्थान	३७१८
			ग्वाल्हेर	३५१७
			जम्मू व काश्मीर	११०५२
			राजपुताना	१४११८
			सिखीम	१९
			प. हिं. संस्थानें	१२६७२
२)	चांभार, खालपा इ.	१२१९५५१६	अजमीर मारवाड	१५९१५
			अंदमान व निकोबार	२०४
			बलुचिस्थान	२२
			बंगाल	१५०४५८
			बिहार–ओरिसा	१२९६००१
			मुंबई	३०३२९६
			वऱ्हाड व मध्यप्रांत	९६७२६५
			कुर्ग	५
			दिल्ली	४५८०६
			मद्रास	२१५८
			वायव्व सर. प्रांत	२९१८
			पंजाब	११०२४६५
			संयुक्तप्रांत	६३१२१९३
			बडोदा	४२८८४
			मध्य हिंदुस्थान	५२०४५७

अनु	जातीचें नांव	एकूण लोक सं.	स्थलनिर्देशासह लोकसंख्या	
			स्थलनिर्देश	लोकसंख्या
			ग्वाल्हेर	४१५९५०
			जम्मू व काश्मीर	४१२२०
			राजपुताना	९३०१२८
			प. हिंदुस्थान–संस्थानें	४६१७१
३)	चाकलियन, ढोर	६७१९२६	मुंबई	३४२००
			मध्यप्रांत व वऱ्हाड	६७३२
			मद्रास	६१३३९२
			कोचीन	८३९
			त्रावणकोर	६३२८
			प. हिं. संस्थानें	४६१७१
४)	मांग,मेघ,मेघवाल, माडगी, मादिगा	२५५६७६५	अजमीर मारवाड	१०
			मुंबई	३८४०५९
			वऱ्हाड व मध्यप्रांत	१११४१६
			कुर्ग	२१७
			मद्रास	६१६७१७
			पंजाब	२३२०७
			बडोदा	३७
			मध्यहिंदुस्थान	२६२५
			जम्मू आणि काश्मीर	७०१९३
			हैद्राबाद	१२८१०९२
			राजपुताना	२३२७३
			प. हिं. संस्थानें	४३९०९
१२	गायक,कोल्हाटी, गारुडी,कुडमुडे जोशी व वैदू.	४३१३१२		

अनु	जातीचें नांव	एकूण लोक सं.	स्थलनिर्देशासह लोकसंख्या	
			स्थलनिर्देश	लोकसंख्या
१)	कोल्हाटी, गारुडी	९४५३	मुंबई	८६२५
			प. हिं. संस्थानें	८२८
२)	त्रिराशी	२८३६३७	अजमीर मारवाड	६६४
			वायव्य सर. प्रांत	१०८९२
			पंजाब	२४४७२६
			मध्य हिंदुस्थान	११३६
			ग्वाल्हेर	११७०
			जम्मू आणि काश्मीर	७९९८
			राजपुताना	१७०५१

अस्पृश्यतेची उपपत्ति

अस्पृश्य म्हणजे कोण, त्यांची संख्या हिंदुस्थानभर कशी पसरली आहे, महाराष्ट्रांतील प्रमुख अस्पृश्य जातींचे आचारविचार काय आहेत, अस्पृश्य पुढाऱ्यांचीं मनोगतें कशा प्रकारचीं आहेत, तसेंच ज्यांना वन्य जाति, मागासलेल्या जाति, गुन्हेगार जाति अशा प्रकारचीं नांवें दिलीं जातात, ते लोक कोण व त्यांच्या वसाहती कोठकोठें आहेत इत्यादि विवेचन व माहिती मागील प्रकरणापर्यंत आली आहे. अस्पृश्यता–निवारणाचा प्रश्न हा अखिल भारतीय महत्त्वाचा आहे हें त्या प्रकरणावरून ध्यानांत आलेंच असेल. तो अखिल भारतीय असावा हें ओघानेंच येतें. कारण अस्पृश्यता हीच अखिल भारतीय आहे. या प्रश्नाच्या सोडवणुकीला आतां हिंदु लोक मनोभावें प्रवृत्त होतील अशीं सुचिन्हें स्पष्ट दिसत आहेत. पण एकाद्या प्रश्नाचा खल चालू झाला म्हणजे त्याचीं अंगें, उपांगें यांचें विवेचन करतांना तो मुळांतच कां उत्पन्न झाला येथपर्यंत विवेचकाचें मन जाऊन पोहोंचतें. यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं. विचारच करावयाचा असें एकदां ठरलें म्हणजे तो सांगोपांग व्हावयास हवा व त्याची कोणतीही बाजू आपल्या विचारकक्षेंतून सुटूं नये असें अभ्यासक सुधारकास सहजच वाटतें. तसेंच जे विरोधी मताचे आहेत तेहि नवमतवाद्याचें बोलणें केवळ गप्प बसून ऐकून घेतील हेंहि शक्य नसतें. अमुक एक गोष्ट अशी कां हें उकलून सांगण्याचें सामर्थ्य त्यांना स्वत:ला नसेल पण यावद्दलची जिज्ञासा असणें व तीस अनुसरून त्यांनीं प्रतिपादकास परत प्रश्न करणें हें क्रमानेंच येतें. मोडकळीस आलेल्या संस्थांची पूर्वींचीं प्रयोजनें काय होतीं हें माहीत करून घ्यावें असें ज्याप्रमाणें कोणासही वाटतें त्याप्रमाणें मोडावयास काढलेल्या परंपरा आणि पीठिका या स्थापित होण्याला काय कारणें झालीं होतीं हेंहि कळावयास हवें असें त्यांच्या संरक्षकांस स्वाभाविकच वाटतें. चालू काळांत त्या परंपरांची किंवा पीठिकांची उपयुक्तता कांहीं नाहीं इतकेंच नव्हे तर त्या सद्य:कालीन समाजव्यवस्थेला व समाजाच्या भावी वाढीला अपायकारक आहेत असें जरी सुधारकांनीं सिद्ध केलें व सुबुद्ध अशा विरोधकांनीं मान्य केलें तरी मुळांत त्या उत्पन्नच कां झाल्या हें कळवून घेण्याची मनाची वखवख कायमच राहते. या चौकशीपासून कांहीं एक

फायदा नाहीं असें म्हणणें सुधारकाला सोईचें असेल, पण विरोधकाला जर त्याला पुरतें जिंकावयाचें असेल व आपल्या विचारांत सचोटी ठेवावयाची असेल तर त्यानें विरोधकाची ही जिज्ञासा डावलतां उपयोगाची नाहीं. पुष्कळदां असें होतें कीं मूळ कारणांची मीमांसा हीच इष्ट सुधारणेला उपकारक बनते; कारण ज्या कारणास्तव अमुक एक गोष्ट अस्तित्वांत आली किंवा ज्यासाठीं ती अस्तित्वांत ठेवणें अवश्यच आहे असें तेव्हांच्या परिस्थितीस अनुसरून वाटलें असेल तीं कारणें, जर नवीन परिस्थितींत विद्यमान नसलीं, किंवा असूनहि त्यास एवढेसें महत्त्व देण्याचें किंवा त्यांचें भय वाळगण्याचें कारण नसलें, तर ही कारणमीमांसा सुधारकाचें काम निःसंशयच सोपें बनविते.

आपलें जें जें कांहीं आहे तें सर्व जुनें आहे. खगोलांतील ताऱ्यांच्या अंतराविषयीं बोलतांना ज्याप्रमाणें लाख किंवा कोटी मैलांच्या खालचें माप घेण्याची जरूरच नसते त्याप्रमाणें आपल्या जीवितांचें कोणचेंहि अंग शोधावयाचें म्हटलें तरी हजार दोनहजार वर्षांच्या आंतलें माप घेण्याची जरूर नसते. इतकेंच नव्हे तर तें घेऊन चालतच नाहीं. हें वाईट अंगांनाहि लाग आहे व चांगल्या अंगांनाहि लागू आहे. आपल्या सर्व जीवितांचीं मुळें दोन तीन हजार वर्षांच्याहि मागेंपर्यंत खोल गेलेलीं असल्यामुळें हें शोधाचें काम फार अवघड बनतें. पण अवघड असलें तरी अशक्य मात्र नसतें. अस्पृश्यता नाहींशी करावयास हवी याचें प्रतिपादन करतांना वर सांगितल्याप्रमाणें तिची कारणमीमांसा करणें हें अवघड असलें तरी सर्वथा अशक्य आहे असें वाटत नाहीं. आपण जुने खरे, पण आपल्या जुनेपणाची आठवण केवळ कालपुरुषालाच राहिलेली आहे असें नाहीं. आपल्यालाही ती आठवण आहे. अत्यंत प्राचीन काळच्या वाङ्मयांत भारतीय किंवा भारतबाह्य अशा ज्या लोकांचीं नांवें आपण वाचतों ते लोक सध्या कोठें आहेत हें जर आपण पाहूं गेलों तर असें दिसून येतें कीं त्यांचीं अनेक शकलें होऊन कालप्रवाहांत ते इतके अस्ताव्यस्त होऊन गेले कीं त्यांची आतां ओळखही पटत नाहीं व त्यांचें त्यांनाहि सम्यक्-ज्ञान नाहीं. हिंदुस्थानांतील त्रिवर्ण लोक मात्र लव्हाळ्याचें नातें पतकरून कालाच्या या महापुरांतूनहि वांचून राहिले आहेत. आपल्या परंपरा व पीठिका धर्मतत्त्वांत घालून आणि तीं धर्मतत्त्वें लोकांच्या नित्याच्या आचारांत कायम

करून आपण भूतकाळाशीं असलेले आपले संबंध जिवंत ठेविले आहेत. आपलें जुने धर्मग्रंथ व इतिहासग्रंथ म्हणजे हे संबंध जिवंत ठेवणारे असे कोशच होत. यांचें जर परिशीलन केलें तर अस्पृश्यतेचीहि उपपत्ति कळण्यासारखी आहे. याच्याच जोडीला युरोपियन पंडितांनीं आपल्या वाङ्मयाचा, संस्थांचा व एकंदर जीविताचा जो अभ्यास केला आहे त्याचें अवलोकन केलें तर तेंहि या कामीं फारच उपयोगाचें ठरतें. युरोपियन पंडितांनीं आपल्या वैदिक वाङ्मयाचा अभ्यास फारच बारकाईनें केला व तेव्हांपासून ते आपल्याविषयीं थोडे आस्थेनें लिहूं लागले. पण त्यांच्या अभ्यासाचा भर मुख्यतः प्राचीन वाङ्मयावरच असल्यामुळें वाङ्मयाचे विशेष व त्यावरून निघणारीं स्थूल अनुमानें येथपर्यंतच त्यांच्या अभ्यासाचा उपयोग झाला. पुढें भारतांतील निरनिराळ्या प्रांतांत इंग्रज अधिकारी आले. त्यांतील अनेक खरे विद्याभिलाषी व शोधक बुद्धीचे असत. आपण ज्या लोकांवर राज्य करतों ते लोक कोण आहेत, एकाच प्रकारचे आहेत कीं अनेक प्रकारचे आहेत, मानववंशासंबंधानें जे नवीन शास्त्रविचार चालू झाले होते ते यास कितपत लागू पडतात, याचें बारीक निरीक्षण, एकीकडे अधिकार चालवीत असतांनाच, ते करूं लागले. ते अधिकारी असल्यामुळें, इतरांच्या वांटचास न येण्यासारख्या सोयी त्यांना आपोआपच लाभल्या व त्यांनींहि त्यांचा पूर्ण उपयोग करून घेतला. तथापि १८८१ सालापासून जी शिरगणतीची प्रथा कायम झाली तिच्यामुळें या अभ्यासास फारच चालना मिळाली व उत्तरोत्तर अधिक तपशील हातीं लागू लागल्यामुळें या अभ्यासाचें आनुमानिक रूप कमी होत जाऊन त्याला थोडें सिद्धांताचें स्वरूप आलें. हे त्यांचे सिद्धांतकल्प विचार व आपल्या परंपरा एकत्र आणून पाहिल्या म्हणजे लांबलांब वळणें घेऊन शोधक लोक, आपण ज्या भूमिकेवर उभे आहों त्याच भूमिकेच्या जवळपास, दाखल होतात असें दिसतें.

आपण वर्णकल्पनेनें आपल्या सर्व जीविताचा हिशेब लावतों. या युरोपियन अभ्यासकांनाहि या कल्पनेवरच यावें लागलें आहे. वर्णकल्पना किंवा जातिसंस्था व तन्मूलक विषमता हीं पाहून ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं हिंदुधर्मावर मोठीच तोहमत आणिलेली होती. वास्तविक पाहतां या मिशनऱ्यांतहि आमच्या संस्कृतीचा अभ्यास करणारे विद्वान् मिशनरी पुष्कळच झाले. पण विद्या

व शोध एवढेंच त्यांचें मुख्य कार्य नव्हतें. हिंदुधर्मास फजित करून त्यांना ख्रिस्ती धर्माचा वरिष्ठपणा सिद्ध करावयाचा होता. यामुळें त्यांचे शोध अधिकाधिक शास्त्रीय बनेनात. पण हे जे विद्वान् अधिकारी व गणनाकोश करणारे म्हणून सांगितले त्यांची दृष्टि जिज्ञासूपणाची व म्हणूनच चांगली शास्त्रीय अशी राहिली. त्यांनीं उपलब्ध करून दिलेल्या या माहितीचा उपयोग राज्यकारभारांत आमचें अपात्रपण सिद्ध करण्यासाठीं जरी सरकार करून घेत असलें, तरी आपल्या जीविताचें खरें ज्ञान होण्यास, त्यांच्या शोधांचा मोठाच उपयोग होतो. असा अभ्यास सुरू झाल्यावर, आमचें स्वतः संबंधीचें मत, आमची वर्णकल्पना, इत्यादि त्यांच्या कानीं सहजच गेलीं. मग त्यांचा अभ्यास व आमच्या या स्वत:संबंधींच्या कल्पना यासंबंधानें अनुकूल किंवा प्रतिकूल असे पुष्कळच उद्‌गार बाहेर पडूं लागले. त्यांत नेल्सन या ग्रंथकारानें असें एक साहसाचें विधान केलें कीं हिंदुस्थानांतील सर्व लोक एकवंशीय म्हणजे एकाच हाडामांसाचे आहेत. बनारस येथें शिकत असलेले प्राचीन विद्यांचे विद्यार्थी त्यानें पाहिले आणि त्यास असें वाटूं लागलें कीं मलशुद्धीचें काम करणारा भंगी आणि वैदिक ज्ञान संपादन करीत असलेला ब्राह्मण विद्यार्थी यांच्यांत कसलीहि तफावत नाही; हीं दोनही टोकें धरून मधील सर्व लोक सुद्धां केवळ एकवंशीय आहेत. या त्याच्या विधानामुळें विशेषत: हिंदुसमाजाच्या अध्यापकांत मोठीच खळबळ उडाली. आणि तेव्हांपासून हिंदु लोकांच्या समाजघटनेचा व जाति–संस्थेचा अभ्यास आधुनिक पद्धतीनें करणारे आजपर्यंत पुष्कळच लिहीत आले आहेत; व इतउत्तर कालांतहि असेंच लिहीत राहतील असा बळकट संभव दिसतो. खुद्द हिंदू लोकांना आपण सर्व एकवंशीय आहोंत असें कधींच वाटलें नाहीं. फार काय सांगावें, समत्व-भाव व बंधुभाव हीं ज्या मुसलमानी समाजाचीं मुख्य लक्षणें असें मानतात त्या समाजांतहि सर्व लोक एकवंशीय आहेत असें त्यांच्यांतील पूर्वपरंपरा आठवणारे लोक तरी मुळींच मानीत नाहींत. रिस्‌ले यानें तर स्पष्टच लिहिलें आहे कीं वायव्य दिशेकडून जे जे वंश हिंदुस्थानांत आले व जेते ठरले ते सर्व होतां होईतों येथील लोकांशीं रक्ताची भेसळ न करतांच राहिले आहेत व अशा वंशांत त्यानें कित्येक मुसलमान वंशांचीं नांवें दिलीं आहेत. ज्या लोकांत समत्वाचा येवढा बोभाटा आहे त्या लोकांतच जर अशी स्थिति, तर ज्या हिंदू

लोकांत वंशशुद्धि हें धर्माचें कलम म्हणूनच संभाळण्याची चाल, त्या लोकांत सर्व लोक व सर्व जाति एकवंशीय असणें कितीसें संभवेल तें स्पष्टच आहे. नेल्सनचें मत पत्करावयास मोठी अडचण ही आहे कीं, हिंदुस्थानचा इतिहास सर्वस्वी त्याच्या विरुद्ध आहे. खुद्द आमच्या इतिहासाप्रमाणें व परदेशीय लोकांच्या इतिहासाप्रमाणेंहि हिंदुस्थानदेशांत निरनिराळ्या काळीं भिन्न भिन्न वंशीय व भिन्न भिन्न संस्कृतीचे असे अनेक लोक आजवर आलेले आहेत व त्यांनीं येथें कायमची वस्ती केलेली आहे. आधुनिक इतिहासाचा अभ्यास करणारेच केवळ असें सांगतात असें नव्हे; तर वैदिक कालाचा अभ्यास करणारे सुद्धां हेंच सांगत आले आहेत कीं उत्तरेकडून वर लिहिल्याप्रमाणें माणसांची आवक हिंदुस्थान देशांत फारच झालेली आहे. हें सर्व माहीत असतांना नेल्सनचें मत कोणी पत्करावें असें नव्हतें. पण तो एक मोठा अंमलदार व अभ्यासू गृहस्थ असल्यामुळें त्याच्या विधानाकडे सर्वांचेंच लक्ष गेलें व या विषयाची जी भवति न भवति चालू झाली ती अजून चालूच आहे.

पण ही चर्चा हिंदुस्थानांतील लोक एकवंशीय आहेत कीं अनेकवंशीय आहेत या मुद्यावर चाललेली नसून, हिंदुस्थानांतील लोक कोणच्या कोणच्या निरनिराळ्या वंशांचे आहेत व तसेंच कोणचे लोक कोणच्या वंशाचे आहेत या-संबंधानेंच चालू आहे. नेल्सनचा मूळ मुद्दा जो कीं सर्व लोक एकवंशीय आहेत तो अगदींच मागें पडला. कारण कीं इतिहासानें त्याच्या विधानाला सहजच येवढा धक्का दिला कीं तो स्थिर राहूं शकला नाहीं. पण त्याच्या विधानाच्या नादानें जेव्हां अभ्यासक न्याहाळूं लागले, तोलून पाहूं लागले, पीठिका शोधूं लागले व ज्याचें त्यासच विचारूं लागले तेव्हां येथें अनेकवंशीय लोक आहेत हें त्यांच्या मनानें खास घेतलें. व पुढें मग हे अनेक वंश कोण-कोणचे याची पूसतपास त्यांनीं चालू केली; व तिच्यांत कांहीं थोडें यश येत आहे असें पाहतांच, येथील कोणचे लोक या अनेक वंशांपैकीं कोणत्या वंशाचे आहेत याचाहि अभ्यास चालूं झाला. पैकीं येथें कोणकोणते वंश असावेत या प्रश्नाच्या चिकित्सेला हिंदुस्थानचा व इतर जगाचा इतिहास हा जसा उपयोगी पडला तसाच मानव वंशाचे कॉकेशियन, मंगोलिअन, निग्रो, रेडइंडियन अशासारखे जे ठळकठळक वंश यांचाहि अभ्यास त्यांच्या उपयोगी पडला. युरोपांतून येऊन एकदम येथील लोकांकडे पाहूं लागले

तर माणसामाणसांत कांहीं फरक आहे असें परस्थ लोकांना लवकर उमगत नाहीं हें युरोपियन पंडितांना, त्यांचें त्यांसच, कळूं लागलें. पहिले कांहीं दिवस गेल्यानंतर वारकाईनें पाहूं लागल्यावर येथील बारीकसारिकसुद्धां फरक त्यांच्या ध्यानांत येऊं लागतात. अर्थात् रंग, रूप, केंस, बांधा, नाक, डोकें, अशा अनेक खुणा स्वाभाविकपणेंच दिसून येतात. याला कांहीं फार शिकावें लागतें असें मुळींच नाहीं. हें अवलोकन झाल्यावर युरोपियन पंडितांनीं आपल्या मताप्रमाणें कोणच्या प्रांतांत कोणच्या वंशाचे लोक वसलेले असावे याचा एक नकाशा तयार केला. या कामीं त्यांना खरी मदत इतिहासाचीच झालेली आहे. हा नकाशा त्यांना सुचणें ही ओघानें येणारीच गोष्ट होती. कारण नाहींतर मग हा जो एवढा मोठा विस्तृत इतिहास व त्यांत दिलेलीं अनेक मानववंशांची हिंदुस्थानाकडील स्थित्यंतरें यांचें काय करावयाचें? तीं स्थित्यन्तरें झालीं आहेत हें जर खरें तर त्यांचा हिशेब हा लागलाच पाहिजे; व तो इतिहासाच्या मदतीनें कांहीं ढोबळ प्रमाणानें त्यांस लावतांहि आला. हा जो हिशेब तोच वर सांगितलेला नकाशा होय.

याच्या पुढील पायरी म्हणजे, बेटीबंदपणा पत्करून हिंदू समाजांतील लोक जे कित्येक शतकें शेजारीं शेजारीं राहिलेले आहेत ते या नकाशांत दिलेल्या वंशांच्या पोटीं कोण कसे जाऊन वसतात हें पाहणें. वर म्हटलेंच आहे कीं या प्रश्नाची चर्चा सध्यां चालू आहे. हिंदू समाजाच्या पोटांत ज्या चार साडेचार हजार किंवा आठ हजारही जाती आहेत त्या सर्व निरनिराळ्या वंशांच्या अवशेषरूप होत हें म्हणणें अगदींच वेडेपणाचें होय. व म्हणून मग हे इतके बारीक बारीक खंड कां पडले असतील याची चिकित्सा चालू झाली व एकेकानें एकेक स्वतंत्र उपपत्ति लावावी असें होता होता सर्वांच्याच उपपत्ती खऱ्या आहेत असें ठरून हिंदू लोकांच्या जातिसंस्थेची कारण-मीमांसा सिद्ध झाली. धंदा, प्रदेश, पंथ, संकर, शाखा, वंश, स्थलांतर अशासारख्या आठदहा निरनिराळ्या कारणांचे व्यापार होऊन या जाति बनल्या असाव्यात हें मत निदान अभ्यासकांत तरी कायम झालें. व त्यांतूनच हा प्रश्न निघाला कीं इतिहासावरून वर लिहिलेली जी वंशकल्पना सिद्ध केली तिचा व या जातिसंस्थेचा अन्वय लावावयास हवा. कोणच्या वंशाच्या पोटीं कोणत्या जाति घालाव्या व अशा रीतीनें सर्व हिंदुसमाज कांहीं थोडया वंशांच्या कोष्टकांत बसवावा

असा हा शास्त्रीय यत्न आहे. हा वंशाचा नकाशा सर्व पंडित एकच मानतात असें नाहीं, पण त्यांत जरी कांहीं पंरी असल्या तरी हिंदुस्थान देशाची वंश-कल्पनेनें प्रादेशिक वाटणी करतां येतें हें मत सर्वांसच पसंत आहे. सध्यां हेंच काम चालू आहे कीं या निरनिराळ्या जाती कोणवंशीय आहेत हें ठरवावयाचें. आम्हां हिंदू लोकांची तरी अगदीं मूळ कल्पना चातुर्वर्ण्याचीच आहे. वर्ण शब्द ऐतिहासिक व म्हणून अत्यंत सूचक आहे. ही वर्णाची कल्पना पूर्वी एकदां नव्हती असें सांगतात व तें खरेंहि असण्याचा संभव आहे. जेव्हां लोक एकवर्णीयच असतील तेव्हां वर्णाची कल्पना नसावी हें स्वाभाविकच आहे. पृथकत्व हें तुलनेनें व सापेक्षतेनें प्राप्त होतें. म्हणून ज्यावेळीं तुलनेनें किंवा सापेक्षतेनें भिन्नवर्णीय लोक एकत्र आले असतील तेव्हांच अनेक वर्णांची कल्पना उद्-भवली असावी व त्याच्या आधीं ती नसावी हें खरेंच आहे. याच चार वर्णांच्या पुढें हजारों जाति झाल्या असें, आपआपली जात संभाळीत असतांना सुद्धां, जुन्या तऱ्हेचे पढिक हिंदूही आजपर्यंत मानीत आले आहेत. आतां युरोपियन पंडित ज्याप्रमाणें अमुक वंशाचे लोक तमुक भागांत असावेत अशीं विधानें करतात तशी आमचे लोक करीत नाहींत. कारण, हिंदुस्थानांत प्रदेशाची वाटणी वंशवार झाली आहे असें त्यांस वाटत नाहीं. एकाच प्रदेशांत, कीं जेथें अमुक एका वंशाचे लोक असावे असा युरोपियन पंडितांचा आग्रह असतो; तेथेंच भिन्न-वर्णीय, भिन्नवंशीय लोकांची वस्ती आहे असें त्यांस वाटतें. तथापि त्रैवर्णिक हिंदू सोडून बाकीचे जे सर्व लोक हिंदुधर्मांत अंतर्भूत झालेले आहेत त्यांच्या वसाहती मात्र हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं पहिल्यापासून कायमच्या आहेत व तेथें ते लोक बहुसंख्य आहेत असें मात्र ते मानतात. युरोपियन पंडितांचें पाहणें बहुसंख्य लोक कोठें कसे आहेत या दृष्टीनें असतें व त्यांच्या मतानें त्या त्या प्रदेशांतील बहुसंख्य लोक अमुक वंशीय आहेत असें ठरलें म्हणजे त्या प्रदेशाला त्या वंशाचा प्रदेश असें नांव ते देतात. उलट त्या त्या ठिकाणच्या मुख्यतः असंस्कृत लोकांच्या वस्तीवरूनच त्या प्रदेशाला त्या लोकांचें नांव देणें हें हिंदूंतील श्रेष्ठ वर्णीयांना विपरीत वाटतें. कारण ज्यांचीं नांवें त्या प्रदेशाला मिळालेलीं असतात त्यांत मुळींच अंतर्भूत न होण्यासारखे असे अनेक श्रेष्ठ वंश–खंड तेथें आहेत हें त्यांस माहित असतें व म्हणून त्यांचाहि समावेश भलत्याच एकाद्या सरसकट नांवांत व्हावा हें

त्यांस आवडत नाहीं. हें कसेंहि असलें तरी उभयतांच्याहि मतें भिन्नवंशीय लोकांच्या वसाहती सर्वत्रच आहेत ही गोंप्ट कांहीं खोटी नाहीं. असो.

इतकें सिद्ध झाल्यावर निरनिराळ्या जातींची वंश–पहाणी नव्या कल्पनांनीं करण्याचें काम अभ्यासकांनीं सुरू केलें. कोणी कोणी केसावरून उपपत्ति वसविली. केस कुरळे असणें किंवा सडक असणें, पिंगट असणें किंवा काळे असणें, दाट असणें किंवा विरळ असणें, ते गालफडावर येणें किंवा न येणें अशा अनेक खुणा त्यांनीं पडताळून पाहिल्या. पण त्यांत कांहीं एक तथ्य दिसेना. हें केसांचें प्रमाण अगदीं पहिले पहिले जे मानववंश ते एकमेकांपासून कसे निराळे आहेत हें दर्शविण्यास उपयोगी पडेल. पण जातिरूपानें दिसत असलेले जे निरनिराळे वांशिक पोटभेद तेसुद्धां या केसांच्या प्रमाणांनीं दाखवितां येतील हें मुळींच खरें नाहीं. रंगाच्या बाबतींतहि असेंच झालें. ज्या सर्व पोटजाति आम्ही अमुक वर्णाच्या आहों असें म्हणतात त्या एकाच रंगाच्या असतातच असें मुळींच नाहीं. म्हणून हीहि खूण निरुपयोगी ठरली. कोणी तर नुसतें, " दिसतो कसा " हेंच प्रमाण मानावयाचें ठरविलें. पण निरनिराळे पेहेराव केलेले, निरनिराळ्या जातींचे लोक त्या त्या पेहरावाच्या जातीचे आहेत असें सहज दिसूं लागलें. म्हणून हीहि खूण एकदमच टाकून देण्यांत आली. पंजाबांत तर कोणी एका शोधकानें वंश ठरविण्याची एक निराळीच क्लृप्ति वसविली. मूल जन्मलें म्हणजे कांहीं महिनेपर्यंत त्याच्या कमरेवर एक निळसर डाग किंवा ल्हासें असतें. हा निळसर डाग ज्या मुलांच्या पाठीवर असेल तीं अमुक वंशाचीं असें म्हणावयाचें त्यानें ठरविलें. पण ही क्लृप्तीही थोडी चारचौघांत पसरल्यावर त्यास दिसून आलें कीं, असल्या खुणा वाटेल त्या जातींच्या मुलांच्या पाठीवर असतात व कांहीं दिवसांनीं त्या जातातहि. तेव्हां हीहि खूण त्याज्य ठरली.

पण रिस्ले यांनीं मात्र या बाबतींत फारच मोठा जोराचा यत्न केला व त्यांनीं आपली उपपत्ति जवळ जवळ सिद्धांतरूपच झाल्यासारखी आहे असें कांहींसें मानिलें; तथापि या पुराव्यांत पुरेशी भर पडल्याशिवाय आपण यास सिद्धांत म्हणणार नाहीं असेंहि त्यानें नमूद करून ठेविलें. पण विद्वानांच्या मतांचा व शोधांचा उपयोग चालू व्यवहाराकडे करून घेण्याची जी इतिहासकार, मुत्सद्दी, वर्तमानपत्रकर्ते इत्यादि लोकांना जी घाई झालेली असते

त्यानीं हा रिस्ले यांना अपेक्षित असलेला पुरावा येण्याची वाट पाहिली नाहीं; व त्यांनीं जुजबी म्हणून सांगितलेलें मत त्यांचा प्रमाण–सिद्धांत म्हणून सगळीकडे पसरवावयास आरंभ केला–व खेदाची गोष्ट ही कीं रिस्ले यांचें मत पुढें झालेल्या शोधांवरून पूर्वीइतकें सुद्धां जरी स्वीकार्य राहिलें नाहीं तरी तेंच सर्वत्र फिरवत ठेवण्याचें काम लेखकांनीं चालू ठेविलें आहे! रिस्ले यांनीं माणसाची कवटी मोजणें व त्याचें नाक मोजणें या गोष्टी सुरू केल्या. पण हें करावयाच्या आधीं आर्यवंशीय लोक म्हणजे अमुक ठिकाणचे असें त्यांनीं ठाम ठरवून घेतलें. पंजाब, रजपुताना, कांहीं थोडा सं० प्रांताचा भाग या प्रांतांत आर्यांची वसाहत असावी हें मत त्यांनीं इतिहासावरून मुक्रर केलें. व त्यांच्या चेहरेपट्टीची व नाकाडोक्यांची पहाणी व मोजदाद करून आर्य-वंशीय लोक म्हणजे अमुक मेजामापाचे असें ठरविलें. मग निरनिराळ्या प्रांतांतील निरनिराळ्या जातींचीं मापें घेऊन तीं वरील आर्यवंशीय म्हणून ठरविलेल्या लोकांच्या नाकां–डोक्यांच्या मापांशीं तोलून पाहिलीं व त्या वरून ते ते लोक आर्यवंशीय आहेत कीं नाहींत हें ठरविलें. पुढें त्या त्या प्रांतांतील निरनिराळ्या जातींच्या लोकांचीं मापें घेऊन त्या त्या मापांत बसणाऱ्या जाति त्या सर्व एकवंशीय होत असें म्हणावयास हवें असें ओघानेंच आलें. पण अमुक लोक, मापावरून पाहतां पंजाब इत्यादि प्रांतांतील मापांशीं त्यांचें जमत नाहीं म्हणून, आर्य नाहींत असें म्हणणें हें निराळें व एकाच मापांत सांपडतात म्हणून अमुक दोन जातींचे लोक एकवंशीय आहेत असें म्हणणें हें निराळें. कारण या दुसऱ्या प्रकारांत विलक्षण चमत्कार दिसूं लागले, इतिहास, पीठिका, मन व बुद्धि यांचीं सामर्थ्यें या दृष्टींनीं ज्या दोन जातींत जमीन-अस्मानाचा फरक ते लोक यांच्या एकाच मापांत बसतात म्हणून ते एक-वंशीय आहेत असें म्हणण्याची पाळी येऊं लागली! शिवाय डोक्याच्या मापानें अमुक जाती एकत्र येतात तर नाकाच्या मापानें भलत्याच जाती एकत्र येतात हा दोष शिरूं लागला. यामुळें हिंदुस्थानांत अनेकवंशीय लोक आहेत हा सिद्धांत कायम राहिला तरी, रिसले यांची मापनविशेषांवरून वंश सिद्ध करण्याची पद्धति पत्करावी असें त्या त्या शास्त्रांच्या अध्यापकांना वाटेनासें झालें आहे. भलत्याच कोणत्या तरी दोन जाती एकाच मापनविशेषाच्या असल्या-

मुळें कशा नजिक येतात व यामुळें रिस्ले यांची सबंधच उपपत्ति कशी पेचांत सांपडते हें एन्थोव्हेन यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेवरून दिसून येईल.

याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थानांतील कोणत्या जाती कोणच्या वंशाच्या आहेत हें ठरविण्याची खरोखर शास्त्रीय पद्धति अजून उपलब्ध झालेली नाहीं. शास्त्री मंडळींतच जेथें मतभेद, दुग्धा आणि संशय तेथें त्यांजकडून आलेलें अमुक एक म्हणणें सिद्धांतरूप आहे असें मानणें धोक्याचें होईल. फार काय सांगावें, शास्त्री मंडळींनीं म्हणजे आधुनिक शास्त्रें पढणारांनीं सर्वांनीं मिळून जरी एकादा सिद्धांत ठरविला, व तो जर कां उघड उघड दिसणाऱ्या वस्तु-स्थितीशीं विसंवादी असला तर त्या सिद्धांताचाहि आमच्या सुधारणेच्या व्यवहाराला कसलाहि उपयोग व्हावयाचा नाहीं. समाजाला कांहीं एक स्थिर ज्ञान असतें–तें त्याला परंपरेनें आलेलें असतें. आणि पुष्कळदां असें दिसतें कीं जीं ज्ञानें सातत्यानें टिकावीं अशी अपेक्षा होती, तीं ज्ञानें तोंडीं राहणाऱ्या वाङ्मयांत किंवा आचार–कांडांत पूर्वींच्या योजकांनीं सूत्ररूपानें कायमचीं करून टाकलेलीं आहेत. ह्या प्रकारांत किंवा चालींत कांहीं योजना आहे, कांहीं हेतु आहे, कांहीं जपणुकीची भावना आहे असें स्पष्ट दिसतें. आम्ही अमुक आहों, म्हणजे तदितर कोणी नव्हों, म्हणजेच आमच्या शेजारीं असलेले किंवा दूर असलेले अमुक लोक जे आहेत ते आमचे आहेत, व तमुक जे आहेत ते आमचे नव्हेत, असें हमखास ठरविण्याच्या कांहीं खुणा कुळांत, जातींत, वर्णांत, ठेवण्याची पद्धति माणसांनीं घातलेली आहे. या योजना बुद्धिपुर-स्सर केल्या आहेत व त्या रोजच्या धार्मिक परिपाठांत रूढ करून दिलेल्या आहेत. त्रिवर्ण हिंदूंना ही गोष्ट लागू आहे. ज्यांनीं वर्णव्यवस्थेविरुद्ध–वर्णाविरुद्ध नव्हे–बंड केलें त्यांनासुद्धां या वांशिक आठवणी कायम होत्या; पण संस्कारलोप व क्रियालोप झाल्यावर ही त्यांची स्मृति शिथिल झाली असल्यास नवल नाहीं. ज्यांचा वर्णकल्पना टाकल्यामुळें क्रियालोप झाला त्यांनीं संस्कारलोपही होऊं दिला नसला तर त्यांच्यांत वांशिक स्मृति कायम आहेत. ज्या लोकांच्यांत दोहोंचाहि लोप झाला त्यांनींसुद्धां कांहीं कांहीं स्मृति कायम ठेविल्या आहेत. ब्राह्मण व वैश्य यांनीं तर या स्मृति अजूनही कायम ठेविल्या आहेत व जे क्षात्र कुलीन असून क्रिया किंवा संस्कार यांनीं युक्त आहेत त्यांसही या आठवणी आहेतच. असो.

मुळें कशा नजिक येतात व यामुळें रिस्ले यांची सबंधच उपपत्ति कशी पेचांत सांपडते हें एन्थोव्हेन यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेवरून दिसून येईल.

याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थानांतील कोणत्या जाती कोणच्या वंशाच्या आहेत हें ठरविण्याची खरोखर शास्त्रीय पद्धति अजून उपलब्ध झालेली नाहीं. शास्त्री मंडळींतच जेथें मतभेद, दुग्धा आणि संशय तेथें त्यांजकडून आलेलें अमुक एक म्हणणें सिद्धांतरूप आहे असें मानणें धोक्याचें होईल. फार काय सांगावें, शास्त्री मंडळींनीं म्हणजे आधुनिक शास्त्रें पढणारांनीं सर्वांनीं मिळून जरी एकादा सिद्धांत ठरविला, व तो जर कां उघड उघड दिसणाऱ्या वस्तु-स्थितीशीं विसंवादी असला तर त्या सिद्धांताचाहि आमच्या सुधारणेच्या व्यवहाराला कसलाहि उपयोग व्हावयाचा नाहीं. समाजाला कांहीं एक स्थिर ज्ञान असतें—तें त्याला परंपरेनें आलेलें असतें. आणि पुष्कळदां असें दिसतें कीं जीं ज्ञानें सातत्यानें टिकावीं अशी अपेक्षा होती, तीं ज्ञानें तोंडीं राहणाऱ्या वाङ्मयांत किंवा आचार—कांडांत पूर्वींच्या योजकांनीं सूत्ररूपानें कायमचीं करून टाकलेलीं आहेत. ह्या प्रकारांत किंवा चालींत कांहीं योजना आहे, कांहीं हेतु आहे, कांहीं जपणुकीची भावना आहे असें स्पष्ट दिसतें. आम्ही अमुक आहों, म्हणजे तदितर कोणी नव्हों, म्हणजेच आमच्या शेजारीं असलेले किंवा दूर असलेले अमुक लोक जे आहेत ते आमचे आहेत, व तमुक जे आहेत ते आमचे नव्हेत, असें हमखास ठरविण्याच्या कांहीं खुणा कुळांत, जातींत, वर्णांत, ठेवण्याची पद्धति माणसांनीं घातलेली आहे. या योजना बुद्धिपुर-स्सर केल्या आहेत व त्या रोजच्या धार्मिक परिपाठांत रूढ करून दिलेल्या आहेत. त्रिवर्ण हिंदूंना ही गोष्ट लागू आहे. ज्यांनीं वर्णव्यवस्थेविरुद्ध—वर्णाविरुद्ध नव्हे—बंड केलें त्यांनासुद्धां या वांशिक आठवणी कायम होत्या; पण संस्कारलोप व क्रियालोप झाल्यावर ही त्यांची स्मृति शिथिल झाली असल्यास नवल नाहीं. ज्यांचा वर्णकल्पना टाकल्यामुळें क्रियालोप झाला त्यांनीं संस्कारलोपही होऊं दिला नसला तर त्यांच्यांत वांशिक स्मृति कायम आहेत. ज्या लोकांच्यांत दोहोंचाहि लोप झाला त्यांनींसुद्धां कांहीं कांहीं स्मृति कायम ठेविल्या आहेत. ब्राह्मण व वैश्य यांनीं तर या स्मृति अजूनही कायम ठेविल्या आहेत व जे क्षात्र कुलीन असून क्रिया किंवा संस्कार यांनीं युक्त आहेत त्यांसही या आठवणी आहेतच. असो.

वाहेरून येणाऱ्या प्रत्येक स्वारीवरोवर समाजाला शेंकडो हदरे वसत होते व वहिस्थांशीं भेसळ होईल कीं काय या धाकानें लोक स्वत्वाला जपत होते. हिंदू लोकांत अनेक जाती आहेत असें म्हणून त्यांस हिणविण्यांत कांहींच भूषण नाहीं. ऐसलंडमध्यें मुळींच जाती नसतील आणि उत्तर ध्रुवावर तर माणसाचा जन्मही होत नसेल. जेथें माणसांची येजाच नाहीं तेथें हे प्रश्न उत्पन्न होणारच नाहींत. चमत्कार असा आहे कीं, हिंदुस्थानच्या चमत्कारिक भौगोलिक स्थानामुळें म्हणजे तें अगदीं दक्षिणेस असल्यामुळें वरून माणसांचे लोंढे सारखे येतच राहिले. हा कांहीं अत्रस्थांचा दोष नाहीं, हा भूगोल-रचनेचा दोष आहे. शिवाय गंगा-यमुनांचीं खोरीं महा सुपीक असल्यामुळें जिकडे भाकरी तिकडे माणसांनीं धावावें हें स्वाभाविक होतें. मूळ आर्य तरी तिच्याच शोधार्थ आले कीं नाहीं ? तसेच इतर अनेक लोक आले. सृष्टिविशेषांचा उपयोग करून घेऊन एकानें नुसती भाकरी खावी इतकेंच नव्हे तर वैभवही उत्पन्न करून भोगावें व तो त्या नादांत असल्यामुळें दुसऱ्या भुकेलेल्या लांड-ग्यांनीं त्याला कैचींत गांठावें हा प्रकार सर्वत्र दिसून येतो. तोच येथें झाला. त्यामुळें शेंकडो निरनिराळे वंशखंड येथें येऊन स्थिर झाले. आरंभीं आरंभीं हे नवागत लोक आपल्या पोटांत रिचवून घेण्याची धमकही लोकांनीं दाख-विली, पण या रीतीला तरी कांहीं अंत असणारच. यांत तीन विचार आहेत. जेव्हां आपण ही रिचविण्याची वाव बोलतों तेव्हां त्यांचा विचार व्हावयास हवा. रिचवून घेणारे कबूल असले तरी जे रिचावयाचे ते कबूल होते कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. जे त्यांस स्वतः रिचविणार ते व रिचणारे ते संख्येनें किती होते हेंही पाहिलें पाहिजे; व ही रिचवून घेण्याची पद्धत त्यांनीं स्वीकारली होती की नाहीं हेंही पाहिलें पाहिजे. पैकीं ही शेवटीं सांगितलेली पद्धति लोकांनीं ठेविली होती, हें पुढल्या हिंदू लोकांना नांवें ठेवण्यासाठीं मागीलांचा दाखला देतांना प्रत्यक्ष आक्षेपकसुद्धां कबूल करतात. पण जे रिचले जाणार त्यांची तयारी होती कीं नाहीं हें कळावयास काय साधन आहे? कदाचित् तेच जर कबूल नसले तर रिचविणारे तरी काय करणार? बरें जे नवे येणारे ते ताज्या दमाचे व वीरश्रीवान् असले तरी संख्येनें कमी असल्यामुळें निराळे राहण्याची बुद्धि त्यांनाच जास्त राहणार. खुद्द आर्यलोक म्हणजे त्रैवर्णिक हिंदू तरी अत्रस्थांशीं एकरूप झाले नाहींतच. ते ज्या कारणासाठीं झाले नाहींत

त्याच कारणासाठीं पुढें पुढें येणारे लोकही यांच्याशीं एकरूप होईनात. शक्य व योग्य आहे असें उभयपक्षीं दिसलें तेथें एकरूप झालेही. पण जर हे नवागत लोक, संस्कृत अशा रोमन राज्यावर धाड घालण्याकरितां येणाऱ्या रानटांप्रमाणें, असंस्कृतच असतील तर आपलें लुटारूपणाचें स्वत्व कायम ठेवण्यासाठीं मिलाफास तयार झाले नसतील व संस्कृत व संभावित स्वत्व कायम ठेवण्यासाठीं हे मूळचे तयार नसतील. याच्याच जोडीला म्हणजे संस्कृतीच्या जोडीला जेव्हां मुसलमानांच्या धर्मवेडाचा विचार येऊन ठेपला व मनावर अनेक परस्परविरोधी संस्करणें होऊं लागलीं तेव्हां तर मूळ कायम ठेवणें ज्यांना ज्यांना शक्य होतें त्यांनीं त्यांनीं ठेवण्याचा यत्न केला.

हें लिहिणें वंशकल्पनेपुरतें आहे. जात ही जी हजारो पुंजांच्या रूपानें दिसून येते तिचें रूप सांगावयासाठीं हें लिहिलेलें नाहीं. वांशिक कल्पना इतर तऱ्हांनीं कशी प्रस्फुट होते हेंही पहाण्यासारखें आहे. जेत्या लोकांनीं एकाद्या देशाचा कबजा घेतला म्हणजे तत्रस्थांचा नायनाट करण्याची ते किती खबरदारी घेतात व इलाज योजतात हें अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, या प्रदेशांत सर्वत्र दिसून आलेलें आहे. तुझा वंश तेथें टिकावयास नको; माझाच टिकावयास हवा या ईर्षेनें या जेत्या लोकांनीं हे सर्व यत्न केले हे कां केले? आपला वंश टिकावा म्हणून, हें एकच निकालाचें उत्तर आहे. म्हणजे असें झालें कीं, वंश टिकविण्याची बुद्धि सार्वत्रिकच आहे. मग ती जर जेत्यांत आहे तर जितांत राहावी हें किती स्वाभाविक आहे? त्यांतही आणखी एक विचार आहे. जित खरा पण तो जर संस्कृत असेल पण अन्य कारणास्तव जित झाला असेल तर तो असंस्कृत जेत्यापासून स्वत्व–रक्षण अधिकच करूं पाहणार हें अगदीं उघड आहे. म्हणून हे सर्व विचार लक्षांत घेतां येथें स्वत्व–रक्षणाची तरतूद माणसांनीं केलेली असावी यांत कांहींच आश्चर्य नाहीं. त्यांतच आणखी एका बाबीची भर पडली होती. जे मूळचे अत्रस्थ लोक होते त्यांच्याहून आर्यकुलोत्पन्न लोक सांस्कृतिक दृष्ट्या श्रेष्ठ होते. ते संख्याबलानें कमी होते हें खरेंच आहे. परंतु अशा संस्कृत पण अल्प संख्य लोकांना येथील मूळच्या असंस्कृतांचेंही भयच होतें. म्हणून दोन अंगांस त्यांचें हें स्वत्वरक्षणाचें काम चालू होतें असें म्हटलें पाहिजे. अत्रस्थापासून दूर रहावयाचें व बहिःस्थांच्या स्वाऱ्या, हदरे यांपासून स्वत्व रक्षण करावयाचें असें हें मोठ्या जिकीरीचें काम त्यांना करावयाचें होतें.

हें चालू असतांना आपल्याच पोटांतून जीं अनेक धार्मिक मतमतांतरें निघालीं तीं रिचवितां आलीं तर पहावयाचें; नाहींतर त्यांस तोंड देण्यासाठीं आपलीं तत्त्वज्ञानें उजळावयाचीं व जास्त संग्राहक करावयाचीं. ही खटपट अखंडपणें चालूच होती. अशा प्रकारें या चौफेर माऱ्यांत ज्या त्रैवर्णिकांनीं हा हिंदु समाज इतपत तरी बलिष्ठ ठेविला त्यांची मातब्बरी फार मोठी खरीच!

येथें शूद्रातिशूद्रांविषयीं लिहिलें पाहिजे. हिंदुस्थानांत एकंदर किती प्रकारच्या लोकांची व कितीदां आवक झाली हें ठरविणें कठिण आहे. खरोखर हा देश दक्षिणेकडील समुद्रांत आणखी शेंपांचशें कोस लांबत गेला असता तर बरें झालें असतें असें वाटतें! म्हणजे वरून येणारीं शेंकडों तऱ्हांचीं माणसें तिकडच्या ओढीनें खालीं खालीं गरंगळत गेलीं असतीं व येथें जरा जास्त पघळपणा आणि निवांतपणा लाभला असता. आगगाडीच्या डब्यांत शेंकडों–पगड उतारू जमून दाटी करतात व एक आंत शिरला म्हणून दहा शिरतात, तसें येथें झालें आहे. एकाच लग्नाचे वऱ्हाडी असले तर दाटी झाली तरी ते कसें तरी सामावून घेतात; पण दर दहा मिनिटांनीं नवे उतारू जमा झाले म्हणजे मोठा जाच होतो. यूरोपांतील देशांत हा जाच नाहीं. असो; हिंदुस्थान हा दक्षिणेकडील अगदींच शेवटचा देश बनून राहिला यामुळें त्याला एका अजबखान्याचें रूप येऊन बसलें. जर याच्या मर्यादा खूप खालपर्यंत पसरल्या असत्या तर नामी झालें असतें. पण सृष्टीनें याही बाबतीत त्याला दगा दिला. सध्यांच्या हिंदी-महासागरांत हिंदुस्थानाला जोडूनच आणखी एक द्वीप होतें व त्यावर माणसांची वसती होती, हें मत संशोधकांत कायम झाल्यासारखें आहे. दक्षिण हिंदुस्थान हा या द्वीपाशीं संलग्न असून तेथील लोक व मूळचे दाक्षिणात्य द्रविड हे एकच होते असेंही त्यांचें मत आहे. सध्यांसुद्धां दक्षिणेकडे जे द्रविडवंशीय लोक आहेत ते या पूर्वकालीन द्वीपावरच्या लोकांपैकींच अवशिष्ट लोक होत असेंही मत मानवशास्त्राचा अभ्यास करणारे सांगतात. तसेच ऑस्ट्रेलिया व आफ्रिका या खंडांत या लोकांसारखींच माणसें सांपडतात व त्या उभयतांचीं कांहीं हत्यारपात्यारेंही अगदीं सारखीं आहेत असें सांगून पुढें ते म्हणतात कीं ते तेथील व हे दक्षिण हिंदुस्थानांतील लोक यांचे पूर्वज एकत्र होते. कालांतरानें या प्रचंडद्वीपानें हिंदी महासागरांत कायमची बुचकळी मारली. दक्षिण हिंदुस्थान व सिंहलद्वीप हीं त्याचीं खांडें राहून गेलीं व म्हणून त्या

द्वीपांतील मानववंशावशेष म्हणजे हे लोक आहेत असें त्यांचें मत आहे. पण या लोकांना द्रविडवंशीयच म्हणावयाचें कीं काय हें अजून ठरलें नसावें. आतां द्रविडांविषयीं आणखीही एक मत चालू आहे. आर्य, म्लेंछ, यवन, शक हे जसे उत्तरेकडून हिंदुस्थानांत आले त्याप्रमाणें द्रविड लोकही त्यांच्या फार पूर्वी आले असाही एक तर्क संशोधकांत चालू आहे. बलुचिस्थानांतील बाहुरी भाषेचें एका दाक्षिणात्य द्रविड भाषेशीं सादृश्य फारच आहे व ही भाषा बोलणारे तेथील लोकही तत्रस्थ इतरांहून कांहींसे निराळे आहेत. यावरून संशोधकांनीं अनुमान बसविलें आहे कीं द्रविडवंशी लोकही वरूनच आलेले असावेत. या दोन सिद्धान्तांपैकीं कोणच्याला प्रामाण्य प्राप्त होतें हें अजून दिसावयाचें आहे. एक महाद्वीप बुडालें व त्यावरील वंशांपैकीं कांहीं खंड दक्षिणेंत राहिले हें मत कायम आहे. पण ज्या द्रविडवंशीय प्रजा आहेत त्या म्हणजेच हें खंड कीं काय हें सिद्ध व्हावयाचें आहे. पण याच्या निर्णयाला एक दोन गोष्टी उपयोगी पडण्यासारख्या आहेत. वंशशास्त्रज्ञ ज्यांना द्रविड म्हणतात ते केवळ दक्षिणेंतच आहेत असें त्यांचें त्यांसच वाटत नाहीं. ते छोटानागपूरच्या वरपर्यंतच नव्हे तर गंगेच्या खोऱ्यापर्यंत पसरलेले होते व अजूनही आहेत असें त्यांचें म्हणणें आहे. असें असेल तर दक्षिणेंतील द्रविड हे नष्ट झालेल्या द्वीपावरच्या लोकांपैकीं असें मानावयाचें कारण नाहीं. मग ते वरून आलेल्या लोकांपैकींच आहेत असें होईल. आणखी एक वाव याच्यापुढें जावयास उपयोगी पडते. दक्षिणेकडील डिप्रेस्ड् लोक किंवा अस्पृश्य लोक स्वतःस आदिद्रविड असें म्हणवितात. आदिद्रविड हा शब्द हेतुपुरस्सर बनविला असला तर फारच बोधक व निर्णायक आहे. द्रविडांच्याही आधीचे असा त्याचा अर्थ स्पष्ट आहे. म्हणजे तिकडील अस्पृश्य लोक आपण द्रविडांच्या आधींचे आहोंत असें समजतात. 'द्रविडांच्या नंतरचे' म्हणजे उत्तरेकडे आर्यांचें स्थिरस्थावर झाल्यावर त्यांच्या ज्या प्रजा खालीं उतरल्या त्या व 'द्रविडांच्या आधींचे' म्हणजे हे स्वतः; असा अनुक्रम धरावयाचा आणि सामाजिक घटनेप्रमाणें पहातां हाच अनुक्रम बरोबर दिसतो. सामग्र्यानें विचार करतां असें दिसतें कीं द्रविडवंशही ज्यांना अस्पृश्य मानतो ते हे अस्पृश्य लोक त्यांच्याही आधीचे आहेत. हिंदू समाजांतील शूद्र लोक हे द्रविडवंशीय, अतिशूद्र हे आदिद्रविडवंशीय, असें मानावयाला कांहींच हरकत नाहीं.

यांपैकीं द्रविडांची अशी कांहीं संस्कृति होती असें दिसतें. शेती करणें व ऊर्णावस्त्रें म्हणजे लोकरीचें कापड बनविणें या गोष्टी त्यांना माहित होत्या. म्हणजे अन्नवस्त्राची तरतूद त्यांना करतां येत होती हें खास. हें तरी कांहीं कमी नाहीं. इतपत संस्कृतीचे लोक आदिद्रविडांहून सरस ठरले व जमिनीची मालकी त्यांच्याकडे गेली. या ठिकाणीं एक फार मोठा प्रबोधक प्रश्न उत्पन्न होतो तो हा कीं, आदिद्रविडांना द्रविडांनीं कसें वागविलें ? आदिद्रविडांच्या जमिनी द्रविडांनीं घेतल्या काय? कां त्यांचें त्यांस राहूं देऊन आपण स्वतःच जमिनी केल्या? त्यांनीं त्यांस वरोबरीनें वागविलें की कमी लेखलें? आपलें वांशिक पृथकत्व राखावें अशी बुद्धि त्यांना कशी झाली? ती त्यांनीं कशी अमलांत आणिली? पण याचा जास्त विचार येथें कर्तव्य नाहीं. प्रस्तुत येवढेंच पहावयाचें होते कीं हे शूद्र व हे अतिशूद्र कोण. तें पाहिलें असतां असें दिसलें : हे दोन भिन्नवंशीय लोक होते व त्रिवर्ण हिंदू लोक हिंदुस्थानांत प्रभावशाली होण्याच्या आधीं यांची वस्ती येथें होती. या भिन्नवंशीय लोकांना त्रिवर्णांनीं दूर लेखिलें. कारण त्यांच्या व यांच्या सामर्थ्यांत व वर्णांत फारच फरक होता. द्रविडांना संस्कृति असली तरी ती केवळ प्रास्ताविक होती. त्यांचा वर्णही अगदीं निराळा असावा. पण ते शेतवाडी करण्यांत प्रवीण म्हणून त्रिवर्णांनीं त्यांचा चवथा वर्ण धरला व त्यांच्यासह चातुर्वर्ण्य बनविलें. सांपत्तिक वांटणीपुरतें हें केलें तरी द्रविडवंशीयांचा म्हणजे शूद्रांचा वंश निराळा होता तो तसाच मानला. आदिद्रविड तर त्यांच्याहूनही निराळे होते, तेव्हां त्यांचा वंश निराळा ठेवला यांत कांहींच नवल नाहीं. पण द्रविडवंशीय हे संस्कृतिप्रवण व धनोत्पादक म्हणून त्यांस एक वर्ग कल्पून त्यांसह चातुर्वर्ण्य बनविलें. सध्यां ज्या ज्या लोकांना शूद्र म्हणावयाची चाल आहे ते सर्व हे द्रविड होत असें मानणें साहसाचें होईल. बुद्धाच्या वर्णविषयक बंडानंतर ज्यांनीं वर्णधर्म न मानावयाचें ठरविलें ते वर्णधर्म मानणाऱ्यांच्या दृष्टीनें शूद्र ठरले. यांत कांहीं क्षत्रिय जातीही कदाचित् गेल्या असतील पण वंशदृष्ट्या त्या क्षत्रियच होत व म्हणून त्यांना क्षत्रियच समजावयास हवें. तर या द्राविडांसह चातुर्वर्ण्यसंस्था निर्माण झाली तरी वंशभिन्नत्वात् त्रिवर्णांनीं आपलें पृथक्त्व कायम ठेवलें व यापूर्वी दिलेल्या व पुढें विस्तृतपणें प्रपंचिलेल्या कारणास्तव त्यांच्याशीं रक्तसंबंध ठेविला नाहीं. यांतही त्यांचें कांहीं चुकलें असें वाटत नाहीं. वन्य,

आदिद्राविड व द्रविड अशा तीनही प्रजा त्यांनीं दूरच ठेविल्या. द्रविडांनींही आदिद्रविडांना वंशदृष्ट्या दूर ठेवलेंच होतें; तेव्हां त्रिवर्णांनीं त्यांना दूर ठेविलें यांत उभयपक्षींही कांहींच वाटण्यासारखें नव्हतें. वांशिक कनिष्ठता त्यांची त्यांस दिसतच होती. पण चातुर्वर्ण्यांत समाविष्ट झाल्यामुळें आर्थिक वांटणीची जिम्मेदारी व ज्या आदिद्रविडांपासून ते आधींपासूनच निराळे होते त्यापासूनही कायमचें निराळेंपण हीं त्यांस आपोआपच लाभलीं. पण आदिद्रविड मात्र अगदीं उघडे पडले असें नव्हे; तर पोटाला मिळावें इतकी व्यवस्था या अर्थवाटणींतही झाली. तथापि कल्पना अशी धावते कीं ही त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था द्रविडांनींच केलेली असावी. म्हणजे गांवगाड्यांत अस्पृश्यांचा प्रवेश हा त्रैवर्णिकांच्याही आधीं झाला असावा. शूद्र हा जमीन कसणारा आणि अतिशूद्र हा त्याचा नोकर. ही स्थिति आर्यांची ढवळाढवळ सुरू होण्याच्याही आधींची असावी. 'ग्राम' ही संस्थासुद्धां त्रिवर्णपूर्वच असावी. तें कसेंही असलें तरी शूद्र व त्यांच्या द्वारा अतिशूद्र हे हिंदुसमाजाचे घटक वनले.

हे सर्व लोक एका हिंदु समाजाचे घटक बनले व यानंतरच्या काळांत देवता व चालीरीति यांच्या देवघेवीनें ते एका धर्माचि वनून गेले. या धर्माचें नांव हिंदुधर्म हें होय. याप्रमाणें आर्थिक व धार्मिक कल्पनांनीं हे सर्व लोक एकाच सांस्कृतिक कक्षेंत दाखल झाले. तरी त्रिवर्णांनीं यांना निराळेंच मानिलें व यांच्याशीं एका धर्माचे असूनसुद्धां लग्नसंबंध केले नाहींत. म्हणजे सधर्मीय असूनसुद्धां त्रिवर्णांपैकीं कोणीहि त्यांच्याशीं कधींहि एका हाडामासाचे झाले नाहींत. असें कां व्हावें याचें इतर धर्मियांना आश्चर्य वाटतें. अथवा खरें म्हटलें म्हणजे त्यांच्यांतील केवळ अडाणी लोकांनाच हें आश्चर्य वाटतें. म्हणून त्यासंबंधीचा खुलासा करतों.

एकाच धर्मांतील लोकांनीं एकमेकांशीं विवाह लावले तरच ते त्या धर्माचे ठरतात हा अपसिद्धांत आहे. आपल्या राष्ट्रीय आपत्तीच्या ज्या अनेक मीमांसा वेळोवेळीं व अनेकांनीं केल्या त्यांत आपण सगळेजण एकमेकांशीं विवाह करीत नाहीं, त्यामुळें असें झालें असे म्हणणारे कोणी निघाले त्यांचें हें मत होतें. चारही खंडांत ख्रिस्ती आहेत पण ते एका धर्माचे आहेत म्हणून सर्व एकमेकांशीं लग्नें करतात असें कोणीं पाहिलें नाहीं. तेव्हां एका धर्माचे असावयास एकाच हाडामांसाचें असावयास हवें असतें

असें मुळींच नाहीं. वरें, एकच धर्ममत सर्वत्र पसरवून देऊन त्याच्या छापेखालीं विविध जातींचीं माणसें आणावीं आणि अशा रीतीनें म्हणजे पारमार्थिक समतेच्या कल्पनाबळावर ऐहिक समता व म्हणून रक्ताची एकी प्रस्थापित करावी असें कोणी ठरविलें तर तें त्यांचें मत सिद्धीस जात नाहीं असा अनुभव आहे. महानुभाव पंथानें हें करून पाहिलें: पण तो पंथच क्षीण झाला; इतका हा प्रयोग त्याला बाधला. लिंगायत पंथानें हें करून पाहिलें; पण त्यांचें पारमार्थिक मत काय असेल तें शिलक राहिलें व जो जातिसंस्था नष्ट करावयाचा त्यांचा हेतु तो सिद्धीस गेला नाहीं. इतकेंच नव्हे तर 'लिंगायत' हें उपपद लावून मूळच्या अनेक जाति त्या पंथांत कायम झाल्या. सध्यां ख्रिस्ती लोकांत काय होत आहे हें पहाण्यासारखें आहे. जेथें ख्रिस्तीकरण स्फुटरूप झालें आहे म्हणून जेथें गल्लतीमुळें लग्नव्यवहाराची अगदींच अडचण पडते तेथें मूळच्या भिन्न जातींतील धर्मांतरितांनीं लग्नें केलीं असतील. त्यांतही उच्चवर्णीय ख्रिस्त्यांनीं नीचवर्णीय ख्रिस्त्यांशीं केलेलीं अशीं फारच थोडीं आढळतील. पण जेथें समाजच्या समाज ख्रिस्ती झाले आहेत व ज्यांत मूळची वर्णभिन्नता फार मोठी, तेथें लोक परस्परांशीं एकरक्त होण्यास नाकबूल आहेत. हा प्रकार इतका प्रबल झाला कीं, "जात ठेवावयास आमची हरकत नाहीं; ख्रिस्ती व्हा म्हणजे झालें" असें प्रतिपादन मिशनऱ्यांनीं करावयास सुरुवात केली! त्यांनीं असें केलें याबद्दल त्यांना दोष देण्यांत येतो. पण हें ओळखावयास हवें कीं मिशनऱ्यांना त्यांच्या जीवात्म्याची काळजी पहिली आहे.समत्वाची किंवा लग्नाची काळजी दुसरी आहे किंवा नाहींही.कारण मुळांतच ख्रिस्ती असलेले पृथ्वीवरचे लोक लग्नदृष्ट्या सर्व एकमेकांस समसमान मानतात हें खोटें असल्याचें त्यांना माहीत आहे. याचा अर्थ असा कीं ख्रिस्ती असूनसुद्धां मूळ जाति-कल्पना अथवा खरें पहातां वर्णकल्पना घालवितां येईल हेंच खरें नाहीं.

नानकानें स्थापन केलेला शीखधर्म हाही समत्वाचा मोठा भोक्ता खरा. पण उच्च वर्णांतून जे शीख झाले ते खालच्या वर्णांतून झालेल्या शीखांत सामील होईनात. त्यांनीं नानकाचें परमार्थमत पत्करलें इतकेंच. आपणांत उच्चनीच भाव नाहींत हा विचार प्रतिपादणारास, उच्चनीच–भावाची कल्पना व वंशविषयक भिन्नत्वाची जाणीव या दोन स्वतंत्र भावना आहेत, ही गोष्ट उमजेना. धर्मदृष्टचा म्हणजे परमेश्वराच्या दृष्टीनें आपण सर्व समसमानच

आहों असें प्रतिपादक म्हणत असतांना श्रेष्ठ लोकही त्यांस येऊन मिळत. पण या उदात्त तत्त्वांतील 'धर्मदृष्ट्या' हें पद वगळून उरलेलें "आपण सर्व समसमान आहों" येवढेंच पद जेव्हां तो घोळूं लागला व "म्हणून आपण रवत संबंधानें एकच व्हावयास हवें" असें बोलूं लागला तेव्हां जवळ आलेले व येणार असलेले लोक बिचकूं लागले. म्हणजे असें कीं, परमार्थ विचारानें म्हणजे एक-धर्मी म्हणून जातिभेद नष्ट करण्याची कल्पना यशस्वी होईना. हा प्रश्न वांशिक आहे हें धर्मसुधारकांच्या ध्यानांत येईना. हें सुधारकांच्या ध्यानीं आलें नाहीं तरी "आपण सर्व समसमान आहों" या वाक्याचा जो लग्नरूप स्थूल संस्कार तो ज्यांच्यावर व्हावयाचा ते मात्र प्रकृत्याच जागरूक राहिले. म्हणूनच आपल्याला गेल्या हजारों वर्षांच्या धर्मविषयक धडामोडींत असा देखावा सर्वत्र दिसतो कीं सुधारकानें समता प्रतिपादावी, तिचा अर्थ पारमार्थिक समता असा प्रथम असावा, तीच लग्नसंबंधापर्यंत त्यानें आणावी व मग लोकांनीं त्याचें तें तेवढें म्हणणें न पतकरतां मान्य झालेल्या तत्त्वाशीं मात्र इमान ठेवावें, व ज्या पंथांत आपण शिरलों असूं त्या पंथाचें नांव मागें घालून आपल्या मूळच्या जातीचें नांव पुढें जोडावें व अशा रीतीनें आपल्या मूळवंशकल्पनेलाही इमानी रहावें आणि हिंदु लोकांची जातिसंस्था मात्र वाढवावी! बौद्ध धर्मानें हिंदु-स्थानांत तेव्हां असलेली जातिसंस्था मोडली हें म्हणणेंही अनैतिहासिक आहे. बुद्धाचें बंड वर्णाधिकाराविरुद्ध होतें, वर्णाविरुद्ध नव्हतें. जैन समाज आपण जाति-संस्था मानीत नाहीं असें म्हणत असला तर तें केवळ कागदोपत्रीचें बोलणें होय.

ख्रिस्ती समाजाची हकीकत फारच गमतीची आहे. नेटिव्ह ख्रिस्त्यांत मूळच्या वांशिक फरकाची जाणीव कशी रहाते व ठेवतात हें मागें सांगितलेंच आहे. पण जे कोणी कसल्या तरी रहाणीनें व संस्करणानें आपला मूळचा रंग बदलून घेऊं लागले ते नेटिव्ह काळ्या ख्रिस्त्यांहून आपण निराळे आहों असें दाख-विण्याची तरतूद करूं लागले व त्यांनीं आपल्याला युरेजियन्स असें नवें नांव घेतलें. म्हणजे हिंदुस्थानांतलेच खरे पण युरोपियांचें संस्करण करून घेतलेले जे आपण ते नेटिव्ह ख्रिस्त्यांहून स्वतंत्र आहों व आपला आणि यूरोपियांचा कांहीं थोडा संबंध आहे असें लोकांनीं या नव्या नांवानें ओळखावें अशी त्यांची इच्छा होती व ती या नांवानें सफळ झाली. खास यूरोपीय अशा माणसांना सरकार-दरबारीं जो मान मिळावयाचा व नोकऱ्याचाकऱ्या मिळावयाच्या त्याच्या

खोलोखालचे या बाबतीतील सर्व फायदे यांनाहि मिळूं लागले. अर्थात् यूरोपियनांच्या अंगाला ते जास्त झुकूं लागले. हळूहळू त्यांची महत्त्वाकांक्षा वाढूं लागली. खास युरोपियनांना अँग्लोइंडियन्स असें नांव पूर्वी असे. तें नांव आपणांस मिळावें अशी टुरटुर या लोकांनीं पुढें चालू केली. होतां होतां सरकारनें ही त्यांची मागणी कबूल केली व यांस वाटूं लागलें कीं आतां आपण व इंग्लंडहून येणारे साहेब लोक एकच होणार. पण सरकारचा हा नवा नामकरणहेतु कळतांच खास युरोपियन्सनीं सांगितलें कीं, यांचा हट्ट आहे तर तुम्ही यांना अँग्लोइंडियन्स म्हणा पण आतांपासून आम्हांला मात्र अँग्लो-इंडियन्स न म्हणतां 'यूरोपियन्स' असें म्हणत जा! याप्रमाणें हे आपल्यांत शिरावयास पहात आहेत असें दिसतांच खास यूरोपियन्स झटकन् दूर सरकले! हेच युरोपियन लोक हिंदू लोकांतील रक्तमिश्रणविन्मुखतेला नांवें ठेवूं लागले. म्हणजे हिंदूजातिसंस्थेचा यांचा पुरेसा अभ्यास झाला नाहीं असें दिसूं लागतें. जातिसंस्थेच्या बुजबुजाटाला कोणी हंसलें व उगाच सटरफटर कारणासाठींही माणसें आपापलीं कोंढाळीं बनवून एकमेकांपासून दूर राहूं लागलीं तर त्यांना हंसावें हें ठीक दिसेल. पण सर्व जगतावर ज्या वांशिक कल्पनेचा व्यापार सर्रहा चालूं आहे ती कल्पना या जातिभेदाच्या अनेक कारणांपैकीं एक आहे हाही विचार जेव्हां ते विसरतात तेव्हां ते चुकतात, असें स्पष्ट म्हटलेंच पाहिजे. त्यांच्या स्वत:च्या संबंधांत ते स्वत: कसा आचार करतात हें दरबारी वागण्याचा पडदा दूर करून पहावयास हवें. अस्सल युरोपियन स्त्रीच्या पोटीं आलेला, बापही अस्सल युरोपियन असलेला पण जर कां आईच्या बदनीतीमुळें यत्किंचितही शामरक्ताचा अंश आपल्यांत आहे असें त्वचेंत दाखविणारा, एकादा अंमलदार असला तर त्याला अस्सल निवडक यूरोपियन स्त्री-पुरुष समाजांत कमी लेखण्यांत येतें हें पुष्कळ लोकांना ठाऊक नसतें. हें त्या समाजाचें वैगुण्य काढण्यासाठीं लिहिलेलें नाहीं. वांशिक कल्पनेचा व्यापार कसाकसा चालला आहे हें दाखविण्यासाठीं लिहिलेलें आहे. सध्यां जी "अँग्लो इंडियन" या नांवानें मोडणारी जात आहे ती ख्रिस्तीच आहे ना? मग जर धर्मानें नेटिव ख्रिस्त्यांची जात व ती एकच आहे तर "नेटिव ख्रिस्ती व आम्ही मिळून एकच मतदारसंघ करा" असें अँग्लोइंडियन्स कां म्हणत नाहींत? ते निराळे कां राहूं इच्छितात?

रक्तानें निराळे म्हणूनच ना? वसती येथचीच कायमची असावयाची आहे तर व खरी "मातृभूमि" जर हीच तर येथल्या ख्रिस्त्यांहून सवतेपणा कां? याचें उत्तर एकच आहे. तें हें कीं, रक्ततः आपण साध्या ख्रिस्त्यांहून निराळें आहों ही त्यांची माहिती व जाणीव. पण याचा खरा अर्थ माहित असतां हिंदू लोकांना हंसण्याची पर्वणी मात्र हेही लोक इतरांबरोवर साधून घेतात.

धर्मकल्पना एक असली तरी आपलें वांशिक पृथकत्व सोडावयास, जर अर्थात् त्या पृथकत्वांत कांहीं वैशिष्टच असेल तर, लोक कवूल होत नाहींत याचें आणखी एक प्रत्यंतर दाखवितां येण्यासारखें आहे. पारशी समाजांत गेलीं कित्येक वर्षें 'ज्युडियन लग्नें' या नांवाचा मोठा व्यावहारिक प्रश्न उभा आहे. पारशी धर्मांत प्रवेश व्हावा असा कित्येकांचा हेतु पारसीकांना माहित झाला. पण पारशी धर्मांत म्हणजे झरथुष्ट्र याच्या धर्मांत प्रवेश करावयाच्या वेळीं, त्याच्या पारमार्थिक मताची गोडी उत्पन्न झाली म्हणून हे इतर लोक त्याचा अंगिकार करावयास उत्सुक झाले असें धरून चाललें तरी, तसें करतांना पारशी समाजांत आपला प्रवेश व्हावा म्हणजे पारशी स्त्रियांशीं आपले विवाह व्हावे, ही वासना या मतान्तरेच्छूंच्या चित्तांत गूढस्थ आहे हें पारशी समाजानें ओळखलें होतें. मत कोणी कोणाचें घेतलें तर त्या मताच्या मूळ संरक्षकांना अभिमानच वाटतो. पण धार्मिक मत हें निराळें असतें व जाति-किंवा-वंश-प्रवेश हा निराळा असतो हें या मतान्तरेच्छूंना समजलें नाहीं. त्यांना वाटलें कीं जातिप्रवेशाचा हेतु जर साधावयाचा असेल तर धर्मप्रवेश केला म्हणजे भागेल. पण पारशी समाजानें या प्रश्नाचा निकाल करण्याचें ठरवून धर्ममत जाणणारांची समिति नेमून झरथुष्ट्र धर्मांत इतरांचा प्रवेश होतो काय याचा खुलासा मागितला; व हा धर्म घेतल्यानें त्या माणसाचा पारशी समाजांत प्रवेश करून घेणें इष्ट आहे काय, या प्रश्नाचा निकाल करण्यासाठीं शास्त्रविशारदांची म्हणजे आधुनिक शास्त्रें पढलेल्यांची समिति नेमून तिजकडून हाहि खुलासा मागितला. शेवटीं सर्वांनीं मिळून असें ठरविलें कीं, ऐहिक भोगासाठीं, सुखासाठीं, धनासाठीं जर कोणी पारशी धर्मांत येण्याची इच्छा करीत असेल तर त्यास घेऊं नये. शुद्ध धर्मतत्त्वाचीच भूक त्याला असली तर त्यास आपल्या धर्मांत घ्यावें. पण जरी अशा शुद्ध हेतूस्तव कोणी झरथुष्ट्रीय झाला तरी त्याला पारशी समाजांत प्रवेश करूं देऊं नये. हें पत-

करून त्याला हा धर्म पतकरावयाचा असला तर त्यानें खुशाल पतकरावा. म्हणजे सर्व पारशी लोक झरथुष्ट्र –धर्माचे हें खरें; पण जो जो झरथुष्ट्रीय असेल तो तो पारशी होतो ही कल्पना चुकीची आहे असें त्यांनीं सांगितलें! याचा अर्थ असा कीं, अमुक एका धर्माचे जे सगळे लोक असतील ते सर्व सजातीय असावे, किंवा व्हावे लागतात, हें मत त्याज्य आहे. सध्यांसुद्धां पारशी स्त्रिया इतरांशीं लग्नें लावण्याची प्रवृत्ति दाखवीत आहेत. यामुळें फार मोठी खळबळ त्या समाजांत चालू आहे व एकादी दुसरी स्फुट व्यक्ति सोडली तर मुख्य समाजस्तंवाचें असें खडखडीत व आग्रहाचें मत आहे कीं असे विवाह होऊं देऊं नयेत.

पुष्कळदां मुसलमानांतील सरमिसळीविषयीं बोलण्याची वहिवाट आहे. मुसलमानी धर्म सर्वांना म्हणजे सर्व मुसलमानांना सारखे लेखतो व म्हणून ते सर्व एकमेकांशीं रक्ततः एक आहेत असें मानतात. याचा अर्थ नीट पाहिला पाहिजे. सर्व मुसलमान सारखे आहेत हें महंमदानें प्रतिपादिलें. हे तरी सारखे कां? तर महंमदाचें जें पारमार्थिक प्रतिपादन त्यावर त्या सर्वांचा सारखा विश्वास असतो म्हणून. परमार्थदृष्ट्या सर्वांची योग्यता सारखी म्हणून, ऐहिक व्यवहारांतही त्यांची योग्यता सारखी असली पाहिजे असा न्याय त्यांनीं पतकरला आहे असें आपण मानतों. पण मुसलमानांची ही समत्वबुद्धि परमार्थ-विचारमूल आहे. कारण त्यांचें परमार्थमत जे कोणी स्वीकारीत नाहींत त्यांच्याशीं आपण सम आहों असें ते मानीत नाहींत. याचा अर्थ त्यांची समत्वबुद्धि परमार्थमतसमत्वावर अवलंबून आहे. आतां महंमदानें जेव्हां हें प्रतिपादन केलें तेव्हां वंशविचार मनांत आणून,माणसा-माणसांत कांहींही फरक ठेवतां उपयोगाचें नाहीं असें त्यानें ठरविलें, असें मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं. त्याचा आवेश एवढाच होता कीं आपलें परमार्थमत ज्यांनीं ज्यांनीं पतकरलें ते सर्व एक व्हावे. म्हणून त्यानें सांगितलें कीं 'तुम्ही सर्व भाऊ भाऊ आहां,' म्हणजे तुम्ही सर्व सारखे आहां. अशा रीतीनें सर्वांना सारखें कल्पिलें, पण ते एकमेकांत सारखें कल्पिलें; ज्यांनीं त्याचें पारमार्थिक मत पतकरलें नाहीं त्यांसही त्यानें सम लेखिलें नाहीं. त्यानें इतरांस काफर ठरविलें व त्यांचें सर्वस्व हिरावून घेण्यांत कांहींच पातक नाहीं असेंही सांगितलें. 'माझें पारमार्थिक मत तुम्ही पतकरा' अशी दरडावणीही त्यानें अनेक राजांना दाखविली. ज्यांनीं हें पतकरलें ते सम

झाले. ज्यांनीं पतकरलें नाहीं ते उध्वस्त झाले. म्हणजे समता परमार्थमतावर ठरली. हें करतांना महंमदाला मानववंशविचार व वंशावंशांतील तरतमभाव हे दोन्ही प्रतीत झाले होते व लक्षांत येऊनही ते घालविण्यासाठीं त्यानें हें प्रतिपादन केलें असें म्हणतां यावयाचें नाहीं. या त्याच्या समत्व–प्रतिपादनाचा उद्देश व अर्थ इतकाच कीं हें मत पतकरणारांचा एक मोठा गट व्हावा; त्याप्रमाणें तो झाला. पण येवढ्यानें ऐहिक समत्व त्यानें प्रस्थापित केलें असें नाहीं. उदाहरणार्थ श्रीमंत व गरीब हा भेद समाजांतून त्यानें घालविला असा त्याचा अर्थ नाहीं. सर्वांना सारखे लेखिले पण राजसत्ता घालविली पाहिजे व लोकसत्ता प्रस्थापिली पाहिजे असें त्यानें सांगितलें असें नाहीं. परमार्थदृष्ट्या जीं मतें केवळ बाष्कळ होतीं तीं टाकावयास लावून त्यानें अर्धबोबड्या लोकांनाही संस्कृतांत आणून सोडलें, इतकेंच. लोक विनाकारण समजतात त्या प्रकारचें समत्व जर महंमदानें प्रतिपादलें असतें तर लोकसत्ता ही प्रथम ख्रिस्ती लोकांत अवतरण्याच्या पूर्वी मुसलमान होत असलेल्या देशांत हजारआठशें वर्षे प्रथम अवतरली असती व कम्युनिस्ट मत हें जर्मनींत गेल्या शतकांत प्रादुर्भुत होण्याऐवजीं तें मुसलमानी देशांत कित्येक शतकांपूर्वींच प्रस्थापितही व्हावयास हवें होतें. पण यांतलें कांहींच झालेलें नाहीं; इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष स्त्रियांचें दास्यविमोचनही आतां व केवळ एका तुर्कस्थानांत होत आहे व तेंही महंमदाचें समत्व कळलें म्हणून नव्हे तर ख्रिस्ती राष्ट्रांच्या शेजार–धर्मामुळें! मग महंमदानें मुसलमानांस समत्व शिकविलें याचा अर्थ काय? याचा अर्थ इतकाच कीं महंमदाला जें कांहीं परमार्थज्ञान झालें होतें तें जे कोणी पतकरतील ते एक म्हणजे सम आहेत असें तो म्हणाला. हें त्याचें म्हणणें ज्यांनीं पतकरलें ते सम म्हणजे एक झाले. हेंच तें महंमदाचें समत्व. हाच समत्वाचा अर्थ भारतवाह्य मुसलमानांना अवगत आहे. सांपत्तिक विषमता वगळली तर वर्णविचारमूल विषमता तिकडे मुळांत नव्हतीच. तेव्हां ती या समत्व–शिकवणीनें गेली असें मुळींच म्हणतां येत नाहीं व म्हणून महंमदाच्या शिकवणीचा अर्थ वर्ण–विषमता घालविणारा असा आहे असेंही ठरत नाहीं.

हिंदुस्थानांत मुसलमानांच्या या म्हणण्याचा काय अर्थ आहे हें पाहिलें पाहिजे. येथें वर्ण हा शब्द वंशवाचकही आहे व धंद्याचा वाचकही

आहे. शूद्र, अतिशूद्र, हे शब्द वंशवाचकही आहेत व धंद्याचे वाचकही आहेत व त्यांत विषमता आहे. वास्तविक त्रिवर्ण हिंदूंत धंद्याचा निराळेपणा आहे इतकेंच, दिषमपणा आहे असें म्हणवत नाहीं. शास्त्राप्रमाणें धंद्यांत वदल करतां येत नाहीं म्हणून मनस्ताप वाटण्यासारखें आहे हें खरें आहे. पण विषमपणा नाहीं. पण शूद्रातिशूद्र यांची बाव मात्र विषमपणाचीच आहे. चांगला धंदा त्यांना करूंच द्यावयाचा नाहीं अशी ही पद्धत आहे. पण मुसलमानांत तसें नाहीं. कोणी कोणचाही धंदा करावा असें आहे. त्यामुळें मुसलमान म्हणतात कीं आमच्यांत समत्व आहे. जो आमच्यांत आला तो इतरांसारखाच झाला. त्याच्यांत काय वकूब असेल तो त्यानें दाखवावा. ही वकूव दाखविण्याची संधि त्याला मिळते, म्हणजे त्यांचा समाजधर्म यांच्या आड येत नाहीं, हा मोठाच फायदा त्याला होतो. मुसलमान लोकांत समत्व आहे या वाक्याचा अर्थ हा इतका आहे; व इतकाच आहे असें वाटतें. लग्नसंवंधांतसुद्धां समत्व आहे कीं काय म्हणजे त्यांच्यांत बेटीव्यवहार कसाही होतो कीं काय हें पाहिलें पाहिजे. आपल्या इकडील मुसलमान म्हणजे बहुतेक सगळे शूद्रातिशूद्रांतूनच बनविलेले आहेत. तेव्हां त्यांना वांशिक पीळ इतकासा रहाणार नाहीं व स्मृतिलोप लवकर होईल हें उघडच आहे व म्हणून त्यांच्यांत रक्ताची सरमिसळ लवकर होत असेल यांत कांहींच शंका नाहीं. आतां उच्च वर्गांतून बनविलेले मुसलमान त्या मानानें फार कमी व त्यांना जर लग्नें व्हावयास हवीं तर मूळ कल्पना टाकल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. उच्च-वर्णीय कित्येक ख्रिस्त्यांना ज्याप्रमाणें नीचवर्णीय ख्रिस्तिणींशीं विवाह करणें भागच पडतें, तसेंच हें झालें पाहिजे. पण जर कां आपलें स्वतंत्रपण त्यांना ठेवतां येत असेल तर ते ठेवीत असले पाहिजेत असें म्हणावयास वरीच जागा आहे. मलखाना रजपूत हे ३५।४० लाख आहेत व त्यांची बेटीबंद जात आहे. ते इतर मुसलमानांशीं सोयरिकी करीत नाहींत. आपण मूळचे रजपूत आहों व उच्चवर्णीय आहों व म्हणून जर लग्नांची सोय होण्यासारखी आहे, तर स्वत्व कां घालवावें असें त्यांस वाटत असल्यास काय नवल? जर मुसलमानांत रक्तासंबंधीं कसलाही फरक नसता तर या मालखानी रजपुतांचा हा वर्ण-पीळ टिकून राहण्याची कांहींच जरूरी नव्हती. हें या रजपुतांचें उदाहरण अनेकां-पैकीं एक असावें असें वाटतें. मागें एके ठिकाणीं रिस्ले यांच्या मताचा उल्लेख

केला आहे. तो स्वच्छ सांगतो कीं जे जे लोक हिंदुस्थानांत आले व आपण निराळें आहों असें ज्यांस वाटतें ते सर्व वंशदृष्ट्या अलगच राहिले आहेत. व हें सांगून पुढें अशा तीन चार मुसलमान वंशांचीं नांवेंही तो देतो. कोठें चांगलेसें जमल्यास इकडील मुसलमानांशीं हे एकादा विवाह करतात; पण तो अनुलोम असतो असेंही त्याचें म्हणणें आहे. हें लक्षांत घेतलें म्हणजे मुसलमानांत रक्तसंबंधाच्या बाबतींत केवळ समत्व नांदत आहे हें म्हणणें उगाच आहे असें दिसेल. हिंदू लोकांतील त्रिवर्ण हिंदू ज्याप्रमाणें पूर्वी फार झालें तर अनुलोम विवाह करीत पण जर का कोणी प्रतिलोम केला तर खपवून घेत नसत, तसेंच या अरब, पर्शियन, अफगाण, मोगल या कुलांतील लोक एतद्देशीय सामान्य मुसलमानाला आपल्या मुली देत नाहींत. सय्यद हा शेखची मुलगी करील पण आपली त्याला देणार नाहीं. म्हणजे प्रतिलोम पद्धत त्याला सम्मत नाहीं. इतकेंच काय पण परदेशांहून आलेले उंच उंच दर्जाचे जे मुसलमान आहेत ते येथील मुसलमानांशीं विवाह म्हणजे निंद्यच समजतात. अगदींच अडले तर, व दारिद्र्याची बाधा फार असली तर असला विवाह घडेल हें निराळें.

बंगाल्यांतील जे वरिष्ठ दर्जाचे मुसलमान आहेत त्यांना अश्राफ असें म्हणतात; व कनिष्ठ दर्जाचे जे आहेत त्यांना आजलाफ असें म्हणतात. यांतील अश्राफ हे स्वत:स उंची मुसलमान समजतात. व अजलाफशीं लग्न करावयाचें म्हणजे आपत्तीच मानतात. हे उंच दर्जाचे मुसलमान म्हणजे बाहेरून आलेल्या ज्या जेत्या कुळ्या व येथील उंचवर्णीय हिंदूपैकीं जे बाटले त्यांच्या प्रजा होत व कनिष्ठ मुसलमान म्हणजे येथील कनिष्ठ बाटग्यांची प्रजा होय. आश्राफ किंवा अत्राप म्हणजे 'उच्च कुलीन,' आणि अजलाफ म्हणजे 'नीच कुलीन.' या नीचकुलीनांना 'कमीना' किंवा 'इतर' किंवा 'रेझिळ' म्हणजे 'कूचकामी' असेंही म्हणतात. हें त्रिवर्ण हिंदूंचें शूद्रातिशूद्रांशीं जें नातें आहे त्यासारखेंच आहे. पण याच विचार-प्रणालीनें आणखीही पुढें जातां येतें. हे जे बहुसंख्य अजलाफ त्यांच्यांत शेंकडों बेटीबंद पोटजाती आहेत. व त्यांचे पृथक् पृथक् धंदे आहेत. आश्राफ हा तर कधीं नांगराला हात लावणार नाहीं! सय्यद हे धर्मोपदेशकांचें काम परंपरेनें करतात व मोगल व पठाण हे हिंदूंतल्या क्षत्रियांसारखे असतात. कांहीं कांहीं ठिकाणीं तर 'आलझीं' म्हणजे 'नीचतम' या नांवाचाही एक वर्ग आहे व त्यांत हलालखोर, लालबेगी, अब्दाल इत्यादींचा समावेश होतो.

त्यांच्याशीं इतर मुसलमान व्यवहार करीत नाहींत, त्यांना मशिदींत येऊं देत नाहींत व आपल्या मसणवाटींत त्यांचीं प्रेतें पुरूं देत नाहींत! खुद्द आपल्या इकड-च्या मुसलमानांत जाती नाहींत हा प्रवाद खोटा आहे. बोहरी लोकांत कित्येक वर्ग असे आहेत कीं ते एकमेकांत बेटीव्यवहार करीत नाहींत. तसेंच धंदेवाल्या कित्येक जाती बेटीबंदच आहेत. पण या गोष्टीचा जास्त प्रपंच करण्याची कांहीं जरूरी नाहीं. मुख्य वाब अशी आहे कीं मुसलमानांत वांशिक समत्व आहे कीं काय हें पहावयाचें. तें नाहीं, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. धंद्यासाठीं आपआपली जात पकडून ठेवण्याची प्रवृत्ति धर्मान्तरानंतरही मूळच्या हिंदूंनीं ठेविली असेल हें खरें: पण वाहेरून आलेले अरब, पठाण, इत्यादि वंश आपापल्या कुळचा शुद्ध ठेवण्यास जपत असतात हा विचार लक्षांत घ्यावयास हवा व त्याविषयींच आपलें मुख्य विवेचन चालू आहे.

हिंदुधर्मान्तरितांपैकीं जे मूळचे शूद्रातिशूद्र होते त्यांच्याशीं आपला संवंध येऊं नये ही जाणीव श्रेष्ठ मुसलमानांना असते, याचें कारण तरी वंशदृष्ट्या आपण कोणी निराळे आहों असें त्यांस माहित आहे हेंच होय. हें जें या थोर वंशीयांच्या वावतींत अजूनही चालू आहे तेंच त्रिवर्ण हिंदूंनीं फार वर्षांपासून चालू ठेविलें आहे. आपल्या रक्ताला जपण्याची जी तरतूद व दक्षता इंग्रजानें अमेरिकेंत ठेविली, तीच हे त्रिवर्ण हिंदुस्थानांत ठेवीत आले आहेत. पारशी ज्या भयानें इतरांपासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करीत आहेत त्याच भयानें त्रिवर्ण हिंदूही कित्येक शतकें हाच यत्न करीत आले आहेत. मग त्यांनाच येवढा दोप देण्याचें कारण काय? जें सर्व जगताला लागूं तें यांनीं आचरलें म्हणून यांना दोपी ठरवावयाचें हा डाव प्रथम युरोपियन पाद्री लोकांनीं व मग इंग्रज अंमलदारांनीं सुरू केला व त्यांचें ऐकून व त्यांचें बुद्धिवैभव पाहून, आमच्या सुधारकांनीं विनचवकसपणानें गळ्यांत घेतला. तर महंमदानें समता प्रतिपादिली हें म्हणणें त्याची व्याप्ति किती आहे व ती कितपत चालते याचें हें विवेचन केलें. खरी गोष्ट अशी कीं, ही वंशकल्पना महंमदाच्या विचारकक्षेंत आली होती असें वाटत नाहीं. येशूख्रिस्त काय किंवा महंमद काय परमार्थमताचा पुरस्कार करणें हेंच त्यांचें जीवितसार होतें. महंमदानें येशूहून निराळें इतकेंच केलें कीं, "परमेश्वर एक आहे व मी त्याचा प्रेषित आहें" हा दुहेरी सिद्धान्त जे कोणी पत्करणार नाहींत त्यांस काफर ठरवून रसातळास मिळविलें पाहिजे.

ही विचाराची पद्धति त्यानें घातली. ज्या मूळच्याच लुटारू टोळ्या होत्या त्यांच्या आचाराला हें धर्माचें अधिष्ठान मिळाल्यानंतर त्यानीं जो हैदोस घातला त्याची आठवण इतिहास कण्हत कण्हतच सांगत आला आहे. स्वर्गास जावयाचें असेल तर एक तरी काफर हस्तगत केला पाहिजे किंवा मारला पाहिजे असा धर्मनिंच प्रतिपादलेला हिंस्र संदेश कळतांच हा हैदोस जोरानें सुरू व्हावा यांत काय नवल आहे? काफरही मरतो व त्याचें सर्वस्व म्हणजे स्त्री व धन हीं आपलीं होतात हें धर्माच्या आचाराचें सद्यःफल दिसतांच त्याच्या अनुयायांनीं जगतास 'त्राहि त्राहि' म्हणावयास लावावें ही ओघानें येणारीच गोष्ट होती. मुसलमान धर्माचा प्रसार समत्व प्रतिपादनामुळें झाला नाहीं तर विषमत्व प्रतिपादनानें झाला. बरें, धर्मांत समत्व–प्रतिपादलेलें असलें म्हणजे लोक शहाणे, ज्ञानी, राष्ट्रविचारी होतात असें म्हणावयाचें असेल तर इराण, अफगाणिस्थान, तुर्कस्थान इत्यादि देशांत हा धर्म सरसहा चालू असतांच तेथील लोकांच्या मनाला व बुद्धीला इतकी मरगळ आली कीं, चार लुटारू लोकांची पुंडाई सोडून दिली तर सरसहा समाज केवळ निपचित पडून राहावा? खुडूक होऊन पडलेला, दुखणाइत, या वेचक शब्दांनीं तर युरोपीयन लोक या लोकांचा परवापरवांपर्यंत गौरव करीत होते! युरोपांतील ज्ञानें जेव्हां त्यांनीं पतकरलीं तेव्हां आतां त्यांस सद्गति प्राप्त होत आहे. व जर हीं राष्ट्रें आतांपर्यंत स्वतंत्र राहिलीं असलीं तर तीं स्वतःच्या कर्तबगारीवर नव्हे तर सर्वभक्षक यूरोपीय राष्ट्रांना जास्त खाववेना म्हणून व तीं एकमेकांस जास्त खाऊं देईनात म्हणून! येवढ्यानें महंमदाच्या समत्व–प्रतिपादनाचा भ्रम नाहींसा होईल असें वाटतें.

उद्यां सगळेच्या सगळे हिंदूलोक मुसलमान झाले असें मानिलें तरी वर्णकल्पना बुडेल असें मानणें भोळेपणाचें आहे. येशू, महंमद, इत्यादींनीं सद्धर्म प्रतिपादिले पण ते पारमार्थिक मताचे धर्म होते. वंश सांभाळावयास हवा ही कल्पना त्यांना धर्मांत घालता आली नाहीं. कारण ती त्यांच्या परमार्थ–विचारांत त्यांना कधीं सुचलीच नाहीं. व सुचली असली तरी, ती धर्माचा एक भाग करून ठेवावयास हवी, हें तर त्यांना कधींच कळलें नाहीं. आर्य लोकांना हें कळलें होतें. वंश–गल्लतीचे विस्तृत प्रयोग त्यांनीं होऊं दिले व त्याची अपकारक फलश्रुति त्यांना कळून चुकली.

आपण मुळांत जगलों पाहिजे ही विवंचनाच त्यांजपुढें होती. व त्या-साठीं जे जे इलाज करणें जरूर आहे असें त्यांस दिसलें ते ते सर्व त्यांनीं केले आणि सुदृढ अशी वनविलेली सामाजिक घटना धर्मरूप वनविली. कदाचित् अनेक शतकांवर पसरून राहिलेला आरंभी आरंभीचा वंशगल्लतीचा प्रयोग वारकाईनें पाहिल्यावर ही गोष्ट आपल्याला मारक होईल असें त्यांच्या ध्यानांत आलें आणि म्हणून तिजविरुद्ध जे इलाज योजावयाचे त्यांना धार्मिक तत्त्वज्ञानांत स्थान देऊन Self preservation म्हणजे स्वत्वरक्षण हा जो जीव-कोटींतील परमश्रेष्ठ न्याय तो म्हणजेच धर्म असें त्यांनीं ठरवून टाकिलें.परमार्थ-विचारांत अनेक तऱ्हेची चलविचल त्यांनीं केली, देव जवळपास नाहींच, असलाच तर त्याचें शुद्ध स्वरूप म्हणजे निर्विकल्प असें ज्ञानरूप मात्र आहे, येथपासून तों मानव–देहधारी अवतारापर्यंत व तेहतीस कोटी देवांच्या फौजे-पर्यंत जेवढ्या म्हणून कल्पना परमार्थाच्या सूक्ष्म विचारांत किंवा स्थूल विचारांत करतां आल्या तितक्या केल्या; पण हें सर्व होत असतांना सुद्धां वर सांगितलेला व प्रयोगावर सुप्रतिष्ठित केलेला जो स्वत्वरक्षणाचा न्याय, त्यास मात्र हात लाविला नाहीं. तो स्थिर करून, त्याच्या पोषानें जे समाजवृद्धीचे रस उत्पन्न झाले त्यांच्या वळावर साम्राज्यें विस्तारिलीं; खगोल, आयुर्वेद, रसायन, गणित, इत्यादि शास्त्रांत शोध लावले, व्याकरण, व्युत्पत्ति, हीहि वाढविलीं; रणांगणावर चतुरंग दळाची कल्पना स्थिर केली व पृथ्वीवरील सर्व दूरदूरच्या प्रदेशांत आपल्या कलाकौशल्याचे नमुने धाडून पृथ्वीवरील अफाट संपत्ति या देशांत जमा केली. हें सर्व या त्रैवर्णिक हिंदूंना कांहीं विशेष प्रकारच्या सामाजिक व्यवस्थेमुळें, कीं ज्या व्यवस्थेंत अंतर्भूत झालेले तीनहि वर्ग निःसंशय संतुष्ट होते, तीमुळें करतां आलें. हा असा इतिहासाचा घोष असतांना, हिंदू लोकांची वंशशुद्धीची कल्पना दुष्ट आहे असें ठरविण्याचा अट्टाहास कां व्हावा हें ध्यानांत येत नाहीं.

एकाद्या धर्माचे अमूक लोक आहेत आणि म्हणून त्या सर्वांनीं एकमेकांशीं लग्नें केलीं पाहिजेत, हा सिद्धान्त आपण स्वतः न पतकरतां तो लोकांना मात्र लागू असावयास हवा असें जें या इतर धर्मीयांचें मत असतें त्याचें कारण असें कीं क्षुल्लक कारणांनीं सुद्धां पडलेल्या हिंदूंच्या जाति त्यांना माहित झाल्या आहेत, व तीं कारणें क्षुल्लक आहेत हेंही खोटें नाहीं. पण या

कारणावरोबरच्च वंशभेद हेंही कारण आहे हें त्यांस तितकेंच माहित झालेलें नाहीं किंवा झालें असल्यास ते त्याची उपेक्षा करीत असावे. हिंदू लोकांची चूक आहे ती ही कीं, जितक्या जाति येथें आहेत तितके वंश किंवा विशिष्ट गुणधारी रक्तविशेष आहेत असें त्यांस वाटतें. ही कल्पना हिंदु समाजानें त्याज्य ठरविली पाहिजे. पण वंशकल्पना मात्र चूक नाहीं. आपल्याला जे प्रश्न सध्यां इतकेसे उपस्थित नाहींत ते फार पूर्वी येथील आपल्या पूर्वजांना प्रत्यक्ष सोडवावे लागले होते. आणि प्रत्यक्ष सोडविण्याचें काम त्यांस करावें लागल्यामुळें त्यांच्या निर्णयपद्धतींत कांहीं विचारसूत्र होतें असें दिसेल. पण त्याचें मर्म आणखी कांहीं विवेचनानें सुलभ होईल असें वाटतें. पूर्वजांना ज्या अडचणी उत्पन्न झाल्या व ज्या परिस्थितीविशेषांत ते सांपडले होते त्याच अडचणी व तेच परिस्थितिविशेष जगतांत इतरत्र कोठें दिसून येतात कां हें पाहिलें पाहिजे.

दक्षिण अमेरिका हें क्षेत्र या दृष्टीनें पहातां अभ्यासाला फारच नामी आहे. कोलंबसानें मोठें धैर्य दाखवून अमेरिकेचा अनावरण विधि केला हें जगताच्या इतिहासांतील अनेक महत्कृत्यांपैकीं एक होय यांत कांहींच शंका नाहीं. पण त्याच्या अचाट कृत्यांतून अनेक प्रश्न पुढें उद्भवले. पैकीं दक्षिण अमेरिकेच्या वसाहतींचा प्रश्न जो उद्भवला तो प्रस्तुतांस उपयोगी म्हणून पहावयाचा आहे. शूर स्पॅनिश व दर्यावर्दी पोर्तुगीज आपापल्या देशांतून इकडे गेले व तेथचा जितका मुलूख त्यांना वळकावतां आला तितका त्यांनीं तो बळकावला. हें सर्व करीत असतां त्यांची तेथें वसती झाली. पण वसतीला त्यांनीं आपलें खटलें बरोबर घेतलें नव्हतें. सर्व सुखदुःखांची, वैभवांची, उत्कर्षवर्धनाची वाटेकरीण व सर्वांच्याहीवर म्हणजे जिच्या द्वारां वंशविस्तार व्हावयाचा ती घरधनीण त्यांनीं मागेंच ठेविली होती. पुढें जें व्हावयाचें तें झालें. या प्रतापी लोकांनीं तत्रस्थ स्त्रियांशीं लग्नें केलीं. या स्त्रिया असंस्कृत रानटी अशाच होत्या. कांहींनीं या टापूंतील स्त्रियांशीं संबंध ठेवला, कांहींनीं त्या टापूंतील स्त्रियांशीं ठेविला. यांची प्रजा निराळी, त्यांची प्रजा निराळी: त्यांनीं पुन्हां एकमेकांत विवाह केले म्हणजे त्यांची प्रजा निराळीच असें होतां होतां त्या प्रदेशांत अशी स्थिति झाली कीं, मूळच्या युरोपियनांच्या संस्कृतीचा व प्रतापाचा ठाव-ठिकाणाही उरला नाहीं. ते युरोपियन्स तत्रस्थांत विलीन होऊन गेले. आणि

तेथें हरतऱ्हेची प्रजा पैदा झाली. आपलें बीज नष्ट होत आहे हें ध्यानांत येईना. स्पॅनिश व पोर्तुगीज यांचें साम्राज्य दक्षिण अमेरिकेभर माजलें हें खरें, पण ते लोक स्वत: मात्र नष्ट झाले. आणि त्यांची ती अर्धबाडगी प्रजा व तत्रस्थ मूळच्या जमाती यांच्या मिलाफाचे लोक तेथें सध्यां धडपड करीत आहेत. त्यांच्याच्यानें नीट अशी समाजबांधणीही होत नाहीं, राज्यघटनाही होत नाहीं, कलाकौशल्यही वाढत नाहीं व उंच आकांक्षाही धरवत नाहींत. स्पॅनिश व पोर्तुगीज हे ज्यावेळीं दक्षिण अमेरिकेंत येऊन राहिले त्यावेळीं तेथें दोनशें भाषा व एक हजार उपभाषा चालू होत्या; या भाषावाल्यांचे परस्परांशीं संबंध अल्पच असत. त्यांतच ही बाहेरच्या रक्ताची भेसळ आली व शेंकडों लहान लहान गट बनले. यांच्या मागून फरेंच लोक उत्तर अमेरिकेंत गेले. पण त्यांनींही तीच चूक केली. बरोबर आपल्या स्त्रिया नेण्याचें त्यांच्या ध्यानीं आलें नाहीं. स्वरक्ताच्या स्त्रिया व आपण मिळून आपला समाज बनतो व त्या जर सहचारिणी नसतील व म्हणून आपण भलत्याच स्त्रिया करूं तर आपलें वैशिष्ट्य नष्ट होईल हें त्यांस माहित झालें नव्हतें. तेही अमेरिकेंत गेले ते सडेच गेले! पुढें व्हावयाचें तें झालें. तत्रस्थ स्त्रियांशीं यांनीं संबंध केले. आणि शेवटीं आपलें रक्ततेज गमावून तेही तेथीलांप्रमाणें मेंगे बनून गेले! Race Life of the Aryans या पुस्तकाचा कर्ता म्हणतो "Cortez, De Soto, Ponce De Leon, Pizzero, Coronado–left progeny but no successors."सर्व स्पॅनिश व पोर्तुगीज शूर वीरांची अशी स्थिति झाली. 'त्यांना तेथें मुलेंवाळें झालीं पण कुलव्रत चालविणारे पुत्र झाले नाहींत' तेंच या फरेंचांचेंही झालें. पण पुढें इंग्रज हा अमेरिकेंत गेला. त्यानें बरोबर आपली सहचरी नेली व रक्ताची भेसळ होतां होईतों होऊं दिली नाहीं. "It was the Teuton wife that settled the question of race Empire in America" जो हीनाशीं लग्न करील त्यावर बहिष्कार घातला. जर अशीं लग्नें झालीं तर त्यांपासून होणाऱ्या मुलांना मातृसावर्ण्य दिलें! बापाच्या जातींत घेतलें नाहीं. या इंग्रजांनीं ही खबरदारी बाळगून अमेरिकेंत केवढें प्रचंड राष्ट्र बनविलें हें दिसतच आहे. जें इंग्रजानें अमेरिकेंत केलें तेंच उच्चवर्णीय हिंदूंनीं हिंदुस्थानांत इतरांशीं केलें. व त्या बळावर एक बलिष्ठ समाज बनवून विद्या, कलाकौशल्यें, तत्त्वज्ञान इत्यादींची अभिवृद्धि केली. पुन्हां पुन्हां बाहेरून येणाऱ्या लुटारूंना

मारून काढलें व या देशाला 'हिंदुस्थान' म्हणजे हिंदू लोकांचा देश हें नांव परकीयांच्या तोंडींही कायम केलें. हिंदुस्थानचा लौकिक दिगंत झाला; इतका कीं जे यूरोपीय लोक सध्यां हिंदू लोकांना नांवें ठेवण्यांत मोठें भूषण मानतात त्यांच्या पूर्वजांना येथील संपत्तीचा अभिलाष वाटूं लागला. ही सर्व कर्तवगारी करतांना यांनीं अत्रस्थांपासून आपलें स्वत्व जितकें अलग ठेवतां आलें तितकें ठेविलें व जेथें चुका झाल्या तेथें मातृसावर्ण्याचा इलाज करूनच खबरदारी राखिली. प्रथम अशा प्रजेला पितृसावर्ण्य देण्याचीही चाल ठेवून त्यांनीं पाहिलें. पण त्यानेंही आपण खालावतों असें त्यांस वाटूं लागलें. हा आपला वर्णाभिमान त्यांनीं जागृत ठेवला म्हणून त्यांना नांवें ठेवणारांनीं स्वतः काय चालविलेलें आहे? आफ्रिकेंत इंग्रज लोक नवी वर्णपरंपरा उत्पन्न करीत आहेत ना? इतकेंच काय पण नवी अस्पृश्यताही सुरू करीत आहेत ना?

शिवाय त्यांच्या मानानें इतक्या पूर्वीच्या त्रैवर्णिकांच्या अडचणी खरोखर दुस्तरच होत्या. वाहेरून बहिस्थांचे लोंढे सारखे येत होते. त्यांना 'मन्रोडॉक्ट्रिन' पुकारतां येण्यासारखे नव्हते व अत्रस्थांपासून स्वत्व जपावयाचें होतें. हें सगळें करून त्यांनीं हजारों वर्षें साम्राज्यें विस्तारिलीं,अफगाणिस्थानापासून सयामपर्यंत सर्व प्रदेशभर आपलें चक्रवर्तित्व गाजविलें आणि आपल्या अंगांतील प्रखर गुणांची ज्ञानाशीं फारकत होऊं दिली नाहीं. हें सर्व त्यांनीं पूर्वी केलें आहे म्हणून त्यांना अभिमान वाटतो. आज 'अमेरिका' म्हटल्याबरोबर मेक्सिको किंवा चिली असले देश कोणाच्या डोळ्यांपुढें येत नाहींत तर युनायटेड स्टेटस् हाच देश येतो व अमेरिकन म्हटला म्हणजे इतर कोणी मेक्सिकन्, पेरूवियन, चिलियन, असा मनापुढें न येतां अमेरिकेंतील इंग्रजच येतो. हें जसें तसेंच 'हिंदुस्थान' म्हटलें म्हणजे या त्रिवर्ण हिंदूंनीं जो देश एवढा वैभवशाली बनविला तोच आठवतो. अत्रस्थ इतरांनीं तो जसा राहूं दिला होता तसा आठवत नाहीं. व हिंदू म्हटला म्हणजे या वैभवाचे कर्ते जे होऊन गेले त्यांचा वंशज असाच बोध होतो. इंग्रजाला आपल्या वंशाचा हा अभिमान आहे तो त्रैवर्णिक हिंदूंच्या अभिमानाहून निराळा नाहीं. सदर लेखक म्हणतो "In this instinctive pride of race–blood, the Teuton and notably the Anglo–Teuton stands side by side with his Kinsman, the Iranic Parsee and the Brahmanic Hindu." 'या वर्णाभिमानाच्या बाबतींत टयूटन

वंशीय व विशेषतः अँग्लो टचूटन वंशीय लोकांचे सखे म्हणजे इराणीय पारशी व ब्रह्मॅनिक हिंदू हे होत'! अशा या त्रिवर्ण हिंदूंनीं इतिहासांत केलेली कामगिरी अत्यन्त उज्वल आहे. पण कामाचा बोजा फार व तोही फार दिवस उचलून धरावयाचा; यामुळें कालगतीनें तेही दमणें स्वाभाविक होतें. पण आपण पृथ्वीवरील सर्व मोठमोठ्या कर्तबगार मानववंशापैकीं आहों ही जाणीव त्यांना आहे व ते ती कधींही विसरणार नाहींत; इतकेंच नव्हे तर तीच कर्तबगारी पुन्हां दाखविण्याची उमेदही ते अजून धरून आहेत. मुसलमानांचें राज्य झालें खरें; पण तें टिकवावयास त्रिवर्णच कारण झाले व मोडून पाडावयास तेच कारण झाले. इंग्रजांचें राज्य टिकवावयास तेच कारण झाले आहेत व तें उध्वस्त करावयासही तेच कारण होतील. नुसत्या मारामारीची ईर्षा दाखविल्यानें एकाद्या लोकांच्या कर्तृत्वाचें परिमाण ठरतें असें समजणेंही चूक आहे. शरीराच्या धैर्यशौर्याबरोबर मन व बुद्धि यांच्या सामर्थ्याचा प्रकर्ष दिसावा लागतो. व विद्या, शास्त्रें, कला, शोध, इत्यादींचा बौद्धिक अभिलाष असणें व त्यांच्या पोषासाठीं आपलीं मनें त्या मार्गाला लावणें याही गोष्टी कराव्या लागतात. हें सर्व ज्यांच्या ठायीं दिसेल तेच लोक जगतांतील कर्तबगार लोकांच्या मालिकेंत दाखल होतील. त्रिवर्ण हिंदू अशा या मालिकेंत बसण्यास सर्वथा लायक आहेत. जगांतील संस्कृतींची यादी केली तर तींत आमच्या वैदिक अथवा आर्य, म्हणजे हिंदू संस्कृतीचा उल्लेख प्रामुख्यानें व्हावयास हवा. आणि हें जर संभावित, वादातीत व प्रगल्भ अशा पंडितांना मान्य आहे तर त्याबद्दल या त्रिवर्णांना अभिमान कां वाटूं नये व आपण कोणी कर्तबगार लोक आहों आणि म्हणून आपण स्वतंत्रच राहिलें पाहिजे असें त्यांस कां वाटूं नये? 'आपण सर्व सारखे आहों' या भावना-निर्मित प्रमेयापेक्षां 'आपण सर्व सारखे नाहीं' या सृष्टिसिद्ध प्रमेयानेंच माणसाच्या जातीचें एकंदरीनें खरें कल्याण झालें आहे. खरोखर आपण जर सर्व सारखे असतों तर सर्व मनुष्यजात एकाच उंचीची म्हणजे गुणवैभवानें अगदीं ठेंगणीच दिसली असती. कारण मानव्यापैकीं बहुतेक प्रजा तशाच आहेत. कांहीं वंशांचीं माणसें गुणप्रकर्षानें उंच, अतिउंच आहे म्हणून एकंदरीनें मानव्याची उंची वाढली आहे इतकेंच.

या दक्षिण अमेरिकेंत जे अनेक संकर झाले ते खरोखर मननीय आहेतते.

मारून काढलें व या देशाला 'हिंदुस्थान' म्हणजे हिंदू लोकांचा देश हें नांव परकीयांच्या तोंडींही कायम केलें. हिंदुस्थानचा लौकिक दिगंत झाला; इतका कीं जे यूरोपीय लोक सध्यां हिंदू लोकांना नांवें ठेवण्यांत मोठें भूषण मानतात त्यांच्या पूर्वजांना येथील संपत्तीचा अभिलाष वाटूं लागला. ही सर्व कर्तबगारी करतांना यांनीं अत्रस्थांपासून आपलें स्वत्व जितकें अलग ठेवतां आलें तितकें ठेविलें व जेथें चुका झाल्या तेथें मातृसावर्ण्याचा इलाज करूनच खबरदारी राखिली. प्रथम अशा प्रजेला पितृसावर्ण्य देण्याचीही चाल ठेवून त्यांनीं पाहिलें. पण त्यानेंही आपण खालावतों असें त्यांस वाटूं लागलें. हा आपला वर्णाभिमान त्यांनीं जागृत ठेवला म्हणून त्यांना नांवें ठेवणारांनीं स्वतः काय चालविलेलें आहे? आफ्रिकेंत इंग्रज लोक नवी वर्णपरंपरा उत्पन्न करीत आहेत ना? इतकेंच काय पण नवी अस्पृश्यताही सुरू करीत आहेत ना?

शिवाय त्यांच्या मानानें इतक्या पूर्वीच्या त्रैवर्णिकांच्या अडचणी खरोखर दुस्तरच होत्या. बाहेरून बहिस्थांचे लोंढे सारखे येत होते. त्यांना 'मन्रोडॉक्ट्रिन' पुकारतां येण्यासारखे नव्हते व अत्रस्थांपासून स्वत्व जपावयाचें होतें. हें सगळें करून त्यांनीं हजारों वर्षें साम्राज्यें विस्तारिलीं,अफगाणिस्थानापासून सयामपर्यंत सर्व प्रदेशभर आपलें चक्रवर्तित्व गाजविलें आणि आपल्या अंगांतील प्रखर गुणांची ज्ञानाशीं फारकत होऊं दिली नाहीं. हें सर्व त्यांनीं पूर्वीं केलें आहे म्हणून त्यांना अभिमान वाटतो. आज 'अमेरिका' म्हटल्यावरोवर मेक्सिको किंवा चिली असले देश कोणाच्या डोळ्यांपुढें येत नाहीत तर युनायटेड स्टेटस् हाच देश येतो व अमेरिकन म्हटला म्हणजे इतर कोणी मेक्सिकन्, पेरुवियन, चिलियन, असा मनापुढें न येतां अमेरिकेंतील इंग्रजच येतो. हें जसें तसेंच 'हिंदुस्थान' म्हटलें म्हणजे या त्रिवर्ण हिंदूंनीं जो देश एवढा वैभवशाली वनविला तोच आठवतो. अत्रस्थ इतरांनीं तो जसा राहूं दिला होता तसा आठवत नाहीं. व हिंदू म्हटला म्हणजे या वैभवाचे कर्ते जे होऊन गेले त्यांचा वंशज असाच बोध होतो. इंग्रजाला आपल्या वंशाचा हा अभिमान आहे तो त्रैवर्णिक हिंदूंच्या अभिमानाहून निराळा नाहीं. सदर लेखक म्हणतो "In this instinctive pride of race–blood, the Teuton and notably the Anglo–Teuton stands side by side with his Kinsman, the Iranic Parsee and the Brahmanic Hindu." 'या वर्णाभिमानाच्या बावतींत टचूटन

वंशीय व विशेषतः अँग्लो टचूटन वंशीय लोकांचे सखे म्हणजे इराणीय पारशी व ब्रह्मॅनिक हिंदू हे होत' ! अशा या त्रिवर्ण हिंदूंनीं इतिहासांत केलेली कामगिरी अत्यन्त उज्वल आहे. पण कामाचा बोजा फार व तोही फार दिवस उचलून धरावयाचा; यामुळें कालगतीनें तेही दमणें स्वाभाविक होतें. पण आपण पृथ्वीवरील सर्व मोठमोठ्या कर्तबगार मानववंशापैकीं आहों ही जाणीव त्यांना आहे व ते ती कधींही विसरणार नाहींत; इतकेंच नव्हे तर तीच कर्तबगारी पुन्हां दाखविण्याची उमेदही ते अजून धरून आहेत. मुसलमानांचें राज्य झालें खरें; पण तें टिकवावयास त्रिवर्णच कारण झाले व मोडून पाडावयास तेच कारण झाले. इंग्रजांचें राज्य टिकवावयास तेच कारण झाले आहेत व तें उध्वस्त करावयासही तेच कारण होतील. नुसत्या मारामारीची ईर्षा दाखविल्यानें एकाद्या लोकांच्या कर्तृत्वाचें परिमाण ठरतें असें समजणेंही चूक आहे. शरीराच्या धैर्यशौर्याबरोबर मन व बुद्धि यांच्या सामर्थ्याचा प्रकर्ष दिसावा लागतो. व विद्या, शास्त्रें, कला, शोध, इत्यादींचा बौद्धिक अभिलाष असणें व त्यांच्या पोषासाठीं आपलीं मनें त्या मार्गाला लावणें याही गोष्टी कराव्या लागतात. हें सर्व ज्यांच्या ठायीं दिसेल तेच लोक जगतांतील कर्तबगार लोकांच्या मालिकेंत दाखल होतील. त्रिवर्ण हिंदू अशा या मालिकेंत बसण्यास सर्वथा लायक आहेत. जगांतील संस्कृतींची यादी केली तर तींत आमच्या वैदिक अथवा आर्य, म्हणजे हिंदू संस्कृतीचा उल्लेख प्रामुख्यानें व्हावयास हवा. आणि हें जर संभावित, वादातीत व प्रगल्भ अशा पंडितांना मान्य आहे तर त्याबद्दल या त्रिवर्णांना अभिमान कां वाटूं नये व आपण कोणी कर्तबगार लोक आहों आणि म्हणून आपण स्वतंत्रच राहिलें पाहिजे असें त्यांस कां वाटूं नये? 'आपण सर्व सारखे आहों' या भावना-निर्मित प्रमेयापेक्षां 'आपण सर्व सारखे नाही' या सृष्टिसिद्ध प्रमेयानेंच माणसाच्या जातीचें एकंदरीनें खरें कल्याण झालें आहे. खरोखर आपण जर सर्व सारखे असतों तर सर्व मनुष्यजात एकाच उंचीची म्हणजे गुणवैभवानें अगदीं ठेंगणीच दिसली असती. कारण मानव्यापैकीं बहुतेक प्रजा तशाच आहेत. कांहीं वंशांचीं माणसें गुणप्रकर्षानें उंच, अतिउंच आहे म्हणून एकंदरीनें मानव्याची उंची वाढली आहे इतकेंच.

या दक्षिण अमेरिकेंत जे अनेक संकर झाले ते खरोखर मननीय आहेतते.

तेच प्रश्न जेथें जेथें उद्‌भवले तेथें तेथें त्यांचीं स्वरूपें एकसारखींच रहात आलीं आहेत. पुढील संकर वाचले म्हणजे आपस्या शास्त्रांतील पांचपन्नास संकर जातींचा चांगला खुलासा होतो.

मिश्र जाती

१ गोरा + इंडियन = मेस्टिझो
२ गोरा + नीग्रो = म्युलॅटो
३ नीग्रो + इंडियन = झँमो
४ पोर्तुगीज + इंडियन + नीग्रो = मेटिस
५ म्युलाटो + गोरा = क्वाड्रून
६ क्वाड्रून + गोरा = ऑक्ट्रून
७ म्युलाटो + म्युलाटो = कास्कॉस
८ म्युलाटो + नीग्रो = सँबो
९ सँबो + नीग्रो = मँगो
१० ऑक्ट्रून + गोरा = मुस्तिफी
११ मुस्तिफी + व्हाइट = मुस्तिफिनो. (" C. B. Davenpost ")

यु. स्टे. मध्यें उत्तरसंस्थानांत गोरा व नीग्रो यांच्या लग्नाला प्रतिबंध कायद्यानें नसला तरी लोकमत खडखडीत विरुद्ध आहे. पण दक्षिण–संस्थानांत अशा लग्नाला कायद्यानें प्रतिबंध आहे.

तेथें वर्ण हा कायम आहे व वर्णानुसार सर्व चढउतार आहेत.

१ गावठाणें, आगगाडी, ट्रॅमकार यांत नीग्रोंना निराळे करतात.

२ कायदा नांवापुरता एक आहे. फरक करतात.

३ शाळा व चर्चे कीं जीं गोऱ्यांचीं आहेत, त्यांत त्यांस घेत नाहींत.

४ चाकर म्हणून गोऱ्याच्या घरांत ते जाऊं शकतात.

५ पोटभेद वर्णभेदावर आहेत. व ते एकमेकांपासून अलग आहेत. जितका गोरा व नीग्रो तितकाच म्युलोटो व नीग्रो एकमेकांपासून दूर रहातो. अलीकडे म्हणजे १०, २० वर्षांत कांहीं बदललें असल्यास न कळे. पण परवांपरवांपर्यंत हे प्रकार सरसहा चालू होते.

हेच प्रकार हिंदुस्थानांत झाले व शिल्लक राहिले. ही वंश–जाणीव आमच्या

समाजघटनेच्या बुडाशीं आहे हें आम्ही विसरलों नाहींच. पण इतरांनाही अभ्यासामुळें ती मान्य करावी लागली आहे. प्रसिद्ध पंडित रिस्ले म्हणतोः—

" हिंदुस्थानांत बौद्धांनीं ठेविलेलीं स्मारकें पुष्कळच आहेत. त्यांपैकींच सांची येथील प्रचंड स्तूप हेंही एक आहे. त्याच्या एका भितीवर एका धार्मिक विधीचें चित्र कोरलेलें आहे. या चित्रांत पानाफळांनीं गजबजलेल्या वृक्षांच्याखालीं एका लहानशा समाधीपुढें बसून तीन स्त्रिया नमन करीत आहेत असें दाखविलें आहे. यांनीं अंगांत घट्ट कुडतीं घातल्यासारखीं दिसतात. तेथेंच पुढें एक वानरांची टोळी असून तिचा म्होरक्या आपल्या हातांतील कशानें तरी भरलेलें पात्र त्या समाधीपुढें ठेवण्यासाठीं वांकला आहे. त्याचा चेहरा मोठा गंभीर असून त्याचे संवगडीही कांहीं चमत्कारिक भक्तिभावाचें चलनवलन करीत आहेत असें दिसतें. व त्यावरून त्यांची पूज्यबुद्धि, भक्ति व नम्रता हीं व्यक्त होतातसें दिसतें. मागल्या अंगास चार भव्य मूर्ती उभ्या आहेत, दोन पुरुष व दोन स्त्रिया, हीं सर्व माणसें चांगलीं उंच असून त्यांचे नाकडोळेहि जेथल्या तेथें आहेत. त्यांच्या अंगांत मोठे पायघोळ पोषाख असून पागोटींहि विशेष कलाकुसरीनें बांधलेलीं आहेत. हे लोक त्या वानरांची चाललेली पूजा पाहून मोठे खूप झाले आहेत असें दिसतें. आजपर्यंत असल्या गोष्टींचा अभ्यास करणारांनीं या चित्राकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. किंवा दिलें तर बुद्ध चरित्रांतील हा एखादा प्रसंग असावा असें मानिलें. पण आर्य लोकांची अत्रस्थ द्रविडांकडे पाहण्याची जी वंशदृष्टि तीच या खोल कामांत व्यक्त झाली आहे असें मानिलें तर या देखाव्याला निराळेंच महत्त्व आहे असें वाटेल. ही वरिष्ठपणाची वांशिक जाणीव हिंदी लोकांच्या जीवितांत सारखी दिसत आली आहे व ती यत्किंचितहि कमी न होतां अजून टिकून राहिली आहे. या दृष्टीनें पाहिलें तर लंकेवर स्वारी करावयास वानरसैन्यानें रामाला मदत केली ही जी कथा तिच्या सारखाच काहीं प्रकार या चित्रांत दिसतो. त्यावरून इतकेंच दिसतें की हे उच्च वंशीय लोक त्या हलक्या लोकांशीं मित्रभावानें वागत आहेत, पण उभयतांच्या माणुसकींत जो मुळांतच फरक आहे त्याची यांना तीक्ष्ण जाणीव आहे आणि म्हणून चाललेल्या पूजाविधींत सामील न होतां त्या वानरांना सहानुभूति दाखवावयास म्हणून केवळ भलेपणानें त्यांजकडे पहात उभे आहेत. × × × × ×

या खोदकामांत जो वांशिक श्रेष्ठपणा व्यक्त झाला आहे त्याला मुळांत भक्कम आधार आहे. व हा आधार आधुनिक शास्त्रपद्धतीनें सिद्ध होतो. हीच वांशिक फरकाची जाणीव हिंदुस्थानांतील जातिभेदाच्या मुळाशीं आहे. अजूनहि तिच्यामुळेंच—मग ही जाणीव कोठें कल्पित असो किंवा कोठें परंपरा-प्राप्त असो—जातिसंस्थेचीं अगदीं आधुनिक रूपेंसुद्धां सिद्ध झालेलीं आहेत. आणि शेवटीं ज्या जातींत हें उच्चवंशीयत्व आहे त्या जाती या वंश-जाणिवे-मुळेंच अजूनहि त्यांतल्या त्यांत शुद्ध राहिल्या आहेत. ''

वंश आहेत, व आहेत म्हणूनच ते तसे राहूं देणें, किंवा राहूं दिलेले असणें न्याय्य आहे असें येथें प्रतिपादावयाचें नाहीं. तर शुद्ध ठेविल्यानेंच संस्कृति-संवर्धन झालें आहे व न ठेविल्यानें झालें नाहीं व झालें नसतें, म्हणून वंशजपणुकी-ची कल्पना न्याय्य आहे असें प्रतिपादावयाचें आहे. त्रिवर्ण हिंदूंना इतरांनीं या त्यांच्या जपणुकीबद्दल इतकें हिणविलें आहे व धूर्त राज्यकर्त्यांनीं लटक्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा आणि औदार्याचा आश्रय करून त्यांस इतका जाच केला आहे कीं, ताठ मान करून ''हो हो असें केलेलें आहे. त्यांत कांहीं चूक नाहीं तुम्हीं हेंच करीत आहां आणि तुमचे वाडवडीलही हेंच करीत होते'' असें खडसावून सांगण्याची वेळ आतां आलीच आहे. हा वैचारिक निर्भयपणा आपण आतां धरलाच पाहिजे. जें केलें त्यांत जर इतिहासदृष्ट्या कांहीं एक चूक नाहीं, व इतर चार चौघांसारखेंच केलें आहे, तर तें केलें असें ठासून सांगण्यास कांहींच हरकत नाहीं. हिंदुस्थानाला हिंदुस्थानपणा कोणीं दिला? हजारों वर्षें डोंगरकठडीला राहून, नाहींतर झाडपाल्याच्या आड लपून, उंदीरघुशींवर नाहींतर पाल्यापाचोळ्यावर ज्यांनीं गुजारा चालविला आहे, अशा संताळांनीं, कां गोंडांनीं, कां भिल्लांनीं, त्याला हिंदुस्थानपणा दिला? नंदनवनासारखीं परम रमणीय वनें, गंगायमुनांच्या विशाल खोऱ्यांसारखीं अत्यंत सुपीक मैदानें, ठिकठिकाणीं पृथ्वीच्या पोटांत गुप्त असलेलीं सुवर्णादि-खनिजें, सुगंधित मसाल्यांनीं भरलेलीं समुद्रतीरें, अशा प्रकारच्या लोभनीय वस्तूंनींही ज्यांच्या कर्तबगारीला स्फुरण आलें नाहीं आणि मानवी मनबुद्धीचा मुख्य गुण जो, कीं आपल्या सामर्थ्याचा आविष्कार हर-तऱ्हांनीं करून माणसाचें जीवित प्रतिदिवशीं उन्नत करीत जावें, तो ज्यांना दाखविता आला नाहीं त्यांनीं या हिंदुस्थानदेशाला सौभाग्य प्राप्त करून

दिलें काय? ज्यांना गंभीर विचार सुचवावयास हिमालयही अपुरा पडला, ज्यांच्या मनांत विचाराला जन्म व गति देण्यास सिंधूच्या आणि गंगेच्या विशाल व अखंड प्रवाहांतील खळखळाटही तोटका झाला, प्रत्यक्ष दंडकारण्यांत राहूनही ज्यांना समाजदंडनाची कल्पना सुचली नाहीं, गोंडवनांत राहूनही मनाला सौंदर्य-मोहाची बाधा होऊन ज्यांना काव्य स्फुरलें नाहीं, आणि वर नीलवर्ण आकाश आणि त्यास भेटलेल्या उत्तुंग नीलगिरीवर वस्ती असें असूनही ज्यांना परमेश्वराच्या शुद्ध स्वरूपाची कल्पना आली नाहीं, त्यांची मानुपता अगदींच प्राकृत असली पाहिजे हें खरें नाहीं काय? असले लोक काय करूं जाणत? सर्व ऐहिक उत्कर्षाची श्रीमंती व सर्व परमार्थ-तत्त्वविचार यांच्या लग्नाची मिरवणूक मोठी आतषबाजी करीत दारापुढून आज कित्येक वर्षे चालली असतांना तिच्याकडे डोळे दिपत दिपत पहाण्या-पलीकडे ज्यांच्या मनांत् नव्या ऊर्मी उत्पन्न होईनात त्यांचीं मनें पुरेशीं तरळ व परिस्थितीला जाब देणारीं नव्हतीं हें स्पष्ट नाहीं काय? या लोकांचें पाणी त्रिवर्ण लोकांनीं उत्तम जोखलें. आसाम, गोंडवन, सातपुडा, सह्य, हिमा-लयाच्या दरडी, इत्यादि प्रदेशांत मिळून कोट्यवधी लोक असे आहेत कीं, ज्यांना संस्कृत जीवनाची तोंडओळख अजूनही झालेली नाहीं. त्रिवर्णिकांनीं यांच्याशीं समत्व ठेवावयास हवें होतें काय? इंग्रज म्हणत असेल कीं असें करावयास हवें होतें; पण तें परदुःख शीतळ म्हणून! त्याच्यावरच जेव्हां हे प्रसंग आले तेव्हां तो क्रूर लांडग्यासारखा वागला व जेथें सध्यां येत आहेत तेथें तो फार झालें तर साळसूद हन्तकासारखा वागत असतो. हे लोक आपल्याशीं एक होऊं देणें हें त्रिवर्णांना प्राणान्तकच ठरलें असतें. पण हे एकमेकांत तरी एक झाले काय? एका नागांत शेकडो जाती. ही जात-कल्पना यांना कोणी शिकविली? ब्राह्मणानें जात आणली असें एक कुभांड मोठेंच चलन पावलें आहे. या नागांना जातिकल्पना शिकवावयास कोणचा ब्राह्मण गेला होता? गोंडांना ती कोणी शिकविली? तेथपर्यंत ब्राह्मण पोंचला नाहीं व त्यांना हिंदूसमाजांत त्यानें अन्तर्भूत करून घेतलें नाहीं ही तर आधुनिक तऱ्हा आहे! मग त्यानें जातिकल्पना त्यांना केव्हां पढविली? खरी गोष्ट अशी आहे कीं, जातीचें Tribal म्हणजे जमातीचें रूप हें त्या त्या लोकांच्या सुधारणा-युगाच्या आरंभीं सर्वत्रच होते. ही जमातीची जाणीव,

निर्वाहाचें एकेक साधन पकडून ठेवण्याची तत्परता, व भौगोलिक गटांची स्वसंरक्षणाची तरतूद, यांनीं शूद्र, अतिशूद्र, व रानट या लोकांत जातिकल्पना उत्पन्न झाली व दृढ झाली. ती त्यांना कोणी जाऊन सांगावी लागली हें बोलणें उगाच आहे. त्रैवर्णिकांत जाति कां झाल्या याचें विवेचन मागें आलें आहे पण शूद्रातिशूद्र व वन्य यांच्याविषयीं हें सांगितलें. या वन्य जातींचीं मनें हिंदूंच्या समाजतत्त्वज्ञानानें मेलीं असेंही म्हणतां येत नाहीं. शूद्रातिशूद्रांचीं मनें मात्र तशीं मारलीं हें खरेंच आहे, तें निर्भयपणें मान्य केलेंच पाहिजे. पण वन्यांचीं मनें मारलीं हें खोटें आहे. कारण तें तत्त्वज्ञान तेथपर्यंत कधीं पोचलेंच नाहीं. असो; तर अशा लोकांपासून दूर रहाण्याची त्रिवर्णांनीं तरतूद केली यांत कांहींच चुकलें नाहीं व ही तरतूद त्यांनीं धर्म-कल्पनेच्या अधिष्ठानावर बसविली हा तर त्यानीं समाजशास्त्र–विचाराचा सर्वोत्तम मान केला असें म्हणावयास हवें.

जें वन्य जातींच्यासंबंधानें वर म्हटलें आहे तेंच द्रविड व आदिद्रविड यांच्या संबंधानें थोडचा कमी अर्थानें पण म्हणावयास हवें. द्रविड हे शेती करीत, व ज्या आदिद्रविडांपासून त्यांनीं ही शेती बळकावली होती त्यांस त्यांनीं आपले चाकर बनविलें होतें. अर्थात् श्रेष्ठकनिष्ठ भावाचा उदय व कदाचित् अस्पृश्यतेचाही उदय आगाऊच झालेला होता. पण हे दोघेही या नवागत आर्य-कुलोत्पन्नापेक्षां हीन संस्कृतीचे होते हें मत अनेक युरोपीय पंडितांनीं प्रतिपादलेलें आहे व तें सर्वथा ग्राह्य आहे. त्यांतल्या त्यांत द्रविड हे उन्नत इतकेंच. तेव्हां या उभयतांशीं प्रसंग येतांच यांचें मन–बुद्धि–वैभव काय आहे याचा प्रयास आर्यकुलोत्पन्नांनीं जरूर तेवढा काळ घेऊन केला व त्यांच्यापासूनही दूर रहाण्याचें ठरविलें. त्रिवर्ण असा एक गट तदितरांशीं सापेक्षतेनें ध्यानांत घ्यावयाचा आहे. शूद्रातिशूद्रांना क्षुद्र लेखण्यास त्रिवर्णांपैकीं प्रत्येक वर्ण स्वतंत्रपणें मान्यता देत आला आहे. व म्हणून त्यांच्यांतील पोटभेद हा जरी लक्ष्य विषय असला तरी प्रस्तुत पहावयाचें जें आहे तें हें कीं अतिशूद्रांशीं या सर्वांचें जें केवळ एकरूप वर्तन झालें तें कां झालें. अतिशूद्रांच्या कोणच्या आचारामुळें त्यांच्यासंबंधीं ही शिसारी त्रिवर्णांना बसली हें कल्पनेनें जाणतां येतें. असो. आतां त्रिवर्णांपैकीं कोणीच शेती करीत नसत हें खरें नाहीं. शेतीच्या बाबतींत ते सर्वस्वीं शूद्रावरच अवलंबून नव्हते. त्यांच्यांतील प्रत्येक

वर्गांतील कांहीं भाग शेतकी करीतच असले पाहिजेत कारण सगळेच ब्राह्मण मंत्र म्हणत बसत नसले पाहिजेत, सगळेच क्षत्रिय रोजच्या रोज कापाकापीच करीत नसले पाहिजेत, व सगळेच वैश्य दुकानें घालून बसले नसतील. म्हणून शेतीवर काम करणाऱ्या त्रैवर्णिकांचा सुद्धां आदिद्रविडांशीं प्रसंग येतच असला पाहिजे. त्रिवर्ण हिंदू हे जमीन नांगरणारे म्हणून तर त्यांना आर्य (शेत नांगरणारे) हें नांव पडलें असेंही कित्येकांचें म्हणणें आहे. पण हें जास्त खरें आहे कीं सामाजिक वाटणीप्रमाणें शेतीचें काम वैश्याकडे होतें व म्हणून त्यांच्याशीं आदिद्रविडांचा संबंध फारच येत असला पाहिजे. व म्हणून वंश-संकराचें भयही उत्पन्न होणें अपरिहार्य होतें. तें नाहींसें करण्यासाठीं हा अस्पृश्यतेचा दंडक त्रिवर्णांनीं घातला यांत कांहीं एक शंका नाहीं. शिवावयाचेंच नाहीं, शिवल्यास धर्मदृष्ट्या पातक आहे ही कल्पना कायम करून टाकण्यांत आली. पण यांत एक गोम अशी आहे कीं जर शूद्र म्हणजे द्रविडवंशी प्रजा या आदिद्रविडांशीं प्रथमपासून शिवून काम करीत असत्या तर ही अस्पृश्यतेची नवी चाल त्यांनीं उचलली नसती. मग ती आगाऊच होती असें म्हणावयाचें काय? द्रविडांनीं आपलें रक्षण आदिद्रविडांपासून कसें केलें? ते त्यांच्या-पासून निराळे राहिले होते याबद्दल शंकाच नाहीं. ते त्यांच्यांतच मिसळले असते तर शूद्रांशींही संबंध ठेवण्यास म्हणजे त्यांचा अन्तर्भाव चातुर्वर्ण्यांत करण्यास त्रिवर्ण कचरलेच असते. पण या बाबतींत निश्चित असें कांहीच बोलतां येत नाहीं. एक विचार मात्र बिनहरकत सुचवावासा वाटतो: तो हा कीं अस्पृश्यतेची चाल कदाचित् द्रविडांनींही घातलेली असावी व ती आर्यांनीं उचललेली असावी. पण आर्यांनीं ती उचलेली असो कीं सुरू केलेली असो, धार्मिक अधिष्ठान देऊन तिला कायमपणा त्यांनीं आणला यांत कांहींच शंका नाही. अशा प्रकारें संस्कृतांना एक करून व ज्यांशीं संबंधच नको असें वाटलें त्यांस धर्मदृष्ट्या दूर ठेवून, शूद्रासह त्रिवर्णांनीं एक प्रचंड संघटना निर्माण केली व आदिद्रविड गावकींत, निदान शेतींत, आधींच प्रविष्ट म्हणून त्यांस सरहद्दी-वर ठेवून घेतलें. हें प्रकरण आणखीही पुढें जाऊन पहातां येण्यासारखें आहे.

द्रविड किंवा आर्य म्हणाले खरें कीं, तुम्ही अस्पृश्य आहां, पण ज्या आदि-द्रविडांस त्यांनीं हें नांव दिलें त्यांनीं हें पतकरलें कसें याचें नवल वाटतें. इतक्या आपत्ति असूनसुद्धां व त्या इतकीं वर्षें सहन करूनसुद्धां आजही त्यांची लोकसंख्या

त्यांच्या पुढाऱ्यांच्या मताप्रमाणें तरी पांच कोटी आहे. जेव्हां ही अस्पृश्यता सुरू झाली तेव्हां ती याच मानानें कांहीं तरी असणार. चतुर्वर्णांचीही संख्या-च्या मानानेंच कांहीं तरी असणार. मग या इतक्या आदिद्रविडांनीं ही आपत्ति कशी पतकरली याची कल्पना होत नाहीं. त्यांनीं बंड कमें केलें नाहीं ? आम्हांला तुम्ही कोण अस्पृश्य म्हणणार असें त्यांनीं या चतुर्वर्णांना कसें चमकाविलें नाहीं? आम्हीच तुम्हाला परत अस्पृश्य मानतों असा उलटा डाव करण्याचें यांच्या मनांत कसें आलें नाहीं? चतुर्वर्णांनीं 'अस्पृश्यता' हा धर्मच आहे असें ठरविलें असलें तरी तें त्यांचें त्यांच्यापुरतें खुशाल ठरलें असतें. पण आदिद्रविडांनीं हें कां पतकरलें? तेंच तेंच ऐकून त्यांचीं मनें मेलीं असतील व देवानेंच आपल्याला असें जन्माला घातलें आहे असला निर्बळ विचार त्यांनींही पतकरला असेल हें खरें. पण हें नाइलाजानें पतकरावयाचें ज्ञान पुढें केव्हां तरी आलें. प्रत्यक्ष ही अस्पृश्यता आली त्यावेळीं प्रति-कारबुद्धि कशी उद्भवली नाहीं हा प्रश्न आहे. प्रतिकारबुद्धि उत्पन्न झाली नसली किंवा इतक्याही लोकांना ती सडकून दाखवितां आली नसली तर एकच अनुमान निघतें तें हें कीं त्यावेळीं त्यांचीं मनःसामर्थ्यें अगदीं सामान्य दर्जाचीं असलीं पाहिजेत. नाहींतर कोण कुणाचें ऐकतो? हे लोक जर अगदीं थोडे असते तर ही धर्माच्या नांवाखालची जबरदस्ती कदाचित् चालली असती; ण त्यांची संख्या केवढी आहे व म्हणून मागें त्या त्या मानानेंच असली पाहिजे ई पाहिलेंच आहे. जे रानावनांत राहिले व अजूनही तेथें राहिलेले आहेत त्यांचें गळेंच निराळें; त्यांनीं हिंदू लोकांच्या संस्कृतीकडे अजूनही अर्धवटच पाहिलेलें आहे. पण जे नजीक वागले व चतुर्वर्णांचे प्रताप पहात होते त्यांना ही प्रतिकाराची बुद्धि होऊं नये हें विस्मयकारक असून शिवाय त्यांच्या तेव्हांच्या मनःसामर्थ्याचें सूचकही आहे. संकर होऊं द्यावयाचा नाहीं येवढ्यासाठीं, ज्याच्याशीं तो होऊं द्यावयाचा नाहीं त्यास अस्पृश्यच लेखलें पाहिजे असें तरी चतुर्वर्णांनीं हटकून कां ठरविलें हेंही चमत्कारिकच आहे. शूद्राशींही त्रिवर्णांना संकर नको होता. पण त्यांना त्यांनीं अस्पृश्य मानिलें नाहीं. त्यांचा त्यांनीं एक निराळा वर्ण केला इतकेंच व वर्णसंकर करूं नये असें ठरविलेलें ज्ञान त्यालाही लावलें. तसाच आदिद्रविडांचाही वर्ण कल्पितां आला असता व वर्णसंकर करूं नये हें ज्ञान तेथेंही लावून दाखवितां आलें असतें. पण त्यांनीं

त्यांचा वर्ण वगैरे कांहीं न करतां त्यांस एकदम अस्पृश्यच लेखिलें, तें कां ? त्यांच्या चालीरीति, संवयी, प्रवृत्ति हीं वैरभाव उत्पन्न होईल अशा प्रकारचीं होतीं काय? त्यांनीं प्रथम द्रविडांशीं व मागून त्रिवर्णांशीं झगडा केला व ते पराभूत झाले अशी जरी कल्पना केली तरी पराभूत शत्रूला अस्पृश्यच करून ठेवलें पाहिजे असें चतुर्वर्णांना कां वाटलें? पराभूत शत्रूही थोडया इतमामानेंच राहिले व आपलें स्वत्व त्यांनीं कांहीं विशेष संघटनानें जागृत ठेविलें असेंही येथें कांहीं दिसत नाहीं. असो. एक गोष्ट खरी कीं हिंदुधर्म व समाज हे मुळांत वंशकल्पनेवर स्थिर केलेले आहेत. व तोच विचार हिंदु समाजाच्या अनेक उलयापालथींत खेळत राहिला आहे.

"आज ज्यांना डिप्रेस्ड् किंवा अस्पृश्य म्हणण्याची चाल आहे ते आपल्या पैकींच होते. आपण त्यांच्यावर उगाच तोहमत आणली व त्यांना अस्पृश्य वनविलें. त्यांचें आपलें रक्त एकच आहे." इत्यादि प्रवाद चांगल्या चांगल्या माणसांनीं केलेले आहेत. हें सर्व दुर्मत आहे. कारण तें अनैतिहासिक आहे. पोथींतील चारदोन नांवें सांगितल्यानें येवढया विशाल प्रश्नाच्या वुडाशीं जाऊन आपण पाहिलें आहे असें होत नाहीं. आपल्याचपैकीं माणसांना माणुसकीच्याही बाहेर लोटावयास चतुर्वर्ण हिंदू कोणी हैवान होते काय? ज्यांचें मनोवैभव अन्य वावतींत इतकें उंच दिसतें त्यांनीं स्वकीयांना तरी असा मारक वहिष्कार घालावयास कां तयार व्हावें? त्यांनीं असें काय घोर पातक केलें होतें कीं ते आपल्यापैकींच असतांना चतुर्वर्णांनीं त्यांना अशा गर्तेत लोटावें? आणि तेंही केवढया वहुसंख्य प्रजेला! तेव्हां "हें लोक आपल्यापैकींच होते" इत्यादि कल्पना केवळ उत्साहभर–निर्मित होत. वास्तविक पहातां वरून येणाऱ्या अनेक लोकांच्या व अत्रस्थ जे कोणी मूळचेच होते त्यांच्या अवशेषांनीं आणि प्रस्तरणांनीं हा हिंदुसमाज वनलेला आहे. या सर्वांचा अन्वय जितका चांगला वसवितां येईल तितका वसविण्याचा यत्न आपण सर्व करीत आहों. हा करतांना इतिहासाचा झाला तर उपयोगच होईल. नवा इतिहास उत्पन्न करून मूळच्या दलदलींत आणखी चिखल माजविण्याची कांहींच जरूरी नाहीं. आजवर प्रसिद्ध झालेलें भारतांतील जातिवाङ्मय वाचलें तर इतकें स्पष्ट दिसून येतें कीं अर्वाचीन संशोधकांनीं हिंदुसमाजांतील व अर्धवट हिंदुसमाजांतील माणसांचे जे हिशेव केले आहेत तेच ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्य-

—अतिशूद्र—वन्य इत्यादि शब्दांनीं आपल्या पूर्वजांनीं व्यक्त केले आहेत. आधुनिकांना भौतिकशास्त्रांचा आधार असला तर प्राचीनांना कुलनिर्देश, परंपरासातत्य, आणि पीठिकासंस्कार यांचा आधार होता. कोणी कशाचाही आधार घेवो. पण वर सांगितलेल्या तऱ्हेचाच हिशेब शेवटीं हातीं लागतो.

वन्य जातींचें कांहींच सांगवत नाहीं, पण अतिशूद्रांचा मूळदेव महादेव होय. जमीनी कसणारे जे शूद्र त्यांचा मूळदेव 'बळीराजा' हा होय; आणि परशुराम, राम व कृष्ण हे कदाचित् अनुक्रमानेंही त्रैवर्णिकांचे देव अथवा प्रतिनिधी-भूत पुरुष होत. हें कसेंही असलें तरी या सर्व दैवतांची सारखीच देवघेव झाली. शूद्र हे चातुर्वर्ण्यांत दाखल झाले व बळी मागें पडला आणि महादेवाचें रूप वैदिक कल्पनांपैकीं रुद्र कल्पनेशीं संलग्न करून घेऊन सुधारकांनीं त्याचाही हिंदूंच्या देवताकोशांत संग्रह केला. हा संग्रह ज्या लोकांनीं घडवून आणला त्यांनींच अतिशूद्रासही व्यापून रहाणाऱ्या सद्यःकालीन हिंदूधर्माचे पाये घातले असें म्हणावयास हरकत नाहीं. हा प्रचंड फरक घडवून आणावयास पुष्कळ कालावधि लागला असला पाहिजे. या सर्व लोकांचें एकधर्मीयत्व साधण्याचे फार बुद्धिपुरस्सर असे यत्न झाले यांत कांहींच शंका नाहीं. ख्रिस्तीधर्मप्रसार करणारे मिशनरी लोक काय करीत आले आहेत हें पहा. अगदीं पांढऱ्या शुभ्र लोकांपासून तों अगदीं काळ्याकुट्ट लोकांपर्यंत आणि ज्यांचीं मनबुद्धींचीं वैभवें फारच उंच आहेत त्यांच्यापासून तों तहत ज्यांना यांपैकीं कसलेंच वैभव नाहीं अशा लोकांपर्यंत सर्वांचा संग्रह ख्रिस्ती या नांवाखालीं ते करीत आले आहेत. हे सर्व लोक एकरक्त मानणें हास्यास्पद होय. पण ते एकधर्मीय आहेत यांत कांहींच शंका नाहीं. म्हणून तर एतद्देशीय काळ्या ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थनेचें आवाहन गोऱ्या ख्रिस्ती राज्य-कर्त्यांच्या न्यायबुद्धीला जलद पोचतें. पण ख्रिस्ती धर्माची ही संग्रहक्षमता जसजशी वाढत गेली तसतशी त्याच्या कोशांत अनेक दैवतें, उपदैवतें, परमार्थ-कल्पना इत्यादींचा संग्रह होत आला आहे. वरील सर्व वर्णाचे लोक येशूनें प्रतिपादिलेलें असें एकच पारमार्थिक सत्तत्व मानतात व इतर कोणचेंही मानीत नाहींत असें समजणें चूक आहे. हा माहिती करून घेण्याचा प्रश्न आहे. ती करून घेतली तर या संग्रहांतील वैचित्र्य व कदाचित् वैपरीत्यही ध्यानांत येतें व विस्ताराच्या वाढीबरोबर वस्तूला कसा उथळपणा येत जातो हेंही मनांत

चांगलें भरतें. ख्रिस्ती धर्माच्या मूळ शुद्ध तत्त्वाशीं विसंवादी समजुती, आचार, दैवतें, परमार्थ कल्पना यांचा थोडा थोडा तरी संग्रह करीत पुढें जावयाचें नाहीं असें जर मिशनरी ठरवते तर ख्रिस्ती धर्माचा विस्तार केव्हांही झाला नसता. ख्रिस्तीधर्मप्रचारकांनीं हें होऊं दिलें आहे; त्या त्या समजुती इत्यादि त्यांनीं स्वतः पतकरल्या आहेत असें मात्र नाहीं; पण ख्रिस्तीधर्म या शब्दांत कालेंकरून त्या अन्तर्भूत होण्याची प्रणाली त्यांनीं आपल्या हातानें घालून दिली आहे खास. हें जें सर्व कांहीं ख्रिस्तीधर्माच्या बाबतींत घडत आहे तेंच हिंदूधर्माच्या बाबतींत पूर्वी घडलें इतकेंच, पण डोळ्यापुढें घडत असलेल्या गोष्टी अणूअणूंनीं नजरेपुढून जात असल्यामुळें त्याचें सार्विक व वांधीव रूप ध्यानांत येत नाहीं; पण त्याच गोष्टी जर भूतकालीन होऊन वसल्या असल्या तर त्या घपकन् डोळ्यांत भरतात; व युक्तायुक्ततेच्या मुद्यावर आपण त्याचें विच्छेदन करावयास प्रवृत्त होतों. पण ख्रिस्ती मिशनऱ्यांच्याहूनही हिंदु-धर्माचे संस्थापक जास्त बलिष्ट होते. त्यांनीं विचित्र व विपरीत समजुतींचा हिंदुत्वांत संग्रह होऊं दिला यांत कांहींच विशेष नाहीं. ख्रिस्ती मिशन-ऱ्यांनीं असंस्कृतांचीं दैवतें पावन करून घेऊन आपल्या दैवतांत कधीं दाखल केलीं नाहींत, पण हिंदुधर्मप्रसारकांनीं गंभीर, उदात्त आणि आवेशयुक्त धैर्य धरून महादेव हें अनार्य दैवतही यथापद्धत आपल्या दैवतांत दाखल केलें; इतकेंच नव्हे तर आसेतुहिमाचल अशी त्याची पूजा चालू केली. धर्मकल्पनांच्या बाबतींत व भिन्नवंशीयांच्या समाजवांधणींत आर्यांनीं केलेला हा अत्यंत विशाल आणि साहसाचा प्रयोग होय. हें महादेवाविषयीं झालें; पण हीच विचारपद्धति शूद्र इत्यादींच्या दैवतांसंबंधांतही चालवून समाजवांधणीचें काम या धर्मप्रसारकांनीं साधून घेतलें.

तुलना ही ज्या नामांत व्हावयाचीं तीं नामें एकाच विभक्तींत असावीं लागतात हा इंग्रजी व्याकरणांतील नियम विचारव्यवस्थेंतही लागू पडतो हें इंग्रजांनीं किंवा कोणीही विसरूं नये. नुसती इंग्रजांची किंवा इतर युरोपियांची तुलना करून ती आम्हांस बाधक अशी करून दाखविल्यानें कांहीं भागत नाहीं. दोघेही त्या त्याच परिस्थितींत कसे वागतात हें पाहिलें पाहिजे. ख्रिस्तीधर्मीय लोक इतस्ततः सर्व पृथ्वीभर पसरलेले आहेत. एका आखीव चतुःसीमेंत अनेक लोकांना ठासून बसवून त्यांचा एक समाज बनवून दाखविण्याचें काम आमच्या पूर्वजांना जेवढ्या प्रमाणा-

वर पडलें होतें तेवढ्या प्रमाणावर युरोपीय ख्रिस्त्यांना कधींही पडलें नाहीं. अल्प प्रमाणावर तरी पडलें होतें कीं नाहीं याविषयींही शंकाच आहे. आणि म्हणून त्यांना औदार्याची नसती शाबासकी देण्यास धजावणें बरोबर नाहीं. उद्यां जर असें झालें कीं. इंग्लंडच्या लहानशा परिघांत अत्यंत भिन्न वर्णांचे व संस्कृतीचे असे कोटयवधि लोक आणून भरले व मग इंग्रजास सांगितलें कीं "तुम्ही सगळेजण मिळून कसा एक समाज बनवितां तो पाहूं" तर या लोकांना काय वेदना पडतील हें पहाण्यासारखे आहे. त्यांतही आतां समाजज्ञान, भौतिकशास्त्रें, संबंधसाधनें हीं विपुल आहेत म्हणून थोडी मदतच होईल. मग जेव्हां यांचा अभावच होता तेव्हां उच्चवर्णीयांना या कामीं फारच वेदना पडल्या असाव्या यांत काय नवल? एकीकडे रेडइंडियनला नष्ट करण्याचे इलाज चालू असतां दुसरीकडे आफ्रिकेंतील काळा शिद्दी घरांत आणून नवेंच दुखणें उत्पन्न करून ठेवणाऱ्या अमेरिकेंतील बड्या इंग्रजाची दूरदृष्टि एकदां तरी घसरली असेंच म्हटलें पाहिजे. त्याला घरांत आणिलें, आणि आतां दर दहांत एक नीग्रो अशी स्थिति होऊन बसल्यामुळें आतांचे अमेरिकन्स वेणा देत बसले आहेत. अजून ही गैरसोय पुरेशी बाधक होऊं लागली नाहीं. झाल्यावर तें राष्ट्र काय करतें तें पाहूं. असो. विविध रंगांच्या छायापडछायांचे व संस्कृतींचे विविधवंशी लोक एकत्र आल्यावर त्यांतल्यात्यांत त्यांना एका समाजांत गोवण्याचा जो एक भव्य प्रयत्न झाला तो हिंदुसमाज या नांवानें संबोधिला जातो. व हा करून हे सर्व हिंदुधर्मीय लोक असें ज्यांनीं ठरविलें त्यांच्या धार्मिक तत्त्वांच्या सूक्ष्म प्रसरणशीलतेची स्तुतिच करावयास हवी.

पण हें म्हणणें खरें असलें तरी अतिशूद्रास अस्पृश्य कां बनविलें याचा छडा मात्र लागत नाहीं. त्यांना दूर ठेवावयाचें होतें तर आणखी एक म्हणजे पांचवा वर्ण बनवावयाचा होता. सध्यां आहे तसें वर्णसंकराचें तत्त्वज्ञान लागू करून त्यांस इतर सर्व व्यवहाराची मोकळीक ठेवावयास हवी होती. पण चतुर्वर्णानीं हें काम केलें नाहीं. त्यांनीं त्यास अस्पृश्यच लेखिलें. हा फार **घोर अन्याय** झाला असें म्हटलेंच पाहिजे. अस्पृश्यता ही वंशकल्पनामूल आहे यांत कसलाही संदेह नाहीं, पण वंशरक्षणास अस्पृश्यताच जरूर आहे असें चतुर्वर्ण हिंदूंना कां वाटलें असावें हें समजत नाहीं. आदिद्रविड किंवा अतिशूद्र हें चतुर्वर्णांशीं कसे वागत होते हा प्रश्न उपस्थित होतो.

परंतु त्याच्या अभ्यासास उपयोगी असें साधन आज उपलब्ध नसल्यामुळें या विवेचनाच्या कामीं पुढें सरावयास कांहींच जागा नाहीं. कोणी कोणी स्मृतींतील प्रतिलोम विवाहापासून उत्पन्न झालेल्या प्रजांचा उल्लेख करून म्हणतात कीं हे अतिशूद्र म्हणजे ब्राह्मणी व शूद्र यांच्यापासून झालेली संतति होय. अस्पृश्य लोकांच्या संख्येचें वैपुल्य लक्षांत घेतां आणि त्यांची अखिल भारतभर असलेली वसति लक्षांत घेतां हें म्हणणें अगदींच टाकाऊ ठरतें. तसेंच चतुर्वर्ण समाज कायम होऊन कित्येक शतकें लोटल्यावर जे परिणाम कदाचित् सूक्ष्म प्रमाणावर व्हावयाचे ते चतुर्वर्णाइतकेच जुने कसे असतील ? स्मृतींतील या वचनांचा अर्थ इतकाच असला पाहिजे कीं जर ब्राह्मणी व शूद्र यांची कांहीं प्रजा झाली तर तिला अतिशूद्राप्रमाणें लेखण्याची चाल असेल. असो.

तर आतांपर्यंतच्या विवेचनावरून दिसून आलें असेल कीं, पृथ्वीच्या पाठीवर वंशविचार हा सर्वत्र चालू असतो. जेथें वर्ण व संस्कृति यांत फरक फार तेथें या विचाराला फार ठळक असें रूप येतें. तसें तें हिंदुस्थानांत अस्पृश्यांच्या बाबतींत आलें. आफ्रिकेंत हिंदी लोकांनीं अमूक ठिकाणींच राहिलें पाहिजे, त्यांना इतके इतकेच हक्क मिळतील, युरोपियांच्या इतकी सवलत कधींही मिळावयाची नाहीं,हे जे प्रकार भर विसाव्या शतकांत चालू आहेत तेच चतुर्वर्ण हिंदूंनीं पूर्वीच्या काळीं प्रस्थापित केले; आणि ज्यांना ते नीच व असंस्कृत समजत असत त्यांस त्यांनीं अस्पृश्य करून ठेविलें. ते हिंदू झाले पण सर्व सत्ता, सुखें व वैभवें ही चतुर्वर्णांनीं व मुख्यत: त्रिवर्णांनीं आपल्या हातींच ठेविलीं.

ही घटना एकदां कायमची झाल्यानंतर तिला भक्कम रूप देणारींच वाङ्मयें तयार झालीं; तत्त्वज्ञानें पसरूं लागलीं व पूर्वकर्माप्रमाणें त्या त्या वर्णांत जन्म मिळतो या विचाराची मगरमिठी सर्वांसच वसली. ही मिठी त्रिवर्णांस बाधण्यासारखी नव्हतीं. कारण वर्ण–कर्म–कल्पना आचारांत प्रविष्ट झाली तर त्यांचें तसें कांहीं नुकसान नव्हतें. पण शूद्रातिशूद्रांना मात्र या कल्पनेची बाधा अतोनात झाली.त्यांचीं मनेंच या तत्त्वज्ञानानें मारिलीं.वंशकल्पना त्रिवर्णांना प्रबल वाटली म्हणून त्यांनीं इतरांशीं संकर न होऊं देण्याची व्यवस्था केली यांतही कांहीं विशेष वाटण्यासारखें नाहीं; पण आम्ही जे त्रिवर्ण तेच सर्व भोक्तृत्वें भोगूं; तुम्ही आमचे दास बनून आम्ही जीं हलकीं कामें तुम्हांस

लावून देऊं तींच तुम्हीं करावीं, श्रेष्ठ कामाचा हव्यास धरतां उपयोगाचा नाहीं, धरल्यास त्यानें नरकास जाल, येथवर जेव्हां हें प्रकरण आलें तेव्हां मात्र दोन सूत्रांचा विलक्षण संकर झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. जपणूक व लोभ हीं तीं दोन सूत्रें होत. तुम्हांस निराळें राहावयाचें आहे ना? त्याप्रमाणें रहा, पण इतरांच्या मनवुद्धीच्या विकसनाला व यावत् शक्य अशा व्यापाराला तुम्ही कां हरकत करावी? हा प्रश्न या तत्त्वप्रतिपादकांना विचारतां येण्याजोगा होता. तुमच्या अंगांत जें कांहीं गुणवैभव असेल तें दाखवून तुम्ही थोर व्हा, पण आमच्या अंगांत जर कांहीं तशा प्रकारचें वैभव असलें तर तें दाखविण्यास व त्याच्या वळावर आमचें नशीव काढण्यास तुम्ही कां हरकत करावी? असें त्यांस चमकावून विचारतां येण्याजोगें होतें. पण तें शूद्रातिशूद्रांनीं केलें नाहीं आणि तें करतां येण्याजोगेंही नव्हतें. कारण त्रिवर्णांचा हा एक कटच होता. मूळ कल्पना वंशश्रेष्ठतेची होती यांत शंका नाहीं, पण जें कांहीं भोग्य म्हणून असेल तें सर्व आमचेंच हा आग्रह मात्र जागतिक वंश-कल्पनाव्यापाराच्या पद्धतीवरच गेला हें स्पष्ट दिसतें. जागतिक वंशकल्पना-व्यापाराचें अवलोकन करतां हें सहज दिसून येतें कीं 'मी तरी,नाहीं तर तू तरी' असा हा अटीतटीचा सामना आहे व हाच सामना हिंदुस्थानरूप लहानशा खंडांत सुदीर्घ चालू होता. म्हणजे याचा अर्थ असा कीं मी वंशानें तुझ्याहून उन्नत म्हणून निराळा राहीनच, पण त्या बरोवरच संसाराचीं सर्व साधनें माझ्या कवजांत ठेवीन व काम करतोस म्हणून तुला पोटापुरतें देईन. जें इतर खंडांत उन्नतवंशाभिमानी लोक प्रत्यक्ष आजही करीत आहेत तेंच येथें आजवर त्रिवर्ण करीत आले आहेत. त्रिवर्णांनीं या आपल्या आग्रहाला परमार्थाची मदत घेऊन त्याला धर्मच बनविलें. "वंशभिन्नत्वाला धर्मश्रेष्ठतेचें महत्त्व दिलें व अशा रीतीनें त्रिवर्णांनीं समाजशास्त्राचा सर्वोत्तम मान केला" असें मीं मागें एके ठिकाणीं प्रतिपादिलें आहे; पण तें प्रतिपादन मात्र या दुसऱ्या प्रकारास लावावयास मी मुळींच तयार नाहीं. जें सर्व असेल नसेल तें मीच खाईन आणि 'दास तुझा म्हणवीन' असें कबूल करीत असलास तर तुला थोडा तुकडा देईन ही वृत्ति निदान परमार्थविचारांत नेऊन वसविण्याच्या लायकीची नाहीं इतकें तरी खरें. " जर आम्ही निराळे तर आम्हीच मालक व्हावें व आमचें आमच्यापुरतें आम्ही पहावें हें वरोबर व

स्वाभाविक नाहीं काय?"असें कोणी त्रिवर्ण म्हणतील पण त्यांना यावर इतकेंच सांगतां येण्यासारखें आहे कीं," हें बरोबर नाहीं. तुम्ही निराळे असाल पण जर आपण गुणांनीं श्रेष्ठ अशी जी तुमची खात्री तीप्रमाणें तुम्ही खरोखरीच श्रेष्ठ असाल तर सर्व लोकांची शर्यत लावूनही त्यांत तुम्ही आपलें श्रेष्ठपण टिकवूं शकाल हेंही खरें आहे. मग त्यांना शर्यतींत दाखल कां होऊं देत नाहीं? तर या मुद्यावर तुमचें म्हणणें स्वीकार्य वाटत नाहीं." पण जगतांतील जो सार्वजनिक न्याय तोच त्रिवर्णांनीं येथें चालविला आहे व जगतांतील यूरोपी-यांच्या त्या न्यायाविरुद्ध म्हणजे अन्यायाविरुद्ध जसें बंड उठत आहे तसेंच त्रिवर्णांच्या विरुद्धही उठत आहे. या वादांत आणखी एक गोम आहे.

मी योजीत असलेला 'त्रिवर्ण' हा शब्द पुष्कळांना आवडणार नाहीं, हें मला माहीत आहे; कां कीं तो ब्राह्मणासह आणखी दोघांना घेऊन पडतो! पण तो शब्द कोणाला आवडो कीं न आवडो तो खराच आहे. पुष्कळ क्षत्रिय-वैश्यांचें असें एक कुभांड असतें कीं हा सगळा सामाजिक अन्याय ब्राह्मणांनीं केला आहे. पण समाजविचारांत ही शुद्ध आगळिक आहे. प्राप्तीचा अर्धा निदान तिसरा वाटा खाणाऱ्या या प्रत्येक वर्णानें आपल्या पाठीवर तडाके घेण्यास निर्भयपणानें सिद्ध असलें पाहिजे. क्षत्रिय–वैश्यांना यांतलें कांहीं कळत नव्हतें हें बोलणें विनाकारण लाडिक व अजागळ आहे.खरी मेख ही आहे कीं त्यांचें चांगलें चळचळीत चाललें होतें व तत्त्वज्ञान सांगितल्याचें टिपरूक आयतें ब्राह्मणावर पडत होतें! मग त्यांनीं कां गप्प बसूं नये? वास्तविक पहातां त्यांना जर हें संमत नव्हतें तरउसळून उठावयास त्यांच्या आड कोणास येतां आलें असतें? विशेषत: क्षत्रियांविषयीं तर बोलावयासच नको.त्यांनीं मनांत आणलें असतें तर ब्राह्मणांना दूर सारणें व शूद्रातिशूद्रांना दास्यमुक्त करणें त्यांस सहज साध्य होतें. पण त्यांनाही तें नकोच होतें. परमार्थविचारांचें कोरडें सुख जरी ब्राह्मणाकडे होतें व तहानेच्यावेळीं कधींही न उपयोगी पडणारें काव्य जरी त्यांच्या हातीं होतें, तरी चकारीपकारीसाठीं त्यांस दुसऱ्याचीं आर्जवें करावीं लागत; व वेदराशींचें ओझें गुरूपासून शिष्यापर्यंत पोचवितां पोचवितां खरोखरच त्यांच्या मानेचे मणके ढिले होत होते. पण जीवितांत एकादे वेळीं जो रणां-गणावर जाण्याचा समय तो सोडला तर क्षत्रिय हा ऐहिक वैभवाचा मोठाच धनी होता. "आम्ही आपले काय राजे; आपलें राज्य करावयाचें; गुण्या-

गोविंदानें गोडधोड खावयाचें; कंटाळा येईपर्यंत गाद्यागिरद्यावर लोळावयाचें; नाहींतर जुगार खेळावयाची; आम्हांला काय त्यांतलें कळणार?" असें म्हणून चालावयाचें नाहीं. हीच गोष्ट वैश्यांचीही आहे. राजाला केव्हां कां होईना पण शत्रूशीं झुंज करावी लागत असे व मान कापून घ्यावी लागे. पण वैश्यांना तेंही दुःख व जबाबदारी नव्हती व हे न्यायान्याय कळण्यास जी मनास व बुद्धीस पात्रता लागते तीही त्यांजपाशीं होती. पण त्यांनींही धर्माचें नांव घेऊन ही गोष्ट अंगाबाहेर टाकली. यामुळें ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्य या तीन धूर्तांनीं 'तू हलकटच; तूं हलकटच' असें वारंवार बजावल्यामुळें शूद्रातिशूद्राला व विशेषतः अतिशूद्राला आपण खरोखरच तसें आहों असें वाटू लागलें. तिकडे यूरोपीय लोक उन्नतवंशाभिमानानें वागले; पण कनिष्ठ लोकांना मात्र त्यांनीं कांहीं अगदीं निराळेंच रूप दाखविलें. त्यांनीं त्यांना साफ मारून टाकण्याचीच पद्धत चालू केली व जेथें हें साधलें नाहीं तेथें दारू आणि उष्णतेचा रोग हीं इतकीं फैलावून दिलीं कीं थोडया थोडया वर्षांच्या अवधींत अवघ्या जमातीच्या जमाती जिवानिशीं नष्ट झाल्या. हें त्यांनीं पूर्वी केलें. सध्यां आपल्या वंशाभिमानाची त्यांस लाजही वाटतनाशी झाली आहे. आम्ही गोरे लोकच जगणार हा आपला आग्रह ते निसुखपणानें बोलून दाखवीत नसले तरी त्यास शोभेशी बिनचूक कृति त्यांच्या हातून होत आहे. पण इतर वर्णीय लोक हा त्यांचा आग्रह मानावयास आतां बिलकूल कबूल नाहींत. ही इतर वर्णीयांची नाकबुली व आमच्या येथील शूद्रातिशूद्रांचें बंड हीं एकाच स्वरूपाचीं आहेत. प्रस्तुत प्रश्न अस्पृष्टांचा असल्यामुळें त्यांच्याकडे जास्त लक्ष दिलें तरी दोघांचेंही बंड आहे. परंतु बंडांतच खरा त्वेष आणि भावनांचा जोर हा अस्पृश्यांच्या समाजांत दिसून येतो. याचें कारण असें कीं शूद्रापेक्षांही हलक्या धंद्यांत त्यास ठाणेवंद केलें असून वरतें त्यास अस्पृश्यही मानिलें आहे; आणि शिवाय ही बाब धर्माच्या तत्त्वज्ञानराशींत सामावलेली आहे.

व्यवहारांतील स्पर्शास्पर्श विचार

समाजांतून या अतिशूद्रांना दूर ठेविलें हें येथवर सांगितलें व तें कां ठेविलें हेंही सांगितलें. आतां या बहिष्काराच्या पद्धतीस अनुसरून शास्त्रवचनें कशी निर्माण झालीं तीं देतों. प्रथम शरीर–स्पर्श, नंतर जलस्पर्श व नंतर देवालय अशा अनुक्रमानें हीं वचनें त्यांच्या मराठी तात्पर्यासह दिलीं आहेत.

शास्त्रवचनें

शुनोपहतः सचैलोवगाहेत ॥१६॥ (१–५–१५)–आपस्तंभ

कुत्र्याचा स्पर्श झाला तर सचैल स्नान करावें.–(आपस्तंभ)

यथा चण्डालोपस्पर्शने संभाषायां दर्शने च दोषस्तत्र प्रायश्चित्तम् ॥८॥
अवगाहनमुपस्पर्शने, संभाषायां ब्राह्मणसंभाषा, दर्शने ज्योतिषां दर्शनम्॥९॥
(२–१–२)

चांडालाचा स्पर्श झाला किंवा त्याच्याशीं संभाषण झालें किंवा तो नुसता दृष्टीस पडला तरीही दोष उत्पन्न होतो. त्याला प्रायश्चित्त पुढीलप्रमाणें:––

स्पर्श झाला तर स्नान करावें, संभाषण झालें तर ब्राह्मणाबरोबर संभाषण करावें, व तो दृष्टीस पडला तर नक्षत्रांचें दर्शन करावें.

पतितचण्डालसूतिकोदक्याशवस्पृष्टितत्स्पृष्टि उपस्पर्शने
सचैलोदकोपस्पर्शनाच्छुध्येत् ॥ २८ ॥

पतित, चण्डाल, नुकतीच बाळंत झालेली, रजस्वला किंवा प्रेत यांचा स्पर्श झाला, किंवा ज्याला यांचा स्पर्श झाला अशा माणसाचा किंवा वस्तूचा स्पर्श झाला तर सचैल स्नान केल्यानें शुद्धता प्राप्त होते.

चैत्यवृक्षं चितिं यूपं चण्डालं वेदविक्रयम् ॥
एतानि ब्राह्मणः स्पृष्ट्वा सचैलो जलमाविशेत् ॥६०॥

चैत्यवृक्ष (ज्या झाडाला यज्ञामध्यें पशूला बांधून मारतात तो), प्रेताची ताटी, यूप (ज्या खांबाला यज्ञांत पशू बांधून मारतात तो), चंडाल, वेदांचा विक्रय करणारा, यांचा स्पर्श झाला तर ब्राह्मणानें सचैल स्नान करावें.

वेदविक्रयणं यूपं पतितं चितिमेव च ॥
स्पृष्ट्वा समाचरेत् स्नानं श्वानं चाण्डालमेव च ॥१४०॥

वेदांचा विक्रय करणारा, यूप, पतित, ताटी (प्रेताची), कुत्रा व चांडाल यांचा स्पर्श झाला असतां स्नान करावें.

श्वचण्डालपतितोपस्पर्शने सचैलं स्नातः सद्यः पूतो भवति इति विज्ञायते॥
(बौधायन)

कुत्रा, चण्डाल किंवा पतित यांचा स्पर्श झाला असतां सचैल स्नान करावें म्हणजे शुद्धता ताबडतोब प्राप्त होते असें म्हणतात. – (बौधायन)

रथ्यामाक्रम्य मूत्रपुरीषं कृत्वा चाचामेत् । चण्डालम्लेच्छसंभाषणे च ॥
विष्णू ध. सू. अ. २२.

रस्त्यावरून आल्यावर, मूत्रपुरीषोत्सर्ग करून आचमन करावें. चण्डाल, म्लेंछ यांच्याशीं संभाषण झाल्यासही तसेंच करावें. –(विष्णु धर्मसूत्र अ.२२)

शिरः प्रावृत्य कर्णं वा मुक्तकच्छशिखोऽपि वा ।
अकृत्वा पादयोः शौचमाचान्तोऽप्यशुचिर्भवेत् ॥९॥ उशनस. अ. २.

डोकें व कान गुंडाळून घेतले किंवा शेंडी व कासोटा सुटलेला असला, कसेंही असलें तरी पाय धुतल्याशिवाय आचमन केलें तरी शुद्धि प्राप्त होत नाहीं. – (उशनस् अ. २)

चण्डालश्च वराहश्च कुक्कुटः श्वा तथैव च ।
रजस्वला च षण्ढश्च नेक्षेरन्नश्नतो द्विजान् ॥२३९॥ मनु अ. ३.

चण्डाल, डुक्कर, कोंबडा, कुत्रा तसेंच रजस्वला स्त्री व नपुंसक यांनीं द्विज (त्रैवर्णिक) जेवत असतांना त्यांना पाहूं नये. –(मनु. अ. ३)

न संवसेच्च पतितैर्न चाण्डालैर्न पुल्कसैः ॥
न मूर्खैर्नावलिप्तैश्च नान्त्यैर्नान्त्यावसायिभिः ॥७९॥ (मनु० अ. ४)

पतित, चाण्डाल, पुल्कस यांच्याशीं एकत्र राहूं नये. त्याप्रमाणें मूर्ख, (घाणीनें) माखलेला अंत्यज व तत्सम यांच्याशींही सहवास करूं नये.
–(मनु अ. ४)

रजकं चर्मकारं च नटं धीवरमेवच ।
बुरुडं च तथा स्पृष्ट्वा शुध्येदाचमनाद्विजः॥१७॥

परीट, चांभार, नट, कोळी, वुरुड यांचा स्पर्श झाला असतां द्विजानें आचमन करून शुद्ध व्हावें.

दिवाकीर्तिमुदक्यांच पतितं सूतिकां तथा ॥
शवसंस्पर्शने चैव स्पृष्ट्वा स्नानेन शुध्यति ॥ १५२ ॥ अंगिरास्मृति.

दिवाकीर्ति (चण्डाल), रजस्वला, पतित, नुकतीच बाळंतीण झालेली स्त्री, प्रेत किंवा प्रेतस्पर्श झालेला यांचा स्पर्श झाल्यास स्नानानें शुद्धता येते. – (अंगिरास्मृति)

चाण्डालं पतितं व्यङ्गमुन्मत्तं शवमन्त्यजम् ॥
शृगालं सूतिकां नारीं रजसा च परिप्लुताम् ॥ २२॥
श्वकुक्कुटवराहांश्च ग्राम्यान्स्पृशति मानवः ॥
सचैलं सशिरः स्नात्वा तदानीमेव शुध्यति ॥ २३॥ वृद्ध शातातप

चाण्डाल, पतित, शारीरिक व्यंग असलेला, उन्मत्त, प्रेत, अंत्यज, कोल्हा, नुकतीच बाळंतीण झालेली स्त्री, रजस्वला, कुत्रा, कोंबडा, गांवडुक्कर यांचा माणसाला स्पर्श झाल्यास त्यानें सचैल डोक्यावरून अंघोळ करावी, तरच शुद्धता प्राप्त होते. – (वृद्धशातातप)

श्वपाकं चापि चाण्डालं विप्रः संभाषते यदि ॥
द्विजसंभाषणं कुर्यात् सावित्रीं च सकृज्जपेत् ॥ २२ ॥

श्वपाक किंवा चाण्डाल यांच्याशीं जर ब्राह्मणानें संभाषण केलें तर त्यानें द्विजांशीं सभाषण करावें व लगेच सावित्री (गायत्री) जप करावा.

चाण्डालदर्शने सद्यः आदित्यं अवलोकयेत् ॥
चण्डालदर्शने चैव सचैलं स्नानमाचरेत् ॥२४ ॥

चाण्डालाचें चुकून दर्शन झालें तर लगेच सूर्यदर्शन करावें. चाण्डालाकडे पाहिल्यास सचैल स्नान करावें.

रजकश्चर्मकारश्च नटो बुरुडमेवच ॥
कैवर्तमेदभिल्लाश्च सप्तैतेऽन्त्यजाः स्मृताः ॥३३॥ यम स्मृति– अत्रिसंहिता.

परीट, चांभार, नट, बुरुड, कोळी, मेद (एक मिश्र जात), भिल्ल हचा सातांना अंत्यज असें म्हणतात. —(यमस्मृति–अत्रिसंहिता)

चाण्डालं पतितं स्पृष्ट्वा शवमंत्यजमेव च ॥
उदक्यां सूतिकां नारीं सवासाः स्नानमाचरेत् ॥१८३॥

चांडाल, पतित, प्रेत, अंत्यज, रजस्वला स्त्री, नुकतीच बाळंतीण झालेली स्त्री यांचा स्पर्श झाल्यास सचैल स्नान करावें.

चर्मकारो भट्टो भिल्लो रजकः पुष्करो नटः ॥
वराटो मेदचण्डालौ दाशः श्वपचकोलिकाः ॥१२॥
एतेऽन्त्यजाः समाख्याता ये चान्ये च गवाशनाः ॥
एषां संभाषणात्स्नानं दर्शनादर्कवीक्षणम् ॥१३॥ वेदव्यास स्मृति ११६

चांभार, भाट, भिल्ल, परीट, पुष्कर, नट, वराट, मेद, चंडाल, श्वपच–कोलिक हे दहा चंडाल होत. या सर्वांना अंत्यज असें म्हणतात. हे सर्व व दुसरे जे गोभक्षक आहेत ते या सर्वांशीं संभाषण झाल्यास स्नान करावें व दर्शन झाल्यास सूर्य दर्शन करावें. —(वेदव्यासस्मृति ११६)

रजस्वलां सूतिकां वा चण्डालं पतितं तथा ॥
पाखण्डिनं विकर्मस्थं शैवं स्पृष्ट्वाप्यकामतः ॥३५८॥
गोमयेनानुलिप्तांगः सवासा जलमाविशेत् ॥
गायत्र्यष्टशतं जप्त्वा घृतं प्राश्य विशुध्यति ॥३५९॥
स्पृष्ट्वा तु कामतः स्नात्वा चरेत्सान्तपनं व्रतम् ॥
श्वपचं पतितं स्पृष्ट्वा गोवाल–व्यजनादिभिः ॥३६०॥

रजस्वला, नुकतीच बाळंतीण झालेली स्त्री, चंडाल, पतित, पाखंडी, नियम मोडणारा व शैव यांचा चुकूनही स्पर्श झाल्यास गोमयानें अंग चोळून स्वच्छ नखशिखांत स्नान करावें. आठशें गायत्रीजप करावा व घृत प्राशन करावें म्हणजे शुद्धता प्राप्त होते.

यांना जर सहेतुक स्पर्श केला तर स्नान करावें व सांतपन व्रत आचरण करावें. श्वपच, पतित, यांचा स्पर्श झाल्यास गाईच्या केसांच्या चौरी इत्यादींनीं प्रायश्चित्त करावें.

श्वचाण्डालपतितावेक्षणे दुष्टम् ॥ गौतम ६–२

कुत्रा, चांडाल किंवा पतित यांचें दर्शन झाल्यास दोष घडतो. ––गौतम

यस्तु च्छायां श्वपाकस्य ब्राह्मणो ह्यधिगच्छति ॥
तत्र स्नानं प्रकुर्वीत घृतं प्राश्य विशुध्यति ॥

श्वपाक (चांडाल) याची जर सावली ब्राह्मणाच्या अंगावर पडली तर त्यानें स्नान करावें व घृतप्राशन करावें म्हणजे शुद्धता प्राप्त होते.

चण्डालपतितच्छायां स्पृष्ट्वा स्नानं समाचरेत् ॥
चत्वारिंशत्पदादूर्ध्वं छायादोषो न विद्यते ॥

चंडाल किंवा पतित यांची छाया पडल्यास स्नान करावें. मात्र चाळीस पावलांच्या दुरून छाया पडल्यास छायेचा दोष लागत नाहीं.

मनु––दिवाकीर्तिमुदक्यां च पतितं सूतिकां तथा ॥
शवं तत्स्पृष्टिनं चैव स्पृष्ट्वा स्नानेन शुध्यति ॥

मनुः––दिवाकीर्ति (चांडाल) रजस्वला, पतित, नुकतीच बाळंतीण झालेली, प्रेत, किंवा त्याचा स्पर्श झालेला, यांचा स्पर्श झाल्यास स्नानानें शुद्धि प्राप्त होते.

वेदधर्मपरित्यागश्चाण्डालस्यच भाषणम् ॥
चान्द्रायणेन शुद्धिः स्यान्न ह्यन्या तस्य निष्कृतिः ॥

वेद व धर्म यांचा त्याग केल्यास किंवा चांडालाशीं भाषण झाल्यास चांद्रायणव्रतानें शुद्धि प्राप्त होते. त्याला दुसरा मार्ग नाहीं.

उच्छिष्टो यदि नाचान्तश्चण्डालादीन् स्पृशेद्द्विजः ॥
उच्छिष्टस्तत्र कुर्वीत प्राजापत्यं विशुद्धये ॥७४॥

जर द्विजानें उष्टा असतांनाच आचमनापूर्वी चंडालादींना स्पर्श केला, तर त्यानें तसेंच प्राजापत्य–व्रत आचरण करावें म्हणजे शुद्धता येते.

चण्डालसूतिकाशवान् तथा नारीरजस्वलाम् ॥
स्पृष्ट्वा स्नायाद्विशुध्यर्थं तत्स्पृष्टान् पतितांस्तथा ॥

चंडाल, नुकतीच बाळंतीण झालेली, रजस्वला स्त्री, व प्रेत, व त्यांचा स्पर्श झालेला, तसेंच पतित यांचा स्पर्श झाल्यास शुद्धीसाठीं स्नान करावें.

चण्डालसूतिकाशवैः संस्पृष्टं स्पर्शयेत् यदि ॥
प्रमादात्स्नात आचम्य जपं कृत्वा विशुध्यति ॥

चंडाल, नुकतीच बाळंतीण झालेली स्त्री किंवा प्रेत, व त्याचा स्पर्श झालेला यांना जर चुकूनही स्पर्श झाला तर स्नान करावें, आचमन करावें व जप करावा म्हणजे शुद्धि प्राप्त होते.

अस्पृष्टस्पर्शनं कृत्वा स्नात्वा शुध्येद्द्विजोत्तमः ॥
आचामेच्च विशुद्धचर्थं प्राह देवः पितामहः ॥७७॥

अस्पृष्टाचा स्पर्श झाला तर द्विजश्रेष्ठानें स्नान करावें व आचमन करावें असें पितामह व्यासांनीं म्हटलें आहे.

चण्डालं त्तु शवं स्पृष्ट्वा चरेत् कृच्छ्रं द्विजोत्तमः ॥
दृष्ट्वा नभस्थं नक्षत्रमहोरात्रेण शुध्यति ॥ ९७ ॥

चंडाल किंवा प्रेत यांचा स्पर्श झाल्यास ब्राह्मणानें कृच्छ्र प्रायश्चित्त करावें, व नक्षत्रदर्शन करावें म्हणजे एका दिवसानंतर शुद्धता येते.

पराशरमाधवीयेः—चण्डालश्वपचैः स्पृष्टो विण्मूत्रोच्छिष्ट एव च ॥
त्रिरात्रेण विशुद्धः स्यात् भुक्तोच्छिष्टः षडाचरेत् ॥

चंडाल, श्वपच, यांचा स्पर्श होणें म्हणजे विष्ठा–मूत्रांचा स्पर्श होण्यासारखें आहे. त्याच्या स्पर्शाची तीन दिवसांनीं शुद्धि होते. त्यासाठीं सहा रात्रीं भुक्तोच्छिष्ट रहावें.

सर्वान्त्यजानां गमने भोजने सम्प्रवेशने ॥
पराकेन विशुद्धिः स्याद् भगवानत्रिरब्रवीत् ॥१६९॥

सर्व अंत्यजांकडे जाणें येणें, भोजन किंवा वसणें–उठणें झाल्यास पराक प्रायश्चित्त करावें म्हणजे शुद्धि प्राप्त होते असें भगवान् अत्रि ऋषि म्हणतात.

चण्डालस्य तु संस्पृष्टं विण्मूत्रं स्पृष्टमेवच ॥
त्रिरात्रेण विशुद्धिः स्याद् भुक्तोच्छिष्टं तथाचरेत् ॥२२५॥

चंडालाचा स्पर्श म्हणजे विष्ठामूत्रांचाच स्पर्श झाल्यासारखें होय. तीन रात्रीं एकभुक्त राहिल्यानें त्याची शुद्धि होते.

आदित्येऽस्तमिते रात्रौ स्पृशन्नीतं दिवा जलम् ॥
तेनैव सर्व शुद्धिः स्याच्छ्वस्पृष्टस्तु वर्जयेत् ॥२४५॥

सूर्य अस्तास गेल्यावर रात्रींच्या वेळीं अस्पृश्याचा स्पर्श झाल्यास दुसऱ्या दिवशीं स्नान करावें म्हणजे शुद्धि प्राप्त होते. याला प्रेतस्पर्शाचा अपवाद मानावा.

चण्डालं पतितं म्लेच्छं मद्यभाण्डं रजस्वलाम् ॥
द्विजः स्पृष्ट्वा न भुञ्जीत भुञ्जानो यदि संस्पृशेत् ॥
अतःपरं न भुञ्जीत त्यक्त्वान्नं स्नानमाचरेत् ॥
ब्राह्मणैस्समनुज्ञातस्त्रिरात्रमुपवासयेत् ॥
सघृतं यावकं प्राश्य व्रतशेषं समापयेत् ॥२६३॥

चंडाल, पतित, म्लेंच्छ, दारूचें भांडें, रजस्वला स्त्री यांचा जेवत असतांना जर द्विजाला स्पर्श झाला तर त्यानें तसेंच जेवण टाकून उठावें. पुन्हा जेवूं नये व स्नान करावें व ब्राह्मणांची परवानगी घेऊन त्रिरात्र उपवास करावा व यवमिश्रित तूप प्राशन करून व्रत संपवावें.

रजस्वला यदा स्पृष्टा श्वानचण्डालवायसैः ॥
निराहारा भवेत्तावत्स्नात्वा कालेन शुध्यति ॥ ३७३ ॥

रजस्वलेला जर कुत्रा, चंडाल किंवा कावळा यांचा स्पर्श झाला तर तिनें कांहीं खाऊं नये व यथाकाल स्नान करून शुद्ध व्हावें.

चर्मको रजको वेण्यो धीवरो नटकस्तथा ॥
एतान् स्पृष्ट्वा द्विजो नित्यमेकरात्रं पयः पिबेत् ॥२७२॥

चांभार, परीट, बुरुड, कोळी, नट यांचा स्पर्श झाल्यास द्विजानें नेहमीं एकरात्र दूध प्यावें.

संवर्तः—चण्डालं पुल्कसं चैव श्वपाकं पतितं तथा
एतान् श्रेष्ठास्त्रयो गत्वा कुर्युश्चान्द्रायणत्रयम् ॥१६८॥

चंडाल, पुल्कस, श्वपाक आणि पतित यांच्याकडे ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्य यांचें येणें जाणें झाल्यास त्यांनीं शुद्ध्यर्थ तीन चांद्रायण व्रतें करावीं.

चण्डालं पतितं दृष्ट्वा शवमन्त्यजमेवच ॥
उदक्यां सूतिकां नारीं सवासाः स्नानमाचरेत् ॥

चंडाल, पतित, प्रेत, अंत्यज, रजस्वला, नुकतीच बाळंतीण झालेली स्त्री यांचें दर्शन झालें असतां सचैल स्नान करावें.

अस्पृश्यं स्पर्शयेद्यस्तु स्नानं तेन विधीयते ॥
ऊर्ध्वमाचमनं प्रोक्तं द्रव्याणां प्रोक्षणं तथा ॥१०८॥

अस्पृश्याला स्पर्श केला तर स्नान करावें असा विधि आहे. नंतर आचमन करावें व वस्तूंचें प्रोक्षण करावें.

चण्डालाद्यैश्च संस्पष्ट उच्छिष्टश्च द्विजोत्तमः ॥
गोमूत्रयावकाहारः षड्रात्रेण विशुध्यति ॥१७०॥

चंडालादींचा द्विजाला तो उष्टा असतांना स्पर्श झाला तर त्यानें गोमूत्र व यव यांचा आहार करावा म्हणजे सहा रात्रींनंतर तो शुद्ध होतो.

शातातपः—अस्पृश्यः स्पर्शसंगीच वस्तुमाश्रित्य शास्त्रहृत् ॥
पतितो मद्यविक्रेताऽनपत्यो द्विजवस्त्रहृत् ॥
चितिवृक्षश्चितिर्यूपश्चांडालो वेदविक्रयी ॥
एतान् वै ब्राह्मणः स्पृष्ट्वा सचैलो जलमाविशेत् ॥

अस्पृश्यांना स्पर्श करणारा, त्यांच्याशीं संबंध ठेवणारा किंवा शास्त्रनिषिद्ध वस्तू जवळ वाळगणारा, तसेंच पतित, दारू विकणारा, निपुत्रिक, द्विजांचीं वस्त्रें चोरणारा, यज्ञपशु मारण्याचा खांब किंवा वृक्ष, तसेंच चाण्डाल व वेद-विक्रय करणारा यांचा स्पर्श झाल्यास ब्राह्मणानें सचैल स्नान करावें.

गौतमः—चण्डालं पतितं व्यङ्गमुन्मत्तं शवमन्त्यजम् ॥
शृगालं सूतिकां नारीं रजसा च परिप्लुताम् ॥
श्वकुक्कुटवराहांश्च ग्राम्यान् स्पृशति मानवः ॥
सचैलं सशिरः स्नात्वा तदानीमेव शुध्यति ॥

चण्डाल, पतित, शारीरिक व्यंग असणारा, उन्मत्त, प्रेत, अंत्यज, कोल्हा, नुकतीच बाळंतीण झालेली स्त्री, रजस्वला, कुत्रा, कोंबडा, गांवडुक्कर यांना जर माणसानें स्पर्श केला तर त्यानें सचैल डोक्यावरून स्नान करावें म्हणजे शुद्धि प्राप्त होते.

बौधायनः—चैत्यवृक्षं चितिं यूपं चण्डालं वेदविक्रयम् ॥
एतानि ब्राह्मणः स्पृष्ट्वा सचैलो जलमाविशेत् ॥

चैत्यवृक्ष, चिति, यूप, चंडाल, वेदविक्रय करणारा, यांना ब्राम्हणानें स्पर्श केल्यास त्यानें सचैल स्नान करावें.

पराशरः—चैत्यवृक्षश्चितिर्यूपश्चाण्डालः सोमविक्रयी ॥
एतांस्तु ब्राह्मणः स्पृष्ट्वा सवासा जलमाविशेत् ॥

चैत्यवृक्ष चितियूप (यज्ञपशु मारण्याचा खांव), चाण्डाल, दारू विकणारा यांचा ब्राह्मणाला स्पर्श झाल्यास त्यानें सचैल स्नान करावें.

हारीतः—चण्डालैः सह संभाष्य द्विजसंभाषणाच्छुचिः ॥
उच्छिष्टैःसह संभाषेत् त्रिरात्रेण विशुध्यति ॥

चाण्डालाबरोबर संभाषण झालें तर द्विजाबरोबर संभाषण केल्यानें शुद्धता येते. उष्टचा माणसाशीं संभाषण केलें तर तीन रात्रींनंतर शुद्धता येते.

चंडालैः सह संवासे दीर्घकालमकामिकम् ॥
विज्ञानान्मृण्मयं पात्रं सर्वं त्यजति तद्गृहात् ॥
बालकृच्छ्रं ततः कुर्यात्तप्तकृच्छ्रं तथैवच ॥

चंडालाबरोबर दीर्घ सहवास निर्हेतुकपणेंही झाला असल्यास तें लक्षांत आल्याबरोबर घरांतील मातीचीं सर्व भांडीं टाकून द्यावींत. व बालकृच्छ्र व तप्तकृच्छ्र प्रायश्चित्त करावें.

देवलः—चण्डालाध्युषितं यत्र यत्र विष्ठादिसंगतिः ॥
एवं कश्मलभूयिष्ठा भूरमेध्या प्रकीर्तिता ॥

जेथें चण्डाल लोक राहतात किंवा जेथें विष्ठा वगैरे पडलेली असते, ती जागा अत्यंत घाणेरडी समजून ती यज्ञादि कर्माकरतां अयोग्य समजावी.

व्याघ्रः—अस्पृश्यस्पर्शनं कृत्वा यदा भुङ्क्ते गृहाश्रमी ॥
अक्रामतस्त्रिरात्रं स्यान्षड्रात्रं कामतश्चरेत् ॥

अस्पृश्यांना स्पर्श केला असतां तसाच जो गृहस्थाश्रमी जेवतो, त्यानें तीन रात्रींपर्यंत किंवा इच्छेप्रमाणें सहा रात्रींपर्यंत घराबाहेर पडूं नये.

कात्यायनः—चण्डालसूतिकोदक्या पतिता शौचकृच्छ्रवान् ॥
स्पृष्ट्वा स्नात्वा शुचिः प्रेतमनुगम्यानलं स्पृशेत् ॥

चण्डाल, नुकतीच बाळंतीण झालेली स्त्री, रजस्वला, किंवा पतित, यांचा स्पर्श झाल्यास स्नान करून शुद्ध व्हावें व कृच्छ्र प्रायश्चित्त भरावें. प्रेताच्या पाठीमागून जावें लागल्यास अग्निस्पर्श करावा.

व्यासः—चण्डालपतितौ दृष्ट्वा नरः पश्येत भास्करम् ॥
स्नात्वात्वेतौ समालोक्य सचैलं स्नानमर्हति ॥
सूतिकां पतितोदक्यां चण्डालं च चतुर्थकम् ॥
यथाक्रमं परिहरेदेकद्वित्रिचतुर्युगम् ॥

चंडाल किंवा पतित हे नजरेस पडल्यास सूर्यदर्शन घ्यावें. तसेंच स्नान केल्यानंतर त्यांना पाहिल्यास सचैल स्नान करणें अवश्य आहे. नुक्तीच बाळंतिण झालेली स्त्री, पतित, रजस्वला व चंडाल यांना क्रमाक्रमानें अधिकाअधिक अपवित्र मानावें.

वैयाघ्रपादः—चण्डालं पतितं चैव दूरतः परिवर्जयेत् ॥
गोवालव्यजनाददर्शक्सवासा जलमाविशेत् ॥

चंडाल, पतित यांना दुरूनच टाळावें व गाईच्या केसांची चोरी वगैरेनीं प्रायश्चित घेण्यापूर्वी सचैल स्नान करावें.

आपस्तंभः—एकशाखां समारूढश्चण्डालादिर्यदा भवेत् ॥
ब्राह्मणस्तत्र निवसन् स्नानेन शुचितामियात् ॥

आपल्याच शाखेचा मनुष्य जर चण्डालादिकांप्रमाणें (अस्पृश्य) बनला, तर तेथें राहणाऱ्या ब्राह्मणानें स्नान करावें म्हणजे तो शुद्ध होतो.

कुक्कुटमः—पतितावि्द्धचण्डालमृताहारांश्च धर्मवित्॥
संस्पृश्य शुध्यति स्नानादुदक्याग्रामसूकरौ ॥

पतित, विद्ध म्हणजे जखमी झालेला, चण्डाल, मृत मांस खाणारा, तसेंच रजस्वला, गांवडुकर यांचा स्पर्श झाला असतां धर्मज्ञ माणसानें स्नान करून शुद्ध व्हावें.

स्मृत्यन्तरेः—चितिं च चितिकाष्ठं च यूपं चण्डालमेव च ॥
स्पृष्ट्वा देवलकं चैव सवासा जलमाविशेत् ॥
देवार्चनपरो विप्रो विप्रार्थी वत्सरत्रयम् ॥
स वै देवलकोनाम हव्यकव्येषु गर्हितः ॥

चिति (यज्ञपशु मारण्याचें ठिकाण) चितिस्तंभ, किंवा लाकूड, तसेंच चांडाल आणि वडवे ह्यांचाही स्पर्श झाल्यास सचैल स्नान करावें. देवपूजा करणारा

विप्र जर तीन वर्षेंपर्यंत पुजारीपणा करीत असेल तर तो देवलक म्हणजे गुरव, देवाचा नैवेद्य खाणारा बनतो. तो हव्यकव्यांच्या बाबतीत निंद्य होय.

कूर्मपूराणेः—उच्छिष्टोऽद्भिरनाचान्तश्चाण्डालं वा स्पृशेद् द्विजः ॥
प्रमादाद्वा जपेत्स्नात्वा गायत्र्यष्टसहस्रकम् ॥
चण्डालपतितादींस्तु कामान्धःसंस्पृशेद्द्विजः ॥
उच्छिष्टः तत्र कुर्वीत प्राजापत्यं विशुद्धये ॥

उष्टा असतांनाच आचमन करण्यापूर्वी जर द्विज चाण्डालाला स्पर्श करील किंवा चुकून त्याचा स्पर्श होईल, तरी त्यानें स्पर्श करून हजार गायत्री जप करावा. चण्डाल किंवा पतित इत्यादींना जर लोभानें एखादा द्विज उष्टा असतांनाच स्पर्श करील तर त्यानें प्राजापत्य प्रायश्चित्त करावें म्हणजे तो शुद्ध होतो.

जलपान

चाण्डालखातवापीषु पीत्वा सलिलमग्रतः ॥
अज्ञानाच्चैकनक्तेन त्वहोरात्रेण शुध्यति ॥ २५॥

चांडालांनीं खणलेल्या विहिरीचें पाणी अज्ञानानें प्याल्यास एका रात्रीनंतर किंवा एका दिवसानंतर शुद्धता येते.

अमेध्यशवचण्डालमद्यमांसादिदूषितात् ॥
कूपादुद्धृत्य कलशैः सहस्रं रेचयेज्जलम् ॥११८॥

यज्ञयागाविरहित असें शव, चांडाल किंवा मद्यमांस यांनीं दूषित झालेल्या विहिरींतून हजार कळशा पाणी बाहेर फेंकून द्यावें म्हणजे शुद्धता येते.

चाण्डालकूपभाण्डेषु यदज्ञानाज्जलं पिबेत् ॥
चरेत् सान्तपनं कृच्छ्रं ब्राह्मणः पापशोधनम् ॥ ४७॥

चांडालाच्या विहिरींतून किंवा भांड्यांतून अज्ञानानें पाणी प्याल्यास सांतपन कृछ्र प्रायश्चित्त करावें म्हणजे ब्राह्मण शुद्ध होतो.

चण्डालेन च संस्पृष्टं पीत्वा वारि द्विजोत्तमः ॥
त्रिरात्रेण विशुध्येत पञ्चगव्येन शुध्यति ॥ ४७॥

चांडालांचा स्पर्श झालेलें पाणी प्याल्यास तीन रात्रींनंतर द्विजश्रेष्ठाला शुद्धता येते. पंचगव्य घेतल्यानें तो शुद्ध होतो.

चाण्डालकूपभाण्डेषु त्वज्ञानात्पिबते यदि
प्रायश्चित्तं कथं तेषां वर्णे वर्णे विधीयते ॥५॥
चरेत् सान्तपनं विप्रः प्राजायत्यं तु भूमिपः ॥
तदर्धं तु चरेद्वैश्यः पदं शूद्रेषु दापयेत् ॥६॥
अज्ञानात्पिवते तोयं ब्राह्मणस्त्वन्त्यजातिषु ॥
अहोरात्रोषितो भूत्वा पञ्चगव्येन शुध्यति ॥७॥

चांडालाच्या विहिरींतून किंवा भांड्यांतून अज्ञानानें पाणी प्याल्यास निरनिराळ्या वर्णांना वेगवेगळीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. ब्राह्मणांनीं सांतपन व्रत करावें, क्षत्रियांनीं प्राजापत्य व्रत करावें, वैश्यांनीं तेंच अर्धें करावें व शूद्रांनीं पाव करावें.

जर अन्य जातीचें पाणी ब्राह्मण अज्ञानानें पिईल तर त्यानें एक अहोरात्र उपवास करावा व पंचगव्य घ्यावें म्हणजे तो शुद्ध होतो.

जातरूपं सुवर्णं च दिवा नीतं च यज्जलम् ॥
तेन स्नात्वा च पीत्वा च सर्वे ते शुचयः स्मृताः ॥१९॥

शुद्ध केलेलें सुवर्ण व दिवसा आणलेलें पाणी हीं शुद्ध होत. ह्या पाण्यानें स्नान केलें असतां किंवा तें पाणी प्यालें असतां सर्व शुद्ध होतात.

चण्डालभाण्डे यत्तोयं पीत्वा चैव द्विजोत्तमः ॥
गोमूत्रयावकाहारः सप्तत्रिंशदहान्यपि ॥ १७०॥

चांडालाच्या भांड्यांतून जो द्विजश्रेष्ठ पाणी पिईल, त्यानें गोमूत्र व यव यांचा २१ दिवस आहार करावा म्हणजे तो शुद्ध होतो.

चण्डालघटभाण्डस्थं यत्तोयं पिवते नरः ॥
तत्क्षणात्क्षिपते यस्तु प्राजापत्यं समाचरेत् ॥७०॥

चांडालाच्या गाडग्यांतील पाणी जो मनुष्य पितो तो त्या क्षणींच पतित होतो. त्यानें प्राजापत्य प्रायश्चित्त करावें म्हणजे तो शुद्ध होतो.

चन्डालेन तु संस्पृष्टो यश्चापः पिबति द्विजः॥
अहोरात्रोषितो भूत्वा त्रिषवणेन शुध्यति ॥४०॥.

चांडालाचा स्पर्श झाला असतांना जो द्विज पाणी पितो तो अहोरात्र उपोषण करून त्रिषवण विधि करून शुद्ध होतो.

चाण्डालेन तु संस्पृष्टं यत्तोयं पिबति द्विजः ॥
कृच्छ्रपादेन शुध्येत आपस्तम्बोऽब्रवीन्मुनिः ॥८०८॥

जो द्विज चांडालानें स्पर्श केलेलें पाणी पितो त्यानें शुद्धीकरितां कृछ्रपाद प्रायश्चित्त करावें असें आपस्तंभ मुनि म्हणतात.

चण्डालस्य तु संस्पृष्टं विण्मूत्रस्पृष्टमेव च ॥
त्रिरात्रेण विशुद्धिः स्याद्भुक्तोच्छिष्टं तथा चरेत् ॥२२५॥

ज्याला चाण्डालाचा स्पर्श झाला तें विष्ठामूत्रस्पर्शासारखेंच (अशुद्ध) समजावें. त्यास तीन रात्रीं भुक्तोच्छिष्ट व्रत करून शुद्धता येते.

वापीकूपतडागानां दूषितानां च शोधनम् ॥
उद्धरेद् घटशतं पूर्णं पञ्चगव्येन शुध्यति ॥

विहीर, आड, तळें यांची शुद्धि करण्याकरतां शंभर घागरी पाणी बाहेर फेकून द्यावें व पंचगव्य त्यांत टाकावें म्हणजे त्यास शुद्धता येते.

प्रपास्वरण्ये घटके च कूपे द्रोण्यां जलं क्रोशविनिर्गलच्च ॥
श्वपाकचाण्डालपरिगृहीतं पीत्वा जलं पञ्चगव्येन शुद्धिः॥

पाणपोयी, अरण्य, विहीर, बादली, यांच्यांतील पाणी किंवा जें एक कोस-भरच फार तर वाहात आलें आहे असें, तसेंच श्वपाक, चाण्डाल यांनीं ज्यास स्पर्श केला आहे असें पाणी प्याल्यास पंचगव्यानें शुद्धि होते.

चण्डालभाण्डसंस्पृष्टं पीत्वा कूपगतं जलम् ॥
गोमूत्र यावकाहारस्त्रिरात्रेण विशुध्यति ॥१७३॥

चाण्डालाचा भांड्याला स्पर्श झाला असून तसेंच त्यांतून किंवा त्यांच्या विहिरीचें पाणी प्याल्यास गोमूत्र व यव यांच्या त्रिरात्र आहारानें शुद्धता येते.

अन्त्यजैः स्वीकृते तीर्थे तटाकेषु नदीषु च ॥
शुध्यते पञ्चगव्येन पीत्वा तोयमकामतः ॥ १७५॥

ज्या ठिकाणीं नदीवर, तळ्यावर किंवा तीर्थावर अंत्यज जातात येतात, तेथें चुकून पाणी प्यालें असतां पंचगव्यानें शद्धि होते.

मंदिरप्रवेश–गृहप्रवेश

चाण्डालः पतितो वाऽपि यस्मिन् गेहे समाविशेत् ॥
त्यक्त्वा मृण्मयभाण्डानि गोभिः संक्रामयेत्त्र्यहम् ॥४०१॥

चांडाल किंवा पतित यांचा ज्या घरांत प्रवेश झाला असेल त्या घरांतून मातीचीं सर्व भांडीं टाकून देऊन व गोधन घेऊन तीन दिवस घर सोडून जावें.

प्रासाददेव हर्म्याणां चण्डालपतितादिषु ॥
अन्तःप्रविष्टेपु तथा शुद्धिः स्यात्केन कर्मणा॥
गोभिः संक्रमणं कृत्वा गोमूत्रेणैव लेपयेत् ॥ ४१० ॥
पुण्याहं वाचयित्वा तु तत्तोयैर्दर्भसंयुतैः ॥
संप्रेक्ष्य सर्वतः पश्चादेवं समभिषेचयेत् ॥४११॥
श्रीसूक्तेन तदा दिव्यैर्दद्यान्नीराजनं द्विजः ॥
अवैष्णवस्पर्शनेऽपि एवं कुर्वीत वैष्णवः ॥४१२॥ वृद्ध हारीत अ.२

मोठे वाडे व बंगले यांच्या अंतःपुरांत जर चंडाल किंवा पतित इत्यादींचा प्रवेश झाला तर काय केल्यानें शुद्धि प्राप्त होते ?

गाईच्यासह घरांतून बाहेर पडावें. घर गोमूत्रानें सारवावें व उदक व दर्भ यांच्या साहाय्यानें पुण्याहवाचन करून तें जल घरांत चोंहोकडे शिंपडावें, श्रीसूक्तानें अभिषेक करावा व चोहोंकडे लखलखाट करावा. जो वैष्णव नव्हे त्याचा स्पर्श झाला तरीसुद्धां वैष्णवानें या प्रकारानेंच शुद्धि करावी.

चण्डालैरंत्यजैश्चैव तथान्यप्रतिलोमजैः ॥
म्लेच्छैश्च नीचचण्डालैर्गुरुनिंदादिदोषितैः ॥
एवमादिभिः संस्पृष्टे देवागारे विशेषतः ॥
स्पृष्टे प्रवेशने बाधा पूजाकाले च दर्शने ॥
आशौचवत्प्रवेशे च पूर्ववद्विधिरिष्यते ॥ –वृद्ध हारीत.

जर चंडाल, अंत्यज इतर प्रतिलोमज संतति, म्लेंच्छ, नीच, चांडाल गुरूची निंदा करणारे लोक इत्यादींनीं विशेषतः देवघराला स्पर्श केला तर किंवा पूजाकालाच्या वेळीं किंवा दर्शनाच्या वेळीं ते देवालयांत शिरले तर आशौचाप्रमाणें सर्व विधि करणें जरूर आहे.

चण्डालः श्वपचो वापि तादृशाः पुल्कसादयः ॥१॥
अज्ञानाद्गर्भगेहे तु कर्मस्वधिकृता यदि ॥
वसेयुश्चैव तैः सार्धं भोज्यं वा वस्तु तादृशम् ॥२॥
स्पृष्टभागधनाङ्गश्चेत्स्पृष्टं वा कौतुकं यदि ॥
क्रियासमभिहारेण प्रायश्चित्तमिहोच्यते ॥३॥ मनु ॥

चंडाल, श्वपच, पुल्कस इत्यादि लोकांना अज्ञानामुळें जर कांहीं कामा-साठीं गाभाऱ्यांत जाऊं दिलें तर किंवा त्यांच्यासह खाणेंपिणें व वसति झाली तर ज्या भागाला स्पर्श झाला असेल किंवा जिकडे त्यांची दृष्टि गेली असेल तो तो सर्व भाग प्रायश्चित्तानें शुद्ध केला पाहिजे.

रजकी चर्मकारी च लुब्धकी वेणुजीवनी ॥
चातुर्वर्ण्यस्य तु गृहे त्वविज्ञातानुतिष्ठति ॥
ज्ञात्वा तु निष्कृतिं कुर्यात्पूर्वोक्तस्यार्द्धमेव तु ॥
गृहदाहं न कुर्वीत शेषं सर्वं च कारयेत् ॥४॥ पराशर स्मृ०अ. ६

परटीण, चांभारीण, बुरडीण किंवा एखादी लोभी स्त्री अज्ञानानें जर घरीं राहिली तर वर सांगितलेल्या प्रायश्चित्ताच्या निम्में प्रायश्चित्त केल्यानें पापाची निष्कृति होते. घर भाजूं नये. वाकी सर्व प्रायश्चित्त घ्यावें.

श्रीवैखानसे भगवद्धर्मशास्त्रे श्रीमरीचिमहर्षिप्रणीतमहाशास्त्रे विमानार्चनकल्पे प्रमाणानिः——पंचमहापातकैः चाण्डालाद्यैश्चालये प्रविष्टे तत्स्पृष्टनिवेदने च सप्ताहं महाशान्ति हुत्वा, देवं कलशैः संस्नाप्य पुनः प्रतिष्ठां कारयेत् ।

पतिते गर्भगृहे प्रविष्टे वास्तुशुद्धिं कृत्वा महाशान्ति कारयेत् । पतिते गर्भ-गृहे प्रविष्टे वास्तुशुद्धिं कृत्वा महाशान्ति हुत्वार्चयेत् । तेषु प्रथमावरणे द्वितीये वा नैरन्तर्येण सञ्चारत्सु मासेऽतीते मासमेकं महाशान्ति हुत्वा कर्षणादि पुनःसंस्कारं कृत्वा, महाप्रतिष्ठां कारयेत् । तेषु प्रासादाभ्यन्तरबाह्येषु संचारत्सु संवत्सरेऽतीतेऽर्चनादि संत्यज्य कौतुकादि रक्षणं कृत्वा, गर्भागारादि सप्त प्राकारेषु सर्वत्र गा वासयित्वा, मासेऽतीते सर्वत्र शुद्धिं कृत्वा मासत्रयं महा-शान्ति हुत्वा कर्षणादि पुनःसंस्कारं कृत्वा वालालयं संकल्प्य, जलाधिवासा-दीनि कारयित्वा बिम्बशुद्धिं कृत्वाऽशीत्यधिकसहस्रकलशैः संस्नाप्य ब्राह्मणान् भोजयित्वा वैष्णवान् सम्पूज्य देवं वालालये प्रतिष्ठाप्यालयादिसर्वत्र नवी-करणं कृत्वा महाप्रतिष्ठां कारयेत् ।

मूर्तिस्पर्श

जर पंच महापातकें करणारांनीं तसेंच चांडालादिकांनीं देवालयांत प्रवेश केला किंवा त्यांनीं प्रवेश केल्याचे समजलें तर सात दिवस महाशांति होम करावा. देवाला कलशांनीं स्नान घालावें व पुन्हां प्रतिष्ठा करावी.

जर एखादा पतित गाभाऱ्यांत प्रवेश करील तर वास्तुशुद्धि करून महाशांति करावी, होम करावा व पूजार्चन करावें. जर हे लोक एकदां किंवा दोनदां किंवा अनेक वेळेला आंत आले तर एक महिना झाल्यावर पुन्हां एक महिनाभर महाशांति होम करावा. मूर्तीला सर्व संस्कार पुन्हां करावे व महा प्रतिष्ठा करावी. या लोकांचा गाभाऱ्याच्या बाहेर संचार चालू असून एक वर्ष झालें तर पूजाअर्चादि टाकून द्यावी, कौतुकादि (हंडया, झुंबरें, चित्रें, अलंकार इ.) यांचें रक्षण करून गाभाऱ्यादि सात ठिकाणीं गायी बांधाव्या. एक महिन्यानंतर सर्वत्र शुद्धि करावी, तीन महिने महाशांति होम करावा. कर्पणादि पुन्हां सर्व संस्कार करावेत. बिंबशुद्धि करावी. १०८० कलशांनीं देवतेला स्नान घालावें, ब्राह्मणांना भोजन घालावें, वैष्णवांची पूजा करावी, देवाची नव्य देवघरांत प्रतिष्ठापना करावी. सर्वत्र नवीकरण करावें व महाप्रतिष्ठा करावी.

अर्चनानवनीतेऽपि सेवाप्रकारे इदं विवेचितम्—तद्यथा:—

गर्भागारे च सेवार्थं वैखानसकुलोद्भवः ।
वेदाध्ययनविप्रेण अर्धमण्डपसेवितम् ॥
यतीनां विष्णुभक्तानां महामण्डपसेवितम् ।
वैश्यशूद्रानुलोमानां ब्रह्ममण्डपसेवितम् ॥
शेषाणां हरिभक्तानां गोपुरं तु विधीयते ।
प्रतिलोमान्त्यजातीनां स्थूपीं दृष्ट्वा समाचरेत् इति ॥

गाभाऱ्यामध्यें वैखानस कुलोत्पन्न वेदाध्ययन करणाऱ्या ब्राह्मणांनीं देवाच्या सेवेसाठीं अर्धा भाग व्यापावा. यति, विष्णुभक्त यांनीं महामंडपांतून सेवा करावी. वैश्य, शूद्र व अनुलोम संतति यांनीं ब्रह्ममंडपांतून सेवा करावी बाकीच्या सर्व हरिभक्तांनीं गोपुरांतून सेवा करावी आणि प्रतिलोम जातींनीं देवालयाचें शिखर पाहून सेवा करावी.

वरील शास्त्रवचनांचे अर्थ अगदीं स्पष्ट आहेत. या शास्त्रवचनांसारखीं शेकडों वचनें शास्त्रजाणते आपल्याला काढून देतील. पण ती सर्व जरी जमा केलीं तरी त्यांचा इत्यर्थ एकच आहे. आतां अस्पृश्यता–निवारणाची चळवळ सुरू झाल्यावर शास्त्रीपंडितांच्या गोटांतहि कोठें कोठें फूट पडूं लागली आहे; व हीं जीं शास्त्रवचनें आहेत तीं सध्याच्या अस्पृश्य वर्गासंबंधानें नव्हेतच असें कोणी कोणी शास्त्री म्हणूं लागले आहेत. व तसेंच कोणी शास्त्री असेंहि म्हणतात कीं अमुक एक प्रकारचें कर्म जोंपर्यंत ते ते लोक करीत होते तोंपर्यंतच ते अस्पृश्य होते असा शास्त्राचा अर्थ आहे. त्यांनीं तें कर्म टाकलें म्हणजे तेथपासून ते अस्पृश्य नव्हेत व त्यांच्या पोटीं जे कोणी आले ते केवळ त्या जातींत जन्माला आले म्हणूनहि ते अस्पृश्य नव्हेत. हें शास्त्रीमंडळींतील भांडण चांगलेंच रंगेल असें दिसतें. या भांडणाचा शेवट कसाहि झाला तरी हरकत नाहीं. अस्पृश्यता–निवारणाला तो निकाल अनुकूल झाला तर बरेंच झालें, पण प्रतिकूल झाला तरी त्याचीहि येवढी मातब्बरी नाहीं. कारण शास्त्र जरी अस्पृश्यतानिवारणाला विरुद्ध असलें **तरी तें आपण बिलकूल मानूं नये. तें डाव्या हातानें बेधडकपणें दूर सारून समाजानें आपला नवा मार्ग चोखाळावा असें माझें ठाम मत आहे** व हेंच मत मी सांगत आलों आहे. पण शास्त्र शास्त्र म्हणून म्हणतात तें काय आहे याची माहिती व्हावी यासाठीं वरील सर्व वचनें दिलीं आहेत.

आगाऊ पडलेल्या पद्धतीचेंच शास्त्र बनतें व एकदां शास्त्र बनलें म्हणजे त्यांतील वचनांस अनुसरून पुढील पुढील प्रजा वागूं लागतात. लोकांनीं अस्पृश्यांचा तिटकारा किती मानला हें या शास्त्रवचनांवरून चांगलें दिसून येईल. त्यांचा प्रत्यक्षच विटाळ नव्हे तर त्यांची सावली पडली किंवा त्यांचें दर्शनहि झालें तरी तें विटाळासारखेंच मानावें येथपर्यंत ही विचाराची अतिशयोक्ति गेली. अर्थात् इतकें झाल्यावर या गरीब आणि दीनवाण्या निराश्रितांची काय अवस्था झाली असेल हें सहज ओळखतां येण्यासारखें आहे. त्यांच्या विषयींची उपेक्षा आणि अवहेलना समाजाच्या मनांत सर्वत्र भरून राहिली व तिचा आविष्कार निरनिराळ्या तऱ्हांनीं होऊं लागला. आजसुद्धां काय स्थिति आहे ही आपण पाहातच आहों. हीच सर्व भूतकालांतून चालत आलेली त्यांची स्थिति होय. या विधानाचें खरेंपण पटविण्यासाठीं प्रथम कांहीं

ऐतिहासिक दाखले देतों. त्यावरून असें दिसेल कीं अस्पृष्टांना सगळीकडे हिडिसफिडिस होत होतें व या सामाजिक तिरस्काराचें दुःख अस्पृष्टांना अनिवार होत होतें. हें दुःख प्रसिद्ध महार संत जो चोखामेळा त्याच्या शब्दांनींच देतों. यानंतर धार्मिक जीवनांतून त्यांना दूर ठेवण्याची किती खबरदारी घेतली जात होती व त्यांचें जिणें कसें कस्पटासमान लेखलें जात होतें हें कांहीं ऐतिहासिक प्रसंगावरून दाखवितों. व शेवटीं हें लेखी वाङमय दिल्यावर जें तोंडी वाङमय असतें त्यावरून समाजानें त्यांची कशी दुर्दशा उडविली होती हेंहि देतों.

सामाजिक जीवितांत ही अस्पृश्यता त्यांना शतकानुशतक शतगुणें जाच करीत होती हें खरेंच आहे. आपलीं लग्नें ब्राह्मणांनीं लावावीं असा महारांचा फार आग्रह होता. पण ब्राह्मण तें पतकरीनात. महारांना ब्राह्मणाचें उपाध्येपण लाभलें तर हवें होतें कारण त्यायोगानें त्यांचा सामाजिक दर्जा वाढणार होता व त्यांच्या लग्नकार्यालाही अधिक गांभीर्य व पावित्र्य येणार होतें. पण ब्राह्मणाची अडचण निराळीच होती. सबंध हिंदू समाजाच्या शरीरभर जो श्रेष्ठकनिष्ठ भाव आहे त्याची बाधा आशूद्र सर्वांनाच होते. ब्राह्मणानें जर अतिशूद्राशीं संबंध ठेविला तर त्या अतिशूद्राचा उद्धार होण्याच्याऐवजीं हा ब्राह्मणच ब्राह्मण्यांतून पतित होतो! इतर सर्व जातींचे लोक व त्याचे सवर्णीय त्याला पतित समजू लागतात. जो ब्राह्मण अतिशूद्रांचें उपाध्येपण करील त्याकडून आपलें उपाध्येपण करवून घेण्यास इतरवर्णीय कबूल होत नाहींत. ब्राह्मणाला पातित्य आणणाऱ्या आठ गोष्टी आहेत. १ सेवावृत्ति पतकरणें, २ शेती करणें, ३ व्यभिचारोत्पन्न असल्याबद्दल वोभाटा असणें, ४ स्मशानावर क्रियाकर्मांतर चालविणें, ५ अशुद्ध प्रतिग्रह पतकरणें, ६ देवस्थानाचें वडवेपण करणें, ७ मुसलमानांशीं पूर्वीसुद्धां केव्हां संबंध आलेला असणें व ८ हलक्या जातीचें उपाध्येपण करणें. ही यादी मुख्यतः उत्तरेकडील ब्राह्मणांना उद्देशून केलेली आहे. पण तिच्यांतील कांहीं कलमें दक्षिणेकडील ब्राह्मणांनाही लागतात, त्यांतच आठवें कलमही लागतें. अर्थात् महारांची इच्छा जरी असली तरी ब्राह्मणाला तें संकटच होतें. इ. स. १७८४ त एक प्रसंग घडला. आनंदराव भिकाजी रास्ते यांनीं पौड खोऱ्यांतील महारांच्या या बाबतींतल्या अर्जाचा विचार करून वतनदार जोशी यांस महारांचीं लग्नें लावावयाचा

हुकूम केला व त्याप्रमाणें महारांस कळविलें. हा हुकूम देतांना रास्ते यांनीं पूर्वीच्या दाखल्याचा उल्लेख केला व तुम्ही पूर्वी लावीत होतां व आतांच लावीनासे झालां असा ठपका त्यांनीं जोशांवर ठेवला. जोशी यांनीं उलट सरकारांत रदबदली चालू केली. ते म्हणाले, "लग्नें लावण्याची चाल पुरातन नाहीं. पूर्वीं हवालदाराचें सांगण्यावरून महाराचें लग्न लाविलें होतें पण तेव्हां मेढ्या महार हजर नव्हता म्हणून लाविलें व आमचे बाप–भाऊ पंधरा वर्षांचे लहान होते. त्यांवर निग्रह केला म्हणून लाविलें. त्या गोष्टीस ५५ वर्षें होऊन गेलीं. त्यावरून महारास कमाविसदारांनीं भोगवटचाचीं पत्रें दिलीं व त्यामुळें महार लग्न लावण्यास ब्राह्मण मागों लागले तो न दिल्हा सबब १० रु. मसाला दंड करून आम्हांस महाली नेऊन लग्नाविषयीं निग्रह केला. आमचें म्हणणें इतकेंच होतें कीं अतिशूद्राचे लग्नास आम्ही मुहूर्त मात्र सांगतों, लग्नें लावित नाहीं. पूर्वापार चाल नाहीं, नवी चाल होणार नाहीं: यावर आमचें वतन जप्त केलें. जुन्नर कोकणकडे चवकशी घेतां लग्न न लावीत असेंच आहे. औरंगजेबाकडेही फिर्याद झाली होती. त्यानींही लग्नें लावू नयेत असा निकाल केला. खुद्द मोंगलांनीं सुद्धां जुनी चाल मोडून नवी घातली नाहीं, तर स्वराज्यांत आग्रह करून नवी चाल करणें अनुचित. अतिशूद्रांचे जातींत ढेगोमेगो आहेत. तेच त्यांच्यीं लग्नें लावित असतात. तर वतन मोकळें करावें व दंड परत द्यावा." पुढें काय झालें तें कळत नाहीं पण येवढ्यानें मुख्य मुद्दा कळून येतो.

हें लग्नकार्याविषयीं झालें. इ. स. १७८३ त पंढरपूरकरांनीं विटाळ होतो असा अर्ज केला व हुकूम आणिला: "देवालयाचे बाहेर चोखामेळ्याचा दगड उत्तरेचे आंगें आहे. तेथें अतिशूद्र दर्शनास येतात. जागा संकोचगल्लीची आहे. स्पर्शास्पर्श होतो. हें ब्राह्मणास विरुद्ध; यास्तव अतिशूद्रांनीं चोखा-मेळ्याचे दीपमाळेजवळ अथवा महारवाड्यांत स्थळ असेल तेथें पूजा करावी. देवालयाजवळ अतिशूद्रांनीं येऊं नये. कोणी आला तर पारिपत्य करावें." यावरोबरच दुसरा एक उल्लेख आहे तो असा: "देवदर्शनास मातबर येतात त्याजबरोबर यवन येतात : ते प्राकारांत जातात व त्यामुळें अनाचार होतो, तो अयोग्य. मुसलमानानें नामदेवाचे पायरीस स्पर्श करूं नये. दुसऱ्याही प्राकारानें आंत जाऊं नये. गेला तर पारिपत्य करून गुन्हेगारी घ्यावी."

(सवाई माधवराव रोज० ३–२७६ व २७९) यांवरून दिसेल कीं जरी लष्करांत व गांवकींत महारांना प्रतिष्ठा प्राप्त झाली होती तरी सामाजिक व धार्मिक उन्नतीच्या दृष्टीनें त्यांना वर सरकण्यास कोठेंही संधि नव्हती. हे उल्लेख मराठी राज्याच्या शेवटचेच आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

पण या सामाजिक कमीपणाचीं जीं अप्रत्यक्ष नुकसानें असतात तींही महारांच्या वाटचाला कशीं येत हें दाखविण्यासाठीं कांहीं उदाहरणें देतों. एक अज्ञान म्हणजे सर्व आपत्तींचें माहेरघरच होय. त्याचा दुसरे लोक अतिरिक्त फायदा घेतात. पुरंदर किल्ल्यावरील शेंदरी बुरुजाचें बांधकाम चाललें होतें तें शेवटास जाईना. पातशहा वेदरकर यास दृष्टांत झाला कीं ज्येष्ठपुत्र व ज्येष्ठसून उभयतां बुरजांत दिलीं असतां काम शेवटास जाईल. मग येसाजी नाईक चिबे म्हणो लागले कीं माझा मुलगा व सून देतों. मग बहिरनाक सोननाकाचा पुत्र नायनाक व देवकाई अशीं आश्विन वद्य ८ स शेंदरी बुरुजांत गाडलीं. मग बुरुजाचें काम सिद्धीस गेलें. नंतर पातशहा काम पाहून खुषमर्जी झाले व पुरंदर किल्ला येसाजीस दिला व बहिरनाकास २०५ होन देऊन म्हावी भोंगली हे ७०५ होनांचें गांव दिलें. (सनदापत्रें पृ. १ लें १) 'तेल्याचा मेला वैल अन् परटिण चालली सती' अशी म्हण आहे. कोणाच्या कामासाठी कोण मरतो पहा. वेदरच्या बादशहाचा किल्ला पुरा होईना तेव्हां महारानें आपला लेक व सून गाडून टाकलीं. पादशहाला दृष्टांत झाला! बहिरनाकाच्या तोंडाला उत्पन्नाचें पाणी सुटलें! आणि नायनाक आणि देवकाई यांना जिवंत समाधि मिळाली. पण मनाला अत्यन्त दुःख देणारा प्रकार असा कीं, आमच्यांतल्या सर्वोत्तम माणसांनासुद्धां महाराच्या जिवाची पर्वा नव्हती, असें दिसतें. त्यांनींच त्याचें जिणें मातीमोल मानलेलें होतें तर वेदरच्या पादशहाच्या किल्यासाठीं नायनाक आणि देवकाई गाडलीं जातील नाहींतर काय होईल? आपल्या राष्ट्राचें, संस्कृतीचें, स्वाभिमानाचें जें थोर निधान म्हणजे श्रीशिवाजी महाराज त्यांनींच त्यांच्या जिवाची किंमत कितपत मानली होती हें पुढील लेखावरून दिसून येईल:—

(शिव–चरित्र–साहित्य खंड ३ रा–लेखांक ६०९ वरून)

करीना खंडनाक वलद रामनाक महार मौजे करंजिये ताा भोर. रोहिडखोरे ताा सुाा सन सवा अर्बेन मया अलफ–साहेबाचे सेवेसी करीना लेहोन दिल्हा

यैसाजे, इदिलशाहा निजामशहाचे कारकीर्दीस किले रोहिडा येथें आपले बापाचा चुलता काळनाक महार मौजे मार व येसनाक महार सोंडकर या दोघांच्या नाइक्या होत्या. ते समइ वतनदारीचे चाकरीस कमळनाक महार मौजे नाटंवी ता॥ मार व वाडी व धावडी ता॥ उतरोली हे दोघेजण दुतर्फाचे महार होते. निमेनिमेप्रमाणें उत्पन्न घेऊन चाकरी करून होते. त्या दोघानी बदमामली केली म्हणोन अजम सेखजी किलेदार रोहिडा याणी दोघाची डोचकी माराविसी केली व मुलेबाळे ढाणकास द्यावीसी केली. तेव्हां सोंडकरानें रदवदल करून कमळनाक महार मौजे नाटंबी यासी आपले हातीं घेऊन खंड कबूल केला. तो दिवाणांत दिल्हा. वाडी धावडीचा महार अटकेंत ठेविला. ते समई नाटंबीच्या महारास खंडाचा पैसा न मिळे म्हणून त्याने आपले महारकीच्या वतनाची चौथी तक्षीम येसनाक सोंडकर यासी दिल्ही. तेही येसनाक कबूल न करी, आपला पैकाच मागो लागला. तेव्हां महारकीच्या वतनाची चौथी तकसीम व किल्ल्याचे वतनदारीमुळें उपेंद्र होईल ते खाणे व वतनदारीची चाकरी करणें म्हणोन सांगितले. त्याप्रमाणे येसनाकाने कबूल करून त्याप्रा॥ चालत आले. त्यावरी किला महाराज राजश्री थोरले–स्वामीस हस्तगत जाला. मोगलाई बुडाली. तेव्हां कालनाकाची नाइकी व सोंडकर महाराची नाइकी करार केली आणि **वाडीचा महार अटकेत होता** त्यास खंडाचा पैका न मिळे याकरिता **त्यास सर्जा बुरुजाच्या खाले पायांत घालावयाचा हुकूम महाराजानी केला**. त्यावरून वाडीचा महार सर्जा बुरुजाच्या पायाखाले घातला. त्यावरी काळनाक व सोंडकर महार मयत जाला. पोरांडा जाला देशावरी गेले. त्यावरी रामनाक आपला बाप गावावरी आला. त्याणे रायेगडास जाऊन महाराज राजेश्री–कैलासवासी याणी पूर्वीचा दाखला मनास आणून पूर्ववर्त प्रमाणें सनद दिल्ही ते किल्यास आणिली. मेटे आठ दिवस वसविली. नाइकी वतनदारी चालवू लागला. पुरातन घरठाणा बांधला टाके पाणी खावयासी एक दिल्हे. तेथील पाणी खावून वतनदारीची चाकरी व नाइकी केली. तो मृत्यु पावला त्यास सर्ज बुरजाखाले पुरिला तेथें चिरा रोविला आहे." हें सामाजिक जीविताबद्दल झालें.

धार्मिक जीवितांत त्यांचें जिणें कसें होतें पहा. संत चरण्यांत चोखोबाचें घराणें प्रसिद्ध आहे. ज्ञानेश्वर व त्यांचीं सर्व भावंडें, नामदेव व त्यांचे नातेवाईक व दासदासीहि ज्याप्रमाणें वारकरी संप्रदायांत

प्रसिद्ध आहेत त्याप्रमाणेंच चोखामेळा महार व त्याचे नातलग हेहि प्रसिद्ध आहेत. चोखोबा हा मंगळवेढ्याचा महार महान भगवद्भक्त होता; त्याची बायको सोयराबाई ही 'चोखायाची महारी' ही हरिभजनीं सादरच होती. महुणपुरा गांवीं दिलेली त्याची बहीण निर्मळा, सोयराबाईचा भाऊ बंका महार व चोखोबाचा खुद्द मुलगा कर्ममेळा हेहि संतांतच मोडतात. स्वतः चोखोबा हा नामदेवाचा शिष्य होता. विठ्ठलाचें नांव त्याच्या जिव्हाग्रीं बांधलेलें होतें. मंगळवेढ्याचें कुसूं रचण्याचें काम चालू असतां तें एकदम कोसळलें व त्याच्याखालीं चोखोबा चिरडून मरण पावला. शेकडों लोक असेच चिरडले होते; अर्थात् चोखोबाचें प्रेत कोठें सांपडेल अशी पंचाईत पडली. पण मृत्यु आल्यानंतरसुद्धां चोखोबाच्या अस्थींतून 'विठ्ठल' 'विठ्ठल' असा ध्वनि निघत होता. त्या खुणेवर त्याचें शव उकरून काढलें कशी कथा आहे. नामदेवानें आपल्या या भक्ताच्या अस्थि पंढरपुरीं नेऊन पुरल्या. या महार संतपंचकानें लिहिलेले अभंग प्रसिद्ध आहेत; अभंगाची भाषा सोपी असून आधुनिक असल्यासारखी वाटते; पण पिढ्यानुपिढ्या जुनी भाषा जर माणसांच्या तोंडीं राहत आली, तर तिला नवें नवें रूप येत राहतें हा वाङमयांतील न्याय प्रसिद्ध आहे. इतर संतांच्या अभंगांत दिसणारा भक्तीचा जिवंत उमाळा याच्याहि अभंगांत दिसून येतो, पण याच्या जोडीला त्यांच्या म्हणून ज्या कांहीं चित्ताच्या वेदना होत्या, त्याहि या अभंगांतून चांगल्या उघडकीस येतात. आपल्या सामाजिक स्थितीसंबंधीं पराकाष्ठेची खंती, विटाळाची भीड, देवाशीं अगदीं चडफडून भांडण इत्यादि या वाङमयांतील प्रकार पाहिले म्हणजे आज सहासात शतकें हे आपले हिंदुधर्मांतील बांधव, आपल्या स्थितीसंबंधानें, कसा टाहो फोडीत राहिले आहेत हें पाहून अत्यंत दुःख होतें. पुष्कळांना असें वाटतें कीं, देवदर्शन, अस्पृश्यता इत्यादिसंबंधानें खुद्द अस्पृश्यांना कांहींच वाटत नव्हतें व वाटत नाहीं. आपणच हे भलभलते विषय काढून उगाच उर बडवीत बसलों आहोंत. अस्पृश्य समाजाची सध्यां इच्छा काय आहे, हें आतां स्पष्टच झालें आहे, व म्हणून त्यांचें त्यांना कांहींच वाटत नाहीं हा शेरा अगदीं लुला पडतो. त्यांना भूतकालांत वाटत होतें कीं नाहीं याचा उलगडा या पंचकाच्या वाङमयांतून कसा होतो हें पुढील मजकुरावरून दिसून येईल. आपल्या देहाला विटाळ मानतात आणि त्यामुळें

विठ्ठलाला भेटणें कसें अवघड बनलें आहे यावद्दल केवढें जोराचें भांडण चोखोबा व त्याची पत्नी यांनीं केलें आहे हें या अभंगांवरून दिसून येतें. 'यातिहीन आम्हां कोण अधिकार अवघे दूरदूर करिताती' 'कोणीहि अंगीकार न करिती माझा, दूरदूर हो जा अवघे म्हणती ' इत्यादि शब्दांत काय परमार्थ आहे काय? आपल्याला अस्पृश्य मानतात याची शुद्ध चडफड व्यक्त झाली आहे. पण नाइलाज झाला म्हणजे रोजच्या व्यवहाराच्या वरच्या तत्त्वज्ञानांत शिरून तेथून तेंच दुःख व्यक्त करण्याची व प्रतिपक्षालाहि लावून बोलण्याची जी पद्धति आहे तिचा अवलंब करून चोखोबांनीं म्हटलें आहे, " पंचहि भूतांचा एकचि विटाळ, अवघाचि मेळ जगीं नांदे " " चोखा म्हणे मज नवल वाटतें, विटाळापरतें आहे कोण ?" "कोण तो सोवळा, कोण तो वोवळा। दोहींच्या वेगळा विठ्ठल माझा !" सोयराबाईची हीच चडफड तिनें किती नम्रपणानें व्यक्त केली आहे! "देहींचा विटाळ देहींच जन्मला, विटाळावांचोनि उत्पत्तीचें स्थान, कोण देह निर्माण नाहीं जगीं?"

पुढील अभंग पहा:—

यातिहीन आम्हां कोण अधिकार। अवघे दूरदूर करिताती ॥
चोखा म्हणे ऐसा हीन नरदेह। पीडीला संदेह काय करूं ॥
अवघ्या वर्णामाजीं हीन केली जाति। विटाळ विटाळ म्हणती क्षणोक्षणी ॥
कोणीहि अंगीकार न करिती माझा। दूरदूर हो जा अवघे म्हणती ॥
चोखा म्हणे जरी तुम्ही घ्याल पदरीं। तरीच मज हरि सुख होय ॥

* * * *

हीन याति माझी दैवा। कैसी घडे तुमची सेवा ॥
मज दूर दूर हो म्हणती। तुज भेटूं कवण्या रीतीं ॥
माझा लागतांचि कर। सितोडा घेती करार ॥
माझ्या गोविंदा गोपाळा। करुणा भाकी चोखामेळा ॥

* * * *

पंचहि भूतांचा एकचि विटाळ। अवघाचि मेळ जगीं नांदे ॥
तेथें सोंवळा वोंवळा तो कोण। विटाळाचें कारण देह मूळ ॥

आदि अंतीं अवघा विटाळ संचला । सोंवळा तो झाला कोण न कळे ।।
चोखा म्हणे मज नवल वाटतें । विटाळा परतें आहे कोण ।।

* * * *

वेदांसी विटाळ शास्त्रांसी विटाळ । पुराणें अमंगळ विटाळाचीं ।।
जीवासी विटाळ शिवासी विटाळ । काया अमंगळ विटाळाची ।।
ब्रह्मीयां विटाळ विष्णूसी विटाळ । शंकरा विटाळ अमंगळ ।।
जन्मतां विटाळ मरतां विटाळ । चोखा म्हणे विटाळ आदिअंतीं ।।

* * * *

कोण तो सोवळा कोण तो वोंवळा । दोहींच्या वेगळा विठ्ठल माझा ।।
कोणासी विटाळ कशाचा जाहाला । मुळींच संचला सोवळाची ।।
विटाळाचे अंकीं विटाळाचें फळ । चोखा तो निर्मळ नाम गाय ।।

* * * *

सोयराबाई म्हणतेः—

देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा निर्मळ शुद्धबुद्ध ।।
देहींचा विटाळ देहींच जन्मला । सोवळा तो झाला कवणधर्म ।।
विटाळावांचोनि उत्पत्तीचें स्थान । कोण देह निर्माण नाहीं जगीं ।।
म्हणूनि पांडुरंगा वानीतसे थोरी । विटाळ देहांतरीं वसतसे ।।
देहाचा विटाळ देहींच निर्धारीं । म्हणतसे महारी चोखियाची ।।

या पतिपत्नींनीं आपलें मनोगत त्यांतल्या त्यांत नम्रभावानें व थोडा तात्त्विक पडदा ठेवून सांगितलें आहे. पण त्यांचा मुलगा जो कर्ममेळा त्यानें तर आपल्या वयास अनुसरून विटाळाच्या चालीवर व प्रत्यक्ष पांडुरंगाच्या निष्ठुरपणावर कडाकड कोरडे ओढले आहेत. फार काय सांगावें, त्यानें तर पांडुरंगाची लाज काढली आहे ! लोकांचें उष्टें खातां जन्म गेला, याची तुम्हांला कांहीं शरम पाहिजे असें त्यानें देवालाच चमकाविलें आहे. "तुमची भक्ति करावी, पण आम्हांला त्याचें काय सुख आहे? कारण तुम्ही हीन आहां, तुम्ही दीन आहां असें आमच्या कानीं कपाळीं लोक ओरडत आहेत. तुम्ही खुशाल आनंदाचे व सुखाचे सोहळे भोगतां, पण विठ्ठला, आमच्या माथीं मात्र वोखटपण मारिलें आहेस ! " या उद्‌गारांत अगदीं संतापाचा कढ सांडल्यासारखा दिसतो. याही पुढें जाऊन कर्ममेळ्यानें "गोड कधीं न

मिळेचि अन्न, सदा लाजिरवाणें जगामध्यें," ही जी तक्रार केली आहे ती लक्षांत घेतली म्हणजे देशांतील संपत्तींत कसलाहि वांटा मिळूं न देणें व अस्पृश्याला जीवित सुखाचें करण्याची संधि न मिळूं देणें ही जी आपली सामाजिक व्यवस्था तिच्यावर अगदीं उघड उघड हल्ला आहे हें ध्यानांत येतें. पुढील दोन अभंग काय जोराचे आहेत हें पाहाः—

कर्ममेळा म्हणतोः—

आमुची केली हीन याती। तुज कां न कळे श्रीपती ॥
जन्म गेला उष्टें खातां। लाज न ये तुमचे चित्ता ॥
आमुचे घरीं भातदहीं। खावोनि कैसा म्हणसी नाहीं ॥
म्हणे चोखियाचा कर्ममेळा। कासया जन्म दिला मला ॥
तुमच्या संगतीचें काय सुख आम्हां। तुम्हां मेघश्यामा न कळे कांहीं ॥
गोड कधीं न मिळेचि अन्नें। सदा लाजिरवाणें जगामध्यें ॥
तुम्हासी आनंद सुखाचा सोहळा। आमुचे कपाळीं वोखटपण ॥
चोखिया म्हणे कर्ममेळा देवा। हाचि आमुचा ठेवा भागाभाग ॥

आतां तोंडी वाङमयांत त्यांच्यासंबंधीं जनमनाची भावना कशी दिसू लागली तें पहाः—

समाजांत ज्या चालीरीती असतात त्या तोंडी वाङमयांत नमूद झालेल्या असतात. तोंडी वाङमय म्हणजे मुख्यतः म्हणी. चलनी नोट जशी लहान पण ती मोडली तर कितीतरी रुपये येतात तशी म्हण ही सुटसुटीत व लहान पण अर्थ पाहिला म्हणजे कितीतरी कल्पना मनांत येतात. नोटीप्रमाणें वापरावयास ही सोयीची असते. व ती देणाघेणारांना चर्चा करीत बसावें लागत नाहीं. नोट दुसऱ्याच्या हातांत देतांना देणाराला माहीत असतें कीं या कागदाची किंमत वरोवर काय हें घेणाराला माहित आहे; तसेंच म्हणीचें असतें; भलें मोठें व विस्तृत तत्त्वज्ञानसुद्धां ती चटकन सांगून टाकते; मात्र तिची योजना करणारानें ती यथास्थलच योजिली पाहिजे. आपल्या संबंधाच्या म्हणी नेहमीं दुसरे लोकच बनवितात. त्या पाहिल्या म्हणजे आपल्या संबंधीचें त्यांचें मत काय आहे हें साधारणपणें दिसून येतें. ठळक गुणावगुण जे असतील त्यांवर मारलेले हे सामाजिक शेरेच असतात. हे शेरे अगदीं खरे असतात किंवा पूर्णांशानें लागू पडतात असें समजतां कामा नये.

सरासरीचा आडाखा म्हणून त्यांचा उपयोग होऊं शकतो इतकेंच. पण गुणावगुणाविषयीं जरी हें खरें असलें तरी रीतीभाती व लोक–समजुती या मात्र म्हणीवरून चांगल्या व्यक्त होतात. समाज या तोंडी वाङमयांत अस्पृश्यांसंबंधीं काय बोलतो तें पहा.

आपल्याकडे जशी 'गांव तेथें म्हारवडा' ही म्हण आहे तशीच मद्रासेकडे प्यारियाच्यासबंधानें आहे असें दिसतें. प्रत्येक गांवीं प्यारिया आहेच. या प्यारियाला जातिबंधनें नसावींत असें इतरांच्या मतानें दिसतें. 'नारळीला सावली नाहीं अन प्यारियाला जात नाहीं' अशी तिकडील म्हण आहे. पण प्यारिया हा अत्यंत विश्वासघातकी किंवा वचनभंग करणारा म्हणून समाज कसा दोष देतो पहा:–'जो करी वचनभंग, त्याचें प्यारियाचें अंतरंग.' गुजराथेंत धेडाची अवस्था आपल्याकडच्या महारासारखीच आहे. धेडाला इतर जातीचा कोणी मित्र मिळावयाचा नाहीं कारण तो अस्पृश्य आहे. म्हणून समाज म्हणतो 'धेडाचा मित्र धेड'! घाणेरडे खाणाराला 'धेडासारखा खाणारा' म्हणजे मासमच्छर खाणारा असें म्हणावयाची वहिवाट आहे. 'धेडाची हळद, खारट कां गुळमट' विचारून काय करावयाचें आहे? त्याला शिवावयाचें नाहीं हें जर खरें तर कां विचारा? 'धेडाची धडक तर पाण्यांत बुचकळी' मारलीच पाहिजे. धेडाच्या रागावण्याला जास्त प्रखर असें काय रूप येणार आहे? त्याच्या हातांत आहे काय? म्हणून लोक म्हणतात, 'धेड रागावला अन् केर उधळला.' याहून जास्त तो काय करणार? उत्तरेकडे डोंबाची अवस्था हीच आहे. डोंब वेळेला उपयोगी पडावयाचा नाहीं असा तिकडे समज दिसतो. पण हा अभिप्राय सांगतांना लोकांनीं समाजाच्या दोन टोकांची गाठ घातली आहे! 'डोंब, ब्राह्मण, अन् बोकड वेळेला उपयोगी पडावयाचे नाहींत.' डोंब हा नेहमीं वाकडा चालावयाचा असें सांगण्यासाठीं त्याची तुलना कशी केली आहे पहा:–गाडा, पडाव, अन् डोंब कधीं सरळ चालायचे नाहींत.' डोंबानें गुजरा–वनियाशीं मैत्री जोडली म्हणजे ते इतक्या दरिद्र्याला सुद्धां नागवल्याशिवाय सोडित नाहींत असें म्हणीवरून दिसतें. ''डोंबानें वनियाला मैतर केलें: दहा घेतले अन् शंभर ओकावे लागले' 'डोंबानें गुजराला मैतर केलें अन् गुजरानें त्याचें घर कोळून खाल्लें.' डोंबाची गरिबी अगदींच विपरीत पद्धतीनें वर्णिली आहे. तिकडे डोंब हे गाढवें बाळगतात

असें दिसतें. ते जमेस धरून लोक म्हणतात, 'गाढव गूळ हगतें तर डोंब भीक का मागते?" डोंबाला गरिबी घालविण्याला कसलेही साधन समाजानें ठेवलेलें नाहीं हें यावरून स्पष्ट होतें. 'डोंबाला पालखी अन् ब्राह्मणाला पायपिटी' या म्हणीनें समाजांतील उलथापालथ दाखविली आहे. त्यांच्या लग्नकार्यांत नेहमीचे वाजंत्री कधींच वाजवणार नाहीत. म्हणून 'डोंबाच्या लग्नांत डोंबच वाजंत्री' असें म्हटलें आहे. म्हणी या अर्धवट खरें सांगतात हें जरी खरें असलें तरी समाजांतील रीतीभाती मात्र त्या पूर्ण खरेपणानें वर्णितात हें कांहीं खोटें नाहीं. मद्रासेकडील व गुजराथ, उत्तर हिंदुस्थान इकडील अस्पृश्य समाजासंबंधींची कल्पना अशा वाङ्मयावरून कसकशी दिसते हें पाहिल्यावर महाराष्ट्रांतील या वाङ्मयावरून काय दिसतें हें पाहूं. मांग हा वन्य जातीपैकीं ही बाब निरनिराळ्या तऱ्हांनीं व्यक्त झाली आहे. तो रानांत राहून पाळत ठेवतो आणि वाटसरांवर छापा घालतो असें समाजाचें म्हणणें दिसतें. कारण म्हण आहे कीं, 'रांजणावर जसा भुजंग तसा रानांत मांग.'

गावकी जरी होती तरी महारांच्या कपाळीं शतदारिद्र्य लिहिलें होतें व त्यांना धंदे अगदीं घाणेरडे करावे लागत हें निखालस खरें आहे. गांवकीचे हक्क जरी असले तरी ते वाढत्या लोकसंख्येला पुरे पडत असतील हें कांहीं खरें नाहीं. अर्थात् त्यांचें कसें तरी खुटूंरुटूं चालत असेल इतकेंच. त्यांचें दारिद्र्य समाजानें उपहासबुद्धीनेंच पण कसें वर्णिलें आहे पहा." "कारे महारा उताणा? हातीं दीड दाणा!" हाती एक दाणा असावयाच्या ऐवजीं दीड आला कीं महाराला अगदीं ताठरपणा येतो. का गे महारणी उताणी? शिंगटं भरलं दाण्यांनीं!" महारीण येवढी ताठून कां गेली आहे? तर हातांतल्या शिंगटांत भरपूर जोंधळे मिळाले आहेत! म्हणजे किती थोडें जास्त मिळालें म्हणजे यांना अभिमानाला जागा झाली असें वाटूं लागतें हें या म्हणीवरून दिसतें. म्हणून या त्यांच्या दारिद्र्याच्या दर्शक नव्हेत काय? त्यांचें भिकारीपण आणखी एका म्हणीनें दाखविलें आहे. 'महाराचे देवास पटकुराची पूजा.' त्याच्या देवालासुद्धां पूजासाहित्य म्हणजे एक पटकूर– म्हणजे ओंगळ फाटके तुटकें धडुतें–असलें म्हणजे पुरे. देवाची जर ही तालेवारी तर भक्ताची काय असेल हें म्हणीनें दर्शविलें आहे. महाराचा जो हडकी हडोळकीचा पेशा त्यास अनुसरून त्याच्या घरीं पोरांना खेळावयास तरी

दुसरें काय सांपडणार हें दाखविण्यासाठीं कुत्सित समाज म्हणतो 'महाराचें लाडकें, खेळतें हाडकें'. महाराला वाटत असेल कीं आपण गांवकीचें मोठे अधिकारी आहों; पण या वेसकराचा अधिकार वेशीपाशीं संपावयाचा, याला वेशीच्या आंत कोण विचारतो ही जाणीव त्याला देण्यासाठीं समाज त्याला जागे करून सांगतो 'महाराचे आडवणं वेशीपाशीं.' आपण मोठे गांवकामगार आहों; हलक्या सलक्या माणसाचें नव्हे तर गांवचा जो पाटिल राजा त्याचें घोडें आपण धरतों यांत भूषण मानणाऱ्या महाराला गांव अवहेलनेनें म्हणतो 'पाटलाचं घोडं अन् महाराला भूषण! ' महारा, तूं मोठं भूषण मानत आहेस पण घोडं पाटलाचं आहे याची सही आहेना? पण दारिद्र्य, अवहेलना यांच्या पलीकडे जाऊन महारासंबंधाची आपली अत्यन्त उपेक्षाबुद्धि समाज किती सहज पण निष्ठुरपणें व्यक्त करतो पहा "महार मेला अन् विटाळ फिटला. "महाराच्या मृत्यूचा काय फायदा झाला हें समाज समाधानानें सांगत आहे! सामाजिक बहिष्कार याहून कठोर बनवितां येईल असें वाटत नाहीं.

जी वंशकल्पनेची जाणीव वर विवरून सांगितली आहे ती जनमनाच्या तळाशीं जाऊन वसली होती यांत कांहींच शंका नाहीं. माणसांना संकराचें कांहीं विलक्षण भय पडलें होतें. एकदां त्यांनीं संकर होऊं दिला होता व तो केवळ त्रिवर्णांत. तरीसुद्धां त्यांतून लोक परत वळले व आपापले वर्ण संभाळून राहिले. हें तर वर्णाविर्णांत झालें: मग जे लोक वर्णबाह्य म्हणून म्हटले होते त्यांच्याशीं संकर होणें हें अत्यन्त भीतिप्रद व किळसवाणें असें त्यांस वाटत असावें हें ओघानेंच येतें. ही भीति व ही किळस समाजानें अगदीं चमत्कारिक रीतीनें व्यक्त करण्याची पद्धत घातली. आपल्या अत्यन्त वाईट शिव्या ज्या आहेत त्या तपासून पहाव्या म्हणजे असें दिसेल कीं त्या संकरवाचक आहेत व तो संकर अस्पृश्य जातींतील माणसाशीं कल्पिलेला आहे. याचा अर्थ असा कीं अगोदर शिवी म्हणजे संकरवाचक असावयाची व मग तो संकरही अति-शूद्राशीं केला असें म्हणावयाचें. असें केलें म्हणजे अधःपाताची पराकाष्ठा झाली असें समजण्याची चाल आहे व तोच समज त्या शिवींत लोक व्यक्त करतात. संकरशब्दानें अगदीं हटकून जरी नाहीं तरी प्रतिलोमता सूचित होते व ही किळसवाणी इच्छा ज्या स्त्रीला झाली किंवा जिच्यावर हा प्रसंग

आला ती स्त्री किती पतित किंवा दुर्दैवी हें शिवीनें दर्शवावयाचें अशी पद्धत पडली. अगदीं साध्या व रोजच्या व्यवहारापर्यंत मूळची सामाजिक तत्त्वज्ञानें कशीं जाऊन पोचतात याचें हें एक चमत्कारिक उदाहरण आहे. ही सीमा गांठली तेव्हां अस्पृश्यावद्दलची मनोभावना काय असली पाहिजे हें सहज समजतें. अब्राह्मणांपैकीं एका प्रतिष्ठित जातीच्या स्त्रीला अन्त्यजाशीं व्यभिचार घडला. पुढें ती शिवनेर तालुक्याच्या मामलेदारापाशीं वटिक म्हणून राहिली. अडीच वर्षांनीं ही कोण व कशी आली हें सर्वांस कळून चुकलें त्यावरोबर समाजांत कोण खळबळ उडून गेली हें (स. मा. रो. ३–२६६) त सांगितलें आहे. मामलेदारसाहेबांना किती व केवढालीं प्रायश्चित्तें घ्यावीं लागलीं हें पाहिलें म्हणजे या परंपरेनें आलेल्या अंत्यजाच्या घाणेरड्या संसर्गाचें केवढें भयंकर भय समाजाला होतें याची कल्पना होते. मातुश्री, खुद्द स्वारी, पत्नी, चुलतबंधू, पुत्र या सर्वांना हजारो रुपयांचीं प्राजापत्यें करावीं लागलीं. सहस्रभोजनें घालावीं लागलीं, नाशिक, पुणतांबे, पुणें येथें दक्षणांची खैरात करावी लागली: शिवाय उपोषणं, पंचगव्य, होमहवन गोसेवा, प्रदक्षिणा इत्यादींचा मारा करावा लागला. हें पाहिलें म्हणजे संकरा-संबंधाची दहशत समाजाला फारच विलक्षण होती हें स्पष्ट दिसतें, व तो दहशत व ती किळस समाजानें शेवटीं शिव्यांत दाखल केला.

विचाराचें बदललेलें वळण

ही व्यवस्था जरी होऊन राहिली असली तरी शेजारधर्म हा हळुहळू क्रांति घडवून आणूं लागला. एकेकदां नातीं व दर्जे हे जरी हर्षविमर्षानें व रागा-लोभानें ठरले तरी शेजारीशेजारी रहाण्यानें परस्परांच्या चित्तवृत्तींतले जे कोमल व्यापार ते चालू होणें अपरिहार्य होतें. मागें सांगितलेंच आहे कीं शूद्रांना शूद्र हें नांव त्रिवर्णांनीं देण्याच्या आधींच त्यांनीं या आदिद्रविडांना आपल्या ग्रामसंस्थेंत व विशेषतः शेतीच्या व्यवसायांत गुंतविलेलें होतें. हाच भावी कालांतील संबंधांचा मूलारंभ होय असें म्हणावयास हरकत नाहीं. पण हे संबंध महाराष्ट्रांत कसकसे वाढत गेले हें मात्र थोडेबहुत दाखवितां येण्यासारखें आहे. हिंदुस्थानच्या इतर भागांतही शेतीच्या व ग्रामसंस्थेच्याही बाबतींत हेच संबंध जडले कीं काय व पुढें वाढले कीं काय हें कळणें निरनिराळ्या प्रांतांतील समाजांचें जीवित कसकसें वनत गेलें हें पाहिल्यास कळण्यासारखें आहे. महाराष्ट्राचा इतिहाससुद्धां अगदीं अलीकडचाच माहित आहे. त्यांतही मराठी राजवटींतला जास्त माहित. त्याच्या मागील मुसलमानी अमलाचा इतिहास ढोवळ रूपानेंच माहित झालेला आहे. त्यावरून इतक्या सूक्ष्म विषयाचा धागादोरा लागणें दुरापास्त आहे. त्याच्या आधींचीं जीं हिंदू राज्यें झालीं तीं तर बहुधा नांवानेंच जास्त माहीत आहेत. त्या काळचा एकादा जुना कागदाचा कपटा मिळाला तर संशोधकांस आनंद व्हावा इतपतच स्थिति आहे. खुद्द राज्यकर्तीं घराणीं व उच्च प्रतीचे लोक यांचाच जेथें माग लागत नाहीं, तेथें शेतकऱ्यांच्या दुय्यमांची आणि गांवकीची हडकीहडोळकी करणारांची काय दाद लागणार हें दिसतच आहे. तेव्हां हे सगळे लोक होते इतकेंच ठाऊक आहे. माहित असलेला जो इतिहास त्यांत काय स्थिति दिसते तिच्यावरून पूर्वगामी स्थिति कितीशी निराळी असेल हें अनुमानानें कळतें. गांवकींत मांग महार व चांभार यांना कायमचें स्थान मिळालें. शेतकरी हा बळीराणा, तो धान्याचा उत्पादिता, जमीन त्याची; तो ती कसणार व पिकविणार. अस्पृश्यांनीं जमिनी केल्या असत्या पण त्या त्यांच्या उरल्या नव्हत्या, इतकेंच काय तें अनुमानितां येतें.

अस्पृश्य हा शब्द एका अवनत स्थितीचा सूचक म्हणन आपण ज्या

लोकांना लावतों ते लोक एक समजणें अगदींच चूक आहे. चांभार हे कोठले व हा धंदा त्यांनीं केव्हां सुरू केला हें सांगतां येत नाहीं. मांग हे मात्र महाराष्ट्राच्या कांहीं भागांतील मूळच्या रहिवाश्यांपैकीं, यांत संशय नाहीं. देशावरील तीन चार जिल्ह्यांत त्यांची वसती आज कित्येक हजार वर्षें असावीं असें वाटतें. सर्व आपत्ति सोसूनही हे लोक आपल्या मातृभूमीला इतकीं वर्षें चिकटून राहिले आहेत. पुणें, सोलापूर व सातारा या जिल्ह्यांत त्याचा मुख्य गड्डा आहे असें दिसतें. मांगेला किवा मादिग यांना मांगांचेच भाऊबंद असें समजण्याची चाल आहे. ते गुजराथेंतही आहेत. त्यांचा व मांगांचा खरोखर संबंध आहे कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. हे मूळांतही शेतकी करीत असावे असें वाटत नाहीं. अजूनही त्यांची प्रवृत्ति समाजाच्या बंधनकोशांत जुलमानेंच राहाते. गांवकींत प्रविष्ट होण्याच्या आधीं त्यांची राहाणी वन्य म्हणजे रानटीच असावी, हें गांवकीच्या व्यवहारांत त्यांचा जो धंदा आहे त्यावरून अनुमानितां येतें. केतकाड अथवा घायपात भिजवावें, तें सोलून त्याचा वाक बनवावा आणि शेतकऱ्याला चऱ्हाटे, दोर हीं पुरवावीं हा त्याचा धंदा; पण त्या घायपातावरूनच त्याच्या मूळ वन्यप्रवृत्तीचा बोध होतो. महार हा मांगाला कमी लेखतो याचीं इतर कांहीं कारणें असलीं तरी त्याचा मूळचा वन्यपणा हें त्याचें एक कारण असलेंच पाहिजे. बुरुडाच्या बाबतींत असेंच झालें आहे. वास्तविक बुरुड हा महारापेक्षां जास्त स्वच्छ धंदा करतो पण तरीही महार त्याला आपल्याहून कमी लेखतो : याचें कारण तरी बुरुडाची मूळची वन्यवृत्ति हेंच असावें. असो. मांगानें दूर राहूनच हा धंदा प्रथम चालू केला असेल व मग त्याची जरूरी शेतकरीवर्गास कळू लागल्यावर त्याचा अन्तर्भाव गांवगाडयांत झाला असावा. तथापि त्यांच्याच जातीचे कांहीं खंड, अजूनही पूर्वीच्या कांहीं रानटी जमातींनीं पतकरलेलें भटकें रूप पतकरूनच, वागत आहेत. त्यावरूनही सर्व मांगजातीच्या प्राचीन वन्यवृत्तीचा बोध होतो. एकदां गांवगाडयांत शिरल्यानंतर कांहीं अंशीं दोऱ्या वळण्याचा धंदा करून व कांहीं अंशीं हडकी हडोळकीपैकीही धंदा करून त्या समाजानें आपली उपजीविका चालविण्यास सुरवात केली.

महारांचें महत्त्व मात्र या दोनही जातींहून फार निराळें आहे. त्यांची लोकसंख्या मोठी व वसतिस्थानही विस्तृत आहे. जेवढा म्हणून आपण महाराष्ट्र देश म्हणतों

तेवढ्याभर महारांची वसती आहे. महार हे इतर दोघांपेक्षां जास्त ईर्षावान्,सकत व मांगापेक्षां जास्त बुद्धिमान असतात. फार काय सांगावें, ज्या कुणब्याच्या आश्रयानें ते आपली उपजीविका करतात त्यांच्यापेक्षांही ते जास्त सशक्त, जाणीक आणि बुद्धिमान असतात असें पुष्कळांचें मत आहे. आणि नव्या मनूप्रमाणें त्यांच्या मनबुद्धींच्या विकासाला जागा मिळत गेली तर ते हिंदू-समाजाच्या बलिष्ठ वर्गापैकीं एक होऊन बसतील यांत कांहींच शंका वाटत नाहीं. गांवगाड्यांत त्यांचा प्रवेश नेमका कोणच्या कालमानांत झाला हें सांगवत नाहीं. तरी तो फार प्राचीन कालीं झाला असावा व शूद्रांनीं त्यांच्याशीं आपलें नातें याच मुद्यावर कायम केलें असावें इतकें ठास म्हणतां येतें, हें मागें सांगितलेंच आहे. थोरल्या घरचे, भूमिपुत्र हीं नांवें महारांना कुत्सेनें दिलीं आहेत असें वाटत नाहीं. तें खरोखरच थोरल्या घरचे म्हणजे कुणब्याच्या आधीचे होते. भूमिपुत्र हा शब्द तर स्पष्ट ऐतिहासिक व्यंजनेचा आहे. 'Son of the soil' हा जो इंग्रजी शब्दप्रयोग त्याच्याशीं तो किती उत्तम जमतो पहा! या भूमीचा तोच पुत्र होय. महाराष्ट्रभूमीची औरस संतति हीच होय. या भूमीला नवें नांव जेव्हां मिळालें तेव्हांचे राजे व तेव्हांची समाजस्थिति यांची हकीकत कळावयास हवी. म्हणजे हा भूमीपुत्र मागें पडून त्याच्या घराचा कबजा कोणी व कसकसा घेतला याचा बोध होईल. महारावर कुणब्यानें आक्रमण केलें; कुणब्यावर मराठ्यानें आक्रमण केलें; मराठ्यांवर ब्राह्मण, गुजर, मारवाडी यांनीं आक्रमण केलें: अशीं हीं प्रस्तरणें एकावर एक पडलेलीं आहेत. पैकीं मराठ्यानें केलेलें कुणब्यावरचें आक्रमण आर्थिक व राक्तिकही होतें. मराठा हा कुणब्याला आपला म्हणवूं लागला कारण तो हळुहळू त्याच्या जमिनीचा मालक झाला आणि विवाहांत अनुलोमपद्धति राखून निदान एका वळणानें तरी त्यानें त्याच्याशीं आत्मीयत्व सिद्ध केलें. कुणबी 'माजला' म्हणजे तालेवार झाला तर तो 'मराठा' होतो. हें मराठ्या-कुणब्यांचें नातें "कुणबी माजला अन मराठा झाला" या म्हणीच्या रूपानें भाषेंत तरी कायमचें नोंदलें गेलें आहे. महाराष्ट्र हें नांव केवळ संस्कृतीकरणाच्या हौसेचें द्योतक असून त्याचें मूळनांव मराठा–जातिवाचक असलें पाहिजे असा अनेक विद्वान मराठ्यांचा आग्रह असतो तो बरोबर आहे असें माझें मत आहे. पुढें ज्याला महाराष्ट्र असें प्रगल्भ नांव मिळालें त्याला मराठपण केव्हां व

कसकसें प्राप्त झालें हेंही इतिहासांतून कळलें तर कुणब्यांच्या शेतवाडीचा कवजा घेणारे जे मराठे त्यांनीं कुणब्याचा आश्रित जो महार त्याचें काय बरें-वाईट केलें हें दिसून येण्यासारखें आहे. मराठ्यांचा भिडू मुख्यतः देशस्थ ब्राह्मण होय. त्यानेंही काय काय केलें, करविलें किंवा अनुमोदिलें याचाही बोध त्या इतिहासावरून होईल. पण जरी इतिहास कळला असें मानिलें तरी त्याचा इत्यर्थ इतकाच निघणार कीं कुणब्यानें महाराचें आक्रमण करतांना जी कांहीं कारवाई केली ती उत्तरोत्तर कायमच होत गेली. याहून निराळें काय निघणार? मराठ्यानें कुणबी पचनीं पाडला पण पुढें जाऊन महाराशीं नातें जोडण्याचें साहस त्याच्यानें करवलें नाहीं कारण कुणबीच मुळांत महाराला अत्यन्त हलका लेखीत असला पाहिजे.

पण हें जातिभिन्नत्व जरी कायम राहिलें असलें तरी महार हे हिंदूसमाजाचा एक अविभाज्य अवयव आहे असें ठरत गेलें हें अगदीं खरें आहे. एरव्ही कितीही दुजाभाव ठेवला तरी उपयुक्तता मान्य करावीच लागते व उपयुक्ततेच्या मागोमाग आर्थिक संबंध ओघानेंच येतात. तथापि, तुला अमूक एका मर्यादेच्या आंत येऊ देणार नाहीं, इहलोकीं जन्माला येऊन व संसार थाटून जीं कांहीं सत्ता, सुखें, व वैभवें आम्ही मिळवितों त्यांत तुला वाटेकरी होऊं देणार नाहीं, सेवाधर्म चालू ठेविलास तर तुला पोटाला मिळेल,अशी ही ताकीद होती. ही ताकीद महारांनीं खालीं मान घालून पतकरली याचें खरोखर अत्यन्त वाईट वाटतें. तो यापडवाईक कुणबी, कीं जो भुताखेतां-तूनही बाहेर पडेना पण महाराला मात्र हलका लेखी; तो मगरूर मराठा कीं जो सगळ्या भोग्य वस्तू माझ्याच असें म्हणावयास सोकावला; आणि तो नाक धरून बसलेला ब्राह्मण कीं ज्यानें मराठ्या-कुणब्यांचें हें करणें धर्म्यच आहे असा निर्णय दिला; या सगळ्यांना उच्छाद आणण्याची ईर्षा येवढ्या देशभर पसरलेल्या महारांनीं बाळगिली असती तर त्यांचें जिणें जें केवळ मातीमोल होऊन बसलें आहे तें बसलें नसतें. त्यांच्या स्वभावविशेषाकडे पाहिलें तर ते खालीं मान घालणारे लोक नव्हत असें वाटतें.त्यांनीं मोठी धडपड केली असावी, पण ते सर्व इतिहास इतर इतिहासावरोबर लुप्त झाले असावे.

'गांव तेथें महारवाडा' या म्हणीतील जो शुद्ध भौगोलिक अर्थ तो तर फारच सूचक आहे. प्रत्येक गांवीं महार असतात हाच तो अर्थ. जर ते प्रत्येक

गांवीं होते तर त्यांच्याकडे त्या गांवचें कांहीं योजलेलें काम असलें पाहिजे. तें काम कोणचें? वास्तविक त्यांच्याकडे अनेक कामें आहेत; पण त्यांत एक जें फारच महत्त्वाचें तें हें कीं गांवच्या शिवारांतील जमिनी, कोणच्या कुणाच्या हें ध्यानांत ठेवणें. हें काम त्यांच्याकडेच कां आलें असावें हें पाहण्यासारखें आहे. वास्तविक शेताच्या हद्दी कायम ठेवणें हें इतकें महत्त्वाचें काम आहे कीं खेडेगांवचीं निमीअधिक भांडणें हा कायमपणा नसल्यामुळेंच उत्पन्न होत असतात. हें एवढें महत्त्वाचें काम कुणबी किंवा मराठे यांनीं आपल्या हातीं ठेवावयाच्या ऐवजीं महारांकडे सोपवावें ही कांहीं लहर नव्हे. यांत पूर्वपीठिकांचा धागादोरा असावा असें वाटतें. त्यांतही महारांच्या शब्दाला इतकें प्रामाण्य दिलेलें दिसतें कीं गांवकऱ्यांपुढें महाराची साक्ष झाली आणि अमूक जमीन अमक्याची किंवा अमूक शिवार येवढें होतें असें त्यानें सांगितलें कीं गांवकरी तो न्याय बिनतक्रार मान्य करीत असत. म्हणजे असल्या खटल्यांत महार हा साक्षीदार व न्यायाधीशही होता असें म्हणावयास हरकत नाहीं. असें वाटतें कीं त्याचा जो भूमिपुत्रत्वाचा लौकिक,त्यानेंच त्याला ही थोरवी प्राप्त करून दिली असावी. भूइयार हें जें त्याला दुसरें नांव आहे त्यावरूनही हीच कल्पना करावीशी वाटते. आपल्या आधीची त्यांची वसती म्हणून [illegible] या बाबतची माहिती जास्त येवढीच व्यंजना येथें नाहीं; ती माहिती त्यांना इतकी चांगली असण्याचें कारण कदाचित् हें असेल कीं त्या जमिनी मुळांत त्यांच्याच होत्या. हें अनुमान पतकरलें म्हणजे 'थोरल्या घरचे' हें महाराचें नांव त्याला शोभून दिसतें. अशा या भूमिपुत्राकडे गांवचें मुख्य काम गांवगाड्यांत आलें व तें त्यानें इंग्रजी अमलाची कचेरी स्थापन होईपर्यंत प्रामाणिकपणें बजावलें. या बरोबरच दुसरें म्हणजे खजिन्याची नेआण करणें. हें काम अजूनही थोडेबहुत त्याच्याकडे असेल असें वाटतें. इतक्या दूरच्या भूतकालींही एवढें महत्त्वाचें काम त्याच्याकडेच सोंपविलेलें पाहून त्याच्या नेकीबद्दल गांवगाड्याची केवढी खात्री होती हें स्पष्ट दिसतें. हे सर्व गुण त्यानें आगाऊच वाढविलेले होते काय? लुप्त इतिहास उपलब्ध झाला तर या गूढ संस्कृतीला वाचा फुटेल, तोंवर फुटणार नाहीं.

महार हा शेतवाडीवरचा व गांवकींतला चाकर झाला खरा; तरी पण तो अस्पृश्यच राहिला. त्यामुळें त्याचें व मराठ्याचें नातें उत्पन्न झालें नाहीं.

पण कदाचित् यामुळेंच त्याचें स्वतंत्र अस्तित्व कायम राहिलें; व युगमानाप्रमाणें उसळी घ्यावयास त्याला अवसर मिळाला तर तो आपलें गुणवैभव वाढविल्याशिवाय सोडणार नाहीं. कुणबी हा मराठ्याच्या दडपणाखालीं दमलेला दिसतो. त्याच्या अंगांत गुर्मी अशी राहिलेली नाहीं. पण त्याला एक समाधान आहे कीं मराठपणाचा सर्व मान आपल्याला मिळाला आहे. अस्पृश्यता नसती व जमिनीची मालकी जर मराठे येथें येईपर्यंत महारांच्या हातीं राहिली असती तर या दोन बलिष्ठ लोकांचे संबंध कसकसे वाढले असते हें कल्पनेनें पहाणें निदान मनोरंजक तरी होईल. असो. कितीही बारीक व महारांना अनुकूल अशा कल्पना केल्या, तरी त्यांची स्थिति अत्यन्त केविलवाणी होऊन राहिली हें म्हणणें कांहीं चुकत नाहीं. मात्र मान खालीं घालून राहिल्याचा त्यांना या विमोचनाच्या काळीं फायदा होणार आहे. कारण तो एक बलाढ्य गटचा गट तयार होऊन उठेल व एकजातियत्वाचा जो फायदा मराठा जातीला मिळत आला आहे तोच फायदा महारांनाही इतउत्तर काळांत मिळेल. असो. शेतकींत प्रवेश म्हणजेच गांवकींत प्रवेश हें ओघानेंच आलें. कारण सर्व गांवकी शेतीवर विसंबून असे. किंबहुना शेती-साठीच गांव वसू लागला. ही शेती ज्या कुणब्याच्या हातीं तो सर्वांचा पोशिंदा. एक शेती म्हटली तरी शेतीच्या कामाला नांगर, कुळव, वखर, डवर, गाडा, मोट, नाडा, चराटें, उपणी इत्यादि कित्येक आऊतें व साधनें लागतात. हीं त्याला पुरविणारे त्याचे एकप्रकारें आश्रितच झाले. पैकीं आपल्याला फक्त अस्पृष्टांचेंच पहावयाचें आहे. तेव्हां यांत चांभार, ढोर, आणि मांग यांचा उपयोग शेतकऱ्याला किती आहे हें स्पष्टच आहे. पण येवढचानें भागण्या-सारखें नव्हतें. त्याच्या शेताच्या ढेपणी, ऐरणी कायम करणें, शेतांच्या हद्दी एकमेकांत न मिळू देणें, गांवकामगाराकडून शेतकऱ्याकडे सरकारी निर्बंधाची वार्ता पोचविणें, गुन्हाळें चालू झालीं म्हणजे चुलवणांत जाळ घालण्याचें काम करणें, हीं कामें महाराकडेच आलीं व त्याला त्यावद्दल हक्काची अशी प्रत्येक शेतकऱ्याकडून थोडोथोडी पोटगी मिळू लागली. तसेंच शेतकींतून निघा-लेली जी ग्रामसंस्था तिच्यांतही त्याच्याकडे बरींच कामें आलीं. सरकारचें दंडक खेडेगांवीं दवंडी देऊन पोचविणें, खजिन्याची ने आण करणें, सरकारचें टपाल पोचविणें, सरकारी अंमलदार आले तर त्यांची बडदास्त ठेवणें हींही

कामें आलीं. अशा रीतीनें अस्पृश्य म्हणून जरी इतर अस्पृष्टांशीं त्याचें नांव संल्लग्न झालें तरी महाराला गांवकीच्या व्यवहारांत बराच वरचा मान मिळूं लागला. अस्पृश्य लोक बलुतेदार झाले, म्हणजे हक्कदार झाले. या हक्काबरोबर त्यांना गांवच्या दरबारांत इतर बलुतेदारांबरोबरचा मान मिळूं लागला. कोणच्याही भानगडी उपस्थित झाल्या तरी त्यांच्यासह सर्व बलुतेदारांनीं जमावें व त्यांचा परिहार करावा व कोठें अन्याय झाला असला तरी त्याची दुरुस्ती व्हावी असा प्रघात सुरू झाला. जो निकाल होईल त्याच्या खालीं इतर गांवकऱ्यांबरोबर अस्पृश्यांचीं नांवेंही हवकाचीं म्हणून नमूद होऊ लागलीं. याचा अर्थ असा कीं हिंदू लोकांच्या सांपत्तिक जुळणींत व म्हणून समाजबांधणींत अस्पृष्टांचा समावेश कायमचा झाला.

या हक्कदार अस्पृश्यांत महाराचे हक्कच विशेष लक्षांत घेण्यासारखे आहेत. चांभार हा व्यवसायोपजीवी असल्यामुळें त्याचा या गांवकीच्या हक्कदारींत इतकासा संबंध पोचत नाहीं. तसेंच मांग हाही समाजापासून थोडा फटकूनच असल्यामुळें त्यालासुद्धां या हक्कदारींत इतकेसें महत्त्व नाहीं. पण इतिहासांत असें मात्र पुन्हां पुन्हां वाचावयास सांपडतें कीं या हक्कांच्या बाबतीत महाराशीं त्याच्या नित्य कटकटी चालत व त्या उत्पन्न होऊ नयेत म्हणून अधिकारी हे मांगाचे हक्क कोणचे व महाराचे कोणचे याचा विवेक व निकाल लिहून ठेवीत असत. या मांग–महारांच्या हक्कांसंबंधाचें जें वाङ्मय उपलब्ध आहे त्यांतील वेच्यांवरून या प्रकरणाचा बोध होण्यास फार सुलभ जाईल असें वाटतें. त्यावरून हक्कांचीही कल्पना येईल व त्यांच्या ऐतिहासिक परंपरेबद्दलही माहिती होईल. तसेंच अजूनही गांवकीच्या व्यवहारांत महारांना जे कांहीं अन्याय होत असतात त्यांचे उगमही किती सूक्ष्म आहेत हेंही ध्यानांत येईल. कै. वि. का. राजवाडे यांनीं आपल्या म.इ. साधनें यांच्या २० व्या खंडांत व इ. मं. च्या चतुर्थ सम्मेलनवृत्तांतांत दोन मोठाल्या याद्या छापिल्या आहेत. त्या याद्या अर्थहानि होऊं न देतां व त्यांतील वाङ्मया सौंदर्य न घालवितां कोठें जशाच्या तशा व कोठें सारांशरूपानें पुढें देतों.

महारांचे हक्क

श्रीशंकर नकल

हक व ळाजिमे कारकीर्दी निजामशाई व काजी शरा शरीफ व हाकीम व धर्माधिकारणी काा पैठण दिाा पााा वांई नींब वकाजी अजम--काजी कमाल सुाा सन इसने अलफ हिजरी माहारानी कासे किरतकेर नाईक वगैरे काा पैठण देहप्रमाणे खातरती तपसील शके १६३७ राक्षस नाम संवत्सरे शंकर नाईक पाडेवार.

फर्डिंगा १	हलवडा १	मुरदारकसी १
पेवबूड १	सारामाफ १	मालव सुमार १
कडबी १	लाकडे सुमारे १	खडकी १
सिसाला १	धुमन सेत १	घास सुमार १
वांगी दर गाडीयास	ऊस दर गाडीयास	फुले व कबू वगैरा दर
१० वेसकर	१० वेसकर	गाडियास ५
१५ पाडेवार	१५ पाडेवार	भाजीचे मालवियास
२५	२५	भाजी ८०५

गुरुवाचे घरीचा हक वााा पहिली वोवालणी गुरवाने घेणे दुसरी वोवालणी पाडेवार व वेसकरानी घेणे १

धणगरानी दर नगास व दर माागास अटफले १ देणे कलम १.

मांगाचे घरी लग्न लागले तरी तेथील पायतांदूळ व सेला १ व जेवण टका १ देणे १ पोलियाचा नैवेद्य व तोरण वेसकरानी व पाडेवारांनी खावा १.

धनगराचे घरीचा हक दर सालास दसरियास बकरे १ देणें व दिवालीस बकरी २ देणे.

कलम १

गुरु मेले तर वोहडून टाकावयासी सिकनी व माहागाईत कुलवाडी यानी भाकर व जेवण व जोरी पाच सेर ८८५ देणे कलम १

दरसालास वेसकरास वेसी सेला १ देणे १

बागठाणे लाकडाचा गाडा आणलिया पासून रुके .।. देणे

विकावयासी येईल ते वेलेस घेत जाणेकलम १. माणुस मेले तरी मसणवटीयास सेला १ एक रुके ८४ देणे.

धणगराचे दर कातरीस दुहक यासी लोहकर वजन ८८७।। बि।।

८८२।। वेसकर

८८५ पाडेवार.

८८७।।

गाडा हरजिनस येईल त्यास पसकी बेणा गाडियास २ गोणीस १ घणगराचे घरी लेकवलियास वाडियाचा दारोटियावरील सेला १ एक व रुके .॥. देणे कलम १ पेंढियाची घागर माहारांनी खलियात घेऊन जावे या खालील चुंवल महारानी घ्यावे कलम १ कोष्टियांनी दर मागास रुके ८५ व अटफले वेसकरास व पाडेवारास वाटून द्यावे १. सेतीतून कणसाचे गाडी भरून येतील वाटेस जे कणसे पडतील ते महारानी घेणे मांगानी न घेणे १.

तेलियाचे गुरु मेले तरी त्याने तेलवजन ८८२देणें. केले बागवानापासून दर बैलास सुमार ७.

लग्न लागेल तर एक मेंढरू व पायतांदूळ महारास द्यावे १

सिंदी विकावयासी येईल त्यासहक पखालेस घागर १ घागरीस गाडिगा १. सेतीतून दर कितीयास हर जिनस महारास द्यावे तुपाचे जोडीस तूप वजन ८८।. दिवाणचा हक जेवण व पेठवणी टका १.२

पेढारियाचें घरी टका १ व पैसा १ एक ज्याची पाली असेल त्यानें मोहबत प्राा रुके ८४ घेणे १ तोरण मांडवाचे महारानी घ्यावे मांगाने न घ्यावे. घेईल तरी त्यास दंड करणें १.

दिवालीचा हक दर घरास रुके ६, दरमोलीस ऊस २ व दर बैलास ५ देणें १.

तेलियाचा घाणीयास तेल वजन ८८॥.

कापड जे येईल त्यास दर बैलास रुके .।.

अडाणियानी दर गुरास वोहडणावली रुके ८६. कुंभारानी दर आवियास मडकी ५.

गाडियाचा सतका बकरे १ एक व चवाले १ ऐसे महारास देणे १.

मांडवाचे ऊस व खोबरे व खारीक व हर ग्रामपूजा वरीली असेल ते महारास देणे सुतारास न देणे कलम १.

चांभारानें दर सालास वाहाणाचे जोड २ दोन देणें कलम १.

दर गाडियास लोणारियापासून कोलसे वजन ८८५ पोलियाचा व महालीचा नैवेद्य वेसकरव पाडेवार यानी मिलोन खावा १.

कलम १.

गुराल लागलिया पाडेवारास दर खंडीस गूल पासरीचा ८॥. देणें १

दिवाली वरसाची येईल त्यास कुलवाडी व अडाणी अठरा खूम यानी दर घरास रुके ८६ प्राा देणें १.

पूजकार्य १

विलायतील तेलियास तेल ८८८९ पाडेवार

८८।. वेसकर

८८।९

सदरहू खरे धर्मादा आसे जो वाचील त्याने धर्मता वाचावे पदरीचे जोडील त्यास गाळ आसे हे लिहिले सही.

१ मुंगी पैठण सणद देवाचे राउळांत जाहाली पाढरस कळावयाचीं

कलमे

१ ब्राह्मणाचा नवरा घोडयावर
१ देशमुखाचा नवरा घोडयावर
१ कुणब्याचा नवरा घोडयावर
१ राज्याचा नवरा घोडयावर
१ सुताराचा नवरा घोडयावर
१ लोव्हाराचा नवरा घोडयावर
१ गुरवाचा नवरा घोडयावर
१ सोनाराचा नवरा घोडयावर
१ धणगराचा नवरा घोडयावर
१ तेल्याचा नवरा बैलावर
१ बेलदाराचा नवरा घोडयावर.
१ मुसलमानाचा नवरा घोडयावर
१ न्हाव्याचा नवरा बैलावर
१ परटाचा नवरा बैलावर
१ कुंभाराचा नवरा बैलावर
१ कातकाडीचा नवरा बैलावर
१ घिसाडियाचा नवरा बैलावर
१ गारुडयाचा नवरा हाल्यावर
१ लोनाऱ्याचा नवरा बैलावर
१ गोपाळाचा नवरा बैलावर
१ महाराचा नवरा घोडयावर
१ मांगाचा नवरा हाल्यावर

१ जैनाचा नवरा बैलावर
१ खदईचा नवरा वैलावर
१ डवऱ्याचा नवरा बैलावर
१ चांभाराचा नवरा बैलावर
१ वनगाराचा नवरा बैलावर
१ लमानाचा नवरा बैलावर
१ रजपुताचा नवरा घोडयावर
१ कैकाडयाचा नवरा पाई
१ फाशेपारधीचा नवरा पाई
१ भामटयाचा नवरा पाई
१ तांबटाचा नवरा घोडयावर
१ वापाचा नवरा घोडयावर
१ जंगमाचा नवरा घोडयावर
१ पात्रुटाचा नवरा बैलावर
१ सणगराचा नवरा घोडयावर
१ गोंधळयाचा नवरा घोडयावर
१ जोशाचा नवरा बैलावर
१ गोपाळ मुसलमान याचा नवरा घोडयावर
१ कासाराचा नवरा बैलावर
१ वराडयाचा नवरा पाई
१ बुरुडाचा नवरा पाई
१ भिलाचा नवरा घोडयावर

पाछयाचे वेळेस आम्ही हुजूर घेतला तेथून आमचे बावण हाक माहाराचे चालू झाले. त्यांत श्री मुंगी पैठण येथें देवाचे राउळांत सणद जाली तुम्हा सर्वत्रास कळावी—

१ सोनार, माळी, न्हावी, कुंभार, लव्हार, परीट, बागवाण, सुतार, मुसलमान, जिनगर, मुलाणी व काजी, लमाण, गोवळी, डोंबारी, गोंधळी, तांबट, अडाणी, कूळ यांच्या घरीं पड झाली असता—

८।।२ धुरुईचा बैल
८।१ चावरीचा बैल
८।१ गाईचे कातडे मागूं नये
८।१ म्हसीचे कातडे मागू नये

देशमुख व पाटील यांचे घरची पड आली असता

८।।२ धुरुईचा बैल
८।१ चावरीचा बैल
८।१ गाईचे कातडे मागू नये
८।१ म्हशीचे कातडे मागू नये

कातडे देवयाचे नाहीं. परंतु देणे जाहल्यास एक मण दाणे द्यावे व कातडे परत घ्यावे.

२ सोनार, माळी, सिंपी, सेटे, महाजन, कासार, घिसाडी, बेलदार, जिनगर, वडारी, लमाण, हलालखोर, कैकाडी, गोपाळ, डोंबारी, गोंधळी, धनगर, तांबट, फाशेपारधी, वैशनव, गारुडी, यांजकडे हक्क

२। लग्नाबद्दल
३।। मढ्यावदल

परीट, न्हावी, गुरव यांजकडे हक्क

२। लग्नावदल
१ मढ्यावदल

कुंभार, सुतार, चांभार, यांजकडे हक्क.

२। लग्नाबद्दल
१। मढयाबदल

रामोसी यास २ लग्नाबद्दल
० मढ्याबद्दल देऊं नये

मुलाणी व काजी १। लग्नाबदल

बागवान २। लग्नाबद्दल

३ आताराने नाडापुडी वगैरे सामान द्यावे येणेप्रमाणें हक्क घ्यावयाचा तो घ्यावा.

४ पिंजारी याणे दरसाल जेन टेकहकाचे देत जावे.

५ वाणी याने दररोज तंवाखू पाणसुपारी देत जावी.

६ न्हावी वळीचा भाऊ सबब त्याणे माहारास वस्तरा देत जावा

७ गोणीस फसकी दर वंझळभर देत जावी.

८ वगैरे जिनस फळफळावळ—

१०० (?) आंबे दर हजारास

१०० (?) नारेळ दर हजारास

१०० (?) जांब दर हजारास

१०० (?) केळे दर हजारास

९ जकात व हक दर शेंकडा रुपये दोन प्रो घ्यावा

१० तांबोळी याणे दररोज पाणे देत जावी

११ वागवाण याणी जिनसास हक देत असावे दरसाल देत असावे १ दर घरास आदयावत देत असावे

१२ दिवाळीची साजवट करने ती महाराणी करावी

१३ दर बुचाडास पाच पुल्या मागले हाताने वढून घ्याव्या. त्यांत मांगाचा संबंध नाहीं

१४ जिनगराने माहाराचे घरी लग्न झाले असता त्यास करा व मंडवळी देत जावी

१५ गुराहाळावर हक दर खंडीस गूळ ८१। देत जावा दररोज ऊस १० तीन काहिलीवर भरताची शेरनी पासरीभर व कांहील धुकटी व हातशेकणे गूळ ८८२।। अडीच शेर दररोज देत जावे जागलाभर काकवी दर काहिलीस देत असावी व दाल झाडन्या बदल पेरी उसाची पाच, आठरा घागरीवर एक घागर रसाची देत असावी. चुलवण जाळावयास घालीत जावे.

१६ मुसलमानाचे लग्नविडयाबद्दल रुपये २। सवादोन

१७ पचवीस हत वावरात नाडा बांधून माहारास द्यावे

१८ संक्राती हुरडा खळमात्र, उपणपाटी व साजवट व बेर माहाराने घेंत असावे मांगाचे त्यांत कांहीं नाहीं

१९ १। बलुत्यास मांडव खंडनी वा रु. १।

२० पाणमळ्यांत दर बिघ्यास दरसाल अडीच रुपये घेत जावे

२१ मांगाणे तात व केरसुणी देत असावी.

२२ लव्हाराणे सुरी कुराड नीट करून देत जावी

२३ देशमुख याचे घरांत राबती माहारानें करावी त्यास पोटास भाकरी घालावी.

२४ पाटील याचे घरी माहाराने रावती करावी सबब त्याजला धडूत पांघरुना-बदल रुपये ६ माहा देत जावे दर रोज पोटास भाकरी घालावी

२५ यासिवाई जमीन हराटीचे पाच विघे देऊन रावती घ्यावी. नाहींपेक्षां राबतीविशी बोलू नये.

२६ सरकारचे सिपाई यास लाकडे माहाराने देत जावे त्याणे पोटास भाकरी देत जावी

२७ दरवेसी यासी पाच गोवऱ्या देत असाव्या त्याची विगार न्हेत असावी माहाराचे पोटास भाकरी देत जावी

२८ हिजड्यास पांच गोवऱ्या द्याव्या व पोटास माहारास भाकरी देत जावी माहारापाशी पैसा मागूं नये

२९ वासुदेव यास पाच गोवऱ्या द्याव्या आणि माहारास भाकरी पोटास देत असावी माहारापासी पैसा मागू नये

३० कुंभारास आवा काढल्यावर दर आव्यास मडकी हकाची देत असावी त्याचे मागचे आव्याची राख वोढीत असावी

३१ चांभाराने जोड्यास सळपुस्ती देत असावी

३२ भाटाणे लग्न काढून द्यावे आणि त्यास माहाराणे दहा पैसे द्यावे

३३ नंदीवाल्याने भिक्षा जी येईल ती घ्यावी पैसे महारापासी मागू नये

३४ नगरीचे होळीचा नैवेद्य महाराने घ्यावा

३५ पोळ्याच्या नैविद्य बैलाची ववाळणी महाराणे घ्यावी रु. १।

३६ गांवपांढर मिळोन सरकारचे पागेतला घोडा माहाराचे वरातीस द्यावा. मांगाहून वहिवाट चालक हा खरा. मांगाचा त्याचा संबंध नाहीं. मांगा-बदल कोनी बोलू लागल्यास तो जाती बाहेर पडेल

३७ आडाणी कुळाचा मोहोतुर लागला म्हणजे घ्यावे

३८ विडचाबदल गांव पांढरीने भादवी केले असता महारास दोन रुपये देत जावे.
३९ हारकी हारवेळ माहाराची. यास रुपये चोवीस २४ दरसाल देत जावे आणि हरकी व माहारकी माहारपांढरीची
४० नगरीतील लग्न झाले असता वेसीत शेला नवऱ्याचा माहाराणी घ्यावा
४१ गारुडी यानें गांवांत खेळ केले असता पैसे महारास. ।६ देत जावे
४२ माहाराने तोरणे वेसीस नगरीचे व नगरीचे लोकांस वाड्यास बांधीत असावे नगरीमधे घरोवर काव टाकीत असावी. नैवयदे माहारास देत असावे यय मांगाचा संबंध नाहीं
४३ माहाराचे लग्न उभे राहिले असता मांगाने व मांगनीने पाच रोज लाकडे पुरवावी व माहाराने त्यास वाढून द्यावे
४४ नवऱ्याचे पाहीचे पैसे चार व तांदूळ पाटी माहारास देत जावे व माहारणीस ववाळणी लुगडे देत जावे पांच रोज अन्न महारास वाढून द्यावे आणि माह्हाराने चाकरी करावी
४५ मोडली जनावरे व विटाळाचे लुगडे फुकट देत जावे
४६ लक्ष्मीचे कारन झाल्यास व झाले असतां माह्हाराने करावे, सडक घरावी, ...घालावा कारण लक्ष्मीचे जरीमरीचे करावे यांत मांगाचे संबंध नाहीं. मांगावदल कोनी बोलले तरी जाती वाहेर बसेल व लटके कोन्ही म्हणेन तर याचा निरवोष होईल
४७ वाणी याचे विरह्हाडावर पाच गवऱ्या देत असावे व यासकरास त्याणे च्यार च्यार पैशे देत जावे
४८ सरकारचा सिपाई यास पाच गवऱ्या देत जावे त्याणी पोटास भाकरी देत जावी
४९ धणगर याणे शंभय वकरी कातरली म्हणजे पावशेर लोकर द्यावी. मेंढरू शेळी मेली तरी माहारास देणें. दुसरे कोणी घेऊं नये

या दोन ऐतिहासिक लेखांत अनेक सूचक व मनोरंजक तपशील आहेत. कोणाचा नवरा कोणच्या जनावरावर बसवून त्याची वरात काढावयाची याच्या यादींत महाराचा नवरा घोड्यावर, चांभाराचा नवरा बैलावर व मांगाचा नवरा हाल्यावर असा शिरस्ता घातलेला होता असें लिहिलें आहे. गांवकींत

महाराचें महत्त्व सर्वांत जास्त म्हणून त्याचा नवरा घोड्यावर म्हणावें तर बेलदार, सनगर, व शेवटीं भिल्ल यांचेही नवरे घोड्यावरच दिसतात. बरें महार शूर म्हणून म्हणावें तर गुरव, सोनार, तांबट यांचाही घोड्यावरच आहे. सरासरी अनुमान असें निघतें कीं, जे समाजाच्या फार उपयोगी, थोडे प्रकृतीनें कडक, किंवा वरचष्मा गाजविणारे असतील त्यांचा नवरा घोड्यावरून जावयाचा असे. मागें आम्ही अस्पृष्टांच्या तक्रारी गोळा केल्या होत्या. त्यांत मांगाला घोड्यावरून वरात काढण्यास गांवकरी प्रतिबंध करतात अशी एक तक्रार होती. तिचें मर्म मला तेव्हां चांगलें कळलें नव्हतें. गांवकऱ्यांचा हा भलताच आग्रह कां हें या यादीवरून नीट ध्यानांत येतें. अशी कोठें यादी आहे हें गांवकऱ्यांना खासच माहित नसलें पाहिजे. पण परंपरेनें आलेल्या ज्ञानावरून त्यांना हें माहित होतें कीं "मांगाचा नवरा हाल्यावर." अर्थात् त्यांनीं गांवांत जेव्हां पाहिलें कीं मांगाचा नवरा 'घोड्यावर,' तेव्हां त्यांनीं हरकत घेतली. असो. पाटील इत्यादींच्या घरचें जे पडें असेल म्हणजे मेलेलें जनावर असेल त्याचें कातडेंही महाराचेंच असावयाचें असा शिरस्ता असे. पण जर त्यांना तें परत हवें असेल तर महाराला एक मण दाणे घालून ते त्यांना परत घेतां येत असावें. पडच्याच्या कातड्याचीं भांडणें अजूनही पुष्कळ ठिकाणीं चालतात. असें वाटतें कीं, कित्येक लोक कातडें परत मागत असतील पण धान्य मात्र देत नसतील. हेंच भांडणाचें मूळ असावें. ८१। हें जें माप आहे तें गहू, हरबरे, ज्वारी यांच्या खंडीसही लागू आहे व आलें व ओवा यांच्या खंडीसही लागू आहे. या मापाप्रमाणें महारांना गहू इत्यादि तरी कमी मिळत असतील किंवा आलें, ओवा तरी विनाकारणच फार मिळत असतील. पिंजाऱ्यानें जेन द्यावें, आतारानें नाडापुडी द्यावी, वाण्यानें दररोज तंबाखू व पानसुपारी द्यावी असें म्हटलें आहे पण न्हाव्यानें हजामत करावी असें म्हटलेलें नाहीं. कारण महार अस्पृश्य. तेव्हां तडजोड निघाली. न्हाव्यानें वस्तराच त्याच्या हवालीं करावा व तुझी तूं करून घे असें सांगावें असें ठरलेलें दिसतें. सुतार, कुंभार, न्हावी, चांभार इत्यादि वळीचे भाऊ म्हणजे ओळीचे भाऊ म्हणजे बलुतेदारांत समान महत्त्वाचे, म्हणून त्यांजकडून लगीनटक्का व मढेटक्का महार वतनदार कमी घेत असें दिसतें. आंबे, नारळ इत्यादींवर दर हजारास महाराला १०० मिळावें असें म्हटलें आहे. पण तें

खरें दिसत नाहीं. तो आकडा कदाचित् दहा असेल. 'जकात व हक दर शेंकडा २ रु. प्रमाणें घ्यावा' याचा नीट बोध होत नाहीं. 'दर वुचाडास पाच पुढचा ? (पेंढचा) मागले हातानें ओढून घ्याव्या; अशासाठीं कीं ओढणाऱ्या महाराच्या हातांत त्या शेलक्याच येऊ नयेत. 'जागलाभर' काकवी द्यावी असें' म्हटलें आहेः तेथें 'भगुलाभर' असें हवें असें वाटतें. 'पंचवीस हात वावरांत नाडा वांधून महारास द्यावें' असें म्हटलें आहे. काय द्यावें ? कां वावरच द्यावें? कोणी व कशासाठीं याचा वोध होत नाहीं. पानमळ्यांत दरविघ्याला दरसाल अडीच रुपये म्हणजे सरकार–साऱ्यासारखाच बोजा वाटतो. 'सरकारचे सिपायी यास लाकडे महारानें देत जावी' हें महाराचें काम म्हणून सांगितलें आहे. कारण तीं गांवजंगलांतून द्यावयाचीं असत. खेडेगांवचे अधिकारी लोक महाराकडून लांकडें कां फोडून घेतात याचा बारीक सुगावा यांत लागतो. मांगांचें लग्न रानांत करावें व त्याची वरात गांवांत मिरवूं नये. यावरून मांगांच्या वन्यपणाविषयींचा वोध होतो. 'महाराच्या लग्नांत मांगानें पागोटें व लुगडें द्यावें ' हा नियम खरा दिसत नाहीं कारण शक्य नाहीं. ही सनद 'अठरा लाख सोमवंसास' कळावी असें म्हटलें आहे. महारांत सोमवंशीमहार हे आजही प्रतिष्ठित आहेत. तसेंच त्यांची लोकसंख्याही तेव्हां चालू असलेल्या संकेताप्रमाणें दिलेली आहे तीही योग्य अशीच आहे. महाराच्या लग्नांत मांगांनीं लांकडें पुरवावीं व महारांनीं त्यांस वाढून द्यावें असें म्हटलें आहे. आपला वरिष्ठपणा गाजविण्याचा हा महारांचा इरादा दिसतोः कारण मांग महार यांची हक्कासंबंधाची चुरस या लेखांत पुष्कळ दिसते. मांगाचा नवरा हल्यावर व महाराचा घोड्यावर आहे, तेव्हा तेवढा श्रेष्ठपणा महाराकडे आलाच. पुढें प्रत्यक्ष हक्कांच्या बाबतींत दर वेळीं महारांनीं 'यांत मांगाचा संबंध नाहीं' असें म्हणून आपले हक्क स्पष्ट करून घेतले आहेत. बुचाडाच्या पुढचा ओढण्यांत मांगाचा संबंध नाहीं; संक्रांतीचा हुरडा महाराचा; त्यांत मांगाचा संबंध नाहीं; ढोरपड झाली असेल ती महारानें आणावी; त्यांत मांगाचा संबंध नाहीं; वरातीच्या घोड्यांत मांगाचा संबंध नाहीं. तोरण बांधण्याबद्दलच्या नैवेद्यांत मांगाचा संबंध नाहीं. महारानें जरीमरीचे करावें यांत मांगाचा संबंध नाहीं, अशासारख्या उल्लेखावरून दिसतें कीं आपल्याला कांहीं गांवकीचे हक्क मिळावे अशी मांगांची खटपट चालू झाली असावी व ती आपल्याला

बाधक होत आहे हें पाहून महारांनीं आपल्या हक्कांची शहानिशा करून घेतली असावी.

हे सुमारे बावन्न हक्क तपासून पाहतां असें स्पष्ट दिसून येईल कीं उपजीविकेचें साधन महार समाजाला वरें मिळालेलें होतें. बेदरच्या बादशहानें ही हक्काची नवीनच पद्धति घातली असें समजावयाचें नाहीं; तर अमूक एका महार घराण्याला त्या गावची बावन हक्कांची हक्कदारी त्यानें दिली इतकेंच. हे किंवा एतत्सम दुसरे पण बावन हक्क महाराला सर्वत्र होते हें इतिहासांत रुजूंच आहे. त्यांत मराठी अमलांत फरक झाला होता असें मानावयाची जरूर नाहीं. इतक्या या हक्कांची अंमल-बजावणी करून घेण्याचा हक्कही महारांना असे. सरकारदरबारीं तक्रारअर्ज जातांच मागील दाखले पाहून सरकारी अधिकारी महाराला न्याय देत असत. महार म्हणून त्याच्या हक्कांची उपेक्षा होत नव्हती. उपजीविकेचें साधन म्हणूनच जर या हक्कांचा विचार केला तर ते पुष्कळच आहेत असें म्हणावें लागेल. जिज्ञासूंनीं इतर हक्कदारांच्या हक्कांशीं यांच्या हक्कांची तुलना करावी म्हणजे दिसेल कीं, चांगल्या तऱ्हेनें गुजराण व्हावयास हे हक्क पुरेसे होते हें कबूल केलें पाहिजे. समाजाची बांधणी करतांना किंवा टिकवितांना जी कांहीं वृतिव्यवस्था म्हणजे चरितार्थाच्या साधनाची व्यवस्था हिंदू लोकांनीं घालून ठेविली तिच्यांत महारमांग यांच्या चरितार्थाची सोय त्यांनीं हक्काच्या रूपानें करून ठेविली व ती टिकून रहात आहे कीं नाहीं हें सरकारी अधिकाऱ्यांनीं दक्षतेनें पाहिलें. हें लक्षांत घेतलें म्हणजे महारमांग यांच्या हिंदुत्वाविषयीं कसलीच शंका कोणासही घेण्याचें कारण नाहीं. केवळ राजदरबारींच या हक्कांची जपणूक होती असे नव्हे: कारण ती गोष्ट अन्यधर्मीयांसंबंधानेंसुद्धां सरकाराला करावीच लागत असते. यांच्या हक्कादिकांची नोंद खुद्द पैठणच्या ब्राह्मणांच्यापाशीं जीं निर्बंधपुस्तकें असत त्यांत झालेली असे असा इतिहास आहे. पैठण हें महाराष्ट्रीय ब्राह्मणसमाजाचें आदिपीठ होय. कसलाही सामाजिक जीवनांतील वाद उपस्थित झाला तरी त्याचें निराकरण पैठणच्या ब्राह्मणांकडे तें प्रकरण जाऊन मगच लागत असे हेंही इतिहाससिद्ध आहे. अशा या ब्राह्मणांच्या निर्बंधपुस्तकांत या हक्कांची नोंद होती यावरूनही वरील म्हणणें यथातथ्य बरोबर ठरतें. मांग व

महार यांच्या हक्कांचें भांडण लागलें असतां तें तोडावयाचा प्रश्न निघाला तेव्हां पैठणास पंडिताजवळचे निर्वंध काढून पाहिले असल्याचा उल्लेख म. इ. सा. खंड २० ले. १७४ यांत स्पष्ट आहे.

एकादें 'दिव्य' करण्याच्या बाबतींत महाराच्या वचनाला केवढें प्रामाण्य दिलें जात होतें हें फार पहाण्यासारखें आहे. शके १६६५मध्यें फुरसंगी येथें पाटिलकीबद्दल कामठे–वोराडे व गायकवाड यांच्यांत तंटा लागला. कृष्णावेणी–संगमीं समस्त गोत जमलें. वादी–प्रतिवादी व येसनाक महार मेहेतरा प्रवाहांत शिरले. त्यानें कामठ्यांना उजव्या हातानें धरलें व प्रवाहांतून प्रथम बाहेर काढलें व गायकवाडांना डाव्या हातानें धरून मागून वाहेर काढलें. याचा अर्थ असा कीं कामठे यांचा पाटिलकींत निम्मा भाग असून शिवाय त्याजकडे वडिलकीचा मानही आहे, व गायकवाड यांच्याकडे उरलेला निम्मा भाग असून त्याजकडे धाकटेपणाचा मान आहे. हा येसनाक महाराचा निकाल मान्य झालेला आहे. (शाहू रो. पृ.१६८). खामगांव बुद्रुक व यवत येथील शिवेचें भांडण उद्भवलें. भोवतालच्या भागांतील सर्व गांवकरी जमा झाले. खामगांवकर निळनाक महार यानें आपला मान घेतला व शिवेनें म्हणजे खामगांवच्या शिवाराच्या हद्दीनें चालला. ज्या हद्दीनें तो चालत गेला ती हद्द सर्व गांवकऱ्यांनीं खरी मानली. (रा. खं. ६ पृ. १११). गांवाचीं शिवारें ठरविण्यांतच महाराचा निर्णय मान्य होत होता असें नाहीं, हें वर दिलेल्या फुरसंगीच्या पाटिलकीच्या वादावरून कळण्यासारखें आहे; पण खुद्द पांढरींतही म्हणजे गांवठाणांतही हद्दीचा तंटा पडला तर त्याच्या निकालानें काम होई असें दिसतें. बेलसर येथील न्हावी व गरुड यांच्या घरांच्या जागेच्या हद्दीबाबत तंटा सुरू झाला. गावचे वारा बलुते जमा झाले: 'दशरात्र पंचरात्रीची क्रिया' नेमिली: महाराचे डोईवर देवीचा अंगारा व पांढरीचा भेंडा दिला व नाहावियाच्या घराची जागा पुरातन असेल तेथवर त्यानें जावें असें ठरलें. हें होऊन उभयतांचा कज्जा वारण्यांत आला. (खं. ६ ले. ९०) यांत महाराच्या डोक्यावर दिलेल्या वस्तूंकडे या निवाड्याचा काहीं भाग जातो हें खरें असलें तरी त्या वस्तू धर्म्य मानून आपल्या प्रामाणिकपणाला अनुसरूनच महार निकाल देणार हें अज्ञ गांवकऱ्यांनाही कळण्यासारखें होतें. या उदाहरणांवरून महारांना काळीपांढरीची म्हणजे शेतजमिनी व गांवठाण

यांची उत्तम माहिती ठेवावी लागे व धर्मास स्मरून त्यांनीं निर्णय दिला असें समजून सर्व लोक तो मानीत हें स्पष्ट दिसतें. सरकारला कर्ज झालें तर तें फेडण्यासाठीं स्वतंत्र कर्जपट्टी म्हणून बसवीत असत. इ. स. १७६० त पेशव्यांनीं अशी कर्जपट्टी वसविली होती असें दिसतें. इतरांवरोवर महाराकडूनही तिची वसुली होऊं लागली; तेव्हां महारांनीं सरकारांत कळविलें कीं आजवर आमच्याकडून अशी पट्टी कोणी घेतली नाहीं व घेऊं नये असा "पेशजीचा करार' आहे. नाणेमावळपैकीं सर्व महारमंडळीच्या या अर्जाचा विचार होऊन त्यास पेशव्यानें कर्जपटी माफ केली. (नानासाो रोज. पृ. ३५२ भा. १) उध्वस्त झालेला गांव सोडून गेल्यामुळें म्हणा कीं स्वतःच परागंदा झाल्यामुळें गांवकरी व बलुतेदार नाहींसे झाले होते: पण पाटिल व बलुतेदार यांस सरकारनें पुन्हां गांवावर आणून कायम केलें त्यांत महारांनांही कायम केलें व कर्ज म्हणूनच पण शंभर रुपये व पांच खंडी गल्ला त्यांस दिला असा थोरले माधवराव यांच्या रोजनिशींत उल्लेख आहे. (रोज. पृ. ३५) जमिनीची पहाणी करून सरकार–सारा आकारला. त्यांत पाटिल इत्यादि सरकारी माणसांना जशी तशीच महारांना सुद्धां पंचोत्रा म्हणजे दरशेंकडा ५ रुपये सूट दिली आहे. (माध. रोज. पृ. ७)–मौजे कळंबी प्रांत मिरज (हल्लीं सातारा जि.) हा गांव जप्त झाला होता पण चवकशी करतां कळलें कीं हा सबंध गांव राजनाक वल्लद काळनाक याजकडे पूर्वीपासून आहे व तो हुजूर चाकरी करीत असतो. हें कळतांच त्या गांवाचा मोकासा म्हणजे जो जमीनमहसूल त्याचा त्यांच्याकडे पावता करण्याचा व गांव जप्तींतून मोकळा झाल्याचा हुकूम पेशव्यानें केला. (थो. मा. रो. भा. १ पृ. ३१०)–महार हा सरकारचा वतनदार अधिकारी म्हणून अधिकारी, कुलकर्णी व खोतपाटील यांच्याप्रमाणें पाली गांवचा भोयी महार यांस घरठाण माफ करण्यांत आलें (नानासाो रो. भा. १ पृ. २०३). महारांच्या जुन्या परंपरागत हक्कांची जपणूक सरकार कशी करी हें पंढरपूरच्या महारांनीं केलेल्या तक्रारीवरून दिसून येईल. पंढरपुरांत 'राडीचा खेळ' होत असे. राडीचा मान महाराचा असे. राड खणावी ही चाल 'सुदामत' असतां वडवेच्च ती खणूं लागले व म्हणू लागले कीं आम्हीच आधीं पूजा करूं, मग सर्वांनी खेळावे. अशा नव्या 'दिकती' वडवे करूं लागले. म्हणून हुजुरांतून हुकूम झाला की सुदामतप्रमाणें राड वतनदार महाराकडून खणून महाद्वारापुढें सर्वांनीं

खेळ खेळावा. नवा कायदा कोणी सांगू नये. सांगितल्यास गुन्हेगारी पडेल. (सवाई माध. रोज. ३–२८५). या पेशवाईंतील उल्लेखांवरून महार हा वतनदार गांवकरी समजला जाई व त्याच्या परंपरागत हक्काची पायमल्ली कोणाकडूनही न होऊं देण्याविषयीं सरकार दक्ष असे हें वाचकांच्या ध्यानांत येईल. इ. १७८९ सालीं मौजे कात्रज गांवालगत जीं महार, मांग, चांभार यांचीं घरें असत तीं मोडून दुसरीकडे घातलीं त्यास हुजुरांतून २५१ रुपये दिले व ३०० वासेही दिले. (सवा. माध. रोज. ३–२८६) हाही उल्लेख या लोकांच्या हक्कदारीचा व त्यांच्यासंबंधीं सरंकारांत काय कर्तव्य मानलें जात असे याचा निदर्शक आहे.

आपद्धर्म शास्त्राधार

अशा रीतीनें अस्पृश्यांच्या उपजीविकेची साधारणत: बऱ्या प्रकारची योजना समाजानें केली असें म्हणावयास हरकत नाहीं. दोन्ही समाज जसजसे निकट येऊं लागले तसतशी स्पृश्य समाजाची तुसड वृत्ति थोडी तरी कमी होऊं लागावी हें ओघानेंच आलें. लढाया, यात्रा, उत्सव अशासारख्या ठिकाणीं इतका तुसडेपणा ठेवून चालत नाहीं असें माणसांनीं ओळखलें व अशासारख्या प्रसंगीं शिवताशिवत झाली तरी कांहीं हरकत नाहीं असें मानावयाचा प्रघात पडून गेला. शास्त्र बिचारें प्रघाताच्या मागोमाग आनंदानें येतें. या त्याच्या प्रवृत्तीप्रमाणें याहि प्रकरणीं झालें. मागें जे अस्पृश्यता हवीच हवी असें ठांसून सांगणारें श्लोक दिले आहेत त्यांच्याशीं पुढें दिलेल्या शास्त्रवचनांची तुलना करावी म्हणजे असें दिसून येईल कीं शास्त्र हें कालगतीनें थोडें ढिलें होत गेलें आहे. आतां पुढें दिलेल्या या वचनांपैकीं कांहीं अस्पृश्यांच्या विटाळासंबंधानें मुळींच नाहींत तर एरवींचें जें आपलें सोवळें ओवळें असतें त्या संबंधाचीं तीं आहेत असें कांहींचें मत आहे. तथापि त्यांच्या वादाचा निकाल लागेपर्यंत तरी पुढील वचनें बदलत्या विचारांचीं दर्शक आहेत असें समजावयास हरकत नाहीं.

मिताक्षरायाम्:—न देवप्रतिष्ठोत्सर्गविवाहेषु न देशविभ्रमे ॥
नापद्यपि च काष्ठायामाशौचम् ॥ इतिविष्णुस्मरणात् ॥

देवप्रतिष्ठा, यज्ञयाग, विवाह, देशपर्यंटन, आपत्काळ, या प्रसंगीं कमींत कमी शुद्धतेचें प्रमाण असलें तरी चालतें.

देवयात्राविवाहेषु यज्ञप्रकरणेषुच ॥
उत्सवेषु च सर्वेपु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥ २४९॥ अत्रि स्मृति

देव, यात्रा, विवाह, यज्ञ, या प्रकरणीं व सर्व प्रकारच्या उत्सवामध्यें स्पर्शास्पर्श विचार मानूं नये.

नारायण सारसंग्रहेः—उत्सवे वासुदेवस्य यः स्नाति स्पर्शशंकया ॥
पतितः स नरश्चैव रौरवं नरकं व्रजेत् ॥ —हारीत स्मृति

वासुदेवाच्या उत्सवांत जो विटाळ झाला या कल्पनेनें स्नान करील तो मनुष्य पातकी होय. तो रौरव नरकाला जाईल.

वैश्वदेवान्तरेषु य आगच्छति भिक्षुकः ॥
चाण्डालोऽथ चौरोवा विष्णुरूपी न संशयः ॥ स्कंद पुराण. अ. ५

वैश्वदेवाच्या काळांत जर कोणी अतिथि आला तर तो चांडाळ असो किंवा चोर असो तो विष्णुरूप आला आहे असें निःसंशय मानावें.

संग्रामे हटमार्गेच यात्रादेवगृहेषु च ॥
उत्सवऋतुतीर्थेपु विप्लवे ग्रामदेशयोः ॥
महाजलसमीपेषु महाजनवरेषुच ।
अग्न्युत्पाते महापत्सु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥ —स्मृत्यर्थसार

लढाई, बाजारहाट, रस्ता, यात्रा, उत्सव, देवस्थानें, यज्ञयाग, तीर्थक्षेत्रें व देशाचे किंवा गांवाचे संकटप्रसंगीं तसेंच महापूरांत किंवा समुदायांत, आग लागली असतांना, किंवा मोठी आपत्ति ओढवली असतांना स्पर्शास्पर्श विचार पहाण्याचें कारण नाहीं.

उत्सवे वासुदेवस्य यः स्नाति स्पर्शशंकया ॥
स्वर्गस्थाः पितरस्तस्य पतन्ति नरके क्षणात् ॥ परा० स. अ. ८

वासुदेवाच्या उत्सवप्रसंगीं जो कोणी विटाळाच्या कल्पनेनें स्नान करील त्याचे स्वर्गति गेलेले पितर क्षणांत नरकांत जातील.

विवाहोत्सवयज्ञेषु संग्रामे जलसंप्लवे ॥
प्रपालये तथारण्ये स्पर्श दोषो न विद्यते ॥ २९७ ॥ परा० सं. उ. खं. अ. ६

विवाह, उत्सव, यज्ञयाग, लढाई, पूर, अरण्य, याप्रसंगीं व संरक्षण करीत असतांना स्पर्शदोष असत नाहीं,

स्मृतिरत्नाकरेः—तीर्थे विवाहे यांत्रायां संग्रामे देशविप्लवे
ग्रामदाहे प्रवासे च स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥ बृहस्पतिः ॥

तीर्थाच्या ठिकाणीं, विवाहप्रसंगीं, यात्रांच्या वेळीं, लढाईंत, देश संकटांत असतांना, गांवाला आग लागली असतांना व प्रवासांत स्पर्शास्पर्श दोष असत नाहीं.

ग्रामे तु यत्र संस्पृष्टिर्यात्रायां कलहादिषु ॥
ग्रामसंदूषणे चैव स्पृष्टिदोषो न विद्यते ॥ –शातातप.

गांवामध्यें यात्रेचे वेळीं किंवा भांडण चालू असतांना तसेंच गांवांत कांहीं विघाड झाला असतांना स्पर्शदोष लागत नाहीं.

संकटे विषमस्थाने दुर्गे तु परिखे तथा ॥
भद्रपत्तनमार्गेषु यथा शूद्रस्तथैव सः (चाण्डाल). ॥

संकटकाळीं, अडचणीच्या प्रसंगीं, किल्ल्यावर, खंदकांत, मोठ्या शहराच्या रस्त्यावर जसा शूद्र तसाच हा (चांडाल)

विवाहोत्सवयज्ञेषु संग्रामे जलसंप्लवे ॥
पलायने तथारण्ये स्पर्शदोषो न विद्यते ॥२९७॥ बृहत्पाराशरीये–अ. ६

विवाह, उत्सव, यज्ञ, संग्राम, महापूर या ठिकाणीं तसेंच पळून जात असतांना व अरण्यांत स्पर्शदोष लागत नाहीं.

विवाहदुर्गयज्ञेषु यात्रायां तीर्थकर्मणि ॥
न तत्र सूतकं तद्वत्कर्म यज्ञादि कारयेत् ॥—पैठीनसि

विवाह, किल्ला, यज्ञप्रसंग, यात्रा, तीर्थें या ठिकाणीं सुतक (दोष) नाहीं, असें समजून यज्ञ–कर्मे करावींत.

परमार्थविचारांत प्रवेश

परमार्थ विचारांतहि असाच फरक हळू हळूं घडून आला. अस्पृश्यांच्या उपजीविकेची जरी सोय झाली तरी माणसें केवळ भाकरीवर जगतात हें

खरें नसल्यामुळें अस्पृश्य समाजाला परमार्थविचाराची भूक लागावी हें साहजिक होतें. परमार्थ विचारप्रवण अशा स्पृश्य हिंदू समाजाच्या सन्निध वागत असतांना अस्पृष्टांना परमार्थाची भूक न लागणें हें अशक्य होय. ज्ञानेश्वरांच्या पूर्वीच्या लोकस्थितीची व वाङमयाची आपल्याला फारशी ओळख नाहीं. पण ज्ञानेश्वरकालीन वाङमयावरून अस्पृष्टांच्या पारमार्थिक क्षुधेविषयीं निश्चित अनुमान करतां येतें. ज्ञानेश्वर महाराजांनीं 'ज्ञानदेवी' लिहून 'निगम पल्ली प्रगट केली' व अशा रीतीनें पतितांच्या तारणाचा उपाय सिद्ध झाला असें चोखोबा फार आनंदानें सांगत आहे. वेदार्थाचा ठेवा आजपर्यंत आपल्यापासून झांकलेलाच होता; पण तो ज्ञानेश्वर महाराजांनीं उघडा केला असेंहि चोखोबानें म्हटलें आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्यावर केलेल्या उपकाराची जाणीव चोखोबाला कशी होती तें पहाः—

तो हा महाराज ज्ञानेश्वर माऊली । जेणें निगमवल्ली प्रकट केली ॥
संसारीं आसक्त मायामोहें रत । ऐसे जे पतीत तारावया ॥
चोखा म्हणे श्रेष्ठ ज्ञानदेवी ग्रंथ । वाचतां सनाथ जीव होती ॥
उघडोनी वेदार्थाचा ठेवा । केला तरणोपाय जीवा ॥
ऐसा समर्थ ज्ञानदेव । तया चरणीं ठेवा भाव ॥
प्रत्यक्ष प्रचीत लोचनीं । अस्थि विरती जीवनीं ॥
पुढें सोन्याचा पिंपळ । ऐसी साक्ष असे अढळ ॥
कर जोडोनियां दोन्ही । चोखा जातो लोटांगणीं ॥

परमार्थविचारांतील अधिकाराची कोंडी ज्ञानेश्वरानें फोडली हें त्यांचें ऋण चोखोबानें कृतज्ञतेनें वर्णन केलें आहे. अस्पृश्य समाजाच्या उन्नतीचा जो कित्येक शतकांवर पसरणारा मार्ग त्याचा आरंभ ज्ञानेश्वरापासून होतो हें म्हणणें कित्येक सुधारकांस पसंत नसलें तरी चोखोबाच्या जबानीनेंच तें खरें आहे हें मात्र यावरून स्पष्ट होतें.

पंढरीच्या पांडुरंगाचें दर्शन याकाळीं लांबून कां होईना अस्पृश्यांस घडत होतें असें वाटतें.हा फार महत्त्वाचा प्रश्न असून तो कांहीं कांहीं अभंगांवरून उत्पन्नहोतो. हा प्रश्न उपस्थित करतांना मजवर फार जबाबदारी पडते हें मी जाणून आहें.जुन्या

पीठिका, माहिती, इतिहास इत्यादींच्या माहितगारांनीं या प्रश्नासंबंधानें लिहिलें, तर उपस्थित केलेल्या या प्रश्नाचा अनुकूल निकाल लागण्यास फार मदत होईल. मी जीं वचनें म्हणून दाखवितों त्यांचे अर्थ परमार्थपरच लावावयास हवेत असा आग्रह सनातनी वांधव करतील. पण प्रत्येक वचनाचा तसा अर्थ लावणें केवळ आग्रहाचें दिसेल हें त्यांचें तेसुद्धां ओळखतील. मला असें खास वाटतें कीं,पूर्वीं म्हणजे चोखोवाच्या वेळीं महाद्वारांतून श्रीविठ्ठलाचें दर्शन अस्पृश्यांस होत असावें. मी पंढरपूरचें देऊळ पाहिलेलें नाहीं व तेथील दर्शनविपयक पद्धतीहि मला माहीत नाहींत. पण विचारून घेतलेल्या माहिती-वरून असें दिसतें कीं, सध्यां अस्पृष्ट लोक हे चोखोवाच्या समाधीपाशींच उभे राहतात, तेथें कापूर लावतात व पंढरीला गेल्याचें सुख मानतात. याच्या शेजारीं पंधरा–सोळा पायऱ्या असून त्या चढून गेलें म्हणजे महाद्वार लागतें. हें महाद्वार व विठ्ठलाचें प्रत्यक्ष मंदिर यांच्यामध्यें मोकळ्या जागा, वारखांबी इत्यादि प्रकार आहेत. प्रत्यक्ष मंदिर व महाद्वार या दरम्यान असलेल्या इमारती जर नाहींत असें मानिलें व मधील सर्व जागा मोकळी आहे असें धरलें तर महाद्वारांत उभ्या असलेल्या माणसाला विठ्ठलाचें दर्शन होणें शक्य आहे कीं काय हें माहितगारांनीं ठरवावयास हवें. तसें जर शक्य असलें तर पुढें दिलेल्या अभंगांतील 'पाहिलें,' 'देखिलें' या शब्दाचे अर्थ परमार्थपर लावण्याचे कांहीच कारण नाहीं. हे शब्द म्हणजे मानसपूजा आहे असें म्हणणें वायफळ दिसेल.

मला वाटतें कीं चोखोबाच्या वेळीं महाद्वारें व खुद्द मंदिर यांमधील सध्यां जो पसारा आहे तो मुळींच नसावा. व कांहीं असला तरी महाद्वारांतून विठ्ठल-मूर्ति दिसणाच्या आड तो येत नसावा. मधील सर्व मंडप इत्यादि प्रकार मागून उभारण्यांत आले असावे. व ते उभारतांना महाद्वारांतून अस्पृश्याला देवदर्शन करण्याची सोय केलेली होती तिजकडे दुर्लक्ष केलें असावें. तथापि यामुळें महाद्वारांतून देवाकडे प्रत्यक्ष पाहून दर्शन घेण्याचा अस्पृश्यांचा पुरातन हक्क आहे हें आपोआपच ठरेल. वहिवाट नसल्यामुळें दर्शन करण्यास परवानगी देतां येत नाहीं असें जे कोणी म्हणतात त्यांना सम-जून येईल कीं वहिवाट होती व म्हणून पुन्हा तशी वहिवाट पाडावयास कांहींच हरकत नाहीं. ही वहिवाट सहासातशें वर्षांपूर्वीच होती हें जर सिद्ध झालें

तर सनातनी बांधवांस असें विचारतां येण्यासारखें आहे कीं इतक्या वर्षांनंतर मंडपांत तरी येऊं देण्याची वेळ आतां झाली नाहीं काय? अस्पृष्टांस दर्शन घडावयास हवें. कारण वरील अनुमानावरून तेव्हां म्हणजे इतक्या वर्षांपूर्वी तें घडतच होतें खुद्द मंदिर व महाद्वार यांमध्यें कसलीच इमारत नाहीं असें धरलें तर महाद्वारांतून मूर्तिदर्शन होतें अथवा निदान मधील स्थिति अशी असावी कीं, महाद्वारांतून दर्शन घेण्यास हरकत पडूं नये.

चोखामेळा हा महाद्वारांतून देवदर्शन करीत होता; खालून कोठून नव्हे, तर प्रत्यक्ष महाद्वारांतून तो तें करीत होता; हें दर्शविणारे अभंग असे आहेत. यांत 'देखिल्याचें' म्हटलेंच आहे. पण महाद्वारांत तरी त्याचें स्थान होतें, त्याच्याखालीं कोठें नव्हतें हेंही त्यांवरून दिसेल.

पाहतां पाहतां वेधियेला जीव । सुखाचा सुखसिंधु पंढरीराव ॥
उभा राहुनि महाद्वारीं । चोखामेळा दंडवत करी ॥
सुखाचा सुखराशी पंढरीसी आहे । जावोनिया पाहे अरे जना ॥
अवघीया उद्धार एकाचि दरुशनें । भुक्ति मुक्त तेणें होय फुका ॥
चोखा म्हणे आनंदें नाचा महाद्वारीं । वाचे हरी हरी म्हणा मुखें ॥
पहातां श्रीमुख हरे तहानभूक । चोखा सुख विठुपारीं ॥
चोखा म्हणें मज कांहींच न कळे । उगाचि मी लोळें महाद्वारीं ॥
गहिंवरुनि चोखा उभा महाद्वारीं । विनवी जोडुनि करीं विठोबासी ॥
देखिला देखिला योगियांचा रावो । रुक्मादेवी नाहो पंढरीचा ॥
चोखामेळा तेथें वंदितो चरण । घाली लोटांगण महाद्वारीं ॥

दर्शनास अनुकूळ पुरावा—

या महाद्वारांतून चोखोवाला व त्याच्या नातेवाईकांना व म्हणून इतर अस्पृष्टांस विठ्ठलमूर्ति प्रत्यक्ष दिसत होती असें म्हणावयास पुढील अभंगांचा आधार मिळतो:—

चोखामेळा—

श्रीमुखाची शोभा कस्तुरी मळवट । उभा असे नीट विटेवरी ॥
कर दोनी कटीं कुंडल झळकती । तेज हे फाकती दशदिशा ॥

वैजयंती माळा चंदनाची उटी । टिळक लल्लाटीं कस्तुरीचा ॥
चोखा म्हणे माझ्या जीवींचा जीवनु । पाहतां तनु मनु भुलोनी जाय ॥
बहुमत ग्रंथ करितां पठण । सुख समाधान नव्हे तेणें ॥
चोखा म्हणे सुख समाधानवृत्ति । पाहतां विठ्ठलमूर्ति विटेवरी ॥
पहा हो वैकुंठनिवासी । उभा भिवरे तीरासी ॥
कट धरोनि हृषीकेपी । विटे समचरणीं देखिला ॥
जो न कळे वेदशास्त्रा अगोचर । तो हा कटीकर उभा विटे ॥
गोड गोजिरें ध्यान मिरविलें । तें आम्हां देखिलें पंढरिरायें ॥
संतसमुदाय पताकांचे भार । करिती जयजयकार महाद्वारीं ॥
चोखा म्हणे सर्व सुखांची विश्रांति । तो हा रमापति पंढरीये ॥
लावण्याचा गाभा त्रैलोक्याची शोभा । विटेवरी उभा पंढरीये ॥
पाऊलें गोजिरीं श्रीमुख शोभलें । ध्यान मिरविलें भीमातीरीं ॥
वैजयंती माळा किरीट कुंडलें । परिधान केलें पीत वस्त्र ॥
चोखा मेळा म्हणे ऐसा लावण्यपुतळा । आम्हीं तो देखिला दृष्टिभरी ॥

बंका—

न कळे वो भाव आगमा-निगमां । जयाचा महिमा श्रुतिशास्त्रा ॥
तो म्यां डोळेभरीं पाहिला श्रीहरी । भिवरेचे तीरीं विठ्ठलरूप ॥
सुखाचा सागर भक्तांचा कैवारी । ब्रीद चराचरीं गाजतसे ॥
बंका म्हणे ऐसा जयाचा महिमा । सुलभ तो आम्हां भाविकांसीं ॥

सोयराबाई—

आजि माझा पुरला नवस । देखिलें पायास विठोबाच्या ॥
अनंता जन्माचें फिटलें सांकडें । कोंदाटलें पुढें रूप त्याचें ॥
आठवीत होतें गोमटीं पाऊलें । तोंचि देखियेलीं विटेवरी ॥
आनंद न समाये मनाचे अंतरीं । म्हणतसे महारी चोखियाची ॥

बंका—

प्रेमाचा पुतळा विठोबा सावळा । उभा तो देखिला भीमातटीं ॥
कर कटावरी पाऊलें साजिरीं । शंखचक्र करीं मिरवीतसे ॥

योगियांचा राणा गोपीमोहन कान्हा । भक्तीचा आंदणा घरोघरीं ॥
बंका म्हणे ऐसा कृपेचा कोवळा । पाळी भक्तलळा प्रेमासाठीं ॥

अर्थ परमार्थपर कां लावावे ?

या अभंगांतील 'देखिला,' 'पाहिला' 'दृष्टभरी' 'डोळेभरी' इत्यादि शब्दांचे अर्थ परमार्थपर कां लावावे हें समजत नाहीं. परमार्थपर अथवा मानसपूजापर असे ज्याचे अर्थ बसवावयास हवेत असे दोन अभंग आहेत. 'देवचि देखिला देहामाजीं', 'प्रेमें आलिंगिलें चोखियानें' हीं वचनें साध्या अर्थानें घेतां यावयाचीं नाहींत हें उघड आहे. पहिलें तर स्पष्टच आहे व दुसरें प्रत्यक्ष आलिंगन या अर्थानें घेतां यावयाचें नाहीं. याचें कारण असें कीं, महाद्वारांत मी उभा असतों म्हणजे पुढें जात नाहीं हें चोखोबानें हजारदां सांगितलें आहे.

आम्हां आनंद झाला आम्हां आनंद झाला । देवचि देखिला देहामाजी ॥
देखणें उंडालें पहाणें लपालें । देवें नवल केलें देहामाजीं ॥
मागें पुढें देव रिता ठाव कोठें । हृदयीं भेटे देहीं देवो ।
चोखा म्हणे देव देखिला पंढरीं । उभा भीमातीरीं विटेवरी ॥

या अभंगांतील 'देव देखिला पंढरी' 'आलिंगिलें' या शब्दांचे अर्थ 'मागें पुढें देव रिता ठाव कोठें। हृदयीं भेटे देहीं देवो' या शब्दांच्या अनुरोधानेंच लावावयास हवा; पण याच्या वरच्या अभंगांतील 'देखिला' इत्यादि शब्द मानस-पूजापर घेण्याचें कांहींच कारण नाहीं.

चोखोबा, बंका, सोयराबाई या सर्वांनीं आपल्या मानसपूजेचेंच वर्णन चालविलें आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें आहे. शिवाय चोखोबा सोडला तर उरलेल्या प्रत्येकालासुद्धां हें परमार्थदर्शन घडलें होतें असें म्हणावयास मन धजावत नाहीं. घरांतला एक कोणी मोठा संत झाला म्हणजे घरांतील बाकीचीं माणसें भक्त बनत; पण भक्त बनलीं म्हणून त्या संताइतकींच तीं अधिकारीं बनत हें खरें वाटत नाहीं. त्यांना प्रत्यक्ष विठोबाच्या मूर्तीचें दर्शनच घडत असावें असेंच वाटतें. वर सुचविल्याप्रमाणें प्रत्यक्ष मंदिर व महाद्वार यांत आड येण्यासारखें पूर्वी कांहीं नसेल तर हें दर्शन त्यांना खास सुलभ होतें; असो.

ज्ञानेश्वर कालानंतर भक्तिमार्गांतील प्रसिद्ध संत म्हणजे एकनाथ हा होय. अस्पृष्टांचें मूल कळवळ्यानें उचलून घेणें ही त्याची कथा सर्वप्रसिद्ध आहे. म्हणून ती येथें देण्याचें कारण नाहीं. तसेंच वडिलांच्या श्राद्धाच्या दिवशीं ब्राह्मणांना जेवूं घालावयाच्या आधींच भुकेलेले अस्पृश्य लोक दाराशीं आले म्हणून ब्राह्मणांना वाढावयाचें सर्व अन्न त्यानें या अस्पृष्टांसच वाढून टाकलें, हीहि त्याच्या विषयींची गोष्ट आबालवृद्धांना परिचित आहे. या नंतरचा भक्तिमार्गांतील श्रेष्ठ पुरुष म्हणजे तुकाराम हा होय. परमार्थविचारांत आम्ही जात ओळखीत नाहीं, वैष्णव हे येथून तेथून सर्व सारखे, अत्यंज व ब्राह्मण हा परमार्थ विचारांत सारखाच,असा घोष या महान् भगवद्भक्तानें जन्मभर केला. वारकरी सांप्रदायांत अस्पृष्टांच्या दिंड्या पालखीपुढें चालतात. व मोठमोठाले भजनाचे ताफे महार समाजांत आहेत हीहि गोष्ट प्रसिद्ध आहे. याचा अर्थ असा कीं निदान परमार्थविचारांत तरी हिंदुधर्मानें अस्पृश्यांचा अंतर्भाव केला.

लष्करांत प्रवेश

महारांच्याकडे रखवालीचेंही काम निदान फार जुन्या काळीं असे असें दिसतें. शके ९७३ च्या सुडी येथील कानडी शिलालेखांवरून दिसतें कीं, शहरांत जर कांहीं चोरीस गेलें तर अर–ताळाला म्हणजे जो ताळ त्यावेळीं कामावर असेल त्यालाच त्याची भरपाई करावी लागत असे. हा ताळ महारच असे, असा अंदाज करावयास कांहींच हरकत नाहीं. गांवकीच्या भांडणांचे निकाल करतांना जी बलुतेदार मंडळी जमत व ज्यांच्या सह्या त्या निवाडपत्रांवर होत. त्यांत महार हा असेच. महाराची 'काठी,' मांगाची 'दोरी,' व चांभाराचा 'इंगा' अशा निशाण्या असतात. असें महजर ऐतिहासिक कागदपत्रांत शेंकडोशें छापलेले आहेत. पण वतनदारीचा, बलुतेदारीचा किंवा रखवालदारीचाच पेशा संभाळून महार राहिले होते असें नाहीं.

बिगार म्हणून हुजूरपागेंत त्यांची व मांगांचीही नेमणूक होत असे व आरमारा-कडे चांभारांची नेमणूक होत असे. पुणें, राहुरी, खेड, संगमनेर,जुन्नर, पारनेर, नेवासें,कर्डे, बेलापूर, गांडापूर या ठिकाणीं ३१३ महार,५४ मांग, ५२ चांभार

हुजूरकडे असल्याचा उल्लेख नानासाहेब यांच्या रोजनिशींत आहे. तसेंच पुणें, गंगयडी, पारनेर, उबेरे, करकम इत्यादि निरनिराळ्या ठिकाणीं मिळून हुजूरपागेंत म्हणजे घोडदळाकडे २७७ महार 'रावते' म्हणून होते. राणोजी भोसले यांच्या पागेकडेही ते असेच नोकर असत. हें रावत्याचें किंवा बेगाऱ्याचें कामच केवळ महार करीत, असें नाहीं. लढाईच्या प्रसंगीं जखमी लोकांना परत आणण्याचें काम महारांकडे असे. (सवा० माध० रो. भा. १–४३). इ.स. १७७८ त तळेगावांहून लष्करांतील जखमी लोक पुण्यास आणण्यासाठीं इतरांवरोवर पुण्याहून महारांची रवानगी झालेली होती (सवा० माध० रो. भा. २ पृ. ४३). वसईच्या मोहिमेंत उत्तम पोहोणारे असे पेटेकरी महार–मांग होते. वसईच्या वेढ्याच्या वेळीं माणसें, पत्रें वगैरे पाण्यांतून पोचविण्याचें मोठें जोखमीचें काम या लोकांनीं वजावलें असें म्हटलें आहे. (पेशवे द. ३–२०९)–पण याही पुढें महारांनीं प्रवास केला होता असें दिसतें. शिवाजीची मुलगी सखूबाई ही वजाजी निंबाळकराच्या मुलाला दिली होती. तिच्यावर एकदां संकट गुदरलें. त्याप्रसंगीं वाल्हे येथील महार तिच्या उपयोगी पडले म्हणून तिनें त्यांना भाऊ म्हटलें व तेव्हांपासून आपलें आडनांव 'भोसले' असें पडलें असें त्यांचें म्हणणें आहे. कोठेंकोठें पाटिलकी महाराकडेही असावी असें दिसतें. देहू, वांवुर्डी, भिमथडी, नागेवाडी जि. सातारा, भांवुर्डे येथील पाटिलक्या महारांच्याकडे होत्या. अर्थात् गांवकामदार वतनदार, सैन्यांतला विगारी, कोठला कदाचित् पाटिलही असलेला हा महार येथेंच थवकला असेल असें नाहीं. जंजिराच्या मोहिमेंत सिद्दीसाताच्या बाजूनें कोंडनाक महार लढत होता असें ब्र. स्वा. चरित्रांत म्हटलें आहे. पेशव्यांच्या सैन्यांत 'हूलस्वार' म्हणून महाराचें पथक असे, (पेशवे सनदा० प्र. १७ पृ. ३०४). हूल या नांवावरून असें वाटतें कीं शत्रूच्या फौजेला हूल दाखविण्याचें काम या महार घोडेस्वारांकडे असे. वाई प्रांतांतील नागेवाडी येथील पाटिलकी कदीम मिरासी महाराची असे. पण गुरवांनीं त्यांच्या वडिलांचे 'मारेचुरे' करून ती मिरासी घेतली. तेव्हां शेजारच्या लोकांनीं साक्षी दिल्यामुळें ती त्याजकडे परत आली. तथापि गुरवाची धडपड चालली होती. राजाराम महाराजांपर्यंत प्रकरण गेलें. त्यांनीं सांगितलें कीं महारांनीं वैराटगड जिंकून द्यावा व हें धारादिव्य करून नागेवाडीची पाटिलकी मिळवावी.

त्यावर महारांनीं मोठा पराक्रम करून वैराटगड जिंकून महाराजांच्या हवालीं केला व नागेवाडीची पाटिलकी परत मिळविली. (सप्त० सम्म० वृत्त पृ.५७ १६९८). म्हणजे इतक्या पूर्वीपासून महारांच्या शौर्याचा प्रत्यय सत्ताधीशांना आलेलाच होता. तो पुढेंहि येत राहिला असें दिसतें. खड्र्याच्या (?) लढाईंत शिदनाक महाराचें पथक होतें. हा तासगांवाकडील कळंबी गावचा वतनदार होता. शाहू सुटून इकडे आल्यावर याचा आजा त्यांच्या फार उपयोगी पडला म्हणून महाराजांनीं त्याला हा गांव वतन दिला होता. शिदनाक आपल्या पथकासह खड्र्यावर आला होता. त्याचा तळ इतर ब्राह्मण–मराठे सरदारांच्या तळाशेजारींच पडला होता. अर्थात् सरदारमंडळींत थोडी चुळबुळ चालू झाली व होतां होतां सवाई (?) माधवरावापर्यंत ही तक्रार पोंचली. श्रीमंतांच्या शेजारीं वृद्ध मराठा सरदार हिरोजी पाटणकर हे बसलेले होते. श्रीमंतांनीं तक्रार ऐकून त्यांजकडे पाहिलें. तो म्हातारा गुरगुरून म्हणाला, "ही कांहीं जेवणाची पंगत नव्हे: तलवारबहादर शूरांची पंगत आहे. येथें विटाळचंडाळ कांहीं नाहीं." श्रीमंतांनीं निकाल दिला कीं शिदनाकाचा तळ आहे तेथेंच असू द्यावा. ही कथाही बोधप्रदच आहे. शिदनाकाचें सैन्यांतील महत्त्व व त्यामुळें त्याचा फिटलेला विटाळ या दोनही बाबी सुधारणेच्या दृष्टीनें फारच अर्थपूर्ण आहेत. पण याहीपेक्षां अत्यन्त हर्ष वाटण्यासारखी ऐतिहासिक हकीकत म्हणजे वसई व जंजिरा येथल्या प्रसंगांच्या वेळची होय. जे कोणी फार मोठा पराक्रम गाजवितील त्यांना 'उडत रुमाल' अशी बहुमानाची पदवी देण्याचा प्रघात असे. 'उडत रुमाल' हा शब्द मूळचा मानपद्धतीचाच द्योतक आहे. ज्यांनीं फार मोठें शौर्य गाजविलें असेल त्याला ही पदवी म्हणजे हा अधिकार देण्यांत येई. या शूर वीराच्या भोंवतीं लोकांनीं उभे रहावयाचें व त्याचा जयजयकार करीत त्याच्या डोक्यावर मोर्चेलाप्रमाणें पांढरे रुमाल उडवावयाचे असा हा बहुमान असे. हा मान फक्त महार शूरांनाच असे असें इतिहाससंग्रहांत म्हटलें आहे; पण केवळ महारांच्यासाठींच हा नवा हलका मान काढला होता असें नाहीं; तर जंजिऱ्याच्या स्वारीच्या प्रसंगीं बीरवाडीकडील नावजी मराठे, होनाजी लकवडे या मराठे वीरांनाही हाच मान दिला होता असें इतिहाससंशोधक श्री. शंकरराव जोशी यांचें म्हणणें आहे. अर्थात् इतर सरदारांच्या बरोबरीनें हा "उडतरुमाली"चा अधिकार व मान महारांनाही

दिलेला आहे. महारांच्या शौर्याची गुणपारख व त्या शौर्याला साजेसा वहुमान मराठी अमलांत कसा होई हें दाखवावयास आणखीही एक पुरावा आहे. वसईच्या मोहिमेंत तुकनाक महार यानें मांडवीकडील मोर्चा उत्तम रीतीनें लढविला व थोर यश मिळविलें. या नामांकित लढवय्याला त्याच्या कर्तव-गारीवद्दल कंठी–कडींतोडें अशीं मोठीं वक्षिसें देऊन पेशव्यांनीं त्याचा गौरव केला आहे.

यावरून दिसून येईल कीं महार वीरांच्या गुणांचें कौतुक पेशव्यांच्या फौजेंत विनहरकत होत होतें. आतां हा अस्पृष्टांचा सैन्यांतील प्रवेश केवळ अपवादादाखल होता असें मानावयाचीं जरूरी नाहीं. प्रसिद्ध इतिहास-संशोधक श्री. आवा चांदोरकर यांनीं नुकत्याच केलेल्या शोधावरून असें खास सिद्ध होतें कीं पेशव्यांच्या फौजेंत महार लढवय्ये अगर शिपाई तुरळकच कोठें असत असें नव्हे; तर त्यांच्या जातींचे कित्येक पथकदारच असत. अशा या पथकदारांपैकीं सध्यां जीं नांवें उपलव्ध झालीं आहेत तीं येथें देतों. यांचीं पथकें केवढीं असत, त्यांबद्दल त्यांना तैनाती किंवा वेतनें किती असत, हें जास्त शोधांतीं कळेल. पण खालील यादीवरून त्यांचें सैन्यांतील स्थान व महत्त्व यांचा वोध होतो.

पेशव्याचे कांहीं महार पथकदार

१ आपनाक	१६ तुकनाक	३१ मेघनाक
२ उमनाक	१७ दमेनाक	३२ येमनाक
३ उपनाक	१८ दसनाक	३३ येसनाक
४ कालनाक	१९ दादनाक	३४ रामनाक
५ कासनाक	२० देवनाक	३५ राजनाक
६ कुसनाक	२१ धावनाक	३६ राणनाक
७ केरनाक	२२ धूळनाक	३७ लाहालनाक
८ खंडनाक	२३ धोंडनाक	३८ वामनाक
९ गोमनाक	२४ नागनाक	३९ सटवानाक
१० गोंदनाक	२५ पदनाक	४० संभनाक
११ चांगनाक	२६ पुजनाक	४१ सिवनाक

१२ चिमणनाक	२७ बदनाक	४२ सुकनाक
१३ चिडनाक	२८ वागनाक	४३ सुवनाक
१४ जाननाक	२९ माळनाक	४४ सिदनाक
१५ झुकनाक	३० मायनाक	

या सर्व वर्णनावरून हें ध्यानांत आलें असेल कीं स्वराज्य सुरू झाल्यावर हळूहळू महारांच्या गुणांचें चीज व्हावयासही सुरवात झाली. ऐन शिवकालांतही, येल्या मांग व खंडया महार असे शूर शिपाई वाजी पासलकरापाशीं शरीरसंरक्षणासाठीं असत. तेथपासून तो उडतरुमाल ही पदवी व कंठीकडींतोडे हे अलंकार, आणि इतर सरदारांच्या पंक्तीला तळ ठोकण्याचा अधिकार हे महारांना पेशवाईच्या शेवटपर्यंत हळूहळू प्राप्त होत गेले हें वाचकांस स्पष्ट झालें असेल. श्री. ज्ञानदरूव घोलप यांनीं आम्ही पेशवाईंत फौजेंत लढणारे होतों असें जें म्हटलें आहे ते किती खरें आहे हें या हकीकतीवरून दिसून येतें. डॉ. आंबेडकर यांनीं इंग्लंडच्या राऊंड टेबल कॉन्फरन्समध्यें सांगितलें कीं आम्हीं इंग्रजांना हिंदुस्थान देश जिंकून दिला. हें सांगतांना महाराष्ट्रापुरती तरी त्यांना कोरेगांवच्या लढाईची आठवण होत असावी असें वाटतें. सर्व देशोदेशीच्या प्रतिनिधींना साक्षी ठेवून त्यांनीं ही जी जवानी दिली तीवरून त्यांना काय काय ध्वनित करावयाचें होतें हें कल्पनेनें ओळखतां येण्यासारखें आहे. पण आपण शूर आहों हेंच जर त्यांत त्यांना सुचवावयाचें होतें असें असलें तर कोरेगांवचाच दाखला कशाला हवा होता? हे वर दिले आहेत यांतलाही एकादा उपयोगी पडला असता.

इंग्रजी अंमलांतील खटपटी

यानंतर इंग्रजी संस्कृतीचा प्रसार सुरूं झाला. इंग्रजी संस्कृतीच्या प्रसारानंतर ख्रिस्ती मिशनरी लोकांनीं आपलें धर्मप्रसाराचें काम चालू केलें. तें अर्थातच अस्पृश्य लोकांत लवकर फैलावलें. पूर्वी मुसलमानांच्या असल्या प्रयत्नानें लोकांच्या मनावर काय संस्कार झाला असेल, हें माहीत नाहीं. परंतु मिशनऱ्यांनीं अस्पृश्यांस ख्रिस्ती बनवितांच तो स्पृश्य बनतो, आणि समाजामध्यें उघडपणें वावरूं शकतो, ही धर्मांतराची किमया उभय-

तांसहि चमत्कारिक वाटली असावी. आपण बाटतांच स्पृश्य होतों, ही जाणीव अस्पृश्यांस सुखावह वाटली असावी, आणि हा बाटतांच स्पर्शयोग्य होतो, हें ज्ञान इतरांस चमत्कारिक वाटलें असावें. तें कांहीं असो, परंतु ख्रिस्ती मिशनऱ्यांची ही ख्रिस्तीकरणाची खटपट फार बोधप्रद ठरली असावी. त्यावेळीं या त्यांच्या प्रयत्नांस चांगलेंच यश आलें हें शिरगणतीच्या आंकडयांवरून स्पष्ट दिसून येतें.

पण ख्रिस्ती मिशनरी हे कांहीं महाराष्ट्रीय स्पृश्य नव्हेत. त्यांच्या प्रयत्नांचा उल्लेख, एतद्देशीय प्रयत्नांस तो कसा कारणीभूत झाला, हें दाखविण्यापुरतांच केलेला आहे. ख्रिस्ती मिशनरी जर थोडयाशा संस्कारानें एवढा बदल घडवून आणूं शकतो, तर आपल्यालाच ही किमया कां करतां येऊं नये, अशी कल्पना, ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या स्नेहभावांत आणि कृपाछत्रांत वागत असलेल्या श्री. फुले या गृहस्थांस प्राप्त झाली. वर सांगितलेल्या अवघड वाटेची, म्हणजे धर्मांतराची जरूरी त्यांनीं मुळींच ठेवली नाहीं. अस्पृश्य लोकांना शिक्षण देण्याचें काम त्यांनीं १८४८ सालीं चालू केलें. या त्यांच्या प्रयत्नाला "मोरो विठ्ठल वाळवेकर, सखाराम यशवंत परांजपे, व सदाशिव बल्लाळ गोवंडे" या गृहस्थांची चांगली मदत असे. फुले यांनीं आपल्या घरच्या विहिरीवर पाणी भरण्यास अस्पृश्यांस परवानगी दिली. फुले यांच्या प्रयत्नांसंबंधानें समाजाच्या मनांत विशेष आदरबुद्धि उत्पन्न होणें, निदान त्याकाळीं तरी अशक्य होतें. एकतर ही बाब जनसमूहाला नवीनच होती, आणि दुसरें असें कीं, फुले यांचीं इतर प्रतिपादनें, धोरणें, व आश्रयस्थानें समाजास पटण्यास अयोग्य अशींच होतीं, हें त्यांच्या लिखाणावरून स्पष्ट दिसून येतें. चळवळीचें तत्त्व कोणतें, आणि चळवळीचा पुरस्कर्ता कोण, या दोनहि गोष्टींकडे अज्ञ समजल्या जाणाऱ्या समाजाचें सुद्धां बारीक लक्ष असतें. अर्थात् फुले यांच्या प्रयत्नांकडे फारसें कोणाचें लक्ष गेलें नसल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं. यानंतर एका ब्रह्मचाऱ्याचा उल्लेख करावयास हवा. तो ब्रह्मचारी म्हणजे विष्णुबोवा गोखले हा होय. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या उपदेशाची व प्रयत्नांची उठलेली लाट विरोधी तत्त्वज्ञानाच्या बळावर थोपवून धरणारा हा तेव्हांचा मोठा प्रसिद्ध वावदूक होता. त्याचे ग्रंथहि प्रसिद्ध आहेत. आपण सध्यां सुधारणाविषयक जें जें बोलतों त्या त्या विषयाचें कडकडून, परंतु आत्म-

भावानें, केलेलें प्रतिपादन त्याच्या लिहिण्यांत दिसून येतें. यानंतर प्रार्थना-समाजानें या बावतींत जे प्रयत्न केले ते विशेष महत्त्वाचे असे झाले. या समाजाच्या पुरस्कर्त्यांनीं समानता, वंधुभाव इ० तत्त्वें आपल्या आचरणाचे आधार मानिलीं, व तदनुसार अस्पृश्य लोकांशीं व्यवहार सुरू केला.

ही मंडळी ख्रिस्ती किंवा ख्रिस्त्यांच्या छापेंतील अशी अर्थातच नव्हती. यांच्यांत भांडारकर, रानडे, केळकर अशांसारखे मोठाले पंडित, विचारी व प्रयत्नवादी असे अनेक लोक होते. हे लोक इतर अंगांनींहि आपल्या समाजा-च्या उपयोगी पडणारे असे होते. अर्थात् समाजाला या प्रयत्नांकडे किंचित् कां होईना, पण आपुलकीच्या भावानें पहाणें योग्यच वाटलें. तरी पण त्यांत एक कूस राहिली होती. हे गृहस्थ आपल्यांतीलच होत; हें तर समाजाला माहीतच होतें, पण त्यांनीं जीं धर्ममतें अंगिकारलीं होतीं तीं समाजाला पसंत नव्हतीं. कां कीं, त्यांनींच जाणून बुजून आपला स्वतंत्र सुभा उत्पन्न केला होता. वर सांगितलेंच आहे कीं, चळवळींचें तत्त्व कोणतें, व पुरस्कर्ते कोण इकडे समाजाचें लक्ष असतें. एकादेवेळीं दोनहि पसंत नसतात; एकादेवेळीं तत्त्व पसंत असून पुरस्कर्ता नापसंत असतो अथवा पुरस्कर्ता पसंत असून त्याचीं मतें पसंत नसतात. चळवळ यशाच्या खऱ्या मार्गास लागावयास, समाजाला दोघेंहि पसंत असावे लागतात. प्रार्थनासमाजाचे पुरस्कर्ते अन्य कारणानें समाजाला वंद्य झालेले होते. परंतु धर्मविषयक बाबतींत समाजापासून ते फटकूनच राहात असल्यामुळें त्यांच्या एतद्विषयक प्रयत्नासंबंधानें बहुजन समाज उदासीनच राहिला. तरी पण या प्रश्नाचें पाऊल जोरानें पुढें पडावयास या पुरस्कर्त्यांचा फार उपयोग झाला, आणि म्हणून "हा प्रश्न सोडविलाच पाहिजे" असें मत ज्यांनीं आतां पत्करलें आहे त्यांनीं यांचें ऋणी राहिलें पाहिजे. राष्ट्राचें कल्याण व्हावें म्हणून जी वरात निघालेली असते, तिजपुढें दर कोपऱ्यावर फुटणाऱ्या नारळासारखे हे लोक होत. ते आपापल्या-परी वाया गेल्यासारखे झाले असतील, परंतु भविष्यकालांतील लोकांच्या सुखसाधनांच्या आड येणाऱ्या आपत्ति टाळण्यासाठीं त्यांनीं आत्मदान केलें, ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं.

प्रार्थनासमाजाप्रमाणेंच, पण पूर्वीच्या बंधनापासून अधिक मोकळा झालेला

असा जो ब्रह्मोसमाज, त्याचे महाराष्ट्रांतील पुरस्कर्ते श्री. विठ्ठल रामजी शिंदे यांनीं या बाबतींत केलेले प्रयत्न अनुक्रमवार पुढें येतात. थोड्याफार फरकानें दोनहि समाज एकच आहेत, निदान प्रस्तुत प्रश्नाविषयीं दोघांचें धोरण एकच आहे; व प्रार्थना समाजांतील पुढारी हे संख्येनें व इतर कारणांनीं महाराष्ट्रांतील ब्रह्मो लोकांपेक्षां श्रेष्ठ असले तरी या प्रश्नासंबंधानें जोराची उचल श्री. शिंदे या ब्रह्मसमाजिस्टांनींच केली. निराश्रित साह्यकारी मंडळीची स्थापना करून तिच्या अनेक शाखा त्यांनीं चालू केल्या. त्यांचें मुख्य ठाणें महाराष्ट्रांतच असल्यामुळें त्यांनीं सुरू केलेल्या कामाचा प्रसार अनेक ठिकाणीं झाला. श्री. शिंदे हे स्वतः धर्मविद्येच्या अभ्यासासाठीं विलायतेस जाऊन आलेले; निरनिराळ्या धर्मांचा त्यांनीं तुलनात्मक अभ्यास केलेला; अर्थात् त्या मानानें धर्मासंबंधीं स्वतंत्र कल्पना मनाशीं बागत असल्यामुळें हें काम हिंदुधर्माचें म्हणून न करतां, अस्पृष्ट लोक हे शुद्ध मानवधर्मापासून दूर ठेवण्यांत आलेले आहेत पण आतां त्यांस जवळ केलें पाहिजे या भावनेनें त्यांनीं आपलें काम चालू केलें; अहोरात्र तोच विषय मनाशीं ठेवून त्याचीं सर्व अंगें–उपांगें त्यांनीं बारकाईनें पाहिलीं. महाराष्ट्रांत त्यांनीं पुष्कळ प्रवास केला, व अस्पृष्ट लोकांची परिस्थिति प्रत्यक्ष पाहिली. अनेक ठिकाणीं शाळा स्थापन करून विद्यादानाचें काम चालू केलें, व वेळोवेळीं इतर समाजाच्या धर्मबुद्धीला आवाहन करून या संस्थेला हरतऱ्हेचें साह्य मिळविलें. सध्यां अस्पृष्ट समाजांत जे लोक पुढारी म्हणून कामें करीत आहेत, त्यांपैकीं बहुतेक शिंदे यांच्या संस्थेंतूनच बाहेर पडले आहेत. या त्यांच्या विस्तृत प्रयत्नांत ज्या माणसांचें कित्येक वर्षेपर्यंत त्यांस बरोबरीनें साह्य झालें, त्यांत श्री. सोहनी, श्री. पटवर्धन यांचीं नांवें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत.

सरासरी १९१८–१९ सालापर्यंत या संस्थेचीं धोरणें व कार्यपद्धति हीं सुसंगत राहिलीं होतीं. पुढेंहि काँग्रेसच्या द्वारां वगैरे हा प्रश्न लोकांपुढें मांडण्यासाठीं बरीच खटपट सदर संस्थेनें केली. शिंदे हे ब्रह्मसमाजी असल्यामुळें त्यांच्या प्रतिपादनावर आणि पद्धतीवर त्या समाजाच्या मताची दाट छाया असे. अस्पृश्योद्धाराचा प्रश्न जरी त्यांनीं हातीं घेतलेला असला तरी त्या समाजाचीं समाजसुधारणेचीं व धर्मसुधारणेचीं इतर सर्व मतें ते पुरस्कारीत

असत. अर्थात् जनसमाजाला त्यांच्या या मतांचें पुरें वावडें असल्यामुळें त्यांच्या मुख्य कामगिरीसंबंधानेंहि जनसमाज उदासीन राहात आला. जर इतर सर्व बाबतींत सुधारक हा आपला आहे असें समाजास वाटत असलें तर त्याच्या एकाद्या नव्या मताकडे समाज आदरानें पाहतो व तें कदाचित् पत्करितोहि. परंतु आपल्याशीं याच्या मत:सांप्रदायाचा कोठेंहि लागावांधा नाहीं असें जर दिसत असलें, तर समाज 'यूयं यूयं, वयं वयं' या न्यायानेंच वागत राहतो, असो.

सामाजिक सुधारणेच्या सर्वसामान्य दलदलींतच याही प्रश्नाचे पाय गुंतविले गेल्यामुळें त्याची प्रगति लवकर होईना. कै. रानडे हे प्रार्थना-समाजिस्ट नसते व शिंदे हे ब्रह्मसमाजिस्ट नसते तर हिंदु समाजाची सुधारणा यांच्या हातून फार त्वरेनें झाली असती. वरें, गूढ धर्मबुद्धि ही त्यांना बाहेरूनच आणावयास हवी होती असेंही मुळींच नाहीं. आपल्याच भक्तिमार्ग-संप्रदायांत या बुद्धीची पूर्ण वाढ झालेली होती. तिचाच अंगीकार करून स्वतंत्र सुभा न करतां समाजाच्या पोटीं राहूनच समाजसुधारणा करण्याचें काम या उभयतांनीं केलें असतें तर कामांत सुकरता आणि सुधारणेंत गति उत्पन्न झाली असती. पण तें व्हावयाचें नव्हतें. साहजिकच हिंदु समाज त्यांच्यापासून दूर राहिला. तें कसेंहि झालें असलें तरी समाजापासून आपण होऊन दूर राहण्याची आपत्ति रा. शिंदे यांनीं आपण होऊन पत्करिली व तेव्हांच्या मानानें पाहतां सरकारदरबारीं मोठें पदवीचें स्थान सहज मिळवितां येण्यासारखें असतां, तिकडे पाठ फिरवून आपद्ग्रस्त लोकांच्या उद्धारासाठीं त्यांनीं जी अहर्निश खटपट केली ती आधुनिक कालांतील सुधारणाविषयक परिश्रमांच्या इतिहासांत प्रमुख जागीं आणि ठळकपणानें शोभण्यासारखी अशी आहे, यांत कांहींएक शंका नाहीं.

शिंदे यांच्या प्रयत्नावरोबरच इतरत्र जें कांहीं कल्पनाप्रसाराच्या रूपानें किंवा प्रत्यक्ष आचाराच्या रूपानें घडून येत होतें त्याचाहि उल्लेख व्हावयास पाहिजे. श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं वाचेनें व आर्थिक मदतीनें या प्रश्नाचा जोरानें पुरस्कार केला व या त्यांच्या पुरस्काराचें फळ म्हणजे अस्पृष्ट समाजाला आपल्या जातीचे शूर पुढारी लाभले हें होय. कै. छत्रपती शाहू

महाराज यांचीहि या बाबतींतील मेहनत व उडी केवळ प्रशंसनीय आहे. ब्राह्मणांचें धार्मिक वर्चस्व मोडून पाडण्याचा महाराजांचा जो मूळ हेतु, त्यास पुढें कशींहि रूपें प्राप्त झालीं असोत, पण त्या हेतूच्या व्यापकपणांत त्यांनीं अस्पृश्यांचा प्रश्न सामावून घेतला होता. आपल्या अधिकाराचा, संपत्तीचा, आणि नैसर्गिक पुढारीपणाचा जितका देतां येईल तितका लाभ त्यांनीं अस्पृष्ट समाजास प्राप्त करून दिला. त्यांजबरोबर चहापान करणें, स्वत:च्या बावडीवर त्यांस पाणी भरूं देणें व त्यांचीं स्वतंत्र बोर्डिगें उभारून चळवळीस द्रव्यसाहाय्य करणें, प्रतिष्ठित धंद्यांमध्यें त्यांचा मुद्दाम प्रवेश करून देणें, अशा-सारख्या अनेक गोष्टी त्यांनीं अस्पृश्य समाजासाठीं केल्या. त्यांच्या प्रयत्नांचें मुख्य ठिकाण जरी त्यांचें संस्थानच असलें तरी बाहेर अनेक ठिकाणीं त्यांच्या औदार्याचा हात पोंचतच होता. असो.

भोपटकर बंधू यांच्या भालापत्राचाहि उल्लेख याच सुमारास करावयास पाहिजे. महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षांत ज्या वेळीं या प्रश्नासंबंधानें कोणी कांहींच बोलत नव्हतें, किंवा बोललें तर सविस्तर आणि कडकडून बोलत नव्हते, त्या वेळीं श्री. भास्कर बलवंत व लक्ष्मण बलवंत या भोपटकर बंधूंनीं या प्रश्नाला आपल्या पत्रांत फार महत्त्वाचें स्थान देऊन नाखूष वाचकांना सुद्धां त्याची चर्चा वाचावयास भाग पाडिलें. पण याहीपेक्षां मत्सरी, गैर-समज माजवून देण्यास टपलेले, राजकारणांत फिके पडलेले, मर्दुमकीनें नव्हे तर गैरसमजाच्या बळावर बहुजनसमाज आपल्यामागें ओढावयास पाहणारे, टिळक हे लोकछंदानुवर्ती असून समाजसुधारणेला विरोध करणारे आहेत या माळेचे मणी सारखे ओढत बसलेले, अशा लोकांचा भोंवतालीं गराडा पडलेला असतांना आणि सरकारी अवकृपेचे लांडगे गाडी चोहोंकडून ओढावयास पाहात असतांना लो. टिळक यांनीं १९०७–०८ सालापासून तों शेवटपर्यंत शेलके प्रसंग साधून या विषयाच्या संबंधानें जीं सूत्रमय वाक्यें बोलून टाकिलीं, त्यांचा विचार करणें त्यांच्या अफाट अनुयायी वर्गास भागच पडलें. पुरुष-सुक्ताचा उल्लेख करून त्यांनीं बेधडक सांगितलें कीं, "पायाचा विटाळ जर शरीराला होत नाहीं, तर परमेश्वराच्या अफाट शरीराचा अवयव असलेले अस्पृष्ट लोक हे त्याच्या इतर देहास विटाळ करूं शकत नाहींत!"

गणपतीच्या मिरवणुकीच्या वेळीं चांभाराचा गणपति त्यांनीं आपल्या स्वतःच्या गणपतीच्या गाडींत बसवून घेतलेला होता हें सर्वांनीं पाहिलें होतें. अस्पृष्टांना देवालयप्रवेश मिळाला पाहिजे या आपल्या मताचा उपयोग 'प्रोपॅगँडा' (मतप्रसार) साठीं करावयास त्यांनीं मला सदर परवानगी दिली होती. त्यांच्या मानपत्राला अपशकून करण्याच्या बुद्धीनें जे जेवणाविषयीं बोलले त्यांना त्यांनीं बजावलें कीं, "राष्ट्रकार्यासाठीं जेवणाची जरूरी आहे असें सिद्ध झालें तर जेवीनहि", पण त्यांचें एक वाक्य मात्र सर्वांवर निकालाचें म्हणून नमूद करावयास पाहिजे. ते म्हणाले, "प्रत्यक्ष परमेश्वरानें जर अस्पृश्यता मानिली पाहिजे असें सांगितलें तर मी त्या परमेश्वरास अस्पृश्य मानीन"! हीं वचनें अनुयायीशून्य फटिंगाचीं, किंवा अनभ्यस्त प्रतिपादकाचीं नव्हत. सर्व हयातभर संकटें सोसून लक्षावधि अनुयायी ज्यानें मिळविले, आणि म्हणून ते जपून धरावयास पाहिजेत अशी चिंता ज्यास पडावयास हवी, अशा व सर्व शास्त्रांचा देशकालपरत्वें अभ्यास करणाऱ्या पुढाऱ्याचीं हीं वचनें आहेत. हेंच त्यांच्या सडेतोड उद्गारांचें खरें महत्त्व आहे. सर्वथा वंद्य अशा आपल्या पुढाऱ्यांचें हें प्रतिपादन लोकांच्या मनांत चरचरत उतरलें असलें पाहिजे! म. गांधींच्या निस्सीम प्रयत्नांविषयींचा विचार पुढें आहे.

आमच्या अस्पृश्यतानिवारक मंडळाची हकीकत शेवटीं सविस्तरपणें दिलीच आहे. त्याशिवाय त्या कामांत पुढील मंडळींचा नामनिर्देश करावयास हवाः—सद्गुरु परांजपे, रा. बर्वे वकील, धुळें; नागपूरचे रा. बर्वे, वऱ्हाडांतील रा. एकबोटे, पुण्याचे ज्ञानप्रकाशचे दुय्यम संपादक कै. हिंगणेकर, पं. महादेवशास्त्री दिवेकर, रा. करकरे, चित्रावशास्त्री, रा. शंकरराव दाते, हिंदुधर्ममठाचे चालक रा. दाणी, श्री. कोठारे, देशभक्त कौजलगी व जावडेकर, मुंबईचे रा. शेटे, रत्नागिरीचे बॅ. सावरकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नगरचा मेहेरबाबाचा आश्रम, पुण्याची सेवासदन सोसायटी, ठिकठिकाणचीं युवकमंडळें, रा. भावे, सातारचे सुप्रसिद्ध भाऊराव पाटील, नाशकाचे प्रो. सबनीस व प्रो. ओतूरकर, भोरसंस्थानांतील रा. लिमये, इत्यादि व्यक्तींचे व मंडळींचे नानाप्रकारचे यत्न या बाबतींत चाललेले आहेत. कोणीं मेळे काढले आहेत, कोणी देऊळ खोललें आहे, कोणी प्रतिपादन चालविलें आहे, कोणी

वोर्डिगें काढलीं आहेत, कोणीं शिक्षणाची सोय केली आहे, कोणीं बंड करावयास शिकविलें आहे, कोणीं परमार्थाच्या आश्रयानें विटाळ घालवूं पाहिला आहे, कोणीं शास्त्राची प्रतिकूलता घालविण्याचा प्रयत्न केला आहे, कोणीं हिंदुसभेच्या कामांपैकींच हें एक आहे हें ओळखून या विषयाला मोठें स्थान दिलें आहे, कोणीं याच्याच अनुषंगानें, रोटीबेटीव्यवहारापर्यंत मजल न्यावयास हरकत नाहीं असें ठरविलें आहे. एतावता ज्याला जें करतां येण्यासारखें आहे तें करण्याचा उपक्रम सर्वांनीं आपापल्या परीनें चालविला आहे. हें स्पृश्यांतील सुधारकांविषयीं झालें.

खुद्द अस्पृष्ट समाजांतूनही अनेक सुधारक पुढें आलेले आहेत. विद्या, प्रवास, बुद्धि, राजदरबारचा मान इत्यादींनीं अलंकृत झालेले डॉ. आंबेडकर हे या सर्वांत श्रेष्ठ आहेत. अस्पृश्य जातींतील बाकीचे पुढारी त्यांच्या मानानें अर्थात् एकदमच वरेच खालचे आहेत; पण त्यांच्या मानानें खालीं असले तरी सार्वजनिक हितबुद्धि, कळकळ या गुणांनीं त्यांपैकीं पुष्कळ लोक आपापल्या समाजाच्या उत्कर्षाला व त्याच्या हितसंवर्धनाला हात लावीत आहेत. सुभेदार घाटगे, रा. धाकोजीराव गायकवाड, रा. रणपिसे, रा. वाघमारे, रा. काळे, रा. ज्ञानध्रुव घोलप, रा. निकाळजे, डॉ. सोळंकी, डेप्युटी कलेक्टर रा. जाधव, रा. गवई, रा. बंदसोडे, रा. कदम, रा. थोरात, रा. भिलारे, रा. बाळू, रा. राजभोज, रा. गाडेकर, रा. कदम, रा. ढोर मास्तर, रा. खडतरे, रा. राऊत मास्तर, श्रीमती सावित्रीबाई बोराडे, सौ. गुणाबाई गाडेकर, रा. अवघडे, रा. बाबूराव वायदंडे, रा. के. के. सकट, रा. शिवदास, रा. आयदाळे, रा. तोरणे, रा. गायकवाड अशा प्रकारचे तीनही जातींतील, सर्वोत्कृष्ट सुशिक्षितांपासून तों अल्पशिक्षितांपर्यंत सर्व लोक या कामामध्यें आपापल्या शक्तीप्रमाणें कार्यभाग उचलत आहेत.

ही सामाजिक सुधारणा असल्यामुळें तिची गति फार मंद आहे. तथापि एकदम चोहोंकडून उठावणी होत असल्यामुळें गव्हर्नरसाहेबांचे माजी सेक्रेटरी जे मि. टर्नर यांच्या जवानीप्रमाणें सुद्धां पाहतां, अस्पृश्यांच्या स्थितींत निदान अस्पृश्यतानिवारणापुरता तरी पुष्कळ फरक पडत चालला आहे यांत कांहींच शंका नाहीं. व्हावयास हवें आहे

त्याच्या मानानें हें थोडें आहे म्हणून, कोठें निराशा व असंतोष यांतच लज्जत वाटते म्हणून, व कोठें चळवळींतील घावडाव म्हणून, 'कांहींच होत नाहीं' असें म्हणण्याचा परिपाठ आहे. पण त्यांत फारसा मतलब नाहीं. महाराष्ट्राच्या वाहेरची इतकीशी माहिती नाहीं पण जें कांहीं वाचावयास सांपडतें त्यावरून असें दिसतें कीं, अखिल भारतांत या प्रश्नाच्या सोडवणुकीला मोठी जोराची उठावणी मिळत आहे. एका अंगाला सरकार व दुसऱ्या अंगाला महात्माजींची कॉंग्रेस हीं दोघेही या कामांत सारखींच गुंतल्यासारखीं दिसत आहेत; व या दोन संस्थांमधील, तिच्या तिच्या सर्व आश्रितसंस्था थोडाफार हातभार लावीत आहेत. वर्णाश्रम-धर्म-स्वराज्य-संघ हा जरी, आपण याच्या विरुद्ध आहों असें म्हणत असला तरी लौकिक व्यवहारांत तरी अस्पृश्य लोकांना सवलती मिळाल्याच पाहिजेत असें म्हटल्यावांचून त्यालासुद्धां गति उरलेली नाहीं. सारांश चालू काळांतील सर्व प्रकारच्या मतवाहिन्या अस्पृश्य लोकांना अनुकूल अशा तऱ्हेनेंच वाहात आहेत यांत कांहींच शंका नाहीं. पण वरची मोजदाद जरी जमेस धरली तरी म. गांधीच्या अद्भुत प्रयत्नांची सर कोणासही येणार नाहीं. जमलें तर कांग्रेसमधून, नाहीं तर स्वतंत्रपणें त्यांनीं या विषयाचा जो पुरस्कार केला आहे व चालविला आहे त्यामुळें या हिंदुधर्माचे पांग पुरते फिटणार असें स्पष्ट दिसू लागलें आहे. महात्माजींची कीर्ति अजरामर होणार आहे आणि याचीं जीं दोन कारणें त्यांत अस्पृश्यता-निवारण हें अत्यंत प्रवल कारण टरणार आहे.

नवें युगमान

अस्पृश्यता–निवारणाचे जे यत्न सुरू झाले त्यांच्या बुडाशीं भूतदया, अथवा मनुष्यमात्रावद्दलची दया हीच होती. अजूनहि या वृत्तीला वश होऊनच, बहुतेक सुधारक वर्ग या बाबतींत उद्योग करीत आहे. आतां भूतदयेची किंमत मोठीच आहे हें कोणीहि कबूल करील. किंबहुना भूतदया हीच सर्व सुधारणांची आद्य जननी होय असें म्हटल्यासहि त्यांत कांहीं बावगें होणार नाहीं. पण पुष्कळदां असें होतें कीं, केवळ भावना ही कितीहि शुद्ध व उदात्त असली तरी, बुद्धिनिर्णयाशीं ती विसंवादी असते. आपद्ग्रस्त अशा एकाहि माणसाकडे जरी पाहिलें तरी आपलें दयालुत्व जागें होतें आणि त्याच्या दुःखाच्या परिहारासाठीं जागचे उठून कांहीं करावेंसें वाटतें. एकाच्या ऐवजीं दहा आपद्ग्रस्त पाहिलें तरी दयालुत्वाचें चलनवलन तेंच असतें पण दुःख-परिहाराविषयींचे आपलें प्रयत्न मात्र दसपट वाढविले पाहिजेत असें आपण म्हणतों. पण एका आपद्ग्रस्ताला पाहून बुद्धीला कांहींच निर्णय देतां येत नाहीं. शेकडों सारखीं सारखीं उदाहरणें जेव्हां तपासावींत तेव्हां सामान्य सिद्धांताच्या रूपाचें असें आपणांस बोलतां येतें. व याच्या मदतीला जर प्रखर भावना असली तर प्रयत्नांचें रूप अधिक व्यापक व निःशंक असें बनतें. म्हणून भावना ही कितीहि जरी खरी असली तरी तिला वश होऊन सुधारकानें केलेले आचार दरवेळेस बरोबरच असतील असें निश्चयानें म्हणवत नाहीं. दारीं आलेल्या भिकाऱ्याला, तो प्रत्यक्ष भुकेलेलाच म्हणून अन्न घालावेंसें वाटणें हें स्वाभाविक असतें. पण देशांतल्या आर्थिक स्थितीचा व नियमनांचा विचार करितां हें दातृत्व दरवेळीं बरोबरच असेल असें निश्चयानें म्हणवत नाहीं म्हणून तर दानधर्माच्या पद्धतीविषयीं व भिकाऱ्यांच्या दगलबाज स्वरूपाविषयीं समाजांत कित्येक वेळां चर्चा चालूं होते. भिकारी हा काम करावयास कबूल आहे पण त्याला काम मात्र मिळत नाहीं म्हणून भीक मागावी लागत आहे असें दिसलें म्हणजे भावनेच्याहि पलीकडे आणखी एक बौद्धिक परगणा सुरूं होतो व मग मनांत असें येतें कीं, जोंपर्यंत अशा प्रकारची समाज-घटना आपणास रचतां येत नाहीं कीं जिच्या पोटांत काम करावयास तयार असलेल्या प्रत्येक माणसाला खावयास मिळालेंच पाहिजे, तोंपर्यंत ज्याच्यापाशीं

स्वत:ची गरज भागवून थोडें तरी वर उरतें, त्यानें अशा या भिकाऱ्यास भिक्षा घातलीच पाहिजे. अशासारखा कांहीं बौद्धिक विचार मनांत आला तर भावना व बुद्धि यांच्या मिलाफानें आपण कांहीं एक करावयास प्रवृत्त होत आहों या विचारानें माणसास बळकटी वाटते. विधवा स्त्रीचें दु:ख पाहिलें म्हणजे माणसाला वाईट वाटतें व तिची इच्छा असेल तर तिला संसारांत परत जावयास सुधारक हा भावनावश होऊन मदत करतो. पण याहीपेक्षां जर त्याला असें कळलें कीं ज्या जातींत हा पुनर्विवाह आपण घडवून आणीत आहों त्या जातींत लग्नाच्या वयांच्या पुरुषांची संख्या ही लग्नाच्या वयाच्या स्त्रियांच्या संख्येपेक्षां पुष्कळच मोठी आहे तर, समाजांतील ही चलबिचल नाहींशी करण्यालाच आपण मदत करीत आहों या बौद्धिक विचारानें आपल्या मूळ भावनेचा व्यापार शुद्ध व सुयुक्त आहे हें पाहून सुधारक आपलें काम नि:शंकपणें करतो. एकाद्या प्रांतांत स्त्रियांची अब्रू घेण्याचे गुन्हे जर जास्त होत असतील तर सामान्य माणसाला सुद्धां अतिशय चीड येईल व गुन्हेगारांचें पारिपत्य केलेंच पाहिजे असा आग्रह तो धरील. आतां ज्या लोकांत किंवा प्रांतांत हे गुन्हे घडतात तेथें स्त्रियांची लोकसंख्याच मुळीं पुरुषांच्या लोकसंख्येपेक्षां हजारीं चारशांनीं कमी आहे असें त्यास कळलें तर कायद्याप्रमाणें सर्व कांहीं व्हावें व म्हणून गुन्हेगारास शिक्षा व्हावी हें सूत्र कायम ठेवूनसुद्धां अपराध्यासंबंधींची त्याची चीड पहिल्या इतकीच प्रखर राहणार नाहीं; तसेंच त्याला जर असें कळलें कीं स्त्री–पुरुषांची संख्या सारखीच आहे, पण बहुपत्नीत्वाच्या दुष्ट चालीमुळें प्रत्येक साधारण श्रीमंत मनुष्यहि दोन दोन, तीन तीन, स्त्रिया करतों, तर अपराध्यांबद्दलची त्याची चीड थोडी कमी होईल व हे जे पैशाच्या बळावर अनेक बायका करणारे लोक त्यांच्यावर त्याचा राग कोसळेल. तसेंच जर कां त्याला कळलें कीं स्त्री–पुरुषांची संख्या सारखीच आहे, बहुपत्नित्व नाहीं, सक्तीचें वैधव्य नाहीं, ज्यांनीं गुन्हे केले तेहि विवाहितच आहेत, तर त्याची चीड दसपट वाढते व या अपराध्यांना शिक्षा करवून घेण्याच्या कामीं तो अधिक जोरानें व नि:शंकपणें काम करतो, असो. सांगण्याचा मतलब असा कीं भावनेचें जें मूळचें स्फुरण असतें त्याच्या मदतीला बौद्धिक अवलोकनहि प्राप्त झालें तर कांहीं करूं इच्छिणाऱ्या माणसाच्या मनाला काम करतांना कांहीं खंबीरपणा प्राप्त होतो. प्रत्यक्ष अन्याय करतांना सुद्धां, तो करणारा

जर बुद्धिमान असेल तर तो अन्याय थोडा तरी न्याय्य ठरवील असे कांहीं तरी बौद्धिक कारण त्याच्या मनःकोशांत गुप्त असतें. ठरलेला तहनामा मोडून वेल्जमसारख्या दुबळ्या राष्ट्रांतून चाल करावयास आपल्या फौजेला हुकूम देतांना जर्मन सेनापतींना आपण अन्याय करीत आहों हें दिसत नव्हतें असें मुळींच नाहीं. पण त्यांनीं भर सभेंत सांगितलें कीं, जर्मन राष्ट्राला जर जगावयाचें असेल तर तहनामा मोडलाच पाहिजे, व दुबळ्या राष्ट्रांवरहि जबरदस्ती केली पाहिजे. हें केलें नाहीं तर जर्मन राष्ट्र खास मरणार. या एका न्याय्य जाणिवेनें जर्मन सेनापति अन्यायास प्रवृत्त झाले. प्रत्यक्ष अन्याय करतांना सुद्धां बुद्धीचा उचित असा आश्रय केल्यानें अन्यायबुद्धीचा सुद्धां जर कांहींसा उपशम होतो तर सद्भावनेच्या स्फुरणाला तिचा आश्रय मिळाला तर ते अधिक सोज्वल असें दिसूं लागेल यांत कांहींच शंका नाहीं. अस्पृश्यता निवारणाच्या बाबतींत हेंच व्हावयास पाहिजे आहे. अस्पृष्ट समाजाचे हाल पाहून ज्यांचें मन दुःखित होत नाहीं असा मनुष्य विरळा. खातेऱ्यांतच जन्मास यावें, खातेऱ्यांतच जगावें, आणि शेवटीं खातेऱ्यांतच मरावें अशी ही घोर आपत्ति आहे आणि म्हणून ज्याच्या अंगीं मनुष्यमात्राला सहज अशी जी दयाबुद्धि ही जर थोडी तरी असेल तरि तो या अस्पृश्यता-निवारणाच्या कामीं प्रत्यक्ष खटपट करील, सहानुभूति दाखवील किंवा निदान विरोध करणार नाहीं. पण हें जें भावनेचें चलनवलन तें शुद्ध व सुयुक्त आहे असें कांहीं विशेष प्रकारच्या बुद्धिवादानें सिद्ध झाल्यास हें निवारणाचें काम करणाराला जरा जास्त बळ देणारें व विरोधी समाजाला कमकुवत करणारें असें तें ठरेल यांत कांहींच शंका नाहीं.

माणसाच्या जातीची भ्रमंती केव्हां सुरूं झाली हें जरी निश्चयानें सांगतां आलें नाहीं तरी ती कां सुरूं झाली हें मात्र सांगतां येतें. जगणें हाच अगदीं मूळचा व गूढस्थ असा मनुष्याचा स्वभाव- धर्म आहे. या धर्मास अनुसरून जिकडे जाणें जरूर पडेल तिकडे माणसें जात आलीं आहेत. बुद्धीची मशागत कांहींच झालेली नसल्यामुळें बसल्या ठिकाणींच निर्वाहाचीं साधनें कशीं उत्पन्न करतां येतात व वैभव सुद्धां संपादितां येतें हा आधुनिक कालांत सिद्ध झालेला न्याय माणसाला तेव्हां माहीत झालेला नव्हता. अगदीं उत्तान दिसणारे व भोग्य असे पदार्थ जिकडे दिसतील तिकडे जावें येवढेंच

त्याला माहीत होतें. पशुपक्ष्यांना या बावतींत जें ज्ञान होतें तेंच ज्ञान केवळ माणसालाहि होतें. ज्या अरण्यांतील फळें संपतील त्या अरण्यांतून दुसऱ्या अरण्यांत उड्डाण करीत जावें येवढेंच वानरांना माहीत असतें. निरनिराळ्या ऋतुमानांत फुलें धरणारीं झाडें एके ठिकाणीं लावून तेथेंच सुखानें रहावें आणि उड्डाणांचें श्रम विनाकारण करूं नयेत हें वानरांना अजूनहि कळलेलें नाहीं. जिकडे हिरवळ दिसेल तिकडे कळप न्यावे, मग पायपिटी कितीहि करावी लागली तरी हरकत नाहीं येवढेंच मेंढपाळांना कळलेलें आहे. मानवी प्रयत्नानें आपण जेथें असूं तेथें सर्व भाग्यें उभीं करतां येतात हें ओळखावयास मनुष्य योनीनें कित्येक हजार वर्षे खाल्लीं. अशा या बाल्य अवस्थेंत माणसांच्या मोठमोठाल्या टोळ्या सारखें भ्रमण करीत असत. कांहीं ठिकाणीं तर कित्येक वर्षेपर्यंत सुद्धां त्या मुक्काम करीत पण अधिक मुवलक किंवा अधिक रुचकर अशा भोग्य वस्तु अमुक दुसऱ्या ठिकाणीं आहेत असें कळलें तर, त्या जलदीनें देशांतर करीत. हें किती हजार वर्षें चालूं होतें हें सांगवत नाहीं. पण कित्येक हजार वर्षांनीं नद्यांचे कांठ मोठे सुपीक असतात हा फारच मोठा शोध त्यांनीं लाविला. व ज्यांना शरीरबल आणि मनोवल यांनीं शक्य झालें ते नद्यांचीं तीरें बळकट धरून बसले. जे अजूनहि वणवणच करीत होते म्हणजे एका वनांतून दुसऱ्या वनांत जात होते, ते, साधलें तर, ह्या स्थायिक झालेल्यांना हुसकून लावीत व आपण त्यांची जागा घेत. पण नद्यांचे सपाट कांठ आपल्या हातीं ठेवण्याचें कसब ज्यांना साधलें त्यांनीं मात्र खबरदारी घेतली. म्हणूनच अत्यंत जुन्या काळच्या सर्व संस्कृति ह्या मोठाल्या नद्यांच्या तीरावर उत्पन्न झालेल्या दिसतात. गंगा, यमुना, सिंधु, टायग्रीस, युफ्रेतीस, नाईल, डयान्यूब, ओहिहो, या नद्यांच्या कांठीं मोठालीं साम्राज्यें उत्पन्न झालीं व संस्कृति निर्माण झाल्या. ज्या भूप्रदेशाचा एवढा गुण ते आपल्याच ताब्यांत रहावें असें त्या त्या लोकांस वाटावें हें स्वाभाविक होतें. जे मानववंश तेथें राहिले ते अधिक जुटीचे झाले व ती भूमि आपली असें मानूं लागले. पण एकेका भूमीचा कबजा जरी त्यांनीं घेतला तरी वांशिक कल्पना मात्र अत्यंत बलवत्तर होत्या. एका वंशखंडानें येऊन दुसऱ्यास हांकून द्यावें व मग तिसऱ्याच खंडानें येऊन याला हांकून द्यावें असें कित्येक हजार वर्षें चालूं होतें. आपण अमुक लोक म्हणजे एक, ही भावना अत्यंत प्रखर व म्हणून बलिष्ठहि होती. या लडथडींत कित्येक भू-

प्रदेशांत सुदैवानें असें झालें कीं एकच वंशखंड हा कांहीं विशेष मर्यादांनीं अंकित केलेल्या भूप्रदेशांत येऊन रहावा, तेथेंच वाढावा, व तो सर्व भूप्रदेश त्याच प्रजांनीं भरून जावा. पण दुसऱ्या कित्येक ठिकाणीं दुर्दैवानें असें झालें कीं अनेक वंशखंड जमा व्हावे त्यांनीं एकमेकांस उध्वस्त करूं पहावें, एकदां हे एकदां ते असें यशस्वी किंवा अपेशी व्हावे व हें चालूं असतांनाच त्यांच्या प्रजांनीं ते सर्व देश भरून जावें. अशी कांहीं एक प्रकारची स्थिरस्थावर झाली व मनुष्यजातीच्या मोठमोठ्या टोळ्यांचीं पृथ्वीवरील भ्रमणें बंद पडलीं. त्या त्या देशांत राजसत्ता स्थापन झाल्या; स्थायिकपणा आल्यामुळें गरजा वाढल्या; कलाकौशल्यें हींही वाढलीं; व्यापार व उदीम यांनीं बळ धरलें; व अशा रीतीनें सर्व तऱ्हेचा उपरेपणा नष्ट होऊन त्या त्या भूमीशीं ते ते लोक कायमचे निगडित होऊन गेले. हें झाल्यावर मग जर कोणी या देशांतून त्या देशांत जाऊं म्हटलें तर त्या देशांतील लोकांस तें खपेनासें झालें. म्हणजे असें कीं हळूंहळूं भूप्रदेशाची लोकवार वाटणी होऊन बसली. पण यांत एक वैगुण्य राहिलें. ज्या भूप्रदेशांत एकच वंशखंड राहिला त्यांना हें राष्ट्रवर्धनाचें काम सोपें गेलें. पण जेथें अनेक वंशखंड जमा झाले त्यांना तें काम लवकर साधलें नाहीं व अजूनहि साधत नाहीं. अशा या उत्तरोक्त देशांतच आमचें हिंदुस्थान मोडतें. अशा सारख्या देशांत तुम्ही आम्ही परस्परांचे कोण हेंच मुळांत ठरलें नाहीं व त्यामुळें घरचें जें वतन असेल त्याचा भोगवटा कसा करावयाचा हा वाद चालूं राहिला व या वादाखालीं मुख्य जें राष्ट्रसंवर्धनाचें काम तें तसेंच पडून राहिलें. जेथें सर्व प्रदेशभर एकच लोक होते तेथें राजसत्ता प्रबल झाली व त्यांच्या अंमलाखालीं जसे राजे असतील तशा प्रजा सुखी किंवा दुःखी झाल्या.

इतिहासावरून असें दिसून येईल कीं सत्ता, ऐश्वर्य, वैभव इत्यादींचे पुंज बनून राहिले व त्यांचे उपभोक्ते म्हणजे राजा नांवाच्या कांहीं व्यक्तिच होत्या. यांचा उपभोग निर्वेध व मनमुराद घेतां यावा म्हणून आपल्या सारखेच चार जण राजा आपल्याभोंवतीं गोळा करीत असे. हे न मिळत तर अनेक बायका करून तितकीं कुळें कृत्रिमानें वर चढवीं व पुढें त्यांत खानदानी आपोआपच येई. ज्या दिवशीं स्वतःच्या वैभवाच्या दीप्तीसाठीं व सोयीसाठीं त्यानें ही

प्रभावळ उत्पन्न केली त्या दिवशींच वर सांगितलेली सत्ता व वैभवें हीं सूक्ष्मरूपानें कां होईना, पण न कळत आपणच विभागण्याचा उपक्रम राजानें सुरू केला. ज्यांनीं या प्रभावळींत कांहीं पिढ्या घालविल्या त्यांना कालमानानें राजाला आपली किती जरूरी आहे हें कळूं लागलें व आपल्याशिवाय जर राजाचें चालत नाहीं तर राजवैभवाच्या उपभोगांत तरी कां फरक रहावा ? असा प्रश्न त्यांनीं मनाशीं सहजच केला. अर्थात् वर सांगितलेलें वैभवाच्या विभागणीचें मूळ वळ करूं लागलें. त्यांची ही आकांक्षा राजाच्या लक्षांत आली तरी त्याचा नाइलाज झाला असावा. कारण त्यानें आपण होऊन त्यांना बलिष्ठ होऊं दिलें होतें. उमरावांना आपल्यासाठीं सत्ता हवी होती, व राजाला उरलीसुरली टिकावी म्हणून त्यांना होय म्हणणें भाग होतें. पण जें उभयपक्षीं सोयीसाठींच होतें तें सरदारांनीं "एकतंत्री सत्ता मोडण्याचे आमचे प्रयत्न" असें म्हणून गौरविलें व राजांनीं "पहा आमचें औदार्य" असें म्हणून आपलीच वहावा केली. पण हें विभागणीचें मूळ आणखी खोलांत जाऊं लागलें. शरीरानें भला आडदांड, दोन बकरीं बसल्या बैठकीला खाणारा, हातानें चारी पाय धरून बैलाला 'परुस' करून खालीं आपटणारा आणि म्हणून भोंवतालच्या सगळ्या उपभोग्य वस्तू मनमुराद चावणारा एकच माणूस होता. त्याच्या ऐवजीं आतां ठिकठिकाणीं तसे अनेक झाले. पण ते अनेक झाल्यानें सगळ्यांचा मिळून उपद्रव सुरू झाला असला तरी ते एकमेकांचे दुष्मन् बनून राहिले. प्रत्येकानें आपल्या भोंवतीं असलींच कोंडाळीं उत्पन्न केलीं व खालावलेल्या राजाला तोंडदेखला रामराम करून आपल्या खालच्यावर खुशाल राजेपण चालविलें. वरून जी प्रणाली म्हणजे पन्हळ खालीं आली तिचेंच पाणी खालच्या थरांत मुरूं लागलें. सत्ता, वैभवें, सुखें यांचें असें शकल पडतां पडतां देशांत पिकणाऱ्या सुखांची, वैभवाची व सत्तेची वांटणी किमानपक्ष अमूक एका प्रमाणांत तरी सर्वांस सारखी व्हावी असें ठरून गेलें. कोरभर भाकरी, पाण्याचें गाडगें, घोंगडीचें पटकूर, कमरेची लंगोटी, डोईला चिंधी, डाव्या हातांत खुळखुळ्याची काठी, मानेंत लवचिकपणा, उजव्या हातांत मुजरा आणि तोंडांत "व्हय दादा !" एवढाच सरंजाम 'माणुसकी'स पुरेनासा झाला. युरोपखंडांत ही विभागणी सपाट्यानें चालत राहून आज हमालवाडयाचा नाईक बडया खानदानीच्या उमरावाशीं बिडी पीत बसतो,

त्याच्या सहीशेजारीं आपली सही करतो; आणि मुख्य प्रधानहि होतो. व "राजेसाहेब ! असें केलेंत तर राजमुकुट लोकक्षोभाच्या भट्टींत वितळवून टाकूं," असें बेदरद बोलतो व बोलण्यावद्दल शाबासकीही मिळवितो !

माणुसकीची किमान किंमत खात्रीनें बदलली असा याचा अर्थ होय. देवानें दिलेली बुद्धि आणि मनःसामर्थ्यें यांचा विकास करवेल तितका होऊं द्यावा व त्यांच्या वळावर इहलोकींचा संसार करवेल तितका सुखाचा होऊं द्यावा असें जो तो म्हणतो. "तूं आपल्यासाठीं कांहीं राखून ठेवूं नकोस व तें राखून ठेवणें सोज्ज्वल दिसावें म्हणून त्याला भूल घालणारीं नांवेंही देऊं नकोस ! सगळी पोळ्यांची चळत पुढें ठेव; तुझ्या माझ्या कर्तबगारीच्या गुणांत फरक पडला तर तितकें तूं जास्त घे, पण मी चांगला जोगवावा, इतकें निदान पक्षीं मला पाहिजेच" असें म्हणण्याचा रोख सर्वत्र सुरू आहे. "चढा-ओढींत मी मागें पडलों तर विशेष प्रकारचीं सुखें मला मिळूं शकणार नाहींत, पण सुखें व वैभवें हीं मिळविण्याची संधि मला पाहिजे व माझ्यांत नाहींत तीं सामर्थ्यें माझ्या मुलाबाळांत उत्पन्न करण्याचें साधन मला उपलब्ध असलेंच पाहिजे." असा हा रोकडा प्रश्न आहे. म्हणजे काय कीं, मनुष्यत्व ज्या काठीनें मोजावयाचें तिची उंची जास्त झाली. वर लिहिलेल्या गोष्टी ज्याला मिळत नाहींत तो, मोजीन म्हटलें तरी या काठींत सांपडतच नाहीं. असें वाटतें कीं, ही माणुसकीची किंमत वाढल्याची बाब बिंबावी तितकी आमच्या मनांत अजून बिंबली नाहीं. म्हणून आम्ही दुसऱ्याचे दास राहिलों आहोंत व दुसऱ्यास दास्यांतून काढावयास विन्मुख आहोंत. असो. तो असें बोलू लागला तर त्याबरोबर त्यानें दुसरी एक जबाबदारीही उचलली व त्यामुळें "माझ्या हातचें गेलें" म्हणून श्रमी होणाऱ्याचें सुद्धां शेवटीं हितच आहे असें दिसून आलें. ती जबाब-दारी ही: पूर्वीं वैभवाचा धनी राजा असे.अर्थात् परचक्र आलें तर तें निवारण्याची मुख्य जबाबदारी त्याचीच असे. तो माणसें भाड्यानें ठेवी व त्यांच्या बळावर काम चालवी. हे भाड्याचे शिपाई अजून सुद्धां आहेतच, परंतु त्यांचें रूप आतां पुष्कळ पालटलें आहे व आपत्कालीं केवळ त्यांच्यावरच अवलंबून रहाण्याची आतां जरूरी नसते. पण पूर्वीं यांची फार मिजास असे. यांतूनच वर सांगित-लेले पुष्कळ उमराव उपटत असत. खावयास घालून चांगलें पोसलें म्हणजे त्यांना हातपाय जोडून बसण्याचा कंटाळा येई व मस्तावलेल्या एडक्याप्रमाणें

ते वसल्या ठिकाणींच भिंतीला टकरा देऊं लागत; व म्हणून त्यांच्या मस्तीला कांहीं तरी व्यापार हवा म्हणून राजेलोक अन्याय पदरीं घेऊन सुद्धां पुष्कळदां परदेशच्या स्वाऱ्या उकरून काढीत असत, असें इतिहासावरून दिसून येईल. "सर्व सुखांचा भोक्ता जो राजा तो, त्याचा साथीदार म्हणजे त्याचे प्रधान, उमराव, व हे पगारी लढवय्ये यांनींच परचक्र आलें असतां पाहून घ्यावें, आपला त्यांत कांहींएक संबंध नाहीं, जर त्यांनीं आपलीं कामें नीट बजावलीं नाहींत तर ते आपल्या इमानाला जागले नाहींत" असें प्रजा समजत. पण आतां पहावें तों उमरावापासून हमालापर्यंत युद्धाला जाण्याची सर्वांची हौसेनें तयारी. परवांच्या महायुद्धांत हें स्पष्ट दिसून आलें. हा फरक कां पडला? स्वदेशासाठीं मरावयास भिकारटाकार लोकसुद्धां कां पुढें आले? याचें उत्तर असें कीं, 'हा देश माझा आहे, यांत मला सुखानें भाकरी मिळते, यांतील सुखें व वैभवें स्वसामर्थ्यानुरूप जितकीं मिळवितां येतील तितकीं मिळवावयास येथें कोणी आड येत नाहीं," त्याप्रमाणेंच "ही क्रान्ति घडवून आणण्याच्या कामीं माझ्या वाडवडिलांच्या कैक पिढ्या या ठिकाणीं खर्चीं पडल्या आहेत," अशा प्रकारचा खोल विश्वास त्याच्या मनांत उत्पन्न झाला आहे. राजेलोकांनीं परचक्राच्या वेळीं सर्व लोकांस चला म्हणावें पण भोगाच्या वेळीं त्यांनीं व त्यांच्या संवगड्यांनीं मात्र भोगावें हें आजवरचें धोरण मोडावत जाऊन 'तुम्हीच येवढे भोगणारे कोण?' असें लोक विचारूं लागले. व होतां होतां सर्व देश म्हणजे तेथें असलेल्या सर्व लोकांचा असें ठरलें. म्हणजे आजपर्यंत राजाच्या अंमलाखालीं तो तो देश त्या त्या वंशखंडाला केवळ वस्तीला कायमचा मिळाला होता इतकेंच. पण त्यांतील भोक्तृत्व मात्र लोकांच्या वांट्याला मुळींच येत नव्हतें. तें आतां येऊं लागलें. व त्यामुळें सर्व लोक खरें खरे देशाभिमानी झाले. म्हणजे वंशखंड, देश व देशाभिमान हीं सर्व एका व्याप्तीची झालीं. अमुक लोक, अमुक येवढ्या परिघांत राहणार, व त्यांतील प्रत्येक मनुष्य "हा देश इतरांबरोबर माझाहि आहे" असें म्हणणार हें ठरून गेलें. या देशांतील लोक खरे खरे देशाभिमानी बनण्यास एकच अडचण होती. ती म्हणजे अमुक एका मर्यादेच्या पलीकडील अत्यंत विस्तृत अशा लोकसमूहांतील बहुतेक सर्व माणसांना संधीच्या विषम वाटणीच्या आपत्ती सोसाव्या लागत. आतां राजसत्ता जाऊन किंवा क्षीण होऊन

संधि सर्वांस मिळावयाची असें झाल्यावर देशाभिमान ही वृत्ति सार्वत्रिक झाली व म्हणून हीं राष्ट्रें बलिष्ठ झालीं.

आतां जेथें अनेक वंशखंड दाखल झाले होते त्यांची स्थिति फारच चमत्कारिक झाली. त्यांतच हिंदुस्थान मोडतें. संस्कृतिपर्याय, वंशभिन्नत्व आणि धर्मांचा विरोधीपणा या तीन कारणांनीं येथील लोकांचा कांहीं सामुदायिक जम बसणें भारीच कठीण झालें. इंग्रजी राज्य सुरूं होऊन बरेंच जुनें होईपर्यंत हें काय घडून येत आहे याचें सार्वत्रिक ज्ञान झालें नाहीं. आतां पूर्वीचीं वंशखंडांची भ्रमंती बंद पडली हें खरें, पण एका एका पाश्चिमात्य देशांत ते सुस्थिर होऊन प्रजाभिवृद्धि झाल्यावर त्यांची वजावाट कशी लावावयाची हा प्रश्न त्या राष्ट्रांच्यापुढें येऊन ठेपला आहे व म्हणून निराळ्या तऱ्हेनें इतरांचें आक्रमण करणें त्यांना प्राप्तच झालें आहे. व तदनुसार त्यांचे चोहोकडे झगडे चालूं आहेत. अशा प्रसंगीं देशाभिमानाची ही कल्पना जर आपण सुविस्तृत केली नाहीं तर हें इतरांचें आक्रमण बंद पाडणें आपल्याला सर्वथा अशक्य आहे. जर देशाभिमान विस्तृत करावयाचा असेल तर मनवुद्धींची बीजभूत सामर्थ्यें विकसित होण्यास व विकसित झालेल्या सामर्थ्यांच्या वापरास, सर्वांस सरसहा परवानगी देणें हा एकच इलाज हिंदुस्थानच्या लोकांच्या हातीं आहे. संस्कृति, धर्म व वंश हे जा म्हटल्यानें इतक्यांत जात नाहींत व ते जाईपर्यंत वाट पहावयाची असें म्हटलें तर मूळची जागा जास्तच निसरडी होत जाणार आहे. ही संधि सर्वांना देणें हें इतर कित्येक देशांत समानधर्मत्वामुळें व एकवंशीयत्वामुळें अतिशय सोपें गेलें असलें तरी आमच्या येथें तें इतकें सोपें जाणार नाहीं हें खरें. पण हें केल्याशिवाय गति नाहीं. आतां हें काम सुरूं करावयाचें म्हणजेच अस्पृश्यांची अस्पृश्यता नष्ट करावयाची; व ती नष्ट करावयाची म्हणजे अस्पृष्टांच्या बीजभूत सामर्थ्यांच्या विकसनास व विकसित सामर्थ्यांच्या वापरास संधी देणें हें होय. 'आपण चतुर्वर्ण लोक म्हणजे एक व त्या सर्वांचा मिळून हा देश ' ही कल्पना टाकून 'या हिंदुस्थानांत असलेले सर्व लोक म्हणजे एक व त्या सर्वांचा मिळून हा देश आहे' ही कल्पना पतकरणें या नव्या युग-मानाचें मुख्य लक्षण आहे. वांशिक, धार्मिक या कल्पना ठेवूनसुद्धां ही प्रादेशिक

समाईक मालकीची कल्पना आपण पतकरली पाहिजे. हिंदूपैकीं चतुर्वर्णांचा हा भरतखंड आहे ही कल्पना पूर्वजांच्या मनाशीं होती. म्हणून एका अंगास अतिशूद्र, वन्य इत्यादींना दाबून ठेवून दुसऱ्या अंगास वाहेरून येऊं पाहणारांशीं कित्येक शतकांचा झगडा त्यांनीं केला. एकीकडे हें अतिशद्रादि दबून राहिले खरे; पण दुसरीकडचा हा झगडा निभेनासा झाला. म्हणून मुसलमान व ख्रिस्ती हे येथें आले किंवा उद्भवले, स्थिर झाले, व समाइकीचा हक्क सांगू लागले. ते समाइकीचा हक्क सांगू लागले इतकेंच नव्हे तर स्वतंत्र धर्माचे म्हणून आक्रमण–बुद्धिही दाखवू लागले आहेत. तसेंच बाहेरून आणखी कोणी येण्याचाही बळकट संभव आहेच. अर्थात् अशा प्रसंगीं जे आपल्या धर्माचेच आहेत पण दावून ठेवले आहेत त्यांस मुक्त करून व समाइकींत घेऊन हिंदुधर्म बलिष्ठ करणें व देशाभिमानी माणसांची संख्या वाढविणें हें काम ओघानेंच येतें. याचा अर्थ असा कीं, चतुर्वर्ण हिंदू व देश यांची समव्याप्ति होती ती जाऊन, आतां चतुर्वर्ण + उश्शापित अतिशूद्र + संस्कारित वन्य हे हिंदू आणि मुसलमान व ख्रिस्ती यांची व देशाची समव्याप्ति मानावयास हवी आहे. हें केलें तरच कांहीं तरणोपाय आहे. पैकीं अतिशूद्रांना उःशापित करणें हें प्रस्तुतचें प्रतिपाद्य आहे. त्यांस उःशापित करणें म्हणजेच त्यांची अस्पृश्यता काढणें होय. यावर अस्पृश्यता–निवारकास कोणी म्हणेल कीं " तर मग हें तुमचें काम स्वार्थबुद्धीचें आहे. तर त्यास उत्तर द्यावें कीं " होय तसेंच आहे. मानव जातीच्या वंशखंडांच्या ज्या अनेक उलथापालथी भूपृष्ठावर आजवर झाल्या आहेत त्या सर्व सूक्ष्मपणें पाहतां, स्वार्थबुद्धीनेंच झाल्या आहेत. " भूतदयेच्या जोडीला हा बुद्धिवाद ध्यानांत ठेवावयास हवा.

आम्ही जोंपर्यंत त्यांना स्पर्शयोग्य सुद्धां समजत नाहीं तोंपर्यंत या लोकांत स्वदेशाभिमान उत्पन्न होणें अशक्य आहे. त्यांनीं अभिमान कशासाठीं बाळगावयाचा? आणि कोणाचा बाळगावयाचा? तुमच्या देशाचा अभिमान म्हणजे काय देशांतल्या दगडमातीचा अभिमान? अभिमान दगडमातीसाठीं वाटेल, पण ती तरी अभिमानास्पद असावी लागते! तिच्यावर आपले प्रतापी पुरुष वावरलेले असावे लागतात. तिच्यावर आपल्या संस्कृतीची पैदस

झालेली असावी लागते. ही भूमि माझी आहे या आवेशानें लढतां-लढतां मेलेल्या आपल्या शूरांचे पुतळे मधून मधून तिच्यावर दिसावे लागतात. तिच्यांतील शेतवाडीवर खंडोगणती गल्ला मालकीचा म्हणून गोळा करतां यावा लागतो. परमेश्वरी इच्छेच्या प्रतिकूलतेची हद्द पायाला लागेपर्यंत तेथें सुखसंपत्ति व वैभव संपादितां यावें; बापाकडून कांहीं वारसा हटकून मिळणार या कल्पनेनें तेथें पिढ्या अनुस्यूत होत असाव्यात; पुत्रपौत्रांना आपली कमाई खास जाऊन पोंचणार या भावनेनें तेथें प्रयत्नवाद बळास लागलेला असावा; त्या ठिकाणीं आपल्या कर्तबगारीमुळें घरींदारीं समाधान-वृत्ति नांदल्यानें स्त्रियांचा आपल्या ठिकाणचा प्रेमभाव द्विगुणित होत असावा; तेथें जीव कदरल्यामुळें नव्हे, तर इहलोकच्या उपभोगानंतर, भूतकाळांत पोहरा टाकण्याची आणि भविष्यकाळांत पतंग उडविण्याची बुद्धि होत असावी; अशी जर दगडमातीची भूमि असेल तर तिचा अभिमान. तुमच्या समाजाचा अस्पृष्टाला कशाबद्दल अभिमान? त्यानें तुमच्यासाठीं कां झटावें व मरावें? असें कोणतें लागतेपण त्याच्याशीं तुम्हीं राखलें आहे कीं, तुम्हांला दंश झाला तर त्याला घेरी यावी आणि तुमच्या अवमानाबद्दल त्याला संताप चढावा?

हें जर व्हावयास हवें असलें तर "आम्ही चतुर्वर्ण लोक हे या देशाचे मालक आहों" हा हट्ट आमच्या धार्मिक तत्त्वज्ञानराशींतून गळाला पाहिजे. "हिंदुस्थान देशांत जे कोणी आहों त्या सर्वांचा हा देश आहे व योग्यते-प्रमाणें कोणालाही सत्ता, सुखें व वैभवें हीं येथें मिळवितां येतात" हा न्याय सामाजिक तत्त्वज्ञान म्हणून आम्ही पतकरला पाहिजे. हें पतकरणें म्हणजे अस्पृश्यता-निवारण करणें ओघानेंच येते.

आपल्या इकडे आपणांस असें दिसून येईल कीं, त्रैवर्णिक हिंदूंनीं सत्ता व सुखें आपापसांत वाटून घेतलेलीं होतीं. तरी त्यांतही अमक्याचें काम अमुकच केवळ, त्याला इतरत्र पाहण्याची परवानगी नाहीं, असा भाव उदित झाल्या-मुळें त्या भाकरीच्या व सुखाच्या सुरक्षितपणासाठीं झगडा करण्याचा प्रसंग आला तर तो करण्यास कंबर कसली पाहिजे हा भाव मावळून गेला व लढणारे लोक व तो राजा हे काय करावयाचें तें करतील या कल्पनेनें माणसें राहूं लागलीं. पण प्रत्यक्ष लढाई जरी केली नाहीं तरी देशाच्या संबंधानें त्यांना अभिमान

व त्याच्या आपत्काळीं हळहळ वाटणें साहजिकच होतें. शूद्रातिशूद्राचें मात्र पहा. देशाभिमान कशासाठीं वाटावा? पराकाष्ठा भाकरी मिळत होती. पण प्रथम माणुसकीचा मान व पुढची सत्ता, सुखें, वैभवें हीं त्यांस कोठें आहेत? हीं दिल्यानें देशाभिमान उत्पन्न होईल असें समजावें. गमावण्यासारखें जवळ कांहींच नसलें तर कोणीही राजा आला तरी त्यांचें काय बिघडतें?" कैक वादळें येतात व कैक जातात, पण हॉलंडचीं डबकीं जशींच्या तशीं, त्यांत हूं कां चूं नाहीं " म्हणून कवीनें वर्णन केलें आहे तेंच खरें. स्वदेशी राजा असला काय आणि परदेशी असला काय? त्यामुळें असा काय फरक त्यांच्या जीवितांत पडणार? एका ठराविक साच्यांत ठाकूनठोकून बसविलेलें त्यांचें जिणें आहे. स्वदेशांतच कोंडमारा झाला आहे मग त्याबद्दल देशाभिमान कसा वाटावा ? वरील मजकूर वाचून तो वाटणें न्यायतः प्राप्त होतें कां सांगा. माणुसकीचा मान, म्हणजे निदानपक्ष शिवावयास हरकत नाहीं असें मान्य करणें, हा तरी द्या, मग इंग्रजांच्या तावडींतून जी भाकरी, सत्ता व सुखें शिल्लक राहिलीं आहेत त्यांच्या वांटणीविषयीं बोलतां येईल. आपल्याला नेहमीं ही भीति वाटते कीं, आपली चांगली वस्तु संसर्गानें जाईल कीं काय, पण तशी भीति बाळगण्यास नको. एक तर तुमची चांगली वस्तु इतकी लेचीपेची नाहीं व ज्या पद्धतीनें हा सगळा प्रश्न सोडवावा असें आम्ही म्हणतों त्या पद्धतींत सुरक्षितपणा आहे. आत्मसंरक्षणाची बुद्धि खरोखर फार चांगली. पण वर जे दोन प्रश्न सांगितले आहेत ते नीट लक्षांत घ्यावयास हवे. एक त्यांना या देशावर प्रेम करण्याचा हक्क आहे हें पहावें व तो जर आहे व त्या देशासाठीं जर त्यांनीं लढावें अशी अपेक्षा असली तर आपल्याप्रमाणेंच आपल्या राष्ट्रीय जीवितांत त्यांना वावरूं देणें योग्य आहे कीं नाहीं हें पहावें.

कोणी म्हणतात कीं सार्वजनिक जीवितांतील जे हक्क आहेत ते सरकारच त्यांस देत आहे. व म्हणून त्यांना तुम्हीं म्हणतां ही संधि आपोआपच मिळणार आहे. मग यांत तुम्हीं त्यांच्यासाठीं निराळें असें विशेष तें काय करणार ? हें अक्षेपकांचें म्हणणें चूक आहे. सर्व हिंदू समाजानें पन्नास पाऊणशें वर्षें पूर्वीपर्यंत ज्या प्रकारचा कडकडीत सामाजिक बहिष्कार चालूं ठेवला होता तोच बहिष्कार जशाचा तसा आजवर चालूं राहिला असता,–व क्षणभर असेंहि धरून चालूं कीं यापुढेंहि चालूं राहणार आहे–तर इंग्रज सरकारानें मनांत आणून सुद्धां

हे सामाजिक जीवितांतील समान हक्क अस्पृश्य लोकांना अर्पण करणें इंग्रज सरकाराला अत्यंत जड वाटलें असतें, किंबहुना तें त्याला साधणारही नाहीं. हिंदुस्थान देशावर राज्य करणें हें आपलें पहिलें काम आहे असें इंग्रज सरकार समजतें. देश म्हणजे मुख्य जे हिंदू लोक ते होत; या हिंदूंतहि ज्यांच्यावर राज्य करण्यापासून कांहीं फायदा आहे असे लोक म्हणजे चतुर्वर्ण हिंदू लोक होत. अर्थात् त्या हिंदू लोकांना जर खूष ठेवावयाचें असेल तर त्यांना अत्यंत अप्रिय अशी गोष्ट करावयास सरकार कधींहि उद्युक्त होणार नाहीं. आजवर म्हणजे गेल्या सवाशे किंवा दीडशें वर्षांत त्यांना या अस्पृश्य लोकांची माहिती नव्हती कीं काय? पण त्यांनीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. कारण राज्य करण्याचा फायदा, तें चतुर्वर्ण हिंदूंवरच केल्यानें, होणार व म्हणून या चतुर्वर्ण हिंदूंना खूष ठेवलें पाहिजे हें ते ओळखत आले आहेत. म्हणून इंग्रज सरकारच्च सर्व संधि द्यावयास निघालें आहे तर तुम्ही आपल्याकडे आतां चांगुलपणा कशाला घेतां असें म्हणण्याचें मुळींच कारण नाहीं. धर्मकारण व समाजकारण यांचा विचार करणारे जे हिंदू सुधारक, त्यांनीं या प्रश्नाला धडका दे देऊन, त्यांतील अन्याय इत्यादि उघडकीस आणून व भावी राजकारणांत त्याच्या योगानें उत्पन्न होणारा गुंता लोकांस स्पष्ट दाखवून देऊन जनमनाची रीत वदलण्याचा पायंडा पाडिला व तो उत्तरोत्तर जलदीनें यशस्वी होत आहे. सुधारकांनीं व देशभक्तांनीं ही जी अखिल हिंदू समाजाची वृत्ति थोडी तरी बोटचेपी करून ठेविली तीमुळें सरकारची ही समत्वदान अर्पण करण्याची घोषणा त्याला शक्य झाली आहे. हिंदू समाजाच्या मनांत हा वृत्तिबदल घडवून आणण्याचें श्रेय सुधारक व देशभक्त यांना आहे. इंग्रज सरकार जें करीत आहे तें इतकेंच कीं, या थोर गृहस्थांनीं उत्पन्न केलेल्या परिस्थितिविशेषाचा फायदा घेऊन अस्पृश्यलोकांची जागृति ही हिंदुस्थानांतील स्वराज्यसाधनाच्या मार्गांत धोंड बनवावी. असो. तर हा मुद्दा सोडून दिला म्हणजे वरील प्रतिपादनावरून ध्यानांत येईल कीं संधींची समानता ही अस्पृश्यांपर्यंत जाऊन पोहोंचावयास हिंदू सुधारकांनींच कष्ट केले पाहिजेत. व ते यशस्वी व्हावयासाठीं अस्पृश्यतेचें निवारण केलें पाहिजे. येथें आपण पूर्वीच्या एका मोठ्या थोरल्या सामाजिक तत्त्वज्ञानाच्या शिवेशीं येऊन ठेपतों.

वर्ण—कर्म—चिकित्सा

चातुर्वर्ण्य कसें सिद्ध झाले व त्यांत मूळ कल्पना वंशासंबंधाची कशी आहे हें 'अस्पृश्यतेची उपपत्ति' या प्रकरणांत सांगितलें आहे. या कल्पनेला धंद्याची म्हणजे देशांतील आर्थिक वाटणीची कल्पना पूर्वजांनीं बांधून टाकली. ब्राह्मणानें अमूक करावें, क्षत्रियानें अमूक करावें, वैश्यानें अमूक करावे इत्यादि सामाजिक व्यवस्थेचीं सूत्रें घालून दिलीं व त्याच्या आश्रयानें कित्येक शतकें-पर्यंत हिंदूसमाज स्थिर राहिला. जो ज्या वर्णांत व मग जातींत, जन्मास येईल त्यानें, त्या वर्णास व जातीस या सूत्रांनीं लावून दिलेलें, कर्म करावें असा न्याय रूढ करण्यांत आला.

कडकडीत जबाब—

ज्यांनीं कोणी ही व्यवस्था कल्पिली व पुरस्कारिली त्यांच्याशीं आमचें कांहींच भांडण नाहीं. ज्यांनीं कोणी सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन हे न्याय मुक्रर केले व समाजाला शेकडों वर्षांचें स्थैर्य प्राप्त करून दिलें ते सूक्ष्म विचारी व धोरणी लोक असले पाहिजेत. आमचें भांडण येवढेंच कीं, आपआपल्या कालाचे न्याय ठरविण्याचा अधिकार जसा तेव्हांच्या लोकांना होता तसाच आमच्या कालाचे नवे न्याय ठरविण्याचा अधिकार आम्हांसही असावा. जन्मानें कर्म ठरवून दिलें तें चातुर्वर्ण्यांकित असा जो समाज होता त्यालाच ठरवून दिलें व जो समाज याच्या पलीकडे होता त्याला तर कांहीं कर्मच नाहीं असा दंडक घालून देण्यांत आला. आर्यसंस्कृतीच्या छापेखालीं जे कोणी समाविष्ट झाले त्यांतही जन्मानुक्रम लावून कर्माचा उच्चनीच भावही घालून देण्यांत आला. पण जे कोणी या छापेच्या पलीकडे आपण होऊन राहिले किंवा ज्यांस ठेवण्यांत आलें त्यांना 'कर्म' या पदवीला शोभेल अशा तऱ्हेचें कसलेंच कर्म शिल्लक ठेविलें नाहीं. म्हणजे असें कीं, राष्ट्रांतील सर्व सत्ता, वैभवें आणि सुखें, राष्ट्रांतील सर्व धनें आणि धनोत्पादनाचीं साधनें, सामाजिक नियमनें व अनुशासनें हीं घालून देण्याचीं सामर्थ्यें इत्यादि चट्-साऱ्या बावी अथवा थोडक्यांत म्हणजे या देशाचा सगळा संसार हा आमचा आहे, तुम्ही आमचे कोणी नाहीं व म्हणून आमच्यापासून दहा कदमांवर

दूर रहा, आमच्या जीविताची जी कांहीं पडझड असेल, आमच्या अंगावरील जे कांहीं उतारे असतील ते तुम्ही वाटल्यास घ्यावे आणि आपली कालक्रमणा करावी असा हा कडकडीत जबाब चातुर्वर्ण्य रचणारांनीं सध्यांच्या अस्पृश्यांच्या पूर्वजांना स्पष्ट दिलेला दिसतो.

जुळणी टिकेना--

चातुर्वर्ण्यांत ज्या पायऱ्या कल्पिल्या, त्यांत आपल्या सामर्थ्यानुरूप कर्म वेचून घेतां आलें नाहीं तरी निदान कर्म ही अभिधा ज्याला शोभेल असें कांहीं तरी प्रत्येकाला करतां येण्यासारखें होतें. तें त्यानें मन लावून केलें तर त्याचा प्रपंच चालावयास कांहींच हरकत नव्हती, असें होतें. पण याच्या पलीकडचे जे लोक कीं, ज्यांना पंचम, अवर्ण, अंत्यज इत्यादि नांवें दिलीं, त्यांना अगदीं साधा प्रपंच चालवावयाचें साधनसुद्धां कांहींच ठेवलेलें नव्हतें, म्हणजे घातलेल्या व्यवस्थेप्रमाणें ठेवलेलें नव्हतें. अशी व्यवस्था असूनही त्यांना कांहीं साधनें उपलब्ध झालीं असलीं व त्यांच्या बळावर ते जगत राहिले तर तो गुण या व्यवस्थेचा नव्हे. कालांतरानें या व्यवस्थेंत ढिलाई उत्पन्न झाली आणि हिंदू समाजाच्या सांपत्तिक जुळणींत त्यांचा प्रवेश झाला हें मागें दाखविलेंच आहे. ही जुळणी आतांपर्यंत चालत आली; पण ही चालू असतांच चातुर्वर्ण्याच्या पोटांतच काय काय उलथापालथी झाल्या याकडे माणसांचें लक्ष जाणें अपरिहार्य होतें. वर्णांचीं कर्मे लावून देऊन त्याप्रमाणें सर्वांनीं वागावें हा न्याय रूढ झाला खरा. पण कालेंकरून दिसूं लागलें कीं, हें जुळत नाहीं, कुलसातत्याबरोबर प्रवृत्तिसातत्य हटकून टिकतेंच असें नाहीं. मुबलक धनोत्पादनाला व गुणसंवर्धनाला सहज प्रवृत्तिव्यापार हा बिनहरकत चालू दिला पाहिजे; आणि एकीकडे आघात झाला तर दुसरीकडे बळ घेऊन उठण्याची ताकद जर राष्ट्राला हवी असेल तर हें नियंत्रण खासच जावयास हवें, हें माणसांनीं ओळखलें. शास्त्र तसेंच राहिलें व ओढग्रस्त, म्हणजे पुढच्या प्रसरणशील ओढीनें ग्रासलेला, समाज रूपांतरित होऊं लागला. नियन्त्रण व आपला आचार यांत विरोध पडला आहे हें समाजाच्या ध्यानीं आलें. समाजाला शास्त्र नको होतें असें नव्हे तर हें शास्त्र नको होतें इतकेंच. बरें, समाजानें जुने नियम मोडले व प्रवृत्तीप्रमाणें वर्तन केलें, यावरून समाज उच्छृंखल झाला होता असा

समज करून घेणें चुकीचें आहे. कारण जें शास्त्र सोडून तो चालला होता त्याबद्दल सुद्धां त्याच्या मनांत पराकाष्ठेचा आदर वसत होता. एकीकडे शास्त्रावर निष्ठा व दुसरीकडे अर्थविषयक चलबिचलीची ओढ व सहज-प्रवृत्तिव्यापार यांच्या कात्रींत समाज सांपडला, व ही उत्तरोक्त बाब बलवत्तर ठरली. ब्राह्मणांनीं क्षत्रियत्व गाजविलें; क्षत्रिय सत्त्वगुणादर्श झाले, व शूद्र मनस्वी बनून शौर्यसाहसानें क्षत्रियत्वावर वारसा सांगूं लागले. आपल्या वर्तनासंबंधीं प्रायः एकहि नियम असा राहिला नाहीं कीं, जो या लोकांनीं धनोत्पादनासाठीं किंवा प्रवृत्तिव्यापारासाठीं मोडला नाहीं. स्पृश्य लोकांनीं आपले स्मृतिग्रंथ उघडून पाहावे व आपण नव्हे तर आपल्या पूर्वीच्या कित्येक पिढ्या काय आचार करीत आल्या आहेत हें, आपल्याला विहित म्हणून असलेल्या विधिनिषेधात्मक वचनांशीं, ताडून पाहावें म्हणजे त्यांना दिसून येईल कीं, आपण शास्त्र पाळणारे नसून मोडणारेच आहों. पण यानें हळहळण्याचें कारण नाहीं. कारण सर्वंकष असे आर्थिक न्याय आपल्याला ओढून नेत असतात आणि म्हणूनच त्यांचें स्वामित्व आपण कबूल करण्यांत कांहींच अवमान नाहीं.

आपापलें कर्म करावें—

ज्यानें त्यानें आपापलीं कर्तव्यें करावींत हें वाक्य मोठें कर्णमधुर आहे, पण त्याची अंमलवजावणी स्वतःच्या चारित्र्यांत करितांना त्यांतील मधुरता नाहींशी होते. मी हेंच कर्म कां करावें असें महारानें विचारलें तर गीतादि ग्रंथांतील वाक्यें उद्धृत करून त्याच्या धर्मबुद्धीला आव्हान करावें आणि आपला उपदेश त्याला पटवावा अशी नीति लोक आचरतात. पण हें पांडित्य फक्त परोपदेशांतच नांदतें, ह्या गोष्टीची आठवण एकमेकांना देणें कदाचित् गैरसोयीचें असेल, पण जरूर मात्र आहे. "भगवंतांनीं लावून दिलेलें" ब्राह्मणाचें कर्म कोणते ब्राह्मण आचरीत आहेत? अध्ययन–अध्यापनादि कर्में जशा प्रकारें ब्राह्मण लोक सध्यां करतात त्याच प्रकारानें करणें जर धर्मसंमत असेल तर धर्माला कांहींच उच्च ध्येय नाहीं असा त्याचा अर्थ होईल. पोट भरावें म्हणून जशा प्रकारचें ज्ञान अमुक एक प्रकारें सांगावें असें वरून सांगण्यांत येईल त्याच प्रकारचें ज्ञान ब्राह्मण शिक्षक देत असतो हें एक;

शिवाय कोणी लोखंडाचें दुकान घालून बोहरी होतो; कोणी शिंपी लोकांना बाजारपेठेंत जागा महाग करतो, कोणी खेडेगांवांत राहून आपली वृत्ति विसरून गहाणें डुलवावयास शिकतो, आणि कदाचित् कोणी कोणी एकीकडे ब्राह्मण्याचा जळजळीत अभिमान बाळगून सुद्धां, सुधारकांना निंदून सुद्धां उत्तम कांचेच्या कपाटांत "श्रीक्षेत्र वांईहून" आणलेले सुंदर लाल जोडे ठेवून विकावयास उभा राहतो. ज्या सेवाधर्माला म्हणजे नोकरीला धर्मग्रंथांत श्वानवृत्ति असें नांव दिलें आहे तीवरच केवळ ब्राह्मणसमाज तगून आहे. हें ब्राह्मणांविषयीं झालें. पण जसे ब्राह्मण, तसेच **क्षत्रियही वर्णाश्रम**धर्माचे मोठे अभिमानी असतात. त्यांनाहि असें विचारणें जरूर आहे कीं, आपल्या क्षत्रियत्वाचें काय झालें? **वैश्यांचेंहि** असेंच आहे. खालीं गळलेल्या वुंदीच्या कळ्या खा-खाऊन पुष्ट झालेल्या वाढप्यापेक्षां वैश्यांची जास्त मातब्बरी नाहीं. वरील मजकूर कोणाला खिजविण्यासाठीं लिहिला नाहीं. आपद्-ग्रस्ताला खिजविण्यांत कोणतें शौर्य? पण तो वस्तुस्थितीच्या यथादर्शनासाठीं लिहिलेला आहे.

विहित कर्माचा संकोच--

वर्णाश्रमधर्माप्रमाणें ब्राह्मणांनीं वागावयाचें म्हणजे अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान, प्रतिग्रह हीं कर्मे त्यांनीं करावयाचीं. पोट भरण्याचीं त्यांचीं साधनें म्हणजे अध्यापन, याजन व प्रतिग्रह हीं होत. असें वाटतें कीं, ब्राह्मणसमाज ज्यावेळीं अगदीं लहान असेल तेव्हां हें कदाचित् जमण्यासारखें असेल. सध्यां हिंदुसमाजाच्या २३-२४ कोट लोकांपैकीं १॥ कोट ब्राह्मण आहेत. या सर्व दीड कोट लोकांचा गुजारा अध्यापन, याजन व प्रतिग्रह यांवर व्हावयाचा हें शक्य दिसत नाही. आपल्या पूर्वीच्या कर्माकडे चला म्हणतां तर त्याचा अर्थ आम्ही ब्राह्मणांनीं वेदविद्याच शिकविली पाहिजे, यज्ञकर्मे केलीं पाहिजेत, व त्यांवर गुजारा केला पाहिजे. परिस्थिति लक्षांत घेतां वेदविद्या शिकणारे व पूजाअर्चा, यज्ञयाग करणारे यांचें मान कमीच होत चाललें आहे. मग हें कसें व्हावयाचें? ब्राह्मणांकडून या सेवेची वांछा करणारे लोक आहेत असें जरी घटकाभर मानिले, तरी एकंदर ब्राह्मण लोकांची संख्याच इतकी ज्यास्त आहे कीं त्या सर्वांना या सेंवेवर जगतां

येणें अगदीं अशक्य आहे. या कामीं आधुनिक ब्राह्मणांना कोणी दोष देऊं लागला तर तेंहि बरोबर होणार नाहीं. मुद्दाम मूळ धर्मकल्पनेपासून च्युत व्हावें असें कोणास वाटत नाहीं. ती धर्मकल्पना ज्या परिस्थिति–विशेषावर रचलेली असेल त्यांत फरक पडत चालला कीं, त्याची हाय माणसाला लागतेच लागते. एकीकडे धर्मकल्पना ओढीत असते व दुसरीकडे परिस्थितिविशेषांतील फरक ओढीत असतो. या ओढाताणींत माणूस भांबावून जातो. हा प्रकार कांहीं आतांच झाला आहे असें नाहीं. ज्याकाळीं हें सामाजिक तत्त्वज्ञान रूढ झालें असें आपण समजतों त्याच काळीं त्या ज्ञानाच्या आटोपांत ब्राह्मण समावत नव्हता असें स्पष्ट दिसतें. खुद्द वेदकालींसुद्धां ब्राह्मण लोक या ज्ञानापासून थोडे दूर सरून इतर सत्तावीस धंदे करीत होते हें आतां पुराव्यानें सिद्ध झालें आहे. याचा अर्थ असा कीं, वर्णधर्माच्या कल्पनेंत डांबून राहणें ब्राह्मण समाजाला तेव्हां सुद्धां अशक्य झालें होतें. ही अशक्यता दोन कारणांनीं प्राप्त झाली असावी. एक मूळवृत्तीप्रमाणें प्रत्येक ब्राह्मणाला वरील कर्में करावींशीं वाटतीलच किंवा तीं त्यानें केलीं तर यजमानास पुरेशीं चांगलीं झालींशीं वाटतीलच असा नियम नाहीं व दुसरें इतक्या ब्राह्मणांची जरूरीही नसेल. कसेंही असो. इतक्या भूतकालांतसुद्धां विहितकर्माचा नियम उल्लंघून बाहेर पडणें ब्राह्मणाला जरूरच झालें होतें असें दिसतें.

ब्राह्मणांचीं आडनांवें––

त्याच्या पुढें पहा. आपला सामाजिक इतिहास ओळीनें लिहिलेला असा नसला तरी त्याच्या खुणा दिसतातच. आपण ब्राह्मणसमाजांतील आडनांवें तपासून पहावीं. पाठक, उपाध्ये अशांसारखीं वर्णकल्पनेस जमून दिसणारीं कांहीं आहेत. पण कुळकर्णी, देशपांडे, देशमुख, पोतदार इ. शेंकडों नांवें त्या त्या कुळाचा कर्म–बोध करून देणारीं आहेत हें स्पष्ट आहे. हे धंदे ब्राह्मणांनीं करावे हें कोणच्या स्मृतींत सांगितलें आहे? मग त्यांनीं हे कां केले? याचें उत्तर हेंच कीं ते ब्राह्मण उन्मार्गवर्ती झाले असें नव्हे, तर चरितार्थासाठीं त्यांना या वृत्त्या पत्करावया लागल्या. ही त्यांच्यावर धर्मदृष्ट्या मोठी आपत्ति आली, असेंही मला वाटत नाहीं. समाजाच्या जीविताला उपयोगी अशी व आपल्याला बरी वाटणारी अशी एक दिशा त्यांनीं पतकरिली इतकेंच. मुसल-

मान राजांच्या पदरच्या मोठमोठ्या मुत्सद्यांचीं नांवें आपण मोठ्या गौरवानें उच्चारतों, पण तेव्हां आपण हें विसरतों कीं, या लोकांनीं वर्णाश्रमधर्मा प्रमाणें आचरण केलें नाहीं ! हे सर्व मुत्सद्दी व त्यांच्या कचेऱ्याकोडतांतून कामें करणारे हजारों ब्राह्मण कारकून यांनीं त्या त्या धंद्यांत पडून दरवेळीं सिद्ध करून दिलें कीं, वर्णकर्मकल्पना पचत नाहीं, परवडत नाहीं. यांना धर्म नको होता असें मला मुळींच वाटत नाहीं. कारण याशिवाय इतर बाबतींतील विहित कर्में ते करीतच होते. कर्मकल्पनेच्या संकोचांत ते मावेनात इतकेंच खरें आहे.बरे सांपत्तिकदृष्ट्या शक्य असूनही समाजानें जर विहित कर्माचा आचार ठेविला नसला तर त्याची प्रवृत्तिच या नियमाच्या विरुद्ध आहे असें म्हटलें पाहिजे; आणि नियम पाळावा अशी प्रवृत्ति असूनही त्यांना तीं तीं कर्में सोडून दुसरीं घ्यावीं लागलीं तर नियम व त्यांचें पायाभूत आर्थिक ज्ञान यांचें भांडण आहे असें म्हटलें पाहिजे.

ब्राह्मणांचे धंदे—

सध्यांसुद्धां काय चाललें आहे तें पहा. खालच्या खालच्या जातींनीं इतर म्हणजे उंच प्रकारचे धंदे करण्याच्या नादीं लागूं नये, तर त्यांनीं आपापले विहित धंदे करावे असें वर्णाश्रमधर्माचे अभिमानी लोक सांगतात.त्या वेळीं ब्राह्मणसमाज काय करीत आहे इकडे इतरांचे लक्ष जाणें साहजिकच आहे. रसयुक्त पदार्थ ब्राह्मणांनीं विकूं नयेत, हा नियम; पण सर्व खाणावळी व हॉटेलें ब्राह्मणांनींच चालविलीं आहेत. रंगीत कापड विकूं नये हा नियम; पण बाजार पेठा ब्राह्मण कापडवाल्यांनीं भरून जात आहेत हें आपण पाहतों. फळें, फुलें ब्राह्मणांनीं विकूं नयेत, हा नियम; पण काष्ठौषधींचीं दुकानें तरी ब्राह्मण लोकच चालवितांना दिसतात. सुगंधित द्रव्यें ब्राह्मणांनीं विकूं नयेत, हा नियम; पण तो पाळला जातो काय हें आपणच पहा. जल, शस्त्र व विष त्यांनीं विकूं नये असें शास्त्रानें ठरलेलें आहे, पण पाणी विकणें हा तर ब्राह्मणांचा खास धंदा होऊन बसला आहे. दूध विकणें पाप आहे. पण दुर्दैवी ब्राह्मण स्त्रियांना दुधें विकावीं लागत आहेत. हें सर्व ब्राह्मणांना खिजविण्याकरितां सांगत नाहीं. हें असें असें आहे, व हें असें कां होत आहे हें नीट पहा येवढेंच म्हणणें. वर्णाश्रमवाले म्हणणार कीं, हे लोक च्युत झाले आहेत, त्यांनीं आपापल्या

विहित कर्माकडे वळावें. पण हे च्युत झाले आहेत, असा जो शेरा ते, मारतात त्यांतील दंश यांना लागू पडत नाहीं; तर निराळे धंदे करूं लागणें हें चुकवितां येण्यासारखें नाहीं व परत मूळच्या विहित कर्माकडे वळणें आतां अशक्य आहे. शास्त्रपुरस्कर्ते समजत आहेत कीं, पोथींतील नियमांच्या तात्पर्यानें कालपरिस्थिति नेहमीं अंकित राहते. आम्ही असें समजतों कीं, हा देखावा कांहीं वेळ दिसतो, पण कालगतीबरोबर नियम गैरलागू म्हणून मागे पडतात व परिस्थितीची घडण सफा बदलते. व तिला अनुसरून माणसें सदाचारप्रवृत्त, अभिमानी अशीं असूनही आचार बदलतात.

आपद्धर्माचें तत्त्वज्ञान––

येथें आपद्धर्माचें तत्त्वज्ञान उल्लेखिलें पाहिजे. ब्राह्मणसमाजानें अमुक अमुक आचार सुरू केले असें म्हटलें म्हणजे वर्णाश्रमधर्मवादी म्हणतात कीं, शास्त्रांत आपद्धर्म सांगितले आहेतच. या गोष्टी आपद्धर्म म्हणून कराव्या किंवा आपद्धर्म म्हणून होतात. यावर, आमचें म्हणणें कीं, आपत्काल या शब्दानें त्या कालाची लांबी फार थोडी असें दर्शविलें जातें. आपत्ति ही थोडा-वेळ टिकावयाची; ती संपतांच पुन्हां पूर्ववत् सर्व कांहीं व्हावयाचें व चाला-वयाचें अशी अपेक्षा असते. आतां असें पहा कीं, वर जें कांहीं म्हटलें आहे त्याची व्याप्ति वेदकालापासून तों तहत आजपर्यंत सारखी पुरून उरली आहे! ब्राह्मणांनीं अमुक कामें करावीं हा नियम थेट ज्या काळीं तो झाला असावा असें म्हणतात त्या कालापासून तों तहत आतांपर्यंत सारखा व उत्तरोत्तर ज्यांस्त ज्यास्त भंगत आला आहे. या गोष्टी फार बोधप्रद आहेत. सदा सर्वकाळ जर आपत्तिच राहूं लागली व आपद्धर्मच शिरजोर बनून घरींदारीं नांदू लागले तर आपल्या कामांत कांहीं चूक झालेली नाहींना, हें सामाजिक तत्त्वज्ञान रचणारांनीं तपासून पाहण्याची वेळ आली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. हे आपद्धर्म सारखे पुढें पुढें येत आहेत, व समाजाच्या पोटीं वस्ती करून राहात आहेत. यावरून शास्त्रनियमांच्या तात्पर्याचें विदारण करून आर्थिक न्याय आपली सर्वंकषता सिद्ध करतात असेंच ठरत नाहीं काय? आपत्कालीं ब्राह्मणांनीं काय करावें याचें शास्त्रीय विवेचन हें विचारप्रक्षोभक, अथवा कित्येक ठिकाणीं विकारप्रक्षोभकही आहे. ब्राह्मण हा आकाशासारखा

आहे, आकाशांत उडविलेल्या चिखलाची जशी त्याला बाधा होत नाहीं तशी आपत्कालीं कोणताही धंदा ब्राह्मणांनीं केला तरी त्यांना त्याची बाधा होत नाहीं असें मनूनें म्हटलें आहे. या प्रतिपादनांतील इतर आक्षेपार्हकता डोळ्याआड करून प्रस्तुत प्रश्नापुरतेंच पाहिलें तरी असें विचारावेसें वाटतें कीं हा येवढा अधिकारी ब्राह्मण म्हणजे ब्राह्मणवर्ग या आपत्कालांतून बाहेर पडणार तरी केव्हां? द्रवीड शास्त्री सांगत आहेत कीं, त्यानें बाहेर पडावें. पण हें केव्हां व्हावयाचें कोणास ठाऊक ! खरी गोष्ट अशी आहे कीं ही आपत्ति वगैरे कांहीं नाहीं. कालगतीनें उत्तरोत्तर विकसत जाणारी, नवनवीन शोधांनीं विविध रूपें धारण करणारीं, माणसाच्या प्रवृत्तीच्या गूढस्थ विशेषांचा आविष्कार करणारीं हीं आर्थिक नियमनें आपल्या जास्त जास्त प्रत्ययास येत आहेत व त्यांच्या व्यापारास आपण कोठें हौसेनें व कोठें नाइलाजानें जाब देत आहों, इतकेंच. अर्थात् मूळ आचार सुटल्यावर त्यांतल्या त्यांत चांगले धंदे पतकरणें प्रवृत्तीस व संवयीस अनुसरूनच होणार हें उघड आहे. समाज लहान असतांना धर्मज्ञान, विद्यार्जन इत्यादिकांकडे ब्राह्मणांचा कायमचा कल बनविला गेला हें स्पष्टच आहे व तो थोडा मोठा होतांच त्या गोष्टीचा उपयोग ज्या ज्या धंद्यांत व्हावयाचा ते ते धंदे ब्राह्मणांनीं पतकरले हें अनुक्रमानें व योग्यतेनेंच आलें, त्यांत आपत्ति वगैरे कांहीं नाहीं.

बौद्धिक कामगिरीची वांटणी—

यांतूनच एक बारीक ज्ञान प्रसवून समाजाच्या मनांत कायम झालें आहे. तें हें कीं बौद्धिक कामें ब्राह्मणांनींच करावीं. इतरांनीं तदितर करावीं. ब्राह्मणांनीं बौद्धिक करावीं, म्हणजे ते करतात, इतकेंच खरें आहे. कारण तसें कांहीं शास्त्रानें ठरलेलें नाहीं. ते बौद्धिक कामें करूं लागले याचें कारण हेंच कीं मूळ आचार सुटल्यावर तोंपर्यंतच्या संवयींस अनुसरून जे धंदे नजिकचे वाटले, ते बौद्धिकच होते. पण वर्णाश्रमधर्मवाद्यांच्या मताप्रमाणें त्यांनीं हे धंदे करणें गैरच असावयास हवें. शास्त्राप्रमाणें ते निषिद्धच ठरले पाहिजेत. त्यांना वाटतें कीं हें आपलें कुरण आहे. येथें इतरांनीं चरूं नये. या त्यांच्या वाटण्याचा विचार दोन तऱ्हांनीं व्हावयास हवा. अनुभवानें म्हणजे इतर लोकांस ते ते बौद्धिक धंदे करावयास परवानगी देऊन जर असें दिसून आलें

कीं ब्राह्मण हे धंदे ज्यास्त चांगले करतात, तर त्यांना ही बाग आपलीच आहे असें वाटणें अगदीं साहजिकच व बरोबर आहे असें म्हणतां येईल. कारण इतरांना अवसर देऊनही जर ब्राह्मणांनीं आपलें वर्चस्व प्रस्थापिलें तर त्याचा अभिमान वाटावा, हें मानवी स्वभावाला धरून आहे. पण इतर कोणी असें मानितात कीं, शास्त्राप्रमाणेंच हीं कामें आपलींच आहेत, इतरांचीं नाहींत. तर त्यांना इतकेंच सांगावयाचें कीं हें मत मुळींच खरें नाहीं. डॉक्टरी, एंजिनियरी इ. धंद्यांसंबंधानें शास्त्रांत तर कांहींच नाहीं. आतां आधुनिक शास्त्राप्रमाणें आनुवंशिकतेच्या तत्त्वाप्रमाणें हीं कामें आपलीं आहेत असें कोणी म्हणत असेल तर त्याला इतकेंच उत्तर देतां येईल कीं केवळ वेदाक्षर पाठ करणाऱ्याच्या पोटीं बडा डॉक्टर आला तर ते Heredity चें हटकून द्योतक आहे, असें कसें म्हणतां येईल? कोणची मनःस्थिति बापाला उपयोगीं पडली व कोणची लेकाला उपयोगीं पडली याचा विवेक यांत करावयास हवा. नुसता "ज्ञानप्रवणता" हा शब्द गबाळ आहे. दुसरें असें कीं, Heredity च्या कल्पनेचा उपयोग आपण अन्यायाच्या जोपासनेकडे म्हणजे संधि नाकारण्याकडे करणें रास्त होणार नाहीं. संधि मिळाल्यावरोवर वेदाक्षररत ब्राह्मणकुलांतून मोठमोठे महारथी अतिरथी निपजले हें आपण पाहतों; तर तसल्याच इतरजातीय कुलांतून संधि दिल्यास निराळ्या तऱ्हेचे मोठे लोक निघण्याचा संभव आहे. संधि द्यावी, न निघाले तर आपला काय इलाज? निघाले तर देशाचें हितच आहे. म्हणून बौद्धिक धंदे हे फक्त ब्राह्मणांचेच असले पाहिजेत असें मानणें युक्त नाहीं. हेंच बोलणें वर्णाश्रमधर्मवादी क्षत्रियवैश्यांनाही लागूं आहे.

वर्णाश्रमधर्म अगदीं निकरानें पाळणें ब्राह्मणाला कसें अशक्यप्राय वनत गेलें, हें आतांपर्यंत पाहिलें. आपलें कर्म ब्राह्मणांनीं सोडलें हें वाईट झालें असें वर्णाश्रमधर्मवादी म्हणोत, पण कित्येकदां उरफाटें मात्र दिसून आलें आहे कीं, ब्राह्मणांनीं क्षत्रियांचीं कामें केलीं म्हणून वरें झालें. नाहींतर श्रीशिवाजीमहाराजांच्या प्रयत्नांवर पाणी पडून महाराष्ट्र अविंधमय झाला असता! तसेंच ज्यांना शूद्र म्हणावयाची चाल होती त्यांना क्षत्रियाच्या कामीं पेशव्यांनीं घातलें म्हणून वरें झालें. कारण कीं त्यामुळें दिल्लीचें तख्त मराठ्यांस हालवितां आलें! चावडीवरचा कुलकर्णी वाळाजी विश्वनाथ; पण त्याच्या कुलांत

कृतांतासारखे तलवार पेहेलणारे शूर शिपाई निपजले; व लोकांचे पायपोस उचलणारांचे नातू गंगायमुनेचीं खोरीं दणाणवूं लागले. हें वर्णाश्रमधर्मवाद्यांना कदाचित् आवडण्यासारखें नसेल; कारण कांहींही झालें तरी खालच्या-खालच्यांनीं वरचे वरचे धंदे करणें त्यांना शास्त्रविरुद्ध म्हटलेंच पाहिजे! पण येवढें मात्र खरें कीं या आचारभ्रष्टांच्या वंशजांनीं जर यज्ञयाग केले तर हे तेथें प्रतिग्रहाचा (दक्षिणा घेण्याचा) आपला हक्क वजावण्यास मात्र कधींही चुकावयाचे नाहींत!

तसेंच "ब्राह्मणांनीं आपापलीं विहित कर्में करावीं" व "ब्राह्मण हे बुद्धिमंतांत अग्रेसर आहेत." हीं दोन वचनें एका म्यानांत बसण्यासारखीं नाहींत. असा ब्राह्मणवर्ग जर बुद्धिमान् तर यजनयाजनासारख्या नवधनदृष्ट्या अनुत्पादक अशा धंद्यांत आपण त्याला गुंतवून ठेवावें काय? तर धनोत्पादक धंद्यांत व आधुनिक शास्त्राभ्यासांत कोणास योजावयाचें? इतर लोकांना कांहीं बुद्धि आहे असें तुम्हीं म्हणाल पण त्यांच्याहूनही चांगली बुद्धि ही अधिक फलप्रद होणार नाहीं काय? कां त्या कामासाठीं मुसलमानांतील, ख्रिस्त्यांतील बुद्धिमान् पुढें आणावयाचे? तात्पर्य हें कीं जर ब्राह्मण अग्रेसर आहेत तर त्यांच्या थोर बुद्धीचा व्यापार राष्ट्रास हितावह व्हावा म्हणून त्यांना यजनयाजनांत नेऊन घालणें बरोबर होणार नाहीं. क्षत्रिय वैश्यांचें असेंच आहे. शूद्रांच्या धंद्यांत शिरलेले लक्षावधि क्षत्रिय आहेत. वैश्यांनीं तर वर्णकर्मकल्पनेप्रमाणें त्यास अवश्य जी शेती ती टाकून देऊन व्यापारावरच आपली उपजीविका चालविली आहे. तेव्हां या त्रिवर्णांनीं आपापलें कर्म टाकण्याचें काम, जरूर तेथें तेथें, कित्येक वर्षें चालविलेलें आहे.

असें कां करतों?—

आतां आपण हें सर्व कां करीत आलों असें स्वत:सच विचारलें तर संसार सुखाचा व्हावा म्हणून, असें उत्तर आपलेंच मन आपणास देईल. इहलोकीं मनुष्यमात्राचा हेतु हा असतो कीं, आपलें जीवित करतां येईल तितकें सुखाचें करावें, व तें तसें करावयास आपणास संधि मिळावी. अवघ्या मानव्याचाच ओढा या सुखाच्या व संधीच्या समत्वाकडे दिवसेंदिवस लागत आहे हें स्पष्ट आहे. मनुष्याच्या या इच्छेला स्पष्ट व्यक्तीकरणामुळें नांवें जरी निरनिराळीं मिळत असलीं, तरी या इच्छेचा उगम माणसाच्या जाती-

इतकाच जुना आहे, व तिचा व्यापार मानवी जीविताइतकाच संतत आहे. हा त्या इच्छेचा व्यापार अवघ्या पृथ्वीवर कसा चालू आहे याची नोंद जरी अलीकडे साधनसुलभतेमुळें जलदीनें होऊं लागली आहे तरी धर्मकल्पना व त्याहीपेक्षां राष्ट्रकल्पना यांनीं केलेले माणसांचे निरनिराळे गट आपापल्या राष्ट्रांतच हा व्यापार कसा चालू आहे याचा मात्र विचार करीत असतात. कारण अजून अतिराष्ट्रीय अर्थवाद फारसा प्रबळ झालेला नाहीं. या एका गटांत सुखकल्पना काय आहे आणि तें प्राप्त करून घेण्यास संधि मिळण्याच्या आड कोणी येतें कीं काय, हें त्या गटांतील लोक पाहात असतात. या ठिकाणीं अस्पृश्यांचा प्रश्न चटकन पुढें येतो. जें व्हावें म्हणून तुम्ही स्पृश्य हिंदू शास्त्र. वचनांच्या बाधेपासून दूर सरलां तेंच अस्पृश्यांना सुद्धां व्हावयास हवें आहे- त्यांना सुद्धां आपले संसार सुखाचे करावयाचे आहेत. अवमान, लाचारी आणि निराशा यांतून बाहेर पडावयाचें आहे. हें जर व्हावयाचें असेल तर राष्ट्राच्या आर्थिक जीवितांत त्यांना प्रवेश मिळावयास हवा. अस्पृश्यतेमुळें हा मिळत नाहीं म्हणून अस्पृश्यता जावयास हवी ही तक्रार आहे. तुमचीं मुलें शहाणीं व्हावीं आणि त्यांच्या मुलांनीं काय जन्मन्‌जन्म तुकडे मागत फिरावें? तुम्ही सरकारदरबारीं प्रतिष्ठा मिळवावी आणि त्यांच्या मुलांनीं काय नेहमीं तुमच्यापुढें काठी खुळखुळत पळावें ? शास्त्रें झुगारून तुम्ही मात्र सत्ता, सुखें व वैभवें मिळवावीं आणि त्यांनीं ती इच्छा प्रकट करतांच तुम्ही काय शास्त्राचें भय पुढें करावें? धनसंपादनाच्या, सुखसाधनाच्या व संस्कृतिसंवर्धनाच्या सरमिसळींत त्यांना प्रवेश मिळाला तर सध्या त्यांचें जीवित ज्या प्रकारचें आहे त्याच्या शंभरपट सुखाचें असें त्यांस करतां येईल. परंतु अस्पृश्यता ही दुर्दैवाप्रमाणें त्यांच्या वाटेवर आडवी पडलेली असते. ती काढा ही मागणी आहे. प्रयत्नांच्या आड येऊं नका. यश कोणास किती येतें हें तदितर कित्येक बाबींवर अवलंबून आहे, व तें सर्वांसच लागू आहे.

किंमतच तितकी! —

कोणी म्हणतात 'अहो, त्यांची किंमतच तितकी आहे.' हें बोलणें नुसतें स्वार्थीच नाहींतर मूढपणाचेंहि आहे. यांचें नीट चालावयास एक कायमचा हमालवाडा हवा म्हणून हे असें बोलतात. आणि संधि दिली असतां अस्पृश्य

लोक आपलीं रूपें कशीं पालटतात हें माहीत नसल्यानें किंवा माहीत असूनहि ते असें बोलतात. म्हणून हें बोलणें स्वार्थाचें व मूढपणाचेंहि आहे. पण यांतच एक जळलेल्या सुंभाचा पीळ आहे. तोहि उलगडला पाहिजे. जर किंमतच तितकी आहे तर मग भितां कां? संधि देऊनहि तिचा कांहीं उपयोग होणार नसेल तर ती देण्यास तरी मग कांचकूच कां करतां? सृष्टीनेंच जर तुमच्या मताप्रमाणें अकर्तृत्वाचा छाप त्यांजवर मारिला असला तर ते नाकर्ते ठरतील व तुम्हांस भ्यावयाचें मग कांहींच कारण नाहीं. पण हें तितक्याच किंमतीचें ढोंग वाया आहे. हे कर्तृत्ववान ठरतील आणि सध्याचा आर्थिक झगडा यांच्या प्रवेशानें जास्त प्रखर होत जाईल ही या लोकांना खरी भीति आहे. ती प्रामाणिकपणें बोलून दाखवाना? स्वतःच्या कर्तृत्वाची जर खरोखरच खात्री असेल तर खरा मर्दपणा यांत आहे कीं, त्यांना या सरमिसळींत म्हणजे जीविताच्या झगड्यांत खुशाल उतरूं द्यावें व आपण आपलें वरिष्ठपण शक्य असल्यास वेशक ठरवावें. त्यास ना नाहीं. पण शर्यतींतच येऊं द्यावयाचें नाहीं हा न्याय कोठला? वांशिक वरिष्ठपणाचें मूळ तत्त्वज्ञान सार्थ आहे पण तें त्या त्या ठिकाणीं सिद्ध व्हावें लागतें; आणि शिवाय त्याचा व्यापार कर्तृत्वाच्या कोणत्या सीमेच्या पलीकडे चालू होतो हेंहि पाहिलें पाहिजे. संधि दिलदारीनें द्यावी आणि हें श्रेष्ठपण खुशाल ठरवून घ्यावें. ते लोक मागें पडले तर मग तुमचा इलाज नाहीं. निदान येवढें तर खरें ना कीं, संधि देण्यांत न्याय आहे? तेवढा करा; मग अमुक जात तमकीपेक्षां अमुक कामांत श्रेष्ठ आहे असें ठरत जाईल, व हें ठरत ठरत जर अस्पृष्ट लोक मागें राहिले तर राहिले. त्यास कोण काय करणार?

समाज चाळविण्याची जरूरी—

आनुवंशिकतेचें महत्त्व कोणी कमी लेखूं अगर करूं इच्छित नाहीं. पण तेवढचा मुद्यावर, म्हणजे आनुवंशिकतेला महत्त्व असल्यामुळें, जर समाज चाळविण्याचें काम बंद पडलें तर त्यानें एकंदर समाजाचा घातच व्हावयाचा. आनुवंशिकतेनें जर कांहीं एक सामाजिक सामर्थ्य पैदा झालें तर तें टिकवून धरण्यासाठीं आनुवंशिकता जपून धरावी; पण त्यावरोवरच उरलेला समाज काठी खोचून चाळविला पाहिजे. म्हणजे सामर्थ्याचे स्फुल्लिंग

कोठें असतील तर ते बाहेर येतील व त्यांना संधि देऊन फुंकर घातला म्हणजे मूळच्या सामर्थ्यांत भर पडत जाईल. व अशीच पद्धत चालू राहिली म्हणजे एकंदर समाजाचें सायकट तेवढें वर येईल; व गैदी लोकच तेवढे खालीं राहतील. आनुवंशिकता मोठी खरी; पण ती उत्पन्न करणारीं बीजें तरी मूळांत समाज चाळविल्यानेंच निघाली, हें स्पष्ट आहे. बीजरूप सामर्थ्याला विकसित होण्यास संधि देणें व विकसित सामर्थ्याच्या वापरास संधि देणें हें दुहेरी कर्तव्य जर समाज बजावील तरच तो तगून राहील. संधि मिळाल्यानें काय होतें हें पुढील यादीवरून समजेल.

इसॉप	.... गुलाम	....	'इसापनीती'चा कर्ता.
ब्रूम फील्ड	.... शिप्याचा मुलगा, जोडे शिवणारा		कवि.
बन्यन्	.... कल्हईवाला	...	पिल्ग्रिम्स प्रोग्रेसचा कर्ता.
बर्न्स	.... नांगऱ्याचा मुलगा	....	श्रेष्ठ कवि.
कोलंबस	.... कोष्टयाचा मुलगा	....	अमेरिका शोधणारा
कॅप्टन् कुक	.... शेतकऱ्याचा मुलगा	....	पृथ्वी प्रदक्षिणा करणारा.
क्रॉम्वेल	.... कलालाचा मुलगा	....	इंग्लंडचा सर्वाधिकारी.
कनिंग हॅम	.... गवंडी	....	बडा लेखक.
डेफो	.... खाटकाचा मुलगा	....	कादंबरीकार.
डेमॉस्थिनीस	.... शिकलगाराचा मुलगा	....	प्रसिद्ध वक्ता.
डिकन्स	.... बातमी ने-आण करणारा ..		कादंबरीकार.
फॅरादे	.... पुस्तके बांधणारा	....	आधिभौतिक शास्त्री.
फरॅन्कलिन	.... मेणबत्तीवाल्याचा मुलगा स्वतः वर्तमानपत्रे विकी		आभाळांतून वीज आणणारा व मुत्सद्दी.
होमर	.... शेतकऱ्याचा मुलगा,भिकारी.		महाकवि.
जॉन हावर्ड	.... वाण्याच्या दुकानांतला मुलगा		तुरुंग-सुधारक.
बेन जॉन्सन	.... कुंभार	....	कवि व नाटककार.
लॅटिमर	.... शेतकऱ्याचा मुलगा	....	समाज-सुधारक.
शेक्सपिअर	.... लोकर विणणाऱ्याचा मुलगा		महा नाटककार, कवि.
वर्जिल	.... पोर्टर	....	महाकवि.
वॅट	.... ब्लॉकमेकर	....	आधिभौतिक शास्त्री.

वॉशिग्टन	.... शेतकरी	....	अमेरिकेचा स्वातंत्र्यदाता.
वूल्से	.... खाटकाचा धंदा करणारा ..		धर्मवाङ्मय–लेखक.
सॉक्रेटीस	.... पाथरवटाचा मुलगा	....	तत्त्ववेत्त्यांचा बाप.
शिंदे	.... पैजार उचलणारा	....	राज्यसंस्थापक
होळकर	.... मेंढ्या पाळणारा	....	राज्यसंस्थापक
पेशवा	.... चावडीवरचा कारकून	....	स्वराज्याच्यासनदाआणणारा

आपल्याकडील अधिक उदाहरणें सहज सुचण्यासारखीं आहेत.

तत्त्वज्ञानांत बदल—

कर्तृत्वाच्या कोणत्या पातळींत पोंचल्यावर हें वांशिक श्रेष्ठपण दृग्गोचर व्हाव याचें असेलच तर होतें हें पाहिलें पाहिजे. जगताचे जे सर्वसामान्य व्यवहार आणि धंदे असतात, त्यांत काय फरक पडणार आहे? दुकानें घालणें, धान्य पिकविणें, सुतारकी, लोहारकी, पाटिलकी, तलाठकी, न्हावकी, मास्तरकी, फोटोग्राफी, वडारकी, परिटपणा, रंगारपणा, खडी काढणें, वाजंत्री वाजविणें, हमाली, कज्जेदलाली किंबहुना संपादकी यांसारखे शेंकडों धंदे सांगतां येतील कीं, जेथें वांशिक श्रेष्ठतेचा आग्रह हास्यास्पद ठरेल. मनाच्या व मेंदूच्या शक्तीचे अत्यंत तीक्ष्ण व्यापार जेथें असतात तेथें हा फरक पडत असेल. बरें, पडला तर, जो मागें राहतो तो पराभूत म्हणून खुषीनें मागें राहील. म्हणून तें तत्त्वज्ञान या चळवळीच्या आड आणण्याचें कारण नाहीं. आपापली किंमत ठरवून घेण्याच्या मागें आपण सर्वजण असतों. तसें त्यांसहि असूं द्यावें ही मागणी आहे. हेंहि जर नाकबूल असेल तर समष्टिजीविताच्या आणि राष्ट्रबंधनाच्या गोष्टी वृथा आहेत. सृष्टीनें दिलेल्या बीजभूत मनःसामर्थ्याचें विकसन होण्यास व विकसित सामर्थ्याच्या वापरास अस्पृष्टांस संधि मिळत नाहीं, आणि म्हणून प्राप्त होण्यासारखा सत्ता, सुखें व वैभवें यांचा वाटा त्यांच्या पदरीं पडत नाहीं; आणि त्यांना आपलें जीवित अत्यंत कष्टांत घालवावें लागतें ही तक्रार आहे. ही आपोआप जाणार आहे हें म्हणणें शोभून जातें; पण खरी गोष्ट अशी आहे कीं, या अपेक्षित स्थित्यन्तराचें तत्त्वज्ञान आमच्या सामाजिक तत्त्वज्ञानराशींत समाविष्ट झालें पाहिजे.

प्रस्तुत जो अस्पृश्यांचा प्रश्न तो लक्षांत घेतां ह्याच सूत्राचा अंमल अधिक विस्तारानें व्हावा इतकेंच म्हणावयाचें आहे. चतुर्वर्ण हिंदूंतील कोणाही

माणसाच्या बीजभूत सामर्थ्याला जशी विकसनाला संधि मिळते व विकसित सामर्थ्याच्या वापरालाहि मिळते, निदान तिच्या आड कोणी येत नाहीं, तशी ती अस्पृश्यांनाही मिळावी, त्यांचीं सामर्थ्यें वाढावीं, समाजाच्या व देशाच्या पयोगी पडावीं व अशा रीतीनें त्यांच्या भाग्योदयाला त्या समाजांत पूर्ण परवानगी आहे असें सिद्ध व्हावें हा अस्पृश्यता–निवारणाच्या कामांतील अगदीं खरा आग्रह होय. माणसाची किमान किमत वदलली हेंच अजून समाजाच्या मनांत नीट उतरत नाहीं. त्यामुळें आपला समाज स्वतः आकांक्षी होत नाहीं व दुसऱ्याच्या आकांक्षा वळावूं देत नाहीं.

युरोपांत वगैरे अगदीं सामान्य माणसाला सुद्धां कमींत कमी किती महत्त्व असलें म्हणजे तो माणूस ठरतो हें ठरून गेलें आहे व त्याचें तें कमींत कमी म्हणजे आपल्या इकडे पुष्कळच वाटण्यासारखें असतें. त्यांच्यांतील कामकरी वर्गाच्या गरजा, आकांक्षा आणि अपेक्षा ज्या बोलून दाखविल्या जातात त्या पाहिल्या म्हणजे, ज्या काठीनें माणुसकीची उंची मोजावयाची ती काठीच मुळांत उंच झाली म्हणजे माणसाचें मेजच बदललें हा न्याय त्यांनीं पत्करलेला दिसतो. तोंच आमच्या कडील लोकांनींसुद्धां पत्करावा इतकाच आग्रह आहे.

पुनर्जन्माचें तत्त्वज्ञान—

येथें पुनर्जन्माविषयींहि थोडेसें अवश्य लिहिलें पाहिजे. मी अस्पृश्य कां? असें महारानें विचारलें तर पूर्वसुकृतानुरूप तुला ही योनि मिळाली आहे असा जवाव देण्यांत येतो. आतां हें पूर्वजन्मींच्या कृतीचें तत्त्व खरोखर अत्यंत उदात्त आहे. परंतु त्याचा उपयोग केवळ ज्या ठिकाणीं व्हावयास पाहिजे त्यापेक्षां जास्त ठिकाणीं केला जातो. एकाद्यानें प्रयत्न केले, अंगच्या सर्व शक्ती वाढीस लाविल्या आणि त्यांच्या बळावर तो कांहीं साध्य करूं लागला असतां जर त्याला अपयश आलें, किंवा कोणी लुलाच जन्मला, घर पडून मेला किंवा स्वतःचे कोणतेहि दोष नसतां जन्मभर दुःखीच राहिला तर त्याच्या समाधानासाठीं हें पूर्व–सुकृताच्या फळाचें तत्त्वज्ञान आहे. आपली शिकस्त करूनहि जर सुख पाठमोरेंच राहूं लागलें तर या तत्त्वज्ञानाशिवाय समाधानाला दुसरी कोणतीहि जागा नाहीं. परंतु जें केवळ अदृष्टाच्या अर्थशोधासाठीं असावें, तें मनुष्यकृत गोष्टींच्या समर्थनार्थ उपयोगांत येऊं लागलें आहे.

जी गोष्ट करतां आली असती किंवा टाळतां आली असती अथवा वदलता आली असती, आणि तीहि आपल्या अंगच्या वळावर, ती "तुला जन्मानेंच प्राप्त झाली आहे म्हणून भोग" असें सांगणें म्हणजे रोग कां झाला हें कळत असतांना सुद्धां औषध न घेऊं देण्यासारखें आहे.

इतर देशांत, अत्यंत गरीब कुळांतील माणसांना सुद्धां नशीव काढण्यास आपल्याइतके प्रत्यवाय नाहींत. कोठें कोठें तर विलकुलच नाहींत. ज्या गोष्टी त्यांच्या बुद्धीच्या आणि आवाक्याच्या बाहेरच्या असतील, त्या संबंधानें कोण काय करणार? पण तोंपर्यंत तरी माणसांनीं आपल्या सोयीसाठीं केलेल्या गोष्टी तत्त्वज्ञानाच्या नांवावर विकून अस्पृश्याला भोळा करून ठेवूं नये. उद्यां एकाद्या देशांतल्या लोकांनीं आपल्या देशांतील कांहीं बांधवांवर "खालीं डोकें वर पाय करून चालावें" अशी शिक्षा फर्माविली व असें कां म्हणून विचारतां हें तुझ्या मागील जन्मींच्या कृतीचें फळ आहे असें त्याला सांगण्यांत आलें तर त्यानें काय तें निमुटपणें सोसावें? तसेंच उद्यां जर आमची सध्याची स्थिति आमच्या मागील जन्मींच्या पापकृत्यांचीच फलरूप अवस्था आहे, आणि म्हणून ती आम्ही निमुटपणें भोगली पाहिजे असें इंग्रजांनीं आम्हांला सांगितलें तर काय उत्तर द्याल ? कर्मशूर व्हा म्हणतां आणि कर्म तर करूं देत नाहीं यामुळें तत्त्वज्ञान आणि व्यवहार यांची फारकत होत आहे. जन्म हा 'दैवायत्त' राहील; पण पौरुष मात्र 'मदायत्त' आहे असें प्रत्येकास म्हणतां यावें.

संधि पाहिजे—

तसेंच पृथ्वीवरील अवघे समाज कोणत्या तऱ्हेनें पुरुषार्थ साधीत आहेत हें पाहिलें तर आमच्या देशांतील कोटचवधि प्रजाजनांच्या अंगांतील शक्ति आणि भावना केवळ मातीच्या मोलानें जात आहेत, असें वाटतें. त्यांचें जिणें म्हणजे शेरडीच्या शेपटासारखें झालें आहे. "लाजहि झाकीना आणि माशाहि वारीना ! " देशांत वैभव, संपत्ति, सुखें, कलाकौशल्य आणि विद्याभिवृद्धि हीं प्राप्त होण्यास देशांत असलेलीं कोटचवधि माणसें वाऱ्यावर सोडून कसें चालेल! युद्ध उपस्थित झालें तेव्हां घरच्या मुलांच्याहि फौजा वनवून युरोपियन राष्ट्रांनीं त्यांच्याकडून देशाची सेवाचाकरी करून घेतली.

रशियानें वायकांचींहि पलटणें केलीं आणि पादाक्रांत केलेल्या रशियाचा बाजार हस्तगत करावा म्हणून जर्मन लोकांनीं पुरुष नव्हते म्हणून ३६००० स्त्रियांना ऐन युद्धांत अर्थशास्त्राचें शिक्षण दिलें! पण आमच्या येथें पहा माणसें स्वस्त झालीं! कोणीही आभाळांतून बॉम्ब टाकून त्यांना जिवें मारावें आणि ही दैवाची कर्कशता ज्यांच्या वांटणीला येते त्यांनींच आपले कोट्यवधी बांधव स्पर्शयोग्यहि नाहींत असें समजत रहावें!

अस्पृश्य लोकांचा अस्पृश्येतर हिंदूंवर कशासाठीं रोष आहे? याचें तात्त्विक उत्तर इतकेंच कीं, इतरांना आपआपलें जीवन आपल्या शक्तीस अनुसरून जसें सुखाचें करतां येतें तितकें तें अस्पृश्यांस करतां येत नाहीं, कारण अस्पृश्यता आडवी येते हें त्या रोषाचें कारण आहे. विद्या शिकविली तर त्यांस काय ती येणार नाहीं? दुकानें घालूं दिलीं तर त्यांस काय किफायतीनें विकतां यावयाचें नाहीं? मेंबर नेमिलें तर गांवकऱ्यांचें म्हणणें निदान ढोवळ मानानें तरी त्यांना सरकारला सांगतां यावयाचें नाहीं? कीं हातीं बंदूक दिली तर ती नेमानें झाडतां यावयाची नाहीं? या सर्व गोष्टी त्यांस करतां येतील. पण माणसें त्यांना शिवूनच घेत नाहींत व म्हणून या गोष्टी ज्या ठिकाणीं व ज्या समाजांत शिकावयाच्या तेथें प्रवेशच होत नाहीं. अर्थात् असें झाल्यामुळें कर्तव्यगारी उत्पन्न होण्याचा वकूब सृष्टीनें दिला असतांसुद्धां त्याच्या व्यापारास व संवयीमुळें त्यांतील सराईतपणास अस्पृश्य समाज मुकतो. म्हणजे असें कीं, शक्तीचीं व गुणांचीं जी बीजें सृष्टीनें त्यांच्या मनोभूमींत जन्मतःच खोंचलेलीं असतात तीं उगवून वर येण्यास व मग त्यांचा घोंसदार पालवीचा वृक्ष बनण्यास संधिच मिळूं शकत नाहीं.

धर्मशिक्षणांत प्रवेश—

हें विवेचन सामाजिक जीवितांत त्यांचा प्रवेश व्हावयासाठीं केलें. याच्याच जोडीला अस्पृष्ट हा हिंदू आहे म्हणून उच्च प्रकारच्या दैवत-पूजनापासून त्याची मानसिक उन्नति होण्याला मदत होईल म्हणून आणि निदान परमेश्वराच्या पवित्र सान्निध्यांत तरी आपापले उच्चनीच भाव विसरून केवळ मनुष्यत्वगत समताबुद्धि परमेश्वराशीं तुलनेनें तरी प्राप्त व्हावी म्हणून आपल्या देवालयांत त्याला प्रवेश करूं देणें हीहि एक मागणी आहे.

मोठ्या आपत्तीच्या वेळीं, ज्याप्रमाणें सांस्कृतिक, बौद्धिक आणि वैभवविषयक विपमता विसरून माणसें समत्व–भावनेनें एकमेकाकडे पाहतात; त्याप्रमाणेंच परमेश्वरी सान्निध्यांत त्याच्या विशालत्वामुळें तींच माणसें लघुत्व-प्रतीति पावतील व क्षणभर कां होईना तीं एकमेकांकडे समत्व–भावानें पाहतील व अशा रीतीनें परस्परांत आत्मीयत्व उत्पन्न होईल, अशीही अपेक्षा आहे.

तसेंच आमच्या हिंदुत्वाचें धर्मशिक्षण जें काय होतें तें देवालयांतूनच होतें. शाळांतून हें शिक्षण व्हावयास अवसर नसतो हें प्रसिद्ध आहे. पुराणें, कीर्तनें, प्रवचनें, हरिजागर, भजनें अशांसारखे सर्व प्रकार देवळांतच होतात. रामाचें प्रजानुरंजन, सीतेचें पातिव्रत्य, लक्ष्मणाची बंधुप्रीति, हरिश्चन्द्राची सत्व-धीरता, यशोदेचें वात्सल्य आणि श्रीकृष्णाचा दुर्बलांचा पक्षपात आणि तत्त्व-बोध हीं सारीं आपण देवळांत ऐकतों. अस्पृष्ट हिंदु खरा, पण माणसाच्या मनाला उदात्त बनविणारीं, रसिकता आणणारीं, आणि ध्येयवाद शिकविणारीं हीं प्रकरणें त्याला काय होत ? तो सांस्कृतिक दिशेनें सुद्धां झपाझप प्रवास करील; पण ही शिकवण त्याला प्राप्त व्हावयास हवी. तसेंच ज्या देवता-मूर्तीवर वेदघोषयुक्त जलधारा वाहत राहिली आहे,जिच्या सात्त्विक स्वरूपा-कडे पाहून मन प्रसन्न व्हावें, जिच्या पायीं एकनाथ, तुकाराम अशा महान् भगवद्भक्तांनीं आपलीं शिरें नम्र केलीं आहेत, त्या मूर्तीचें दर्शन आपल्याला व्हावें असें त्याला वाटलें तर तें गैर आहे काय? असें वाटतें कीं, तें गैर तर नाहींच, पण अत्यंत योग्य आहे.

हें जर घडून आलें तर त्यांना स्वतः हिंदुत्वाची प्रतीति जास्त जास्त येत राहील व ते हिंदुत्वाचे खरे खरे अभिमानी बनतील हेंहि स्पष्ट नाहीं काय ? इतर धर्मांतील लोक विधर्मीयांना 'या या' म्हणून बोलावितात; आणि आपण 'आम्हाला देव दाखवा' म्हणणाऱ्या स्वकीयालासुद्धां दूर ढकलतों हें बरोबर आहे काय? हें सर्व बोलणें लक्षांत घेतलें म्हणजे असें दिसून येईल कीं, बैतें, बलुते, गांवकी इत्यादींचे हक्क अस्पृश्यांस देऊन आपल्या सांपत्तिक जुळणींत त्यांना कायमचें प्रविष्ट करून घेण्याचें काम, आणि भगवन्नामाचा अधिकार त्यांस देऊन व त्यांच्यांत उत्पन्न झालेल्या थोर वैष्णवांच्या वाङ्-

मयाचा मान करून त्यांना आपल्या धार्मिक जीवितांत प्रविष्ट करून घेण्याचें काम, हीं दोन जीं सुधारणाविषयक कामें पूर्वजांनीं चालू केलीं तींच आपण कालमानास अनुसरून प्रगल्भतर करण्याची खटपट करीत आहों. अविचारी लोकांस वाटतें तसलें हें कांहीं बाडगें काम नाहीं. इंग्रजी शिक्षणानें बहकलेल्यांचें हें काम नाहीं. हें काम धर्मनिष्ठांनीं सुरू केलेलें आहे. हें कांहीं कलम नाहीं, तर पूर्वींच्या धर्मवृक्षाच्या बुंध्यांतूनच हे फरगाडे फुटत आहेत. हिंदुधर्माच्या प्रसरणशील तत्त्वज्ञान–विचारांचें हें पुढचें स्तबक आहे. नव्या नव्या लोकांनासुद्धां आपल्या कबजांत घेत आलेल्या हिंदुधर्माच्या आक्रमशील बाहूंचा हा नवा आवेश आहे. हें काम सुधारकांचें आहे. म्हणून त्यांच्या जबाबदाऱ्या काय आहेत हें पाहिलें पाहिजे.

सुधारकाची जबाबदारी

यश प्राप्त व्हावें म्हणून कोणत्या गोष्टी ध्यानांत ठेवणें अवश्य आहे हें सुधारकानें पाहिलें पाहिजे. म्हणजे त्याचें स्वतःचें जें सुधारक-स्वरूप तद्विषयक त्याची जबाबदारी काय आहे हें ध्यानांत येईल. कै. रानडे यांनीं सुधारकांचे चार वर्ग केलेले आहेत. पहिल्या वर्गाचे सुधारक ते होत कीं, जे जुन्या शास्त्रांत नवे अर्थ शोधितात. त्यांना कांहीं कांहीं नवीन गोष्टी घडावयास हव्या असतात, पण आपण त्या नवीन करीत नसून, त्यांना जुन्या शास्त्रांत आधार आहे असें ते म्हणतात व सिद्ध करूं पहातात. यांत दोन प्रकारचीं माणसें असतात. कांहीं असे कीं, जे जुन्या शास्त्रांचें परीक्षण करून त्यांची सम्मति खरोखरीच मिळत असेल तर ती घेऊन कोणत्याही नवीन गोष्टीला प्रवृत्त होतील; आपल्या मनांतील नवीन कल्पनांना त्यांतून सम्मति काढतां यावी म्हणून जुन्या शास्त्रांचा छळ करणार नाहींत. पण त्यांच्या बरोबरीचेच कांहीं दुसरे थोडे आडवळण पत्करतात व शास्त्रांची सम्मति सरळ अर्थानें मिळूं शकत नसेल तर शब्दव्युत्पत्ति, व्याकरणाचीं रूपें, समासांचे विग्रह, दूरान्वय, श्लेष इत्यादींच्या बळावर शास्त्रांच्या मूळ संहितेवर आपणांस अनुकूल अशा कोटचा वसवितात व एकाद दुसऱ्या कोटीनें आपणांस अनुकूल असा शास्त्राच्या अर्थांत थोडा जरी विकल्प उत्पन्न करतां आला तरी तेवढ्यानें कार्यभाग झाला असें म्हणतात. त्या वरच्यांना शास्त्रांनीं सरळ सांगितलें तरच नवीन हवें असतें व ह्या आतांच्यांना नवीन हवें असतें हें पहिलें; पण शास्त्रांतून तर उठून जावयास नको असतें. म्हणून ते त्याला थापट्या मारून स्वतःस अनुकूल करून घेतात. पण हे दोघेही एकाच वर्गांतील.

दुसऱ्या वर्गांतील सुधारक म्हणजे बुद्धि चालविणारे सदसद्विवेकी हे होत. हे शास्त्रास केवळच गुंडाळून ठेवतात असें नव्हे; तें अनुकूल असलें तर फारच चांगलें. पण प्रतिकूल असलें तरी त्यास बाजूस सारून अमुक एक गोष्ट करावी कीं न करावी याचा जाव आपल्या बुद्धीस विचारतात. वऱ्या-वाइटाची ते छाननी करितात व चिकित्सा झाल्यानंतर बुद्धीनें जर अनुकूलता दाखविली तर तें काम हातीं घेतात. पण न दाखविली तर टाकून देतात. पहिल्या वर्गांतील सुधारकाला शास्त्रप्रामाण्य आवश्यक वाटतें व

दुसऱ्या वर्गांतील सुधारकाला बुद्धिप्रामाण्य आवश्यक वाटतें. तिसऱ्या प्रकारचे सुधारक हे साधनांच्या भेदामुळें स्वतंत्रपणा पावले आहेत. एकादी गोष्ट त्यांना पटली म्हणजे तेवढें त्यांस पुरेसें होतें. ती ज्या समाजाच्या पचनीं पडावयास हवी असते त्याचा अनुनय करणें जरूर असतें असें ते मुळींच मानीत नाहींत. जनता जनता म्हणून जी आहे ती त्यांच्या मतानें शहाण्यानें सांगितलें असतां ऐकावें इतक्याच किंमतीची असते. जनतेला एकादी गोष्ट पटवून मग ती अमलांत आणणें म्हणजे सुधारणा कधीं व्हावयाचीच नाहीं, असें त्यांचें मत असल्यामुळें व राजसत्तेच्या जोरावर कोणतीही गोष्ट लोकांच्या गळीं बांधतां येते हें अर्धवट खरें तत्त्व पूर्ण खरें आहे असें त्यांस वाटत असल्यामुळें ते मंत्र्यांच्या कानास लागतात व कायद्याच्या जोरावर सुधारणा घडवून आणतात.

चौथ्या वर्गाचे सुधारक म्हणजे सवता सुभा वनविणारे. हेही साधनभेदामुळेंच पृथक्पणा प्राप्त करून घेतात. अमुक एक गोष्ट शास्त्रविहित आहे किंवा बुद्धीस पटत आहे पण समाज मात्र ती उचलावयास नाकबूल आहे असें त्यांस दिसून आलें म्हणजे ते तटकन् उठतात व आपल्या विचाराचें गोत स्वतंत्र जमवून समाजापासून पंथरूपानें तुटून निघतात. साधनभेदानें सुधारकांचा आणखी एक वर्ग पडूं शकतो, तो म्हणजे पडून घर घेणाऱ्या सुधारकांचा. हे कोणासच डावलीत नाहींत, शास्त्रास अवमानीत नाहींत, बुद्धीची संमति घेतच राहतील, बऱ्यावाईटाची निवड करतील, आपलें बोलणें समाजाला पटविण्याची शिकस्त करतील, समाजाची प्रवृत्ति बोटचेपी झाली आहे इतकें दिसलें, म्हणजे कदाचित् राजमंत्र्याकडेही जातील; पण समाजास वश करून घेणें तें बुद्धीनें आर्जवानें व सारासार विवेकानें करतील.

वरील वर्गांपैकीं चौथ्या वर्गांतील लोक इतर सर्व पद्धतींना कंटाळलेले असतात. ह्याच देहीं आणि याच डोळां त्यांना बुद्धीनें पटलेल्या सुधारणा हातांत यावयास हव्या असतात. लोक तर महा मुर्दाड आणि चेंगट. अर्थात् हें सगळें लोढणें गळ्यांत वागवावयाचें म्हटलें म्हणजे आपली विवेकबुद्धि मुद्दाम दडपून टाकणें त्यास प्राप्त होतें. हें पातक करावयाच्या ऐवजीं ते आपण होऊनच बहिष्कृत होतात. ते स्वतःच्या बुद्धीचा मान राखतात म्हणून त्यांच्या

संबंधानें आपल्याला आदर सुद्धां वाटतो. पण कार्याचें यश मात्र दिरंगाईवर पडतें हें तितकेंच खरें आहे. मनाच्या भिन्न भिन्न प्रकृती लक्षांत घेतां या वर्गाचे सुधारक समाजांत नेहमींच असावयाचे. स्वतःची सुधारणा कीं समाजाची सुधारणा या दोहोंच्या विवंचनेंत असतांना ते स्वतःच्या सुधारणेला जास्त मान देतात. अर्थात् एकदम पराकोटीला गेलेल्या या सुधारकाला, सुधारलेला हें नांव मिळूं शकतें, सुधारक हें नांव मिळूं शकत नाहीं. त्याचें बोलणें बरोबर असतें व वागणें खरें असतें. पण सुधारकत्वाचीं सर्व अंगें एकाच प्रकृतींत सारखींन विकसित होणें ही गोष्ट माणसाला सहज नाहीं, म्हणून आपल्यापरी तो बरोबरच असतो. पण सुधारणा पुढें ढकलण्याच्या दृष्टीनें त्याचा पुरेसा उपयोग होत नाहीं. तो निराळा निघाल्यानें त्याजवरचा समाजाचा विश्वास कमी होतो, व आपला पृथक्पणा न्याय्य ठरविण्यासाठीं त्याला बहुजन समाजाशीं सारखी हुजत घालावी लागते. शेवटीं असें होतें कीं, असला सुधारक समाजाचा उपकारकर्ता न राहतां समाजाच्या अनेक विरोधकांतच तो दाखल होतो. मनांत नसतांना सुद्धां आधींच बुजबुजलेल्या पंथांच्या संख्येंत तो भर मात्र घालतो.

उत्तर हिंदुस्थानांत सनातनी व आर्यसमाजी यांच्यांमध्यें चाललेल्या वादावादीचें व खटक्याचें मर्म काय आहे हें वरील विवेचनावरूनसुद्धां ध्यानांत येईल. आपलेपणाचा भाव तुटलेला असल्यामुळें समाजाचीं वैगुण्यें तो निसुखपणानें दाखवितो. अर्थात् समाजाशीं सारखा दावा मांडल्यामुळें त्याचें सुधारकपण क्षीण होत जातें. मागें असें ऐकण्यांत आलें होतें कीं, आर्यसमाजाचे पंजाबांतील आधारस्तंभ जे लाला लजपतराय यांनीं आर्यसमाजाच्या पटावरून आपलें नांव काढावयास सांगितलें व तेंहि या मुद्यावर कीं आपण असे कोणी सवते बनल्यामुळें व राहिल्यामुळें आपल्या सदुपदेशाचा सुद्धां समाजावर व्हावा तितका सुपरिणाम होत नाहीं. ही वातमी खोटी असली तरीसुद्धां वर दिलेल्या चर्चेला तिचें स्वयंभू बळ आहेच आहे. पण लजपतरायांची ही हकीगत खरी असली तर चर्चेचें मर्म चांगलें सोदाहरण मनांत भरेल म्हणून तिचा उल्लेख केला इतकेंच.

ही गोष्ट फटकून निघणाऱ्यांची झाली. तिसऱ्या वर्गाचे सुधारक सुद्धां

समाजाला अप्रियच बनतात; आणि देशावर परकीय संस्कृतीचा राजा असेल तर ते खासच अप्रिय बनतात. लोकांस साहजिकच असें वाटतें कीं, जी गोष्ट आम्हांस मान्य नाहीं, पटवून देण्याची तुम्ही खटपट केली नाहीं, ती आमच्यावर लादणारे तुम्ही कोण? आणि त्यांतही भिन्न संस्कृतीच्या परकी सत्तेच्या आधारानें या गोष्टी तुम्ही आमच्या गळ्यांत काय म्हणून अडकवाव्या? तुम्हांस आपलें कर्तव्य करावयास नको, अंग मोडून काम करावयास नको, आणि लोकांना गाढव ठरवून त्यांस जबरीनें शहाणपण शिकवितां काय? जनतेचा हा प्रश्न सुधारकानें खरोखरच ध्यानांत घ्यावयास हवा. कायदावाला सुधारक हळुहळू कसा चळत असतो हें मतलबी समाजाला स्पष्ट कळतें.

सध्यांचीच स्थिति घ्या. हिंदू समाजांतील असवर्ण पोटजातींनीं विवाह करावेत कीं नाहीं, याचा कायदा होऊं घातला असतां त्यावर होय किंवा नाहीं असें मत देणारे हे ख्रिस्ती किंवा मुसलमान कोण? हिंदूंना आपआपसांत काय करावयाचें असेल तें ते स्वतः वाटेल तें करतील. पण धर्मानें, आचार-विचारानें इतकेंच काय संस्कृतिविषयक प्रत्येक बाबींत हिंदूंचा व आपला संबंध नाहीं असें धडधडीत ठरवून घेऊन जे कोणी कायदेमंडळांत 'आमच्या मेंवरांची टोळी स्वतंत्र असावी' असें म्हणतात त्यांना तिसऱ्या समाजांतील केवळ समाजविषयक किंवा धर्मविषयक बाबीवर मत देण्यास कसलाही हक्क पोंचत नाहीं, हें सुधारकानें ध्यानांत घ्यावयास हवें. मागें गौर साहेबांचें मिश्रविवाहाचें बिल पुढें आलें. त्यावेळीं हिंदुस्थानांतील अठरा-पगड धर्मीयांनीं मतें दिलीं व वेडचा हिंदूंनीं तीं घेतलीं, ही गोष्ट उभयतांसहि सारखीच लाजिरवाणी आहे. उद्यां मुसलमान समाजांतील एकाद्या नाजूक बाबीसंबंधानें कौन्सिलांत बिल येऊं द्या व त्यावेळीं मुसलमानेतरांनीं मतें देण्याचा आव आणूं द्या म्हणजे काय नकाशा होतो तो दिसेल. असो. असल्या गुणांनीं सुधारणा मूळ धरीत नाहींच नाहीं. पण सुधारक शुद्ध बुद्धीचा असूनसुद्धां केवळ साधनभेदामुळें तो समाजाच्या रोषास पात्र होतो. बाकी तीन वर्ग राहिले. पहिला, दुसरा व पांचवा या तीन लोकांचें बरें बनतें.

जुन्या शास्त्रांच्या सम्मतीची ओढ लोकांना कितीही असली तरी सारासारविवेक व बुद्धीची शिकवण हींत्यांस डावलतां येत नाहींत. ज्या गुणांच्या बळावर मनुष्यत्वच सिद्ध करावयाचें त्याला सर्वथैव विन्मुख होणें कोणासच

पटण्यासारखें नसतें. शास्त्र जरी विरुद्ध आहे असें मानिलें तरी सुधारकानें आपल्या विवेकबुद्धीनें व तर्कानें प्रतिपादनाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली असली म्हणजे त्याच्या बोलण्याकडे लक्ष देणें समाजाला भागच पडतें. पण असें असूनसुद्धां शास्त्राची सम्मति शास्त्रांतूनच उकरून काढितां येत असली तर यश लवकर पदरांत पडतें. म्हणून पहिल्या प्रकारच्या सुधारकाशीं म्हणजे शास्त्रासच मानणाऱ्यांशीं दुसऱ्या व पांचव्या प्रकारचे सुधारक होतां होईतों संगनमत करतात व अशा रीतीनें हे तीनही जातींचे लोक म्हणजे शास्त्रास मानणारे, बुद्धि व विवेक यांस मानणारे, आणि दोघांनीं जें ठरविलें आहे तें साधनांच्या कौशल्यानें समाजाच्या पचनीं पाडणारे समाजास अत्यन्त उपकारक होतात. अर्थात्, फटकून निघालेले व शेणमार होऊन कदाचित् प्राणासही मुकलेले जे आत्मयागी, त्यांची किंमत कशानेंही कमी होत नाहीं. सुधारणेची वरात सुखानें पुढें सरावी म्हणून प्रत्येक वळणावर फुटणारे हे नारळ होत. ते फुटल्यानें इडापिडा टळते आणि सुधारणेचा छबिना वाजत गाजत जाऊन घरभरणी करतो. पण अभिप्रेत सुधारणा समाजाच्या पचनीं पाडणाराचे कष्टसुद्धां कमी नाहींत. आत्मयागी एकदां मरतो आणि हा चिकट सुधारक रोज तसूतसूनीं मरत असतो. मनुष्य एकवेळ प्रवृत्ति पिळवटून एका सपाट्यास आत्मदान करील. पण रोजची झुरणी सहन करीत राहणें यालाही सुधारणापर्वांत फार महत्त्व आहे. सबंध राष्ट्राचें म्हणून एक राष्ट्रीय मन मानिलें तर त्यांत होणारा हा श्रमविभाग होय. एकानें समाधान वृत्ति ठेवावी, एकानें पिसाळून जावें, एकानें जुन्याकडे ओढ खावी, दुसऱ्यानें नवीनाकडे खावी, अशीं विविध प्रकारचीं मनें एकाच पिढीला काम करीत असलीं तरी त्यापासून फायदाच होतो. असो. पण हे जे प्रत्यहीं काम करीत राहणारे सुधारक, त्यांच्या कल्पनांची थोडी जास्त छाननी केली पाहिजे. कारण समाज व ते स्वतः यांचें जमलें म्हणजेच सुधारणा पुढें सरते.

समाज बनविणारे लोक स्वसंरक्षणासाठीं एकत्र येतात. प्रत्येकानें आपापलें वैयक्तिक स्वातंत्र्य थोडें थोडें खर्चीं घातलें तर सर्वांसच वाटेल तितकें स्वातंत्र्य मिळूं शकतें. खांद्यावर फरशीं टाकून दोन चार कुत्रीं बरोबर घेऊन रानोमाळ भटकणाऱ्या कोणत्याही स्वातंत्र्यप्रिय 'एकाकी' रानटी मनुष्यापेक्षां सामाजिक मनुष्य, कीं जो विनय शिकला आहे, प्रामाणिकपणा

शिकला आहे, घर बांधून वसला आहे, सदाचरण शिकला आहे, तो दसपट स्वातंत्र्य अनुभवितो; चोरी करावयाची नाहीं असें त्यानें एकदां ठरविलें म्हणजे त्याची चोरी होण्याची भीति नाहींशी होते; लोकांची चोरी न करण्यांत त्याचें प्रवृत्तिस्वातंत्र्य नष्ट होतें हें खरें; पण तेवढ्यामुळें दाराला साधें कुलूप लावून त्याला चारही खंड पृथ्वी हिंडून येतां येतें; असलें जबर स्वातंत्र्य त्याला प्राप्त होतें. ही आपल्या स्वातंत्र्याच्या त्यागाची गोडी जों जों जास्त लागत गेली आणि म्हणून इतर स्वातंत्र्यें मन-मुराद अनुभवितां येऊं लागलीं तों तों मनुष्य अधिकच सामाजिक बनत चालला हें स्पष्ट आहे.

ज्या ज्या आचारपद्धतीनें त्याला हें सुख प्राप्त करून दिलें त्या पद्धतीस अर्थात् तो बळकट धरून बसतो. तिचें उपकारकत्व पिढ्यान्‌पिढ्या त्याच्या प्रत्ययास आलेलें असतें व मग कोणत्या कारणांनीं आणि कोणत्या परिस्थितींत त्या त्या पद्धती रूढ झाल्या तें विसरून जाऊन ते आचार मात्र तो केवळ न कळतच चालू ठेवीत असतो. रोजच्या व्यवहारांत त्याचें मन नेहमीं गढून गेलेलें असल्यामुळें आपल्या आचारांची पाहणी करण्याचें त्याच्या मनांतही येत नाहीं. इतकेंच काय पण जर त्या आचारांत कोणी बदल करावा असें म्हटलें तर त्याला त्याचा विस्मय वाटतो व रागही येतो. आचार ज्या तत्त्व-ज्ञानावर रचला तें तत्त्वज्ञानच साफ ढासळलें आहे या गोष्टीची जाणीव त्यास एकाएकी होणें व ती पटणें हें केवळ अशक्य असतें, आणि म्हणून तो जुन्यांत जोरानें पाय रोवून उभा राहतो, आणि सुधारकाकडे तिरस्कारानें पाहतो. सुधारक तितकाच कडवा असला म्हणजे तो त्याला दुराग्रही, जुन्यास कवटाळणारा, जुनें तितकें सोनें मानणारा, पुराणप्रिय इत्यादि विशेषणें देतो. पण जर आपल्या कामाचें खरें स्वारस्य त्याच्या ध्यानीं आलें असेल तर तो ओळखितो कीं, ज्याला दुराग्रह म्हणून संबोधण्यांत येत आहे त्या रूपाच्या समष्टिरूपाकडे पाहिलें तर उपकारक तत्त्वज्ञानाला टिकाऊपणा प्राप्त करून देणारा सामाजिक मनाचा तो सहजधर्म होय.

या धर्ममुळेंच तत्त्वांना प्रतिष्ठा मिळते, आणि समाजाचे भोंवतीं-भोंवतीचे थर खपरेलासारखे ढांसळत असले तरी मध्यस्तंभवर्ती समाज छिन्न-विच्छिन्न न होतां उभा राहतो. म्हणजे ज्याला दुराग्रह म्हणून सामान्यतः

संबोधितात तो पूर्वी केव्हां तरी संभावित व सर्वमान्य असा विचार असतो. अर्थात् त्याचें उच्चाटन करणें म्हणजे साधी गोष्ट नाहीं. सुधारक जर केवळ शिवी देऊन मोकळा होईन असें म्हणेल, समाज आचरट आहे, चेंगट आहे, दुराग्रही आहे असें म्हणेल तर सुधारकाचें चालावयाचें नाहीं. नांव ठेवून दूर सरकणारा सुधारक आपलें कर्तव्य बरोबर जाणत नाहीं. ज्यांची सुधारणा करावयाची त्यांची इतराजी करून घेणें यशाच्या दृष्टीनें बरें नाहीं. लोकांस आपल्या बाजूस वळविण्यासाठीं केवळ निषेधाहून जास्त आकर्षक आणि खात्री पटविणारें असें दुसरें कांहीं तरी त्याजपाशीं पाहिजे. कारण आरोपानें प्रत्यारोप मात्र होतो. समाज जर 'दुधखुळा' तर सुधारक 'फाटिंग' ठरतो. समाज जर 'दुराग्रही' तर सुधारक 'बहकलेला' असें होतें. म्हणून सुधारणा साधण्याचा खरा मार्ग म्हटला म्हणजे जनसमूहांत चालू असलेल्या ज्या पीठिका असतील त्या उकलून दाखविणें हा होय.

सध्यां रूढ असलेल्या ज्या चाली अमुक एका कारणामुळें उत्पन्न झाल्या होत्या, तीं कारणें सध्यां विद्यमान् नाहींत आणि म्हणून त्या चाली सोडल्या पाहिजेत असें प्रमाणपुरःसर बोलणें सुधारकानें बोलावें. याचा अर्थ असा कीं, लोकांचा सामाजिक इतिहास बारकाईनें पाहणें, सूत्ररूपानें चालू असलेल्या धर्मग्रंथांतील संहितेचें पूर्वीचें भव्य रूप कोणतें याचा तलास लावणें, हें सुधारकास करतां आलें पाहिजे. म्हणजे सुधारक हा विद्वान् असावयास पाहिजे. त्याचें प्रतिपादनाचें धोरण असें असावें कीं, जुनें चूक आहे असें त्यानें म्हणूं नये तर जुनें आज गैरलागू आहे असें म्हणावें. असें म्हणतांना या विधानांतील सर्व जबाबदारी मात्र त्यानें उचलली पाहिजे. जुनें प्रस्थापित झालें त्या काळीं तें कसें सुयुक्तच होतें; पण परिस्थिति बदलल्यामुळें तें पूर्वीचें सुयुक्तसुद्धां कसें गैरलागू झालें आहे हा दुहेरी सिद्धांत त्यानें समाजास पटवून दिला पाहिजे. हें त्यानें केलें नाहीं तर 'पूर्वज काय मूर्ख होते?' या समाजाच्या प्रश्नाचें समाधान होऊं शकत नाहीं. समाजाचें विचारणें बरोबरच असतें. पूर्वज मूर्ख नव्हतेच नव्हते. जी ती पिढी आपापल्या काळाची मालक असते ही गोष्ट सर्वांनीं ध्यानांत ठेवावयास हवी. आपण ज्याप्रमाणें आपल्या कालाची गति लक्षांत घेऊन फरक करावयास सिद्ध होतों व तो करणारास कर्तबगार म्हणतों, त्याप्रमाणेंच जुन्या चालींचे पूर्वींचे उत्पादक कालगति जाणणारे

होते व तदनुसार कर्तवगारी करणारे होते. अर्थात् त्यांचा तेव्हांचा इतिहास दाखवून त्यांचें तत्त्वज्ञान कसें झिजून गेलें आहे हें सोपपत्तिक दाखविणें हा एकच इलाज सुधारकास शिल्लक राहतो.

जुन्यानव्याची सांगड—

दुसरें असें कीं, ही जुन्याची झीज जशी दाखविली तसें नवीनाची उपयुक्तता व सामर्थ्य हीं नवीनाला स्थिरपणा कसा प्राप्त करून देतात याचाही त्यानें उलगडा केला पाहिजे. कदाचित् जुनें वाईट हा भाग खरा असेल, पण वाईट आणि चांगलें हे सापेक्ष शब्द असल्यामुळें नवीनाचें चांगलेंपण व स्थैर्य हीं त्यांनीं दाखविलीं पाहिजेत. तसें केलें नाहीं तर समाज विश्वास ठेवीत नाहीं. नवीन तत्त्वज्ञान जर आळून घट्ट बनलें नसलें व आपल्या पाठीवर पुनर्घटित समाजास तोलून धरण्यास असमर्थ असलें तर समाज साशंकच राहील. संस्कृत वाङ्मयांत सांगितलेला गवतावरचा प्राणी पुढील काडीचा आश्रय भक्कम सांपडल्यानंतरच पहिल्या काडीवरचा पाय सोडावयास तयार असतो, तसेंच समाजाचें. 'ओल्ड ऑर्डर चेंजेथ, यील्डिग प्लेस टु न्यू' या सुप्रसिद्ध वाक्याचें पहिलें अर्धुक आपण जितकें आळवितों तितकें दुसरें आळवीत नाहीं ही चूक आहे. जुनें बदलतें हें खरें व म्हणून आम्हीं जुनें टाकावें हेंहि खरें. पण नवीन तें कोणतें, त्याचें रूप दाखवा, त्याला स्थैर्य प्राप्त झालें आहे का हें सांगा, असें समाजास म्हणावयाचें असतें. फुकाफुकी स्थलांतर करावयास कोणीच तयार नसतो. हा विचार सुधारकानें मनापुढें सदैव ठेविला पाहिजे.

शिवाय सुधारणाविषयक त्या त्या विषयांचीं केवळ ठोकळ नांवें घोटीत राहिल्यानें कार्याचें यश जवळ येतें असें मुळींच नाहीं. जातिभेद मोडला पाहिजे, अस्पृश्यता–निवारण केलें पाहिजे, रूढींचा उच्छेद केला पाहिजे, अशा प्रकारचीं सामान्यार्थाचीं विधानें जुन्या पागोटयाच्या आहेराप्रमाणें माणसांनीं एकमेकांस शंभरदां पोंचविलीं आहेत. पण तें तें वाक्य बोलणारास पदर धरून विचारलें कीं, तुझ्या विधानाचा बारकावा सांग, तर त्याचीहि थोडी लटपटच उडेल. हीं सामान्य विधानें करतांना सुधारकाला केवळ शिफारसच करावयाची असती तर लोकांनींही होय म्हणून त्याचे कान

संतुष्ट केले असते. म्हणजे हा केवळ शब्दांच्या देवघेवीचा प्रश्न असता तर सुधारकाचा आग्रह आणि जनतेची उत्सुकुता यांचा सुंदर मिलाफ झाला असता! आपल्या मिठाईचा वास घेत राहणाऱ्या एका आधाशाला हलवायानें किंमत मागितली. त्या आधाशानें इतकेंच केलें कीं पैशाचा खिसा नुसताच खुळखुळवून दाखविला. हलवायानें त्याला केवळ सुवासानें तृप्त केलें, तर आधाशानें केलेल्या केवळ नादानें हलवायानें संतुष्ट व्हावयास हवें! असला प्रकार येथें नसतो. लोकांनीं आपल्या म्हणण्यास अनुसरून वर्तावयास हवें असें सुधारकांचें मत असतें. असें जर आहे तर 'तुझ्या सामान्य विधानांचा व्यवहारांतील बारकावा सांग' या जनतेच्या सवालाकडे त्यानें लक्ष दिलेंच पाहिजे. "तुम्हांस हें तत्त्व पसंत आहे का? म्हणजे सामान्य विधान पसंत आहे का? असल्यास मग त्याचा तपशील मागाहून पाहात बसूं" असें म्हणणें पगदस्तीपणाचें आहे. त्यांत ऋजुता नाहीं आणि यशावर आपली दृष्टि जर खिळवावयाची असेल तर पायारूप कल्पनांच्या विवरणांत डाव टाकून चालावयाचें नाहीं. विचाराची ही पद्धति स्वीकारली तर आपल्याच कल्पनेचा तपशील स्वतःच्या मनाशीं बारकाईनें चिंतणें सुधारकास अगत्याचें वनतें, व तो तपशील समाजापुढें स्पष्ट मांडला म्हणजे समाजाचा अनुनय करण्याची जरूरी किती आहे हें त्याच्या ध्यानांत येईल. आपण रोजच्या व्यवहारांत उतरलों म्हणजे सामान्य विधानांनीं भागण्यासारखें नसतें. कारण उद्यां सकाळीं उठल्याबरोबर 'काय करूं', आपल्या प्रतिपाद्य विषयाच्या संबंधानें लोकांना स्वीकार्य वाटेल असें 'काय करूं' हा प्रश्न सुधारकापुढें कायमचा उभा असतो. म्हणून सुधारकाचें बोलणें सुनिश्चित कल्पनांचें असावें.

आमच्या सामाजिक सुधारणेचा पाय परकीय राज्यसंस्थेच्या रथचक्राला बांधलेला आहे. त्यामुळें राज्यकर्त्यांच्या देशांत जे जे कांहीं सामाजिक उत्पात होतात त्यांचें लोण मूळ रूपानें किंवा निदान पडसादरूपानें तरी आमच्या देशास येऊन पोहोचतें; आणि जे पाहतात त्यांना तर हें स्पष्ट दिसतें कीं, तिकडील देशांत तर उत्पाताची केवळ परंपराच चालू आहे. दर पिढीच्या अवकाशांत निरनिराळीं समाजविषयक तत्त्वज्ञानें तेथें प्रादुर्भूत होत आहेत. इतर युरोपियन राष्ट्रांशीं असलेले त्यांचे संबंध, साम्राज्य टिकवून ठेवण्याचे व तें मोडण्याचे इतरांचे प्रयत्न, देशांतील शेतीची दैना, परकीय देशांतील

वाजारपेठा हस्तगत असल्यामुळें सर्वत्र माजलेली कारखानदारी, अशांसारख्या अनेक वावींमुळें कित्येक सामाजिक परिवर्तनें तेथें घडत आहेत व राजकारणाच्या नगाऱ्याच्या घाईंत ज्या दुसऱ्या कांहीं समाजविषयक गोष्टी मधून मधून ऐकूं येतात त्यांवरून त्यांच्या समाजाच्या टिकाऊपणाविषयीं आपल्या समाजास वळकट वहीम येतो. अर्थात् त्यांच्याकडेच लेचींपेचीं ठरलेलीं ज्ञानें आणि तत्त्वें सुधारक बिनटीक आणि जशींच्या तशीं पत्करावीं असें म्हणूं लागला तर समाजालाही मोठी अडचण उत्पन्न होते.

दुसरें असें कीं, आपण जर केवळ झुलू लोकांसारखे असंस्कृत असतों तर त्यांनीं अर्धवट वापरून टाकून दिलेलीं तत्त्वें, म्हणजेच त्यांच्या अंगावरचे उतारे आपण पत्करिले असते. पण हें कसें होईल? केवळ त्यांच्या म्हणजे युरोपियनांच्या सद्यःकालीन वैभवाकडे पाहून त्यांचें बोलणें किंवा करणें केवळ अनुकरणीय आहे असें मानणें चुकीचें होईल. आपण तर एका मोठ्या संस्कृतीचे वारसदार आहों, खानदानीचे आहों, पीठिका उत्पन्न केलेले आहों, राज्यें व साम्राज्यें विस्तारविलेले आहों, अर्थात् राज्यसत्ता हातीं असती तर अमुक एका प्रकारें वनत आलेल्या व आपल्या मनांतून उद्भवलेल्या विचारांची छाया ज्यांवर पडली आहे अशीं ज्ञानें आपण पत्करिलीं असतीं. तें तर दूरच राहिलें, पण युरोपियनांच्या झगझगीमुळें त्यांना गुरु मानण्याचें जर सुधारकानें पत्करिलें तर तें केवळ फायद्याचें होईल असें समाजास वाटत नाहीं.

समाजाची ही प्रवृत्ति वाढावयास आणखी एक कारण झालें आहे. आमच्यांतील कित्येक पंडित एका अंगास असें म्हणत आहेत कीं, आपलें सर्व चुकलें आहे; युरोपियन वोलतात तें खरें आणि म्हणून आपण त्यांच्यासारखे झालें पाहिजे. हें त्यांचें जों ऐकावें तों दुसरीकडे कित्येक पाश्चात्य पंडित आपणां प्राच्यांची स्तुति करीत आहेत; व आपणां स्वतःस कमसंस्कृतीचे मानून उद्वेगानें दाढी उपटीत आहेत असें दिसतें. या देखाव्यामुळें शंकाखोर समाज अधिकच कुशंकी बनतो. अर्थात् वर प्रतिपादलेली सुधारणाविषयक सामान्य विधानांची तपशीलवार चर्चा किती महत्त्वाची आहे हें यावरून स्पष्ट दिसेल. दुसऱ्याकडून आणावें पण तें सगळेंच्या सगळें लागू करून घेऊं, या इराद्यानें

आणूं नये. जांगड आणावें आणि पसंत वाटल्यास आणि पसंत पडेल तेवढेंच ठेवन घ्यावें. असें केलें तर समाजही सुधारणेला विन्मुखच राहील असें नाहीं.

सापेक्ष विचार—

पण या सर्वांहूनही जास्त महत्त्वाचा असा आणखी एक विचार सुचवावासा वाटतो व तो म्हणजे सर्व ठिकाणीं सापेक्ष विचाराची आवश्यकता हा होय. आपलें जीवित म्हणजे अनेक भिन्न भिन्न तत्त्वांचा खच आहे. कोणत्याही एकाद्या सन्मान्य संस्कृतींतील माणसास घेऊन त्याला तपासून पाहिलें तर त्याच्या भोंवतीं शेंकडो लपेटे वसलेले आहेत असें दिसेल. त्याच्या मनावर शेंकडों आवरणें असून तीं सगळींच्या सगळीं संभाळणें अवश्य आहे असें तो समजतो. हीं संभाळलीं तरच जीवित पूर्ण होतें असें त्यास वाटतें. कोणत्या का कारणानें, मग तीं स्वाधीनचीं असोत किंवा पराधीनचीं असोत, त्याला तीं जर संभाळतां आलीं नाहींत तर त्यास उद्वेग उत्पन्न होतो. आपलें कांहींतरी कमी पडत आहे या जाणीवेनें त्याच्या मनाला हुरहुर लागते व जीवितांत उत्पन्न होणारे रस त्याला रुचकर लागत नाहींत. हीं जीं भिन्न भिन्न आवरणरूप मतें अथवा कल्पना किंवा संकल्प-विकल्प तीं सर्वच आपापल्या परीं इतकीं महत्त्वाचीं असतात कीं त्या सर्वांचें लटांबर बरोबर घेऊन जाणें त्यास अगत्य असें वाटतें. हजारों वर्षें माणसाची जात व्यक्तीचे, कुटुंबाचे व समाजाचे असे धर्म रचीत आहे व विस्कटवीत आहे. अर्थात् या सर्व घटनेची व विघटनेची कल्पनारूप आस्तरणें, कांहीं सबंध धड, कांहीं दंड घातलेलीं, तर कांहीं केवळ लक्तऱ्यावजा आपल्या मनावर टिकून राहिलेलीं आहेत. पण या अंतराळीं बोलण्याचा थोडा खुलासा करणें जरूर आहे. आपण ज्या अनेक गोष्टींना मान देतों त्यांची मोजदाद करून पाहणें जरूर असलें तरी शक्य झालें असतें तर फार वरें झालें असतें. पुढें दिलेल्या तत्त्वांपैकीं प्रत्येकानें मनुष्याच्या जीवितावर सदैव सत्ता चालविलेली आहे. म्हणजे असें कीं, यांपैकीं प्रत्येकासाठीं बाकीचीं सारीं क्वचित् प्रसंगीं माणसानें अवहेललेलीं आहेत व प्रसंगानुसार त्या तत्त्वांसाठीं प्रत्यक्ष जीविताचें सुद्धां बलिदान केलेलें आहे. असें झालेलें असल्यामुळें हीं सर्व तत्त्वें उंच पीठावर अधिष्ठित झालेलीं आहेत, व म्हणून नैवेद्य दाखवितांना त्या सर्वांनाच आवाहन करावें लागतें. प्रेमासाठीं माणसानें जीव दिल्याच्या आणि राज्यें

गमावल्याच्या कथा सर्वांना माहीत आहेत. पण देशाभिमानासाठीं प्रेम बाजूस सारलेले वीर पुरुष आहेतच. वात्सल्यबुद्धीनें क्षणभर कां होईना पण देशाभिमानाच्या कल्पनेवर ताण केल्याचें राणा प्रतापसिंहाचें उदाहरण आहेच. ऐन यौवनांतलें पत्नीचें प्रेम बाजूस सारून लक्ष्मणानें बंधुप्रेम कळसास नेऊन पोहोंचविलें. स्वामिनिष्ठेचीं उदाहरणें तर इतिहासभर पसरलेलीं आहेत. धर्मासाठीं लक्षावधि लोकांनीं जीव दिले आहेत तर वतनासाठीं धर्म झिडकारल्याचीं उदाहरणें अनेक आहेत. वंश कायम रहावा म्हणून नियोग पत्करल्याचीं उदाहरणें आहेत; आणि नीतीनेंच जीवित दवडावें म्हणून माणसानें वंशच्छेदहि पतकरिले आहेत. पातिव्रत्य कल्पनेनें स्त्रियांनीं स्वत:ची होळी केलेली आहे. पण गुरुभक्तीसाठीं पातिव्रत्याचें फूल गुरुचरणींहि वाहिलेलें आहे. स्त्रियांच्या रक्षणासाठीं शेंकडों पुरुषांनीं समरकुंडांत उडी घातली आहे; पण स्वसंरक्षणासाठीं 'दारैरपि धनैरपि' हाहि मंत्र रचिला आहे. न्यायासाठीं वाटेल तसलें विडंबन माणसानें पतकरिलें आहे. पण एका पुरुषश्रेष्ठानें 'अर्थस्य पुरुषो दास:' हा न्याय सांगितला आहे. भक्तीसाठीं अनेकांनीं आपल्या माना चंडीपुढें कापिल्या आहेत, पण शरीर बेतानें खर्चून म्हणजे पुरवून पुरवून परमार्थ कर असा उपदेश तुकारामबावांनीं केलेला आहे. एका सबंध ज्ञातींत पुरुषांना हवें म्हणून मांसाशन करूं देऊन सर्व स्त्रियांनीं मात्र आहारशुद्धीचें व्रत शतकानुशतकें चालविलेलें आहे; पण जीव–धारणासाठीं मोठ्या ऋषीनेंसुद्धां कुत्र्याची तंगडी चघळलेली आहे. स्वाभिमानासाठीं शाहूमहाराजांनासुद्धां कांहींसा उपमर्दकारक निरोप धाडावयास त्यांचा एक सरदार चुकला नाहीं, पण आपल्या बालधन्याची काळजी म्हणून डोईवरचें पागोटें उडालें तरी तो अपमान एका मुत्सद्यानें गिळून टाकिला आहे. एकपत्नीव्रत गाजवून अयोध्येचा भूपाळ अवतारकोटींत दाखल झाला हें जसें खरें आहे तसेंच आर्थिक पेचांत सांपडून प्रत्यक्ष पतीस व्यभिचार करावयाची परवानगी स्त्रियांनींच दिलेलीं उदाहरणेंहि सांपडूं शकतात.

एतावता काय कीं, वर उल्लेखिलेल्या सर्वच तत्त्वांना प्रसंगोपात्त वहर येतो, आणि सर्वांनींच मनुष्याच्या जीवितावर आपापला रंग चढविला आहे. म्हणून सुधारकानें हें लक्षांत ठेवावयास हवें कीं, कोणत्याही त्याच्या आवडीच्या

तत्त्वानेंच केवळ मनुष्याचें जीवित अंकित झालें नसल्यामुळें तें तत्त्व कोठपर्यंत पतकरावें म्हणजे त्याची जास्तींत जास्ती मर्यादा किती असावी हें त्यानें विवेकबुद्धीनेंच ठरवावयास हवें. धर्म थोर झाला म्हणून त्यास अर्थशास्त्राची अपेक्षा नाहीं असें नाहीं. किंवा अर्थशास्त्र थोर असलें म्हणून त्याला कौटुंबिक प्रेमाची अपेक्षा नाहीं असेंही नाहीं. स्त्रीविषयक प्रेम कितीहि बलवत्तर असलें तरी त्याला बंधुप्रेमाचा मान ठेवावा लागतोच लागतो. म्हणजे आपापल्यापरी थोर असलेल्या या सर्व तत्त्वांना, आपल्याशिवाय वाकीचे इतर विचार माणसाच्या जीवितांत टिकावयास हवेच असतात. त्यांना त्यांची अपेक्षा असते, म्हणून हे सर्व विचार परस्पर–सापेक्ष आहेत. या सर्व तत्त्वांचा, कल्पनांचा अथवा भावनांचा जेवढा जेवढा अंश आपल्या नित्याच्या राहणीला अवश्य असतो तेवढा घेऊन त्या सर्वांच्या मिलाफानें माणसें आपल्या जीवितांत स्वारस्य उत्पन्न करतात.

शरीर दहावारा पृथक् द्रव्यांचें झालेलें असून तीं परस्परांशीं अमुक एका वांधीव प्रमाणानें राहतात; हें प्रमाण कमीजास्त झालें तर डॉक्टरांचें काम इतकेंच कीं, कोणतें द्रव्य कमी किंवा जास्त झालें आहे हें पाहणें, व आपल्या औषध--योजनेनें कमी द्रव्याची भरपाई करणें किंवा जास्त झालेलें मर्यादेंत आणणें. हें जसें, तसेंच सामाजिक मनाचें म्हणजे सुधारणेचें होय. काय कमी पडत आहे, सामाजिक द्रव्यांपैकीं कोणतें एक इतरांशीं आपलें प्रमाण राखीत नाहीं, हें सुधारकानें पाहावें व तेवढी भरपाई करण्याचा सक्त प्रयत्न करावा. पण जर का त्याला प्रतीत झालेली गोष्ट तो इतर तत्त्वें खर्चीं टाकूनहि पुढें हाकूं लागला तर तो आपलें अपयश आपल्याच गुणांनीं मिळवितो. म्हणून कोणतेंहि तत्त्व केवळ निरपेक्ष, अनवलिप्त, इतर तत्त्वांच्या छायांनीं अनंकित आहे असें सुधारकानें समजूं नये.

स्त्रीशिक्षण, मिश्रविवाह, लोकसत्तावाद अशांसारखे अनेक प्रश्न समाजांत उत्पन्न झाले आहेत. आणि त्या त्या प्रश्नांचे पक्षपाती सुधारक आपल्या प्रतिपादनांत एकच एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे, म्हणजे इतरांना कांहींच महत्त्व नाहीं, पण हिला मात्र आहे असें वोलूं लागतात. त्या वेळेस नम्रपणानें त्यांच्या नजरेस इतकेंच आणून द्यावयाचें असतें कीं, केवळ समता, केवळ न्याय, केवळ

बंधुभाव, केवळ स्वातंत्र्यप्रीति, केवळ व्यक्तिस्वातंत्र्य इतर तत्त्वांची अपेक्षा न बाळगतां आपल्या व्यवहारांत उत्कर्ष पावतील किंवा टिकून सुद्धां राहतील असें नाहीं. म्हणून वर सांगितलेली सापेक्ष विचाराची आवश्यकता त्यांनीं मानावयास हवी. वर उल्लेखिलेलीं तत्त्वें व जीं अनेक तत्त्वें अनुल्लिखित राहिलीं आहेत त्यांच्या संयुक्त गतिविशेषाला प्रगति हें नांव प्राप्त होतें. 'आपापल्या परीं ज्यांचें त्यांचें बोलणें खरेंच असतें,' हें जें आपण व्यवहारांत अनेकदां बोलतों त्याला फार अर्थ आहे.

खरोखरीच थोडाथोडा खऱ्याचा भाग परस्परविरोध्यांना आलेला असतो· हें ओळखून काय कमी पडत आहे हें जो कोणी हेरतो त्याचें नांव त्या वेळचा "तत्त्ववेत्ता"; इतर गोष्टी कांहींशा कमी लेखून, कमी पडणारें जें असतें तें पुरविणारा तो सुधारक होय. त्याच्या पद्धतिविशेषानें त्याला कदाचित् विभूतिमत्वसुद्धां प्राप्त होईल. पण विभूति जरी झाली तरी ती इतर सर्व वाकीच्या लोकांसारखीच असावयाची. जसे वाकीचे लढवय्ये सैनिक तसाच हाही एक सैनिक. अमेरिकन तत्त्ववेत्ता म्हणतो, त्याप्रमाणें त्याचा विशेष इतकाच कीं इतरांच्याहून त्याची तलवार चार अंगुळें ज्यास्त लांब असते. ज्या सुधारक चमूंतून हा वीर बाहेर पडावयाचा तिला सापेक्ष विचाराची आवश्यकता किती असते याची या विवेचनावरून कल्पना येईल. पण यावरून असें समजावयाचें नाहीं कीं, या सर्व बाबी माणसाच्या जीवितांत सम प्रमाणांत मिसळलेल्या असतात. म्हणजे प्रत्येक तत्त्व शेंकडा पांच टक्के असावयाचें असें नाहीं. पण सम प्रमाणांत नसलीं तरी अमुक एका बांधीव प्रमाणानें तीं तत्त्वें खास मिसळलीं आहेत. असें असल्यामुळें त्यांच्या परस्पर-व्यापारांत चांगला संवाद राहतो. पण जर कां हें प्रमाण विनसलें, म्हणजे जें तत्त्व निदान पंधरा टक्के असावयास हवें तें दोनच टक्के उरलें तर तीं परस्परांशीं विसंवादी बनतात आणि जीविताच्या वीणेला विस्कटलेल्या तारांचा आवाज ऐकूं येतो. माणसांचें सामुदायिक जीवित जर भांडखोरीचें, वितंडेचें असें झालें तर समजावें कीं या लोकांच्या जीवितांतील वरील प्रमाण बिनसलें आहे. एकादे वेळीं बाकी गोष्टी ठीक असून न्यायबुद्धिच आटली असेल; किंवा समताबुद्धीची पुसटसुद्धां ओळख राहिली नसेल; असें निदर्शनास आलें म्हणजे नवीन चळवळीचे आरंभ होतात. पण ही चळवळ सुरू झाली असतां

धोक्याची जागा असते ती ही कीं, सुधारक हा त्या एकाच तत्त्वासंबंधानें एकांतिकपणानें बोलूं लागतो. केवळ त्याच तत्त्वाचें महत्त्व त्याला उत्तम प्रतीत झालें असल्यामुळें व त्याच्या मनाचा सर्व अवकाश तन्मय झाला असल्यामुळें तो वेळीं अवेळीं त्याचेंच प्रतिपादन करीत रहातो.

एकादा घावाडावानें काम करणारा मनुष्य बळें सुद्धां असें करील. आपलें बोलणें त्याजविषयीं नाहीं. अतिशयोक्तिप्रियता हेंच ज्याच्या बुद्धीचें अवलक्षण आहे त्याच्या संबंधीचें हें बोलणें आहे. आपल्याला पटलेल्या कल्पनेचें महत्त्व सांगतां सांगतां तो तें प्रकरण इतकें ताणीत नेतो कीं, यशाची वांछा असतांना आणि तें साध्य होणें शक्य असतां त्याच्या हातून अपयशाची मात्र पैदास होते. अतिशयोक्ति करणारास वाटतें कीं, आपलें तत्त्व आपल्याइतकें कोणासच उमगलें नाहीं आणि बहुजन समाजास तर मुळींच नाहीं. स्वयंशिक्षित समाज मनांत म्हणतो कीं, याच्या यशाची हद्द मागेंच राहिली. आतां हा उगाच पुढें पळत आहे. याचें बोलणें आमच्यांत जेवढें उतरावयास हवें होतें तेवढें उतरलें आहे. सुधारक म्हणतो, लोक ढिले आहेत. समाज म्हणतो, आम्हीं सापेक्ष–विचारी आहों, तुम्हीं निरपेक्ष आहां म्हणजे फाटिंग आहां! म्हणून कर्त्या सुधारकानें एवढेंच पाहिलें पाहिजे कीं, कोणत्या गुणाच्या भरपाईची अपेक्षा किती आहे.

हिंदुसमाजाच्या स्थितींत फरक--

हिंदु समाजाच्या स्वरूपांत सपाटयानें पडत चाललेला फरक त्याच्या सर्व थरांना चांगला भासूं लागला आहे. आज जगलों, आतां उद्यां जगण्याची काय व्यवस्था करावी, ही विवंचना लागलेल्या माणसापासून तों वर्षावर्षांत आपण कशाच्या जोरावर अन्न खातों व भोग भोगतों याची ओळख करून घेण्याची कल्पना सुद्धां ज्याच्या मनाला शिवली नाहीं अशा निर्विकल्प माणसापर्यंत सर्वांना या खोल समुद्रांत कांहींतरी एक मोठी चलबिचल चालू झाली आहे याचें ज्ञान निखालसपणें पोंचलें आहे. सांस्कृतिक दृष्ट्या केवळ खंक अशा माणसापासून तों अंगाभोंवतीं लपेटून घेतलेल्या संस्कृतीच्या दडपणांत गुदमरून गेलेल्या माणसापर्यंत सर्वांना, काय घ्यावें, काय टाकावें; याचा विवेक करणें प्राप्त झालें आहे. मीही म्हणजे कोणीतरी आहे, नुसता वाळका पाचोळा नव्हे, कीं जो दुसऱ्याच्या चुलवणाखालींच जळावा असा

आत्मज्ञानाचा गूढ हुंकार अगदीं तळच्या माणसाला सुद्धां येत आहे, व त्या-बरोबरच लहान खांद्यावर जडविलेलें बडेपणाचें डोकें केवळ कष्टानें व परंपरेनें संभाळणाऱ्या पुष्कळांना हें कस्तर केलेलें पोकळ अवडंबर बरोबर आहे काय? असा आत्मशोधनपर प्रश्न स्वत:लाच विचारावासा वाटूं लागला आहे. जन्माला येऊन मरेपर्यंत मुंभ वळणें, लोकांच्या घरांवर तुरकाटच्या हंतरणें, नाहींतर फुफाटचाच्या लगद्यांत नाचणें हेंच कां पतकरावें असा प्रश्न, प्रत्यक्ष तीं तीं कामें करतांनाच, तीं करणारांनाच उद्भवत आहे. व त्याबरोबरच दुसरीकडे, गादीवरून गाडींत व गाडींतून गादीवर एवढीच तसदी शरीराला देणारांना आपला कपडा आपण विणला पाहिजे व आपल्या हातानें भुई-तील तणें उपटून तेथें स्वकष्टानें दाणा पिकविला पाहिजे असें वाटूं लागलें आहे. 'मी स्वाभिमानानें जगणार' असें ओरडत ताठ उभें राहणाऱ्या गावं-ढचाला 'वडील सांगत आले' या वाक्याची खोळ लांडी होऊं लागली आहे, आणि नागर विचारवंत हा आत्मचौकस बनून आपल्याच पाठीवर आसूड मारून घेत आहे. एतावता काय कीं, या अफाट हिंदू समाजाला जोराच्या शिलका बसत असून, राजकीय, सामाजिक व धार्मिक समाजपुरुष खडबडून जागे होण्याचीं हीं पूर्वचिन्हें आहेत, हें त्याच्या राष्ट्रीय जीविताची परीक्षा कर-णारे ओळखून निश्चल मनानें उभे असले तरी सर्वत्र चिंतेची छाया पसरली आहे. पूर्वरूढीप्रमाणें जीवितांत स्थिर झालेल्यांना, मग ते समाजाच्या कोणत्याहि कोष्टकांत बसलेले असोत, सर्व लोकांचें जीवित निखळत आहे असें वाटतें. नवमतवाद्यांच्या पदरास धरून 'तुला काय विधायक पाहिजे' म्हणून विचार-ल्यास त्यालाहि स्वत:च वांच्छिलेल्या घटनेची आंखीव कल्पना नसल्यामुळें हे नवे लोक केवळ कोलमडत चालले आहेत, असें जुन्यांस वाटत आहे.

राष्ट्रीय जीवितविचार चिकित्सून पाहण्याच्या कामीं पोथीवाल्यांपासून तों टिकाववाल्यांपर्यंत तमाम लोक सामील झालेले असून चट साऱ्या जुन्या कल्पना, मग त्या खुरटलेल्या असोत कीं फोफावलेल्या असोत, वांझ असोत कीं फळ धरणाऱ्या असोत, या प्रचंड विचारकटाहांत क्वचित् उल्हासानें व क्वचित् केवळ बिनमुर्वतीनें फेकून देण्यांत येत आहेत. 'आमच्या काळाचे आम्ही मालक आहों' हा यथायोग्य अभिनिवेश सर्वत्र पसरला असून भविष्यत्काल

सुखाचा करण्याची ईर्षा सर्वांनीं धरिली आहे. जुनें तें चांगलें म्हणत राहिलेल्यांना 'तें कां चांगलें?' असा प्रश्न प्रत्यहीं विचारला जात असल्यामुळें आपलें घोटीव वचन कितपत टिकाऊ आहे हें पाहण्यासाठीं कर्कश अभ्यासाची जरूरी त्यांना भासूं लागली आहे व नवमतवादी जुन्याच्या निषेधापलीकडे फारसे फिरकतां येत नसल्यामुळें कांहींसें कुचंबले आहेत. जीवितांतील सर्व संस्कारांची छेडणी सुरू अमून वंश, गोत्र, जात, धंदा, लग्न, संख्या, धर्म, खाद्यपेय, सावकारी, शेती, वतन अशा एक ना दोन हजारों विषयांच्या ऊहापोहाचा काला झाला आहे. धार्मिक, सामाजिक आणि राजकीय या तीनहि कोनांचे धोंडे निखळविण्यांत येत असल्यामुळें प्रत्येक प्रकारचा सुधारक सुद्धां कोठें हर्षभरित व कोठें चिंताकुल असा दिसत आहे.

अस्वस्थतेचे नमुनेसुद्धां मोठे बोधप्रद वाटतील. कोणी राजावर रागावला आहे, कोणी भटावर रागावला आहे, कोणी आइतखाऊवर रागावला आहे, पण दुसऱ्यापुढें दीनाहून दीन आहे. एक वेदाचा भुकेला तर दुसरा जुन्या गळाठ्यास कंटाळलेला. एकानें जानवें खुंटीस लाविलें तर दुसरा श्रावणीच्या तयारींत. जो एकीकडे लोकसत्तावाद पुकारतो तोच दुसरीकडे एकाद्या आयतोवाला दहा सलाम करून एकच मानतो. एकीकडे जातिभेदनिषेधाची गर्जना चालू ठेवितो व दुसरीकडे जातवारी पतकरून समाजाच्या चिंध्या जास्तच चिवडतो. पण हें सर्व जरी खरें असलें तरी हीच भावी आशेला जागा आहे. अशी खळबळ माजून राहावी हें फार चांगलें आहे. मधून मधून सगळ्या राष्ट्राचा कोठा असाच ढवळला पाहिजे. खडकाळ पात्रांत पसरून वाहणाऱ्या नदीच्या पाण्याचे लोट जसे एकमेकांच्या उलट दिशेनें वाहतात व म्हणून नदी आत्मविरोधी झाल्यासारखी क्वचित् दिसते तसाच प्रकार येथेंही होत असेल. एकंदरीनें या खळबळीनें आपली प्रगति झाल्यावांचून राहणार नाहीं. जेथें कोठें तोळामासाभर तरी सामर्थ्य सांपडल्यासारखें असेल तेथून तें पुढें आणून राष्ट्राच्या कारणीं लावलें पाहिजे; या सामर्थ्याच्या शोधासाठीं आपण कमर कसली पाहिजे; व इष्ट त्या सुधारणा म्हणजे राष्ट्रहितकारक असे पीठिकांचे बदल घडवून आणण्यास आपण उद्युक्त झालें पाहिजे. पण खळबळ ही कितीहि इष्ट असली तरी 'ती चालू आहे' एवढीच गोष्ट मोठीशी हितकारक आहे असें मानतां यावयाचें नाहीं. जिचे अवयव परस्परविरोधी, आत्मविरोधी व केव्हां

केव्हां अडोळसपणें काम करणारे दिसून येतात अशी ही खळबळ आहे. पृथक्-करणबुद्धीनें तिच्या गल्लतींत शिरून तिचे धागेदोरे शोधिले पाहिजेत. एकाकी कल्पनेचें महत्त्व मनांत आणून जेथें इतर समान महत्त्वाच्या कल्पना प्रतीतच झाल्या नाहींत तेथें त्या पटवून देण्याचा यत्न झाला पाहिजे. सर्व भिन्न भिन्न पण सकस व शुद्ध कल्पनांचें वस्त्र विणावयाचें आहे खरें; पण तीं सुतें पुनः पुनः आपापल्या कोष्टकांत बसविण्याचा यत्न केला पाहिजे. केवळ आपा-पल्यांतच हा प्रश्न असता तरीहि त्याच्या सोडवणुकींत थोडी सुकरता उरली असती. पण मुसलमान, ख्रिस्ती इत्यादि लोकांच्या व धर्मांच्या सान्निध्यामुळें त्याला अधिकच बिकटपणा आला आहे. म्हणून जितक्या कल्पना सध्यां राष्ट्रांत चालू आहेत तितक्यांचा परामर्ष घेऊन त्यांची युक्तायुक्तता ठरविणें जरूर आहे.

भाकरीचा प्रश्न सर्वांना लागू असल्यामुळें व राष्ट्रांतील बुद्धिमान् लोकांची परकीय बुद्धीच्या छायेखालीं कुचंवणा होत असल्यामुळें राजकीय चळवळीला जोर असला तरी जसे जगभर तसे येथेंहि राजकारणाचे अवघे प्रश्न समाज-कारणाच्या विशाल स्वरूपांत विरत चालले आहेत. व यूरोपखंडांत समाज-विचारांचे जे नवनवीन धूमकेतू आकाशांत पसरत असतात त्यांच्या दुरून दर्शनानें अधीर-प्रकृतीच्या माणसांना हे विचार उपास्य आहेत असें वाटूं लागलें आहे. अर्थात् त्यासंबंधानें आपण काय धोरण ठेवावें हें पाहिलें पाहिजे. हिंदुसमाजाच्या सर्व अवयवांची व्यथा एकच नाहीं. म्हणून लोक जरी एका अंगास तोंड करून लढत असले तरी, पिछाडीच्या कोपऱ्यावर अचानक तुटून पडणाऱ्या नेपोलियनच्या घोडेस्वाराप्रमाणें कोणताही एकादा चोरून येत असलेला राजकीय वा सामाजिक विचार या गाफिल समाजावर चाल करून त्याचीं शकलें उडवील. यासाठीं पिछाडी फौजांना डोळसपणा व जागरूकता प्राप्त करून दिली पाहिजे.

ग्रामसंस्था संभाळून आपापल्या गांवकुसवाच्या आंत असावें, ज्यानें त्यानें आपापल्या गांवाचें पाहावें अशी पूर्वींची पद्धत होती. त्यामुळें दहा-वीस हजार माणुसबळावर कोणीहि एकादा पुंड नर्मदेपासून लंकेपर्यंत अवघा मुलूख खुशाल मारून काढीत असे. हें जसें लौकिक व्यवहारांत तसेंच मत-

सांप्रदायांतहि हजारों वारीकसारीक मतांचे गुल्म सर्वत्र पसरलेले असून लोकांचे लहानलहान पुंज त्या त्या मतांच्या तंद्रींत निपचित असल्यामुळें, थोडी संघटना व पुष्कळसा उरक अंगीं असलेला कोणीहि हुप्या माणूस-एकादें अनार्य मत लोकांच्या मनांत सहज कालवून देतो. केवळ नवीन म्हणूनच त्याला हा हक्क मिळतो! तें त्याचें मत शोधिलें पाहिजे. परदेशा-हून जाऊन आलेले स्वकीय जे विषय अभ्यासावयास जातात त्याहून अन्य विपयांवरही म्हणजे सामाजिक वगैरे प्रश्नांवर ते तडातड मतें देतात; तीं त्यांचीं मतें चलनी नाणें बनण्याचा संभव असल्यामुळें तींहि तपासून पाहिलीं पाहिजेत.

या सर्व बाबींचें निरीक्षण सापेक्षपद्धतीनें करणें जरूर आहे. प्रस्तुत विषय जो अस्पृश्यता निवारण त्याच्या दृष्टीनें अस्पृश्यांच्या तक्रारींचें निरीक्षण केलें असतां **सुधारकांस दिसून येईल कीं, 'बदललेल्या विचारांचें वळण' या प्रकरणांत जे विचार सांगितले आहेत त्यांस अनुसरून अस्पृष्टांना आपल्या मनबुद्धींच्या विकसनास व विकसित झालेल्या सामर्थ्यांच्या वापरास संधि देणें, तसेंच त्यांस स्पृश्यांच्या शाळा, पाणवठे इत्यादींचा उपयोग करूं देणें व त्यांस देवालय-प्रवेश प्राप्त करून देणें हें आजचें काम आहे.** पैकीं पहिल्या कलमाविषयीं आतांपर्यंत पुष्कळच लिहून झालेलें आहे. म्हणून पाणी व देऊळ यांविषयी आतां लिहितों.

पाणी

गांवगन्ना अस्पृश्य लोकांना पाण्याची काय अडचण होत आहे हें स्पृश्य लोकांनीं अवश्यमेव पहावें. कोठें तरी ओढचाखोडचांत सांठलेलें पाणी असतें त्यावरच त्यांना भागवावें लागतें. व गांवच्या पाणवठ्यावरचें पाणी जर हवें असेल तर दोन दोन तास आक्रंदन करावें लागतें. या पाण्याच्या हालां-विषयीं 'अस्पृश्यता–निवारणाचे अनुभव' म्हणून जें प्रकरण पुढें दिलें आहे त्यांत बरेंच विवेचन आलें आहे. म्हणून येथें मागें मी एकदां "अस्पृश्याच्या डायरींतील पानें" या नांवाचा जो लेख लिहिला होता तो देतों. तो वाचून अस्पृश्यांच्या या दुर्धर हालाची वाचकांस कल्पना येईल.

एका अस्पृष्टाच्या डायरींतील पानें !

मी विचारल्यावरून माझ्या माहितीच्या एका अस्पृष्टानें एका दिवसाची हकीकत सांगितली. ती जरूर ते फेरफार करून खालीं दिली आहे.

तारीख—
ठिकाण—

"....साहेबांनीं खटले रात्रीचे चालविण्याची पद्धत ठेवल्यामुळें निजावयास उशीर झाला होता. नऊ वाजल्यापासून पहाटे तीन वाजेपर्यंत हातांतील खुळखुळा वाजवीत गांवांत नऊ हेलपाटे घातले. चार वाजतां घरीं जाऊन पडलों. जरा डोळा लागला तों दारावर थाप बसली. बुध्याच ओ दिली नाहीं. हाकाहाक ऐकून बायको कुजबुजली, "महंमदभाई आल्याती जनु". महंमदभाईचें नांव ! ताडकन् उठलों. लंगोटीवरच्या कापडाचा त्रिकोण सावरीत पुढें आलों. शिपाई म्हणाला, "लेका पिऱ्या, त्यो महं-मदभाई बोंबलत आलाय ना !" इतक्यांत महंमदभाई स्वतःच आले व म्हणाले, "ल्येका पिऱ्या, आता रास्सार निजला हैस, जरा भाईर चल." कारभारीण आंतून गुरगुरून म्हणाली, "अन् आता तर आल; जरा वाइच डोळा लागतुया त्यो तुमी आला; अन् रातसार कोन निजलया जी?" मी खोटचाच रागानें तिला टाफरलों, "अग म्हाउं दे ! उगाच का त्वांड करतीयास? मानूस बगून बोलावं, दुसरं तिसरं कुनी हाइ का ? आपल महंमदभाई हायती."

वास्तविक हा महंमदभाई आला असावा हें मला प्रथम तिनेंच सांगितलें होतें. पण जाणूनबुजूनच तिनें ही ढुशी दिली होती. सारवण्यासाठीं ती आतां म्हणाली, "आं, कोन महंमदभाई ! मेल्यानु पांठचं दिसतया कुट ! जा, जा, मंग, जा बेगी बेगी." दरम्यान महंमदभाईंनीं आपला फेटा चार वोटें मागें सारून आपली टाळू कुरवाळावयास सुरवात केली होती. बायकोनें सावरलें म्हणून ठीक, नाहींतर साल्यापासून सुरवात होऊन बेचाळीस कुळचांचा उद्धार सूर्योदयाच्या आंतच व्हावयाचा. मी कांवळें खांद्यावर टाकलें. पागोटचाचीं सगळीं वेटोळीं डोक्यावर ठेवून एकाच विळख्यानें तीं मी घट्ट केलीं व निघालों. चूळही भरली नव्हती व सकाळचें सगळेंच व्हावयाचें होतें. पण थोरांचीं कामें पडलीं, गेलें पाहिजे.

चालूं लागल्यावर महंमदभाई म्हणाले, "लेका पिऱ्या !" कोणास वाटेल कीं, मी महंमदभाईंचा फार लाडका म्हणून मला ते अशी हाक मारीत असावे. पण तसें नाहीं. कोणाचेंहि नांव निघो, त्याच्यामागें 'लेक' हा उपसर्ग हा यांचा असावयाचाच ! "त्यो लेकाचा मामलेदार; त्यो लेकाचा फौजदार," हें महंमदभाईंचें पालोपदच होतें. "लेका पिऱ्या, आता साहेबाला पुढल्या गांवाला जायचं आहे. तुला वर्दी द्यायला गेलं पाहिजे." मुजरा करून मी म्हणालों, "मी जातों जी." महंमदभाई म्हणाले, "आठ वाजायच्या आंत म्हसोबाच्या वडाखालीं ये; मी तिथं वसलों आहे. काय होतं तें सांग." मी मनांत ओळखलें कीं, पुढील गांवाला वर्दी देण्याचा हुकूम साहेबांनीं यालाच केला असावा; पण हा सुस्तावला असल्यामुळें यानें ही गोणी माझ्यावर लादली. म्हसोबाच्या वडाखालीं मीं याला काय होतें तें सांगावें म्हणजे मग जणूं कांहीं आपणच जाऊन आलों या ऐटीनें हा साहेबापुढें उभा राहणार. अजून फटफटलें नव्हतें. नाईकसाहेब दोंद हलवीत एका बोळाकडे कोठेंसे निघून गेले. थोडासा गेल्याचा देखावा करून मी पिरगळा मारला अन् घरीं परत आलों. सगळे विधी उरकले. तुकडा खाऊन जावें असें वाटलें; पण घरांत कांहीं नव्हतें. पुन्हां निघालों, आणि पलीकडच्या गांवच्या वेशीवर जाऊन येसकराला सांगितलें, "साहेब येतोया. पाटलाला सांग." दोन-चारदां ढोसल्यावर येसकर खेकसून म्हणाला, "आर व्हय, सांगतु, सांगतु जा."

मी परत आलों. म्हसोबाच्या वडाखालीं महंमदभाई गवसला नाहीं. वोळाकडे गेलों. विजारीच्या नाड्या आवळीत आवळीत लालबुंद डोळे करून भाई म्हणाले, "लेका पिऱ्या, काय रे झालं ?" मी म्हणालों, "आलों वर्दी देऊन." भाई निघाले ते एकठोक साहेबाच्या तंबूकडे. चोपदारानें विचारलें, "काय काम आहे ? साहेब आतां मिळायचे नाहींत." इतक्यांत साहेबच जांभया देत बाहेर आले. भाईंनीं रिपोर्ट दिला. साहेब म्हणाले, "अच्छा नाइकसाब, तुम्हांला फार जाग्रण झालं आहे. आतां जाऊन निजा जा." खोटेंच हंसून भाईंनीं सलाम केला. परततात तों पलीकडच्या राहुटींतून हपीसचे हेड्क्लार्क आले व भाईस म्हणाले, "वा नाईक, आमच्या हपीसला तुमच्या गांवांत लाकडं सुद्धां मिळूं नयेत?" भाई म्हणाले, "हा साब, लाकडाला काय तोटा गेला आहे?" भाईनीं खूण करून मला बरोबर चालविलें. आम्ही दोघे एका पडक्या घरापाशीं आल्यावर ते थांबले व एका जुन्या तुळवंटावर चपलचा पाय देऊन इकडेतिकडे पाहूं लागले. भिंतीच्या आसऱ्यानें मी पलीकडे उभा होतों. इतक्यांत स्वारींतला शिपाई आला. भाई म्हणाले, "लाकडं आहेत. पण फोडायला कोण आहे ?" दरम्यान मी मधल्या खिडारांतून घरीं निघून गेलों होतो. शिपाई साहेबांच्या स्वारींतला, गुरगुरूं लागला. महंमद-भाई संतापला. घरीं येऊन दारावर लाथा मारूं लागला. कडकन् मोडून दार उघडलें. "साल्या, लाकडं तुझ्या बानं फोडायचीं का ? अरे, उत्पन्न खातां सरकारचं, का फुकट काम करतां ?" कारभारीण त्रासानें म्हणाली, "मडं गेलं त्या सरकाराचं. उत्पन्न असतं तर तुकड्यासाठीं पोरं का धाडलीं असतीं गांवभर? " "हं जास्त बोलूं नको चंद्रे ! " भाई म्हणाले, "राजदों होईल." मी मुकाटयानें कुऱ्हाड उचलली. पण ती शेवटायला हवी होती. भाई म्हणाले, "जा पळत सुलतानजीकडे, त्याला म्हणावं शेवटून दे." जातां जातां नाईक-साहेबांनीं मला डोळ्यांनीं खूण केली. मी उमगलों कीं, भाईंनाहि थोडीं लाकडें हवीं आहेत. सुलतानजीकडे गेलों पण त्याची बायको बाळंतीण होत होती. तो म्हणाला, "काय ल्येका शेवाटतूइस. घरामंदी सर्वी गरबड-आन्–". खांडाळलेल्या कुऱ्हाडीनेंच काम चालू केलें. दहा वाजतां स्वारींतला माणूस आला आणि म्हणाला, "ल्येका, तकड व्वांब झाली ना ?" घाम निरपून मी म्हणालों, "झालं दादा ! " लाकडांचा बिडा वांधून हपीसच्या

दाराशीं टाकला. लाकडांकडे पाहून आचारी म्हणाला "लेका! लाकडं जरा वारीक फोडलीं असतीस तर तुझ्या वाचं काय खरचलं असतं का?" माफीसाठीं मी खोटेंच हंसलों व सलाम केला. हपीसच्या तंबूंत खूप खोकाळा चालला होता. मामलेदार–फडणीस यांनीं फराळाचें करून आणलें होतें! आंतून डराडर ढेकरा ऐकूं येत होत्या. आचाऱ्यानें तक्रार केली. शिरस्तेदार वाहेर आले आणि अनुनासिक आवाजानें म्हणाले, "कायरे! कोण तूं? हंहं. सरकारचीं कामं अशींच करतां का? तुम्हांला फुकट खायला हवं अं!" इतकें बोलून त्यांनीं मला चालतें केलें.

हा वेळपर्यंत दिवस अगदीं डोईवर आला होता. मी घरीं गेलों. वायकोला विचारलें, "शिद्या कुठं हाय?" ती म्हणाली, "शिद्या अन् रक्मी गांवांत गेल्याती." "अन् तानी?" "तानी ग्येलीया पान्याला. येरवाळीं गेलीया. अजून न्हाई आली." भुईला अंग टेकतांच हें ऐकलें. तट्कन उठून पाणवठ्याकडे गेलों. पहातों तो पाण्याचा घडा ठेवून तानी उकिडवी वसली आहे. झाड होतें, पण त्याच्या सावलींत साहेबाचा घोडा धुवावयाला उभा केला होता. माझी तानी शेराच्या सावलींत बसली होती! "दादा, पानी वाडता का व?" "वया, माज मला काम हाय." "दादा, पानी वाडता का व?" "वया मला लई वकत झालाय." "वया पानी वाडता का व?" "इश्श! आम्ही का तुला पाणी वाढायचं?" असें सारखें चाललें होतें. बराच वेळ तारतळ्या दिल्यावर महंमदभाईची वहीण बाहेरून कल्हई केलेला हंडा घेऊन आली. पाण्यांत उतरलेले कुणवी लोक खोटच्याच रागाने एकमेकांस म्हणाले, "दूर व्हा लेको! बेगमला पानी न्हेऊं द्या." बेगम उंच, सरळ व वयस्कर झालेली अशी होती. तिची विजार काळी झाली होती; आणि तिनें आपले केस मागल्या आठवड्यांत विंचरलेले होते. बेगम हेळांत शिरली. ओंजळीनें पाणी घेऊन तिनें आपलें तोंड साफ केलें व दोन चुळाहि थुंकल्या. तानी म्हणाली, "बेगमवाई, पानी वाडा व." बेगमनें हंडा भरला व वाहेर येऊन तिनें तो तानीच्या घडयांत ओतला. घडा भरून जाऊन पाणी इकडे तिकडे वाहवलें. ब्राह्मणिणी, कुणबिणी किंचाळून म्हणाल्या, "अग ए! तुझं विटाळाचं पाणी इकडं येतंयना." मी थट्टेनें म्हणालों. "आमचा इटाळ झाला! अन् त्या वेगमसाहेवानें चुळा थुकल्या त्याचं काय?"

तानीचा घडा मीच डोईवर घेतला. ऊन म्हणजे मी म्हणत होतें. काध्यानें वांधलेला माझा जोडा तानीच्या पायांत घातला. तो फरकटत असल्यामुळें तानी हळुहळू चालली होती. मी डावा हात घडयाला दिला होता. तानीनें माझा उजवा हात आपल्या काखेंत विळखून घेतला. भुकेनें, श्रमानें, उन्हानें तापलेला माझा देह तानीच्या लडिवाळ स्पर्शानें शांत झाला. घराजवळ आलों, तों रक्मी व शिद्या कळवंडतांना ऐकलीं. आंत येऊन पहातों तों रक्मीच्या पदरांत हपीसच्या लोकांनीं टाकलेले करंज्याचे उष्टे तुकडे होते. शिद्याला नुसतीच भाकर मिळाली होती. त्याच भांडणांत तानी जाऊन मिसळली. मी विहिरीवर गेल्यापासून एक गोष्ट बरी झाली. कारभारीण मोकाश्याच्या घरीं गेली आणि दोन शेर दाणे त्याच्याकडून घेऊन आली. तिचा रस्ताझाडणीचा अडीच रुपये पगार उद्यां व्हावयाचा होता. उद्यांपर्यंत तग धरायला हवा म्हणून तिनें चांगल्या पातळ कण्या केल्या. आम्ही सगळीं जणं त्या प्यायलों. पितांच त्या हातींपायीं आल्या. पोरांना आणि मला गर्कन् झोप आली. कारभारीणहि थोडी वाकडी झाली. इतक्यांत नायकाचा गिरा पुन्हा आला, "लेका, माझ्या नर्डीला नख लावलंस. लेका, माझ्या पोटावर पाय आणलास. तूं तरी आतां कसा जगतोस तें पाहतों. ध्या दिवसा लेका सवास्त पडलाइस ढोरावाणी घोरत ! ऊठ ! ऊठ ! " अशा शिव्याशापांची आणि धमक्यांची गर्दी उसळली. मी खरोखरच ढोरासारखा अगदीं स्वस्थ पडलों होतों. बायको पुढें झाली. दोन्ही हातांनीं नमस्कार करून अस्तुरी म्हणाली, "पाया पडतें महाराज ! मालिक निजल्यात, जिवाला वाइच ग्वाड वाटत नाहीं." "काय धाड बडवली आहे त्याला ! कापला तर दोन होतील ! " "जरा वाईच जाळ आलाय ! " "अरे, सकाळीं पांच मण लाकडं फोडलीन् भर उन्हांत ! अन् ताप यायला काय झालं ? " "माझ्या गळ्याच्यान् त्यास्नी जाळ आलाया." "वया ! तुझ्या नवऱ्याला सांगितलं कीं. . . .पूरच्या पाटलाला साहेव येतोय म्हणून वर्दी दे. मला म्हणाला वर्दी दिली, अन्–" "भाईसाव, तुमच्या गळ्याची आन्, त्ये ग्येल व्हत." "बया, माजा गळा तुम्ही कापला, आतां तो माझें डोकं मारल्याबगार राहील का ? "

आरडाओरडा ऐकून बाहेर आलों. मी म्हणालों, "वर्दी दिली होती."

"मग उलट रपोट कसा आला र ?" मी मनांत ओळखलें कीं, येसकरानें माझा निरोप झोपेंत ऐकला, आणि तो पाटलास सांगावयाचें विसरला. पण मीं आतां त्याला काय करावें ? नाईक रागारागानें इकडे तिकडे पाहून फुसफुसत होता. इतक्यांत फौजदाराकडून त्याला बोलावणें आलें. पांच-पन्नास शिव्या हसडून भाई चालते झाले. बोलवावयास आलेल्या शिपायास मी विचारलें, "काय झालं हो ?" तो म्हणाला, "अरे हें वघ, पाटलाला कांहीं वर्दी मिळाली नाहीं. साहेब जो घोड्यावरनं गांवांत शिरतो तों सगळा शुकशुकाट ! चावडीवर एकठोक गेला तो कोल्हाटणीचें गाणें चाललेलें. संबू पाटील, नारू पाटील, बाळोबा देसपांडचा, सगळे खुलल्यात !" मी विचारलें, "आतां काय होईल र ?" "काय होईल ? दिवेलावणीच्या आंत महंमदभाईला आतां लांब नेऊन घालत्याल !" बायको म्हणाली, "लई वंगाळ झालं." "अन् बढती बंद होईल." "लई कसनुसं झालं." "अन् पगार तोडत्याल !" "लई वंगाळ झालं !" तानी म्हणाली, "अन् भाई जायाचं मंजी बेगम बी जायाची का ग ?" "व्हो तर, ती त्याची भन नव्ह का ?" तानीनें विचारलें, "आय, मंग आपल्याला पानी कोन वाडील ग ?" शिपाई निघून गेला.

हा वेळपर्यंत सूर्य मावळलाच होता. साहेब व त्यांचें हपीस गांव सोडून गेलें होतें. मामलेदार, फौजदार इत्यादि मंडळी मोकळ्यानें श्वास सोडूं लागली होती. "आपलें कांहीं येणें राहिलें नाहीं." अशा पावत्या वाण्याकडून, लाकुडवाल्याकडून घेण्यास हपिसांतली मंडळी विसरली नव्हती. गांवांत हरिबोवांचा उत्सव होता. संध्याकाळीं कीर्तन होतें. हरिदासबोवांची वाणी मोठी प्रासादिक म्हणून प्रसिद्ध होती. संध्याकाळ होतांच मांडवाकडे मंडळी जमूं लागली. मंडप शृंगारण्यांत गांवचे कसबी सोनारलोक आणि आळींतल्या उत्सवाचें निमित्त करून शाळेंतून गैरहजर राहिलेलीं पोरें दुपारभर खपत होतीं. कोणी कांहीं, कोणी कांहीं असें सामान पुरवून मोठा सुंदर थाट केला. पाटलानें मेढी दिल्या. भिकणभाईनीं पत्रे दिले. गणू हलवायानें वत्तासे दिले. फौजदारांनीं परवानगी दिली, वापूशास्त्री पुराणिकानें अक्षता दिल्या. वरल्या घरच्या सावकारानें हंड्याझुंबरें दिलीं. मी दवंडी दिली.

कासमनें बुक्का दिला. गेन्या मांगानें चराटें दिलीं. आज गांवांत जिकडे तिकडे आनंदीआनंद होता. साहेब व हपीस हीं गेलीं होतीं व हरिबोवांचा उत्सव होता. दुपारीं गांवांत तुकडे मागतांना शिद्या आणि रक्मी यांनीं ही वार्ता ऐकलीच होती. तिकडे वाजंत्री सुरू होतांच शिद्या आणि रक्मी आनंदानें इकडेतिकडे नाचूंउडूं लागलीं. "आज आपल्या गांवांत उच्छाव, आज आपल्या गांवांत उच्छाव ! बाबा आपण केव्हा जायचं ? " म्हणून पोरें मागें लागलीं. कारभारणीनें महंमदभाईचा विषय काढला. मी म्हणालों, "आपल्याकडे काय आहे? मी जायचा तो जाऊन आलों." वाजंत्रीं जोरानें चालू झालीं. "वाबा, आतां केव्हां जायचं" म्हणून पोरें बोटें ओढूं लागलीं. आम्हींही तयारी केली. अस्तुरी कोरें लुगडें नेसली. तिच्या मुंबईच्या मावळणीनें तिला तें दिलें होतें. शिद्यानें बिनवाह्यांचा कोट घातला. श्रमाचा योग्य तो मोबदला मिळण्यासारखा नसल्यामुळें चोर लोक आमच्या आळीला फिरकत नाहींत म्हणून मोडकें कवाड नुसतें ओढून घेतलें व निघालों. मंडपापाशीं पोचतों तों जिकडेतिकडे 'उत्तम' लोकांची गर्दी चालली होती. दिव्यांचा चकचकाट झाला होता. माझीं माणसें दिपलीं, बाजूस उभीं राहिलीं. बोवा आले. पखवाज वाजविणारा गांवचाच होता. बोवा इकडेतिकडे जिज्ञासेनें बघत होते. इतक्यांत 'आले, आले' असा कल्ला झाला. मामलेदार, फडणीस, फौजदार आले. पहिले दोघे उंच गाद्यांवर लोडाशीं टेकून बसले. फौजदार मुसलमान होते. मंडपांत येतांना ते विचकूं लागले. मामलेदार म्हणाले, "या, या. हरकत नाहीं, अहो, हरिबोवा सगळ्यांचेच होते ! या, या!" त्यांना खुर्ची देऊन शेजारीं बसविलें. वसाबस सुरू झाली. मंडपाच्या टोकाशीं कोणी बसलेले, कोणी उभे, त्यामुळें दिसेना. आम्ही दूर फुपाट्यांत उभे होतों. कोणी झळक-फळक गृहस्थ आले म्हणजे आजूबाजूचे लोक म्हणत, "पिऱ्या वाजूला हो ! त्यांना लागशीलना ? " आज हरिबोवांचा उत्सव होता. ते सर्वांना सारखं लेखीत ! पोरें म्हणालींच, "बाबा मंडपांत चला कीं ? वाबा, मंडपांत चला कीं ?" मी नुसताच खेकसलों व त्यांना चूप बसविलें. आज गांवचा उत्सव होता. हरिवोवा सर्वांना सारखें लेखीत ! ! खरोखर आज गांवचा उत्सव होता. ते सर्वांना सारखें लेखीत.

कथा उभी राहिली. पहिलें नमन झालें. बोवांनीं अभंग म्हटला, " जे

का रंजले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुलें ॥ तोचि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा ॥" इत्यादि. ज्या हरिबाबांचा हा उत्सव होता, ते फार विरागी संत होते. त्यांचें वर्तन सर्वांशीं समत्वाचें असे. अर्थात् त्यांच्या चरित्राचें आख्यान लावावयाचें तर पूर्वरंगहि त्याला जमेसा पाहिजे; म्हणून या अभंगाची योजना बोवांनीं केली असावी. बोवांचा शब्दप्रवाह चालू झाला. अभंगाची खुलावट करतां करतां बोवा एकनाथांच्या गोष्टीवर आले. त्यांची कावड काशीहून आली. पुढें ती रामेश्वराला जावयाची ! आंतील गंगा जर रामेश्वरावर पडली तर कावड आणल्याचें सार्थक व्हावयाचें. पण वाटेंत एक गाढव तान्हेनें व्याकूळ होऊन पडलेलें होतें. गाढवाच्या तोंडांत गंगा टाकावी ही नाथांची इच्छा. "महाराज ! गंगा खांद्यावरून आणली, आणि रामेश्वरास घालावयाची आहे." नाथ म्हणाले, "माझा रामेश्वर गाढवाच्या अन्तरात्म्यांत आहे." इतकी कथा सांगून बुवा म्हणाले, "काय थोरवी ही ! केवढें साधुत्व ! केवढी भूतदया ही ! ! आपणां सर्वांना मार्ग दाखविणारे नाथमहाराज त्यां व्याकुळ झालेल्या गाढवाच्या तोंडांत गंगा ओतते झाले! गाढवाचा अन्तरात्मा तृप्त झाला. नाथमहाराजांना परम हर्ष झाला कीं, अरे, गाढवाची तृषा शांत झाली. गाढवाचा अन्तरात्मा माणसाच्याहून कांहीं निराळा आहे का हो ? प्राणिमात्र येथूनतेथून सारे एकच आहेत. काय सांगावं, तुम्हाआम्हांला माणसांचा अन्तरात्मा तेवढा कळतो, पण साधु पुरुषांना पशुपक्ष्यांचे अन्तरात्मेसुद्धां कळतात. अहो, कळतात नव्हे आपल्यासारखे वाटतात." तानी लहानच, पण कळण्याइतपत मोठी होती. तिनें माझ्याकडे साभिप्राय पाहिलें. बोवा म्हणाले, "सर्व चराचर विश्वांत तो परमात्मा भरला आहे, म्हणून भूतमात्राचे ठायीं त्याचा साक्षात्कार ओळखून सज्जन लोक सर्व प्राण्यांवर दया करतात. संसारी लोकांना सुद्धां महान् भगवद्भक्त तुकाराम उपदेश करतांना काय म्हणतात ? 'उत्तम गति तो एक पावेल' कोण पावेल ? 'भूतदया गाईपशूंचें पालन ॥ तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥' काय सांगावें महाराज ? रानावनांतसुद्धां माणसासाठीं, पशूसाठीं पाणपोया घातल्या पाहिजेत." तानीनें माझ्याकडे पाहिलें. "हा माणसांचा साधा धर्म आहे बरें. वैश्वदेव झाल्यावर कोणी अतिथि आहे का, हें ब्राह्मणानें पाहावें व मग जेवावें असें सांगितलें आहे. नगरांतील सर्व प्रजा

जेवल्या आहेत कीं नाहीं हें पाहून राजानें जेवावें असें सांगितलें आहे. हा गृहस्थधर्म झाला. हा पाळील तो साधूच. देव तेथेंच आहे, म्हणून महान् भगवद्भक्त तुकाराममहाराज म्हणतात, 'जे का रंजले गांजले. . . .' बोला पुंडलीक वरदे हारिविठ्ठल ! "

बोवांनीं कंबर बांधली. पखवाजवाला कोंबड्यासारखी मान झुंजवूं लागला. वुक्का आला. बोवांना लावला. अधिकाऱ्यांच्या पुढें तबक धरलें. पेंगणारीं पोरें पाठमोरीं असलीं तरी त्यांच्या कपाळावर तो मागून चोळण्यांत आला. बुक्केवाला निघून गेला. तानीनें माझ्याकडे पुन्हा पाहिलें. शिद्या अन् रक्मी तेथेंच पायाशीं पसरलीं होतीं. वायकोहि पेंगूं लागली. मीं म्हटलें, "चल आतां, पोरं निजलीं." कीर्तनाकडे तोंड करून वायको धीटपणानें ओरडली, "ववाळणीचा पैसा न्या व ! " कोणसें खेकसलें, "आतां कसली ववाळणी? माझ्यापाशीं देऊन ठेव, आरतीच्या वेळीं मी देईन." तिनें पदराच्या गांठींतला पैसा त्या गृहस्थाच्या हवालीं केला. मंडपांत "राम राम सीताराम दिनांचा कैवारी राम" चा धडाका चालू होता. पोरें खांद्यावर घेऊन आम्ही एकटे घराकडे चाललों. वाटेनें तानी म्हणाली, "बाबा! त्या गाढवाच्या पोराला बामनानं कावडीचं पानी पाजलं, अन् आपल्याला गांवच्या हेळावर कावं भरूं देत न्हाइती ? " मी उद्गारलों, "तुला काय सांगूं, आपला शिद्या मोठा झाला, म्हणजे गांवकऱ्यांना विचारील याचा जाब." घरीं जाऊन निजलों. बऱ्याच वेळानें कथा संपल्याचें ऐकूं आलें. सर्वत्र सामसूम झालें. सर्व लोक ज्या वेळीं झोंपी जातात त्या वेळीं संयमी जागा असतो असें म्हणतात. पण आणखी एकजण जागा असतो. हाल, विपत्ति, अवमान आणि काळजी यांनीं पोखरलेला आत्मा जागाच राहातो. पण कांहीं वेळानें चित्तांतल्या वडवानळावर झोंपेची भरती पसरत आली. " भगवाना ! " म्हणून झोंपीं गेलों.

धर्म व देऊळ

एकाच सार्वजनिक वरवंट्याखालीं आपण सगळेच सांपडलों आहों, परंतु हा एक त्रैवर्णिकांच्या हातचा पोटवरवंटाहि अस्पृश्याला डोक्यावर फिरवून घ्यावा लागत आहे त्यामुळें तो अत्यंत उद्विग्न होतो. आणि अशा उद्विग्नतेच्या काळीं ज्या सुंदर धर्मतरूच्या गार छायेखालीं त्याच्या संतप्त जीवात्म्याला विसांवा मिळावा, तो धर्म त्याला तूं नीच आहेस असें सांगतो आणि धर्माचा उपदेष्टा गुरु त्याच्या जिवाला समाधानाचें भातुकें पोंचविण्याऐवजीं त्याच्या सावलीच्याही विटाळाच्या भीतीनें दहा कदमांवरून दूर पळतो.

वास्तविक पहातां धर्म केवढे उपकार करतो पहा. समाजाचें धारण करून आपल्या पोटांतील प्रत्येक माणसाला जितकें जास्त सुख देतां येईल तितकें देण्याची खटपट करतो; अंगावर आलेल्या अस्मानीं संकटांचीं कारणें त्याला पूर्वसंचितांत शोधावयास लावून भविष्यत्काल सद्गुणाच्या जोरावर सुखाचा करतां येईल अशी शिकवण तो त्याला देतो; आणि त्याचा जीव दारिद्र्यानें ओशाळला किंवा अवमानानें चिडून गेला तर जवळ जाऊन त्याला गोंजारून आणि धीर देऊन नित्य नवीन उगवणारी 'उद्यां' आजच्यापेक्षां खरोखरच जास्त आनंदाची येईल असा विश्वास त्याच्या ठिकाणीं उत्पन्न करतो. पण धर्माची ही सगळी कर्तबगारी अस्पृश्यांच्या बाबतींत शून्यच असते. 'समाजव्यवस्था, समाजव्यवस्था 'म्हणजे चातुर्वर्णिकांच्या सुखसोयीची दक्षता, ती राहावी म्हणून ज्या गुणांच्या बळावर इहलोकींची यात्रा त्याला अधिक सुखाची करतां आली असती त्या गुणांच्या प्रसाराला अवसर न देणें हाच धर्म झाला आहे. पूर्व-संचितानेंच तूं 'नीच' योनींत जन्माला आला आहेस असें त्याला सांगून धर्म त्याच्या मनोबलाची अर्धीअधिक हत्या करतो आणि सद्विचार, सदाचार, ज्ञान इत्यादींच्या सान्निध्यापासून त्याला दूर ठेवतो. अर्थात् तो अनीति, अमंगल विचार, दुष्ट वासना आणि मलिन वाणी अशा कर्दमांत वाढतो. तो मरणोत्तरकालाविषयीं बेफिकीर होऊन इहलोकच्या आचारांत बेफाम बनतो. त्यानें धर्म ऐकावा कोठें आणि शिकावा कोठें? ज्या मंदिरांत धर्मा-वर प्रवचनें चालावयाचीं, प्राचीन थोर विभूतींच्या सुरस आणि उत्साहवर्धक कथा ऐकावयास सांपडावयाच्या आणि साधुसंतांच्या प्रेमळ वाणीचा रंग

खुटावयास मिळावयाचा, त्या मंदिरांपासून त्याला मोठ्या अदबीनें आणि भयानें दूर सरावें लागतें. आश्रमव्यवस्थेंत त्रैवर्णिकांना संस्कारयुक्त जीवित लाभतें आणि त्यांच्या पारमार्थिक कल्याणाची काळजी वाहिली जाते. अस्पृश्याला दोनहि गोष्टींना मुकावें लागतें. साधुसंतांनीं धर्माच्या दारापर्यंत त्याला येऊ दिलें असलें तर ती गोष्ट आश्रमव्यवस्थेनें गौरवासाठीं आपल्याकडे ओढून घ्यावी. पण तिनें ती योजना बुद्धिपुरस्सर केली असें कधींही म्हणतां येणार नाहीं.

असो. अशा प्रकारें धर्मापासून फलित होणाऱ्या सर्व हितांपासून अस्पृश्य कायमचाच दुरावलेला राहिला आहे. अर्थात् कशा प्रकारच्या पूजाअर्चेकडे त्याचें मन वळलें असेल आणि मनुष्याला सहज अशी जी धर्मबुद्धि तिला कसला व्यवसाय त्यानें प्राप्त करून दिला असेल हें सहज अनुमानितां येण्यासारखें आहे. त्याचे देव म्हणजे मरीआई, जाखाई, तुकाई, म्हसोबा, बिरोबा फार झालें तर खंडोबा, ढेगू, मेगू अशांसारखी अक्राळविक्राळ, भेसूर, शेंदूर माखलेली, कोंबडी मागणारी, शिरा ताणल्यानें अंगांत येणारी, वेताळाच्या प्रकृतीची आणि झुटिंगाच्या हट्टाची मंडळी आहेत. यांची पूजा म्हणजे पूज्य वस्तूच्या थोर गुणावद्दल वाटणाऱ्या आदराचें प्रदर्शन नव्हे, तर भेडसावणाऱ्या सावल्यांना लांच चारण्याचा प्रयत्न आहे. तिनें अस्पृश्याच्या जीवाला शांति आणि आनंद लाभत नाहींत तर नाकेदाराला जकात दिल्यासारखें वाटतें इतकेंच. संसाराच्या व्यापांतून बाहेर ओढून काढून त्याचें मन आपल्या गोड आणि मऊ वेष्टनांत, कांहीं वेळ कां होईना, पण अडकवून ठेवील असें उदात्त तत्त्व या पूजेंत नाहीं. थोर विभूतींच्या गुणोत्कर्षाचा, गोलानें चढत जाणाऱ्या पायऱ्यांचा, म्हणजे ध्येय दाखविणारा आणि वाटाड्याचेंहि काम करणारा सुंदर मनोरा या पूजेंत अस्पृश्याला दिसत नाहीं. आणि सर्वाच्याहि वर, चारापाणी मिळविण्याच्या खटपटींत असतांना आणि भिन्न भिन्न प्रवृत्तींच्या माणसांशीं प्रसंग आले असतांना, झोक जाऊन जीं पातकें आपल्या हातून घडतात त्यांच्या रुखरुखीनें पोखरलेलें आणि मरणाच्या दटावणीनें घाबरलेलें आपलें मन, 'मामेकं शरणं व्रज म्हणजे मी तुझा त्राता बनेन' या परमेश्वरी आश्वासनानें निर्धास्त होऊन जसें विसावा पावतें, तसा कांहींहि प्रकार मरीआईच्या

पूजनांत अस्पृश्याला होत नाहीं. पेंढार येणार म्हणून आवई उठली म्हणजे जसा दाणागोटा गोळा करून त्याच्या तोंडावर टाकावयाचा, तसा जरीमरीला 'अंड्यांचा गुडघ्याइतका ढीग' वहावयाचा इतकाच त्याचा अर्थ. अशा प्रकारच्या थोरांच्या हयगयींत सांपडल्यामुळें अस्पृश्यांच्या मनाची वाढ कधींहि पूर्ण होत नाहीं. आणि ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन धूर्तांनीं 'तूं हलकटच, तूं हलकटच' असें वारंवार म्हटल्यानें त्याला खरोखरीच असा वहीम येतो कीं, आपण हलकटच आहों ! असल्या मनोदास्यांतून त्याची सुटका जो जो करील तो तो त्या अस्पृश्याचा उपकारकर्ता. या हीन मनस्कतेच्या जोडीला मागील भागांत सांगितलेली धंद्यांची नागवणूक आणून वसवा, म्हणजे अस्पृष्ट लोक ख्रिस्ती कां होतात याचें कारणें एकदम कळतील.

ख्रिस्ती मिशनरी आपले मठ स्थापित सुटला म्हणजे साहजिकच मोठें वैषम्य वाटतें. अज्ञानाचा खच जेथें जास्त आणि दुष्काळाची कृपाहि जेथें जाडी, तेथें मिशनऱ्यांच्या कामांचा झपाटा फार. पण भाकरी मिळेनाशी झाली आणि मनाला विशेषसा मागचा ओढा नसला म्हणजे धर्मांतर करण्याकडे प्रवृत्ति व्हावी यांत काय नवल ? एक वर्ष पाऊस पडला नाहीं कीं अन्नान्नदशा व्हावी या गोष्टीचें श्रेय अर्थात् आपल्या दयाळू राज्यकर्त्यांकडून हिसकून घेण्याचा कोणाचा अधिकार असणार? पण स्वराज्याचा अभाव हें एक महाकारण प्रत्येक ठिकाणीं सांगून सुटका करून घेणें इष्ट नाहीं आणि आपण सर्वत्र तसें करीतहि नाहीं. दुष्काळ पडल्याबरोबर आमचे शंकराचार्य जर दुष्काळाच्या प्रांतीं गेले, घरोघर हिंडले, वर्गण्या, देणग्या, पुड्या एकत्र करून धर्मरक्षणाला सरसावले तर ख्रिस्ती मिशनऱ्यांचा काय पाड लागला आहे? त्यांचे प्रयत्न कुंठित करण्याला आपले प्रयत्न काय होत आहेत? आपल्या दरिद्रीपणामुळें ज्या प्रमाणावर हे प्रयत्न व्हावयास पाहिजेत त्या प्रमाणावर व्हावयाचे नाहींत हें उघड आहे. पण अल्पस्वल्पावरूनसुद्धां आपली जागरूकता व हेतु हीं सिद्ध होतील, हें निर्विवाद आहे. संकटाच्या प्रसंगीं जर वांचवावयास जावयाचें नाहीं तर मग केव्हां? सबंध हिंदुस्थानांत प्रतिवर्षीं सव्वा लाख हिंदू ख्रिस्ती होतात असा हिशेब आहे, पण दक्षिण हिंदुस्थानांत ख्रिस्ती करण्याचा तडाखा फार यशस्वी होत असतो. आपल्याकडे अगदीं सर्कत-

वांटणीनें जरी प्रमाण आलें नाहीं तरी गांवोगांव जे ख्रिस्त्यांचे मठ दिसतात ते निश्चेष्ट आहेत असें कधींहि मानतां यावयाचें नाहीं. त्यांचें पोखरणें चालूच असतें. नगर जिल्ह्याकडे जाऊन पाहावें म्हणजे पसरत चाललेल्या धर्मांतराची वाव नीट ध्यानांत येईल. दुष्काळांच्या मेहेरवानीनें आणि आमच्या उपेक्षेनें लाखांनीं मोजतां येण्यासारखी ख्रिस्ती प्रजा कोटीवर गेलीच आहे. इंग्लंड व अमेरिका इकडचे पाद्री लोक कोट्यवधि रुपयांचा फंड उभारून हिंदुस्थानांत येणार असून खेड्यापाड्यांतूनसुद्धां आपल्या शाळा, मठ, दवाखाने सुरू करणार आहेत अशी वातमी कांहीं वर्षांपूर्वी वाचल्याचें वाचकांना स्मरत असेल. ही गोष्ट अशक्य नाहीं. शिसारी येण्याइतकी संपत्ति कांहीं ऐद्यांच्या हातीं तिकडे जमा होत असते; ती धर्मकृत्यांत खर्चावयास ते केव्हांहि तत्परच असणार. आणि ही ख्रिस्ती भिक्षुकांची स्वारी ख्रिस्ती राजाच्या आश्रयाखालीं एकदां का सुरू झाली म्हणजे दोन ठिकाणीं विभागलेला हा हिंदुस्थान देश एकंदर तीन ठिकाणीं फाटणार असा त्याचा सरळ अर्थ होईल. एक कोटि ख्रिस्ती प्रजा म्हणजे एक मोठा जवरदस्त लोढणा होऊन वसणार आहे. धर्माचा समानपणा हा पुष्कळदां एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेलाहि मागें टाकतो हें डोळे उघडून पाहणारास सहज दिसण्यासारखें आहे. मनानें या ख्रिस्ती लोकांचा ओढा ख्रिस्ती राज्यकर्त्यांकडे राहीलच राहील, व राहत नाहींसा दिसला तर हरहुन्नर करून राज्य टिकवूं पाहणारा अधिकारी आपल्या हातांतील शेंकडों उपकारांचा वर्षाव त्यांच्यावर करून हा ओढा उत्पन्न करील. इतपत पराक्रम त्यांच्या अंगीं खास आहे.

आतां हे सगळे झालेले व होतकरू ख्रिस्ती आपल्याकडे तरी बव्हंशी अस्पृश्य वर्गातलेच आहेत यांत शंका नाहीं. इतर जातींतलीं सावजें पाद्री लोकांना थोडीं गवसतात, कारण त्यांना धर्मज्ञान आहे; पूर्वीचा इतिहास आणि संस्कृति यांचें बंधन आहे; आणि दुष्काळाच्या पहिल्या ढांगेंतच ते आक्रमिले जात नाहींत. अस्पृश्यांचें असें नाहीं. सगळा काच त्याला एकदम उत्पन्न होतो व जवळ घेणारा स्वकीय कोणी नाहीं अशी स्थिति असते. पाद्री उपकार करतो व ते ठळक डोळ्यांत भरण्यासारखे आणि अंगीं लागण्यासारखेच असतात. तो कुडतीं देतो, अन्न देतो, औषध देतो, अमेरिकेंतून येऊन महिना दहावीस

हजारांचा गल्ला गोळा करतां येण्यासारखी, अश्विनीकुमारांना लाजविणारी विद्या अंगीं असतां पोटापुरतेंच घेऊन वाकी सहस्रावधि व्याधिग्रस्तांची पीडा दूर करण्यांत खर्च करतो, आणि त्यांना पुनः वायकापोरांत आणून सोडतो. असा माणूस ज्या धर्माचा उपदेश करील त्यापासूनसुद्धां परावृत्त राहावें असा पीळ बहिष्कृताला कसा राहील! आमच्या येथें पहा! तापाच्या साथीमध्यें आचार्यानीं पुढें होऊन शहरांतले डॉक्टर, वैद्य गोळा करून कांहीं सामुदायिक यत्न केला तर काय होणार नाहीं? पण त्यांच्या म्हणजे डॉक्टर–वैद्यांच्या धर्मबुद्धीला धर्मगुरु हटकीतच नाहींत. अर्थात् सांथी म्हणजे प्रत्यक्ष वैदूंची सुद्धां पोळी पिकण्याची हुल्लड बनून जाते. अशा अनास्थेमुळें आमच्या धर्मांत वजाबाकी झपाट्यानें चालू आहे.

हें प्रकरण चालू असतां आणखी एक विचार सांगावयास हवा. शिरगणति करणारांनीं असा एक न्याय सिद्ध केला आहे कीं The masses multiply faster than the classes म्हणजे सामान्य जनसमूहाची लोकसंख्या वरिष्ठ वर्गांच्या लोकसंख्येपेक्षां जलदीनें वाढते. तिकडच्या पद्धतीनें पाहतां Masses या शब्दाच्या अर्थानें संस्कृतीचा बोध इतकासा होत नाहीं तर सांपत्तिक दर्जाचा वोध होतो. म्हणजे असें झालें कीं गरीवांची प्रजा श्रीमंतांच्या प्रजेपेक्षां भराभर वाढते. आतां अस्पृष्ट लोक हे सर्व गरीबच आहेत. पण जर कां त्यांनीं धर्मांतर केलें तर वरील न्यायाप्रमाणें त्यांची झपाट्यानें वाढणारी प्रजा अन्यधर्मीयच होणार. असें झालें म्हणजे लोकसंख्येचा कांटा आपल्या विरुद्धच जाणार.

ही वजाबाकी जों जों अशीच चालत राहील तों तों हिंदुस्थानांत एक निराळा गट उत्पन्न होत आहेसें समजावें. कितीही माना वांकड्या करून राष्ट्रभाव आळविला तरी राष्ट्राच्या चतुःसीमेच्या टोपणाहून विशाल असें हें धर्माचें टोपण आहेसें कवूल करावें लागेल. मुसलमानाला युरोपांतून वाहेर काढण्याची ख्रिस्त्यांची उत्सुकता आणि राजकारस्थानी मुत्सद्यांची तिला संमति या गोष्टी जर एकादी जाणीव मनांत आणून कोंवींत असल्या तर ती हीच कीं, अजून तरी राष्ट्रभावनेपेक्षां धर्मभावना अधिक शिरजोर ठरण्याचा काळ गेला नाहीं. तेव्हां शहाण्याहून शहाणे होण्याची हौस

न दाळगिलेली वरी. अस्पृश्य लोकांना आपल्या उपेक्षेनें आपण जाणूनबुजून पाद्री लोकांच्या तावडींत देत आहोंत व घरच्या घरीं एक नवीन तिढा उत्पन्न करीत आहोंत. आपल्या संस्कृतीची रक्षक होण्यासारखी प्रजा फुकाफुकी गमावणें हें पढतमूर्खाचें लक्षण आहे. पण तो अस्पृश्य तरी आमच्या संस्कृती-चा रक्षक केव्हां बनेल? जेव्हां त्याला तिच्या कक्षेंत घ्याल तेव्हां! तिचे सर्व तऱ्हेचे फायदे त्याच्या वांटचाला येतील तेव्हां. त्याला जर तुम्ही संस्कृत केलें नाहीं तर तो वाटेल त्या नव्या मताला मिळणार आणि वाटेल त्याच्या गोड हांकेला 'ओ' म्हणणार.

असो. ही आपत्ति लक्षांत घेऊन या लोकांना ख्रिस्ती न होऊं देणें जरूर आहे. तसेंच धर्मांतर केलेल्यांना परत आपल्याकडे घेण्याचे प्रयत्न होणें जरूर आहे. 'मी ख्रिस्ती होणार' असें अवमानानें त्रस्त झालेला अस्पृश्य म्हणाला, तर कांहीं लोक उदासीन आवाजानें 'जा हो जा' असें म्हणतात. पण यांत जितका त्रागा दिसतो तितकी काळजी दिसत नाहीं. शक्य ते सर्व प्रयत्न त्याला ठेवून घेण्यासाठीं केले आणि मग जर तो आडमुठेपणानें 'ख्रिस्ती होणार' असें म्हणूं लागला तर त्या वेळची ही भाषा आहे. आधींची नाहीं. पण अस्पृश्य इतका आडमुठा नाही. नाहीं नाहीं म्हटलें तरी अगदीं झिरझिरीत कां होईना पण त्याच्या समाजावर हिंदुत्वाचेंच पांघरूण आहे. तेंच जर जास्त उवदार झालें तर त्याला काय नको आहे? तो आपल्यांत वागत आलेलाच नाहीं. तर तसा प्रयत्न करावा आणि मग रागवावें. असो. जे आधींच ख्रिस्ती झाले आहेत त्यांना परत आणणें जरूर आहे आणि अशा तऱ्हेचा प्रयत्न जरी धर्मगुरूंनीं केला नाहीं तरी कै. वैद्यांनी सुरू केलेला व आतां वाढत चाललेला सर्वांना माहीत आहे. मसूरकर महाराजांनीं तो चालू ठेवला आहे. हा प्रयत्नहि पूर्ण यशस्वी होण्यास अस्पृश्यता-निवारणाची जरूर आहे. कारण ख्रिस्ती झालेल्या महाराला आपण स्पृश्य कोटींत आलों आहों, इतरांशीं हस्तांदोलनाला योग्य झालों आहों ही जाणीव उत्पन्न झालेली असते. पण पुनः जर हिंदुत्वांत गेलों तर संस्कृतीच्या कुंचलीनें माझें कपाळ पुसून काढतील आणि तेथील अस्पृश्य हा छाप वाचून हा 'अस्पृश्य ऱ्हे अस्पृश्य' म्हणून, पुनः येरे माझ्या मागल्या करावयास लोक

चुकावयाचे नाहींत, असा वहिम त्याला येत राहील यांत शंका नाहीं. तेव्हां त्याला परत बोलवितांना त्याच्या मनांतील या वारीक शंकेला जागा उरूं देतां कामां नये. त्याला आपण हिंदुसमाजांतले अधिकृत घटक आहों अशी भावना उत्पन्न होईसा दिलदारपणा आपण दाखविला पाहिजे. धर्मापासून प्राप्त होणारे नैतिक फायदे आपण त्याला मिळूं दिले पाहिजेत. कोणी कोणी असें समाधान सांगतात कीं, ते घाणेरडे असतात तेव्हां त्यांना धर्ममंदिरांत कसें घ्यावें? वास्तविक पाहतां ही गोष्ट स्वच्छतेच्या मुद्यावरच अडली आहे असें वाटत नाहीं. पण तसें जर खरोखरच असेल तर धर्मगुरूंनीं तसें सांगावें कीं, अमुक एक डिग्रीची स्वच्छता असली तर त्यांना आंत घेऊं. गोव्याकडील अगदीं घाणेऱ्या व केवळ 'लंगोटी व पंखा' च नेहमीं घालणाऱ्या ख्रिस्ती कामाठ्याला सुद्धां स्वच्छ होऊन डगलापट्टा घालून चर्चमध्यें जातां येतें. तसें आचार्यांनीं यांना सांगावें कीं, तुम्हांस आंत घेण्यास तुमच्या घाणेरडेपणाखेरीज दुसरा कोणताहि प्रत्यवाय नाहीं. असें धर्मगुरु म्हणावयास कबूल आहेत का पहा आणि मग स्वच्छतेचा मुद्दा पुढें आणा. मुसलमान किंवा ख्रिस्ती निदान देवळाच्या प्राकारांत जेथपर्यंत येऊं शकतो तेथपर्यंतहि अस्पृश्य येऊं शकत नाहीं, असें म्हटलें म्हणजे राज्यकर्ते विष्णूचेच अवतार असतात असें म्हणावयाचें. पुजारी जेव्हां एकाद्या साहेबाला ही मूर्ति अशी आहे आणि ती तशी आहे असें माना हालवून सांगावयास लागतो तेव्हां त्याला या उत्तराशिवाय दुसरें न सुचणेंच रास्त आहे. पण हे असले लोक आपलें दास्य लपविण्यासाठीं तत्त्वज्ञानाची फरपट काढतात आणि दास्य चिरंतन करतात येवढाच या उत्तराचा अर्थ आहे. जो कोणी मानगुटीस बसेल तो विष्णूचा अवतार! असलीं उत्तरें मिळतात म्हणून त्यांचा उल्लेख करावासा वाटतो इतकेंच. बाकी त्याची किंमत काय आहे हें कोणालाहि कळण्यासारखें आहे.

ही स्थिति पालटावयास हवी. आपल्याला हिंदुधर्मांत खसखशीत अंतभूत केलें आहे असें अस्पृष्टांस वाटावयास हवें. तें वाटावयाचें असलें तर त्याला एकच उपाय आहे. तो म्हणजे अस्पृष्टांना आपल्या देवळांत घेणें हाच होय.

देवालयांत प्रवेश

अस्पृश्यता-निवारणाच्या प्रश्नाचें पाऊल जरी पुढें पडत असलें तरी कालमानास अनुसरून त्याची गति जितकी जलद असावयास हवी तितकी

ती नाहीं असें दुःखानें म्हणावें लागतें. अस्पृष्ट समाजांत जी जागृति उत्पन्न झाली आहे, ती परिणामरूपानें हिंदु समाजास व धर्मास खरोखर बलवान् करणारीच आहे. वास्तविक पाहतां केवळ मानवधर्माचीं शुद्ध नातीं लक्षांत घेऊनच हें अस्पृश्यतानिवारणाचें काम आपण करावयास हवें, व जलद उरकावयास हवें. पण ही जी मानवधर्माची जाणीव, तिच्या जोडीला आपल्या मनांत आणखी एक जोराची जाणीव असावयास हवी. ती म्हणजे समानधर्मीयत्व हें होय. या जाणिवेनें आपले प्रयत्न दुप्पट जोरानें व्हावयास हवेत. समानधर्मीयत्वाचा पाया हा पूर्वजांनीं मागेंच भरलेला आहे. ज्या पूर्वजांच्या धर्माचे आपण रक्षक आहों, असें आपण म्हणतों त्यांनींच पाया भरलेला आहे. पूर्वीचें धार्मिक वाङ्मय साकल्यानें व त्यांतील मध्यवर्ती विचारास धरून पाहावें म्हणजे अस्पृष्ट हे हिंदूच आहेत अशी खात्री होईल. पण हिंदुत्वांत त्यांचा अंतर्भाव खसखशीत व्हावा अशी चालू काळाची जोराची आरोळी आहे. तिचे सादपडसाद महाराष्ट्रभर उठत आहेत. ज्याला ज्याला या प्रश्नाच्या सोडवणुकीस हातभार लावतां येण्यासारखा असेल, त्यानें त्यानें लाविला पाहिजे.

वास्तविक पाहतां अस्पृष्टांचा देवालयांत प्रवेश होऊं देणें ही बाब सर्वस्वीं देऊळवाल्यांच्याच जबाबदारीची आहे असें नाहीं. लोकमत जर याला अनुकूल असलें तर हा प्रश्न लवकर सुटेल हें खरें आहे; पण लोकमत अनुकूल होण्यालासुद्धां त्यांची तयारी असल्याचें दिसून आलें तर मदतच होईल. नाहीं तर लोकांना वाटत राहातें कीं, देऊळवाले याला प्रतिकूल आहेत व देऊळवाल्यांस वाटतें कीं जनता प्रतिकूल आहे; आणि प्रश्न मात्र तसाच भिजत राहतो. यांतून बाहेर पडावयास हवें. हें व्हावयास देऊळवाल्यांपैकीं कांहींजणांनीं उचल केली पाहिजे, प्रत्येक जातींतील सुशिक्षित वर्ग या कामीं त्यांना अनुकूल आहे; आणि एकंदर लोकमताचा प्रवाह अनुकूलतेकडेच वाहात आहे हें अगदीं बिनचूक खरें आहे. देऊळवाल्यांचेंही स्वतःचें मत या कामाला अनुकूल असावयास हवें. दुसरें, एकाद्यानें किंवा थोड्याशा कांहींनीं हा प्रयोग करून पाहिला आणि इतर सारे मात्र जर जुन्यासच चिकटून राहिले तर जे कोणी आपलीं देवळें खुलीं ठेवतील ते वाडगें म्हणून मानले जातील ही भीति; व तिसरें, सुशिक्षित जनता जरी अनुकूल

असली तरी त्यांस प्राप्ति जी व्हावयाची ती कांहीं सुशिक्षितांकडून होत नाहीं, तर जुन्या मताच्या लोकांकडून होते व जर करितां जुने लोक आपल्या देवळांत येण्याचें बंद झालें तर उत्पन्न येईनासें होईल ही भीति. यांपैकीं पहिली बाब आमच्या मतें फार महत्त्वाची आहे. कारण स्वतःचेंच मत जर नवीन पायंडयाला अनुकूल असलें तर प्रतिकूलता खणून काढण्यासाठीं आपण हरतऱ्हेनें खटपट करतों. इतकेंच नव्हे तर त्यागालाहि प्रवृत्त होतों. कोणतीही नवी गोष्ट करावयास सर्व समाज एकदम तयार होईल हें खरें नाहीं; व त्याप्रमाणेंच सर्व समाज तयार झाल्यावरच आपण जागचें हालूं हाहि न्याय खरा नाहीं. अशानें कोणत्याही सुधारणेचें पाऊल पुढें पडावयाचें नाहीं. कांहीं जणांचें पुढें जाणें हेंच बहुतांना पुढें सरावयास प्रोत्साहक बनतें. देऊळवाल्यांतच जर हें मत पत्करलें गेलें तर त्यांच्या अनुकूलतेचा परिणाम जनमनावर फार मोठा होणार आहे. आणि देऊळवाल्यांनीं हें मत पत्करणें कालगतीनें प्राप्त आहे. इतकेंच नव्हे, तर ते बहुतेक सर्व सुशिक्षित वर्गांतीलच असल्यामुळें व चालू काळाशीं त्यांची उत्तम ओळख असल्यामुळें त्यांच्यावरहि इतर सुशिक्षितांप्रमाणें ही जबाबदारी येऊन पडते. म्हणून आमचें म्हणणें असें कीं, कांहीं देवळांच्या मालकांनीं जरी पुढें होऊन अस्पृष्टांस देवालयप्रवेश करूं दिला तरी या चळवळीच्या यशाला त्यांनीं मोठाच हातभार लावला असें होणार आहे. अल्पसंख्य लोकांचें मत जर उदयोन्मुख असलें व म्हणून प्रभावी होत चाललें असलें तर बहुमताची भीति फार काळ टिकूं शकत नाहीं. कारण तें तें मत प्रभावी होत आहे याचाच अर्थ, प्रस्तुतचें बहुमत रोडावत जात असून अल्पमत पोसत जात आहे, असा आहे. म्हणून आपण कायमचेच बाडगे समजले जाऊं अगर दर्शनास येणाऱ्यांकडून होणारें उत्पन्न कायमचेंच बसेल ही भीति फार थोडा काळ खरी ठरणार आहे. शिवाय या बाबतींत पर्यायही आहेत. सर्वच देऊळवाल्यांचें या उपऱ्या उत्पन्नावर चाललें आहे असें नाहीं. शेंकडों देवळांना कायमचीं उत्पन्नें आहेत आणि एक पैहि कांहीं काळ देवापुढें पडली नाहीं तरी मालकांचा गुजारा व्हावयास कांहींच हरकत पडणार नाहीं. दहा अज्ञ दूर राहिले पण एखादा सुज्ञ जवळ झाला तर देवळाच्या प्रतिष्ठेचा काटा कोणीकडे झुकतो हें सहज दिसेल. दहा जणांनी अज्ञानामुळें दुरुत्तरें केलीं पण जर एखाद्या सुज्ञानें उदार देऊळवाल्यांची भलाई गौरविली तर

त्याच्या स्थानाची प्रतिष्ठा वाढली असा त्याचा अर्थ आहे. चार अज्ञ आळीकरांनीं या देवाचें दर्शन घेतलें नाहीं, पण देवळाच्या औदार्याचा लौकिक ऐकून गांवांत इतर कामानिमित्त आलेल्या पंडित मालवीयांनीं अथवा म. गांधींनी त्या देवळांत जाऊन देवास नमस्कार घातला तर देवळाचें पावित्र्यसुद्धां वाढलें असें होईल. शिवाय सभामंडपांत येऊन चार लोक जेथून दर्शन घेतात, कथाकीर्तनें ऐकतात, तेथें अस्पृष्टांसही येऊं द्या इतकेंच आम्ही म्हणत आहों. सभामंडपांतून जेथून सर्व लोक सरसहा दर्शन घेत आहेत तेथून दर्शन घ्यावयास अस्पृष्टांस परवानगी असावी इतकीच विनंति आहे. कित्येक देवळें एकाच्या मालकीचीं नसून पंचांच्या ताब्यांत आहेत. त्या पंचमंडळीसही हीच विनंति करावयाची आहे, पण या प्रघातास मदत करावयास समर्थ असे तेच देऊळवाले होत कीं, ज्यांचीं देवळें त्यांच्या स्वतःच्या खासगी मालकीचीं आहेत, आणि ज्यांस चरितार्थासाठीं देवापुढील उत्पन्नावर अवलंबून राहावें लागत नाहीं. अशांची संख्याहि कांहीं अल्पस्वल्प नाही. यांना लोकापवादाची हाय लागेल हें खरेंच आहे. त्यांनीं ती सोसली पाहिजे. अगदीं कसलीहि गैरसोय न होतां आणि कसलाहि त्याग न करावा लागतां नवमतांचा पुरस्कार कोणास कधींहि करतां येत नाहीं आणि नवा प्रघातहि पाडतां येत नाहीं. लोकमताला मान देणें या तत्त्वाला जशी किंमत आहे त्याप्रमाणें स्वार्थत्यागाच्या तत्त्वालाही किंमत आहे हें मनांत बिंबवून घेतलें पाहिजे.

देऊळवाल्यांनीं हाही विचार ध्यानांत घ्यावयास हवा कीं, नवोदित मत हें हिंदुधर्म तारावयास पुढें येत आहे. त्यास मारावयास येत नाहीं. मात्र देवळें शिल्लक राहावयास हवीं असलीं तर तुम्ही अस्पृष्टांस जवळ करा, असला दुबळा विचार आम्ही कधीं दुरूनहि सुचविणार नाहीं. अस्पृष्ट लोक म्हणजे काय कोणी राखणदार भय्ये आहेत कीं काय कीं त्यांस दर्शनपरवानगीची लालूच दाखवून त्यांजकडून रक्षण करून घ्यावें ? आणि आजपर्यंत देवळें टिकलीं आहेत तींही त्यांच्या मदतीवांचून टिकलीं आहेत हेंहि खरें नाहीं काय? म्हणून असला लालुचीचा विचार कोणीही नवमतवाद्यानें प्रसृत करूं नये. अस्पृष्ट हे हिंदूच आहेत आणि म्हणूनच त्यांना देवालयप्रवेश हवा. हा शुद्ध संघटनेचा विचार आहे, व त्याच्या बळावर हें कार्य व्हावयास हवें. देवळें

इतर सर्वांचीं ज्या अर्थानें आहेत त्याच अर्थानें त्यांचींहि झालीं म्हणजे त्यांच्या रक्षणासाठीं त्यांनीं काय करावें हें आपण त्यांस सांगावयास जाण्याचें कारण नाहीं. त्यांच्या व आमच्या सहविचारानें जें काय करावयाचें असेल तें होत राहील. पण या प्रश्नाचें जें विशाल रूप आहे तें ध्यानांत घ्यावयास हवें. हिंदुधर्माचें धोरण आणि त्याचा समावेश हीं उत्तरोत्तर उदारपणाचीं व विस्तृत होत आलेलीं आहेत. त्यांतीलच हा पुढचा हप्ता आहे हें ध्यानांत घ्यावयास हवें. आपली औदार्यबुद्धि, सुधारणेचा एक हप्ता आक्रमिल्या-वरोबर आळून बसते हें वरें नाहीं. मूळचीं थोर तत्त्वज्ञानें जशीं आळलीं तशींच साधुसंतांनीं प्रसृत केलेलीं भक्तिमार्गतत्त्वेंहि आळून बसलीं आहेत. नवविचारानें त्यांस आंच लावावयास हवी, व त्यांचा खळखळाट पुनः सुरू करावयास हवा. अशानेंच आपल्या या आपद्ग्रस्त धर्माची प्रतिष्ठा वाढेल आणि त्याचें सामर्थ्य कसल्याहि शत्रूस कापरें भरवील. जो धर्म मनःशांति देत नाहीं आणि आत्मिक बल वाढविण्यास मदत करीत नाहीं, त्याजवर निष्ठा ती कसली असावयाची? म्हणून जो जो कोणी हिंदुधर्माचा म्हणून मोडतो, त्यास या सामर्थ्याचा उपयोग, हटकून करूं दिला पाहिजे! हें झालें म्हणजे त्याची त्यावरची निष्ठा वाढेल आणि निष्ठायुक्त अनुयायी ज्या धर्मांत आहेत त्यास कोणी कितीहि बळवंत असला तरी त्याची दरडावण्याची छाती होणार नाहीं.

समाजानेंहि देऊळवाल्यांचें काम सोपें केलें पाहिजे. अस्पृष्टांस जर आपला धर्मबांधव म्हणावयाचें तर आपण आपखुषीनें त्याला देवळांत घेतलें पाहिजे. देवळांत घेतल्यानेंच त्याच्या सुधारणेला जास्त मदत होईल हें विसरतां कामां नये. समाजाची उचल जोराची आहे असें जर दिसलें तर देऊळवालेहि इत-केसे बिचकणार नाहींत. म्हणून कालमान लक्षांत घेऊन व अस्पृष्टांच्या आतुरतेकडे लक्ष देऊन त्यांना देवळांत घेण्याविषयींची सर्व समाजानें तयारी दाखवावी. जे कोणी प्रतिपादक आहेत त्यांनीं समाजाचें मत–परिवर्तन कर-ण्याची खटपट करावी. त्यानेंच हें काम तडीस जाणार आहे. हिंदुधर्मांत जे शेंकडों पंथ आपल्याला दिसतात ते या परिवर्तनपद्धतीनेंच प्रस्थापित झाले आहेत. म्हणून या यशस्वी होत आलेल्या पद्धतीचा लोकांनीं अवलंब करावा-

मतपरिवर्तनाचें महत्त्व.

पुणें येथील पर्वतीसत्याग्रहाच्या वेळीं 'मतपरिवर्तन' या शब्दाचा उपयोग पुष्कळदा झाल्यामुळें प्रस्तुत प्रश्नाच्या सोडवणुकीशीं तो कायमचा निबद्ध झाला आहे. त्याचा उपयोग कित्येकांस खपत नाहीं. कारण कीं त्यानें काम पुढें ढकलण्याची बुद्धि सुचविली जाते असें त्यांस वाटतें. दुसरे कित्येक तर त्याची टर उडविण्यासच प्रवृत्त होतात. कारण त्या शब्दानें सुचविलेल्या चळवळींत कांहीं धकाधकी आणि झगझग नाहीं. माझी या सर्वांस आग्रहाची विनंति आहे कीं, त्यांनीं निराशा वाटूं देऊं नये, व अवहेलनेची ऊर्मि आवरून धरावी. मंदिरप्रवेश घडवून आणण्याच्या कामीं ज्या ज्या साधनांची शिफारस होते त्यांची तपशिलवार छाननी वरील विचारकांनीं आपल्या मनाशीं करावी व 'मतपरिवर्तन' पद्धतीचें महत्त्व तुलनेनें ठरवावें. पण त्याच्याहि आधीं या प्रश्नाचें खरें रूप कोणतें हें त्यांनीं व सर्वांनींच नीट ओळखावें हें युक्त आहे. खरी कार्यसाधकता मतपरिवर्तनाच्याच अंगीं आहे हें, प्रश्नाचें रूप नीट ओळखल्यानें, ध्यानांत येईल.

जे लोक सध्यां देवळांत दर्शनपूजनास जातात ते अस्पृष्टांचा प्रवेश तेथें झाल्यावरहि जात राहिले तरच प्रस्तुत प्रश्न खरोखर सुटला हें आपण पुनः पुनः विसरत आहों. प्रश्न आहे तो अस्पृष्टांना मंदिरप्रवेश मिळावा हा नाहीं; तर स्पृश्य लोक **ज्या देवळांत** दर्शनपूजन करतात **त्या देवळांत** अस्पृष्टांस येऊं देण्यास व निदान सहदर्शनास ते तयार आहेत कीं नाहीं, हा आहे. "हिंदू देवतांच्या मंदिरांत प्रवेश" येवढाच प्रश्न असता तर काम अगदींच सोपें होतें, किंवा काम मुळांतच नव्हतें असेंच म्हटलें पाहिजे. कारण अस्पृष्टांना आपापलीं देवळें आहेत, व तेथें ते जातातच. तर प्रश्न तो नाहीं. ज्या देवळांत स्पृश्य जातात व ज्यांत अस्पृष्टांस प्रवेश मिळाला तरी स्पृश्य जात राहतील त्या देवळांत अस्पृष्टांस प्रवेश हवा आहे, असा प्रश्न आहे. कोणत्या का इतर उपायांनीं होईना पण अस्पृष्टांस मंदिरप्रवेश साध्य झाला, पण जर तेथें जाणारे स्पृश्य मात्र जावयाचे बंद झाले तर सध्यां आहे या परिस्थितीहून कांहीं निराळें झालें असें खुद्द अस्पृष्टांससुद्धां वाटावयाचें नाहीं. बाहेर असलेले अस्पृष्ट आंत जातील व

आंत असलेले स्पृश्य बाहेर पडतील असा प्रकार होईल. पण चळवळ तर त्या दोघांना एकत्र आणावयासाठीं आहे. म्हणून साध्याचें हें रूप ओळखून त्यावर साधनाची योजना करावयास हवी. मतपरिवर्तनविरहित जीं साधनें अवलंविण्यास योग्य म्हणून शिफारस होते त्यांनीं कदाचित् देवळें हस्तगत होतील व अस्पृष्टांचा प्रवेशहि तेथें होईल. पण तसें झाल्यावर, स्पृश्यांच्या मनाविरुद्ध जर तें काम झालें असेल तर, त्या स्पृश्यांना तेथें यावयास लावणें कसें शक्य आहे हें कोणी सांगेल काय? सत्याग्रहाच्या अवलंबनानें कार्याची निकड उत्पन्न झाली आहे इतकेंच सिद्ध होतें; त्या साधनांत कार्यसाधकता आहे हें सिद्ध होत नाहीं.

वरील परिच्छेदांत प्रतिपादिलेलें प्रश्नाचें रूप ध्यानांत ठेवूनच साधनांचा विचार करावयास हवा. ज्या ज्या साधनांच्या योजनेमुळें स्पृश्य लोक देवळापासून दूर सरकतील तें तें साधन योजण्यास नालायक आहे हा विचार साधनचिकित्सेच्या वेळीं आपल्या डोळ्यापुढें अविचलित हवा. असो. मतपरिवर्तनाची खटपट अस्पृश्यता–निवारणाच्या कामीं आज कित्येक दिवस चालूच आहे. पण या विशाल प्रश्नांपैकीं देवालय–प्रवेश हा एक सुटा प्रश्न उचलून त्या वादतींत मतपरिवर्तनाची खटपट जोरानें करावी असें आतां म० गांधीनींही ठरविलें आहे, व त्यास अनुसरून खटपट सुरूही झाली आहे मतपरिवर्तन–कार्यपद्धतींत कांहीं वीरश्री, झगझग इत्यादि नाहीं. वास्तविक पाहतां मतपरिवर्तन हाहि विजयच होय. पण तो घडवून आणण्याच्या कामीं आर्जव, कुशलता, युक्तिवाद, धर्मबुद्धीस आवाहन इत्यादि लागतात, व त्या कामांतील व विजयांतील मानसिक सुख अनुभविण्यास आपली रुचि सुसंस्कृत व सूक्ष्म असावयास हवी. यांच्या अभावीं, कोणाकोणास हा विजय नकोसा, इतकेंच नव्हे तर उपहास्य वाटूं लागला आहे.

हेंहि चाललें असतें. साधनयोजना हा रुचिभिन्नत्वाचा प्रश्न होऊं शकेल. पण साधन हें कार्यसाधक असलें पाहिजे. व वर वर्णिलेली कसोटीहि त्यास अवश्य लागली पाहिजे, हा विचार पुण्यास मागें सत्याग्रह झाला त्यावेळीं हयगयींत सांपडला! येथें चूक झाली, सत्याग्रहाची योजना साधन म्हणून आली! यावर व्हावयाचें तें झालें. सत्याग्रहानें, म्हणजे आग्रहानें, म्हणजे हट्टानें, म्हणजे

स्पृश्य लोकांना मान्य नसतांहि देवळांत शिरण्याचा प्रयत्न होणार असें दिसूं लागलें. "देवळें उघडीं राहिलीं असतीं तरी आम्ही आंत शिरलों नसतों." असें कोणी कोणी बचावादाखल म्हणतात; पण त्यांत कांहींच स्वारस्य नाहीं. सत्याग्रही आंत शिरण्याची भीति नसती तर देवळाचे दरवाजेहि लावले गेले नसते. केवळ दाराबाहेर हे लोक उभे आहेत यासाठीं कोणीहि दरवाजे लावले नसते. कारण दुर्दैवानें हे लोक आज हजारों वर्षें दाराबाहेर उभे राहातच आले आहेत. तरी कोणी दरवाजे लावले नव्हते. असो. याचा अर्थ असा कीं, स्पृश्यांस अमान्य असतां अस्पृश्य पुढारी देवालयप्रवेश घडवूं इच्छित होते.

बरें, तो घडला असता असें क्षणभर मानलें तरी काय झालें असतें? किंबहुना तो कायमचा घडला असता तरी काय झालें असतें? याचें उत्तर हेंच कीं, ज्या बहुजनसमाजास हें अमान्य आहे ते देवळांतून बाहेर पडले असते. पण आपली चळवळ तर या उभयतांना एकत्र आणावयाची आहे. मग हें साधन दुसऱ्या परिच्छेदांत सांगितलेल्या कसोटीस मुळींच उतरत नाहीं; आणि म्हणून तें योजण्यास लायक नाहीं. यावर कोणी अशी कोटी केली कीं, सत्याग्रह हा मतपरिवर्तनाचा इलाज म्हणून आहे. जबरदस्तीनें मनें वश कशीं करतां येतात हें उमगणें कठीण आहे व तीं तशीं वश होत नाहींत हेंहि अनुभवानें सिद्ध झालें आहे. म्हणून ही कोटी केवळ वांया आहे. कोणी म्हणतात कीं, आपण कोण हें न सांगतांच अस्पृष्टांनीं खुशाल जाऊं लागावें. असें बरेच दिवस होत राहिलें म्हणजे लोक समजतील कीं ही वहिवाटच आहे. समाजाच्या दुर्लक्षानें एकादी गोष्ट होत राहून ती शेवटीं वहिवाटीचा हक्क कसा सांगते व विसरभोळा समाज तो हक्क कसा मान्य करतो यावर ही मोठी मनोरंजक टीका आहे. पण एक तर यांत धडधडीत चोरी आहे, व म्हणून कोणीहि स्वाभिमानी मनुष्य हा मार्ग पत्करणार नाहीं. अस्पृष्टांना देवालयप्रवेश साखसुरत हवा; चोरून नको. व शिवाय या मार्गाचें प्रतिपादन कसें करावयाचें? चोरीची मुख्य मदार यावर आहे कीं, ती कोणास कळवावयाची नसते! कोणाचें म्हणणें दंडेली करावी. पण हें दंडेलीनें भागण्यासारखें नाहीं. आपल्यापेक्षां जास्त

दंडेली करणारे लोक प्रतिपक्षाकडे आहेत हें दोनतीन ठिकाणीं दिसून आलें आहे. शिवाय इतकेंहि करून ध्येयरूप साध्य म्हणजे सहदर्शनपूजन हें हातचें निसटून जाणार हें वर दाखविलेंच आहे. त्रागा करणें, खरखरमुंडेपणा करणें, तळतळाट देणें हाहि मार्ग आहे असें कोणी सांगतात. यानें भोळ्या स्पृश्यांच्या मनांत आत्मिक भय उत्पन्न करावें अशी अपेक्षा असते. याला अनुसरूनच पुण्याच्या सत्याग्रहाच्या वेळीं अंगांत आणण्याचा उपक्रमहि कोणी करून पाहिला होता. पण समाज असल्या उपायाला भीतहि नाहीं व भ्याला तर एकादे वेळीं क्षणभर वश होईल पण मनांतलें किल्मिष निघालेलें नसल्यामुळें मुरडून पहिल्या वळणावर जाईल. म्हणून महात्मा गांधींनाही पुढें दिलेलें अनावृत पत्र लिहिण्याचें धाडस केलें. कोणी कोणी असें प्रतिपादितात कीं देवालयप्रवेश हा आमचा हक्क आहे व म्हणून आम्ही जाणार. 'आमचा हक्क आहे' या शब्दप्रयोगांत अनेक मतांचा संकर झालेला आहे. पैकीं खरें सात्त्विक आपुलकीच्या भावनेचें मत हें कीं, आम्ही जर हिंदू आहों, सनातनी आहों, तर आम्हांला देवळांत कां बरें येऊं देऊं नये ? हें मत अक्षरशः खरें आहे; आणि म्हणूनच मतपरिवर्तनाची यातायात करावयास हवी असें आम्ही म्हणतों. या मतांत अस्पृष्टांच्या धर्मश्रद्धेच्या जिवंतपणाचा झरा दिसतो म्हणून तर समाजानें मतपरिवर्तनासाठीं सज्ज व्हावयास हवें असें आम्ही म्हणतों. हें मतच या चळवळीचें पायाभूत तत्त्व आहे. हा अस्पृष्टांचा हक्क खरा आहेच आहे व हें तत्त्व स्पृश्यांना पटवून देणें, त्यांनासुद्धां तसेंच वाटावयास लावणें, याचेंच नांव मतपरिवर्तन हें होय. इतकेंच कीं एखादा हक्क दोघांनीं जर एकत्र भोगावयाचा असेल तर त्या दोघांनाहि त्याची जाणीव व कबुली असली पाहिजे. सध्यां हच्या दोघांपैकीं अस्पृष्टांना ती झाली आहे. उरलेला पक्ष जो स्पृश्य त्यालाहि ती करून देणें याचेंच नांव मतपरिवर्तन.

पण 'हक्क' शब्दाचा उपयोग इतर कोणी निराळ्या अर्थानें करतात. ते म्हणतात देवळें सार्वजनिक आहेत. सर्व जन जातात म्हणून सार्वजनिक असा अर्थ केला जातो असें दिसतें. "देवळें खासगी मालकीचीं आहेत" असें याला उत्तर देण्यांत येतें. पण किती देवळें खासगी आहेत व एकहि देऊळ सार्वजनिक मालकीचें नाहीं की काय, याची माहिती मला स्वतःला नाही.

पण मला वाटतें हा मालकीचा प्रश्न नाहीं. 'सार्वजनिक' म्हणण्यानें जो कायदेशीरपणा त्यांतून सुचविला जातो त्याला हें कायदेशीर उत्तर असावें असें वाटतें. सनातनी स्पृश्यांचें खरें उत्तर हें आहे कीं, "सार्वजनिक खरें; पण जे आम्ही तेथें आजवर जाणारे त्या सर्वांचें, या अर्थानें सार्वजनिक असें हें देऊळ आहे." एका विवक्षित वर्गाची व तेवढ्या वर्गापुरती सार्वजनिक अशी संस्था सार्वजनिक नांवानें मोडूं शकते. 'हिंदू हॉटेल,' 'मुसलमान हॉटेल,' 'वीरशैव बोर्डिंग' हीं सार्वजनिक ठिकाणेंच आहेत. पण त्यांतला सार्वजनिकपणा कोठपर्यंत पोंचवावयाचा हें स्पष्ट आहे. त्याप्रमाणेंच हीं देवळें सार्वजनिक म्हटलीं तरी त्यांचा सार्वजनिकपणा कितपत आहे हें आजवरच्या संकेतानें व वहिवाटीनें ठरलेलें नाहीं काय? 'सार्वजनिक' या शब्दाचा आपल्याला हवा तो अर्थ काढण्याच्या या पद्धतीमुळें, या संकेताला प्रत्यक्ष नांव देण्यास आपण स्पृश्यांना भाग पाडूं कीं काय हा विचार चळवळ करणारांनीं ध्यानांत घ्यावा. एकेकदां त्यांनीं "त्रैवर्णिकांचें देऊळ" "चतुर्वर्णांचें देऊळ" अशा पाटच्या लावण्यास सुरवात केली म्हणजे चळवळीचें अधिष्ठान आकसत चाललें असें होणार नाहीं काय? ही आपत्ति फार मोठी आहे. म्हणून आपण वैचारिक सचोटी ठेवून शब्दांना नसलेले अर्थ त्यांना चिकटविण्याचें साहस करूं नये; कारण त्यानें प्रकरण चिघळत जातें. कोणी सार्वजनिक याचा अर्थ सरकारी मदतीवर चाललेली किंवा तसली मदत अंशतः असलेली असा करतात; आणि ज्याअर्थीं सरकारी खजिना सर्वांचा त्याअर्थीं तेथें जाण्याचा आम्हांस हक्क आहे असा त्यांचा आग्रह आहे. हेंहि बोलणें निर्णायक नाहीं. एकतर कांहीं देवळांना जी मदत सरकार देते ती त्यांना सार्वजनिकपणा यावा म्हणून देत नाहीं तर आपली राजवट कायम करण्याच्या वेळीं वचनें दिलीं म्हणून देतें. दुसरें असें कीं, अशी मदत ज्याला असेल त्या ठिकाणीं सार्वजनिकपणा येतो हें म्हणणें चूक आहे. कारण कीं, ख्रिस्त्यांच्या शाळेला, मुसलमानांच्या शाळेला सरकारी मदत आहे म्हणून वाटेल ते लोक त्या संस्थांचा आम्हांला उपयोग झाला पाहिजे असें म्हणूं लागले तर चालावयाचें नाहीं. यावर कोणी म्हणेल कीं या कामीं हिंदुत्वापुरता सार्वजनिकपणा आम्ही मानतों तर त्याचा अर्थ असा होईल कीं खजिन्याचा सार्वजनिकपणा तुम्हीं सोडला व त्या म्हणण्यावरून धार्मिक सार्वजनिकपणावर आलां, म्हणजे नागरिकत्वा-

वरून धर्मावर आलां! मग असें जर आहे तर, स्पृश्य म्हणणार, आणखी थोडें पुढें जाऊन सरकारास चतुर्वर्णिकांच्या देवळांस मदत करावयास काय हरकत असावी? खजिन्याच्या मुद्यावर आपल्या देवळांत मुसलमानाला व ख्रिस्त्याला सुद्धां घ्यावें लागेल. म्हणजे काय कीं या कैचींत धरण्याच्या वोलण्याला अंत नाहीं. **आपला खरा मित्र शत्रूस कोंडणें हा नव्हे तर त्याचें मन कवजांत आणणें हा आहे.**

कोणी कोणी लोक कायदेकौन्सिलांतून बिलें आणून, त्यांच्या साहाय्यानें, देवळें जर अस्पृष्टांना उघडीं केलीं नाहींत तर त्याचीं हीं उत्पन्नें खालसा करावीं म्हणून कलागत करणार आहेत. पण हा निराशादर्शक उपाय आहे व तो अमलांत आल्यास उत्पन्न हिरावण्याचें श्रेय त्यांस मिळेल. पण वर सांगितलेलें ध्येय कधींच साध्य होणार नाहीं. हा कांहीं साधक उपाय नाहीं, सूड आहे. प्रश्न आहे तो भावनाबदलाचा आहे. रुपये–आण्यांचा नाहीं. घोडें पाण्यावर नेणें एका माणसाच्यानें सुद्धां होतें. पण त्याला पाणी प्यावयास लावणें विसांच्या हातून होणार नाहीं. त्याप्रमाणें उत्पन्न हिरावलें तरी अस्पृश्यांना देवालयप्रवेश कसा साधतो व जबरीनें साधला तरी बाहेर पडणाऱ्या स्पृश्यांना तेथें यावयास लावणें कोणत्या सरकारास शक्य आहे, हें कोणी सांगेल काय? देवळांच्या सार्वजनिकपणाचा मुद्दा उगाच आहे. म्युनिसिपालिटीच्या सडकेइतकें सार्वजनिक कांहींच नसतें. पण देवालयप्रवेशाचा हक्क सार्वजनिकपणाच्या मुद्द्यावर बजवावयास निघणारे लोक, "प्रार्थना चालू आहे, दिंड्या नेऊं नका" असें मुसलमानांनीं बजावल्याबरोबर मात्र रस्त्याचा सार्वजनिकपणा विसरून निमूटपणानें चालतांना दिसतात. म्हणून माझें सविनय म्हणणें इतकेंच आहे कीं, आपण आडरानांत शिरूं नये. हिकमती, गफलती, द्रव्य, कायदा, आधार या बाबतींत आपण पुरे पडणार नाहीं. म्हणून देवालय-प्रकरणीं त्यांत शिरूंच नये हें योग्य आहे.

वरील सर्व विचार मनांत आणले म्हणजे मतपरिवर्तनासारखा आपल्याला दुसरा सखा नाहीं हें ध्यानांत येईल. आपला समाज आपल्याला पुरा माहीत असतांना अस्पृष्टांना सत्याग्रहाच्या भरीस घालून, निराशेच्या तीव्र तापांत आणन सोडल्यानें काय संकट ओढवतें हें नाशिकच्या सत्याग्रहानंतर

झालेल्या धर्मांतरामुळें सर्वांच्याच चरचरून ध्यानांत भरलें असेल. पण झालें तें झालें. स्पृष्टास्पृष्ट पुढाऱ्यांनीं आतां मतपरिवर्तनासाठीं एक व्हावें. समाजाच्या धर्मबुद्धीस, न्यायविचारास, सदसद्विवेकास आवाहन करणारे उभयविध पुढारी गांवगन्ना फिरूं लागले तर हा डाव कुजून पडावयाचा नाहीं असा माझा दृढ भरंवसा आहे. समाजाला तिरस्करणीय व उपहास्य बनविण्याची प्रथा आपण पाडूं नये. जे आपण स्पृश्य लोक देवालयप्रवेशाला अनुकूल बोलतों तें तरी मतपरिवर्तनपद्धतीनेंच अनुकूल झालों ना? मग आपल्या विरहित जे कोणी राहिले ते आपण पूर्वी होतों त्यापेक्षां जास्त दुराग्रही व हटवादी असें आपण कां मानावें? व तसें मानून कडक व कार्यनाशक उपाय कां योजावे? खरी वाण काम करणारांची, द्रव्याची व श्रमसातत्याची आहे. समाज जाब देत नाहीं हें खोटें आहे. काम करणारांनीं स्वतःच्या ढिलेपणास दोष द्यावा. इंग्रज हा परकी व स्वातंत्र्यहारक, इतिहास अनुकूल, जनता मनानें तरी तयार, कार्यकर्ते हजारों, पुढारी पहिल्या प्रतीचे बुद्धिमान् व त्यागी, व चळवळ सतत पाऊणशें वर्षें चाललेली, असें असतां सुद्धां राजकारण अजून ध्येयसिद्धीपासून किती दूर आहे हें पाहावें. म्हणजे शास्त्र व इतिहास प्रतिकूल, जनता साफ विरुद्ध, अव्वल दर्जाचा केवळ एक कार्यकर्ता आतांच इकडे वळलेला, व चळवळहि एक पिढीभर सुद्धां न झालेली, अशा स्थितींत समाजाकडून अपेक्षा तरी काय करावी हें ध्यानांत येईल. म्हणून राजकारणांतील गडबड जशीच्या तशी साधनासुद्धां इकडे दत्तक घेऊं नये. खटपटींत जितकी एकाग्रता व अखंडितपणा ठेवावा तितकें साध्य नजीक येईल. मारक उपाय योजल्यानें हें काम होणार नाहीं.

मतपरिवर्तन–पद्धतीवर माझा दृढ विश्वास असल्यामुळें महात्मा गांधी यांनीं "देवळें उघडा नाहींतर प्राणांत उपवास करीन" अशी भीति जेव्हां समाजाला घातली तेव्हा मी महात्माजींना जें अनावृत पत्र लिहिलें व जें त्यांचें उत्तर आलें तीं माझ्या टीकेसह पुढें देतों. अजूनहि या पत्रव्यवहाराला प्रस्तुत विषयांत महत्व आहे. या पत्रव्यवहारानंतर कायदा, व पुणें व नाशिक येथील सत्याग्रह यांच्यासंबंधानें महात्माजींनीं एका मुलाखतींत काढलेले उद्गार दिले आहेत व त्यानंतर आणखी एका मुलाखतींत त्यांचें व माझें जें संभाषण झालें तेंहि दिलें आहे. अस्पृश्यता–निवारणाचे अनुभव या प्रकरणांत १३९

पानावर, त्यांच्याशीं झालेल्या आणखी एका मुलाखतीची हकीकत दिली आहे. तिच्यासह, पुढील पत्रव्यवहार व मुलाखती वाचकांनीं वाचाव्या. मी महात्मा गांधींना हें पत्र लिहिलें म्हणून पुष्कळांना राग आला. पण आज महात्माजी आपण होऊन राजकारणाचा बारा महिने त्याग करून या चळवळीत पडत आहेत हें पाहिलें म्हणजे माझी तेव्हांची विनंति अगदींच अप्रासंगिक होती असें कोणास वाटणार नाहीं. तसेंच पत्रांतील मुख्य मुद्दा जो कीं, "समाजाला प्राणत्यागाची भीति घालूं नका" त्याविषयींहि कोणी कोणी नापसंती दर्शविली. पण समाजांतील कित्येक वजनवार, विचारी व सुधारक अशा सद्गृहस्थांनीं मला त्या पत्राबद्दल चांगलेंच म्हटलें. तें पत्र वाचून अस्पृश्यता-निवारणाला सर्वथा अनुकूल अशा महाराष्ट्रांतील एका श्रेष्ठ महा-महोपाध्यायानीं मला पत्र लिहिलें त्यांतील उतारा देतों:—

".....आपलीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेलीं अनावृत पत्रें वाचलीं. त्यावरून आपण योग्य तेंच धोरण या धुमाळीच्या काळांतहि राखिलें आहे यावद्दल आंतरिक संतोष झाल्यानें स्वयंप्रेरणेनें हे पत्र अभिनंदनार्थ पाठविलें आहे व श्रीशंकर आपणास योग्य मार्गानें असलीं कृत्यें करण्यास दीर्घायुष्य देवो अशी त्याची प्रार्थना करून पत्र पुरें करतों."

महात्माजींस अनावृत पत्र—

महात्माजी, आपणांस कसें संबोधावें हें पाहात होतों. पण आपल्या असंख्य अनुयायांना जें आपलें नांव पसंत तेंच देतों. पुढील चार शब्द मी भीत भीत लिहीत आहें. आपल्या व माझ्या अधिकारांतील अंतर इतकें मोठें आहे की, हे शब्द लिहिणें म्हणजे आपला उपमर्द करण्यासारखें आहे असें मला कितीदां तरी वाटलें; पण मन घट्ट करून लिहितों; आपण त्याचा अवमान किंवा विषाद मानूं नये. माझें लघुत्व हें मला झालें आहे इतकें जर प्रतीत झालें नसतें तर हें पत्र मी आपणांस याच्या आधींच लिहिलें असतें.

समाजसुधारणा व धर्मसुधारणा हीं हिंदू लोकांचीं पोरकी अपत्यें आहेत. हिंदू लोकांचें मन राजकारणग्रस्त आहे. परिस्थिति लक्षांत घेतां हें स्वाभाविक आहे असें दिसतें. राजकारणांत ज्यांनी विजय मिळविले आणि या भारत-

भूमीचे पाश निदान खिळखिळे केले त्यांच्यावर हा हिंदूसमाज आसक्त आहे. जे समाजाचें व धर्माचें राजकारणानें अनवलिप्त असें संगोपन करतात त्यांची भूमिका ध्यानांत घेण्याइतपत जागा हिंदूलोकांच्या मनांत नाहीं. जो राजकारणांत विजयी ठरला, ज्याची इर्षा, शौर्य, त्याग व विराग हीं राजकारणांत उत्कर्षानें दिसलीं तोच कोणी जर वरील पोरक्या अर्भकांना सनाथ करील तर त्याचें ऐकावयास समाज तयार असतो असा आजवरचा अनुभव आहे. हें असें कां असावें याची शहानिशा करतांना पृथक्करण बुद्धीची अगदीं कड लावली म्हणजे असें दिसतें कीं, या अन्नान्न झालेल्या व अवमानित देशांत तें अन्न मानानें खाण्याचा अधिकार जो कोणी उत्पन्न करून देईल तो आपला खरा उपकारकर्ता होय असें जनसमूहास वाटत असावें. हें त्याचें वाटणें सर्वथा युक्तच आहे. अर्थात् अशा देशभक्ताच्या सुधारणावादी आग्रहाला लोकांनीं पसंती देण्याची तयारी दाखवावी हें त्यांच्या कृतज्ञताबुद्धीस शोभेसें आहे. आपल्यासारखा देशभक्त या सुधारणेच्या भूमीवर अवतरला हें पाहून सुधारणेची इच्छा मनांत वाळगणाऱ्या अनेक सुधारकांप्रमाणें मलाहि निरतिशय आनंद होत आहे. या आपल्या आगमनानें अस्पृष्ट समाजाचा प्रश्न चालीस लागला हें पाहून परम सुख वाटतें. आपण करूं घातलेल्या त्यागाच्या प्रतिज्ञेनें सामान्य समाज खडबडून उठत आहे आणि यशस्वी देशभक्ताच्या शब्दाला जी किंमत मिळावयास हवी ती तो उत्सुकतेनें देत आहे.

महात्माजी, मला जर विचार बरोबर करतां येत असेल तर विनयबुद्धीनें लिहितों कीं, ही जागृतीची प्रणालि अमुक एका मर्यादेपर्यंतच जाणारी आहे. म्हणजे ती जेथपर्यंत पोहोंचावयास हवी तेथपर्यंत पोहोंचणारी नव्हे. आमच्याशीं झालेल्या संभाषणांत आपण म्हणालां व नंतरही जाहीर केलें कीं, अस्पृष्टता अमुक दिवसांत नष्ट न झाली तर मी पुन्हां प्राणांत उपवास करीन. महात्माजी, थोडें धैर्य धरून मी म्हणतों कीं, प्राणांताची भीति आपण समाजाला घालूं नका. राजकारणप्रवण अशा जनसमूहांत आपल्याला पुष्कळ अनुकूलता दिसेल, पण खरी ठेंच पुढें लागावयाची आहे. जेथें ती लागावयाची त्या मर्यादिपर्यंत आपण पोहोंचलां म्हणजे प्राणांत उपवासाची दहशत ही कांहींशी राजसवृत्तीची (मला तामसच म्हणावयाचें आहे, पण मी अंग चोरीत आहें.) व

वृथा ठरेल. कारण तेथून पुढील प्रांत, कीं जो खरा कब्जांत आला तरच देवालयप्रवेशविषयक अस्पृश्यता खरी नष्ट होईल, तो घाबरून लवकर लवकर अनुकूल न होणारा आणि प्रचारकाची कसोटीच पाहणारा आहे असें शेवटीं दिसून येईल. आपल्या उपकारकाच्या प्राणांत आग्रहानें ज्यांना त्यागबुद्धि सुचली त्यांचा हा झटका यापुढील प्रांतांत वावरणाऱ्या माणसास तितकाच वसेल किंवा निदान तो तसा बसवावा हें माझ्या लहान समजुतीनें योग्य नाही. आपल्या दहशतीनें नवीन मार्गाकडे वळणारे लोक आपलें म्हणणें पत्करून सुद्धां विचारानें दरिद्रीच राहतील. व खरी भीति ही कीं, मूळ वस्तु कळली नसतां त्याग्याचें भय वाळगणारे असे उरतील.

ही तळतळाटाची भीति घालूं नका. यानें, आधींच भेकड असलेला समाज, पुन्हा जास्तच भेकड होईल. हा नवा विचार कां पत्करावा याचें आपल्या चित्तांत औदार्याचें जें कोणतें चलनवलन चालू असेल तें अज्ञ माणसाच्या मनांत आपण शिरवावें व अशा रीतीनें त्यांचीं मनें कब्जांत घ्यावीं हा एकच उपाय धर्मसुधारणेच्या बाबतींत बलवत्तर आहे असें मला वाटतें. 'देवळें उघडा, नाहीं तर महात्माजी जीव देत आहेत' असें जर लोकांस सांगितलें तर हा आग्रह शापगर्भ आहे असें आपणांवर प्रीति करणाऱ्या लोकांस सुद्धां निःसंशय वाटेल. महात्माजी, या अज्ञ व विचाराच्या औदार्यास मुकलेल्या लोकांच्यापुढें आपल्या अनुयायांच्याद्वारां ही शापवाणी कां वदवितां ? 'देवळें उघडा नाहींतर महात्माजी मरत आहेत' या दोन पोटवाक्यांत जोडलेला जो कार्यकारण-संबंध तो परमार्थरीत्या आपणांस संमत आहे काय ? म्हणजे एकांतून दुसरें फलितच व्हावें असा त्यांचा अंतःसंबंध आहे काय ? पाहूं जातां इतकेंच दिसतें की, आपल्या उपकारकर्त्याच्या प्राणाची किंमत आपण इतकी तरी दिलीच पाहिजे असें लोकांस वाटावयास लावणें असा त्याचा अर्थ आहे. पण ही धर्म सुधारणेंतील विनिमयपद्धति असावी तितकी उंच दर्जाची नाहीं असें म्हणण्याचें साहस मी करतों. सुधारकानें खरी उंची गांठली असें केव्हां म्हणावें ? तर जेव्हां तो आपल्या प्रतिपादनानें श्रोत्यांस आपल्यासारखेंच वाटावयास लावील तेव्हांच. कोणत्याही विषयांत प्रतिपक्षी श्रोत्यांपुढें हाच इलाज योजावयास हवा असें म्हणतां येणार नाहीं. पण प्रस्तुत प्रश्न धर्ममत बदलण्याचा आहे. लोभ, दुष्टवासना, आसक्ति, अभिलाष इत्यादींवर मिळवावयाच्या विजया-

चा नाहीं, आणि कांहीं अंशीं तो तसा आहे असा आग्रह असला तर ज्याला सुधारावयाचें त्याला मृदु हातानेंच धुवून पुसून कबजांत घेतलें पाहिजे हें व्यावहारिक प्रमेय शिल्लक उरतें. 'देवळें उघडा, नाहींतर मी प्रायोपवेशन करीन' म्हणजे पुढल्या या प्रायोपवेशनाच्या भीतीनें तुम्हीं आतां देवळें उघडा अशी दहशत घालण्याऐवजीं ' माझे धर्मबंधूहो, तुमचीं मनें कबजांत घेण्याचे कामीं मी प्राणान्त कष्ट करीन' असा सिद्धांत जर आपण लोकांपुढें मांडिला तर तो धर्ममत-प्रवर्तकाच्या भूमीशीं खरा सुसंगत होईल असें मला वाटतें. मरणें खरें पण तें दहशत घालून नव्हे, तर कष्टत असतांना प्राप्त करून घेणें हा सुधारकांचा खरा पेशा होय. हा पत्करल्यास लोकांना सत्य ज्ञानें प्राप्त होतील, त्यांच्या हृदयांतील ग्रंथी सुटतील, त्यांच्या सर्व संशयांचा छेद होईल आणि त्यांचीं वाङ्मयें विचाराच्या अभिनव औदार्यानें समृद्ध होतील.

ही भूमिका पत्करण्यास आपल्यासारखा विरागी, देह जिंकलेला आणि वासनांवर विजय मिळविलेला साधुपुरुष सर्वथा योग्य होईल. इतर कोणाचें हें काम नव्हे. जे कोणी ही सुधारणा घडून यावी म्हणून मनांत घोकत बसले आहेत, ते पराकाष्ठा आपल्याजवळ येऊन चार गोष्टी बोलण्याच्या योग्यतेचे आहेत, इतकाच याचा अर्थ आहे. महात्माजी या भारतांत जीं मतमतांतरें प्रचलित आहेत तीं या परिवर्तन-पद्धतीनें प्रस्थापित झालीं असें इतिहास सांगतो. म्हणून आपण म्हणत असलेला हा आत्यंतिक इलाज करून पाहीनच असा आपण आग्रह धरूं नये. त्या ऐवजीं मत-परिवर्तकाची शुद्ध व उदात्त भूमिकाच केवळ आपण पत्करावी. मला परमार्थाचें कांहींच ज्ञान नाहीं आणि त्याचा प्रतिहुंकार तर मुळींच नाहीं. पण माझ्या भोळ्या भावामुळें मनश्चक्षूपुढें प्रतिपादकाच्या भूमिकेचीं मोठीं मनोज्ञ चित्रें मात्र केव्हां केव्हां दिसतात.

हा महाराष्ट्र देश वीर प्रसवणारा म्हणून जरी गाजलेला असला तरी मूळची ही संतभूमि आहे. गोदावरीचा तटाक आणि चंद्रभागेचें तीर हीं आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकोत्तर संतांनीं पावन केलेलीं आहेत. त्यांच्या संकीर्तनांनीं येथील हवा शुद्ध झालेली आहे, आणि त्यांच्या उदार आचारांचीं पाउलें तेथील वालुकेंत स्पष्ट उमटलेलीं आहेत. अशा या पुण्यभूमींत सटीक बोलणाऱ्या अशा आपल्या अनुयायांच्या मेळ्यांत आपलीं कृशांग मूर्ति प्रतिपादना-

साठीं उभी आहे, भोंवतालीं जिज्ञासू, परंपरेचे अभिमानी, दहिमी, अशा श्रोत्यांचा गराडा पडला आहे, सत्त्वभावप्रेरित अशा आपल्या वाणीचा घोष गोदावरीच्या व चंद्रभागेच्या घोषांत मिसळत आहे; या नद्यांच्या शुद्ध पाण्यानें जशीं त्यांचीं मलिन शरीरें निर्मल होतात त्याप्रमाणें आपल्या सत्य वाणीनें त्यांचीं मनें शुद्ध होत आहेत, असा देखावा मला किदीदां तरी दिसतो. राजकारणांतील आपले असंख्य अनुयायी जसे आतां भाकरी मिळणार म्हणून आनंदले आहेत तसे मिळत असलेली कदाचित जाणार असें भय कोणा वडव्याच्या पोटांत असेल; आजवरच्या पीठिकांची पडापड होत आहे म्हणून कोणी फडकरी व माळकरी मनानें खेद करीत असतील; व कोणी हें अद्‌भुत काय घडत आहे म्हणून नुसतेच विचारमूढ झाले असतील. त्या सर्वांस आपलें आगमन वैऱ्याच्या आगमनासारखें वाटूं नये, तर विचाराच्या कचाटींतून आपली सानुकूल मुक्तता करणारा असा कोणी दैवीसंपदा लाभलेला योगिराज आपणांकडे येत आहे असें त्यांस वाटावें. महात्माजी, हे लोकहि अज्ञ आहेत व म्हणून अनुकंपेस पात्र आहेत. त्यांना छळ नको असेल, पण सानुकूलतेनें परमार्थविचाराची नक्की शिकवण झाली तर ती नको असेल असें म्हणवत नाहीं. त्यांजपुढें आपण बोलावें, त्यांचे सर्व सत्वभाव जागे करावे, त्यांच्या चित्ताचीं किल्मिषें धुवावीं, त्यांना पाठ येत असलेल्या शास्त्र–वचनांचे जिवंत अर्थ कोणते हें त्यांस आपण पटवावें, त्यांच्या स्वत:च्या अज्ञानाची आपण त्यांना प्रतीति करून द्यावी, आपलें प्रतिपादन ऐकत असतां आजवरच्या अज्ञान तिमिराची त्यांना ओशाळगत व्हावी, त्यांनीं दु:खाचे उसासे टाकावे व अशा या तिमिरांतून मुक्त होऊन आपण नवजीवनांत प्रविष्ट होत आहों असें वाटून त्यांना आनंदाश्रूंचे गरगरून भरतें यावें.

महात्माजी, या लोकांना संतवचनें पाठ आहेत. परंतु त्यांतील विचारांच्या औदार्याची सारिका पंख फडफडून केव्हांच निघून गेली आहे हें त्यांना माहीत नाहीं; त्यांना पाठ येत असलेल्या वचनांना रक्तक्षय झालेला आहे; आपलें प्रतिपादन चालू झालें म्हणजे आपण, आपल्या निश्वसनानें ते विचार पुन्हा प्रभावी करावे. प्रतिपादन चालू असतां मधून मधून त्यांच्या मनांत घुटमळत असलेल्या आक्षेपांचें पाणी होऊन त्यांचे कंठ दाटून यावे; प्रतिपादनाची

शीग पोहोंचली म्हणजे आपली वाणी अस्पष्ट व्हावी; शब्द हे ध्यानाच्या तंद्रींत विरून जावे; श्रोत्यांचा व आपला शब्दातीत असा सूक्ष्म संवाद चालू व्हावा व अशा रीतीनें सर्व संशय फिटून सर्वांनीं विठ्ठलाचा जय-जयकार करावा व आपल्या अस्पृश्य बांधवांस त्यांनीं खुषीनें जवळ करावें. अशीं मधुर स्वप्नें मला कितीदां तरी पडत आलीं आहेत. मनुष्य जों जों जास्त पातकी अथवा अज्ञानी तों तों परमेश्वराचें कारुण्य जास्त उचंबळतें, हा न्याय आपल्या परवांच्या भेटींत आपण सूचित केला होता. त्याचाच अवलंब आपल्या अज्ञ देशबांधवांच्या संशय–विच्छेदाच्या कामीं आपण लागू करावा असें माझें म्हणणें आहे. त्यांस दहशतीनें सुधारावयास भाग पाडूं नये. कारण ती सुधारणा मूलग्राही व कायमची होणार नाहीं. आपण दृष्टिआड झालां कीं, त्यांच्या मनांतील सर्व विकल्प पुन्हां उभे राहतील. असें होऊं नये असें वाटतें. हें जर व्हावयास हवें असेल तर मला आपणांस एक विनंति करावयाची आहे. ही माझी विनंति वाचून राजकारणी लोक 'समय न जाणणारा' अशीं नांवें ठेवतील व 'आपला अधिकार न जाणणारा' असा दोष आपण मला द्याल. पण आपल्या चित्ताची व्यथा केव्हांतरी बोलून टाकलीच पाहिजे हें ओळखून मी ही सूचना करतों. एवढें मतपरिवर्तन आपणांशिवाय व्हावयाचें नाहीं, व आपण तर बंदिवान् आहां. राजकारणाची हिवाळी हवा अजून किती दिवस चालू राहील याचा निश्चय करवत नाहीं आणि आपण तर म्हणतां कीं अमुक दिवसांत अस्पृश्यता–निवारण झालें नाहीं तर मी प्राणत्याग करीन. महात्माजी, हें सर्व कसें जमावें? याला एकच इलाज आहे. आपण तुरुंगाच्या बाहेर यावें, वारा महिनेपर्यंत राजकारणाचें अक्षरहि बोलणार नाहीं असें वचन सरकारास द्यावें आणि या अस्पृश्यता–निवारणाच्या कामाची संततधार वारा महिने चालू ठेवावी. असें वचन देणें हें अवमानाचें आहे असें कोणास वाटेल; पण अस्पृश्यांसाठीं जीवही द्यावयास तयार असलेल्या आपणाला हा त्याग फार मोठा आहे, असें मला वाटत नाहीं. मला पक्कें स्मरत नाहीं; पण या प्रश्नाविषयीं बोलतांना आपण असें म्हणालां असें वाटतें कीं, कायदे-भंगाची हाक मला जास्त महत्त्वाची वाटते. हेंच जर आपलें कायमचें मत असेल तर आपल्या प्रयत्नांवर आशा लावून बसलेल्या सर्व समाज-सुधारकांच्या आशा सुकून गेल्या असें आपण समजावें. आपण मागल्या मोठ्या शिक्षेंतून

जेव्हां सुटून आलां तेव्हां या प्रश्नाच्या मागें आपण लागतां काय अशी विनंति मी आपणांस केली होती. तीच आज पुन्हां करतों ही मान्य करावी. तुरुंगांतून बाहेर यावें आणि महात्मा गांधींच्या सामर्थ्याचा आपल्याला उपयोग व्हावा अशी आशा करणाऱ्या आपल्या अस्पृष्ट बांधवांचें काम हातीं घ्यावें. झाला एवढा अतिक्रम पुरे आहे. पत्राचें उत्तर यावें. कळावें. ही विनंति."

अनावृत पत्रास महात्माजींचें उत्तर—

मी जें अनावृत्त पत्र प्रसिद्ध केलें त्या पत्रास महात्माजींनीं पुढील उत्तर पाठविलें:—

"तुमची विचारपद्धति मी उमगलों. माझें म्हणणें इतकेंच कीं कोणास कैचींत धरून वळवावें या हेतूनें मी उपास करीत नाहीं. 'पांगुळलेलीं' मनें चेतनायुक्त व्हावींत एवढ्यासाठींच तो असतो. आतां कांहीं लोकांना जाच व्हावा हें दुर्दैवानें खरेंच आहे. पण हा जाच फार दिवस टिकतो किंवा सार्वत्रिकच होतो असें मात्र म्हणतां येत नाहीं. धर्माची सुधारणा करूं पाहणारा लोकांच्या मनावर हुकमत चालवूं पाहातो असें नव्हे; तर तो लोकांना ढोसतो आणि त्यांना विचारास व आचारास प्रवृत्त करितो.

"आपल्या वर्तनसूत्रांची (Principles) किंमत देऊन बंधमुक्तता विकत घ्यावी हें मी करतां कामा नये. अस्पृश्यता–निवारण हें माझ्या जीवितांतील कार्यक्रमांपैकीं एक जिव्हाळ्याचें काम आहे. पण हें काम म्हणजेच सगळा कार्यक्रम असें मात्र नाहीं. माझें जीवित परमेश्वराच्या हातीं आहे. त्याची इच्छा असेल त्याप्रमाणें तो तें वळवीत राहील. तो माझ्या जीविताचें जें कांहीं करील तें आपल्या कल्याणाचेंच करील असें तुम्हांस वाटत नाहीं काय ?"

माझे अनावृत्त पत्र आणि महात्माजींचें हें उत्तर हीं दोन्हीं वाचकांनीं पुन्हा एकदां जोडीनें वाचावीं अशी माझी त्यांस विनंति आहे. अमुक दिवसांत अस्पृश्यता मुळासकट उपटा नाहींतर मी प्राणांत उपवास पुन्हां सुरू करीन या त्यांच्या कडकडीत बजावणीचा अर्थ त्यांना समाजाला दहशत घालावयाची आहे असा होतो, व विशेषतः देवालयप्रवेशाचें काम दहशतीनें न घडवितां, मुलाखतींत आपण पसंत म्हटलेल्या मतपरिवर्तन पद्धतीनें घडवावें एवढेंच

माझें म्हणणें होतें. महात्माजींच्या उत्तराचा अर्थ एवढाच असावा कीं आपण जरी असें निर्वाणीचें म्हणजे दहशतवजा बोललों असलों तरी लोकांनीं तें तसें मानूं नये; तर त्यामुळें केवळ विचारास व आचारास प्रवृत्त व्हावें. हें ठीक आहे. पण महात्माजींसारखा लोकोत्तर पुरुष प्राणत्यागास तयार होणार हें ऐकून लोकांस केवळ दहशत बसेल कां नाहीं हें विवंचून पाहाण्यासारखें आहे. त्यांना स्वत:ला विचार करतां येत नाहीं ही तर मूळ तक्रार आहे. धर्ममत बदलण्याच्या कामांतील विचारांची घडामोड कोणची म्हणजे कोणचे विचार कसे मोडावयाचे व कोणचे कसे घडावयाचे हेंच समाजास प्रतिपादन पद्धतीनें कळावयास हवें आहे. तें धर्मविचारनिरत अशा महात्माजींनीं प्रतिपादक बनून करावें असें म्हणणें होतें. दहशतीनें चुळबुळ उत्पन्न होईल इतकें मात्र खरें. पण ही वैचारिक घडामोड लोकांची लोकांना सुसंबद्धपणें करतां येईल हें खरें वाटत नाहीं. तसेंच स्वार्थत्याग, अनासक्ति, निर्भयता आणि श्रद्धा यांनीं युक्त असा सर्वश्रेष्ठ प्रतिपादक समाजापुढें प्रत्यक्ष उभा राहिला तरच हें काम साधण्यासारखें आहे असें आजवरच्या इतरांच्या अपयशावरून मनांत चांगलें भरतें. मग ही विचाराची घडामोड आणि तिला लागणारें हें आत्मिक बल हीं केवळ निर्वाणीचें बोलल्यानें प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत कशीं अवतरतील हें समजणें मात्र अवघड आहे. असो. आपापलीं वर्तनसूत्रें झुगारून द्यावीं असा आग्रह कोण कोणास करील? शुद्ध बुद्धीचा आग्रह मात्र असा होता कीं तुरुंगांत केवळ वाया जाणारा काल या विधायक कामांत खर्ची पडावा. राजकारणाविषयीं बारा महिने कांहीं बोलणार नाहीं अशी अट त्यांनीं पतकरली, म्हणजे तुरुंगांत राहिल्यानें त्यांना जी अट मानावीच लागणार आहे ती एका निराळ्या स्वदेशसेवेसाठीं पाळली, तर तत्त्वहानि होते असें वाटत नाहीं. राजकारण अजिबात सोडावें असें सुचविलें नाहीं. जो कोणी सुचवील तो गाफील विचाराचा व उद्धट वृत्तीचा ठरेल. राजकारण हा तर मूळ महामंत्र आहे. पण "अस्पृश्यता–निवारण झाल्याविना स्वराज्य नाहीं" "अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे" "माझा हा प्राणांत उपवास हिंदू लोकांना दरारा देण्यासाठींच आहे" "अमुक दिवसांत अस्पृष्टता गेली नाहीं तर मी प्राणांत उपवास पुन्हां चालू करीन" इत्यादि वचनांतील निकड लक्षांत घेतां, नाहींतरी जें राजकारण कांहीं दिवस तरी व्हावयाचें नाहीं असें दिसतें

तें न करण्याचें पत्करणें हा तत्त्वहानीचा प्रकार होईल असें मला अजूनहीं वाटत नाहीं. कोणास वाटतें कीं असें पत्करल्यानें लोक नाराज होतील. असें वाटणारांना महात्माजींची लोकप्रियता आणि आपणांस जसें वाटतें तसेंच लोकांस वाटावयास लावण्याचें महात्माजींचें कसब यांचा पुरा कयास आला नसावा. तत्त्वें टाकावीं असा आग्रह नाहीं, तर निष्क्रिय राहण्यापेक्षां आपत्तीचा उपयोग या विधायक कामाला व्हावा एवढाच आग्रह आहे. व तो तरी, महात्माजींना "राजकारणाचें असें तुम्ही कांहीं बोलतां उपयोगाचें नाहीं म्हणजे तुम्हांस गांठीभेटी व अस्पृश्यता–निवारणाबद्दलची चर्चा यांची मोकळीक देतों" असें जें उपवास सुरू होतांना सरकारानें म्हटलें होतें व जें धोरण पतकरून महात्माजींनीं याविषयापुरतें स्वातंत्र्य अनुभविलें होतें तेंच धोरण मोठ्या प्रमाणानें त्यांनीं आणखीही पत्करावें हाच विचार मी सुचविला इतकेंच काय तें.

परमेश्वराच्या मनांत आपल्या जीविताला जसें वळण द्यावयाचें आहे तसें तो देईल असें महात्माजींनीं म्हटलें. "मला आंतून हाक आली नाहीं" असा शब्दप्रयोग महात्माजी अनेकदां करतात त्याचा व या लिहिण्याचाही एकच अर्थ असावा असें वाटतें. प्रसंगोपात्त त्यांस होणाऱ्या या गूढ स्फुरणाविषयीं बोलणें माझ्या आवांक्याच्या बाहेरचें आहे. सुसंस्कृत अशी उदात्त भावना आणि सूक्ष्म विवेकबुद्धि यांच्या संगनमतानें जी उठावणी आंतून होईल ती म्हणजेच हें गूढस्थ परमेश्वरी स्फुरण होय, असें मी समजत होतों. व म्हणून भावना व बुद्धि यांच्या खेळाविषयीं व वापराविषयीं पत्रांत लिहिलें होतें. पण महात्माजींना याच्याही पलीकडची जी प्रतीति आहे ती माझ्यासारख्या सामान्यास अगदीं अगम्य असल्यामुळें तिजविषयीं कांहींच बोलतां येत नाहीं. शेवटीं इतकेंच म्हणावयाचें कीं हें अस्पृश्यता-निवारणाचें कार्य "दमानें, मतपरिवर्तनपद्धतीनें, व संततपणें" चालू ठेवून महात्माजींच्या जीवात्म्यास संतोष उत्पन्न करावा इतकेंच आपल्या हातीं आहे.

अस्पृश्यता–निवारणाचा कायदा—

आमच्याशीं झालेल्या एका मुलाखतींत गांधीजी म्हणाले:—

"ही वाब माझ्या हातीं असती तर जो कोणता करार व्हावयाचा असेल त्यांत देवालय–प्रवेश व तत्सम गोष्टी अंतर्भूत झाल्याच पाहिजेत असा आग्रह

मी धरला असता. व सर्व सुधारक व अस्पृश्य यांनीं असा आग्रह धरावा असें माझें त्यांस म्हणणें आहे. मी करीत असलेल्या उपवासांत मला जितके दिवस तग धरवेल तितक्या थोडया दिवसांतच देवालय–प्रवेशाची वाव निकालांत निघणें कठिण आहे हें मी ओळखूनच आहें. पण करार–पत्रावर सह्या करणारांनीं मनुष्यप्राण्याचा हा अगदीं मूलभूत हक्क जितका लवकर व्यवहारांत आणून दाखवितां येईल तितका दाखवूं असें स्वतःस बांधून घेतलें पाहिजे. तथापि सनातनी लोकांना कैचींत धरून वळवितां यावें म्हणून माझ्या उपवासाचा कोणीं उपयोग करून घ्यावा असें मला वाटत नाहीं. सनातनी लोकांनीं सुद्धां विचारास प्रवृत्त व्हावें हा उपवास करण्यांत माझा एक हेतु आहे हें खरेंच आहे. जर करितां मानवी प्राण्याच्या हक्कांसंबंधीचें हें साधें प्रमेय त्यांना अजून पटत नसेल तर आपण दमानेंच घेतलें पाहिजे. पण देवळें व तत्सम बाबी या केवळ सनातनी लोकांच्याच आहेत असें नव्हे, तर त्या अखिल हिंदूंच्या आहेत. म्हणून सार्वजनिक उपयोगाच्या बाबींपासून हिंदूपैकीं एका समाजाला दूर ठेवण्याची कल्पना ही स्वतःच अत्याचाराची एक जात आहे आणि म्हणून या मूलभूत हक्काचें रक्षण व्हावें यासाठीं कायद्याचा आधार घेणें प्राप्तच होतें. तथापि हिंदू समाजांतील बहुमत जर 'अस्पृश्यां'नीं आपला हक्क बजवावा याच्याविरुद्ध असेल तर कायदा हा सर्वस्वी वांझ ठरेल हें मी कबूल करतों. पण माझें मत असें कीं, जर ही सुधारणा चाहूल न देतां घडत आली तर ती पत्करण्यास बहुजनसमाजाचें मन तयारच आहे. म्हणून सुधारकांनीं अविश्रांतपणें आणि सावधगिरीनें भूमि तयार करावी व या सुधारणेविषयींची लोकांच्या मनाची जी केवळ निष्क्रिय ठेवण अथवा अनुकूलता तिला सक्रिय पसंतीचें रूप द्यावें.

सनातनी लोकांवरील जबाबदारी

"या सुधारणेच्या बाबतींत लोकमताला चढत चाललेली भरती पाहिली म्हणजे सनातनी लोकांची खात्री पटेल कीं आतां हें कांहीं केल्या थांवत नाहीं, म्हणून आपल्या कामांत कसलीहि जबरदस्ती म्हणजे मानसिक जबरदस्तीसुद्धां असतां उपयोगाची नाहीं. स्वतंत्र देशांत कायदा हा बहुजन समाजाची इच्छा नेहमीं व्यक्त करतो. सर्वसाधारण जनमताला मागें टाकून जर कायदा झाला तर त्याचा अर्थ इतकाच होईल कीं, मतपरिवर्तनाच्या प्रयत्नांचें दिवाळें

वाजलें. म्हणून मी नेहमीं मतपरिवर्तन हा जो अवघड यत्न, यावरच विसंबून राहात आलों आहें. होणारा करार जर जिवंत अर्थाचा व्हावयाचा असेल तर त्यांतील राजकीय भाग अस्पृष्ट लोकांनीं पत्करण्याच्या आधीं करारावर सहया करणाऱ्या स्पृश्यवर्गीय पक्षानें आपल्याला तो पत्करावयाचा आहे इतकेंच नव्हे तर या बाबतींत तो प्रत्यक्ष आचरावयाचा आहे ही अट मान्य केली पाहिजे. माझें स्वतःचें मत अगदीं स्वच्छ आहे. ज्या करारांत स्वतंत्र मतदार-संघाची छटासुद्धां नाहीं तोच करार मी पत्करीन. संयुक्त-मतदार-संघ व राखीव जागा हें तत्त्व मी मोठ्या नाखुषीनें पत्करीन. पण ही जी सामाजिक व राजकीय सुधारणा सांगितली तिचा आग्रह मात्र मी धरीनच धरीन. कारण करारां-तील हा भाग मला तरी केवळ जिव्हाळ्याचा वाटतो. म्हणून संयुक्त मतदारसंघाच्या योजनेवर तडजोड झाली आणि ब्रिटिश सरकारनें स्वतंत्र मतदारसंघाची योजना परत घेतली तर हिंदुस्थानाच्या एका टोंकापासून तों दुसऱ्या टोंकापर्यंत ज्या असंख्य सभा होत आल्या आहेत, त्यांत माझ्या भोंवतीं थवेच्या थवे करून जमणाऱ्या लक्षावधि हिंदू लोकांस मी असें बजावीन कीं, आजपासून, समजा सहा महिन्यांच्या आंत, ही सामाजिक सुधारणा दिसून येण्याइतपत झाली नाहीं तर मी पुन्हां उपवास करूं लागेन. याचें कारण उघडच आहे. मी जर उपवास पुन्हां सुरू केला नाहीं तर ज्याच्या नांवानें मी आज उपवास करीत आहें त्या परमेश्वराशीं मी खोटा ठरलों असा दोष मला येईल. आणि ज्या अस्पृष्ट लोकांच्या हितासाठीं मी हें करीत आहें त्यांच्याहि हितास मी दगा दिला असें होईल.

नाशिकच्या सत्याग्रहांतील अत्याचार--

"नाशिकच्या काळाराम देवळापुढें जो सत्याग्रह झाला तो मला अजूनहि पसंत नाहीं. याचें कारणहि अगदीं साधें आहे. तें हें कीं, त्या सत्याग्रहांत मला अत्याचाराचा वास येतो आणि सत्याग्रह म्हटला म्हणजे अत्याचारापासून तो निपटून निर्लेप असला पाहिजे. पर्वतीसारखीं जीं देवालयें आहेत त्यां संबंधानें असें कळतें कीं, तेथें ट्रस्ट हा आड येतो. तेथील ट्रस्टडीडमध्येंच अस्पृष्ट लोकांना देवळांत येऊं देऊं नये अशी जबाबदारी ट्रस्टींवर घातलेली आहे. अशी अडचण जेथें असेल तेथें ट्रस्टींचा निरुपाय होतो हें मला समजतें. अशा देवळांत

सत्याग्रह करणें म्हणजे शुद्ध अत्याचार आहे. आतां या दिवसांत कोणत्याही ट्रस्टमध्यें असलेली ही अट लोकांच्या प्रवृत्तीविरुद्ध अशी समजली जाते आणि म्हणून तिची वजावणी होऊं नये. जर हें मत प्रभावी न होईल तर मग मात्र असल्या अटी रद्द करण्यासाठीं कायद्यानें पुढें सरसावावें.

म. गांधी यांच्याशीं झालेली आणखी एक मुलाखत—

श्री. माटेः—आपला जो जाहिरनामा प्रसिद्ध होत आहे त्यांतील निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या चाली आहेत इत्यादि प्रकारचा जो मजकूर आहे त्याचा अर्थ ज्या प्रांतांत स्पृश्य लोकांना देवालयांत जेथपर्यंत जातां येतें त्या प्रांतांत अस्पृष्ट लोकांना सुद्धां तेथपर्यंत जातां आलें पाहिजे असाच आहे ना ?

म. गांधीः—होय, अगदीं निःसंशय असाच तो अर्थ आहे.

श्री. माटेः—याच मुद्यावर तर परवां सेवासदनांत बराच वेळ वाद झाला व त्याचा निकाल लागेना म्हणून आम्ही आपणांकडे आलों ! इतर प्रांतांत काय चाल असेल ती माहीत नाहीं. पण आमच्या प्रांतांत गाभाऱ्यांत केवळ पुजारीच जातो असें नाहीं; तर शुचिर्भूत होऊन किंवा कांहीं ठिकाणीं न होऊन सुद्धां माणसांना गाभाऱ्यांत जाऊन मूर्तीला शिवून दर्शन घेतां येतें. आपलें म्हणणें लागू करावयाचें म्हटल्यास अस्पृष्ट लोकांना हीच परवानगी सर्व देवळांत आत्तांच दिली पाहिजे. अर्थात् हा कार्यक्रम आपण लोकांपुढें मांडिला तर हें देवालयप्रवेशाचें काम अधिकच बिकट होत जाणार नाहीं काय ? तसें न होईल अशा दिशेनें प्रयत्न करावा अशी आपल्याला विनंति आहे.

म. गांधीः—पण मग त्या प्रयत्नांत मी असणार नाहीं.

श्री. माटेः—हेंही अवघडच आहे. आपण आमच्याबरोबर असावें व आम्ही आपल्याबरोबर असावें असें मला वाटतें. आज अस्पृष्ट लोक गाभाऱ्याच्याच नव्हे तर देवळाच्या भोंवतालच्या कुसवाच्याही बाहेर सडकेवर उभे आहेत, त्याच्याऐवजीं त्यांना सभामंडपांत घ्यावें असा आग्रह आपण धरला तर सनातनी पक्षाच्या मतालाही थोडा मान दिल्यासारखें होईल व देवालयप्रवेशाचें कामही पुष्कळच पुढें सरकलें असें होईल. आपणांस असें वाटत नाहीं काय ?

म. गांधी:—नाहीं. मी म्हणतों त्यांत अगदीं थोडका सुद्धां फरक मला करावयाचा नाहीं; कारण त्यांत तुम्ही थोडी तरी अस्पृश्यता वाळगतां असें होतेंच.

श्री. माटे:—पण यानें देवालयप्रवेशविषयक अस्पृश्यता पुष्कळशी गेली असें होत नाहीं काय ?

म. गांधी:—नाहीं, तसें होत नाहीं.

श्री. माटे:—समजा गाभाऱ्यांत प्रवेश करणें हें अस्पृष्टालासुद्धां प्राप्त व्हावें हें मत आम्ही ध्येय म्हणून मान्य केलें व सनातनी लोकांची भावना व अस्पृष्ट लोकांचे आचार व संस्कृति यांकडे लक्ष देऊन आज सभामंडपांत प्रवेश मिळावा म्हणून चळवळ केली, तर ती बरोबर होईल असें वाटतें; कारण सनातनी लोकांचें मत बदलणें हें आपलें काम आहे व अस्पृष्टांनींही आजच आपले आचारविचार टाकले आहेत असेंही नाहीं. हें माझें म्हणणें युक्त नाहीं काय ?

म. गांधी:—नाही.

श्री. माटे:—समजा, आपलें मत आम्ही पत्करलें नाहीं, पण अस्पृष्ट लोकांस निदान सभामंडपांत तरी घ्यावें असा आग्रह आम्ही धरला तर त्या आमच्या चळवळीला आपला आशीर्वाद द्याल काय ?

म. गांधी:—नाहीं. देणार नाहीं.

श्री. माटे:—असो. पण आम्ही या तऱ्हेची चळवळ केली तर आपल्या चळवळीच्या आड आम्ही आलों अथवा तिची गति आम्ही कुंठित केली असें आपण म्हणणार नाहीं ना ?

म. गांधी:—मी इतकेंच करीन कीं, तुमच्या चळवळीस मी शाप देणार नाहीं; एवढें पुरेसें नाहीं काय?

श्री. माटे:—हें ठीक आहे; पण या आमच्या प्रयत्नानें सुद्धां देवालय-प्रवेशाचें काम पुढें सरकेल असें मला वाटतें.

म. गांधी:—असें कसें म्हणतां ? एकादा मनुष्य जर भुकेनें मरत असला व त्याला मिळावयाची भाकरी त्याच्यापासून २० मैलांवर असली व तुम्ही त्याला

भाकरीपासून दहा मैलांवर आणून सोडलें व म्हणूं लागलां कीं, आम्ही त्याची थोडीशी भूक भागवली, तर तें खरें होईल काय ?

श्री. माटेः—हीच गोष्ट मी दुसऱ्या तऱ्हेनें विचारतों. समजा, आमच्या-पाशीं असलेल्या सबंध भाकरीपैकीं चतकोर किंवा अर्धी एका भुकेनें मरत असलेल्या माणसास दिली तर त्या माणसाची भूक भागविण्याच्या कामी तिचा थोडातरी उपयोग झाला असें आम्हांस म्हणतां येण्यासारखें नाहीं काय?

म. गांधीः—नाहीं. मला असें वाटत नाहीं. याला मी दुसरा एक दाखला सांगतों. परवा मला कोणी असें विचारलें कीं, " आमच्या विहिरीवर कोणते तरी ठराविक २।३ तास पाणी भरावयास आम्ही अस्पृष्ट लोकांस मोकळीक देऊं ". पण मी त्यांस सांगितलें कीं, "हें मला संमत नाहीं. "

श्री. माटेः—पण ज्या लोकांनीं एवढें तरी पत्करलें ते अस्पृष्टांनीं शिव-लेल्या विहिरींतील पाणी नेण्यास तयार झाले व अशा रीतीनें अस्पृश्यतेची थोडीतरी पिछेहाटच झाली असेंच ठरणार नाहीं काय ?

म. गांधीः—असें ठरत नाहीं.

श्री. माटेः—अस्पृष्टांनीं शिवलेल्या विहिरींतील पाणी जे आजपर्यंत घेत नाहींत, ते आतां घेऊं लागले व म्हणून त्यांनीं अस्पृश्यता थोडीतरी घालविली म्हणून त्यांना श्रेय देणार नाहीं काय ?

म. गांधीः—श्रेय कसलें ?

श्री. माटेः—मी 'श्रेय' शब्द परत घेतों. पण शेवटचें ध्येय साध्य होण्याच्या मार्गावरील आपलें कर्तव्य त्यांनीं केलें असा तरी याचा अर्थ आहे ना ?

म. गांधीः—तसेंही मला वाटत नाहीं. तुम्हीं जर उद्यां अस्पृष्ट लोकांच्या मुलांना शाळेच्या इमारतींत घेतलें व त्यांस निराळें बसविलें तर त्यांत विशेष कांहीं झालें असें मला वाटत नाहीं.

श्री. माटेः—महात्माजी, आपण हीच गोष्ट निराळ्या तऱ्हेनें पाहूं. समजा, पंधरावीस वर्षांच्या मागची परिस्थिति आहे, कीं जेव्हां अस्पृष्टांच्या मुलांना शाळेच्या आवारांत कुसवाच्या आंतही येऊं देत नसत. अशा वेळीं एकाद्या शिक्षकानें धैर्य धरून त्यांना कुसवाच्या आंत आणून इतकेंच नव्हे, तर केवळ व्हरांड्यांतही न बसवितां इमारतींत घेतलें असतें पण लोकांच्या

भावनेकडे लक्ष देऊन एकदमच मिसळून बसविलें नसतें, तरी शालाप्रवेशाच्या बाबतींत त्यानें कांहींतरी काम केलें असें आपण म्हटलें नसतें काय? कारण, येथून पुढें एकच टप्पा काय तो शिल्लक राहिला.

म. गांधी:—माझें असें मत नाहीं.

श्री. माटे:—असें जर आहे तर आपण आतां दुरुस्त केलेल्या जाहीरनाम्याच्या आरंभाला स्पृश्य लोकांनीं अस्पृष्टांना ज्या कांहीं थोड्या सवलती दिल्या आहेत, त्याबद्दल आपणांस फार आनंद होतो असें लिहून आपण स्पृश्य लोकांचा जो थोडा गौरव केला आहे तो तरी त्यांनीं या चळवळीच्या ध्येयाकडे थोडेंतरी अनुकूलतेनें तोंड फिरविलें म्हणूनच ना ?

म. गांधी:—तसेंही नाहीं. देवालय–प्रवेशाच्या बाबतींत मी म्हणतों तेंच बरोबर आहे. मला माणसाची सायकॉलजी (मनोधर्म) चांगली कळते.

श्री. माटे:—उलटपक्षीं माझेंही म्हणणें असें आहे कीं, मलासुद्धां माणसांची सायकॉलजी चांगली कळते.

म. गांधी:—मग कोणी तरी तज्ज्ञ आणून आपलें म्हणणें तपासून घेतलें पाहिजे.

श्री. माटे:—या माझ्या बोलण्याबद्दल आपण मला उद्धट तर म्हणणार नाहीं ना ?

म. गांधी:—मी असें कसें म्हणेन ? नाहींतर मीही त्याच आरोपास पात्र होईन.

बॅ. अग्रवाल:—अस्पृष्ट लोकांनीं मृत मांस व गोमांस खाण्याचें सोडून द्यावें अशी अट या देवालयप्रवेशाच्या कामीं आपण अस्पृष्ट लोकांना घालणे इष्ट नाहीं काय ?

म. गांधी:—नाहीं. मला अट घालावयाची नाहीं. मला नेहमीं वाटतें कीं, मी (आपण हिंदू लोक) या कामांत पातकी आहें, व प्रायश्चित्त घेतलें पाहिजे व म्हणून अस्पृष्टांनीं माझ्या तोंडावर जरी गोमांस फेकलें तरीसुद्धां मी कांहीं बोलणार नाहीं.

\+ \+ \+

वरील संवादावरून ध्यानांत येईल कीं, म.गांधींच्या मतें स्पृश्य लोक देवळा-मध्यें जेथें जातात व जे संस्कार करूं शकतात तेथें अस्पृष्टांस आजच जातां आलें पाहिजे व तेच संस्कार त्यांसही करतां आले पाहिजेत. Precisely on the same terms या त्यांच्या शब्दांचा हाच अर्थ आहे. दुसरा कोणताही नाहीं. आमचा आग्रह असा आहे कीं, सनातनी लोकांची भावना लक्षांत घ्यावयास हवी व अस्पृष्टांचे आचारविचार हेही आजच बदलले आहेत असें नव्हे. या दोनही गोष्टी लक्षांत घेऊन आज मंडपप्रवेशाचा आग्रह धरला तर तो उचित होय. देवाचें दर्शन होणें व मानसिक सुधारणेसाठीं भजन, कीर्तन हीं ऐकावयास सांपडणें हे दोनही लाभ अस्पृष्टांस सभामंडपां-तून होण्यासारखे आहेत. आम्ही सनातनीच आहों पण सनातनी सुधारक आहों इतकेंच. एका अंगास "अस्पृश्यता कधींही जातां उपयोगाची नाहीं हा आग्रह" व दुसऱ्या अंगास "अस्पृश्यता आत्ताच्या आत्ता आणि झाडून-पुसून गेली पाहिजे व अस्पृष्टांना स्पृश्यांइतकेच सगळेच्या सगळे हक्क आजच मिळाले पाहिजेत" हा आग्रह, अशी परिस्थिति उत्पन्न झाली आहे. यामुळें सारासारविवेक व धर्म न टाकतां सुधारणा मात्र करूं इच्छिणारा असा जो बहु-जनसमाज त्याला फारच पंचाईत उत्पन्न झाली आहे व म्हणून देवळाचें पावित्र्य व आचारांतील शुचिर्भूतपणा हीं संभाळून व अस्पृष्टांचें ध्येय बव्हंशीं साध्य करून देऊन समाजांतील बेदिली घालवावी असा जर हेतु असेल तर सर्व लोकांनीं मंडपप्रवेशाच्या चळवळीस संमति द्यावी अशी आमची त्यांस विनंति आहे.

देवदर्शनाची तडजोड--

आपलें सर्व काम तडजोडीनें चालते व पुढें सरकतें. हें देवालयप्रवेशाचें काम पूर्वीच सुरू झालेलें आहे : आपण त्यांत चार पावलें पुढें जाऊ असें म्हणत आहों, हें समाजास पटवावयास हवें. या कामीं उदाहरण म्हणून पुढील हकीकत बोधप्रद ठरेल.

सातारा जिल्ह्याच्या पश्चिम पट्टींत तारळी नांवाची लहानशी नदी असून तिच्या कांठीं पाल किंवा पाली या नांवाचें तसेंच एक लहानसें गांव आहे. या गांवीं खंडोबाचें मोठें स्थान आहे. दरसाल जत्राही बरीच भरते.

साधारण वारकाईनें पाहिल्यास सातारा, पुणें, सोलापूर इत्यादि आठदहा जिल्ह्यांत मांग, महार, चांभार इत्यादि लोकांची खूप दाट वस्ती आहे असें दिसेल. त्यांतल्या त्यांत हें जें तारळ खोरें त्यांत मांगांची वस्ती खूप दाट आहे. सरकारदरबारीं या मांग लोकांना "गुन्हेगार जात" असें नांव देण्यांत आलें आहे. मांगगारुडी या नांवाची जी एक जात आहे ती गुन्हे करते हें खरें आहे व म्हणून तिला 'गुन्हेगार जात' हें नांव शोभेलही. पण खास मांग लोक जे आहेत ते 'गुन्हेगार' या विशेषणास कितपत पात्र आहेत याविषयीं शंका आहे. अर्थात् इतरांच्या मानानें त्यांच्यांत गुन्ह्याचें प्रमाण थोडें जास्त असेल पण त्याबरोबर हेंही खरें आहे कीं, उदरनिर्वाहाचें साधन आतां त्यांना जवळ जवळ कांहींच राहिलेलें नसल्यामुळें हें गुन्ह्याचें प्रमाण उत्पन्न झालें असेल किंवा टिकलें असेल. या मांग लोकांच्या प्रदेशांत पालीच्या खंडोबाचें देऊळ आहे. जत्रेच्या वेळची मुख्य गोष्ट म्हणजे खंडोबाचें व म्हाळसाईचें लग्न ही होय. म्हाळसाईच्या देवळापुढें हें लग्न लागावयाचें असतें. नवरा मुलगा जो खंडोबा तो आपल्या देवळांतून बाहेर पडून मिरवत मिरवत आणि वाजतगाजत नवऱ्या मुलीच्या म्हणजे म्हाळसाईच्या मंडपाकडे जातो. ही त्याची मिरवणूक मोठी थाटाची असते. सहस्रावधि लोक त्या देवळाभोंवतीच्या थोडयाशा परिघांत व म्हाळसाईच्या मंडपापर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर खेंचाखेंच करून जमलेले असतात. गर्दी इतकी तुफान होते कीं, गांवांत एक ओहोळ आहे त्याची दादसुद्धां कोणाला लागत नाहीं. नवरामुलगा देवळाच्या गाभाऱ्यांतून बाहेर पडतो; तेथून सभामंडपांत येतो; सभामंडपांतून प्राकारांत येतो. प्राकाराच्या भोंवतीं भलें दांडगें कुसूं आहे. या प्राकारांत देव म्हणजे नवरामुलगा आला म्हणजे दर्शनाची खरी लढाई चालू होते. वास्तविक गाभाऱ्यांत किंवा सभामंडपांत अस्पृश्य लोकांना घेत नाहींत. पण देव एकदां प्राकारांत आला म्हणजे मात्र दर्शनाच्या कामीं कुणाला कसलाही प्रतिबंध नसतो. प्रतिबंध नसण्याचा असा वर्षांतून एकच दिवस असतो. आणि म्हणून आपल्या खोऱ्यांतील या खंडोबाचें—म्हणजे स्कंधोवाचें—हात लावून दर्शन घेण्याची ही संधि साधण्यासाठीं उभ्या तारळ खोऱ्यांतील झाडून मांग लोक हजर असतात. वर्षांतून आनंदाचा दिवस हा एकदांच येणार; आणि म्हणून भोंवतालचे मांग लोक दर्शनास येणें हें आपलें व्रतच समजतात.

कोणी कोणी तर सांगतात कीं, पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरारी झालेले आणि वर्षानुवर्षं बेपत्ता राहिलेले असे अट्टल मांग सुद्धांही खंडोबाच्या दर्शनाची पर्वणी चुकूं देत नाहींत. यात्रेच्या बंदोबस्तासाठीं पुष्कळच पोलीस जमा झालेले असतात. पण बंदोबस्त ठेवणें हा जसा त्यांचा धंदा असतो तसाच झुकांडी दिलेले कोणकोण फरारी जमा झालेले आहेत हेंही हेरून ठेवण्याकडें त्यांचें लक्ष असतें; पण लक्ष असलें तरी तेथल्या तेथें मुसक्या बांधून एकाद्याला गिरफदार करणें हें मात्र पोलिसांना फार धोक्याचें वाटतें असें सांगतात.

हा दर्शनाचा विधि पुष्कळच वेळ चालत असतो. कारण निदान पालखीला हात लावून दर्शन घेण्याची संधि सर्वच मांगांना हवी असते. प्राकाराच्या महाद्वारांतून बाहेर पडून देव मंडपाची वाट चालू लागला म्हणजे मात्र मग यांनीं कोणी हात लावावयाचा नसतो. नवऱ्यामुलाच्या भोंवतीं पुजारी इत्यादिकांचें भलें मोठें कडें पडतें. सडकेच्या दोन्ही बाजूंनीं खारिक, खोबरें व भंडारा म्हणजे हळद याचीं ठिकीची ठिकी लागलेलीं असतात. वाण्याकडून आपल्याला हवें तेवढें विकत घ्यावयाचें व आपण फुलें किंवा अक्षता जशा देवावर फेकतों तशा खारका आणि खोबऱ्याच्या वाटया हे यात्रेकरू लोक पसे भरभरून देवावर फेकीत असतात. भंडारा तर इतका फेकतात कीं, आभाळांत जिकडेतिकडे पिवळें होऊन जातें. एकमेकांच्या अंगावरच इतकी हळद उडते कीं, सगळे यात्रेकरू आणि त्यांच्या पायाखालची जमीन हीं पिवळी जरद होतात. यांतही एक तऱ्हेचा आनंदच असतो. रोजचें संसाराचें तापत्रय आणि कर्जपाण्याच्या काळज्या यांनीं हे लोक नेहमींच गांजलेले असतात. पण या सगळ्या काळज्या घरीं ठेवून दोन चार दिवस मोठ्या गमतीनें घालविण्यासाठीं हे लोक जमलेले असतात. अर्थात् क्षणभर मिळालेल्या मोकळिकीनें त्यांना आनंदाचें मोठें भरतें आलेलें असतें. व रंगपंचमीच्या दिवशीं खेळकर मुलें जसा रंगाचा धिंगाणा घालतात तसे हे पोक्त बापई गडीसुद्धां या मिरवणुकींत भंडाऱ्याची चारी दिशा खैरात करून सोडतात. मांगांनाही समाजांत सरमिसळीनें वागण्याचें व देवदर्शनाचें सुख लाभलेलें असतें. तेही बहोत खूष असतात.

अशा प्रकारें वाजत गाजत ही नवरदेवाची पालखी म्हाळसाईच्या मंडपाकडे

जाते. पण या प्रकारांतील एक फार महत्त्वाची बाब सांगावयाची आहे. पालखीच्या पुढें रस्त्यावर एकमेकांकडे तोंड करून मांग लोकांच्या चार चार, सहा सहांच्या रांगा चाललेल्या असतात. व या रांगांची लांबी फर्लांग-भरसुद्धां असते. हे मांग लोक चांगले उंच, काळे कुळकुळीत, बांध्यानें मजबूत व खूप सकत असे दिसतात. त्यांच्यापैकीं प्रत्येकाच्या हातांत एक भलें जाड व लांबट असें टिकारणें (दांडगी काठी) असते; व तें तो सबंध बाहू पसरून उभें ताठ धरून चाललेला असतो. अशा हजारों काठ्या हवेंत सारख्या रांगेनें दिसत असल्यामुळें ज्या प्रसंगाचें वर मौजेनें वर्णन केलें आहे त्यांत थोडी भीषणताही उत्पन्न होते. वर काठ्या धरून लांब लांब हारीनें चालण्याचा हा काय प्रकार आहे हें विचारलें तर असें कळतें कीं, ज्याचें आपण दर्शन घेतलें व पुनीत झालों त्याच्या पहाऱ्यासाठीं व रक्षणासाठीं ही शूर मांग लोकांची शिवंदी पलटण पुढें चाललेली असते! ज्या देवाला असले रक्षक आहेत त्याचा लग्नसमारंभ खास सुखानें व्हावयाचा व त्याची मूर्ति कसल्याहि मूर्तिभंजकाच्या हातून कधीही फुटावयाची नाहीं! असा हा निर्भय खंडोबा आहे. कारण त्याचें दर्शन प्राप्त होऊं दिल्यानें संतुष्ट झालेले सहस्रावधि मांग लोक काठीच्या रूपानें आपल्या शौर्याचें प्रदर्शन करीत त्याच्यापुढें सेवका-सारखे चाललेले असतात. देवळांत पोंचल्यावर लगीन लागतें. व लगोलग यात्रा फार जलदीनें फुटूं लागते. लग्नसोहळा आटोपल्यावर हे कामाधामाचे वऱ्हाडी जलदीनें आपापल्या गांवाकडे परत फिरतात.

वर जें वर्णन दिलें आहे त्यावरून देवालयप्रवेश विषयासंबंधींची कांहीं एक विशेष प्रकारची तडजोड या खंडोबाच्या देवळांत कोणी सुधारकानें घडवून आणली असावी असें दिसतें. ज्यानें कोणी हें देऊळ बांधलें तें त्यानें जाणून वुजून मांग लोकांच्या ऐन वस्तींत बांधलें. अर्थात् कालेंकरून या देवाच्या दर्शनाचा लाभ आपणांस व्हावा अशी इच्छा भोंवताली पसरलेल्या वस्तींतील मांगांना व्हावी हें स्वाभाविक दिसतें. त्यांची ही इच्छा कशी तृप्त करावयाची? त्यांस गाभाऱ्यांत किंवा सभामंडपांत येऊं द्यावें तर विटाळाची भीति; अर्थात् तें कांहीं जमण्यासारखें नव्हतें. मग कोणीतरी ही तडजोड काढली असावी कीं, देव राऊळांतून सभामंडपांत आणि तेथून प्राकारांत आला म्हणजे तेथें

सर्व अस्पृश्य लोकांना उत्सवमूर्तीला हात लावून दर्शन घेण्याची मुभा द्यावी. या लोकांनींही ही तडजोड मान्य केली असावी. अर्थात् ज्यांचा देव ते मांगांना प्रिय झाले व मांग हे त्यांना प्रिय झाले. दोघांनाही देव प्रिय झाला; कारण, दोघांनीं ओळखिलें कीं, देवाला दोघेही प्रिय आहेत. असा हा मोठा सुंदर समेट ज्यानें कोणी घडवून आणला तो मोठा कल्पक सुधारक असला पाहिजे; पण हें एक दर्शन त्या मांग लोकांना मिळाल्यावरोबर त्यांनीं आपल्या डोक्यावर कसली जवाबदारी घेतली हें वरील वर्णनावरून ध्यानांत आलेंच असेल. या देवाच्या रक्षणाचें काम त्यांनीं पत्करलें! उद्यां जर तारळ खोऱ्यांतील या खंडोबाच्या देवळावर कांहीं अनिष्ट आलें तर एकजात मांग लोक त्याच्या रक्षणासाठीं आवेशानें जमा होतील! पण आपापल्या देवळांचीं रक्षणें व्हावीं म्हणून अस्पृश्यांना देवालयप्रवेश करूं द्यावा असें जर कोणी त्यावरून अनुमान काढील तर तो भित्रा समजला जाईल. आपल्या देवालयांना जर खरोखरीच कांहीं किंमत असेल तर त्यांचें रक्षण आपणच केलें पाहिजे. तें होईना तर तीं देवळें आपल्या हातून जाण्याच्याच लायकीचीं आहेत असा त्याचा अर्थ आहे. म्हणून दर्शनाची लालूच दाखवून त्यांस देवळाचे संरक्षक वनविणें हा स्वाभिमानाच्या दृष्टीनें नेभळा व परमार्थ दृष्टीनें अधम मार्ग होय. देवालयप्रवेश द्यावयाचा तो शुद्ध धर्मबुद्धीनेंच द्यावा. तो मिळाल्यानंतर देवालयासंबंधीं आपलें कर्तव्य काय आहे हें जो तो मनुष्य उत्तम तऱ्हेनें जाणील. त्यांत विनिमयबुद्धि असूं नये इतकेंच मला म्हणावयाचें आहे. तो आपला हिंदू बांधव आहे म्हणून त्यास देवदर्शन करून द्यावें हा खरा उन्नत व सोज्वल विचार आहे. तो अमलांत आणिला म्हणजे त्यानें या धर्मांतील देवालयांसाठीं काय करावें हें सांगण्याची निराळी जरूर नाहीं. म्हाळसाईच्या लग्नाची मिरवणूक जी वर वर्णिली आहे तिजवरून समाजाला तडजोडीची आवश्यकता पूर्वीपासून कशी वाटत आली आहे याचें उत्तम ज्ञान होईल. दक्षिणेकडे आचार्यांनीं कांहीं देवांना प्रदक्षिणा घालण्याची मुभा अस्पृष्ट लोकांना दिली आहे हीसुद्धां तडजोडच आहे. नामाचा अधिकार अंत्यजालासुद्धां आहे हें तुकारामबावांनीं जन्मभर आक्रंदन करून समाजाला पटविलें. हीही तडजोडच आहे. याच तडजोडीच्या मार्गानें सध्यांच्या सुधारकांनीं पुढें जावें.

प्रतिपादकाची भूमिका

या अस्पृश्यता–निवारणाच्या कामीं प्रतिपादनाची सारखी जोराची झोड उडावयास हवी. दर तालुक्यांत कांहीं एक ठराविक विचार सांगणारे असे प्रतिपादक सारखे हिंडत राहिल्यास या प्रश्नाचा निचरा लवकर होईल. मात्र या प्रतिपादकांनीं कांहीं विशेष प्रकारच्या पद्धती पत्करल्या पाहिजेत; कांहीं घोरणें राखलीं पाहिजेत व प्रतिपादनांत अतिव्याप्तीचा दोष शिरूं देतां उपयोगी नाहीं. या अतिव्याप्तीच्या दोषानें पुष्कळदां फसगत झाली आहे व तोच दोष आपल्या प्रतिपादनांत पुन्हां शिरू दिल्यास पुन्हां फसगत होईल. म्हणून प्रतिपादकाला उपयोगी पडेल असा कांहीं विचाराचा तपशील पुढें दिला आहे. हे सर्व सुटे विचार आहेत. पण त्यांचा यथास्थल उपयोग केल्यास प्रतिपादकांचें काम सोपें होईल असा बळकट भरंवसा आहे.

राजकारणांतील साधनें––

राजकारणांत उपयोजिलीं जाणारीं साधनें जशींच्या तशीं इकडे दत्तक घेऊं नयेत. विचारांतील बारीक बारीक तर्कविप्लव ताठर बनून फारच त्रास देतात. राजकारणाची व समाजकारणाची मनांत तुलना चाललेली असते, तेव्हां त्यांतील सादृश्यें जितकीं जलद ध्यानांत येतात तितके विरोध येत नाहींत हें फार वाईट आहे. या दोनहि क्षेत्रांत युद्ध चालूं आहे, हें सर्व खरें आहे; पण एका युद्धाचा सर्वच तपशील आपण दुसऱ्याच्या तपशिलाशीं तंतोतंत जुळवूं लागतों हें घातक आहे. इंग्रज सरकारशीं जीं साधनें आपण योजितों तींच स्वकीयांशीं योजण्याची कल्पना पुष्कळांना वरील तुलनेनें सुचते. त्यांनीं ध्यानांत ठेवावें कीं, इंग्रज आमचा कोणी लागत नाहीं, व आम्ही त्याचे कोणी लागत नाहीं. चार दिवस आपत्तिरूप गांठ पडली आहे. दगडाखालीं सांपडलेला हात त्याच्या हर्षविषादाकडे लक्ष न देतां काढून घ्यावयाचा आहे. शिवाय त्याच्याशीं भांडण म्हणजे एका पाशवी शक्तीशीं भांडण आहे हेंहि ध्यानांत हवें. प्रस्तुत विषयांतील भांडण मात्र खुद्द समाजाशींच आहें. तो म्हणजेच राष्ट्र आहे.भांडणास्तव त्याला वगळलें तर कांहीं उरतच नाहीं. त्याची चूक त्याच्या पदरांत घालावयाची आहे, व

ती घालतांना अस्पृष्ट समाजांशीं असलेली त्याची तेढ दृढतर न होऊं देण्याविषयीं दक्षता ठेवली पाहिजे. एक भांडण बुजवून नवें पिकत घालण्यासाठीं ही चळवळ नाहीं. अर्थात् चळवळ म्हटली म्हणजे वाद आलाच. पण आपलें साध्य फिसकटेपर्यंत जर त्या वादाची सीमा गेली तर आपणच आपल्या कार्याचे वैरी ठरूं. आपण जबरदस्ती करूं लागलों व समाजानें सगळाच पट उघळून दिला तर आपलें काम आपण नासलें असें होईल.

हें धर्ममत-बदलाचें काम आहे--

शिवाय समाजाशीं भांडतांना धर्ममत बदलण्याचें काम आपण करीत आहों हें ध्यानांत हवें. ही उदात्त भावना मुख्यतः प्रतिपादकाच्या मनांत कायमची असली पाहिजे. हें भांडण पाशवी स्वरूपाचें नाहीं. 'अस्पृष्ट देवळांत आला तर देऊळ बाटतें, मूर्ति पूजार्ह राहात नाहीं,' हें धार्मिक समजलें जाणारें मत जनमनांतून काढून टाकून, अस्पृश्याला देवळांत घेण्यांतच खरा धर्म आहे, त्याला जर आपुलकीची भावना आहे, तो जर देवदर्शनाची आतुरता वाळगतो, दास तुझा म्हणवीन असें झिडकारणाऱ्याला सुद्धां म्हणतो तर त्याला प्रवेश करूं देणें हाच खरा धर्म आहे, ही भावना जनमनांत स्थापावयाची आहे. असें हें परम उदात्त स्वरूपाचें काम आहे. शिवीगाळीच्या आणि वितंडाच्या कर्दमांतून वर उचलून हा विषय अशा प्रकारच्या उंच स्थंडिलावर स्थापावयाचा आहे. ही भावना प्रतिपादकानें मनानें धरिली म्हणजे युद्धाची तुलना त्याच्या मनांतून गळून पडेल. ज्या बहुजनसमाजाशीं सहकार्य घडून यावें हेंच ध्येय आहे त्याच्याशीं युद्धांतील न्याय लावणें चूक आहे.

समाज जाब देतो--

दुसरें असें कीं, समाजानें जाब दिला नाहीं असें म्हणणें म्हणजे समाजाशीं कृतघ्नपणा करण्यासारखें आहे. पंधरावीस वर्षांपूर्वीं या विषयाची काय स्थिति होती व हल्लीं काय आहे, हें जे कोणी तोलून पाहतील त्यांना कबूल करावें लागेल कीं, प्रगति होत आहे व तिची गतिहि अवहेलण्यासारखी नाहीं. गांठावयाचा पल्ला अजून मोठा आहे हें खरेंच आहे, पण जनसमाज जागचा हलत नाहीं, या आक्षेपाचा अर्थ सामान्य लोकांनीं शब्दशः खरा मानूं नये,

इतकेंच सुचवावयाचें आहे. पंधरा वर्षांपूर्वीच्या अस्पृश्यालाच जाऊन विचारा म्हणजे तोच सांगेल कीं, प्रगति होत आहे. खरी चूक समाजाच्या उदासीनतेची किंवा हटवादीपणाची आहे असें मला वाटत नाहीं. खटपट करणारांची संख्या पुरेशी नाहीं व श्रमांत सातत्य नाहीं, हें काय तें खरें आहे.

प्रतिपादक सश्रद्ध नाहीं ?—

या धर्मसुधारणेच्या कामांत पडलेल्या लोकांत असावी तितकी धर्मश्रद्धा नाहीं, असा आक्षेप समाज घेतो. समाजानें हा आक्षेप अनेकदां काढलेला आहे. या आक्षेपांत कांहीं भाग खरा व कांहीं खोटा आहे. चळवळ करणारे लोक बहुधा नवीन पद्धतीनें शिकलेले व म्हणून वरपांगीं तरी निदान जुन्या समाजाला धर्मशून्य दिसतात हें कांहीं खोटें नाहीं. धार्मिकपणाचे दोन भाग; एक देवादिकांवर श्रद्धा असणें, व दुसरा तिला अनुसरून कांहीं आचार असणें. आतां हें सुशिक्षितांनीं कबूल केलेंच पाहिजे कीं, आचारकांडांत आपण अगदीं खंक आहों. पण एक आचारकांड सोडलें तर सश्रद्धतेच्या बाबतींत कसल्याहि हरिभक्तिपरायणाची बरोबरी करतील असे हजारो सुशिक्षित दाखवितां येतील. आचारकांडाच्या बळावर श्रद्धा नसूनहि ती असल्यासारखी दिसते व तें बळ नसल्यामुळें चित्तांत घर करून राहिलेली श्रद्धा बाहेर दृग्गोचर होत नाहीं, असेंही होतें. गंधांत बुचकळलेल्या मुद्रा कानशिलावर उठविलेला मनुष्य सुशिक्षित धार्मिकांपेक्षां हटकून श्रद्धावान् असेलच असें नाहीं. 'मुद्रा भद्राय राजते !' शिवाजी राजाची मुद्रा लोकांच्या भद्रासाठीं म्हणजे कल्याणासाठीं तळपत होती. पण यांच्यातील कित्येकांची स्वतःच्या भद्रासाठीं कानशिलावर चमकते. तरी तेवढ्या मुद्रेच्या बळावर सश्रद्ध प्रतिपादकाला सुद्धां हे हिणविल्याशिवाय सोडणार नाहींत, हें होतकरू सुशिक्षित प्रतिपादकांनीं ध्यानांत ठेवावें. पण आचारबळाचा तुटवडा त्यांना आपल्या हेतूच्या आणि कार्यनिष्ठेच्या बळावर खास भरून काढतां येईल. म्हणून समाजाच्या या आक्षेपानें आपण बिचकण्याचें कारण नाहीं. तात्पर्य असें कीं, समाजानें जाब दिला नाहीं हा प्रतिपादकाचा आक्षेप आणि प्रतिपादक हा अधार्मिक आहे हा समाजाचा त्याजवरील आक्षेप हे दोनहि निर्मूल आहेत.

फडकरी हवा—

पण इतकें जरी खरें ठरलें तरी सश्रद्ध सुशिक्षितांची धर्मश्रद्धा आचार-रूपानें आविष्कृत होण्याइतपत बलवत्तर नसते हें आक्षेपशल्य शिल्लकच राहील. आणि म्हणून पुष्कळदां असें वाटतें कीं, श्रद्धा आणि तिचा आविष्कार यांनीं अन्वित असा प्रतिपादक जर कोणी पुढें आला तर सोन्याहून पिंवळें होईल. पहिल्यापासून तसा आचार नसतां या कार्यासाठीं तीं तीं चिन्हें धारण करणें हें ढोंग दिसेल; म्हणून प्रामाणिक प्रतिपादकाला आपल्या निष्ठाबळावर व कार्याच्या न्याय्यतेवर विसंबूनच पुढें सरकलें पाहिजे. पण ही गोष्ट मात्र खरी कीं, प्रतिपादकाचें म्हणणें स्वीकार्य बनावयाचें असेल तर वरील गोष्टींची आवश्यकता आहे. दुसऱ्याहि एका वाटेनें आपण याच विचारा-पाशीं येऊन पोंचतों. ती अशी. एका मराठा गृहस्थानें या विषयाचा म्हणजे अस्पृश्यतानिवारणाचा पुरस्कार जोरानें सुरू केला. पण आपल्या समाजाच्या पोटांत कोंढाळीं मोठीं. तो पुरस्कार ब्राह्मणांनीं दुरूनच धुत्कारिला व तदितरांनीं अज्ञानानें उपहास्य बनविला. पण एक ब्राह्मणच पुढें यांत दाखल झाला; आणि त्यानें या विषयाचा विटाळ आपल्या समाजांत पुष्कळ कालविला. तरी ब्राह्मणांतील ब्रह्मगांठ जी शास्त्रीपंडित ती सुटेना. इतक्यांत एक शास्त्रीच हा विचार घेऊन उठला त्यामुळें शास्त्रीमंडळींतहि तो विचार दाखल झाला. तिकडे राजाश्रयानेंहि या विषयाचा पुरस्कार झाला. पण आतां जें व्हावयास हवें तें हें कीं, देवालयप्रवेशाच्या बाबीसाठीं तरी एकादा श्रद्धावान् सत्त्ववृत्तीचा असा भक्तिमार्गांतील प्रचंड फडकरी या विषयाकडे वळावयास हवा. ज्ञानोबा, तुकोबा यांच्या वाणीची रसवंती ज्याच्या जिव्हा-ग्रावर उभी आहे, भक्तिरसानें चिंब झालेल्या भगवद्भक्तीच्या कथा जो प्रेमळपणानें गातो, भिल्लिणींचीं बोरें खाणारा दाशरथी राम आणि वंदि-शाळेंत जन्मास आलेला गोपाळकृष्ण यांच्या आख्यानांनीं जो श्रोत्यांकडून अश्रूंचा पूर वाहवितो, आणि दीनांचीं दुःखें वर्णितांना ज्याच्या चित्ताचा अवघा भावनाकंद तटतटून उपडून येतो असा सरस्वतीनें वरदहस्त ठेवलेला एखादा महानुभाव वारकरी, अस्पृश्य समाजाची धर्मश्रद्धा निराशेनें बुरसावयाच्या आंत, जर या विषयांत प्राप्त झाला तर अठ्ठावीस युगे विटेवर उभा असलेला

तो पांडुरंग आणि तितकींच युगें उद्धाराची वाट पाहात कर्दमांत उभे असलेले अस्पृष्ट लोक यांची आलिंगनगांठ खरोखर पडेल, असा भरंवसा वाटतो.

समाज हेंच दैवत—

असा मनोरम आणि उदात्त देखावा आपण आपल्या मनःचक्षूपुढें कितीदां तरी उभा करतों! तो प्रत्यक्ष केव्हां होणार असेल तो होवो. सध्यां तरी आपण जसले कसले असूं तसल्यांनींच यत्न केले पाहिजेत. मोठमोठ्या आगामी संतमहंतांच्या मार्गावरील धूळ झाडण्याचें काम आपण लहानांनीं केलें पाहिजे. या लहानांना विद्यमान महानुभावाचा आश्रय आणि पुरस्कार हींहि आजवर लाभत नव्हतीं. भुकेनें व्याकूळ होऊन शेजारीं पडलेल्या एकाद्या अर्भकाकडे पाहून दुग्धवती स्त्रीनें जसें नुसतेंच "चुक् चुक् " करावें, पण तें करतांना आपला खणखणून येणारा पान्हा जसा आपल्याच तान्ह्याच्या तोंडांत सोडावा त्याच-प्रमाणें बुद्धिमान्, ईर्षावान् आणि मनोवलवान् पुढारी या विषयाकडे पाहून दीर्घ उसासा टाकीत इतकेंच.पण आपलें सर्व बळ राजकारणांत मात्र खर्चीत असत. यामुळें सुद्धां लहान माणसें अधिकच लहान बनत. पण म.गांधी हे या विषयाकडे वळल्यामुळें सर्वच कांहीं बदलत आहे. म्हणून समाजासंबंधीं प्रतिपादकांनीं व प्रतिपादकांसंबंधीं समाजानें अधिक्षेपपर असें कांहीं बोलण्याची जरूरी नाहीं. प्रतिपादकांनीं तर समाजासंबंधीं उपहासबुद्धि केव्हांच वाळगतां कामा नये. समाज हेंच आपलें दैवत म्हणजे आराध्यदैवत मानिलें पाहिजे. ज्याला समाजा-संबंधीं तिरस्कार व उपेक्षा उत्पन्न झाली त्याचा प्रतिपादकाचा पेशा संपला असें त्यानें समजावें. हें मी आग्रहानें सांगतों. याचें कारण असें आहे कीं, या विषयांत प्राप्त झालेल्या कांहीं उमेदवार लोकांना समाजाविषयीं अवहेलना-बुद्धि उत्पन्न झालेली आहे. ती बरोबर नाहीं हें त्यांस कळावें. एक घाव दोन तुकडे हें काम लढाईंतील आहे. येथें लढाई नाहीं. प्रतिपक्षास वैरी बनूं न देतां वश करून घ्यावयाचें आहे. म्हणून समाजाच्या मनांत आपुलकीनें प्रवेश केला पाहिजे. त्यांतील राजमार्ग इतरांनीं व्यापिले आहेत म्हणून आपण पाऊलवाटेनें चाललें पाहिजे. लांब लांब वळणें घेतलीं पाहिजेत. नव्या वाटा पाडल्या पाहिजेत; आणि " पातळपणें तळा खणीं " असें केलेंच पाहिजे.

राजकारण-निरपेक्ष प्रयत्न—

पण या विषयांतील आपला प्रयत्न राजकारणनिरपेक्ष असावा. या माझ्या म्हणण्याला प्रतिपादकाच्या भूमीशीं संल्लग्न असा एक अर्थ आहे. राजकारणांतील साधनें इकडे आणूं नयेत या म्हणण्यांतलें तात्पर्य वरील एका परिच्छेदांत दिलेंच आहे. दुसरें असें होतें कीं, आजवर होऊन गेलेल्या देशभक्तांच्या श्रमसंचयावर आरूढ झालेल्या व स्वतः वेगवान असलेल्या देशभक्तांना राजकारणाच्या क्षेत्रांत जलदी करतां येते व ती तेथें चालतेहि; पण या प्रश्नाच्या गतीचा आणि त्यांच्या राजकारणाच्या गतीचा वेग सारखाच असावयास हवा असें जर त्यांनीं चुकून कल्पिलें तर या विषयाची फरपट निघण्याचा संभव असतो. म्हणून प्रतिपादकांनीं त्यांच्या डोळ्याला डोळा लावून पाहण्याचें कारण नाहीं. आपल्या विषयांतील वस्तुगत व्यापारास आणि साधनानुकूलतेस जो परवडेल तोच वेग आपण ठेविला पाहिजे. त्यांत मात्र शिकस्त केली पाहिजे. नुसतेच परिस्थितीवर विसंबणें याला काम म्हणत नाहींत हें ध्यानांत ठेवावयास हवें. पण सांगावयाचें आहे तें हें कीं, त्यांच्या चळवळीच्या गतिविशेषानें आपल्या चळवळीची गति कमी किंवा जास्त करण्याचें कारण नाहीं. मग यावर कोणी विचारील कीं, राजकारणी माणसांनीं या बाबतींत कांहीं बोलावयाचेंच नाहीं कीं काय? याला उत्तर असें आहे कीं, असें नाहीं. राजकारणाच्या चळवळीमुळें प्राप्त होणारे हक्क आपल्या अस्पृष्ट बांधवांना त्यनीं भरपूर द्यावे; इतकेंच नव्हे तर त्यांची निकृष्ट स्थिति लक्षांत घेऊन हक्कांचें माप त्यांच्या पदरांत चांगलें झुकतें टाकावें, कारण ते हिंदूच आहेत, व आपलेच आहेत. हक्क, अधिकार आणि सवलती हीं जीं कांहीं त्यांना मिळतील त्यांच्या बळावर त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारेल व ती जों जों सुधारेल तों तों अस्पृश्यतानिवारणाचें काम सोपें होत जाईल. यावरून असें दिसून येईल कीं, राजकारण हें या प्रश्नाच्या सोडवणुकीस उपकारक होईल, या प्रश्नाची सोडवणूक राजकारणास उपकारक होईल व परस्परांच्या अकारण उपसर्गापासून परस्पर अपूट राहतील.

हा प्रश्न हिंदूंचा आहे—

दुसरीहि एक बाब अनुभवसिद्ध आहे. तिची बोधप्रदता वांया जाऊं देऊं

नये. हा प्रश्न हिंदूंचा आहे. अठरापगड लोकांच्या कॉंग्रेसचा नाहीं, हें प्रतिपादकांनीं विसरूं नये. या बावतींत डॉ. कूर्तकोटी सर्वांच्या आधीं जागे झाले. पण हा प्रश्न कॉंग्रेसनेंच हातीं घ्यावयास हवा असें ठरविण्यांत आल्या-बरोवर हिंदू लोकांना घोपटावयास हें चांगलें टिकारणें मिळालें असें पाहून त्याचा भरपूर फायदा मुसलमानांनीं मागें एकदां घेतला, व तहनाम्याची अट म्हणून त्यांनीं उर्मटपणानें असें सुचविलें कीं, हे लोक आपण निमेनिम वाटून घेऊं! म्हणून हें ठाम मत सांगितलें पाहिजे कीं, हा प्रश्न हिंदुमहासभेचा आहे. कॉंग्रेसचा नाहीं. विनअटीची मदत कोणीहि केली तर ती स्वीकारण्यास कांहींच हरकत नाहीं. या वावतींत डिप्रेस्ड पुढारी पूर्वी कांहींहि वोलले तरी त्यांचे हिंदुत्वप्रेम निरपवाद सिद्ध होईल अशीच भाषा ते आतां वोलत आहेत. "हिंदुधर्माचा खरा अभिमान आम्हाला आहे; कारण त्याच्यासाठीं आम्ही क्लेश भोगीत आहों" या त्यांच्या शव्दांत फार गंभीर अर्थ आहे.

विषय–मिश्रण करूं नये––

अनेकविध समाजसुधारणांचा गोतंकाला करून श्रोत्यांपुढें मांडल्यानें सुधारावयास हव्यात अशा पुष्कळच वावी आहेत असें दाखवितां येतें. पण त्यावरोवरच नुकसान असें होतें कीं, श्रोत्यांच्या डोक्यांतहि गोंधळच माजतो; आणि मुख्य प्रतिपाद्य विषयाचा सुटा विचार करावयाचें त्यांस साधत नाहीं. म्हणून प्रतिपादकानें स्वतः आपला विषय इतर विषयांपासून स्पष्ट असा भिन्न करून दाखविला पाहिजे. त्याच्या मर्यादा व त्याचें महत्त्व हीं सापेक्षतेनें दाखविलीं पाहिजेत व त्यास अनुसरून साधन–योजनेसंवंधीं वोललें पाहिजे. म्हणजे असें कीं, केवळ अस्पृश्यतानिवारणासंबंधींचाच विचार श्रोत्यांस करतां यावा. समाजसुधारणेस लोक अगोदरच विन्मुख असतात. त्यांत अनेक सुधारणांविषयींचा गठ्ठा वळून त्यांजपुढें मांडला तर त्यांतील अप्रिय वावी एकवटून श्रोत्यांपुढें उभ्या राहातात व गांगरून जाऊन हें कांहीं तरी सवगोलंगारी पुंड प्रकरण आहे असें मानून ते अवघा विषय कानामागें टाकतात. म्हणून प्रतिपादकानें इतर अप्रिय विषय दूर ठेवून, स्वतःच्या विषयांत जेवढी अप्रियता आहे तेवढीच सोसावी. अस्पृश्यता–निवारणासंबंधीं वोलणें चालू केलें कीं, केव्हां केव्हां चांगले सुशिक्षितसुद्धां रागारागानें अद्वातद्वा वोलू

लागतात. मग अशिक्षितांची व जुन्या तऱ्हेनें शिकलेल्यांची वृत्ति काय असेल हें उघड आहे. या त्यांच्या वृत्तिक्षोभाला पुष्कळदां अस्पृश्य पुढाऱ्यांनीं गैरसावधपणानें व्यक्त केलेलें त्यांचें मनोगतहि कारण होतें. यामुळें अगोदरच सुधारणेस, त्यांतहि या प्रकारच्या सुधारणेस, प्रतिकूल असलेला बहुजनसमाज अगदींच उलट जातो, व स्पृश्यास्पृष्ट समाजांत असलेलें आधींचें अंतर दुणावत जातें. हें सर्व लक्षांत घेऊन अस्पृश्यता–निवारणाची कल्पना प्रथम आपल्या मनांत स्थिर करावी, व तदनुसार ती कल्पना यशस्वी व्हावी म्हणन कांहीं मर्यादा हटकून पाळाव्या.

धोरण—

आपल्या ह्या चळवळीचें धोरण अमुक नांवाचें आहे असें सांगणें फार कठीण पडतें. जिज्ञासू लोक पुष्कळदां असें विचारतात कीं तुमचें धोरण काय? प्रत्यहीं थोडें थोडें कांहीं ना कांहीं करणाराला 'हें माझें धोरण' असें बोटानें दाखवितां येईल असें वाटत नाहीं. देशांत उडालेल्या वादाचा कचरा जरा दूर उभें राहून तपासून पाहिला तर इतकीं निरनिराळीं मतें समाजांत चालू आहेत, असें दिसेल कीं, त्यांचा अन्वय लावणें व मग त्या अन्वयास अनुसरून धोरण ठरविणें हेंहीं साध्य आहेसें वाटत नाहीं. व त्या सर्वांना वाजूस सारून आपलेंच एक कांहीं चालू ठेवावें हेंही युक्त ठरत नाहीं. अस्पृश्यता–निवारण करणें हें ध्येय ठरून त्याच्या साधनसामग्रींत योग्य तो तो फेरफार करीत राहणें येवढेंच काय तें म्हणतां येण्यासारखें असतें. एका पक्षानें म्हणावें 'ब्राह्मण लोक कांहींएक करीत नाहींत' तोंच अस्पृश्यांपैकीं दुसऱ्या एकाद्यानें खिन्न होऊन आपल्याशींच पुटपुटावें "लोकांनाच दोष काय द्यावा! आपलें आपण तरी काय करीत आहों?" एक म्हणतो "ह्या ब्राह्मणाला जेथें तेथें विटाळ दिसतो" दुसरा म्हणतो "हरळ्या चांभार कोंकण्याच्या पंक्तीला वसत नाहीं त्याचें काय?" सात्त्विक भावना उद्दीपित होऊन एक म्हणतो 'सहकार्य केलें तरच भागेल! दुसरा म्हणतो, "आपण आपल्या पायावरच उभे रहाव-यास शिकलें पाहिजे. त्यावांचून गति नाहीं" एक अस्पृश्य म्हणतो, 'धर्माच्या वाता कशाला मारता? येथें जीव चालला आहे'.हें जों त्याचें ऐकावें तोंच दुसरा अस्पृश्य कळवळून म्हणतो, 'आमच्या स्पृश्य वंधूनीं आम्हांस धर्माचें शिक्षण

द्यावें.' एक बडा स्पृश्य म्हणतो 'अस्पृश्यांना घरांत घ्यावें. इतकेंच नव्हे तर देव-घरांत घ्यावें.' तोंच दुसरा स्पृश्य भर सभेंत सांगतों 'आम्ही रोटी–बेटी–व्यव-हाराचा आग्रह धरीत नाहीं." आपल्याला ज्ञान देण्यांत येत नाहीं हा मुद्दा खुलवून सांगतांना एक अस्पृश्य उद्‌गारतो 'बांधवहो ज्ञानाचा पल्ला केवढा मोठा आहे!' पण तोंच दुसरे शिक्षितपणाचा आपल्या समाजाला संस्कार आहे हें सिद्ध करण्याकरितां चौथ्या पांचवींतल्या पोराकडे बोट दाखवितात. एकादा अस्पृश्य आपल्याला हिणविण्यासाठीं म्हणतो 'तुमच्या कामाची गति केवळ मुंगीच्या पायानें चालली आहे' पण त्याविषयींच एकाद्या स्पृश्याला विचारलें म्हणजे तो म्हणतो 'तुम्ही रोज सद्धर्मावर घाला घालीत आहां.' आपण धर्माचें ज्ञान देण्यासाटीं म्हणून निरोप धाडावा कीं 'आज मी प्रवच-नाला येत आहें' तोंच त्यांचा निरोप यावा कीं आज एकादशी आहे, आज निशा करण्याचा दिवस आहे, प्रवचनाला येऊं नये.' एकजण उपदेशितो 'सुधारकाला Humility म्हणजे नम्रता पाहिजे' पण दुसरा सांगतो, 'जोडा मारला पाहिजे', एक सांगतो, 'उदारपणा हेंच धर्माचें जीवन होय'. तोंच दुसरा सांगतो, 'शिस्तीशिवाय समाज टिकत नाहीं.' सांगावयाचें तात्पर्य असें कीं, परस्परविरोधी असें खंडोगणती बोललें जातें. आणि ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीप्रमाणें तो इलाज सुचवीत असतो. अर्थात् या सर्वांचें ऐकून सर्वांना पसंत पडेल असें धोरण आंखणें हें कोणाही काम करणाराला साधावयाचें नाहीं व त्याहीपेक्षां त्या त्या मतवाल्यांची प्रीति संपादन करतां यावयाची नाहीं. हा गलबला ध्यानांत घेतां 'नदी आपलें पात्र बनवीत जाते तशी कार्यपद्धति ठरते' असें म्हणणें ज्यास्त युक्त होईल.

वर दिलेल्या विरोधवचनांपैकीं प्रत्येक थोडें थोडें खरेंच आहे. ज्याला ज्या वेळेला जसा अनुभव येत असेल तसें त्या वेळचें अर्धवट सत्य तो बोलून टाकतो. सहकार्य केल्यानें कार्यभाग होणार आहे याही वचनांत सत्य आहे. आणि स्वत:च्या पायावर उभें राहिलें पाहिजे याही वचनांत सत्य आहे. पण चूक होते ती ही कीं, तें तें वचन बोलणाऱ्या दोघांना हा न्याय पटत नाहीं. ते एकान्तिक बनून केवळ आग्रहानें माझेंच खरें असें म्हणतात. पण केवळ तत्त्ववाद सोडून ते जर आपल्या कार्याच्या व्यवहारांत उतरतील तर त्यांस असें दिसून

येईल कीं, या दोन्ही विधानांशीं प्रसंगाप्रमाणें मिळतें घ्यावें लागतें. अर्थात् मनाशीं ठरविलेल्या ध्येयाच्या यशाच्या सागराकडे जाण्यासाठीं कार्याच्या पद्धतीच्या पाण्यास विरोधभूमि उखळीत उखळीत पुढें जाऊं द्यावें. या पाण्यानें कोठें लवण घ्यावें; कोठें खडक फोडावा; कोठें खडकाळींत गर्जना करावी; कोठें रेताडांत केवळ गंभीरपणानें चालावें. असो. असें जरी आहे तरी या बाबतींत कांहीं विधायक बोलतां येण्यासारखें आहे. आपलें ध्येय व कामाची रीत यांचा संकर होऊं देतां उपयोगीं नाहीं. म्हणजे असें कीं, जर देवालय-प्रवेश व्हावयास हवा तर तो घडवून आणावयास हवा; एकदम दहापांच जणांनीं देवळांत मस्तीनें शिरणें हा त्याचा इलाज नव्हे. आंत जातां येणें हें ध्येय आहे. तें साध्य होण्याचें साधन आंत जाणें हेंच जर केलें तर साध्य आणि साधन यांतील भेद आपण शिल्लक ठेवीत नाहीं असें होतें.

मागल्या जन्मींचें पातक—

अस्पृश्य समाजाचे कित्येक ठिकाणीं जे अनन्वित हाल होतात ते पाहून ज्यांचें चित्त कळवळतें त्यांना अर्थातच जुन्या कल्पनांचा व समाजाचा फार राग येतो व या रागाच्या भरांत हिंदु समाजाच्या सद्यःकालीन पतित अवस्थेची ते एक चमत्कारिक मीमांसा करीत असतात. असल्या मीमांसेचा मोह भावडया धार्मिकांना तर सहजच पडेल; परंतु जे एरवीं कधीं धर्माविषयीं फारसें बोलतांना आढळत नाहींत अथवा ज्यांचा हिंदुधर्मांतील मुख्य मुख्य तत्त्वांवरसुद्धां भरंवसा असल्याचें माहीत नाहीं त्यांनासुद्धां तो आवरतां येत नाहीं. त्यांचें म्हणणें असें कीं, आपणा लोकांस परदास्याचीं जीं दुःखें भोगावीं लागत आहेत तीं आपल्या समाजाच्या मागील पापांचें फळ होय. आपण ह्या अस्पृश्य लोकांचा अतिशय छळ केला त्यामुळें आपल्याला परदास्याच्या आपत्ति सोसाव्या लागत आहेत. या विधानाकडे दोन दृष्टींनीं पाहतां येतें. एक परमार्थदृष्टया व दुसरें ऐतिहासिक दृष्टया. परमार्थदृष्टया वरील विधानाचा अर्थ असा कीं, आपण त्यांचा पूर्वकाळीं छळ केला, त्यांनीं आपणास शाप किंवा तळतळाट दिले, आपणांस आतां ते भोगणें प्राप्त झाले आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं साउथ आफ्रिकेंत आपल्या लोकांचा जो अमानुष छळ होत आहे त्याविषयीं बोलतांना एका पुढाऱ्यानें अशा अर्थाचे उद्‌गार

काढिले कीं, आपला तेथें होणारा छळ हा आपण अस्पृश्य लोकांना भूतकाळीं जी निष्ठुर वागवणूक दिली तिचाच कर्मविपाक आहे. म्हणजे नेहमींच्या प्रचारांत सांगावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, आम्हीं जें पूर्वीं केलें तें आतां फेडीत आहोंत. 'करावें तसें भरावें' हा आपल्या तत्त्वज्ञानांतील न्याय प्रसिद्धच आहे. आपण जें पूर्वजन्मीं करतों तें आपणांस या जन्मीं फेडावें लागतें हाच तो न्याय होय. आतां हाच न्याय, कीं जो व्यक्तिमात्रालाच आपण बहुधा लागू करतों तो बाढवीत बाढवीत न कळत बोलणारांनीं समाजाला लागूं केला आहे. म्हणजे समाजानें जर अमुक एक पातक आज केलें असलें तर त्यास त्याची फेड करण्याची पाळी उद्यां येते. इतिहासांत आपणांस हें खरें आहे असेंही दिसतें. आज अधिकारमदानें एकाद्याचा स्वातंत्र्यापहार करावा, दोन तीन पिढ्या तेथील सुखांत खुशाल घालवाव्यात. पण चवथ्या पिढीला सगळेंच गाडें उरफाटें होऊन राज्य करणाराची पिढीची पिढी कापून सफा व्हावी. ही ऐतिहासिक उपपत्ति झाली. व या दृष्टीनें 'करावें तसें भरावें' हाही न्याय येथें खरा झाला असें म्हणणें बरोबर आहे. पण वर जें उदाहरण दिलें आहे तेथें हा ऐतिहासिक उपपत्तीचा न्याय कसा लागू पडतो हें कळणें कठीण आहे. साउथ आफ्रिकेंत आमचा छळ कां तर आम्ही अस्पृश्य लोकांना अमुक हजार वर्षें हिंदुस्थानांत छळलें म्हणून! यांतील कार्यकारणभाव ऐतिहासिक दृष्ट्या उत्पन्न होत नाहीं. साउथ आफ्रिकेंत आम्हांला येथील अस्पृश्य लोकांनीं सूडासाठीं छळलें कीं काय? अथवा साउथ आफ्रिकेंतील गोऱ्या लोकांनीं येथील अस्पृश्यांची कड घेऊन आम्हांस छळावयाचें ठरविलें आहे काय? असें कांहींच नाहीं. म्हणजे कार्यकारणभावांनीं उपन्न होणारी इतिहासाची दृष्टि येथें लागूच पडत नाहीं. अस्पृश्यांना छळणारे, निराळ्या देशांतले आणि निराळ्या काळचे व या छळणारांचा जो छळ होत आहे तो निराळ्या देशांत निराळ्या काळीं. व सर्वांहून महत्त्वाचें म्हणजे जे स्वतः छळले गेलेले अस्पृश्य नव्हत, त्यांचे वंशज नव्हत अथवा त्यांचे पक्षपातीही नव्हत अशा लोकांकडून. मग कोणास असें विचारावेसें वाटेल कीं पुढाऱ्याच्या वरील उद्‌गाराचें रहस्य काय? त्यास उत्तर एकच आहे कीं, हिंदू मनाला पातकाची फेड करावी लागते या विचाराची कायम बसलेली मिठी हें तें रहस्य होय. सगळ्या हिंदूसमाजानें मिळून जें पातक केलें त्याबद्दल

परमार्थदृष्टचा ही शिक्षा आहे असा या वोलण्याचा निष्कर्ष निघतो. महात्मा गांधींनीं आपल्या आर्यसमाजावरील लेखांत अशाच तऱ्हेचें विधान केलेलें सांपडतें. माझ्या मतें आपल्या भूतकालीन चुका सद्य:कालीं पटवून देण्याची ही पद्धत अत्यंत प्रमादाची आहे. असें वोलल्यानें, म्हणजे ऐतिहासिक उपपत्ति सोडून देऊन बोलण्यानें, आपण भलत्याच एका गोत्यांत सांपडतों हें आम्ही ध्यानांत ठेवावयास हवें. आपले हाल व छळ कां वरोवर? तर आपण पूर्वीं पातक आचरिलें म्हणून. म्हणजे आतांच्या आपत्ती पूर्वींच्या पातकाची फलरूप अवस्था होत. याचा अर्थ असा होतो कीं, माणसाचे जे जे कांहीं हाल होतात, व जें जें त्याला सोसावें लागतें तें तें त्याच्या पूर्वकालीन पातकाचें फल असतें. मग कोणी तार्किक असें म्हणेल कीं अस्पृश्यांचे जे सध्यां हाल होत आहेत ते त्यांनीं पूर्वीं पात्कें आचरिलीं असलीं पाहिजेत म्हणून होत आहेत. व म्हणून ते वरोवर आहेत. म्हणून माझें असें म्हणणें आहे कीं असला दैववाद कोणी कोणास सांगूं नये.

स्वच्छता—

वरिष्ठ वर्गाच्या लोकांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवावयास हवी कीं, स्वच्छतेचा विचार आपल्या व्यवसायावर पुष्कळदां अवलंबून असतो. जशा कित्येक चालीरीती तसा स्वच्छतेचा विचारही सापेक्ष असतो. हें बोलणें उदाहरणानें स्पष्ट होईल. शेतवाडीवर काम करणारीं जीं माणसें त्यांना स्वच्छतेची कल्पना असूनही ती कितीशी संभाळितां येईल याविषयीं शंकाच आहे. शहरांत राहून सांवलीखालीं काम करणारे व त्या कामांत शरीराला फारशी हालचाल न पडणारे जे असतात यांची त्वचा नितळ व साधारणपणेंही स्वच्छ ठेवल्यास तजेलदार दिसते. पण तोच काम करणारा कोठें दऱ्याखोऱ्यांत किंवा माळावर काम करीत असला किंवा रावत असला किंवा कामामध्यें त्याच्या शरीराला व अवयवांना वाकडे तिकडे पिळोके बसत असले तर त्याचा चेहरा रापून जातो, त्याच्या पोटऱ्यावर चिरण्या पडतात, व शिरांना वटवटीतपणा येऊन शरीराचे कोणचे तरी अवयव भलतेच पोसतात. म्हणजे उघड्या हवेवरच्या कामानें नुसती स्वच्छता कमी होते इतकेंच नव्हे तर शरिराचा घाटसुद्धां बेडौल व कांहींसा कुरूप वनतो, असो. अशा कामांत स्वच्छता ठेवण्याच्या साधनापासून जों जों दूर जावें लागतें तों तों अस्वच्छता जास्त येते. व तें काम सारखें करीत राहावयाचें

म्हटलें म्हणजे स्वच्छतेची मुळांत असलेली कल्पनाच मलीन होते. आणि कालांतरानें मलीनपणाच अंगवळणी पडतो. अर्थात् हें असें होत असलें म्हणून मलीनपणाला सुद्धां स्वच्छतेइतकाच मान द्यावा असें कोणी म्हणत नाहीं. येथें इतकेंच दाखवावयाचें आहे कीं, अस्पृश्य लोकांना जात्याच ओंगळपणाची आवड आहे असें नव्हे. तर ओंगळ धंदे करणेंच भाग पडल्यामुळें ओंगळपणा आपोआपच उत्पन्न होतो. हा कसा होतो हें उदाहरणानें सांगतों. कोणच्याही शहरच्या मंडईंत आपण भाजी घ्यावयास गेलों तर तेथें एक ओंगळवाणा प्रकार दृष्टीस पडतो. तेथें लोक पालेभाज्या विकावयास बसलेले असतात. पुष्कळ श्रम झाले म्हणजे त्यांस घाम येतो किंवा प्रकृत्यनुरूप थंडीहि होते. मग हातानेंच घाम निपटून टाकणें किंवा नाक साफ करणें या गोष्टी त्यांना कराव्याच लागतात. बरें त्या इतक्या लवकर उरकावयाच्या असतात कीं हात धुवून टाकणें त्यांना शक्यच नसते. कारण गिऱ्हाईक जाण्याची भीति असते. मग पराकाष्ठा बोटें मागल्या अंगाला पुसून त्याच हातानें भाजी गिऱ्हाइकापुढें करतात. त्यांना याहून जास्त स्वच्छ राहतां येणें अशक्य असतें. आमचे एक प्रोफेसर अतिशय घामाळू होते; शिकवीत असतांना त्यांच्या कानशिलावरून घामाच्या धारा लागत. मग संकोच न बाळगतां बोटांची कमान करून ते घाम भराभर निरपीत असत. बरें, दुसरें तरी काय करतां येणें शक्य होतें? त्यांना स्वच्छतेची कल्पना नव्हती म्हणावें तर म्हणणाराच मर्ख ठरावयाचा. असो. दुसरीं उदाहरणें पहा. मेंढपाळ मेंढरें राखावयास किंवा गुराखी गुरें राखावयास माळावर किंवा रानांवनांतून भटकत असतात. एका सकाळीं घरून निघावयाचें तें संध्याकाळीं परत यावयाचें. देहधर्म सर्वांसच आहेत. अर्थात् त्या ठिकाणीं त्यांनीं पाणी कोठून आणावयाचें? अर्थात् इतर दगडधोंड्यासारख्या साधनांवरच त्यांस विसंबून रहावें लागतें. मेंढपाळ किंवा गुराखी यांना धंद्याच्या स्वरूपामुळेंच असला अमंगळपणा पतकरावा लागतो. पण त्याचाच एकादा भाऊ जर शिकून शाळामास्तर झाला असला तर तो शरीर-शुद्धीची निराळीं साधनें वापरीत असेल हें उघड आहे. खांद्यावर कुऱ्हाड टाकून लाकडें फोडण्याचा धंदा करणारा किंवा म्युनिसिपालिटीतील नाले खणणारा यांची वाव उदाहरणादाखल उपयोगीं पडेल. त्यांनीं कामाला सुरवात केली म्हणजे कांहीं वेळानें त्याचे हात हुळहुळे होतात.

मग हाताला थोडा गारपणा व ओशटपणा यावा म्हणून हाताची मूठ करून ते तींत थुंकतात. व पुन्हां कामाला सुरवात करतात. आतां ह्या ठिकाणी हाताला फोड येऊं नयेत म्हणून त्यानें काय तेलाची कुपी जवळ बाळगावी? यासारखेंच चांगल्या सुशिक्षितांतील एक उदाहरण सांगतों. ज्यांना कागदाचीं पानें भराभर उलटावयाचीं असतात त्यांच्यापैकीं कित्येक लोक टेबलावर पाण्याचा पेला भरून ठेवतात व बोट किंचित् भिजवून मग पानें चाळतात. पण शेकडों सुशिक्षित वाचक असे आहेत कीं ते तोंडांतच बोट घालतात. तिकिटाच्या पाठी चाटणारे तर लक्षावधि लोक आहेत. वर लाकुड फोडणाराचें जें उदाहरण दिलें आहे त्याच्याहून हें उदाहरण कांहीं फारसें निराळें नाहीं. एतावता काय कीं, ज्या व्यवसायांत पडावें त्याप्रमाणें स्वच्छतेच्या किंवा गैरस्वच्छतेच्या कल्पना वनत जातात. मला अशी एक गोष्ट माहीत आहे कीं, जीवरून प्रस्तुत मुद्याचा आणखी खुलासा होईल. एक अस्पृश्य गृहस्थ शिकून शाळामास्तर झाला व त्याचा भाऊ मळ धंद्यांतच राहिला. दोघांचे व्यवहार निराळे, बोलणें चालणें निराळें, मित्रपरिवार निराळा. अर्थात् शाळामास्तर आपल्या मुलांना चांगलें वळण लावूं लागला. वाईट वाकडे शब्द ह्याच्याच तोंडांत नसल्यामुळें मुलांच्याही येईनासे झाले. पण आपल्या भावाच्या मुलांमध्यें आपलीं मुलें खेळूं लागलीं तर त्यांना वाईट संवयी लागतील व तीं अपशब्द बोलूं लागतील अशा भीतीनें त्यानें त्यांचें एकत्र खेळणेंसुद्धां बंद केलें. ही हकीकत अत्यंत बोधप्रद आहे. आणि तो वोध हाच कीं व्यवसाय बदलले म्हणजे त्याप्रमाणें स्वच्छतेच्या कल्पना बदलतात.

सहभोजन—

जिला 'संस्कृति, संस्कृति' म्हणून म्हणतात ती म्हणजे बुद्धि व भावना यांनीं दिलेले जे निर्णय असतात त्यांच्या समन्वयाचें आचारांत झालेलें रूपांतर हेंच होय. हे निर्णय काढण्याची किंवा त्यांचा समन्वय करण्याची कुवत ज्या ज्या मानानें एकादा समाज दाखवितो त्या त्या मानानें त्याची संस्कृति उच्च किंवा नीच रहाते. परिस्थितिविशेषांत जे बदल होत असतील त्यांचें सूक्ष्म अवलोकन करण्याची पात्रता अंगीं असेल तर हें साधतें, व नसेल तर साधत नाहीं. अशा निर्णयाचे पुंज बनवीत बनवीत माणसांची जात आजवर उन्नत

होत आली आहे. नव्या निर्णयांनीं जुने बाधित झाले तर ते टाकण्याची धमक ज्यांना आहे व परिस्थितिविशेषांचें चांचल्य लक्षांत घेऊन त्यांच्या लहरी-बरोबर आपणही लहरखोर न बनतां, जुने निर्णय टिकवून धरण्याला लागणारा दृढ भावही ज्यांच्यांत आहे ते प्रगति करीत रहातात व उच्चतर भूमिकेला पोंचतात; बाकीचे क्षीण होतात किंवा वैचारिक जीवनांत केवळ उपरे किंवा भटके ठरतात. बुद्धि व भावना या एकमेकांना ताळ्यावर आणणाऱ्या निवळ्या होत. त्यांचे व्यापार यथास्थित चालू राहून उभयसंमत असें आचारकांड समाजांत रूढ झालें तर तें मनुष्ययोनीला खरें उपकारक होतें. केवळ बुद्धि-विलासजीवी हे पशू बनतात व केवळ भावनाविलासजीवी हे वेडे व भ्रांत ठरतात. तसेंच पुष्कळदां असें होतें कीं, आजचा जो निर्णय आहे तो उभय-संमत आहे असें जरी असलें तरी तो आचारांत शिरून पाठ झाल्यानें त्याची मीमांसा विसरून जाते. त्यामुळें आपला आचार हा वेडाचार आहे असें विस्मरणशील प्रजा मानूं लागतात: व ती मीमांसा ज्यांना करतां येत नाहीं ते सुधारक याच आचाराला दुराग्रह असें नांव देतात. तसेंच कांहीं नवीन विचार सुरू झाला आहे येवढी आवईसुद्धां कानीं येतांच जे अस्वस्थ बनतात ते बुद्धिभावनांना संमत असोही सुधारकाचा विचार लक्ष्य मानीत नाहींत आणि त्यामुळें त्यांचा निर्णयकोश रोडका रहातो व आचार नवजीव-नाशीं विसंवादी बनतो. ही आपत्ति जर चुकवावयाची असेल तर समाजांत अखंड चालना पाहिजे. 'असें कां ?' या प्रश्नाला भिण्याची जरूरी नाहीं. जर चालना असेल तर परंपरावादी व नवमतवादी या उभयतांनाही या प्रश्नाचें उत्तर देणें भागच पडेल. पण जर कां परंपरावादी केवळ श्रद्धाळू असला व नवमतवादी केवळ हौशी व अनुकरणप्रिय असला तर हे दोघेही समाजाला टिकवूं किंवा बदलू शकणार नाहींत. म्हणून चालना अखंड पाहिजे या दृष्टीनें पाहतां सहभोजन व मिश्रविवाह हे प्रश्न पुन्हां विवादांत दाखल झाले हें कांहीं वाईट नाहीं. पैकीं मिश्र विवाहाचा विचार अन्यत्र आला आहे; येथें सहभोजनाविषयीं मात्र जें सर्वांसच मनानें तरी माहीत आहे तें थोडक्यांत लिहितों.

सहभोजनाचा अगदीं खोलांतला अर्थ काय व या रूढीचा उगम कोठें हें कोणीं

विचारलें तर त्याला वैदिक परंपरेपर्यंत मागें जावें लागेल. एकत्र जेवणें याचा अर्थ ते जेवणारे एका कुलाचे निदान जातीचे झाले असें मानीत असत. लग्नांत नवरावायकोनीं एकमेकांस घांस देणें ही त्याची एकाकी खूण अजून शिल्लक राहिली आहे. अगदीं खालपर्यंतच्या जातींतही ही पद्धति अजून प्रचलित आहे. जातीचें जेवण हें एक सामुदायिक एकत्वाचें गमक म्हणून अजून त्यांच्यांत मानलें जातें. इतर धर्मांतून एकाद्याला परत घ्यावयाचें तर केवळ जातीच्या पंक्तीला त्याला घेतलें म्हणजे तो आपल्या जातींत परत आला असें अस्पृश्य लोकही मानतात. तेव्हां जे एका पंक्तींत बसतात ते एका जातीचे असतात किंवा होतात हा अतिप्राचीन कालापासूनचा मान्य संकेत आहे. त्याचा अंमल अजूनही पुष्कळांच्या मनावर असतो. आपल्या ध्यानांत येत नाहीं, पण मूळ येथेंच आहे. शिवाय ती ती जात वसती, धंदा, आचार, पंथकल्पना यांनीं एकाच प्रकारची असल्यामुळें तिचीं माणसेंच तेवढीं एकत्र जेवतात. नाहींतर मुद्दाम उठून दुसऱ्या पठडींतल्या माणसांत जाऊन कोण जेवावयास बसणार? आपण अगदीं सुधारलों असें मानिलें तरी आपण काय करतों? लग्नकार्य, सोहाळे,उत्सव यांत पहावें म्हणजे ध्यानांत येतें कीं, वरील उपाधींनीं अवलिप्त असा जो एक जातिपंथ असेल त्यांतलेच लोक एकत्र येतात. आतां धंदा, शिक्षण, प्रवास, भीड, भावना, अशांसारख्या कारणांनीं आपल्या हातून जें काय निराळें आचरण होत असेल तें निराळें; पण हें हातीं नसलेलें प्रकरण सोडलें तर वरील पद्धतीनेंच आपला आचार होतो हें कबूल करावयास हवें. त्या आचाराचें मूळ कोठपर्यंत गेलें आहे हें सांगितलेंच आहे. तेव्हां जुने लोक असें कां बोलतात असें आश्चर्य दाखविण्याइतपत कांहीं कायमचा निराळा आचार नवे लोकही करतात असें नाहीं. म्हणजे ज्या त्या जातींतले लोक आपापल्यांत जेवतात हेंच खरें आहे. अर्थात् या आचाराहून मुद्दाम निराळें आचरण करावयास कोणी एकदम प्रवृत्त झाला नाहीं तर त्याला दोपच येतो कसा, हें ध्यानांत येत नाहीं. पण याला याहीपेक्षां बलवत्तर असें दुसरें एक अंग आहे.

जिकडे तिकडे अहिंसा तत्त्वाचा जयजयकार चालू असलेल्या या युगमानांत हें अंग आपणांस आपोआपच दिसावयास हवें व पटावयासही हवें.

बुद्धोत्तर काळांत असो कीं बुद्धपूर्व काळांत असो, पण हिंदू समाजांतील कित्येक जातींनीं आहाराच्या बाबतींत तरी अहिंसा पतकरली. पूर्वी त्या केव्हांतरी मांसाहारी होत्या व पुढें शाकाहारी झाल्या हें निश्चित आहे. शाकाहार हा माणसाच्या जातीनें सुधारणा म्हणून पतकरला. ज्यानें ही सुधारणा पतकरली तो इतरांस कमी सुधारलेला असें समजणार यांत काय शंका आहे ? हें त्याचें समजणें, इतरांस अवमानकारक रीतीचें झालें तर त्याबद्दल इतरांस वाईट वाटणें कदाचित् बरोबर असेल. पण त्याला जो आचार इतरांच्याहून उंच दर्जाचा आहे असें वाटतें तो पाळण्यासाठीं त्यानें स्वतंत्रपण ठेवलें तर इतरांनीं त्याला दोष देणें अप्रशस्त आहे. आहारविषयक शुचितेची ही कल्पना हिंदूसमाजांत इतकी बद्धमूल झालेली आहे कीं, जे स्वत: मांसाहारी आहेत त्यांनींहीं तिचें श्रेष्ठपण मान्य केलें आहे. देवाचे उत्सव असले, पुण्यतिथ्या असल्या, नैवेद्यसमर्पण करावयाचें असलें, महालयश्राद्धें असलीं तर हे मांसाशनी लोकही शाकपदार्थंच तयार करतात हें त्यांचें त्यांना व इतरांनाही माहीत आहे. ते असें कां करतात? याचें एकच उत्तर आहे कीं त्यांनाही शाकाहाराचें शुचित्व मान्य आहे. देवाची पूजा करावयाची तीही शाकाहारी माणसाकरवीं करावी हाही त्यांचा विचार वरील शुचित्व–मान्यतेचाच द्योतक आहे, यांत कांहींच शंका नाहीं. खुद्द नेपाळांत काटमांडूला देवाचा पुजारी महाराष्ट्र ब्राह्मण असावा लागतो यांतील रहस्य हेंच आहे कीं, महाराष्ट्र ब्राह्मण मांसनिवृत्त आहे. नाहींतर तिकडे काय ब्राह्मण नाहींत? पंढरीची माळ घातली तर व तिचें सौभाग्य कायम ठेवावयाचें असलें तर माळकरी दारूबरोबर मांसाशनही टाकतो हें सर्वांस माहीत आहे. तो मांसाशन कां टाकतो याचा उलगडा करावयास हवा काय? सांगावयाचें तात्पर्य असें कीं, आपल्यांतीलच मांसाशनी लोकही शाकाहाराचें शुचित्व मान्यच करीत आले आहेत. इतर संस्कृतींतील थोरथोर लोक कीं ज्यांनीं या दृष्टीनें विचार केला आहे ते शाकाहारी बनल्याचीं उदाहरणें आहेत. मिसेस बेझंट, काऊंट टॉल स्टॉय, इत्यादि व्यक्ति उच्चतम विचार म्हणून शाकाहाराचें शुचित्व मान्य करीत असत व त्या स्वत:ही शाकाहारी बनल्या होत्या. हें सर्वांसच माहीत असतें असें नाहीं; पण असावयास मात्र हवें. जें इतर देशांत व्यक्तींना चिंतनिकेनें प्राप्त होतें व म्हणून जें कांहीं व्यक्तींनाच फक्त साधतें तें आमच्या

येथील अनेक समाजचे समाज आज शेकडों पिढ्या आचरीत आले आहेत ही आमच्या उन्नतपणाची खूण समजावयाची कां हीनपणाची समजावयाची? जी गोष्ट इतर समाजांत कांहीं व्यक्तींनाच कष्टसाध्य झाली व केवळ वैयक्तिक तर्क–बुद्धीनेंच ओळखितां आली ती आमच्या येथें सामाजिक धर्म म्हणून प्रस्थापित व्हावी व हजारों वर्षें आचारांत राहावी हें खरोखर आमच्या अवनत स्थितीचें लक्षण नसून उन्नत स्थितीचेंच आहे असें ठासून सांगावयास माणसांनीं शिकलें पाहिजे.

प्रस्तुत कालीं सर्व प्रकारच्या लोकांत भूतदयेचा बोभाटा जगभर चालू आहे आणि अस्पृश्यता–निवारणाच्या कामी जेव्हां स्पृश्यास्पृश्यांनीं एकत्र पाणी भरण्यासंबंधानें बोलण्याचा प्रसंग येतो व स्पृश्य लोकांना हिणवावयाचें असतें तेव्हां त्यांच्या अंगीं साधे पाणी घेऊं देण्याची सुद्धां भूतदया नाहीं असें दूषण लावण्यांत येतें. त्यावेळीं हें दूषण लावावें असें माझेंहि मत आहे व म्हणून मीहि हें दूषण समाजास लावतों. पण ही भूतदयेची आस्था लोकांनीं जरा जास्त दाखवावी व जर कोणी इचा अवलंब अन्यत्र करीत असेल तर त्याबद्दल त्यांना योग्य तें श्रेय द्यावें. भूतदयेचीच हत्या केल्याशिवाय पशुहत्या होते काय? आणि पशुहत्त्या केल्याशिवाय मांसाशन होतें काय? पशुहत्या ही जर खरोखरीच वाईट असेल तर जे कोणी ती करीत नाहींत व आपल्या भोगासाठीं करवीत नाहींत त्यांची नैतिक थोरवी लक्षांत घ्यावयास नको काय? आपल्यांतील शाकाहारी लोक स्वसंरक्षणासाठीं–म्हणजे आपल्या जीविताचाच जर संशय उत्पन्न झाला–तरच हिंसा करतात. पण आपल्या उदरपोषणासाठीं मात्र ते ती कधींहि करीत नाहींत. जगांतील व्यवहारांत या लोकांनीं उत्पन्न केलेली ही तडजोड खरोखरच फार उदात्त स्वरूपाची म्हटली पाहिजे. महाभारतांत वर्णन केलें आहे कीं, राम, युधिष्ठिर इत्यादि मोठमोठाले पन्नास साठ सम्राट् हे निदान चातुर्मास्यांत तरी मांस वर्ज करीत असत. प्रत्यक्ष त्या त्या राजांनीं हें खरोखरीच केलें होतें कीं नाहीं हा प्रश्न जरी शंकास्पद धरला तरी निदान तेवीसशें वर्षांपूर्वीं म्हणजे जेव्हां सध्यांचें महाभारत लिहिलें गेलें तेव्हां व तेव्हांपासून आजपर्यंत या आहारविषयक अहिंसेला समाजांत अखंड मान्यता राहिली आहे, येवढें यावरून दिसतें. ज्यांना तें व्रत झेपलें त्यांनीं तें संभाळिलें. कोणच्या कां कारणासाठीं

होईना, ज्यांना तें पत्करलें नाहीं त्यांनीं घेतलें नाहीं. पण त्या आचाराची शुचिता मात्र त्यांनीं मान्य केली. खरोखर आपला आचार निराळा असूनहि शाकाहाराच्या शुचितेला ज्यांनीं मान्यता दिली तेच खरोखरी (Libera minded) उदार व सहिष्णु असे होते असें म्हणावयास हरकत नाहीं. पण कालाचें वैपरीत्य कसें आहे पहा. त्या लोकांना जुन्या काळचे समजून धर्माचीं तथाकथित अशीं नवीं तत्त्वें घालण्याचा मनस्वी उद्योग जे करू पाहतात ते तोंडानें भूतदयेचा गौरव करीत असतांना सुद्धां आचारांत तिचा प्रत्यहीं खून पाडीत असतात व वरते (Liberal mindedness) ची म्हणजे उदारसहिष्णुत्वाचो प्रौढीहि मिरवितात.

ब्रह्मसमाज आणि प्रार्थनासमाज यांचें मूल अधिष्ठान म्हणजे भूतदया हें होय. या भांडवलावरच त्यांचे सर्व प्रतिपादनरूप व्यापार चालावयाचे. पण हें सर्व कागदोपत्रीं राहून प्रत्यक्ष, "तोंडांत" काय आहे हें पाहूं जातां असें दिसेल कीं, हे हिंसेचाच अवलंब करतात आणि वर "हे पशू कांहीं आम्ही मारीत नाहीं" असें म्हणून लटकाच बचाव करून घेतात. मागें एकदां डॉ. भांडारकर यांस कोणा मासिकाच्या संपादकानें "आपण शाकाहारीच असाल?" असें विचारलें असतां पाऊणशेंच्या घरास आलेल्या या वृद्ध ज्ञानराजानें सांगितलें, "मी मागें मांसाहार व मात्स्याहारही करीत असें: अलीकडे मी मांसाहार टाकला आहे." याचा अर्थ असा कीं अजून मत्स्याहार करतों, हें त्यांचें वचन वाचून मला तेव्हांपासून अचंबा वाटत आला आहे कीं, हें काय आहे? 'रूढी ही कैदाशीण आहे, तिच्या मुसक्या बांधल्याच पाहिजेत' असा जन्मभर घोष करीत आलेल्या या ज्ञानमूर्ति ऋषीला मत्स्याशनाची साधी रूढीसुद्धां मोडतां आली नाहीं याचें नवल वाटतें. हाच त्यांचा कित्ता त्यांच्या मेळांतील अनेकांनीं गिरविला असला आणि वर अहिंसा-वाद लकडीसारखा तोंडांत ठेविला असला तर कांहींच आश्चर्य नाहीं. कोणी यज्ञ करणारांनीं, कधीं काळीं, एकादेवेळीं, कर्मकांडानें ग्रस्त होऊन, केवळ नमुना म्हणून, एकप्रकारच्या यज्ञकर्माचें सातत्य राखावयाचें म्हणून, जर बोकड मारिला तर या पंथाच्या मंडळींत केवढा कल्लोळ उडावयाचा. आणि थेट बुद्धापासून सर्व महात्म्यांच्या जवान्या उद्धृत करून या यज्ञ करणारांवर टीका व्हावयाची! पण सभा होऊन घरीं

गेल्यानंतर आपल्याच ताटांत काय आहे हें पाहण्याचें मात्र हे सर्व लोक विसरत असत! या मुद्यावर मी थोडा जास्त भर दिला आहे याचें कारण असें कीं, नवसुधारकांत रूढ झालेले मिथ्याचार वाचकांच्या ध्यानीं यावे. मागें म्हटलें आहे कीं, निर्णयपुजांचा संग्रह करीत करीत माणसें उन्नत होत जातात. नव्या निर्णयानें जुना बाधित झाला तर तो सोडावा यांत शंका नाहीं. पण भूतदयेचें तत्त्व अजून बाधित झाल्याचें ऐकिवांत नाहीं. उलट तिचा महिमा जास्तच गाइला जात आहे. असें असतां तिला अनुसरून होणारा आचार जे कोणी करतात व म्हणून स्वत:ला इतरांहून थोडें तरी उन्नत समजतात त्यांची हेटाळणी करण्याचें काम मात्र चालू आहे. वास्तविक या लोकांचा संभावित आचार तो होय कीं, जर आपण प्रतिपादीत असलेल्या तत्त्वाची अंमल-बजावणी निदान दुसरे लोक तरी करीत आहेत तर या जाणीवेनें त्यांनीं संतुष्ट व्हावें व त्यांचें उन्नतपण निदान मनानें तरी मान्य करावें. माझें तर असें मत आहे कीं, शाकाहारी असलेला अत्यंत दीनवाणा माणूससुद्धां सर्वसमर्थ अशा मांसाशनी सम्राटापेक्षां **या एका बाबतींत** तरी श्रेष्ठ आहे.

"चालत नाहीं" अशी कोणाकोणाची तक्रार असते. अशा लोकांनीं चालविण्याचा हट्ट धरला पाहिजे म्हणजे चालतें असें त्यांस दिसून येईल. अव्वल इंग्रजींतील इंग्रजी सुधारणेला भाळलेले सुधारक, विनाकारण–स्वतं त्र –मतवादी लोक, विलायतेस शिकावयासाठीं जाऊन आलेले लोक, मुख्यत: डॉक्टरीचा धंदा शिकणारे लोक इत्यादींनीं मांसाशनाचा प्रघात थोडा थोडा निदान आपल्यापुरता तरी सुरू केला. पण या प्रघातांतील त्यांचा हेतू अगदींच प्राकृत असल्यामुळें ते या आचाराचा प्रसार करण्याला धजावले नाहींत; पण पुढें पुढें स्वत: आचारभ्रष्ट झालेले देशभक्त लोक व एकादा इतिहासचिंतामणि हेच जेव्हां हा आचार केला पाहिजे, तरच देशाचें रक्षण करितां येईल असें प्रतिपादन करूं लागले. देशासाठीं अमुक गोष्ट करावयाची आहे असें म्हटलें म्हणजे वाईट गोष्टीलासुद्धां संभावित रूप येतें हें सर्वांनाच माहीत आहे. मांसनिवृत्त लोकांतूनच हे हीन विचार पुढें येत आहेत असें पाहिल्याबरोबर ज्यांना ब्राह्मणादि मांसनिवृत्त लोकांना खालीं ओढून आपल्या पदवीला आणावयाचें आहे त्यांनींहि आपला सूर त्यांच्यांतच मिसळविला व जे कोणी चोरून मारून असा आचार पूर्वी करीत

होते त्यांचीं नांवें उदाहरणादाखल इकडे तिकडे झळकत ठेवण्याची प्रथा पडली व शेवटीं आपण मांसनिवृत्त म्हणून आम्ही स्वतंत्र आहोंत असें जे कोणी म्हणतील तेच वेडे असें ठरविण्याचा उद्धटपणा, संस्कृतांना खालीं ओढूं पाहणारे कांहीं मतलबी लोक व इतर कांहीं भोळसटें, यांनीं दाखवावयास सुरुवात केली. हा येवढा जोराचा हल्ला होत असतांना ज्यांना बाधा होते त्यांनीं कडकडूनच बोललें पाहिजे. "मी पिढीजात मांसनिवृत्त आहें, मांसनिवृत्ति हा थोर सदाचार आहे व तो जतन करून ठेवणें हें माझें मी कर्तव्यच समजतों" असें कसल्याही थोर सुधारकापुढें ठासून सांगावयास भिण्याचें कांहीं एक कारण नाहीं. जर भूतदया ही निर्दयपणापेक्षां श्रेष्ठ असेल तर मांसनिवृत्ति ही मांसप्रवृत्तीपेक्षां श्रेष्ठ ठरलीच पाहिजे. आणि जर ती तशी ठरते तर मांसनिवृत्त लोकांपेक्षां या आहाराच्या एका बाबतींत तरी मांसनिवृत्त श्रेष्ठ आहेत हें ओघानेंच येतें. त्यांनीं आपला श्रेष्ठपणा इतरांना मनस्ताप देईल अशा रीतीनें न दाखविण्याचा संभावितपणा व सुशीलपणा दाखविला म्हणजे त्यांची जबाबदारी संपली.

येथें आणखी एका प्रश्नाचा विचार करणें जरूर आहे. आम्ही जेव्हां सहभोजन करा असें म्हणतों तेव्हां जेवावयास शाकपदार्थच करावे असें आमचें मत असतें असें हे लोक म्हणतात. या त्यांच्या म्हणण्याचा अर्थ निस्संशय हाच होतो कीं ते स्वतः मांसनिवृत्ति ही मांसप्रवृत्तीपेक्षां अधिक पवित्र मानतात. जर ते तसें मानीत नसते तर त्यांनीं स्वतःच मांसाहार केला असता. पण ते करीत नाहींत यावरून मांसनिवृत्तीला ते जास्त मान देतात हें स्पष्ट आहे. आम्ही तुमच्याबरोबर जेवूं पण आमचें खाणें आहे तेंच तुम्ही खाल्लें पाहिजे असें त्यांनीं मांसाशन करणारांस बजावणें याचाच अर्थ मांसनिवृत्तीला ते जास्त मान देतात. मग ही निवृत्ति जर अधिक मानाची गोष्ट आहे असें यावरून ठरतें तर ती पिढ्यानुपिढ्या ठेवणाराला आपल्या आचाराबद्दल थोडा अभिमान वाटला तर त्यांत काय चूक आहे? आणि त्याला आपल्याकडे ओढण्यांत मांसप्रवृत्तिवाल्यांना तरी कां भूषण वाटावें? पण सध्यां भलत्याच गोष्टीला फाजील महत्त्व देण्याचा मोह कांहीं आगाऊ भ्रष्ट झालेल्या लोकांना, व कांहीं ऐक्यविषयक चुकीच्या

कल्पना वाळगणारांना वाटत आहे. आपल्या समाजाच्या सार्वजनिक जीविताला जें एक निराळें वळण लागत आहे त्यांत इतकी कसोशी करून चालावयाचें नाहीं हें कळण्याइतपत बुद्धि व तारतम्य सर्वांनाच असतें. परिपदा इत्यादि प्रसंगीं इतर लोक निराळ्या आचाराचे जरी असले तरी ते व आपण एकच आहों हा विचार ध्यानांत घेऊन व त्या त्या प्रसंगीं आपल्याच शुद्ध आहाराला मान दिला जातो हा आपला गौरवच आहे असें समजून संभावित व सहिष्णु अशीं मांसनिवृत्त माणसें फारशी खळवळ करीत नाहींत व त्यांनीं अशी खळबळ न करणें हें युक्तच आहे. उभयपक्षाची अशी सुशीलपणाची समजूत असली म्हणजे अपवादादाखल व्हावयाच्या या गोष्टींना कोणी इतकेसें महत्त्व देत नाहींत. पण **सध्यां जी मोहीम चालू आहे** ती ही कीं, मांसनिवृत्तींत श्रेष्ठपण नाहीं हें सिद्ध करावें. मांसनिवृत्तीच्या श्रेष्ठ संस्कृतीवर ही मुद्दाम चढाई करण्यांत येत आहे. ही त्यांतील खरी गोम आहे व म्हणून स्वारी करणारांचा हा क्षुद्र हेतु लक्षांत घेऊन मांसनिवृत्तांनीं पाय रोवून उभे राहून याचा प्रतिकार केला पाहिजे. यांतूनच झांकून ठेवलेलें दुष्ट मत पुढें यावयाचें आहे व तें म्हणजे प्रत्यक्ष मांसाशनालाच कांहीं हरकत नाहीं. पण हा एक स्वतंत्र वाद आहे व तो करण्याचें हें स्थळ नव्हे. सहभोजनाच्या कल्पनेंतील भोळे व कुत्सित हेतू सांगण्यासाठींच हें वरील लिहिणें लिहिलें आहे. प्रवृत्तीपेक्षां निवृत्ति श्रेष्ठ आहे हें वर जें भूतदयेचें विवेचन आलें आहे त्यावरून स्पष्टच आहे. मन्वादिकांचे आश्रय घेणें हें या मतांच्या प्रतिपादकांनाच बाधक ठरेल अशी वास्तविक स्थिति आहे. ऋषि असें करीत होते असें सांगूनही भागण्यासारखें नाहीं. कारण या ऋषीचे ऋषि तर नरमेधसुद्धां करीत होते. असो. जे लोक किंवा ज्या जाती राष्ट्राच्या हितासाठीं, आपल्या बांधवांचें कल्याण व्हावें यासाठीं जिवापाड कष्ट करतात, स्वार्थत्याग करतात, बलाबलाची क्षिति न वाळगतां राष्ट्रांवर जुलूम करणारांवर चाल करून जातात आणि प्रसंगीं फांसावरहि लटकतात त्यांना देशाच्या कल्याणासाठीं काय करावें लागतें याचा बोध नीट झाला आहे असें समजावयास हरकत नाहीं. पण अशा लोकांचा जो एक शुद्ध आचार त्याचाहि शुद्धपणा अप्रत्यक्ष रीत्या खोटा ठरविण्याचा उद्योग जे कोणी करितात त्यांची मात्र कींव येते; व त्यांना जरूर तें रसिकपण लवकर प्राप्त व्हावें असें वाटूं लागतें.

पण आणखी एक विचार सांगितल्यावांचून हें प्रकरण संपवितां येत नाहीं ज्या जाती ब्राह्मण नाहींत पण ज्यांनीं हा थोर सदाचार ब्राह्मणाप्रमाणेंच पिढ्यान् पिढ्या चालविला आहे त्या कोणत्याहि वर्णाच्या असल्या तरी त्यांच्यांशीं सहभोजन करावयास हरकत नाहीं, हा विचार मात्र ब्राह्मण समाजानें पचनीं पाडला पाहिजे. "मी आपला निराळा" या नुसत्या वाक्याला कांहींच अर्थ नाहीं. आपला आचार हा कांहीं तत्त्वावर आधारलेला असावयास हवा तरच त्याला शाश्वत असें बलिष्ठ अधिष्ठान सांपडेल. नाहींतर तो म्हणजे एक कोंझा प्रघात इतकेंच नांव त्याला देतां येईल. या प्रकरणाच्या आरंभीं मनबुद्धींच्या निर्णयाविषयीं जें कांहीं लिहिलें आहे तें लक्षांत घेतलें म्हणजे माझ्या या सूचनेंत विपरीत वाटण्यासारखें कांहींच नाहीं. वैश्यवर्ण हा केवढा संभावित, व आहाराच्या दृष्टीनें केवढा सदाचारी आहे हें ब्राह्मणांपैकीं बहुतेकांना माहीत नसतें; त्यामुळें व तसेंच अगदीं आरंभीं सांगितलेली जी वेदकालीन चाल तिचाहि अंमल सरसहा चालू असतो, त्यामुळें आपण कधीं एकत्र येत नाहीं इतकेंच.पण वर सांगितलेलें आचारसमत्व जर इतर जातींत आचार म्हणून रूढ दिसलें तर त्यांच्याशीं सहभोजन करावयास कसलाहि संकोच वाळगण्याचें कारण नाहीं.

मिश्रविवाह--

वास्तविक पाहतां हा मिश्र विवाहाचा प्रश्न अस्पृश्यता–निवारणांत येत नाहीं. कसलीहि चिकित्सकबुद्धि न ठेवतां सर्व सुधारणाकल्प विचार एकत्र आणून बोलण्याची जी एक पद्धति असे, तिच्यांतूनच हें प्रकरण उद्भवलें आहे. अस्पृश्यतेनें अस्पृश्यांचें नेमकें कोणतें नुकसान केलें आहे याचा विवेक होणें हें फार जरूर आहे. व त्यास अनुसरून 'विचाराचें बदललेलें वळण' या प्रकरणांतील सर्व विवेचन केलेलें आहे. अस्पृश्यांशीं तदितरांनीं लग्नें केलीं नाहींत म्हणून त्यांचें कांहीं नुकसान झालें आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. खरें नुकसान कोणतें झालें व होत आहे याचें सांगोपांग विवेचन येथवर केलेलें आहे. पण वर जी सर्व प्रश्नांची गल्लत करून बोलण्याची पद्धत म्हणून म्हटली तिच्यांतून हा विषय थोड्या थोड्या वर्षांच्या अंतरानें पुन्हां पुन्हां उद्भवत असतो. वास्तविक पाहतां ज्या संधिसमानतेच्या मुद्यावर सुधारकांनीं अव्वल पासून

जोर द्यावयास हवा होता त्यावर न देतां या जेवणाखाणाच्या व लग्नाच्या मुद्यावरच दिल्यामुळें चळवळीला जेवढी गति मिळावयास हवी तेवढी मिळाली नाहीं. पण ही गति कुंठित होण्याला किंवा निदान मंद करण्याला, हीच अप्रस्तुतावर जोर देण्याची अविवेकाची पद्धति, आणखी एका रीतीनें कारण झाली आहे. सुधारकच असें बोलूं लागल्यामुळें ज्या अस्पृश्य लोकांची तरफदारी करून ते बोलत त्यांसहि असें वाटूं लागलें कीं, आपल्याशीं इतर लोक जेवत-खात नाहींत व लग्नसंबंध ठेवीत नाहींत हेंच आपलें खरें दुखणें आहे. त्यांचा त्यांस स्वतंत्र असा विचार करतांच येत नाहीं व अजुनहि त्यांच्यापैकीं बहुतेकांना करितां येत नाहीं यामुळें नसत्या मुद्यालाच ते पुष्कळदां चमत्कारिक महत्त्व देतात.

अस्पृश्यांच्या देहालाच विटाळ आहे, त्यांच्या स्पर्शानें जलाशयसुद्धां विटाळतात आणि त्यांनीं दर्शन घेतलें असतां मंत्रप्रतिष्ठापित मूर्ती भ्रष्ट होतात असेंच ज्या समाजाला अजून वाटत आहे त्याच्या पुढें अस्पृश्यांशीं तुम्ही लग्न करा असा उपदेश करणें हें, अगदीं सौम्य पद्धतीनें सांगावयाचें म्हटलें तरी, वेडेपणाचें आहे असें म्हटलें पाहिजे. आपल्या सुधारणा–विचारांत कांहीं पद्धति, अनुक्रम, विकासाचीं पुढलीं पुढलीं स्तबकें इत्यादि प्रकार ठेवावयास हवेत, हा कोणच्याहि सुधारणा–पर्वातील केवळ प्रास्ताविक विचार सुद्धां मनांत आणावयाचाच नाहीं असें म्हटलें तर नाइलाज आहे. असलें जें भरमसाट बोललें जातें तें अंमलांत येत नाहींच पण जें अंमलांत आणणें त्यांतल्यात्यांत सोपें व शक्य असतें तें हस्तगत होण्याच्या मार्गांत मात्र असले विचार दुर्दैवासारखे आडवे पडतात. आपण सर्व कांहीं बोलून टाकीत आहों या जाणिवेंत मोह मोठा आहे व तिच्या अंगीं निशा आणण्याचीहि थोडी शक्ति आहे. पण मोह किंवा निशा यास वश होऊन बोललेले अप्रस्तुत विचार चळवळीच्या बुंध्यावरच घाव घालतात, हें कांहीं खोटें नाहीं. असल्या बोलण्यानें अस्पृश्यांच्या मनांतहि भरमसाट आकांक्षा उत्पन्न होतात. त्या सफल झाल्या नाहींत म्हणजे त्यांनीं निराश व्हावें व चिडून जाऊन स्पृश्यांशीं अदावत धरावी असली चमत्कारिक आपत्ति स्पृश्य व अस्पृश्य अशा दोनहि समाजांवर आपण आणणार आहों हें या लोकांना कळावयास हवें. दुसरीहि एक आपत्ति ते लोकांवर आणतात. ज्याला समाजविचार उलगडूनच बघावयाचा नसेल व जसला कसला माल उत्साह–

चक्रांतून वाहेर पडेल तो लोकांपुढें मांडावयाचा अशी ज्यांची चाल असेल त्यांचें निराळें. पण ज्यांना अमुक एक गोष्ट करा असें सांगतांना ती कां हवी याचें वारीक विवेचन करावें लागतें व अमुक गोष्ट नको असें म्हणतांना ती कां नको याचें विवेचनहि तितकेंच वारीक करण्याचा प्रसंग त्यांजवर येतो त्याचें निराळें. हें विवेचन करतांना ज्या लोकांच्या मनाला आपण अगोदर इतके चटके दिलेले आहेत त्यांना,बोलून दाखविल्यामुळें अप्रिय वाटतील,अशा गोष्टींचे उल्लेख लोकांपुढें करणें भाग पडतें. अस्पृश्य लोकांना आपण सध्यां काय उपदेश करतों इकडे सर्वांनीं लक्ष द्यावें. त्यांचीं सामाजिक वैगुण्यें अमुक एका प्रकारचीं आहेत व म्हणून आपण त्यांच्या उन्नतीसाठीं झटलें पाहिजे असें आपण म्हणतों ना? आज तीन हजार वर्षें अज्ञान, दारिद्र्य, लाचारी यांच्या कर्दमांत ते उभे आहेत, असेंच आपण व ते समजतोंना? हें सर्व माहीत असतां त्यांना व आपल्याला मनस्ताप उत्पन्न करणारे प्रश्न उपस्थित करण्यापासून कसलाहि फायदा नाहीं. अस्पृश्य लोक आपल्या सभांतून स्वजातीच्या सुधारणेसंबंधानें जे कांहीं विचार बोलतात त्यांची सूक्ष्म माहिती जर या अत्युत्साही प्रतिपादकांनीं करून घेंतली तर सर्वांचाच फायदा होईल. परंतु या विषयाचा जास्त उहापोह करावा असें मला वाटत नाहीं. कारण या मुद्याच्या प्रतिपादनांत शेवटपर्यंत पुढें जाणें सर्वथा शक्य असलें तरी तसें करणें अस्पृश्यांस अवमानाचें वाटण्याचा संभव आहे. या उत्साही लोकांचें बोलणें ज्याप्रमाणें चळवळीला अपायकारक त्याप्रमाणेंच करावयाची म्हटली तर शक्य असलेली ही मीमांसा सुद्धां अपायकारकच आहे. तो मुद्दा सोडून देऊन इतकेंच सांगणें श्रेयस्कर दिसतें कीं 'अस्पृश्यतेची उपपत्ति' या प्रकरणांत जें विवेचन आलें आहे तें लक्षांत घ्यावें. व 'नवें तत्त्वज्ञान' या प्रकरणांतील संधिसमानत्वावर जोर देऊन सर्व जातींना आपली संस्कृति, दर्जा, हीं वाढविण्यास आणि त्यांच्या मनबुद्धींच्या विकसनास व वापरास संधि देऊन आपआपला जातिमगदूर सिद्ध करण्याची संधि त्यांस द्यावी. हें उत्तरोत्तर होत गेलें म्हणजे प्रस्तुत चर्चेस घेतलेल्यासारखे प्रश्न सोडविण्याच्या मन:स्थितींत सर्व जाती येतील. तोंपर्यंत हें सर्व बोलणें केवळ वायफळ आहे.

ज्या जातींतील कांहीं व्यक्ती उत्साहभरानें या गोष्टीला आतांच प्रवृत्त होतील त्या स्वत:चें भवितव्य स्वत: ठरवून घेतीलच. त्यांत इतरांनीं

वोलण्याची जरूरी नाहीं. पण एक गोष्ट मात्र सांगितलीच पाहिजे. ज्या कुलांतील किंवा जातींतील या व्यक्ती असतील त्या कुलाच्या व जातीच्या स्वाभाविक सुधारणेच्या मार्गांत मात्र हे लोक प्रचंड धोंड उभी करतील. तें कुळ व ती जात इतरांच्या दृष्टीनें हीन ठरतील, पोटजाती मोडाव्या ही जी एक अत्यंत सुबुद्धपणाची अशी पद्धति समाजानें पतकरली आहे तिचा फायदा त्या कुलास व जातीस मिळण्याचें बंद होईल, व अशा रीतीनें सुधारणेच्या सुयुक्त मार्गावर वाट चालूं लागलेल्या या जातींचा मार्ग अगदीं खुंटून जाईल. हिंदु समाजाची सुधारणा हा इतर कांहीं देशांतील समाजांच्या सुधारणेप्रमाणें अगदीं एकेरी असा प्रश्न नाहीं व अगदीं साध्या अशा धोपट मार्गानेंहि तो सोडवितां येण्यासारखा नाहीं. आपादपर्यंत हिंदु समाजाची जातवार माहिती करून घेऊन व त्यांचे वंश, कुल, शाखा, गोत्र, कुळ्या, इतिहास, स्वभावविशेष, धंदे, पंथ, धर्म, व्यवहार, ऐपत, पीठिका, आहारविहार, लग्नपद्धति अशा सारख्या अनेक बाबींची समजूत पाडून घेऊन कांहीं सुधारणेचे न्याय वसवावयास हवे; व त्या न्यायांस अनुसरूनच जातिभेदाचा प्रश्न सोडविला पाहिजे. जे कोणी हे न्याय डावलतील ते आणखी एक जात उत्पन्न करावयाचें अपश्रेय मात्र संपादन करतील. हिंदु समाजांतील सर्व जातींच्या मनाची ठेवण लक्षांत घेतां व आजवर संकराचे जे जे प्रकार झाले त्यांची वजावाट समाजांत कशी लागते यांचें यथायोग्य ज्ञान करून घेतलें म्हणजे जे कोणी हे न्याय बाजूला सारतात ते आपल्या प्रजांचीं जीवितें कष्टाचीं करून ठेवतात असेंच आजवर दिसून आलें आहे. शिवाय हें वर्णांवर्णांतच जे संकर झाले त्यांचें सांगितलें. मग याच्याहि बाहेर जे कोणी जातील त्यांना जातिभेद मोडल्याचें व्यक्तीपुरतें काय श्रेय मिळावयाचें असेल तें कदाचित् मिळेल. पण आपलें मूळचें कुल, आपली जात, व आपली प्रजा यांच्या दुर्दैवासच ते कारणीभूत होतील असें दोन्हीटोंक हिंदुसमाजाच्या मनोरचनेच्या निरीक्षणावरून दिसतें. सध्या या मिश्र विवाहाच्या बाबतींत, हिंदू समाजाला अंतीं खरा उपकारक ठरणारा विचार म्हणजे, प्रत्येक वर्णानें आपल्या पोटजाती मोडाव्या व हें काम सुकर व्हावें म्हणून आपआपल्या सामाजिक जीवनांत जेथें जेथें तुल्यबलता दिसेल तेथून सुरुवात करावी हाच आहे. असो. मिश्रविवाह हा प्रश्न उगाच कोणी कोठें थोडासा सुचवीत असल्यामुळें त्याची ही

झालेली चर्चा समाजविचार करणारांस थोडीवहुत तरी उपयोगाची होईल असा भरंवसा वाटतो.

संत-वाङ्मयाचा आधार किती ?—

पुष्कळदां साधुसंतांच्या वाङमयाचा आश्रय भलत्याच मुद्यावर करण्याचा मोह होतो. तो होऊ देऊं नये. अस्पृश्यता-निवारण किंवा जातिभेद मोडणें हें आपल्याला हवें असलें तर स्वतंत्रपणें तसें म्हणावे. संतांना त्यांत ओढू नये. कारण तें काम अंगलगट येईल. संत-मालिकेंतील सर्वश्रेष्ठ संत तुकाराममहाराज, त्यांच्या गाथ्यांतील जाति व वर्ण यांविषयींचे सर्व उल्लेख पुढें दिले आहेत. निर्णयसागर-प्रतीचे अनुक्रमांक आहेत. नजरचुकीनें एकादा उल्लेख राहिला असल्यास न कळे. पण या विषयासंबंधीं त्यांचीं मतें काय होतीं हें ठरवावयास ही उल्लेखयादी निर्णायक म्हणून उपयोगी पडेल. अर्थात् तें करतांना उल्लेखाचा मूळ अभंग पाहून अनुसंधान ठरविलें पाहिजे. अशा प्रकारच्या वाचनानें असें निस्संदेह ध्यानांत येईल कीं:— (१) आपण शूद्र म्हणून आपणास परमार्थविचारांत अधिकार नाहीं यावद्दल बोवांस खंती वाटे, व म्हणून त्या विचारावर त्यांनीं खूप टीका केली आहे. (२) परमार्थविचारांत जाति व वर्ण यांचा श्रेष्ठ व कनिष्ठ भाव लागू नाहीं, ब्राह्मण असो कीं अंत्यज असो, परमार्थविचारांत सर्व सारखे आहेत. (३) आपापलें विहितकर्म त्यांनीं त्यांनीं करावें व जातिकुलशुद्धि ठेवावी, असें बोवांचें मत होतें. (४) आपण सध्यां ज्या सामाजिक दृष्टीनें जातिसंस्थेकडे पाहतों त्या दृष्टीनें तुकारामबोवांनीं गाथ्यांत पाहिलेलें नाहीं. सामाजिक दृष्टचा ज्यांस जातिसंस्था नकोशी वाटते ते तुकारामाच्या अभंगांतून अनुकूल आधार काढूं पहातात. तें त्यांचें करणें चूक आहे. (५) अस्पृश्यता-निवारण हें गाथ्यांत नाहीं व (६) सहभोजनाला तुकारामबोवा अनुकूल नव्हते. सामान्यतः सर्व संतवाङमयासंबंधानेंहि हेंच ध्यानांत धरण्यास हरकत नाहीं.

५६७ न चळे हा मंत्र न चळे यातिकुळ,
न लागे काळवेळ विचारावी ॥

६९९ शुद्ध हीन कांहीं न पहासी कुळ,
करिसी निर्मळ वास देहीं ॥
८९९ शुद्धयातिकुळ वर्णा चाड नाहीं ।
करी भलते ठायीं दास तुझा ॥
९०३ देई चरणसेवा भूताचें भजन ।
वर्णा अभिमान सांडवूनी ॥
१०७१ यातीहीन जयें ऐको नये वेद ।
तया दिलें पद वैकुंठाचें ॥
११०७ नाहीं पाहिला आचार कुळगोत्रांचा विचार ।
फेडूं आला भार, मग न म्हणे दगड ॥
१४७६ कोठें अधिकार नाहीं, रानट विचार ॥
१५०१ तूं श्रियेचा पति, माझी वहूत हीनयाती ॥
१५४२ याती हीन, मती हीन, कर्म हीन माझें, ।
सर्व लज्जा सांडोनिया शरण आलों तुज ॥
१६५४ बरा देवा कुणबी केलों ।
नाह्मींतरी दंभेंचि असतों मेलों ॥
१६७४ यातीहीन मज काय तो अभिमान, ।
मानी तुला जन नारायणा ॥
१६८७ शूद्रवंशीं जन्मलों, म्हणूनि दंभें मोकलिलों ॥
घोकाया अक्षर, मज नाहीं अधिकार ॥
सर्वभावें दीन, तुका म्हणे यातीहीन ॥
१७०४ हीन माझी याती ...
१८८७ यातीमती-हीन, रूपें हीन दीन ।
आणिक अवगुण जाणूनीया ॥
१९०३ काय माझी याती नेणा हा विचार ॥
२०२५ तुका म्हणे याती हो कां तयाची भलती ॥
२०३२ गुण दोष याती न विचारीतां कांहीं, ।
ठाव दिला पायीं आपुलिया ॥

२०६० वर्णाश्रम करिसी चोख ।
तरि तूं पावसि उत्तम लोक ॥ इ०
२०७० उत्तम त्या जाती देवा, शरण अनन्य गती ॥
२०७२ जपतो हरिनाम बीज, तोचि वर्णामाजि द्विज ॥
तुका म्हणे वर्णधर्म, अवघें आहे सम ब्रह्म ॥
२०८९ वर्णअभिमानें कोण झाले पावन ,
ऐसें द्या सांगून मजपासी ॥
२१५९ जो हे दूषि हरीची कथा, त्यासी क्षयरोग व्यथा ।
याति वर्ण श्रेष्ठ परि, तो चांडाळ पापिष्ट ॥
२२११ नाहीं वर्णधर्मयाती, नामीं अवघींच सरती ॥
२२४४ सकळासी आहे येथें अधिकार ।
कलियुगीं उद्धार हरिनामें ॥
२२६५ वेदाचें गव्हर न कळे पाठका ।
अधिकार लोकां नाहीं येरां ॥
२२७६ नेणतां सायास शुद्ध आचरण ।
यातिकुळहीन नामासाठीं ॥
२२९५ न पाहे सिदोरी । यातिकुळ न विचारी ॥
२२९६ हो कां भलतें कुळ शुचि अथवा चांडाळ ।
म्हणवी हरिचा दास—॥
२२९९ तुका म्हणे नाहीं जातीसवें काम ।
ज्याचे मुखीं नाम धन्य तोची ॥
२३५५ तुका म्हणे नाहीं वर्णअभिमान ॥
अवघे जीवन्मुक्त लोक ॥
२४६५ ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य-शूद्र-चांडाळाही अधिकार—
२५४१ समर्थासी नाहीं वर्णावर्णभेद ।
२५४२ न सरे तेथें यातिकूळ—
तुका म्हणे अभिमान नारायणा न सोसे ।
२५५१ कर्म आचरण यातीचा स्वगुण ।
विशेष तो गुण काय येथें ॥

२५६१ ऐका कलिचें हें फळ पुढें होईल ब्रह्मगोळ ।
चारी वर्ण अठरा जाती, भोजन करिती एके पंक्ती ॥
२५६८ श्रेष्ठ वर्ण ब्राह्मणाचा संग न सुटे शूद्रीचा ।
बदशाहीच्या पाडी दाढा, लागे तुकयाचा हुंदाडा ॥
२६४७ ब्राह्मण तो नव्हे ऐसी त्याची बुद्धि ।
जयासी नावडे हरिनाम कीर्तन ॥
२६६० वर्णाश्रमाचे धर्म, जाति श्रम जालीया ॥
२६८९ (कलियुग महिमान) वहुत पाप जाले उचंबळ, ।
उत्तम न म्हणती चांडाळ, अभक्ष भक्षिती, विटाळ
कोणी न धरी कोणाचा ॥
२६९१ वर्णधर्म कोणी न धरी विटाळ, ।
घालिती गोंधळ एके ठायीं ॥
२७०० द्विजा नमस्कारा (री?) मनीं भाव कैसा;
तुर्काचे दासीचा लेक होय ॥
२७३१ सांडिले आचार, द्विज चव्हाड झाले चोर,–
वैश्यशूद्रादिक, हे तो सहज नीच लोक. ॥
२७७२ देवब्राह्मणासी न जाई शरण,
दासीचे चरण वंदी भावें,
२७८० यातिकूळ येथें असें अप्रमाण ।
गुणाचें कारण अंगीं असे ॥
२८०८ अंत्यजाची खिचडी घेताती मागुनी,
गालियाप्रदान मायबहिणी ॥
उत्तम कुळीं जन्म क्रिया अमंगळ,
बुडविलें कुळ उभयतां ॥
२८०९ खिस्तीचा उदीम ब्राह्मण कलियुगीं;
महारवाडा मांगीं हिंडतसे ॥
२८५५ अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड,
वैष्णव चांभार धन्य त्याची माता ॥
२८५४ महारासी शिवे, कोपे, ब्राह्मण तो नव्हे ॥

२९१७ याती शुद्ध परी अधम लक्षण ।
वायां गेलें तेणें सोंगेही ते ॥
३१०१ ब्राह्मण तों याती अंत्यज असतां,
मानावा तत्त्वता निश्चयेसी ॥
रामकृष्णनामें उच्चारी सरळें ...
३१६७ यातिहीन झाला गांवींचा मोकाशी ।
त्याच्या वचनासी मानूं नयें ॥
३१६६ न पालटे जाती जिवाचिये साठीं,
वाहे तेचि पोटीं दावी वरा ॥
३२२१ जरी तो ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट
तुका म्हणे श्रेष्ठ तिही लोकीं ॥
३२४९ कैसा होतो कृपावंत बहुसंत सांगती,
पुराणें नाहीं यातिकुळ लागों वेळ नेदावा ॥
३४२६ तुका म्हणे मी न वजे यातीवरी,
पूज्यमान करी वैष्णवांसी ॥
३४२७ नये माझा तुम्हां होऊं शब्दस्पर्श ।
विप्रवृंदा तुम्हां ब्राह्मणांसी ॥
म्हणोनिया तुम्हां करितों विनंति–
वेदी कर्म जैसें वोलिलें विहित ।
करावी ते नीत विचारूनी ॥
३४८७ लक्षूनीया योगी पहाती अभास ।
अंत नाहीं पार वर्णा नाहीं थार ।
कुळयाति शिर हस्तपाद–
अचेत चेतलें भक्तीचिया सुखें ॥
३५४९ आतां मी सर्वथा नव्हें गा दुर्बळ।
यातिहीन कुळ (कुळहीन ?) दैन्यवाणा ॥
३५५६ माझें माझ्या हातां आलें-तु. म्ह.
शुद्ध कुळ, येथें मळ कशाचा ॥
३५६३ अधिकार याती वर्णधर्म जाती ।

ठाव नाहीं सत्यअसत्यांशी ॥

३६८९ जीवशिवाचें भातुकें, केलें क्रीडाया कौतुकें ।
कैचीं येथें लोकें, हा आभास अनित्य ॥
विष्णुमय खरें जग, येथें लागतसे लाग,
वांटिले विभाग, वर्णधर्म हा खेळ ॥
अवघी एकाचीच वीण, तेथें कैचें भिन्न भिन्न ।
वेदपुरुष नारायण, तेणें केला निवाडा ॥

३८१८ अधिक यातिकुल हीन नहिं जावूं,
जाने नारायण सो जानी ॥

३८२४ जातनसुं मुझे कछु नहि प्यार,
असतेके हिंदु धेड चांभार ! ज्याका चित्त लगा
मेरे रामके नाम ॥

४३५६ ब्राह्मणा न कळे आपलें तें वर्म,
गवसें परब्रह्म नामें एका ॥

४३५७ जयजय म्हणा राममंत्र जपा हाचि सार ।
वर्णायाति जयजयकार ॥

४३६४ सर्व ते हें जाय गंगाचि होऊन ।
तैसा वर्णावर्ण नाहीं नामीं ॥

४३६८ तुका म्हणे काय शुद्ध माझी याती ।
थोर केली ख्याति हरीनामें ॥

४३७९ जातीचें मी हीन न कळे भजन ।
म्हणोनि संतचरण इच्छीतसे ॥

४३८५ अठरापगड याती सकळही वैष्णव ।
दुजा नाहीं भाव पंढरीसी ॥

४४२९ तुम्हां सांगतों कलियुगफळ ।
श्रेष्ठ वर्ण वेदविद्वांस, अंगिकारिती मद्यमांस ।
चारी वर्ण अठरा जाती ,
कवळ करिती एक पंक्ती ।

४४५० जातीचा ब्राह्मण न करितां संध्यास्नान ।
तो एक कशाचा ब्राह्मण, होय हीनाहुनी हीन ।
४४५७ याति गुणें रूपें काय ते वानर ।
तयाच्या विचारें वर्ते राम ॥
४४५९ वर्णकुळ याती याचा अभिमान ।
त्यजावा सन्मान लौकिकाचा ॥
४४७५ भरणी आली मुक्त पेठा ।
उधार घ्यारे उधार घ्यारे, अवघे या रे जातीचे ॥
येथें पंक्तीभेद नाहीं । मोठें कांहीं लहान ॥
४४८७ ब्राह्मणें ब्राह्मणा सद्गुरु करावा ।
परी न करावा शूद्रादिक ॥
४४८८ तुका म्हणे जाती, जातीसाठीं खाती माती ।

वरील सूचना प्रतिपादकानें लक्षांत घेतल्यास त्याचें काम कमी अवघड होईल असें वाटतें.

अस्पृष्ट समाजाची आंकडेवारी

अस्पृष्टांपैकीं जे कोणी स्वकीयांसाटीं कांहीं करावें असें योजितील किंवा स्पृश्यांपैकीं जे कोणी त्यांस साह्य करू म्हणतील त्यांना पुढें दिलेलीं कोष्टकें फार उपयोगाचीं वाटतील. प्रांत, जिल्हा, तालुका येथपर्यंतच्या अस्पृष्टांच्या संख्या, पोटजातींच्या संख्येसह, त्यांत सांपडतील. तसेंच शिक्षण कोठें कितपत पसरलें आहे, निरक्षरपणा कोठें किती आहे, हेंही त्यांवरून दिसेल. मुंबईकडे अस्पृष्टांची ओढ कशी आहे याचीही माहिती मिळेल. इतर कांहीं जातीशीं तुलना करावयास सांपडली तर सापेक्षतेनें आपण कोठें आहों हें अस्पृष्टांस कळेल; म्हणून तौलनिक कोष्टकें दिलीं आहेत. वैवाहिक जीवनाची कल्पनाही कांहीं कोष्टकांवरून येईल. मध्यप्रांत, वऱ्हाड व निजामचें राज्य या प्रांतांतील अस्पृष्टविषयक कोष्टकें शक्य तीं दिलीं आहेत. १९३१ च्या खानेसुमारीवरून जेथें कोष्टकें मिळालीं नाहींत तेथें १९२१ चीं दिलीं आहेत. शेवटीं मॅक्डोनल्डचे अॅवॉर्ड व पुणें करार हींही दिलीं आहेत.

मुंबई इलाखा१९३१च्या खानेसुमारीप्रमाणें अस्पृष्टांची संख्या

अनुक्रम	प्रांत किंवा संस्थानें	अस्पृष्टांची संख्या	
		पुरुष	स्त्रिया
१	मुंबई,संस्थानें व एजन्सीज धरून मुं. इलाखा.	१०५९२३४	१०३९७६४
२	इंग्रजी प्रांत	८८६१३१	८६४२९३
३	मुंबई शहर	६१५६४	४३४१३
४	उत्तर वि.नॉर्दर्नडिव्हि.	१२६७२०	१२३९९८
५	अहमदाबाद	४६९१२	४३४४७
६	भडोच	१४१९२	१३५९७
७	खेडा	१८७५८	१८८६६

अनुक्रम	प्रांत किंवा संस्थानें	अस्पृष्टांची संख्या	
		पुरुष	स्त्रिया
८	पंचमहाल	९६४३	८६०८
९	सुरत	१६४२७	१९६९७
१०	ठाणें	२०७८८	१९७८३
११	मध्य वि.सेंट्रल डिव्हि.	४३५१०७	४३८४२३
१२	अहमदनगर	५४७६३	५५७२३
१३	पूर्वखानदेश	६४७७४	६६१९६
१४	पश्चिम खानदेश	२४५२५	२५१५४
१५	नाशिक	५९४८४	६०६९४
१६	पुणें	६९५११	७०६५६
१७	सातारा	७८९५५	७९७०३
१८	सोलापूर	७५५९४	७३९१५
१९	बॉंबे सबर्बन डिस्ट्रि.	७५०१	६३८२
२०	सदर्न डिव्हि.मध्य.	२०७६५२	२१३९९६
२१	बेळगांव	४९७५४	५०२६१
२२	विजापूर	४०५६१	४२४०७
२३	धारवाड	३०५०९	३१२०२
२४	कानडा	९२८१	७९८५
२५	कुलाबा	२२४०१	२३३५०
२६	रत्नागिरी	५५१४६	५८७९१
२७	सिंध	५५०८८	४४४६३
२८	हैदराबाद	११७२५	१२१६५
२९	कराची	१६०५६	८०७५
३०	लारखाना	४८६	३४४
३१	नबाबशहा	४४३१	४१०९
३२	सक्कर	२६२८	२२२६
३३	थार व पार्कर	१९०९२	१७१५१
३४	सिंध, उत्तर सरहद्द	६७०	३९३
३५	मुंबई संस्थानें व एज.	१७३१०३	१७५४७१

अनुक्रम	प्रांत किंवा संस्थानें	अस्पृष्टांची संख्या	
		पुरुष	स्त्रिया
३६	कँबे	४०४२	३७६७
३७	महीकांठा एजन्सी	२०१९८	१९६५६
३८	इदर	१०४०८	१००८९
३९	एजन्सीचा राहि. वि.	९७९०	९५६७
४०	रेवाकांठा एजन्सी	१६६३६	१५५६७
४१	राजपिपळा	३३४५	३३२१
४२	छोटा उदेपूर	२२३७	१९५२
४३	देवगड–बारिआ	१८२४	१७०८
४४	लुना-वाडा	२२१५	२२५३
४५	बाळसिनेर	२११०	२०२४
४६	संथ	९४५	८५८
४७	सांखेड मेवास	१६०४	१४४१
४८	एजन्सीचा राहि. भाग	२३५६	२०१०
४९	जव्हार	८०८	४०७
५०	जंजिरा	४४०१	५०००
५१	भोर	७४१०	७५१०
५२	औंध	५८९३	५७५०
५३	फलटण	४३०८	४४४४
५४	अक्कलकोट	८४४८	८०१४
५५	सावंतवाडी	७२५१	७३५८
५६	कोल्हापूर	५००६३	५३२९५
५७	कुरुंदवाड (थोरलें)	१८२७	१९४७
५८	कुरुंदवाड (धाकटें)	१८८५	१९०४
५९	मिरज (थोरलें)	५२८४	६३७४
६०	मिरज (धाकटें)	२२७८	२५२९
६१	जमखिंडी	४९०७	५४१०
६२	मुधोळ	२९६६	२५५०
६३	रामदुर्ग	९०६	९८७

अनुक्रम	प्रांत किंवा संस्थानें	अस्पृष्टांची संख्या	
		पुरुष	स्त्रिया
६४	सांगली	१२९०६	१२७२०
६५	वाडी जहागीर	१५१	१६४
६६	जत	७५३६	७०९३
६७	बांसडा	७११	७१७
६८	धरमपूर	५१४	४९१
६९	साचीन	६५८	७९२
७०	डंग्ज	११४	५३
७१	खैरपूर	४२५	३९९
७२	सुरगाणा	९४	७२
७३	सावनूर	४८३	५०१

जिल्हानिहाय व तालुकानिहाय अस्पृश्यांची लोकसंख्या व साक्षर संख्या दाखविणारें पत्रक १९३१.

जिल्हा व तालुका	एकूण		शिक्षित	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
ठाणें	२०७८८	१९७८३	१०६१	६३
वसई	९६३	९५०	४९	३
भिवंडी	३१२८	३०५८	१५७	१२
डहाणू	१६५३	१८३२	८३	७
उंबरगांव (पेटा)	४२९	५२५	२४	२
कल्याण	३९१०	३४७६	२०४	१३
मुरबाड	२७७७	२६३०	१३९	७
पालघर	२००३	१८४८	१०३	५
शहापूर	३५२१	३२७५	१७७	८
ठाणा	७१५	६०९	३६	२
वाडा (पेटा)	७७७	७६४	४३	३
मोरवाडा (पेटा	९१२	८१६	४६	१
मध्यभाग	४३५१०७	४३८४२३	२०४७२	१५४८
अहमदनगर	५४७६३	५५७२३	१४५२	८६
अहमदनगर	७९५९	८४४८	३९८	३४
अकोला	३३५०	३३४२	४९	१
कर्जत	४६९१	४६६६	३१	२
जामखेड (पेटा)	४४०६	४३४१	१९	२
कोपरगांव	५८७१	५९४५	१०७	८
नेवासें	३६८०	३६७३	५७	६
पारनेर	४३४०	४७३७	१२९	५
राहुरी	२८५४	२८०४	१११	६
संगमनेर	३९१३	४००६	१८०	१६

जिल्हा व तालुका	एकण		शिक्षित	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
शेवगांव	४४९८	४५६६	१२७	१
पाथर्डी (पेटा)	३६७४	३७३०	११९	२
श्रीगोंदा	५५२७	५४६५	१२५	३
पूर्वखानदेश	६४७७४	६६१९६	३२३९	२६५
अमळनेर	५६६६	५५४२	२८३	२२
भुसावळ	७०४३	६९५१	३५२	२८
एदलाबाद (पेटा)	२९३९	३०४०	१४८	१२
चाळीसगांव	७४६९	७३७१	३७३	२८
चोपडा	४१२७	४४०१	२०६	१८
एरंडोल	५४५५	५३७१	२७३	२०
जळगांव	४७४४	४७०१	२३७	१९
जामनेर	६२१५	६५९४	३११	२६
पाचोरा	५३९७	५३२२	२७०	२३
भडगांव (पेटा)	३३४७	३४५८	१६७	१५
पारोळा	३१०२	३१२४	१५६	११
रावेर	५२४५	५८९५	२६२	२४
यावल	४०२६	४४२६	२०१	१९
पश्चिमखानदेश	२४५२५	२५१५४	१२२६	१६
धुळें	६३९७	६४७४	३१८	१६
नंदुरबार	२६२७	२७३२	१३१	५
नवापूर	१२७	११२	६	०
साक्री	२३५२	२३८५	११८	५
शहादे	३२६९	३४२४	१६३	९
शिरपूर	३२४५	३१६७	१६३	८
शिंदखेडा	५३४३	५४१५	२६७	१२
तळोदा	१२०५	१४४५	६०	६

जिल्हा व तालुका	एकूण		शिक्षित	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
नाशिक	५९४८४	६०६९४	२९७४	२४३
बागलाण	३२२३	३३५१	१६१	१३
चांदोर	४३३५	४४९३	२१७	१८
दिंडोरी	४३०९	४४६१	२१५	१८
इगतपुरी	५२२१	५२०६	२६१	२१
कळवण	१९२३	१९७९	९६	८
मालेगांव	६१६१	६१३०	३०८	२५
नांदगांव	४८५०	४८३७	२४३	१९
नाशिक	८६७३	९०२७	४३४	५१
निफाड	६०१०	६६५५	३०१	२७
पेठ	६५६७	६०३२	३२८	८
सिन्नर	४५८३	४७७७	२२९	१९
येवले	३६२९	३७४६	१८१	१५
पुणें	६९५११	७०६५६	३४७५	२८३
भिमथडी	८९९६	९०१८	४५०	३६
धोंड (पेटा)	४४९७	४४३४	२२५	१८
हवेली	७५४४	७९८८	३७७	३२
मुळशी (पेटा)	११६२	११३८	५८	५
इंदापूर	६२४५	६२६३	३१२	२५
जुन्नर	४०४२	४३४६	२०२	१७
खेड	५५६४	५७७६	२७८	२३
अंबरगांव (पेटा)	१६०२	१६३०	८०	७
मावळ	४४१३	४६०९	२२१	१८
पुणें	१६०६८	१५५००	८०३	६२
(१) पु. सि. म्यु.	५९७९	६१०१	२४७	२५
(२) पु. सबर्बन म्यु.	१८६८	१६२१	७७	७
(३) पु. कॅन्टोन्मेंट	३९५०	३८५३	१६२	१५

जिल्हा व तालुका	एकूण		शिक्षित	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
(४) सिव्हिल एरिआ	३५२०	३५७९	१४३	१५
(५) मिलिटरी एरिआ	४३०	२७४	१९	०
(६) खडकी कॅन्टोन्मेंट	२०१९	१८२७	८१	१८
(७) सिव्हिल एरिआ	१४३६	१३५३	५७	६
(८) मिलिटरी एरिआ	५८३	४७४	२४	२
(९) पुणें तालु.बाकी भाग	२२५२	२०९८	२३६	७
पुरंदर	५०४०	५५१५	२५२	२२
शिरूर	४३३८	४४२९	२१७	१८
सातारा	७८९५५	७९७०३	३९५१	२९०
जावळी	२८९७	३३८१	१४५	१४
मालकमपेठ (पेटा)	८५२	८१४	४३	३
कऱ्हाड	१०१९७	१०१४०	५१०	११
खानापूर	७२४८	७२५६	३६२	२९
खटाव	६५७३	६४५७	३२९	२६
कोरेगांव	६१९२	६४५७	३१०	२६
माण (पेटा)	५४५६	५३८८	२७३	२२
पाटण	७३८२	६७८६	३७०	२७
सातारा	७०१३	७३५७	३५१	२९
तासगांव	६५९६	६४६८	३३०	२६
वांई	५१३५	५९३३	२५७	२४
वाळवे	९४२४	९२५८	४७१	३७
शिराळे (पेटा)	३९९०	४००८	२००	१६
सोलापूर	७५५९४	७३९१५	३७८०	२९६
बार्शी	११७६९	११७५७	५८८	८७
करमाळे	९५८१	९३४१	४७९	३७
माढे	१००० ५	१०१२७	५००	४१
माळशिरस	५९१०	५६९६	२९६	२३

जिल्हा व तालुका	एकण		शिक्षित	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
पंढरपूर	७४२०	७२५७	३७१	२९
सांगोला	८६९१	८५२५	४३५	३४
सोलापूर	२२२१८	२१२१२	१११९	८५
(१) सो. म्यु. आणि सबर्बन	८१४८	८६६३	३२३	६३
(२) तालुक्याचा बाकी भाग	१४०७०	१२५४९	७८८	२२
मुंबई सबरबन जिल्हा	७५०१	६३८२	३७५	२४
अंबरनाथ	४८८	४०५	२४	०
दक्षिण साष्टी	७०१३	५९७७	३५१	२४
दक्षिणभाग	२०७६५२	२१३९९६	१०३८२	९२४
बेळगांव	४९७५४	५०२६१	२४८८	२०१
अथणी	९२२४	९६०९	४६१	३८
बेळगांव	३६८७	३६६७	१८४	१५
चांदगड (पेटा)	१५४७	१४६६	७७	६
चिकोडी	१४७६३	१४०३८	७३८	५६
गोकाक	५१४९	५४९५	२५८	२२
हुकेरी	७२७१	७४०१	३६४	३०
खानापूर	२३३५	२२८२	११७	९
पारसगड	२५८८	२९४७	१२९	१२
संपगांव	३१९०	३३५६	१६०	१३
विजापूर	४०५६१	४२४०७	२०२८	१४१
बदामी	३०७६	३१७७	१५४	१३
बागलकोट	२९१५	३१८७	१४६	१३
विळगी पेटा	१६४५	१९२८	८२	८
बागेवाडी	५२२७	५६२६	२६१	१२
विजापूर	६९२९	७२६८	३४६	३९
हुनगुंड	३७३२	४२८०	१८७	१८

जिल्हा व तालुका	एकूण		शिक्षित	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
इंदी	७४५४	७००५	३७३	१
मुद्देविहाल	४०४२	४३३९	२०२	१
शिदगी	५५४१	५५९७	२७७	१
धारवाड	३०५०९	३१२०२	१५२५	२२
बंकापूर	१८२७	१७९९	९१	
धारवाड	२१६०	२२९७	१०८	
गदग	३१६७	३३४८	१५८	१
मुंदर्गी	१०६८	१०६५	५३	
हनगळ	१९०६	१७९२	९५	
हुबळी	४३६२	४४६५	२१८	१
हुबळी म्यु०	२२७४	२२०७	११३	१
बाकीचा तालुका	२०८८	२२५८	१०५	
कलघटगी	९४१	९४३	४७	
करजगी	३१२९	३१६५	१५७	
कोड	२९२९	२७०७	१४६	१
नवलगुंद	१७५३	१९३९	८८	
नरगुंद (पेटा)	६५५	७६८	३३	
राणेबेन्नुर	३४११	३५६३	१७१	
रोण	३२०१	३३५१	१६०	
कानडा	९२८१	७९८५	४६४	७
अंकोला	११३७	११५१	५७	
हुल्ल्याळ	८४६	७४७	४२	
सुपा (पेटा)	४०२	३२३	२०	
होनावर	६२१	६५१	३१	
भटकल (पेटा)	९८	७३	५	
कारवार	३९४	३५१	२०	
कुमठा	१६४३	१७०५	८२	

जिल्हा व तालुका	एकूण		शिक्षित	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
सिद्दापूर	१८४८	१२१६	९२	५
शिरसी	१८५४	१४४९	९३	६
येल्लापूर	१६१	१०५	८	०
मुंदगोड (पेटा)	२७७	२१४	१४	१
कुलाबा	२२४०१	२३३५०	११२०	९३
अलिबाग	१०४१	१०९९	५२	४
कर्जत	२३८७	२१४५	११९	९
खालापूर (पे.)	११२५	११०२	५६	४
महाड	६८०४	७१३२	३४०	२९
माणगांव	५६८९	६४१५	२८४	२६
पनवेल	१८९४	१९५४	९५	८
उरण (पेटा)	१३०	१३३	७	०
पेण	१३५१	१२७७	६८	५
रोहा	१९८०	२०९३	९९	८
रत्नागिरी	५५१४६	५८७९१	२७५७	२३५
चिपळूण	७०५६	७५६२	३५३	३०
गुहागर (पेटा)	३४००	३६५३	१७०	१६
दापोली	४९६९	५२८२	२४८	२१
मांडणगड	२८९२	३२२८	१४५	३
देवगड	५९८०	६३९९	२९९	२६
खेड	६५२७	६६२२	३२६	६
मालवण	३४०५	३३८५	१७०	३४
राजापूर	५६८५	६२९६	२८४	२५
रत्नागिरी	५८११	६५५१	२९१	२६
संगमेश्वर	८५४२	८९४३	४२७	३६
वेंगुर्ला	८७९	८७०	४४	१३

जिल्हा व तालुका	एकूण		शिक्षित	
	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
संस्थानें				
जव्हार	८०८	४०७	४०	२
जंजिरा	४४०१	५०००	२२०	२०
भोर	७४१०	७५१०	३७१	३०
औंध	५८९३	५७५०	२९५	२३
फलटण	४३०८	४४४४	२१५	१८
अक्कलकोट	८४४८	८०१४	४२२	३२
सावंतवाडी	७२५१	७३५८	३६३	२९
कोल्हापूर	५००६३	५३२९५	२९८६	२१३
कुरुंदवाड (सि.)	१८२७	१९४७	९१	८
कुरुंदवाड (जू.)	१८८५	१९०४	९४	८
मिरज (सि.)	५२८४	६३७४	२६४	२५
मिरज (जू.)	२२७८	२५२९	११४	१०
जमखिंडी	४९०७	५४१०	२४५	२२
मुधोळ	२१६६	२५५०	१४८	१०
रामदुर्ग	९०६	९८७	४५	४
सांगली	१२९०६	१२७२०	६४५	५२
वाडी जहागीर	१५१	१३४	८	१
जत	७५३६	७०९३	३७७	८

मुंबई शहराच्या एकंदर लोकसंख्येंतील हिंदूंमधील कांही जातींच्या १९११-२१ व-३१ या दशकांतील

लोकसंख्येचे आंकडे दर्शविणारें पत्रक

क्रमांक	जात	लोकसंख्या		
		१९११	१९२१	१९३१
१	भंगी किंवा हलालखोर	५६४५	६०१५	७०९७
२	ब्राह्मण (सर्वजाती)	५३६५६	७२४००	७५९४६
३	चांभार किंवा मोची	२१३०५	२७५८९	२३४४९
४	कायस्थ प्रभू	५०९०	५९६४	६३८०
५	महार, धेड	५७८५५	९२४८१	६७३६०
६	मांग किंवा मादिग	४२४७	९५४९	५२२७
७	मराठा	२३१९२४	२६४३३८	२९१३३०
८	कुणबी	१४४५८	२६४१८	१३९२४

हिंदूंची एकूण संख्या ७,८९,८६१. त्यापैकीं १,७७,९३९ पुढारलेल्या जातींचे, ४,९७,८७३ मध्यम वर्गाचे, ४,७७२ प्रिमिटिव्ह जातीचे, ४,३०० मागासलेल्या जातीचे, आणि १,०४,९७७ अस्पृष्ट जातीपैकीं.

अस्पृष्टांच्यामध्यें महार होलीया, धेड आणि वांकर यांचीच बहुसंख्या आहे. ते ६७,३६० भरले. चांभारांची संख्या २३,४४९ इतकी आहे.

१९३१: जिल्हेवार पोटजातींची संख्या

क्रमांक	प्रांत किंवा संस्थान	भंगी, हलालखोर		चांभार मोची मोहिगर सो ी		ढोर	
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
१	मुंबई शहर	४२९९	२७९८	१३४६	९९८५	३०	८६
२	ठाणें	४७३	४९२	३३०	२८७३	०	०
३	अहमदनगर	४०३	३१७	९३२	९२९१	३५६	३५५
४	पूर्व खानदेश	१०४६	९२५	९५०	९२१०	४६९	४७३
५	पश्चिम खानदेश	२६४	२२८	३८५	३९४४	९७	३९
६	नाशिक	५१२	३८०	६४६	६३८६	२४७	२३४
७	पुणें	१५२३	११०३	१०२८	१०१६५	३८०४	३८७
८	सातारा	२०९	२१५	९८५	९९७७	१४९२	१५२१
९	सोलापूर	२२२	१९०	११९१	११२३२	१४०८	१२२५
१०	मुंबई सबर्बन डिस्ट्रि.	६२०	५०६	८५३	७१६	७४	५८
११	बेळगांव	१०३	९५	४६३	४३१३	११३९	९५०
१२	विजापूर	१६	१७	३०६	२८७३	६९३	६४७
१३	धारवाड	२४०	२१२	२२१	२११४	३६९	३५३
१४	कानडा	३२	१५	९७	९०७	१४	१०
१५	कुलाबा	१३६	१०४	२८३	२८७१	०	०
१६	रत्नागिरी	२४	३५	६८५	६८५५	०	०
१७	जव्हार	३	४	१२	११७	०	०
१८	जंजिरा	१०	७	८९	९३४	०	०
१९	भोर	११	१०	६१	६१०	१	०
२०	औंध	७	७	२९	३००	२१६	२३२
२१	फलटण	१२	७	५६	५६३	३७	२४
२२	अक्कलकोट	१०	६	११५	८५३	५४८	४६०
२३	सावंतवाडी	१४	१२	११	१०३९	०	०
२४	कोल्हापूर	१९०	६८	६४	६१५९	०	०
२५	कुरुंदवाड (थोरलें)	७	१४	१	१४१	०	०
२६	कुरुंदवाड (धाकटें)	६	८	१	१८०	०	०

जिल्हेवार पोटजातींची संख्या

क्रमांक	प्रांत किंवा संस्थान	महार होलिया		मांग		मांग गारुडी	
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
१	मुंबई शहर	४००७२	२७२८८	२८२३	२४०४	१४	८
२	ठाणें	१५३९८	१४९२९	११६	४४	०	०
३	अहमदनगर	३१४३१	३२३८८	१३१८३	१३२५३	६१	११९
४	पूर्वखानदेश	४८३७७	५०४७१	४८८८	४८४८	४८५	२६९
५	पश्चिमखानदेश	१८१७२	१८५५२	१५५६	१७९८	५७७	५९३
६	नाशिक	४१२५८	४३०६६	४१५७	४३०९	५४६	५०७
७	पुणें	४०७१३	४५२५०	१२१०९	१२६४८	०	०
८	सातारा	४८९६७	४९९८३	१८४३६	१८००७	०	०
९	सोलापूर	४२८०१	४२४९८	१८८१२	१८४२३	४३२	३४७
१०	मुंबई सबर्बन डिस्ट्रि.	५५२८	४६६९	२४४	२३९	१८२	१९४
११	बेळगांव	२८३८४	२९२७६	१४७६३	१४८३८	०	०
१२	विजापूर	१८४०४	१९२६९	१७७४९	१८९८७	०	०
१३	धारवाड	७८१९	८२८३	१९१४२	१९६२७	०	०
१४	कानडा	४०३६	३२८९	३४५	२६८	०	०
१५	कुलाबा	१९२६१	२०२०६	१६६	१५९	०	०
१६	रत्नागिरी	४८२२४	५१८८०	२३	२१	०	०
१७	जव्हार	१९८	१८८	०	०	०	०
१८	जंजिरा	३४०१	३९६३	३	५	०	०
१९	भोर	६४९९	६६०३	२८८	२८७	०	०
२०	औंध	३३७९	३२९८	१९९३	१९१३	०	०
२१	फलटण	२६४१	२८३७	१०५०	१०१३	०	०
२२	अक्कलकोट	५५७३	५५७४	११५९	११२१	०	०
२३	सावंतवाडी	६११६	६३०७	१	०	०	०
२४	कोल्हापूर	३३७३८	३७९४६	९६६३	९१२२	०	०
२५	कुरुंदवाड (थोरलें)	११३१	१२११	५७२	५७१	०	०
२६	कुरुंदवाड (धाकटें)	१४८६	१४७७	२२८	२३९	०	०

(पृष्ठ ३८० वरून पुढें चालूं)

अ. क्र.	प्रांत किंवा संस्थान	भंगी हलालखोर		चांभार मोची मोहिगर सोची		ढोर	
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
२७	मिरज (थोरलें)	९	०	८९९	८४५	०	०
२८	मिरज (धाकटें)	५	२	१९८	२३९	०	०
२९	जमखिंडी	३	२	३९६	३८८	०	०
३०	मुधोळ	०	०	२०१	१८७	०	०
३१	रामदुर्ग	५	२	१६८	१९७	०	०
३२	सांगली	२	१	१८३८	१७०६	०	०
३३	वाडी जहागीर	०	०	४७	५६	०	०
३४	जत	८	६	१४५१	१३७०	८९	९२

(पृष्ठ ३८१ वरून पुढें चालूं)

क्रमांक	प्रांत किंवा संस्थान	महार होलिया		मांग		मांग गारुडी	
		पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया	पुरुष	स्त्रिया
२७	मिरज (थोरलें)	३१८३	४१८५	११९३	१३४४	०	०
२८	मिरज (धाकटें)	१६१७	१८३०	४५८	४५४	०	०
२९	जमखिंडी	२७००	२९८७	१८०८	२०३३	०	०
३०	मुधोळ	३५६	३७०	२४०९	१९९३	०	०
३१	रामदुर्ग	२४६	२८३	४८७	५०५	०	०
३२	सांगली ...	८७५२	८७६१	२३१४	२२५२	०	०
३३	वाडीजहागीर	५९	६६	४५	४२	०	०
३४	जत	४२५६	३८३९	१७३०	१७८५	०	०

वरील आंकड्यांशिवाय खालपा पोटजातींत पुरुष १२४ स्त्रिया १०७; कोलघा पोटजातींत पुरुष २४२ स्त्रिया २३२; कोळी ढोर पोटजातींत ठाणें, पुरुष १५०१ स्त्रिया १४४५; नाशिक, पुरुष ६२९९ स्त्रिया ५८१२; जन्हार पुरुष ४८५ स्त्रिया ९८; जंजिरा, पुरुष ९३ स्त्रिया ९१; इतर जातींत पुणें १०७४ पुरुष स्त्रिया ११०३; बेळगांव पुरुष ७२६ स्त्रिया ७३९; विजापूर, पुरुष ६३१ स्त्रिया ६१४. धारवाड, पुरुष ७२७ स्त्रिया ६१३; कानडा ३८७९ पुरुष ३४९६ स्त्रिया. रत्नागिरी, पुरुष १९. स्त्रिया. जत पुरुष २ व १ स्त्री.

मुंबई शहरांत स्थलांतर करून येऊन राहिलेल्या दलित वर्गांतील लोकांचे १९२१ व १९३१ चे

जिल्हावार आकडे दाखविणारें पत्रक

क्रमांक	जिल्ह्याचें नांव	दलितवर्गांतील पोटजाती	स्थलांतर केलेले लोक	
			१९३१	१९२१
१	कुलाबा	चांभार, मोची	२२०१	२०९९
		धेड किंवा महार	३९४०	३८४६
२	रत्नागिरी	चांभार, मोची	६३४९	५६२२
		धेड किंवा महार	१७८४५	१३४९०
३	नाशिक	धेड किंवा महार	६३४९	९३४२
४	अहमदनगर	चांभार	१००२	२५६१
		धेड किंवा महार	६१०९	१६२३५
५	पुणें	चांभार	२८९०	३५५०
		धेड किंवा महार	७८२९	१०९५५
६	सोलापूर	चांभार	१२४९	११८४
		धेड किंवा महार	२२२९	२३३१
७	सातारा	चांभार, मोची	३०५०	४५६१
		धेड किंवा महार	११८१६	१३३३५

टीपः—वृहन्महाराष्ट्रांतील अनेक ठिकाणांहून अस्पृष्ट लोक कदाचित् मुंबईस स्थलांतर करून आले असतील. परंतु सेन्सस रिपोर्टांत फक्त वरील सातच जिल्ह्यांतील आंकडे दिले आहेत.

निवडक जातींतील शिक्षितांची संख्या दाखविणारें पत्रक

सू.—यांत संस्थानांचे आकडे दिले नाहींत.

जात अगर वंश	ज्या जिल्ह्यांचे आंकडे जमा केले ते	लोकसंख्या (७ वर्षें वय व त्यावरील वयाचे आंकडे)					
		एकूण संख्या			शिक्षित		
		एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया
बेडर अगर वेरड	बेळगांव, धारवाड	१०७८४९	५४१५१	५३६९८	२१४४	२०१६	१२८
ब्राह्मण देशस्थ	नगर, पू.खान., नाशीक, पुणें, सातारा						
	सोला. बेळगांव, विजापूर, धारवाड	१८५१५२	९८८२२	८६३३०	९७३२७	७९९१२	१७४१५
ब्राह्मण कोकणस्थ	पुणें, सातारा, कुलाबा, रत्नागिरी	५५१९१	२७७७७	२७४१४	३०४६९	२१३९८	९०७१
ब्राह्मण गौड सारस्व.	बेळगांव, रत्नागिरी, कॅनरा.	३०७३१	१५२५२	१५४७९	१४०१८	११०८१	२९३७
चांभार	नगर, पू.प.खानदेश नाशिक, पुणें						
	सातारा, सोलापूर	९४५१८	४८००३	४६५१५	२७५७	२६१४	१४०
धेड अगर महार	गुजराथी जिल्हे	९२८९२	४५८४९	४७०४३	४९०८	४५४७	३६१
मराठे (कुणबी धरून)	सातारा, रत्नागिरी	२८८७६३	१३१४०३	१५७३६०	१७०३	१६०६	९७
कायस्थ प्रभू	ठाणें, मुंबई शहर व उपनगर	१३२२१	७२४९	५९७२	८५१७	५४४२	३०७५
महार	नगर, पूर्व व पश्चिम खानदेश, नाशि.						
	पुणें, सातारा, सोलापूर	४३६२८४	२१४०१७	२२२२६७	१२७६१	११८३६	९२५
मांग	नगर, पूर्व पश्चिमखानतेश, नाशिक						
	पुणें, सातारा, सोलापूर	११४७९५	५७७७५	५७०२०	१८०८	१५७२	२३६
वरळी	ठाणें	९०३२९	४५२०४	४५१२५	५०१	४६३	३८
झोरोस्ट्रियन	सर्व इंग्रजी जिल्हे	८०१०९	४१४७४	३८६३५	६३६०३	३५२४०	२८३६३

निवडक जातींतील शिक्षितांची संख्या दाखविणारें कोष्टक

सू.—यांत संस्थानचे आकडे दिले नाहींत.

जात अगर वंश	ज्या जिल्ह्याचे आकडे जमा केले ते	लोकसंख्या (७वर्षे व वरील वयाचे) अशिक्षित			इंग्रजी जाणणारे		
		एकूण	पुरुष	स्त्रिया	एकूण	पुरुष	स्त्रिया
बेडर अगर वेरड	बेळगांव, धारवाड	१०५७०५	५२१३५	५३५७०	३६	३२	४
ब्राह्मण देशस्थ	नगर,पूर्वखानदेश,नाशिक,पुणें,						
	सातारा,सोलापूर,बेळगांव,विजा.	८७८२५	१८९१०	६८९१५	२६६९८	२५२७१	१४२७
ब्राह्मण कोकणस्थ	पुणें,सातारा,कुलाबा,रत्नागिरी	२४७२२	६३७९	१८३४३	१०११५	८७१३	१४०२
ब्राह्मण गौड सारस्व.	बेळगांव,रत्नागिरी कॅनरा	१६७१३	४१७१	१२५४२	२८८२	२६८५	१९७
चांभार	नगर,खानदेश,पूर्व व पश्चिम						
	नाशीक,पुणें,सातारा,सोलापूर	९१७६१	४५३८९	४६३७२	१५२	१४१	११
धेड अगर महार	गुजराथी जिल्हे	८७९८४	४१३०२	४६६८२	४५	४५	०
मराठे (कुणबी धरून)	सातारा, रत्नागिरी	२८७०६०	१२९७९७	१५७२६३	३८	३६	२
कायस्थ प्रभू	ठाणें,मुंबई शहर व उपनगर	४७०४	१८०७	२८९७	४५१८	३८३२	६८६
महार	नगर,पूर्व व पश्चिम खानदेश,						
	नाशिक, पुणें,सातारा,सोलापूर	४२३५२३	२०२१८१	२२१३४२	७०५	६८९	१६
मांग	नगर,पूर्व व पश्चिम खानदेश,पुणें,						
	नाशिक,सातारा, सोलापूर	११२९८७	५६२०३	५६७८४	१२८	१२७	१
वरळी	ठाणें	८९८२८	४४७४१	४५०८७	१७	१५	२
झोरोस्ट्रियन	सर्व इंग्रजी जिल्हे	१६५०६	६२३४	१०२७२	३४०८	१२७०२२	७०६७

कांहीं जातींतील लग्न झालेले–न झालेले–विधुर अगर विधवा, यांची वयवारी संख्या दाखविणारें पत्रक

(यांत संस्थानी आकडे धरले नाहींत)

ब्राह्मण देशस्थ	नगर,पूर्वखानदेश,नाशिक,पुणें, सातारा,सोलापूर,बेळगांव,विजापूर धार.	पुरुष स्त्रिया	१२०२२६ १०७४४०
ब्राह्मण कोकणस्थ	पुणें,सातारा,कुलाबा,रत्नागिरी	पुरुष स्त्रिया	३५३३९ ३३६००
चांभार	नगर,पूर्व-पश्चिम खानदेश,नाशिक, पुणें,सातारा, सोलापूर.	पुरुष स्त्रिया	६१२२० ६०२०५
मराठे-कुणब्यांसह	सातारा,रत्नागिरी (कुणबी म.कु.	पुरुष स्त्रिया	१७०२९३ १९४९७५
मराठे	मुंबई शहर	पुरुष स्त्रिया	१८६३५५ १०४९७५
महार	नगर,पूर्व व पश्चिम खानदेश, नाशिक,पुणें,सातारा,सोलापूर.	पुरुष स्त्रिया	२७१७१९ २८२२०८
मांग	नगर,पूर्व व पश्चिम खानदेश नाशिक,पुणें,सातारा, सोलापूर.	पुरुष स्त्रिया	७३१४१ ७३२८०
ब्राह्मण गौड सार.	बेळगांव,रत्नागिरी,कानडा.	पुरुष स्त्रिया	१८८९१ १८९९७
झोरोस्ट्रियन	सर्व जिल्हे	पुरुष स्त्रिया	४६१६६ ४३०३३

निरनिराळ्या जातींतील अविवाहित स्त्री-पुरुषांची संख्या

प्रथम पुरुषांचे व त्याखालीं स्त्रियांचे वयमानपरत्वें आकडे दिले आहेत.

	०–६	७–१३	१४–१६	१७–२३	२४–४३	४४ त्यावर	एकूण
ब्रा. देशस्थ	२१२३८	१८७८२	७४४४	१०५२०	४९२५	११६३	६४०७२
	२०९०९	१५८४८	२१६३	५२६	२६५	७३	३९७८४
ब्रा.कोकण.	७४९७	५०४२	२४२७	३९०१	१५१५	२५६	२०६३७
	६१५७	५४५६	१३६०	४४९	५४६	३३	१४००१
चांभार	१३०४४	९१३९	२०२२	१३४८	६५३	३०३	२६५०८
	१२९२८	४६९६	३३६	२९१	३३	२७	१८६१४
मराठे कु.	३८७४५	३३६९६	७९५२	३६९०	३२९६	४०५	९०४८४
	३७२१३	२२६१२	८३९३	४८४	४००	११०	६९२१२
मराठे	१७२१३	१५१५८	७२४३	१३४३८	८८२१	१०३६	६२९०९
	१४०६८	९४२८	२०८९	२३६५	१११७	४२७	२९४९४
महार	५६४२६	४३४६६	९५९९	६४६७	२३४३	११००	११९४०१
	५६२९७	२४४१३	२३८४	२७४९	१५६०	९१२	८८३१२
मांग	१५१८३	१२०३४	२४८२	१८९०	५६७	२१७	३२३७३
	१५६५९	६८२१	३७४	३७३	३१६	११२	२३६५५
ब्रा.गौ. सा.	३६१८	३४७३	१३१४	१७००	६८१	१२२	१०९०८
	३४९७	३२४३	६८८	१६५	५१	१९	७६६३
झोरोस्ट्रि.	४६४०	५७३३	२७४९	५१८६	५५०७	११२७	२४९४२
	४३८३	५५१८	२५३६	४३२०	३६१४	८०२	२११७३

निरनिराळ्या जातींतील विवाहित स्त्री-पुरुषांची संख्या

प्रथम पुरुषांचे व त्याखालीं स्त्रियांचे वयमानपरत्वें आकडे दिले आहेत.

	०–६	७–१३	१४–१६	१७–२३	२५–४४	४४व त्यावरचे	एकूण
ब्रा.देशस्थ	१६४	४०८	५५६	४६१८	२६३७२	१४९०१	४७०१९
	१९२	१६४८	४७८४	१२६२३	२०००७	५५५७	४४८११
ब्रा.कोंकण.	६३	९९	२३८	९२५	६८७९	४४१७	१२६२१
	२५	१४१	८२१	३४१४	६१६७	१९८१	१२५४९
मराठे कु.	१७२	१८६३	१६८१	४६९२	१५७८१	८०११	३२२००
	७५३	५३६९	३२०२	६९९८	१४०७१	३४१६	३३८०९
मराठे कु.	१३१	६६९	१४०५	७१९०	३७२५७	२६३४४	७२९९६
	२८१	५९६०	९६६९	१९४७८	४९४५८	११४६४	९६३१०
मराठे	१४०	९९७	३०५३	१४२६२	८९३३२	१११९७	११८९८१
	१५५	१३२३	३५१९	२०८५५	३४५४८	३०३८	६३४३८
महार	१२४९	७१९८	८१४७	२२३८०	७००४७	३३१९०	१४२२११
	३५२९	२१८६३	१६४५९	३२६९०	६३०२०	१४७३१	१५२२९२
मांग	१७८	१३२२	१५३३	६४४०	१९१५९	९४९७	३८१२९
	५९५	५४५९	५१२८	८५५२	१६८१५	३७८०	४०३२९
ब्रा.गौ.सा.	२०	३१	३१	३६७	३६९८	२८२७	६९७४
	२०	८७	४९७	१९३६	३८०४	१०६२	७४०६
झोरोस्ट्रि.	३७	४५	७१	९१७	९०००	९४८४	१९५५४
	१२	५७	९१	१३२५	९६५३	५३७६	१६५१४

निरनिराळ्या जातींतील विधवा–विधुर स्त्री–पुरुषांची संख्या

प्रथम पुरुषांचे व त्याखालीं स्त्रियांचे वयमानपरत्वें आकडे दिले आहेत.

	०–६	७–१३	१४–१६	१७–२३	२४–४३	४४व त्यावरचे	एकूण
ब्रा.देशस्थ	२	८	२९	१४३	१९००	७०५३	९१३५
	९	६०	१४५	१०३४	८२९२	१३३०५	२२८४५
ब्रा.चित्त.	२	२३	२९	३२	३८०	१६१५	२०८१
	४	१०	२३	२९०	२४७८	४२४५	७०५०
चांभार	१	३३	३८	९५	६७०	१६७५	२५१२
	९	९०	७९	२२९	२२५४	५१२१	७७८२
मराठे कु.	१४	३५	३२	९४	१२२९	५४०९	६८१३
	१२१	१५३	२०२	८२०	८७५४	१९४०३	२९४५३
मराठे	१	८	३५	२९५	२०६५	२०६१	४४६५
	१	४१	८९	५२२	५३४९	६०४१	१२०४३
महार	२७	१२२	१९८	५५७	२७९८	६४०५	१०१०७
	११५	५५२	८२५	१३३२	१३१२०	२५६५७	४१६०१
मांग	५	१९	३०	१०२	७२५	१७५८	२६३९
	१२	१०५	१०४	३६९	२९६४	५७४८	९३०२
ब्रा.गौ.सा.	१	१	०	८	१७५	८२४	१००९
	१	४	९	१४४	१३३५	२४३५	३९२८
झोरोस्ट्रि.	१५	०	१	४	२४८	१४०२	१६७०
	३	१	६	२७	८५४	४४५५	५३४६

मागासलेल्या जातींपैकीं कांहीं जातीच्या शैक्षणिक परिस्थितींचे आंकडे दर्शविणारें पत्रक

(आंकडे मराठवाड्याचे) १९२१ हैद्राबाद संस्थान,

क्रमांक	जातीचें नांव	लोकसंख्या									इंग्रजी जाणणारे		
		एकूण			शिक्षित			अशिक्षित					
		माणसांची संख्या	पुरुष	स्त्री	माणसांची संख्या	पुरुष	स्त्रिया	माणसांची संख्या	पुरुष	स्त्रिया	माणसांची संख्या	पुरुष	स्त्रि
१	चांभार	९९२५४	५०१३६	४९११८	२२२	१६७	५५	९९०३२	४९९६९	४९०६३	५	५	०
२	महार	४९२४२६	२४४२५८	२४८१६८	६७९	५४४	१३५	४९१७४७	२४३७१४	२४८०३३	२५	२०	५
३	मांग	३२६१५४९	१६१७८२	१६४७६७	४०९	२९०	११९	३२६११४०	१६१४९२	१६४३४८	४	३	१
४	वंजारी	२५२१२	१३८४५	११३६७	४५२	४२०	३२	२४७६०	१३४२५	११३३५	२७	२७	०
५	वडारी	३६२५०	१७३१३	१८९३७	६७	५६	११	३६१८३	१७२५७	१८९२६	४	४	०
६	पंचाळ	५४७८३	२७८३५	२६९४८	१३३७	१२३२	१०५	५३४४६	२६६०३	२६८४३	५३	५३	०

मध्यप्रांत व वऱ्हाड : अस्पृश्यांची लोकसंख्या व—

क्र.	जातीचें नांव	प्रांत विभाग	एकूणसंख्या		
			एकूण	पुरुष	स्त्रिया
१	बलाही	एकूण	४३५१८	२१४५१	२२०६७
२	बसोर	नर्मदेचें खोरें	२९३६६	१४४७३	१४८९३
३	चांभार	एकूण	८८१६७४	४३२९३७	४४८७३७
४	धोवी	एकूण	१६५६२४	८१७३७	८३८८७
५	गंडा	,,	९५८६८	४४९७८	५०८९०
६	कातिया	,,	३६५७३	७०४९८	१९०७५
७	कोरी	नर्मदेचें खोरें	२८३४३	१४१७८	१४१६५
८	कुंभार	एकूण	१२१४०८	६०१८२	६१२२६
९	माडगी	चांदा	४४९७	२१६८	२३२९
१०	माला	,,	४४०	२०६	२३४
११	मांग	मराठी विभाग	७८६६१	३८८१५	३९८४६
१२	महार	एकूण	११७०७३७	५७९५१७	५९१२२०
१३	मेहेतर	,,	१३४४८	७७१७	५७८१
१४	पाणका	,,	१२७५१५	६२०१५	६५५६०
१५	मोची	नर्मदेचें खोरें	१५२०	७९०	७३०
१६	खाटिक	जबलपूर	१५००	९०९	५९१
१७	ढोर	वुलढाणा	२७८१	१३२२	१४५९
१८	खांडगर	एकूण	११२७८	५७०८	५५७०
१९	चादर	,,	२४८२६	१२४३३	१२३८८
२०	दहायत	जबलपूर	७५८८	३५०१	४०८७
२१	चव्हाण	बिलासपूर	१५८१	९३२	६४९
२२	खंजर	एकूण	११२७८	५७०८	५५७०
२३	कोळी	वऱ्हाड	३३१६०	१६५४८	१६६१२
२४	बेडर	अकोला	४४३	२६२	१८१

त्यांच्यांतील साक्षरतेचें प्रमाण दाखविणारें पत्रक १९२१

शिक्षित			अशिक्षित.			इंग्रजी जाणणारे		
एकूण	पुरुष	स्त्रि.	एकूण	पुरुष	स्त्रिया	एकू.	पु.	स्त्रि
२३७	२०७	३०	४३२८१	२१२४४	२२०३७	१	१	०
७०	६७	३	२९२९६	१४४०६	१४८९०	४	४	०
३७०६	३३२०	३८६	८७७९६८	४२९६१७	४४८३५१	१५२	१५१	१
३४७७	३१५६	३२१	१६२१४७	७८५८१	८३५६६	१२६	१२४	२
४९३	४६८	२५	९५३७५	४४५१०	५०८६५	६	६	०
५४४	४९५	४९	३६०२९	१७००३	१९०२६	२०	२०	०
९३४	७८३	१५१	२७४०९	१३३९५	१४०१४	१४१	१३५	६
२५१४	२४१२	१०२	११८८९४	५७७७०	६११२४	१६८	१६७	१
१७	९	८	४४८०	२१५९	३२२१	०	०	०
९	९	०	४३१	१९७	२३४	०	०	०
३०६	२६९	३७	७८३५५	३८५४६	३९८०९	६	६	०
१६२०१	१५६४६	५५५	११५४५३६	५६३८७१	५९०६६५	३७३	३७०	३
२५६	२२९	२७	१३१९२	७४८८	५७०४	९	९	०
१९३१	१८२८	१०३	१२५६४४	६०१८७	६५४५७	९०	९०	०
१७२	१५३	१९	१३४८	६३७	७११	१८	१८	०
१५७	१४८	९	१३४३	७६१	५८२	२८	२८	२
३	३	०	२७७८	१३१९	१४५९	०	०	०
५५३	५३५	१८	१०८२५	५२७३	५५५२	१७	१६	१
३०९	३००	९	२४५१७	१२१३८	१२३७९	१	१	०
३१५	३०७	८	७२७३	३१९४	४०७९	२	२	०
११६	९२	२४	१४६५	८४०	६२५	१	०	१
४५३	४३५	१८	१०८२५	५२७३	५५५२	१७	१६	१
१०६९	९०३	१६६	३२०९१	१५६४५	१६४४६	२०	२०	०
५०	४८	२	३९३	२१४	१७९	६	६	०

कांहीं जातींतील लग्न झालेले–न झालेले–विधुर अगर विधवा, यांची वयवारी संख्या दाखविणारें पत्रक

मध्यप्रांत व वऱ्हाड

क्र०	जात	प्रांतविभाग	लिंगभेद	एकूण लोकसंख्या
१	ब्राह्मण	सर्व	पुरुष	२४४९१९
			स्त्रिया	२१२४५८
२	चांभार	सर्व	पुरुष	४३२९३७
			स्त्रिया	४४८७३७
३	ढोर	बुलढाणा	पुरुष	१३२२
			स्त्रिया	१४५९
४	महार	सर्व	पुरुष	५७९५१७
			स्त्रिया	५९१२२०
५	मांग	मराठीविभाग	पुरुष	३८८१५
			स्त्रिया	३९८४६

अविवाहित

		एकुण	०–५	५–१२	१२–१५	१५–२०	२०–४०	४०व वर
१	पु.	११२५१८	२६५६८	३६९९०	१५३०९	१३७३०	१५५६९	४३५२
	स्त्रि	६९४४०	२६२०७	३३१००	५११८	२१५२	१८८३	९८०
२	पु.	१७४७४७	५५४९७	७६१४०	२०६३८	१०७०१	९२२९	२५४२
	स्त्रि	१५३३८४	६३७०४	७०९२५	१३५३९	६५८१	५६७०	२९६५
३	पु.	५२०	१८८	२७२	३८	१३	७	२
	स्त्रि	३३०	३२६	१२५	२	०	४	०
४	पु.	२५७८८१	७९००२	११५७२८	२८६१०	१७१२०	१३५०९	३९१२
	स्त्रि	२०५८५८	८५९१८	९७१९६	१३२६३	४९९०	३२०५	१२८६
५	पु.	१६०६४	५१८८	८१३६	१४९४	६३०	५३३	८३
	स्त्रि	११६९३	५४७९	५५५६	३९४	९१	१२७	४६

विवाहित

		एकूण	०–५	५–१२	१२–१५	१५–२०	२०–४०	४०व वर
१	पु.	१८०९५	३२७	१६४८	३७८०	९०३५	५६३०१	३७०२४
	स्त्रि	९५४२२	२९९	४४६१	८१०१	१५०७९	४७७००	१९७८२
२	पु.	२२१२३६	१३१८	१०८६९	१२०२३	२१६५४	९१०४३	७६३२९
	स्त्रि	२२६३९३	२१३०	१७५३०	१७३८२	२७८३२	१०९४०२	५२११७
३	पु.	७५३	०	६१	६३	७१	३४८	२१०
	स्त्रि	९३१	४	२३०	७५	९९	३४८	१७५
४	पु.	२८७७२२	१०१७	१०६९६	१३०२४	२०४३५	१३५१४३	१७३०७
	स्त्रि	२९६४४९	१७२२	३१५६०	२०२६२	२१३९३	१४८५९२	६२५३०
५	पु.	२०८७०	४४	१२१३	१२६०	१६५६	९७६०	७९३७
	स्त्रि	२१९८२	१३०	३६९०	१६५१	२५११	१०६२१	३३७९

विधुर–विधवा

		एकण	०–५	५–१२	१२–१५	१५–२०	२०–४०	४०व वर
१	पु.	२४३०६	११४	२०३	७३६	१०४२	७४८४	१४७२७
	स्त्रि	४७५९६	२८७	४७०	६२९	१७९९	१३७२५	३०७८६
२	पु.	३६९५४	१४६६	२९४०	२१६२	३०४९	१०८२२	१७४१५
	स्त्रि	६८९६०	१३७३	२५१०	२६४२	४५८३	१६७५७	४१०९५
३	पु.	४९	०	०	१	२	१४	३२
	स्त्रि	१९८	०	१०	२	४	२७	१५५
४	पु.	३३९१४	१२९	४९४	७३२	१२४२	११००९	२०३०८
	स्त्रि	८८९१३	८६	१३९१	१३३९	३४२८	१९९७९	६२६९०
५	पु.	१८८१	०	४५	३१	३६	५७७	११९२
	स्त्रि	६१७१	६	१२५	१२४	८२	१५०८	४३२६

हैद्राबाद संस्थानांतील कांहीं जातींतील विवाहित, अविवाहित, विधुरविधवा यांचें प्रमाण दाखविणारें पत्रक

क्रमांक	जात	प्रांत विभाग	लिंगभेद	एकूण लोकसंख्या
१	ब्राह्मण	मराठवाडा	पुरुष	८२२४७
			स्त्रिया	७५१६५
२	चांभार	,,	पुरुष	५०१३६
			स्त्रिया	४९११८
३	महार	,,	पुरुष	२४४२५८
			स्त्रिया	२४८१६८
४	मांग	,,	पुरुष	१६१७८२
			स्त्रिया	१६४७६७

अविवाहित

	एकूण	०–५	५–१२	१२–१५	१५–२०	२०–४०	४०व वर
१	२९९६४	७५४३	९३५०	५४५२	३३०२	३११५	१२०२
	१८२७२	९१८७	६४८१	१६४३	२४०	४७०	२५१
२	२१७१७	४२५८	७१६४	३९०६	१५८२	१९६६	२८४१
	१५७८६	६१३०	५३४३	१८४९	३३७	१७०५	४२२
३	११३८४९	३५००३	४४९१२	१९९८८	५६१९	६३१९	१९३६
	८५१६१	३८९१५	३५०००	५०३२	१३१६	३५०५	१३९३
४	७११६०	२०२७४	२४२१५	११३२६	४८२४	८९६०	१५६१
	५११०१	२१६८०	२०१४९	४४२४	१४८९	२८५४	१३०५

विवाहित

	एकूण	०–५	५–१२	१२–१५	१५–२०	२०–४०	४०व वर
१	४४६५२	२४	१०२३	२२१५	४७३७	२२८१७	१३८३६
	४३६७८	२७४	२९६५	४६१०	५१२६	२१५६०	९१४३
२	२३९२१	२९७	१०९७	१३०४	१६४४	११३२	८५४७
	२४५३७	३००	२०२०	१७३५	१९०६	१३१६१	५४१५
३	११७४६३	७१०	३०२७	४०७१	६१२८	५३९७३	४९५४४
	१२५६५८	१५४९	१२०१६	१२३०९	१२६८०	६६४१०	२०६९४
४	७८७६०	४८०	२८१२	३६२०	५१३३४	०९८८१	२५७३४
	८०१५६	५०६	५९९१	७१५२	८३६४	४०९३३	१७२१०

विधुर–विधवा

	एकूण	०–५	५–१२	१२–१५	१५–२०	२०–४०	४०व वर
१	७६३१	३	१५०	१३६	२२०	२३०९	४८१३
	१३२१५	७	१७७	२२३	२४७	३९२३	८६३८
२	४४९८	५०	७८	७१	१११	११०७	३०८१
	८७९५	२९	१५२	२३८	२२५	२५१९	५६३२
३	१२९५६	८६	४१५	२५८	४९६	४७३१	६९७०
	३७३४९	८३	९००	७१६	११८७	९१३३	२५३३०
४	११८६२	५६	२५	२५४	१९५	३८१८	७२८०
	३२७१०	७५	४१६	३२१	३४८	८९३८	२२६१२

जाति-प्रतिनिधि-प्रमाण-निर्णय तारीख १६-८-१९३२

मॅक्डोनल्ड यांनीं केलेल्या मूळ योजनेप्रमाणें कायदेकौन्सिलांतील जागांच्या प्रांतवार वांटणीचा तक्ता

प्रांताचें नांव	सर्वसामान्य	अस्पृश्य	मागसलेले	मुसलमान	हिंदी ख्रिश्चन	अँग्लो-इंडियन	युरोपियन	व्यापार, खाणी	जमिनदार	विश्वविद्यालय	मजूर	एकंदर
मद्रास	१३४-५स्त्रियांसुद्धां	१८	१	२१-१स्त्री	९-१स्त्री	२	३	६	६	१	६	२१५
मुंवई सिंधसह	९७-६ स्त्रियांसुद्धां	१०	१	६३-१स्त्री	३	२	४	८	३	१	८	२००
बंगाल	८०-२ स्त्रिया	०	०	११९-२स्त्रि.	२	४-१	१	१९	५	२	८	२५०
संयुक्त प्रांत	१३२-४ स्त्रिया	१२	०	-६६-२स्त्रि.	२	१	२	३	६	१	३	२२८
पंजाव	४३-१ स्त्री	शीख ३२-१स्त्री	०	-८६-२स्त्रि	२	१	१	१	५	१	३	१७५
बिहार ओरिसा	९९-३ स्त्रिया	७	८	४२-१स्त्री	२	१	२	४	५	१	४	१७५
मध्यप्रांत वऱ्हाड	७७-३ स्त्रिया	१०	१	१४	०	१	१	२	३	१	२	११२
आसाम	४४-१ स्त्री	४	९	३४	१	०	१	११	०	०	४	१०८
वायव्यप्रांत	९	शीख ३	०	३६	०	०	०	०	२	०	०	५०

वर प्रांतवारीच्या दिलेल्या आंकडयांत मुंवई इलाख्याच्या जागा सिंध धरून दिल्या आहेत. परंतु मुंबई इलाख्यांतून सिंध वगळून तो स्वतंत्र झाल्यास मुंवई इलाख्यांतील जागांची वांटणी पुढीलप्रमाणें होईल. सर्वसामान्य जागा १०९ (यांत ७ जागा मराठ्यांना व पांच जागा स्त्रियांना), मुसलमान ३० (एक स्त्री), अस्पृश्य १०, व्यापार ७, मजूर ७, युरोपियन ३, हिंदी ख्रिस्ती ३, जमीनदार २, अँग्लोइंडियन्स २, मागासलेले १, विश्वविद्यालय १ एकून १७५

सिंध स्वतंत्र झाल्यास सिंधातील जागांची वांटणी पुढीलप्रमाणें होईल:—सर्वसामान्य १९ (१स्त्री सुद्धां) १मुसलमान ३४ (एक स्त्री सुद्धां) व्यापार २, युरोपियन्स् २, जमीनदार २, मजूर १, एकूण ६०.

पुणें करार (तारीख २४।९।१९३२)

(१)मतदार संघाच्या सर्व–साधारण यादींत ज्या अस्पृश्य मतदारांचीं नांवें नोंदलीं गेलीं असतील, त्या अस्पृश्य मतदारांचा एक संघ मानला जाईल.

(२) या संघांतील प्रत्येक मतदार आपलें एक मत देऊन राखीव जागां-पैकीं प्रत्येक जागेकरितां चार उमेदवारांचीं नांवें निवडील. ज्यांना या प्राथमिक निवडणुकींत जास्तींत जास्त मतें या संघांतील मतदारांकडून मिळतील तेच गृहस्थ प्रत्येक राखीव जागेकरितां म्हणून सर्वसाधारण मतदार संघातर्फे निवडून देण्याकरितां उमेदवार म्हणून कबूल केले जातील.

(३) वरिष्ठ कायदे कौन्सिलांत अस्पृश्य वर्गातर्फे जे प्रतिनिधी निवडले जातील, त्या निवडणुकीकरितां प्रांतिक कायदेमंडळाच्या प्रतिनिधींच्या निवडणुकीप्रमाणेंच वर कलम दोनमध्यें सांगितलेल्या पद्धतीनें प्राथमिक निवडणुकी होऊन मग संयुक्त मतदार संघातर्फे निवडणुकी होतील.

(४) वरिष्ठ कायदे कौन्सिलांत ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्वसाधारण मतदार संघाकरितां ज्या जागा दिल्या जातील त्यांपैकीं दहा टक्के जागा अस्पृश्यवर्गाकरितां म्हणून राखून ठेवण्यांत येतील.

(५) प्रांतिक कायदे कौन्सिलांत व वरिष्ठ कायदे कौन्सिलांत अस्पृश्य वर्गातर्फे प्रतिनिधि वर सांगितलेल्या पद्धतीनें निवडून देतांना प्राथमिक निवडणूक होऊन उमेदवार ठरविण्याची जी पद्धति सांगितली आहे, ती दहा वर्षांनंतर बंद राहील.खालीं दिलेल्या ६ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें स्पृश्य व अस्पृश्य हिंदूंनीं परस्पर नवा करार केल्यास दहा वर्षांच्या अगोदरहि पद्धत बंद करण्यांत येईल.

(६) प्रांतिक व वरिष्ठ कायदेमंडळांत अस्पृश्य वर्गाकरितां ज्या राखीव जागा ठेविल्या आहेत त्यांच्या निवडणुकीची कलम १ व कलम ४ मध्यें जी पद्धत सांगितली आहे, ती पद्धत या करारावर सही करणारे जे समाज आहेत त्यांच्या ऐकमत्यानें हा करार बंद होईपर्यंत चालू राहील.

(७) वरिष्ठ व प्रांतिक कायदे कौन्सिलांतील निवडणुकीकरितां मत-

दानाचा हक्क प्राप्त होण्यासाठीं लोथियन कमिटीच्या शिफारशीमध्यें अस्पृश्यां-करितां म्हणून जे गुण सांगितले आहेत, ते ज्या अस्पृश्यांना असतील त्यांनाच मताधिकार मिळेल.

(८) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत किंवा सरकारी नोकरीबाबत कोणालाहि तो अस्पृश्य आहे म्हणून नालायक समजण्यांत येणार नाहीं.

(९) वरील निवडणुकीबाबत व सरकारी नोकरीबाबत अस्पृश्य वर्गांना योग्य प्रमाणांत जागा मिळाव्या म्हणून शक्य तितका प्रयत्न केला जाईल. फक्त सरकारी नोकरीकरितां शिक्षणाच्या ज्या अटी सरकारनें ठरविल्या असतील त्या मात्र पुऱ्या असल्या पाहिजेत.

(१०) प्रत्येक प्रांतांत शिक्षणखर्चासाठीं म्हणून जी रक्कम खर्च केली जाईल तींत योग्य प्रमाणांत अस्पृश्य वर्गांतील लोकांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून कांहीं रक्कम निराळी ठेविली जाईल.

(११) पुढील प्रमाणें निरनिराळ्या प्रांताच्या कायदेमंडळांत अस्पृश्य वर्गाकरितां म्हणून जागा राखून ठेविल्या जातील. सर्व–साधारण–मतदार संघांना ज्या जागा दिल्या आहेत,त्या जागांमध्यें ह्या राखीव जागांचा अंतर्भाव करण्यांत आला आहे.

प्रांत	कायदेमंडळांतील सर्वसाधारण जागा (जागा हिंदू)	अस्पृश्यांकरितां राखीव जागा..
१ मद्रास	१५३	३०
२ सिंध सहमुंबई	१०८	१५
३ पंजाब	४३	८
४ विहार–ओरिसा	११४	१८
५ मध्यप्रांत व वऱ्हाड	८८	२०
६ आसाम	५७	७
७ बंगाल	८०	३०
८ संयुक्तप्रांत	१४४	२०
	७८७	१४८

अस्पृष्टांचीं कर्तव्यें

या अस्पृश्यता–निवारणाच्या कामाचे दोन भाग पडतात. अस्पृश्येतर समाजाला नवीन परिस्थितीची ओळख व अस्पृश्यता–निवारणाचें महत्त्व हीं पटवून देणें हा एक व अस्पृश्य समाजानें आपल्या चालीरीती, आचारविचार यांत सुधारणा करावी असें त्यांस सांगणें व त्यांत विद्येची आवड उत्पन्न करणें हा दुसरा.

आतां दुसऱ्या भागाचें विवेचन व्हावयास पाहिजे. अस्पृश्यांनीं जागचें हाललें पाहिजे. अस्पृश्य जातींनीं आपल्याला सर्वसामान्य प्रश्न कोणते व पोटप्रश्न कोणते याची चालना केली पाहिजे. महार, चांभार, मांग, ढोर या सर्वांना लागू असा अस्पृश्यतेचा दुर्धर रोग आहे व त्याच्या निवारणासाठीं सर्वांनाच यत्न करणें भाग आहे. यापुढें असें दिसून येईल कीं, चांभार व ढोर यांचा प्रश्न इतर दृष्टींनीं थोडा कमी अवघड आहे. त्यांच्या हातीं अजन धंदा आहे व तो बुडत जात असला तरी धंद्याची परंपरा अभंग आहे. चांभार, ढोर व त्यांचे साहाय्यक यांनीं परिश्रम करून बुडता धंदा तारण्याची खटपट करावी. या दोन जातींनीं करावयाचीं कामें म्हणजे अस्पृश्यता निवारणें व बुडता धंदा तोलून धरणें हीं होत. या सर्व अस्पृश्य समाजांतून विद्यासंपन्न, राजदरबारीं शोभण्यासारखीं अशीं माणसें उत्पन्न व्हावयास हवींतच हवीं, पण सरकारी नोकरीवर सगळा देश जगूं शकत नाहीं तर धनोत्पादक धंद्यावर मात्र शकतो हें ध्यानांत ठेवावयास हवें.

यापुढें महार समाजाची गोष्ट येते. महार हे राज्यव्यवस्थेंतील का होईना पण जरूरीचे घटक होत व त्या त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांस थोडाबहुत मुशाहिरा असे. पण आतां ज्या शेतकऱ्यापासून हा मुशाहिरा मिळावयाचा तोच विपन्न झाल्यामुळें महारांची स्थिति अधिकच केविलवाणी झाली आहे. परकीय कुंभार, सुतार, चांभार, ढोर, रंगारी, कोष्टी इत्यादींनीं आपल्या या देशांतील ते ते लोक धंद्यांतून हुसकून लावल्यामुळें नाइलाजानें ते ते सर्व शेतीभोवतीच गोळा होत आहेत. अर्थात् शेतकरी खंगत चालला आहे. तो महारास किंवा मांगास काय देणार? याचा अर्थ असा कीं, शहराकडे निघून

जाण्याशिवाय खेडेगांवच्या महारांना धंदा असा कांहींच उरला नाहीं. म्हणजे अस्पृश्यता निवारणें व नवीन धंदा काढणें या दोन गोष्टी महारसमाजास करावयाच्या आहेत.

सर्वांच्या शेवटीं मातंगांची बाब येते. त्यांची बाब फार अवघड आहे. कारण त्यांस अस्पृश्यता निवारावयाची आहे, नवीन धंदा हुडकावयाचा आहे व गुन्हेगारीची छाप पुसण्याची खटपट करावयाची आहे. मातंगांनीं ही शेवटची बाब अगदीं जिवास लावून घेतली पाहिजे. त्यांची गुन्हेगारीची प्रवृत्ति मुळासकट काढून टाकण्यास जे जे उपाय योजिले जावेत ते अमलांत येत नाहींतच. पण उलट दारिद्र्याचा फैलाव त्यांच्यांत सपाटयानें होत असल्यानें गुन्ह्याची प्रवृत्ति वाढण्याचा मात्र संभव आहे. केवळ डांबून ठेवल्यानें नैतिक सुधारणा होईल असें वाटत नाहीं. जो चोरी करतो तो चरितार्थाची सोय करावयास जवळची वाट साधतो असा त्याचा अर्थ आहे. हें त्यानें करूं नये असें जर हवें असेल, तर त्याला स्वतःच्या श्रमाची किंमत कळवून दिली पाहिजे. रावणाच्या शेतकऱ्याचा दाणा चोरणारा जर स्वतः शेतकरी झाला व ऐन वेळीं त्याचा दाणा चोरीस गेला, तर ज्या शेतकऱ्याचे दाणे आपण चोरले त्याच्या पोटांत पडणाऱ्या उन्हाळ्याची कल्पना या होतकरू शेतकऱ्यास खास येईल. अन्नान्न-दशेला आलेल्या या समाजाला गुन्हेगारीतून काढावयाचें असल्यास सरकारनें पडीक जमिनी पिकवून खाण्यासाठीं त्यांस द्याव्या व त्यांच्या जीविताला स्पष्ट नवीन वळण लावावें. चोरी करणें ही चांगली गोष्ट आहे असें मांग लोक आपापसांत सुद्धां समजत नाहींत. इतर कांहीं गुन्हेगार जातींत चोरी यशस्वी झाली तर देवतापूजन, सत्यनारायणपूजा इत्यादि करण्याचा प्रघात आहे. पण मातंग समाजाचें तसें नाहीं. ते असल्या पूजा कधींहि करीत नाहींत. चोरी हा ते अधर्मच मानतात. म्हणून वरील उपाय योजून त्यांना गुन्हेगारींतून सोडवावें हें युक्त आहे.

अस्पृश्य जातींनीं आपापल्या संबंधांत ज्या गोष्टी करावयाच्या आहेत त्या अचूकपणें पाहाव्या. जातिभेद ही संस्था मोडणें, मूर्तिपूजा नष्ट करणें, निराळा धर्म स्थापन करणें, व अस्पृश्यता–निवारण करणें, या सर्व प्रश्नांची त्यांनीं गल्लत करूं नये. त्यानें अगदीं निकटचा जो अस्पृश्यता-निवारणाचा

प्रश्न तो विकट होतो. नशीब काढावयास व सृष्टीनें मुळांत दिलेलीं सामर्थ्याचीं बीजें वाढीस लावावयास अस्पृश्यता आड येते. म्हणून अस्पृश्यता नको. तिच्यामुळें, जन्मतः अंगीं असलेल्या सामर्थ्याच्या जोपासनेला संधि मिळत नाहीं. ही मुख्य तक्रार आहे आणि म्हणून केवळ याच प्रश्नाच्या मागें अस्पृश्य समाजानें लागावें. इतर सुधारणा कीं ज्या सहज मदतनीस होतील त्या करणें अर्थातच इष्ट आहे. सक्तीचें शिक्षण सक्तीनें मागावें, पाणी इत्यादीचे हक्क झगडून घ्यावे. जमिनी मागून गुन्हेगारी पुसून टाकावी आणि भांडवलें जमा करून धंद्यांत स्थिर व्हावें. अखिल हिंदुसमाज या प्रश्नाच्या सोडवणुकीस तोंड वळवीत आहे, हें नाकारणें बरोबर नाहीं व म्हणून धर्मांतराची गोष्ट बोलूं नये. मात्र प्रत्येक दुखणें वेशीस टांगावयास शिकावें.

मृतमांसाशन टाकावें—

अस्पृश्यता–निवारणासाठीं होणाऱ्या प्रतिपादनांत मुर्दाड मांसाचा उल्लेख नेहमीं येतो. मुर्दाड मांस म्हणजे आपोआप मेलेल्या जनावराचें मांस अस्पृश्य जातींपैकीं कित्येक जाती हें मांस खातात. व म्हणून इतर मांसाहारी लोकसुद्धां इतर कारणांबरोबर याही कारणामुळें त्यांना अमंगल मानतात. येथें मांसाहारविचार योजलेला नाहीं. पण विचाराचा खुलासा व्हावा म्हणून थोडी चिकित्सा करणें क्रमानेंच येत आहे. मुद्दाम मारिलेल्या जनावराचें मांस जे खातात ते मुर्दाड मांस खाणारांना कमी प्रतीचे लेखितात व अस्पृश्यता–निवारणाच्या प्रतिपादनांत अस्पृश्य लोकांनीं असलें मांस खाण्याचें सोडून दिलें पाहिजे असें आग्रहानें प्रतिपादतात. आतां या बाबतींत दोन भिन्न भिन्न तत्त्वांची हत्त्या झाली आहे असें दिसेल. मुद्दाम मारिलेल्या जनावराचें मांस खाणारे जे लोक अस्पृश्याला कमी लेखितात ते स्वतः आपल्या आहार-विचारांत भूतदयेची ढोबळ हत्त्या करीतच असतात. पण मुर्दाड मांस खाणारे आणखी एका चांगल्या तत्त्वाची हत्त्या अस्पृश्येतर मांसभक्षकांच्या दृष्टीनें करीत असतात. तें तत्त्व म्हणजे स्वच्छतेचें होय. केवळ शाकाहारी माणसाला मारलेल्या जनावराचें मांस खाणें व मेलेल्या जनावराचें मांस खाणें, हीं दोनही इतकीं किळसवाणी वाटतात कीं, त्यांच्या अस्वच्छतेंतील कमी-अधिकपणाचा विचार करणें त्याला उपहास्यच वाटतें. पण मारलेलें जनावर

खाणाराचा अस्पृश्यास जो उपदेश असतो त्यासंबंधानें आपलें लिहिणें चाललें आहे. म्हणून त्याचा विचार पाहणें अवश्य आहे. मारलेलें खाणारा जसा भूतदया मारतो, तसा मेलेलें खाणारा मारलेलें खाऊन भूतदयाही मारतो, व मेलेलें खाऊन स्वच्छताही मारतो. पैकीं भूतदयेचा मुद्दा उभयतांसही मान्य नाहीं. उरतां उरली स्वच्छतेची बाब. आतां मेलेलें खाणारा हा प्रत्यक्ष व्यवहाराच्या दृष्टीनें किंवा परिणामाच्या दृष्टीनें मारलेलें खाणारापेक्षां ओंगळ असतो असें जर दिसून आलें तर मारलेलें खाणाराचा आग्रह यथार्थ आहे असें म्हणावें लागेल. मारलेलें खाणारे व्यवहाराच्या दृष्टीनें म्हणजे आपलें भक्ष्य बनविण्याच्या दृष्टीनें ओंगळ ठरत नाहींत. त्या बाबतींतली आपली जबाबदारी ते खाटकावरच सोंपवितात. मेलेलें खाणारे मात्र आपलें भक्ष्य आपणच बनवितात. ही व्यवहारांतील स्वच्छतेची बाब आहे व तीवरून शाकाहारी माणसांनासुद्धां कल्पनेनें असें दिसून येईल कीं मांसान्न पकविण्याच्या दृष्टीनें मारलेलें खाणारा मेलेलें खाणाऱ्याहून थोडा श्रेष्ठ खराच. आतां दुसरी बाब परिणामाची. या विषयींचें लिहिणें व विशेषत: शाकाहारी माणसाचें लिहिणें उभयतांसही थोडेंफार नाराजच करील. मांसभक्षक माणसाच्या उच्छ्वासाला दुर्गंधि येते ही गोष्ट प्रसिद्ध आहे. शाकाहारी माणसांतही कांदे खाणाराच्या उच्छ्वासाला जशी कांहीं काळ घाण येते तसेंच हें. ही दुर्गंधि फक्त श्वसनापुरती आहे हें ध्यानांत असावें. परंतु असें सांगतात कीं मेलेलें खाणाराच्या केवळ श्वासालाच नव्हे तर त्वचेलासुद्धां म्हणजे शरिरालाही दुर्गंधि येते. हें सर्व लिहिणें खरें असलें तरी अत्यन्त अप्रिय वाटेल हें मी ओळखतों. पण कोणचाही समाजविचार पुढें ढकलावयाचा असतांना जी सर्व खळमळ माहीत असावी लागते व काढून टाकण्याची खटपट करावी लागते तिजविषयीं बोलणें अपरिहार्य आहे. मारलेलें खाणारा वरील दोन दृष्टींनीं मेलेलें खाणाऱ्यापेक्षां स्वत:स श्रेष्ठ समजतो. तिऱ्हाईत बुद्धीनें पहातां हें त्याचें वाटणें बरोबरही आहे. कोणी कोणी असें समजतात कीं—व या समजणारांत मांसभक्षकही असतात—मेलेलें खाणारांचा निषेध या वरील दोन दृष्टींवरोवरच आणखीहि एका दृष्टीनें होतो. व त्यांच्या मतानें तीच दृष्टि खरी महत्त्वाची होय. ते म्हणतात कीं, मेलेलें खाणें हें रोगट मांस म्हणून वाईट आहे व ज्या अर्थीं रोगटसुद्धां मांस खाण्याचें हे लोक पत्करतात त्या

अर्थीं ते निषिद्ध होत. पण येथें तर्क चुकतो असें वाटतें. जर हें मांस म्हणतात त्याप्रमाणें रोगट असतें तर त्याचे दुष्परिणाम त्या त्या समाजावर निःसंशय दिसले असते; पण त्या लोकांच्या शरीरयष्टीवरून व सामर्थ्यावरून पाहतां, समजण्यांत येतें तितकें हें मांस रोगट नसावें. शिवाय मूलभूत असा एक विचार पहावयास हवा कीं ही आहारासारखी रोजची वस्तु आहे, तर तिच्याविषयीं खाणारे तरी स्वतः बेफिकीर कसे राहतील? मेलेलें रोगट असलें तर तें पुरून टाकीत असावेत, व तें भक्ष्य असलें तरच ते त्याचा उपयोग करीत असतील. रोगट खावें कीं नाहीं इतकें कळण्याइतपत साधें प्राथमिक ज्ञान कोणालाही सहजच असेल. याला एक निराळी दृष्टि आहे. एक मांसभक्षक मारलेलें कां खातो? तर तें त्यास परवडतें म्हणून व दुसरा मांसभक्षक 'पडें' म्हणजे मेलेलें कां खातो तर त्यास तेंच परवडतें, "उभें" म्हणजे मारलेलें परवडत नाहीं म्हणून. जों जों परवडत जाईल व तो तालेवार बनत जाईल तों तों त्याचें पडें सुटतें हें चौकशीअंतीं दिसेल. या प्रश्नाविषयीं एका खेडेगांवच्या संभावित गृहस्थानें मला मोठा वेचक प्रश्न विचारला आहे. तो म्हणतो, "अस्पृश्य लोकांनीं पडें खाऊं नये असें म्हणण्याचा जो आग्रह चालू आहे त्याचा परिणाम विपरीत होईल. त्यांनीं पडें खाण्याचें सोडलें तरी ते मांसाहारी राहणारच. मग सध्यां भक्षणासाठीं जितकीं गुरें मारिलीं जात आहेत त्याच्या दिढीनें जिवंत गुरें मारिलीं जातील. अगोदरच गुरांचा तुटवडा खेडोपाडीं किती आहे हें दिसतच आहे, त्यांतच हें एक नवीन तत्त्व जर बळावलें तर जनावरांची हत्त्या अधिकच होत जाईल." असो. या प्रश्नाचा विचार जनावरांचा विचार करणारांनीं अवश्य करावा.

वरील सर्व लिहिण्यावरून ज्यांच्यावर अस्पृश्यतेची आपत्ति आहे त्यांच्या तरी ध्यानांत निदान आलें असेल कीं, आजपर्यंतच्या संकलित विचारानें मनुष्ययोनीनें जीं कांहीं सनातन स्वरूपाचीं तत्त्वें कायम करून अंगिकारलीं आहेत व त्या तत्त्वांच्या अंगिकारावर संस्कृतीचा थोरपणा रचिलेला आहे, त्या तत्त्वांपासून ज्या ज्या प्रमाणानें माणसें दूर सरलीं असतील त्या त्या प्रमाणांत तीं इतरांहून कमी लेखलीं जातात. भूतदया, स्वच्छता अशांसारखीं जीं चिरंतन तत्त्वें तीं केवळ सर्वस्वी पाळणारे असे अर्थातच कोणी नसतात. पण प्रश्न असतो तो थोड्याफारासंबंधीचा असतो. एकान्तिक विचाराचा नसतो.

ह्या चिरंतन तत्वांचा अंगिकार जों जों जास्त केला जातो तों तों तो करणारांची पायरी वर चढत जाते. हिंदू समाजांतील सर्व जातींच्या आहारांचें जे कोणी परीक्षण करतील त्यांना असें दिसून येईल कीं या आहारभेदामुळें जातींचा उच्चनीच भाव कितीतरी बळावलेला आहे. म्हणजे असें कीं मुळींच मांस न खाणारे तें खाणाऱ्यापेक्षां स्वतःस तेवढ्यापुरतें तरी मोठे समजतात. इतकेंच नव्हे तर खुद्द मांसाहारी लोकही त्यांस तें श्रेय वादाचा पीळ नसतांना देतात. मांसाहारी लोकांच्या पोटांतही अमुक एका श्वापदाचें मांस जे कोणी खातात ते इतरांहून कमी समजले जातात. म्हणजे उंदीर, घुशी, खेकडे इत्यादींचें मांस खाणाऱ्या लोकांस बकरें, गाय, बैल, कोंबडी इत्यादींचें खाणारे लोक स्वतःपेक्षां कमी लेखतात हें त्या त्या दोघांनाही पूर्ण माहीत आहे. इतकेंच काय पण या विशिष्ट प्राण्यांचें मांस खाणारी, पण एरवीं पाहतां बुद्धि, कर्तबगारी व संस्कृति या बाबतींत निखालस श्रेष्ठ असलेली अशी एक प्रतिष्ठित जात जुन्या दळणाच्या मराठ्यांकडून या आहारभेदाच्या मुद्यामुळें अवमानिली जाते. हीच विचाराची प्रणाली खालीं गेली म्हणजे हलकेसलकेच कां होईनात पण जिवंत मारलेले प्राणी जे खातात, ते स्वतःस केवळ मेलेलें खाणारांपेक्षां उंच समजत असावेत हें विचारव्यवस्थेस केवळ धरूनच आहे. म्हणून मनुष्याच्या मनांतील खोल मुरलेल्या या सदाहाराच्या भावनेस मान देऊन अस्पृश्य लोकांनीं आपापली सुधारणा या दृष्टीनें करणें योग्य होईल. मीं असें पुष्कळदां पाहिलें आहे कीं हा विचार शहरांतील अस्पृश्यांपुढें विवेचिला तर ते चटकन साहेबाकडे बोट दाखवून असें म्हणतात कीं, येवढे युरोपियन लोक ते तर खातात, मग आम्हांस काय हरकत ? आतां जर साहेबाचाच दाखला द्यावयाचा तर मेलेल्यावरून तरी परत यावें; त्या भूमिकेवर आल्यावर मग साहेब तरी बरोबर आहे कीं नाहीं याचा विचार करणें त्यांस वरें वाटूं लागेल. येवढी नवी भूमिका त्यांनीं पत्करिली तरीसुद्धां अस्पृश्यांचें पुष्कळच कल्याण आहे. कारण कीं ब्राह्मण, गुर्जर, जैन व मारवाडी अशांसारखे लोक वगळले तर बाकीचा प्रचंड जनसमूह आहाराच्या बाबतींत तरी त्यांना निराळा लेखिनासा झाला तरी तेवढ्यानें अस्पृश्यता-निवारणाला बरीच मदत होईल. व आतां सांगितलेले

लोकही अस्पृश्येतर हिंदूंशीं ज्या पद्धतीनें आणि जितपत जवळपणानें वागतात त्या पद्धतीनें व तितपत ते अस्पृश्यांशीं वागूं लागतील.

अस्पृष्ट समाजांची अस्पृश्यता नाहींशी होण्यास ज्या अनेक गोष्टी कारणीभूत होतील त्यांपैकीं आहारविषयक स्वच्छपणा ही एक होय. न परवडल्यामुळें अधिक उंच प्रतीचें खाणें मिळत नाहीं व असले आहार पतकरावे लागतात. असा आर्थिक बाबीचा विचार अर्थातच फार महत्त्वाचा आहे व केवळ जवळ दमडी नसल्यामुळें पडें खाऊन भूक भागविण्याचा कोणावर प्रसंग यावा हा विचार मनांत आला म्हणजे आपलें मन द्रवतें. पण हा आक्षेप कितीहि खरा असला तरी या आचारांतून सुटल्याशिवाय अस्पृश्यांना गति नाहीं. चार पैसे गांठीस बांधणारा माणूस जसें पडें सोडतो तसेंच सामाजिक सुधारणेच्या दृष्टीनेंही अस्पृश्यांच्या मनांत याविषयीं चिळस उत्पन्न होणें हाही विचार इष्ट हेतु साध्य होण्यास कारणीभूत होईल. कारण हें खाणें सोडावयाचें म्हणजे इतर खाणें मिळविण्याचीं साधनें त्यांस उत्पन्न करावींच लागतील.

जातवारीची चुरस सहविचारानें घालविली पाहिजे–

अस्पृश्य समाजाचे महार, चांभार व मांग हे तीन मुख्य घटक होत. धंद्याच्या दृष्टीनें जवळचे म्हणून ढोर हे चांभारांच्या बरोबरच उच्चारले जातात. यांपैकीं प्रगतीच्या मानानें पाहतां महार जात सर्वांच्या पुढें आहे. सांपत्तिक अडचण व धंद्याची वाण ही थोड्याफार फरकानें सर्वांसच लागू आहे, पण आधुनिक सुधारणाविषयक आचारांचा संस्कार व विद्या या बाबतींत त्यांतल्या त्यांत महार सर्वांच्या पुढें आहेत. इंग्रजी शिकलेल्यांची संख्याही त्यांच्यांत थोडीशी आहे, व कोठल्याही पंडितांच्या सभेंत आपलें तेज दाखवितील अशीं एक दोन विद्वान् माणसेंही त्यांना लाभलीं आहेत. पूर्वीच्या राजवटींत गांवगाड्यांच्या घटनेंत महार जातीचें स्थान कायम व महत्त्वाचें होतें व तें बजावीत असतां या ज्ञातीनें उत्तम गुण दाखविले. तसेंच स्वकीयांबरोबर व परकीयांबरोबर त्यांनीं लष्करची हवाही अनेकदां पाहिली. कोणच्या का कारणानें होईना पण ख्रिस्ती मिशनरी व युरोपियन लोक यांच्याशीं त्यांचा संबंधही इतरांच्या आधीं आला. नवीन काळाची शिकवण त्यांस आधीं पोंचली आणि स्पृश्य समाजांतील सुधारकांच्या सहानुभूतीचा व प्रयत्नांचा जो काय

अल्पस्वल्प फायदा तो या समाजाला प्रथम मिळाला. अर्थात् इतर अस्पृश्य समाजापेक्षां या समाजांत जागृति आधीं सुरू झाली व तदनुसार प्रगतिही जास्त झाली. आपल्या समाजाची चळवळ आपणांस स्वतंत्रपणें चालवितां येईल अशी धमक त्यांच्यांत उत्पन्न झाली आहे. हें व्हावयास हवें तसेंच झालें आहे. स्पृश्य समाजाची त्यांस मदत नको आहे असें मुळींच नाहीं. ती त्यांस हवी आहे पण ती केवळ आर्थिक स्वरूपाची होय. विचार कोणचे पतकरावे, चळवळी कशा कराव्या, आपलें हित नेमकें कोणचें, या बाबी ठरविण्यास त्यांस मदत नको आहे, किंबहुना आपल्या कामांत नसता हात कोणी घातला तर त्यासंबंधानें त्यांचें मन थोडें अस्वस्थच होईल. जागृत झालेल्या स्वाभिमानाची व स्वतःसंबंधींच्या जाणीवेची ही नेमकी खूण आहे. तसेंच आपलें पुढारीपण पतकरून इतर अस्पृश्य जाती आपल्याबरोबर सहकार्यानें वागल्या तर तें त्यांस हवें आहे. पण प्राप्त होणाऱ्या लाभांची वांटणी ते इतर अस्पृश्यांबरोबर समाइकपणाच्या पद्धतीनें खात्रीनें करतीलच असें नाहीं. अस्पृश्यांसाठीं म्हणून कांहीं सवलती अगर हक्क सरकारनें राखिले आहेत, ते आपण कर्तबगार, पुढारलेले व बहुसंख्य म्हणून, आपल्याकडे राहावे अशी त्यांची आकांक्षा आहे. एकाद दुसरा समतोल व डोळस पुढारी सोडला तर त्यांच्या पुढाऱ्यांत ही वृत्ति प्रबल आहे. जातवार हक्काचें तत्त्व हवें; कां कीं त्याशिवाय अस्पृश्य समाजास आपलें दुखणें वेशीवर टांगण्यास संधिसुद्धां मिळावयाची नाहीं, असें त्यांचें न्याय्य मत आहे. पण एकदां अस्पृश्यांसंबंधीं बोलणें सुरू झाल्यावर मिळालेल्या हक्कांच्या बजावणीस जो लायक अस्पृश्य असेल त्याचीच तेथें नेमणूक व्हावी, मग पुन्हां अस्पृश्यांतील जातींची चुरस असूं नये असें त्यांस वाटतें. म्हणजे असें कीं हक्क मिळणें ते अखिल अस्पृश्य समाजाच्या नांवें मिळावे पण त्याचा भोगवटा मात्र पात्रतेच्या तत्त्वानें व्हावा. पुढाऱ्यापुढाऱ्यांत फरक असतात. त्यांच्यांतील कांहीं पुढाऱ्यांना जरी स्वार्थबुद्धीनें हे हक्क आपणासच असावे असें वाटत असलें तरी इतर कित्येकांस, औदार्य असूनसुद्धां, मिळालेल्या हक्कांची बजावणी नीट व्हावी व अस्पृश्य समाजाची पात्रता अशा रीतीनें सिद्ध होऊन अधिक हक्कांच्या मागणीस जोर चढावा असें वाटतें. पण एतावता वेरीज एकच येते. अर्थात् ही दुसरी कल्पना इतर अस्पृश्य जातींना इतकीशी कळतही नाहीं व मानवत-

ही नाहीं. त्यांस वाटतें कीं जातवारप्रतिनिधीपणाचें तत्त्व जर रूढ आहे तर तें वहात वहात आमच्यापर्यंत कां येत नाहीं? अस्पृश्य समाजाची सरहद्द सुरू होतांच तें तेथेंच कां जिरतें? व नवीनच पात्रतेचें तत्त्व कां सुरू होतें? या प्रश्नाला समर्पक उत्तर असेलही, पण समाधानकारक उत्तर नाहीं. हिंदू-समाजाच्या सबंध उतरंडींत हा अविश्वास उत्पन्न झाला आहे. हिंदूंना म्हणून हक्क दिले व भोगवटा पात्रतेवर ठेवला तर ब्राह्मण जोगावतील व आपण मागें पडूं असा धाक ब्राह्मणेतरांस वाटतो म्हणून ते जातवारीचें तत्त्व पत-करतात. पुढें ब्राह्मणेतरांतील कांहीं बुद्धिमान जाती आपणांस गिळतील या भयानें, सर्व ब्राह्मणेतर एक असा चवघडा एकीकडे चालू ठेवूनच मराठे आपली निराळी व्यवस्था पहातात, पण ब्राह्मणेतर समाज म्हणजे आपणच असा अर्थ बसविण्याची खटपट करतात. अर्थात् त्यामुळें मराठा–मराठेतर वादाची झुळूक वाहूं लागते. अस्पृश्य लोक हे ब्राह्मणांशीं भांडावयापुरते उपयोगी पडावे म्हणून मराठ्यांनीं ब्राह्मणेतर या ऐसपैस नांवांत सामावून घेतले असले तरी त्यांस स्वतंत्र मतदारी मिळाली तर तीही मराठ्यांस हवीच असते, कारण प्राप्तीच्या अर्ध्या वांटचाचें भय आपसुखेंच नाहींसें होतें. पुढें अस्पृश्य समाजास म्हणून हक्क मिळाले तर त्यांच्यांतले पुढारलेले जे महार तेच सर्व हक्क पात्रतेच्या मुद्यावर बळकावून बसतील आणि आपण पुन्हां मोकळे ते मोकळे असा गोळा मांग, चांभार इत्यादींच्या पोटांत उठतो. बरें तो खोटा म्हणावा तर तेंही नाहीं. इतरांकडून न शिवलें जाणें याहून निराळा असा अस्तिवाचक बंध या अस्पृश्य जातींत कोणचा आहे ? इतर सर्व हिंदू जाती जशा परस्परांपासून अलग तशाच याही अलगच आहेत. अर्थात् एकदां जातवारी पतकरूनच विचार करावयाचा अशी विचारांची पन्हळ वाहूं लागली म्हणजे मला हिताची ठरे-पर्यंत ती वाहात यावी व पुढें मात्र एकदम बंद पडावी अशी वांछा ठेवणें अव्यवहार्य होय. अस्पृश्य समाजांत हाच प्रकार सध्यां चालू आहे. चांभार, ढोर, मांग इत्यादि लोकांची अशी इच्छा असते कीं कमिट्या, लोकलबोर्डें, कौन्सिलें इत्यादींवर आपल्याही निवडणुकी व्हाव्या. या समाजांकडे ओळखीनें पाहणारांस हें स्पष्ट झालें आहे कीं, या नेमणुकांच्या बाबतींत त्या परस्परांत बरीच चुरस माजून राहिली आहे आणि म्हणून एक होऊन स्पृश्य समाजाशीं झगडण्याचें त्यांचें सामर्थ्य लुलें होत आहे. जातवारी देऊन सरकारनें आपल्या

मागचा भुंगा पार काढून टाकला. कारण हक्कांच्या भांडणांत लोकांच्या शक्तींचा व्यय सहज होऊं लागला. तोच प्रकार इतर समाजांशीं झगडण्याच्या बाबतींत अस्पृश्य समाजांत होत आहे.

सर्वांनाच संधि पाहिजे—

हिंदुस्थानांतील सर्व बुद्धिमान लोक राजकारणाच्या आखाड्यांत कां उतरलेले असतात याचें कारण कोणासही अगदीं सहज अनुमानितां येण्यासारखें आहे. माणसाच्या अंगांत सृष्टीनें दिलेलीं जीं बीजरूप मनःसामर्थ्यें असतील त्यांच्या विकासाला संधि मिळाली तर माणसाची मानसिक वाढ व त्यायोगेंच इहलोकींचा उत्कर्ष करवेल तितका होणें शक्य आहे. पण या सूत्राशीं दुसरें सूत्र वळलें पाहिजे. जशी बीजरूप सामर्थ्याच्या विकासाला संधि हवी; तशीच विकसित सामर्थ्याच्या उपयोगाला सुद्धां संधि हवी. सामर्थ्यें उत्पन्न झालीं, पोसलीं, पण त्यांचा वापर जर कोठेंच करतां येईना तर तीं ज्या मनांत वागतात त्या मनांनाच तीं पोखरून खाऊन टाकतात. बुद्धिमंताच्या बुद्धीला व्यापार पाहिजे. तेजस्वी माणसाच्या पराक्रमाला अवसर पाहिजे. साधें उदाहरण म्हणजे वक्तृत्व करणारास ज्याप्रमाणें सभा पाहिजे त्याप्रमाणेंच हें. एक वेळ सामर्थ्यच उत्पन्न झालें नसलें तर विकसित सामर्थ्य पदरीं असल्यामुळें जो एक प्रकारचा आनंद वाटतो व बुद्धीला स्वाभिमानाची निशा चढते, ती वाटावयाची नाहीं. व साधारणतः मनाच्या अस्वस्थतेपलीकडे ह्या आपत्तींत सांपडलेल्या माणसाला दुःख होणार नाहीं. परंतु ज्याचीं शस्त्रास्त्रें तयार, साधनसंपत्ति विपुल व ज्याच्या बुद्धीला व्याप प्राप्त झाला आहे, त्याला जर त्या त्या गुणाच्या प्रसाराला जागाच मिळूं दिली नाहीं तर त्याचा विलक्षण कोंडमारा होतो.

सध्यां अस्पृश्येतर हिंदूंचें काय झालें आहे पहा. युरोपांतील अथवा इंग्लंडांतील चांगल्या चांगल्या बुद्धिमान लोकांशीं सहज स्पर्धा करूं शकतील असे लक्षावधि बुद्धिमान लोक सध्यां हिंदुस्थानांत आहेत. प्रसंगच आला तर आपल्या बुद्धितेजानें मोठमोठ्या मी मी म्हणविणाऱ्या धुरंधरांना आजपर्यंत कित्येकांनी दिपवून सोडिलें आहे. प्रत्यक्ष गव्हर्नराची जागासुद्धां आपल्या बुद्धीच्या प्रभावाला कमीच पडत आहे अशी तक्रार करणारे लोक येथें आहेत.

पण बुद्धिमत्तेची अशी सुबत्ता असतांना केवळ मध्यम प्रतीचीं किंवा कनिष्ठ प्रतीचींसुद्धां युरोपियन माणसें येथें आणून त्यांजकडून बुद्धीचीं कामें करविण्यांत येतात. पण एतद्देशीय लायकांना मात्र संधि देत नाहींत. राजा तोडरमल्ल, पूर्णय्या, नाना फडणवीस अशांसारखे थोर थोर मुत्सद्दी व चतुर पुरुष येथें पूर्वी होऊन गेलेले आहेत व विक्रम, शिवाजी अशांसारखे घटनापटु राजे सम्राट झालेले आहेत. अशा लोकांच्या संस्कृतींत उत्पन्न झालेल्या बुद्धिमंतांना आपल्या डोक्यावर कमी बुद्धीच्या माणसांकडून अंमल चालवून घेणें केवळ अवमानाचेंच वाटेल.

दुसरी शिपाईगिरीची गोष्ट घ्या. ज्याच्या बळावर खुद्द इंग्रजांनीच येथील अनेक लढाया जिंकल्या व जिंकीत आहेत त्या लोकांतून मोठमोठे सेनापति उत्पन्न होणार नाहींत असें आहे कीं काय? मिसरूड न फुटलेलीं पोरें येथें आणून कसलेल्या शिपायांवर त्याजकडून हुकमत चालविण्यांत यावी, प्रत्यक्ष युरोपियन फौजांशीं ज्यांनीं कित्येक वर्षेंपर्यंत खडा सामना केला आणि प्लासीला सुरू झालेला डाव निदान पंचाहत्तर वर्षे तरी इंग्रजांस जिकूं दिला नाहीं, त्यांच्या शौर्यादि गुणांचा व्यापार कोठें व्हावा? आणि झाला तर त्याचें चीज होण्याची संधि कोठें आहे वरें? कसलाहि रणपंडित असो तो सुभेदार मेजरीच्या पलीकडे जाऊंच शकत नाहीं. हीच गोष्ट कलाकुशल, शिल्प, हरहुन्नर इत्यादि सर्व बाबींत, व्यापार–टापारांत सर्वत्र लागू आहे. यावरून ध्यानांत आलें असेल कीं, ज्यांची बुद्धि व मनःसामर्थ्यें चांगलीं विकसलीं आहेत, त्यांच्या मनोव्यापाराला या राज्यांत मुळींच संधि मिळत नाहीं. अर्थात् मन नाराज होऊन इंग्रज सरकारच्या विरुद्ध हे सर्व लोक बोलूं लागले आहेत. म्हणजे काय कीं, वर जें सांगितलें आहे कीं, माणसाच्या गुणविकासाला संधि असावी तशीच विकसित गुणाच्या प्रसारालाहि संधि असावी, हा दुहेरी न्याय खरा आहे. अस्पृश्यांच्या बाबतींत पहिल्या गोष्टीला संधि नाहीं आणि अस्पृश्येतर लोकांच्या बाबतींत दुसऱ्या बाबतींत न्याय नाहीं. अर्थात् दोघांचेंहि भांडण भिन्न भिन्न प्रतिस्पर्ध्यांशीं असलें तरी त्यांस भांडणाचें उठाण एकाच भूमिकेवरून झालेलें आहे. हा बुद्धिवाद लक्षांत घेऊन जाणीक अस्पृश्यांनीं स्वराज्यविषयक चळवळीला अन्यायाची म्हणूं नये, निदान तिची अवहेलना करूं नये. त्यांचीं त्यांचीं कामेंच त्यांना डोईजड असल्यामुळें त्यांना

स्वतः या चळवळींत पडतां आलें नाहीं तर त्यांनीं पडूं नये इतकेंच फार तर म्हणतां येईल.

गरीब विद्यार्थ्यांची सोय—

अस्पृश्य जातींच्या मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून बोर्डिगें काढण्याची कल्पना अमलांत येत आहे. त्याच वेळीं गरीब विद्यार्थी पोसण्याचें आणखी एक सामाजिक वळण त्यांस माहीत व्हावयास पाहिजे. पण त्याच्या आधीं बोर्डिगाविषयीं थोडें लिहितों. बोर्डिग म्हणजे काय याविषयीं अस्पृष्ट लोकांत पुष्कळ भोळसर कल्पना चालूं आहेत; म्हणून निरनिराळ्या तऱ्हेच्या बोर्डिगाविषयींच्या कल्पना अज्ञान लोकांस नीट समजावून दिल्या पाहिजेत. हें केलें म्हणजे मग त्या कल्पना किती व्यवहार्य आहेत किंवा अव्यवहार्य आहेत, त्यांत सोपेपणा किंवा अवघडपणा किती आहे, हें त्यांच्या ध्यानांत येईल, व गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या सोईचा प्रश्न केवळ बोर्डिगची कल्पना उचलल्यानें भागणार नाहीं, हें त्यांस पटेल.

पुण्यासारख्या ठिकाणीं मोठमोठाल्या शाळा व कॉलेजें आहेत. त्या शाळांचा व कॉलेजांचा लौकिक फार दूरवर पसरलेला आहे. अशा संस्थांतून आपल्या मुलांना शिक्षण मिळावें अशी इच्छा दूरदूरच्या लोकांना साहजिकच होते. शिवाय त्यांच्या त्यांच्या गांवीं अशा संस्था मुळांतच नसल्यामुळें ते लोक आपलीं मुलें अर्थातच इकडे धाडतात. पण येथें परगांवीं हीं मुलें यावयाचीं तर त्यांनीं राहावें कोठें? जेवावें कोठें ? त्यांच्यावर देखरेख कोण करणार? तीं पुण्यासारख्या परठिकाणीं कशीं वागतात, त्यांस संवयी कशा लागतात, आईबापांकडून महिन्याच्या महिन्याला येत असलेल्या पैशाचा व्यय तीं कसा करतात, हें कोणी पहावयाचें? अर्थात् ज्या शाळांत किंवा कॉलेजांत हे विद्यार्थी अभ्यासासाठीं येतात त्यांच्या चालकांना हा प्रश्न सोडवावा लागतो. आणि म्हणून हें काम ते आपल्याच शिरावर घेतात. मोठमोठाल्या इमारती बांधून किंवा भाड्यानें घेऊन त्या ठिकाणीं मुलांना राहण्याला सोइस्कर जागा करतात. आचारी, पाणक्ये नोकरीस ठेवून त्यांच्या जेवणाची सोय करतात. महिन्याला जो कांहीं खर्च येईल तो सर्व मुलांवर वांटून देऊन त्यांचे आईबापांकडून महिन्याचे महिन्यास पैसे आणवतात व आणलेल्या पैशाचा हिशेब पालकास

कळवितात. मुलांच्या वर्तनावर सक्त नजर राहून, आईबापापांसून दूर राहिलेल्या व शहरच्या फंदांत येऊन पडलेल्या या मुलांच्या अभ्यासाची घडीही ह्या कैचींत नीट जभून वसते. आईबापांना हेंच हवें असतें. शिवाय ते घरचे सुखी असल्यामुळें पैसे धाडण्याची खळखळ ते कधींच करीत नाहींत. त्यांचें पाहणें एवढेंच असतें कीं पैका किती का पडेना, आपलीं मुलें चांगल्या ठिकाणीं रहावीं, त्यांच्या खाण्यापिण्याचा उत्तम बंदोवस्त असावा व त्यांना संगति भल्या माणसांची असावी. अशा प्रकारची राहण्याची जी सोय केलेली असते तिला रेसिडेन्सी किंवा बोर्डिंग म्हणजे विद्यार्थीविसतिगृह असें म्हणतात.

कांहीं कांहीं वेळां सरकार आपल्या खर्चानेंच बोर्डिंगें चालू करतें व विद्यार्थ्यांना जेवावयाला घालून शिकवितें. आपल्या पदरचे पैसे खर्च करून अशी व्यवस्था करण्यांत सरकारचा कांहीं हेतु असतो. क्वचित् प्रसंगीं ज्या विद्येकडे लोकांचें लक्ष लागत नाहीं, पण लागावयास तर पाहिजे असें सरकारास वाटतें व लोकांच्याही तें हिताचें असतें, ती विद्या शिकविण्यासाठीं सरकार अशी सोय करतें. केव्हां केव्हां विशेष प्रकारचे नौकर तयार करणें सरकाराला जरूरच असतें. तेव्हांही पदरखर्चानें सरकार ही गोष्ट करतें. क्वचित् प्रसंगीं विद्येची गोडी लागावी व सामर्थ्य नसलेल्या गरीब विद्यार्थ्यांस शिक्षण मिळावें यासाठींही सरकार अशी व्यवस्था करतें. अशीं बोर्डिगें अर्थातच फार थोडीं आहेत. निरनिराळीं ट्रेनिंग कॉलेजें म्हणजे जेथें चांगले शिक्षक तयार करण्याचें काम चालतें व पुणें येथील डिप्रेस्ड क्लासेस बोर्डिंग म्हणजे जेथें गरीब पण लायक अशा अस्पृश्य विद्यार्थ्यांची सोय केली आहे, तीं अशा प्रकारच्या सरकारनें उघडलेल्या मोफत बोर्डिगांचीं उदाहरणें होत.

आतां ज्यांना आईबापांकडून शिक्षणाची सोय होणें शक्य नसतें, सरकारांतूनही ज्यांची व्यवस्था लागत नाहीं, पण जीं लायक असूनहि केवळ गरीबीमुळें विद्येला मुकतात अशा मुलांची संख्या खूप मोठी असते. त्यांना घरीं खावयाला नसतें, सरकारही त्यांजकडे पाहात नाहीं; तर मग या मुलांची व्यवस्था काय करावयाची? यांना केवळ वाऱ्यावर सोडावयाचें काय? तसें केलें तर इतकी थोरली बुद्धि आपण होऊन मरूं दिली असा त्याचा अर्थ होईल. म्हणून समाजांतील कोणी कर्तबगार माणूस या प्रश्नाच्या मागें लागतो.

एकंदरींत सर्व समाजाला या मुलांचें शिक्षण व्हावें असेंच वाटत असतें व समाजांतील शेंकडों लोक त्यांच्या जेवणाखाण्याचा व शिक्षणाचा खर्च थोडाथोडा उचलावयास कबूल असतात; पण हें सर्व करावयाचें कोणी? तर समाजहिताची काळजी वाहण्यास एखादा मनुष्य पुढें होतो व आतांच सांगितलेली समाजांत विखरून राहिलेली औदार्यबुद्धि कामीं लावतो. हरतऱ्हेचें साहाय्य जमवितो. वर्गणी, देणग्या, पुस्तकें, घरें, वस्त्रें, भांडीं जें जें कांहीं मुलांच्या संगोपनाला, वस्तीला व शिक्षणाला जरूर असेल तें तें जमवितो व चौकस बुद्धीनें गरीब पण होतकरू मुलांची निवड करून त्यांच्या शिक्षणाचें कार्य सुरू करतो. अर्थात् हें लक्षांत आलेंच असेल कीं, या सर्व मुलांच्या खर्चाचा बोजा शेवटीं समाजच उचलतो,पण ही गरीब मुलें व दानशूर स्त्रीपुरुष ह्यांची गांठ घालून देणें किंवहुना या स्त्रीपुरुषांचीं मनें वळवून त्यांच्या दातृत्वाचा ओघ या कार्याकडे वळविणें हें काम मोठ्या जोखमीचें, कष्टाचें व थोडें चुकल्यास फार दोष पदरीं टाकणारें असें आहे.दहा घरचा पैसा जमवावा व तो दहांच्या पसंतीनुरूप खर्च करावा, हें काम साधें नाहीं. याला माणूस फार निरलस, साधा, निर्लोभी आणि सर्वांच्याही वर हातीं धरलेल्या मुलांचें कल्याण व दात्या लोकांच्या पैशाचा सदुपयोग यांविषयीं दक्ष असा असावा लागतो. या संस्थेलाही बोर्डिंग म्हणावयास हरकत नाहीं. हें सर्वस्वी लोकाश्रयावर चालतें.

असलीं बोर्डिंगें महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं झालीं आहेत व निरनिराळ्या जातींचीं झालीं आहेत. अनाथ–विद्यार्थी–गृह या नांवानें ओळखलें जाणारें पुणें येथील विद्यार्थीगृह याचें ठळक उदाहरण होय. प्रो. कर्वे यांचा अनाथ बालिकाश्रम मूळचा सर्वस्वी याच स्वरूपाचा होता. बांईची पहिली प्राज्ञपाठशाळा हें याच पद्धतीच्या बोर्डिंगाचें आणखी एक नमुनेदार उदाहरण आहे. ज्या ज्या वेळीं मागसलेल्या जातींतील प्रौढ माणसेंसुद्धां "आम्हांला बोर्डिंग काढावयाचें आहे" असें म्हणतात, त्या वेळेस त्यांच्या मनांत आतां वर्णिलेल्या प्रकाराचेंच बोर्डिंग काढावयाचें असतें. त्यांचा हेतू फळास येणें किती कठीण आहे हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. याला कारण गैरमाहिती हें होय. आपआपले समाज ही कल्पना मान्य करण्यास किती उन्मुख आहेत याचें वरोवर ज्ञान चळवळ करणाऱ्यांस नसतें; व त्यांजपाशीं राहणाऱ्या विद्यार्थ्यांनाही

यांत पडणाऱ्या कामाकाजांची नीट कल्पना नसते. रा. केतकर यांच्या अनाथ विद्यार्थी–गृहाचेंच उदाहरण घ्या. या गृहांतील हरत-हेचीं कामें विद्यार्थ्यांनाच करावीं लागतात. "काम कसलेंही पडो, आपलें जेवण व शिक्षण ही संस्था चालवीत आहे, हे आपल्यावर केवढे उपकार आहेत, येथें शिक्षण मिळालें नसतें तर आपण अडाणीच राहिलों असतों." अशा प्रकारच्या जाणीवेनें त्यांतील विद्यार्थ्यांचें मन प्रसन्न असावें लागतें. पुण्यांतील लोकांस हें माहितच आहे कीं या संस्थेंतील विद्यार्थी दर आदितवारीं निरनिराळ्या पेठा वाटून घेऊन भिक्षा मागण्यासाठीं जातात. कांहीं धान्याच्या व्यापाऱ्यांनीं आपल्या दुकानांतील "मात्र" आठ दिवस सांठवून दर आठवड्याला यांना देण्याचें कबूल केलें आहे. हें "मात्र" घरीं नेऊन धुवून, खाण्यालायक करणें हेंही काम विद्यार्थीच करतात. इतक्या सगळ्या विद्यार्थ्यांचीं स्वयंपाक, धुणें इत्यादि कामें मोलानें करवून घेऊं म्हटलें तर जमा झालेली पुष्कळशी वर्गणी त्यांतच नाहींशी होईल. म्हणून मुलांनींच हीं सर्व कामें करणें त्यांच्याच हिताचें ठरतें. अशा रीतीनें हीं मुलें विद्याभ्यास करीत आहेत असें समाजानें पाहिलें म्हणजे त्याला कौतुक उत्पन्न होतें व जास्त मदत करण्याची इच्छा होऊं लागते. वरील विद्यार्थी–गृहांतील मुलांना या गोष्टींचा अनुभव नेहमीं येतो. कोणी एखादा आपल्या घरच्या लग्नमुंजींत यांना मुद्दाम आवर्जून आमंत्रण देतो. कोणी श्राद्ध–पक्षाला खर्च होणारा शिधा यांनाच पोहोंचवितो. यांचें नित्याचें अन्न अगदीं जाडेंभरडें व अर्धवट कोरडें असेंच असतें. हें दयार्द्र बुद्धीनें लक्षांत घेऊन, आपल्या स्वतःच्या मुलांना सुग्रास खाल्ल्यानें जसा आनंद होतो तसा या मुलांना आपल्या हातून एखादे वेळीं तरी मिळावा अशी दया उत्पन्न होऊन, कोणी एखादा त्यांस पक्वान्न करून जेवावयास बोलावितो. साताऱ्यास रा. भाऊराव पाटील यांनीं सर्व जातींच्या मुलांचें बोर्डिंग चालविलेलें आहे व तेंही लोकाश्रयावरच चाललें आहे. या बाबतीत त्यांच्या इतकी काटकसर आजवर कोणीही करून दाखविली नाहीं. सांगावयाचें तात्पर्य हें कीं, समाजाच्या औदार्यावर अवलंबून असलेलीं हीं मुलें ज्या पद्धतीनें राहावयास पाहिजेत त्याच पद्धतीनें राहात आहेत असें दिसलें म्हणजे समाजही अधिक उदार बनत जातो. पण केवळ मुलें चांगलीं वागलीं व त्यांनीं आपली स्थिति ओळखून वर्तन केलें म्हणजे झालें असें नाहीं. असल्या

संस्थांच्या चालकांवर फार मोठी जबाबदारी असते. या गोष्टीचा उल्लेख वर आलाच आहे. आपण काय करावयास निघालों आहों व लोकांच्या धर्म-बुद्धीस आव्हान करावयाचें तर आपलें वर्तन कसें असावयास पाहिजे हें त्यानें नीट ओळखिलें पाहिजे. असल्या प्रयत्नांत पडून फजीत झालेलीं माणसें कांहीं थोडीं नाहींत. असो, तर "असलें बोर्डिंग काढावयाचें आहे" असें म्हणतांना किती विविध जबाबदारी आपल्यावर येऊन पडते याची चांगली जाणीव अज्ञान माणसांना नसते. त्यांत अपयश व निराशा हीं पुन्हां पुन्हां भेडसावीत पुढें येतात हेंही त्यांना माहीत नसतें. त्यांना असें वाटतें कीं चोहोंकडून मदतीचा उल्हास सर्वत्र पसरला आहे, व फक्त हांक मारण्याचाच अवकाश कीं, माणसें आपआपल्या वर्गण्या घेऊन महिन्याच्या महिन्याला भराभरा धांवत येतील व आपलें काम म्हणजे फक्त ही हांक ठोकणें येवढेंच आहे. पण हें असें नाहीं. म्हणून ही बोर्डिंगाची कल्पना मनांत येतांच त्या कामांत पडलेल्या एखाद्या माणसाला त्यांनीं जाऊन विचारावें म्हणजे संस्था उत्पन्न करून वाढविणें म्हणजे काय याची चुणूक त्यांना कळेल.

पण ज्या अस्पृश्यांच्या संबंधानेंच हें लिहिणें चालू आहे त्यांच्या बाबतींत तर अडचणी याहूनही जास्त आहेत. शिकणारीं मुलें सांपडतील; त्यांत पुष्कळ लायकही असतील; संस्थासंवर्धनाला लागणारे गुण अंगीं असलेले लोकही मिळूं शकतील पण खरी गोष्ट म्हणजे आपल्या समाजाचीं मुलें शिकत आहेत तर त्यांची सरबराई करणें अवश्य आहे हा विचार त्या समाजांत मुळींच रुजलेला नाहीं. पण रुजून सुद्धां इतकासा उपयोग नाहीं. एकंदर मानानें पाहतां या समाजांतील माणसांची प्राप्ति फार अल्प असते. आपआपल्या मुलाला शिकवावयाचें असा प्रत्येकानें निश्चय केला तरीसुद्धां तो चालेल किंवा नाहीं याविषयीं शंकाच आहे; कारण घरांतील सर्व मुलांमुलींना चांगलें शिकवणें हें किती जिकिरीचें होत चाललें आहे याची जाणीव वरिष्ठ वर्गांतही शेंकडों लोकांना आहे. असें जर आहे, म्हणजे आपआपलेंच जर भागेना तर धर्मादाय द्या कोठला,असा प्रश्न सहजच येतो; व तो दिला नाहीं तर त्यांना कोणी दोष देऊं शकत नाहीं. पण हेंही खरें कीं कितीही हालअपेष्टा असल्या तरी दमडी अधेली कां होईना दूर करून धर्मादाय केली पाहिजे व विद्या ही वस्तु अशीच आहे कीं तीवर हा निढळाच्या घामाचा पैसा खर्च केलाच पाहिजे,

अशी खोल श्रद्धा अस्पृश्य समाजांत अजून उत्पन्न झाली नाहीं. ती होत आहे हें निर्विवाद आहे. शिवाय आणखीही एक विचार सांगावासा वाटतो. तो सांगितल्यानें अस्पृश्य समाजांतील माणसांना थोडें वाईट वाटेल; पण ही आपत्ति पत्करून सुद्धां विषयाच्या सर्वांगीण विवरणासाठीं मला तो सांगितला पाहिजे. तो विचार हा. आपल्याचपैकीं एखाद्याच्या हातांत पैका नेऊन द्यावा व त्याच्या हातून त्याची विल्हेवाट होत राहावी असें सुरू झालें म्हणजे तो मनुष्य सचोटीचा असूनसुद्धां त्याच्या प्रामाणिकपणाविषयीं शंका अज्ञान लोकांत चालू होतात. हा जो सामान्य नियम तो अस्पृश्यांना फारच लागूं आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. यामुळें पुष्कळ कर्तबगार माणसेंसुद्धां विनाकारण एकादें खेकटें गळ्यांत घेऊन आपलें नांव बद्दू करून घ्यावयास नाकबूल होतील. असो.

या सर्व अडचणींचा उल्लेख येवढ्यासाठींच केला आहे कीं हीं बोर्डिगें काढण्याचें काम किती अवघड आहे हें अज्ञ लोकांस कळावें. पहिल्या प्रकारचीं बोर्डिगें हीं आपल्या विचारांतीलच नव्हत. दुसऱ्या प्रकारचीं केवळ सरकारच्या खुषीवरचीं आहेत व तिसऱ्या प्रकारचीं आतांच वर्णिलेल्या स्वरूपाचीं व भानगडीचीं आहेत. याचा अर्थ हीं अनाथ–विद्यार्थीगृहें कोणी उघडूं नयेत असा नव्हे. कोणाच्या अंगांत हिंमत असेल तर त्याचा निरुत्साह करणें हें पातक होईल. पण कामाचें खरें स्वरूप काय आहे हें ध्यानांत यावें म्हणून केवळ वरील ऊहापोह केला आहे. या अडचणी असूनही जो कोणी कार्य करून दाखविण्याची उमेद दाखवितो व त्याहीपेक्षां कार्य सिद्ध करून दाखवितो तो शूरच होय.

पण या दोन्ही गोष्टी नाहींत असें झालें तर अस्पृश्य समाजानें काय गप्प बसावें? आपल्या समाजांतील गरीब पण लायक विद्यार्थ्यांची विद्या आश्रयावांचून कुचंबूं द्यावी काय? याला कांहीं तरी मार्ग काढिला पाहिजे. तो सांगणें हाच या लिहिण्याचा मुख्य उद्देश होय. आजपर्यंत इतर समाजानें काय अनुभव घेतले आहेत ते शोधून पहावे. ब्राह्मणसमाजांत बहुतेक करून सर्वांना विद्या येते. विद्या शिकण्यावांचून राहणें म्हणजे आपलें जिणें व्यर्थ होय असें त्यांना वाटतें. ब्राह्मणसमाजांतील सर्व शिकाऊ लोकांचे वडील आपल्या मुलांच्या

शिक्षणाला पैका खर्चं करण्यासारखे असतात असें मुळींच नाहीं. शेंकडों गरीब लोक असे आहेत कीं, ज्यांच्या घरांत दोन प्रहरची भ्रांत असते. हे लोक आपलीं मुलें कशीं शिकवितात ? यांचीं मुलें सरकारनें बोर्डिंग न काढतां किंवा एखाद्या अनाथ विद्यार्थीगृहाचा आश्रय न घेतां जर विद्या करीत असतील तर त्यांनीं ती कोणत्या सोयीच्या बळावर केली हें पाहिलें पाहिजे व ती सोय जर आपल्या कल्पनेला व गृहव्यवस्थेला पटली तर तिचा अवलंब अस्पृश्य समाजानेंही केला पाहिजे.

सुधारणा म्हणजे नवीन काळाला योग्य अशा नवीन पीठिका उत्पन्न करणें. त्या नवीन काळाशीं आपलें जीवित जुळवून देतात म्हणून त्यांना "बरोबर, न्याय्य, हिताच्या" अशीं विशेषणें आपण देतों. त्या नवीन चाली उत्पन्न करतांना आपण जुन्या टाकून देतों. कारण, नवीन काळाशीं त्या आपलें जीवित जुळवून देत नाहींत. पण त्या केव्हां तरी उपयुक्त होत्याच होत्या. कारण पिढ्यान्‌पिढ्या माणसांनीं त्या बुद्धिपुरःसर चालविल्या होत्या. हें लिहिणें ज्या समाजांत एक प्रकारच्या चाली बदलून दुसरे परिपाठ उत्पन्न करावयाचे आहेत त्यांच्या संबंधींचें झालें. पण कांहीं समाजांत सुधारणा याचा अर्थ एकादी गोष्ट घडवून आणण्याचे बाबतींत निराळें वळण घेणें इतकाच नसून, जीवितांत एक स्वतंत्रच उपक्रम करणें असा होतो. अस्पृश्य समाजांत विद्या शिकणें हा नवीनच उपक्रम आहे. व ती शिकण्याचे कामीं गरीब लोकांची काय सोय करावी हा प्रश्न प्रस्तुत आपणांसमोर आहे. या बाबतींत ज्यांनीं ज्यांनीं असे प्रयत्न केले आहेत त्यांचें उदाहरण घेण्यास अस्पृश्यांनीं मुळींच कचरूं नये. सामाजिक प्रगति म्हणजे सर्वांच्या सुखसोयींच्या बाबतींत परस्परावलंबानें पुढें पाऊल पडणें हें होय. ब्राह्मणसमाजांत अशा रीतीनें गरीब विद्यार्थ्यांना विद्या शिकविण्याच्या बाबतींत एक फार सुंदर योजना केलेली आहे व तिचा फायदा शेंकडों विद्यार्थी घेत असतात. या योजनेचें स्वरूप ऐकावयास थोडें कठीण आहे. पण विद्या शिकणें ती वाटेल तें करून शिकूं असा निर्धार असलेल्या माणसांनीं तिचा अवलंब शतकानुशतक केलेला असल्यामुळें ज्या इतर जातींचा तसा निर्धार असेल त्यांनीं तिचा अवलंब बेलाशक करावा. मग तें दिसावयास कितीही कठोर असो.

मधुकर हा शब्द भुंग्याला लावतात. मधुकर म्हणजे मध जमा करणारी

माशी. या फुलावर जावें, एक कणभर मध शोधून घ्यावा, मग त्या फुलावर जावें, तेथें एक कण शोधून घ्यावा असें करीत करीत पुष्कळ मध सांठवावा, म्हणजे चार ठिकाणीं हिंडून आपलें खाद्य जमा करावें अशी या मधुकराची वृत्ति असते, ही माशी ज्याप्रमाणें आपलें अन्न निरनिराळ्या फुलांतून गोळा करिते त्याप्रमाणें जो विद्यार्थी निरनिराळ्या घरीं हिंडून आपलें अन्न गोळा करितो त्यास मधुकरी असें म्हणतात. दहा वाजण्याचे सुमारास स्नान आटोपून सोंवळें नेसून हा विद्यार्थी, आंत ताट घातलेली एक झोळी हातांत घेतो व त्याच हातांत आमटी वगैरेसाठीं एक भांडें घेतों; व ज्या आळींत तो राहात असेल त्या आळींतील घरांत जाऊन "ओम् भवति भिक्षां देहि" म्हणजे "अहो, घरधनीणबाई, भिक्षा वाढा' असें म्हणतो. तो शुचिर्भूत असल्यामुळें जेवणाच्या जागेपर्यंत येतो. त्याचा आवाज कानीं पडतांच घरांतील बाई त्याला मधुकरी वाढते. पण नेहमीं वाढावयाची पद्धति अशी असते कीं जितके मधुकरी यावयाचे असें माहीत झालेलें असतें तितके भाकरीचे चतकोर एका ताटांत मांडून ठेवितात व त्या प्रत्येकावर थोडा थोडा भात व वरण घालतात. हें ताट एका ठराविक ठिकाणीं ठेवून देतात. मधुकरी आला म्हणजे तो 'ओं भवति भिक्षां देहि' असें म्हणतो व त्या ठरलेल्या ठिकाणच्या ताटाजवळ जाऊन एकच चतकोर उचलून घेतो. दुसरा आला म्हणजे दुसरा घेतो. अशा प्रकारें ज्याचा भाग तो घेऊन जातो. घरांतील स्वयंपाकापैकीं केवढा हिस्सा मधुकऱ्यांना घालावयाचा हें ज्याच्या त्याच्या ऐपतीवर अवलंबून असतें. पण एवढें मात्र खरें कीं माधुकऱ्याला विन्मुख दवडणें आम्हीं थोडें फार पातकच समजतों. नवीन माधुकरी आला तर घरवाला एक दोन दिवसांत त्याची चौकशी करतो व हा विद्येसाठीं मधुकरी मागत आहे अशी स्वतःची खातरी करून घेतो. पण चांगला धडधाकट असून विद्याही शिकत नसेल तर अशा मधुकऱ्यास चार दोन दिवस मोहोवतीखातर जरी धर्म केला तरी "तुम्ही कांहीं काम करून पोटाला कां मिळवीत नाहीं?" असें साफ विचारावयास आम्ही चुकत नाहीं. यांतील मर्म हेंच आहे कीं मधुकरी मागणें व मधुकरी घालणें ही संस्था, गरीब विद्यार्थ्यांची विद्या शिकण्याची सोय व्हावी, यासाठींच केवळ आहे. या संस्थेचा फायदा शेकडों गरीब विद्यार्थी घेतात. अलीकडे शहरांतील एकादा अति शहाणा माणूस "येथें मधुकरी मिळणार नाहीं" अशी

पाटी लावितो. तरी एकंदरीनें सर्व समाज ही संस्था चालत राहावी यालाच अनुकूल आहे. शुचिर्भूत होऊन केवळ विद्यार्जनासाठीं आपल्या घरीं येऊन 'बाई मला भिक्षा वाढा' असें जो म्हणत येईल त्याला तोंडभर 'नाहीं' असें म्हणणें सहसा कोणाच्यानें होणार नाहीं व स्वतःच्याच गरिबीमुळें जर असें म्हणण्याचा प्रसंग आला तर घरधन्याला अत्यंत क्लेश होतील. मधुकरी मागणाराला अशी जाणीव असते कीं आपण केवळ पोट जाळण्यासाठीं हें दैन्य पत्करलेलें नाहीं, तर विद्यार्जनासाठीं पत्करलेलें आहे, व यजमानालाही वाटत असतें कीं, आपलें दान सत्पात्रीं होत आहे. कांहीं झालें तरी ही भीकच आहे हें उघड आहे व तितक्या पुरती तिची लाज वाटावयाचीच; पण तिच्या थोर हेतूमुळें मधुकऱ्याला थोडा नैतिक आश्रय असतो इतकेंच. आपण केवळ भिकारी नव्होंत तर सर्वसंमत अशा एका सामाजिक चालरूप संस्थेचा उपयोग करून घेत आहोंत अशा कल्पनेनें तो भिकेची खंती कमी मानतो. असो. या पद्धतीनें विद्याभ्यास करून नांवलौकिकास चढलेलीं माणसें आमच्या समाजांत किती तरी आहेत.

यासारखीच पण जरा जास्त सोईची व विद्यार्थ्याला कमी अपमानकारक अशी दुसरीही एक पद्धति आमच्या समाजांत रूढ आहे. ती पद्धति म्हणजे वाराची. पुण्यासारख्या शहरीं या पद्धतीचा अम्मल फार जारी असतो. शेजारच्या अथवा दूरच्या गांवांत एकादा हुषार विद्यार्थी असतो. शाळेंत त्याचा वर नंबर असतो. तेथें ४–५ इयत्ता झाल्या म्हणजे पुढें शिकण्याची सोय नसते व कोठें दुसरीकडे जावें तर खर्चाला सामर्थ्य नसतें. अर्थात् अशा विद्यार्थ्याची कुचंबणा सुरू होते. घरच्या माणसांनाही मुलाची विद्या करण्याचें सामर्थ्य आपल्या पदरीं नाहीं असें पाहून फार दुःख होतें. शेवटीं मुलाला परिचित कल्पना सुचते. तो म्हणतो मी पुण्यास किंवा एकाद्या मोठ्या शहरीं जातों. तुझें तेथें कसें चालणार असें विचारल्यास 'मी मधुकरी मागून खाईन, मला कोणीतरी वार देईल, पण मी विद्या शिकेन' असें उत्तर तो करतो. आपल्या मुलानें भिक्षा मागावी ही गोष्ट बापाच्या जिवावर येते. पण मुलगा होतकरू असतांनासुद्धां त्याला दगड करून ठेवण्यापेक्षां भीक मागावी लागली तरी हरकत नाहीं हा विचार परंपरागत संस्कारामुळें प्रबळ होतो व तो मुलास

परवानगी देतो. शाळेंतील मास्तरांचें हुषारीबद्दलचें व जमल्यास, शहरांत गेल्यावरोबर कोठेंतरी टेकावयास तात्पुरती जागा सांपडावी म्हणून, कोणाच्या तरी ओळखीचें पत्र घेऊन हा मुलगा शहरांत येतो. पडवीला येऊन उतरला व त्यानें चिठीचपाटी दाखविली म्हणजे साधारण प्रतीचा घरंदाज माणूस तरी त्याला राहवून घेतो. मुलगा चालचालणुकीनें व एकंदर आविर्भावावरून वरा आहे, आपल्यालाही थोडयाशा सोवतीची अगर हरकामेपणाचें काम करणाऱ्या मुलाची जरूरी आहे असें घरवाल्याला दिसलें तर तो त्याला रहावयाला जागा देतो. आपल्या घरीं आठवडयांतून एक दिवस सकाळ संध्याकाळच्या त्याच्या जेवणाची हमी घेतो. कोणी स्नेही सोवती घरचे बऱ्यापैकीं असले तर त्यांच्यापाशीं भीड खर्च करतो व अशा रीतीनें या निराश्रित मुलाचे सातही वार लागून जातात. म्हणजे त्याची राहण्याची व जेवण्याची सोय झाली. तो ज्याच्या घरीं राहतो त्याच्याच दिव्यावर अभ्यास करतो, त्याच्याच मुलाबाळांत वसतो उठतो, व स्नेह जमल्यामुळें त्यांच्यांतच हंसून खेळून मायाळू घरधनीणीशीं विनयानें पण लाघवीपणानें पुत्रत्वाचें नातें जोडून आपल्या संबंधानें त्या कुटुंबांत ममता उत्पन्न करितो. ज्यांच्या ज्यांच्या घरीं त्याला वार मिळालेला असतो त्यांच्या घरचें थोडेसें काम म्हणजे स्टेशनवर पाहुण्यांना पोहोंचवावयास जाणें, मंडईंतून कांहीं आणून देणें अशासारखें काम त्याला करावें लागतें. पण हा विद्यार्थी आहे व त्याच्या अभ्यासाचा वेळ आपण घेतां उपयोगी नाहीं अशी जाणीव वाळगणारे घरवाले पुष्कळ असतात.

या पद्धतीनें विद्या संपादून पुढें चांगल्या प्रकारें संसार थाटल्यावर व लोकांत मानमान्यता मिळविल्यानंतरही आपल्या आश्रयदात्यांच्या घरीं जाऊन, त्यांनीं दिलेल्या आश्रयाचा उपयोग आपण कसा करून घेतला हें त्यांना दाखवून त्यांचे मनापासून उतराई होण्याचा प्रसंग हे प्रापंचिक विद्यार्थी पुष्कळदां साधतात. या पद्धतीचा फायदा आपल्या हुषारीच्या बळावर, आर्जवबुद्धीवर किंवा लाघवीपणानें ज्यांना मिळवितां येत नाहीं त्यांना वर सांगितलेल्या मधुकरीच्या पद्धतीचा अवलंब करावा लागतो. असो.

ब्राह्मणसमाजांत ज्या पद्धतीच्या बळावर शेंकडों विद्यार्थ्यांचा गुजारा

होतो व त्यांना विद्यालाभही घडतो त्या पद्धतीचें वर्णन वर विस्तरशः केलें आहे. ही पद्धति आमच्या समाजांत इतकी खिळून गेली आहे कीं तिचें अस्तित्व व तीपासून होणारें कल्याण यांची कल्पनासुद्धां मुद्दाम केल्याशिवाय मनांत येत नाहीं. 'दसकी लकडी' जमा झाली म्हणजे एकापुरता बोजा तयार होतो. हें वर्णन वाचून बिनमाहितगारास असें विचारावेसें वाटेल कीं एवढ्या ह्या पद्धतीनें अशीं कितीशीं मुलें तयार होत असतील? त्यांच्या समाधानासाठीं असें सांगतों कीं, मोठ्या शहरांतून व मध्यम प्रतीच्या शहरांतूनही शेंकडों विद्यार्थी या पद्धतीनें तयार होत असतात. पुणें शहराचीच गोष्ट सांगतों. येथें दीड दीड हजार विद्यार्थी असलेल्या दोन इंग्रजी शाळा आहेत. याहून कमी संख्येच्या पुष्कळ आहेत. यांपैकीं प्रत्येक इयत्तेच्या प्रत्येक तुकडींत चाळीस चाळीस मुलें असतात. अशा तुकड्या म्हणजे वर्ग सगळ्या शाळेंत मिळून चाळीस चाळीस सुद्धां असतात. प्रत्येक तुकडींत वारकरी किंवा मधुकरी दोघेतरी असतात. म्हणजे सबंध शाळेंत मिळून निदान ७५ विद्यार्थी झाले. इतके विद्यार्थी फारसा गाजावाजा न होतां व कोणाही एकावर विशेष ओझें न पडतां पोसले जातात आणि विद्या शिकतात. हें फळ वर वर्णिलेल्या सामाजिक चालीचें होय. याच्या ऐवजीं या पंचाहत्तर मुलांचें तिसऱ्या प्रकारचें बोर्डिंग काढावयाचें म्हटलें असतें तर किती यातायात पडली असती हें तसलीं बोर्डिंगें चालविणारेच सांगूं शकतील. फार मोठीथोरली रहावयास जागा, स्वयंपाकाचीं भांडींकुंडीं, इतक्यांची आंथरण्या-पांघरण्याची सोय, वर्गण्या गोळा करण्यासाठीं हेलपाट्यांस न कंटाळणारा चालक, वर्गणीदारांचीं धोरणें संभाळणारे व्यवस्थापक, हिशेब तपासनीस, अध्यक्ष, उपाध्यक्ष, कमेट्या, मतें इत्यादि गोष्टींची गर्दी उडाली असती व शेंकडों रुपये यांतच खर्चवि लागले असते. ही सर्व आपत्ति एका विशेष प्रकारच्या सामाजिक वळणानें आम्ही चुकविलेली आहे, व यापासून होणाऱ्या हिताकडे लक्ष देतां हें वळण सहसा मोडलें जाणार नाहीं असा भरंवसा वाटतो. सध्यां श्रीमंत म्हणून माहीत असलेल्या सर्वांच्या विद्याभ्यासाची चौकशी केली तर कित्येक प्रसिद्ध लोकांकडून सुद्धां कळेल कीं आपण एकदां माधुकरी किंवा वारकरी होतों.

ही पद्धत इतक्या विस्तारानें मानीव अस्पृश्यांना सांगण्याचें कारण इतकेंच कीं, त्यांनीं हिचा अवलंब केला असतां गरीब विद्यार्थ्यांचा प्रश्न सर्वस्वी नाही

तरी निदान थोडया अंशानें तरी त्यांना सोडवितां येईल. त्यांच्या समाज-स्थितीकडे लक्ष देतां एक गोष्ट सुचवावीशी वाटते. मधुकरी व वार यांपैकीं मधुकरीची चाल त्यांनीं इतक्यांत पाडूं नये. मधुकरी मागणारा व घालणारा हे ज्या मनःस्थितीचे असावे लागतात ती मनःस्थिति त्यांच्या समाजांत उत्पन्न होण्यास अजून थोडा अवकाश आहे. भीक मागेन पण विद्या शिकेन, व विद्या शिकावयाची तर भिक्षा मागण्यांत कांहींच कमीपणा नाहीं ही भावना विद्येची आवड समाजाच्या मनांत कायमची बाणल्याशिवाय, उत्पन्न होणार नाहीं. व ती अजून झाली नसल्यामुळें आपण भिक्षेकरी आहोंत अशी खंती अस्पृश्य विद्यार्थ्याला वाटत राहील. तसेंच विद्येचें महत्त्व व मधुकऱ्याची विद्या-संपादनाची आस्था हीं पटलेलीं नसल्यामुळें घरधनीणबाई पुष्कळदां अशा विद्यार्थ्याला एरवीच्या भिकाऱ्याप्रमाणेंच तिरस्कारानें लेखितील. म्हणून केवळ वाराच्या पद्धतीचा स्वीकार अस्पृश्य समाजानें सद्यःस्थितींत तरी करावा.

समाजानें अशा प्रकारें पोसलेलीं व शिकविलेलीं मुलें हीं समाजाची खरी दौलत होय. समाजाच्या अन्नावर हीं मुलें पोसलीं जाणार, तर त्यांच्या रक्त-मांसाचा कण आणि कण समाजाच्या मालकीचा होतो. त्यांना जर धार्मिक कल्पनेचें, नीतिविचारांचें शिक्षण मिळालें तर कृतज्ञताबुद्धि त्यांच्या मनांत सदैव खडी राहील व ज्या समाजानें दारिद्र्याच्या चिखलांतून व अज्ञानाच्या अंधकारांतून आपल्याला हात देऊन वाहेर काढिलें त्याच समाजाच्या हिता-साठीं आपला पोसलेला देह झिजविणें व ज्ञानदीप पाजळून एका दिव्यानें अनेक दिवे लावीत राहणें हेंच आपलें इहलोकींचें कर्तव्य आहे असें तो समजत राहील.

विद्यार्थ्याच्या मनांतील उनाडपणा व "मी कोणाचें काय लागतों" असें कदाचित् त्याची म्हणण्याची फटिंगवृत्ति ही घालविण्यास समाजानें जे अनेक उपाय करावयाचे त्यांपैकीं हा एक आहे. अशा प्रकारानेंच आपल्या हाडा-मांसाची आपल्या अन्नावर वाढलेली म्हणजेच स्वकष्टार्जित अशी बुद्धिसंपदा समाज संपादन करितो.

सरकारनें किंवा इतर लोकांनीं हक्काचें किंवा ममत्वाचें म्हणून जें जें कांहीं द्यावयास काढिलें असेल त्याचा संग्रह व उपयोग अस्पृश्य समाजानें

जरूर करावा. हक्कदारीची कल्पना धसास लावून सरकारापासून व इतर समाजांच्या एकराष्ट्रीयत्ववृद्धीला आवाहन करून, जें जें मिळवितां येण्यासारखें असेल तें तें पदरीं पाडून घ्यावें व त्याचा सदुपयोग आपण हटकून करतों हें आपल्या कर्तृत्वानें सरकाराला व इतर समाजांना दाखवून द्यावें. माझ्या अल्प बुद्धीप्रमाणें, जसें इतर समाजांचें तसें अस्पृश्यसमाजाचेंही खरें बळ, आत्मविश्वास, आत्मशोधन, व आत्मीय रक्ताच्या जिव्हाळ्याचा चिवटपणा जेणेंकरून जास्त वाढेल असे उपाय करणें, यांतच आहे. म्हणून ज्या ज्या समाजांना आपलें घटकावयव अधिकाधिक निगडित करण्याचे उपाय करतां येतील व आपापल्या गुणांना व मनःसामर्थ्याला पाणी घालून त्यांची उत्कृष्ट जोपासना करतां येईल त्यांनीं त्यांनीं ती करणें हा त्यांचा समाजधर्म होय. यानें बळ पोसेल, स्वाभिमान चेतावेल, पराक्रमाची ईर्षा उत्पन्न होईल, घरादारांत धोतीपोती करणारा नवोदित विचारांचा प्रवाह फिरत राहील व पिढ्यानुपिढ्या जन्माला लागलेलें खातेरें नाहींसें होऊन त्यांचें जीवित उपवनासारखें परम रमणीय होईल. पण या पिढीला तें भाग्य नाहीं. आपल्या नातवंडांनीं तशा प्रकारें सुखी व्हावें म्हणून झडझडून अंग झाडून कष्ट करण्याचें भाग्यमात्र सध्यां त्यांच्या वाटचास आलें आहे. त्याला त्यांनीं कंटाळूं नये. स्वकीयांसाठीं थोडा थोडा तरी त्याग करण्याची बुद्धि सध्यांसुद्धां प्रत्येकाला असलीच पाहिजे. तिलाच कालानुरूप नवें वळण देणें एवढेंच त्यांना करावयाचें आहे. आपल्या जीविताला आपण स्वतः पीळ पाडीत गेल्याशिवाय आपल्या समाजाच्या जीविततंतूला ताठरपणा उत्पन्न होईल असें त्यांनीं समजूं नये. असो. वरील गोष्टी ध्यानांत घेऊन आपल्यांतील लायक पण गरीब मुलांच्या विद्याभ्यासाची सोय बोर्डिंगाबरोबरच वर दाखविलेल्या पद्धतीनें करावी एवढीच त्यांस विनंति आहे.

अस्पृश्य समाजांतील बेकारी—

अस्पृश्य समाजानें स्वराज्य प्राप्तीचे जे देशांत यत्न चाललेले आहेत त्याच्या विरुद्ध बोलण्यांत कांहींच मतलब नाहीं. स्वराज्यामुळें देशांत भाकरी स्वस्त झाली तर तिचा उपयोग सर्वांनाच होणार आहे. मिळणाऱ्या स्वराज्यांत आमचाहि हात असूं द्या हें म्हणणें न्यायाचें आहे. पण स्वराज्याच्या खटपटीची

अवहेलना करणें अगदींच अप्रशस्त आहे. आपल्या सर्व लोकांच्या गरीबीवर स्वराज्याशिवाय दुसरें कोणतेंही औषध नाहीं. हा मुद्दा अस्पृष्टांच्या ध्यानांत यावा म्हणून प्रथम त्यांच्या बेकारीविषयीं लिहितों व मग स्वराज्य कां हवें, जातिभेद इत्यादि त्याच्या आड कसे येऊं शकत नाहींत इत्यादीविषयीं डॉ. आंबेडकर यांचें मत देतों.

बेकारी सर्वच लोकांत पसरत आहे. पण त्यांतल्या त्यांत ज्या मानीव अस्पृश्यांचें जिणें मुळांतच मोठ्या कष्टाचें, त्यांच्यांत तर ती फार झपाट्यानें पसरत आहे. सर्व सामान्य कारणांबरोबरच, अस्पृश्य समाजांत ही बेकारी पसरण्यास आणखीहि कांहीं कारणांची भर पडत आहे व त्यांत विशेष गोष्ट ही कीं, सर्वसामान्य कारणें जर केवळ पराधीन तर अस्पृश्यांतील बेकारी वाढविणारीं जीं विशिष्ट कारणें तीं स्वाधीन आहेत! पराधीन कारणें म्हणजे 'राजा मारी त्यास कोण तारी' या कोटींतील आहेत हें सर्वांना माहीत आहे. पण स्वाधीन कारणें मात्र स्पृश्य व अस्पृश्य या दोनहि समाजांनीं आपणच उत्पन्न केलीं आहेत. पराधीन कारणांचा पेंचसुद्धां आमच्यापेक्षां अस्पृश्यांना जास्त. कारण, कोणी झाला तरी त्यांच्या आधीं आम्हालाच जवळ करणार. पण या अडचणींना आपणच उभी केलेली अडचण येऊन मिळाली म्हणजे प्रश्न अधिकच बिकट बनतो. अस्पृश्य लोकांना, विशेषतः महारांना आपण सांगतों कीं, तुम्ही आपले घाणेरडे धंदे सोडा म्हणजे तुमची अस्पृश्यता जाईल हें एक; व दुसरें असें कीं, नवीन गोष्टी कानीं येऊं लागल्यामुळें त्या धंद्याची किळस त्या लोकांनाहि वाटूं लागली आहे. त्यांच्यापैकीं थोडीशीही विद्या शिकलेला मनुष्य त्या धंद्याच्या वाऱ्याला सुद्धां उभा राहत नाहीं व राहणें शक्यहि नाहीं. शिवाय असल्या धंद्यांच्या जोडीचीं जीं वतनें तींहि टाकण्याकडे महार लोकांचा ओढा आहे असें दिसतें. वतनें फार फुटीर फुटीर व म्हणून चरितार्थाला अगदींच अपुरीं पडतात. पंधरा-पंधरा, वीस-वीस डोयांना मिळून जे दाणे मिळावयाचे ते फक्त कांहीं थोडेसे शेरच असावेत असें सुद्धां क्वचितच घडून येते. असलें वतन सांभाळण्यासाठींहि खेडेगांवांत कुचंबून पडणें जरूर बनत असलें तरी एकंदरीनें पाहतां तें टाकून देऊन पोटापाठीमागें कोठें तरी जावें लागतें. त्यांतच आणखी एक भर आहे. वतन पाहावें तर असलें, पण

त्यासाठीं गांवकऱ्यांचा व गांवकामगारांचा सासुरवास मोठा. हे कोण मामलेदार आले, महाराचा मुजरा आहेच. हे कोण फौजदार साहेब आले, महाराचा मुजरा आहेच आहे. हेचसे काय, कोणीहि अळणी अम्मलदार गांवाला येवो, पाटील–कुलकर्ण्यांची लगबग तोंड–पाटीलकीपुरती; पण अंगाला तिडका वसावयाच्या महाराच्या. 'अंमलदाराची सवारी' शिवेवर मोहरल्यापासून महाराची धांवपळ सुरू व्हावयाची, ती तो दुसऱ्या शिवेला जाऊन मावळेपर्यंत सारखी चालूं असावयाची. कोणीही फाटका अधिकारी आला तरी तो सरदारच. त्याच्यापुढें पळलेंच पाहिजे: त्याला रात ना दिवस; आणि हें सगळें चालूं असतां महार जरी जिवाचें रान करून घेतो तरी 'खाणार म्हणतो वाटत' अशी स्थिति असते.

हें झालें नैमित्तिक. नित्याचा जाच कांही कमी असतो असें नाहीं. चावडी-वरच्या धन्याच्या हुकुमासाठीं अखंड पायपिटी चालतेच. पण आज हचा रावसाहेबांचीं लांकडें फोडलीं, उद्यां तमक्या साहेबांचीं फोडावयाचीं आहेत असलीं नाटपेट कामें अधून मधून बहुतेक असतातच. मोठी मेहेरबानी म्हणजे काय तर संध्याकाळची भाकरी घातली इतकीच. शिवाय थोडें चुकल्यास या हरघडीच्या चाकराची संभावना कशी होते हें लिहावयास नकोच. एकाद्या तोंडाळाला जर कोणी शुद्धीवर आणूं लागला तर 'या लोकांच्याशीं असेंच वागावयास पाहिजे' असलें व्यवहारचातुर्य तो गांवढळ तोंडाळ त्याला समजा-वितो. शिवी हसडल्याशिवाय यांना समजावयाचेंच नाहीं असें समजण्या-इतपत त्याच्या मनाचें चामडें घटावलें आहे असा न्याय सर्वत्र सुरू असतो. गांवच्या महाराला कसलें काम सांगावें आणि कसलें नाहीं याला नेमच नाहीं. घरीं बापई नसला तर बायकांना ही कामाची वेठ पोंचवावी लागते. अर्थात् असलें अपमानाचें व अपमान पत्करून सुद्धां पोटाला पुरतें न देणारें काम व वतन सोडून देण्याची प्रवृत्ति सपाटयानें वाढत आहे. म्हणजे धंदे घाणेरडे म्हणून व वतनें अपमानाचीं व अपुरीं म्हणून सोडून देण्याची प्रवृत्ति सुरू आहे. हीं बेकारीचीं स्वाधीन कारणें होत. बैतें, बलुतें इत्यादींवद्दल शेतकऱ्याशीं सारखी घासाघीस करावी लागून हमरीतुमरीवर येण्याचा प्रसंग येतो. बरे, शेतकऱ्याचेंहि आपल्यापरी खरेंच असतें. हा बळी राजा तरी काय करणार?

गांवगाडयांत वर्णिलेले सगळे उडाणटप्पू, तसेंच सावकार व उत्पन्न वाढलें आहे कीं काय म्हणून वरचेवर हुंगून पाहणारें सरकार हे सगळेच त्याला नागवावयास उभे. मेघराजाची कृपा एकाद्या वर्षीं व्हावयाची. "आतां ह्यो बाबा काय करील तें करो" असें म्हणून आशेला आलेला शेतकरी आभाळाकडे टक लावून बसलेला असतो. पावसाळा पंचांगांत येतो आणि पंचांगांत जातो. पण उभ्या सालांत शिवारावर चार थेंब पडले तर शपथ. अशीं वर्षांमागें वर्षें निघून जातात. अर्थात् त्याच्या खळ्याला जर दाणा मुवलक येईना तर तो उदार तरी होणार कसा? अशा प्रकारें खेडोपाडीं महारांची स्थिति फारच बिकट झाली आहे. वतन व गुराढोरांच्या बावतींतले धंदे यांच्याशिवाय आणखी धंदे म्हणजे शेतावर मजूरी करणें. पण याही धंद्यांत प्रविष्ट होणें कठीणच आहे. खुद्द शेतकऱ्यांना आपल्याच जातीचे लोक इतके कोठें मिळेनासे झाले आहेत कीं त्यानें महारास जवळ बोलवावें? ज्याला त्याला आपापली माणसें सांभाळतां सांभाळतां पुरेवाट झाली आहे. तालुक्याच्या व शहराच्या ठिकाणीं म्युनिसिपालिटयांतून सडका झाडणें वगैरे कोणी न करीना असलीं कामें यांच्या वांटयाला येतात. असल्या कामांनीं जीवितांत शाश्वती व सुरक्षितपणा किती उत्पन्न होणार हें दिसतच आहे. लष्कराची नोकरी हा एक महारांचा प्रतिष्ठित धंदा आहे. पण परवांचें युद्ध संपतांच सरकारनें मोठें थोरलें महारदळ खालसा करून टाकिलें. अर्थात् तिकडूनही त्यांचा कोंडमाराच होत आहे. हें महारांच्या स्थितीसंबंधानें झालें.

मांगांचेंही तेंच. महारांना त्यांचा म्हणून जातधंदा असा कांहीं नव्हता. अगदीं शेवटचे का होईना अशा तऱ्हेचे ते राजपुरुष म्हणजे सरकारी नौकरच असत. पण मांग हे जातीचा म्हणून एक धंदा वाळगून होते. आतां पाहावें तों ते सर्व धंद्यांतून भराभर उठत आहेत. कारण धंद्याला बरकतच नाहीं. धंदे राजाश्रयाशिवाय उत्पन्न होत नाहींत व त्यांतील कसब राजाश्रयावरच त्या त्या लोकांत बाणून गेल्याशिवाय धंद्याला तेजी येत नाहीं. एकाद्या स्वदेशी राजानें घायपात, केतकाड, अंबाडी अशा सारख्या तंतू-वनस्पतींची मोठी लागवड केली असती, पुष्कळ तज्ज्ञ नेमून त्यांच्या तंतूंचें परीक्षण केलें असतें, लांब व टिकाऊ धागा कसा उत्पन्न करतां येईल हें पाहून

लागवडीचें शास्त्र निर्मिलें असतें, मैलमैल लांबीचे व तुळतुळीत असे जे परकीय दोर सध्यां बाजारांत दिसतात तसले वनविण्याची यंत्रसामुग्री व त्याचें शिक्षण हीं प्राथमिक शिक्षणापेक्षांहि जास्त अगत्यानें दिलीं असतीं. पण स्वतःच्या घरचे लोक सुखी ठेवण्याच्या नादांत इंग्रज यांतील कांहीं एक करीत नाहीं. सध्यां सुमार तरी इतकाच दिसतो कीं, तो मांगाला व्होट देईल, पण भाकरी देणार नाहीं. गुन्हेगारी मोडावयास तुरुंग, फटके व पराकाष्ठा वसाहती एवढाच इलाज आहे असें सरकारास वाटतें. माणसाच्या मनाची व समाजाच्या वाढीची ही अगदीं दुबळी पारख होय. गुन्हेगारी मोडावयास स्वतःच्या श्रमानें मिळवून खाणें, या गोष्टीवर विश्वास उत्पन्न करावयास हवा. तसेंच गुन्हेगारी नसेल त्या ठिकाणींहि अति दारिद्र्यामुळें ती उत्पन्न होऊं लागते, हेंहि लक्षांत आणिलें पाहिजे. "बुभुक्षितः किं न करोति पापम्" यांतील रहस्य राज्यकर्त्यांनीं ध्यानांत घ्यावयास हवें. मोठा उद्योगधंदा उत्पन्न करून त्याच्यावर पोट चालविण्याची सोय करून देऊन सरकारनें दरिद्री लोकांना थोडी सावली उत्पन्न करावी व मग 'गुन्हेगार' 'गुन्हेगार' म्हणून हिणवावें. गुन्हेगारी नाहीं असें आम्हीं म्हणत नाहीं. पण गुन्हेगारीचा छाप जो ढळढळीत मारतो तोच स्वतः त्या समाजांतील चांगल्या प्रवृत्तीच्या पण भाकरीला महाग झालेल्या लोकांना गुन्हेगारीकडे हाकलीत नेण्याचा गुन्हा स्वतःच करीत असतो, ही गोष्ट विसरतां कामा नये. "राज्य करणारा म्हणून फटके मारतोंस, पण राज्य करणारा म्हणून भाकरी कां देत नाहींस ?" असा प्रश्न मांगानें केल्यास सरकारपाशीं काय उत्तर आहे ? जसा महारांचा समाज तसाच हा मांगांचाहि अत्यंत चिंताक्रांत आहे. वरिष्ठ दर्जाच्या लोकांना दारिद्र्य बाधत असलें तरी त्यांच्या दृष्टीला दूरचा पोंच तरी उत्पन्न झालेला असतो. दहा ठिकाणच्या दहा गोष्टी त्यांच्या कानांवर येतात. आणि उंचावर उभें राहून राष्ट्राच्या जीविताकडे पाहावयास येत असल्यामुळें कोणत्या कोष्टकांत आपण आतां जाऊन बसावयास हवें याची चिंतनिका त्यांना व्यष्टि-रूपानें किंवा समष्टिरूपानें करतां येते. पण हें उपायचिंतन सुद्धां या अज्ञान व गरीब लोकांना शक्य नाहीं. पडीक जमिनी पिकवून खावयास द्या, आम्ही त्यावर हक्क सांगत नाहीं अशा विनवण्या केल्या तरी, नुसतें एक एक उत्तर

मिळावयास दोन दोन महिने पिंगा घालावयास लावतात. ही मांगांच्या विषयीं रड झाली.

तिसरे चांभार व ढोर. अस्पृश्यांपैकीं ज्यांच्या हातीं अजून थोडासा धंदा शिल्लक राहिला आहे ते हे लोक होत. बायकांची लुगडीं व खण विलायतेहून करून धाडण्याची क्लृप्ति अजून यूरोपियन गिरणीवाल्यांनीं न काढिल्यामुळें जसे चार कोष्टी अजून जगत आहेत तसे हरतऱ्हेचीं पायताणें विलायतेहून धाडून इकडे स्वस्त विकण्याची सोय अजून तिकडल्या चांभारांनीं केली नसल्यामुळें यांना तुटपुंजी का होईना पण भाकरी मिळत आहे. शहर व शहराच्या आसपास एवढ्यांतच त्यांची स्थिति इतरांच्या मानानें कांहींशी बरी म्हणतां येईल, पण खेडेगांवांत सरसकट उपासमार पसरत चालली आहे. माणसें धंदा करावयास तयार आहेत, पण हातांत अडका नाहीं आणि सावकार पाहावा तर तो फोलून घर खातो अशी स्थिति आहे. कातडें रंगविण्यास तरवडासारखे जे जिन्नस लागतात त्यांचे मक्ते होऊं लागले आहेत असें म्हणतात. कोटयवधि रुपयांचीं कच्चीं कातडीं जहाजें भरभरून परदेशीं रवाना होत आहेत. हा धंदा निषिद्ध न मानणारे परधर्मीय भांडवलवाले म्हणजे विशेषत: खोजे इत्यादि आपलीं भांडवलें गांवोगांवीं पसरवीत असून चांभार लोक केवळ रोजदारीनें पोट भरणारे हमाल होत चालले आहेत. विलायतेहून इकडे येत असलेलीं कमावलेलीं कातडीं व त्यांच्या विविध प्रकारच्या वस्तू हीं येथल्या येथें बनविण्याची तरतूद सरकारनें केली व त्या दृष्टीनें त्या शिक्षणाची व उद्योगाची उभारणी केली तर चांभार–ढोरांचा वर्ग सुखी होईल. पण तें व्हावें कसें ? कच्चें न्यावें आणि पक्कें आणून दामदसपट करावी ही नीति राजा आचरीत आहे, तर माणसाला सुखप्राप्ति व्हावी कोठून ?

या तीनही लोकांची वर लिहिल्याप्रमाणें सध्यां फार हलाखी आहे. अर्थात् सरकारी नौकरींत प्रवेश व्हावा अशी सर्वांचीच इच्छा आहे व नवीन मनूप्रमाणें यथाक्रम सरकार यांची व्यवस्थाही लावील. पण राष्ट्रें काय, किंवा समाज काय, सरकारी नौकरीवर जगत नाहींत, त्यांस धंदे हवे असतात. लोकांनीं धंदे काढावे असें म्हणणें योग्य दिसत असेल. पण सरकार स्वत: जर धंदेवाले नसतें तरच फक्त येथें धंदे काढणें शक्य होतें. सरकारी नौकरी शेंकडा तीन

चार माणसें देखील पोशीत नाहीं. व सगळ्या बेकार लोकांची जातवार पद्धतीनें या नौकरीवर उडी पडणार आहे या गोष्टीची वर्दी या लोकांना अजून पुरती लागावयाची आहे. तोंपर्यंत "कांहीं तरी निराळें होईल" या भाबड्या आशेवर हीं सर्व माणसें तरंगत राहणार असें दिसतें. ज्यांना परिस्थितीचें तांत्रिक तरी ज्ञान झालें आहे ते भराभर शहराचा रस्ता सुधारीत आहेत. पण देशांतील उद्योगधंद्यांची ऐपतच थोडी असली तर कोठेंही गेलें म्हणून सबंध समाजाच्या मोठ्या दृष्टीनें असा फरक काय पडणार आहे? चालू आहे ही स्थिति म्हणजे धंद्यांतून उठत जाणें हें, जर असेंच चालूं राहिलें तर अखिल अस्पृश्य समाज उपरा वनून जाईल असें स्पष्ट दिसतें. **ही स्थिति जर दुरुस्त व्हावयास हवी असेल तर स्वराज्य हवें.**

स्वराज्य कां हवें?—

स्वराज्य कां हवें याची मीमांसा अस्पृश्यांपुढें करतांना डॉ.आंबेडकर नागपुरास म्हणाले:—"स्वराज्य कां हवें याचें इतर कोणतेंहि कारण जरी तुम्हांस पटलें नाहीं तरी 'दारिद्र्य' हें कारण तुम्हांस पटण्यासारखें आहे.हिंदी लोकांच्या दारिद्र्याला पृथ्वीच्या पाठीवर कोठें तरी तुलना आहे काय? एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पंचविशींत जेव्हां इंग्रजांचें राज्य या ठिकाणीं स्थिर झालें असें ठरलें, तेव्हां एकंदर पांच दुष्काळ पडले व सुमारें दहा लक्ष लोक भुकेनें मेले. दुसऱ्या पंचविशींत दोन दुष्काळ पडले व सुमारें चार लक्ष लोक मृत्युमुखीं पडले. तिसऱ्या पंचविशींत एकंदर सहा दुष्काळ पडले आणि पन्नास लाख लोक अन्नाविण मेले. व शेवटच्या पंचविशींत अठरा दुष्काळ पडले व दीड ते अडीच कोटीपर्यंत माणसें मरण पावलीं. यांचें कारण काय असावें वरें? स्पष्ट शब्दांनीं सांगावयाचें म्हणजे इंग्रजांनीं या देशांत राज्यकारभाराचें जें धोरण बुद्धिपुरस्सर ठेविलें आहे तेंच याचें कारण आहे. अगदीं आरंभापासून इंग्रज सरकारचें हें ध्येयच आहे कीं, या आपल्या देशांत उद्योगधंदे व व्यापार यांची वाढ म्हणून होऊं द्यावयाची नाहीं. हा दोषारोप केवळ अनमानधक्क्याचा आहे असें नाहीं. इंग्रजांच्या येथील राज्याच्या वहिवाटीचें हें प्रतिष्ठित असें सूत्रच आहे कीं, हिंदुस्थानाची व्यापारपेठ इंग्रजी मालाला सदैव खुली राहील अशा रीतीनें राज्य चालवावयाचें. या असल्या धोरणा-

मुळें हिंदुस्थान म्हणजे भिकारीचें माहेर होऊन बसलें आहे. या वाढत्या दारिद्र्याची हाय सर्वांत जास्त कोणाला लागते बरें?" ही हाय अस्पृष्ट समाजास जास्त लागत असेल हें केव्हांहि खरेंच आहे! पण एकंदर दारिद्र्या-विषयीं त्यांनीं जें विवेचन केलें आहे तें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. आपल्या बांधवांना उद्देशून ते म्हणतात, " जास्त हाय लागणारे लोक जर आपले आहेत तर या हृदयविदारक स्थितीकडे तुम्ही काणाडोळा करून कसें चालेल? सरकारनें सडका केल्या, कालवे खणले, आगगाडया सुरू केल्या, तारहपिसें व पोस्टें केलीं, कायदे केले, शांतता प्रस्थापिली इत्यादि बऱ्याच चांगल्या गोष्टी त्यांनीं केल्या म्हणून त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गात बसण्यांत कांहीं मतलब नाहीं. त्यांनीं हें जें केलें हें बरेंच केलें. पण एवढें ध्यानांत हवें कीं, तुमच्यासकट सगळे हिंदी लोक कायदा व शांतता यांजवर जगत नाहींत तर भाकरीवर जगतात. ती भाकरी कोठें आहे? ती मिळावी म्हणून देशाची आर्थिक स्थिति सुधारील असें सरकार आम्हाला पाहिजे अशी मागणी अस्पृष्टांनीं सुद्धां केली पाहिजे. " राजकारणी पुढारी तरी याहून दुसरे काय म्हणत आहेत? अस्पृष्टांची अत्यंत करुणास्पद स्थिति त्यांस अवगत नाहीं असें कोणास वाटतें काय? पण प्रस्तुत तरी, सामाजिक प्रश्नास त्यांचें महत्त्व देऊनहि स्वराज्य-स्थापना हाच विचार सर्वांचीं मनें व्यापून राहणार यांत कांहींच शंका नाहीं. कारण परराज्यामुळें उत्पन्न झालेलें दारिद्र्य केवळ सर्वंकष बनलें आहे. अस्पृष्ट पुढाऱ्यांच्या मनांतहि हे विचार उत्पन्न झाले हें चांगलें लक्षण आहे. त्यावरून स्पष्ट दिसून येतें कीं, राजकारणी पुढाऱ्यांची भूमिका त्यांनीं बरोबर ओळखिली.

कुंभाराचा मुलगा कुंभारच राहिला पाहिजे; इतर अधिक चांगलें काम करतां येत असलें तरी त्यानें तें करतां उपयोगी नाहीं; न्हाव्यांनीं उन्नत-शक्ति असल्या तरी, श्मश्रूच केली पाहिजे; दुसरे कांहीं जास्त धनोत्पादक असें करतां आलें तरी तें करतां कामा नये, हा परंपरागत आग्रह आतां कोणी धरू नये. कारण अनुभवानें तें तत्त्व आतां क्षीणबल ठरलें आहे. पण कुंभाराचा मुलगा कुंभारच राहिला नाहीं किंवा रंगाऱ्याचा रंगारीच राहिला नाहीं, तरी देशांत कुंभाराचा धंदा व रंगाऱ्याचा धंदा मात्र हवा हें खरेंच आहे. ज्याच्या सामर्थ्याला व रुचीला तो परवडेल तो तो करील. पण सध्यां

येथें असें झालें आहे कीं, आमच्या रंगाऱ्याच्या ठिकाणीं साहेब रंगारी,आमच्या कुंभाराच्या ठिकाणीं साहेब कुंभार, आमच्या तांबटाऐवजीं साहेब तांबट, किंबहुना आमच्या चांभाराच्या व मांगाच्या ऐवजीं साहेब चांभार व मांग असा प्रकार चालू होऊन ते ते धंदे आमच्या देशांतून अजीबात उडाले आहेत. तेली, सुतार, तांबट, रंगारी, जिनगर, चांभार, ढोर, मांग एक ना दोन हजारों धंदेवाले लोक धंदे गमावून बसले आहेत. अवघ्या बाजारपेठा परदेशी मालानें तुफान भरून चालल्या आहेत. आम्ही गिऱ्हाईक व परदेशी लोक हे दुकानदार असें झालें आहे. अर्थात् धनोत्पादक धंदे साफ बुडाल्यामुळें संपत्तीची केवळ चाळवाचाळव करणारे धंदे व ज्या सरकारी नोकरीवर शेंकडा सरासरी तीन माणसें पराकाष्ठा पोसलीं जातात ती सरकारी नोकरी आणि सर्वांचें मायपोट जी शेती ती, इतकींच काय तीं निर्वाहाचीं साधनें शिल्लक राहिलीं आहेत. पण येवढ्यानें कसें भागणार?

ज्या देशांत नवें धन उत्पन्न होत नाहीं, जेथें रानांत योग्य गवत असूनसुद्धां सरकार काडयाच्या पेट्या करीत नाहीं, समुद्र खारा असून सुद्धां मीठ काढूं देत नाहीं, खाणी सांपडण्यासारख्या असूनसुद्धां त्या खणीत नाहीं, गळिताचीं धान्यें खंडोगणती पिकत असतां तज्जन्य वस्तु उत्पन्न करण्यास प्रोत्साहन देत नाहीं, उत्तम वाळू आणि शिकून आलेले कांचशास्त्रज्ञ ही सामग्री सिद्ध असतांना त्यांचा उपयोग करून घेत नाहीं, जेथें कच्चीं कातडीं खंडीखंडींनीं परदेशीं रवाना होतात व जेथील कसबी चांभारसुद्धां युरोपियन कारखानदारांचे मजूर बनतात, तेथें नवें धन कोठून निपजणार? आणि तेथील लोक पोटभर कोठून जेवणार? हा प्रश्न सर्वांना लागू असल्यामुळें स्वराज्य-कल्पनेचें वेड लोकांना लागावें यांत कांहींच आश्चर्य नाहीं. बुद्धिमन्तांना पोटभर असा बुद्धि-वापर नाहीं; शूरांच्या शौर्याला गांवकुसवाच्या बाहेर क्षेत्र नाहीं, धनोत्पादकांना नवीन धंदे उत्पन्न करण्याचे सर्व मार्ग कुंठित करण्यांत आले आहेत. असें असल्यामुळें खालपासून वरपर्यंत सर्व लोक त्रस्त होऊन स्वराज्याच्या मागें लागल्यास त्यांत स्वार्थीपणाचें अगर असाहजिक असें कांहींच नाहीं. आजपर्यंत बोलत असलेले अस्पृष्ट पुढारी अर्धशिक्षितपणामुळें या प्रश्नाच्या बुडाशीं जाण्याचें साहस करीत नसत. हें फार मोठें वैगुण्य होतें. पण आतां तशी स्थिति राहिली नाहीं. आणि म्हणून स्वराज्यस्थापनेची कल्पना व

आवश्यकता समाजाच्या दोनहि टोकांपर्यंत जाऊन पोहोंचली आहे असें मानावयास हरकत नाहीं.

जातिभेदाचा व धर्माचा बाऊ

डॉ. आंबेडकर यांनीं आणखी एक प्रबळ विचार मांडला आहे. हिंदुस्थान देशांत इतक्या जाति, इतके धर्म, इतक्या चाली, इतक्या रीती व इतके पंथ असें असतां तेथील लोक स्वराज्यभोगी कसे होऊं शकतील असा प्रश्न खुद्द राज्यकर्ते, त्यांचे यूरोपांतील इतर साम्राज्यवादी साथीदार व आपल्याकडील समाजसुधारकापैकीं बांधली शिदोरी खाणारे व परप्रत्ययनेय असे कांहीं सुधारक हे विचारीत असतात. त्या सर्वांना डॉ. आंबेडकरांनीं फार समर्पक असें उत्तर दिलें आहे. ते म्हणतात कीं, "युद्धानंतरच्या लॅटव्हिया, रुमेनिया, लिथुऑनिया, जुगोस्लाव्हिया, एस्थोनिया व झेकोस्लोव्हाकिया या देशांत काय परिस्थिति उत्पन्न झाली आहे ती पहा. या देशांची सामाजिक स्थिति आज काय आहे? ती हिंदुस्थानांतल्या इतकीच वाईट आहे. लॅटव्हियामध्यें लेटस्, रशियन्स्, जर्मन्स्, ज्यूज् इत्यादि लोक आहेत. झेकोस्लोव्हाकियामध्यें, झेक, जर्मन, माग्यार, रूथिअन् इत्यादि लोक आहेत. हे सर्व लोक भिन्नवंशीय असून भिन्न भाषा बोलतात. तसेंच त्यांच्यांत चार चार पांच पांच धर्मपंथहि आहेत.एकाच कॅथॉलिकांचे पांच पोटपंथ आहेत.आणखी इतरहि किती तरी भेद आहेत. हिंदुस्थानांतील सामाजिक व धार्मिक गोंधळ याहून जास्त गोंधळ माजविणारा आहे असें मला वाटत नाहीं." या त्यांच्या उत्तरानें तरी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे या टिळकांच्या सूत्रवाक्याचा अर्थ आतां सर्वांस पटेल असा भरंवसा वाटतो. स्वराज्यप्राप्तीच्या आड हे भेद येण्याचें कारण नाही असें त्यांनीं बजाविलें आहे. हे भेद गेल्यावर स्वराज्यास पात्रता येणार असा सिद्धांत जे कोणी लोक मांडतात, ते वस्तूंचा अनुक्रम उरफाटा लावतात असें आंबेडकरांचें मत आहे. स्वराज्याच्या अंगीं जो एकीकरणाचा गुण आहे तो या लोकांना प्रतीत झाला नाहीं, असा त्यांच्यावर त्यांचा शेरा आहे! याचा अर्थ इतकाच कीं, आपले आपण स्वामी झाल्यावर एकमेकांशींच प्रसंग पडल्यामुळें आपण योग्य ती तडजोड लावून घेण्यास प्रवृत्त होतों. म्हणून या भेदांचा कोणी बाऊ करूं नये.

भावी काळ

नव राजकारण—

पहिल्या प्रकरणाच्या शेवटीं शेवटीं म्हटलें आहे कीं, अस्पृश्यतानिवारणाचें दार उघडून वाहेर पाहिलें म्हणजे काय काय दृश्यें दिसतात तीं पहावीं, म्हणून रानटी, असंस्कृत इत्यादि लोकांचेही आंकडे व स्थलनिर्देश दिलेले आहेत. *आतांपर्यंत* वाचकांना त्या सर्व नांवांचा व आंकडयांचा परिचय झाला असेल; व तसेंच हे सर्व लोक हिंदुस्थानभर कसकसे पसरलेले आहेत हेंही त्यांच्या मनःचक्षूंपुढें उभें राहूं लागलें असेल. आपण हिंदू लोकांविषयीं बोलतांना त्रिवर्ण हिंदू हेच पुढारलेले असें अर्थातच मानतों. शूद्र हे मागसलेले आहेत; अस्पृश्य हे अस्पृष्ट आणि मागसलेले आहेत; गुन्हेगार लोक क्वचित् रानटी, क्वचित् अस्पृश्य व सर्व मागसलेले आहेत; मूळचे व डोंगरकरी हे असंस्कृत व मागसलेले आहेत; हेंही आपल्या मनांत येतें. पण मुसलमान, ख्रिस्ती इत्यादि लोक हे सर्वच चांगले संस्कृत असतील असें आपल्याला विनाकारणच वाटतें. हिंदूसमाजापैकीं वर जे निरनिराळे प्रकार सांगितले त्यांची माहिती आतांपर्यंत दिली आहे, त्याप्रमाणेंच मुसलमान व ख्रिस्ती यांच्यांतील असंस्कृतांची व मागसलेल्यांची माहिती देतां आली असती तर वरें झालें असतें. पण ती आपल्या प्रस्तुतांत येत नसल्यामुळें देत नाहीं. पण एवढें मात्र सांगावयास हवें कीं, मुसलमान समाजांतील बहुतेक सर्व लोक अडाणी आहेत. बाहेरून आलेली जीं अफगाण, मोगल, अरव इत्यादि मोठालीं घराणीं व हिंदुधर्मांतील त्रिवर्णांपैकीं जे लोक मुसलमान झाले यांची प्रजाच काय ती खास पुढारलेली अशी आहे. हे पुढारलेले वर्गच मुसलमानी समाजाचें दृढीकरण करतात, मुसलमान मताचा प्रसार करतात आणि हिंदुस्थानचें राजकारणही आपल्या हिताच्या दृष्टीनें मधूनमधून चाळवितात. एका धर्माचे म्हणून व जात आणि विटाळ यांचा सवतेपणा नसल्यामुळें या पुढारलेल्या वर्गाची हुकमत मागसलेल्या वहुजनसमाजावर पुष्कळच चालते आणि पुढारलेल्या लोकांच्या मताला जवरदस्ती करून किंवा गुंडगिरी माजवून, जो एक पाठपुरावा करावा लागतो तो, हे मागसलेले लोक आपखुषीनें व मुवलक असा करतात. पण शिक्षण व संस्कृति या शब्दांनीं जें जें कांहीं ध्वनित होतें त्या सर्व वावतींत हा बहुजन समाज मागसलेलाच आहे.

ख्रिस्ती लोकांच्या बाबतींत देखील असेंच आहे. मागें सांगितलेंच आहे कीं, युरोपियन्स निराळे, अँग्लोइंडियन्स निराळे व एतद्देशीय ख्रिस्ती निराळे. येथें राज्य करण्यापलीकडे व कारखाने वगैरे काढून त्यांत घातलेलीं भांडवलें जपून ठेवून हिंदुस्थानचा बाजार होतांहोईतों आपल्या हातांत राखण्यापलीकडे युरोपिअनांचा येथें कांहींच संबंध नाहीं. तरीसुद्धां त्यांचीं हितें जपण्याची व्यवस्था सरकार करीतच आहे. दुसरे जे अँग्लोइंडियन्स त्यांना आपण साहेब आहों असें कितीही वाटत राहिलें तरी साहेब त्यांना आपल्यांतील मानीत नाहींत व इंग्लंडांत घेऊन जात नाहींत. अर्थात् त्यांना येथेंच राहावयाचें आहे; कारण त्यांची "मातृभूमि" हीच आहे.तथापि आपले हितसंबंधही निराळेच आहेत आणि जरी आपण ख्रिस्ती असलों तरी हे जे काळे नेटिव्ह ख्रिस्ती त्यांच्याहून आपलें सगळेंच कांहीं निराळें आहे अशी त्यांची भावना असल्यामुळें तेही अतःपर येथें स्वतंत्र लोक म्हणूनच नांदणार असें दिसतें. त्यांची स्वतःची प्रजा जी काय वाढेल व काळ्या नेटिव्ह ख्रिस्त्यांतून हळूहळू वर्णबदलानें त्यांच्यांत जी काय भर पडत जाईल तिच्यावरच यांची संख्या वाढत राहणार. तिसरे जे एतद्देशीय ख्रिस्ती लोक त्यांत पुन्हां मूळचे जातिभेद शिल्लक ठेवलेच पाहिजेत असें मनानें तरी मानणारे जे कोणी मूळचे श्रेष्ठवर्णीय लोक आहेत तेच पुढारीपण गाजवितील; व मागसलेल्या आणि असंस्कृत लोकांतून जे लक्षावधि लोक ख्रिस्ती झाले आहेत ते त्यांचें पुढारीपण मान्य करीत राहतील.

वर सांगितलेले जे पुढारलेले मुसलमान व हे पुढारलेले ख्रिस्ती हे जीं काय राजकारणें बोलतील व पुरस्कारितील तीं तीं त्यांच्या त्यांच्या समाजांत विनामतभेद मान्य होतील असें दिसतें. हे दोन मोठे गट सोडले तर पारशी, यहुदी असे जे आणखी थोडेथोडे स्वतंत्रधर्मीय लोक आहेत त्यांच्या संबंधानें पाहतां इतकेंच दिसतें कीं, यहुदी इत्यादि लोक संख्येनें फारच थोडे असल्यामुळें भावी उलाढालींत त्यांचा कुठेंच पत्ता लागावयाचा नाहीं. पण पारशी हे, त्यांना अन्य रीत्या जाच झाला नाहीं किंवा जीवितांत अशाश्वती वाटूं लागली नाहीं तर, आजवर त्यांनीं दाखविलेला देशाभिमान, विद्याभिलाष यांकडे पाहतां, भावी राजकारणांत पुष्कळच चांगल्या गोष्टी करतील असें वाटतें. म्हणजे असें झालें कीं, हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, अँग्लोइंडियन्स, पारशी हे

लोक हिंदुस्थानचें भवितव्य ठरविणार. सध्याला जो राजकारणाचा मांड मांडला जात आहे त्यावरून असें दिसतें कीं,जितकें ठेवतां येईल तितकें प्रमाण-बद्ध समत्व ठेवून हे लोक राजकारणाच्या दिशा निश्चित करतील.

अविश्वास--

या सर्व लोकांच्या मनांचें आजचें मुख्य लक्षण परस्परांविषयींचा अविश्वास हें होय. हिंदूलोक संख्येनें खूपच मोठे हें खरेंच आहे. यामुळें मुसलमान समाजाला त्यांची भीति वाटते. निदान आपला वस प्रमाणाबाहेर कायम बसविण्यासाठीं या भीतीचा ते बहाणा तरी करीत असतात. हिंदू व मुसलमान यांचे आजवरचे इतिहासांतले संबंध लक्षांत घेतले म्हणजे हिंदू लोकांना मुसलमानांविषयीं अविश्वास वाटणें व त्यांच्या आक्रमणबुद्धीवर पाळतच टेविली पाहिजे असें वाटणें हें ओघानेंच येतें. पण हिंदू लोक हे संख्येनें जास्त म्हणून आणि यापुढें जर लोकसत्ता प्रस्थापित व्हावयाची तर संख्येलाच महत्त्व जास्त राहणार हें मनांत येऊन मुसलमान लोक हिंदूसंबंधानें मनांत दरद बाळगतात. केवळ मताचा प्रश्न असला तर हिंदूंना भिण्याचें कांहींच कारण नाहीं. पण त्यांच्यांत खरी असलेलीं व आणून घातलेलीं अशीं अनेक वैगुण्यें आहेत.त्यामुळें आपल्या मतांचा चांगला जुटीचा असा संच बनावयाचा नाहीं अशी त्यांस भीति वाटते.

अस्पृष्ट समाजांतील लोकांना चतुर्वर्ण हिंदूच्यासंबंधानें अविश्वास वाटणें हें, त्यांचें जें परस्पराचें आजवरचें नातें, त्यावरून अनुक्रमानें येतें. त्यांच्याही पलीकडील जे कोणी रानटी इत्यादि लोक आहेत त्यांच्या प्रदेशावर अजून फटफटलें सुद्धां नाहीं. पक्ष्यांची थोडी किलकिल चालू असून त्यांची थोडीशी झोंपमोड झाल्यासारखें दिसतें इतकेंच. हे लोक बव्हंशीं हिंदुत्वांतच शिरलेले आहेत. कारण हिंदुत्वाची जी सूक्ष्म प्रसरणशक्ति आहे तिनें त्यांच्यांत कित्येक वर्षांपासूनच रिघाव केलेला आहे. हिंदुधर्मांतील देवतांचें अनेकत्व व पूजनीय वस्तूंचें कमीअधिक संस्कृतत्व हें ज्या युरोपिअन पंडितांना चांगलेसें माहीत झालेलें नव्हतें त्यांनीं शिरगणती करतांना 'ॲनिमिस्टस्' या नांवाचा यांचा एक स्वतंत्र गट कल्पिला. एन्थोव्हेन यानें अशी विचाराची प्रथा पाडली कीं, हे जे वन्य वृत्तीचे व वृक्ष पाषाणादिकांची पूजा करणारे लोक आहेत हे 'ॲनिमिस्टस्' या नांवाखालीं एक कल्पावे. त्याच्या

मतानें हिंदुत्वाच्या कक्षेंत ते अजून आलेले नाहींत. पुढें ही त्याची कल्पना निरनिराळ्या इलाख्यांतील खानेसुमारीवाल्यांनीं उचलली व क्वचित् त्यांनाच वाट पुसत जाणाऱ्या हिंदू शोधकांनींही पत्करली. थोडीशीं वर्षें या कल्पनेचें प्राबल्य चाललें पण अधिक शोध करतां करतां युरोपियन पंडितांनाच दिसूं लागलें कीं, 'ॲनिमिस्टस्' हें नांव यांना वरोवर लागू पडत नाहीं; हे लोक हिंदूच आहेत. अर्थात् मागची प्रथा मोडून पडली व निदान शिरगणतींत तरी यांचा अंतर्भाव आतां हिंदुधर्मांतच होऊं लागला आहे. पुष्कळदां असें घडतें कीं, गणती करणारे जें वर्गीकरण करतात किंवा जीं नवीं नवीं नावें देतात तें वर्गीकरण व तीं नांवें सरकारदरवारीं प्रचलित होतात व परंपरेनें त्यांना मान्यता मिळते व मग उलट वळून तीं समाजाच्या मनावरच कायमचीं आरूढ होतात. हा न्याय कळल्यामुळेंच "आमचें नांव बदला. आम्हाला अमुक प्रकारचे ब्राह्मण म्हणा" अशा प्रकारचीं आर्जवें पुष्कळ जातींनीं आजवर या गणती करणारांकडे केलीं आहेत व तीं त्या त्या गणनाकोशांत नमूदही आहेत. गणना-कारांनीं 'ॲनिमिस्टस् ' हें नांव जेव्हां चालू केलें तेव्हां हिंदू समाजाचीं चांगलीं शकलें पडत आहेत हें पाहून पुष्कळांना समाधान झालें, व धर्मप्रसाराला हें एक मोठें थोरलें नवेंच घबाड सांपडलें असाही हर्ष पुष्कळांना झाला. पण आतांच सांगितलें त्याप्रमाणें जास्त शोध होतां हे हिंदूच आहेत असें ठरलें. या वावतींतील फार उत्तम उदाहरण म्हणजे भिल्ल लोकांचें होय. त्यांना 'ॲनि-मिस्टस्' असेंच नांव दिलें गेलें; पण पुष्कळ शोध करून रेव्हरंड डॉ. इनॉक्-हेडवर्ग यांनीं १९२१ सालच्या गणनाकोशांत नमूद केलें कीं भिल्ल हे हिंदूच आहेत; जर कोणी ख्रिस्ती किंवा मुसलमान झालेले असले तर हे हिंदू भिल्ल त्यांना 'मुसलमानी भिल्ल', "ख्रिस्ती भिल्ल" अशीं नांवें देतात. आपण हिंदू नव्हे असें कोणी म्हटलें तर त्यांना त्याचा राग येतो असेंही या मिशनरी गृहस्थाचें म्हणणें आहे. अस्पृश्य लोकांतही आपल्याला गणतां कामा नये असेंही त्यांचें म्हणणें आहे व तें वास्तविकच आहे. असो. तर 'ॲनिमिस्टस्' हें नांव मागें पडून या सर्व वन्य लोकांची गणना हिंदुत्वांत करावयास आतां कोणी फारसा प्रत्यवाय घेत नाहींत. तथापि आधुनिक संस्कृतीची व यांची ओळख नुकतीच होत असल्यामुळें हे लोक संस्कृत हिंदूविषयीं कोणत्या प्रकारची वृत्ति दाखवितात हें अजून कळावयाचें आहे.

नेटिव्ह ख्रिस्ती हे मिशनरी लोकांच्या शिकवणीमुळें त्याच परिस्थितींतल्या इतर लोकांपेक्षां जास्त उन्नत झाले आहेत, पण तेही वर्‍हंशीं गरीबच आहेत. हिंदू लोक आपल्याला छळतील असें त्यांस भय असेल असें वाटत नाहीं; निदान असूं नये हें खरें. हिंदुधर्मांत परत घेण्याची जी मोठी चळवळ आतां सुरू आहे तिचा या समाजावर काय परिणाम होतो हें पाहण्यासारखें आहे. आज अदमास असा आहे कीं, त्यांचा स्वतंत्र गट बनवावयाचा उद्योग चालू आहे तो सिद्ध झाला, व त्यास अनुसरून त्यांचे हितसंबंध स्वतंत्र आहेत असें ठरविण्यांत आलें व त्यांतही त्यांना जर कांहीं खास सवलती इत्यादि मिळावयाच्या असें ठरलें, तर ही शुद्धीची कल्पना फारशी यशस्वी होणार नाहीं. आजच आपल्याला असें स्पष्ट दिसत आहे कीं सरकारी नोकर्‍यादिकांत त्यांच्या वाटणीची म्हणून कांहीं एक ठराविक संख्या राखून ठेवण्याची पद्धति सरकारानें घातली आहे. अर्थात् ख्रिस्ती राहिल्यानें जर आपल्याला हे असे राखीव फायदे मिळतात असें त्यांस माहीत झालें आहे तर केवळ हिंदुधर्माची पूर्वीची ओढ प्रबल ठरून ते हिंदुधर्मांत येतील असें संभवत नाहीं; मग निराळें राहिलें म्हणजे अविश्वास हा पुन्हा आलाच. अँग्लोइंडियन्स हे थोड्या वरच्यम्यानें बोलतात व वागतात. ते संकरज म्हणून खास नेटिव्ह ख्रिस्ती लोक कदाचित् त्यांना मनांतून हंसत असतील व तें त्यांना माहीतही असेल. हिंदू व मुसलमान यांच्या मनांतही ही थोडी तिरस्काराची भावना राहणार. अर्थात् आपला युरोपियनांशीं संबंध हा त्यांचा गर्व व इतरांची त्यांच्यासंबंधीची सूक्ष्म तिरस्कारबुद्धि यांमुळें परस्पर अविश्वासबुद्धि ही राहणारच. राहतां राहतां पारशी व ज्यू लोक राहिले. हे दोघेही हुषार, कर्तृत्ववान्, देशाभिमानी व चांगले श्रीमंत, असे आहेत. यांच्या सर्व चांगल्या गुणांचा व श्रीमंतपणाचा फायदा हिंदुस्थानला अवश्य मिळावा हें आवश्यक आहे. पण लोकसत्तेची जी नवी वावटळ उठलेली आहे तिच्यामुळें हे लोक आपल्या मनांत थोडेबहुत सर्दच झाले आहेत. या लोकसत्तेंत कोणकोण व कसले कसले लोक आपले सत्ताधीश होणार हें पाहून त्यांच्या मनांत ही अविश्वासाची बुद्धि उत्पन्न झालेली आहे. याप्रमाणें सर्व देशभर भिन्न धर्मीय समाजांचा परस्परांविषयीं कमीजास्त अविश्वास हेंच सध्यांच्या लोकमताचें मुख्य लक्षण आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

सरकारी धोरण--

अशा या अविश्वासाच्या सार्वजनिक मनःस्थितींत इंग्रज सरकारच्या धोरणाची भर पडल्यामुळें ही परस्पर-अविश्वासाची वुद्धि द्विगुणित होत आहे. म्हणजे लोकसत्ता प्रस्थापित व्हावयाची व आपले आपणच धनी व्हावयाचें असें असलें तरी आपण परस्परांशीं कसे वागूं यासंबंधाची भयाकुलवृत्ति सर्वांच्या पोटामध्यें आहेच; पण त्याच्या जोडीला राज्यकर्ते जे इंग्रज ते कोणाला वलहीन किंवा वलिष्ठ करूं इच्छितात, कोणाचें श्रेष्ठपण हिरावून घेण्याची इच्छा करतात व कोणा कनिष्ठाला श्रेष्ठ बनविण्याचे उद्योग सुरू करतात याविषयीं जनमनांत बरीच चलबिचल चालू असल्यामुळें वरील अविश्वासाची वृत्ति अधिकच दाट होत आहे व ती लोकांचीं मनें ग्रस्त करीत आहे.ज्यांना असें वाटतें कीं या राजकीय धोरणामुळें आपला फायदा होईल, त्यांच्या मनाला थोडीशी खंविरी येत आहे व ज्यांना हें त्यांचें धोरण आपल्याला वाधक होईल असें वाटतें ते चिंतातुर होत आहेत. वरें, इंग्रज लोकांना आपलें राज्य टिकवावयाचें आहे म्हणून हरतऱ्हेच्या क्लृप्त्या योजणें हा त्यांच्या राजकीय कार्यक्रमा-पैकींच एक भाग वनला आहे. त्यांनीं राज्य करण्याची वासना धरूं नये हें म्हणणें वायफळ आहे; पण त्यांचें राज्य जाऊन तेथें आपलें व्हावें असें हिंदी लोकांना वाटणें हेंही जास्त साहजिक आहे. पण हें कितीही जरी साहजिकच असलें तरी सामर्थ्य इंग्रजांच्या बाजूस असल्यामुळें त्यांची जी राज्य टिकवून धरण्याची इच्छा ती सफळ करण्यासाठीं ते हरतऱ्हेच्या युक्त्या योजीत रहाणार. हिंदी राष्ट्रांतील निरनिराळ्या लोकांचें एकमत कसें होणार नाहीं याविषयींची तरतूद ठेवणें हीही एक त्या हिकमतीपैकीं हिकमत होय.

मनाची लाज---

पूर्वीचे राज्यकर्ते व या काळांतील राज्यकर्ते यांच्यांत एक मोठा फरक आहे. ते पूर्वींचे सत्ताधीश लोक आपले हेतु जबरदस्तीच्या रूपानें सरळच सांगत असत. 'बळी तो कान पिळी' या न्यायाची त्यांना लाजही वाटत नसे; त्यामुळें केवळ आपल्या सामर्थ्यावरच ते विसंबून असत. पण आधुनिक काळांत माणसाला आपलीच लाज वाटावी असें झालें आहे. स्वातंत्र्य, समता,

बंधुभाव इत्यादींची गर्जना आज दोन अडीचशे वर्षें जगतांत सारखी घुमत असल्यामुळें आणि कसलेही कष्ट करून स्वातंत्र्य संपादावें व राखावें ही कल्पना त्यांनीं स्वत:च्या बाबतींतच सिद्ध केलेली असल्यामुळें त्यांची त्यांनाच थोडी लाज वाटते. आपण बोलतों काय व करतों काय यांकडे केव्हां ना केव्हां तरी राज्यकर्त्यांचें मन जातेंच. तसेंच देश स्वतंत्र व समृद्ध असला तरीसुद्धां आम्हाला खरें स्वातंत्र्यसुख नाहीं, आम्ही अजून हमालच आहों अशीं चुटपुट ज्यांच्या जिवाला लागली आहे त्यांच्या हातीं राज्यकारणाचें सुकाणूं आलें म्हणजे तर ही लाज त्यांना अधिकच वाटूं लागते. जे साम्राज्यवादांत अगदीं भाजून खंगरच झालेले आहेत त्यांची गोष्ट अलाहिदा, पण साम्राज्यवाद्यांत सुद्धां आजपर्यंत चालत आलेल्या स्वातंत्र्यविषयक उदात्त कल्पनांनीं निदान थोडेतरी भारलेले असे लोक आहेतच. या सर्वांना निसुखपणें व शरमिंधे न होतां साम्राज्यवादाचा पुरस्कार करतां येत नाहीं. पण जरी करतां आला नाहीं तरी आपलें साम्राज्य बुडावें, हिंदुस्थान आपल्या हातांतून जावें, आपली उपासमार झाली तरी चालेल, आपले वाजार बुडाले तरी चालतील असें निर्वाणीचें बोलणें त्यांना बोलतां येत नाहीं, कारण या औदार्याच्या भरांत आपल्या लोकांच्या अन्नांतच आपण माती कालवूं असें त्यांना स्पष्ट दिसतें. म्हणजे उन्नत तत्त्ववाद एकीकडे व आपल्या लोकांना जगवावयास हवें या जरूरीचें ज्ञान एकीकडे; असा कांहीं चमत्कारिक लढा त्यांच्यांतील चांगल्या चांगल्या मुत्सद्यांच्या मनांत चालू असला पाहिजे हें ओळखावयास फारसें ज्ञान लागतें असें नाहीं.

पळवाट--

आतां या अशा अडचणीच्या प्रसंगीं आपल्याकडे वाईटपणा घेऊन या वुचकळ्यांत पडलेल्या मुत्सद्यांना वाट काढून देण्याचें कसब त्यांच्यांतील कांहीं हिकमती लोकांना साधलेलें आहे. आपले हे उदारवुद्धीचे वांधव कदाचित् मंत्रचळे होतील व औदार्याच्या एकाद्या लहरींत आत्महत्यार बनतील हें या कसबी लोकांनीं जाणलेलें असतें. पण त्याच वेळीं त्यांना हें माहीत असतें कीं जर कां यांना एकादी पळवाट काढून दिली व ती एकाद्या मोठ्या तत्त्वज्ञानाचा आश्रय करून संभावितपणाची ठरविली तर हे लोक तिचा फायदा खुषीनें घेतील. आपण

हें जें कसब करतों त्याचा उमज न पडण्याइतके हे कमी बुद्धीचे नाहींत, पण तेवढचापुरती ते आपल्या शुद्धबुद्धीशीं दगलबाजी करावयास माघार घेणार नाहीत हेंही त्यांनीं ओळखलेलें असतें. म्हणून हे कसबी लोक इंग्रजांचा इहलोकीं कशासाठीं अवतार झाला आहे, इंग्रज वंशाचा जीवितहेतु काय असेल, वायबलांत जें म्हटलें आहे कीं पृथ्वीवरील लोक एकमेकाकडे जातील व अवघे सुपंथ धरतील, त्याची अंमलबजावणी या आपल्या वंशाच्या द्वाराच व्हावयाची आहे, पृथ्वीवरील अज्ञानतिमिराचा ध्वंस करणारे आपणच आहोंत, अशासारखे इंग्रजी राष्ट्राची खुषमस्करी करणारे व पुन्हां पुन्हां घोळ-ल्यानें खरें वाटूं लागणारे अनेक प्रवाद ते चालू करतात; व त्यांच्या अपेक्षे-प्रमाणें वर सांगितलेले जे कांहीसे आत्मवंचक उदार मुत्सद्दी ते नेमके फशी पडतात. या वचनाचा आश्रय सांपडला म्हणजे हे सर्वजण एकमेकांकडे पाहून म्हणतात "आपण किती अज्ञानी होतों! सृष्टीचे व्यापार केवढे गूढ आहेत! तिच्या गूढ नियमनांना अनुसरून आपण चाललें पाहिजे"! मग ते हातांत हात घालतात व सगळ्यांचें मिळून एक राजकारण सिद्ध होतें. या राज-कारणावर आतांच सांगितलेल्या सृष्टीच्या ज्या गूढ योजना त्यांची दाट छाया पडलेली आहे असें मानून त्यांची अंमलबजावणी केलीच पाहिजे असें ते निग्रहानें बोलूं लागतात. आणि इंग्रजानें एकदां निग्रह केला म्हणजे तेथून तो कधीं ढळत नाहीं ही गोष्ट तर इतिहासप्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांत जे शेकडों समाज असंस्कृत आहेत, मागसलेले आहेत, ज्ञानदीपिकेचा उजेड त्यांच्या घरीं पोचलाच नाहीं, जेथें स्त्रियांना मान नाहीं, आणि धर्माची स्थिति अवनत आहे तेथेंच आमचा खरा उपयोग आहे अशी बुद्धि बाळगावयास त्यांनीं मागेंच आरंभ केलेला आहे व ही बुद्धि टिकवून धरण्याची त्यांची खटपट अजूनही चालू आहे. पण इंग्रजांना सांगावेंसें वाटतें कीं "हें सगळें व्हावयाचें तर त्याला हिंदुस्थानांत राज्यच करावें लागतें असें मुळींच नाहीं. हें तुमच्या ध्यानांत येत नाहीं असें दिसतें!" मिशनरीपणा पत्करून पण उंच ध्येयाची पताका खांद्यावर टाकून, हिमालयाच्या उंच दरडी ओलांडून जपानपर्यंत आपलीं सोज्ज्वल मतें सांगण्यासाठीं बुद्ध भिक्षु फिरत गेले असल्याचें इतिहासांत नमूद आहे. त्याप्रमाणेंच एका लहानशा खेड्यांत ज्याचा

थोर उपदेश प्रथम सामावला होता त्या येशूचे शिष्य, आपापले शूळ खांद्यावर टाकून दक्षिण अमेरिकेपर्यंतही धर्मजागृति करीत आणि रानटी माणसांच्या मनांवरसुद्धां उंच संस्कार करीत गेल्याचें इतिहासांत नमूद आहे. हीं थोर उदाहरणें डोळ्यापुढें ठेवून वर उल्लेखिलेल्या मुत्सद्यांना हीं उंच ध्येयें खरोखर गांठतां येण्यासारखीं आहेत. पण अशी खात्री वाटते कीं, ते आपलीं ध्येयें आपल्या धर्मगुरूंच्या पद्धतीनें साधणार नाहींत तर दुसऱ्याचें अपहरण करून, दुसऱ्याच्या घरांत दारिद्र्य माजवून व दुसऱ्यांच्या मनबुद्धींच्या व्यापाराला पुरेसा वाव न देऊनच साधणार आहेत. आपलें साम्राज्य हिंदुस्थान देशावर चालविण्याचा त्यांचा जो निग्रह आहे तो आपल्या लोकांचें सुखानें चालावें यासाठीं आहे, हिंदुस्थानांतील लोकांच्या सुधारणेसाठीं नाहीं किंवा सृष्टीच्या कल्पित योजनेला मान देण्यासाठींही नाहीं.

लोकसत्ताच देणार—

साम्राज्य चालविण्यासाठीं ज्या कांहीं निरनिराळ्या युक्त्या अमलांत येत आहेत त्यांतच हिंदुस्थान देशांत प्रजासत्ताक राज्य प्रस्थापित व्हावें, तीच सत्ता आम्हांस तेथें प्रस्थापित करावयाची आहे व दुसरी कोणतीही होऊं द्यावयाची नाहीं असा पुकारा करणें हीही एक आहे व त्यास अनुसरूनच सर्व कांहीं होत आहे. वास्तविक हिंदुस्थानच्या लोकांना जर स्वराज्यच द्यावयाचें तर तें अमुकच प्रकारचें देऊं हा हट्ट कशाला? जेव्हां यांचें राज्य स्थापन झालें तेव्हां जसलीं कसलीं आमचीं राज्यें होतीं तसलींसुद्धां आतां मिळालीं तरी चालतील पण हें दरघडी दारिद्र्य पिकविणारें परकी राज्य नको असेंच लोकांस वाटत आहे. हिंदुस्थानदेशांत मोठमोठाले संस्थानिक आहेत व त्यांच्यांतील कित्येक राजे आपलीं राज्यें फारच उदारपद्धतीनें व नवीन विचाराला अनुकूल होऊन चालवीत आहेत असें आपण वाचतों व पाहतोंही. इंग्रज सरकारालाही हें मान्यच असावें. अशा राजांचें एक राजमंडळ स्थापून त्याच्या हवाली जरी हिंदुस्थानचें राज्य दिलें तरीसुद्धां चालण्यासारखें आहे. अशीच व्यवस्था होत आहे असें दिसलें तर जरूर तेवढ्या फौजा उभ्या करण्याइतक्या शूर जाती हिंदुस्थानांत रगड आहेत. पण इंग्रजांना हें भावत नाहीं. त्यांच्या मतानें येथें प्रजासत्ताक राज्यच हवें! व तें आज द्यावयाचें म्हटलें तर लोक

पात्र नाहींत ! म्हणजे लोकांना पात्र करण्याचें काम चालू झालें पाहिजे. बरें पात्र झाले असें केव्हां म्हणावयाचें? तर जेव्हां मागसलेले समाज, उत्तम पुढारलेले जे समाज आहेत, त्यांच्या वरोवरीचे होतील तेव्हां. अर्थात् हें व्हावयास पुष्कळच वर्षें लागतील हें कोणीही कवूल करील; म्हणजे तोंपर्यंत इंग्रजांचें राज्य येथें राहिलेंच पाहिजे असें झालें! हें लिहिणें साम्राज्यवादी इंग्रजांच्या संबंधानें झालें. पण त्याला एक सत्पक्षाची बाजू आहे. ज्या इंग्रजांनीं आपल्या देशांत लोकसत्ता उत्पन्न केली व सतत तीनचारशें वर्षें तिच्यासाठीं हरतऱ्हेचे झगडे केले त्यांना लोकांना द्यावयाची शासनसंस्था ही लोकसत्ता-रूपच असावी असें वाटणें स्वाभाविक आहे. ज्याच्या पदरीं जें असेल तेंच तो लोकाला देणार हें स्पष्ट आहे. इंग्रजाच्या पदरीं लोकसत्ता आहे; अर्थात् तो तीच सत्ता लोकांस देणार हें ओघानेंच येतें. हे जे लोकसत्तावादी शुद्ध विचाराचे इंग्रज लोक ते या साम्राज्यवाद्यांना उत्तम उपयोगी पडतात. वर जसे पळवाट काढून देणारे लोक यांना भेटल्याचें सांगितलें आहे, तसेंच याही प्रकारांत घडतें. शुद्ध विचारी इंग्रज गृहस्थ, कीं ज्याच्या मनांत लोकसत्ता कायमची बिंबलेली आहे तो हिंदुस्थानांत लोकसत्ता प्रस्थापित व्हावी असेंच म्हणत राहणार. जे साम्राज्यवादी आहेत तेही हाच मंत्र जपतात; पण दोघांचे हेतु अगदीं निराळे आहेत. आपल्याशीं जें असेल तेंच द्यावें हा एकाचा विचार आहे. दुसऱ्याचाही असाच आहे कीं, लोकसत्ताच द्यावी; कारण ती प्रस्थापित होण्याला आणि ती चांगली चालू लागण्याला कैक वर्षें लागतील व म्हणून तोंपर्यंत आपलें राज्य हिंदुस्थानांत सुखानें चालेल.

खरोखर पाहतां, हिंदुस्थानानें राजसत्तासुद्धां मनमुराद भोगलेली नाहीं व त्यामुळें जनमनाच्या भूमींत स्वकीय राजासंबंधानें तिरस्कार किंवा द्वेषभाव उत्पन्न झालेला नाहीं. इंग्लंडमध्यें राजेलोक अस्ताव्यस्त वागूं लागले. त्यांच्यासंबंधानें उपेक्षा, अवहेलना, चीड, द्वेषभाव व शेवटीं जिवावर उठणारें वैर प्रजेच्या मनांत उत्पन्न होऊन तेथें राजसत्ता संपुष्टांत आली; देश लहानसा, माणसें एकवंशी, एकधर्माचीं, एकाच संस्कृतीचीं इतकें साहित्य सज्ज असतांना सुद्धां तीनचारशें वर्षांच्या झटापटीनंतरच लोकसत्ता प्रस्थापित झाली. याचा अर्थ असा कीं, लोकसत्ता ही त्या भूमींतूनच उत्पन्न झाली आहे. आमच्या

येथें तसें झालेलें नाहीं. राजसत्तेचा वीट येईल इतकी राजसत्ताही, निदान आधुनिक कालांत, निर्वेधपणें लोकांना भोगावयास सांपडलेली नाहीं व त्यामुळें अजूनसुद्धां अतृप्त राहिलेली जी राजभक्ति ती, तें राजवैभव जेथें कोठें थोडें कां होईना दिसेल, तेथें जोरानें प्रस्फुट होतें हें आपण सर्व हिंदुस्थानभर पाहतों. असें असतांना सुद्धां म्हणजे राजभक्तीची वासना अतृप्त असतांच या ठिकाणीं लोकसत्तेचा प्रादुर्भाव होत आहे. व तोही भूमींतून उद्भवून वर येत नाहीं तर बाहेरून तिचा अध्यारोप होत आहे. असें असल्यामुळें त्याच्या पोषाला व तो पोसल्यावर त्याच्या टिकाऊपणाला काल-गति लागेल हें सांगावयास नको. दुसरें असें कीं, इंग्लंडच्या वरोवर उलट सर्व परिस्थिति येथें उभी आहे. देश अवाढव्य, लोक अनेकवंशीय, धर्मही अनेक व पंथ तर हजारों व संस्कृतीविषयीं म्हणाल तर निवळ शंख रानटापासून तों युरोपांतील कोणत्याही लोकांच्या शेजारीं बसून चर्चा करावयास पात्र अशा लोकांपर्यंत निरनिराळे लोक; अशा या अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत परस्पराविषयींचा समत्वभाव व गाढ विश्वास हेच ज्या लोकसत्तेचे मुख्य आधारस्तंभ असावयाचे ती कशी प्रस्थापित होणार व करावयाची म्हटलें तर ती किती वर्षें खाणार याचा अंदाज कल्पनेला सुद्धां होत नाहीं.पण हीच प्रस्थापित करावयाची असा तर इंग्रजांचा ठाम हेतु आहे.

देशभक्त तेंच म्हणतात--

वरें, आपल्या अंगानें पहावें तर आपल्यांतील देशभक्त लोकसत्तावादच पत्करून वसले आहेत. आपण मूळचे वेदांती; तेव्हां राजकारणांतल्या वेदांतानें आपलें मन भारीच झपाटलें. फरेंच राज्यक्रांति, अमेरिकेंतील राज्यक्रांति यांचे इतिहास आपण शाळा–कॉलेजांतून शिकलेले. तेव्हां आपल्या देशांतही हेंच असावें असें आम्हांस वाटू लागलें. अर्थात् कोणीही पुढारी निघो, येथें लोकसत्ताच प्रस्थापित व्हावयास हवी असें त्याचें आग्रहाचें म्हणणें असतें. हा त्यांचा लोकसत्तावादाचा अभिनिवेश पाहून साम्राज्यवादी इंग्रज मुत्सद्यांना मनांतून फारच वरें वाटत असेल व उपहासानें तो असें म्हणत असेल कीं, "आम्हीं तरी हेंच म्हणत आहों." वरील शुद्ध विचाराचा इंग्रज किंवा पळवाट काढून देणारा इंग्रज हे जसे साम्राज्यवाद्यांच्या पथ्यावरच पडतात तसे हिंदुस्थानांतील

राजकारणवेदांती हेही त्यांच्या पथ्यावरच पडतात. कारण दोघांचें बोलणें शेवटीं एकच येतें. पण बिनसतें कोठें हें पाहिलें तर लोकसत्ता या शब्दापैकीं 'लोक' शब्दाची व्याप्ति ठरविणें! येथें जे "आजच स्वातंत्र्य हवे" असें म्हणत आहेत व दिलें असतां घेतीलही, त्यांचे लोकसत्ता चालविणारे जे लोक आहेत ते कदाचित् इंग्रजसरकारचेही असतील. पण सरकार म्हणतें, "लोक म्हणजे एवढेच नव्हेत. डिप्रेस्ड लोक आहेत, वावचे आहेत, भिल्ल आहेत, कातकरी आहेत, रामोशी आहेत, वेरड आहेत, फासेपारधी आहेत, घंटीचोर आहेत, लमाण आहेत, पाथरवट आहेत, कुडमुडे जोशी आहेत, वडार आहेत, वैदू आहेत, गोंड आहेत, खोंड आहेत, संताळ आहेत, तोडे आहेत, ओरिये आहेत, असे किती सांगावेत? हे सर्व 'लोक'च आहेत. तुम्ही आम्ही मिळून जी लोकसत्ता प्रस्थापित करणार त्यांत हे सगळे हवेतच," यावर देशभक्त कदाचित् म्हणेल कीं, 'ते आमचेच आहेत, आम्ही त्यांचें बरें पाहूं. हातीं सत्ता द्या, मग दाखवितों." हें देशभक्ताचें आव्हान इंग्रज खुषीनें पत्करतो व या सर्व लोकांना विचारतो कीं तुम्ही कोण आहांत? ते म्हणतात कीं 'आम्ही कोण आहों हें आम्हांस माहीत नाहीं.' येथें देशभक्ताची फसगत होते. मला तर खरोखरच असें वाटतें कीं या तर्कपद्धतीला अंत नाहीं आणि हिलाच चिकटून राहावयाचें असें मनांत आणिलें तर देशभक्तांच्या किती पिढ्या घालवाव्या लागतील हें कळत नाहीं.

आडवळणी विचार—

विचार अडवळणी खरा पण तो परिस्थितींतून हटकून निघत असल्यामुळें लिहून दाखवावयास संकोच वाटण्याचें कारण नाहीं असें वाटतें. देशांतील मोठमोठाले देशभक्त आणि देशांतील देशभक्त संस्थानिक यांची जर जूट झाली तरच हा डाव साधेल नाहींतर साधणार नाहीं. स्वराज्य संस्थापनेच्या स्वाधीन कारणांपैकीं हें एक स्वाधीन कारण आहे. महायुद्धें चालू होतील, सर्व जगभर खळबळ माजेल, कांहीं अकल्पित उत्पात होतील, इंग्रजांचें राज्य डळमळेल, त्यांतून आपला फायदा होईल ही इच्छा प्रकाशासाठीं धूमकेतूची वाट पहात बसणाऱ्या लोकांच्या इच्छेसारखीच होय. हीं सर्व कारणें परिस्थितीच्या आधीन आहेत. स्वाधीन कारण मात्र

वर जें सांगितलें तेंच आहे. राजमंडळाची किंवा राजाची सत्ता जरी या ठिकाणीं प्रस्थापित झाली तरी लोकसत्तावादाचें मर्म ज्यांच्या भावनेंत जाऊन भिनलें आहे अशा बुद्धिमान् लोकांवरही आपल्याला राज्य करावयाचें आहे असें जर या राजांना कळलें तर तेही भीति वाटण्यासारखे उरणार नाहींत; आणि जर कोणी तसे झाले तर प्रजा त्यांचीं हाडें मऊ केल्याखेरीज राहणार नाहीं. पण त्यांचे व्यक्तिगत दोष कसेही जरी असले तरी स्वदेशांत उद्योगधंदे उभे करण्याला या परदेशी राजापेक्षां ते अधिक तत्पर होतील हें खरें नाहीं काय? परकीय मालावर किंमतीच्या तिप्पट जकात वसवून, जुन्या इंग्रज मुत्सद्यांच्या धोरणावर सूड म्हणून,त्यांना इंग्रजांचा व्यापार मारतां येणार नाहीं काय? अनेक भूमिगत खनिजें, कीं जीं निजून राहिलीं आहेत,त्यांना जागे करावयास स्वदेशी राजा अधिक उद्युक्त होणार नाहीं काय? नद्यांच्या मोठमोठाल्या धबधब्यांत गारठून राहिलेली वीज बाहेर काढून ती सर्व देशांत खेळविण्याचें काम आपले राजे अधिक उत्सुकतेनें करणार नाहींत काय? हें सर्व करणें त्यांनीं स्वत:च्या हितासाठीं जरी केलें तरी तें शेवटीं भारतीय प्रजांच्या हिताचेंच ठरणार. म्हणून असें वाटतें कीं, मोठमोठाले देशभक्त, चतुर मुत्सद्दी आणि निरीक्षक संस्थानिक यांच्या संगनमतानें जर कांहीं निराळें राजकारण झालें व कशा प्रकारची सत्ता येथें स्थापन व्हावयाची याचा निकाल झाला तर अधिक वरें होईल.

मुख्य काम—

पण सध्यां तरी ज्या विचाराला देशांत मान आहे तो हा नव्हे. इतकेंच काय पण संस्थानें वुडविलींच पाहिजेत आणि ऐपतदार लोक नागविले पाहिजेत याच मताचा पुरस्कार होईल कीं काय असें वाटूं लागलें आहे. हें अगदीं नवें मत पुढें येत असलेलें पाहून इंग्रजास अधिक वरें वाटेल. पण हें प्रजापक्षांतील कांहींचें एकांतिक मत सोडून दिलें तरी राजकारणांत मन घालणाऱ्या व श्रमसाहस करणाऱ्या बहुतेकांचें मत असेंच आहे कीं, आपणास लोकसत्ता हवी आहे. जी लोकसत्ता हवी ती सक्तीनें घेण्याचें सामर्थ्य आजतरी प्रजापक्षांत नाहीं. याचा अर्थ असा कीं, सरकार ज्या प्रकारची देईल तीच घेतली पाहिजे. मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं आपलें राजकीय औदार्य किती

आहे हें आपण मताधिकार किती विस्तृत करतों यावरून मोजलें जावें असेंच सरकारनें ठरविलें आहे. अर्थात् जास्त जास्त माणसें मताधिकारी होत जाणार हें स्पष्ट आहे व या मताधिकारी लोकांची सत्ता जर प्रबल व्हावयाची तर यास शहाणे करावयास हवे; आणि हेंच मुख्य काम आतां राष्ट्रापुढें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

मागसलेल्यांचें दुखणें--

'मीच प्रत्येक ठिकाणीं पुरा पडेन' ही पुढारलेल्या जातींपैकीं कांहीं जातींची कल्पना अगदीं चूक आहे. देशांतलें राजकारण म्हणजे समाजांत जागृति करणें व त्या जागृतीच्या बळावर सरकारला जाच करणें हें आजवर कांहीं थोडे लोक करीत आले आहेत. त्यांचें तोंड नुकतेंच कोठें प्रजांच्याकडे वळलेलें आहे; पण तें सुद्धां या प्रजांचा उपयोग सरकाराशीं झुंज करण्यांत कितपत होतो हें पाहण्यासाठीं होय. या लोकांच्या हस्तें लोकसत्तेचा वापर व्हावयाचा आहे आणि म्हणून ती वापरण्याला यांचा मगदूर वाढवावयास हवा, इकडे आतांपर्यंत जितकी दृष्टि गेली आहे यापेक्षां शंभर पटीनें जास्त गेली पाहिजे. तरच हें काम जलदीनें उरकेल. राजसत्ता, प्रजासत्ता, बहुमत, अल्पमत, मताधिकार, उमेदवार, व्होट, व्हीटो हे काय प्रकार आहेत आणि यांच्या बळावर नवें कसें घडतें व जुनें उध्वस्त होतें हें त्या त्या माणसांना कळलें तर त्यांच्या मताधिकाराचा उपयोग योग्य तऱ्हेनें होईल. इंग्रज सरकार ज्या पद्धतीनें या लोकसत्तेचे हक्क आपणांस उत्तरोत्तर देऊं असें म्हणतें त्या पद्धतीनें ही लोकसत्ता प्रस्थापित होवो किंवा कांहीं अकल्पित प्रकार घडून, देशभक्तांचें सामर्थ्य वाढून, किंवा इतर कोणत्याही कारणानें ही लोकसत्ता जलदीनें स्थापित होवो, आतांच उल्लेखिलेलें काम हें जरूर आहेच आहे. त्रिवर्ण हिंदु हे जरी आजपर्यंत राजकारणाचे धडे घेतलेले असेच लोक आहेत तरी त्यांच्यांतही कांहीं लोक पुढें व कांहीं मागें असें झालेंच आहे. त्यामुळें मागें असलेल्यांना पुढें गेलेल्यांच्या बरोबरीनें चालवत नाहीं. इतकेंच नाहीं, पण हे विनाकारणच इतके जलद चालत आहेत असें त्यांना वाटतें. बरें, हे मागें असलेले लोक तरी थोडे आहेत असें म्हणावें तर तसें नाहीं, तर बहुतेक सगळे तसेच आहेत. यांना जर पुढारलेले लोक राजकारणांत बोलतात तसें वागावयास हवें असें

वाटवावयास हवें असेल तर त्यांच्या मनांतील अविश्वासाचा किंतु नाहींसा झाला पाहिजे. प्रस्तुत प्रकरणाच्या आरंभींच या अविश्वासाविषयीं लिहिलें आहे. तेंच काय तें आपलें खरें दुखणें आहे व तें जर वरें करावयाचें असेल तर पुढारलेल्या लोकांच्या विरुद्ध यांच्या ज्या कांहीं तक्रारी असतील त्या पुढारलेल्या लोकांनीं जलदीनें दुरुस्त करावयास हव्या.

मराठ्याची निरक्षरता—

या बाबतींत महाराष्ट्राच्या बाहेर ब्राह्मणेतर समाजाच्या मनाची काय स्थिति आहे हें सूक्ष्मपणें कळणें अवघड आहे. कारण त्यांची देशभाषांतील वर्तमानपत्रें आपणांस वाचतां येत नाहींत. पण स्थूल ज्ञान मिळतें तें असें कीं नर्मदेच्या उत्तरेस ब्राह्मण–अब्राह्मण हा भेद बाधक असा ठरणार नाहीं. दक्षिणेस मात्र म्हणजे मध्यप्रांत व वऱ्हाड, महाराष्ट्र, कर्नाटक व सर्वच मद्रास इलाखा इकडे या प्रश्नाला मोठेंच महत्त्व आलेलें आहे. पैकीं आपल्याला खरी ओळख म्हणजे बृहन्महाराष्ट्रांतील अब्राह्मणांची होय. या अब्राह्मण वर्गांत जरी शेकडों जातींचीं नांवें असलीं तरी त्यांतील प्रमुख जात म्हणजे मराठा जात ही होय. अस्पृश्यांत मुख्य जात म्हणजे महार व अब्राह्मणांत मुख्य जात म्हणजे मराठा. धंद्याची उलथापालथ होऊन त्यांच्या संबंधींच्या नव्या पीठिका उत्पन्न झाल्या किंवा कांहीं धंदे अजिबात बुडाले म्हणजे एकेक स्वतंत्र धंदा उचलून मराठा वर्गापैकीं जे कोणी आपली स्वतंत्र जात बनवून बसले होते ते सर्व मराठा या विशाल व खोल जातींत पुन्हां एकजीव होतील. मुख्य पाण्याला ज्याप्रमाणें बुडबुडे उठावे त्याप्रमाणें एकेक धंदा घेऊन निराळ्या झालेल्या बारीक बारीक सर्व जाती आपल्या मूल स्वरूपाप्रत जातील. मराठा व तत्सम जाती हें शब्दसूत्र ज्यांनीं बनविलें त्यांनीं या समाजाचें चांगलेंच अवलोकन केलें होतें असें म्हटलें पाहिजे. हा मराठा समाज मोठा असला तरी त्याचें आजचें दुखणें म्हणजे निरक्षरपणा हेंच आहे. अज्ञानाचा ध्वंस व्हावयास त्यांचा हा निरक्षरपणा गेला पाहिजे. त्याला साक्षरता आली म्हणजे आपण पुढारलेल्यांच्या बरोबरीचे झालों असें त्यास वाटूं लागेल. ती निरक्षरता कशी घालवावयाची याविषयीं मात्र कांहीं विचार सांगतां येण्यासारखे आहेत. कोणच्या संबंधांत हें आतां आठवत नाहीं, पण प्राथमिक शिक्षण मोफत, सक्तीचें व सार्वत्रिक

करणें हें सध्याच्या काळांत तरी अशक्य आहे असें महात्मा गांधी केव्हां तरी म्हणाल्याचें स्मरतें. तें त्यांचें मत बरोबर आहे असें माझ्याहि अल्पबुद्धीस वाटतें. जें स्वराज्य यावें यावें म्हणून आपण म्हणत आहों तें आलें म्हणजे सध्याच्यापेक्षां कितीतरी करवाढ होईल असें अर्थशास्त्रज्ञ सांगतात. लोकांना भाकरी देणें हें त्यांना श्रीगणेशायनमः शिकवण्यापेक्षां जास्त महत्त्वाचें व जरूरीचें आहे हें, त्या आपल्या नव्या सरकाराला, पहिल्या दिवशींच कळून येईल. ही भाकरी उद्योगधंदे उभे केल्याशिवाय लोकांना देतां यावयाची नाहीं हेंहि त्याला कळेल; आणि जर उद्योगधंदे उभे करावयाचे तर सांपडतील तितके पैसे त्याच कामांत घालावयास हवेत हाहि निश्चय त्यांस करावा लागेल. मग प्राथमिक शिक्षण सक्तीचें व फुकट करणें हें काम त्याला एकदम साधणार नाहीं. सक्तीचें म्हटलें म्हणजे शिकणाऱ्या मुलामुलींची संख्या अवाढव्य होणार व मोफत म्हटलें म्हणजे शिकणारांकडून एक पैहि मिळावयाची नाहीं. शिवाय इतकी प्रजा शिकवावयाची म्हणजे कित्येक हजार शिक्षकांची फौज उभी करावयास हवी. या फौजेचा प्रास्ताविक खर्च, पगार, तेच तेच होणारे खर्च, भाडें, हीं सगळीं खर्चाचीं तोंडें भागवावयाचीं म्हणजे मोठें अवजडच काम आहे. बरें हें काम करूं नये तर लोकांचा वकूब वाढणार नाहीं हें निखालस खरें आहे. साधी कवायत शिकावयाची व हुकूम ऐकल्याबरोबर नुसती उजवी–डावीकडे तोंडें वळवावयाचीं; पण या कामांत सुद्धां निरक्षर शिपायापेक्षां साक्षर शिपाई जास्त शहाणपण व तल्लखपणा दाखवितो असा लष्करी अधिकाऱ्यांचा अनुभव आहे; व गिरणींत नुसती सुतें त्या त्या कोष्टकांत वसवावयाचीं येवढें साधें काम जरी असलें तरी त्यांत निरक्षर मजुरांपेक्षां साक्षर मजूर जास्त वकूब दाखवितो असें गिरणीवाल्यांचें मत आहे. अर्थात् उद्योगधंदे नीट व्हावयास हवे असले किंवा कोणतेंहि काम चांगलें उत्पादक व आस्थेनें व्हावयास हवें असलें तर तें करणारास अक्षरओळख हवी. पण ही ओळख त्यास करून द्यावयाची म्हटलें तर खर्चाचें बुजगावणें पुढें येतें व तें खरेंहि आहे. येथें पुन्हा सामाजिक विचाराला स्थान आहे असें मला वाटतें. हें बोलणें केवळ भावनासृष्टींतील व हिशेबाच्या राज्यांतच घडून येण्यासारखें आहे असें कोणास वाटेल; पण पूर्वीच्या पीठिकांचा अजूनहि थोडा उपयोग करून घ्यावयाचा म्हटलें तर प्रयत्न वायां जातील असें वाटत नाहीं. प्रत्येक

खेडेगांवांत अगदीं नाहीं म्हटलें तरी दोन तीन ब्राह्मणाचीं घरें असतातच व शिक्षित ब्राह्मणेतरांचींहि थोडींबहुत असतात. या लोकांनीं जर कसलाहि भार लोकांवर न टाकतां मुलांमुलींना साक्षर करावयाचें असें म्हटलें तर तें त्यांना शक्य आहे असें वाटतें. दिवसा आपआपले धंदे संभाळून रात्रीचा एक दीड तासाचा वेळ आपल्या अज्ञ बांधवांच्या मुलांना शहाणे करण्यासाठीं खर्च करणें हें निदान खेडेगांवांतल्या वस्तीला तरी सहज शक्य आहे. लोक आपआपला वेळ कसा घालवितात हें ज्यांना माहीत आहे त्यांना यांत अतिशयोक्ति वाटणार नाहीं. धर्मशाळा, चावड्या, देवळें आणि उघडिपीच्या वेळेस पिंपळाचे पार हे सुद्धां इमारती म्हणून उपयोगी पडण्यासारखे आहेत. जर गांवचे लोक मुलें धाडावयाचें कबूल करीनात तर सरकाराशीं सहकार्य करून त्यांजकडून मुलें धाडण्याची सक्ती लोकांवर करवावी. पण शिक्षण मात्र मोफत द्यावें; शिकवावयाची पद्धति कोणतीहि असो, श्रीगणेशायनमः पासून सुरुवात करा, किंवा ग, म, भ, न पासून करा सहा महिन्यांच्या आंत विद्यार्थ्याला उत्तम अक्षरओळख होतेच होते असा माझा अनुभव आहे. उत्तरोत्तर या शिक्षकांच्या मंडळींत विद्यार्थ्यांतूनच नवीन भरती होईल व जुन्यांना काम करण्याची जरूरी कमी कमी पडत जाईल. हा प्रयोग एक सामाजिक उचल म्हणून व्हावयास हवा. आपण एका मोठ्या सामाजिक परिवर्तनाच्या फाटकापाशीं येऊन ठेपलों आहोंत व तें उघडतांच पुढील प्रवास जर सुखानें व्हावयास हवा असेल तर मोठी तयारी करावयास हवी हा विचार व ही जाणीव सर्व समाजांत रूढ व्हावयास हवी.

पायगोवा असलेला मराठा—

अशा रीतीनें साक्षर झालेला व बुद्‌बुद रूपाच्या अनेक धंदेवाल्या जाती स्वतःच्या अंगांत मुरवून घेऊन पुष्ट झालेला हा मराठा समाज मोठा भव्य आणि तरतरीत असा दिसूं लागेल. आणि राजकारणाचे साचे कायम करण्याचा अधिकार व सरकारदरबारचे मानमरातब हे आपल्याकडे आले आहेत असें एकदां त्यांस दिसूं लागलें म्हणजे या लोकसत्तेच्या काळांत महाराष्ट्राचे पुढारीपण आपल्या जुन्या धन्याकडे म्हणजे विशालसंख्य मराठ्यांकडे पुन्हां परत जाईल. हेंच व्हावयास हवें; कारण ज्या राजकारणांत महाराष्ट्राचा हा

मुख्य प्रतिनिधि मनानें, वाणीनें, आणि शरीरकष्टानें हजर नाहीं तें राजकारण यशाला जाणें फार कठीण आहे. आपणच धनी झालों आहों असें एकदां या समाजास वाटूं लागलें म्हणजे त्याची सध्याची संशयी वृत्ति नष्ट होईल. व भावी कालांत जें मोठेंच मतसंगर होणार आहे, त्यांत त्याचा चांगला उपयोग होईल. सध्यां महाराष्ट्रांत सोशालिस्टिक किंवा कॉम्युनिस्टिकहि मत रुजत चाललें आहे. या मतांची अंमलबजावणी खाणी, आगगाडया इत्यादींवर होतां होतां शेवटीं शेतजमिनीवर व्हावयाची असते. तेव्हां हा भूमिनिष्ठ मराठा वर्ग काय करतो हें पहाण्यासारखें आहे. हा चलविचलीचा काल जसा जसा जवळ येईल तसतसें मराठा समाजाचें जातिरूप अधिक बळकट होत जाईल; व सामर्थ्याच्या पोसाला जरूर असलेल्या सर्व बाबी त्याच्या अंगास असल्यामुळें तो, युरोपांतून येथें येऊन ठेपत असलेल्या नव-मताच्या वावटळीविरुद्ध, एकाद्या भव्य बुरूजासारखा उभा राहील. कारण या नवीन मताची हाय त्याला फारच लागण्याचा संभव आहे. लोक-संख्या ही त्याच्याच अंगास आहे. याचाच अर्थ असा होतो कीं बहुमत हें त्याचें होणार. शेतीची मालकी ही त्याजकडेच आहे. ब्राह्मण, गुजर इत्यादिकांकडे कांहीं असली तरी प्रत्यक्ष जमीनी कसणें हें काम ते करीत नसल्यामुळें शेवटीं मराठा हाच जमीनीचा मालक हें खरें ठरेल. अनेक घराण्यांची श्रेष्ठ कुल-परंपरा आणि महाराष्ट्राचें आदिदैवत जे शिवाजी महाराज तेहि त्यांचेंच होय. त्याप्रमाणेंच मोठमोठाले मातवर संस्थानिक हेहि जातीनें मराठेच आहेत. अर्थात् हा सर्व ठेवा (Stake) नवीन मताच्या वायधुळांत सांपडूं देण्यास मराठा समाज कधींहि तयार होणार नाहीं. मताचा आग्रह तो दाखवीलच; पण आपला ठेवा संभाळण्यास जरूर पडली तर धक्काबुक्की करावयास जरूर असलेलें शरीरसामर्थ्यही त्याच्या अंगांत असल्यामुळें ठेवा जपून धरण्याचा आपला हट्ट तो पुरा पाडील.

पायगोवा नसलेला अस्पृष्ट--

आतां याचवेळीं महाराष्ट्र समाजांतील जो दुसरा मोठा घटक म्हणजे अस्पृश्य समाज त्याच्या मनाची काय चलविचल होण्यासारखी आहे हें पाहूं. जवळ जवळ वीस लक्ष इतकी लोकसंख्या या समाजाची आहे. याच्यांतील

मुख्य जात म्हणजे महाराची. महारांच्या संबंधानें आतांपर्यंत पुष्कळच उल्लेख आले आहेत. त्यावरूनहि दिसून येईल कीं केवळ लोकसंख्येनें नव्हे तर मनोवृद्धींच्या गुणांमुळें महारसमाज अनुकूल परिस्थिति प्राप्त होतांच झपाट्यानें पुढें येईल. चांभार कांहीं तरी रुटूं खुटूं करीत खेडेगांवांतच डोई देऊन बसेल. पण महारांना मात्र भाकरीच्या शोधासाठीं आपलीं खेडीं सोडून शहरांकडे धांव घेणें भागच आहे. म्हणून असें वाटतें कीं कोंकण व देश इकडील तमाम महार लोक मुंबई, सोलापूर, अशासारख्या गिरण्यांच्या शहरांत जमा होतील. गेलीं कित्येक वर्षें या समाजाला हा शहरचा ओढा कसा लागला आहे हें मागील एका कोष्टकांत दाखविलेलें आहे. हें स्थलांतराचें वाढत चाललेलें प्रमाण दिवसेंदिवस जास्त वाढेल. शहरांत राहणी पडल्यामुळें व गिरणींतल्या नोकरीवर निश्चित पैसा हातीं आल्यामुळें महारांची राहणी त्वरेनें सुधारेल. पण या बरोबर दुसरीहि एक गोष्ट घडून येईल. अशा शहरांतच सोशालिस्टिक किंवा कॉम्युनिस्टिक मताचे आखाडे निघालेले आहेत व त्या मताचा प्रादुर्भाव होण्यास अत्यंत अनुकूल भूमि म्हणजे ज्या लोकांना जगतांत कसलाहि ठेवा नाहीं त्यांचीं मनें ही होय. अस्पृश्य समाजाचें देशाशीं काय लागतें आहे? त्याला ठेवा (Stak) कसला आहे? म्हणून मनाला स्वास्थ्य प्राप्त करून देणारें हें नवें सामाजिक तत्त्वज्ञान तो लवकर पिईल व अंगांत रग असल्यामुळें त्याच्या अंमलबजावणीचीहि आकांक्षा बाळगील. ज्याला गांवांत घर नाहीं, रानांत शेत नाहीं, ज्याच्या देवळांत देव आहे पण त्याच्याकडे कोणी ढुंकून पहात नाहीं आणि ज्या देवळांतल्या देवाच्या पायावर लक्षावधी लोक आपलीं डोकीं ठेवतात त्याचे दरवाजे जो पुढें आला असतां बंद होतात, त्याला कसला ठेवा असणार आहे? जो शिडीच्या शेवटच्या पायरीवर असतो तो हलावयास नेहमीं नाकबूल असतो कारण हलणें म्हणजे खालच्या पायरीवर येणें हें त्याला माहीत असतें. पण जो शिडीच्या पहिल्या पायरीवर असतो तो हलावयास नेहमींच उत्सुक असतो. कारण कसलीहि हालचाल केली तरी आपण वरच सरकूं हें त्याला माहीत असतें. हा न्याय अस्पृष्ट समाजाच्या बाबतींत उत्तम लागूं पडेल व हें नवीन तत्त्वज्ञान तो हौसेनें पत्करील. असें झालें म्हणजे मग वर जें मतसंगर म्हणून म्हटलें आहे तें सुरू होईल. जबरदस्त पायगोवा (Stake) असलेला मराठा समाज एका अंगास व कांहींशीं सूडाची

बुद्धि मनांत बाळगणारा आणि जगतांत कसलाही पायगोवा नसलेला बलिष्ठ अस्पृश्य समाज दुसऱ्या अंगास असा प्रकार भावीकालांत घडून येण्याचा संभव आहे. म्हणून महाराष्ट्रांतील सर्व स्पृश्य जनतेनें वेळींच सावध झालें पाहिजे व या लोकांना त्यांनीं कांहीं पायगोवा उत्पन्न करून दिला पाहिजे. मोठा पायगोवा असलेल्या लोकांनीं केलेली नव्या मताची अंमलबजावणी व मुळींच पायगोवा नसलेल्या लोकांनीं केलेली तीच अंमलबजावणी यांत फार मोठा फरक पडेल हें कोणीं कोणास सांगावयास नको. वास्तविक पाहतां आधींच उशीर झालेला आहे,म्हणून जेवढ्या जास्तींत जास्त सद्बुद्धीनें व जलदीनें हें काम उरकतां येईल तितकें आतां उरकावयास हवें. त्यांच्या मनबुद्धींच्या सामर्थ्याच्या विकासास व विकसित झालेल्या सामर्थ्यांच्या वापरास भरपूर संधि समाजानें द्यावी व त्याच्या धार्मिक व सामाजिक आपत्ति झटाझट दूर कराव्या.

वन्य जाती—

आतां यापुढें लोकसत्तेचें जें युगचक्र चालूं झालें आहे त्याच्या दातऱ्यांत अस्पृष्टांच्या मागोमाग रानटी व वन्य जातीहि सरकारानें आणून लाविल्या आहेत. सरकारचा हेतु स्पष्टच आहे. अस्पृश्यांचा प्रश्न जों सुटावा तोंच अर्धसंस्कृतांचा व रानटांचा उपस्थित व्हावा अशी ही योजना आहे. पण वर एकदां सांगितलेंच आहे कीं, सरकाराप्रमाणें आपले देशभक्तहि लोकसत्ता हवी हेंच म्हणत आहेत. व हे लोक म्हणजे लोक नव्हेत असेंहि कोणास म्हणतां येण्यासारखें नाहीं. म्हणून नवी उमेद धरून तरुण लोकांनीं याहि प्रश्नाच्या मागें उत्साहानें लागावें.

हिंदु समाजांतील तरुण लोकांनीं या प्रश्नाकडे जवळ जवळ हव्यास–बुद्धीनें लक्ष दिलें पाहिजे. आजवर हिंदुधर्म जो पसरत आला तो मुरवणीच्या पद्धतीनें पसरला. हिंदू समाज जर आसपास असले तर त्यांचे धर्मासंबंधींचे विचार अथवा खरें म्हटलें म्हणजे त्यांच्या धर्मसमजुती व पूजा इत्यादींचे प्रकार, या वन्य जातींनीं अनुकरण बुद्धीनें पत्करावे असेंच आजवर झालेलें आहे. केशाकर्षण-न्याय म्हणून जी कोणचीही गोष्ट पसरण्याच्या बाबतींत एक तऱ्हा असते तीच या ठिकाणीं लागू पडली आहे. राखेच्या ढेपशावर एक पाण्याचा

थेंब पडला म्हणजे तो ज्या न्यायानें पसरत पसरत जातो व सगळा ढेपसा ओला करून टाकतो त्याच न्यायानें हिंदुधर्मांतील समजुती, देवतांच्या कल्पना या हळुहळू पसरत जाऊन त्यांनीं हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व रानटी लोक हिंदुत्वाच्या छापेंत आणून सोडले. हें कांहीं हिंदू लोकांनीं बुद्धिपुरस्सर केलेलें काम नव्हे. असें जरी असलें तरी ते हिंदू नव्हेत अशी कल्पना मात्र कोणी करतां कामा नये. केल्यास त्याची कशी फसगत होईल हें नुकतेंच मागें सांगितलें आहे. आतां यापुढें या मुरवणीच्या पद्धतीवरच हिंदुसमाजानें अवलंबून राहतां कामा नये. जे हिंदुत्वाच्या कक्षेंत आले आहेत त्यांना हिंदुत्वांतच भक्कम करून टाकणें व जे अजून आलेले नाहींत त्यांनाहि हिंदुत्वाच्या परिघांत ओढणें हें फार महत्त्वाचें काम अजून शिल्लक आहे व हें करावयास तरुण हिंदू शिक्षितांनीं जलदीनें पुढें यावयास हवें. वेदकालापासून तों तहत आधुनिक कालापर्यंत जें हिंदुधर्माचें म्हणून वाङ्मय उत्पन्न झालें आहे त्यांतील कांहीं सूत्ररूप भाग 'हिंदुधर्माची तत्त्वें' या नांवानें कायम करावयास हवे. हें करतांना त्यांना 'प्रामाण्य'प्राप्त करून देण्याची खटपटहि अवश्य केली पाहिजे. नाहींतर हा एक स्वतंत्र पंथच होण्याचा संभव आहे. तसेंच जे कोणी रामकृष्णासारखे अवतारी पुरुष किंवा इतिहासप्रसिद्ध लोक झाले आहेत त्यांचीं शुद्ध चरित्रें तयार करावयास हवीं व याच्या जोडीला जे कोणी संतमहंत झाले आहेत त्यांच्या वाङ्मयांतील, फालतू विचार सोडून देऊन, संसारावर श्रद्धा व इहलोकीचें वैभव प्राप्त करून घेण्याची ईर्षा यांच्या जोपासनेस जो भाग उपयोगी असेल त्याचीं स्वतंत्र पत्रकें तयार करावयास हवीं. पण हें सगळें साहित्य आहे इतकेंच. या साहित्याचा उपयोग या अर्धसंस्कृत अशा जातींत करावयास कोण जातो यावर सगळें अवलंबून आहे. विद्या शिकलेले, विवेकाची चालना मनाशीं अखंड ठेवणारे, पर-स्त्री मातेसमान मानणारे, स्वतः विवाहित असलेले, व लोकांना अज्ञानतिमिरांतून बाहेर काढून ज्ञान व उत्कर्ष यांच्या वाटेवर आणून ठेवण्यांत आपल्या मनबुद्धींच्या सामर्थ्याचा उपयोग करण्यांत ज्यांना गोडी वाटते असे हव्यासी आणि आकांक्षी लोक पुढें यावयास हवेत. आपल्या या देशांत पुष्कळच काम आहे आणि हिंदू समाजांत तर त्याहूनहि जास्त आहे. हें उरकण्याचा बोजा आतांच ज्यांचें वर्णन केलें अशासारख्या

तरुणांनीं घेतला पाहिजे. शिवाजीच्या डोंगरकरी मावळ्यांचें कौतुक आपल्य बुद्धीला व्यापून राहिलें आहे तें योग्यच आहे. पण या एक मावळ्यांसारखे शेकडों प्रकारचे डोंगरकरी लोक आणि झाडाझुडपांत दडून बसलेले लोक अशा या हिंदु मिशनऱ्यांची जणूं वाटच बघत आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. मागें वन्य व डोंगरकरी लोक हे कोठें कोठें राहतात व त्यांच्या संख्या केवढ्या अफाट आहेत हें दाखविलेंच आहे. त्यांच्या त्या ठिकाणांकडे व संख्येकडे पाहून भविष्यकालाला वठणीवर आणण्याची धमक बाळगणाऱ्या तरुण लोकांना आनंद व्हावा व तेथें तेथें जाऊन आपण हीं क्षेत्रें काबीज करणार, हे लोक आपले वनविणार, हिंदु धर्मांतील उदार श्रुतिवचनें जीं केवळ अक्षर-रूपानें शिल्लक आहेत त्यांना जिवंत अर्थ उत्पन्न करणार असा कांहीं हव्यासाचा आणि आकांक्षेचा विचार त्यांच्या मनांत तुडुंब भरून जावयास हवा. बुद्ध भिक्षू हिमालयाचे उंच उंच पहाड ओलांडून जपानपर्यंत जाऊन थडकले होते. ख्रिस्ती मिशनरी येशु ख्रिस्ताचा 'तारण-मंत्र' बरोबर घेऊन सश्रद्ध चित्तानें चारहि खंडांत आजहि फिरतच आहेत. आपले हिंदू मिशनरी मात्र अजून येवढ्या अभिनिवेशानें, निदान ऐतिहासिक कालांत तरी, फिरलेले नसावेत असें वाटतें. हें अजून करावयाचें राहिलेलें काम, आतां हिंदू तरुणांनीं करावयास हवें. सह्याद्रीचीं दरींखोरीं, सातपुडा आणि विंध्य यांच्या वळचणी, गोंडवनांतील निविड अरण्यें, नीलगिरीचे घाटमाथे, हिमालयाचीं सुंदर पठारें, आसामांतील चिरफळ्या झालेले डोंगर, अशांसारख्या अनेक प्रदेशांवर, हिंदुधर्माचा टिळा ज्यांच्या कपाळीं आगाऊच लागलेला आहे किंवा कदाचित् लागलेलाहि नाहीं असे कांटक, धिप्पाड, उंच, आणि इमानी लोक आपल्या ऐहिक व पारमार्थिक क्षुधेचा उपशम कोणी करील काय असें मुक्यानेंच बोलत आहेत असें त्यांनीं समजावें.

महाराष्ट्रांत निदान ब्राह्मण वर्गाच्या मनाला जो पीळ भरला आहे तो राजकारणानें भरलेला आहे; तो यथायोग्य आहे व तो तसा रहावयास हवाच. नाहीं तर राजकारणरूप भाल्याला लावलें असलेलें हें पोलादी फळ काढून घेतल्यासारखें होईल. पण त्यांच्यांतले जे राजकारणांत पडतात त्यांवाचून दुसरे जे हजारों तरुण लोक आहेत त्यांच्या मनाला वरील विचाराचें आवाहन पोंचलें पाहिजे.

मराठा समाज जरी अशिक्षित असला तरी हें जें आपलें ए, बी, सी, डी चें शिक्षण आहे त्यांत तो अशिक्षित आहे इतकेंच काय तें. त्याला ही नवी कल्पना जर कां प्राप्त झाली आणि हिंदु धर्माच्या आणि समाजाच्या भवितव्याची जाणीव त्याला आली तर या कामीं सुद्धां तो हरतऱ्हेचें श्रमसाहस करावयास मागें पाहणार नाहीं. त्यागबुद्धि तर त्याला कोणी शिकवावयास नको. हें बोलणें महाराष्ट्रापुरतें झालें. पण असाच प्रकार जर देशोदेशींच्या हिंदू तरुणांनीं केला तर चोहोंबाजूंनीं फार जोराचा उठाव होईल. एकेका टोळीनें कामाचें एकेक क्षेत्र कबजांत घेतलें तर एका हयातीच्या आंत हिंदुत्वाचा विचारकंद त्या त्या लोकांच्या मनोभूमींत कायमचा व्हावयास हरकत पडणार नाहीं. त्यांची मनोभूमि आधींच थोडी खणून व ओलवून ठेवलेली आहे; याच्या पुढचें काम करावयाचें आहे व तें करावयास हिंदू तरुणांनीं उशीर न करतां उद्युक्त व्हावें.

सरहद्दीवरच्या जाती—

हे दूरचे लोक सोडले तरी आपल्या समाजाच्या सरहद्दीवर उभे असलेले किंवा समाजांत येऊन सुद्धां, पूर्वीच्या स्वतंत्र बाण्याचा पीळ मनांत कायम असल्यामुळें जे कोणीं समाजाचीं नियमनें थोडया जुलमानेंच पाळतात त्यांना आपल्या संस्कृति–पाशांत पूर्णपणें घेणें हेंहि एक अगत्याचें काम आहे. अशा लोकांचें ठळक उदाहरण म्हणजे रामोशी होत. 'राजा कालस्य कारणम्' हें वचन संस्कृत असेल पण त्याचा 'इंग्रजी' अंमल मात्र आपल्याला अनेक ठिकाणीं दिसतो. इंग्रजी अंमलामुळें कुणाचीं राज्यें बुडालीं असतील, कोणाचीं उत्पन्नें खालसा झालीं असतील, कुणाचे दत्तकाचे हक्क बुडाले असतील, कोणी वेदविद्येला तुच्छ मानूं लागले असतील; हें सर्व झालें असेल पण नवीन घडण झाल्यामुळें व तिची तऱ्हाच कांहीं निराळीं असल्यामुळें कित्येक जातींचा संस्कृतिदृष्टचा सुद्धां अपकर्ष झाला. त्यांचे पेशेच बदलले, त्यांना चरितार्थाचीं साधनेंच राहिलीं नाहींत.आणि शेवटीं त्यांना 'गुन्हेगार जाती'असें नांव मिळालें. इंग्रज सरकारानें पुस्तकें लिहून व नामकरण करून कित्येक जातींना, जवळ करावयाच्या ऐवजीं जवळजवळ माणसांतूनच उठविलें आहे. रामोशांची जात हें या प्रकाराचें फार उत्तम उदाहरण आहे. इतिहास-कालांत या रामोशांचा

महिमा फार मोठा होता. कानडी मुलखांत बेडर किंवा बेरड व शेजारच्या मराठी मुलखांत रामोशी म्हणून माहीत असलेले लोक हे एकच होत. पूर्वी याजकडे डोंगरी किल्ले संभाळण्याचें काम असे. नगर–रक्षणाला लागणारी शिबंदी यांच्यांतून तयार करीत व खेडेगांवच्या वेशीचा पहारा सुद्धां यांजकडेच असे. रामोशी हा बिथरला तर कठीण हें खरें,पण त्याच्यासारखें इमान फार थोडचा जातींनीं दाखविलेलें आहे. एकदां रामोशानें तुमच्या घरचा दूधभात खाल्ला म्हणजे प्राण गेला तरी तो तुमच्यावर उलटावयाचा नाहीं अशी त्याच्याविषयीं समाजाची खातरी असे. हे लोक उंच, तरतरीत, अंगापिंडानें मजबूत, कसल्याहि साहसाला प्रवृत्त होणारे, पण आपली कसलीहि काळजी न वाहणाऱ्या या समाजाकडे कांहींसें तिरस्कारानें पाहणारे असे आहेत. इंग्रजी अंमल सुरू होतांच यांची लष्कराची नोकरी गेली. किल्ल्यांचाच महिमा संपल्यामुळें हे किल्लेकरीही बेकार झाले. त्यांचा गुजाराहि पूर्वीच्या सरकारच्या आश्रयावरच चालत असल्यामुळें समाजाशीं त्यांचें जें निकट नातें उत्पन्न झालें होतें तें अगदीं तुटलें. अर्थात् खावयाचें काय हा प्रश्न पुढें आला आणि या शूर पण अज्ञ लोकांना तो जसा सोडवितां आला तसा त्यांनीं सोडविला. म्हणजे असें कीं लूटमार करण्यास आणि दरोडे घालण्यास त्यांनीं सुरवात केली. खावयास मिळालें नाहींतरी हरकत नाहीं पण सर्वांनीं देशांत शांतता ठेविली पाहिजे हें आपल्या राज्यकारभाराचें ज्या इंग्रज सरकारानें सूत्र बनविलें, त्या सरकारानें त्यांची गणना गुन्हेगार जातींत केली. असा हा रामोशांचा काल बदलला आहे. म्हणून म्हटलें आहे कीं 'राजा कालस्य कारणम्!' हे लोक स्वत:ला "रामवंशी" असें समजतात. व राम जेव्हां सीतामाईला घेऊन अयोध्येला परत गेले तेव्हां त्यांच्या संरक्षणासाठीं आपले कांहीं पूर्वज अयोध्येला गेले व अजूनही तेथें त्यांची वस्ती आहे असें त्यांचे पुढारी सांगतात. अशा या लोकांना नवें राज्य झाल्याबरोबर उदरनिर्वाहाचें असें नवें साधन मिळालें असतें तर गुन्हेगारजात हा नवा शिक्का त्यांच्यावर पडला नसता. या लोकांच्या जीविताची परीक्षा करून त्यांच्यांत नवसंस्कृतीचीं वळणें घालावयाची हिंमत कोणी उमेदवार लोक धरतील तर या लोकांना सुधारलेल्या लोकांच्या ओळींत आणून बसविल्याचें श्रेय त्यांना लाभेल. अशीं कित्येक उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत. डोंगरांत व रानावनांत ज्या

तरुणांना जावयास नको व आपल्या समाजहितबुद्धीचा वापर करावयास क्षेत्र जवळच असावें असें ज्यांस वाटतें त्यांनीं अशा जातींत कामास लागावें.

शिक्षणांत अन्तर्भाव—

भावी राष्ट्रसंवर्धनाला जरूर असलेले हे किंवा दुसरे जे याहून वरोवर विचार असतील ते आपल्या वर्तमानपत्रांदिकांतून व प्रौढविद्यार्थ्यांच्या म्हणजे कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांत घालण्याची व्यवस्था व्हावयास हवी. आमचें भावी जीवित जसें व्हावें असें आपणांस वाटत असेल तसें तें हटकून होईलच अशी हमी एका इलाजानें मात्र घेतां येण्यासारखी आहे. व तो म्हणजे आतांच सांगितलेला इलाज होय. त्या त्या लोकांच्या ज्या कांहीं भावी गरजा असतील त्यांस अनुसरून प्रौढ विद्यार्थ्यांचें शिक्षण ठेवावयास हवें, हा विचारहि आपण पत्करिला पाहिजे. आपलें प्रौढ शिक्षणसुद्धां दोनच तऱ्हांचें आहे. एक काव्य, नाटक, तत्त्वज्ञान इत्यादींचें व दुसरे आधुनिक शास्त्रांचें. पण याच्या जोडीला आमच्या भावी गरजा व त्या भागविण्याचे इलाज या संबंधीचें वाङ्मय विद्यार्थ्यांस अभ्यासासाठीं दिलें पाहिजे. नाहींतर असें होतें कीं विद्यार्थ्यांचें शिक्षण एका तऱ्हेचें आणि तो कॉलेजांतून बाहेर पडल्या-बरोवर त्याच्या पुढें जे प्रश्न दत्त म्हणून उभे राहणार ते भलत्याच तऱ्हेचे. असें झाल्यामुळें विद्यार्थ्याला अनोळखी मुलुखांत आल्यासारखें वाटतें व उपस्थित झालेल्या प्रश्नांची सोडवणूक त्याला यथायोग्य करितां येत नाहीं. कै. रानडे यांनीं मागें अशी पद्धति ठेवली होती कीं प्रत्येक सामाजिक परिषदेच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीं गेल्या बारा महिन्यांत सामाजिक विचारांची जी काय प्रगति झाली असेल तिचा आढावा सभेपुढें मांडावा व त्याच्या अनुषंगानें सामाजिक विचार बोलून दाखवावे. तसेंच ज्या प्रांतांत सामाजिक परिषद असेल त्या प्रांताच्या इतिहासांत जो सामाजिक विचार विशेष ठळकपणें आला असेल त्यावर मोठें भाषण करावें. हीं त्यांचीं सर्व भाषणें एकत्र छापलेलीं आहेत. कॉलेजच्या अभ्यासक्रमांत लावावयाच्या पुस्तकांत जर याहि पुस्तकांचा अंतर्भाव झाला तर वर म्हटलें आहे त्या सारखें कांहीं केलें असें होईल. याचा अर्थ इतकाच कीं आपलीं जीं कांहीं ध्येयें असतील तीं साध्य करून घेण्यास शिकणारांचीं मनें व बुद्धि हीं तयार

व्हावींत. दरदहा वर्षांनीं जे गणनाकोश प्रसिद्ध होतात त्यांतील मुख्य मुख्य सिद्धांतांचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणें जरूरच आहे. ते कॉलेजांत येईपर्यंत भाषाज्ञानादर जास्त जोर देणें व कॉलेजांत आल्यावर जरूर त्या विषयज्ञानावर जोर देणें हें जर बरोबर असेल तर ज्या विषयांच्या ज्ञानावर जोर द्यावयास हवा त्या विषयांत वर सांगितल्याप्रकारच्या विषयांचा अंतर्भाव व्हावा हें योग्य नाहीं काय ? सामाजिक ज्ञानें आपल्या समाजाच्या अभ्यासानें उत्पन्न व्हावीं व आर्थिक ज्ञानें आपल्या समाजाच्या आर्थिक चलबिचलीच्या अभ्यासानें उत्पन्न व्हावीं. असें करावयाचें याचा अर्थ समाज-कारणाचे किंवा अर्थकारणाचे जे सर्वसाधारण स्थूल स्वरूपाचे सिद्धांत आहेत त्यांचें ज्ञान करून देऊं नये असें कोणीच म्हणत नाहीं. पण जिवंत ज्ञान कोणचें ? म्हणजे कोणच्या ज्ञानाचा व्यावहारिक अर्थ विद्यार्थ्याला पटावयाचा आहे हें पाहिलें तर जीं ज्ञानें आमच्या जीविताच्या अभ्यासानें उत्पन्न झालीं तींच जीवंत ज्ञानें होत. पाश्चिमात्य सामाजिक खळबळी किंवा आर्थिक उत्पात यांची स्थूल ओळख असणें हें जरूरच आहे. कारण त्याशिवाय विद्यार्थ्यांना तौलनिक ज्ञान व्हावयाचें नाहीं. पण केवळ याच बाबीचा वाङ्मयरूपानें त्यांच्यापुढें खल व्हावा आणि ज्या व्यवहारांत त्यांना पडावयाचें आहे त्याच्याशीं त्यांची पूर्ण फारकत राहावी हें युक्त नाहीं.

शेवटची विनंति--

या अस्पृश्यता निवारणाच्या कामीं प्रत्येकाला कांहींना कांहीं करतां येण्यासारखें आहे. सरकारी नोकरींत त्यांच्या शिरकावाची व्यवस्था सरकारानेंच केली आहे; पण ज्या मोठमोठ्या खाजगी संस्था आहेत त्यांतहि त्यांच्यांतील चांगलीं वकूबदार माणसें प्रविष्ट करून घेतलीं पाहिजेत. सरकारी शाळा कांहींहि करोत किंवा न करोत पण खाजगी शाळांच्या चालकांनीं त्यांच्या मुलांना मोफतच शिकविलें पाहिजे. पुस्तकें विकणारांनीं देशभक्ति आणि धर्मबुद्धि दाखविण्याची हीच संधि आहे. त्यांनीं पुस्तकांच्या रूपाची मदत जितकी करतां येईल तितकी केली पाहिजे. गांवांत शेंकडों खाणावळ-वाले आणि हॉटेलवाले असतात. त्यांच्या येथें प्रत्यहि शेकडो रुपयांचा गल्ला गोळा होतो. त्यांनीं दोन दोन चार चार विद्यार्थी पोसावयाचे म्हटले तर अवघड

आहे असें नाहीं. दुकानदार कापडवाले धर्मादाय म्हणून केवढा तरी गल्ला बाजूला ठेवतात. राष्ट्राच्या या नव्या कालांत त्यांनीं आपल्या दातृत्वाला थोडी नवी दिशा दाखविली तर लोक त्यांस भलेच म्हणतील. फार काय सांगावें? त्यांच्या जीवितांत कांहीं सुखोत्पत्ति व्हावी म्हणून नाटकवाले आणि सिनेमावाले यांनीं मधून मधून त्यांना खेळ दाखविले तरीसुद्धां ही समाज-सेवाच गणली जाईल. एतावता काय कीं सर्व वाजूंनीं व सर्व लोकांनीं उठाव केला तर ही खंडोवाची तळी उचलणें फारसें अवघड नाहीं. आपल्या संस्थानिकांनाहि कांहीं करतां येण्यासारखें आहे. चांभार व मांग हे दोन लोक त्यांनीं हाताशीं घ्यावे. घायपाताच्या लागवडीस योग्य अशी शेकडो मैल मोकळी पडलेली जमीन त्यांजपाशीं असते. तेथें घायपाताची लागवड करून, पाण्याची व्यवस्था करून, मोठमोठाल्या टापूंवर जर मांगांच्या वसाहती करतां आल्या आणि आधुनिक पद्धतीनें दोर, दोऱ्या,चऱ्हाटें वळण्याची यंत्रसामग्री तेथें सिद्ध केली तर एक मोठी थोरली जात धंद्यांत स्थिर केल्याचें श्रेय त्यांना लाभेल. चांभार व ढोर यांचेंही असेंच आहे. ते सर्व लोक रोजंदारीनें काम करणारे मजूर होत चाललेले आहेत. वडचा शेटयांनीं किंवा संस्थानिकांनीं मोठमोठ्या कंपन्या उभारून, त्यांच्यांतील इंग्रजी शिकलेलीं तरुण मुलें परदेशीं पाठवून, यांना जर कातडें कमावणें आणि त्याच्या हरतऱ्हेच्या जिनसा करणें या पूर्वींच्या धंद्यात स्थिर केलें तर याहि जातींना कायमचा धंदा मिळवून दिल्याचें श्रेय त्यांना लाभेल. याचा अर्थ असा कीं श्रीमंतापासून गरीबापर्यंत आणि श्रेष्ठापासून कनिष्ठापर्यंत सर्व समाजाचा मोहरा या समाजाच्या उद्धाराकडे मनोभावें आणि अनुकूलतेनें वळला पाहिजे. हें झालें म्हणजे हिंदू समाजाला उःशाप मिळाला असें समजावयास हरकत नाहीं.

महात्मा गांधीसारख्या लोकोत्तर राजकीय पुढाऱ्यानें आतां या विषयाची शिवळ आपल्या खांद्यावर घेतली असल्यामुळें अस्पृश्यता-निवारणाचे काम जलदीनें चालूं लागेल असा बळकट भरंवसा वाटतो. महात्माजींच्या प्रतिपादनांतील आवेश व कळकळ हीं इतरत्र दुर्मिळच आहेत. एकेका गोष्टीचा ध्यास घेतला म्हणजे तिच्यासाठीं जनमनाचा अवघा कटाह ढवळून काढील असा महात्माजीएवढा लोकाग्रणी सध्यां दुसरा कोण आहे? अस्पृश्यता-निवारणाचे ग्रह आतां खास उच्चीचे आले असें म्हणावयास हरकत नाहीं.

कारण कीं महात्मा गांधी यांनींच तो विषय हातीं घेतला. एकाद्या विषयाची धुमाळी उठविणें म्हणजे काय हें महात्माजींनीं अनेकदां दाखविलें आहे व आतां याहि विषयांत ते तीच ईर्षा दाखवितील असें त्यांच्या चालूं असलेल्या तयारीवरून दिसतें. कायदेकौन्सिलांतून व प्रतिपादन–पद्धतीनेंहि ते या प्रश्नावर चौफेर मारा करणार असें दिसतें. एकदां त्यांचें काम चालूं झालें म्हणजे प्रतिपक्षाच्या आक्षेपांतील तेच मुद्दे शिल्लक राहतील कीं ज्यांना स्वयंभू बळ आहे. बाकीचे सर्व धडाधड ढांसळतील. पण महात्मा गांधी बोलूं लागले म्हणजे इतर कोणी विकल्पाचा कसलाहि शब्द काढूं नये हें मत मात्र दुर्मतच आहे. पुष्कळदां झंझावात सुटला म्हणजे, किंवा महापूर आला म्हणजे वाइटांबरोबर चांगल्याचाहि नाश होण्याचा संभव असतो. म्हणून ज्याला जी कल्पना शुद्ध, उदात्त, आणि सामाजिक जीवनाला आवश्यक अशी वाटेल ती त्यानें जपून धरावी व तिच्या रक्षणासाठीं महापुरांतहि सांगड टाकून जपावयास योग्य अशा वस्तू जपून धरण्याची शिकस्त करावी. असें केलें असतां महात्मा गांधीशीं द्रोह केल्यासारखें होतें असें समजणें भोळेपणाचें आहे. सर्व परस्परविरोधी अशा प्रतिपादनांचा संनिकर्ष होऊन शेवटीं जो कांहीं एक संयुक्त-गति–विशेष (Resultant) सामाजिक कल्पनांना प्राप्त होईल तोच शेवटीं समाजाच्या हिताचा ठरणार आहे. अशा उंच भूमिकेवरून पाहिलें म्हणजे महात्माजींशीं मतभेद दर्शविण्यास कसलीही हरकत नाहीं. मुख्य प्रश्न येवढाच आहे कीं, आपण जे मतभेद दर्शवितों ते तर्कशुद्ध व सद्भावनापूत आहेत कीं नाहींत हें पाहावयाचें. दर वेळीं आपल्या म्हणण्याला होकार भरणाऱ्या अनुयायांपेक्षां जो प्रसंगविशेषीं आपलें स्वतंत्र मत बोलून दाखविण्यास भीत नाहीं व आपल्या कामांतच आपल्याला जमेल तेवढें साह्य मात्र करतो तो मनुष्य, अनुयायी हें नांव न घेतांना आपला अधिक अनुयायीच झालेला आहे असें खुद्द महात्माजींना सुद्धां वाटत असेल. म्हणून आपआपलें वैशिष्ट्य व वैचारिक सचोटी हीं कायम ठेवून या मोठ्या कामांत आतां सर्व लोकांनीं सामील व्हावें असाच प्रसंग आहे.

एक चळवळ करून एकादें गाऱ्हाणें मिटविण्याचा यत्न करतांना दुसऱ्या एकाद्या अरिष्टाचीं बीजें आपण न कळतच खोचून ठेवीत असतों. तसें या अस्पृष्ट समाजावरील आपत्ति नष्ट करण्याच्या कामांत आपण करूं नये. त्यांच्या

कुटुंबसंस्थेवर आघात न होईल असेच इलाज योजावयास हवेत. सुदैवानें त्यांच्या समाजांत स्त्रीपुरुषांचीं संख्या समसमान आहे, हें फार चांगलें आहे. पण जर कां नवीन मन्वंतरांत स्थलांतरामुळें त्यांना या नैसर्गिक देणगीचा जो फायदा मिळावयाचा तो बंद पडला तर त्यांच्यांत गूढस्थ असंतोषाचें आणखी एक बीज पेरलें जाण्याचा संभव आहे. भाकरीसाठीं शहरांकडे त्यांची पैरवी जास्त जास्त होत जाणार हें स्पष्टच आहे. पण ज्या गिरण्यादिकांत ते कामें करतात त्यांच्या मालकांनीं त्यांची सकुटुंब रहाण्याची व्यवस्था केली पाहिजे. हें सांगण्यांत मुद्दा आहे. आपल्याला सर्व प्रकारच्या सुखसोयी असतात. मित्र-परिवार, रुग्णालयें, भोजनालयें, क्लब्ज, नाटकगृहें, जातिसंस्थांनीं केलेल्या सोयी, वाचनालयें, राजकारण, सभा, प्रवचनें, कीर्तनें, पुराणें, संम्मेलनें, उत्सव, लग्नसमारंभातील दिमाख, मेजवान्या अशांसारखे किती प्रकार श्रांत मनाला विरंगुळा उत्पन्न करावयास आपल्याला सांपडतात. घरांच्या बाबतींत मध्यम वर्गापेक्षां मजूरवर्गाची या बाबतींतील स्थिति सुधारली आहे असें जरी गणना-कोशांत म्हटलेलें असलें तरी अस्पृश्य मजुरांची ती कशी काय आहे हें कळावयास मार्ग नाहीं; पण अजमास करतां येतो. म्हणून त्यांच्या राहण्याची व्यवस्था कारखानदारांनीं नीट केली पाहिजे. दिवसभर श्रम केल्यानंतर आपलीं मुलेंबाळें व कुटुंबें यांच्या संगतींतच त्यांना विश्रांति वाटण्यासारखी आहे. वर लिहिल्यासारखीं दुसरीं कोणतींही प्रौढ, सभ्य, आणि चांगल्या प्रकारचीं साधनें त्यांना उपलब्ध होण्यासारखीं नसतात, म्हणून त्यांचे प्रपंच त्यांच्यापाशीं राहतील अशी व्यवस्था व्हावयास हवी. सरकारनेंही या कामांत मदत केली पाहिजे. खेड्यापासून शहरापर्यंत सर्व ठिकाणीं दारूनें केवळ हाहाःकार मांडलेला असतो. तो बंद करावयाचे कांहीं इलाज सरकारनें योजावयास हवेत. पठाणाची सावकारीही त्यांचा जीव सारखी कुरतडीत असते. त्याही बाबतींत कांहीं सरकारी नियंत्रण झालें तर त्या समाजावर फार उपकार होतील.

आत्मसंरक्षणांत ज्याप्रमाणें दुसऱ्याच्या उत्कर्षाच्या आड येऊं नये, त्या प्रमाणेंच सात्त्विक उत्साहाच्या भरांत सारासार विचार दवडूं नये, हेंही अर्थात् खरें आहे. अस्पृश्यांना स्पृश्य करणें व आपण हिंदू समाजांत खसखशीतपणें अंतर्भूत झालों आहोंत असें वाटावयास लावणें हें कां जरूर आहे तें वर आलेंच आहे. पण ही गोष्ट घडवून आणतांना युक्तायुक्तता वाऱ्यावर सोडूं नये.

कार्याची घडण ही क्रमशः घडत जाते व अशी घडली तरच ती टिकाऊ वनते हें विसरतां कामा नये. "हें घडावयाचें आहे" असा बुद्धीचा निश्चय होऊन, हेतूंत प्रामाणिकपणा उत्पन्न झाला म्हणजे मग कसल्याही प्रकारच्या अपवादाला बुद्धि भिईनाशी होते. अपवादाला व रागाच्या भाषेला कोण भितो ? जो नवोदित विचारानें गांगरतो, मनांत नसतांनाच बुद्धिनिश्चय झाला असें म्हणतो किंवा बुद्धिनिश्चय होऊन सुद्धां अलखट–पलखट घालून खुशाल माशा मारीत बसतो तो शब्दप्रहाराला भितो. त्याच कामाला आपण लागलों म्हणजे आपल्या मंदगतीबद्दल जरी कोणी आपल्यावर रागावला, तरी आपल्या हेतूची विशुद्धता त्याला मान्य करावी लागते, आणि विकासाच्या बाबतींत "जवळचा रस्ता" असा बहुधा नसतो हें कामांत पडल्यावर आक्षेपकाच्याहि ध्यानांत येते.

अस्पृश्यांच्या राहाणींत अनेक दोष व वैगुण्यें आहेत. चाली रीती, भाषापद्धति विचाराच्या मोडणी, व्यसनाधीनता इत्यादि अनेक बाबतींत त्यांना फार मोठा पल्ला गांठावयाचा आहे. या कामीं त्यांस काया–वाचा–मनेंकरून अखंड साहय करणें याचें नांव सुधारक बनणें होय. अशा मदतीची त्यांनाहि अपेक्षा आहे. 'तूं अडाणी आहेस' हें म्हणणें दोष काढण्यापुरतें आहे असें दिसतें, व त्यामुळें अडाणी मनुष्यसुद्धां तें खुषीनें कबूल करीत नाहीं. पण "तूं अज्ञ आहेस, मी तुला शिकवावयास येतों; तूं यत्न कर, मी मनापासून साहय करतों, " अशा बोलण्यानें अज्ञानी माणसाला केवळ लाजावलेंसें होत नाहीं. आपल्या शुद्ध हेतूकडे लक्ष देऊन तो आनंदानें 'होकार' देतो. अर्थात् या दोन बोलण्यांत एक ठळक फरक आहे आणि तो मूळ बुद्धिनिश्चयाच्या बाबतींत. पहिल्यांत असें दिसतें कीं, "तूं अडाणी, तूं घाणेरडा, तुझें माझें कसें जमणार?" म्हणजे पोटकल्पना ही कीं जमवावयासच नको. उलट दुसऱ्यांत असें दिसतें कीं जमवावयाचें निश्चित आहे पण उघड उघड दोष दिसत आहेत तर ते नाहींतच असें खोटेंच कसें म्हणावें? त्यानें प्रगतीचा भास उत्पन्न होईल पण तिच्यांत पिळदारपणा येणार नाहीं. पण ते काढण्यासाठीं मदत करण्याची तयारी मात्र खरोखरी मनापासून आहे. हा फरक मूळ मनोवृत्तीच्या ठेवणींत आहे व ही ठेवण दुसऱ्या प्रकारची कां ठेवावी–बनवावी यांचीं कारणें व पद्धति वर

सांगितलेली आहेत. प्रगतींत 'जवळची वाट नाहीं' असें म्हटलें तर प्रयत्नाच्या बाबतींत ढिलाई उत्पन्न होते अशी एक खोल शंका कार्यसाधकांना नेहमीं पडत असते. खरेंच आहे कीं, या सूत्राचा आश्रय प्रत्येक आळशाला आणि रे रे करीत चालणाऱ्याला करतां येईल. म्हणून त्याचा फायदा आपल्या प्रयत्नांचा शिथिलपणा सजविण्यासाठीं कोणीहि घेऊं नये. त्या सूत्राचा अर्थ सिद्ध व खरा करण्यासाठीं आपण सृष्टीला मदत करण्याची जरूर नाहीं. तिचा व्यापार सर्व कारणें लक्षांत घेऊनच चालावयाचा असतो. आवाच्या-सवा उडीला जशी ती उपहासपूर्वक हंसते त्याप्रमाणेंच रेंगाळू प्रयत्नाकडेसुद्धां ती तिरस्कारानेंच पाहते.

याप्रमाणें अस्पृश्य जाती व मागसलेले, रानटी, गुन्हेगार लोक यांविषयीं येथवर लिहिलें आहे व त्यांच्या बऱ्यासाठीं स्वकीयांना मित्रभावानें कांहीं सूचनाहि केल्या आहेत. त्यांचा त्यांनीं सहानुभूतीनें विचार करावा. हें सर्व काम व्हावयास हवें आहे. आपण एका नव्या कालमानाच्या उंबरठ्याशीं येऊन ठेपलों आहों, म्हणून त्या काळाचें रूप नीट न्याहाळून लवकर कामास लागलें पाहिजे.

अस्पृश्यता-निवारणाचे अनुभव

अस्पृश्यता-निवारक मंडळ—

आम्ही जेव्हां सन १९१७ सालीं या कामाला सुरवात केली तेव्हां व तेव्हांपासून पुढेंही हरतऱ्हेच्या खटपटीस प्रसिद्धि देण्याची वहिवाट आम्ही ठेविली नव्हती.प्रसिद्धीनें मतप्रसार होतो हें खरें; पण सदभिरुचि, त्या प्रसिद्धीमुळें येणारी जबाबदारी व केलेल्या कामाचें क्षुद्ररूप हीं लक्षांत घेतां प्रसिद्धि न करणें हेंच बरोबर असें आम्हांस वाटत असे. पण आतां बरींच वर्षें झाल्यामुळें आपण केलेल्या खटपटीची हकीकत लिहून प्रसिद्ध केली तर कोणी दोष देणार नाहीं व कदाचित् ती बोधप्रदही ठरेल या कल्पनेनें तसें करीत आहें. मीं एकादी कादंबरी लिहिली असती तर ती प्रसिद्ध करावयास मला संकोच बाळगण्याचें कांहीं तरी कारण होतें काय? किंवा कादंबरी लिहिली म्हणून मला कोणी दोष दिला असता काय? मग खोट्या काल्पनिक तंतूंचें जाळें विणावयाच्या ऐवजीं खरोखरच जें घडून आलें व केलें त्याची गोष्ट वाचकांस सांगितली तर ते दोष देतील असें वाटत नाहीं. आपल्या-पैकींच एका आपद्ग्रस्त लोकांचें बरें व्हावें व त्यांच्याद्वारां शेवटीं देशाचेंही कल्याण व्हावें म्हणून कोणास कसलेंही संकट न घालतां शुद्ध धर्मबुद्धीनें जें काम आजवर केलें तें येथें सांगितलें आहे. या कामांत श्री. आण्णासाहेब भोपटकर व पुढील हकीकतींत ज्यांचीं नांवें कारणपरत्वें आलीं आहेत व आलेलींही नाहींत ते सर्व या कामाचे श्रेयभागी आहेत. पण मीच याचें वर्णन करावें असा माझा या कामाशीं संबंध असल्यामुळें तें मी करीत आहें. कोणीसें म्हटलें आहे कीं प्रत्येक संसारी माणसानें आपली हकीकत जर सरळपणानें लिहून काढली तर कितीतरी चांगलीं वाचनीय पुस्तकें बाहेर पडतील. साधा आचार पण जर तो सांगण्यांत खुबी असली तर पुस्तक चांगलें बनेल; सांगण्यांत विशेष कांहीं कसब नसलें पण जर आचार सामान्याहून थोडाही निराळा असला तरीही पुस्तक वाचण्यासारखें होईल व ज्यांचा आचारही

स्वतंत्र व सांगणेंही स्वतंत्र ते तर केवळ वाङ्मयाचे आचार्यच होत. पुढें दिलेली हकीकत यांपैकीं दुसऱ्या कलमांत बसेल असें मला वाटतें.

अस्पृश्यता-निवारक मंडळाचे सभासद—

अध्यक्ष:—लक्ष्मण बलवंत भोपटकर, एम्. ए. एल्एल् बी., व्हाइस प्रिन्सिपॉल लॉ-कॉलेज.

उपाध्यक्ष:—(कांहीं दिवस) डॉ. विश्वनाथ दामोदर फाटक, एफ्. आर. सी. एस.

चिटणीस:—श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.

ज्यांनीं मंडळाच्या स्थापनेपासून व तदनंतर कार्यप्रसाराचें काम सतत किंवा कांहीं कालपर्यंत केलें आहे ते सभासद:—

१ श्री. हरि गणेश फाटक, सार्वजनिक कार्यकर्ते.
१ श्री. चिंतामणि अनंत तुळपुळे, वी. ए. एल्एल्. वी. (सल्लागार म्हणून)
३ श्री. विनायकराव लिमये, बी. ए.
४ श्री. अनंतराव सहस्रबुद्धे, बी. ए. खादीप्रचारकर्ते
५ श्री. त्रिंबक वामन तळवळकर एम्. एससी. (अमेरिका)
६ श्री. पुरुषोत्तमपंत मराठे, एम्. ए. एल्एल्. बी.
७ श्री. रघुनाथ दामोदर दिवेकर, बी. ए.
८ श्री. विनायक अनंत पटवर्धन एम्. एस्सी.
९ श्री. सदाशिव पांडुरंग नाडकर्णी व्यापारविशारद मॅं. भा. इं. कं.
१० कै. बनोपंत खरे
११ श्री. छोटेलाल भगवानदास अग्रवाल, एम्. ए. (कँट्ब) बार-ॲट-लॉ.
१२ श्री. जी. सी. मोटॅंडू बी. एजी.
१३ श्री. अश्वत्थामाराव दातार, एम्. ए.
१४ श्री. मायदेव बी. ई.
१५ श्री. शेठ चुनीलाल, महाड.
१६ श्री. गोपाळ अनंत देशपांडे वाङ्मयविशारद, असहकारवादी
१७ श्री. काशिनाथ नरसिंह केळकर, वा. वि., ॲडव्होकेट.

१८ श्री. नानासाहेब दिघे ऊर्फ शिंदकर इनामदार
१९ श्री. सदाशिवराव गोडबोले व्यायामशिक्षक
२० कै. रामचंद्र दत्तात्रय ऊर्फ वापूराव चित्रे बी. ए.
२१ श्री. गोविंदराव पंडित एम् बी. बी. एस्.
२२ श्री. नानासाहेब गुप्ते बी. ए. एल्एल्. बी.
२३ श्री. डॉ. भागवत एल्. सी. पी. एस्.
२४ श्री. रघुनाथपंत देशपांडे
२५ श्री. नीलकंठराव गोखले.
२६ श्री. पंडितराव आपटे
२७ श्री. विंझे
२८ श्री. शिवरामपंत कुलकर्णी
२९ कै. चंद्रराव मोरे
३० श्री. श्रीधरपंत दामले बी. ए.
३१ श्री. पोंक्षे
३२ श्री. कुशाभाऊ जेजुरीकर
३३ श्री. कोकजे (ज्ञानप्रकाश–बातमीदार)
३४ श्री. पटवर्धन बी. ए.
३५ श्री. भोंडे इलेक्ट्रिक एंजिनियर
३६ श्री. बाबूराव धोंडीबा वायदंडे
३७ श्री. के. के. सकट
३८ श्री. पांडुरंग नाथोजी राजभोज
३९ श्री. राऊत
४० श्री. नरहर लक्ष्मण कदम

याशिवाय चौधरी, देशपांडे, पोंक्षे, भोसले, भागवत, वाघ, रानडे, लेले, अशा कित्येक विद्यार्थ्यांनीं साहाय्य केलें आहे. वर जे मोठमोठ्या पदव्या घेतलेले लोक आहेत ते शाळा–कॉलेजांत असतांना व कांहीं थोडे विद्याभ्यास संपल्यावरही हरतऱ्हेचीं कामें करीत असत व करीत आहेत. ३६ पासून पुढें अस्पृश्य मंडळींचीं नांवें दिलीं आहेत.

हीं सर्व मंडळी एकाच वेळीं मदत करीत होती असें नाहीं. पण या सर्वांची शक्ति, फार म्हणा थोडी म्हणा, या मंडळाच्या कामीं खर्ची पडली आहे.

पण या मंडळाच्या कामांत लेखरूपानें मतप्रसार करणें हें एक मोठेंच काम आहे व वर्तमानपत्रांत वगैरे लेख लिहिणें, त्याप्रमाणेंच परिषदांचीं भाषणें, पत्रकें, रिपोर्ट इ. लिहिणें हें काम मला अखंड पडत आलें आहे. लेखणी घेऊन लिहित वसणें फार जिकिरीचें वाटतें म्हणून सांगितलेलें लिहिणें हें मोठें चिकट काम कोणी तरी जर करावयाचें पतकरलें नसतें, तर मी जे बरेंच लिखाण केलें आहे तें झालें नसतें. पण कांहीं विद्यार्थी–स्नेह्यांनीं तें काम अतिशय त्रास सोसून केलें. त्यांचीं नांवें द्यावीं असें माझ्या मनांत होतें. पण त्यांना नको म्हणून तीं देत नाहीं.

आरंभ व देवळाची कल्पना.—

प्रत्येक तऱ्हेच्या विचारांत व आचारांत "तुमचा गुरु कोण? तुम्ही या कामांत कसे पडलांत, हे विचार तुम्हाला कोठून आले? असे प्रश्न त्या त्या माणसाला विचारण्याची दहिवाट असते. पण वहिवाट असली तरी प्रत्येक माणसाला गुरु करावाच लागतो असें नाहीं. आपल्या भोंवतीं काय चाललें आहे हें जर आपण पाहात असलों आणि आपल्या हातून कांहीं व्हावें अशी मनाला वासना असली तर कांहींना कांहीं विचाराची जुळणी बनत जाते व माणूस उठून कामाला लागतो. १९१५, १६ सालापासून स्वराज्याची चळवळ खूप जोरानें चालू झाली. लो. टिळक हे सुरू झालेल्या महायुद्धाचा फायदा घेऊन राजकीय चळवळींत जोरानें पडले आणि जिकडे तिकडे राजकीय आंदोलनाच्या लाटा जोरानें उठूं लागल्या. सर्वत्र उल्हासाचें भरतें आलें; विशेषतः नागपुरापासून बेळगांव, धारवाडपर्यंत अखिल महाराष्ट्र देशांत राजकारणाची ईर्षा खूपच जोरानें दिसूं लागली. आपण कांहीं एक नवें संपादावयास निघालों आहोंत अशा आवेशानें पुढारी बोलत होते, वर्तमानपत्रें लिहीत होतीं, व श्रोते व वाचक त्यांना अनुकूल जवाब देत होते. अशा प्रकारें उल्हास व आवेश सर्वत्र दिसत असतांना सुद्धां मधून मधून कोणी तरी कण्हत असावे असे स्वर ऐकूं येत. ज्याचें दुःख त्याला माहीत. सर्व राष्ट्र जरी एका विचारानें भारलेलें असलें तरी जर कोणाची कांहीं व्यथा असली

तर ती त्यानें बोलून दाखविणें हें रास्तच होतें. राष्ट्रांतील नवा जोर पाहून आपलें प्राक्तन पुन्हां याच लोकांच्या हवालीं होणार कीं काय अशी गूढस्थ भीति अस्पृष्ट समाजाला वाटूं लागली व ती ते स्पष्टपणें बोलूनही दाखवूं लागले. राजकारणी माणसांना हें त्यांचें करणें गाण्यांत निघणाऱ्या बदसुराप्रमाणें वाटलें असेल; पण त्यांचें भवितव्य पाहतां त्यांनीं आपलें दुःख वेशीवर टांगण्याचा यत्न करणें यांत कांहींच गैर नव्हतें. अर्थात् सर्व जनता जर राजकारणाच्या मागें जोरानें लागली आहे तर या अस्पृष्टांच्या प्रश्नाकडे कोणीतरी लक्ष पुरविलें पाहिजे असें वाटणें स्वाभाविक होतें. त्यांतही राजकीय पुढारी "अस्पृश्यांचा प्रश्न सुटलाच पाहिजे, परमेश्वराला जर अस्पृश्यांचा विटाळ होत असेल तर तो परमेश्वरच नव्हे असें मी म्हणेन" अशी निकराचीं वचनें मधून मधून बोलत असल्यामुळें,राजकारणाची त्यांना ओढ असली तरी हा प्रश्न निकालांत निघावयास हवा अशी त्यांची इच्छा खास आहे, असें मनावर वरचेवर ठसत असे. शेवटीं हा प्रश्न जर सुटावयास हवा व देशांतील मोठे लोक हे जर दुसरीकडे व्यापृत आहेत तर आपल्याला कांहीं जमतें का पाहावें या इच्छेनें मी या अस्पृश्यता-निवारणाच्या कामाकडे वळलों. याच्या आधीं १२।१४ वर्षे श्री. विठ्ठल रामजी शिंदे यांचें निराश्रित-साहाय्यकारी मंडळ स्थापन झालेलें होतें व अनेक ठिकाणीं त्याच्या शाखाही झाल्या होत्या. याहीपूर्वी निदान ५० वर्षें ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं अस्पृश्य समाजास आपल्याकडें ओढण्याचे यत्न चालविलेले होते. कोणास कितीही वाईट वाटो व अस्पृष्टांचें धर्मांतर झालें याबद्दल हळहळ वाटो; पण ही गोष्ट अगदीं खरी कीं, ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं अस्पृष्ट समाजाच्या मनाला स्वाभिमानाची व स्पृश्य समाजाच्या मनाला पश्चात्तापाची फुणगी लावली यांत कांहींच शंका नाहीं. त्यांनीं या गोष्टी ख्रिस्ती-धर्मप्रसारासाठीं केल्या असें म्हटल्यानें आपलें दुर्लक्ष न्याय्य ठरत नाहीं व त्यांच्या प्रयत्नाला हीनपणा येत नाहीं. "तुम्ही या गोष्टी केवळ धर्मप्रसारासाठीं केल्या" असें त्यांस म्हणणें ही कांहीं त्यांची निंदा होऊं शकत नाहीं. यानंतर स्वाभिमान असणारे पण हिंदूधर्मीय म्हणवून घेण्यांत कांहींसा बौद्धिक अवमान मानणारे लोक पुढें आले. स्वाभिमानामुळें त्यांना ख्रिस्ती होणें नको होतें आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं त्यांच्या कल्पनेप्रमाणें पुन्हां पुन्हां फजीत केलेल्या हिंदू धर्माचे आम्ही आहों असें म्हणवून घेण्यांत त्यांना एक

तऱ्हेची सूक्ष्म शरम वाटत असे. यासाठीं या लोकांनीं ब्रह्मसमाज, प्रार्थना-समाज, इत्यादि पंथ काढिले; व सर्व धर्मांतील चांगलीं चांगलीं तत्त्वें एकत्र आणून जुन्या हिंदूधर्मापेक्षां आपण फार उन्नत विचाराचे आहों, त्या जुन्या काल्यांत आपली बौद्धिक व पारमार्थिक भूक भागत नाहीं अशा अभिनिवेशानें ते जनसमूहापासून तुटून दूरच उभे राहिले. लोकसेवेचे ख्रिस्ती मिशनऱ्यांचें जें तत्त्व तें त्यांनीं आपलेसें मानिलें व त्यांस अनुसरून या अस्पृष्टांच्या प्रश्नालाही त्यांनीं हात घातला. ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, हे अस्पृश्यांची चळवळ महाराष्ट्रांत अस्तित्वांत येण्याच्या आधीं पुष्कळच वर्षें कामें करीत होते. पण त्यांच्यांतील पुढारी माणसांचीं कामें उच्चवर्णीय हिंदूंच्या सामाजिक सुधारणेच्या पलीकडे गेलीं होतीं असें वाटत नाहीं. अस्पृश्यांचा प्रश्न हा त्यांना बुद्धीनें माहीत झाला होता. हें त्यांच्या व्याख्यानावरून दिसून येतें. पण उच्च वर्णांची समाजसुधारणा करणें हें त्यांचें प्रत्यक्ष काम होतें असें स्पष्ट दिसतें. श्री.विठ्ठल रामजी शिंदे हे विलायतेहून धर्मशिक्षण घेऊन आल्या-नंतर ते प्रार्थनासमाजांत येऊन दाखल झाले नाहींत तर हिंदू समाजापासून अधिक दूर असलेला जो ब्रह्मसमाज त्याचे सदस्य ते बनले. या दोन समाजां-तील फरक काय आहे हें पाहण्याचें हें स्थळ नाहीं. पण एवढें खरें कीं प्रार्थना-समाज हा त्यावेळीं हिंदू समाजाला त्यांतल्या त्यांत जवळ वाटे व ब्रह्मसमाज दूरचा वाटे. या ब्रह्मसमाजाचे श्री. शिंदे हे प्रचारक बनले, व त्यांनीं शुद्ध मानवधर्म–कल्पनेनें अस्पृश्यांच्या प्रश्नाला हात घातला. आज कित्येक वर्षें लोटल्यानंतर आणि हिंदू धर्माच्या पोठांतूनच सुधारक लोक बाहेर पडून त्यांनीं सुधारणेचें काम आवेशानें चालू ठेविल्यामुळें, हिंदू समाजापासून कांहींशा अवमानाच्या कल्पनेनें दूर राहणाऱ्या लोकांना आतां हिंदू समाजांतले असें म्हणवून घेण्यांत तितकीशी लाज वाटत नाहींशी झाली आहे. खास हिंदुत्वां-तील सुधारकांना या स्वतंत्र मतपंथवाल्यांची उन्नत विचाराच्या बाबतींत मोठीशी मातब्बरी वाटेनाशी झालेली आहे व हे जे निराळे तंबू ठोकून वसलेले लोक, त्यांचाही तिऱ्हाईतपणाचा अभिनिवेश ढिला पडूं लागून आपणही खास हिंदूत्वांतील सुधारकाहून कांहीं फारसे निराळे नव्हों अशी सूक्ष्म प्रतीति त्यांस येऊं लागली आहे; व असा सुमार दिसतो कीं निदान महाराष्ट्रांत तरी ब्रह्मसमाज आणि प्रार्थनासमाज या संस्था थोडयाच कालांत अगदीं

नामशेष होऊन जातील. समाजापासून फटकून निघालें तरी कांहीं विशिष्ट बाबतींत फटकतां येतें; सगळ्याच्या सगळ्या जीवितापासून दूर राहतां येत नाहीं. कांहीं पारमार्थिक तत्त्वांचा किंवा समाजकल्पनांचा निराळेपणा बुद्धीला पटला असला तरी सामाजिक जीविताचा पायगोवा पूर्वीसारखाच राहतो; तोच प्रबल ठरतो असें दिसतें व हें असें आहे म्हणूनच बरें. कारण कीं शकल-रूपानें समाजापासून तुटून निघूं म्हणालेले पंथ मूळ समाजाच्या पोटांत याच्या योगानें पुन्हां सामावले जातात. असो. श्री. शिंदे यांनीं या प्रश्नाला हात घातला तो कोणच्या भूमिकेवरून हें ध्यानांत यावें म्हणून वरील लिहिणें लिहिलें आहे. हे त्यांचे प्रयत्न चालू असतांनाच वर सांगितलेली स्वराज्य–विषयक चळवळ चालू झाली. व तिनें सर्व देशाचें आक्रमण होत आहे असें दिसूं लागतांच वर सांगितलेलें दुखणाईताचें कण्हणें ऐकूं येऊं लागलें. अर्थात् ख्रिस्ती मिशनरी, ब्रह्मसमाजवाले, प्रार्थनासमाजवाले व यांच्याही अलीकडच्या समाजाच्या थरांतून म्हणजे खुद्द सनातन हिंदूंतूनच या प्रश्नाकडे सहानुभूतीनें पाहण्याला सुरवात व्हावी हें ओघानें येतें. अस्पृश्यांचा प्रश्न हातीं घ्यावयास हिंदुत्वांतून निराळेंच व्हावें लागतें, अथवा स्वतंत्र व तुसडा असा मतपंथ स्थापावा लागतो असें नाहीं; तर समाजाच्या पोटीं राहूनही, इतकेंच नव्हे तर पोटीं राहूनच या प्रश्नाच्या मागें लागलें तर या प्रश्नाची सोडवणूक अधिक चांगली करतां येण्यासारखी आहे असे विचार समाजांत उत्पन्न होणें अगदीं स्वाभाविक होतें; व तेच आमच्या या प्रयत्नांच्या बुडाशी होते.

अस्पृश्यांचा प्रश्न सध्या मला जितक्या विविध तऱ्हांनीं कळतो असें वाटतें तितका १९१७ सालीं कळत नसावा हें स्वाभाविकच होतें. अगदीं प्रथम देवालयप्रवेशाची बाब माझ्या मनांत उत्पन्न झाली. आपण जर त्यांना हिंदू म्हणतों तर आपल्या देवाचें दर्शन त्यांना कां घेऊं देऊं नये ही या प्रश्नाची अगदीं पहिली बोंच माझ्या मनाला लागली. रा. हरिभाऊ फाटक हे याच्या आधींच कांहीं बारीक बारीक चळवळीच्या निमित्तानें माझ्या ओळखीचे झालेले होते व पुष्कळ काम करण्याची आम्हा दोघांनाही हौस असल्यामुळें, विचारांत बहुधा एकरूपता असल्यानें व कसल्याही दगदगीच्या कामांत असतांना मनाला श्रमाचा विसर पाडणारी जी विनोदबुद्धि ती थोडीफार दोघांतही असल्यामुळें हरिभाऊंचें व माझें चांगलें जमलें. त्यांनाही ही देवळाची बाब माझ्यासारखीच

तऱ्हेची सूक्ष्म शरम वाटत असे. यासाठीं या लोकांनीं ब्रह्मसमाज, प्रार्थना-समाज, इत्यादि पंथ काढिले; व सर्व धर्मांतील चांगलीं चांगलीं तत्त्वें एकत्र आणून जुन्या हिंदूधर्मापेक्षां आपण फार उन्नत विचाराचे आहों, त्या जुन्या काल्यांत आपली बौद्धिक व पारमार्थिक भूक भागत नाहीं अशा अभिनिवेशानें ते जनसमूहापासून तुटून दूरच उभे राहिले. लोकसेवेचे ख्रिस्ती मिशनऱ्यांचें जें तत्त्व तें त्यांनीं आपलेसें मानिलें व त्यांस अनुसरून या अस्पृष्टांच्या प्रश्नालाही त्यांनीं हात घातला. ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, हे अस्पृश्यांची चळवळ महाराष्ट्रांत अस्तित्वांत येण्याच्या आधीं पुष्कळच वर्षें कामें करीत होते. पण त्यांच्यांतील पुढारी माणसांचीं कामें उच्चवर्णीय हिंदूंच्या सामाजिक सुधारणेच्या पलीकडे गेलीं होतीं असें वाटत नाहीं. अस्पृश्यांचा प्रश्न हा त्यांना बुद्धीनें माहीत झाला होता. हें त्यांच्या व्याख्यानावरून दिसून येतें. पण उच्च वर्णांची समाजसुधारणा करणें हें त्यांचें प्रत्यक्ष काम होतें असें स्पष्ट दिसतें. श्री.विठ्ठल रामजी शिंदे हे विलायतेहून धर्मशिक्षण घेऊन आल्या-नंतर ते प्रार्थनासमाजांत येऊन दाखल झाले नाहींत तर हिंदू समाजापासून अधिक दूर असलेला जो ब्रह्मसमाज त्याचे सदस्य ते बनले. या दोन समाजां-तील फरक काय आहे हें पाहण्याचें हें स्थळ नाहीं. पण एवढें खरें कीं प्रार्थना-समाज हा त्यावेळीं हिंदू समाजाला त्यांतल्या त्यांत जवळ वाटे व ब्रह्मसमाज दूरचा वाटे. या ब्रह्मसमाजाचे श्री. शिंदे हे प्रचारक बनले, व त्यांनीं शुद्ध मानवधर्म–कल्पनेनें अस्पृश्यांच्या प्रश्नाला हात घातला. आज कित्येक वर्षें लोटल्यानंतर आणि हिंदू धर्माच्या पोळंतूनच सुधारक लोक बाहेर पडून त्यांनीं सुधारणेचें काम आवेशानें चालू ठेविल्यामुळें, हिंदू समाजापासून कांहींशा अवमानाच्या कल्पनेनें दूर राहणाऱ्या लोकांना आतां हिंदू समाजांतले असें म्हणवून घेण्यांत तितकीशी लाज वाटत नाहींशी झाली आहे. खास हिंदुत्वां-तील सुधारकांना या स्वतंत्र मतपंथवाल्यांची उन्नत विचाराच्या बाबतींत मोठीशी मातब्बरी वाटेनाशी झालेली आहे व हे जे निराळे तंबू ठोकून बसलेले लोक, त्यांचाही तिऱ्हाईतपणाचा अभिनिवेश ढिला पडूं लागून आपणही खास हिंदूत्वांतील सुधारकाहून कांहीं फारसे निराळे नव्हों अशी सूक्ष्म प्रतीति त्यांस येऊं लागली आहे; व असा सुमार दिसतो कीं निदान महाराष्ट्रांत तरी ब्रह्मसमाज आणि प्रार्थनासमाज या संस्था थोडयाच कालांत अगदीं

नामशेष होऊन जातील. समाजापासून फटकून निघालें तरी कांहीं विशिष्ट बाबतींत फटकतां येतें; सगळ्याच्या सगळ्या जीवितापासून दूर राहतां येत नाहीं. कांहीं पारमार्थिक तत्त्वांचा किंवा समाजकल्पनांचा निराळेपणा बुद्धीला पटला असला तरी सामाजिक जीविताचा पायगोवा पूर्वीसारखाच राहतो; तोच प्रबल ठरतो असें दिसतें व हें असें आहे म्हणूनच बरें. कारण कीं शकल-रूपानें समाजापासून तुटून निघूं म्हणालेले पंथ मूळ समाजाच्या पोटांत याच्या योगानें पुन्हां सामावले जातात. असो. श्री. शिंदे यांनीं या प्रश्नाला हात घातला तो कोणच्या भूमिकेवरून हें ध्यानांत यावें म्हणून वरील लिहिणें लिहिलें आहे. हे त्यांचे प्रयत्न चालू असतांनाच वर सांगितलेली स्वराज्य–विषयक चळवळ चालू झाली. व तिनें सर्व देशाचें आक्रमण होत आहे असें दिसूं लागतांच वर सांगितलेलें दुखणाईताचें कण्हणें ऐकूं येऊं लागलें. अर्थात् ख्रिस्ती मिशनरी, ब्रह्मसमाजवाले, प्रार्थनासमाजवाले वं यांच्याही अलीकडच्या समाजाच्या थरांतून म्हणजे खुद्द सनातन हिंदूंतूनच या प्रश्नाकडे सहानुभूतीनें पाहण्याला सुरवात व्हावी हें ओघानें येतें. अस्पृश्यांचा प्रश्न हातीं घ्यावयास हिंदुत्वांतून निराळेंच व्हावें लागतें, अथवा स्वतंत्र व तुसडा असा मतपंथ स्थापावा लागतो असें नाहीं; तर समाजाच्या पोटीं राहूनही, इतकेंच नव्हे तर पोटीं राहूनच या प्रश्नाच्या मागें लागलें तर या प्रश्नाची सोडवणूक अधिक चांगली करतां येण्यासारखी आहे असे विचार समाजांत उत्पन्न होणें अगदीं स्वाभाविक होतें; व तेच आमच्या या प्रयत्नांच्या बुडाशी होते.

अस्पृश्यांचा प्रश्न सध्या मला जितक्या विविध तऱ्हांनीं कळतो असें वाटतें तितका १९१७ सालीं कळत नसावा हें स्वाभाविकच होतें. अगदीं प्रथम देवालयप्रवेशाची बाब माझ्या मनांत उत्पन्न झाली. आपण जर त्यांना हिंदू म्हणतों तर आपल्या देवाचें दर्शन त्यांना कां घेऊं देऊं नये ही या प्रश्नाची अगदीं पहिली बोंच माझ्या मनाला लागली. रा. हरिभाऊ फाटक हे याच्या आधींच कांहीं बारीक बारीक चळवळीच्या निमित्तानें माझ्या ओळखीचे झालेले होते व पुष्कळ काम करण्याची आम्हा दोघांनाही हौस असल्यामुळें, विचारांत बहुधा एकरूपता असल्यानें व कसल्याही दगदगीच्या कामांत असतांना मनाला श्रमाचा विसर पाडणारी जी विनोदबुद्धि ती थोडीफार दोघांतही असल्यामुळें हरिभाऊंचें व माझें चांगलें जमलें. त्यांनाही ही देवळाची बाब माझ्यासारखीच

पटली असल्यामुळें पतितपावन मंदिर या न्नांवाचें एक विठ्ठलाचें देवालय बांधावें व तेथें सर्व हिंदूंना प्रवेश ठेवावा, असें आम्ही ठरविलें. आमच्या मनाचा हा निश्चय झाला पण हा बेत जर यशस्वी व्हावयाचा तर जनमनाची थोडीतरी अनुकूलता असावयास हवी हें उघड होतें. म्हणून या विषयांत आमच्या आधीं पंधरा वर्षें काम करीत असलेले रा. विठ्ठल रामजी शिंदे यांजकडे आम्ही गेलों. रा. शिंदे यांची व माझी याच्या आधींच थोडीशी ओळख झालेली होती. ती कोणच्या कारणानें हें आतां आठवत नाहीं. पण ते जर या विषयांत आपल्या आधींपासून काम करीत आहेत तर त्यांना या बाबतींत विचारावें असें आम्ही ठरविलें

लोकमान्यांचें मत—

त्याप्रमाणें मी एके दिवशीं रा. शिंदे यांजकडे गेलों व त्यांस म्हणालों कीं, "आमची अशी अशी कल्पना आहे; आपल्याला त्यासंबंधानें काय वाटतें?" यावर त्यांनीं उत्तर द्यावयाचें तें दिलें पण त्याच्यापूर्वी मला विचारलें कीं, तुम्ही टिळकांकडून आलां आहांत काय ? मला याचा कांहीं अर्थ कळेना. मी त्या वेळेपर्यंत टिळकांच्याशीं एक शब्दहि बोललों नव्हतों आणि हे मला असें कां विचारतात? असें मला वाटलें. म्हणून मी रा. शिंदे यांना म्हणालों "माझ्या मनांत ही देवळाची कल्पना येतांच, तुम्ही या अस्पृश्य विषयांतील जाणते म्हणून तुम्हांसच पहिल्यांदा विचारावयास आलों. माझी व टिळकांची मुळींच ओळख नाहीं." रा. शिंदे म्हणाले "मीं तुम्हास असें विचारलें याचें कारण इतकेंच कीं, टिळक ही कल्पना मजजवळ बोलले होते व ही जर अमलांत आली, म्हणजे असें मंदिर जर झालें, तर ती फार नामी गोष्ट होईल, असें ते म्हणाले होते." आपल्या मनांत असलेली कल्पना खुद्द लोकमान्यांच्याहि मनांत आलेली आहे हें पाहून मला आनंद झाला व त्यांची स्वतःची गांठ घेऊन ते या विषयासंबंधीं काय बोलतात तें पाहावें म्हणून त्यांजकडे जाण्याचें मीं ठरविलें.

रा. दत्तोपंत आपटे म्हणजे प्रसिद्ध इतिहाससंशोधक व तेव्हांचे चित्रमय-जगतचे संपादक हे आमच्या हरिभाऊंचे मित्र व टिळकांच्या उत्तम परिचयाचे. तेव्हां माझी टिळकांशीं मुलाखत त्यांच्या द्वारां घडवून आणण्याची योजना

हरिभाऊंनीं केली. ठरल्याप्रमाणें सकाळीं आठाच्या सुमारास मी गेलों. लोकमान्यांच्या राहत्या घरांत माडीवरील मधल्या सोप्यांत आम्ही वसलों. लोकमान्य आरामखुर्चीवर बसले व मला समोरील खुर्चीवर त्यांनीं आग्रहानें बसविलें. मीं माझी कल्पना सांगितली. सांगतांना माझें विषयान्तर होत आहे असें त्यांना वाटलें कीं ते म्हणत "तें निराळें." असें दोन-तीनदां झालें. माझ्या ध्यानांत इतकेंच आलें कीं, मी फार विस्तारानें बोलावें अशी त्यांची इच्छा नाहीं. माझ्या या कल्पनेवर लोकमान्य फार ठासून आणि रेखीव बोलणें बोलले. "ही खटपट तुम्ही जरूर करा; सर्व हिंदू देवळांत एकत्र जमविणें हें अगदीं इष्ट आहे," असें ते म्हणतांच मी म्हणालों 'आम्ही थोडी योजनाहि केली आहे' व तिचें रूप थोडक्यांत सांगितलें. त्यावर ते म्हणाले "उगाच खोपट बांधूं नका. मी परत विलायतेहून येईपर्यंत यत्न करा. मोठ्या मुंबईच्या भाटयालाहि आंत येण्याला लाज वाटणार नाहीं असें चांगलें भव्य मंदिर बांधा. मी तेथें येईन व सर्वासमोर मला जें बोलावयाचें तें--Pronouncement--स्पष्टपणानें बोलेन." हे त्यांचे शब्द ऐकून मला अतिशय आनंद झाला. त्यांचें मत निश्चित व मांडणेंहि निश्चित. मी त्यांना सभांतून वगैरे शेंकडों वेळां पाहिलें होतें. नजीकहून पाहून व त्यांचें रेखीव बोलणें ऐकून माझा आदरभाव द्विगुणित झाला. शेवटीं मी म्हणालों "हें आपलें मत मी प्रसिद्धपणें बोललों व त्याचा Propaganda च्या कामीं उपयोग केला तरी चालेलना?" लोकमान्य लगोलग उद्गारले "खुशाल करा." हा प्रश्न मीं संकोचानेंच केला होता. पण त्याचें उत्तर मात्र एकदम व खुलासेवार आलें.

नव्या देवळाची कल्पना—

लो. टिळकांचें एवढें जबर आश्वासन मिळाल्यानंतर आम्हांला पुष्कळच हुरूप आला. मग आम्ही कै. हरिभाऊ आपटे यांचें काय मत असावें हें पाहण्यासाठीं त्यांजकडे गेलों. स्वतंत्र देवालय बांधण्याची कल्पना ऐकून हरिभाऊंना अतिशय हर्ष झाला. ते म्हणाले, "असें जर कोणी करील तर फार उत्तम होईल. कारण एक सामाजिक प्रश्न सुटावयाच्या मार्गास लागेल." आणखी एका मोठ्या गृहस्थाकडे जावें असें ठरवून आम्ही नामदार बाबासाहेब कामत

यांजकडे गेलों. बाबासाहेब यांनींही पसंती दर्शविली, प्रोत्साहन दिलें पण त्याबरोबरच प्रश्नाचा अवघडपणाही त्यांनीं आमच्या नजरेस आणून दिला. पण हें करावयाचें असें ठरवून आम्ही हस्तपत्रकेंही काढलीं व मित्रपरिवारांत मदतीची याचनाही करूं लागलों. जों जों खास समाजाच्या पोटांत शिरून आम्ही खटपट करूं लागलों तों तों समाजाचें खरें मन काय आहे हें आमच्या ध्यानांत उतरूं लागलें. बॅ. जयकर, श्रीनिवासराव कौजलगी, डॉ. के. के. जोशी या मंडळींनीं मदतीचें आश्वासन दिलें परंतु बांधावयाच्या देवळांत स्पृश्य लोक किती येतील याचा हिशेब आम्ही मनांत बांधीत होतों. सरदार, जहागिरदार, नोकर वर्ग, सुशिक्षित लोक, शास्त्री पंडित, इत्यादि समाजाच्या सर्व थरांत आम्ही भ्रमंती ठेवली; अशासाठीं कीं समाजाचें मनोगत बरोबर कळावें व देवालय बांधलें तर त्याची स्थिति काय होईल हें नीट समजावें. यांत दोन प्रश्न होते. कदाचित् पैसा जमविणें ही गोष्ट आम्हांस जड गेली असती असें वाटत नाहीं. पण खरी गोष्ट म्हणजे हचा देवाला देवपणा यावयास वैदिक मंत्रांनीं जी प्रतिष्ठापना व्हावयास हवी ती मान्य व प्रतिष्ठित अशा वैदिकांकडून होईल काय व देऊळ झाल्यावर अस्पृष्ट आपल्या संगतींत आले तरी त्यांचें कांहीं एक न मानतां स्पृश्य हिंदू त्या देवळांत येण्याचा रावता पाडतील काय. या दोन बाबी फार महत्त्वाच्या होत्या. पैकीं दुसऱ्या बाबी-विषयीं आम्ही कांहीं ठळक माणसांना पत्रें धाडून त्यांच्या मताची चांचणी केली व खुद्द पुणें शहरांत पांच पन्नास प्रतिनिधीभूत अशा माणसांना भेटून त्यांच्याशीं चर्चा करून त्यांचें मत अजमाविलें. हें झाल्यावर समाजाच्या व आपल्या विचारांत जमीन-अस्मानाचा फरक आहे आणि जर देऊळ बांधलें तर तें महाराचें देऊळ होऊन बसेल हें आमच्या मनांत चांगलें उतरलें; पण त्याबरोबरच दुसरीही बाब तितकीच अवघड आहे हेंही ध्यानांत आलें. वे. शा. सं. श्रीधरशास्त्री पाठक यांजकडे प्रतिष्ठापनेच्या प्रकरणीं बोलावयास गेलों असतां त्यांनीं स्वच्छ सांगितलें कीं, "कालमान लक्षांत घेऊन आपण ही गोष्ट करीत आहां तर करा; देवळाच्या कामास मी वर्गणीही देतों. पण शास्त्रार्थ काय आहे म्हणून जर विचाराल तर जो खरा आहे तोच मला सांगितला पाहिजे; तो असा कीं अस्पृश्यांच्या दर्शनानें देव बाटतो. इतकें जर आहे तर वैदिक मंत्रांनीं तुमच्या विट्ठलाची प्रतिष्ठापना कशी होणार हें आपणच

ओळखा." अर्थात् स्थापनेला वैदिक मंत्र नाहीं; आणि अस्पृश्य-प्रवेशाचा नवा दंडक मान्य करून देवदर्शनास जाण्यास समाज तयार नाहीं अशा दोन गोष्टी आमच्या लक्षांत आल्या. समाजाचे नेते कांहींही म्हणोत किंवा राजकारणाची लगबग झाल्यामुळें अमुक अमुक गोष्टी व्हावयास हव्या असें कोणी म्हणोत पण ज्या समाजांत ही गोष्ट घडवून आणावयाची त्याची गति कोठपर्यंत आहे हें पाहून मग काय तें करावयास हात घालावा असें जें आम्ही ठरविलें होतें तें वरोवर आहे असें प्रत्ययास आलें. पण वैदिक लोक जरी याला अनुकल झाले नाहींत तरी मनांतून असें वाटे कीं भक्तिमार्ग सांप्रदायाकडून आपल्याला प्रोत्साहन मिळेल. या सांप्रदायांतील विचाराचें औदार्य त्याच्या वाङमयाच्या अभ्यासानें माझ्या मनांत चांगलेंच भरलें होतें व म्हणून वारकरी पंथांतील अमीर उमराव आपल्या कल्पनेला पाठवळ देतील असा माझा भोळा भाव होता. कै. विष्णूबुवा जोग हे वारकरी पंथांतील एक मोठे अधिकारी गृहस्थ होऊन गेले. मी त्यांच्याशीं या विषयांत पुष्कळदां बोललों. अशी कांहीं गोष्ट घडून यावयास हवी असें त्यांचें स्पष्ट मत असे. पण त्यांचें वयोमान वरेंच झालेलें असल्यामुळें आपल्या पंथांत हें नवें बंड उभे करावयास ते अगदीं कबूल नव्हते. पण एका एका गोष्टीचा शेवटपर्यंत छडा लागला पाहिजे असें धोरण आम्ही ठेवलें असल्यामुळें विष्णूबुवासारख्या एकटया दुकटयाच्या अभिप्रायावर आपण मदार ठेवूं नये असें आम्ही ठरविलें.

आळंदी येथील खटपट—

वारकरी सांप्रदाय हा "उदारांचा राणा पांडुरंग" याचा भक्त; या पंथाची परंपरा विचाराच्या औदार्यावर आधारलेली; अफाट हिंदू समाज परमार्थदृष्टया तरी आपल्या कक्षेंत घ्यावा अशासाठीं या पंथानें उदारपणानें बाहू पसरलेले; म्हणून त्यांतील श्रेष्ठ लोकांच्या धर्मबुद्धीस आवाहन करावें व त्यांनीं कोणच्या तरी एका पद्धतीनें या होऊं घातलेल्या देवालयास मान्यता द्यावी असा हेतु मनांत धरून आम्ही आळंदीच्या जत्रेला गेलों. डॉ. कूर्तकोटी, कीं ज्यांच्याशीं माझी ओळख यापूर्वीच झाली होती, त्यांचा मुक्कामही त्यावेळीं तेथेंच होता. आळंदीस जाऊन जास्तींत जास्ती काय साधतां येतें हेंच आम्हांला पाहावयाचें होतें. काय प्राप्त होणार याचा अंदाज मला लागलेला होता.

पण अमूक एक वाजू ढोसावयाची राहिली आहे असें होऊं नये म्हणून यत्न करून पाहाणार होतों. इंद्रायणीच्या कांठीं मोठमोठाल्या फडकऱ्यांचीं पथकें पडलेलीं होतीं. एक एक फडकरी म्हणजे मोठी वलिष्ठ असामी असते. प्रत्येकाचे शिष्य हजारांनीं मोजतां येण्यासारखे असतात. यांचा पारमार्थिक अधिकार किती हें जरी कोणासच सांगतां येण्यासारखें नसलें, अथवा कोणालाही सांगतां येण्यासारखें असलें, तरी आज वारकरी संप्रदायांत त्यांचा महिमा मोठा आहे ही गोष्ट नाकवूल करतां येणार नाहीं. अर्थात् याच पुढाऱ्यांनीं आपल्या कल्पनेचा पुरस्कार केला तर ते त्यांच्या पूर्व परंपरेला जुळूनच होईल अशी माझी कल्पना होती. हा वेळपर्यंत अनेक माणसांशीं वोलून वोलून माझा सगळा पाढा पाठ झाला होता. भक्तिमार्गाचें वाङमय हें मी वरेंच वाचलेलें असल्यामुळें त्यांतील वचनांचा आश्रय माझ्या मताच्या पुष्टी-साठीं मी करीत असें. प्रत्येक फडकऱ्याकडे जावें व त्याच्यापुढें अस्पृष्टाची वाव कनवाळूपणानें सांगावी. हुजत, मारामारी, चढाई असला कांहीं हा प्रकार नव्हे तर धर्मकल्पना विस्तृत करणें एवढेंच काय तें साधावयाचें आहे असें त्यांस परोपरीनें सांगावें, असा क्रम आम्ही आळंदीस ठेविला. अंमळनेर-कर महाराज, गोपाळबुवा, गोडवोलेबुवा, न्हावीगुरु, अशांसारख्या आठदहा फडकऱ्यांच्याकडे आम्ही रदवदलीसाठीं गेलों. वहुतेकांनीं माझें म्हणणें शांत-पणें ऐकून घेतलें पण ही गोष्ट आपल्या आवाक्याबाहेरची आहे असें पर्यायानें त्यांनीं मला सांगितलें. त्यांचें म्हणणें असें कीं अस्पृश्याला देवळांत घेणें हा मुळांत अधर्मच होय. गोडवोले बुवांनीं सांगितलें कीं, तुमचें बोलणें चौदा आणे मान्य आहे. मी शेवटीं असें म्हणत असे कीं तुमच्या देवळांत जरी अस्पृश्यांना प्रवेश मिळाला नाहीं तरी आम्ही एकादें स्वतंत्र देवालय बांधिलें तर त्या स्थानाला तुम्ही मान्यता द्याल काय? वारकरी पंथानें मान्यता द्यावयाची म्हणजे इतकेंच करावयाचें कीं, ज्ञानोवाच्या पालखीच्या वाटेनें जर हें देऊळ असलें तर त्या देवळापाशीं पालखी येतांच तेथें थांवावयाचें, दोन अभंग म्हणावयाचे व पुढें चालू लागावयाचें. माझी ही विनंति इतकी साधी होती व एवढी जरी फडकऱ्यांनीं मान्य केली तरी आपलें वरेंच काम होईल अशी माझी अटकळ होती. परंतु प्रत्येक फडकऱ्यापाशीं एवढें अल्प मागणें मागितलें तरी एकानेंही त्याला होकार दिला नाहीं. अंमळनेरकर

बुवांनीं तर आम्हास केवळ धुडकावूनच लाविलें. पण मुख्य गोष्ट सांगावयाची ती ही कीं आपापली नापसंती जरी या मंडळींनीं दर्शविली तरी शेवटीं चासकर बुवा काय म्हणतील त्याप्रमाणें आम्ही वागूं असें बहुतेकांनीं सांगितलें. एक फडकरी तर असें म्हणाले कीं, "चासकरांच्या दारातलें कुत्रें जसें शेपूट हलवील तशी आमची मान हलेल"! प्रत्येकाच्या बोलण्याचें पालुपद जेव्हां एकच येऊं लागलें तेव्हां निराशा जरी वाटली तरी कामाच्या सोयीच्या दृष्टीनें हें बरेंच आहे असें दिसून आलें. कारण एकदां चासकरांनाच जाऊन विचारलें आणि त्यांच्या दारांतील कुत्र्याचें शेपूट आम्हांला कसा कौल देतें हें पाहिलें म्हणजे पुढलें काम सोपें होणार होतें! म्हणून चासकर महाराजांच्याकडे गेलों. पायावर डोयी ठेवून अदबीनें बाजूला बसलों व लक्ष नसतांनासुद्धां बिनचूक येईल असा तयार झालेला सगळा पाढा अर्धा पाऊण तास त्यांजपुढें वाचला. बोवा गंभीर मुद्रेनें उठले, व पिचकारी मारून खालीं बसले. माझी उत्सुकता फारच वाढली. मला वाटलें आतां कांहीं तरी चांगलें ऐकावयास मिळणार, कारण इतर सर्वांनीं यांचेकडे बोट दाखविलें होतें व यांनींही मोठ्या गंभीर मुद्रेनें माझें म्हणणें ऐकून घेतलें होतें. अनुकूल असो कीं प्रतिकूल असो; पण कांहींतरी श्रवणीय मजकूर आतां हे आपल्याला ऐकविणार असें मला वाटलें; पण खालीं बसतांच महाराज म्हणाले "आपलें सर्व म्हणणें आमच्या गिंडींना जाऊन सांगा. ते काय तें तुमच्याशीं बोलतील!" या वाक्यांत त्यांनीं सगळा निकाल केला. अर्थात् चासकर महाराजांच्या तंबूंतून आम्ही रिक्तहस्तेंच बाहेर पडलों व रा. गिंडी यांच्या शोधार्थ निघालों. रा. गिंडी हे बेळगांवीं एक वकील असून फार भले गृहस्थ आहेत. चासकर बोवांच्या जमीनजुमल्याची व्यवस्थाही ते पाहतात असें कळलें. पण बोवांनीं आम्हाला जें शेवटीं सांगितलें त्यावरून बोवांच्या जमीनजुमल्याचाच नव्हे तर त्यांच्या मताचाही कारभार रा. गिंडी यांजकडेच आहे हें आम्ही उमगलों. मग सकाळीं गिंडी यांच्या तंबूकडे गेलों. आमच्याशीं पुढें गिंडी हे ज्या पद्धतीनें वागले त्यावरून आम्ही कशासाठीं आलों आहों याची वर्दी त्यांना आगाऊच पोहोंचलेली असावी असें वाटतें. नदीवर स्नानास गेले आहेत, पूजा चालली आहे, अजून बरेंच व्हावयाचें आहे अशा सारखी माहिती आम्हा भेटावयास आलेल्या व बाहेर तिष्ठत बसलेल्यांना अधून मधून कळत असे. आमचा बेत एवढाच

होता कीं, सर्व फडकऱ्यांचें प्रतिनिधित्व पर्यायानें प्राप्त झालेले रा. गिंडी, डॉ. कूर्तकोटी व विष्णूबुवा जोग यांची एकत्र गांठ पाडावी, सर्वांना मिळून अर्ज करावा, व त्यांचें काय म्हणणें पडतें तें खिशांत घालून पुण्यास यावें. वाट बघतां बघतां शेवटीं रा. गिंडी हे बाहेर आले. पण तोंपर्यंत अतिकाळ होऊन गेला होता. डॉ. कूर्तकोटी हे अभिषेकास बसले. पण ते जरी बरोबर आले असते तरी भक्तिमार्गी आणि ज्ञानमार्गी यांच्या भाषणांतील कांहीं तिढे उभे राहातीलच असें या उभयतांशीं झालेल्या संभाषणावरून मला वाटूं लागलें होतें. शेवटीं रा. गिंडी व आम्ही फरूटवाल्याच्या धर्मशाळेंत गेलों. तेथें विष्णूबुवा वाटच बघत होते. उगाच कोलाहल नको म्हणून दार दपटलें, व उभयतांस विनविलें कीं, आपलें काय म्हणणें असेल तें मला स्वच्छ सांगा. आपलें खाजगी मत मला नको.जें वर्तमानपत्रांत आलें असतां आपल्यांस चालेल तें आपलें मत मला सांगा. विष्णुबुवा म्हणाले "तुम्ही म्हणतां तसें व्हावयास हवें असें माझें स्पष्ट मत आहे! पण मी आतां थकलों आहे; तुमच्या म्हणण्याचा मी पुरस्कार केला तर आमच्या पंथांत मी फाटाफूट आरंभिली असें होईल, वयाच्या मानानें मला तें उचलावयाचें नाहीं." रा.गिंडी म्हणाले "माझें स्वच्छ मत असें आहे कीं तुम्ही करीत आहां हा अधर्म आहे, पण त्यां-तूनही इतकेंच सांगतों कीं तुम्ही देवालय बांधलेंच तर तुमच्या मार्गांत मी आडवा पडणार नाहीं." हें बोलणें ऐकून मला खरोखर अतिशय वाईट वाटलें. पुण्यास जावयाच्या आधीं भक्तिमार्गांतील या अधिकारी माणसांचें अनुकूल प्रतिकूल कसें कां होईना पण निकालाचें मत मला घ्यावयाचें होतें, तें घेतलें. पण तें ऐकत असतांना देवालय बांधण्याची आमची कल्पना व्यवहार्य नाहीं या गोष्टीची दुःखप्रद जाणीव मला झाली. सामान्य जनता विरुद्ध, वैदिक व शास्त्री पंडित हे विरुद्ध,व बहुजनसमाजाचा धर्म जो वारकरी सांप्रदाय त्यांचे पुढारी विरुद्ध, असें असतांना कांहीं तरी जमवाजमव करून देऊळ बांधावयाचें म्हणजे शेवटीं तें महाराचा विठोबा या नांवानेंच ओळखलें जावयाचें असें खास वाटूं लागून हरिभाऊंनीं व मी देवालय बांधण्याची कल्पना तहकूब केली.

पण या खटपटीचा एक फायदा झाला. तो हा कीं शेकडों चांगल्या चांगल्या अधिकारी व निरनिराळ्या क्षेत्रांतील लोकांशीं आमचा विचारविनिमय झाला; प्रत्येक संभाषणाचा अनुभव पुढल्या संभाषणाला उपयोगी पडूं लागला.

निरनिराळ्या लोकांचे निरनिराळे मुद्दे, आक्षेप, उत्तरें, प्रत्युत्तरें, वादांतील आडाखे, शास्त्रवचनें हीं सर्व मला चांगलीं माहीत झालीं. या सर्व संभाषणां-च्या प्रसंगीं हरिभाऊ फारसे बोलत नसत. पण, आम्ही दोघेच जण चर्चा करीत असलों म्हणजे हरिभाऊंचा कल्पकपणा, समधात व मृदु असें बोलण्याची त्यांची धाटणी आणि इतर कोणच्याही गोष्टीकडे न पाहतां आपल्या प्रयत्नाला कार्यसाधकता कशी येईल एवढेंच पाहण्याची त्यांची पद्धति हीं माझ्या मनावर चांगलीं ठसत असत. आळंदीचा निकाल झाल्यावर आम्ही अगदींच खट्टू झालों हें खरें, पण तें फक्त देवालय–प्रवेशाच्या बाबतींत झालों इतकेंच. आमचा इतर व्याप हळूहळू वाढत चालला होता. त्याच्याच मागें मग आम्ही जोरानें लागलों.

अस्पृश्यांच्या वस्तींतील काम—

प्रत्यक्ष अस्पृश्यांच्या वस्तींतच जाऊन काम करावयास लागावें म्हणजे आपल्या लोकसेवा–वृद्धीचा यथायोग्य उपयोग होईल व त्या योगानें अस्पृश्य समाजाचीही आपल्याला प्रत्यक्ष चांगली माहिती होऊन या चळवळींतील जो विचाराचा भाग तोही आपल्याला चांगला साधेल असे विचार मनांत हळुहळू सांचत चालले होते–त्यांस अनुसरून पुणें शहरांतील नव्या पेठेंत जो मांगवाडा आहे तेथें काम चालू करावयाचें आम्हीं ठरविलें. याच्या आधीं विद्यार्थ्यांच्या मोठमोठाल्या टोळ्या बरोबर घेऊन पुणें शहरांतील अस्पृश्य लोकांच्या वस्त्या पाहावयास मी गेलों होतों. विठ्ठल रामजी शिंदे यांची कामाची काय पद्धति आहे याचें मी वारकाईनें अवलोकन केलें होतें. सरकार–दरबारीं मान प्राप्त करून घेण्याची आणि धनदौलत मिळविण्याची उत्तम संधि या गृहस्थांना असतांना सुद्धां ती दूर सारून त्यांनीं जनसेवेसाठीं गरिबी पतकरलेली होती, व म्हणून त्यांच्यासंबंधीं माझ्या मनांत मोठी आदरबुद्धि उत्पन्न झाली होती. व म्हणून त्यांच्या कामाच्या पद्धतीचें हें अवलोकन मी केलें. इतक्या दिवसांनंतर सुद्धां लिहितांना मला कसेसेंच वाटतें पण लिहा-वयास हवें म्हणून लिहितों कीं शिंदे यांचें ब्रह्मसमाज–धोरण व त्यांस अनुसरून त्यांनीं घातलेली कामाची पद्धति मला आवडेना. जनसेवा करावयास किंवा विचाराला औदार्य प्राप्त करून घेण्यास आपल्या जुन्या धर्माच्या पोटांत

पुरेसा वाव आहे असें मला वाटे व जर ही अस्पृश्य प्रजा हिंदू धर्माची तर आपली चळवळ सुद्धां पूर्वकालीन विचारधनाच्या ऐपतीवरच चालवावी असें वाटे. मूर्तिपूजेला ब्रह्मसमाजांत कोठेंही स्थान नाहीं आणि म्हणून अस्पृश्यांच्या प्रश्नांतील देवालय–प्रवेश हा जो भाग त्या बाबतींत आपल्या तत्त्वाशीं बेइमान न होतां शिंदे यांना चळवळ करतां येण्यासारखी नाहीं असें मला वाटे. ही एकचशी काय, पण अशा अनेक बारीक बारीक बाबी होत्या कीं ज्यामुळें त्यांचें व माझें कार्य एक असूनसुद्धां चळवळीची प्रणाली एकच राहील असें मला वाटेना. प्रश्न जर सोपा बनवावयाचा तर त्याची इतर सामाजिक प्रश्नांशीं गुंतागुंत करूं नये, तसें केल्यानें समाजापुढें एक मोठाच बाऊ उभा केल्यासारखें होतें व आपण हातीं घेतलेला जो एक सुटा प्रश्न असतो त्याच्या सोडवणुकीच्या कामीं विनाकारण अडथळे उत्पन्न होतात हें माझें तेव्हांही मत होतें.ब्रह्मसमाजाच्या तत्त्वाप्रमाणें वागावयाचें तर शिंदे यांना आपला जुना धर्म, जातिसंस्था, धर्मग्रंथ इत्यादि प्रत्येक बाबतींत हिंदू समाजापासून तुटून राहाणें भागच होतें. ते मुळांत जुना धर्म टाकाऊ म्हणून सुधारणावादी बनून ब्रह्मसमाजांत प्रविष्ट झालेले होते. त्यांची मूळ भूमिका जवळ जवळ नवधर्म–स्थापनेची होती. व त्या धर्मांतील जें शुद्ध मानव–धर्म–रहस्य त्यास अनुसरून मार्गांत आलेला अस्पृश्यांचा प्रश्न त्यांनीं हातीं घेतला होता. हरिभाऊ व मी जुन्या सनातन धर्माचे. त्या धर्मांत कांहीं सुधारणा कराव्या असें आमचें मत खरें. पण त्याच्याबद्दल उपेक्षाबुद्धि आम्हांस कधींच उत्पन्न झाली नाहीं आणि म्हणून त्याच्या पोटीं राहूनच आपल्याला हिंदू धर्मांतील या कोटयवधि प्रजांचा प्रश्न सोडविण्याच्या कामीं आपल्या सामर्थ्यानुरूप कांहीं काम करतां येईल अशी आमची मनोभूमिका होती. म्हणून शिंदे यांच्यासंबंधीं आदरबुद्धि मनांत कायम ठेवून सुद्धां आम्हांला कांहीं निराळा आखाडा घालावा लागला. पण जेव्हां जेव्हां जमे तेव्हां तेव्हां अतिशय स्नेहभावानें इतकेंच नव्हे तर प्रेमळ-पणानें आम्ही एकमेकांशीं सहकार्य केलें आहे. व ज्या बाबतींत जमत नाहीं असें दिसलें त्या बाबतींत आम्ही परस्परांच्या आड कधींही आलेलों नाहीं. असो.

पहिली शाळा—

वर सांगितल्याप्रमाणें मांगवाडयांत शाळा सुरू करावयाची असें ठरलें.

शेजारींच न्यू इंग्लिश स्कूलचें खेळावयाचें मैदान आहे. तेथें नुकताच पॅव्हे-लियन बांधलेला होता. त्याच्या पडवींत आपल्याला शाळेला जागा मिळाली तर बरें म्हणून शाळेच्या अधिकाऱ्यांस विचारलें. त्यांचें म्हणणें पडलें कीं तुमची ही शाळा आमच्या विद्यमानें चालू आहे असें तुम्ही म्हणत असाल तर आम्ही जागा देतों. पण हें आम्हांस परवडलें नाहीं म्हणून मांगवाड्यांतच पिंपळाचा एक पडका पार होता त्याच्यावरच काम सुरू केलें. आदल्या दिवशीं आळींतील झाडून सर्व माणसें मैदानावर बोलाविलीं व लिहिणें वाचणें शिकविणें, धार्मिक प्रवचनें करणें, दारू सोडावयास लावणें, व इतर अडचणींचा परिहार करणें असें चार प्रकारचें काम आम्ही तुमच्या येथें करणार आहों असें त्यांना समजावून दिलें; दुसरे दिवशीं रात्रीं शाळा चालू झाली. हरिभाऊ, विनायकराव लिमये, अंतोवा सहस्रबुद्धे, आणखी कांहीं स्वयंसेवक व मी इतके जण शाळा सुरू करतांना होतों. पाटच्या, पेन्सिली, पुस्तकें हें सर्व फुकटच पुरवावयाचें धोरण आम्ही आरंभापासून ठेविलें. पूर्वी कधीं न झालेली गोष्ट. पांढरपेशी व ब्राह्मण माणसें आपल्या आळींत येत आहेत व आपल्या पोराबाळांना जमा करून शिवताशिवत न मानतां त्यांना लिहा-वयास शिकवत आहेत हें पाहून आळीभर मोठें कुतूहल उत्पन्न झालें होतें. दिवसेंदिवस कामाची प्रगति चांगली होऊं लागली. पण शिक्षण देणें हा जरी आमचा हेतु असला तरी त्याला लागणाऱ्या इतर पोषक बाबींवर आम्हांला आमचें मन पुष्कळच खर्चावें लागत असे. सध्यां ही आळी बरीच स्वच्छ आहे, व तेथील रस्ताही खडी टाकून चांगला बळकट केला आहे. पण तेव्हां दोन्ही अंगांला रांगेनें घरें होतीं म्हणूनच मधल्या जागेला रस्ता म्हणावयाचें अशी स्थिति होती. नव्या पेठचें वरून येणारें सर्व पाणी याच सडकेनें खालीं वहात जात असे व त्यामुळें सडकेला मोठमोठाले खाचखळगे असत. स्वच्छते-विषयीं म्हणाल तर लोकांनीं याला काय नांव दिलें असतें हें मला कळत नाहीं. मेलेलीं ढोरें फाडणें, त्यांचे रक्ताळलेले अवयव इकडे तिकडे पडूं देणें, दारूनें बेफाम झिंगून जाणें, शिव्याशापांचा आहेर परस्परांस चालू ठेवणें, घरांतील घाणेरडें पाणी सडकेवर आणून ओतणें, सगळ्या गांवांतले रस्ते झाडले तरी स्वत:च्या घरापुढचा रस्ता कधींही न झाडणें, या कारणांनीं ही आळी म्हणजे ओंगळपणानें बुजबुजलेलें असें ठिकाण झालें होतें. मुलांना शिकवावयाचें खरें पण

या बाकीच्या गोष्टींचा थोडा थोडा परिहार केला पाहिजे म्हणून त्या संबंधीचें कामही हातीं घ्यावें लागलें. दरम्यान पावसाळा आला. रात्रीची शाळा उघडण्यावर भरत होती. तिला निवाऱ्याची जागा हवी होती. पत्र्याची झोपडी घालावयाची, पण पत्रे तरी कोठून आणावयाचे? शेवटीं म्युनिसिपालिटीकडून बरेचसे पत्रे व वासे आणले. याची झोपडी घालून द्यावयास सुतार ३५ रुपये मागूं लागला. आमच्यापाशीं पैसे नव्हते; म्हणून आम्हीच झोपडी घालावयाचें ठरविलें. पुरुषोत्तपंत मराठे एम्. ए. एल्एल्. बी. वकील नागपूर, त्रिंबकराव तळवलकर एम्. एस्सी. (अमेरिका), कै. बनोपंत खरे, रा. जी. सी. मोटॅडू हे त्या वेळीं सातवीच्या वर्गांत लहान लहान विद्यार्थी होते; व त्यांना थोडें सुतारकीचें ज्ञान होतें. बाकीच्या स्वयंसेवकांचीं नांवें आतां मला आठवत नाहींत पण असल्या या ओंगळ गल्लींत चांगल्या चागल्यांच्या मुलांनीं माझ्यावरोबर शुद्ध मजुराचीं कामें केलीं. कोणी दर काढले, कोणी वासे कापले, कोणी दगड बसविले असें करून वस्तींतील मांग मुलें मदतीस घेऊन आमची पहिली शाळा उभी केली! आम्हा सर्वांस त्या दिवशीं अतिशय आनंद झाला. पावसाळा लगेच सुरू झाल्यामुळें निवाऱ्याचें महत्त्व तावडतोब कळलें. रात्रीं कंदील घेऊन आळींत येतांच प्रत्येक घरच्या मुलांमुलींना हाका मारून बरोबर घ्यावें व अशी सगळी प्रजा जमा करीत करीत शाळेंत जाऊन काम सुरू करावें असा प्रघात असे. शाळेंत येतांना मुलानीं हातपाय धुऊन व नाक तोंड साफ करून यावें अशीही सक्ती ठेवली होती. संख्येच्या मानानें मुलांचे लहान लहान गट पाडून अर्धचंद्राकार वर्ग करून एकाच वेळीं तीन तीन वर्ग चालू ठेवीत असूं. शिकविणारे शिक्षक हे सर्व स्वयंसेवक असत. या कामाची उपयुक्तता व त्यांतील पवित्रपण या बाबी मी इंग्रजी शाळेंतील सातवींतल्या विद्यार्थ्यांना व हाताखालून शिकून गेलेल्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांना व्याख्यानांनीं व संभाषणांनीं पटवून देण्याचा प्रघात ठेविलेला होता. त्यांतून स्वयंसेवक हौसेनें कामाला येत. शाळेंत जे कोणी आपलीं कामें नीट करीत नसत किंवा जे कोणी स्कॉलर्स वगैरे असत त्यांची इच्छा असली तरी मी त्यांना या कामांत ओढीत नसे. साधारणपणें चांगल्या तऱ्हेनें पास होणारे विद्यार्थीच आमच्या या परिवारांत घेण्याची मी वहिवाट ठेवलेली होती. या स्वयंसेवकांच्या बळावर आमची ही शाळा उत्तम चालू लागली. येथें

शिकावयास येणारीं मुलें अत्यंत ओंगळ असत. दारू ही तर त्यांच्या पांचवीलाच पुजलेली. आपण जसा उसाचा रस वगैरे बाजारांतून आणतों व प्रसंगविशेषीं मुलांना देतों तशी आपल्या मुलांना दारू देण्याची या लोकांची वहिवाट होती; पण समजावून सांगितल्यावर हा प्रकार बंद पडला. पालकांची दारू मात्र आम्हांला केव्हांही बंद करतां आली नाहीं. दारू प्यावी व प्रतिष्ठितपणानें शाळेंत येऊन मास्तरांच्याशीं कांहीं गोष्टी काढाव्या व मधून मधून चांगल्या स्वच्छ व सारवलेल्या अशा जागेंतच कोपरा बघून पिचकारी मारावी असा प्रकार चालत असे. दारू प्यायलेल्या माणसाला सारखें थुंकत बसण्यांत कांहीं एक विशेष लज्जत असावी असें वाटतें. शेवटीं केव्हां समजूत पाडून, केव्हां उपरोधानें बोलून, व केव्हां दरडावून मी पालकांच्या या वृत्तीला बराच आळा घातला. 'सुंदर तें ध्यान' इत्यादि अभंग प्रथम प्रार्थनेसाठीं म्हणत असूं. वर्गांत मास्तरांनीं राम्या, गण्या, अशा हांका मारतां उपयोगाचें नाहीं अशी माझी सक्ती असे. ज्याला राम्या, गण्या अशी आपण हांक मारतो त्याला स्वतः-संबंधाची हीन कल्पना होते; तेंच रामचंद्र, गणपती, असें त्यांस संबोधिलें तर स्वतःसंबंधीं स्वाभिमानाची कल्पना त्याला येते. म्हणून मीं हा नियम सक्तीचा केलेला होता. स्वयंसेवक मुलें तेव्हांपासून तों आजतागायत माझ्याशीं अतिशय प्रेमळपणानें वागत आलेलीं आहेत. वयानें मी त्यांच्यापेक्षां पुष्कळ मोठा असलों तरी मीही त्यांच्याशीं तसाच वागत आलों आहें. जें जें करावयास हवें असें मी म्हणत असें व ज्याचें रहस्य भूतदया व धर्मबुद्धि या मुद्यांवर मी त्यांस समजावून देत असें तें तें करावयास माझे विद्यार्थीमित्र सदैव तयार असत. त्यामुळें शाळेचीं कामें मोठीं सुयंत्र चालू लागलीं. एकादशीला प्रवचन करणें, हेंही नेहमींचेंच एक काम असे. परमार्थाच्या खोल पाण्यांत मी फारसा शिरत नसे. तर अभंगादिकांच्या साह्यानें व्यावहारिक नीतितत्त्वें त्यांस समजावून देई.

शाळांची वाढ—

या आळींतील काम सुयंत्र सुरू झाल्यावर व स्वयंसेवकांची मदत खास मिळणार असें दिसूं लागल्यावर मंगळवार पेठेंतील महारवाड्यांत आम्ही आमची दुसरी शाळा सुरू केली. तेथील शंकराचे देवालयांत ही शाळा

भरूं लागली.वाढता वाढतां ५०।५५ मुलें जमूं लागली. ही शाळा फार लांब, मोठी व नवीन म्हणून हरिभाऊ व मी असे रोज जाऊं लागलों. नागनाथाच्या पारापाशीं मी राहात असे. सकाळच्या प्रहरीं दहा वाजेपर्यंत जे कोणी अस्पृश्य लोक येतील त्यांचीं सावतील तीं तीं कामें करण्याची माझी वहिवाट असे. पुढें अंघोळ, जेवण उरकून शाळेंत जाऊन व खाजगी क्लास उरकन मी सरासरी साताला परत येई. एका तासांत थोडी विश्रांति व जेवणखाण करून बरोबर आठ वाजतां हरीभाऊ व मी शाळेंत जावयास निघत असूं. आमच्या घरापासून दोन अडीच मैलांवर हें ठिकाण होतें तेथें पोहोंचल्यावर घंटेच्या ऐवजीं देवळांत एक नगारा होता तो वाजवीत असें. तेवढ्यानें मुलें जमलीं नाहींत तर घरोघरीं जाऊन बोलावून आणीत असें. येथील वस्ती महारांची आहे. यामुळें मांगवाड्यांतल्यापेक्षां येथें थोडी जास्त स्वच्छता आहे. माणसें थोडी जास्त प्रतिष्ठित व मुलेंही बुद्धीनें बरीं, या कारणानें आमचें येथील काम खूपच जोरानें चालत असे. घरून इतक्या लांब जातांना पुष्कळदां असें मनांत येई कीं, जें कांहीं पुढें एक मोठें घडून यावयाचें असेल त्याच्या सहस्रावधी कारणांपैकीं आपला हा आजचा हेलपाटा कितीसें साधक कारण असेल कोण जाणें ! पण अणूअणूनीं मोठा डोंगर रचतां येतो हेंच खरें. पुढें कांहीं दिवसांनीं पावसाळी हवा सुरू झाल्यावर हरिभाऊंना हे हेलपाटे होईनातसे झाले. सरासरी सव्वादहा वाजतां तेथून परत निघालों म्हणजे घरीं यावयास आम्हांला अकरा वाजत असत. हा रोज रात्रीचा पांच मैलांचा तकाटा व तोही वर सांगितलेला दिवसाचा कार्यक्रम आटोपल्यावर मलासुद्धां जाणवूं लागला. हरिभाऊ तर माझ्यापेक्षां वयानें मोठे, त्यामुळें त्यांच्याच्यानें होईना. मग मात्र एकटचानेंच जावयाचें व यावयाचें मलासुद्धां जिकीरीचें वाटूं लागलें. परंतु शाळा काढण्याचा आमचा उत्साह वाढतच चालला होता. सदाशिवराव नाडकर्णी (लंडन), छोटेलालजी अग्रवाल प्रोफेसर व बॅरिस्टर, बापूराव केळकर ॲडव्होकेट, गोविंदराव पंडित एम्. बी. वी. एस्. रघुनाथपंत दिवेकर बी. ए., विनायकराव पटवर्धन एम्. एस्सी. (लंडन) ही सर्व मंडळी सातवींत असतांना या मंगळवारच्या शाळेंत व्हॉलंटीअर म्हणून कामें करीत असत.

यानंतर नारायण पेठेंत नदीकांठीं एक चांभारवाडा आहे तेथें आम्ही शाळा चालू केली. कै. लाला लजपतराय यांना, कायदा न जुमानतां सभा

भरविल्याबद्दल, ज्या दिवशीं शिक्षा झाली त्याच दिवशी ही शाळा आम्ही चालू केली. कर्वे यांच्या संस्थेकडे तेथें एक घर होतें त्याच्या पिछाडीला एका लहानशा खोलींत काम चालू केलें. भास्कर धोंडो कर्वे एम्. ए., टी. डी. हे सातवींत असतांना स्वयंसेवक म्हणून येथें काम करीत असत. हेंही काम सुरळीत चालू झाल्यानंतर नव्या पेठेंत मसणवाटीच्या शेजारीं जो एक चांभारवाडा आहे तेथें आणखी एक शाळा आम्ही घातली. लक्ष्मणराव कदम या नांवाचे एक संभावित गृहस्थ आहेत. त्यांच्याच ओसरीवर शाळा सुरू केली. जागा स्वच्छ व माणसें संभावित आणि टापटिपीचीं असल्यामुळें येथें काम करणें आम्हांस फार सोयीचें गेलें. यानंतर कसबा पेठेंतील चांभारवाडा, हत्तीमहालांतील चांभारवाडा, भिकारदासाच्या गेटाजवळील चांभारवाडा, घोरपडे पेठेंतील चांभारवाडा, मीठ गंजेंतील चांभारवाडा, साऱ्याचा मांगवाडा, मीठगंजेंतील महारवाडा, रविवारांतील ढोरवाडा, नागझरीच्या काठचा चांभारवाडा, कामाठीपुऱ्यांतील महारवाडा, कातडखाना, भांबुर्ड्यातील मांगवाडा, खुद्द भांबुर्डेगांवचा महारवाडा, गुलटेकडी येथील मांगवाडा इत्यादि ठिकाणीं आम्ही हळुहळू शाळा चालू केल्या. आतांपर्यंत म्युनिसिपॅलिटीची मदत मिळू लागली होती स्वयंसेवकपद्धतीनें कामास मूळ आरंभ झाला होता, व सुमारे ८० पासून ९० विद्यार्थी केवळ समाजसेवाबुद्धीनें या शाळांतून काम करीत असत. हीं सर्व मुलें पांढरपेशा लोकांचीं व शाळेंतील आपल्या अभ्यासांत चांगलीं प्रवीण असत. स्वयंसेवकांची एक एक जोडी आठवड्यांतून एकदां किंवा दोनदां शिकवावयास जात असे. उत्साह व श्रम या दृष्टीनें या स्वयंसेवक-पद्धतींत कसलाही उणेपणा नव्हता. पण रोज नवे शिक्षक असल्यामुळें धडयांना व पद्धतींना सातत्य व एकसूत्रीपणा राहीना, म्हणून मग रोज जाणारा एक शिक्षक नेमावयाचा व त्यास पगार द्यावयाचा असें ठरविलें. त्याला मदतीस म्हणून मात्र स्वयंसेवकांच्या जोड्या जात असत. या पद्धतीमुळें मुलांची प्रगति झपाझप होऊं लागली. वर ज्या अठरा शाळांचीं नांवें दिलीं आहेत. त्या अनुक्रमानें सुरू होत होत झाल्या होत्या व जसजसा स्वयंसेवकांचा पुरवठा मला करतां येई तसातसा नवीन शाळा काढण्याचा उपक्रम पुढें सरत असे. मधून मधून असें होत असे कीं केव्हां ही, केव्हां ती, अशी एकादी एकादी शाळा बंद पडावी व एकाद दुसरी तर अजिबात सुद्धां बंद पडलेली आहे. पण

तसें झालें तरी १५।१६ ठिकाणचें काम नेहमींच चालू असे. पंधरापासून चाळीसांपर्यंत मुलें व मुली मिळून प्रत्येक शाळेंत असत.

अभ्यासाचा क्रम लिहितां वाचतां येणें व भागाकारापर्यंत गणित येणें येथपर्यंत असे. इतका त्यांचा विषय झाला कीं, तीं मुलें म्युनिसिपालिटीच्या शाळेंत जात असत. कोणच्याशा एका वर्षीं आमच्या सर्व शाळांतून मिळून ५१ विद्यार्थी म्युनिसिपालिटचांच्या शाळांत गेलेले मला माहीत आहेत. आपल्या कामाची फलश्रुति काय असें जर कोणी विचारलें तर आपण थोडेबहुत तरी गांगरतों अशी माझी कल्पना आहे. तथापि एवढें निश्चयानें म्हणतां येण्यासारखें आहे कीं आपल्या मुलामुलींना शाळेंत घालावें, त्यांना लिहितां वाचतां आलें पाहिजे, ही कल्पना पुणें शहरांतील बहुतेक सर्व अस्पृश्य वस्त्यांत आमच्या या श्रमानेंच उत्पन्न होऊन कायम झाली. वर जरी म्हटलें आहे कीं शिक्षकांना पगार देऊं लागलों तरी हे पगारी शिक्षक सुद्धां वाटेल तेथून उचलतां येत नव्हते. ज्यांच्यापुढें मी अस्पृश्यता–निवारणासंबंधानें पुष्कळ प्रवचनें केलीं आहेत व म्हणून ज्यांना या विषयाची आंच लागली आहे त्यांच्यांतूनच ही पसंती मी करीत असें. शिक्षकसुद्धां स्वयंसेवक म्हणून आठवडचांतून दोनदांच जावयाचे असते तर गेलेही असते. पण रात्रीं दहा साडेदहा वाजेपर्यंत सर्व वेळ रोजच्या रोज खर्च करणें हें अवघडच होतें. एक तर यांचा पेशा विद्यार्थीपणाचा असे व दुसरें असें कीं त्यांतील पुष्कळांना आपले कॉलेजचें चालविण्यासाठीं इतर कांहीं काम करून धनोत्पादन करावें लागे. आपण थोडे कां होईना परंतु पैसे घेतों या गोष्टीची पुष्कळांना खंती वाटे, परंतु दारिद्र्यामुळें कोणाचाच इलाज नसे. त्यांच्या श्रमाच्या मानानें पाहतां दहा रुपये म्हणजे कःपदार्थ असत. आपल्या घरापासून रोज रात्रीं तीन तीन व क्वचित् चार चार मैलांचा नुसता हेलपाटा घालून ये, तुला महिन्याचे दहा रुपये देतों, असें म्हटलें असतें तरी सुद्धां कोणी हें काम पतकरलें नसतें; मग तेथें जाऊन, मुलें गोळा करून, हंसत खेळत, उघडचा नागडचा व घाणेरडचा मुलांना शिकवीत बसणें हें तर दूरच राहिलें. असो.

या शाळांतील अनुभव सुद्धां गमतीचे पण उद्‌बोधक आहेत. आळींतील वयस्कर माणसांना जेवल्याखाल्यावर येऊन वसावयास हें बरें ठिकाण झालें आहे असें वाटें. त्यांतील एकादा दुसरा जाणीकही असेल, पण बहुतेक सगळे

अज्ञानी, भोळे, अशा प्रकारचे असत. मधून मधून मास्तरांनाही सल्ला मसलत देण्यास ते धजावत असत. आपल्याकडून आपण मास्तरांना मदत करण्यासच तयार आहों हें सिद्ध करण्यासाठीं कोणी कोणी औदार्याचा आवेश आणून म्हणत कीं, "मास्तरसाहेब, तुम्ही या पोरांना चांगले वडवून काढा; मारल्या-शिवाय त्यांना विद्या यावयाची नाहीं"! अर्थात् पालकांचा हा उदार उपदेश आम्ही कधींही ऐकला नाहीं. दारू पिऊन शाळेंत येणें ही गोष्ट फार वाईट आहे याचा उमज पडावयास मात्र हेच आळीकर बराच वेळ घेत असत.

गुलटेकडीवरील मुसलमानांचें प्रकरण--

पुणें शहरच्या आग्नेयीस गुलटेकडी नांवाची मांग लोकांची एक वसाहत आहे. येथें सुमारें २५।३० घरें असतील. येथचे मांग लोक मोठे काटक व बेफिकीर असे आहेत. सडकेच्या कांठचें घायपात मक्त्यानें घेऊन त्याचा वाक वनवावा, क्वचित् दगडाच्या खाणी काढाव्या, म्युनिसिपालिटीचीं मेलेलीं गुरें पुरण्याचें काम करावें असले धंदे हे लोक करतात. पैकीं पहिल्या धंद्यांतून एक चमत्कारिक प्रकरण उद्भवलें. गुलटेकडीच्या थेट पूर्वेस मुसलमानांचा एक दर्गा आहे व आसपासच्या वंगल्यांत त्यांची थोडी वस्तीही आहे. येथून मुसलमानी धर्माची छाया या मांग वसाहतीवर पसरविण्याचें काम चालू झालें होतें. मांगांच्या मुलांना कांहीं शिकवावें, शिकवितांना मुलांची मूळचीं नांवें सोडून देऊन कोणास महंमद, कोणास अबदुल असें वळेंच म्हणावें, त्यांनीं कपडे मागितले तर विजारी व शेकडो वारीक वारीक गुंडचांचे जे मुसलमानी कब्जे असतात ते द्यावे असे प्रकार चालू होते. पण हें केवळ मुलांना मुसलमान बनविण्यासाठीं चाललेले होते. पालकांना मुसलमान बनविण्यासाठीं निराळ्या पाशांची योजना चालूं होती. सरकारी सडकेच्या कांठचे घायपात विकत घ्यावयास या मांगांना पैसे हवे असत. अर्थात् मुसलमानांनीं येथें आपली सावकारी चालू केलेली होती. घायपाताचे मक्ते घेण्यास रकमा फार मोठ्या लागत असें मुळींच नाहीं व यंदा घेतलेल्या रकमा परत करून पुढल्या सालीं लागणाऱ्या पुढें घेतल्या तर सावकाराच्या कह्यांत जाण्याची त्यांस फारशी भितीही नव्हती, परंतु हें त्यांच्या हातून झालें नाहीं. बाक्या तुंबत चालल्या. मुसलमान सावकारांना हें हवेंच होतें. शेवटीं गोष्टी अशा थराला येऊन

पोहोंचल्या कीं कर्जे तरी परत द्यावीं नाहींतर मुसलमान होण्यावद्दलचें सावकाराचें म्हणणें तरी पतकरावें. मग ही घासाघीस चालू झाली. मांग जरी झाले तरी या तिढ्यांनीं एकदमच वधावे असे नव्हते. परंतु जेव्हां अगदींच कांहीं तरणोपाय दिसेना तेव्हां त्यांच्यापैकीं कांहीं जण अर्धवट कबूल झाले. सादजें हातीं येत आहेत असें पाहतांच सावकारांनीही या कामांत फार निकड दाखविली नाहीं. कारण एकदम फार वभ्रा होण्याची भीति होती. हळुहळू वेताबेतानें जमेल तसें तसें हें सर्व व्हावें असा त्यांचा हेतु होता. म्हणून हे जे अर्धवट तयार झालेले त्यांपैकीं कांहींना त्यांनीं दग्र्यात प्रार्थनेला नेले. नुसती प्रार्थना करा, सुंता करादयासच हवी असें मुळीच नाहीं, तुम्हांला परवडेल तेव्हां करा, अशासारखा उपदेश झाला व त्यांच्या अंगावर थोडें पाणीप्रोक्षण-ही झालें. हें वर्तमान आळींत कळतांच व तेथून तें इतर मांगवाड्यांत कळतांच सगळीकडे एकदम भडका झाला. रा. के. के. सकट, कीं ज्यांचें नांव वर्तमानपत्राच्या वाचकांना चांगलें माहीत आहे, ते मजकडे आले व अशी अशी गोष्ट होत असून जर या प्रकरणाचा गाजावाजा केला नाहीं व मांगांना सावकारीच्या तिढ्यांतून सोडविलें नाहीं तर सबंध वस्ती मुसलमान होऊन जाण्याची भीति वाटते असें म्हणाले. आम्ही लगेच या उद्योगास लागलों.

गुलटेकडी व भांबुर्डा या दोनही ठिकाणीं ही कारवाई कसकशी चालू आहे याचें आम्ही दोनही ठिकाणीं यथातथ्य ज्ञान करून घेतलें. सर्व मांगांना घरीं बोलावून आणून व त्यांच्या वस्तीत जाऊन प्रश्नाचें रूप त्यांना समजावून सांगितलें.त्यांनीं आम्हांसच परत पैशाविषयींच्या घातलेल्या अटी फारशा चांगल्या नव्हत्या, म्हणजे अगदींच वेडेपणाच्या होत्या. दोनतीनशांची केवळ कर्जवाजारी-पणाचीच बाब असली तर भागवून टाकू असें आण्णासाहेब भोपटकर म्हणाले. मी त्याना इतकेंच सांगितलें कीं तुमची कर्जे भागविणें व तुम्हांस कर्जमुक्त करणें हें आमच्या आवाक्याबाहेरचें आहे. आज तुम्ही म्हणतां की सावकाराकडून केवळ कर्जाची सूट मिळत आहे इतकेंच नव्हे तर वर बक्षिसादाखलही रकम मिळत आहे तर मग आम्ही धर्म कां बदलूं नये ? हें जर तुमचें म्हणणें असेल तर माझ्या हातून तुमचें बरें होणार नाहीं. कारण त्या लोकांनीं आज जें तुम्हाला देऊं केलें आहे तितकें माझ्यानें देववणार नाही व तें मला देता येतें असें क्षणभर मानिलें तरी मी तें करणार नाहीं. कारण त्यांच्याइतकी रक्कम मी देत आहें

असें त्यांस समजलें व त्यांनीं जर कांहीं जास्त देऊं केलें तर तुम्ही मला पुन्हा म्हणाल कीं आम्हांस तितकें द्या नाहीतर आम्ही जातों. धर्म वदलणें हा तुम्ही धंदाच वनवाल. म्हणून तुम्ही काय म्हणतां तें मला मुळींच परवडत नाहीं. तुम्ही त्यांचे पैसे परत देत नाही तर त्याचीं फेड त्यांनीं सरकारदरवार करून करून घ्यावी, तुम्हांला धर्मांतर करावयास लावून नव्हे. सरकार दरवार करावयाचा असला तर मला सांगा, आण्णासाहेव त्याची तजवीज करतील. पण हा पैसा उकळण्याचा धंदा मात्र बरा नव्हे. या बोलण्यांतील न्याय त्यांच्यापैकीं वहुतेकांना पटला. ज्या थोडचांना पटला नाहीं तीं चांगलीं म्हातारीं झालेलीं माणसें होतीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

इकडे मांगांच्याशीं या प्रश्नाची चर्चा चालू ठेवून आम्हीं सार्वजनिक सभेंत खूप मोठी सभा भरविली. व पुणें शहरचे व आसपासचे मांग लोक जमा केले, मुसलमान प्रतिपादकांचीं काय कारस्थानें चालू आहेत याची दरोबस्त हकीकत सांगितली, आणि स्पृश्य व अस्पृश्य समाजांनीं या वावतींतली आपापलीं कर्तव्यें काय आहेत, तीं जर वजावलीं नाहींत तर हिंदू समाजावर मोठी आपत्ति आल्याशिवाय राहाणार नाही, हें आम्हीं सर्वांस समजाविलें. मोठमोठाले जाहीरनामे लावून व मातंग वस्तींत पुष्कळ गाजावाजा करून ही सभा केलेली असल्यामुळें तिचा उपयोग झाला. गुलटेकडीच्या वस्तींत मुसलमानांचा रावता वंद पडला. ही उचल अगदीं सद्यः फलदायी झाल्यामुळें आमचाही उत्साह जास्त वाढला व ज्या ज्या वस्त्यांतून ही कारवाई चालू होती त्या त्या वस्त्यांत आपल्या शाळा घालावयाच्या असें आम्ही ठरविलें. अर्थात् गुलटेकडीशीं पुष्कळच रदवदली करणें भाग होतें; व दिवसा ते लोक आपापल्या कामास जात असल्यामुळें व कांहीं वाबी फारसा वोभाटा न करतांना सांगण्यासारख्या असल्यामुळें रात्री दहा वाजतां त्यांचेकडे जाणें भाग पडे. रा. सदाशिवराव गोडवोले व रा. रघुनाथपंत दिवेकर हे त्यांच्याशीं रदवदली करण्यास जात असत. तेव्हां टिळक रोड नव्हता, व वानवडी नाक्यावरून नैऋत्येकडे माळावरून जी सडक व पायवाट गुलटेकडीला जाते तिनें जावयाचें म्हटलें तर पल्ला फार. म्हणून शंकरशेट रोडवरील मधल्याच ओढचांतून कनॉलखालच्या पुलांतून ही मंडळी जात असत. उत्साह व तारुण्य यांच्या बळावर माणूस काय वाटेल तें करतें. मंडळीचे हे भलत्याच

रात्रीचे हेलपाटे पाहून माझ्याशीं विशेष ओळख झालेला एक तिकडला पुढारी मांग गमतीनें म्हणाला "आम्ही कोण आहोंत हें तुम्हां लोकांना माहिती आहे ना ? आमचेकडे रात्रीं अपरात्रीं वेलाशक येणारीं माणसें दणकटच असलीं पाहिजेत ! " सर्व बोलणें झाल्यावर पैशाचा प्रश्न फारसा अवघड नाहीं, किंबहुना मुळांत तो आम्हांस जितका भासविण्यांत आला होता तितका तो नाहीं हें आमच्या ध्यानांत येऊन चुकलें. प्रत्येक चळवळींत चांगले व वाईट असे दोन प्रकारचे लोक असतात. लोकांच्या सार्वजनिक हितबुद्धीचा खाजगी-कडे फायदा करून घेणारे कांहीं लोक नेहमींच आढळतात.

मुसलमानांच्या कारवाया—

पुष्कळ येणें जाणें झाल्यावर व आळीकरांचा विश्वास आम्ही संपादन केल्यावर या वस्तींत आमची शाळा चालू झाली. श्री. आण्णासाहेब हे म्युनिसिपालिटींत असल्यामुळें हें काम सुकर झालें. अर्थात् एकदां शाळा चालू झाल्यानंतर इतर ठिकाणच्या शाळांतून जीं जीं कामें चालत तीं सर्व या ठिकाणींही चालू झालीं. नंतर भांबुर्ड्यासही एक शाळा स्थापन केली. या वेळीं नवा पूल झालेला नव्हता. फर्ग्यूसनकॉलेजवरून सायन्स कॉलेजवरून जावें लागे. रा. पंडितराव आपटे या स्वयंसेवकानें या शाळेसाठीं अतोनात काम केलें. श्रीमंताचा मुलगा, काम हें असलें आणि श्रम तर बेहद्द, परंतु कसलीही कां कूं न करतां त्यांनीं फार चांगलें काम केलें व तेथेंच काढलेल्या दुसऱ्या एका शाळेंत रा. रघुनाथपंत देश-पांडे यांनींही असेच विलक्षण श्रम केले. हीं कामें चालू झाल्यानंतर मुसलमानांच्या स्थानिक कारवाया काय आहेत त्या आमच्या ध्यानीं येऊं लागल्या व हे आगाखानी मुसलमानांचे प्रयत्न इतर मुसलमानांच्या प्रयत्नाहून जास्त सूक्ष्म व ख्रिस्ती मिशनरी थाटाचे कसे आहेत हेंही कळून आलें. आगाखान हे परमेश्वरी अवतार आहेत इतकेंच नव्हे तर हिंदूंचेच कलंकी अवतार आहेत हें मत ते समाजांत पसरवीत असतात. आम्हा हिंदू लोकांना कोणी कसें फसवावें याला कांहीं अंतच नाहीं.कोणीही यावें मग तो ख्रिस्ती असो,मुसलमान असो, कोण वाटेल तो असो; कांहीं ठराविक परमार्थाची भाषा तो बोलला किंवा कांहीं चमत्कारिक चाळे करीत असला, अभद्र बोलत असला किंवा मीं अमूक आहे तमूक आहे असें सांगत सुटला कीं त्याच्या भोंवतीं आम्हा लोकांचा

गराडा पडला म्हणून समजावें. आपल्या धर्मांतील तत्त्वांचें खरें ज्ञान नसणें आणि भीतिग्रस्त मनानें देवाला विचकून राहाणें व भल्या पारमार्थिकांच्या मेळांत लफंगे लोक पुष्कळच शिरलेले असतात हें न ओळखणें या कारणांमुळें, कोणी काय वाटेल तें सांगावें, यांचा विश्वास वसावयाचाच. बरें, अस्पृष्ट इत्यादि लोकांना धर्माची बरोबर कल्पना नाहीं म्हणून असें होतें हें खरें मानावें तर चांगल्या सुशिक्षित समाजांत सुद्धां हें गुरूंचें पीक व बंड पुष्कळच माजलेलें दिसतें. सुशिक्षितांची जर ही दशा तर अज्ञान अशिक्षितांचें काय होत असेल हें सहज समजण्यासारखें आहे. गुजराथेंत ह्या मतपंथाचा खूप जोरानें प्रसार होत आहे, व तसलाच प्रकार वर सांगितलेल्या वस्त्यांत चालू झाला होता. ना. आगाखान यांच्या शिष्यांनीं आगाखान हे हिंदूंचे धार्मिक अवतार आहेत असें सांगत फिरावें हें तर आश्चर्याचें आहेच. पण आपलेच शिष्य हें मत फैलावीत आहेत हें माहीत असतांना सुद्धां आगाखानांनीं या बाबतींत कांहींच बोलूं नये हें फारच चमत्कारिक आहे. म्हणून माझ्या मनांत एकदां असें आलें कीं, खुद्द ना. आगाखान यांसच विचारावें कीं आपण अवतार आहोंत असें त्यांचें त्यासच वाटतें कीं काय ? त्याप्रमाणें मी ना. आगाखान यांस अनावृत पत्र या नांवाचें एक पत्र केसरींत व मराठ्यांत प्रसिद्ध केलें. व इंग्रजी पत्राची नक्कल ना. आगाखान यांजकडेही पाठवून दिली.

नामदार आगाखान यांस उघड पत्र

नामदारसाहेब यांचे सेवेसीः—

आपणांस माझ्या मनांतून एक पृच्छा करावयाची आहे. मुसलमानी धर्मांतील आचार्यमंडळांत आपलें स्थान फार उंच आहे व त्याबद्दल मला फार आदरहि वाटतो. पण असें असूनहि पुढील अर्थाचें पत्र लिहिणें मला योग्य वाटतें.

आपल्या खोजा पंथाच्या प्रचारकांनीं धर्मप्रसाराचें काम अलीकडे जरा जादा उत्साहानें चालविलें आहे. हें काम हिंदू लोकांपैकीं अगदीं अज्ञान लोकांतच विशेष चालू असेल हें न सांगतांहि ओळखतां येण्यासारखें आहे. अर्थात् जर कोणी लोकांनीं आपल्याला अत्यंत श्रेष्ठ वाटणारें धर्ममत पसरविण्याचा यत्न केला तर त्याबद्दल इतरांना विषाद वाटण्यासारखें कांहींच

नाहीं. महंमद पैगंबरसाहेबांनीं जें उदात्त धर्मतत्त्व प्रतिपादिलें त्याचा उपदेश जारीनें सुरू झाला तरी परमेश्वरस्वरूपाच्या अनेकविध कल्पना संग्रहीं ठेवणें हें अंगवळणीं पडलेल्या आम्हां हिंदू लोकांना त्यांत कांहींच चमत्कारिक वाटावयाचें नाहीं.

पण धर्मप्रसाराच्या कामीं जीं साधनें योजावयाचीं तीं मात्र निरपवाद असावीं हें कोणीहि मान्य करील. वस्तुतः पैगंबरानें जें सत्य प्रतिपादिलें तेंच सांगितलें जावें हें उचित आहे. पण तेवढेंच सत्य खोजा प्रचारकांना पुरेसें पडत नाहींसें दिसतें. म्हणून ते नवीन सत्यें उठवितात. अशा या नवनिर्मित सत्यांत जें एक विलक्षण सत्य पुकारण्यांत येत आहे त्याचा छडा लावण्या-साठीच हें पत्र मी आपल्याला लिहीत आहें. टाकाला गुतूं नये म्हणून याचा प्रसार तोंडींच केला जातो. तें सत्य हें कीं, आपण—म्हणजे नामदार आगाखान—हिंदू लोकांचा दहावा अवतार आहां. आपणांस माहीतच आहे कीं, इतर धर्मांतल्याप्रमाणें हिंदुधर्मातहि अशी एक समजूत आहे कीं, श्रीविष्णूचा दहावा अवतार होणार आहे व त्याचें नांव कलंकी आहे. हा कलंकी म्हणजेच ना. आगाखान असा समज पसरविण्याची खटपट चालू आहे. ज्यावरून हा ग्रह वळकट होईल अशीं पत्रकेंहि वाटण्यांत येतात व त्यांत 'निष्कलंकी' हा सूचक व सावधगिरीचा शब्द उपयोजिलेला असतो. हा शब्द नवीन आहे असें नाहीं. पण त्याचा संबंध आपल्या नांवाशीं जोडण्याची कल्पित मात्र नवीन आहे असें वाटतें. अर्थात् या बाबीशीं आपला कांहींहि साक्षात् संबंध नसला पाहिजे हें ढळढळीत आहे. शिवाय असें कीं, आपण मुसल-मानांचे अवतार आहां म्हणून कोणी प्रतिपादिलें तर त्यांत आमचें काय जातें? पण आपण मुसलमान गृहस्थ हिंदूंचे अवतार आहां असें प्रतिपादन होऊं लागलें तर तिकडे काणाडोळा करतां येत नाहीं. आतां जी वस्तु ज्या स्वरूपाची प्रमाणतः नाहीं ती त्या स्वरूपाची आहे अशी बतावणी करणारांचें खरेंखोटें करणें नेहमीं शक्य असतें असें नाहीं. पण मला हें खास माहीत आहे कीं, आपला अवतारीपणा हिंदूंच्या गळ्यांत बांधण्याचें काम चालू आहेच आहे!

हे प्रयत्न हाणून पाडणें म्हणजे मोठें अवघड काम आहे असें नाहीं. ही बनावणीची बेगड, वेगड ठरविण्यास फार शोधक बुद्धि लागते काय? पण या कामाला मनापासून लागावें तर हिंदू—मुसलमानांच्या एकीची बोलबा

जी सर्वत्र सुरू आहे तिला विघ्न केलें असें होणार! बरें, न लागावें तर या हिंदूंना कांहींच प्रतिकार करतां येत नाहीं, अशा समजुतीनें हे प्रचारक शेफारून जावयाचे. अशा प्रकारच्या तिढ्यांत सांपडल्यामुळें काय करावें हें कळेना. पण चिंतनानें उपाय सुचतात असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. अकल्पितपणें मला एक कल्पना सुचली व कोणालाही न दुखवितां हा प्रश्न सोडवितां येईल असें मला वाटूं लागलें. ही कल्पना आपल्यापुढें मांडणें चुकवितां आलें असतें तर मला फार आनंद झाला असता. कारण आपला लौकिक व दर्जा फार मोठा व थोरवीही फार मोठी. पण प्रश्नाच्या महत्त्वाकडे लक्ष देऊन पुढील प्रश्न मी आपणास विचारीत आहें.

उघड अगर झांकून आपल्यावर खोजे अवतारीपणाचा आरोप करोत, पण नामदारसाहेब, आपण आमचे कलंकी अवतार आहां असें खुद्द आपल्यास वाटतें काय? म्हणजे अवतारीपणाच्या आत्मप्रत्ययाचा हुंकार आंतून आपल्याला येतो का? ज्या लोकांशीं धार्मिक बाबतींत आपल्या अनुयायांचें नेहमीं खडाष्टकच असावयाचें त्यांचाच अवतार आपण आहों असा साक्षात्कार झाल्याचें आपणांस स्मरतें काय? पृच्छा करावयाची ही पद्धत जरा राकट आहे हें मी जाणतों. पण तिच्या अंगीं एक गुण निःसंशय आहे. ती तडक आपल्याशींच जाऊन भिडते. खोजांनीं म्हणावें 'आगाखान अवतार आहेत.' आम्ही म्हणावें 'नाहींत'; पण खोजे झाले तरी तिन्हाईत; आम्ही तर बोलून चालून तिन्हाईत, आम्हाला निवाडा कसा करतां येणार? तेव्हां ज्याच्या संबंधानें वाद त्यालाच विचारून शहानिशा करून घ्यावी हें सरळ व तर्काला जमून दिसलें म्हणून थेट आपल्यालाच विचारलें. हिंदू लोकांसाठीं परमेश्वरी चैतन्याचा संचार आपल्या अंगांत झाला असेल तर आम्ही हिंदू लोकांनीं जागें झालें पाहिजे, व डोळे चोळले पाहिजेत व "बापहो! उठा, फटफटलें, रामराज्य उजाडलें" असें म्हणून एकमेकांस ढोसलें पाहिजे! खरेंच आहे, केव्हां काय घडेल हें कोणी सांगावें? पण जर असा कांहीं प्रसंग नसला– व नसावाच असाच मला वहीम येतो–तर आपण अवतार नव्होंत व हिंदूंना कळविण्यासारखे तर खास नव्हों, असें आपल्या अनुयायांना आपण कळवाल काय? मलाहि कळविलें तर मी फार ऋणी होईन. कारण मग जेव्हां

जेव्हां हे प्रचारक आपला अवतारीपणा पुढें आणतील तेव्हां तेव्हां त्यांच्या तोंडावर टाकावयास आपली जबानी मला खाशी उपयोगी पडेल.

खरोखर, आपल्या नांवाचा हा वोभाटा आपल्या कानींहि आला नसेल. पण मला व पुष्कळांना हें माहीत आहे कीं, असले प्रयत्न चालू आहेत. कांहीं वर्षांपूर्वी म. गांधींच्या संबंधानेंहि असाच प्रवाद कोणी चालू केला होता. पण तो कळतांच त्यांनीं त्याचा स्पष्टपणें इनकार केला, व थोतांडाच्या पकडींतून भावडीं माणसें वाचविलीं. म. गांधीं संबंधीं आपण आदरबुद्धि वाळगतां असें मला ठाऊक आहे. तर या बाबतींत त्यांचें अनुकरण कराल काय ? म्हणजे खोजे लोकांना धर्मप्रसारासाठीं अधिक लायक साधनें शोधावीं लागतील व भोळ्या हिंदू लोकांची अवताराच्या सुकाळांतून सोडवणूक होईल. कळावें, तसदीची माफी असावी. ही विनंति.

ना. आगाखानांना वरील पत्र धाडलें, परंतु त्याला त्यांनीं उत्तरच दिलें नाहीं. पण कांहीं दिवसानंतर मुंबईच्या रिक्रिएशन क्लबचे सेक्रेटरी यांनीं मी ना. आगाखान यांस लिहिलेल्या उघड पत्रास उत्तर दिलें. या सेक्रेटरीकडून माझ्याकडेहि वरींच पत्रकें व पत्रें आलीं. त्यांच्या लिहिण्याच्या एकंदर ठेवणीवरून हे गृहस्थ सत्प्रवृत्त दिसतात. उगीच वाद माजवूं नये असाहि त्यांचा कल स्पष्ट दिसला. मी वादाला विन्मुख आहें हेंहि तितकेंच खरें व म्हणून वाद तोडण्याचें जें सरळ ठोक जाऊन भिडणारें साधन तेंच मी योजिलेलें होतें. पण नामदारसाहेब उत्तरच देईनात. वास्तविक यांत अवघड काय होतें? आपण अवतार आहों असें वाटत असेल तर आहोंत म्हणावें; वाटत नसेल तर नाहीं म्हणावें. पण नामदार गप्प राहिले. मला वाटतें त्यांना हा वाद गैरसोयीचा अगर कदाचित् गैरमहत्त्वाचा वाटला असावा. पण ते बोलेनात तरी त्यांचे अनुयायी बोलू लागले; पण अनुयायांशीं उत्तर-प्रत्युत्तर करणें माझें काम नव्हतें. माझें लिहिणें ना. आगाखानांना. तिऱ्हाइतानें उत्तर देणें अप्रस्तुत होतें. शिवाय अनुयायांचें म्हणणें या बाबतींत काय पडेल हें मला त्यांनीं सांगावयाच्या आधींच कळण्यासारखें होतें. मुद्दा तो नाहीं. अनुयायी असें सांगतच असतात कीं, आगाखान अमुक तमुक आहेत. त्याची शहानिशा करावी म्हणून तर खुद्दांना लिहिलें. मग त्याच्या उत्तरादाखल मूळचेंच म्हणणें पुनः सांगितल्यानें काय होणार ?

अनुयायांना शक्य वाटत असेल तर स्वदस्तूरचें उत्तर आणवावें, म्हणजे निकाल होईल असें मी या अनुयायांना कळविलें.

महात्माजींची भेट व त्यांचें उत्तर—

महात्माजी हे शस्त्रक्रियेसाठीं मुक्त झाल्यानंतर त्यांचें वास्तव्य ससून हॉस्पिटलमध्यें असतांना त्यांच्या दर्शनासाठीं जाण्याचें आम्ही ठरविलें. पण जावयाच्या आधीं आपण कोण, काय, हें त्यांस लिहून कळविलें व त्यांचें या म्हणून उत्तर आल्यावरच गेलों. हरीभाऊ फाटक, दिवेकर, व मी असे तिघे-जण गेलों. महात्माजी फार अशक्त झाले होते. तरी त्यांचा बोलण्याचा झपाटा फार मोठा असें दिसून आलें. मुसलमान कसकसे आक्रमण करीत आहेत, कोणचीं साधनें योजीत आहेत हें त्यांस आधींच लिहिलेलें होतें. संभापण सुरू होतांच त्यांनीं तो मुसलमानांचा विषय काढला व हरतऱ्हेनें त्यांचा पक्ष घेऊनच ते बोलले. इतकेंच नव्हे तर 'तुम्ही हें असें मुसलमानां-विषयीं बोलतां यामुळेंच Bad blood वैरभाव उत्पन्न होतो असें त्यांनीं मला चमकाविलें ! वास्तविक मी अगदीं ज्या खऱ्या खऱ्या गोष्टी होत्या त्याच सांगितल्या होत्या व या साधनांना Questionable means असें म्हटलें होतें. महात्माजींच्या मनांत त्यावेळीं मुसलमानांची प्रीति फारच प्रबळ होती. पुढें, महंमदअल्ली यांनीं मद्रासच्या काँग्रेसमध्यें जी अस्पृश्यांच्या समाजाची वाटणी करून घ्यावी असें वेडगळ मत सांगितलें होतें तेंही महात्माजींपुढें मांडिलें. ते म्हणाले महंमदअल्ली असें म्हणाले नसले पाहिजेत. त्यांचें भाषण छापलेलें आहे व त्यांत ही कल्पना आहे असें मी सुचविल्यावर ते म्हणाले कीं महंमदअल्ली म्हणाले असले तर त्याचा अर्थ तुम्ही म्हणता तसा नसेल! या पुढें मला बोलतां आलें नाहीं हें खरें आहे. मग अस्पृश्यता-निवारणाच्या इतर अंगांविषयीं थोडी चर्चा त्यांनीं केली. 'अस्पृश्यांच्या हातचें तुम्ही खा असें मी कोणास सांगणार नाहीं' हेंही एक तेव्हांचें त्यांचें वाक्य मला आठवतें. मुलाखत संपवून बाहेर पडल्यावर मुसलमानांबद्दलच्या त्यांच्या ओढ्याविषयीं व विशेषतः महंमदअल्लीच्या भाषणावर त्यांनीं जें कांहीं बोलणें केलें त्याविषयीं विस्मय पावत हरीभाऊ, मी व दिवेकर परत आलों. यानंतर महात्माजींना या विषयासंबंधानें मी एक विस्तृत पत्र लिहिलें. माझी

जेव्हां हे प्रचारक आपला अवतारीपणा पुढें आणतील तेव्हां तेव्हां त्यांच्या तोंडावर टाकावयास आपली जबानी मला खाशी उपयोगी पडेल.

खरोखर, आपल्या नांवाचा हा बोभाटा आपल्या कानींहि आला नसेल. पण मला व पुष्कळांना हें माहीत आहे कीं, असले प्रयत्न चालू आहेत. कांहीं वर्षांपूर्वी म. गांधींच्या संबंधानेंहि असाच प्रवाद कोणी चालू केला होता. पण तो कळतांच त्यांनीं त्याचा स्पष्टपणें इनकार केला, व थोतांडाच्या पकडीं-तून भावडीं माणसें वाचविलीं. म. गांधींसंबंधीं आपण आदरबुद्धि बाळगतां असें मला ठाऊक आहे. तर या बाबतींत त्यांचें अनुकरण कराल काय ? म्हणजे खोजे लोकांना धर्मप्रसारासाठीं अधिक लायक साधनें शोधावीं लागतील व भोळ्या हिंदू लोकांची अवताराच्या सुकाळांतून सोडवणूक होईल. कळावें, तसदीची माफी असावी. ही विनंति.

ना. आगाखानांना वरील पत्र धाडलें, परंतु त्याला त्यांनीं उत्तरच दिलें नाहीं. पण कांहीं दिवसानंतर मुंबईच्या रिक्रिएशन क्लबचे सेक्रेटरी यांनीं मी ना. आगाखान यांस लिहिलेल्या उघड पत्रास उत्तर दिलें. या सेक्रेटरीकडून माझ्याकडेहि बरींच पत्रकें व पत्रें आलीं. त्यांच्या लिहिण्याच्या एकंदर ठेवणीवरून हे गृहस्थ सत्प्रवृत्त दिसतात. उगीच वाद माजवूं नये असाहि त्यांचा कल स्पष्ट दिसला. मी वादाला विन्मुख आहें हेंहि तितकेंच खरें व म्हणून वाद तोडण्याचें जें सरळ ठोक जाऊन भिडणारें साधन तेंच मी योजिलेलें होतें. पण नामदारसाहेब उत्तरच देईनात. वास्तविक यांत अवघड काय होतें? आपण अवतार आहों असें वाटत असेल तर आहोंत म्हणावें; वाटत नसेल तर नाहीं म्हणावें. पण नामदार गप्प राहिले. मला वाटतें त्यांना हा वाद गैरसोयीचा अगर कदाचित् गैरमहत्त्वाचा वाटला असावा. पण ते बोलेनात तरी त्यांचे अनुयायी बोलू लागले; पण अनु-यायांशीं उत्तर-प्रत्युत्तर करणें माझें काम नव्हतें. माझें लिहिणें ना. आगा-खानांना. तिऱ्हाइतानें उत्तर देणें अप्रस्तुत होतें. शिवाय अनुयायांचें म्हणणें या बाबतींत काय पडेल हें मला त्यांनीं सांगावयाच्या आधींच कळण्यासारखें होतें. मुद्दा तो नाहीं. अनुयायी असें सांगतच असतात कीं, आगाखान अमुक तमुक आहेत. त्याची शहानिशा करावी म्हणून तर खुद्दांना लिहिलें. मग त्याच्या उत्तरादाखल मूळचेंच म्हणणें पुनः सांगितल्यानें काय होणार ?

अनुयायांना शक्य वाटत असेल तर स्वदस्तूरचें उत्तर आणवावें, म्हणजे निकाल होईल असें मी या अनुयायांना कळविलें.

महात्माजींची भेट व त्यांचें उत्तर—

महात्माजी हे शस्त्रक्रियेसाठीं मुक्त झाल्यानंतर त्यांचें वास्तव्य ससून हॉस्पिटलमध्यें असतांना त्यांच्या दर्शनासाठीं जाण्याचें आम्ही ठरविलें. पण जावयाच्या आधीं आपण कोण, काय, हें त्यांस लिहून कळविलें व त्यांचें या म्हणून उत्तर आल्यावरच गेलों. हरीभाऊ फाटक, दिवेकर, व मी असे तिघे-जण गेलों. महात्माजी फार अशक्त झाले होते. तरी त्यांचा बोलण्याचा झपाटा फार मोठा असें दिसून आलें. मुसलमान कसकसे आक्रमण करीत आहेत, कोणचीं साधनें योजीत आहेत हें त्यांस आधींच लिहिलेलें होतें. संभाषण सुरू होतांच त्यांनीं तो मुसलमानांचा विषय काढला व हरतऱ्हेनें त्यांचा पक्ष घेऊनच ते बोलले. इतकेंच नव्हे तर 'तुम्ही हें असें मुसलमानां-विषयीं बोलतां यामुळेंच Bad blood वैरभाव उत्पन्न होतो असें त्यांनीं मला चमकाविलें ! वास्तविक मी अगदीं ज्या खऱ्या खऱ्या गोष्टी होत्या त्याच सांगितल्या होत्या व या साधनांना Questionable means असें म्हटलें होतें. महात्माजींच्या मनांत त्यावेळीं मुसलमानांची प्रीति फारच प्रबळ होती. पुढें, महंमदअल्ली यांनीं मद्रासच्या कॉंग्रेसमध्यें जी अस्पृश्यांच्या समाजाची वाटणी करून घ्यावी असें वेडगळ मत सांगितलें होतें तेंही महात्माजींपुढें मांडिलें. ते म्हणाले महंमदअल्ली असें म्हणाले नसले पाहिजेत. त्यांचें भाषण छापलेलें आहे व त्यांत ही कल्पना आहे असें मी सुचविल्यावर ते म्हणाले कीं महंमदअल्ली म्हणाले असले तर त्याचा अर्थ तुम्ही म्हणता तसा नसेल! या पुढें मला बोलतां आलें नाहीं हें खरें आहे. मग अस्पृश्यता-निवारणाच्या इतर अंगांविषयीं थोडी चर्चा त्यांनीं केली. 'अस्पृश्यांच्या हातचें तुम्ही खा असें मी कोणास सांगणार नाहीं' हेंही एक तेव्हांचें त्यांचें वाक्य मला आठवतें. मुलाखत संपवून बाहेर पडल्यावर मुसलमानांबद्दलच्या त्यांच्या ओढ्याविषयीं व विशेषतः महंमदअल्लीच्या भाषणावर त्यांनीं जें कांहीं बोलणें केलें त्याविषयीं विस्मय पावत हरीभाऊ, मी व दिवेकर परत आलों. यानंतर महात्माजींना या विषयासंबंधानें मी एक विस्तृत पत्र लिहिलें. माझी

इतकीच इच्छा होती कीं आर्यसमाजासंबंधानें त्यांनीं जसा एक मोठा अंक काढला व त्यांत जसें त्या समाजाविषयीं सर्व कांहीं लिहिलें तसा एक अंक काढावा व उपस्थित होणाऱ्या वारीक वारीक सर्व प्रश्नांवर त्यांनीं उत्तरात्मक असें लिहावें. दुसरेंही एक मी त्यांस सुचविलें कीं आपण आतां अस्पृश्यता-निवारणाच्या कामाकडे वळावें. कारण तुरुंगांत जातांना 'तुम्ही आतां सामाजिक वैगुण्यें दुरुस्त करण्याकडे वळा' असा उपदेश त्यांनीं लोकांना केला होता. या पत्राला श्री. महादेवभाई देसाई यांच्या सहीचें कार्ड आलें कीं "या सर्व प्रश्नांचा निकाल महात्माजींनीं यंग इंडियाच्या रकान्यांत मागेंच लाविला आहे."

शाळा आश्रयाचें ठिकाण बनलें—

या ज्या ठिकठिकाणीं आमच्या शाळा सुरू झाल्या होत्या त्यांचा मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीनें जो काय उपयोग झाला असेल तो झालाच. पण शाळा म्हणजे त्या त्या वस्तींतील लोकांना एक मोठें आश्रयाचें ठिकाण होऊन बसलें. आळींतील ज्या कांहीं तक्रारी असतील त्या सगळ्या तेथील मास्तरांच्याकडे यावयाच्या व तक्रारवाल्यांना घेऊन मास्तरांनीं मजकडे यावयाचें असें ठरलेलें असे. कोणाच्या आळींत दिवा नाहीं, कोणाच्या आळींत सडक नाहीं, कोणाच्या आळींत पाण्याची चावी नाहीं, कोठें खाटिक लोक बलदंडपणानें पाण्याच्या चावीवरच हाडें धुवावयास आणतात, कोणाच्या वस्तींतील पाहुण्यास पावसाळ्यांत नागझरीलगतच्या चिखलांत निजावें लागतें, कोणाच्या घरास उठकळा येत आहे, कोठें मुसलमानांची भिरड लागली आहे, कोठें आपापसांतील तंटे अनिवार झाले आहेत, कोठें केराचे ढीग घरासारखे उंच झाले आहेत, कोठें सावकार लोक दारुड्यास पैसे पुरवून व्यसनें माजवीत आहेत, कोणास बुधवारांतल्या एकाद्या घरांत जोडेविक्रीला जागा हवी आहे अशा एक ना दोन शेंकडो तऱ्हेच्या तक्रारी उपस्थित होत असत. माझा सकाळचा बहुतेक वेळ व शनिवार, आदितवार व इतर सुट्या या सगळ्या या कामामध्यें खर्च होत असत. असो.

मीठगंजांतील महारवाडा—

मीठगंज पेठेंत एक महारवाडा आहे. तेथें ख्रिस्ती मिशनऱ्यांचें एक मकाण

आहे. त्यांची एक शाळाही असे. भोंवतालच्या महारवाड्यांतील मुलें व तेथून दक्षिणेकडे थोड्याशा अंतरावर असलेल्या साऱ्याच्या मांगवाड्यांतील मुलें या शाळेंत थोडींबहूत जात असावी असें वाटतें. गांवांतील सर्व अस्पृश्यांच्या वस्त्यांतून शाळा सुरू करावयाच्या हें आम्हीं निश्चित ठरविलें असल्यामुळें या महारवाड्यांतही आमचें काम आम्हीं सुरू केलें. या आळींत एक मोठा सुशील महार गृहस्थ राहात असे. त्याचें खरें नांव निराळें असलें तरी येथें मी रामा असें घालतों. हा मनुष्य निर्व्यसनी असून आपल्या समाजाचें कांहीं बरें व्हावें असें चिंतणारा होता. शाळा कोठें सुरू करावी हें ठरविणें नेहमींच फार अवघड असे. खुद्द आळींतच शाळा चालू करावयाची हा तर आमचा निश्चय असल्यामुळें तेथलेंच एकादें घर शाळेला भाड्यानें घ्यावें लागत असे. असें घर घ्यावयाचें तर पुरेसें मोठें मिळणें व तें स्वच्छ असणें हें जमत नसे. कांहीं कांहीं आळींतील आम्हीं घेतलेलीं घरें अगदीं गलिच्छ असत. पण इलाज नसल्यामुळें तीं पतकरावीं लागत. या आळीमध्यें जरी तितकी घाण नव्हती तरी शाळेला पुरेल एवढें घर मिळेना. म्हणून वरील रामाकडे गेलों. याचेंही घर लहानच होतें, पण घरापुढची जागा मात्र कोंकणांतल्या अंगणासारखी सारवणी घालून लखलखीत करून ठेवलेली असे. रामाचें व आमचें बोलणें जमलें व तेथें अंगणांतच शाळा चालू झाली. शेजारच्या मिशनच्या शाळेंत आतां येथील मुलें जाईनातशीं झालीं. तुम्ही मिशनच्या शाळेंत आतां कां जात नाहीं असें कोणीसें त्यांस विचारतां त्यांनीं उत्तर केलें, "आतां आम्हांस बामण शिकवावयास येतो; ख्रिस्त्याच्या शाळेंत जाण्याची आम्हांला जरूरी नाहीं". खरोखर या उत्तराचें मर्म सर्व ब्राह्मणसमाजानें ध्यानांत ठेवावयास हवें. सर्व समाजाची आपल्या बाबतींतील सूक्ष्म अपेक्षा काय असते हें त्यांनीं नीट पाहावें. प्रत्येक खेडेगांवीं ब्राह्मण लोकांनीं प्राथमिक शिक्षण देण्याचें लहानसें काम जरी उरकलें तरी शिक्षणाचा प्रश्न सुटल्यासारखा होईल आणि त्यांच्यासंबंधींची अप्रियता निःसंशय कमी होईल. हिंदुस्थानांतील लहान लहान जातींना जर स्वत्वानें जगावयाचें असेल, तर त्यांनीं इतर जातींना आपली उपयुक्तता पटवून दिली पाहिजे. शहरांतून व कांहीं कांहीं ठळक गांवांतून ब्राह्मणांनीं एकंदर शिक्षणाच्या कामासाठीं पुष्कळ झीज सोसून कामें चालविलेलीं आहेत. पण आधुनिक कालाबरोबर

पुढें येणारे जे शिक्षणविषयक व्यापक प्रश्न देशाला सोडविणें भाग आहे ते सोडवावयाचे असतील तर पैशाचें कसलेंही संकट न घालतां ब्राह्मण समाजाला पुष्कळ करतां येण्यासारखें आहे.

रामा महाराची हकीकत—

येथें शाळा चालू झाल्यावर आमचा पहिला विद्यार्थी रामा हाच झाला. मी स्वतः या शाळेंत रोज जात असें. रामाला अगदीं कांहीं येत नव्हतें. इतर लहान मुलांच्या बरोबर आपण कसें शिकावें असली खोटी लाज त्यानें कधींही बाळगली नाहीं. लवकरच त्याला अक्षर ओळख झाली व जाड्या टाइपांत छापलेलें 'मुलांचें रामायण' तो आपलें आपण वाचूं लागला. देवादिकांच्या गोष्टी आपल्यालाच वाचतां येऊं लागल्या हें पाहून त्याला पराकाष्ठेचा आनंद झाला. त्याचा आनंद पाहून माझ्या मनाला सुख उत्पन्न होई. Educate या शब्दाचा अर्थ (अज्ञानांतून) बाहेर काढणें असा आहे. त्या अर्थाचें अगदीं बालबोध प्रत्यंतर आपल्या प्रयत्नानें अगदीं प्रत्यक्ष पाहाणें हें फार सुखाचें असतें. या रामाच्या संबंधानें, तोच विषय चालू झाला आहे म्हणून आणखी कांहीं थोडेंसें लिहितों. त्याची व माझी ओळख झाल्यानंतर आपल्याला हा एक आश्रय उत्पन्न झाला आहे असें त्यास वाटूं लागावें हें अगदीं स्वाभाविक होतें. रामा हा साधारण मध्यम वयाचा गृहस्थ असून मोठा सच्चा मनुष्य होता, हें वर सांगितलेंच आहे. कोणचीही अडचण उपस्थित झाली तरी माझ्याकडे येऊन ती सांगण्यास त्याला कसलाही संकोच वाटेनासा झाला होता. तो स्वतः भांवुर्डा किंवा गणेशखिंड इकडे कोठें तरी कामास जात असे, व त्याची बायको ही स्टेशनच्या पलीकडे एका गिरणींत कामास जात असे. पहांटे लवकर उठून हीं दोघेजण बोलतबोलत, कांहीं वाट संगतीसोबतींत जात असत, व पुढें बायको उजवीकडे वळे व रामा डावीकडे वळे. बरोबर आपआपली शिदोरी तीं उभयतां नेत असत. सबंध दिवसभर आपापल्या कारखान्यांत कामें करून रात्र पडण्याच्या सुमारास घरीं आल्यावर उभयतांची गांठ पडे. पहाटे झुंजुक असतांनाच या नवराबायकोंनीं जें एकमेकांस सोडून जावें ते संध्याकाळीं अंधार पडूं लागल्यावर पुन्हां एकत्र यावें अशी स्थिति असे. वस्तीतील माणसांशीं पुष्कळच घसट झाली म्हणजे मग मात्र मी त्या त्या

वस्तींतील स्त्रियांविषयीं चौकशी करीत असें. अजून या वस्तीशीं माझें तितकें संघटण झालेलें नव्हतें. पण रामानेंच एके दिवशीं गोष्ट काढली. आपण कामास कोठें जातों व वायको कोठें जाते हें सांगून तो कळवळ्यानें म्हणाला, "तरण्याताठ्या वायकोला रोज अंधारांतून वकाल वस्तींतून कारखान्याकडे जावें लागतें! पहांटे आमची जोडी फुटतांना मला अतिशय वाईट वाटतें. कशाचा संसार? कधीं खुशालीनें एके ठिकाणीं बसावयास सांपडतें, कां सुखानें चार दिवस घालवितां येतात? रोज पोटांत धस्स! कीं पहाटे उठायचें, आणि याच्यावर, तुकडा बरोबर घेऊन जें एकमेकाला अंतरायचें तें दिवे-लागणीपर्यंत! मास्तर, आम्हा दोघांला मिळून जर कोठें एके ठिकाणीं काम मिळालें तर फार बरें होईल." रामानें हें आपलें गाऱ्हाणें चार दोन वाक्यांत आणि अगदीं साध्या शब्दांनीं सांगितलें; पण त्यानें माझें अंत:करण अगदीं ढवळून निघालें. त्याच्या या लहानशा गाऱ्हाण्यांत कित्येक सामाजिक असंतोषाचीं बीजें प्रसुप्त आहेत हें समाजाची घटनापद्धति व त्याची आर्थिक स्थिति यांचा विचार करणारांच्या सहज ध्यानीं येईल. खरोखर, ही काय आर्थिक घटना कीं, जी कुटुंब तर असावें पण कुटुंबाला जरूर त्या पद्धतीनें मात्र राहतां येऊं नये असें करते? आतां तूं एकटीच जा असें पहाटेच्या वेळेस वायकोला सांगतांना रामाच्या जिवाची होणारी तळमळ, आणि असल्याही आपत्तींत जीव मुठींत धरून रोज बकाल वस्तींत कामाला जावें व परत येऊन आनंदानें रामाचा संसार सुखाचा करावयास सज्ज राहावें ही त्या स्त्रीची थोरवी, हीं पाहून या जोडप्याबद्दल माझ्या मनांत अतिशय आदरबुद्धि उत्पन्न झाली. आपल्या वाङ्मयांतून, कथांतून राजेमहाराजे व श्रीमंत लोक यांच्या जीवितांतील प्रसंगांचीं कथानकें आणि त्यांच्या सद्गुणदुर्गुणांचें वर्णन हीं वाचावयास सांपडतात. संरक्षणाचीं सर्व साधनें, चालत आलेल्या विशिष्ट संस्कारांनीं मिळालेलें स्थैर्य, सांपत्तिक खुशाली, इत्यादींनीं जपून धरलेल्या समाजांत नांदणाऱ्या सद्गुणांची सुद्धां आपण आपल्या वाङ्मयांत केवढी बडेजाव करतों! पण वर दिलेल्या गोष्टी ज्यांना लाधलेल्या नाहींत तीं गरीब माणसें, नेकीनें वागून, परस्परांवर निष्ठा ठेवून केवढे थोर सद्गुण दाखवितात हें पाहिलें म्हणजे आपलें चित्त भरून येतें. ज्यानें त्यानें सकाळीं उठल्यापासून निजेपर्यंतचा आपला कालक्रम न्याहाळून पाहावा व परस्परांच्या सहवासांत संसार सुखाचा करणारे

रस कसे उत्पन्न होतात तें पाहावें व तेच रस, ज्या पतिपत्नींना परस्परांचें साहचर्य सुद्धां लाभत नाहीं, त्यांच्या जीवितांत उत्पन्न होणें किती कठीण आहे हें पाहावें ! तरीसुद्धां, म्हणजे अशा सुखाचा अगदीं उन्हाळा असतांना सुद्धां, परस्परांवर निष्ठा ठेवूनच, माणसें कशीं सुखोत्पत्ति करून घेतात हें पाहिलें म्हणजे त्यांची निष्ठा वाङ्मयांत स्थिर होण्याला जास्त लायक आहे असें वाटतें. रामाचें गाऱ्हाणें ऐकून मी पुष्कळ ठिकाणीं शोध केला. शेवटीं अगदीं नजीकच सोय झाली. नूतन मराठी विद्यालयांतील सभागृह बांधावयाचें काम तेव्हां चाललें होतें. त्याचे कंत्राटदार कै. अभ्यंकर यांजपाशीं मी गोष्ट काढतांच त्यांनीं होकार दिला व अगदीं दुसऱ्या दिवसापासून रामा व त्याची बायको हीं तेथें कामावर जाऊं लागलीं. सकाळीं उठून स्वस्थपणें आठ वाजतां बरोबरच कामावर जावें, व थोडा दिवस ठेवून बरोबरच घरीं जावें असें त्यांस करतां येऊं लागलें! यामुळें रामाला व त्याच्या बायकोला अतिशय आनंद झाला. मी त्यांच्या उपयोगीं पडलों खरा, पण तें माझें करणें किती अल्प होतें हें कोणालाही कळेल. माझ्या एवढ्याशा खटपटीनें त्यांना आपण जास्त सुखी झालों आहों असें वाटूं लागलें होतें. पुढें कांहीं दिवस गेल्यानंतर रामानें सडकेनें जातां जातां हळूच गोष्ट काढली "मास्तरजी, एक गोष्ट बोलायची आहे; आम्ही सध्यां तरी सुखी आहों पण एक अडचण आली आहे".पण आतां रामाला पूर्वीइतका संकोच वाटत नव्हता. तो म्हणाला "बायको पोटिशीं आहे, काम मिळालें आहे खरें पण बांधकाम चढतां चढतां तिसऱ्या मजल्यावर गेलें आहे. डोक्यावर धोंडा घेऊन तो गवंड्यापर्यंत पोंचवायला बायकोला धोंडा घेऊन दोन शिड्या चढत जावें लागतें"! मी पुन्हां एकदां अभ्यंकर यांना भेटलों व ही हकीकत सांगितली. त्यांनीं लगोलग त्याच्या बायकोला तळमजल्यावर काम दिलें. रामा व त्याची बायको यांनीं आपली कृतज्ञताबुद्धि कशी व्यक्त केली याची आठवण झाली म्हणजे मला कळमळल्यासारखें वाटतें. श्रीगोंद्याकडे त्याचें कोठें गांव आहे तिकडे तो जावयास निघाला होता. बरोबर त्याची गरोदर बायको होती. श्रीगोंद्याकडे त्याचें थोडेसें उत्पन्नही होतें व बायकोचेंही माहेर तिकडेच असावें असें वाटतें. तिकडे जावयाच्या आधीं एकदां मला भेटावें म्हणून तीं उभयतां मजकडे आलीं. माणसें गरीब पण त्यांना वाटत होतें कीं यानें आपल्यावर पुष्कळच उपकार

केले आहेत व म्हणून आपण उतराई आहों हें त्याला कसेंतरी दाखविलें पाहिजें. त्यांनीं बरोबर एक तवक आणलें होतें. त्यांत एक केळ्याच्या घड, विड्याचीं पानें, दोन सुपाऱ्या, निरांजन, काड्याची पेटी, खण अशा वस्तु होत्या. रामाची बायको भोळी होती. तिनें निरांजन पालथें ठेविलें होतें. कारण तिच्या मतानें तेलाला जास्त जागा त्याच अंगानें राहाते. काडी ओढून तिनें निरांजन पेटविलें व उभयतांनीं थोडेसें गहींवरून येऊन मला ओवाळिलें. एक एकेरी फुलांचा हार आणला होता तो मला घातला. हें सर्व होत असतांना मला अगदीं संकोच वाटत होता. वास्तविक मीं कांहींच केलें नव्हतें. व मी तसें पुन्हां पुन्हां बोलूनही दाखविलें. पण त्या नवराबायकोच्या आग्रहापुढें माझा इलाज चालेना. वास्तविक पाहतां हा माहितीचा तपशील अगदीं बारीक आहे आणि म्हणून उत्तान विचाराचीं माणसें तो उपाहास्य सुद्धां ठरवतील. परंतु तो रसिकांसाठीं दिला आहे.

नव्या शाळा काढणें—

अशा प्रकारें पुणें शहरांतील बहुतेक सर्व वस्त्यांत आमच्या रात्रीच्या शाळा चालू झाल्या. मंगळवार पेठेंतील गाडीतळापाशीं जी एक अस्पृश्य लोकांची शेतजमिनीवरच वसाहत आहे तेथें शाळा काढावी म्हणून मी फार खटपट केली. शाळेला भाड्यानें कां होईना पण जागा मिळणें तेथें अगदीं अशक्य होतें. थोडकासा जमिनीचा तुकडा घेऊन त्यावर एक झोपडी घालावी म्हणून मी पैशांची तरतूद करून ठेविली. परंतु त्या लहानशा तुकड्याचा मालक केवळ जागाभाडें म्हणून महिन्याचे वीस रुपये मागूं लागला. म्हणून हा नाद मीं सोडून दिला. ससून हॉस्पिटलच्या मागें, स्टेशनवरील अस्पृश्य हमालांची मोठीच वस्ती आहे. माणसें त्यांतल्या त्यांत चार चौघांत वागणारीं असल्यामुळें ही वस्ती इतरांपेक्षां पुष्कळच स्वच्छ व टापटिपीची अशी आहे. येथें आपल्याला शाळा काढतां आली तर पुष्कळच काम होईल व निदान पाऊणशें एक विद्यार्थी तरी शाळेंत येतील असा अजमास असल्यामुळें मी त्या उद्योगास लागलों. व्याख्यानें दे-देऊन माझें म्हणणें मीं तेथील पुढाऱ्यांना पटविलें. व शाळा निघाल्यास आम्ही आपलीं मुलें तींत घालूं असा होकार त्यांजकडून घेऊन स्टेशनच्या अधिकाऱ्यांकडे गेलों. माझी

कल्पना अशी होती कीं, स्टेशनच्या अवाढव्य वाडग्यांत इतक्या शेड्स आहेत कीं त्यांतील एखादी आमच्या शाळेच्या उपयोगाला ते खास देतील व कंपनीच्या पदरच्या गरीब हमालांच्या मुलांना जर आयती फुकट शिक्षणाची व्यवस्था होत आहे तर ही योजना ते मोठ्या आतुरतेनें पत्करतील. स्टेशन-मास्तरसाहेबांना हें सर्व प्रकरण मीं समजावून सांगितलें व आपणच मन घातल्यास हें काम सहज होण्यासारखें आहे असेंहि लाघवाचें बोलणें बोलून पाहिलें. पण ट्रॅफिक मॅनेजर यांस विचारल्याशिवाय कांहीं करतां यावयाचें नाहीं असा अगदीं रोकडा जवाब त्यांनीं मला दिला. तें तरी तावडतोव विचारा ही माझी विनंति मान्य करून मला त्यांनीं चालीस लावलें. पुढें कित्येक महिने हें प्रकरण लोंबकळतच पडलेलें होतें. शेवटीं मॅनेजरसाहेव नाहीं म्हणतात येवढा साधा जवाव त्यांनीं मला दिला. अनेक व्याख्यानें आणि हेलपाटे सर्व वायां गेले व पांचपन्नास मुलें रात्रीचीं दोन तास वसावयास स्टेशनवरील त्या शेंकडों शेड्समध्यें कोठेंहि जागा मिळूं नये याचें आश्चर्य मानीत दुपारीं १।। वाजतां मी निराशेनें परत आलों.

पुण्याच्या सर्व वस्त्यांतून अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय करण्याचें संपल्या-नंतर आमची दृष्टि थोडी बाहेर गांवाकडे वळूं लागली. भोर संस्थानांतील कोणच्याशा गांवचा एक माझा विद्यार्थी तेथें शाळा घालण्याच्या उद्देशानें मजकडे आला. त्याचा तो हुरूप पाहून मी त्याची होईल तितकी तरतूद करून दिली. ही शाळा तेथें कांहीं महिने चालली होती. परंतु गांवकऱ्यांचा कसलाच आश्रय किंवा कोरडी सहानुभूति ही नसल्यामुळें या मुलाचें तेथील काम लवकरच बंद पडलें यांत कांहींच नवल नाहीं. याच्या पलीकडे मात्र शाळा वाढविण्याचा प्रयत्न मीं कधींही केला नाहीं. वास्तविक पाहतां गांवो-गांवीं जाऊन आठ आठ दहा दहा दिवस मुक्काम ठेवून कामाची कांहीं कायमची घडी बसवून दुसऱ्या गांवाला जावें, असें करतां आलें असतें तर हा शिक्षणाचा फैलाव पुष्कळच झाला असता. वांईचे वृद्ध पेन्शनर कै. काथवटे यांनीं मला अशी सूचना केलीहि होती व सातारचे रावबहादूर काळे यांनींही पत्र पाठवून एकदां कळविलें कीं तुमच्या सर्व चळवळीचा व्याप तुम्ही पुण्याच्या बाहेरही ठेवावयास हवा. पण माझी नोकरी व हें काम यांचा मेळ घालून जितकें करतां येण्यासारखें आहे तितकें करावयाचें हें माझ्या स्वाभिमान-

कल्पनेला पसंत असल्यामुळें मला पुण्याच्या बाहेर कायमचा व्याप असा कांहींच घालतां येत नाहीं. कांहीं पांच सहा व्यक्ती, व दोन तीन संस्था यांच्या देणग्या सोडल्या तर चळवळीच्या खर्चासाठीं अण्णासाहेब भोपटकर व मी स्वत:-वरच अवलंबून रहात असूं. कोणाकडे वर्गण्या मागावयास जाण्याचें आम्हां दोघां-सहि फार अवघड वाटतें. मी होय म्हटलें असतें तर माझा दोन चांगल्या संस्थांत सहज प्रवेश होण्यासारखा होता. व थोडें अधिकाराचें मोठेपण मिळून या चळवळीचा पुरस्कार अधिक जोरानें करतां आला असता. हौसेचेंहि काम तेंच व पोटाचेंहि काम तेंच असें झालें म्हणजे काम पुष्कळ होतें यांत कांहींच शंका नाहीं. पण याच कामांतून आपलें पोट चालवावें, महार मांग इत्यादि गरीब लोकांसाठीं पैसा जमा करावा व त्यांतूनच आपलीहि उप-जीविका करावी हा विचार मला अत्यंत दु:सह वाटत आला आहे. अर्थात् त्या त्या मानानें माझ्या प्रयत्नांचें रूपहि मर्यादितच राहिलेलें आहे.

शाळांची जातवारी—

खुद्द पुणें शहरांत चांभार लोकांच्याच वस्त्या जास्त आहेत. त्यामुळें आमच्या शाळा याच वस्त्यांत जास्त होत्या व त्यामुळेंच चांभार मंडळींच्याशीं आमचा संबंध जास्त आला व त्यांनींहि मंडळासंबंधानें विश्वास बाळगून आपली सार्वजनिक व खाजगीही कामें पुष्कळ करून घेतलीं. महार लोकांच्या वस्त्या खुद्द शहरांत एक दोनच असल्यामुळें तेवढ्यापुरती आमची त्यांच्याशीं घसट झाली. पण चांभारांशीं वरील कारणास्तव विशेष घसट झाल्यामुळें आम्ही त्यांच्याकडेच विशेष लक्ष देतों, असा महार मंडळींचा समज झाला. मंगळवार पेठ, गाडीतळ, स्टेशनवरील हमालांच्या बराकी, कामाठी-पुरा, व घोरपडे पेठ याच काय त्या महार लोकांच्या प्रमुख वस्त्या आहेत. त्यांपैकीं मंगळवार पेठ, कामाठीपुरा व घोरपडे पेठ या तीन ठिकाणीं आमच्या शाळा होत्याच; उरलेल्या दोन ठिकाणीं यत्न करूनहि आम्हांला शाळा काढतां आल्या नाहींत याचें विवेचन अन्यत्र केलेलेंच आहे. म्हणजे काय कीं आम्ही वगळलें असें कोणासच नव्हतें. दुसरें असें कीं महार लोक हे त्यांतल्या त्यांत जास्त पुढारलेले. ख्रिस्ती मिशनरी, युरोपियन लोक इत्यादिकांशीं त्यांचा इतरांच्या मानानें फार आधीं

संबंध आलेला असल्यामुळें व लष्करांत सुभेदारीपर्यंत वाढविलेले असे अनेक लोक त्यांच्यामध्यें असल्यामुळें त्यांना स्वत्वाची जाणीव इतरांच्या मानानें जास्त झालेली आहे. इंग्रजी शिकलेल्यांची संख्याहि त्यांच्यांतच जास्त आहे. त्यामुळें वरील जाणिवेला स्वाभिमानाचेंहि रूप आलेलें आहे. अर्थात् इतर कोणी येऊन आपल्याला कांहीं सांगावें व मी तुमच्या वऱ्यासाठीं खटपट करितों आहे व अशा रीतीनें आपण म्हणजे कोणी काळजी वहावयास योग्य असे हीन लोक व हे म्हणजे कोणी काळजी वाहण्याची मानसिक ऐपत असलेले असा भाव त्यांच्या आपल्यांत उत्पन्न व्हावा हें त्यांना खपत नाहीं. आमचें आम्ही पाहूं; असें वागा आणि तसें वागा असें आम्हाला सांगणारे एवढे तुम्ही कोण? असें टाफरून वोलण्याची त्यांच्यांतील अर्धवट सुशिक्षितांत सुद्धां प्रवृत्ति आहे व तीच हळुहळू त्यांच्याद्वारा त्यांच्या समाजांत फैलावत आहे. याच्याच जोडीला ब्राह्मण–द्वेषाचीही चुणूक या वृत्तींत आहेच. पण मनुष्य एकदां स्वाभिमान घेऊन उठला म्हणजे हें सर्व होणारच. स्वत्वाची जाणीव व स्वाभिमान हेच सामाजिक उन्नतीचे पाये आहेत हें ओळखून महार लोकांनीं आमच्या प्रयत्नांसंबंधानें थोडी उपेक्षा किंवा अप्रियता सुद्धां बाळगली तर त्यांत कांहींच आश्चर्य नाहीं. अर्थात् जेथें आमच्या प्रयत्नांची जरूरी नाहीं तेथें ते आम्ही करतों असें म्हणावें व विनाकारण वारीकसारीक भुणभुण चालू होण्याला जागा करून द्यावी हें आम्हालाहि संमत नव्हतें. जेथें आमच्या प्रयत्नांची जरूरी जास्त होती व ते प्रयत्न व्हावेत अशी जेथील लोकांनीं मनापासून अपेक्षा बाळगली व प्रसंगीं आशासुद्धां व्यक्त केली तेथेंच ते आम्ही चालू करणें हें बरोबर होतें. तसेंच आम्हाला आमचीं कांहीं मतें आहेत व कांहीं कार्यपद्धतीविषयीं आमचा कांहीं आग्रह आहे व हें सर्व समाजविचार, धर्मविचार, इत्यादींच्या कांहीं थोड्याशा अभ्यासानें आम्हीं बसविलें आहे.त्यामुळें कोणाच्या मतावरोवर फरपट काढून घ्यावयास व "आपण समाजसेवा करीत आहों" येवढ्या भोळ्या जाणिवेची पैदास करण्याकरितां आमच्या मताच्या व पद्धतीच्या विरुद्ध वागावयास तयार होणें आम्हाला अतिशय जड जातें. अर्थात् ज्यांनी आमच्या समाजसेवाबुद्धीचा आपल्या बाबतींत वापर करून घेतला त्यांच्या वावतींत तो होऊं देणें हें ओघानेंच येत होतें.

आमची शिक्षणपद्धति—

शाळेंत कसें शिकवावें याच्याहि कांहीं पद्धती मीं बसविलेल्या होत्या. वाचावयाच्या वेळीं वर्णमालेचा अनुक्रम आहे तसाच मी चालू ठेविला. व तुमची वर्णमाला कोणती असें जर कोणी विचारलें तर अ, आ, इ, ई, हीच ती होय असें सांगावें असें विद्यार्थ्यांस शिकविलें. पण लिहिणें शिकविण्यास सोपें जावें म्हणून र, ग, न, भ, हीं अक्षरें पहिल्यानें शिकविण्यास हरकत नाहीं असें ठरविलें. वर्णमालेंतील अक्षरांचा अनुक्रम घशांतील अगदीं खोल भागापासून तों ओठाच्या टोंकापर्यंतच्या निरनिराळ्या भागावर कसा अनुक्रमवार बसविला आहे हें समजवून दिलें असतां लहान विद्यार्थ्यांस सुद्धां चांगलें समजतें. तसेंच क,ख, चछ, टठ इत्यादींस कठोर व्यंजनें म्हणतात पण खरीं कठोर व्यंजनें क, ग; च, ज; ट, ड; त, द; प, ब इत्यादि आहेत व त्यांत एक वारीक 'ह'कार मिळविल्यानें त्यास थोडी मृदुता येते व क, च, ट, त, प, आणि ग, ज, ड, द, ब यांच्यांतील कडकपणा कांहींसा सैलावतो म्हणून प्रत्येक पंचकांतील दुसरें व चौथें अक्षर हेंच खरें मृदु असतें हा विचार सुद्धां वयानें मुलें जर थोडीं मोठीं असलीं तर त्यांना सहज समजतो. त्याप्रमाणेंच क, का च्या बाराखडीची रीत एकदां कळली म्हणजे सगळ्या व्यंजनांच्या बाराखड्या कोणी न सांगतां कशा बनवितां येतील हें एकदां सांगून दिल्यावर थोडीं जाणतीं मुलें त्या भराभर तयार करतात. शाळेंत शिकवावयाचीं पुस्तकें सुद्धां जीं मामूल म्हणून ठरलेलीं आहेत तीं मी मुळींच घेत नव्हतों. निर्णयसागर प्रेसची माला मला जास्त सुबक वाटली व कोणा एका मराठी शाळेच्या हेडमास्तरानें लिहिलेलें बिनजोडाक्षराचें पहिलें पुस्तक हेंहि फार उपयुक्त वाटलें. म्हणून तींच पुस्तकें मीं चालू केलीं. जोडाक्षरांचा अवघडपणा हा उच्चाराच्या अनुक्रमानें तीं व्यंजनरूपानें लिहीत गेल्यास, कसा नाहींसा होतो हेंहि जोडाक्षर सावकाश उच्चारून व तोंडांतून जें अर्धवट अक्षर निघेल व जें शेवटीं पूर्ण निघेल तें अर्धवट व पूर्ण असें पाटीवर लिहून दाखवून, लवकर पटवून देतां येतें. कवितांविषयीं मात्र माझें समाधान कोणच्याच पुस्तकानें होईना. म्हणून मी माझें स्वतःचेंच कविता-पुस्तक तयार केलें. "बिकट वाट वहिवाट" हा फटका, पुष्कळ संस्कृत सुभाषितांचीं अगदीं सोपीं भाषांतरें, दारूचा निषेध

करणारीं कांहीं पद्यें, विद्येचा महिमा सांगणारीं अष्टकें, अस्पृश्य लोकांनीं जागचें उठावें असें त्यांस सांगणारी भूपाळी, अशांसारखी, प्रत्यक्ष उपयोगी पडणारीं अशीं जुनीं पद्यें घेऊन व नवीं तयार करून तें पुस्तक सर्व शाळांत लावलें व त्या कविता मुलांना पाठ आल्याच पाहिजेत अशी सक्ति ठेविली. लहान मुलांना, गोटचा खेळतांना सुद्धां कां होईना पण गाण्याची संवय असते. हीं गाणीं म्हणजे जर चारगट लावण्या असल्या तर तींच त्यांच्या तोंडांत वसतात. त्यांच्या ऐवजीं हीं पदें वसावीं म्हणजे धूप जाळल्यानें जशी हवा शुद्ध होते तशीं हीं पुन्हां पुन्हां म्हटलीं गेल्यानें घरांतील दुसऱ्या एका प्रकारची हवा शुद्ध होत रहावी असा माझा कटाक्ष होता. भागाकारापर्यंत गणित आलें म्हणजे तें आमच्या शिक्षणक्रमाला पुरेसें आहे असें ठरविलेलें होतें. उत्तम लिहितां वाचतां आलें, बऱ्याचशा कविता पाठ आल्या व भागाकारापर्यंत गणित आलें, सरासरी पुणें जिल्ह्याच्या भूगोलापर्यंत भूगोल आला, केवळ श्रवण करून मराठ्यांच्या इतिहासाची माहिती झाली व सरकारी अधिकारी कोण कसे कसे असतात यांची ऐकीव माहिती त्यांना झाली म्हणजे त्यांना आपण प्राथमिक शिक्षण दिलें असें मी समजत असें.

खरें म्हटलें म्हणजे प्रत्यक्ष शिक्षण देण्याच्या आधीं त्याची आवड उत्पन्न करणें हेंच मोठें काम असतें. पहिले कित्येक महिने, लहान मुलें नुसती शाळेंत येण्याचीच संवय करीत असतात. हाहि शिक्षणाचाच भाग होय. हात धुवून, नाक तोंड साफ करून, मास्तर सांगतील तेथें गोंगाट न करतां बसून एक तासानें घरीं जावयाचें; येवढें अंगवळणीं पडणें हेंहि शिक्षणच होय. मी स्वत: वरील सर्व तपशील लक्षांत ठेवून शिकविण्याचें काम करी व जे कोणी शिक्षक म्हणून मी नेमीत असें त्यांना प्रथम या सर्व गोष्टींची समजूत करून देऊन मगच शिकवावयास पाठवीत असें. चांगले उच्चार, साफ वाणी, हींच विद्यार्थ्यांच्या कानीं पडावी व पोषाख, वागणूक, चालचलणूक इत्यादींत कांहीं एक विशेष प्रकारचा सौम्यपणा व नीटनेटकेपणा हाहि त्यांना पहावयास सांपडावा म्हणजे त्या नमुन्यासारखें आपण बनावें असें विद्यार्थ्यांना आपोआपच वाटूं लागतें. म्हणून शिक्षणानें पुढारलेल्या वर्गांतूनच, म्हणजे ब्राह्मण व प्रभू, यांच्यांतूनच मी शिक्षकांची निवड करीत असें. व्हालंटियर्समध्यें मात्र बहुधा अनेक जातींचे लोक दाखल होत असत. पण पुढें पुढें धोरण म्हणून हा क्रम मला

बदलावा लागला व अस्पृश्य लोकांपैकींच कांहीं शिक्षक मी नेमूं लागलों. मागसलेलेपणा हा केवळ विद्यार्थ्यांतच नव्हे तर या शिक्षकांतहि मला दिसून येत असे. व बहुतेकजण जरी चांगले सभ्यपणानें वागत व कामें वक्तशीर करीत तरी एक दोघे गृहस्थ असे चमत्कारिक भेटले कीं, त्यांचा संसर्ग आपणास यत्किंचितही नको असें मला वाटूं लागलें. आपल्या स्वत:च्या अंगावरचा कोट जो मनुष्य जुगारीसाठीं गहाण टाकतो तो मुलांच्या मनावर काय संस्कार करणार व आळींतल्या आळींतच मुलांच्या दृष्टीनें त्याची रया काय राहणार हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. तथापि वर म्हटल्याप्रमाणें बहुतेक सर्व अस्पृश्य शिक्षकांनीं आपलीं कामें वरीं मन लावून केलीं. हे शिक्षक बहुधा त्या त्या आळींतच राहणारे असल्यामुळें त्यांना ब्राह्मणादि शिक्षकांइतका जाण्यायेण्याचा उपद्रव होत नसे. या शिक्षकांना मात्र फार श्रम पडत. पण खरें म्हटलें म्हणजे ते नोकरपेशा पत्करून राहिलेलेच नव्हते. त्यांतल्या कित्येकांनीं महिनोमहिने फुकट कामें केलेलीं होतीं; पण आपला कॉलेजचा अभ्यास चालवावयाचा, हें स्वयंसेवकाचें काम करावयाचें, व आपलें शिक्षण चालावें म्हणून आणखी कांहीं धनोत्पादनाचें काम करावयाचें येवढा बोजा त्यांना झेपेना म्हणून अगदीं नाइलाजानें ते हें वेतन पत्करीत असत. असो. सर्व काम व्यवस्थेशीर चाललें होतें. परंतु 'दमणें' म्हणून जें कांहीं आहे तें मला बाधूं लागलें. सतत दहा वर्षे मला फार काम पडलें.

कामाचा व्याप—

पंधरा सतरा शिक्षक असत. सर्व शाळांना हरतऱ्हेचें सामान म्हणजे पाटच्या, पुस्तकें, दिवे, तेलाची व्यवस्था, क्वचित बैठकी, नकाशे, फळे इत्यादि सर्व प्रकार मोफतच असत, त्यांची तरतूद करून ठेवणें, म्युनिसिपालिटीच्या तपासनिसाशीं पत्रव्यवहार ठेवणें, बिलें पाठविणें, हिशेब रवाना करणें, घरभाडेंवाल्यांचें पहाणें, मधून मधून जुन्या सोडून नव्या जागा पहाणें, मास्तरांच्या कडून येणाऱ्या तक्रारींकडे लक्ष पुरविणें, कोठें मुलांची संख्या कमी होऊं लागल्यास आळींत जाऊन पुन्हां प्रोत्साहन देणें, इत्यादि कामें मला करावीं लागत. शिवाय मग कोणी अर्ज लिहून द्या म्हणून आले, कोणी अमूक गृहस्थाला गळ घालावयास चला म्हणून आले, शाळेंत नादारी मिळवून

द्या म्हणून कोणी आले, कोणी बोर्डिगांत प्रवेश मिळविण्यासाठीं खटपट करा म्हणून आले, देवळाच्या भितीला चिकटून कमिटीनें मुतारी बांधली आहे ती काढण्याची खटपट करा म्हणून कोणी आले, आपल्या जोडयाच्या दुकानाची जाहिरात लिहून द्या म्हणून कोणी आले, जातपंचांचीं भांडणें मिटवा म्हणून कोणी आले, आळींत कंदील नाहीं म्हणून तक्रार घेऊन कोणी आले, मास्तरांच्या घरीं तक्याला टेकून बसून आम्ही बरोबरीनें गोष्टी करतों अशी ऐट आपल्या अज्ञ आळीकरांत भोगावयास सांपडावी म्हणून बैठक मारावयास कोणी आले, बाहेरगांवचे कोणी आम्ही बोर्डिग काढीत आहों त्याची कांहीं तरतूद करा असें म्हणावयास आले, अशा एक ना दोन किती तरी बाबी असत, व त्याकडे वेळ व श्रम खर्चावीं लागत. हीं कामें म्हणजे सामान्य स्वरूपाचीं व लगोलग निकालांत काढावयाचीं अशीं असत. केव्हां केव्हां हें अस्पृश्यता-निवारणाचें काय बंड आहे हें विचारण्यासाठीं, नाहींतर "चल तुझा मास्तर कोण आहे तो मला पाहू दे, त्याला विचारतों हा काय प्रकार आहे" असें आपल्या प्रबुद्ध मुलालासुद्धां खडसावून माझ्याशीं दोन हात करण्यासाठीं कोणी पालक येत; जातीजातींच्या पंचांचेंच भांडण तोडण्याचेही प्रसंग येत; कोणी बाहेरगांवचे अस्पृश्य पुढारीवजा लोक मन वघण्यासाठीं येत; कोणी शास्त्राची चर्चा करावयासाठीं येत; कोणी झालेल्या व्याख्यानांतील मुद्यांची आणखी फोड करून घेण्यासाठीं येत; कोणी व्याख्यान फार चांगलें झालें असें गौरविण्यासाठीं येत; एतावता सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं ११ वाजेपर्यंत पोटाच्या उद्योगाचा वेळ सोडून बाकीचा सर्व वेळ मी सर्वथा या कामांत घालीत असें. हे स्फुटरूप उद्योग सोडले म्हणजे चळवळीच्या रूपानें उद्योग करावयाचे असत ते स्वतंत्रपणें दिलेच आहेत. पण या सर्व कामांनीं मला अगदीं उसंत मिळेनाशी झाली. तरी रात्रीच्या शाळा तपासावयास जावयाचें काम मी आतां रा. दिवेकर व रा. पटवर्धन यांजकडे दिलें. मला सायकलवर बसतां येत नसल्यामुळें तें माझ्यानें होण्यासारखें नव्हतें. मधून मधून मात्र शाळांची व्यवस्था व चांचणी पहावयास मी जाई. पुढें पुढें असें झालें कीं, पहिली पहिली उत्साही स्वयंसेवक मंडळी आपल्या व्यवसायामुळें कमी होऊं लागली व शाळा चालविणें अवघड बनूं लागलें.

अडाणी म्युनिसिपल मेंबर—

त्यांतच एक नवीन मुद्दा आला. म्युनिसिपालिटी आम्हांला ग्रँट देत असल्यामुळें तिनें आपली तपासणी आमच्यावर ठेवावी हें स्वाभाविक होतें. त्याप्रमाणें तपासणीस येत असत. तपासण्या होत व इन्स्पेक्टर साहेब पुढील सालची ग्रँट देण्याबाबत शिफारस करीत असत. परंतु हळुहळू म्युनिसिपल मेंबरांच्या जातवारीचें वारें आम्हांला बाधक अशा रीतीनें वाहूं लागेल असें दिसूं लागलें. आमचे शिक्षक व आमचे शाळातपासनीस यांची विद्यार्थीदशाच चालू असल्यामुळें अधिकाऱ्यांपुढें जें लुलुपुतु करावें लागतें तें त्यांस माहित नव्हतें. ते उर्मट होते असें तर मुळींच नव्हे. पण नवीनच अधिकार प्राप्त झालेल्या लोकांना—व तोही ते अपात्र असतांना- आपण कोणी विशेष झालों आहों असा भ्रम उत्पन्न होतो व त्या तोऱ्यांत ते वागूं लागतात. ज्यांच्या छपन्न पिढ्यांला कधीं अक्षर ओळखीचा संस्कार झाला नाहीं व ज्यांचे म्युनिसिपालिटींत येण्याचे अर्जसुद्धां मींच लिहून दिले त्यांना सुद्धां अधिकार गाजविला पाहिजे अशी उर्मट वासना झाली व त्यांचें ऐकून "अस्पृश्यता-निवारण करणारे असे जे स्वत:स म्हणतात त्यांनीं अस्पृश्यांच्या पुढारी माणसांना असें कां वागवावें" असली पश्चात्-कुरकुर कांहीं सुशिक्षित व म्युनिसिपालिटींत उंचदर्जा प्राप्त झालेल्यांनीं सुरूं केली. तुमचे लोक उर्मट आहेत असल्याही आगळिकी करावयास सुरवात केली. मी सर्व चवकशी बारकाईनें केली. आमची मंडळी उर्मट मुळींच नव्हती व अस्पृश्यांशीं कसें वागावें याचा धडा वरील तक्रार करणारांनाच त्यांनीं द्यावा अशी त्यांची वागणूक होती. पण हे सगळे कशाचे चाळे आहेत हें मी ओळखूं लागलों होतों.

उत्तरोत्तर मला असें दिसूं लागलें कीं हे अडाणी मेंबर लोक, त्यांच्या-साठींच चाललेल्या कामाला मदतनीस बनावयाच्या ऐवजीं, त्या कामाला घुणें मात्र घालीत राहतील आणि म्युनिसिपालिटीचे शाळा तपासनीस यांच्या दृष्टीनें सुद्धां जें काम अगदीं सुयंत्र चाललेलें होतें त्यांत, म्युनिसिपालिटींतील पक्षोपपक्ष, रागलोभ, जातवारी इत्यादी लक्षांत घेऊन, विनाकारण खेंकटीं उत्पन्न करतील. वास्तविक पाहतां केवळ जातवारीची मांडवशोभा खुलून दिसावी यासाठींच असल्या लोकांना मेंबरपणा मिळतो पण त्यांचा असा भलताच समज होऊन बसतो कीं आपण मोठे शहाणे आहोंत, म्हणून आपल्या पायाकडे हा मेंबरपणाचा मान लोटांगण घेत आला आहे. जे शिक्षक पुढें वर्ष

सहा महिन्यांत डॉक्टर, एंजिनिअर असे होऊन गेले व पुढें त्यांच्या दारांत पट्टेवाले होऊन बसण्याची सुद्धां ज्यांची लायकी नाहीं असले लोक त्यांना कसें शिकवावें व कसें शिकवूं नये हें सांगण्याचें धाडस करूं लागले. म्युनिसिपालिटीच्या तपासनिसांनीं जर कांहीं कमी जास्त सांगितलें व सूचना केल्या तर त्यांची अंमलवजावणी आम्ही तत्परतेनेंच करीत असूं. पण ज्यांना विद्येचा कसलाही गंध नाहीं ते जेव्हां भलतेच अधिकार गाजवूं लागले तेव्हांच मला पहिली इशारत मिळाली. मेंवरांच्या कानाशीं लागणें, त्यांच्या मनधरण्या करणें, आणि अशा रीतीनें उत्पन्न झालेल्या अडचणींचा परिहार करणें मला साधण्यासारखें नव्हतें. याच वेळीं इतरत्र म्हटल्याप्रमाणें हें कामहि मला एकटयाला अनावर झालें. १९२६ सालीं माझी प्रकृतीहि ध्वनिनलिका-शैथिल्यामुळें अगदीं विघडून गेली व म्हणून वास्तविक हें काम म्युनिसिपालिटीनेंच चालवावयाचें आहे हें लक्षांत घेऊन मी म्युनिसिपालिटीस या शाळा आतां तुम्ही आपल्याकडे घ्या असा अर्ज केला. येथील नेमस्त पक्षांतील एका जबाबदार गृहस्थानें, "शाळा म्युनिसिपालिटीच्या हवालीं करूं नका, आम्हीहि कांहीं पैशाची तरतूद करूं' असा निरोप मला पाठविला होता. पण यानें झालें तरी माझ्या स्वत:वरचा दगदगीचा वोजा मुळींच कमी होण्यासारखा नव्हता. व त्याची तर मला अगदीं कीक आली होती. म्हणून म्युनिसिपालिटीकडे केलेला अर्ज मी कायम केला. आमच्या मंडळाचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब भोपटकर यांचीही हीच इच्छा होती. जरूर तेवढा सर्व पत्रव्यवहार झाल्यावर म्युनसिपॅलिटीनें सर्व शाळा आपल्या ताब्यांत घेतल्या व अशा रीतीनें सतत दहा वर्षेंपर्यंत एक शाळाखातेंच चालविण्याच्या दगदगींतून मी मोकळा झालों. शाळा म्युनिसिपालिटीच्या ताब्यांत गेल्यापासून उत्तरोत्तर त्यांची काय अवस्था होत गेली हें पाहणें जिज्ञासूंस बोधप्रद ठरेल असें वाटतें. आमचे शिक्षक पगार घेत असले तरी ते तो अगतिक म्हणून घेत होते. ते मूळचे समाज-सेवा करण्याच्या शुद्ध हेतूनें भरलेले तरुण लोक होते. म्हणून हिंवाळा, पावसाळा, कसलेंही ऋतुमान न पाहतां, आणि क्वचित् चार चार मैलांचा रोजचा तकाटा सहन करून त्यांनीं आपल्या शाळा चालविलेल्या होत्या. पुण्यांत राहून गुलटेकडीची शाळा चालविणें हें किती दगदगीचें काम असेल हें ती चालविणारालाच केवळ माहीत. शिक्षकांच्या

या सामाजिक कार्याचा अन्यत्र उल्लेख आलेलाच आहे. त्यांतच आणखी कांहीं नांवें सांगणें योग्य होईल. नागझरी म्हणून जो एक घाणेरडा ओढा वाहतो त्याच्या अगदीं कांठाला गणेशपेठेंत एक चांभारवाडा आहे. त्या वेळीं तरी निदान तो घाणेरडचा वस्तीचा नमुना म्हणून दाखवितां आला असता. अशा या ठिकाणीं चांभारांच्या माळ्यावर धुराच्या गर्दींत रोज शाळा चालवाव-याची व तीहि सानंद, सोल्हास अशी, हें काम रा. निळकंठराव गोखले यांनीं इतक्या चिकाटीनें करून दाखविलें कीं म्युनिसिपालिटीच्या तपासनिसांनीं त्यांची मोठी वहावा केली. रा. दामले हे तर, घरापासून दोन मैलांच्या अंतरावर असलेल्या दोन शाळा चालवीत. त्यांनीं हें काम सतत तीन वर्षें केलें; पण कधीं कंटाळा केला नाहीं कीं सबब सांगितली नाहीं. बी. ए. झाल्या-वर ते आतां बरेच मोठे अंमलदार झाले आहेत. सदाशिवराव नाडकर्णी या अल्पभाप पण बहुगुणी विद्यार्थ्याच्या श्रमाची आठवण मला सदैव राहील. आपली श्रीमंती व उंच बौद्धिक दर्जा हा अगदीं विसरून कसल्याहि खातेऱ्यांत सध्यांचे बॅरिस्टर अग्रवाल काम करण्याची उत्सुकता दाखवीत. पण या सर्वांत एका विद्यार्थ्यानें अगदीं कडी केली. हे सध्यां ठाणें जिल्ह्यांत पोस्ट-मास्तर असून चांगले सुखवस्तु आहेत. पण ते पुण्यास विद्यार्थी असतां त्यांची फार हलाखी असे व म्हणून ते वारानें जेवीत. ज्या एका गृहस्थाच्या घरीं त्यांनां एक वार होता त्याच्याच घरीं ते राहात असत. व त्यांच्याच दिव्यावर अभ्यास करीत असत. स्वतः गरीब असल्यामुळें दुसऱ्यांच्या गरीबीची व दैन्याची त्यांना लहान वयांतच उत्तम ओळख पटली होती. म्हणून ते आमच्या एका शाळेंत शिकवावयास येऊं लागले. ज्यांच्या घरीं निजत बसत त्यांना पहिल्याच दिवशीं कळलें कीं आपल्या घरचा हा वारकरी रोज चांभारवाड्यांत जाणार आहे. यानें सांगितलें कीं हें खरें आहे, पण मी त्याचा उपसर्ग तुम्हांस लागूं देणार नाहीं. मग या शिवराम कुलकर्ण्यानें कसा आचार ठेविला तो पहा. रोज रात्रीं न चुकतां शाळेंत शिकवावयास जावयाचें; घरीं परत आलें म्हणजे अंघोळ करावयाची; पुन्हा दुसरे दिवशीं शाळेंत जावयाचें; पुन्हा परत आल्यावर अंघोळ करावयाची व घरांत यावयाचें! असें सारखें तीन महिने चाललेलें होतें. या तपश्चर्येनंतर घराच्या मालकाला करुणा आली. त्यांनीं उदारपणानें त्याला सांगितलें कीं अतःपर अंघोळ करूं

नकोस. तूं तसाच निजलास तरी आम्हांस चालेल! नमतें घेऊन सुधारकानें दुसऱ्याचा विरोधभाव कसा जिंकावा याचें हें फार उत्कृष्ट उदाहरण आहे हें कोणीहि कबूल करील. अशा या शिक्षकांना व समाजसेवकांना कोणी उणें-तुणें बोललें तर तें मला सहन होण्यासारखें नव्हतें. म्हणून वरील शाळा हवालीं करण्याचा उपक्रम मीं केला. हें मात्र सांगितलें पाहिजे कीं दोन तीन मूर्ख व प्रतिनिविष्ट माणसांनीं जरी असलें वर्तन सुरू केलें तरी म्युनिसिपालिटीचे अधिकारी व ज्यांच्याशीं संबंध आले ते बहुतेक मेंबरलोक आमच्याशीं फार भलेपणानें वागले.

शाळांची यादी—

१ नवी पेठ मांगवाडा
२ नारायण पेठ चांभारवाडा मसणवाट
३ नारायण पेठ चांभारवाडा
४ भांबुर्डा महारवाडा
५ भांबुर्डा मांग वाडा
६ कसबा चांभार वाडा
७ गणेशपेठ-नागझरी चांभारवाडा
८ रविवार पेठ–ढोरवाडा
९ शुक्रवार पेठ–हत्तीमहाल–चांभारवाडा.
१० घोरपडे पेठ–मारुतीचें देऊळ चांभारवाडा
११ घोरपडे पेठ- भाग्यवंताचें घर चांभारवाडा
१२ साऱ्याच्या मांगवाडयाच्या खालील महारवाडा
१३ चिमण्या गणपतीजवळील चांभारवाडा
१४ मंगळवार पेठ-महारवाडा
१५ गाडीतळ महारवाडा
१६ कामाठीपुरा–महारवाडा
१७ कातडखाना–मांगवाडा
१८ गुलटेकडी मांगवाडा

मतप्रचारासाठीं दौरा—

प्रतिपादनावर आमचा भर फार होता व तेंच साधन खरें बलवत्तर आहे असा माझा दृढ विश्वास आहे. हें प्रतिपादन सर्वत्र करावें व सर्व वस्तुस्थिति डोळ्यांनीं पहावी म्हणून आम्ही दौऱ्यावर निघावयाचें ठरविलें. रा. हरीभाऊ फाटक, मी व विनायकराव पटवर्धन कीं, जे सध्या एम्. एस्सी. होऊन मोठे असामी झाले आहेत ते, असे निघालों. प्रथम साताऱ्यास गेलों. रा. व. काळे वकील यांनीं सहानुभूति दाखविली व देवळाच्या कल्पनेसंबंधीं बोलतांना म्हणाले कीं भोवतालीं संतगण उभा करून मध्यें श्रीविठ्ठलाची मूर्ति आहे असें पतितपावन-मंदिर बांधावयास कांहींच हरकत नाहीं. चळवळींत व्यवहार्यता आणावयासाठीं प्रार्थना-समाजाच्या या पुढारी गृहस्थानीं आपलें मत असें गौण मानिलें व मूर्तिपूजेलाही संमति दिली हें पाहून मला फार बरें वाटलें. रा. नाथ घाणेकर व डॉ. आठल्ये यांच्याशीं पुष्कळच कसोशीनें चर्चा झाली व ती फार बोधप्रद झाली. उभयतां फार सानुकूल बोलले. न्यू इं. स्कूलच्या आवारांत सभा झाली. प्रतिष्ठित गांवकरी उपस्थित होते. रात्रीं महारवाडा, ढोरवाडा इकडे पहाणी केली. तेथील लोकांपासून सर्व माहिती विचारून घेतली. शेवटीं कांहीं विद्यार्थ्यांशीं बोलणें करून कऱ्हाडास गेलों. हा आतां सांगितला असाच त्रिविध कार्यक्रम प्रत्येक ठिकाणीं करावयाची वहिवाट ठेवली. श्री. पांडुअण्णा शिराळकरांच्या मदतीनें व 'गोविंदा' मांगाच्या माहितीनें तेथील गांवांतील व अस्पृश्य वस्त्यांतील कामें पार पडलीं. लायब्ररींतल्या सभेला चांगली चांगली मंडळी आली होती. व रात्रौ महारवाड्यांतही फार चांगला कार्यक्रम झाला. सर्व नवीनच प्रकार होता. त्यामुळें कुतुहल, भय, व जबाबदारी यांचा मोठा चमत्कारिक मिलाफ बनत असे. तेथून आम्ही सांगलीस गेलों. कारभारी साहेबांच्या अध्यक्षतेखालीं निराळाच कसला तरी समारंभ होता, त्यांत बोलावयाचें निमंत्रण आलें होतें. तेथेंच हा विषय सांगून टाकिला. विद्यार्थ्यांच्या गटापुढेंहि व्याख्यान झालें. जुन्या सांगलीच्या तिकडे रात्रौ महारांच्या शाळेंत अस्पृश्यांसाठीं व्याख्यान झालें. त्यांच्या ओळखी करून घेऊन नव्या विद्यार्थ्यांचीं कर्तव्यें काय हें स्पृश्य विद्यार्थ्यांस समजावून देऊन पुढें जमखिंडीस गेलों. तेथें रा. सा. काळे यांच्या मदतीनें कार्यक्रम उरकले. हायस्कुलच्या इमारतींत व्याख्यान झालें. समाज शिक्षित व पोक्त

होता. रात्रौ महारवाड्यांत गेलों. त्यांची भाषा कानडी म्हणून दुभाष्याच्या द्वारां माझे विचार त्यांस कळविले. तेथें भजनी मंडळी भेटली. त्यांचा शुद्ध भाव व आमचे विचार ऐकून त्यांस झालेलें परम समाधान हें पाहून आनंद झाला. तेथून मी परत इसलामपुरास आलों. तेथें शाळेंत व्याख्यान झालें. मास्तर मंडळीनीं फार वारकाईनें विचारपूस केली व काम कसकसें करावें याची चर्चा केली. महारवाड्यांत पहाणीस गेलों. पाण्याचे कसे हाल आहेत याचें वर्णन ऐकून दु:ख झालें. दिवसभर कष्ट करून गोळा केलेल्या लाकडाच्या मोळीचे ४।५ आणे येतात पण त्यांतलाच एकादा आणा प्रसंगविशेषीं पाण्याला द्यावा लागतो, हें जेव्हां एका महार गृहस्थाच्या तोंडून ऐकलें तेव्हां अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा अधिकाधिक उलगडा होऊं लागला. महारवाड्यांत मोठी सभा झाली. भजन झालें. मी ब्राह्मण म्हणून आणि महारांच्या उद्धाराची गोष्ट बोलतों हें पाहून जमलेल्या महारांना खरोखर आनंद झाला. हीं गांवें घेऊन मी पुण्यास परत आलों.

पुढें, वांई, कल्याण, नाशिक, मुंबई ब्राह्मण सभा इत्यादि ठिकाणीं प्रचारार्थ गेलों. ठरल्याप्रमाणें सर्व कार्यक्रम पार पडत असत. वांईला घाटावरच व्याख्यान झालें. रात्रौ महारवाडा पाहिला. नदीच्या कांठाकांठानें वरेंच लांब जावें लागलें. बरोबर बरीच ब्राह्मण मंडळी आली होती. माझ्या बोलण्यांतील न्याय व युक्तायुक्तता हीं सर्वांसच पटण्यासारखीं होतीं. "तुम्ही लोक परटाला शिवता ! आणि आम्हाला शिवत बाहीं"! असें येथें एक महार गृहस्थ म्हणाला.कल्याणास फक्त व्याख्यानच झालें. श्री.चिंतामणराव वैद्य हे अध्यक्ष होते. ब्राह्मणसभेंतील प्रसंग फार नामी झाला. श्रोते मोठे सुशिक्षित,तरतरीत, समजदार आणि जबाबी असल्यामुळें प्रसंग चांगला रंगला. दरम्यान नाशिकास गेलों. हिंदुधर्म परिषदेची बैठक डॉ. कूर्तकोटी यांच्या अध्यक्षतेखालीं भरावयाची होती. तेथें आपला विषय मांडावा म्हणून जावयाचें ठरविलें. वरोवर रा. रघुनाथपंत दिवेकर हे होते. सभागृहांत गेलों तों एक चमत्कारिकच देखावा दिसला. मुख्य रंगपीठ व बाकीचें सर्व थिएटर माणसांनीं फुलून गेलें होतें. पण उजव्या हातचा सोपा मात्र अगदीं रिकामा होता. चवकशी करतां कळलें कीं ही जागा अस्पृश्यांसाठीं ठेविली आहे. तेथें इतर कोणी बसणार नाहीं व त्यांना आपल्यांत कोणी घेणार नाहीं. ही व्यवस्था पाहून

आम्ही खरोखर चकितच झालों. सभेंत भाषण केलें पण जरा खिन्न मनानेंच घरीं आलों. रात्रीं माझा तपास काढीत कांहीं महार मंडळी तेथें आली. तुम्ही सभेस कां आला नाहीं असें विचारतां त्यांनीं सांगितलें कीं आम्हांस सुतक्या-सारखे निराळे बसवीत आहेत म्हणून आम्ही आलों नाहीं. मी म्हणालों हें सुधारणेचें काम नुकतेंच सुरू झालें आहे. सभेला आलां असतात तर तुम्हाला अनुकूल अशीं अनेक भाषणें तुम्हांला ऐकावयास सांपडलीं असतीं. निराळें वसविलें याची लाज इतरांना. पण हें म्हणणें त्यांना पटेना व दुसरे दिवशीं त्यांनीं सभेस जरूर यावें हा माझा आग्रह त्यांना पसंत पडेना. शेवटीं मी त्यांना एक तडजोड सुचविली. इतर जरी कोणी तुमच्या पाख्यांत वसावयास तयार नसले तरी मी व दिवेकर जर तुमच्यांत येऊन बसलों तर तुम्हांस पुरे कां? असें मी त्यांस विचारलें व त्यांनीं मोठ्या आनंदानें आमचें हें म्हणणें पतकरलें व सभेस यावयाचेंही ठरविलें. दुसरे दिवशीं या देवळालीच्या मंडळींची वाट पहात आम्ही दाराबाहेर वराच वेळ उभे राहिलों. इतक्यांत पाचपंच-वीसजण आले. पण आतां तिकिटें कशाचीं काढावयाचीं ? आठ आण्याला तिकिट होतें! मी डॉ. कूर्तकोटींना विनवून लिहिलें कीं या मंडळीस फुकट सोडण्याविषयीं व्यवस्थापकांस आज्ञा द्यावी. त्यांनीं ती ताबडतोब दिली व ही मंडळी त्या सवत्या सुभ्यांत जाऊन बसली. ती बसल्यावर आम्हीही सभा-गृहांत गेलों व व्यवस्थापक योग्य जागा दाखवीत असतां सरळ जाऊन त्या महारमंडळींत जाऊन बसलों. याचा समाजावर योग्य तो परिणाम निः-संशय झाला. भाषणें सुरूं झाल्यावर कांहीं महार पुढारी बोलण्याची इच्छा दर्शवूं लागले. मी कुर्तकोटीना पुन्हां विनंति केली व त्यांनींही दुपारीं परवानगी देतों म्हणून म्हटलें. माझ्या मतें ही दोनही कामें बरीं झालीं. मुख्य विषय मी आदल्या दिवशीं सभेपुढें मांडलाच होता व या आजच्या प्रकारानें समाजाचें लक्ष तिकडे बरेंचसें वळलें होतें. मला रजा नसल्यामुळें मी दुपारींच परत येण्यास निघालों. तिकडे दुपारीं बैठक भरली. शंकराचार्यांच्या अनुज्ञे-प्रमाणें एक महार गृहस्थ बोलण्यासाठीं टेबलाकडे येऊं लागला. इतक्यांत कोणी व्यवस्थापकांनीं कां धार्मिकांनीं रंगभूमीवर घातलेली विशाल सतरंजी झटकन् ओढून घेतली कां कीं तीवर महार येऊन उभा राहिला तर विटाळ कालवेल ! सदर महार गृहस्थाच्या अंगाचा काय भडका झाला असेल

याची कल्पनाच करावयास हवी. खरोखर हा असा प्रकार होईल हें मला माहीत असतें तर मी ती बोलू देण्याची परवानगीही मागितली नसती. सभा झाल्यावर सदर गृहस्थाचें पुण्यास एक पत्र आलें. त्यांत त्यानें आपला सात्त्विक त्वेष एवढा ओतला होता कीं पत्र आगीच्या अक्षरांनीं लिहिलें आहे असें वाटलें!

प्रतिपादनासाठीं हिंडावयाचें व खास माहिती गोळा करावयाची व तिच्या आधारावर बोलावयाचें असल्यामुळें सांपडतील तितके प्रसंग मी संपादीत असें. विजापुरास जावयाचें ठरविलें व बरोबर सदाशिवराव नाडकर्णी व छोटेलाल अग्रवाल या स्वयंसेवकांसह निघालों. विजापुरास रा. नाईक वकील यांच्याकडे उतरलों. थिएटरांत बरीच मोठी सभा झाली. दुसरे दिवशीं सकाळीं महारवाडयांत गेलों. कानडी भाषा फार त्यामुळें तितकासा उपयोग तेथें झाला नाहीं. विद्यार्थी वगैरे या ठिकाणीं कोणी भेटले नाहींत. इमारती वगैरे पाहून परतलों. मग सोलापुरास गेलों. तेव्हां एकटाच होतों. तळयाच्या कांठीं जो मोठा हॉल आहे त्यांत व्याख्यान झालें. नानासाहेब चापेकर अध्यक्ष होते. श्री. बंडूनाना लिमये यांच्याकडे पाहुणचारास गेलों. त्यांनींही कामाविषयीं फार सहानुभूति दाखविली. रात्रीं मोठ्या महारवाडयांत गेलों. आम्ही जाऊन बसलों तसे लोक येण्यास विचकत आहेत असें दिसलें. कांहीं वेळानें बसाबस झाल्यावर मीं त्यांस विचारलें कीं तुम्ही काचकूच कां करीत होतां ? त्यांनीं दिलेलें उत्तर ऐकून मी विस्मितच झालों. काहीं दिवसांपूर्वी प्रसिद्ध प्रांतिक परिषद सोलापुरास भरली होती. तेथें लोकमान्य टिळकांवर मात करण्याची इर्षा धरून कांहीं शहाण्यासुरत्या लोकांनीं या अज्ञ लोकांस हाताशीं धरून त्यांजकरवीं रंगपीठावर व थिएटरवर दगड मारविले होते. त्या पुढाऱ्यांच्या पापाचें प्रायश्चित्त या लोकांना विनाकारण भोगावें लागलें होतें. त्या प्रकरणाची ओळख देऊन महार पुढारी म्हणाले "आम्ही विचकतों याचें कारण असें कीं मागच्या सभेसारखाच कांहीं प्रकार आहे कीं काय ? तेव्हां आम्हांला पुढें केलें; अन् आम्हांला विनाकारण हाल सोसावे लागले!" तसें कांहीं नाहीं हें दिसतांच सभा चांगल्या रीतीनें झाली. सोलापुराहून परत निघून मी श्रीगोंद्यास गेलों. जोशी नांवाच्या माझ्या एका माजी विद्यार्थ्यानें माझी चांगली बडदास्त ठेवली. दुपारीं शाळेंत सभा झाली. इतर शिक्षक मंडळींनीं माझें म्हणणें व शाळा काढून त्यांस शिक्षण देणें या बाबीचें फार

शांतपणें व जिज्ञासेनें श्रवण केलें. पण एका शिक्षकानें मात्र फार कुत्सित शब्द उच्चारले. हे शिक्षक म्हणाले, "हें तुम्ही करतां तर यांत तुमचा कांहीं खाजगी लाभ करून घ्यावयाचा हेतु असेल." हे उद्‌गार ऐकून व तेही चांगल्या शिक्षिता-कडून आलेले पाहून मला फार वाईट वाटलें. वास्तविक यांत माझें खाजगी हित काय होतें? फार काय सांगावें ? मी कोणाचाही मिंधा नव्हतों. चळवळीसाठीं सुद्धां मी मुख्यतः स्वतःच्या मिळकतीवर अवलंबून असे. मग या भल्या गृहस्थाला त्यांत काय पाप दिसलें कोणास ठाऊक! येथें महारवाड्यांत लहानसाच प्रसंग झाला. नंतर मी पारनेरास गेलों. माझी कोणाचीही ओळख नव्हती. अंधार पडल्यावर गांवांत पोचलों. रा. धोंगडे या विद्यार्थ्यानें मला आवाजावरून ओळखलें व आपल्या घरीं नेलें. माझी काळजी गेली. रा. धोंगडे यांची सर्व हकीकत ऐकली तेव्हां कारण नसतांना मुद्दाम अनोळखी पाहुण्याला घरीं बोलावून नेणाऱ्या या गरीब विद्यार्थ्याचें मन मोठ्या घरं-दाजाचें असावें असें मला वाटलें. दुसरे दिवशीं त्याचे मित्र जमा होऊं लागले. पहातों तों ते सगळे माझे विद्यार्थी ! संध्याकाळीं रा. भालेराव वकील यांच्या अध्यक्षतेखालीं सभा झाली. फौजदारसाहेब अगदीं टेबलाच्या समोर खुर्ची टाकून बसले होते ! सभा झाल्यावर दे. भ. पांडुरंगपंत बापट हे कोणच्या चौकांत व्याख्यानाला उभे राहात व हातीं खराटा घेऊन कसे झाडीत याची हकीकत विद्यार्थ्यांनीं मला सांगितली. तेव्हां त्या थोर पुरुषाबद्दलचा माझा आदर द्विगुणित झाला व अस्पृश्यता-निवारणाचें काम माझ्या आधीं तेथें त्यांनीं चालूं केलें होतें हें पाहून आनंद झाला. पारनेराहून मी नगरला गेलों. हायस्कूलच्या हॉलमध्यें व्याख्यान झालें. परिणाम फार अनुकूल झाला. समाजसुधारणा झाल्याशिवाय राजकीय सुधारणा करतां उपयोगी नाहीं, हें मत मी त्या व्याख्यानांत त्याज्य ठरविलें. सभेस नानासाहेब सप्तर्षी आले होते. समाजसुधारणा व राजकीय सुधारणा यांवरील माझीं मतें त्यांना फार पसंत पडलीं. सभा संपतांच तुम्ही कोपरगांवास चला म्हणून मला त्यांनीं आग्रह केला. माझ्या दौऱ्यांत तें गांव होतेंच, रात्रीं अस्पृश्य वस्त्यांत जाऊन विचारपूस केली, व्याख्यानें दिलीं. अस्पृश्यता कां काढावी या विषया-वर मी गांवांत मुख्य सभेंत बोलत असें व अस्पृश्यता घालविण्यास आपली आपण कशी खटपट करावी व या खटपटीला कसा जाब द्यावा यावर

अस्पृश्यांच्या पुढें बोलत असें व जेथें जमेल तेथें तरुण लोकांना जमवून अस्पृश्य वस्तींत रात्रीची शाळा काढण्याविषयीं प्रतिपादन करीत असें. नगरचें काम संपवून मी राहुरीस आलों. तेथें वाडेकर मास्तरांच्याकडे मुक्कामास होतों. त्यांच्या खटपटीनें संध्याकाळीं सभा भरली. एक गुजराथी मुन्सफ होते तेच अध्यक्ष होते. महारवाड्यांत जाण्याचें जमण्यासारखें नव्हतें म्हणून मी लगेच निघालों तो कोपरगांवास गेलों. नानासाहेब सप्तर्षी यांनींच स्टेशनवर उतरल्यापासून सर्व व्यवस्था ठेविली होती. घरीं त्यांच्याबरोबर या विषया-संबंधानें खूप गोष्टी झाल्या. रात्रीं चौकांत मोठी सभा झाली. गांवांत नानासाहेबांचें मोठें वजन दिसलें. सभेला तेच अध्यक्ष होते. दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही महारवाड्यांत गेलों. तेथें एक गमतीचा प्रकार घडला तो सांगतों. आम्ही महारवाड्यांत जाणार आहोंत ही बातमी लागल्यामुळें एक पोलीस जमादार तेथें आगाऊच जाऊन बसले होते. महारवाड्याची जागा चांगली झाडून झुडून ठेविली होती, तथापि बसावयास कांहीं नसल्यामुळें तेथेंच पलीकडे एक छकडा सुटलेला होता त्यांत ते सुखासन बसले होते. सभा सुरू झाली. पद्धतीप्रमाणें मी सर्व कांहीं सांगितलें. त्यांतच अधिकारी लोक फुकट कामें कशीं करून घेतात याचेंही विवेचन केलें व अशीं कामें करण्यास महार बांधलेला नाहीं असेंही श्रोत्यांस बजाविलें. माझें भाषण संपल्यावर एक महार पुढारी बोलावयास उभा राहिला व बोलतां बोलतां महाराकडून फुकट कामें करून घेण्याची जी अधिकाऱ्यांची संवय तेथपर्यंत आला. आतां सरसकट सगळ्याविषयीं बोलावें तर जमादारसाहेब समोरच बसलेले! पण त्यानें त्यांतूनही मार्ग काढला. त्याच्या मनांत खरें तेंच सांगावयाचें होतें. पण धोरण ठेवून म्हणतो "काय सांगावें? सगळे अंमलदार लोक अस्से छळत असतात : याची लाकडं फोड, त्याची लाकडं फोड, असें चाललेलें असतें. पण हे समोर छकड्यांत जे रावसाहेब बसले आहेत ते मात्र फार चांगले. हे मात्र कधीं फुकट काम करून घेत नाहींत ! बाकी सगळे अधिकारी त्रास त्रास देतात !" वास्तविक त्यानें जमादारसाहेबांना वगळलेंच होतें पण वगळल्यामुळेंच त्यांची वाव श्रोत्यांच्या इतकी ध्यानांत आली कीं जमादार-साहेब काय करीत असतील याची मनोमय साक्ष सर्वांना पटून सभेंत हंसें उत्पन्न झालें. असो. तेथून पुढें मी संगमनेरास गेलों. तेथील प्रसिद्ध वकील

श्री. संत यांच्या चिरंजींवाना मी येणार आहे असें त्यांच्या एका मित्रानें लिहून ठेविलें होतें. त्यांनीं बडदास्त उत्तम ठेविली. इतकेंच काय पण प्रत्यक्ष वकील साहेबांनीं बारीकसारीक बाबीपर्यंत लक्ष ठेवून गांवांतील व महारवाड्यांतील सभांची व्यवस्था केली व जातीनें हजर राहून विषयास भारदस्तपणा प्राप्त करून दिला. बाटलेल्या स्वकीयांना आपल्या जातींत, केवळ जेवणावळ घेऊन, परत घेण्याची येथील अस्पृश्यांची धमक पाहून खरोखर समाधान वाटलें. मिशनऱ्यानें एक उंची लुगडें दिलें होतें, त्याच्या लोभानें धर्मान्तराच्या फशी पडलेल्या व परत येऊं इच्छिणाऱ्या एका अस्पृष्ट स्त्रीची हकीकत ऐकल्यावर तत्रस्थ माणसांच्या चित्तांत काय गलबल चालू असेल याची कल्पना आली. रा. लेले हेडमास्तर यांच्या अध्यक्षतेखालीं गांवांत सभा झाली व महार-वाड्यांत श्री. संतांच्या अध्यक्षतेखालीं झाली. संतांनीं अस्पृश्यांना फार उत्तम उपदेश केला. तेथून पुढें मी जळगांवास गेलों. रा. सोनाळकर वकील यांच्या अध्यक्षतेखालीं टेनिस कोर्टावर चांगली सभा झाली. सभेंत कांहीं मंडळींनीं वखेडा करावयाचा प्रयत्न केला पण परस्पर श्रोत्यांनींच त्यांस मोडून काढलें. येथें इतर कांहीं उपक्रम झाला नाहीं. हा वेळपर्यंत माझें प्रतिपादन, उदाहरणें, दाखले इ. सर्व पाठ होऊन गेलें होतें! त्यामुळें जळगांवचें व्याख्यान चांगलें वठलें. येथें हा दौरा संपवून मी माझ्या बंधूंच्याकडे खानदेशांत निघून गेलों. या व एतत्सम सर्व फिरण्यांत अस्पृश्यता–निवारणासंबंधानें तर मी बोलतच असें. पण अस्पृश्यांची मी बारकाईनें चवकशी करी. पण मी एकटा या कामाला किती पुरा पडणार? म्हणून हें चवकशीचें काम पुरेसें व्हावें व आपलें सर्व बोलणें या जमा केलेल्या वस्तूंवर म्हणजे वास्तविक गोष्टींवर आधारलेलें असावें म्हणून मी पुष्कळ स्वयंसेवकांना या कामास तयार केलें होतें. हें काम सोपें नव्हतें. अगोदर अस्पृश्यता–निवारण व्हावयास हवें हेंच तरुण लोकांना पटवून देण्याचें मोठें काम होतें. तें पटल्यावर मग त्यांनीं स्वयंसेवकपणा करावयाचा ! पण हें सर्व होत होतें.बोलून बोलून व्हॉलंटियर्स तयार करण्याचा आमचा कारखानाच होता. त्यांपैकीं पुष्कळजण खेडेगांवचे असत. त्यांना आपापल्या गांवच्या अस्पृश्य वस्त्यांची पहाणी करा असें सांगून त्याजपाशीं चवकशीच्या मुद्यांचे छापील तक्ते देत असें. तो तक्ता पुढें दिला आहे. सुमारें शंभर अस्पृश्य लोकवस्त्या मी व स्वयंसेवक यांनीं मिळून पाहिल्या व त्यांचे

तक्ते तयार केले. अलीकडे अलीकडे प्रसिद्धीकरणाचा प्रघात फार वाढला आहे. तेव्हां तो इतकासा नव्हता. नाहींतर रोज एक याप्रमाणें तीन महिने-पर्यंत आम्हाला हे तक्ते प्रसिद्ध करतां आले असते.

माहितीचा तक्ता--

स्वयंसेवकाचें नांव व पत्ता:———————————————

———————चवकशीचें गांव———————ता.———————जि.———————

पुढील मुद्यांसंबंधीं माहिती गोळा करावी व हा माहितीतक्ता श्री. म. माटे, सदाशिव पेठ, पुणें या पत्त्यावर पाठवून द्यावा.

(१) जातीचें नांव, (२) शिरगणती, (३) हल्लींच्या जागीं वस्ती किती दिवस आहे, (४) परंपरागत धंदा, (५) आतांचा धंदा, (६) सरकारी नोकर किती व काय काम करितात, (७) म्युनिसिपॅलिटीकडे किती व काय काम करितात. (८) गांवकीचें उत्पन्न, (९) रोजच्या उत्पन्नाचें सरासरी प्रमाण, (१०) शेतकऱ्याशीं संबंध, (११) शिकण्याच्या वयाचीं मुलें किती, (१२) आधीं शिकलेले किती, (१३) गांवांतील शाळेंत घेतात काय, (१४) ख्रिस्ती मिशनऱ्याची शाळा आहे काय (१५) पूजा कोणच्या देवाची करतात (१६) वारकरी, भजनी किती, (१७) धर्मसंस्कार कोणचे पाळतात, (१८) कोण चालवितात, (१९) इतर अस्पृश्यांशीं रोटीबेटी होते काय, (२०) दारूचें व्यसन किती व केव्हांपासून फैलावलें, (२१) गुत्ता किती अंतरावर आहे, (२२) मक्तेदार कोणच्या जातीचा, (२३) पाण्याची सोय काय आहे, (२४) कोण कोण एकत्र भरतात, (२५) वाड-वडील कधीं लष्करांत होते काय, (२६) चोरीदरवडयाबद्दल कोणास शिक्षा झाली आहे काय, (२७) स्वच्छतेचें मान, (२८) सावकार कोण लोक आहेत, (२९) व्याजाचा दर काय, (३०) गांवकीच्या उत्पन्नासंबंधीं पाटील-शेतकऱ्यांशीं संवाद. (३१) स्त्रिया, मुलें, तरणे, म्हातारे यांशीं पृथक् संवाद.

अशा प्रकारें प्रत्यक्ष माहिती जमा केल्यामुळें, व्याख्यानांत आपण कांहीं अनुमानित बोलत आहोंत, अशी भीति मला वाटेनाशी झाली. सर्व मुद्दे व बांधलेलीं अनुमानें यांना भक्कम आधार असल्यामुळें व्याख्यानांतील माझ्या विधानांना एक तऱ्हेचा निर्भयपणा प्राप्त होणें स्वाभाविक होतें. इतर परिषदा

वगैरे कीं ज्यांची हकीगत यांत स्वतंत्रपणें येईल, त्या सोडून दिल्या तरी संधि सांपडेल तेव्हां परगांवीं जाऊन आपल्या कल्पनांचा प्रसार करण्याची पद्धति मी ठेविली होती. मी व्याख्यानें देतों हें पुष्कळांना माहीत झाल्यामुळें गणपतिउत्सवांत वगैरे अनेक ठिकाणाहून मला आमंत्रणें येऊं लागलीं. माझ्या नोकरीच्या कामाशीं, बाहेर व्याख्यानाचें जितकें जुळवून घेतां येईल तितकें घेऊन या आमंत्रणांचा स्वीकार करण्याचा प्रघात मी ठेविला. हे वाहेर गांवचे उत्सव करणारे लोक, भाडयाची व्यवस्था करीत असल्यामुळें फिरण्याच्या कामीं पडणारा माझ्यावरचा बोजा पुष्कळच कमी झाला. अस्पृश्यता–निवारणाच्या जोडीला, इतर अनेक सामाजिक विषयांचें व वाङमय–शाखांचें थोडें बहुत अध्ययन माझ्या वुद्धीप्रमाणें मी करीत असल्यामुळें या उत्तरोक्त विषयावर बोलण्यासाठीं सुद्धां मला लोक पुष्कळदां बोलवितात. पण या विषयावर बोलतांनाही, विचारांत असंगति उत्पन्न न करतां, जेथें जेथें अस्पृश्यता–निवारणाचा विषय आणितां येईल तेथें तेथें तो आणण्याची माझी पद्धति आहे. यामुळें बोलविणारांचेंहि काम होतें व आपलाहि विषय प्रतिपादल्यासारखें होतें. या पद्धतीस अनुसरून नगर, सोलापूर, सातारा, वांई, मिरज, कऱ्हाड, इस्लामपूर, मुंबई, विलेपार्ले, दादर, ठाणें, गुलवर्गा, औरंगाबाद, धारवाड, मडगांव, वसई, दौड इत्यादि ठिकाणीं मी हिंडून आलों आहे. मुख्यतः वाई व ब्राह्मण–सभा मुंबई हीं जीं पुण्याबाहेरचीं दोन विचारी लोकांचीं ठाणीं तेथें अस्पृश्यता-निवारणाच्या चळवळींत व कल्पनांत पडत असलेल्या फरकांचे आढावे मी वेळोवेळीं घेतलेले आहेत. खुद्द पुणें शहरीं तर या विषयावर आमचा अखंड पहारा आहे हें सांगणें नकोच. पण हें दौऱ्याचें प्रकरण संपविण्यापूर्वी बाहेरच्या दोन गांवांचा उल्लेख करणें प्रशस्त होईल. मिरजेला गेलों असतां गांवांतच पाण्याची इतकी हलाखी पाहून, अस्पृश्य लोकांचें कसें होत असेल याची कल्पना मला आली व म्हणून त्यांच्या आळींतून विचारपूस करून आलों. एका महार गृहस्थानें मला सांगितलें कीं, आपले हाल सांगवत नाहींत. गांवांत जर कांहीं थोडें बहुत पाणी असलें तर तें सर्व "उत्तम" लोक घेतात. "उत्तम" याचा त्यानें स्पृश्य लोक असा अर्थ वसविला आहे असें दिसतें. गुलबर्गा मुक्कामीं पहिल्याच खेपेला अस्पृश्यता–निवारणावर माझीं दोन व्याख्यानें झालीं व रात्रीं महारवाडयांतहि व्याख्यान झालें. तेथें एक

वृद्ध गृहस्थ ही चळवळ चांगली मनापासून करीत असतात व त्यांचें अस्पृश्य लोकांत वजनहि चांगलें दिसलें. पुन्हा आणखी एकदां मी गुलबर्ग्यास गेलोंच होतों. दोन्हीं खेपेस अस्पृश्यांच्या संबंधानें फार काळजी वाटण्यासारखी जी एक हकीकत मला कळली तिच्याकडे तेथील लोकांनीं फारच लक्ष द्यावयास हवें. अस्पृश्य लोकांत दारूचें व्यसन जोरानें फैलावलेलें असून मुसलमान समाजांतील गुंड लोक या समाजावर जोराचें आक्रमण करीत आहेत व स्त्रियांना फुसलावण्याचेहि ते सारखे प्रयत्न करीत आहेत.

मतप्रसाराचें कार्य—

आम्हांस प्रतिपादनाचें काम अव्याहत करणें जरूर होतें. त्याचा मुख्य उद्देश जरी मतप्रसार हा असला तरी स्वयंसेवक मिळविणें हाही एक गौण हेतु होता. शाळेंत ज्या मुलांना मी शिकवीत असें त्यांना तर प्रसंग साधून अस्पृश्यता–निवारणाचें महत्त्व मी पटवीत असें; पण इतर जेथें जेथें प्रसंग उत्पन्न होईल किंवा करतां येईल तेथें तेथें तो साधण्याची खबरदारी मी घेत असें. शाळेंतून पास झालेले व कॉलेजांत गेलेले ओळखीचे विद्यार्थी आपापल्या गटांत मला बोलवीत असत; कॉलेजांतून पूर्वी निरनिराळीं जिल्हामंडळें असत. त्या प्रत्येकापुढें माझें केव्हां ना केव्हां प्रवचन झालेलें आहे. मंडळांत सभासद मोजकेच असल्यामुळें प्रश्नोत्तररूपानें सुद्धां विषयाचा ऊहापोह चांगला होई. हीं प्रवचनें या मंडळांच्यापुढें मी एकेकदांच केलीं असेंही नाहीं. याशिवाय कॉलेजांतील डिबेटिंग क्लब, निरनिराळीं असोसिएशन्स, वाङ्मयमंडळें इत्यादींच्या पुढेंही हें प्रवचनाचें काम चालतच असे. एतावता जितक्या प्रबुद्ध विद्यार्थ्यांच्या कानावर हा विषय जितक्या वेळां घालतां येण्याजोगा होता तितक्या वेळां घालण्यास मी कधींच कसूर केली नाहीं. माझ्या घरींही आलेल्या, एका विद्यार्थ्यापासून तों सभांतील हजारों विद्यार्थ्यांपर्यंत श्रोत्यांची संख्या कधींही लक्षांत न घेतां, कालानुक्रमानें माझ्या ज्ञानांत जशीजशी भर पडत गेली त्या सर्व भरीसह, बोलण्याचा माझा प्रघात होता. गांवांतील तिठ्यावरचीं व्याख्यानें हीं निराळीं. अस्पृश्यता-निवारणासंबंधाचा कोणताही बारीकसारीक सुद्धां विशेष प्रश्न उपस्थित झाला असतांना त्याचें माझ्या दृष्टीनें सोपपत्तिक विवेचन करण्याचा मी

कोणताही प्रसंग सहसा सोडलेला नाहीं. गाडीतळ, डी. सी. मिशन, अस्पृश्यांचें सरकारी बोर्डिंग, सेवासदन, पुरुषांचें ट्रेनिंग कॉलेज, डेक्कन, फर्ग्युसन, इत्यादि कॉलेजें, अनाथ बालिकाश्रम, एरंडवण्याचें स्त्रियांचें कॉलेज, चार बावडी, मेडिकल स्कूल, फीमेल हायस्कूल, न्यू इंग्लिश स्कूल बोर्डिंग, निरनिराळीं हायस्कुलें इत्यादि सर्व ठिकाणी, प्रसंग आले ते ते घेऊन या विषयाचा मत-प्रसार मी केलेला आहे. यूथलीगपुढें व रा. दाणी यांच्या हिंदू मठापुढेंही माझीं अनेक व्याख्यानें झालीं आहेत.

अस्पृष्ट समाजांतील प्रचारक—

अस्पृश्यता-निवारणाच्या बाबतींत लोकशिक्षणाच्या दृष्टीनें व मत-परिवर्तन घडवून आणण्याचा हेतु धरून केलेली खटपट फारच अल्प झाली आहे. व जी झाली आहे तिच्यांतील बहुतेक स्पृश्य समाजांतील माणसांनीं केलेली आहे. अस्पृश्यता-निवारण्याच्या बाबतीत स्पृश्य व अस्पृश्य या दोनहि समाजांनीं कांहीं गोष्टी टाकल्या व घेतल्या पाहिजेत हें मत विवाद्य कोटींत सांपडण्यासारखें आहे असें वाटत नाहीं. अर्थात् दोनही समाजांचीं एतद्विषयक कर्तव्यें काय आहेत हें उभय समाजांतील सुबुद्ध वक्त्यांनीं सर्वांस पटविलें पाहिजे. अन्यायामुळें उत्पन्न झालेला चिडीचा पहिला जोर उतरल्या-नंतर विचाराच्या देवघेवीचा व उभयपक्षांच्या विचाराच्या तडजोडीचा काळ सुरू होतो. अशा वेळींच वर सांगितलेल्या मतपरिवर्तनासाठीं सारखे कष्ट करण्याची आवश्यकता जास्त भासूं लागते. स्पृश्य वक्त्यांनीं हें काम करावयास हवेंच हवें. पण त्याहीपेक्षां आपली बाजू स्पृश्य समाजापुढें विवेचक बुद्धीनें मांडून त्यांच्या सदसद्विचारास, सात्त्विक धर्मबुद्धीस व देशाभिमानास आवाहन करण्याचें काम अस्पृश्य समाजांतील वक्त्यांनी पत्करिलें पाहिजे. या कामास लागणारे निरीक्षक, तत्त्वानें कडकडीत, पण विचाराचा मिलाफ करून घेण्यांत कसबी असे वक्ते अस्पृश्य समाजांतून देशभर फिरावयास हवे. असे वक्ते त्यांच्यांत कोणी असतीलहि. परंतु साधनांच्या अभावीं किंवा कांहीं अन्य कारणास्तव हा कार्यभाग त्यांस शिरावर घेतां येत नसावा.

ही त्यांची अडचण ओळखून आमच्या अस्पृश्यता-निवारक मंडळानें मातंग समाजांत जागृति करण्यासाठीं व स्पृश्य समाजापुढें त्यांचें गाऱ्हाणें सांगण्या-

साठीं बाबूराव वायदंडे व सकट या मातंग पुढाऱ्यांस महाराष्ट्रांत संचारासाठीं धाडिलें होतें. त्यांनीं खानदेश, नाशिक, नगर, पुणें, सातारा व सोलापूर या सहा जिल्ह्यांत बराचसा प्रवास केला. ज्या गांवीं जावयाचें असेल तेथें आपल्या येण्याची वर्दी आगाऊ पोंचवून भोंवतालच्या खेड्या-पाड्यांतून लोकांस बोलावून आणण्याची व बाजाराचे दिवस गांठून तेथें सहजच जमलेल्या अनेक गांवच्या लोकांची भेट घेण्याची पद्धत त्यांनीं ठेवलेली होती. त्यामुळें ज्या सुमारें शंभर गांवांस ते प्रत्यक्ष गेले तेथेंच त्यांच्या प्रतिपादनाचा उपयोग झाला असें नसून प्रत्येक गांवच्या भोंवतालच्या पांच-सहा गांवांतसुद्धां हें काम घडून आलें. प्रत्येक गांवीं जाऊन मातंग समाजापुढें समाजस्थितीचा पाढा वाचावा, स्पृश्य समाजापुढें सार्वजनिक व्याख्यान द्यावें, स्वकीयांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीची पाहाणी करावी. तक्रारी टिपून घ्याव्या, पुढारी लोकांशीं परिचय करून घेऊन विद्यार्थ्यांस उद्‌बोधक असें बोलावें, असा त्यांचा क्रम असे. स्पृश्य समाजानें अस्पृश्यांच्या बाबतींत काय काय करावयास हवें हें त्यांनीं स्पष्टपणें पण संभावित रीतीनें त्यांस बजावून सांगितलें. त्याबरोबरच स्वकीयांपुढें आपलीं वैगुण्यें कोणतीं व तीं कशीं काढावीं याचेंहि विवेचन त्यांनीं निर्भयतेनें केलें. या दोघा प्रचारकांकडून मंडळाकडे ठिकठिकाणांहून जे विस्तृत अहवाल आले त्यांतून कांहीं वेचक गोष्टी लोकशिक्षणाच्या दृष्टीनें वाचकांपुढें मांडतों.

या दौऱ्यामुळें एकंदर मातंग मंडळीस फार आनंद झाला, व त्यांनीं आपल्या चित्ताची तळमळ निरनिराळ्या तऱ्हांनीं बोलून दाखविली. एक वक्ता आपल्यालाच शिव्याशाप घेऊन आणि आपण अजून कसे जागे होत नाहीं याबद्दल खंत मानून आवेशानें उद्‌गारला, "आम्ही डुकराच्या पिलासारखे आहों. तुम्ही आम्हांस आज धुतलेंत तरी उद्यां पुनः खातेऱ्यांत लोळणार!" मतलब इतकाच कीं, हें नवविचारांचें संस्करण सारखें व्हावयास हवें. दुसऱ्यानें कबुली दिली कीं, मी तुमचा विरोधक होतों. पण मी नुसता सणासुधीला बोलतों व चळवळ करतों. पण तुम्ही अखंड तेंच काम करीत राहतां, यामुळें मी तुमच्याशीं विरोध करावयाचें टाकून देतों. तिसऱ्यानें आर्जवानें सांगितलें कीं, आपण एकमेक कोणाशीं विरोध करूं नये, समाजोद्धाराची ही खंडोबाची तळी सर्वांनीं मिळून उचलावयास हवी. आणखी एक म्हणाला,

"आपण इतरांस शिव्या दिल्यानें शहाणे होऊं असें नाहीं. आपल्यांतच ब्राह्मण उत्पन्न करा". पांचवा अधीरपणें म्हणाला, "स्पृश्यांच्या सहानुभूतीवर माझा विश्वास नाहीं." पुढें कोणी एक म्हणाला, "हया तुमच्या चळवळी म्हणजे गवताचा जाळ होय. त्या लवकर विझतात व त्यामुळें पुरेशी धग उत्पन्न होत नाहीं." दुसरा एक अभिमानानें म्हणाला, "आम्ही मांग म्हणजे हिरे आहोंत. पण काय करावें, सांदाडिला पडलों आहों." एक वृद्ध गृहस्थ भरतें येऊन म्हणाला, "बाबा आपल्या जातीचें वरें व्हावें म्हणून हिंडणारा आज जरी तूं एकटा आहेस, तरी देवाच्या दयेनें दहा-पांच वर्षांत तुझ्यासारखे पांच पन्नास जण उत्पन्न होतील असा माझा आशीर्वाद आहे" खरोखर वरील सर्व उद्‌गारांचा हिंदु समाजानें, अनेक पक्षीयांनीं व प्रचारकांनीं फार खोल विचार करावयास हवा. हें जसें अस्पृश्यांच्या अभिप्रायांतील वेंचे बोधप्रद वाटतील तसेच स्पृश्यांचे अभिप्रायसुद्धां चळवळीचें धोरण ठरविण्यास मार्गदर्शक होतील. प्रचारकांचें भाषण ऐकून मला परस्पर कांहीं गृहस्थांनीं लिहिलें कीं, आलेले प्रचारक फार समतोल बुद्धीचे व हितकारक असे शब्द बोलले. येत्या गणपत्युत्सवांत त्यांना आम्ही मुद्दाम निमंत्रण देऊं. दुसऱ्या एके ठिकाणीं एक सरदार प्रचारकांस म्हणाले, "तुम्ही भाषण सडेतोड पण अतिशय सभ्य केलें. मी तृप्त झालों. तुम्ही आमच्या घाटावर पाणी भरा." तिसरा एकजण म्हणाला, "हा दिवस आम्ही अतःपर सोन्याचा समजूं." चौथ्यानें आनंद मानला कीं, वक्ते वर्गणीवाज नाहींत ! पांचव्यानें आग्रह केला कीं, आपण येथें जास्त दिवस राहा. पुढें एके ठिकाणीं एकानें अलंकार केला कीं, "आपण धोबी आहां. समाजाचे दोष धुण्याचें हें काम आपण फार उत्तम केलें." एकजण संतुष्ट होत्साता म्हणाला, "खरोखर या हिंदु समाजाचें पाप संपत आलें आहे, म्हणून अशा प्रकारचे प्रचारक फिरूं लागले" असो. हे निरनिराळ्या ठिकाणच्या स्पृश्य लोकांचे या प्रचारकांसंबंधानें अभिप्रायहि वरीलप्रमाणेंच बोधप्रद आहेत.

या दौऱ्यांत मातंगसमाजाच्या ज्या तक्रारी ऐकावयास आल्या त्यांत पाण्याचें दुर्भिक्ष ही सार्वत्रिक तक्रार होय. पण त्यांतहि बारीक तपशील, मोठा तपशील मननीय आहे. पाणी मिळत नाहीं किंवा मिळालें तर फार कष्टानें अशीं गांवें तर शेंकडों आहेत. पण एके ठिकाणीं 'स्पृश्य' लोक गांवां-

तून नदीकडे जाऊं देत नाहींत हें आश्चर्य आहे! तसेंच सुधारणेनें चालणारांस गांव पाणी बंद करतें हाहि विचित्र न्याय होय. एके ठिकाणीं लोक नदीचें पाणी पितात, पण म्युनिसिपालिटी त्यांजकडून पाणीपट्टी घेते! ही पद्धत त्यांस अत्यंत जाचक वाटते. एके ठिकाणीं नगररचनेची बाधा त्यांच्या वस्ती-ला पुनः पुनः होत आहे अशी तक्रार आहे. तिसऱ्या एके ठिकाणीं त्यांच्या मोफत शाळेजवळ मटनमार्केट आहे तें त्यांस बिलकूल खपत नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे!

अन्नाची हलाखी सर्वत्र आहे. धंदा नसल्यामुळें लोक हवालदील असून 'सुधरा सुधरा म्हणतां पण आधीं पोटाला देण्याची व्यवस्था करा' हा आक्रोश सार्वत्रिक आहे. चळवळीच्या आधुनिक साधनांची व वर्तमानपत्रांची ओळख नसल्यामुळें आपली दारिद्र्याची हांक सरकारच्या कानापर्यंत जोरानें कशी न्यावी हें त्यास माहीत नाहीं. त्यांचा धंदा व आर्थिक स्थिति यांविषयीं मी मागें लिहिलेलें असल्यामुळें त्याची येथें पुनरावृत्ति करीत नाहीं. तूर्त इतकेंच सांगतों कीं, प्रचारकांना भिकेचा वणवा आपल्या लोकांत सगळी-कडे पेटत चाललेला दिसला. धर्मान्तराविषयींहि थोडेसें लिहावयास हवें. दोनहि प्रचारकांनीं मातंगांनीं ख्रिस्ती किंवा मुसलमान होऊं नये असा सक्त उपदेश सर्वत्र केला. त्यामुळें नेटिव्ह ख्रिस्त्यांच्या पोटांत मोठी काळजी उत्पन्न झाली व त्यांच्यापैकीं कित्येक त्यांस भेटावयास येऊन कांहीं गुळमट-पणाच्या भाषा बोलूं लागले. एकानें तर असा कांगावा केला कीं, हे अस्पृश्य लोक मोठे वाईट आहेत. यांना तुम्ही शिकवूं नका. हें तुमच्यावरच उलटतील. हेतु हा कीं, ग्रामस्थ मातंगांच्या कानावर ख्रिस्ती धर्माच्या विरुद्ध असें कांहीं पडूं नये. नगर जिल्ह्यांत एका सबंध मांगवाड्याचें नांव बदलून ख्रिस्तवाडा असें त्याचें नांव ठेवण्यांत आलें आहे. कांहीं ख्रिस्ती मांगांनीं असें विधान केलें कीं, तुम्ही ही सुधारणेची भाषा बोलावयास लागा, आम्ही जवळच आहों. गोविक्रय, मेलेलें मांस न खाणें, दारुची बन्दी इत्यादि विषयांवर प्रचारकांनीं बराच भर दिला.

प्रचारांतील निरनिराळे अनुभव—

रा. बाबूराव बायदंडे यांनीं हें प्रचाराचें काम फार मेहनतपुरस्सर केलें.

खालीं दिलेल्या सर्व गांवांत प्रचाराचे वेळीं काय काय झालें व दिसून आलें, याची सर्व हकीकत श्री. बाबूराव वायदंडे यांनीं लिहून मंडळाकडे पाठविली. ती फार विस्तारपूर्वक लिहिलेली असल्यामुळें देतां येण्याजोगी नाही. पण प्रत्येक गांवांतील हकीकतींतून कांहीं शेलका भाग उचलतां येतो. त्यावरून प्रतिपादकाचें धोरण,देवालय-प्रवेशाचा प्रश्न,कामाची पद्धति, अस्पृष्टांच्या पोटापाण्याचा प्रश्न, रोगट धर्मसमजुती, इतर धर्मीयांचें आक्रमण, आहाराचा अपवित्रपणा, शाळा-प्रवेश इ. संबंधाचे बारीक बारीक शेरेवजा पण मोठा सूचक मजकूर या रिपोर्टात सांपडतो. तीं तीं वाक्यें कोणच्या गांवचे लोक बोलले हें सांगण्यापासून फायद्यापेक्षां नुकसानच जास्त होतें. अर्थात् नवीं भांडणें सुरू करण्याचा आमचा मानस नसल्यामुळें गांवांचीं किंवा व्यक्तींचीं नांवें लिहीत नाहीं. अहमदनगर, संगमनेर, राहुरी, श्रीगोंदे, कर्जत, खर्डे, शेवगांव, नेवासे, डोंगरगड, कोपरगांव, पुणतांबे, पारनेर, ह्या नगर जिल्ह्यांतील गांवीं; जुन्नर, नारायणगांव, मंचर, खेड, चाकण, लोणी, पाटस, इंदापूर, बारामती, निरापूल, तळेगांव-ढमढेरे, भोर, सासवड, तळेगांव दाभाडे, या पुणें जिल्ह्यांतील गांवीं; येवलें, मनमाड, नांदगांव, बाणगांव, टाकळी बुद्रुक, नाशिक, विहितगांव, इगतपुरी या नाशिक जिल्ह्यांतील गांवीं; तासगांव, विसापूर, विटे, बलवडी, पलूस, अळसुदे, तारगांव, रहिमतपूर, कोरेगांव, सातारा, पाडळी, देऊर, वाठार, वाल्हे, लोणंद, फुरसुंगी, या सातारा व पुणें जिल्ह्यांतील गांवीं; नांद्रें, कुपवाड मिरज, कवठे, डिग्रस, कागवाड, आगर, येड्रूर, गणेशवाडी, शिरोळे, हात-कणंगले, तारदाळ, आळते, कोडोली, कोंगल, पन्हाळा, कोल्हापूर, हलें, नेज, कुंभोज, या दक्षिण महाराष्ट्रांतील गांवीं; नागपूर, चांदूर, यवतमाळ, धामण-गांव, अमरावती, मलकापूर, अकोला, बोदवड, भुसावळ, चाळिसगांव, या खानदेश, वऱ्हाड व मध्यप्रांतांकडील गांवीं; व पुनः सातारा जिल्ह्यांतील नेलें, शिरोळें, अष्टें, चिकुर्डे, भांगले, अंकलकोप, भिलवडी, रेठरे, इत्यादि लहानमोठ्या गांवीं श्री. वायदंडे हे हिंडून आले. दौऱ्याच्या प्रसंगीं अस्पृष्टांपुढें व स्पृश्यांपुढें मतप्रतिपादन, खाजगी संभाषणें व सामाजिक स्थितीचें अवलोकन करणें असें त्यांचें धोरण असे. मांग लोक मुसलमानांच्या ताबुतांत नाचावयास गेले, म्हणून एके ठिकाणचे स्पृश्य लोक फारच खवळून गेलेले दिसले; दुसऱ्या ठिकाणचे कोणी म्हणाले, मुसलमानापेक्षां अस्पृश्य आम्हांला

अधिक जवळ, कारण ते मूर्तींचें रक्षण करतात, प्रचारकाचें म्हणणें शांतपणें ऐकून घेऊन एक गांव–पुढारी गंभीरपणानें म्हणाला, कीं, तुम्हीं कांहीं म्हणा, पण असला एकंकार करणें अगदीं लज्जास्पद आहे; व्यवहारांत सांपडलेला एक धोरणी माणूस म्हणाला कीं, शहरांत असलों म्हणजे मी सुधारक असतों आणि गांवीं आलों कीं जुन्यासारखा वागतों; दुसरा म्हणाला कीं, आम्हांकडे कांहीं नाहीं, शहरांत घडेल त्याची नक्कल करूं. एका गांवच्या मांगांनीं मोठ्या खुषीनें सांगितलें कीं आम्ही बँड वाजवितों व गांवचे तालेवार लोकसुद्धां या कामाचा विडा आम्हांस देतात; दुसऱ्या एके ठिकाणीं तक्रार आली कीं, आमच्या गांवचे मांग लोक कसाबाशीं गाईची दलाली करतात; कोणी शाबासकी दिली कीं, तुमच्यासारखे प्रचारक सारखे फिरले तरच उपयोग आहे; कोणी कबुली दिली कीं, सत्याग्रहासंबंधानें वर्तमानपत्रें वाचून आम्हांस भोपटकर व माटे हे जगूं नयेत असें वाटूं लागलें होतें, पण आतां समजूत पटली. कोठें असें दिसलें कीं स्पृश्य लोकांनीं पदरखर्चानें अस्पृष्टांना बँडचा घंदा काढून दिला आहे. प्रचारकांस कोणी कोणी विनविलें कीं, प्रत्येक गांवीं निदान चार दिवस तरी मुक्काम करीत जा; एके गांवीं स्पृश्यांनीं अस्पृष्टांची वरात आडवून धरली अशी तक्रार ऐकूं आली; कोठें स्पृश्यांनीं बजाविलें कीं अस्पृष्टांच्या नवीन धोरणानें लोकांत सहानुभूति कमी होईल; अस्पृष्ट हे सरकार-पक्षाचे म्हणून त्यांच्यावर बहिष्कार घातला पाहिजे, असें कोणी रागावून बोलत; कोणी अस्पृष्टांनीं प्रतिपादिलें कीं, काँग्रेसच्या चळवळींत आपण पडलें पाहिजे कारण कीं त्यानें आपल्याविषयीं सहानुभूति उत्पन्न होईल. कोणी कदरून सांगितलें कीं, आमचें आम्हांस रडावयास पुष्कळ आहे, गांधींच्या मोहिमेबरोबर भाड्यानें रडूं नये. तात्पर्य या चळवळीच्या धोरणासंबंधानें कोठें कांहीं कोठें कांहीं ध्यानांत राहण्यासारखे व विचारांत घेण्यासारखें कसें बोललें जातें हें वरील सुटचा वाक्यांवरून सुद्धां दिसून येईल. एके ठिकाणचे पोकळ वासे झालेले पण बडचा घरांत राहणारे सरदार मोठा अंमलदारीचा आव आणून म्हणाले, "हें अस्पृश्यता-निवारकमंडळ एवढें कोण आहे, यानें काय केलें आहे?" कोठें ख्रिस्ती मिशनरी म्हणाले, मंडळाची ही पद्धति फार स्तुत्य आहे; एके गांवीं एक वृद्ध सनातनी प्रचारकास म्हणाले, तुम्ही फार चांगलें बोलतां, माझ्यासारख्या माणसाला सुद्धां समजेल व पटेल असें तुम्ही

बोलतां; एक देवभक्त अस्पृष्ट म्हणाला, आमचा उदयकाल जवळ येत चालला म्हणून ही लीन वृत्ति तुम्हीं स्वीकारली. एका वकिलांनीं प्रचारकांस वर बोलावून नेलें, बिछायतीवर बसविलें व सर्व गोष्टी समजावून सांगून, आपण म्हणतां तसें आम्ही आजच वागलों तर शेणमार चालू होईल, असें कळवळ्यानें सांगितलें; एक सनातनी गुरकावून म्हणाला, अशीं व्याख्यानें देऊन आपली पायरी सोडतां काय? एक वृद्ध ब्राह्मण पेन्शनर म्हणाला, ज्याच्या हातीं जोडा, त्याला हक्क मिळतात. दुसऱ्या एका वकिलानें गंभीरपणें सांगितलें, मी या कामांत लक्ष घालीत नाहीं. एका क्षेत्रस्थ असहकारितावाद्यानें रागा-रागानें सांगितलें, तुमच्या त्या माटयांना आमच्यासमोर उभे करा, आम्ही त्यांचा वादांत पराभव करूं, त्यांनीं सनातनी लोकांचे सोटे आवरून धरावे. याप्रमाणें मंडळाविषयीं आपले रागलोभ कोणी कोणी व्यक्त केले.

देवळाच्या बाबतींत प्रचारकास आलेला अनुभव अत्यंत उद्वेगकारक आहे व त्यावरून यथार्थ कल्पनेचा प्रसार करण्याची किती आवश्यकता आहे, हें चांगलें ध्यानांत येतें.....बोवांच्या देवळांतील पुजाऱ्याची मुलगी सुद्धां आपणास कसें टाकून बोलली याचें वर्णन प्रचारकानें केलें आहे तें फार दुःख-कारक आहे. अस्पृश्यत्व खेडेगांवांत इतकें जारी आहे कीं, 'पाणी वाढल्यानें सुद्धां भ्रष्टता येते इतका कोता विचार लोक अजन बाळगून आहेत, मग देवळांचें काय पुसावें?' एक जण उर्मटपणानें म्हणाला, 'त्यांना देवळाकडे येऊं तर द्या म्हणजे काय होतें तें दिसेल.' दुसऱ्या एका भगवद्भक्तानें सांगितलें, आम्ही नास्तिक बनावें म्हणतां? देवाला जर विटाळ झाला तर त्याचेंसुद्धां पावनत्व जातें हें तुम्हांस माहीत नाहीं का ? हीं वचनें ऐकून प्रचारक म्हणाले अहो, पुण्यामुंबईचे सुशिक्षित लोक अस्पृष्टांना देवदर्शन घेऊं द्यावें असें म्हण-तात. यावर तो उद्गारला, त्या तुमच्या सुशिक्षितांवर आमचा मुळींच विश्वास नाहीं ! एका फकीरवजा हिंदु साधूच्या मठाच्या जोत्यास आपण टेकून बसलों म्हणून एका तांबोळ्यानें आपल्याला काय अनन्वित शिव्या दिल्या त्याचेंहि वर्णन प्रचारकानें फार गहिंवरून केलें आहे.

अस्पृष्ट समाजाला अमूक हक्क द्या, तमूक हक्क द्या, असें स्पृश्य लोकांपुढें बोलत असतांना खुद्द अस्पृश्यांच्या चाली रीती, स्वच्छता इत्यादिकांची

जाणीव प्रचारकांना असतेच असते. आमच्या मंडळाच्या कार्यप्रचाराच्या पद्धतीची ही एक ठराविक गोष्ट आहे कीं, अस्पृष्टांची स्थिति सुधारावयास स्पृश्यांनीं काय केलें पाहिजे हें त्यांस सांगावें, व अस्पृष्टांपुढें बोलतांना स्वतःची स्थिति सुधारण्यासाठीं व इतर समाजांत प्रविष्ट होण्यासाठीं स्वतः त्यांनीं काय काय करणें जरूर आहे हें त्यांसहि सांगावें. हें करीत असतां एके ठिकाणचे अस्पृष्ट म्हणाले, 'अहो सुधारा म्हणतां, पण पोटाचे हाल होत आहेत, धंदा नाहीं, पोटाला नाहीं, भलतें सलतें खाऊन आंतडीं वाटलीं आहेत, कांहीं धंदा द्याल कां? पडें खाणें सोडावें म्हणतां, पण बकरीच्या मांसाला पैसे पडतात.' खरोखर अस्पृष्टविषयक किती तरी चळवळीचे उगम या थोड्याशा उद्गारांतून होत आहेत असें दिसतें. स्वकीयांची हवालदिल स्थिति पाहून प्रचारकाचें मन अगदीं गोंधळून गेलें. या लोकांच्या अंगीं जी काय थोडीशी माणुसकी दिसते, तिचें श्रेय कांहीं कांहीं ठिकाणीं तरी, केवळ ख्रिस्ती मिशनऱ्यांना आहे, असें त्यांनीं स्पष्ट लिहिलें आहे. मांग लोक ज्या रेडे–जत्रा भरवितात व तेथें ज्या कांहीं भेसूर कत्तली चालतात त्या पाहून या लोकांना सद्धर्मकल्पना कोण देणार, यांचा वाली कोण? असें त्यांचे अतिशय कळवळ्याचे उद्गार आहेत. केवळ एका लहानशा मकाणांत ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं सुमारे तीन हजार लोक ख्रिस्ती केलेले पाहून स्वकीयांचा नादानपणा व परकीयांची उद्यमशीलता माझ्या चांगली ध्यानांत आली, असें त्यांनीं लिहिलें आहे. डिप्रेस्ड् लोकांनीं राजकीय चळवळीकडे वळूं नये म्हणून मात्र नेटिव्ह ख्रिस्ती मिशनरी अज्ञ लोकांना काय वाटेल तें सांगत असतात असें दिसतें. त्यांच्या सांगण्याचें तात्पर्य हेंच आहे कीं, स्वराज्याची चळवळ खोटी आहे, पुनः गळ्यांत गाडगें परत येईल, हें ध्यानांत ठेवा. अस्पृश्यता गेल्याशिवाय सरकारानें स्वराज्य देऊं नये, ती घालवावयास धर्मांतरच केलें पाहिजे, व तें करवावयास आम्ही उभेच आहोंत! शाळांतून मात्र अस्पृश्यता झपाट्यानें जात चालली आहे.

पंडित–परिषद्—

महाराष्ट्रांतील शास्त्री–पंडितांचें मत आपल्या या प्रयत्नांना अनुकूल असावें अशी माझी पहिल्यापासून इच्छा आहे. त्यांच्या संबंधानें अवहेलनेचे

शब्द बोलण्याची पुष्कळांची वहिवाट आहे. पण मी हें कधींहि केलेलें नाहीं; उलट त्यांचा आश्रय आपल्या कामाला प्राप्त करून घेतां आला तर त्यानें आपलें यश सुलभ होईल अशीच माझी पहिल्यापासून कल्पना आहे. त्यांच्या-पुढें हा प्रश्न एकदां मांडावा व त्यांच्याशीं हा प्रश्न सोडविण्याविषयींची चर्चा करावी या विचारानें आम्ही पंडित परिषद भरविण्याचें ठरविलें. पुणें येथें वेदांत-वागीश श्रीधरशास्त्री पाठक, महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री अभ्यंकर, फडकेशास्त्री, विष्णुशास्त्री वापट, गोडबोलेशास्त्री इत्यादि सात आठ निरनिराळ्या शास्त्रीमंडळीकडे जाऊन या विषयाचा ऊहापोह केला व परिषदेस आपण यावें अशी त्यांस विनंति केली. पुढें वांईस जाऊन प्राज्ञ-पाठशाळेच्या चालक शास्त्रीमंडळीस तीच विनंति केली. पुढें साताऱ्यास जाऊन गजेंद्रगडकरशास्त्री, रघुनाथशास्त्री अभ्यंकर, इत्यादिकांच्या गांठी घेतल्या. वांईची मंडळी परिषदेस जरी येतील असें दिसलें नाहीं तरी पहिल्या-पासूनच ती या प्रश्नाकडे सानुकूलतेनें पाहणारी होती. सातारच्या मंडळींनीं अनुकूलता दर्शविली नाहीं. अर्थात् परिषदेस येण्यासहि ती नाकबूलच होती. पण ही मंडळी जरी आली नाहींत तरी पुण्याचे शास्त्रीपंडित तरी एकत्र आणावे यासाठीं परत येऊन पुन्हां खटपट केली व होतां होतां त्रिवक-राव आवटे यांच्या हॉलमध्यें शेवटीं सभा भरली. सभेला वासुदेवशास्त्री आलेच नाहींत. बाकी सात आठ मंडळी आली व चर्चाहि 'शास्त्रात् प्रवृत्ति' व 'शास्त्रात् निवृत्ति' याच पद्धतीनें कां होईना पण मोठी बोधप्रद झाली. त्यांच्याकडून जुन्या शास्त्रीय पठडीचे विचार व शास्त्रवचनें मला माहीत झालीं व जगांतील नवीन विचार काय आहेत ते मला त्यांच्या कानांवर घालतां आले. यातायातीच्या मानानें यांतून प्रत्यक्ष असें कांहींच निघालें नाहीं. पण समाजाच्या सर्व थरांत या विषयाचा विचार खेळता ठेवण्यास असल्या प्रयत्नांचाहि उपयोग होतोच होतो.

अस्पृश्यांच्या परिषदा—

शाळांचें काम म्युनिसिपालिटीच्या हवालीं करून त्या रोजच्या दगदगीं-तून मी मोकळा झाल्यानंतर सभा, परिषदा इत्यादि जीं मतप्रसाराचीं साधनें त्यांचा उपयोग करून घेण्याच्या मार्गें मी अधिक जोरानें लागलों. " बोलणें

पुष्कळ झालें, कांहीं करावयास हवें " असें म्हणून बोलणारांना हिणविण्याचा कांहीं कुत्सितांचा नेहमीचाच प्रघात असतो; पण मतप्रसार हा नेहमीं बोलण्यानें, चर्चेनें व विचाराच्या देवघेवीनें होतो आणि म्हणून ज्याला ज्याला एकादें मत पसरावयाचें असेल त्यानें प्रतिपादनाचा झपाटा ठेवला पाहिजे असें माझें मत आहे; व तो ठेवला असतां मतप्रसार होतो असा माझा अनुभव आहे. बोलणें व मतप्रसार करणें ही एक क्रियाच आहे, हें "क्रिया करावी" असें म्हणणाऱ्यांच्या ध्यानांत येत नाहीं. मतप्रसार खूप झाला आणि लोकांत तें मत ग्राह्य झालें म्हणजे केलेल्या क्रियेला मान्यता मिळून तिला कायमची प्रतिष्ठा प्राप्त होते. नाहींतर ती क्रिया एकाद्या पाखंडी माणसाचें बेजबाबदार कृत्य या नांवानेंच मोडतें. म्हणून मतप्रसारासाठीं आपली जिव्हा जितकी शिणवितां येणें शक्य आहे तितकी शिणविण्याची शिकस्त मजकडून झाली आहे असें म्हणण्यास मला आनंद वाटतो. पण या बोलण्याच्या जोडीला लिहिण्याचें कामही मी केलें. 'केसरी' पत्रांतून १९२२ सालापासून तों तहत आतांपर्यंत मी अनेक लेख लिहिलेले आहेत व त्यानें आमची जी कांहीं एक विचाराची पद्धति आहे तिचा प्रसार होण्यास पुष्कळच मदत झालेली आहे. हें वर दिलेलें मतप्रसाराचें काम स्पृश्य लोकांपुरतें झालें. अस्पृश्य लोकांत चांगल्या कल्पना पसरविण्याचें काम याबरोबरच करीत आलों आहें. त्यांच्यापुढें सांगावयाचे विचार अगदीं साधे व साध्या भाषेंत सांगितलेले असेच असत. पण मतप्रसार करीत असतांना सुद्धां कोठें तरी मताला ठळकपणें परिस्फुटता यावी व सामुदायिक मत म्हणून त्या मताला मान्यता मिळावी यासाठीं परिषदांची जरूरी असते. अशा परिषदा करण्याच्या कामीं आमचे श्रम आम्ही खर्चू लागलों. सगळ्या परिषदा किंवा सभा आम्हीच प्रत्यक्ष केल्या असें नव्हे; तर अप्रत्यक्षरीत्या घडवून आणल्या व कांहीं परस्पर झालेल्यांचा उपयोग करून घेतला. नाशिकच्या हिंदुधर्म परिषदेचा उल्लेख दुसरीकडे आलेलाच आहे. पाली मुक्कामी एक मातंग परिषद आमचे स्नेही के. के. सकट यांच्या खटपटीनें भरली. अण्णासाहेब भोपटकर, नानासाहेब शिंदकर व मी कांहीं स्वयंसेवकांसह पालीस गेलों. सातारचे भाऊसाहेब सोमण यांनीं सातारपासून पुढली सगळी व्यवस्था जातीनें लक्ष घालून केली. पालीस खूप मोठी यात्रा भरली होती. या यात्रेचाच आम्हांस उपयोग करून घ्यावयाचा

होता. आपण बोलवून जर गर्दी जमत नाहीं तर गर्दीच्याच ठिकाणीं आपण जावयाचें ही पद्धति मतप्रसारकांना नेहमींच अवलंबावी लागते. परिषदेंत करावयाचीं भाषणें व वाटावयाचें वाङमय हीं पुण्याहून छापून नेलेलीं होतीं. श्री. अण्णासाहेब भोपटकर यांचें भाषण जरी छापलेलें असलें तरी प्रत्यक्ष परिषदेंत ते आपलें भाषण कधींही वाचून दाखवीत नाहींत. परिषदेंत ते आणखी एक स्वतंत्र भाषण करितात. त्यामुळें सभेस आलेल्यांना त्यांचीं दोन भाषणें मिळतात; एक छापलेलें व दुसरें ऐकलेलें. ही त्यांची पद्धतीहि चांगलीच आहे. कारण तिनें अधिक मजकूर श्रोत्यांच्या पदरांत टाकतां येतो. भाषणांचे सारांश पुस्तकाच्या मुख्य भागांत अंतर्भूत केलेले असल्यामुळें येथें त्यांची पुनर्वाच्यता करण्याचें कारण नाहीं. मतप्रसाराला या परिषदेचा फार उपयोग झाला. मतप्रसार या शब्दाचा अर्थ सुद्धां जें सांगितलेलें असेल तें कळणें व पटणें येथपासून तों, या विषयाकडे गैरमाहितगाराचेंही मन केवळ जिज्ञासेनें वळणें इतका व्यापक आहे असें समजावयास हवें. आपलें म्हणणें लोकांना पटलें म्हणजेच प्रसारकाला समाधान होतें किंवा व्हावें असें नाहीं; तर आपलें म्हणणें हा विषय माहीत नसलेल्या चार श्रोत्यांच्या कानीं पडलें तरी त्याचें काम पुढें सरकलें असें तो समजतो; कारण याच थोड्याशा माणसांतून "हा वक्ता काय म्हणत आहे तें पुन्हां ऐकलें पाहिजे" या इच्छेनें थोडेतरी लोक पुन्हां आपल्या भाषणाला येतात हें त्याला माहीत असतें. असो. येथेंच श्री.शिंदकर यांच्या अध्यक्षतेखालीं गोरक्षणपरिषदही भरविली. कारण,मांग लोक कसावांना गाई ओपतात असा स्पृश्य लोकांचा जो आरोप तो मांगांना सांगून त्यांचें मन या व्यवसायापासून वळवावें असा के. के. सकट यांचा हेतु होता. परिषदेचें काम आंवरून आम्ही साताऱ्यास गेलों. या परिषदेच्या प्रसंगीं पालीचेच रा. गणपुले व तिकडील महारपुढारी रा. ज्ञानध्रुव घोलप यांनीं आम्हांस पुष्कळ मदत केली.

सोलापूर जिल्ह्यांतील केम या गांवीं तेथील खटपटी गृहस्थ रा. अवघडें व पुण्याचे पुढारी रा. के. के. सकट यांच्या प्रयत्नानें एक मातंगपरिषद घडून आली. आमच्या मंडळाला हरतऱ्हेची जेवढी म्हणून मदत करतां येण्यासारखी होती तेवढी आम्ही केली. सभेचा अध्यक्ष मीच होतों. नानासाहेब शिंदकर व मी असे दोघे परिषदेस गेलों. तिकडील मांगांचें मुख्य दुखणें असें होतें कीं,

सोलापूर जिल्ह्यांत लोकलबोर्डें, म्युनिसिपालिट्या इत्यादि ठिकाणीं महार लोकांचें सगळें फावतें व आपल्या वाट्यास तेथें कसलीच जबाबदारी किंवा पुढारीपण येत नाहीं. ही त्यांची तक्रार अगदीं बरोबर होती. ओळीनें दोन खेपेस जर तुमचा माणूस नॉमिनेट झाला तर एकादे वेळेस आमचा किंवा चांभारांचा व्हावा व अशी मागणी आपण सर्वांनीं सरकाराकडे करावी हें त्यांचें म्हणणें न्यायास अगदीं धरून होतें. परंतु तें तिकडील महार मंडळीस मान्य नव्हतें असें दिसलें. म्हणून हें मत ठांसून सांगण्यासाठीं ही परिषद भरविलेली होती. तेथील एक मराठी शाळेचे तपासनीस व आणखी कांहीं चार दोन महार गृहस्थ परिषदेस हजर होते. मातंगांनीं हा ठराव पास करावा अशी त्यांची इच्छा दिसेना. वास्तविक यांत गैर कांहींच नव्हतें. मीही त्याची युक्तता व न्याय हीं पटवून दिलीं तेव्हां त्यांच्याच्यानें निराळें बोलवेना. पण चुळबुळ मात्र संपेना. तथापि परिषद मातंगांची होती आणि म्हणून त्यांना जें हवें आहे तेंच त्या ठिकाणीं व्हावयास हवें होतें. भोंवतालच्या ४०।५० गांवांतील पुढारी मंडळी चारपांचशांपर्यंत जमली होती. मुख्य मुद्दा त्यांना हरतऱ्हेनें समजावून दिल्यावरच त्यांचीं मतें घेतलीं व वर सांगितलेली जी मातंगांची तक्रार तिचा पुरस्कार सर्व सभेनें ज़ोरानें केला. सर्व हिंदुलोकांत ब्राह्मणांचें भय अब्राह्मणांना वाटतें. कारण विकल्प उत्पन्न न करतांना बोललें तर ब्राह्मण हाच शिरजोर ठरावयाचा असें त्यांना वाटतें. हीच विचाराची पद्धति खालवर गेलेली आहे. अब्राह्मण म्हटले तरी त्यांत मराठेतर लोकांना वाटतें कीं, विकल्प उत्पन्न केला नाहीं तर मराठा हा शिरजोर ठरणार. तसेंच अस्पृश्य म्हटले तर महारेतर अस्पृश्यांना वाटतें कीं, महार शिरजोर ठरणार. आतां ब्राह्मणांपासून ब्राह्मणेतर, ब्राह्मणेतरांतून मराठेतर हे अविश्वासानें निराळे निघावे ही विचारपद्धति पुष्कळ महार पुढाऱ्यांना पटते, किंवहुना हवी असते. पण मांग, चांभार, ढोर इत्यादि इतर अस्पृश्य जाती आपल्या-संबंधानें अविश्वास दाखवितात व स्वसंरक्षणाची कांहीं तरतूद मागतात हा विचार त्यांना दुस्सह वाटतो. वर उल्लेखिलेल्या ठरावाला मांगांची अनुकूलता व महारांची प्रतिकूलता कां असावी हें यावरून दिसून येईल. स्पृश्य लोकांकडून न शिवलें जाणें यापलीकडे या अस्पृश्य जातींत कसलेंही नातें नाहीं. चांभार व ढोर महाराला कमी लेखतात व त्यांच्याशीं रोटीबेटीव्यवहार

करीत नाहींत व महार हे मांगाला कमी लेखतात व त्याच्याशीं रोटी–बेटी-व्यवहार करीत नाहींत. किंवहुना कित्येक ठिकाणीं, शक्य असलें तर, या तीनही जातींचे पाणवठे निरनिराळे असतात. तसेंच या सर्वांचे धंदेही अगदीं निराळे. खाद्यपदार्थहि सांस्कृतिक दृष्ट्या वरून खालीं जास्त जास्त हीन प्रकारचे असतात. अर्थात् स्पृश्यांकडून न शिवलें जाणें एवढेंच काय तें एक सर्वांना सामान्य असें अवलक्षण आहे. तें धुऊन काढण्यासाठीं सर्वांनीं एक दिलानें प्रयत्न करावयास हवे हें खरें आहे. हें करतांना आपआपल्यांत जी एक पोट–अस्पृश्यता आहे ती घालविण्याचीहि त्यांनीं खटपट केली पाहिजे. पण हें जरी खरें असलें तरी जातितः ते एकमेकापासून दूर आहेत व म्हणून मागें सांगितलेला जो अविश्वास तो यांच्यांतील श्रेष्ठासंबंधानें कनिष्ठांना वाटला तर त्यांत कांहींच नवल नाहीं. ज्या मुद्यावर इतर लोक स्वतंत्र प्रतिनिधी मागतात त्याच मुद्यावर यांना सुद्धां ते हवेसें वाटतें; पण हें त्यांच्यांतील वरिष्ठांच्या ध्यानांत येत नाहीं. हा सर्व खुलासा मी तेथें केला व सकट यांचा ठराव सर्व मातंगांच्या एकमतानें पास झाला. दुसरा महत्त्वाचा ठराव म्हणजे मेलेल्या ढोरांचें मांस खाऊं नये अशा अर्थाचा होता. व तोहि तेथील एका मांगानेंच आणिलेला होता. या ठरावावरहि मी विस्तृत भाषण केलें व याची अंमलबजावणी करावयास काय काय केलें पाहिजे यांचेंहि तपशिलानें विवेचन केलें; व नीट जबाबदारीनें मतें द्या असें सर्वांस बजाविलें. आनंदाची गोष्ट ही कीं सर्व मांगांनीं जोरानें आरोळ्या ठोकून या ठरावाला संमति दिली. व ही दंगल चालू असतांच एक म्हातारा मांग उभा राहून ओरडून म्हणाला कीं हें खाणें टाकल्याशिवाय आमच्या अंगीं माणुसकी यावयाची नाहीं. हे दोनच ठराव प्रमुख असे होते. बाकीचें काम झटाझट आवरून परिषद संपवून आम्ही परतलों. या पहिल्या ठरावामुळें तिकडील पुढारी महारमंडळीचा माझ्यावर राग होणें अगदीं स्वाभाविक होतें.

जमाखर्चाचा हिशेब—

या लोकांना पुष्कळदां पैसा बऱ्या प्रकारचा मिळतो. पण व्यसनाधीनता फार. दारू पिणें व हॉटेलांत जाणें हे यांचे शत्रू आहेत. हे शत्रू तिसऱ्या एका शत्रूला घरांत घेऊन येतात. तो म्हणजे सावकार हा होय. त्यांतही जर

तो सावकार पठाण असला तर यांचें तळपट वाजलेंच म्हणून समजावें. त्यानें व्याजाचा दर काय घ्यावा व हिशेब कसे करावे याला कांहीं धरबंधच नाहीं. व्याजापायीं थोडचाशा दिवसांत विसाचे नव्वद झालेले मला माहीत आहेत. अगदीं तुटके जोडे नीट करणारे चांभार सोडले तर इमानानें धंदा चालवून व निर्व्यसनी राहून यांच्यापैकीं पुष्कळांना सुखानें राहतां येतें. धंद्यांत मन लावून काम करणाऱ्या एका प्रतिष्ठित चांभारानें मला एकदां सांगितलें कीं, ही दारू नसली तर आमच्यासारखा श्रीमंत कोणी नाहीं. पण हें व्यसन अनावर आहे. यामुळें कमाई कशीही करा, धंद्याला कधीं बरकत येतच नाहीं व संसार सुखाचा होत नाहीं. मिळालेल्या पैशाचा उपयोग जर नीट केला तर तुमची इतकी दैना असावयाची जरूरी नाहीं हें त्यांस पटवून देण्यासाठीं आम्ही एक इलाज योजिला. तो हा कीं त्यांचा जमाखर्च रोज टिपावयाचा. दोन तीन वस्त्यांत हा प्रकार ठेवला. पैकीं एके ठिकाणची हकीकत देतों. एक मांगाचें घर घेतलें. माणसें एरवीं वरीं सालस व स्वतःच्या स्थितीचा खेद वाटणारी अशी होतीं. त्यांच्यावर सावकाराची घोरपड आली व भांडीं विकून त्यांनीं आपली सुटका करून घेतली. याचेंच घर आम्ही प्रयोगासाठीं घेतलें. रोजचा प्रत्येक माणसाचा आदा किती व एकंदर खर्च किती व तो कोणकोणच्या कारणास्तव झाला हें त्यांनीं आम्हाला रोज सांगावयाचें व आम्ही टिपावयाचें असें ठरलें. महिनाभर रोजच्या रोज हें टिपण्याचें काम चालू ठेवलें. त्यांनीं प्रामाणिकपणानें सर्व कांहीं सांगितलें याविषयीं आम्हाला मुळींच शंका नव्हती. शेवटीं असें दिसून आलें कीं, महिन्याच्या शेवटपर्यंत त्या घरांतील सर्वाचा मिळून आदा ७२ रुपये झाला व खर्च दहापंधरा रुपये कमीच लागला. तेव्हां त्याचें त्यास दिसून आलें कीं विनाकारण खाडे वगैरे न करतां जर काम केलें व दारू, हॉटेल इत्यादींत पैसा उधळला नाहीं तर पोटभर खातां येऊन चार पैसे गांठीला ठेवतां येतात. हें मात्र सांगितलें पाहिजे कीं सर्व घरें या तोलाचीं असतात व केवळ व्यसनामुळें वायां जातात असें नाहीं. शेंकडो लोक असे असतात कीं, ज्यांना कामें करावयाची धमक आहे पण कामच मिळत नाहीं. वर उदाहरण दिलें तें अशा घराचें कीं ज्यांचा आदा बऱ्या प्रकारचा असतो पण व्यसनामुळें ते अन्नास मोताद होतात.

सुताचा प्रयोग—

महात्मा गांधी यांची चळवळ सुरू झाल्यावरोवर त्यांनीं खादीचा प्रसार करण्याचें ठरविलें व पुरेशी खादी निपजावी म्हणून सर्वांनीं सूत काढावें अशी घोषणा चालू झाली. सूत काढण्याचा सराव व्हावयास हवा तितका जर झाला तर माणसाचें पोट त्याच्यावर भागतें, निदान ज्यांना कांहींच काम नाहीं त्यांना दोन अडीच आण्यांची तरी मदत होते असें त्या चळवळीचा पुरस्कार करणारे सांगूं लागले. आमच्यापैकीं हरीभाऊ फाटक, सदाशिवराव नाडकर्णी व चंद्रराव मोरे, (हा अतिशय होतकरू, मनमिळाऊ व उमदा तरुण मुलगा पुढें मुंबईस गिरणीच्या चाकाच्या दावांत सांपडून चिरडून मरण पावला.) यांची या सुताच्या चळवळीकडे फार ओढ दिसली. म्हणून आम्ही तोही प्रयोग करून पहावयाचें ठरविलें. निरनिराळ्या तीन चार वस्त्यांतून हा प्रयोग सुरू केला. सूत काढण्याचें ज्ञान कोणासच नव्हतें. म्हणून तें कसव शिकविण्यासाठीं आमच्या या मंडळींनीं खूपच खटपट केली. पण आम्ही सांगतों हें काम शिकावयाचें म्हणजे दुसरें जें कोणचें मिळण्यासारखें असेल तें घालवावयाचें; व तें हातचें गेलें म्हणजे जें काय मिळावयाचें तें बुडावयाचें असा त्याचा अर्थ होत होता. आतां आमच्या प्रयोगासाठीं त्यांनीं आपले पैसे कां बुडवावे? हें ओघानेंच आलें. अर्थात् हे बुडूं नयेत म्हणून त्यांच्या मजुरीइतके पैसे त्यांच्या या सुताचें कसव शिकण्याच्या मुदतींत देऊं लागलों व आमच्या आमच्यांत ठरविलें कीं एकदां यांना सूत काढतां येऊं लागलें म्हणजे या स्कॉलरशिपा बंद कराव्यात व उन्हातान्हांत खपण्याच्या ऐवजीं खुशाल सावलीला बसून चाक फिरवावें व पोटाला मिळवावें असें आपण त्यांस सांगूं. पुढें बऱ्याच जणांस तें येऊं लागलें व म्हणून आम्ही त्यांस स्वावलंबनाचें तत्त्व सांगूं लागलों. अनुभव असा आला होता कीं सकाळ-दुपार दिवसभर काम करून जें कांहीं सूत निघेल त्याचे पुरते पांच पैसे सुद्धां मिळत नसत. शिवाय चरखा व कापूसही फुकट! आम्ही आतां स्कॉलरशिपा बंद करणार व त्यांना चरख्याच्याच कमाईवर ठेवणार हें जेव्हां त्यांस दिसलें तेव्हां त्या सर्वांनीं सांगितलें कीं हें आमच्यानें होण्यासारखें नाहीं. एकतर "चारपांच पैसे मिळविले म्हणजे एकही पैसा न मिळण्यापेक्षां वरें कीं नाहीं हा प्रश्न पुण्यास लागू पडण्यासारखा नव्हता. दुसरें असें कीं,येथें मजूरीचे दरही

मोठे असून त्या वेळीं शनवारवाडा पाडण्याचें काम चालू असल्यामुळें कामें भरपूर मिळूं शकत होतीं. पण आम्हाला वाटूं लागलें कीं आमच्या सूत काढण्याच्या पद्धतींत किंवा इतर कांहीं कामांत चूक होत असावी. म्हणून कै. रामभाऊ साने यांजकडे वार्शी मुक्कामीं रा. मोरे यांनाच धाडिलें; कारण साने यांनीं सुताचें काम वार्शीस कसें योग्य चाललें आहे व गरीब माणसांना तें कसें एक प्रकारचें तारण झालें आहे याविषयींची हकीकत वर्तमान-पत्रांतून प्रसिद्ध केली होती. मोरे यांनीं जाऊन तेथील सर्व काम पाहिलें व रा. साने यांना आमचें कां फसतें हें विचारलें. त्यांनीं दोन तीन वाक्यांतच आमच्या सर्व शंका फेडिल्या. ते म्हणाले, "जीं माणसें या आमच्या कार-खान्यांत काम करीत आहेत त्यांना दुसरीकडे कसलेंहीं काम मिळण्यासारखें नाहीं म्हणून तीं येथें टिकून असतात. पुण्याची गोष्ट निराळी आहे. इतर मोल-मजुरी करून दहा पासून पंधरा आणे मिळविण्याची संधि वायां घालवून ते तुमचा चरखा चालवीत बसतील हें खरें नाहीं." मोरे परत आल्यानंतर हें आमचें काम संपलेंच म्हणावयास हरकत नाहीं. सुतें काढणारांनीं तर तें केव्हांच संपविलें होतें. पण निदान पुण्याच्या लोकवस्तीला तरी हें जमण्यासारखें नाहीं असा खुलासा त्यांतल्या त्यांत जाणत्या माणसांनींच केल्यानंतर त्याचा नाद सोडणें प्राप्तच झालें.

औषध-पाण्याची योजना—

शाळांच्या अनुषंगानें जीं दुसरीं अनेक कामें उत्पन्न होत असत, त्यांत आजारी माणसांना औषधें देणें हें एक होतें. मलेरिया, डोळे येणें, देवी अशांसारखे कांहीं रोग आलटून पालटून सगळीकडेच चालत असत. या बाबतींतले आमचे, म्हणजे आमच्या द्वारां अस्पृश्य लोकांचे, उपकारकर्ते म्हणजे डॉ. व्ही. डी. फाटक हे होत. ते नुकतेच विलायतेहून आलेले होते व तो त्यांचा विलायती रुबाब बघून हे आपल्यांत मिसळतील असें मला कधीं वाटलें नव्हतें. पण विनायकराव लिमये यांच्या द्वारां त्यांची माझी ओळख झाल्यावर त्यांचा गोड व विनोदी स्वभाव व गरीब लोकांवर उपकार करण्याची त्यांची तत्परता हीं माझ्या चांगलीं निदर्शनास आलीं. कोणी अस्पृश्यानें जर कांहीं दुखण्याची तक्रार मजकडे आणिली तर मी त्याला घेऊन सरळ डॉ. फाटक यांजकडे जाऊं लागलों

किंवा त्यालाच परस्पर पाठवूं लागलों. इतकेंच काय पण रोगी जर येण्या-सारखा नसेल तर आपल्याच गाडींतून ते त्याला तपासण्यासाठीं जात असत. आम्ही जितके वेळ त्यांस पाचारण केलें तितके वेळ ते आले व सर्वांना मोफत औषधें दिलीं. आमच्या मंडळाच्या कामाला त्यांची ही फारच मोठी मदत झाली. पण ह्या मोठ्या बाबी सोडल्या तर साधे टाणेटोणे रोग यांवरचे इलाज आम्हीच करीत होतों. आमच्या एका स्वयंसेवकाचे वडील आम्हांला वाटेल तितक्या कोयनेलच्या नळ्या पुरवीत असत. मलेरियाच्या सांथीच्या वेळीं यांचा या वस्त्यांतून आम्हांस फार उपयोग होई. डोळे आलेल्यावरचींही कांहीं ठराविक औषधें आम्ही देत असूं. एकदां एका गृहस्थानें एक लहानशी रक्कम माझ्या हवालीं केली; तिचा उपयोग एक फिरता डॉक्टर नेमण्याकडे मी केला. तथापि इतकें म्हटलेंच पाहिजे कीं, आम्हांस हें औषधाचें खातें चांगलें यशस्वी करतां आलें नाहीं; आणि याचें कारण तरी इतकेंच कीं आमच्यापैकीं कोणीच डॉक्टर किंवा वैद्य नव्हता. कै. लक्ष्मणराव आपटे हे अध्यक्ष असतांना त्यांनीं कोयनेलचा भरपूर पुरवठा आमचेकडे ठेविला होता. पण तापकरी पाहून तें त्याला देण्यापलीकडे आम्हांस कांहीं करतां येत नव्हतें. त्यांतही पुन्हां असें आहे कीं, औषध घेण्याची सुद्धां लज्जत असावी लागते! आजारी म्हटलें कीं औषध घ्यावयाचें हें एकदम मनापुढें आलें पाहिजे. पण अस्पृश्य वस्त्यांत असें शेकडों वेळां दिसून आलें आहे कीं, आजाराचे पहिले कांहीं दिवस तिकडे काणा डोळा करण्याचीच प्रवृत्ति मोठी व मग तें अगदीं जिवाशीं आलें म्हणजे धांवपळ करावयाची. याचा उत्तम अनुभव कॉलऱ्याच्या एका सांथींत मला आला. मी अगदीं बजावून ठेविलें होतें कीं, पटकीचा आजार सुरू होतांच मला ताबडतोब कळवा; मी ताबडतोब व्यवस्था करीन. पण इतकें करूनहि घरापासून मी फारसा लांब नसतां वाख्यानें प्रत्यक्ष माणूस मेल्यावर असें असें झालें असें मला कळविणारे अज्ञ लोक मीं पाहिले आहेत.

वार लावणें—

आपल्या मुलांनीं शिकावयास हवें हा विचार अस्पृश्य समाजांत हळूहळू रूढ होत आहे. तथापि या शिकणाऱ्या मुलांच्या जेवणाखाणाची सोय शहरांत करणें हें त्यांच्या सांपत्तिक स्थितीच्या मानानें फार अवघड आहे.

डॉ. परांजपे यांनीं पुणें येथें जें पन्नास मुलांचें सरकारी बोर्डिंग काढलें त्याचा फायदा अस्पृश्य समाजाला पुष्कळच होत आहे. पण शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानानें ही सोय फार थोडी आहे. पण या योजनेचा फायदा सर्वांना माहीत झालेला असल्यामुळें निदान जिल्ह्यांच्या मुख्य मुख्य गांवीं अशा बोर्डिंगांची स्थापना करण्याची खटपट नेहमीं चालू असते. कित्येक ठिकाणीं ही खटपट यशस्वीही झाली आहे. पण याच्या जोडीला आणखी एक नवा विचार त्यांच्या समाजांत रूढ करावा. या हेतूनें "अस्पृश्यांच्या मुलांचें शिक्षण व्हावयास हवें असेल तर त्यांनीं एक निराळें सामाजिक वळण पत्करावें" अशा तऱ्हेचें एक नवें प्रतिपादन त्यांजपुढें चालू केलें. पूर्वीं बोर्डिंगें किंवा अनाथ–विद्यार्थी–गृहें काढण्याची पद्धति नव्हती. गरीब मुलें मधुकरी मागत किंवा वार लावीत व अशा रीतीनें आपले विद्याभ्यास पुरे करीत. पैकीं मधुकरीची पद्धत अस्पृश्यांनीं उचलूं नये असें माझें मत आहे. कारण आपण ही भिक्षा विद्येसाठीं मागत आहों म्हणून यांत लाज नाहीं असें अस्पृश्य विद्यार्थ्यांस वाटूं लागावयास व आपणही याला भिक्षेकरी म्हणून नव्हे तर विद्यार्थी म्हणून अन्न घालीत आहों असें अस्पृश्य बायकामाणसांस वाटूं लागावयास अजून थोडा अवकाश आहे; व म्हणून त्यांच्या समाजांत जे कोणी त्यांतल्या त्यांत समर्थ असतील त्यांनीं वार देण्याची पद्धति घालावी असें माझें मत आहे. हा विचार मी प्रस्तुत पुस्तकांत अन्यत्र सविस्तर मांडिलेलाच आहे. पण तो अस्पृश्यांना नीट कळावा म्हणून प्रत्येक वस्तींत जाऊन तेथें या विषयाचें विवेचन मी त्या त्या ठिकाणच्या अस्पृष्टांपुढें केलें. केलेल्याचा उपयोग होतो हें दर वेळेस खरें नाहीं. नवीन विचार समाजांत शिरकविला येवढें समाधान मात्र आम्हांला खास लाभलें. पण सकट व वायदंडे यांनीं ही कल्पना आठदहा महिने तरी अंमलांत आणून दाखविली. पांच सहा विद्यार्थी त्यांनीं या वाराच्या पद्धतीनें इतके दिवस पोसून दाखविले, हें त्यांस भूषणावह आहे.

अस्पृश्यांच्या वस्त्या झाडणें—

अस्पृश्य लोक म्युनिसिपॅलिटींत नोकर राहून रस्ते झाडण्याचें काम करतात व अशा रीतीनें सगळा गांव स्वच्छ ठेवतात; पण स्वतःच्या आळींतील रस्ते मात्र घाणेरडे राहूं देतात याचें मला अतिशय आश्चर्य वाटत असे. म्युनिसिपालिटीनें

त्यांची आळी स्वच्छ ठेवावी हें खरेंच आहे व हें व्हावें म्हणून म्युनिसिपालिटीकडे आम्ही हजार तक्रारी पोंचविल्या असतील.पण ज्याचें त्यानें कांहीं करावयास हवें हें कांहीं खोटें नाहीं. शिवाय अस्पृश्य आळींतील रस्ता हा सर्वथा त्यांच्या अंगणासारखाच असतो. इतर कोणाचाही त्यावर वापर नसतो व अस्पृश्य माणसेंही त्याचा खरोखरीच घरच्या अंगणासारखा उपयोग करून घेतात. मग तो साफ ठेवावयास तरी त्यांना हरकत कां वाटावी ? पण तो तसा नसतो हें खरें आहे. हें दुरुस्त व्हावें म्हणून एक प्रयोग करून पहावयाचें मीं ठरविलें. आपणच खराटा घेऊन झाडण्याचें काम सुरू करावें म्हणजे तेथील तरुण लोक तरी आपलें पाहून तसें करूं लागतील अशा कल्पनेनें मीं बेत कायम केला. नव्या पेठेंतील मांगवाडयांतील व चांभारवाडयांतील फार माहितीच्या अशा तरुण लोकांस 'मी अमुक दिवशीं येणार आहें; हाक मारतांच तुम्ही घराबाहेर या' असें सांगून ठेवलें. व माझ्या अगदीं नजीकच्या स्वयंसेवकांपैकीं दोघांतिघांस माझा हा बेत कळविला, पण तुम्ही कोणी येऊं नका असें मात्र सांगितलें. स्वयंसेवक हे पोरसवदाच होते. अर्थात् त्यांच्या आईबापांस अप्रिय वाटणाऱ्या गोष्टींत मीं त्यांस गोवावें व कदाचित् त्यांना सामाजिक अडचणी उत्पन्न होण्यास मी कारण व्हावें हें मला संमत नव्हतें. पण माझा बेत कळविणें मात्र नेहमींच्या धोरणास धरून होतें. मी एकटयानेंच हें काम करावयास जावें हें त्यांस बरें वाटेना; पण मी समजावून सांगितल्यावर एक सोडून बाकीच्यांनीं माझें म्हणणें पतकरलें. एके दिवशीं मी दोन खराटे आणून ठेवले व पहाटे ३ वाजतां उठून ठराविक वस्तीकडे निघून गेलों. रा. दिवेकर हे मजबरोबर आले. मांगवाडयांत जाऊन, तेथील सांगून ठेवलेल्या मुलांना मजबरोबर घेऊन, मी झाडावयास लागलों. त्यांना तें चमत्कारिक वाटूं लागलें. लगेच शेजारच्या चांभारवाडयांत गेलों तेथें रा. नरहरी कदम, नांवाचे गृहस्थ कीं जे सध्यां कलेक्टरकचेरींत नोकर आहेत, तेही झाड़ावयास आले. त्यांनीं मला पाहतांच नमस्कार घातला व 'आमची आळी तुम्ही झाडूं नका' असें आर्जवानें म्हटलें. पण ठरविल्याप्रमाणें आम्ही आपला कार्यक्रम उरकला व 'तुमचे तुम्ही झाडावयास लागा' या अर्थाचें त्यांजपुढें प्रवचन करून आम्हीं पहाटेच घरीं परत आलों. वास्तविक हीं कामें मागें थोर दर्जाच्या संतांनीं केलेलीं व आम्ही तर त्यांतले कोणीच

नव्हों. पण या कामाला प्रसिद्धि दिली तर आपण आपल्याकडे भलताच अधिकार घेतों व कधींही न झेपेसें मोठेंपण आपण आपल्याला चिकटवितों असा त्याचा अर्थ होईल या कल्पनेनें मी या कामाला प्रसिद्धि दिली नाहीं. त्या त्या वस्तींतील मुलांना धडा घालून देणें यापलीकडे माझ्या या कृत्याला फारसा अर्थ नव्हता. हें काम आवरल्यानंतर मंगळवार पेठेंतील महार-वाडयांत जावें म्हणून ठरविलें. दरम्यान मी हा उपक्रम चालू केला आहे याची कुणकुण तेथील वस्तींतील कांहीं लोकांना लागलेली होती. त्यांपैकीं कांहीं आम्हांला अनुकूल होते व एक दोघे प्रतिकूल होते. या प्रतिकूलांना वाटे कीं मास्तर संतपणा उपटावयास पहात आहेत! त्यांच्या ध्यानांत येईना कीं, तें वैभव मला नको म्हणून तर मी कसलाही बोभाटा न करतां, सूर्योदयाच्या आंत हें सर्व काम उरकण्याचें ठरविलें होतें. असो. या प्रसंगीं रा. दिवेकर यांच्याशिवाय रा. शंकरराव जोशी इतिहाससंशोधक हेही मजबरोबर आले होते. पहाटे ती सर्व आळी झाडली, तेथील कांहीं भल्या गृहस्थांस सर्व कांहीं सांगितलें, हें तुमचें तुम्ही करावें म्हणून विनविलें व परत आलों. नंतर साऱ्याचा मांगवाडा झाडण्याचें ठरवून रा. बाबूराव वायदंडे व मी गेलों व ती लहानशी वस्ती चांगली झाडून काढून परतलों. झाडतांना, सगळ्यांत घाणेरडी घाण होती ती मी झाडावयास कचरत आहे कीं काय हें बाबूराव यांनीं मुद्दाम थांबून पाहिलें. मीं त्यांच्या परीक्षेस उतरलों! हें झाल्यावर हत्तीमहाल नांवाचें जें चांभारवस्तीचें ठिकाण आहे तें स्वच्छ करावयाचें ठरविलें. या ठिकाणाचें नांव मोठें उमदें आहे. पण येथें हत्तीही नाहीं आणि महालही नाहीं! थोडीशीं चांभारांचीं घरें आहेत, इतकेंच. याही वस्तींत आमची एक शाळा होती. या शाळेच्या द्वारां इतर बाबींचाही आम्ही परामर्ष घेत असूं हें मागें सांगितलेंच आहे. तेथील मास्तरांच्या सांगण्यांत आलें कीं, आळींत डोकीइतका उकिरडा माजला आहे. वहिवाटीप्रमाणें लोकांकडून कमिटीकडे अर्ज करवावा असें त्यांस सांगितलें. तें सर्व झालें, पण कांहीं इलाज झाला नाहीं. मग आपलें आपणच काय तें करावें असें ठरवून मी, दिवेकर, नरहरी कदम असे पहाटे तेथें गेलों व सकाळपर्यंत श्रम करून तेथील एक दोघां तरुणांच्या मदतीनें आम्ही तो सर्व उकिरडा बाजूस नेऊन टाकला व सर्व आळी अगदीं लखलखीत करून टाकिली. दुसरे दिवशीं आळीकर पाहतात तों

रस्ता स्वच्छ! दरम्यान म्युनिसिपालिटीचे अधिकारी आले, व पहातात तों रस्ता स्वच्छ! त्यांनीं वर रिपोर्ट लिहिला कीं आळी सर्व स्वच्छ असतां हे चांभार लोक कोणाचें तरी ऐकून कमिटीच्या नोकराविरुद्ध विनाकारण तक्रारी करतात. कमिटीचें आम्हांला लिहून आलें. दिवेकरांनीं जाऊन सर्व समजावून दिलें, तेव्हां म्युनिसिपल अधिकाऱ्यांनाही समाधान वाटलें व खुद्द हेल्थऑफिसरनींही पत्र धाडून आमच्या स्वयंसेवकांचा गौरव केला. हळूहळू माझ्या ध्यानांत येऊं लागलें कीं आपण जावें तेवढ्यापुरतें लोक खडबडून उठतात व लाजेकाजेनें झाडावयास लागतात. मनावरचा थोडासा संस्कार दूर होतांच येरे माझ्या मागल्या असेंच सुरू होतें. बरें, असें होतें म्हणून संस्कार कायम होईपर्यंत हें काम मला करावयास हवें होतें. पण हें माझ्यानें होण्यासारखें नव्हतें.

आंघोळी—

अशाच प्रकारचा दुसरा एक अनुभव मला आला. दिवाळीचे दिवस होते. मुलांना आंघोळी घाला म्हणून आयांस कळविलें होतें पण त्यांच्या हातून तें झालें नाहीं. दुसरे दिवशीं साबण इत्यादि घेऊन मांगवाड्यांत गेलों. त्यांच्याच घरचीं भांडीं काढलीं; मोठें चुलवण पेटविलें. पाणी तापवून साबण लावून मुलांना आंघोळी घातल्या. त्या दिवशीं मुलांना व आयांना फार बरें वाटलें. हत्ती-महालांतही हाच संस्कार करावयासाठीं गेलों. तेथील मुलें बरीं हुशार, त्यांनींही मदत केली. सर्व मुलांच्या आंघोळी उजेडण्याच्या आंत होऊन तीं सर्व लिहिणें लिहावयास बसलेलीं पाहून आईवापांस फार आनंद झाला. पण हें येथेंच संपलें. आळी पुन्हां घाणेरडी झाली व मुलांनाही नव्या संवयी लागल्या नाहींत. असो. अज्ञान व आळस किती असतात याचें निदर्शक म्हणून एक चुटका सांगतों. एके ठिकाणीं पाणी तापविण्याचें काम चालू झालें. शेजारींच एक दुकानासारखी जागा होती व तेथें कांहीं असामी निजले होते. चुलींत जाळ पेटल्यावर त्याचा उजेड आंत जाऊं लागला व ते पहाटेच्या साखरझोपेंतील निद्राळू जागे झाले. बाहेर आमचें बोलणें चालूच होतें. आमचे आवाज त्यांना खास ऐकूं जात होते व बोलणेंही कळत होतें. पण लक्ष देण्याचें काम त्यांनीं कां करावें? तेव्हां आंतल्या आंत एक जिज्ञासू दुसऱ्यास पृच्छा करतो "कोन हाइ र?" दुसरा माहितगार त्याला माहिती देतो "तीं मुन्शीबाट्लीचीं

(म्युनि०ची) मानसं हाइतीं"! इतकी माहिती दिल्या घेतल्यावर ते उभयतां स्वस्थ झोपीं गेले. असो. या आमच्या प्रयोगांत खरोखर गैर असें कांहींच नव्हतें. आमचें आम्ही जनसेवेचें व्रत जास्त शिकत होतों व जे कोणी अस्पृश्य तरुण आमच्यासारखें करावें असें वाटून करूं लागतील त्यांस शिकवीत होतों. आम्ही कोणासही हिणवीत नव्हतों किंवा "हें पहा समाजसेवाव्रत"! अशी दवंडीही देत नव्हतों. इतकेंच काय पण कांहीं वेडया लोकांनीं त्याचा वर्तमान-पत्रांत उच्चार केला नसता तर ही हकीकत फारशी कोणास कळलीही नसती. पण आम्ही आपल्याकडून जरी मनापासून आचरण करीत होतों तरी "हे लोक मतलबी आहेत, कावेबाज आहेत, आपल्या सेवेचा डांगोरा करून कीर्ति मिळविण्याचा यांचा हेतु आहे" अशी कांहीं माणसांची तरी कुरबूर असे. आम्ही कसे वागत होतों याची साक्ष दर आळींत वर्षानुवर्षं सर्वांस होती पण ब्राह्मणाचें वावडें असलेला एकादा गृहस्थ असेच. अशांपैकींच एकानें "चोरटें अस्पृश्यता–निवारण" या मथळ्याखालीं पुष्कळ निरर्गल मजकूर वर्तमानपत्रांत प्रसिद्धीस धाडला! म्हणजे आम्ही जी गोष्ट विनयाची व नसतें मोठेपण आपल्याला नको या हिशेबानें केली तिलाच या भल्या माणसानें 'चोरटी' म्हणून नांव दिलें! समजा आम्ही ही गोष्ट प्रसिद्धपणें केली असती तर हा गृहस्थ म्हणाला असता "पहा! काय केलें काय? तर एक दिवस झाडलें! अन् त्याचा गाजावाजा किती? थोडें करून पुष्कळ दाखवावें व दिमाख मिरवावा हा यांचा मतलब!"

शिदोरी व अन्नदान––

एके सालीं महाराष्ट्रांत वरेच ठिकाणीं दुष्काळ पडलेला होता, व विशेषत: नगर जिल्ह्यांतील वरेच डिप्रेस्ड लोक पुणें शहरीं आलेले होते. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें वस्त्राची फारशी नड पडली नाहीं. परंतु अन्नाचें मात्र तसें नव्हतें. अर्थात् सगळ्या बेकार लोकांची तरतूद करणें हें गगनाला गवसणी घालण्यासारखेंच होतें. अर्थात् हें त्याचें मोठें रूप मी विचारांतून सोडून दिलें व माझे कायमचे मित्र जे विद्यार्थी लोक त्यांच्या द्वारांच कांहींतरी करावयाचें ठरविलें. शाळेचे सुपरिंटेंडेंट प्रो. सवनीस यांची परवानगी घेऊन ठेविली व सहावी–सातवीच्या प्रत्येक तुकडींत जाऊन या

गरीब लोकांच्या अन्नान्नदशेचें वर्णन केलें. वर्गण्या गोळा करावयास हिंडणें, अध्यक्ष, उपाध्यक्ष, मतें,पक्ष, उपपक्ष,बहुमत इत्यादींचा मला मनापासूनच कंटाळा आहे. म्हणून त्या फंदांत मी सहसा पडत नाहीं. आपल्या प्रतिपादनाच्या पद्धतीनेंच लहानग्या मुलांतून काय करतां येतें हेंच मला पहावयाचें होतें. विद्यार्थ्यांनीं वर्गणी द्यावी असें मी त्यांस कधींच सांगितलें नाहीं. "आपण आठ-वडयांतून चौदा वेळां जेवतों व बहुतेक जण पांच सात वेळेला तिसऱ्यांदा खातों. या चौदा जेवणांपैकीं तुम्ही एक जेवण जेऊं नका. आईस सांगावें कीं, असे असे गरीब लोक आले आहेत, म्हणून एक वेळ न जेवतां, माझ्या वांटणीचें अन्न घेऊन मला शाळेंत जावयाचें आहे. असें तुम्ही आपआपल्या घरीं सांगा म्हणजे आईवापांवर कसलाही भार म्हणून पडणार नाहीं" असें मी मुलांना आग्रहानें सांगितलें. "आपल्याला धार्मिक शिक्षण हवें असें आपण नेहमीं म्हणतोना व आपल्या आधुनिक पद्धतींत या शिक्षणाची सोय नाहीं अशी तक्रार आपण नेहमीं करतों ना? ही पाहा आतां धर्मशिक्षण मिळविण्याची संधि आली आहे. तिचा उपयोग तुम्ही कसा करून घेतां हें पाहूं" अशासारखा उत्तेजक मजकूर मी वरच्या प्रत्येक वर्गांत जाऊन तास तास बोललों व आनंदाची गोष्ट अशी कीं सुमारे १०५ विद्यार्थ्यांनीं हें माझें म्हणणें पतकरलें. प्रो. सवनीस यांची परवानगी घेऊन शाळेच्या मधल्या चौकांत आम्हीं रोज रात्रीं जमूं लागलों. रोज सुमारें पंधरा विद्यार्थी आपापल्या घरची शिदोरी घेऊन येत असत. एक आठवडा झाला म्हणजे पुन्हां त्या विद्यार्थ्यांवर पाळी येत असे. माझी शिदोरी मात्र मी रोज घेऊन जात होतों. आम्हाला आमच्या वांटणीचें अन्न द्या, आम्ही घेऊन जातों असें जो तो विद्यार्थी घरीं सांगे! आई-बापांनीं पाहिलें ही मुलें कांहींतरी चांगलें करीत आहेत. ते म्हणाले तुम्ही उपास कशाला करतां? तुम्ही आपले जेवा. तुम्हाला मोठी शिदोरी दिली म्हणजे झालें ना? माझा मुख्य मुद्दा मुलांनीं उपास करावा हा नव्हता. तर आईवापांना शिदोरीचें संकट वाटूं नये एवढाच होता. अर्थात् उपास करण्यावर मी मुळींच भर दिला नाहीं. रोज पंधरा जणांची शिदोरी आली म्हणजे ती आम्ही एकत्र करीत असूं. भातांत भात, भाकरींत भाकरी अशा सगळ्या वांटण्या झाल्या म्हणजे सुमारें तीस पसतीस उपाशी लोकांना अन्न घालीत असूं. कोणी जेवत असत, कोणी घरीं घेऊन जात असत. प्रत्येक जणाची शिदोरी

भली भक्कम असे. त्यामुळें पंधरा जणांच्या शिदोरींत इतकीं माणसें सहज जोगावत. अन्न देऊन झालें म्हणजे अंगणांतील फरस धुऊन टाकावा व घरचा रस्ता सुधरावा असें रोज चाले. हा क्रम आम्ही महिनाभर चालविलेला होता; व एवढ्या मुदतींत निदानपक्ष नऊशें लोक आम्ही जेऊं घातले. नऊशें लोकांना अन्नदान करण्यासाठीं उद्योगासच लागलों असतों तर वर्गण्या गोळा झाल्या असत्या. परंतु त्या दातृत्वाला जीवंतपणा राहिला नसता. विद्यार्थ्यांच्या भूतदयेला आवाहन या पद्धतीनें जेवढें जोराचें झालें तेवढें प्रत्येकाच्या वडिलांकडून रुपया आठ आणे घेऊन आलों असतों तर झालें नसतें. मग याच लोकांना कपडे पुरविणेंही प्राप्त झालें. म्हणून शंभर स्वयंसेवकांनीं निम्या शहरभर कपडे जमविण्याची खटपट केली व या लोकांना पांच वर्षें पुरले असते इतके कपडे जमा केले !

विश्वास—

विश्वास संपादितां येणें ही एक प्रयत्नानें साध्य पण थोडीशी सुदैवाची गोष्ट समजली पाहिजे. प्रयत्न असून दैव अनुकूल नसलें तर हा प्राप्त होणार नाहीं. इतकेंच काय पण प्राप्त झालेला सुद्धां गमावण्याचा वळकट संभव असतो. दैव शब्द घालून मला भोळेपणा दाखवावयाचा नाहीं. आपल्या हातीं नसलेल्या व जीं उत्पन्न होण्यास आपण मुळींच कारणीभूत नाहीं अशा कारणांच्या समुदायाला मी दैव म्हटलें आहे इतकेंच. मागें शाळांचा उल्लेख अनेकदां झालेलाच आहे. पैकीं एका शाळेच्या आसपासच्या वस्तींतील बऱ्याच जिवट चांभार गृहस्थांचा माझ्यावर चांगला विश्वास बसला. पाहूं जातां हा विश्वास बसावा इतक्या गोष्टी मी त्यांच्यासाठीं खास केलेल्या होत्या. म्हणून या विश्वासांत अस्वाभाविक असें कांहीं नव्हतें. एकदां असें झालें कीं शहरांत चोरट्यांचा उपद्रव फार माजला. होतां होतां या चांभारांच्या आळीवर रात्रीं दगडमार चालू झाली. चोऱ्याही होऊं लागल्या. एके दिवशीं रात्रीं मी घरीं बसलों असतां या वस्तींतील दोघे तिघे लोक मजकडे आले. आपली सर्व हकीकत त्यांनीं सांगितली व म्हणाले, "असें मोठें भय उत्पन्न झालें आहे. म्हणून आमच्यापाशीं जें काय किडुक मिडुक असेल तें तुमच्या घरीं आणून ठेवावें या हेतूनें आम्ही आलों आहों." हे त्यांचे शब्द ऐकून

त्यांच्या विश्वासाला आपण पात्र आहों हें पाहून मला बरें वाटलें. पण ही जबाबदारी घ्यावयास मी भ्यालों. कारण चारपांच दिवसांपूर्वीच मी रहात होतों त्याच्या मागल्या अंगास वीस पंचवीस हजारांची चोरी झाली होती. ही हकीकत सांगतांच त्यांनींही आपलें म्हणणें परत घेतलें. असो. हा एक प्रकारचा विश्वास झाला. दुसरें असेंच एक गंमतीचें उदाहरण आहे. पण तो विश्वास निराळ्या तऱ्हेचा आहे. मागें भुकेलेल्या लोकांना रात्रीच्या वेळीं अन्नदान केल्याची हकीकत दिलेली आहे. त्याच प्रसंगीं एके दिवशीं पुढील हकीकत घडून आली. वाढलेलें अन्न घेऊन किंवा खाऊन सगळे लोक आपआपल्या घरीं निघून गेले. स्वयंसेवक व मी आपापल्या घरीं गेलों. सरासरी रात्रीं साडेदहा अकरा वाजण्याची वेळ असेल, दिवसाचीं सर्व कामें उरकून दुसऱ्याचें कांहीं बरें केलें काय हें मनास विचारीत व झोंप आळवीत मी अंथरुणावर पडलों होतों. इतक्यांत खालीं दरवाजाची दिंडी कोणी ढकलीत आहे असा आवाज ऐकूं आला. कोण आहे म्हणून विचारतां बाल आवाजानें, "मी लक्ष्मी आहें" असें कोणसें म्हणालें. आवाजावरून ही लक्ष्मी कोण हें मी ओळखलें. व ही कां आली असेल हेंही माझ्या ध्यानांत आलें. अन्न खावयाला आलेल्या लोकांत हीं असावी व चुकून मागें राहून आतां अंधारांतून घरीं जावयास ही भीत असावी हें मीं ओळखलें. "आतां इतक्या रात्रीं पुन्हां कोठें जातोस" असें माझ्या आईनें मला विचारलें. उत्तरादाखल कांहीं पुटपुटून मी जलदीनें खालीं गेलों व दिंडी उघडून तिला विचारलें, "लक्ष्मी, कां आली आहेस?" कसलेंही कृत्रिम न करितां ही नऊ दहा वर्षांची मांगाची मुलगी कांहींशा आर्जवाच्या आवाजानें मला म्हणाली, "मास्तर, लई अंधार पडला आहे, भीति वाटत आहे; मला घरीं नेऊन पोंचवा" तिचें वय, भयाकुल वृत्ति, यांनीं मी एकदमच गर्हिवरलों व तिला बरोबर घेऊन मांगवाडयांत तिच्या आईबापांच्या हवालीं केलें. परत येतांना मला अत्यंत सुख होत होतें. कारण कीं चुकलेलें आणि भयभीत झालेलें मूल मीं नेऊन आईवापांच्या हवाली केलें होतें. पण त्याबरोबरच आपण भ्यायलों तर कोणास हांक मारावयाची हा विचार तिच्या मनांत येतांच तिला माझें स्मरण झालें यामुळेंही मला फार आनंद वाटला हें कबूल केलें पाहिजे. असो.

संशयी स्वभाव—

अज्ञानामुळें स्वभाव संशयी कसे बनलेले असतात याचें एक उदाहरण देतों. चांभार व ढोर यांचा धंदा मुसलमानांच्या हातांत चालला आहे हें वरवर पाहणारासही दिसतें. पुष्कळ चांभार उपरे बनून मुसलमान कारखानदारांच्या दुकानांत रोजंदारीनें कामें करतात. ते चांगले कसबी असतात. पण स्वत:चें भांडवल नसल्यामुळें ही रोजंदारी त्यांस पतकरावी लागते. ढोरांचेंही भांडवलावांचून फार अडतें. तीस चाळीस वर्षांपूर्वी पुणें शहरांतच ढोरांचा धंदा फार जोरांत होता असें त्यांच्यांतील वृद्ध लोक सांगतात. हळूहळू तो डबघाईस येत आहे हें पाहून एकदां त्या दिशेनें खटपट करावयाची असें मनांत आणिलें. बुधवारांत तुमचीं स्वत:चीं दुकानें कां काढीत नाहीं असें मी बऱ्याच चांभारांना विचारून पाहिलें. त्यांनीं सांगितलें कीं जागा मिळत नाहीं. वास्तविक मुसलमान बोहरी जर बुधवारांत जोड्यांचें दुकान तेथें थाटून बसतो तर खुद्द चांभारांस हें कां करतां येऊं नये हें ध्यानांत येईना. चौकांत जागा मिळाल्यास चांभारांना स्वत:ची दुकानें तेथें घालतां येतील व सर्व नफा त्यांसच मिळेल या कल्पनेनें त्यांना तेथें जागा मिळवून देण्याच्या खटपटीस लागलों. चौकांतील व बुधवारांतील हमरस्त्यावरील घरवाल्यांकडे जाऊन मी प्रत्येकाजवळ पुष्कळ रदबदली केली पण कांहीं उपयोग होईलसें मला दिसेना. एक तर चांभाराला आपल्या जागेंत दुकान घालूं द्यावें हा विचार त्यांना कसासाच वाटे व दुसरें असें कीं, त्यांच्या मताप्रमाणें मुसलमान बोहरी, चांभारापेक्षां त्याच कामांत का होईना, अधिक स्वच्छता ठेवतो, चांभाराला जागा दिली कीं तो तेथें आपलीं सगळीं आयुधें घेऊन येतो, घाणेरडे कातडेंही आणतो व वस्तु तयार करावयाचा धंदाच घालतो. उलट बोहरी हा तयार केलेल्या सुवक वस्तू तेवढ्या मांडून बसतो व त्यामुळें वाड्यांत घाण सुटत नाहीं असें घरमालकांचें म्हणणें पडलें. यांत पुष्कळच तथ्य होतें. त्यामुळें मला फार आग्रह करतां येईना. जो चांभार केवळ वस्तु मांडून बसेल त्यालाच कदाचित् जागा मिळण्याचा संभव. पण तेव्हां तरी मला हें साधलें नाहीं हें खरें. दहाबारा वर्षांत लोकांच्या कल्पनेंत व घरवाल्यांच्या सांपत्तिक स्थितींत इतका फरक पडला आहे कीं, पूर्वी जेथें नकार मिळाला होता किंवा मिळाला असता तेथें सध्यां वस्तू बनविणारीं सुद्धां चांभारांचीं दुकानें आहेत!

हें चांभारांचें प्रकरण चालू असतांच ढोरांचें कांहीं जमतें कां म्हणून एकदां त्यांच्या आळींत सभा भरविली. हेतु असा होता कीं समाईक भांडवलाची कंपनी काढण्याची कल्पना त्यांस सांगावी. सभेला येऊन मास्तर काय म्हणतात हें लक्षपूर्वक मनापासून ऐकावें अशी त्यांची इच्छा असल्यामुळें सभा बरी जमली. समाईक भांडवलाची कंपनी कशी काढावी, सरकारी नियंत्रण मुद्दाम कसें घ्यावें, सरकारी हिशेबतपासनीस असल्याचे फायदे कोणचे, संस्था रजिस्टर कां करावी, थोडया थोडया पातीनेंसुद्धां मोठें भांडवल कसें जमवितां येतें इत्यादि मुद्यांचा वारीक खल मी त्यांजपुढें केला. पण हें सर्व बोलणें आपल्या पुरतेंच आहे, बोलणारा त्यांत कांहीं करूं इच्छित नाहीं असें त्यांस वाटूं नये म्हणून मी म्हणालों कीं तुम्ही सर्वांनीं मिळून जर हजार पंधराशे रुपये जमविले व सरकारी देखरेखीखालीं कंपनी उभारली तर तुमच्या या प्रयत्नाला मदत म्हणून मीही कांहीं रक्कम गोळा करून, तुम्हांस वापरावयास भरपूर भांडवल व्हावें म्हणून, या कंपनींत घालीन. याप्रकारें सर्व समजाविशी झाल्यावर कोणी कांहीं बोलावें अशी माझी अपेक्षा होती. परंतु कोणीच कांहीं बोलेना; तेव्हां माझ्या पश्चात् त्यांना बोलावयास थोडें जास्त मोकळें वाटावें म्हणून मी सभा संपविली व याचा विचार करा, आपण पुन्हां जमूं असें त्यांस सांगितलें. पांच चार दिवस झाल्यावर आमच्या तेथील शाळेच्या मास्तरांना सांगितलें कीं कंपनी काढण्याच्या बाबतींत तेथील लोकमताचा कानोसा घ्या. त्यांनीं दिलेला रिपोर्ट ऐकून मी थक्कच होऊन गेलों. ते म्हणाले कीं आळीकर एकमेकांत पुष्कळ बोलले. पाती घालून रक्कम उभारणें हें तर होणें नाहींच; पण त्यांना भलतीच शंका येत आहे! ती काय म्हणून विचारतां त्यांनीं सांगितलें कीं ढोरांच्या भांडवलांत व धंद्यांत आपलें भांडवल घालून मास्तरांचा पैका मिळविण्याचा हेतु दिसतो असें त्यांच्यांत लोक बोलतात ! अर्थात् या कामांत पुढें सरावें असें मला वाटेना. त्यांना भांडवल पुरें पडावें म्हणून मी चार ठिकाणीं खटपट करून पैसा जमा करीन म्हटलें, त्याचा या मंडळींनीं असा अर्थ केलेला पाहून त्यांच्या अज्ञानाची मला आणखी एकदां ओळख झाली.

मराठा सावकार—

सावकार लोक व्याजाचे दर जास्त लावून अपहरण करीत असतील हें

तर खरेंच; या पण अज्ञान लोकांनीं आपल्याकडून जास्त जास्त पैसे न्यावे अशीही तरतूद ते मनांतून करीत असतात. याचा एक गमतीचा नमुना सांगतों. एका वस्तींत एक मराठा सावकार व्याजबट्ट्यावर बराच चांगला जोगावत असे. कुळांची हलाखी काय आहे हें त्यांस माहीतच होतें. तो स्वतः चांगला गबर असल्यामुळें पैशाच्या उवाऱ्याचें सुख दारूच्या निशेनें जास्त भोगावयास सांपडावें म्हणून तो दारूही पीत असे. एकदां त्यानें आपल्या कुळालाही निशा करावयास नेलें. सावकार आपल्या घरीं गेला आणि कूळ आपल्या घरीं गेलें. आळींत जातांच या कुळानें कलागतीस प्रारंभ केला आणि होतां होतां एवढी प्रचंड मारामारी जुंपली कीं रक्ताचा सडा होऊन एक माणूस तर मृतप्राय घायाळ झाला. मला वोलावणें आलें. जाऊन पाहतों तों तिघांचौघांस मोठाल्या जखमा झालेल्या व एक तर अगदीं वेदम पडलेला. ज्यानें मार दिला होता तो या सावकाराचें कूळच होता व ज्यांस मार बसला होता त्यांच्या नातलगांना हा सावकार उठावणी देत होता कीं तुम्ही फिर्याद करा, मी तुम्हांस पैसे देतों. मीं हें सर्व ओळखलें व हें सर्व प्रकरण कोर्टांत गेलें तर उभयपक्ष अन्नाला मोताद होऊन जातील, हें लक्षांत घेऊन हें आपसांत मिटविण्याच्या खटपटीस लागलों. मारामारी दारूच्या निशेंत झालेली होती, हा भांडण मिटविण्याच्या दृष्टीनें फार चांगला मुद्दा होता. शुद्धीवर असतांना त्या लोकांची कांहींच अदावत नव्हती. या मुद्यावरच जोर देऊन मी तें प्रकरण बहुतेक मिटवीत आणलें. याची कुणकुण त्या सावकाराला खास लागली असावी. हें प्रकरण मिटविण्यासाठीं त्या वस्तींत माझ्या येरझाऱ्या दोन तीन दिवस चालल्याच होत्या. एके दिवशीं तहनामा घडवून आणून मी आळींतून बाहेर पडतों तों त्या आळींतला एक दारुड्या व हा सावकार असे दोघेजण मला भेटले. सावकारानें त्याला विचारलें, "ह्यो कोन्?" त्यानें सांगितलें हेच ते आमचे मास्तर. यांच्याच प्रयत्नामुळें आपल्या हातांतलीं सावजें सुटत आहेत याचें स्मरण होऊन हा भर बारा वाजतां झिंगलेला सावकार माझ्या अंगावर जोरानें चाल करून आला. त्यानें उगारलेला हात मी जोरानें बाजूस झिंजाडून देतांच तो तिकडे हेलपाटला व मग दारुड्याचें मुख्य शस्त्र म्हणजे जें शिवीगाळ तिला त्यानें सुरुवात केली. या दुसऱ्या हल्ल्याला मला जबाब करितां येण्यासारखा नव्हता म्हणून निमूटपणें

मी आपला मार्ग सुधारला. मी जों जों दूर जाऊं लागलों तों तों त्यानें आपला आवाज चढविला व जवळजवळचे चांगले दोन चौक ओलांडून जाईपर्यंत त्यानें अपशब्दांची वृष्टि चालविलेली होती. त्याची पोटदुखी हीच कीं मी त्याचीं कुळें घालविलीं. ठिकठिकाणच्या शाळा चालविणाऱ्या आमच्या शिक्षकांना असे किती तरी अनुभव आलेले आहेत. नमुन्यासाठीं हा एक दिला आहे इतकेंच.

पठाणांविरुद्ध तक्रार—

पुणें शहरच्या शेजारच्याच एका खेडेगांवाहून कांहीं अस्पृश्य लोक माझ्याकडे आले व सांगूं लागले कीं पठाण भारीच त्रास देत आहेत. पठाण किती आहेत असें विचारतां दोघे आहेत असें म्हणले. आळीकर किंवा जातवाले किती आहांत हें विचारतां, "पन्नास मानूस आहे" असें उत्तर आलें. तेव्हां मात्र मी त्यांस फारच टाकून बोललों. पन्नास माणसांना दंडेली करणाऱ्या दोन पठाणांना झोडपून काढतां येत नाहीं तर तुम्ही मर्द कसले ? इत्यादि निषेधपर शब्द मी पुष्कळच बोललों व माझ्या हातून तुमचें कांहीं एक व्हावयाचें नाहीं असें बजावून मीं त्यांस वाटेस लाविलें. चौकशी करितां पुढें असें कळलें कीं ती मंडळी पैशाच्या वासावर आली होती व अस्पृश्यांचे कैवारी म्हणतां तर द्या कांहीं तरी असें म्हणावयाचा त्यांचा हेतु होता. पठाणांच्या छळाचें नुसतें नांव होतें.

साळसूद ब्राह्मण—

आपल्या समाज-हितबुद्धीचा अशा रीतीनें फायदा करून घेऊं इच्छिणारे धूर्त लुब्रे लोकही पुष्कळदां भेटतात. त्यांच्यापासून चांगलें सावधच असलें पाहिजे. एके दिवशीं अगदीं मळकट रंगाचे पोषाख केलेले असे दोन गृहस्थ मजकडे आले. त्यांच्या बरोबर मावळची छाया तोंडावर असलेला दुसरा एक माणूस होता, तो बाहेरच उभा राहिला. हे मात्र तडक आंत येऊन बैठकीवर बसले. तो कोण आहे असें मी विचारतांच तो महार आहे असें त्यांनीं सांगितलें. मी त्यालाही आंत बोलाविलें व काय प्रकरण आहे म्हणून पूसतपास चालू केली. हे दोघे गृहस्थ ब्राह्मण होते. त्यांनीं सांगितलें कीं

हा गरीब महार शेतकरी आहे; गांवकरी मोठे खटचाळ आहेत. ते याची पिकें कापतात; याचीं गुरें मारतात; सध्यां तो मोठ्याच हलाखींत आहे. गांवकऱ्यांचा कांहीं बंदोबस्त करतां आला तर तो आपण करावा. आपण या कामांत झटणारे आहांत म्हणून आपणाकडे आलों. वकीलाकडे जावयाचें आहे. तर पैशाचीही कांहीं मदत करितां आली तर करा. मी त्या महारास पांच रुपये दिले व काय करतां येतें तें पाहतों म्हणालों. मामलेदारांना वगैरे लिहून कांहीं झाल्यास पहावयाचें माझ्या मनांत होतें. मग मी ओळखीच्या एका नामदार गृहस्थाकडे जाऊन त्यांना ही सर्व हकीकत सांगितली व त्यांनींही कांहीं करावयाचें आश्वासन दिलें. पण हें होतां होतां बरेच दिवस गेले. वाट पाहून ती मंडळी पुनः मजकडे आली. एका महाराच्या हितासाठीं ही खेडेगांवची ब्राह्मण मंडळी इतकी ये जा करितात हें पाहून मला मोठेंच कौतुक वाटलें. व पुन्हां एकदां प्रश्न समजावून घेण्यासाठीं मी फार बारकाईनें चौकशी करण्यास सुरुवात केली. कळतां कळतां शेवटीं असें कळलें कीं हा महार गृहस्थ शेतकरी आहे हेंही खरें, व त्याची नुकसानी गांवकरी करितात हेंहि खरें, पण तो महार आहे म्हणून ही गोष्ट होत नाहीं. तर तो या ब्राह्मणांची जमीन कसतो म्हणून! खरी गोष्ट अशी होती कीं, या दोघां ब्राह्मणांचें गांवकऱ्यांशीं वांकडें होतें व म्हणून कोणीही कुणबी शेतकरी त्यांचें शेत कसावयास कबूल नव्हता. म्हणून त्यांनीं या महारास हाताशीं धरलें. हा महार गांवकऱ्यांच्या मनाविरुद्ध वागतो म्हणून गांवकऱ्यांचा त्याच्यावरती राग व. म्हणून त्यांनीं त्याची नुकसानी केली. या दोघा धूर्त ब्राह्मणांच्या कानांवर मी या विषयांत खटपट करणारा आहे असा बोभाटा पोंचलाच होता. त्यांनीं माझ्या या समाजहितबुद्धीचा फायदा करून घेण्याचें ठरविलें व महाराला पुढें करून ते मजकडे आले. व सबंध हकीकतीपैकीं आपण व महार यांचा जो संबंध तो वगळून महाराची नुकसानी गांवकरी कशी करतात येथूनचीच सगळी गोप्ट त्यांनीं मला सांगितली! हेतु हा कीं, मी महाराचा पक्ष घेऊन कोणाला तरी सांगून गांवकऱ्यांस जरब बसवावी. ही जरब बसली म्हणजे महाराचें काम बिनबोभाट चालू राहणार; तें चालू राहिलें म्हणजे यांचीं शेतें पिकणार; अशी ही परंपरा होती! यांना जो कळवळा होता तो महाराचीं पिकें कापलीं जात आहेत म्हणून नव्हे तर आपलीं शेतें बुडत आहेत म्हणून;

च तीं तरल्यास पहावीं म्हणून महाराची हकीकत तेवढी त्यांनीं माझ्यापुढें गाइली. पुढें हें त्यांचें छद्म जेव्हां माझ्या लक्षांत आलें तेव्हां मी त्यांची निर्भर्त्सना केली व एकाद्यागरीब माणसाला पुढें घालून आपलें हित साधण्याचा या त्यांच्या हीन वृत्तीचा निषेध केला.

जुगारीचें वेड--

जुगारीची आवड सर्वत्रच आहे. श्रीमंत व समर्थ लोक तिला शर्यती इत्यादि नांवें देतात व अनपेक्षिताची अपेक्षा ठेवून ती सफल झाली तर सुख मानतात. जीविताचें परीक्षण केल्यास दिसून येतें कीं ज्यांचे कार्यकारणभाव कधींही उकलितां येत नाहींत अशीं सुखदुःखें आकस्मिक रीत्या प्राप्त होतात व सुख भोगण्याची योग्यता व दुःख सोसण्यासारखी आगळीक नसतांच त्यांचे संस्कार होतात. त्या वेळीं संसारांतील योजनाचक्रांतही जुगारी दिसून येते. पण ही रोजच्या व्यवहारालाही अंकित करते असें समजून तिच्याशीं कोणी खेळ खेळूं लागला तर ती संसाराचा उन्हाळा केल्याशिवाय सोडणार नाहीं. दिवसभर राबून आणि अंगाचा घाम गाळून जें कांहीं मिळविलें असेल तेंच पणाला लावण्याची दुर्बुद्धि एकाद्याला झाली तर त्या माणसाला दुर्दैव मोफतच राबवून घेत आहे असें दिसेल. जों जों दारिद्र्य जास्त आणि भावी कालांत अधिक बरें होण्याची आशा कमी तों तों, न कळतच, दरिद्री माणसाचें मन सृष्टीची लहर आपल्याला हवी आहे तशीच वळेल या भोळ्या भावनेनें जुगारीकडे वळते. शेंकडो, हजारों लोक या कामीं गर्क असतात. सुदैव व श्रीमंत हे अगोदरच उन्मत्त बनून एकमेकांशीं रंगेलपणा करीत असतात. व त्याची गोडी निशा करून वाढावी म्हणून, श्रीमंत जुगार खेळतात. दरिद्री हा तर सुदैवास नेहमींच पारखा असतो. वणवण करणें, अभद्रांत पिचत रहाणें, संसाराची करकर काणाडोळा करून घालविणें, आणि अपमान हा स्वाभिमानाच्या ऊर्मीसह गिळून टाकणें या गोष्टी त्याला नित्यशः कराव्या लागल्यामुळें "तें सुदैव सुदैव म्हणतात तें काय आहे त्याची एकदां तरी व ओझरती तरी नजरानजर व्हावी व त्याचा एकदां तरी झुरका मारावयास सांपडावा" या हेतूनें दरिद्री माणूससुद्धां जवळ काय असेल नसेल त्याची किंमत द्यावयास तयार होतो आणि त्यानें भारलेला फांसा संसाराच्या पटावर उत्सुकतेनें

फेकतो. खोलांत जाऊन पाहतां दरिद्री माणसाच्या या जुगार-प्रवृत्तीचें मर्म हें असें ध्यानांत येतें. पण या खेळाची बहुधा कायमची अशाश्वती ध्यानांत घेऊन शहाणे लोक गरीब असतांनाही यापासून दूर राहतात. इतरांप्रमाणें अस्पृश्य समाजांतही हें जुगारीचें खूळ मोठें प्रबल आहे. महिन्याचा पगार झाला म्हणजे दारू, भजीं, आणि जुगार यांवर कितीतरी खर्च होतो. आणि त्यांपैकीं कशानेंही अपेक्षा फलित होत नाहींत हें पाहिलें म्हणजे जिच्या सहवासांत प्रपंच करून कांहीं सुख व्हावयाचें तिच्याकडे हे व्यसनी लोक अर्धवट खलास झालेली कमाई घेऊन येतात. हें मोठ्या माणसाचें पाहून लहानही तसेच वागतात व आपण त्यांतलेच असल्यामुळें त्या मोठ्या माणसांना मुलांना बोलतां येत नाहीं. पण एवढें खरें आहे कीं, हें कांहींतरी वाईट आहे याची जाणीव सर्वांस असते. जसें दारूचें तसेंच याचें.हें व्यसन आहे, हा संभावित आचार नाहीं, हें चोरूनच करावयाचें व शिष्टांच्या नजरेस येऊं देतां कामा नये ही कल्पना सर्वांस असते.याचें एक गमतीचें उदाहरण सांगतों. एके दिवशीं रात्रीं साडेआठ व नवाच्या सुमारास मी एके ठिकाणीं गेलों. त्या रात्रीं सुटी असल्यामुळें मी येईन असें मुलांना वाटलें नव्हतें. दुसरें कांहीं काम मोठ्या माणसांशीं होतें म्हणून मी गेलों होतों. आळींत शिरतांना माझा कंदिल अगदीं बारीक होता म्हणून मी येत आहें हेंही कोणाच्या ध्यानांत आलें नाहीं. जातां जातां एक तालमी-सारखी जागा होती तेथें थांबलों व आंत गेलों. आंत पहातों तों मध्यें एक दिवली ठेवून भोंवतालीं मोठा पाळा घालून दहाबारा मुलगे हातांत पत्ते घेऊन बसलेले होते. मला पाहतांच त्यांतल्या एकानें चटकन् दिवली मालविली व गुडुप अंधार केला! पण इतक्यांत मी माझा कंदिल मोठा केला आणि पाहूं लागलों तों पत्त्यावर पैसे लावून खेळाण्याचा धंदा चालला होता! त्याच दिवशीं कमिटीचा पगार झाला होता व काय जे चार दोन रुपये प्रत्येकाला मिळाले होते त्याचा पहिला उपभोग चालू होता. मला पाहतांच तीं मुलें भ्यालीं व लाज लपविण्यासाठीं म्हणा कीं अंधार करून मूर्ख चाळे आंवरावयास सांपडावे म्हणून म्हणा त्यांनीं दिवा घालविला! पण माझ्या कंदिलानें त्यांचें तेंही फसलें. मुलें ओशाळलीं व पुन्हां असें करणार नाहीं असें म्हणूं लागलीं. चवकशी करतां कळलें कीं मिळालेल्या ३, ३ रुपयांपैकीं २, २॥ रुपये गमावलेले कित्येक मुलगे होते. दुसरे दिवशीं ते काय खाणार होते हें त्यांचें त्यांस माहीत.

दंडेलीचे प्रकार—

मुसलमान लोकांत अगदीं खालच्या खालच्या प्रकारचे लोक हिंदू समाजांतील पडझड उचलण्यासाठीं नेहमींच पाळतीवर राहात असतात. तसेंच निरनिराळीं आमिषें वगैरे दाखवून स्त्रियांच्या बाबतींत समाजावर आक्रमण करण्याचें त्यांचें काम नेहमींच चालू असतें. व जर हे समाज जागरूक राहिले नाहींत आणि आपण ज्या बिनवहिमी दृष्टीनें सर्वत्र वागतों व इतर सर्व लोक आपल्यासारखेच भले आहेत असें समजतों तसेच हे समाज वागत, समजत राहिले तर त्यांचें मोठें नुकसान होणार आहे. आपल्या दर्जाचे हिंदुसमाजांतले जे कोणी लोक असतील त्यांच्याशीं एकत्र येण्याचा जर प्रसंग आला तर या धोरणाचा आचार त्यांच्या मनांत सदैवच वागत असतो. पण आपल्या इकडल्या प्रांताला उंच दर्जाच्या लोकांचा व त्यांचा सहप्रसंग क्वचितच येतो. व त्यामुळें त्यांच्या या आक्रमणबुद्धीची बाधा वरील समाजास सहसा पोंचत नाहीं. परंतु अस्पृश्य समाजाशीं त्यांच्यांतील गुंडांना तरी चांगलें दळणवळण ठेवतां येतें व त्याची बाधा या समाजाला फार होते. या बाबतींतलीं उदाहरणें देणें या जातिविषयक भांडणाच्या काळांत भांडणें उत्पन्न करण्यास मात्र कारण होतील व म्हणून तपशिलांत न शिरतां येवढेंच सांगतों कीं, अस्पृश्य समाजानें जागरूक राहिलें पाहिजे. हें माझें अनुमान ज्या एतद्विषयक अनेक बाबतींत मला खटपटी कराव्या लागल्या आहेत त्यांवर मी आधारलेलें आहे.

मुसलमान लोकांची दंडेली फार असते. व ती चालते असें पाहिल्यावर ते अधिकच शिरजोर बनतात. बरें; आमचेहि लोक अगदीं थापडबाईक, चेपणारा भेटल्यास उसळून उठावयाचे नाहींत. एकदां एका शाळेंत अशी तक्रार आली कीं खाटिक लोक आळींतल्या मुख्य नळावर आपलीं बरबटलेलीं हत्यारें किंवा हाडेंसुद्धां धुवावयास आणतात. वास्तविक पाहतां तेथील अस्पृश्य आळीकरांनीं त्यांस एकदमच बंदी करावयास हवी होती. पण ही आगळीक पुनःपुन्हा होत असतांनासुद्धां त्यांनीं प्रतिकार असा कांहींच केला नाहीं. पण उलट खाटकांच्या दरडावणीस भिऊन अंग मात्र चोरूं लागले. ही तक्रार यथाप्रकारें आम्हीं म्युनिसिपालिटींत कळविली व तिला या प्रकरणांत अनेकदां ढोंसल्यावर खाटकांच्या या फाजील वर्तनावर

कांहीं आळा बसला. वास्तविक येथें अस्पृश्य लोकांची वस्ती भरपूर होती पण त्यांच्याच्यानें प्रतिकार होईना हेंच खरें.

घरांचें उच्चाटन—

अस्पृश्य लोकांवर ज्या अनेक आपत्ती आहेत त्यांत त्यांच्या वस्तीला पुन्हा पुन्हां उठकळा येणें ही एक आहे. हल्लीं टाऊन प्लॅनिंगच्या पद्धतीमुळें व रस्तेरुंदीमुळें या आपत्तीची थोडी थोडी चुणूक स्पृश्य समाजालाही लागते. पण तिला कांहीं मोठी आपत्ति असें नांव देतां येत नाहीं. अस्पृश्यांच्या बाबतींत मात्र हें स्थलांतर म्हणजे मोठें संकट बनून राहतें. पुणें येथील टिळक-रोडची योजना पास झाली तेव्हांच नव्या पेठेंतील मांग लोकांना आपल्याला उठकळा येणार हें कळून चुकलें. नवीन रस्ता करावयाचा असला म्हणजे म्युनिसिपालिटी मोठ्यामोठ्यांचीं घरें पाडिते तेथें या गरीबांचा काय पाड? हें उगाच भावनावश होऊन पाहण्यासारखें प्रकरण नाहीं. घरें पाडावीं लागतात म्हणून नव्या सडका करूं नयेत असें कोणीं म्हटलें तर तें अगदीं वेडेपणाचें होईल. म्युनिसिपालिटींतून नोटिसा आल्याबरोबर सगळी मांग मंडळी नोटिसा घेऊन मजकडे आली. रस्ता होऊं द्यावयाचा नाहीं असें म्हणून चालण्यासारखें नाहीं हें त्यांना न सांगतांच कळण्यासारखें होतें.कारण नव्या रस्त्यासाठीं किंवा रस्तेरुंदीसाठीं गांवांतल्या पुष्कळांचीं घरें म्युनिसिपालिटीचे मजूर म्हणून त्यांनींच पाडिलीं होतीं. तेव्हां प्रश्न जो उरला तो नुकसान भरपाईचा होता. कमिटी घरांच्या किंमती ठरवील व ज्याच्या त्याच्या अंगावर पैसे टाकून चालावयास लागा म्हणून सांगेल हें स्पष्टच होतें. पण ही कल्पना मला स्वत:ला मान्य नव्हती. हातांत पैसे पडतांच कधीं एकदम पाहिले नाहींत इतके रुपये पाहून ते उधळमाधळ करतील व मुख्यत: दारू पिऊन सगळे पैसे गमावून बसतील व अशा रीतीनें एरव्हीं गरिबी असली तरी आपल्या आढ्या-खालीं टांचा घांसून मरावयास जी एक सोय आहे तीही नाहीशीं होईल हें ओळखून मी त्यांच्या आळींत दुसऱ्या दिवशीं सभा भरविली. आतां हातांत पैसे येणार या आशेनें त्यांच्यांत वरेच लोक हुरळले होते. सभेला बायका, पुरुष वगैरे चटसारी मंडळी बोलाविली होती. हातीं पैसा आला असतांना तो कसा नाहींसा होईल व रहावयास घरसुद्धां कसें उरणार नाहीं हा विचार

मीं त्यांस फार बारकाईनें समजावून दिला. "जेवढ्या क्षेत्रफळाचीं प्रत्येकाच्या घराची जागा असेल तेवढ्या आकाराची म्युनिसिपालिटीनें त्यांना दुसरीकडे जागा द्यावी व ज्या किंमतीचें घर त्या जागेवर उभें असेल त्या किंमतीचें घर तेथें उभें करून द्यावें. हे मांग लोक म्युनिसिपालिटींतच नोकर असल्यामुळें, योग्य वाटल्यास कमिटीनें प्रत्येकीं थोडे जास्त पैसे घालून वरीं घरें बांधून द्यावीं व त्या त्या नोकरदाराच्या पगारांतून महिना अमुक रुपयेप्रमाणें हे जास्त घातलेले पैसे फेडून घ्यावे. असें झालें तर तुमचीं तुम्हांला घरेंही राहतील व ही सगळीच्या सगळी वस्ती एकत्रच राहील. पण जर कां पैसे घेतलेत तर ते खर्चून जातील, रहावयास घरें उरणार नाहींत व नातेवाईकांची पांगापांग होऊन जाईल" हें माझें प्रतिपादन मी चांगलें खुलवून केलें व त्याचा इष्ट तो परिणामही झाला. सर्व लोकांना हा मुद्दा पटून त्यांनीं "आम्हांस घराचे पैसे घ्यावयाचे नाहींत तर आमच्या या योजनेप्रमाणें आम्हांस तुम्ही दुसरीकडे घरेंच बांधून द्या" असा अर्ज म्युनिसिपालिटीकडे केला. मी लागलीच प्रत्येकाच्या घराची लांवी रुंदी मोजून नकाशा तयार करून म्युनिसिपालिटींत धाडून दिला व म्युनिसिपालिटीच्या इंजिनियरनें येऊन प्रत्येक घराची किंमत ठरवावी असेंही त्यांस कळविलें. माझी ही योजना म्युनिसिपालिटीचे त्या वेळचे अध्यक्ष कै.लक्ष्मणराव आपटे यांना फारच पसंत पडली व तिची आपण अंमलबजावणी करूं असें आश्वासन त्यांनीं आम्हाला दिलें. मलाहि बरें वाटलें. पण म्युनिसिपालिटीचा खिळखिळा रणगाडा भारीच हळूहळू चालतो हें आतां सर्वांना माहीत आहे. पुढें दोन वर्षांनीं या प्रकरणांत आतांपर्यंत जणूं कांहीं झालेंच नाहीं अशा रीतीनें म्युनिसिपालिटींतून घरें खालीं करावीं म्हणून पुन्हां नोटिसा आल्या. मांग लोक पुन्हा आले. मी म्युनिसिपालिटीस कळविलें कीं हें सगळें मागें एकदां झालें आहे; मी नकाशेहि म्युनिसिपालिटींत गुदरले आहेत. आतां फक्त ती आमची योजना अमलांत यावयाची राहिली आहे इतकेंच. म्युनिसिपालिटींतून लिहून आलें कीं तुम्ही काय म्हणतां हें आम्हांस मुळींच कळत नाहीं व कसला नकाशा दिला म्हणतां तोहि आम्हांला माहीत नाहीं! म्युनिसिपालिटींत तर कोणी कोणी असेंहि म्हटलें कीं यांनीं नकाशा वगैरे कांहीं दिला नाहीं. शेवटीं माझ्या वरचा हा आळ घालविण्यासाठीं मी खुद्द आपटयांचीच साक्ष काढली. ते जेव्हां माझ्या अंगानें चांगले खसखसून बोलले

तेव्हां हें प्रकरण मिटलें. पण पुन्हा नकाशा तयार करून देणें भागच होतें. पुन्हां मोजमापें घेतलीं. यानंतर पुढें कित्येक वर्षें हें घोंगडें भिजतच पडलेलें होतें. शेवटीं प्रो. शंकरराव भागवत यांच्या फार सहानुभूतीच्या धोरणामुळें आम्ही योजिला होता तसा जरी अगदीं नव्हे तरी वराच समाधान-कारक निकाल लागला. व अगदींच कोठेंतरी उधळून जाण्याच्या ऐवजीं वरीच मांग कुटुंबें तेथें कायम झालीं आहेत.

भांबुर्ड्याच्या हद्दींत एंजिनियरिंग कॉलेजच्या रेसिडेन्सीच्या दक्षिणेस एक मांग वसाहत कित्येक वर्षें होती. नवा पूल होऊन तिकडे दळणवळण सोपें व्हावें म्हणून अनेक रस्ते झाले आहेत. यापैकीं एक रस्ता या वसाहतीं-वरून जावयाचें मुकर झालें. या रस्त्यानें गव्हर्नरसाहेबसुद्धां जावयाचे तेव्हां त्या सडकेच्या लगतकाठीं असली घाणेरडी वस्ती नको असा बूट निघाला व त्यांनीं नुकसानभारपाई घेऊन दुसरीकडे वसाहतीस जावें असें त्यांस कळविण्यांत आलें. आमची तेथें वग म्हणून हें प्रकरण आमचेकडे आलें. आमची या कामांतील विचारपद्धति वर सांगितलेलीच आहे. त्यांना लिहून आलें तें असें कीं, एरंडवण्याकडे जागा देतों किंवा चतुःशृंगीच्या मैदानांत जागा देतों तेथें जावें. पैकीं एरंडवण्याच्या जागेसंबंधीं मांगांचा आक्षेप असा कीं तेथें आमची प्रजा वाढत नाहीं. ते म्हणत कीं तेथें पूर्वीं एकदां मांगांची वस्ती होती. परंतु प्रजा जगेना म्हणून तेथून आमचे लोक निघून गेले. चतुःशृंगीचें मैदानही गांवा-पासून लांबच. प्रत्यक्ष कलेक्टर साहेबांना ही बाब कळवावी म्हणून हें प्रकरण व्यवस्थेशीर लिहून धाडिलें व आपणच जातीनें येऊन एकदां चवकशी करावी अशी त्यांस विनंति केली. आमचें म्हणणें इतकेंच होतें कीं मांगांना दूर दवडूं नये. गांवच्या जवळ असण्यापासून हरतऱ्हेची सोय असते. केरसुण्या, चराटें इ. विकावयास येणें, मुलांना शाळेंत पाठविणें, इतर कामधंदा पहावयास येणें, निदान भीक मागावयास येणें हेंही कामच आहे, व त्यासाठीं शहरापाशीं त्यांची वस्ती व्हावी. अमूक दिवशीं येतों असें आम्हांस कळवून कलेक्टरसाहेब सकाळीं आले. मी व शिंदकर मातंग वस्तींत हजर राहिलों. सर्व आळी हिंडून पाहिल्यावर मी मुख्य प्रश्नाची हकीकत सांगावयास लागलों पण मी तेथील मांगांचा प्रतिनिधी आहें काय हें कलेक्टरसाहेबांनीं त्यांस विचारलें! त्यांनीं सर्वांनीं होकार दिल्यावर मी सर्व प्रकरण खुलासेवार सांगितलें. जवळ

पासच कोठेंतरी सोय व्हावी हा आमचा मुख्य कटाक्ष होता, भाषण झाल्यावर जवळ जवळ दोन तासपर्यंत आमचेसह त्यांनीं भोंवतालची सर्व वाजू पारखून पाहिली व अगदीं नदीला चिकटून नव्हे तर थोडी उत्तरेच्या अंगास एक जागा त्यांनीं पसंत केली. एकंदर मांग कुटुंवें किती आहेत, प्रत्येकांत माणसें किती इत्यादींची आंकडेवारी तयार करून ती आमच्याकडे पाठवावी म्हणजे पुढील योजना करावयास ठीक पडेल असें आम्हांला सांगून साहेव निघून गेले. दुसरे दिवशीं भांवुडर्याचे झाडून सर्व लोक माझ्याकडे आले. त्या सर्वांची नांवनिशी,आकडेवारी, यांचा तक्ता करून तो कलेक्टरसाहेब यांजकडे पाठवून दिला. त्यानंतर कित्येक महिने हें प्रकरण भिजतच पडलें होतें. अधिकाऱ्यांच्या बदल्या,म्युनिसिपालिटीच्या निवडणुकी, नव्या मेंवरांचीं धोरणें यांचे अन्वय बसतां बसतां वेळ फार जातो. दरम्यान भांबुडर्याच्या पश्चिमेस यांची वस्ती झाली तर त्यांच्या वस्तीवरचा वारा आमच्या गांवावर येईल व म्हणून तिकडे वस्तीला जागा देऊं नये असें कांहीं मंडळींनीं सरकारांत कळविलें होतें. पुढें हें प्रकरण श्री. शंकरराव भागवत यांनीं हातीं घेऊन सोसायटी वगैरे काढण्याची कल्पना बसविली. तेथून पुढें आमचा कांहीं संवंध राहिला नाहीं. सध्यां तेथें एक मोठी वस्ती झाली आहे. या दोनही वस्त्यांच्या बाबतींत मंडळानें जी योजना मांडली व तिच्या अम्मलबजावणीसाठीं कांहींसा हट्ट धरला तो जर धरला नसता तर या दोनहि वस्त्यांतील कुटुंबें कोठें तरीच गेलीं असतीं असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं.

जातीजातींच्या परिषदा--

पुणें शहरांतील चांभार मंडळीनें मजवर पुष्कळच विश्वास टाकला व मीही त्यांच्या जितकें उपयोगी पडतां येण्यासारखें होतें तितकें पडलों. शाळांचें आतांपर्यंत सांगितलेंच आहे. त्यांच्या दुकानांना बुधवारांत जागा मिळवून देण्याची खटपट करणें, त्यांच्या मठाच्या बाबतींत पडलेल्या घोळाचा निकाल लावणें, आपलीं शिकाऊं मुलें आपणच कशीं पोसावीं याचें ज्ञान त्यांना आळो-आळीं जाऊन देणें, त्यांच्यांत पडलेली फूट मिटविण्याचे यत्न करणें, त्यांच्यां-तील मुली सेवासदनांत किंवा इतर शाळांत घालण्याची खटपट करणें, अर्ज लिहिणें, मुसलमानांचें त्यांजवर होणारें अतिक्रमण निवारण्यासाठीं खटपट

करणें अशा एक ना दोन किती तरी तऱ्हांनीं मी त्यांच्या उपयोगी पडत होतों. या सर्व चळवळींचा त्यांनाहि उपयोग दिसत असल्यामुळें तेहि एकजुटीनें मजबरोवर वागत असत. पुढें हळुहळू कांहीं लोकांच्या मनांत तरी दुजाभाव उत्पन्न होऊं लागला. जुन्या नव्याचें भांडण सर्वच समाजांत असतें, तसेंच तें याही समाजांत सुरू झालें. जातीचे जे कोणी पंच म्हणून असत ते जुन्या पठडींतले असून त्यांना नव्या कल्पनांची व त्या बरोबर घेऊन येणाऱ्या नव्या माणसांची थोडी जाचणूक वाटूं लागली. नवीन लोकांना वाटे कीं जे लोक जुने झाले त्यांनीं आतां घरीं वसून नवीन माणसांना संधि द्यावी; निदान जे पंच मेले आहेत, त्यांच्या जागा अजिबात रिकाम्या न ठेवतां तेथें तरी नवीन माणसांची भरती करावी. ही विचाराची धुसफूस पुष्कळ दिवस त्यांच्या-त्यांच्यांतच होती. शेवटीं तिला थोडें तोंड फुटून आळंदीच्या जत्रेच्या दिवशीं या वादीचा विचार व्हावा असें ठरलें. सभेंत फार झालें तर बरीच चर्चा होईल इतकीच काय ती सर्वांची कल्पना होती. व जमल्यास ठिकठिकाणाहून आलेल्या लोकांची संमति घेऊन जातिपंचायतीची पुन्हां घटना बनवितां येईल असेंही कांहीं लोकांस वाटत होतें. आमच्या मंडळाचा या परिषदेस पूर्ण पाठिंवा होता व मदतहि होती. परिषदेचा अध्यक्ष मीच होतों. मुंबईहून कांहीं पाहुणे आले होते. मी ब्राह्मण अध्यक्ष होतों हें पाहून ते थोडे फुरंगटून वसले व सभेचें काम चालीस लागेना. मी त्यांच्यांतील सर्व प्रतिष्ठितांच्या पुढें व हचा पाहुण्यांच्यापुढें माझीं सर्व मतें मांडिलीं व हा असा माणूस तुम्हाला हवा असल्यास पत्करा नाहींतर सोडून द्या असें सांगितलें. पाहुण्यांचें समाधान झालें; इतर कोणी विरुद्ध नव्हतेच; माझें अध्यक्षाचें भाषण करतांना जाती-पंचायतीची सर्व कल्पना मी त्यांना विशद करून सांगितली. नवीन निवडणुकी झाल्या तर आपण निवडून येऊं कीं नाहीं अशी ज्यांना भीति होती त्यांना पंडित मालवीयांचें उदाहरण देऊन सांगितलें कीं तुम्ही जोंपर्यंत लोकांचें वरें करीत आहां तोंपर्यंत तुम्ही निवडून यालच. पण याचा फारसा उपयोग झाला नाहीं. आपल्याला हे नवीन लोक पंचायतींतून काढण्याच्या हेतूनेंच प्रेरित झाले आहेत हें जें एक वेड त्यांच्या डोक्यांत शिरलें तें त्यांच्या प्रतिनिविष्टपणामुळें कायमच झालें व तेथून सूक्ष्म फुटीला आरंभ झाला. परिषद यशस्वी झाली पण हें नवें दुखणें मात्र उत्पन्न झालें. तेंच पुढें बळावत

जाऊन त्यांत त्यांच्याच जातींतील व्यक्तिमत्सराची भर पडली. प्रतिष्ठितांच्या कानाशीं लागण्याचे धंदे सुरू झाले. एकमेकावर डाव करण्याचें काम चालू झालें. आळंदीच्या परिषदेंत हिशेबाचें प्रकरण निघालें होतें. तेंच विनाकारण चिघळत राहिलें. पोटांत एक हेतु धरून पण भलत्याच मुद्यावर परस्परांवर फिर्यादी अर्यादींचा झगडा चालू झाला व अशा रीतीनें या लोकांची एक जूट बनून ते कांहीं उपयोगाचें काम करीत राहतील अशी जी एक आशा वाटत होती ती अगदीं नष्ट झाली.

तथापि याच गडबडींत एक नवीन खटपटी माणूस पुढें आला. याचें नांव पांडुरंग हरळे असें होतें. पुढें यानें हरळे हें पोटजातीवाचक नांव टाकून देऊन राजभोज हें नांव चालू केलें. पुण्यास सरकारी डिप्रेस्ड बोर्डिंग आहे त्यांत धुळ्याहून दोन तीन चांभारांचीं मुलें आलीं. बोर्डिंगांत येऊन दाखल होतांच त्यांना कुणकुण लागली कीं स्वैपाकाला महारीण आहे. अर्थात् हीं मुलें तेथून निघाली व गांवांत आपल्या जातीच्या लोकांकडे गेलीं. त्यांनींही एक दिवस त्यांना संभाळलें व दुसरे दिवशीं त्यांना घेऊन ते मजकडे आले. मांग हा मृतमांस व गोमांस खातो, महार हाहि या दोषापासून मुळींच अलिप्त नाहीं पण चांभार मात्र व त्यांतल्या त्यांत हरळे चांभार या दोनहि दोषांपासून अगदीं अलिप्त आहेत. अर्थात् त्यांना वाकीच्या दोघांहून आपण आहारसंस्कृतीच्या बाबतींत श्रेष्ठ आहों असें वाटणें स्वाभाविक आहे. पण सध्यां आपण हें पाहतोंच कीं सुधारणा या नांवाखालीं दुसऱ्याच्या सदाचाराची किंमत शून्य लेखून त्याला आपल्या पदवीला ओढणें अशी पद्धत पडत चालली आहे. चांभारांनीं बोर्डिगांत जेवावयास कांहींच हरकत नाहीं असें या मुलांना सांगण्यांत आलें; पण तीं म्हणालीं कीं आम्ही यानें वाळींत पडूं, आमचीं लग्नें होणार नाहींत व आम्हांस क्षौर करावा लागेल. मी त्यांचें तें म्हणणें घेऊन शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्यांकडे गेलों. यांना तुम्हीं येथें सहभोजनासाठीं आणलेलें नाहीं, तर शिक्षणासाठीं आणलें आहे व या बोर्डिगची माहिती सगळीकडे देतांना स्वैपाकाची व्यवस्था अमूक आहे असेंहि तुम्हीं कळविलें नव्हतें; जर यांची कांहीं व्यवस्था झाली नाहीं तर हीं मुलें परत जाणार हें स्पष्ट आहे. म्हणून जास्त महत्त्वाचें कोणतें व कमी महत्त्वाचें कोणतें याचा विवेक करावा असें मीं त्यांस सुचविलें. मग हें प्रकरण शिक्षणखात्यांत पुष्कळ वेळ घुमत राहिलें व शेवटीं चांभारांच्या

मुलांचें करावयास त्यांच्या जातीच्या वाईची व्यवस्था होऊन त्यांस निराळें बसण्याची परवानगी देण्यांत आली. डॉ. परांजपे हे तेव्हां शिक्षणमंत्री होते. त्यांनींच हें बोर्डिंग काढलेलें होतें. त्यांना ही गोष्ट ऐकून विस्मय वाटला व नागपूर येथील सामाजिक परिषदेच्या वेळीं त्यांनीं याचा उल्लेखही केला. त्यांना वाटत होतें कीं सर्व डिप्रेस्ड् लोक सारख्याच आहाराचे व आचाराचे आहेत ! ही तक्रार किती खरी आहे याचा दुसरा एक दाखला देतो. हें प्रकरण सुरू होतांच मुंवईहून एक प्रतिष्ठित चांभार गृहस्थ, कीं जे शिक्षक होते व जे सध्या मोठे पुढारी वनले आहेत ते मजकडे मुद्दाम आले व सांगू लागले कीं सरकारनें शिक्षणाची व्यवस्था केली, पण आम्हां चांभारांच्या मुलांना महारामांगांच्या बरोवर जेवण्याची सक्ति करीत आहेत हें बरोबर नाहीं. त्यांची कांहीं तरी व्यवस्था व्हावयास हवी. आपणाकडून कांहीं झालें तर पहा. हें त्यांचें म्हणणेंही अधिकाऱ्याशीं बोलतांना मीं त्यांस सांगितलें होतें; असो. या मुलांचें शिक्षण सुरू झालें. हरळे हे कांहीं दिवस बोर्डिंगमध्यें होते. परंतु कोणच्या कां कारणास्तव होईना त्यांचा तेथें निभाव लागेना. शेवटीं होना होतां होतां इंग्रजी चौथ्या यत्तेंत असतांना त्यांनीं शिक्षण सोडलें. तेव्हांपासून ते पुणें शहरांतच आहेत. लहान वय व शिक्षण अगदीं तुटपुंजें यामुळें पुढें काय करावयाचें हें त्यांस कळेना. शिक्षणाची व्यवस्थाही होईना व त्यांचेंही मन तिकडे लागेना. तथापि आपल्या लोकासाठीं कांहीं करावें ही बुद्धि त्यांना पहिल्यापासून आहे. त्यांच्या इतपत शिकलेलीं माणसें तरी पुण्यास चांभारांत होतीं कोठें? मराठी सात इयत्ता झालेले दोघे तिघे होते पण ते आपल्या नोकरींत चूर असत. तेव्हां सार्वजनिक कामांत मन घालणाऱ्या या लहानवयी माणसाचेंही त्यांच्या लोकांनीं कौतुकच केलें. इंग्रजी चौथीपर्यंत शिकलेले असल्यामुळें मुळाक्षरें शिकवितां येणें त्यांना शक्य होतें. व म्हणून मी त्यांना आमच्या एका शाळेंत दुय्यम शिक्षक म्हणून नेमिलें. होतां होतां ऐकून ऐकून माणसाला कळूं लागतें. हा विषय काय आहे, अस्पृश्यांची स्थिति काय आहे, त्यांच्यासाठीं काय काय करावयास हवें इत्यादि बाबी मी त्यास उलगडून सांगत असे. स्वतंत्रपणें ग्रंथ वाचतां येण्यासारखें ज्ञान नसल्यामुळें या ऐकीव ज्ञानाचाही संग्रह त्यांनीं चांगला केला व सांगितलेल्या खटपटीही विश्वासूपणानें केल्या. मग जातीची जी कांहीं चळवळ चालू होती तिच्यांतही

ते हळूहळू पडूं लागले. हा एक नवा मुलगा बरा खटपटया आहे अशा दृष्टीनें चांभार जातीचे लोक त्याजकडे पाहूं लागले. वर जी आळंदीची परिषद म्हणून म्हटली आहे तिच्या खटपटींत हे गृहस्थ होतेच. याच सुमारास नगरकडले दुसरे एक चांभार शाळामास्तर येथें बदलून आले. त्यांचीही या परिषदेच्या कामीं बरीच खटपट झाली.

उत्तरोत्तर असें दिसूं लागलें कीं, तमाम अस्पृश्यांच्यापेक्षां त्यांच्या पोटजातींच्याच सभा भरविणें जरूर आहे. कोठेंही अस्पृश्यांची परिषद भरावयाची आहे असें म्हटलें म्हणजे तेथें शेंकडा नव्याण्णव महार असावयाचे.आपला यांचा काय संबंध आहे, आपण यांच्यांत कां मिसळावें अशा भावनेनें चांभार लोक त्यांच्यांत कधीं मिसळत नसत; व मांगांना वाटतें कीं, आपल्याला हे कमी लेखतात, म्हणून ते मिसळत नसत. हेंही खरें आहे कीं, मांगांत अजून ती चळवळीची बुद्धीही नाहीं व महारांच्या मानानें ते खरोखर मागासलेलेही आहेत. आतां अस्पृश्य लोक जमावावयाचे असें म्हटलें असतां जर हे दोघे त्यांत येत नाहींत तर त्यांस एकत्र आणण्याचा कांहीं निराळा इलाज योजावयास हवा. व तो इलाज म्हणजे जातीची सभा आहे, तुम्ही चला, असें म्हणणें हा होय. या विचारास अनुसरून पुढें मी जेव्हां चांभार-परिषद भरविली तेव्हां तिला यावें म्हणून दिलेलें आमंत्रण एका मोठ्या सुधारकानें पत्करलें नाहीं. कारण त्याच्या मतें परिषदेंत ही जातवारी उपयोगाची नाहीं. पण मी या प्रश्नाचा अगदीं सद्बुद्धीनें व बारकाईनें विचार केलेला होता व त्यावरून मला दिसून आलें कीं, सर्व डिप्रेस्ड लोकांची एक परिषद व्हावी हें किती जरी खरें असलें तरी मांग व चांभार हे जर त्या कामांत येईनात तर त्यांना एकत्र जमवावयाचे यत्न करावयाचेच नाहींत कीं काय? ते तसे एकत्र येत नाहींत ही गोष्ट अगदीं ढळढळीत खरी आहे. कोणी चार दोन पुढारी म्हणावयाचीं माणसें येत असतील.पण ज्याला समाज म्हणून म्हणतां येईल तो समाज कधींही जमत नाहीं. व जर कांहीं सुधारणा घडवून आणावयाची असेल तर हे एकत्र तर जमावयास हवेतच व एकत्र जमावयाचे तर जातीच्या नांवानें हांक मारल्याशिवाय कधीं जमावयाचे नाहींत. ही विचाराची सांखळी अगदीं बरोबर होती. व म्हणून कोण काय म्हणेल याच्याकडे लक्ष न देतां मी चांभार-परिषद भरविण्याचें कायम केलें. पण परिषद मात्र चांगली शास्त्रशुद्ध व्हावी अशी

तजवीज केली. आयत्या वेळेस फूट पडूं नये म्हणून महाराष्ट्रांतील प्रमुख चांभारांना व ढोरांना परिषदेच्या उपयुक्ततेसंबंधानें पत्रें धाडिलीं. त्या सर्वांची मोठ्या उत्सुकतेनें उत्तरें आलीं. त्यांच्या उत्तरांतील महत्त्वाचा मजकूर त्यांच्या नांवासह देऊन एक मोठें पत्रक काढिलें व अनेक जिल्ह्यांतून लोक आणण्याचीही खटपट सुरू केली. महाराष्ट्रांतील चांभार–ढोरांची एकंदर परिस्थिति काय आहे याची नक्की कल्पना यावी व तीवरच आपले ठराव रचलेले असावेत, उगाच अनमानधक्यानें बोलूं नये म्हणून एक प्रश्नावलीचा तक्ता तयार केला व तो तीन चारशें गांवीं माहितीमाहितीनें पाठवून दिला. या तक्त्यांत मुख्यतः धंदा, शिक्षण व पाण्याची सोय याचीच चौकशी केलेली होती. रा. राजभोज यांनाही प्रत्यक्ष चौकशीसाठीं म्हणून अनेक ठिकाणीं पाठविलें. हळूहळू निदान चाळीस पन्नास गांवची माहिती जमा झाली. नाशिक, मुंबई, पंढरपूर, सातारा, सोलापूर, नगर, कोल्हापूर, बेळगांव अशा अनेक ठिकाणची पुढारी मंडळीही येतील असें दिसूं लागलें. परिषदेची सर्व बौद्धिक बाजू व भाषणें, रिपोर्ट, इत्यादींच्या तयारीची व छपाईची बाजू मंडळानें आपल्या अंगावर घेतली. पण हे इतके सगळे पाहुणे उतरणें व त्यांची जेवणाखाणाची व्यवस्था करणें हा मोठा अवघड प्रश्न होता. मग एके दिवशीं शहरांतील सर्व प्रमुख चांभार–ढोरांची माझ्या घरीं सभा भरविली व हे सर्व पाहुणे तुम्ही आपआपसांत वांटून घेतले पाहिजेत असें त्यांस सांगितलें. परिषदेला पुष्कळ माणसें भाडें खर्चून येतील पण येथें राहण्याचा खर्च अमूक, जेवण्याचा तमूक, असें त्यांस सांगू लागलों तर ते विचकतील म्हणून राहण्याची, जेवण्याची सर्व मोफत सोय केली आहे असें आपणांस त्यांस कळवितां यावें असा आग्रह मी या चांभार मंडळीस केला; व आनंदाची गोष्ट ही कीं, सर्वांनीं माझें म्हणणें उचलून धरलें व येतील तितक्या सर्व पाहुण्यांची व्यवस्था आम्ही आपआपसांत करतों असें आश्वासन त्यांनीं मला दिलें. स्वागताध्यक्ष कोणीं व्हावें या मुद्यावर गांवांत तंटा माजूं नये म्हणून मुंबईचेच कै. कांबळे यांस स्वागताध्यक्ष नेमिलें. रा. राजभोज यांस सेक्रेटरी केलें होतें. त्यांनीं मेहनतही खूप केली होती. व पुढाकार घेऊन लोकांसाठीं कांहीं काम करील असा त्यांच्याहून लायख असा चांभार गृहस्थ येथें नव्हता. कै. लक्ष्मणराव आपटे हे अचानक अजारी पडल्यामुळें मंडळाचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब भोपटकर यांच्या

अध्यक्षतेखालींच हें अधिवेशन पार पडलें. परिषदेस इतर जातींचेहि पुष्कळ मोठमोठाले लोक आले होते. भोजन-कमिटी, स्वयंसेवक-कमिटी, इत्यादि अनेक कमिट्या नेमून कामाची वांटणी केलेली असल्यामुळें सर्व कांहीं यथा-सांग पार पडलें. जमविलेल्या माहितीला धरून अनेक ठराव पसंत केले. गुणाबाई वाघमारे व सावित्रीबाई बोराडे या सुशिक्षित स्त्रियांनीं चांगलीं भाषणें केलीं. आपण सर्वजणांनीं जमून विशेष कांहीं तरी साधलें; सगळे लोक आपल्या परिषदा भरवितात तशी आपलीही भरली अशा आनंदानें सभा वरखास्त झाली. बडदास्त ठेविल्याबद्दल पाहुण्यांनीं गांवकऱ्यांचें आभार मानिले. राजभोज या मुलाचें सर्वांनीं कौतुक केलें व परिषदेच्या कल्पनेपासून समाप्तीपर्यंत सर्व जबाबदारी आपल्यावर घेऊन चांभार जातीच्या संघटनेला सुरवात करून दिली, याबद्दल आमच्या मंडळाचे आभार मानले. गांवीं परत जातांना बहुतेक सर्व ठळक चांभार-ढोर लोक माझी ओळख करून घेण्यासाठीं मजकडे येऊन गेले. हें असेंच जर चाललें असतें तर पुष्कळ चांगलीं कामें झालीं असतीं. परंतु तें व्हावयाचें नव्हतें. या परिषदेचा रिपोर्ट लिहून आम्ही या कामांतून मोकळे झालों. ही चांभारांची स्वतंत्र परिषद भरविल्यामुळें आमच्यावर महार पुढाऱ्यांचा मोठा राग झाला. पण त्यांचा तो राग सर्वथा अनाठायीं होता इतकेंच मला म्हणावयाचें आहे.

जातीची स्वतंत्र परिषद कां भरवावी याची जी वर उपपत्ति दिली आहे तिला अनुसरून यापुढें मातंगांची परिषद भरविण्याचें आम्हीं ठरविलें. रा. धोंडुमामा साठे यांनीं अगदीं अनाहूत अशी पांचशे रुपयांची रक्कम अधिक मासानिमित्त मंडळाच्या हवालीं केली. मातंग परिषदेसाठीं या त्यांच्या देणगीचा फारच मोठा उपयोग झाला. रा. बाबूराव वायदंडे व के. के. सकट यांना प्रचारार्थ महाराष्ट्रांत धाडिलें. दोघे मिळून सरासरी एकशेपंचवीस गांवें हिंडले. पैकीं जवळपास शंभर गांवें एकटे बाबूराव हिंडले व त्यांनीं मतप्रसार व चौकशी अत्यंत कसोशीनें केली. हा मोठा दौरा संपवून ते परत आल्यावर नामदार गोविंदराव प्रधान यांच्या अध्यक्षतेखालीं पुण्यासच परिषद भरविण्याचें ठरविलें. मांग लोक हे अगदींच गरीब असल्यामुळें व म्हणून पाहुण्यांची व्यवस्था करण्याचें त्यांना अशक्य असल्यानें तें सर्व मंडळानेंच करावयाचें ठरविलें. नव्या पेठेनजीकच तात्यासाहेब केळकर यांचा जो एक

वाडा होता तो त्यांनीं आपण होऊन या मांग मंडळीस उतरावयास दिला व परिषद टिळक–स्मारक–मंदिरांत झाली. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या गांवचे प्रतिनिधि म्हणून सुमारें तीनशे मांग पाहुणे आलेले होते; ग्रामस्थ मंडळी निराळी. रघुनाथपंत दिवेकर, नानासाहेब शिंदकर, विनायकराव पटवर्धन वगैरे मंडळींनीं उत्तम व्यवस्था केली. विषयनियामक कमिटीचें काम दिवेकर यांच्या अध्यक्षतेखालींच झालें. स्वागताध्यक्ष वायदंडे हे असून नामदार प्रधान यांची अचानक नकाराची तार आल्यानें आण्णासाहेव हेच अध्यक्ष झाले. तथापि वेळांत वेळ काढून नामदारसाहेब परिषदेचें काम पाहण्यास आले होते. सभेंतील मुख्य ठराव म्हणजे निरुपद्रवी मांगांना सुद्धां जो हजेरीचा जाच सरकार लावितें तो रद्द व्हावा व पडीक जमिनी पिकवून खाण्यास सरकारनें मांग लोकांस द्याव्या, हे होते. परिषद अत्यंत यशस्वी झाली. या दोनही परिषदांचें काम देशांत प्रचार करण्यापासून तों रिपोर्ट लिहून प्रसिद्ध करीतोंपर्यंत इतकें पद्धतीनें व त्या त्या जातीच्या तरुण लोकांना सर्व तपशिलांत मुद्दाम शिरकवून आम्हीं केलें. याचा हेतु इतकाच होता कीं, त्यांच्यांतील माणसांना या कल्पना याव्या व परिषदा भरविण्याचें वगैरे शिक्षण मिळावें.

इतर परिषदा—

पुणें येथें जी महाराष्ट्र हिंदु–धर्म–परिषद कै. राजे लक्ष्मणरावजी भोंसले यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती तिचा आम्हाला जितका उपयोग करून घेतां आला तितका करून घेतला. अस्पृश्यांना अनुकूल असा एक ठराव पास झाला; व देवालय–प्रवेशाचा दुसरा ठराव मी मांडणार असें मीं अध्यक्षांस कळविलें होतें. विषयनियामक कमिटींत हा ठराव थोड्याशा मतानें नापास झाला होता व म्हणून तो भर सभेंत आणण्यास कांहीच हरकत नाहीं असें ठरलें होतें. दरम्यान मुख्य बैठकींत सर्व तऱ्हेनें अनुकूल वातावरण उत्पन्न झालें होतें, नाशिक मुक्कामीं महार पुढाऱ्यांना शंकराचार्यांच्या खुर्ची शेजारच्या सतरंजीवरही येऊं दिलें नाहीं ही हकीकत अन्यत्र आलेलीच आहे. पण दरम्यानच्या काळांत इतका फरक पडला कीं महार पुढारी भाषणाला जवळ आले इतकेंच नव्हे, तर कूर्तकोटी व अध्यक्ष महाराज भोंसले यांच्यामध्यें उभे राहून त्यांनीं भाषण केलें व कूर्तकोटींच्या शेजारींच ते खुर्चीवर बसून राहिले. या

फरकामुळें खुद्द अस्पृश्य पुढाऱ्यांच्या मनांतच कांहीं चमत्कारिक चलबिचल झाली. देवळाचा ठराव आणण्याचें इमान मीं त्यांना दिलेलें होतें व त्याप्रमाणें मी बाजूस बसून तयारी करीत होतों. लक्ष्मणराव भोंसले हे याला विरुद्ध आहेत हें सभेंतील प्रमुखांना माहीत होतें व त्यामुळें आतां पंधरावीस मिनिटांत माटे यांचा ठराव पुढें आल्याबरोबर मोठा बखेडा उत्पन्न होणार अशी चिंता सर्वांस लागून राहिली. इतक्यांत रा. थोरात, सुभेदार घाडगे, बॅ. गाडगीळ इत्यादि लोक मजकडे बाजूस आले व म्हणूं लागले कीं, हिंदू समाजानें पुष्कळच प्रगति दाखविली आहे; शास्त्रीपंडितसुद्धां इतके उदारपणें बोलतील असें आम्हांला वाटलें नव्हतें. म्हणून आतां आपण हा ठराव जर पुढें आणला तर सभेचा विनाकारण बेरंग होईल. डिप्रेस्ड् पुढाऱ्यांचेंच हें मतांतर झालेलें पाहून मला मोठा चमत्कार वाटला व ठराव पुढें न आणण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे असें त्यांस बजावून, "माझा ठराव मी आणीत नाहीं" असें मीं अध्यक्षांस कळविलें. दोन चार वर्षांच्या आंत घडून आलेला फरक लक्षांत घेण्याची जी रसिकता डिप्रेस्ड पुढाऱ्यांनीं या प्रसंगीं दाखविली तीच जर कायम ठेवून इतर समाजापासून फटकून निघण्याचे ते न ठरवितील तर त्यांत उभयतांचेंहि हित आहे.

ब्राह्मणपरिषदांतील ठराव—

वाईच्या ब्राह्मण परिषदेंतहि "आपल्या जमिनी कसावयास जर कोणी डिप्रेस्ड लोक पुढें आले तर ब्राह्मणांनीं त्या त्यांजकडे जरूर द्याव्या" अशा अर्थाचा ठराव आम्ही पास करून घेतला. हिंदु समाजाच्या सांपत्तिक जुळणींत डिप्रेस्ड लोकांचा जास्त प्रवेश व्हावा यासाठींच हा ठराव मी आणला होता. अशा ठरावांचा मुख्य उपयोग हा होतो कीं अस्पृश्यता–निवारणाचें मतप्रसाराचें काम तेथील चर्चेच्या योगानें आपोआपच पसरत जातें.

पुणें येथें द्वारकापीठाच्या शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखालीं एक ब्राह्मण सभा भरली होती. केवळ ब्राह्मणांच्या संबंधाचेच विषय त्यांत आणावयाचें असें ठरलेलें नव्हतें. म्हणून ब्राह्मणांची इतरांच्या संबंधानें सध्यां काय कर्तव्यें आहेत या मुद्यावर भर देऊन, "ज्या गांवीं अस्पृश्यांना पाणी मिळत नसेल तेथें ब्राह्मणांनीं तें त्यांस घालावें" असा केवळ भूतदयेचा ठराव सभेपुढें

मांडणार आहें असें विषयनियामक कमिटींत मीं सांगितलें. यावर खूप घनचक्कर झाली व आतां मुख्य बैठकींत लढत माजून राहणार असा समज दिसूं लागला. याच सुमारास आचार्यांच्या कांहीं अनुयायांची व कांहीं पुणेकरांची अगदीं क्षुल्लक कारणावरून मोठीच कलागत झाली. आंत हें ठरावाचें भय, व बाहेर हें कलागतीचें भय अशीं दोन भयें पोटांत घेऊन आचार्य सकाळीं निघून गेले. दुपारीं मुख्य बैठक व्हावयाची व तेव्हां ठरावांची दंगल होणार या अपेक्षेनें लोक थिएटरांत जमले. पण अध्यक्ष श्री शंकराचार्य हे सभेलाच येईनात. अनेक बोलावणीं गेलीं व विनवण्या झाल्या पण त्यांनीं भय खाल्लें.मग मी, चित्रावशास्त्री, गोपाळराव पळसुले वगैरे मंडळी गेलों व मी म्हटलें कीं मी ठरावही आणीत नाहीं व थिएटरकडे फिरकतसुद्धां नाहीं. आपण जाऊन सभा पूर्ण करावी.पण आचार्य अगदीं धजेनात. थिएटर मोकळें झालें.दुसरे दिवशीं संध्याकाळीं श्रींच्या बंगल्यावरच परिषदेचें सातत्य टिकावें म्हणून बैठक भरविण्याचा तोडगा केला. वास्तविक पाहतां माझा ठराव अगदीं साधा आणि नरम असा होता. पण या विचारशून्य आचार्याला त्याचेंहि भय वाटूं लागलें.

पुण्याची हिंदुधर्म परिषद--

महात्मा गांधींनीं पूना पॅक्टच्या निमित्तानें या विषयांत खळबळ सुरू केल्यानंतर देवालयप्रवेशासंबंधीं लोकमत काय आहे हें ठरविणें प्राप्तच झालें व त्याप्रमाणें हिंदुसभा व आमचें मंडळ यांनीं एक विचारानें महाराष्ट्र हिंदुधर्मपरिषद भरविण्याचें ठरविलें. महाराष्ट्रांत सत्याग्रहाची हूल उठल्यापासून सनातनी मंडळींनीं आपली संघटना करावयास सुरवात केली व १९३० सालापासून या संघटन--कल्पनेला कांहीं व्यक्त रूप येऊं लागलें. या संघटनेला वास्तविक पाहतां, सुधारकांचा विनधोरणी आचार हाच कारणीभूत झाला होता, व महात्मा गांधी यांनींही आपलें वजन त्याच अंगानें टाकल्यावरोबर सनातनी लोकांना--ज्यांत सुशिक्षित समाजापैकीं कांहीं भाग सोडून वाकी सर्व हिंदूंचा समावेश होतो त्यांना--सूक्ष्म विचार करणें भागच झालें! या सर्वांची फलश्रुति म्हणजे हें संघटन होय. आम्ही मंडळाचे लोकही सनातनीच आहों. पण सनातन हिंदु-समाजांत कांहीं सुधारणा व्हावयास हवी असें म्हणणारे आहों. परिषदेचें अध्यक्षस्थान दे.भ. जम्नादास मेहता यांस दिलें होतें.

मी कार्याध्यक्ष होतों. आम्हालाही फाजील सुधारक समजणारे सनातनी आम्हांलाच वाधणार असा सुमार दिसूं लागला होता. तरी देशाचें मत व्यक्त व्हावयाचें आहे तर तें योग्यपणें झालें पाहिजे असा आमचा हेतु असल्यामुळें सर्व खास सनातनी बांधवांनींही यावें असा आग्रह आम्हीं त्यांस केला. त्याप्रमाणें तेही येणार असें दिसूं लागलें. महात्मा गांधींच्या कांहीं कांहीं वेचक वचनांनीं विद्ध झालेल्या लोकांबद्दल आम्हांलाही सहानुभूतिच होती व म्हणून मंडळाचे अध्यक्ष श्री. आण्णासाहेव भोपटकर यांनीं ठरावसुद्धां अगदीं साधा लिहिला. इतका कीं जम्नादास मेहता हे तो पाहिल्यावर अगदीं नाखूष झाले आणि सनातनी वांधवांस खूष करण्याचाच तुमचा इरादा दिसतो असेंही म्हणाले! पण आमचें आम्हास माहीत होतें. वादळाचीं पूर्वचिन्हें आगाऊच दिसूं लागलीं होतीं व तारू जर शेवटपर्यंत न बुडतां घालवावयाचें असेल तर आपला मुद्दा न सोडतां जितकें नमतें घेतां येईल तितकें घेणें आमचें काम होतें. अस्पृष्ट समाजाला देवदर्शनाला देवळांत येऊं द्यावें हाच आण्णासाहेबांचा मुख्य ठराव होता. अपेक्षेप्रमाणें सनातनी पक्षाचे पुण्याचे व पुण्याबाहेरचे सर्व लोक परिषदेंत येऊन मिळाले त्यामुळें तिला चांगलें प्रातिनिधिक रूप प्राप्त झालें. देवालय-प्रवेशाचा मुख्य ठराव आण्णासाहेब यांनीं मांडला. त्याला भाऊसाहेव लवाटे यांनीं पुस्ती आणिली कीं, या सभेनें या प्रकरणाचा निकाल करूं नये तर पंडितां-च्या सभेकडे हा विचार सोंपवावा. अध्यक्षांनीं अनुकूल प्रतिकूल असे वक्ते नोंदून घेऊन एकाआड एक असे वोलावयास लावले. एकंदरीनें झालेला वाद-विवाद फार उंच दर्जाचा झाला. सकाळीं ११॥ वाजेपर्यंत धुमश्चक्री चालून बैठकीचें सकाळचें काम संपलें. पण सकाळच्या एकंदर प्रकारावरून सनातनी लोक सभा जिंकणार असा रंग दिसूं लागला. त्यांनीं मतदारांचे गटच्या गट परिषदेला आणले होते. स्वसामर्थ्याची त्यांना इतकी जबर जाणीव होती कीं त्यांच्यांतील एका पोरसवदा वक्त्यानें आम्हांस धमकी देऊन सांगितलें कीं, "ठराव पास होण्याची काय बिशाद आहे? दीडशें लोक घेऊन आलों आहें" आम्हा सनातनी सुधारकांचें सौम्य म्हणणेंसुद्धां पसंत करावयाचें नाहीं व ठराव हाणून पाडावयाचा असा चंग बांधूनच ही मंडळी आली होती. दुपारच्या सभेंत काय होतें हें कुतूहल सर्वत्र पसरलें. मग आमच्याही मंडळींनीं तयारी केली. उभयपक्षांच्या वक्त्यांनीं शिकस्त केली. सभासदांनींच मतें द्यावयाचीं आहेत

हें बजावून मतें घेतल्यानंतर आमच्या अंगास बहुमत आहे असें दिसतांच सनातनी लोकांनीं बंडाळीस सुरवात केली. शेवटीं एक तासानें मतांची नोंदणी करूं असें बजावून अध्यक्षांनीं सभासदांना विश्रांति दिली. या काळांत दिवे विझवणें, तुरळक मारामाऱ्या करणें, हलकल्लोळ उडवून देणें हे प्रकार गुंडांनीं केले. पण तेवढ्यानें मतावर कांहींच परिणाम होण्यासारखा नव्हता. कवडेशास्त्री, भाऊसाहेब लवाटे, बॅ. अग्रवाल व स्वत: जमनादास शेठजी यांनीं मतांची प्रत्यक्ष नोंदणी केली. निकाल आमच्या अंगानें व तोही मोठ्या बहुमतानें झाला. अशा रीतीनें भाऊसाहेबांची उपसूचना फेटाळली जाऊन मंडळाचे अध्यक्ष भोपटकर यांनीं मांडलेला ठराव पसार झाला. मंडळाला या कामासाठीं हे श्रम करणें जरूरच होतें. मतप्रसार व अमूक एका मर्यादेपर्यंत आलेल्या मताला ठरावरूपानें निर्गठि मारणें हीं जीं दोन कामें तीं याप्रमाणें मंडळ सतत वजावीत आलें आहे.

इस्लामपूरची सभा—

समाज आपल्या कामाला अनुकूल आहे असें घावाडावानें बोलावयाचें असलें तर बोलावें पण तें खरेंच आहे असा आग्रह धरूं नये. समाजांत या विषयासंबंधाचें जसें व जितकें खोल प्रतिपादन व्हावयास हवें तितकें झालेलें नाहीं असें माझें अजूनहि मत आहे. वरच्या लोकांना राजकारणाच्या पेचाच्या द्वारा या विषयाचें रूप कळलेलें आहे. पण त्यांतील जो शुद्ध सामाजिक विचार आहे, मानव्याच्या स्वाभाविक अधिकाराविषयीं जी एक गंभीर कल्पना समाजास कळावयास हवी व हिंदुधर्माचे बाहू अधिक विस्तृत कसे करावयास हवे याचें विवेचन समाजापुढें झालेलें नाहीं. चांगल्या चांगल्या पुढाऱ्यांना, ते या मुद्यावर आल्याबरोबर, लोक झिडकारून लावतात यांतलें रहस्य हेंच आहे कीं तो विषयच त्यांना कळलेला नाहीं व एका विषयांतला पुढारी आपलें पुढारीपण भलत्याच विषयांत त्याजवर चालवूं पाहतो. धर्म म्हणजे काय याची कल्पनाच बदलावयास हवी, याचें प्रत्यंतर समाजांत शिरल्यानें चांगलें येतें. मी एकदां इस्लामपुरास गेलों होतों. तुमच्या गांवचे लोक अस्पृश्य लोकांना गांवांतील पाणवठ्यावर येऊं द्यावयास कबूल आहेत काय असें सरकारनें तेथील म्युनिसिपॅलिटीस विचारलें होतें. म्युनिसिपॅलिटीनें

गांवकऱ्यांची सभा भरवून या प्रश्नाचा निकाल लावावयाचें ठरविलें. सभा भरली व प्रश्न जिव्हाळ्याचा असल्यामुळें गांवाच्या मानानें लोकहि पुष्कळ आले. सभेंत आपलाच प्रश्न निघावयाचा आहे म्हणून गांवांतील व शेजारच्या पेठ वगैरे खेड्यांतील महार लोकही बरेच आले होते. मी तेथें सहज असल्यामुळें मलाच अध्यक्ष केलें होतें. गांवांत सत्यशोधकांची पुंडाई थोडीबहुत होतीच. दिवस असहकारितेच्या आरंभाचे होते. गांवांत ब्राह्मणांचें कसलेंहि वर्चस्व राहूं न देण्याची खटपट झालेलीच होती व म्युनिसिपालिटींत एकहि ब्राह्मण सभासद नव्हता. या आपसांतील अदावतीचा फायदा घेण्यास थोडे अन्य-धर्मीयहि टपून होते. कांहीं भोळे अस्पृश्य सभेला बिब्बा घालूं इच्छिणारांच्या फशीं पडले होते. अशा प्रकारें पुष्कळ निरनिराळीं प्रकरणें व निरनिराळे अभिनिवेश एकत्र झाले होते व त्या सर्वांत म्हणजे सभेचा अध्यक्ष मी ब्राह्मण होतों! अध्यक्षाचे अधिकार,सभासदांचीं कर्तव्यें इत्यादिकांसंबंधानें कांहीं विचार सांगून 'गांवच्या पाणवठ्यावर अस्पृश्यांस पाणी भरूं द्यावें असें माझें मत आहे' असेंही मीं सांगितलें, अशासाठीं कीं माझ्या मतासंबंधीं लोक दुग्ध्यांत राहूं नयेत. भाषणें चांगलीं झालीं. त्यांतील एक दोन मात्र फारच उंचावरून झालीं. ब्रह्म, पिंडब्रह्मांड इतक्या उंचीवरून तीं झालीं. तेव्हां कांहीं उपद्व्यापी माणसांनीं आगाऊ ठरवून ठेवल्याप्रमाणें एक महार गृहस्थ भाषण करावयाचें आहे म्हणून पुढें आला. त्यानें हातांत एक बशी आणिली होती व तिच्यांत थोडासा भात होता. दुसऱ्या हातांत एक बुन्डुकुलें होते. बशी टेबलावर ठेवून सभेकडे वळून महार म्हणाला, "आतांपर्यंत पुष्कळ देव झाले, धर्म झाले; हें जर सर्व खरें असेल तर एवढा भात खाऊन दाखवा व येवढें पाणी पिऊन दाखवा" हे शब्द त्याच्या तोंडून निघतांच एवढी थोरली सभा तटकन् उठून उभी राहिली व पाणवठ्यावर पाणी भरूं द्यावयाचें म्हणजे त्याच्यामागें हें जेवणाचेंच यावयाचें असा या प्रकाराचा अर्थ करून लोकांनीं सगळी सभा डोक्यावर घेतली. आम्हाला ते विचार करणेंहि नको आणि मग ही येणारी बाटेगिरीहि नको, असें म्हणत लोक एकमेकांत पुष्कळ अभद्र बोलूं लागले. वास्तविक पाहतां ज्यांनीं कोणीं या महाराकडून हें कृत्य करविलें त्यांनीं अस्पृश्य लोकांचें हित कसलेंच साधलें नाहीं. गांवच्या पाणवठ्यावर पाणी

देणें म्हणजे आमच्याशीं तुम्ही सहभोजन करणें असा अर्थ त्यांनीं महाराच्या तोंडून वदविला व त्यामुळें जें कदाचित् कांहीं जमलें असतें तें फिसकटण्याच्या मार्गास लागलें. माझें काम फारच अवघड झालें. सगळी सभा उभी राहिलेली व जिकडे तिकडे गोंगाट चालूं असलेला. शेवटीं सभा सोडून जाऊं नका, याचा केव्हां तरी तुम्हांला निर्णय करावयासच हवा, इत्यादि प्रकारें त्यांची समजूत घालून मी व तेथील माझे असहकारितावादी मित्र यांनीं कशी बशी ती सभा खालीं बसविली. "आपण महाराशीं जेवावें कीं नाहीं हा प्रश्न आपल्या सभेपुढें नाहीं; तर गांवच्या पाणवठ्यावर त्यास पाणी घेऊं द्यावें कीं नाहीं असें जें सरकारांतून विचारलें आहे त्याचाच केवळ विचार आतां करावयाचा आहे" हें सभेस व त्या महारगृहस्थास परोपरीनें समजावून दिलें व कामाला पुन्हां सुरुवात झाली. येथवरच्या हकीगतीवरून भलतेच प्रश्न गल्लतीनें पुढें आणिले असतां कसें नुकसान होतें, लोक अन्नव्यवहाराला किती विन्मुख आहेत हें ध्यानांत येण्यासारखें आहे. असो. पुढें दोन तीन भाषणें झाल्यावर एक पोक्तसा मराठा गृहस्थ बोलावयास उठला. विटाळचंडाळाची आपल्या मनाची तळमळ बोलून दाखवून तो मजकडे वळून म्हणाला, आपण चांगले ब्राह्मण दिसतां आणि गांवच्या तळ्याचें, महाराच्या विटाळाचें, पाणी आम्हीं प्यावें असें म्हणतां? असा मोठ्या काकुळतीनें त्यानें मला प्रश्न केला व त्याच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें. हें पाहिल्यावर मत बदलणें म्हणजे काय याची मला पुन्हां एकदां ओळख झाली. महाराला तळ्यावर पाणी घेऊ देणें ह्यांतच धर्म आहे अशी नवी सुधारणेची कल्पना आणि तें घेऊं देणें म्हणजे आपण सद्धर्मांतून पतित होतों ही जुनी कल्पना या दोहोंचा मेळ घालावयाचा आहे. म्हणजे एक उखणून टाकन तेथें दुसरी बसवावयाची आहे. सच्चेपणा, कळवळा इत्यादींविषयीं म्हणाल तर आमच्या प्रतिपादनांत तो जितका तितकाच त्याच्याही प्रतिपादनांत दिसला! तेव्हां खरें काम म्हणजे मानव धर्माचेंच मूळ रहस्य लोकांना पटवून देणें व ज्याला आपण संस्कृति म्हणून म्हणतों तिच्या खऱ्या व खोट्या कल्पना त्यांना सांगणें हें आहे; व तें झालें आहे असें मला वाटत नाहीं. वरील सभेच्या वर्णनावरून या प्रमेयाचें सत्य पटण्यासारखें आहे.

पुण्यास खटपट—

अस्पृष्टांचीं जीं अनेक गाऱ्हाणीं किंवा गैरसोयी आहेत त्यांत पाण्याची अडचण हें एक फार मोठें गाऱ्हाणें आहे. त्याच्या निवारणासाठीं मत-प्रसार करणें जरूरच असतें. बाहेर गांवीं जेथें जेथें मी आजवर जात आलों आहें तेथें तेथें या बाबीवर मी पुष्कळच बोललों आहें. वास्तविक पुणें शहरांत या प्रश्नाला इतकेसें महत्त्व नाहीं. पण मतप्रसार या दृष्टीनें कांहीं करावयास हवें असें ठरवून त्या उद्योगास लागलों. दर पेठेंत सभा करावयाची हें कायम केलें. या प्रश्नाचें सार्वजनिक महत्त्व काय आहे याचें वर्णन केलेलें पत्रक व त्याच्या विचारासाठीं आपण अमूक ठिकाणीं सभेला या, अशा अर्थाचें एक पत्रक प्रत्येक घरांत व बिऱ्हाडांत टाकण्याची व्यवस्था केली. देवळाच्या कामीं जी विचारपद्धति पुढें अवलंबिली तीच येथेंही पतकरून शहराच्या पश्चिम भागांत हें करावयाचें ठरविलें. सदाशिव पेठेंत डॉ. फाटक यांच्या घरीं पहिली व त्रिंबकराव आवटे यांच्या घरीं दुसरी सभा भरविली. सुमारे तीस लोक आले होते. माझें म्हणणें प्रथम मांडून मग त्यावर प्रश्नोत्तर-चर्चा करावयाची अशी पद्धति होती. प्रश्नांचीं उत्तरें देतों असें आव्हान करूनच आपण वादास बसलों तर चर्चा मोठी बारकाईनें व क्वचित् ईर्षेनें होते तशीच येथें झाली. संस्कृतीची हानि होईल कीं काय ही कायती सर्वांना नेहमीं भीति असते. तिचा विचार जर आपल्या प्रतिपादनांत यथान्याय होत असला तर श्रोता सहसा बिचकत नाहीं, हा माझा अनुभव आहे. श्रोता लागलीच आपल्या मताचा होतो असें नव्हे पण आपलें म्हणणें सुयुक्त व विचारांत घेण्यास पात्र आहे असें तरी त्यास वाटूं लागतें. हीच त्याच्या मतांतराची पहिली खूण आहे. त्या दृष्टीनें सभा चांगल्या झाल्या. तिसरी सभा नारायण पेठेंत पटवर्धनांच्या वाड्यांत झाली. येथें एका वक्त्यानें मला हिणविलें कीं, हीं कामें घडवून आणावयास तुमच्याहून मोठा माणूस हवा आहे. वास्तविक या गोष्टीची ओळख मला स्वत:ला इतकी असत आली आहे कीं दुसऱ्याकडून ती करून घेण्याची मला जरूरच नव्हती! सभासदांची संख्या सुमारे १५।२० असेल पण सुरू केलेलें प्रकरण ठरल्याप्रमाणें शेवटपर्यंत करावयास हवें म्हणून सभा चालू ठेवल्या. चौथी सभा शनवार पेठेंत ओंकारेश्वराच्या देवळांत भरली. सभासद तीस होते. येथें वादविवाद मोठा कुशलपणाचा झाला.

सभेला रा. नीलकंठराव सहस्रबुद्धे हे आलेले होते. ते मोठे सुधारक म्हणून गाजलेले. तेव्हां त्यांचा आमच्या कामाला उपयोगच होईल अशी अपेक्षा होती. पण त्यांची बुद्धिवाद करण्याची तऱ्हा पग्दस्तीपणाची होती. वस्तूंत मूळचें जिवंत व स्वयंभू बळ असेल तेंच शेवटीं लागू पडतें. एडनला गाढवावरचें पाणी ब्राह्मणलोक पितात तर येथेंच एवढें सोवळें कां? असें विचारून चालण्या-सारखें नाहीं. जो आचार आपद्धर्म म्हणून कोणी आचरिला तो त्यांना संभावित व विहितधर्म म्हणून पतकरा असें म्हणणें चूक आहे. या विचारपद्धतीनें माणूस एकादे वेळेस निरुत्तर होतें पण त्याची खात्री पटत नाहीं. ही खात्री कां पटत नाहीं याचीं कारणेंही त्याला त्याच वेळीं सांगतां येतील असें नाहीं. म्हणून प्रतिपक्षाला कुंठित करण्याच्या नादीं न लागतां विचारसरणी शुद्ध ठेवून निदान बौद्धिक खात्री तरी सुधारकाला करतां आली पाहिजे हें त्या दिवशीं मला फारच पटलें. ही सभा फारच चांगली रंगली. पुढील सभा बुधवार पेठ व शुक्रवार पेठ यांची मिळून करावी असें ठरवून ती नूतन मराठी विद्यालयाच्या इमारतींत कायम केली. त्यासाठीं दोन्ही पेठांतून घरोघर निमंत्रणें दिलीं होतीं. पण सभेच्या ठिकाणीं मात्र दोन पेठा मिळून दोन माणसें आलीं! एक प्रोफेसर जोग व दुसरे रा. गुप्ते. यांना मी काय सांगणार? दोघांनाही नमस्कार करून सभा रद्द आहे असें सांगितलें व पुढील कसब्यांतली सभा अजिबातच टाकली. कारण तिकडचें लोकमत मला चांगलें माहीत होतें! मतप्रसार हेंच जर फल मानिलें तर या सभांचा निःसंशय फार उपयोग झाला.

टिळक विहिरीची सोय—

मंडळानें सर्व हिंदूंकरितां म्हणून वोअरिंगच्या विहिरी काढण्याची कल्पना वसवून ती श्री. तात्यासाहेब केळकर यांजपुढें मांडिली. विहिरीला टिळक विहीर असें नांव द्यावें व तीवर सर्व लोकांना पाणी घेण्याचा हक्क असावा; ह्या विहिरीवर महार इत्यादि अस्पृश्य पाणी घेतात म्हणून आपण घेऊं नये असें कोणास वाटलें तर त्यानें घेऊं नये; पण स्पृश्य लोक घेतात म्हणून अस्पृश्यांना मात्र बंदी होतां कामा नये अशी या विहिरींची कल्पना आहे. सदर योजनेप्रमाणें एका विहिरीवद्दलची देणगी त्यांनीं मंडळाकडे पाठवूनहि दिली

आहे व पुणें जिल्हा लोकल बोर्डाशीं पत्रव्यवहार होऊन जरूर तेवढी जास्त रक्कम घालून बोर्डानें विहीर काढावी व तिला टिळकविहीर हें नांव देऊन वरील अटीप्रमाणें ती सर्वांस मोकळी असावी असें ठरल्यावर आण्णासाहेबांनीं सदर रक्कम पुणें डि. लोकल बोर्डाच्या हवालीं केली आहे. बहुधा दरसाल एका विहिरीचा खर्च केसरीसंस्थेकडून मिळेल अशी आज अपेक्षा आहे.

महाडचा अन्याय व न्याय--

महाड मुक्कामीं डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखालीं महार समाजाची १९२७ च्या आरंभीं फार मोठी परिषद झाली. कोंकणपट्ट्याला डॉ. आंबेडकर यांच्या प्रयत्नानें महार समाजांत मोठीच जागृति होऊन त्यांचें वरेचसें संघटनहि झालेलें आहे. महाड येथें चौदार किंवा चवदार या नांवाचा एक बराच मोठा तलाव आहे; इतका कीं, त्यांत कोण कोठें पाणी घेत आहे याचें, मुद्दाम लक्ष दिल्याशिवाय, कोणास ज्ञानहि होणार नाहीं. या तळ्यांतही इतर सर्व ठिकाणांप्रमाणें अस्पृश्यांना पाणी घेण्याची मनाईच होती. "परिषदेच्या वेळीं, या तळ्यावरच पाणी भरावें असें परिषदेंत ठरलें. त्या ठिकाणीं जीं कोणी स्पृश्य मंडळी परिषदेच्या मदतीसाठीं गेली होती त्यांपैकीं कांहींनीं आजच ही गोष्ट करूं नये असें आपलें मत सांगितलें. पण महार मंडळींनीं त्यांचें तें मत बाजूस सारलें, व त्यांचा मोठा थोरला जथा, ललकारणी करीत, तळ्यावर गेला व तेथें हे सर्व लोक पाणी पिऊन परतले. पुढें गांवांतील मुख्य रस्त्यावर गांवकऱ्यांनीं महार मंडळींस वेदम मारलें व रक्तपातही केला." अशा अर्थाची बातमी प्रसिद्ध झाली. ही पुरेशी वाईट होतीच पण याच्या जोडीला आणखीही दोन कलमें तिच्यांत गोविलेलीं होतीं. पहिलें म्हणजे हें कीं ब्राह्मणांनीं मारलें व दुसरें म्हणजे एका चांभारबाईस मार देण्यांत आला. मार देणें, तो ब्राह्मणांनीं देणें व एका बाईमाणसास तो बसणें हे तीनही प्रकार अत्यंत खेदकारक व विस्मयकारकसुद्धां वाटले. परिषदेला रा. राजभोज हे मला विचारून व माझी मदत घेऊन गेलेले होते. परिषदेंत, हा तलावावर पाणी पिण्यास जावयाचा कांहीं विषय निघणार आहे असें मला त्यांनीं सांगितलें नव्हतें व त्यांनाही त्याची कल्पना असावी असें वाटत नाहीं. अस्पृश्य लोकांना ज्या कांहीं सवलती, अधिकार इत्यादि मिळतात त्यांत यथाप्रमाण

चांभारांचीही कांहीं व्यवस्था व्हावी असें बोलण्यासाठीं ते गेलेले होते. ज्यांना मार बसला त्यांत तेही सांपडले. ही सर्व हकीगत ऐकून मी तेथील एका प्रसिद्ध गृहस्थांस पत्र लिहिलें कीं, आम्ही तिन्हाइतांनीं तेथें चौकशीसाठीं यावें हें तेथील गांवकऱ्यांना अवमानाचें वाटेल व म्हणून खरा खरा काय प्रकार झाला आहे तो जर आपण कळविला तर फार बरें होईल. या गृहस्थांनीं खरा प्रकारही कळविला नाहीं; इतकेंच काय पण पुढें वर्तमानपत्रांत त्यांनीं जी माझ्याविरुद्ध विनाकारण उठाठेव केली तींत मजकडून त्यांना अशा अर्थाचें पत्र गेलें होतें, याचा उल्लेखही केला नाहीं. त्यांचें उत्तर येत नाहीं असें पाहून मी व हिंदुसभेचे श्री. शंकरराव दाते असे दोघेजण महाडास गेलों. तेथें आमच्या मंडळींतील एक स्वयंसेवक श्री. चुनीलाल शेठ यांजकडेच आम्ही गेलों. सर्व पूसतपास अतिशय बारकाईनें केली. आमचे दुसरे मित्र रा. बापूराव जोशी यांजकडेही सर्व चौकशी केली. पोलीस फौजदार यांसही भेटलों. पांच-पंचवीस महार मंडळींशीं बोलणें केलें व ज्या बाईला मार बसल्याचा बोभाटा होता तिच्या घरींही जाऊन चौकशी केली. चौकशीचा इत्यर्थ इतकाच निघाला कीं महारांना मार बसला यांत कांहींच शंका नाहीं. रगतसांड झाली हेंही खरें, पण ब्राह्मणांनीं मारलें हें खोटें व बाईला मार बसला हें साफ खोटें. पुढें जी पोलीस चौकशी झाली, खटले खोकले झाले, त्यावरून पाहतां ब्राह्मणांनीं मारलें ही गोष्ट जी मुळांत खोटी होती ती तशीच ठरली व बाईला मार बसल्याचें प्रकरण तर कोर्टापुढेंही येऊं दिलें नाहीं. आयते ब्राह्मणांना जर कोर्टांत खेचतां आलें असतें व बाईला मार बसल्याचें खरोखरींच दाखवितां आलें असतें तर ब्राह्मणद्वेषी लोकांना व स्पृश्य समाजाचा पाणउतारा करावयास टपलेल्या लोकांना तें नको होतें असें मुळींच नाहीं. पण या दोहोंपैकीं एकही झालें नाहीं. चौकशी करून आम्ही परत आलों व शिवाजीमंदिरांत भाषण करून कळलेली सर्व हकीकत मी तपशीलवार सांगितली. महारांना मारल्याबद्दल मारणारांचा सडकून निषेध केला आणि ब्राह्मणांनीं मारलें व बाईला मार बसला या दोनही गोष्टी, निखालस खोट्या आहेत असें सांगितलें. यांत जें करावयास हवें होतें तेंच आम्ही केलें; परंतु ज्या लोकांनीं एक भलतेंच कुभांड रचलेलें होतें त्यांना आम्ही सांगितलेली हकीकत अतिशय बाधक ठरेल असें वाटूं लागलें व म्हणून वर्तमानपत्रांतून आम्हीच खोटें बोलणारे अशा

गप्पा वेधडक छापविण्याचा उपक्रम सुरू झाला. यांनीं लिहिलेल्या पत्रांत खटचाळपणा जणूं कांहीं कमी आहे असें वाटून संपादकांनीं आपल्या पदरच्या भरीही त्यांत घातल्या व तसलीं बदनामीचींही पत्रें प्रसिद्ध केलीं.पण या वर्तमानपत्रांचा हा धंदाच आहे असें म्हणून त्यांची, व जे चुकले ते पोरसवदा असल्यामुळें चुकले म्हणून त्यांचीही आम्ही उपेक्षाच केली. हातीं वर्तमानपत्र असल्याचा फायदा वर्तमानपत्रवाले किती घेतात व मुळांत राळ्याइतकें सुद्धां नसलेल्या गोष्टींचें थाळें कसें वनवितात याचा उत्तम अनुभव यावेळीं आला. हा पोटविषय सोडून दिला तरी स्पृश्य लोकांना काय म्हणावें हेंच आम्हांस तेव्हां कळेना. एवढा तलाव भरला असतांना अस्पृश्य माणसांना त्यांत घागर बुचकळण्याचीसुद्धां मनाई असावी व पूर्वी ती कोणत्याही कारणानें झालेली असेना कां, पण आतांही ती तशीच राहिली पाहिजे असा आग्रह त्यांनीं धरावा याचा विस्मय वाटतो. तलाव खाजगी आहे असें सिद्ध करण्याचा अजूनही मोठा खटाटोप चालू आहे असें सांगतात; पण मी म्हणतों कीं यांतूनही एक आपल्याला अनुकूल असेंच अनुमान निघतें! तलाव जर खाजगी नसला तर मग मात्र सर्वांनीं पाणी भरण्यास हरकत नाहीं असें यांतून आपोआपच निघेल! नाहींतर तो खाजगी आहे असें ठरवून घेण्यांत कांहींच अर्थ नाहीं !

गुन्हेगारांच्या वसाहती—

येथील मातंग पुढाऱ्यांची एक मोठी तक्रार चालू असे व त्या बाबतींत मी कांहीं तरी करावें अशी त्यांची अपेक्षा असे. त्यांचें म्हणणें कीं सरकारनें जीं क्रिमिनल कास्ट्स् सेटलमेंटें केलीं आहेत तेथें ज्यांस डांबून ठेविलेलें असतें त्यांत कित्येक निरपराधी असतात व कित्येक थोडयाशा अपराधासाठीं अडकविलेले असतात; अशा लोकांच्या मागचा उपद्रव नाहींसा करण्याची कांहीं खटपट करावी व यासाठीं भाटघरच्या सेटल्मेंटची पहाणी करून यावें. मि. स्टार्ट यांच्याशीं मी पत्रव्यवहार केला पण त्यांजकडून जबाब येईना. या बाबतींत त्यावेळीं असहकाराची चळवळ जोरानें चालू होती. कदाचित् त्यांना वाटलें असावें कीं आम्हीही त्यापैकींच असूं व अशा रीतीनें साखसुरत माहिती गोळा करून कांहीं कुभांड रचूं. हा संशय येऊन मी त्यांना त्याप्रमाणें लिहिलें व आश्वासिलें कीं आमचें सर्वस्वी सामाजिक काम आहे, मांग पुढारी लोकांना

ज्या बातम्या लागतात त्यांचा खरेखोटेपणा पहावयाचा आहे व जर कांहीं विधायक सूचना करतां आल्या तर करावयाच्या आहेत. हें आमचें मनमोकळें पत्र जातांच भाटघर वसाहत पहावयाची परवानगी मिळाली. आम्हांस सर्व माहिती मिळावी म्हणून त्यांनीं एक इन्स्पेक्टर तेथें धाडिले. नानासाहेब शिंदकर व मी असे पहाणी करण्यासाठीं गेलों. इन्स्पेक्टरनीं सर्व दप्तर आम्हांला खुल्या दिलानें दाखविलें व तेथें ज्यांना डांबून ठेविलें होतें त्यांच्या झोंपड्याही दाखविल्या व प्रत्येकाची कच्ची हकीकत सांगितली. आम्हीही कांहींजणांना माहिती विचारली. एक माणूस तर सात वेळां चोरी केलेला होता. आतां अशा माणसांनाही येथें ठेवावयास नको काय? हा प्रश्न खरोखर उत्पन्न होतो. भाटघरच्या बंधाऱ्याचें काम चालू होतें. त्यावर या सर्वांना मजुरीनें काम करावें लागे. अन्न पोटभर मिळत असेल यांत कांहींच शंका नाहीं व शिवाय भोंवतालीं ३।४ मैलांच्या टापूंत त्यांस मोकळेपणानें फिरावयास सरकारचा प्रत्यवाय नसे. अशा स्थितींत सरकारच्या या कृत्यांत कांहीं विशेष चूक आहे असें आम्हांस वाटलें नाहीं. एक गोष्ट मात्र आमच्या मनांत फार जोरानें भरली व ती मी केम येथील मातंगपरिषदेंत मांग श्रोत्यापुढें फार विस्तारानें सांगितली. मांगांची चोरीची प्रवृत्ति बंद करावयाची असेल तर त्याला इलाज म्हणजे शिक्षा, पुन्हां शिक्षा, जास्त शिक्षा हा नसून, त्यांना काम करून खावयास शिकविणें हाच होय. सरकारच्या पदरीं हजारों एकर जमीन पडीक आहे ती त्यांनीं यांना पिकवून खाण्यास द्यावी. त्यांस जबरदस्तीनें शेतकरी बनवावें व जर करतां शेतें सोडून ते जाऊं लागले तर त्यांना शिक्षा करावी. तेथें वाटल्यास त्यांस हजेरी ठेवावी. एकदां श्रमोपजीवनाची गोडी त्यांस लागली म्हणजे स्वाभिमान, प्रतिष्ठा ही त्यांस आपोआपच प्राप्त होतील व एकदरींत सामाजिक जीवनांत त्यांचा दर्जाही वाढेल. त्याप्रमाणेंच मांगांचा जोमुख्य धंदा म्हणजे दोर वळणें तोही कांहीं आधुनिक पद्धतीनें करावयाचें त्यांस शिकविलें व केतकाड किंवा घायपात यांची लागवड पद्धतशीर रीतीनें व विस्तृतपणें केली तर मांगांच्या बेकारीचा प्रश्न थोडा तरी सुटेल. दुसऱ्याचें लुबाडणें यांत कांहीं गैर आहे असें कांहीं जाती मानीतच नाहींत. उलट, आपली चोरी यशस्वी व्हावी म्हणून आधीं, व झाल्यास ती झाली म्हणून मागून, ते आपल्या देवतांचें पूजनही करतात. याचा अर्थ असा कीं, त्यांना आपल्या सर्व समाजानें

उत्पन्न केलेली संस्कृति व घटना मान्यच नाही. पण मांगांचें तसें नाहीं. ते अशी पूजा करीत नाहींतच पण आपण करतों हें पाप आहे असेंही त्यांस वाटतें. म्हणून त्यांना कांहीं उपजीविकेचें साधन प्राप्त करून देऊन त्यांची ही चोरीची प्रवृत्ति घालवावी हा विचार प्रबल ठरतो. दरम्यान सरकारनें वसाहती स्थापन करून त्यांजकडून कांहीं काम करून घेऊन, किंवा त्यांच्यांतील जे शिकाऊ असतील त्यांना नवे नवे धंदे शिकवून पोटास द्यावें किंवा कसें मिळवावें हें त्यांस दाखवून द्यावें हें युक्तच आहे. भाटघरहून परत आल्यावर सरकारवर आम्ही कांहीं प्रतिकूल लिहूं अशी कोणाकोणाला अपेक्षा होती. परंतु आम्हांस तसें करावयास कांहीं जागा आहे असें मुळींच वाटलें नाहीं. मांगांचा प्रश्न त्यांचा त्यांना थोडा अवघड होऊन बसला आहे. त्यांच्यापैकींच जी मांग–गारोडी म्हणून एक जात आहे ती धादांत गुन्हेगार आहे. व तिचा पक्ष घेऊन भांडावयाचें म्हणजे मोठें कठिण काम आहे. तिच्यावर पोलिसांची नजर असते व त्यांच्या हालचालीही मोठ्या हिकमतीच्या असतात. हडपसर, लोणी इकडे त्यांच्या टोळ्या आल्या होत्या. त्यांना हजेरीची भारी सक्ती असे. व आमच्यासाठीं कांहीं करा म्हणून हे लोक मजकडे आले. त्यांचें सर्व म्हणणें ऐकून घेऊन व त्यांची जी माहिती सरकारी पुस्तकावरून मला मिळालेली होती तीवरून पाहून आपण या प्रकरणांत विशेष मन घालावें असें मला वाटेना. कारण मग तेथून पुढें अस्पृश्यतेचा प्रश्न न उरतां गुन्हेगार जाती, वन्य जाती, इत्यादींच्या सुधारणेचा प्रश्न सुरू होत होता.

लोकमताचा प्रवाह––

एकदां अखिल भारतांतील मोठमोठ्या व माहीत असलेल्या लोकांच्या मताचा प्रवाह कसा वहात आहे हें पहावयाचें आम्ही ठरविलें. रोटीबेटी, पाणी, शिक्षण, धंदा इत्यादि पोटविषयांवर २५।३० प्रश्न तयार केले व त्यांची उत्तरें नांवांनीं प्रसिद्ध करणार नाहीं या अटीवर ते सुमारे हजार दीड हजार लोकांकडे रवाना केले. असेंब्लीचे, कौन्सिल ऑफ स्टेटचे, प्रांतिक कायदे-मंडळांचे सभासद, इतर प्रसिद्ध कार्यकर्ते इत्यादि सर्वांस ही प्रश्नावलि धाडली. सरासरी दोनशें लोकांकडून त्यांचीं उत्तरें आली. उत्तरें ज्यांनीं धाडिलीं त्यांनीं फार कसोशीनें विचार केला होता हें स्पष्ट दिसून आलें. अस्पृश्यांस पाणी

ज्या बातम्या लागतात त्यांचा खरेखोटेपणा पहावयाचा आहे व जर कांहीं विधायक सूचना करतां आल्या तर करावयाच्या आहेत. हें आमचें मनमोकळें पत्र जातांच भाटघर वसाहत पहावयाची परवानगी मिळाली. आम्हांस सर्व माहिती मिळावी म्हणून त्यांनीं एक इन्स्पेक्टर तेथें धाडिले. नानासाहेव शिंदकर व मी असे पहाणी करण्यासाठीं गेलों. इन्स्पेक्टरनीं सर्व दप्तर आम्हांला खुल्या दिलानें दाखविलें व तेथें ज्यांना डांबून ठेविलें होतें त्यांच्या झोंपड्याही दाखविल्या व प्रत्येकाची कच्ची हकीकत सांगितली. आम्हीही कांहींजणांना माहिती विचारली. एक माणूस तर सात वेळां चोरी केलेला होता. आतां अशा माणसांनाही येथें ठेवावयास नको काय? हा प्रश्न खरोखर उत्पन्न होतो. भाटघरच्या बंधाऱ्याचें काम चालू होतें. त्यावर या सर्वांना मजुरीनें काम करावें लागे. अन्न पोटभर मिळत असेल यांत कांहींच शंका नाहीं व शिवाय भोंवतालीं ३।४ मैलांच्या टापूंत त्यांस मोकळेपणानें फिरावयास सरकारचा प्रत्यवाय नसे. अशा स्थितींत सरकारच्या या कृत्यांत कांहीं विशेष चूक आहे असें आम्हांस वाटलें नाहीं. एक गोष्ट मात्र आमच्या मनांत फार जोरानें भरली व ती मी केम येथील मातंगपरिषदेंत मांग श्रोत्यापुढें फार विस्तारानें सांगितली. मांगांची चोरीची प्रवृत्ति बंद करावयाची असेल तर त्याला इलाज म्हणजे शिक्षा, पुन्हां शिक्षा, जास्त शिक्षा हा नसून, त्यांना काम करून खावयास शिकविणें हाच होय. सरकारच्या पदरीं हजारों एकर जमीन पडीक आहे ती त्यांनीं यांना पिकवून खाण्यास द्यावी. त्यांस जबरदस्तीनें शेतकरी बनवावें व जर करतां शेतें सोडून ते जाऊं लागले तर त्यांना शिक्षा करावी. तेथें वाटल्यास त्यांस हजेरी ठेवावी. एकदां श्रमोपजीवनाची गोडी त्यांस लागली म्हणजे स्वाभिमान, प्रतिष्ठा ही त्यांस आपोआपच प्राप्त होतील व एकदरींत सामाजिक जीवनांत त्यांचा दर्जाही वाढेल. त्याप्रमाणेंच मांगांचा जोमुख्य धंदा म्हणजे दोर वळणें तोही कांहीं आधुनिक पद्धतीनें करावयाचें त्यांस शिकविलें व केतकाड किंवा घायपात यांची लागवड पद्धतशीर रीतीनें व विस्तृतपणें केली तर मांगांच्या बेकारीचा प्रश्न थोडा तरी सुटेल. दुसऱ्याचें लुबाडणें यांत कांहीं गैर आहे असें कांहीं जाती मानीतच नाहींत. उलट, आपली चोरी यशस्वी व्हावी म्हणून आधीं, व झाल्यास ती झाली म्हणून मागून, ते आपल्या देवतांचें पूजनही करतात. याचा अर्थ असा कीं, त्यांना आपल्या सर्व समाजानें

उत्पन्न केलेली संस्कृति व घटना मान्यच नाहीं. पण मांगांचें तसें नाहीं. ते अशी पूजा करीत नाहींतच पण आपण करतों हें पाप आहे असेंही त्यांस वाटतें. म्हणून त्यांना कांहीं उपजीविकेचें साधन प्राप्त करून देऊन त्यांची ही चोरीची प्रवृत्ति घालवावी हा विचार प्रबल ठरतो. दरम्यान सरकारनें वसाहती स्थापन करून त्यांजकडून कांहीं काम करून घेऊन, किंवा त्यांच्यांतील जे शिकाऊ असतील त्यांना नवे नवे धंदे शिकवून पोटास द्यावें किंवा कसें मिळवावें हें त्यांस दाखवून द्यावें हें युक्तच आहे. भाटघरहून परत आल्यावर सरकारवर आम्ही कांहीं प्रतिकूल लिहूं अशी कोणाकोणाला अपेक्षा होती. परंतु आम्हांस तसें करावयास कांहीं जागा आहे असें मुळींच वाटलें नाहीं. मांगांचा प्रश्न त्यांचा त्यांना थोडा अवघड होऊन बसला आहे. त्यांच्यापैकींच जी मांग-गारोडी म्हणून एक जात आहे ती धादांत गुन्हेगार आहे. व तिचा पक्ष घेऊन भांडावयाचें म्हणजे मोठें कठिण काम आहे. तिच्यावर पोलिसांची नजर असते व त्यांच्या हालचालीही मोठ्या हिकमतीच्या असतात. हडपसर, लोणी इकडे त्यांच्या टोळ्या आल्या होत्या. त्यांना हजेरीची भारी सक्ती असे. व आमच्यासाठीं कांहीं करा म्हणून हे लोक मजकडे आले. त्यांचें सर्व म्हणणें ऐकून घेऊन व त्यांची जी माहिती सरकारी पुस्तकावरून मला मिळालेली होती तीवरून पाहून आपण या प्रकरणांत विशेष मन घालावें असें मला वाटेना. कारण मग तेथून पुढें अस्पृश्यतेचा प्रश्न न उरतां गुन्हेगार जाती, वन्य जाती, इत्यादींच्या सुधारणेचा प्रश्न सुरू होत होता.

लोकमताचा प्रवाह--

एकदां अखिल भारतांतील मोठमोठ्या व माहीत असलेल्या लोकांच्या मताचा प्रवाह कसा वहात आहे हें पहावयाचें आम्ही ठरविलें. रोटीबेटी, पाणी, शिक्षण, धंदा इत्यादि पोटविषयांवर २५।३० प्रश्न तयार केले व त्यांची उत्तरें नांवांनीं प्रसिद्ध करणार नाही या अटीवर ते सुमारे हजार दीड हजार लोकांकडे रवाना केले. असेंब्लीचे, कौन्सिल ऑफ स्टेटचे, प्रांतिक कायदे-मंडळांचे सभासद, इतर प्रसिद्ध कार्यकर्ते इत्यादि सर्वांस ही प्रश्नावलि धाडली. सरासरी दोनशें लोकांकडून त्यांचीं उत्तरें आलीं. उत्तरें ज्यांनीं धाडिलीं त्यांनीं फार कसोशीनें विचार केला होता हें स्पष्ट दिसून आलें. अस्पृश्यांस पाणी

द्यावें या प्रश्नावर उत्तरें देणारांचें मोठें वहुमत दिसून आलें. सहभोजनाला मात्र अत्यंत अल्प असें मत दिसून आलें. हीं प्रतिकूल उत्तरें धाडण्यांत स्वत: मांसाशनी असे अनेक लोक होते हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. पण हे ठोकळ प्रश्न जरी वाजूस ठेवले तरी अस्पृष्टांच्या इतर प्रश्नांसंबंधीं आलेल्या उत्तरांत अनेक सुंदर विचार प्रदर्शित केलेले होते. पैकीं तीन ठळक म्हणून नमूद करतों. तुम्ही कितीही खटपट करा, अस्पृश्यांची आर्थिक स्थिति सुधारल्याशिवाय अस्पृश्यता कधींही पुरती जावयाची नाहीं हें मत अनेकांनीं आग्रहानें प्रतिपादिलें होतें. एका वकीलांनीं शिक्षणाविषयीं लिहितांना कळविलें कीं वर्गांत जर वहुतेक मुलें स्पृश्यांचीं व शुद्ध उच्चार–आचाराचीं असलीं तर त्यांत थोडीं मुलें अस्पृश्यांचीं असावयास कांहींच हरकत नाहीं; त्यांचा फायदाच होईल. पण जर हें प्रमाण उरफाटें असलें तर मात्र स्पृश्य व चांगल्या संस्कृतीच्या मुलांचें नुकसान होईल. तिसरा एक असा विचार लिहून आला कीं जर यांना मुरदाड मांस खाण्यापासून परावृत्त केलें तर हे जिवंत गुरें मारून खातील. अगोदरच गुरें इतकीं कमी होत चाललीं आहेत कीं यांच्यासाठीं आणखी कापावयाचें ठरलें तर गुरें आणखी कमी होतील. पहिले दोन विचार खरोखरच विचारार्ह आहेत. पण तिसरा सर्वथा त्याज्य आहे, कारण कीं यांच्यासाठी जर गुरें मारावयाचीं नसलीं तर ज्यांच्यासाठीं मारलीं जातात त्यांच्यासाठीं तरी तीं कां मारलीं जावीं? जगांतलीं गुरें जिवंत ठेवण्याची जवाबदारी त्यांच्यावरच आहे कीं काय?

पुण्यास देवळाबद्दल खटपट–

स्वतंत्र देऊळ वांधण्याचा नाद आम्ही मागेंच सोडला होता. पण देवालय-प्रवेश अस्पृश्यांना असावा हें मत मात्र कायम आहे. त्यास अनुसरून पुणें शहरांत काय करतां येतें हें पहावयाचें ठरवून त्या उद्योगास लागलों. आपण कांहीं करावयास निघालों तर प्रथम त्या त्या वेळीं जीं इतर विषयां-तील मतांतरें गांवांत चालू असतील त्याची वाधा आपल्याला होऊं नये या विषयीं जागरूकच असावें लागतें. पुण्यांत देवळें काय तीं ब्राह्मणांचीं आहेत असें थोडेंच आहे? पण सगळीकडेच सांगत सुटलों तर आणखी मारामाऱ्या सुरू व्हावयाच्या हें ओळखून शुक्रवार, बुधवार, शनवार, कसबा, नारायण,

सदाशिव या पेठांतल्या देऊळवाल्यांची सभा करावी, त्यांस उपस्थित प्रश्न कोणचा हें सांगावें, भावी काल कसा येणार आहे हें पटवून द्यावें या हेतूनें एक पत्रक काढलें व प्रत्येक देऊळवाल्याला आमंत्रण केलें. दर देऊळवाल्याला भेटून तो जें जिज्ञासेनें विचारील त्याचें त्याचें उत्तर देऊन जें कांहीं निषेधाचें बोलेल तें सहन करून आमंत्रणें द्यावयाचीं म्हणजे अवघड काम होतें. पण मला कार्यकर्तेही एक चांगला भेटला. आमच्याच शाळेंतून उत्तम तऱ्हेनें कॉलेजांत गेलेले आमचे स्वयंसेवक रा. विंझे यांनीं फार मेहनत केली. एकूण-एक देउळवाल्याकडे ते स्वत: गेले. मोरोबादादाच्या वाडयांत सभा ठरलेली होती. सरासरी ३९ देवळांचे मालक त्यांस भेटले होते व आपण सभेस जरूर या असें त्यांनीं त्यांस विनविलें होतें. खुद्द सभेच्या दिवशीं पुन्हां एकदां या सर्व गृहस्थांकडे ते जाऊन आले. आम्हांस वाटलें आतां दुपारीं चांगलें काम होईल. म्हणून सभेच्या आधीं हरीभाऊ फाटक, मी व विंझे तिघेजण वाडयांत जाऊन श्रोत्यांची मार्गप्रतीक्षा करीत बसलों. वाट बघतां बघतां शेवटीं दोन माणसें आलीं. एक आमच्या वयाचे गृहस्थ व दुसरा बारा वर्षांचा मुलगा! आम्हांस वाटलें कीं हे तरी हस्तगत होतील. पण त्यांतही निराशा झाली. ते जे गृहस्थ आले होते त्यांच्या देवळाला आंतवाहेर असें कांहीं नव्हतें! देव जवळजवळ उघडयावरच असल्यामुळें आमचा जो मुद्दा कीं निदान दर्शनास मोकळीक द्या तो कांहीं यातायात न करतां साध्य झाला होता! दुसरा जो मुलगा आला होता त्याला आम्ही काय म्हणालों हें मुळींच कळण्यासारखें नव्हतें. आमचें म्हणणें ऐकल्यावर जातांना त्यानें इतकेंच आश्वासन दिलें कीं, "हें सगळें आईला जाऊन सांगतों"! इतकें होऊन ही सभा संपली. इतर देऊळवाले कोणी आलेही नाहींत किंवा त्यांनीं निदान निषेधाची तरी चिटी-चपाटीही धाडली नाहीं! त्यांनीं आमची विनंति उपेक्षेनेंच त्याज्य ठरविली! मला तेव्हां त्याचें मोठें वाईट वाटलें. ही गोष्ट सन १९२५-२६ सालची होय. पण १९३० सालापासून पुढें जी देवालय-प्रवेशाची चळवळ झाली व तिच्यांत जे रागलोभ खवळले ते पाहिले तेव्हां हें काम केवढें विकट आहे याचा मला पुन्हा एकदां प्रत्यय आला व सारखे श्रम करीत राहिल्यावांचून हा प्रश्न सुटावयाचा नाही हें ध्यानांत आलें.

गणेशोत्सवांत अस्पृश्यांचा गणपति—

देवालय–प्रवेश कधीं होईल तो होवो पण त्या विषयाकडची वाट तरी निदान मळावी म्हणून सार्वजनिक उत्सवांत अस्पृष्टांचा प्रवेश करून द्यावा या हेतूनें गणपति–उत्सवांत अस्पृश्यांनीं सामील व्हावें असें आम्हीं ठरविलें. अस्पृश्यांचेच सार्वजनिक गणपति वसविण्यास सांगितलें व मंडळानें सर्व हिंदूंचा गणपति या नांवाचा गणपति बॅरिस्टर गाडगीळ यांच्या बखळींत बसविला. गणपतीची सर्व व्यवस्था अस्पृश्यांचीं मुलें आमच्या स्वयंसेवकांत मिळवून घेऊन केली. रोज व्याख्यानेंहि केलीं व त्रयोदशीच्या दिवशीं गांवांतील अनेक शिष्ट लोकांना मुद्दाम निमंत्रण करून आणिलें. व या नव्या संप्रदायाला त्यांची मान्यता मिळविली. अस्पृश्यता–निवारणांतील गेल्या बारा महिन्यांत जी कांहीं प्रगति झाली असेल तिचा विवेचक आढावा समाजापुढें याचवेळीं सांगण्याचा परिपाठहि आम्हीं पाडला. चतुर्दशीच्या दिवशीं मिरवणुकींत सामील व्हावयाचें होतें. आमच्या गणपतीवरोबरच खूप अस्पृश्य लोकहि येतील अशी अपेक्षा होती. त्याप्रमाणें कोणच्या गणपतीच्या मागें आम्हीं चालावयाचें हें त्या गणपतीवाल्यांशीं आधीं ठरवून त्याप्रमाणें आम्हीं मिरवणुकींत शिरलों. गणपतीपुढें शेंकडो स्पृश्यास्पृश्य तरुण लोक हातांत हात घालून आनंदानें नाचत चालले होते. रा. कोकजे (ज्ञान-प्रकाशचे बातमीदार) यांनीं या उत्सवाच्या बाबतींत फारच मोठी मदत केली. मतप्रसाराच्या दृष्टीनें व एकेक गोष्ट पुढें पुढें नेण्याच्या दृष्टीनें उत्सवांत सामील होण्याच्या या पद्धतीचा पुष्कळच उपयोग झाला. आण्णासाहेब भोपटकर हे आमचे अध्यक्ष म्हणून आमच्या गणपतीच्या मेळ्यांत कांहीं वेळ चालत व मग शहरांतील पुढारी म्हणून मुख्य गणपतीवरोवर चालत व शेवटीं जिमखान्यावरील प्रचंड लोकसमुदायापुढील व्याख्यान करीत. तेथें जमणारा समाज अर्थात् सर्व सनातनी असतो. अस्पृश्यांच्या मेळांत कांहीं वेळां पूर्वी असलेला पुढारी सनातनी श्रोत्यांच्यापुढें लोकप्रिय म्हणून बोलावयास उभा राहणें ही लोकशिक्षणाच्या दृष्टीनें फार बोधप्रद गोष्ट होती. पुढल्या वर्षीपासून हा उत्सव आम्ही मोरोवादादांच्या वाड्यांत अगदीं घरांतच नेला. व्याख्यानें इत्यादि प्रकार होऊन त्रयोदशीच्या दिवशींचा आढावा, चतुर्दशीच्या दिवशींचा पानसुपारीचा प्रसंग फार मोठ्या प्रमाणांत होऊं लागला. संभावित

अशा स्पृश्यास्पृश्य स्त्री–पुरुषांचा मोठा समुदाय या प्रसंगीं जमत असे. माझें आढाव्याचें भाषण झालें म्हणजे आण्णासाहेब आपलें भाषण करून उत्सवाचा समारोप करीत. हा उत्सव पुष्कळ दिवस चालला होता. यांतीलच एका प्रसंगीं आर्यसमाजाचे येथील प्रतिनिधि यांनीं मला एक हकीकत सांगितली ती देतों. स्वामी श्रद्धानंद यांच्या मनांत पुणें शहरांत आर्यसमाजाचा मोठा मठ स्थापान करावयाचें होतें. या बाबतींत पत्रव्यवहार चालूं असतां पं. विद्याधर पुरी यांनीं स्वामीस कळविलें " येथें मठाची इतकीशी जरूरी नाहीं; येथें ब्राह्मण-लोकसुद्धां अस्पृश्यांच्या हितासाठीं खूप जोरानें खटपट करीत असतात." ही हकीकत त्यांनीं मला आमच्या गणपतीच्या मेळ्यांत चालत असतांना सांगितली. ही बाब रूढ होऊन गेल्यानंतर अलीकडे अलीकडे मंडळानें उत्सव करण्याचें सोडून दिलें आहे. या गणेशोत्सवाच्या बाबतींत आणखी एक गोष्ट सांगावयास हवी. एका चांभार मुलीला सेवासदनामध्यें प्रविष्ट करून घ्यावी अशी विनंति करण्याकरतां कै. रमाबाईसाहेब रानडे यांजकडे गेलों होतों. कै. रानडे यांची केवळ पडछायारूप असलेल्या या थोर स्त्रीशीं झालेलें संभाषण मला अजून चांगलें आठवतें.त्याची आठवण झाली म्हणजे खुद्द रानडे स्वतः केवढे थोर असतील याचें मनानें चिंतन करावेसें वाटतें. रमाबाईनीं माझ्या विनंतीचा अत्यंत सहभावानें विचार केला. त्यांनीं आधींच एक दोन अस्पृश्य मुलींना प्रविष्ट करून घेतलेंच होतें. मी ज्या मुलीविषयीं सांगत होतों "तिचें पांचवीपर्यंत शिक्षण होऊं द्या, मग मी तिला घेतें" असें त्यांनीं मला आश्वासन दिलें. ज्या अस्पृश्य स्त्रीपुरुषांना मी हा रमाबाईंचा सद्भाव वर्णून सांगितला त्यांचा असा फार आग्रह होता कीं त्यांना आपल्या वस्तींत आणावें. पण विशेष प्रसंग असा कांहीं नसल्यानें तें घडलें नाहीं. लवकरच रमाबाई वारल्या. पण आम्ही सुरू केलेल्या गणेशोत्सवांत सदनांतील वगैरे स्त्रियांनीं येऊन मदत करावी अशी इच्छा दर्शविल्यावरून श्रीमती जानकी-बाई भट व हिंगणें येथील आश्रमांतील श्रीमती वारूताई शेवडे या इतर कांहीं स्त्रियांसह ठिकठिकाणीं व्याख्यानें देण्यास आल्या होत्या.

प्रचारकांची शाळा—

अस्पृश्यता–निवारणाचा प्रश्न जों जों महत्त्वानें वाढत चालला तों तों जास्त

प्रचारकांची जरूरी आहे हें दिसूं लागलें. प्रचारक नुसते संख्येनें जास्त असून चालावयाचें नाहीं तर ते चांगले माहितगार, बहुश्रुत, बोलके, हजरजबाबी, पाठांतर केलेले व विषयाची मनापासून आवड असणारे असावयास हवेत. असे प्रचारक आयते कोठून मिळणार? ते तयार करावयास हवेत. त्यासाठीं चांगल्या होतकरू माणसांची निवड करून, त्यांस शिक्षणासाठीं येथें ठेवून घेऊन त्यांचें शिक्षण आपल्या कल्पनेप्रमाणें भरपूर व योग्य झालें आहे असें पाहून व पारखून घेऊन त्यांस जिल्होजिल्हीं प्रचारार्थ धाडावयास हवें. तरच हें काम शास्त्रशुद्ध, तर्कशुद्ध आणि लोकांना स्वीकार्य असें वाटेल. वक्त्याला भूतदया व शुद्ध धर्मबुद्धि यांविषयीं आस्तिक्यबुद्धि व प्रेम असावें. तो केवळ धंदेवाईक न बनतां त्याला या विषयाचा ध्यास किंवा निदान चुटपुट तरी लागलेली असावी. या वक्त्यांनीं विषयांची गल्लत करतां कामा नये व हे आपल्या संस्कृतीची हत्या करावयास आले आहेत असेंहि श्रोत्यांस वाटूं नये. उलट हा आपला मित्र आहे, आपलें कांहीं चुकत आहे तें दुरुस्त व्हावयास हवें असें आत्मबुद्धीनें सांगावयास आला आहे अशी त्याच्याविषयीं-ची कल्पना व्हावी. असे प्रतिपादक तयार करण्याची मला इच्छा होती. परंतु वक्ते निदान तीनचार महिने येथें जवळ बाळगून पुढें त्यांना वर्ष दीडवर्ष महाराष्ट्रांत फिरत ठेवणें हें मोठें खर्चाचें काम आहे. दहा हजार रुपये हाताशीं असले तर हें काम करून दाखवितां येण्यासारखें आहे असा मला बळकट भरंवसा आहे. पण आम्हांला पैसा वावडा नसला तरी पैशाला आम्ही वावडें आहों असें दिसतें. येवढी रक्कम आपल्या हातीं सांठेल व ती खर्चतां येईल हें कांहीं शक्य कोटींतील दिसेना. म्हणून आपले अभिमान सगळे दूर ठेवून महाराष्ट्रांतील थोर धनिकांना, कीं ज्यांना सार्वजनिक कामांची लज्जत आहे व त्यासाठीं जे थोडाबहुत स्वार्थत्यागहि करतात त्यांना विस्तृत विनंति-पत्रें लिहिलीं. वर सूत्ररूपानें लिहिलेली प्रचारक तयार करण्याची कल्पना त्यांज-पुढें सविस्तरपणें मांडून पैशाची कांहीं जमवाजमव करितां येईल कां अशीही पृच्छा केली; परंतु मला लिहावयास दुःख वाटतें कीं या दहाबारा लोकांपैकीं एकाहि माणसानें कल्पना उचलून धरली नाहीं, इतकेंच नव्हे तर दोन ओळींचें उत्तर धाडून सुद्धां मला उपकृत केलें नाहीं. हे सर्व लोक थोरच आहेत कारण हे थोर आहेत हें सर्व लोकांना माहीत आहे व त्या मानानें मी अगदींच लहान

असेंहि पदवीपरत्वें त्यांस वाटणें स्वाभाविक होतें. पण निदान विषयाच्या महत्त्वाकडे लक्ष देऊन तरी त्यांनीं नुसतें हो ना म्हणावयास तरी हरकत नव्हती. पण तें झालें नाहीं. ही प्रचारक तयार करण्याची कल्पना मला फार महत्त्वाची वाटत असल्यामुळें मी ती अजून सोडली नाहीं. दरम्यान पंडित मदन मोहन मालवीय हे येथें आले असतांना दोन खेपांस मी त्यांजपुढें ती मांडली. रा. दिवेकरहि बरोबर होतेच. पैकीं पहिल्या खेपेस पैशाची कांहीं तरतूद कराल काय अशी मी विनंति केली. आमच्या वाकीच्या हकीकती-संबंधानें मोठें चांगलें मत दर्शवून ही पैशाची गोष्ट निघाल्याबरोबर त्यांनीं हिंदु महासभेच्या चिटणीसाकडे अर्ज करा असें मला एकाच वाक्यांत सांगून टाकलें. दुसऱ्या खेपेस मी पैशाचें मुळींच बोललों नाहीं. पण अशी व्यवस्था करावयास नको काय असें त्यांस विचारलें. माझ्या सूचनेस होकार भरून ते एवढेंच म्हणाले कीं अशा तऱ्हेचें एक कॉलेज नाशिक येथें काढा. हिंदुमहासभेच्या चिटणीसांकडे अर्ज करावयास किंवा नाशिक येथें कॉलेज काढावयास मला या पंडितजीची 'परवानगी' मुळींच नको होती. या बाबतींत हे स्वतः कांहीं करावयास तयार आहेत का हें विचारावयाचें होतें. असो. पुढें माझ्या वगीच्या हिंदुमहासभेच्या चिटणीसांना यासंबंधीं प्रत्यक्षच विचारलें व उत्तरेकडील मोठमोठाल्या श्रीमंत मारवाड्यांचीं नांवें घेऊन हे कांहीं देणार नाहींत काय असें विचारलें. त्यांनीं खासगतांत उत्तर म्हणून जें दिलें तें मोठें बोधप्रद आहे. ते म्हणाले, "ते तिकडील मोठे लोक आपणा दक्षिण्यांच्या हातावर एक कपर्दिकहि कधीं ठेवावयाचे नाहींत." मग मी जास्त खोलांत शिरलों नाहीं. शक्य झालें तर मात्र ही कल्पना मला केव्हांना केव्हां तरी अंमलांत आणावयाची आहे.

स्त्रियांस मारणें--

स्त्रियांना मारणें हें सर्वच समाजांतील फाजील पुरुषांचें तोंडी लावणें आहे, आणि जों जों व्यसन, दारिद्र्य, अज्ञान जास्त तों तों हा स्त्रियांचा भाजाकार जास्तच होतो. माणसाच्या अहंतेला खेळावयास कोठें तरी जागा हवी असते. खांद्यावर कुऱ्हाड टाकून "लाकडं फोडायचीं आहेत कां लाकडं" करीत फिरण्यांत दिवसमान गेल्यावर व मुकादमाच्या चिरचिरींत नाला

उकरण्याखालीं दमून भागून घरीं आल्यावर आपणही कोणी तरी आहों एवढें वाटवून घेण्याची संधि या कष्टाळू माणसाला मिळावी असें आपल्याला सुद्धां वाटेल; पण या वाटण्यामुळें त्याची अहंता इतकी प्रबळ बनते कीं तो बायकोला टाफरावयास लागतो व आपलें दुर्दैव जसें कांहीं इच्यामुळेंच ओढवलें आहे अशा भावनेनें तिच्याशीं तिरस्कारानें वागतो. वास्तविक तिच्याकडे काय आहे! पण दुसऱ्याला टाकून बोललें, रागें भरलें, व डोळे वटारून जरा इकडे तिकडे फुसफुसून पाहिलें म्हणजे माणसाला जरा बरें वाटतें. आणि एवढ्यानेंही ज्यांचें भागत नाहीं ते बायकांस प्रत्यक्षच मारीत सुटतात. संसारां-तील ही अगदींच प्राकृत आपत्ति स्त्रिया निमूटपणें सोसतात; यांतच पुरुष सुख मानितात व स्त्रियांविषयीं चांगलें मत बनवून त्यांच्या विनयाचें स्तवन करतात. हा स्त्रियांचा खरोखर अवमानच होय. पण आपलें सगळें गाडें येथवरच आलेलें आहे! एकदां रात्रीं सरासरी दहाच्या सुमारास मी एका वस्तींतून परत येत होतों. अंधारच होता पण अंधार असला तरी थोडातरी उजेड असतोच, तसा होता. सडकेच्या कांठाला एक बाई बसली होती. कांहीं तरी कुरबुर चालू होती. ती व तिचा नवरा मला चांगली माहीत होतीं. इतक्यांत त्या बेफाम नवऱ्यानें आपल्या पावलाची वरची बाजू, पाय फिरवून तिच्या कानफडांत येवढ्या जोरानें मारली कीं त्या आवाजासरशी मी थबकून उभाच राहिलों. ती बाई अगदीं कळवळली. मारण्याची तरी काय तऱ्हा पहा! मी थबकतांच तो पशूही थोडा वरमलाच व नमस्कार करून केलेल्या अपराधाची थोडी निष्कृति करूं लागला. मी तरी काय बोलणार? नवराबायकोचें भांडण; मी त्यांत काय बोलावें? दुसरे दिवशीं तिला पुन्हां विचारलें पण तीही बापडी म्हणाली "कांहीं नाहीं, मास्तरजी, त्ये दारू प्यायले होते"! यांत आमचें सर्व तत्त्वज्ञान विरघळून गेलें. दारू प्यालेल्या पुरुषां-च्या मोठमोठ्या मारामाऱ्या बायकांनीं मध्यें पडून मिटवाव्या असे प्रकार तर या समाजांत किती तरी चालतात. आमच्या एका शाळेसमोर दोनचार दारुडे जुगार खेळत होते. रा. पोंक्षे मास्तरांनीं परोपरीनें सांगितलें कीं, आम्हीं आंत मुलांना शिकवीत आहों, तुम्ही मेहेरवानी करून येथें आरडाओरडा करूं नका व जुगारहि खेळूं नका. मास्तरांनीं एकदोनदां असें सांगतांच हे दारुडे जुगारी एकदम खवळले व मास्तरांना दोन्हीकडून धरून त्यांना सांदींत

कोंबूं लागले. सुदैवानें शाळेंत शिकत असलेल्या मुलांच्या आया तेथें आल्या व त्यांनीं आपल्या पुरुषांची चांगली खरडपट्टी काढून मास्तरांना सोडविलें.

पोथीवाचन––

एके वर्षीं श्रावण महिन्यांत आमच्या एका शाळेंत आम्हीं पोथी वाचण्याचा उपक्रम केला. ज्या अस्पृष्ट बाईच्या ओसरीवर शाळा भरत असे, ती फार भली बाई होती. पोथीच्या वेळेस आजूबाजूच्या बायांना बोलवून आणून मोठ्या भाविकपणानें हें पुराण–श्रवणाचें काम ती करीत असे. एकदां असें झालें कीं, पुराण सांगतांना मी एका दारुड्याची हकीगत सांगावयास सुरुवात केली. या बाईचा मुलगासुद्धां फार चांगला माणूस होता. पण त्याला दारूचें व्यसन फार. शुद्धीवर असला म्हणजे रेशमाहून मऊ पण एकदां का झिंगला म्हणजे त्याच्या जिभेला हाड उरत नसे. मी पोथी सांगूं लागलों, त्यावेळीं तोहि येऊन बसला होता, व चांगला शुद्धीवर होता. दारू पिणारे लोक हे शुद्धीवर असतांना दारू पिण्याच्याच अंगानें बोलत नाहींत, इतकेंच नव्हे तर कोठें दारू पिण्याची निर्भर्त्सना चालू असली तर तिच्यांत खुषीनें सामील होतात असा अनुभव आहे. पुराण सांगतांना दारुड्याच्या गृहस्थितीविषयीं मीं फार बारकाईनें वर्णन चालू केलें; व या कामांत मला कांहीं विशेष कष्ट पडणार होते असें मुळींच नव्हे. थोडचा आडपडद्यानें त्यांच्याच आळींतल्या माहितीच्या हकीगती सांगावयाच्या! "आपणांस जें कांहीं बाहेर मिळेल तें सगळेंच्या सगळें जर घरीं आणलें, तर बायकोच्या जिवाला आनंद होतो. कारण तुमच्या संबंधानें तिच्या मनांत जो प्रेमभाव असेल, तो व्यक्त करण्याला तिच्या हातीं थोडासा पैसा असल्यामुळें असेल त्यांतच, पण कोंडयाचा मांडा करून ती तुमच्या पानांत वाढील; तुम्हीं देह कष्टवून घरीं आलां म्हणजे तुमच्या शिणलेल्या पायांना तेल लावून ते ती ऊन पाण्यानें धुवील आणि तयार केलेला मांडा तुम्हांस–कदाचित् आपण अर्धपोटीं राहून सुद्धां–खाऊं घालील. आपलें जेवण, उष्टींखरकटीं लवकर आवरून उद्यां काम कोठें आहे, त्यांतलें मला कांहीं उरकतां येण्यासारखें आहे का, असें मोठ्या गोडीनें तुम्हांस विचारील; संध्याकाळीं तुम्हीं कामावरून येतांना न झिंगतां घरीं याल तर लांबूनच तुम्हांला पाहून बाबा आले, बाबा आले, म्हणून तुमच्या

स्वागतासाठीं मुलेंलेकरें धांवत पुढें येतील. आणि तुमच्या पायांना चोहोंकडून कवटाळून मला काय आणलें, मला काय आणलें, असा एकच गिल्ला करतील. तुम्हींही त्यांच्यापैकीं कोणास खांद्यावर, कोणास काखेंत घेऊन हंसत हंसत दाराशीं येऊं लागलां म्हणजे तें तुमचें सुख पाहून, तुमची संसाराची वांटेकरीण आनंदानें गदगदून हंसेल. हा आनंद तुम्हांला दारूच्या आनंदापेक्षां जास्त चांगला वाटत नाहीं काय? दारूच्या निशेंत हांसडलेल्या शिव्यांनीं तुमचें घर भरावें त्या ऐवजीं मुलावाळांच्या आनंदानें तें भरलें तर तें चांगलें नाहीं काय? " असें माझें प्रतिपादन चालू असतां श्रोते मंडळींत एक तऱ्हेचा उल्हास पसरत चाललेला होता. पुरुष मंडळी मालविल्यासारखी होऊन स्त्रिया एक-मेकींकडे अभिप्रायानें पहात होत्या. बाईचा मुलगा जवळच माझ्या उजव्या हाताच्या ओळींत वसला होता. व खुद्द बाई माजघरच्या दारांत वसलेली होती. माझें प्रवचन तसेंच चालू राहिलें, मी म्हणालों, "तुमचीं मुलें आमच्या शाळेंत शिकावयास येतात. पण कित्येकदां असें होतें कीं, तुमच्या आळींतील चांगलीं कर्तीं सवरतीं माणसें दारू पिऊन शाळेंत येऊन बसतात, व तेथेंच कोपऱ्यांत पिचकाऱ्या मारतात. हें फार वाईट असल्यामुळें आम्हांला तुमच्या-विरुद्ध बोलावें लागतें. पण वाईट या गोष्टीचें वाटतें कीं, आमच्या बोलण्या-मुळें तुमच्या मुलांच्या मनांत तुमच्यासंबंधीं अवहेलना, उपहास हीं उत्पन्न होतील, तीं तुम्हांस हिडीसफिडीस करूं लागतील. पण आपल्या मुलांनीं आपल्याला वाईट लेखावें हें जर नको असेल तर तुम्ही आपलें वर्तन सुधारलें पाहिजे. मुलांनीं आपली अब्रू संभाळावी असें जर वाटत असेल तर तुम्हींहि आपल्या आईबापांची अब्रू जपली पाहिजे. कारण तुम्ही दारू प्यालांत म्हणजे लोक म्हणतात कीं यांच्या आयांनीं यांना लहानपणीं चांगला मार्ग कां दाखविला नाहीं?" इतकें बोलून मी जों पुढें सरणार तों ती वयस्कर बाई तटकन् उभी राहिली, आणि दोनही हात मुलाच्या पुढें पसरून व तोंड मजकडे वळवून गहिंवरून म्हणाली, "ह्याला, ह्याला विचारा! ह्याला कसा वाग-विला अन् कसा वाढविला! पण हा बापई होतांच गाढवाचं ××पिऊं लागला, अन् घरादाराचा आतां उन्हाळा करीत आहे. बायकोला मारतो, मला मारतो, अन् हा चांडाळ घरीं आला म्हणजे पोरें माराच्या भयानें दहा हात दूर पळतात"! बाईनें आपलें मनोगत अगदीं उघडें करून सांगितलें. जमलेले पुरुष खालीं

मान घालून वसले, आणि बाईनें सांगितलेली हकीगत जरी अक्षरशः खरी असली तरी हा गृहच्छिद्राचा उच्चार असल्यामुळें बाकीच्या बाया लाजेनें खालीं पाहूं लागल्या. खरोखर शेकडों अस्पृष्ट स्त्रियांच्या कपाळीं हा भाजाकार लिहिलेला असतो. निशा न करणाऱ्या गृहस्थाला गृहसौख्य कशा प्रकारचें लाभत होतें याचें मीं जें वर वर्णन दिलें आहे त्यानें स्त्रियांच्या चित्ताला गरगरून भरतें आल्याचें मला स्पष्ट दिसलें. असो. सांगण्याचा मतलब हा कीं, दारू, जुगार, व हॉटेल, यांच्यापायीं नवऱ्याचा बहुतेक पैका उडत असल्यामुळें शेंकडो अस्पृष्ट स्त्रियांना मोठी जिगजिग उत्पन्न होते. पण या वरोवर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, ज्या ठिकाणीं नवरा थोडा शिकलेला, जगतांत काय चाललें आहे हें पाहणारा, आपल्या संबंधानें जी चळवळ चालू आहे ती आपल्या वर्तनानें आपण ज्यास्त यशस्वी केली पाहिजे हें उमगणारा असा असतो तेथें त्याची घरधनीण अतिशय टापटिपीनें राहणारी, संसार दक्षतेनें करणारी अशी असते. माझ्या ओळखीच्या एका महार गृहस्थाच्या घरीं मी एकदां कशालासा गेलों होतों. हा गृहस्थ मोटार ड्रायव्हर असून त्याला महिना ६०–७० रुपये मिळत असत. त्याच्या घरची टापटीप पाहिली व थक्क झालों. स्वयंपाकघर व माजघरासारखी असलेली खोली यांतील व्यवस्था फारच चांगली ठेविलेली होती. एकदां त्यांच्याच एका आळींतील महादेवाच्या देवळांत स्त्रिया पूजेचें साहित्य घेऊन जात असतांना मीं पाहिल्या. यांचे पुरुष चांगले कर्तबगार, शहाणे व आपल्या भलेपणाच्या वळावर सभ्य लोकांत वागणारे असे होते. अर्थात् तेंच वळण घरच्या माणसांनाहि लागलेलें होतें. म्हणूनच मागें म्हटलें आहे कीं पुरुषांचा दर्जा जों जों वाढेल, ते जों जों चांगले होत जातील, तों तों स्त्रियांची पदवी उंच होत जाईल.

कै. वासुदेवराव आपटे—

एके दिवशीं सकाळीं आठाच्या सुमारास कै. वासुदेवराव आपटे, आनंद मासिकाचे संस्थापक, हे मजकडे आले. काखेंतील बोचकें शेजारीं ठेवून ते खालीं बसले. ते फार कष्टी दिसत होते. थोडेसें प्रास्ताविक बोलणें झाल्यावर ते म्हणाले, "माझा मुलगा आनंद वारला. त्याच्या कांहीं वस्तू या बोचक्यांत आहेत. तुम्ही अस्पृश्यता-निवारणाचें काम करतां तें मला फार आवडतें;

पण माझ्या हातून मदत मात्र कांहीं होत नाहीं. या वस्तू तुमच्या हवालीं करतों तुम्हीं त्या विकून टाका व ते पैसे तुमच्या चळवळीला मदत म्हणून घ्या." त्यांचा कापरा आवाज आणि उदासीनता हीं पाहून मला अतिशय वाईट वाटलें. या वस्तू घ्याव्या असें मला वाटेना. कारण कीं एकाद्याच्या अंगावरील उतारा, देणारानें दिला तरी, चळवळ करणारानें घ्यावा कीं नाहीं असा विचार माझ्या मनांत आला. मदत खरी पण ती अशा रूपानें आली असल्यामुळें म्हणजे थोडीशी अशुभत्वाची कल्पना तिच्याशीं संलग्न असल्यामुळें चळवळीच्या दुर्दैवाविषयींही वाईट वाटलें. म्हणून मी त्यांना म्हणालों कीं आमच्या मंडळाच्या अध्यक्षांना विचारल्याशिवाय या मदतीचा स्वीकार मला करतां यावयाचा नाहीं. वासुदेवराव म्हणाले, "त्याला कांहीं हरकत नाहीं. तुम्ही या वस्तू ठेवून घ्याच; मला त्या माझ्या घरांत क्षणभरही माझ्यासमोर नकोत. मी त्या परत नेणार नाहीं" त्यांच्या मनोवृत्तीचा नाजुकपणा व दुःखाचा उमाळा पाहून मी एकदम बदललों व वस्तू ठेवून द्या म्हणून त्यांस सांगितलें.

"या मदतीचा उल्लेख मात्र तुम्ही कोठें करतां उपयोगाचें नाहीं" असें मला सांगून ते निघून गेले. होय म्हटल्याप्रमाणें मी वस्तू विकून टाकल्या. त्यांचे सुमारे ८५ रुपये आले. हें खर्चावयास पुष्कळ जागा होत्या. परंतु खर्चून जावे व ते कोठून मिळाले हेंही विसरलें जावें हें मला पसंत पडेना. म्हणून ज्या नूतन मराठी विद्यालयांत वासुदेवराव हे कित्येक वर्षें शिक्षक होते व त्यांचा मुलगाही जेथें शिकत होता, त्या विद्यालयाच्या व्यवस्थापकांच्या हातीं मीं ही रक्कम दिली व शाळेंतील डिप्रेस्ड् क्लासमधील जो विद्यार्थी वर्तणुकीनें सर्वांत चांगला असेल त्यास या रकमेच्या वार्षिक व्याजाच्या किंमतीचें बक्षिस द्यावें आणि या बक्षिसास 'आनंद' बक्षिस असें म्हणावें असें ठरविलें. हें बक्षिस दरसाल दिलें जातें.

सत्याग्रहाची खटपट--

अस्पृष्टांस देवालयप्रवेश मिळाला पाहिजे हें मत सन १९१७सालापासून आम्ही समाजाच्या पुढें मांडीत आलों आहों व तदनुसार खटपटही करीत आलों आहों, हें मधून मधून आलेल्या एतद्विषयक उल्लेखांवरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. तीन वर्षांपूर्वी नाशिक येथें महार पुढाऱ्यांनीं काळा

रामाच्या देवळापुढें मोठा सत्याग्रह केला. अस्पृश्य समाजाच्या संघटनेच्या दृष्टीनें या चळवळीचा जरी फार मोठा उपयोग झाला तरी देवालयप्रवेश या साधनानें मिळविणें हें अगदीं चूक आहे असें आमचें मत आहे. नाशिकच्या सत्याग्रहांत रा. राजभोज हे सामील झाले व आपणहि कांहीं असाच पराक्रम करावा अशी इच्छा धरून ते पुण्यास आले. वास्तविक पाहतां नाशिकच्या प्रकाराला सत्याग्रह हें नांव कां द्यावें याचा उलगडा त्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांनीं अजूनहि केलेला नाहीं. राजभोज हे महाराष्ट्रांतील या विषयांतील खटपटी पहातच होते. पण महाराष्ट्रामध्यें या विषयाच्या संबंधानें कांहींच होत नाहीं अशी महात्मा गांधींच्या आसमंतात् वागणाऱ्या अनेक लोकांची दृढ समजूत होती. महाडचें प्रकरण व नाशिकचा सत्याग्रह या दोनहि प्रकरणांच्या वेळीं डॉ. आंबेडकर इत्यादि महार पुढाऱ्यांनीं हिंदु समाजाच्या सुधारणेविषयींची जी मतपरंपरा सांगितली तिच्या योगानें अस्पृश्य समाजाच्या आकांक्षा व त्यांच्या कार्याच्या पद्धति याविषयीं समाजाला चांगलाच बोध झाला. हिंदू समाजावर तुटून पडल्याशिवाय गत्यंतर नाहीं हीच त्यांची कार्याची पद्धति व इथून तिथून सर्व हिंदू समाज हा एक रक्ताचा होऊन गेला पाहिजे हीच त्यांची आकांक्षा. डॉ. आंबेडकर हे अनेक परीक्षा पास झालेले, परदेशांत अध्ययन केलेले व कसेहि कडक बोलले तरी त्यांतही सूक्ष्मबुद्धीची खूण दाखविणारे असे मोठे स्वाभिमानी गृहस्थ आहेत. इकडे आमचे राजभोज हे महाडच्या कुभांडानंतर हळूहळू आमच्यांतून फुटून निघूं लागले होते. ब्राह्मण समाजाविरुद्ध व त्यांतहि कै. लोकमान्य टिळक, केसरी कचेरी यांच्या बाबतींत कोणी उपद्व्यापी लोक जर कांहीं कटकटी उत्पन्न करीत असले किंवा फुसलाती लावीत असले तर त्यांत सामील होण्याचें धोरण त्यांनीं चालू केलें. शिवाय आदल्याच वर्षीं गायकवाडवाड्यांत त्यांच्याच अस्पृष्ट मेळ्याचा यथास्थित सत्कार झालेला असून सुद्धां व तो तसा झाला हें खुद्द रिपोर्टांत त्यांनीं स्वतःच प्रसिद्ध केलेलें असतांना सुद्धां उलटीं कुभांडें घेण्याची वासना त्यांना झाली. त्यांतच समाजसुधारणेचें व विशेषतः ती घडवून आणण्याच्या सत्याग्रही साधनाविषयींचें अगदीं ताजें मत त्यांच्या कानीं आलेलें होतें. अर्थात् त्याची चुणूक पुणें येथेंहि दाखवावी असें त्यांच्या मनानें घेतलें. दरम्यान गांधींच्या कांहीं श्रेष्ठ अनुयायांना तरी महाराष्ट्राची

व निदान पुण्याची तरी या बाबतींतील हालहवाल नीट कळलेली असावी म्हणून त्यांना आम्ही पुणें मुक्कामीं बोलाविलें. अस्पृश्यता-निवारणासाठीं खटपट करणाऱ्या स्पृश्य गृहस्थांची एक सभा टिळक–स्मारक–मंदिरांत भरविली. न. चिं. केळकर, डॉ. फाटक, हरीभाऊ फाटक, रा. ब. काळे, जम्नालाल बजाज, स्वामी आनंद, अण्णासाहेब भोपटकर आणखीही कांहीं निकटची मंडळी व आमच्या मंडळाचे सर्व प्रमुख सभासद आले होते. त्या सभेंत मीं विस्तृत भाषण करून वे. महादेवशास्त्री दिवेकर, डि. सी. मिशन, यांच्या प्रयत्नांची स्थूलमानानें व आमच्या मंडळाच्या प्रयत्नांची प्रथमपासूनची सर्व हकीकत सांगितली. नंतर दुसरे दिवशीं पुष्कळ चर्चा होऊन रोटीबेटी-व्यवहार सोडून अस्पृश्यता-निवारणाची खटपट स्पृश्य लोकांनीं करावी,साधन मतपरिवर्तन हेंच असावें, हें मत या प्रातिनिधिक स्वरूपाच्या लहानशा परिषदेनें मान्य केलें. एक कमिटी नेमण्यांत येऊन तिच्यांतील प्रत्येक सभासदानें बारा महिन्यांच्या आंत आपल्या खटपटीनें एकतरी देवालय अस्पृष्टांस मोकळें करवावें, अशी जवाबदारी पत्करली. त्यानंतर माझें व स्वामी आनंद यांचें या विषयासंबंधानें अगदीं सविस्तर असें संभाषण होऊन मतांची सर्वथा एकवाक्यता झाली. मंडळीहि कामाला लागली. पुढें "महाराष्ट्रांतील देवळांच्या मालकांस विनंति" आम्ही केसरींत प्रसिद्ध केली. व देवळें उघडण्याची उपयुक्तता व जरूरी त्यांजपुढें मांडली. नंतर श्रावण महिना आला म्हणून देऊळ खुलें करावें अशा अर्थाचें पत्र मंडळाच्या अध्यक्षांनीं देऊळवाल्यांना धाडिलें. देवळें उघडण्याची जी खटपट चालू झाली होती तिचाच हा एक भाग होता. यांत सत्याग्रह, मारामारी, इत्यादींची उठावणी करण्याची पुसट पुसट कल्पना-सुद्धां नव्हती. मतपरिवर्तनपद्धति यशस्वी होईल असा वारा वाहूं लागला होता. महाराष्ट्रांत सात आठ देवळें स्वसंतोषानें मोकळीं झालीं होतीं. पुण्यास अण्णासाहेबांच्या हस्तें एक देऊळ खुलें झालें होतें. कऱ्हाडास दोन व वांईस एक अशीं आणखी तीन देवळें उघडीं करण्याची आंतून पूर्ण तयारी झाली होती. वास्तविक पाहतां या प्रकारानें अस्पृष्ट पुढाऱ्यांस सुद्धां आनंदच व्हावयास हवा होता. परंतु त्यांना कसलाच तोल राहिला नाहीं आणि त्यांनी पर्वतीवर सत्याग्रह करण्याची धमकी दिली व तारीखहि कायम केली. राजभोज हे जातीनें चांभार असल्यामुळें पुण्यांतील महार व मांग

समाज हे त्यांजपासून अगदीं निराळे राहिले व खुद्द त्यांचा समाजहि चार दोन माणसांपलीकडे त्यांना फितला नाहीं. किंबहुना महार, मांग व चांभार या तिन्हीहि जातींच्या जबाबदार अशा पुढारी लोकांनीं आपण या कामाच्या अगदीं विरुद्ध आहों असें केसरींतच जाहीर केलें. यामुळें या सत्याग्रहवाल्यांना कोणीहि अनुयायी नाहींत ही जी पुढें प्रत्यक्ष दिसावयाची गोष्ट ती आगाऊच सर्वांना माहीत झाली. पण राजभोजांना म. गांधीच्या येथील कांहीं अनुयायांचें पाठबळ होतें. त्यांना गांधींच्या निकटच्या कार्यकर्त्यांकडून कांहीं दोन शब्द सांगवावे म्हणून बजाज व आनंदस्वामी यांसहि आम्ही येथें बोलविलें. आमच्या पश्चात् त्यांची या लोकांशीं जीं संभाषणें झालीं तींवरून त्यांनीं या मंडळीच्या मनोरचनेविषयीं पुष्कळच बोध घेतला. रात्रभर वाटाघाट होऊन त्यांच्या आग्रहावरून या सत्याग्रहचांनीं तारीख पुढें ढकलली. या मुदतीच्या आंत आमच्याच्यानें मतपरिवर्तन मुळींच होणार नाहीं असें आम्ही स्वच्छ सांगितलें. वर्ष सहा महिन्यांची मुदत पत्करण्यांत आली असती व सर्वांनींच ही धार्मिक जबाबदारी ओळखून सामोपचारपद्धतीनें खटपट केली असती तर पुष्कळ काम झालें असतें असें मला अजूनहि वाटतें. पण तें झालें नाहीं. दरम्यान "गांधी असोत नाहींतर ब्रह्मदेव असोत" आम्ही त्यांचें या कामांत ऐकत नाहीं " ही भाषा गांधींच्याच अनुयायांनीं भर सभेपुढें केली. देवळांत घुसलें पाहिजे हेंच अज्ञ अस्पृश्यांस सांगितलें. एका वर्तमानपत्रानेंहि जितकें तेल ओततां येईल तितकें ओतलें. पण इतकें होऊनहि वर सांगितल्या-प्रमाणें तीनहि जातींच्या अस्पृश्य पुढाऱ्यांनीं आपलें अंग या कामांत नाहीं असें केसरींत प्रसिद्ध केलें व त्या दिवशीं सत्याग्रहांत सामील न होऊन त्यांनीं तें सिद्धहि करून दिलें. आमच्या मंडळाचा खुलासा आम्ही केसरींत प्रसिद्ध केला व त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट ही कीं देवाळाचे सरपंच जे आबा-साहेब मुजुमदार त्यांना आमची पूर्ण माहिती असल्यामुळें आमच्या संबंधानें त्यांचा कधीच गैरसमज झाला नाहीं. सत्याग्रह झाला. समाजानें विराट स्वरूप धारण केलें. ज्यांनीं अविचारानें होकार भरला होता त्या सर्वांना आतां पुढें येणें भागच होतें. तथापि त्यांतीलहि बहुतेक गळाले व स्पृश्यास्पृश्य मिळून सरासरी पांच सात माणसें प्रत्यक्ष सत्याग्रहाच्या कामांत गेलीं. स्पृश्यांनीं दगडफेक केली. देवळाचे दरवाजे बंद झाले. हाच आपला विजय समजून ही

मंडळी परत आली. पुणें येथील ब्राह्मण व मराठा समाजांतील पुढाऱ्यांनीं या हल्ल्याचा प्रतिकार करण्याची तयारी केलेलीच होती. व त्यांच्या जोडीला पर्वती गांव व आसपासच्या वाडया येथून हजारो मराठे लोक आलेले होते.आम्ही पहिल्यापासूनच याच्या अगदीं विरुद्ध होतों व मतपरिवर्तन–पद्धतीनें हें व्हावयास हवें असें आम्ही आपलें मत शेंकडो वेळां सांगितलें होतें. तथापि आम्ही यांच्या वरोबरच अविचारांत शिरलों नाहीं ही यांच्याशीं आम्ही मोठी दगलवाजी केली व त्यामुळें हें प्रकरण फसलें असा कांगावा कित्येक लोकांनीं चालू केला. त्याप्रसंगीं उत्तरादाखल मी जें पत्र एका वर्तमानपत्राकडे पाठविलें होतें, तेंच पुढें देतों:—

"पुष्कळांचा असा समज आहे कीं, आम्ही ही सत्याग्रहाची मूळ कल्पना काढली. त्यांच्या माहितीसाठीं सांगणें भाग आहे कीं, ही कल्पना आम्ही काढली नाहीं व सत्याग्रहाचा हा अभिनव अर्थ आम्हांस माहीतही नाहीं. 'देऊळ-वाल्यांस विनंति' या नांवाचें एक पत्रक आम्ही प्रसिद्ध केलें व लवकरच पर्वती संस्थानच्या ट्रस्टींस तशाच प्रकारची एक विनंति लिहिली. त्या विनंति-पत्रांतही आम्ही सत्याग्रहाचा उल्लेख कोटेंही केलेला नाहीं. कारण तो आमच्या मनांतच नव्हता. पण कोणी असा कांगावा मात्र करतात कीं या पत्रावरूनच आपणांस सत्याग्रहाची कल्पना आली, आणि कोणी तर असेंही लिहितात कीं जहाल पद्धतीप्रमाणें लोकांच्या सत्याग्रहाची भाषा सुरू झाली. पण प्रत्यक्ष तसा विचार सुरू होतांच त्यांनीं पगडी फिरवली. हें लिहिणें कोणास उद्देशून आहे व हा कांगावा कसा कसा करतां येतो हें आम्हांस अजून समजत नाहीं. आमच्या पत्रावरून ही कल्पना घेण्याइतपत सत्याग्रही लोक निर्बुद्ध आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. पण आम्ही सत्याग्रहाची कल्पना सुचवूनच्या सुचवून आतां मात्र निराळे राहात आहोत असा आरोप करतां यावा म्हणून मंडळानें पंचांस धाडलेल्या पत्रांतूनच ही चळवळ निघाली असा बहाणा चालू आहे. वास्तविक हिचा आरंभ मंडळाच्या पत्रानें सुरू केलेल्या खटपटीस यश मिळूं नये या इच्छेंतून झाला आहे: किंबहुना अस्पृश्यता–निवारणाच्या व कॉंग्रेसनें नेमलेल्या कमिटीच्या आजपर्यंतच्या कामाला देवालयप्रवेशाच्या बाबतींत यश मिळत चाललें आहे हें न खपून आपण कांहींतरी स्वतंत्र प्रयत्न करण्याची ईर्षा बाळगिली पाहिजे असें समजणारांनीं ही चळवळ सुरू केली

आहे. गेल्या थोडक्याशा महिन्यांत ६।७ देवळें अस्पृष्ट लोकांस खुलीं झालीं व खुद्द पुणें शहरांतही मंडळाचे अध्यक्ष श्री. भोपटकर यांच्या हस्तें एक देवालय खुलें झालें. ही कार्याची प्रगति मतपरिवर्तनाची स्पष्ट निदर्शक आहे. पण कांहीं अस्पृष्ट पुढाऱ्यांस हें मानवलें नाहीं. व आपण कांहीं तरी केलें पाहिजे व तें मंडळाच्या कामाहून निराळें असलें पाहिजे असा अभिनिवेश त्यांस उत्पन्न झाला. त्यांच्या कृत्याचा हा अर्थ आम्ही बसवितों असेंही नाहीं. दलितबंधू १त्रांत तसा लेखच आला आहे. त्यांतील मजकूर ज्यांनीं ज्यांनीं वाचला त्यांच्या ध्यानांत हा अर्थ तेव्हांच उतरला. त्यांत लेखकानें स्पष्ट म्हटलें आहे कीं, श्री. जम्नालाल बजाज असोत कीं इतर कोणी असोत त्यांनीं उघडलेल्या देवळाचा आम्हांस कांहींएक उपयोग नाहीं.आमचा हक्क आम्हींच वजावला पाहिजे. म्हणजे याचा अर्थ धडधडीत असा आहे कीं स्पृश्य पुढाऱ्यांच्या खटपटीनें कितीही देवळें स्वसंतोषानें मोकळीं झालीं तरी तीं या अस्पृष्ट पुढाऱ्यांस नकोत. त्यांना त्याची कांहीं एक मातब्बरी नाहीं. आपले हक्क आपणच वजावले पाहिजेत असा त्यांचा इरादा या त्यांच्या लिहिण्या-वरून स्पष्ट झाला व तदनुसार सत्याग्रहाची कल्पना सुरू झाली. पंचांनीं उत्तरें दिलीं नाहींत इत्यादि गोष्टींमुळें सत्याग्रह-कल्पना सुरू झाली हाही शुद्ध कांगावा आहे. स्पृश्य पुढाऱ्यांच्या प्रयत्नाला यश मिळत चाललें तें सहन न झाल्यामुळें व त्यांत आपला हात कांहींच दिसत नाहीं याचें वैषम्य वाटूं लागल्यामुळें सत्याग्रहाची कल्पना सुरू झाली. मंडळाच्या पत्रानें खोड काढली व त्यामुळें असें झालें अन् तसें झालें हा कांगावा, समाजाशीं कमींत कमी विरोध करून हा प्रश्न सोडवणुकीच्या सीमेपर्यंत आणून भिडविण्याच्या मंडळाच्या प्रयत्नाला अपेश देण्यासाठीं सुरू आहे, हें आम्हीं ओळखलें. सत्या-ग्रहाची कल्पना कशी निघाली व कोणी काढली याचा पुरावा ती काढणारांच्या वर्तमानपत्रांतूनच वर दिला आहे. ती निघाल्यावर येथील म्युनिसिपालिटीच्या निवडणुकी आल्या व अस्पृष्ट पुढाऱ्यांना आपल्या पक्षाकडे ओढण्यासाठीं कोणी कोणी त्या पुढाऱ्यांना "'पर्वती-सत्याग्रहांत मदत करूं, तुम्ही आम्हांस येऊन मिळा" अशीं गुप्त वचनें दिलीं. पार्टी तयार झाली. निवडणुकी यशस्वी झाल्या व अशा तऱ्हेनें वचन मानेस बसलें. मग ही विनिमयाची क्षुद्रता तत्त्व-ज्ञानविचारानें भरून काढण्यांत आली व असा बभ्रा भुद्दामच सुरू करण्यांत

आला कीं पर्वतीसत्याग्रह झाल्याशिवाय कांहीं एक होत नाहीं. आतांपर्यंत समाजानें स्वसंतोषानें ६।७ देवळें महाराष्ट्रांत खुलीं करून आपलें मतपरिवर्तन होत आहे हें स्पष्ट केलें असतां तिकडे मुद्दामच काणाडोळा केला. दरम्यान 'चक्रं भ्रमति मस्तके' हा न्याय इतरत्र चालूच होता. कोणचेंही नवें मत येवो; त्याच्या परटोकाला जाण्याचा ज्वालाग्राहीपणा स्वस्थ बसून उवत ठेवणारांना ही सुसंधि प्राप्त झाली. त्यांनींही त्यांच्या शब्दांत आपला शब्द मिसळून दिला व अस्पृष्ट लोकांस असें बेधडक वजाविलें कीं, तुमच्या हक्कांची वजावणी झाली पाहिजे. तुम्ही कसल्याही आचाराचे असलात तरी हरकत नाहीं, तुम्ही देवळांत घुसलेंच पाहिजे. झालें, सरपणानें सरपण पेटत चाललें. दरम्यान वाऱ्याची जरूर होती तीहि भागली. समाजावर तोहमत आणण्याला व समाजाचें नांव वद्दू करण्याची जी जी संधि साधेल ती घेण्याला सोकावलेल्या वृत्तपत्रकारांनीं आपल्या पंख्यानें पुष्कळच वारा घातला; असें पाहिलें नाहीं कीं मतपरिवर्तन होत असतां एवढ्या हमाम्याची जरूरी नाहीं. पूर्वीच्या सुधारकांनीं मतपरिवर्तनार्थ केवढ्या खटपटी केल्या व म्हणून समाजसुधारणा बळ धरू लागली इकडे त्यांनीं वुद्धचाच दुर्लक्ष केलें. व समाजकारणांतच सत्याग्रहाची जरूरी आहे असें प्रतिपादावयास सुरवात केली. देवळांत आम्हांस घुसावयाचें आहे व देवास माळ घालावयाची आहे अशा प्रकारचें सभांतील भाषणांस गोडवें रूप देऊन तें समाजापुढें मांडण्यास सुरवात केली. कारण मूळ भाषणें लोकांस कळलीं तर विरोधास सुरवात होईल! सत्याग्रह या शब्दाचा बेधडक घुसणें असा अर्थ सभांतून चालू होता, पण तो मुद्दामच दडवून ठेवण्यांत आला. आणि होणाऱ्या जबरदस्तीला सात्त्विक सफेती देण्यांत आली. आम्ही कोणास कांहीं इजा करणार नाहीं असें उदारपणाचें आश्वासनही देण्यांत आलें. कारण तसें म्हटलें म्हणजे चालू संप्रदायाचा फायदा मिळतो व दुर्वलतेला आच्छादन घालतां येतें. याप्रमाणें तयारी चालू असतां अस्पृष्ट वस्त्यांतून सभा चालू झाल्या. तेथेंही पर्वतीवर घुसण्याची भाषा होतीच. मतपरिवर्तनानें हा प्रश्न झपाटचानें ढिला होत चालला असतां आपला पराक्रम कांहींच दिसत नाहीं म्हणजे दाखवितां येत नाहीं याची रुखरुख ज्यांना लागली होती ते आतां हळूहळू जमा झाले. मतपरिवर्तनालासुद्धां चिकाटी, धमक आणि कुशलता लागतेच, पण त्या

गुणांची व हें कार्य करण्यांत गुंतलेल्या व यशस्वी होत असलेल्या गृहस्थांची हेटाळणी आपापल्या गटांत करीत बसण्याची रीत सुरू झाली. हा पुढारी निर्माल्य आहे. तो ढोंगी आहे असल्या शेऱ्यांची खैरात होऊं लागली. असा हा संच तयार झाला. मध्यंतरीं आम्ही आपल्याकडून या मंडळीस परावृत्त करण्याची शिकस्त केली. परंतु त्यांच्यापुढें आमची काय किंमत आहे? आम्ही मतपरिवर्तन म्हणत बसणार, त्यांत बोजड अभिरुचीला कळेल अशी लखलख कांहीं नाहीं. त्यांत तरुत दान महापुण्य असें कांहीं नाहीं. आमच्या विचाराचा व कार्यपद्धतीचा या नव्या विचाराशीं व कार्यपद्धतीशीं कोठेंच जम बसेना. अर्थात् प्रस्तुत प्रकरणाशीं दुरूनच जो संबंध होता तोही सुटला आणि आम्ही व आमच्यासारखेच विचार ज्या संस्थेचे व लोकांचे होते त्यांनीं आपापलीं मतें प्रसिद्ध केलीं. वरील हकीकतीवरून या चळवळीचा उद्भव कोठें व कसा झाला आणि आमच्या मंडळाचा तिच्याशीं कितीसा संबंध आहे हें सर्वांस पुन्हां एकदां स्पष्ट होईल.

धोरण--

"आमच्या धोरणाचाही खुलासा करतों. आमचे अस्पृश्यतानिवारणाचे प्रयत्न ज्यांना माहीत आहेत त्यांना आमचें आजवरचें धोरणही माहीत आहे. मतपरिवर्तन हेंच तें धोरण होय. या धोरणास अनुसरून आमचें मंडळ गेलीं कित्येक वर्षें खटपट करीत आहे. मंडळाचे चालक हे या कामांत कोणाचे शिष्य किंवा अनुयायी नाहींत. समाजसुधारणेचें काम त्यांनीं आपल्या कल्पने-प्रमाणें व आपल्या हिंमतीवर केलें आहे. आणि त्यांच्या या कामाला देशांतील सर्वच चळवळीचा पाठिंवा मिळाल्यामुळें त्याची प्रगति, प्रश्नाचें रूप लक्षांत घेतां, व्हावी तशी होत आहे असें त्यांचें मत आहे. गेल्या थोड्याशा दिवसांत जवळ जवळ दहा देवळें मोकळीं होतात याचा अर्थ काय हें कोणीही प्रांजल मनुष्य सांगूं शकेल. याप्रमाणें प्रश्न उलगडावयास लागला असतां तो सगळाचा सगळा एकदम उलगडला नाहीं म्हणून ही पद्धति चूक किंवा उपहास्य-सुद्धां आहे असें म्हणणें म्हणजे स्वतःच्याच समजशक्तीचा उपमर्द करण्या-सारखें आहे. वांई, सातारा, पुणें, कऱ्हाड, मुंबई इत्यादि ठिकाणीं आणखी देवळें उघडण्याचा उपक्रम लवकर होईल असें तेथील खटपटीच्या खाजगी

हकीकतीवरून कळतें. अर्थात् हें मतपरिवर्तनाचें पवित्र कार्य आमच्याप्रमाणेंच त्या त्या ठिकाणीं जे कार्यकर्ते करीत आले आहेत त्यांच्या श्रमानें होत आहे हें स्पष्ट आहे. अशी जनमनाची रीत त्वरेनें बदलत असतां समाजाशीं दंडेली करण्याची पद्धति कशासाठीं पतकरावी हें आमच्या ध्यानांत येत नाहीं. जबरदस्ती, त्रागा, तळतळाट असल्या उपायांचा अवलंब न करतांसुद्धां हें काम होत असतां येवढ्या थोडचाशा अवकाशांत मतपरिवर्तनाला इतपत तयारी दाखविणाऱ्या समाजाचें नांव बद्दू करून, त्याला निंदास्पद बनवून, त्यावर प्रहार करावयास उठणें म्हणजे शुद्ध कृतघ्नपणा होय असें आमचें स्पष्ट मत आहे. खरोखर, आम्हाला जी मानवी मनाची ओळख आहे तीवरून पाहतां पुरा एक पिढीचा म्हणजे २० वर्षांचाही काळ न घेतां समाजानें जर इतपत प्रगमनशीलता व्यक्त केली आहे तर त्या समाजाला जगण्याचा खास वकूब आहे हें त्यानें सिद्ध केलें आहे आणि म्हणून त्याच्यावर दंडेली करण्याचें कांहींच कारण नाहीं. जे कोणी या कामांत सतत जागत आहेत ते त्याच ठिकाणीं कांहीं काळानंतर जर जात आले असले तर त्यांच्या ध्यानांत आलें असेल कीं दर वेळीं लोकमतांत स्पष्ट फरक पडत चालला आहे; लोकांची वृत्ति निबर राहिलेली नाहीं. आणि जर आपलें काम नीट जाणणारे पुरेसे प्रतिपादक असते तर याहूनही प्रगति दाखवितां आली असती. असें असतां ज्या समाजानें इतपत जाब आपल्या हांकेला दिला त्याची विटंबना करणें हें कामांत व्यापृत असलेला कोणीही समाजसुधारक करणार नाहीं. ज्यांना तें करावयाचें नसतें पण जे फलाची मात्र अपेक्षा बाळगतात त्यांची राष्ट्र-सुधारणेची निकड ध्यानांत येते, पण त्यांची या प्रश्नाशीं व लोकमताशीं फारशी ओळख नाहीं इतकेंच मात्र दिसून येतें. असो. तर आमच्या मंडळाचें धोरण काय हें या विवेचनावरून ध्यानांत येईल. एका वर्षांत मिळणार होतें तें स्वराज्य व जबरदस्तीनें अगर तळतळाटानें मिळणारा देवालय–प्रवेश यांचा आयुर्दाय सारखाच आहे असें खुशाल समजावें."

अलीकडच्या घडामोडी--

सत्याग्रहाचें प्रकरण हळूहळू मागें पडलें व त्याचे स्पृश्य पुरस्कर्ते त्यांचा जो नेहमींचा राजकारणाचा व्यवसाय त्याकडे निघून गेले. या उठाव्याचा

एक मात्र वाईट परिणाम झाला. समाजाला असें वाटूं लागलें कीं अस्पृश्यता–निवारण म्हणून जें कांहीं चालू आहे त्याकडे दुर्लक्ष करतां उपयोगाचें नाहीं. पर्वतीपेक्षां सुद्धां नाशिकच्या प्रकारानें समाजाला धसका जास्त बसला. पर्वतीचें प्रकरण म्हणजे, सत्याग्रहयांपुरतें पहावयाचें म्हटलें तर, अगदींच नरम काम झालें. माणसें इनमिन पांच सात, मांडवशोभेला येऊन बाकावर बसून राहणारीं असतील कोणी; पण एकंदर वर्तमानपत्रांतल्या गर्गशाच्या मानानें प्रकार अगदींच लटोपटीचा झाला. पण नाशकाचें प्रकरण मोठेंच रंगलें होतें. चारपांच हजार लोक सत्याग्रही झालेले, त्यांचे कँप पडलेले, त्यांच्या मिरवणुकी, ललकारण्या हें सर्व मनस्वी, आणि पुढारपण डॉ. आंबेडकरासारख्या मातबर माणसांकडे, त्यामुळें त्याचा परिणाम जनसमाजावर फार झाला. हा परिणाम हवा होता तसा झाला नाहीं याचें मात्र वाईट वाटतें. उलट ज्याला आतां कांहींशा उपेक्षेनें किंवा तिरस्कारानें 'सनातनी' असें संबोधितात व ज्यांत खरोखर बहुतेक सर्व हिंदु समाजाचा समावेश होतो त्याला कांहीं एक चमत्कारिक जागृति प्राप्त झाली. सत्याग्रहाचा मार्ग फसल्यामुळें ज्या अस्पृश्य समाजापुढें त्याचें सामर्थ्य वर्णिलें गेलें होतें तो मोठा नाखुष बनून गेला व समाजाविषयीं त्याच्या मनांत मोठी आढी उत्पन्न झाली. वास्तविक यानें काम होणार नाहीं हें कळण्याइतपत ज्ञान सत्याग्रहयांपैकीं कांहींना तरी खास होतें. पण कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांपासून त्यांनीं जो 'सत्याग्रह' शब्द उचलला होता त्याचा अर्थ यथान्याय करावयाचा मगदूर न दाखवितां त्यांनीं जबरदस्तीचा मात्र अवलंब केला. आग्रही सुधारकांना व अस्पृश्य समाजांतील पुढाऱ्यांना हा मनांतील त्वेष घालविण्यास पुष्कळ वेळ लागेल व धर्मकल्पना बदलण्यास याहून उदात्त, प्रगल्भ आणि सात्त्विक मार्ग पतकरावयास हवेत, व समाजाची मनोभूमि प्रतिपादनानें तयार करावयास हवी हें मत स्वीकारण्यास ते फार खळखळ करतील. मतपरिवर्तनावर समाजाचा पुन्हां विश्वास येईपर्यंत आम्हांस खरोखर कांहींच करतां येण्यासारखें नाहीं हें पाहून प्रासंगिक प्रतिपादनापलीकडे कांहीं करावयाचें आम्ही बंद केलें. कारण "तुम्ही तोंडानें जरी सामदामाचें बोललां तरी शेवटीं हें कोणीकडे जाणार हें आम्हांस दिसतच आहे" असा रोकडा जबाब आम्हांस समाजाकडून मिळूं लागला.

दरम्यान राजकीय आन्दोलन प्राप्त झालें व सर्व राष्ट्र एकत्रित होऊन

तिकडेच व्यापृत झालें. राऊंड टेबल कॉन्फरन्सची बोलवा उठली व तिच्या दुसऱ्या बैठकीस महात्माजी गेले. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ द्यावे कीं संयुक्त मतदारसंघ करून त्यांस राखीव जागा द्याव्या हा प्रश्न जोरानें पुढें आला. रा. राजभोज हे या दुसऱ्या मताचे असल्यामुळें व आमचेंही मत आधींपासून जाहीर असल्यामुळें त्यांनीं मंडळाकडे पुन्हां रावता ठेवला. मंडळाचें जें मत आहे तेंच ज्यांचें असेल त्यांना मदत करावयास मंडळ सदैव तत्पर असल्यामुळें आम्ही या मतप्रतिपादनाच्या कामीं त्यांना हरतऱ्हेची मदत केली. डॉ. मुंजे यांची या बाबतींतील जीं मतें होतीं तीं आमच्या मंडळींचींही असल्यामुळें त्यांना जोराचा पाठिंबा जे अस्पृश्य पुढारी देत होते त्यांस मदत करणें आमच्या पद्धतीशीं सुसंगतच होतें. तथापि राजकारणाचा भाग हा कांहीं आमचा मुख्य विषय नव्हे आणि म्हणून प्रत्यक्ष आम्हीच त्या विषयांत पडणें आमचें कामहि नव्हतें.

पुढें महात्माजींनीं प्राणान्त उपवास सुरू केला व पुणेंकरार झाल्यानंतर त्यांनीं अस्पृश्यतेविरुद्ध मोहिम चालू केली. या मोहिमेंत त्यांनीं जीं मतें मांडिलीं त्यांत जीं आम्हांस आक्षेपार्ह वाटलीं त्याविरुद्ध प्रतिपादन करणें हेंही आमचें काम होतें. महात्माजींचा उपवास चालू झाला तेव्हां त्यांच्याकडे चला असा रा. राजभोज यांनीं फार आग्रह केल्यामुळें मी महात्माजींच्या दर्शनास गेलों. कृष्णाजीपंत लिमये, राजभोज, मी, सकट असे पांच सातजण होतों. मी प्रश्न लिहून नेले होते. महात्माजी उपासाच्या अशक्तपणामुळें फार कष्टानें बोलत होते. पण त्यांनीं आम्हांला फार चांगलें वागविलें. आमच्या प्रश्नांना व शंकांना त्यांनीं फार प्रेमानें उत्तरें दिलीं. कायद्यानें अस्पृश्यता-निवारण व विशेषतः देवालयप्रवेश करणें हें चूक आहे; बहुजनसमाज आपल्या मताकडे प्रतिपादन–पद्धतीनेंच वळविला पाहिजे. तो वळल्यावर कोणी आडमोठा उगाच कायद्याचा आश्रय घेऊन अनेकांच्या विरुद्ध आचार करूं लागला तर त्याला बाजूस सारण्यासाठीं कांहीं कायद्याची योजना करावी लागेल असें त्यांनीं आपलें मत दिलें. तसेंच नाशिक व पर्वती येथील सत्याग्रह अगदीं चूक होते, कारण तो अत्याचार होता असेंही त्यांनीं सांगितलें. या मुलाखतीचा सारांश मी त्यांस, त्यांच्या सांगण्याप्रमाणें लिहून धाडिला. त्यांनीं तो पुन्हां आपल्या शब्दांनीं लिहिला व मजकडे धाडिला. त्याचें भाषांतर

अन्यत्र दिलेलेंच आहे. पॅक्ट होऊन मग लोकांनीं जर देवालयप्रवेशाला परवानगी दिली नाहीं तर मी प्राणान्त उपवास करीन अशी धमकी महात्माजींनीं दिली. तिला उद्देशून मी महात्माजींस 'अनावृत्त पत्र' म्हणून एक प्रसिद्ध केलें. बॅ. अग्रवाल यांनीं त्याचें इंग्रजी केलें व तें त्यांजकडे धाडलें. त्यांचें उत्तर व त्यावरील माझा जबाबही मागें दिलीं आहेत. पण महात्माजींनीं उपवासाचें भय घालून, किंवा मी जीव देईन असलें तळतळाटाचें बोलणें सुरू करून लोकांकडून कांहीं करून घेणें हें अगदीं विपरीत आहे. गांधींच्याविषयीं पूज्य-बुद्धि म्हणून कदाचित् कोणी त्यांना हवी आहे ती देवालय-विषयक सुधारणा करीलही पण हें कांहीं समाजाला शिक्षण नव्हे. हीही जबरदस्तीच आहे. उलट महात्मा गांधी यांनीं जेलच्या बाहेर यावें व राजकारणांत पडणार नाहीं असें सरकारास वचन देऊन या मतपरिवर्तनाच्या। कामास लागावें असें माझें मत आहे, असें मीं पत्रांत लिहिलें. गांधींना जें राजकारण करावयाचें आहे तें सरकार करूं देत नाहीं हें निश्चित झाल्यावरच ही विनंति मी म.गांधींना केली. एरव्ही हें अनावृत्त पत्र' मी त्यांस धाडिलें नसतें व प्रसिद्धही केलें नसतें. हें पत्र मागें दिलेलेंच आहे म्हणून त्याची चर्चा येथें करीत नाहीं. पण महात्माजींच्या उपवासकालांत मतपरिवर्तनाचा प्रयत्न मात्र आम्हांस करतां आला तितका केला. आमच्या अध्यक्षांच्या घरीं कांहीं निवडक सद्गृहस्थांची सभा झाली. आमचें जें या बावतींत मत आहे तेंच सभेनें पसंत केलें. पण परिस्थिति इतक्या झपाट्यानें बदलत चालली कीं प्रतिपादनाकडून लक्ष काढून वरी वाईट मतें हींच विचारांत घेऊन त्यांच्या युक्तायुक्ततेचा निर्णय करावयास हवा असें ठरवावें लागलें.

नंतर गुरुवायूरचें प्रकरण सुरू होऊन कायदेभंगाच्या द्वारा हा प्रश्न सोडविला पाहिजे असें महात्माजींनीं ठरविलें. बिलेंही तयार झालीं व कौन्सिलांपुढें आलीं. बिलें अगदीं निरुपद्रवी व लोकांवर जुलूम न करणारीं अशींच आहेत असें महात्माजी पुन्हां पुन्हां सांगत असतात. आम्हांस असें वाटत नाहीं. अगोदर 'कौन्सिलें हराम आहेत' हा घोष वर्षानुवर्षें चालू ठेवून आपणाला हवें तेव्हां मात्र त्यांचा उपयोग करून घ्यावयाचा हें करणें लोकांच्या बुद्धीला उपमर्दकारक व दगलबाजीचें आहे असें आम्हांस वाटतें व म्हणून मी व बॅ. अग्रवाल यांनीं या प्रकारांत महात्माजींची चूक होत आहे

असें सभांतून प्रतिपादन केलें. पण याहीपेक्षां कायद्यानें ही गोष्ट व्हावी हा विचार आम्हांस त्याज्य वाटतो कारण त्यानें देऊळ हस्तगत झालें तरी तें 'पूज्य' न राहतां परित्यक्त बनेल अशी आम्हांस सबळ भीति वाटते. म्हणून याहीविरुद्ध आमच्या सभा भरल्या. वास्तविक पाहतां हा वाद साधनाबद्दलचा आहे, ध्येयाबद्दलचा नाहीं, असें आम्हांस वाटत होतें. पण महात्माजी हे उत्साहाच्या भरांत ध्येयालासुद्धां व सत्कल्पनांना सुद्धां दंश करतात हें त्यांच्याशीं आमची जी दुसरी मुलाखत झाली तीवरून ध्यानांत आलें. एक मॅनिफेस्टो काढावयाचें ठरत होतें. त्याची भाषा काय असावी याविषयीं सेवासदनांत चर्चा झाली. श्री. देवधर, दासगुप्त, देवीदास, राजभोज, चित्रावशास्त्री, हरीभाऊ फाटक, बॅ. अग्रवाल, नानासाहेब शिंदकर, जानकीबाई भट व मी असे होतों. चर्चेंतून कांहींच निष्पन्न होईना. दुसरे दिवशीं महात्माजींकडे यांतील कांहीं जण गेलों. सदनांतील आमच्या चर्चेचा गोषवारा महात्माजींना आधींच कळलेला होता हें मला लागलीच दिसून आलें. झालेल्या संभाषणाचा सारांश मागें दिला आहे तो अगदीं बरोबर आहे. त्यावरून दिसून येईल कीं महात्माजी अविचारानेंच बोलत होते. त्यावेळीं ते फार रागावले होते: पण रागाचा शब्द तोंडांतून न जाऊं देण्याविषयीं ते फार दक्ष असतात. त्यांनीं जी भूमिका त्यावेळीं घेतली ती पाहून अग्रवाल व मी अगदीं खट्टू झालों व आपलीं मतें जर आपल्याला प्रमाण असतील तर आपण तींच प्रतिपादिलीं पाहिजेत व इतर कशीं चूक आहेत हें सांगितलें पाहिजे हें मत कायम करून आम्ही त्याप्रमाणें वागत आहों. चळवळींत असा काळ येतोच कीं जेव्हां कामापेक्षां मतमतांचाच गलबला जास्त माजावा. तसा तो सध्यां माजलेला आहे. त्यांतच महात्माजींनीं ब्राह्मणाचें लग्न महारणीशीं व ब्राह्मणीचें आपल्याच मुलाशीं लावल्यामुळें मूळच्या दलदलींत आणखी चिखल झाला आहे. पण आपलें विचारकुंड मात्र विझू न देण्याविषयीं आम्ही दक्ष आहों. येवढ्या मोठ्या माणसाविरुद्ध बोलणारे हे कोण ! असें माणसें एकमेकांत कुरबुरतात. त्यांचें तें कुरबुरणें चालावयाचेंच व आमचें बोलणेंही चालावयाचेंच. या सगळ्या दंगलींत जर कांहीं बरा विचार बाहेर पडला व तो आमच्या मंडळाच्या मतास जमेसा असला तर आम्ही या कामांत जोरानें कष्ट करूं. पण जर कां कांहीं विपरीत विचार

कायम झाला व तो समाजाला घातक आहे असें आम्हांस दिसूं लागलें तर त्याच्याविरुद्ध तितक्याच जोराचें भांडणही आम्ही करूं अशी दुग्ध्याची स्थिति सध्यां आहे.

महात्मा गांधी हे परवां बन्दिवासांतून मुक्त झाल्यानंतर बॅ. अग्रवाल व मी त्यांच्या दर्शनासाठीं पुन्हां गेलों होतो. श्री. पटवर्धन यांनीं भंगीकाम मिळावें म्हणून सत्याग्रह सुरूं केला होता त्यावेळीं समदुःखी (Sympathy) म्हणून म. गांधींनीही उपवास सुरू केला. आमच्या ज्या संभाषणाचा उतारा मागें दिला आहे तें संभाषण या उपवासाच्या प्रसंगीं झालें होतें. त्यांना उपवास आहे हें माहित असतें तर त्यावेळीं आम्ही इतका बोचरा विषय चर्चेस काढला नसता. पण उपवास आहे हें मुलाखत संपल्यावर आम्हांस कळलें. महात्माजी त्यावेळीं फार तुसडेपणानें बोलले होते. पण जरी बोलले असले तरी ते या विषयांतले आज सर्वश्रेष्ठ कार्यकर्ते आहेत व म्हणून आपल्या मनांत कांहीं असलें तर तें त्यांजपुढें मांडणें आपलें कामच आहे हें ओळखून आम्ही पुन्हां जावयाचें ठरविलें. महात्माजी यावेळीं फार खुषींत होते. गोडपणें हंसून त्यांनीं आमचें स्वागत केलें व सन्मुख बसवून घेऊन पूसतपास केली. अस्पृश्यता–निवारण–कार्याची जर आतां जोरानें उचल व्हावयाची असली तर त्या कार्याला उपयोगी पडणारे असे शेंकडो प्रचारक हवे व म्हणून ते तयार करावयासाठीं प्रांतोप्रांतीं चार सहा महिने मुदतीच्या शाळा काढाव्या हें आमचें म्हणणें आम्हांस त्यांजपुढें मांडावयाचें होतें. खटपटी माणसें पुष्कळ मिळतात; तीं हौशी व कळकळीचींही असतात व त्यांच्या या गुणांचा चळवळींत उत्तम उपयोग होतो. पण केवळ खटपटी माणसाच्या कर्तबगारीवरच चळवळ शुद्ध रूपानें होईल किंवा टिकेल हें खरें वाटत नाहीं. त्यांतही ही चळवळ मुख्यतः देवालयप्रवेशाबद्दलच व्हावयाची आहे. म्हणून अस्पृश्यता–निवारणाची सर्व अंगें–उपांगें ज्यांनीं बारकाईनें पाहिलीं व अभ्यासिलीं आहेत; समाजाचीं मनोगतें व हरकती कोणच्या हेंही ज्यांस नीट कळलें आहे; हरतऱ्हेच्या श्रोतृवर्गापुढें बोलणें प्राप्त असल्यामुळें तींत वाङ्मय, स्मृतिवचनें, इतिहास, आर्थिक परिस्थिति, यूरोपांतील नवमतवाद, इत्यादींची ज्यांना यथामर्याद पण चांगली माहिती झाली आहे व ज्यांना अस्पृष्टांच्या डोईवरचा हा अस्पृश्यतेचा वाळ काढलाच पाहिजे अशी शुद्ध धर्मबुद्धीची आंच लागली

आहे अशीं माणसें जर समाजापुढें जाऊन बोलूं लागलीं तर जनमनाची रीत बदलण्यास त्यांच्या मोठाच उपयोग होईल असें आम्ही महात्माजींस सुचविलें. दर प्रांतांत जितके जिल्हे आहेत तितके प्रचारक त्या त्या प्रांतांत, स्थानिक परिस्थिति लक्षांत घेऊन तयार करावे, त्यांजकडून वाचून घ्यावें, भाषणें करवावीं, आपण मुद्दामच शंका विचाराव्या व त्यांचीं समाधानें ते कशी करतात हें पहावें व अशा रीतीनें चवकसबुद्धि व बहुश्रुतपणा यांनीं समृद्ध असलेले प्रचारक लोकांपुढें मतपरिवर्तनासाठीं उभे करावे अशी आमची सूचना होती. ही सूचना करून थोडें धाडस करून मी असेंही म्हणालों कीं जर महाराष्ट्रापुरती कांहीं अशा तऱ्हेची व्यवस्था पुणें येथें करावयाचें ठरलें तर माझ्या शक्तीप्रमाणें या प्रचारकांस जरूर ते शिक्षणसंस्कार करण्याचें काम मी करीन. महात्माजींनीं हें ऐकून घेतलें व म्हणाले, "अमेरिकेंतील तेलाच्या कंपन्या असले शिक्षित प्रचारक सर्वत्र धाडते हें मला माहीत आहे, पण अशा कामांत ते धाडावे हें मला चमत्कारिक वाटते! " या त्यांच्या सुरवातीच्याच वाक्यानें पुढें होणाऱ्या सर्व संभाषणाचा रोख आमच्या ध्यानांत आला; पण निराश न होतां पुन्हां आलटून पालटून आम्ही तेंच म्हणणें त्यांजपुढें मांडिलें. पण महात्माजी म्हणाले "यानें चळवळीला गिरणीचें रूप येईल. तुम्ही म्हणतां तें माझ्या चित्ताला मानवत नाहीं. ज्याला मनानेंच चैन पडेनासें झालें आहे तो आपोआप या कामांत दाखल होतो." मी इतकेंच म्हटलें कीं हे जे प्रचारक तयार करावयाचे ते वाटेल तेथून उचलावे असें मी म्हणत नाहीं. जे आपण होऊन या कामांत पडले आहेत, पण केवळ 'वर्कर्स' आहेत त्यांतून हे घ्यावे व शिक्षित करून बाहेर पाठवावे". पण महात्माजींनी 'मूलेकुठार'च केलें. ते म्हणाले "व्याख्यानांची जरूरच नाहीं; अगदीं मालवीयांच्या सारखा कोणी असला तर त्यानें भाषण करावें. वाकी भाषणाची जरूरी नाहीं. म्हणून तर मी उपवास केला" अर्थात् यापुढें कांहीं बोलण्यासारखें नव्हतें म्हणून हा मुद्दा सोडून दिला व इतकेंच मनाशीं म्हटलें कीं जरी हें व्हावयास हवें असें असलें तरी महात्माजींना तें मुळींच मानवत नाहीं. नंतर देवालयप्रवेशाच्या बाबतींत अस्पृष्टांना गोमांसनिवृत्तीची अट घालावी हा जो मुद्दा बॅ. अग्रवाल यांनीं मागील मुलाखतींत काढला होता तोच त्यांनीं पुन्हां काढला. आम्ही

हा मुद्दा तरी इतका जोरानें तेव्हां कां मांडला होता तर पुष्कळ देऊळवाले यावर जोर देऊन बोलतात व महात्माजी तर मंडपप्रवेशावर खूष नसून अगदीं गाभाऱ्यांतही अस्पृश्यांचा प्रवेश आजच व्हावा या मताचे आग्रही प्रतिपादन करतात. पण महात्माजी या खेपेस मागच्या इतकें सडेतोड बोलले नाहींत. ते म्हणाले कीं "गोमांसभक्षकांनीं आंत येऊं नये" अशी पाटी मी देवालयाच्या दारावर लावण्यास कबूल आहे! व ही माझी कांहीं नवीन कबूली आहे असें नाहीं; मी हरिजनपत्रांत हें मागेंच सांगून टाकलें आहे. आम्हांलाही हे त्यांचे उद्‌गार मिळतें घेण्याच्या सदिच्छेचे द्योतक वाटल्यामुळें समाधान झालें. महात्माजींनीं आपले दक्षिण आफ्रिकेंतील व बार्डोलीच्या चळवळीतील अनुभव सांगून भाषणें करण्याच्या पद्धतीचें वैयर्थ्य आम्हांस कथन केलें.असो.

आमचा अजून असाच विश्वास आहे कीं,असे प्रचारक तयार करणें व त्यांनीं संचार करीत रहाणें हें जरूरच आहे. साधल्यास ही शिक्षण देण्याची व्यवस्था करणें हें आमच्या धोरणास अनुसरूनच होईल.

अस्पृश्य समाजांतील कार्यकर्ते

अस्पृश्य समाजांपैकीं ज्यांनीं आमच्या मंडळाशीं सहकार्य करून काम केलें व आपल्या समाजाच्या हितार्थ जे सतत झटतात त्यांचा अल्प परिचय पुढें दिला आहे.

रा. राजभोज:—मागील अनुभव–वृत्तांतात रा. राजभोज यांचा उल्लेख अनेकदां आला आहे. ते अगदींच बालवयाचे असतांना त्यांची आमच्याकडे वग चालू झाली. पण एक विद्येचा संस्कार अल्प झालेला आहे ही बाब सोडली तर त्यांच्या अंगीं समाजसेवेस लागणारे पुष्कळच गुण आहेत. वास्तविक पाहतां पुणें शहरचे रहिवासी असे हजारो चांभार आहेत पण समाजसेवेला वाहून घ्यावयास हवें ही वासना त्यांपैकीं कोणालाही झालेली नाहीं. रा. राजभोज हे नाशिक जिल्ह्यांतून आलेले व वयानें लहान; पण त्यांनीं मेहनतीच्या बळावर या समाजाचें पुढारीपण प्राप्त करून घेतलें. लेखन किंवा सभेंतील प्रतिपादकाचें वक्तृत्व हीं त्यास अजून प्राप्त झालीं नाहींत पण अस्पृष्टांचा प्रश्न निरनिराळ्या तऱ्हांनीं त्यांनीं समजून घेतला आहे व जेथें जें अंग पुढें ढकलावयास हवें तेथें तें ढकलण्याच्या कामांत ते पुष्कळच कौशल्य दाखवितात. तसेंच ज्या पुढाऱ्याचा अमूक एका प्रकरणांत उपयोग होण्यासारखें आहे असें त्यास दिसेल त्याकडे जाऊन आर्जवबुद्धीनें ते त्याच्या जनसेवाबुद्धीचा उपयोग करून घेतात. लहानपणीं बुजरेपणा हा जरी कमीच असतो. राजभोज यांच्या अंगांत तर तो मुळींच नाहीं व म्हणून कोणी केवढाही पुढारी असो, त्याच्याकडे जाऊन मोठमोठ्या प्रश्नासंबंधीं त्याच्याशीं चर्चा करावयास त्यांना कसलीही दरद वाटत नाहीं. अनेक पक्षांतील लोकांत वागत राहण्याची त्यांना जरुरी पडते, त्यामुळें मतभेद फार असले तरी कोणासही तोडून टाकावयास त्यांचें मन धजत नाहीं. पुष्कळदां असें होतें कीं याचें कांहीं, त्याचें कांहीं असें मत त्यांना पसंत असतें व तेवढ्यापुरतें ते तें पतकरावयास व त्या त्या माणसास भलेपणा द्यावयास खुषी असतात, पण हें कसब दरवेळीं साधणें कठीण जातें. रा. सकट व वायदंडे यांना ज्याप्रमाणें हिंदूसमाजाच्या पिडापासून आपण तुटून निघावें असें वाटत नाहीं तसेंच यांनाही वाटत नाहीं व त्यासाठीं कसल्याही मातबर माणसाशीं मतभेद दाख-

विण्याचा प्रसंग आला तरी ते तो दाखवितात. चांभारांच्या हिताविषयीं त्यांनीं जास्त खटपट करावी हें यथान्यायच आहे. स्वकीयांविषयीं त्यांना मोठा अभिमान आहे आणि एकदा तर एका परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून त्यांनीं सांगितलें कीं ब्राह्मणांत ज्याप्रमाणें चित्पावन ही जात तेजस्वी आहे तशी अस्पृष्टांत माझी चांभारांची जात तेजस्वी व्हावी असें माझें मत आहे. पुढारी-पणांत 'खटपट' व 'वोलणें चालणें' या शब्दांचे जे अर्थ आहेत ते यांच्या सर्व मेहेनतींत ठळकपणानें दिसतात.

रा. के. के. सकट—हे मातंग जातीचे गृहस्थ मध्यमवयीन आहेत. यांचें शिक्षण बेताचें म्हणजे फारच थोडें झालेलें असावें.पण सार्वजनिक व्यवहारांत मन व बुद्धि घालण्याची संवय असल्यामुळें त्यांना वर्तमानपत्रांचें वाचन बरेंच करावें लागतें व तें ते हौसेनें करतात. स्वकीयांचें कांहीं बरें करावें अशी मनांतून जोराची इच्छा असल्यामुळें ते पुष्कळ धडपड करतात. पण शाळा-कॉलेजांतून शिक्षण मिळवून सुशिक्षितपणाचा जो एक गौरव प्राप्त होतो तो त्यांस नसल्यामुळें त्यांची महती वाढलेली नाहीं. वास्तविक पाहतां हे गृहस्थ मूळचे चांगले कल्पक व एक एक गोष्ट मनांत घोळत ठेवून तिजविषयीं साधकवाधक विचार काय आहेत हे पाहणारे आहेत. स्पृश्य लोकांकडून होणाऱ्या अन्यायाविषयीं त्यांना इतरांइतकेंच वाईट वाटतें व त्यांच्या इतकाच रागही येतो. पण त्यांच्याशींच शेवटीं गांठ ठेवली पाहिजे व हिंदू समाजाच्या मूळ पिंडापासून सुटून जातां उपयोगी नाहीं अशी त्यांची दृढ समजूत आहे. त्यामुळें सुधारक स्पृश्यांशीं विचारविनिमय करतांना ते एकांगीं मत घेऊन उठत नाहींत. तसेच स्पृश्यांविषयीं अस्पृश्यांना जो एक अविश्वास वाटतो व त्यांच्या हातीं सत्ता आली असतां ते तिचा आपल्याविरुद्ध उपयोग करतील अशी जी त्यांस भीति वाटते, तसाच अविश्वास व तीच भीति यांना अस्पृश्यां-तील प्रमुख जात जी महार तिजविषयीं वाटते व ही भावना ते पुष्कळदां स्पष्टपणें बोलून दाखवितात. त्यामुळें त्यांजवर पुष्कळांची मोठी इतराजी होते. शिक्षण अगदींच बेताचें असल्यामुळें त्यांना आपली प्रगति करून घेतां येत नाहीं व याच विषयांत जेथें लिहिणें, वाचणें, प्रतिपादणें, इत्यादि विशेष जवाबदारीचीं कामें सुयन्त्रपणें करीत रहाणें जरूरीचें असतें तेथें त्यांचा इतकासा उपयोग होत नाहीं. पण प्रसंगोपात्त निघणारीं जीं कांहीं चळवळीचीं

अगदी यशवंत व थोडा काल टिकणारीं असतात त्यांत त्यांना पुष्कळच हालचाल करतां येते व ते ती आपखुषीनें व कार्यं तडीस लावावें म्हणूनच करतात. एक दोन असामी सोडून यांच्याइतपतही माणसें मातंग समाजांत सांपडत नाहींत.

रा. बाबूराव वायदंडे—हेही मातंग जातीचे पुढारी मध्यमवयीन असून त्यांची मराठी सातवी इयत्ता झालेली आहे. पुणें येथील डी. सी. मिशनमध्यें त्यांनीं पुष्कळ वर्षें शिक्षकाचें काम केलें आहे. डिप्रेस्ड् समाजांतही ज्या जातीचा दर्जा अत्यंत निकृष्ट समजतात त्यांत जन्माला येऊनही या थोर समाजसेवकानें आपला मनोविकास कांहीं विशेष प्रकारें केला आहे, हें त्यांच्याशीं चांगला परिचय झाल्यानें मात्र ध्यानांत येईल. आमच्या मतांशीं व मतप्रसाराच्या पद्धतीशीं त्यांचें जमत असल्यामुळें मंडळाकडे त्यांची ये जा सुरू झाली व शेवटीं आमच्या मंडळापैकींच ते एक झाले असें म्हणावयास हरकत नाहीं. मत-प्रसाराच्या कामीं लागणारा सोशिकपणा, विनयभाव, भाषणांतील मार्दव व निराश न होणें हे गुण या गृहस्थाच्या अंगीं भरपूर आहेत. पण गरिबीनें माणूस असतें तेवढें उंच दिसत नाहीं हेंच खरें. मनाचा मोकळेपणा, स्वत:चा मतभेद दर्शविण्याची संभावित व सूचक पद्धति व कसल्याही परिस्थितींत असतांना मनाला आराम देणारी विनोदबुद्धि हीं कसल्याही सुशिक्षित माणसाला शोभून दिसतील इतक्या दर्जाचीं या गृहस्थांच्या अंगीं आहेत. वरील गुणांमुळें व मतसादृश्यामुळें मी त्यांना मतप्रसारासाठीं पुन्हां पुन्हां बाहेर धाडिलें व तिन्हाईतांनीं पत्रें धाडून मला कळविलें आहे कीं, पाठविलेले प्रचारक फार उत्तम काम करितात. त्यांची प्रवासाची व्यवस्था व इतर रीतीनेंही चालतें रहावयाची व्यवस्था आम्ही करीत होतों पण त्याची कांहींच मातब्बरी नाहीं. साधनें असोत नसोत, जेवणखाण मिळो न मिळो, ते पायपिटी करतील व उपास काढतील. स्वजनांविषयीं पोटांत मोठा कळवळा असल्यामुळें व सुधार-लेल्या लोकांच्या पैलूदार जीवितांशीं चांगली ओळख झालेली असल्यामुळें यांच्या स्वकीयांच्या निरीक्षणांत मोठी मनोरंजक बारकाई असते व रिपोर्ट लिहिण्यांत थोडी वाङ्मयाची झाकही असते. मनासारखी कामाला संधि कोठेंच नसल्यामुळें ते सध्यां आपल्या भिलवडी गांवीं थोडाबहुत शेतीचा उद्योग करतां येतो का हें पहात असतात.

REFBK-0004806